## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/१/२००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दिनांक २०.१.२००५ रोजी सायंकाळी ५. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. उप—महापौर, श्रीमती जया साधवानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३२. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास, |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, | ३३. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम, | ३४. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३५. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३६. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३७. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ८. | श्रीमती मोकल सीमा | ३८ | श्री. सुरेश जाधव |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ३९ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४० | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ४१ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. ऐडके गणपत गोविंद | ४३. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४४. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४५. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४६. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४७ | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४८. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २१. | श्री. नाना आनंदा पवार, | ५१. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्री. जग्यासी राजु | ५२. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २३. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्री. शांताराम निकम, | ५४. | श्री. विनोद तलरेजा |
| २५. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५५. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५६. | श्री. बेहरानी मोहन, |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ५९. | श्री. हरदास माखिजा |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३१. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर | ६१. | श्री. गोविंदराम लुंड |

तर,

१. मा. महापौर. श्रीमती मालती करोतिया तसेच मा. सदस्य / सदस्या २. श्री. वाघे शामु बाबु, ३. श्रीमती. गुप्ता अनिता धमेंद्र, ४. श्रीमती. आहुजा निता प्रकाश, ५. श्रीमती. वनवारी मोना अशोक,. ६. श्री. मोहन

साधवानी, ७.श्री. रमेश चव्हाण, ८.श्रीमती. जयश्री सुर्वे ,९. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १०. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास,११.श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, १२. श्रीमती. भटीजा कोमल अमृत,१३.श्री. जयसिंघानी अनिल, १४. श्रीमती किरण लखी माखिजा, १५. डॉ. निना प्रकाश नाथानी,१६.श्रीमती. छाबरीया भारती पहलाज,१७.श्री. संजय रामचंद्र बठीजा, १८.श्री. बेहरानी ठाकुरदास , १९.श्रीमती मीनु राजकुमार दासानी ,२०. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ५. ४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिव:—विषय क्र. १ वाचून दाखवितात.

प्रश्नोत्तरे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—प्राश्नोत्तरे झाली पाहिजेत. प्रश्नोत्तरासाठी ऑक्टोबर महिन्यापासुन सभा झालेली नाही. व पुढची फेब्रुवारी महिन्यामध्ये जी सभा होणार आहे त्या सभेत सुध्दा प्रश्नोत्तरे येणार नाहीत. म्हणुन आता प्रश्नोत्तरे झाली पाहिजेत. नाही तर पुर्ण सभेचे कामकाज स्थगित करून दुस—या दिवशी ठेवा. आम्हाला असे वाटते की, प्रश्नोत्तरे झाली पाहिजेत नाहीतर भलेही स्थगित करून सभेचे कामकाज पुढच्या दिवशी घ्या.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— प्रश्नोत्तरे झाली पाहिजेत. कारण पुढच्या महिन्यात सुध्दा प्रश्नोत्तरे होणार नाहीत.

मा. सचिव:—प्रश्नोत्तरे.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी:—आपणा सर्वांच्या मतानुसार प्रश्नोत्तरे घेता येतील.

प्रश्न क्र. २८९ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. २८९:— शिट नं. ५१, सी—४२, रुम नं. १५६, उल्हासनगर—३ येथिल श्री. जी. जे. मोटवानी व दौलतराम मोटवानी यांच्या मालकीच्या जागेवरील इमारत मंजुर आराखडा क्र. १५६ /२०००/१०१०, दिनांक १३/१२/२००० नुसार सदर इमारती संबंधीत विचारलेल्या खालील प्रश्नाची योग्य सुचक समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्याबाबत.

प्र. १) शिट नं. ५१, सी—४२, रुम नं. १५६, उल्हासनगर—३ इमारत मंजुर आराखडा क्र. १५६ /२०००/१०१०, दिनांक १३/१२/२००० च्या नुसार सदर इमारतीस पायाभरणी दाखला घेतला आहे का?

प्र. १ ब) ) शिट नं. ५१, सी—४२, रुम नं. १५६, उल्हासनगर—३ इमारत मंजुर आराखडा क्र. १५६ /२०००/१०१०, दिनांक १३/१२/२००० च्या नुसार सदर इमारतीने बांधकाम पुर्णतेचा दाखला घेतला आहे का?

प्र. १ क) ) शिट नं. ५१, सी—४२, रुम नं. १५६, उल्हासनगर—३ इमारत मंजुर आराखडा क्र. १५६ /२०००/१०१०, दिनांक १३/१२/२००० च्या नुसार सदर इमारतीचे वाढीव बांधकाम आहे का? असल्यास किती? त्यावर आपण कोणत्या प्रकारची कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

उत्तर:—सदर इमारतीस पाया भरणी दाखला दिलेला नाही.

नाही.

होय, १६२.९५ चौ.मीटर

वाढीव बांधकामाबाबत नोटिस बजावण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सन्माननिय महापौरजी व आयुक्त साहेब, हा प्रश्न मी १ जानेवारी, २००४ रोजी दिला होता. याचे उत्तरात असे दिले आहे की , १६२. ७५ चौ.मी. चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे.

मा. सचिव:—यावेळेस ५. ४२ मिनिटे झाली आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—याबाबत आतापर्यंत काय केले ते जरा सांगा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, ते जे तेथे जास्त बांधकाम झालेले आहे. त्यांना फक्त नोटीस बजावली आहे. बाकी जी कार्यवाही आहे सुनवाई देवुन बांधकाम निष्कासित करण्याची ती बाकी आहे. ती कार्यवाही लवकरच केली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—साहेब, दहा—पंधरा वर्षात होईल?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—भुल्लर महाराज, आपण आता असे म्हणत आहात?

**मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आम्ही नेहमी सांगतो की, आपण आपल्या अधिका—यांचे संरक्षण करू नका. आमचे आपणांस नेहमी असे सांगणे आहे की, त्यांना जरा येथे येवून उत्तरे देवू दया. जेव्हा पासुन आपण आलात तेव्हा पासुन व्यासपीठावर उत्तर देण्यासाठी कुणी अधिकारी आला नाही. त्यांना येवु दया. अनाधिकृत बांधकामाबाबत काय उत्तर आहे?अनाधिकृत बांधकामास सहकार्य करत आहेत, त्यांना व्यासपीठावर उत्तर देण्यासाठी बोलवा. अधिकारी बेकायदेशिर बांधकामांसाठी सहकार्य करतात. व आपण त्यांचे संरक्षण करता.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—नाही महाराज, येथे सहकार्य करण्याचे , सरंक्षण करण्याचे प्रश्नच उद्‌भवत नाही. कायदयात असे म्हंटले गेले आहे की, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आयुक्तांनी दयायचे आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—हे तर जेव्हापासुन आपण आलात तेव्हापासुन सुरू झाले आहे. त्याअगोदर कुणी आयुक्त उत्तर देण्यास तयार नसत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—व हे पहा कुण्याही आयुक्तांना हेच बरे वाटेल की, आपला कनिष्ठ अधिकारी उत्तर देत आहे. परंतु असे नाही उत्तर देण्याची जबाबदारी माझी आहे. जर माझ्याकडे माहिती नसेल किंवा मला असे वाटत असेल की त्यांनीच उत्तर दिले पाहिजे. तर मी त्या बाबत सांगेन. मा. महापौरांच्या परवानगीने........

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—त्यांना बोलवा, त्यांनी आतापर्यंत काय केले आहे? १ जानेवारी, २००४ रोजीचा प्रश्न आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—ते उत्तर देण्यास येतील परंतु..... एक महिन्यापासुन, श्री. कोळेकर साहेब, सेवानिवृत्त झाल्यापासुन त्यांच्याकडे कार्यभार सोपविण्यांत आला आहे, ते सभागृहात येतील असे काही नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आता ते काय करणार आहेत? कोळेकर साहेबांनी कारवाई केली नाही. हे काय कारवाई करणाार आहेत ते जरा सांगा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—आम्हास करावी लागेल ना? मी आदेश देतो. ते जे आश्वासन मी देतो त्याची पुर्तताही मलाच करायची आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>सांगा काय करणार आहात आपण?

मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>ती जी कारवाई आहे. ती कारवाई पुर्ण केली जाईल. व लवकरात लवकर पुर्ण केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>साहेब, किती दिवसात, दोन महिने, चार महिने, सहा महिने, दोन वर्ष, चार वर्ष,

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>निष्कासित करावयाची येथे बरीचशी बांधकामे आहेत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>बरीचशी कसे, जसा प्रश्न येतो त्यास उत्तर दिले जाते की, याकामी नोटीस बजावण्यात आली आहे. तर ती नोटीस काय आपण नावासाठी बजावता? आपण उत्तर देत आहात म्हणुन आम्ही बोलत नाही. आपल्याठिकाणी दुसरा कुणी अधिकारी उत्तर देत असता तर आम्ही म्हंटले असते की तडजोडीची गोष्ट आहे. ज्यामुळे कारवाई होत नाही याचा अर्थ काहीतरी देणे घेणे झाले आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>देणे घेणे झाले आहे असा आपण विचार करू नका.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>आपण नाही परंतु आपल्या जागी दुसरा कुणी अधिकारी असेल तर आम्हाला असेच म्हणावे लागेल. यामध्ये काहीतरी देणेघेणे झाले आहे की ज्यामुळे या बांधकामावर कारवाई होत नाही. जे लोक देणेघेणे करत नाही त्यांचे बांधकाम निष्कासित केले जाते. आता मध्यंतरी ३ नंबर ओटी येथे एक बांधकाम निष्कासित केले गेले. तेथे लोक रहात होते.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>ठिक आहे दोन महिन्याच्या आत कारवाई केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>दोन महिन्याच्या आत?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>१६२. ७५ चौ.मी. जे अतिरिक्त बांधकाम झाले आहे चटईक्षेत्राचे उल्लंघन केले आहे ते तोडुन टाकले जाईल.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. २९० हा सुध्दा आपलाच आहे.

<u>प्रश्न क्र. २९०:—</u> प्र. क्र. १ मध्ये, १२ ओटी सेक्शन, निलेश अपार्टमेंट मागे, ए—ब्लॉक रोड, बाळकृष्ण नगर, उल्हासनगर—१ येथे डॉ. रवि शंकर श्रीवास्तव नामक व्यक्तीने सदर ठिकाणी लांबी १८ ग ६५ उंची २४ फुट ट्रेग्टेर (लोड बेरींग) नविन बांधकाम केले आहे. सदर ठिकाणच्या नव्या बांधकामा संबंधीत विचारलेल्या खालील प्रश्नाची योग्य सुचक समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्याबाबत.

प्र. १ अ) डॉ. रवि शंकर श्रीवास्तव नामक व्यक्तीने निलेश अपार्टमेंट मागे, ए—ब्लॉक रोड, बाळकृष्ण नगर, उल्हासनगर—१ येथे लांबी १८ X ६५ उंची २४ फुट ट्रेग्टेर (लोड बेरींग) नविन बांधकाम अधिकृत, कायदेशीर, महापालिकेच्या अटी व शर्तीनुसार मंजुर आराखडयानुसार परवानगी आहे का?

प्र. १ ब) डॉ. रवि शंकर श्रीवास्तव यांचे सदर ठिकाणच्या बांधकामाच्या जागेवर मालकी आहे का?

प्र. १ क) डॉ. रवि शंकर श्रीवास्तव यांचे सदर ठिकाणचे बांधकाम अधिकृत आहे का? नसल्यास आपण कोणत्या प्रकारची सदर बांधकामावर कारवाई केली आहे याबाबत खुलासा करावा.

<u>उत्तर:—</u> परवानगी घेतली नाही.

मालकी हक्काबाबत सदर विकास धारकाकडुन सदर विकास धारकाकडुन कागदपत्र मागणी केली आहे.

बांधकाम धारकास बांधकामाची कागदपत्र सादर करण्याबाबत नोटिस बजावण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—सचिव साहेब, मागील सभेत २९३ क्रमांकाचा प्रश्न प्रलंबित ठेवला होता.

मा. सचिवः—कुणाचा, कोणता?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—२९३ क्रमांकाचा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—तो प्रश्न पुर्ण झाला.

मा. सचिवः—आपणांस फक्त लेखी उत्तर प्रस्तुत करायचे होते. ते दिले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—प्रश्न क्र. २९०.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—प्रश्न क्र. २९० हा सुध्दा असाच अनाधिकृत बांधकामासंबंधिचा आहे. त्याबांधकामावर कायदेशिर कारवाई केली जाईल. महाराज, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर निश्चित वेळेच्या आत दिले जावू शकत नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—एक मिनिट, हे म्हणतात ते बरोबर आहे. १ जानेवारी, २००४ रोजीचा प्रश्न आहे. व एक वर्षानंतर चर्चेस येत आहे तरी सुध्दा.. याबाबत यांचा पुर्ण हक्क आहे की, याबाबत कारवाई व्हावयास पाहिजे होती त्यांनतर आपण या प्रश्नाचे उत्तर दयावयास हवे होते. व आपणच असे म्हणता की आपण विहित वेळेच्या आत उत्तराची अपेक्षा करू नका. हा जो प्रश्न आहे तो १ जानेवारी, २००४ रोजीचा आहे. बारा महिने झाले त्यास,.....

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—३१ मार्च अगोदर कारवाई पुर्ण केली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—पुर्ण केली जाईल?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—निश्चितच.

श्री. उत्तम लोणारे उपआयुक्त (मुख्यालय):—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब आणि सन्माननिय सदस्य प्रश्न क्र. २९० बाबत मी सांगु इच्छितो की ते बांधकाम टिअर गर्डरचे होते. तळमजला अधिक एक माळयाचे होते. त्यावर दुस—या माळयाचे बांधकाम केलेले होते त्याचे निष्कासन केले होते. बाजुच्या ज्या भिंती राहील्या आहेत. त्या सामाईक भिंती आहेत. त्यामुळे दुस—याचे नुकसान होवु नये म्हणुन त्यांचे निष्कासन करण्यांत आलेले नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—साहेब, तेथे फक्त दोन होल पाडण्यांत आली आहेत. एक पुढे व एक मागे, पत्रे तसेच वरच्या वरच आहेत.

श्री. उत्तम लोणारे उपआयुक्त (मुख्यालय):—पत्रे मी काढुन घेईन असे त्यांनी हमी पत्र दिले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—हमी पत्र दिले आहे? परंतु तेथुन ते काढलेले नाहीत. मग आपण दिशाभुल का करत आहात?

श्री. उत्तम लोणारे उपआयुक्त (मुख्यालय):—२४ तारखेनंतर पहाणी करून पत्रे काढुन टाकु. त्यांनी आम्हाला हमी पत्र दिलेले आहे त्याबाबत आम्ही त्यांना विचारणा करू त्यांनी पत्रे का काढले नाहीत. त्यानंतर आम्ही पत्रे काढुन टाकु.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>पुढल्या आठवडयात, २४ तारखेनंतर पत्रे काढणार? ठिक आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. २९२ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>प्रश्न क्र. २९१ झाला आहे का?

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. २९१ झाला आहे. तो मागील सभेत घेण्यात आला होता.

<u>प्रश्न क्र. २९२:—</u> उपरोक्त विषयानुसार उल्हासनगरचा विकास आराखडा सन २००० मध्ये प्रसिध्द झाल्यानंतर सदर प्रारुप विकास आराखडयावर महाराष्ट्र शासनाने दिनांक २९/११/२००२ रोजी स्थगन आदेश दिला होता.

सदर स्थगन आदेश रद्द झाला किंवा नाही. तसेच झाला असल्यास केव्हा झाला याची माहिती दयावी.

<u>उत्तर:—</u>उल्हासनगर शहराचा प्रारुप विकास आराखडा शासनाने दिनांक १०/५/२००१ रोजी प्रसिध्द केला असून सदर प्रारुप विकास आराखडयावर शासनाने दिनांक २९/११/२००२ रोजी स्थगिती आदेश दिले होते. प्रकारणी शासनानाकडील पत्र क्र. इपीएस /१२०२/२९६ प्र.क्र. ८३/०२/नवि—१२, दिनांक ७/११/२००३ च्या पत्रान्वये या महानगरपालिका आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई यांना खालीलप्रमाणे आदेश दिले आहे व त्याची प्रत या कार्यालयास माहितीस्तव पाठविण्यात आली आहे.

१. शासनाने दिनांक २९/११/२००२ च्या आदेशान्वये देण्यांत आलेली स्थगिती उटविण्यात येत आहे.

२. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्राकरीता तयार करण्यात आलेल्या विकास योजनेवर कोणतेही सुनावणी न होता विकास योजना आहे त्या स्थितीत अभिप्रायासह शासनाकडे सादर करण्यात यावी. त्या विकास योजनेबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>याबाबतची सद्यस्थिती काय आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>शासनाने तो स्थगन आदेश तर रद्द केला आहे. नंतर सुधारित प्रारूप विकास योजना रद्द करण्याबाबत निर्णय झाला होता. परंतु त्याची अधिसुचना अदयाप पर्यंत प्रसिध्द झालेली नाही. अधिसूचना प्रसिध्द करण्यास आता स्थगिती आदेश आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>म्हणजे आता निश्चित परिस्थिती काय आहे?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>सुधारीत विकास आराखडा रद्द करण्याबाबत निर्णय झाला आहे. त्याबाबत अधिसूचना प्रसिध्द करण्याचे बाकी आहे. ती अधिसूचना प्रसिध्द करण्यास स्थगिती आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>नाही. म्हणजे पुर्वस्थितीवर आले आहे ना?

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>आज सुधारीत विकास आराखडा सुध्दा अंमलात आहे. व १९७४चा मंजुर विकास आराखडा सुध्दा अंमलात आहे. ही आजची स्थिती आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>तर हे दोन्ही अंमलात आहेत?

**मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, सुधारीत विकास आराखडा रद्द झाल्याचा निर्णय आमच्याकडे आलेला आहे. परंतु त्याची अधिसूचना अदयाप झालेली नाही. व शासनाकडुन

आम्हाला जे उत्तर प्राप्त झाले आहे त्यामध्ये असे लिहिले आहे की, जोपर्यंत महानगरपालिका नवीन विकास आराखडा तयार करत नाही तोपर्यंत याबाबतीत मंजुर विकास आराखडा व सुधारीत विकास आराखडा यामधील कठोरात कठोर तरतुद लक्षात घेवुन निर्णय घ्यायचा आहे. तर त्या हिशोबाने दोन्हीही विकास आराखडे लागु आहेत.

मा. सचिव:—प्रश्न क्र. २९३ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

यावेळेस ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांचा प्रश्न व त्याच्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. २९३:— उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यात काम करीत असलेल्या सफाई कामगारांची माहिती मिळणे बाबत.

१) आरोग्य खात्यातील सफाई कामगारांची नेमणूक जून्या वार्ड पध्दतीने केली आहे का नविन पॅनल पध्दतीने केली आहे?

२) वार्ड / पॅनल नुसार एका वार्डास / पॅनलला किती कामगारांची नेमणूक केलेली आहे? सर्व वार्ड / पॅनलची संख्या दयावी.

३) प्रत्येक वार्ड / पॅनलमधील स्त्री / पुरुष कर्मचा—यांची संख्या दयावी.

उत्तर:—नविन पॅनल पध्दतीने केली आहे. सोबत तक्ता जोडला आहे.

## कॅम्प नं. १ ते ५, प्रभाग १ ते २५ सफाई कामगारांची यादी

| अ. क्र. | स्त्री कामगार | पुरुष कामगार | रिक्त | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५ | ३१ | | | ५६ |
| २ | १८ | २५ | | | ४३ |
| ३ | १२ | १५ | | | २७ |
| ४ | २५ | २२ | १ | | ४८ |
| ५ | १७ | २६ | १ | | ४४ |
| ६ | १६ | १८ | १ | | ३५ |
| ७ | १६ | १५ | १ | | ३२ |
| ८ | १८ | २२ | | | ४० |
| ९ | १६ | २० | २ | | ३८ |
| १० | २३ | ३४ | ४ | | ६१ |
| ११ | २६ | ३४ | ४ | | ६४ |
| १२ | २८ | ३४ | २ | | ६४ |
| १३ | १५ | २८ | १ | | ४४ |
| १४ | २२ | २६ | १ | २ (मुख्यालय) | ५१ |
| १५ | १६ | १८ | | १ | ३४ |
| १६ | १९ | २३ | | | ४२ |
| १७ | ११ | १७ | १ | | २९ |
| १८ | १६ | २७ | ३ | १ | ४४ |
| १९ | ३२ | ३४ | २ | | ६९ |
| २० | २६ | २३ | | १ | ५२ |
| २१ | ३० | २३ | ५ | | ५३ |
| २२ | २४ | २९ | | | ५८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | १९ | १९ | | | ३८ |
| २४ | २६ | ३४ | २ | | ६२ |
| मुख्यालय | ३ | १३ | २ | | १८ |
| २५ | २५ | ३८ | | | ६३ |
| **एकूण** | **५२४** | **६४८** | **३३** | **५** | **१२०९** |

मा. सचिव:—प्रश्न क्र. २९४ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. २९४:— उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळा अंतर्गत शाळा क्र. २५ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्ती / रंगकामाबाबत माहिती मिळणे बाबत.

१) उमपा शाळा क्र. २५ मध्ये करणेत आलेल्या दुरुस्ती व रंगकामाची वर्क ऑर्डर व अंदाजपत्रके मंजुर आहेत काय?

२) उमपा शाळा क्र. २५ मध्ये करणेत आलेले दुरुस्तीचे / रंगकाम केव्हा सुरु करण्यात आले व केव्हा संपले?

३) सदर काम करणारा ठेकेदार कोण कृपया नाव दयावे. तसेच मंजुरी दिलेली नसल्यास सदर काम कोणाचे आदेशान्वये काम करण्यात आले?

उत्तर:—सन २००३—२००४ करीता महानगरपालिका शिक्षण मंडळास शाळा दुरुस्तीसाठी रुपये ४०,००,०००/— चे बजेट मंजूर आहे. त्यानुर ३/६/२००३ रोजी शिक्षण मंडळाने शाळा दुरुस्तीचे टेंडर मागविले होते. त्याप्रमाणे सर्वात कमी दर असलेल्या मे. सद्‌गुरु कस्ट्र. कंपनी यांना या कार्यालयातून दिनांक ८/४/२००३ रोजी शाळा दुरुस्तीच्या कामांचे जनरल कार्य आदेश देण्यात आले. त्याप्रमाणे एकूण ३१,४७,८२०/— चे कामांचे कार्य आदेश या कार्यालयातून दिलेले आहेत. मात्र शाळा क्र. २५ चे दुरुस्ती व रंगकामाचे अंदाजपत्रक मंजूर नसल्याने या कामाचे कार्य आदेश या कार्यालयाने दिलेली नाही.

२) सदर कामाची माहिती काढली असता हे काम दिपांक ७/११/२००३ रोजी सुरु केले व २३/१२/२००३ ला बंद केलेले आहे.

३) सदर काम सद्‌गुरु कंस्ट्रक्शन कंपनी यांनी केलेले आहे. ठेकेदार हरेश केशवानी आहेत.
सदर काम मा. सभापती महानगरपालिका शिक्षण मंडळ उल्हासनगर यांचे तोंडी आदेशान्वये करणेत आले आहेत.

मा. सचिव:—उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—ठिक आहे.

मा. सचिव:—प्रश्न क्र. २९५ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

यावेळेस ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांचा प्रश्न व त्याच्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. २९५:— उल्हासनगर शहरातील पाणी समस्या दुर करणेचे दृष्टीने महानगरपालिकेने आमदार निधितून जलवाहिन्या टाकणेसाठी निविदा मागविल्या होत्या. सदर निविदा फॉर्म संबंधित ठेकेदारांनी भरुन दिले. सदर निविदा बाबत पूढे काय कारवाई झाली?

ज्या ठेकेदाराने लघूत्तम दराने निविदा भरली होती त्यांना कामाचे वाटप झाले काय?

कामाचे वाटप झाले असल्यास संबंधीताने काम सुरु केले काय? अदयापपर्यंत संबंधीत ठेकेदार काम सुरु का करत नाही?

कृपया याचा खुलासा येत्या महासभेत व्हावा ही विनंती.

उत्तर:—ठेकेदारांनी भरलेले दर अवाजवी असल्याने कोणत्याही ठेकेदारास काम वाटप करण्यात आले नाही. सदर कामासाठी फेर निविदा मागविण्यात आल्या आहेत.

मा. सचिव:—प्रश्न क्र. २९६ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

यावेळेस त्या सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. २९६:— उल्हासनगर महानगरपालिकेचे विविध खात्यामार्फत कामांच्या निविदा काढण्यात येतात, सदर निविदा ठेकेदार लघूत्तम दराने स्विकारतात किंवा ८० टक्के कामे ही डी.एस.आर. दराने सहकारी संस्थांना दिली जातात, त्यामूळे महापालिकेचे करोड रुपयाचे नुकसान होते. तरी यानंतर काढण्यात येणा—या निविदा लघुत्तम दराने ठेकेदारांना दिल्यास महापालिकेचा आर्थिक फायदा होवू शकतो. तरी आतापर्यंत अश्याप्रकारे दिलेल्या कामामूळे झालेल्या आर्थिक नुकसानास जबाबादार कोण?

सहकारी संस्थांना डी.अेस.आर दराने देण्यात आलेली कामे किती?

कृपया याची सविस्तर माहिती येत्या महासभेत देण्यात यावी मोघम माहिती देवू नये ही विनंती.

उत्तर:—मजूर कामगार सहकारी संस्थांना देण्यात येणारी कामे १) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम व गृहनिर्माण विभाग क्र. १०७७/५५९३३/ का. २७, दिनांक ३०रु३रु१९८९ २) १०/३/८४७१८/७८९/३, दिनांक १२/१९८४ ३) शासन निर्णय क्र. एलएबी/१०९८/प्र.क्र. १६४/इमारती/२/मंत्रालय, मुंबई —४०० ०३२, दिनांक ४/५/१९९९ नुसार मजुर कामगार संस्थांना रुपये ५.०० लाख रुपये ५.०० लक्ष पर्यंत करुन घेण्याची तरतुद आहे. सदर शासकीय धोरणेनुसार वेळोवेळी उचित निर्णय घेवून उप—निबंधक मजूर कामगार सहकारी संस्था, जिल्हा ठाणे यांच्या मार्फत कामे वाटप करण्यात येत आहे. म्हणून आर्थिक नुकसान होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

सदर प्रश्नास कुठलीही कालावधी दिली नसल्याने प्रश्न मोघम वाटतो. तरीही वर्ष २००३—२००४ या वित्तीय वर्षात सहकारी संस्थांना ३६७ कामे उप—निबंधक मजूर कामगार सहकारी संस्था, जिल्हा ठाणे, यांच्यामार्फत देण्यात आलेली आहेत.

मा. सचिव:—प्रश्न क्र. २९७ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

यावेळेस त्या सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. २९७:—आपण आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारल्यापासून लेखाशाखेमार्फत ठेकेदारांना अदा करणेत आलेल्या देयकांची सविस्तर यादी दयावी. सदर देयके लेखाशाखेत कधी आली व केव्हा मंजुर करुन अदा करणेत आली?

या देयकापूर्वीची प्रलंबीत देयके लेखा शाखेत आहेत काय?
असल्यास केव्हापासून प्रलंबीत आहेत?
प्रलंबीत ठेवणेची कारणे काय?
नंतर प्राप्त झालेली देयके अगोदर मंजूर करणेमागे प्रयोजन काय?

सदर प्रकरणात भ्रष्टाचाराचा किंवा काही विशीष्ट ठेकेदारांना सहकार्य करण्याचा प्रशासनाचा इरादा आहे काय?

कृपया याबाबत सविस्तर माहिती येत्या महासभेत दयावी ही विनंती.

उत्तर:—प्रदान केलेल्या सर्व देयकाची धनादेश पुस्तीकेमधील सविस्तर यादी कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

होय

सन २००० पासून निधी उपलब्ध नसल्यामुळे महापालिकेमधील आवश्यक कामे व इतर तातडीची कामे याचा विचार करुन देयके प्रदान केली जातात.

यामध्ये कुठल्याही भ्रष्टाचार झालेला नाही व ठेकेदारांना सहकार्य करण्याचा प्रश्नच येत नाही.

मा. सचिव:—प्रश्न क्र. २९८ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. २९८:— प्लॉट नं. ६१९, शिट नं. ६०, सी. ब्लॉक रोड, कल्याणी नगर , उल्हासनगर—१ येथिल बांधकाम नियमानुसार आहे का?

सदर बांधकामास सुधारीत मंजुरी किती वेळा दिली आहे?

दिलेल्या सुधारीत मंजूरी नंतर आज तारखेपर्यंत किती वाढीव बांधकाम केले आहे?

उत्तर:—नाही.

सदर भुखंडात असलेले बंगल्याचे बांधकामास या कार्यालयातर्फे दिनांक ९.१.२००२ व ४.३.३००३ रोजी सुधारीत बांधकाम परवानगी प्रदान करण्यात आल्या आहेत.

सुधारीत मंजूरीनंतर सदर इमारतीमध्ये ३५.७६ चौ.मी. वाढीव बांधकाम केले आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—उत्तर काय आहे?

मा. सचिव:—बांधकामाबाबत आहे. बांधकामाबाबत आहे. प्लॉट क्र. ६१९, शिट क्र. ६०, सी ब्लॉक रोड,

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—३५. ७६ चौ. मी. वाढीव बांधकाम केले आहे..

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, ३५. ७६ चौ. मी. चे जे वाढीव बांधकाम केले आहे ते निष्कासित केले जाईल.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—आयुक्त साहेब माझे म्हणणे असे आहे. गेल्या दोन तीन वर्षापासुन मी जो जो प्रश्न विचारला होता, अनाधिकृत बांधकामा विषयीचा त्या प्रश्नावर एक ठराविक असे उत्तर दिले आहे. श्री. भुल्लर महाराज यांचा सुध्दा तोच प्रश्न आहे. कायदेशिर कारवाई चालु आहे असे ते उत्तर, आतापर्यंत मी जेवढे काही प्रश्न विचारले तेवढयावर खरोखरच कायदेशिर कारवाई केली आहे का? आतापर्यंत या दोन तीन वर्षामध्ये मी विचारले, श्री. भुल्लर महाराज यांनी विचारले किंवा इतर काही सदस्यांनी विचारले त्याबाबत फक्त असे उत्तर दिले आहे की, कायदेशिर कार्यवाही चालु आहे. खरोखर कायदेशिर कार्यवाही झाली आहे का आणि किती जणांवर झाली आहे. कायदेशिर कारवाई होणार आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, सभागृहासमोर या प्रश्नांची जी काही उत्तरे प्रस्तुत केली आहेत. त्यामध्ये लिहिले आहे की, कायदेशीर कार्यवाही चालु आहे. तर त्याबाबत कायदेशिर कारवाई सुरू झाली आहे. जसे की कागदपत्र मागविणे, नोटीस देणे, सुनावणी देणे ही कारवाई सुरू

झाली आहे. परंतु आजपर्यंत सभागृहात किती प्रश्न विचारले व त्यापैकी किती प्रश्नांच्या उत्तरात कारवाई सुरू केली आहे असे म्हंटले आहे. त्याबाबतची विस्तृत माहिती सध्या तरी माझ्याकडे नाही. परंतु सभागृहास प्रशासनाकडुन जे काही लेखी स्वरूपात सादर केले जाते त्यानुसार कारवाई सुरू होते.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—मी प्रश्न विचारला आहे. २९.१.२००४ रोजी. म्हणजे जवळपास आज वर्ष होवुन गेले. वर्षभरानंतर सुध्दा जर त्यावर काहीच कारवाई होत नसेल तर त्याचा नेमका अर्थ काय समजायचा. जेव्हापासुन तुम्ही आयुक्त म्हणुन आलात तेव्हापासुन जेवढे जेवढे प्रश्न विचारलेले आहेत प्रत्येक प्रश्नावर ठराविक साच्याची उत्तरे दिली आहेत. यामध्ये नेमके काय आहे ते मला काही समजले नाही. कायदेशिर कारवाई चालु आहे म्हणजे नेमके काय हे मला समजुन येत नाही. श्री. महराज भुल्लर यांचा सुध्दा असाच प्रश्न होता. गेल्या दोन तीन वर्षात या महासभेत आम्ही जेवढे काही प्रश्न विचारले याबाबत तुम्ही उत्तरे दिली पाहिजेत ना? काय कारवाई केली आहे त्याबाबत. एक ठराविक उत्तर दिले की, कायदेशिर कारवाई चालु आहे तर संपला तेथेच विषय, म्हणजे आम्ही जो प्रश्न विचारतो त्याला काही महत्व नाही?

मा. सचिव:—प्रश्न क्र. २९९ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

प्रश्न क्र. २९९:— सन २००१—२००२ / २००२—२००३ साली स्टेशनरी प्रिन्टींग साठी किती खर्च केला गेला?

२००३—२००४ सालात किती खर्च अपेक्षित आहे?

सदर कामासाठी सदर साली किती व कोणते ठेकेदार काम करतात?

महानगरपालिका झाल्यानंतर ठरविलेले ठेकेदारच कामे घेतात हे सत्य आहे का?

उत्तर:—१) सन २००१ ते २००३ सालाकरीता स्टेशनरी व छपाईसाठी वरीलप्रमाणे खर्च झालेला आहे.
खर्चाचे तपशिल (रुपये लाखात)

| वर्ष | स्टेशनरी | छपाई | एकूण |
|---|---|---|---|
| १) २००१—२००२ | ५.७० | ६.६० | १२.३० |
| २) २००२—२००३ | १२.०६ | ९.२० | २१.२६ |
| एकूण | १७.७६ | १५.८० | ३३.५६ |

२) सन २००३—२००४ करीता खर्च अपेक्षीत आहे.
(खर्चाचे तपशिल रुपये लाखात)

| वर्ष | स्टेशनरी | छपाई | एकूण |
|---|---|---|---|
| २००३—२००४ | १०.०० | १६.५० | २६.५० |

३) सन २००३—२००४ करीता स्टेशनरी व छपाई करीता सोबत दिलेले ठेकेदारांचे न्यनत्तमदरावर मंजूरी दिलेली आहे.

| स्टेशनरी | छपाई |
|---|---|
| १) कैलास इंटरप्रायझेस, उल्हासनगर | १) प्लेटो प्रिंटींग, डोंबिवली |
| २) महादेव इंटरप्रायझेस, उल्हासनगर | २) कैलास इंटरप्रायझेस, उल्हासनगर |
| ३) सर्वेशम इंटरप्रायझेस, डोंबिवली | ३) इंमप्रिंट व ऑफसेट प्रिंटर्स, नाशिक |
| ४) श्रृती प्रिंटर्स, उल्हासनगर | ४) श्रुती प्रिंटर्स, उलहासनगर |

५) यश ट्रेडिंग कंपनी, डोंबिवली

महापालिका झाल्यानंतर भांडार विभागाद्वारा स्टेशनरी, छपाई व इतर साहित्य खरेदी हे जाहिर निविदाद्वारा / दरपत्रकाद्वारे मागविण्यात येते व न्युनत्तम दरधारकास काम दिले जाते.

४) सन २००३–२००३ करीता खर्च अपेक्षित आहे. (खर्चाचे तपशिल– रुपये लाखात)

| वर्ष | स्टेशनरी | छपाई | एकूण |
|---|---|---|---|
| २००३–२००४ | १०.०० | १६.५० | २६.५० |

मा. सचिव:—उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—उत्तर ठिक आहे.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३०० हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

यावेळेस त्या सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ३००:— उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे ज्या विभागात अपूरा व अनियमित पाणी पुरवठा होत आहे अश्या विभागात मोफत टॅकरने पाणी पुरवठा केला जातो. वास्तविक पाहता अश्या कामांच्या निविदा मागवून काम देणे आवश्यक असतांनाही निविदा न मागवता जयराम / गायत्री / विजय वॉटर सप्लायर्स यांना प्रति टॅकरचे ट्रिपला १७० रुपये या दराने दि. १६/५/२००३ पासून काम वाटप करणेत आले असून त्यापूर्वी म्हणजेच दि. ९/५/२००३ रोजी मोहित / मनोज वॉटर सप्लायर्स, उल्हासनगर–३ यांनी प्रती टॅकरला १६० या दराने काम करणेची तयारी दर्शवूनही त्यांना काम न देता जयराम / गायत्री /विजय वॉटर सप्लायर्स यांना जास्त दराने काम देणेत आले यामुळे महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यास जबाबदार कोण?

निविदा भरलेली नसतांना ठेकेदारांना कार्यादेश देणेमागे प्रशासनाचा हेतू व उद्देश कोणता?
कृपया वरील प्रश्नांची सविस्तर माहिती येत्या महासभेत दयावी ही विनंती.

उत्तर:—सन २००३–२००४ या वित्तिय वर्षामध्ये टॅकरव्दारे पाणी पुरवठा करण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या.

१. मेसर्स श्वेता ट्रासपोर्ट रू. १७०/– प्रती टॅकर्स
२. मेसर्स जयराम वॉटर सप्लायर्स रू. १७०/– प्रती टॅकर्स
३. मेसर्स एस. टी. तिवारी रू. १७०/– प्रती टॅकर

वरील निविदा व्यतिरिक्त खालील ठेकेदारांनी काम करण्यास उत्सुक असल्याने अर्ज दिले होते.

१. गायत्री वॉटर सप्लायर्स रू. १७०/– प्रती टॅकर
२. विजय वॉटर सप्लायर्स रू. १७०/– प्रती टॅकर
३. माहीत वॉटर सप्लायर्स रू. १६०/– प्रती टॅकर
४. मनोज वॉटर सप्लायर्स रू. १६०/– प्रती टॅकर

कामाच्या आवश्यकतेनुसार अटी व शर्ती पूर्ण करणा–या ठेकेदारांचा विचार करण्यात आला यासाठी हा दिनांक १२.५.०३ रोजीच्या स्थायी समिती विषय समोर ठेवण्यात आला होता. मेसर्स माहित/ मनोज वॉटर सप्लायर्स यांचे दर (रू .१६०:–) कामी असेल तरी ते कामाची अर्हता (पात्रता) पुर्ण करू शकत नव्हते. त्यांचेकडे स्वत:चे पुरेसे टॅकर असल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध होऊ शकले नाही.

मात्र स्थायी समिती दि. १२.५.०३ ठराव क्र. १८ नुसार प्राप्त निविदाधारक व अर्जदारांपैकी मे. गायत्री व विजय वॉटर सप्लायर्स हे अर्हता पूर्ण करीत असल्याने त्यांनाही कामाची एकुण आवश्यकता लक्षात घेवुन त्याप्रमाणे संबंधीत ठेकेदारांना कार्यादेश देण्यात आले.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३०१ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. ३०१:— महासभा प्रश्न क्र. २७४ अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे मागासवर्गीय अनुशेष भरतीत विविध पदावर किती कर्मचारी नेमले असा प्रश्न उपस्थित केला असता एकूण ९४ उमेदवारांना नियुक्त्या दिल्याचे कळविले आहे. त्या अनुषंगाने सदर भरती नंतर मगासवर्गीय अनुशेष भरणेसाठी मुलाखती घेतल्या का?

किती कर्मचा—यांना / उमेदवारांना नियुक्त्या दिल्या?

कोणत्या पदावर नेमणूक केली? सदर मुलाखती कोणत्या नियमान्वये केल्या?

कृपया याची माहिती येत्या महासभेत दयावी ही विनंती.

उत्तर:—मागासवर्गीय कर्मचारी/ उमेदवारांच्या दि. २८.१.०४ व २९.१.०४ रोजी मुलाखती घेतल्या.
एकुण ३७ उमेदवारांना नियुक्त्या देणेची प्रक्रिया सुरू आहे. लघुलेखक (निम्न),कनिष्ठ लिपिक, जोडारी, पंपचालक, फायरमन हया पदांच्या मुलाखती सेवाभरती नियमानुसार घेतलेल्या आहेत.

मा. सचिवः—उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—उत्तर ठीक आहे.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३०२ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

यावेळेस ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांचा प्रश्न व त्याच्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ३०२:—१) जनरल अरुणकुमार वैद्य सभागृह (टाउन हॉल) जो पूढील ३० वर्षासाठी बांधा व वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर श्री. कुमार चैनानी यांना दिलेला असून त्याचे काम सध्या चालू आहे. त्याचा प्लॉन मंजूर करुन घेतला आहे का?

२) असल्यास प्लॉन प्रमाणे काम चालू आहे का? चटई निर्देशांकाचे उल्लंघन केले आहे का?

३) पूर्वीच्या प्लॉन मध्ये किंवा बांधकामामध्ये तळमजला फक्त पार्किंग करता वापरण्यासाठी होता तेथिल आर.सी.सी. ची भिंत तोडली असून तोडतांना महापालिकेची परवानगी घेतली आहे का?

४) भिंत तोडल्यामूळे महापालिकेचे किती नूकसान झाले?

कृपया वरील प्रश्नांची सविस्तर उत्तरे / माहिती येत्या महासभेमध्ये देण्यात यावी.

उत्तर:—१. त्याचा प्लान नगररचना विभागाकडुन आजपर्यंत मंजुर करून घेतला नाही.
२. प्लॅन मंजुर करून घेतले नसल्याने सदया काम बंद आहे.
३. आर.सी. सी. भिंत तोडण्यासाठी नगररचना विभागाकडुन परवानगी घेतलेली नाही.
४. अंतर्गत बदल करून घेण्याची मुभा असलेने नुकसान झालेले नाही.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३०३ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३०३:—</u> उल्हासनगर महानगरपालिकेस सन २००२—२००३ या आर्थिक वर्षात म्हाडा कडुन (महाराष्ट्र शासनाकडुन) लोकहिताची लोकोपयोगी कामे करणेसाठी निधी उपलब्ध झाला आहे का? झाला असल्यास सविस्तर तपशिल दयावा.

तसेच सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सन २००२—२००३ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र शासनाकडून निधी उपलब्ध झाला आहे का? झाला असल्यास सविस्तर तपशिल येत्या महासभेत दयावा ही विनंती.

<u>उत्तर:—</u>उल्हासनगर महानगरपालिकेस सन २००२—२००३ या आर्थिक वर्षात म्हाडाकडुन रक्कम रूपये ३३,७७,०००/— निधी उपलब्ध झाला आहे.

त्याची तपशिलवार माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडुन प्राप्त करून घ्यावी.

सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत २००२—२००३ या अर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र शासन व केंद्रशासनाकडुन उपलब्ध झाला आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | घटक | केंद्र शासन | राज्य शासन | एकुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागरी रोजगार योजना | निरंक | निरंक | निरंक | १८ कामांना मंजुरी मिळाली असुन कार्यवाही चालु आहे. |
| २ | स्वयंरोजगार योजना | निरंक | निरंक | निरंक | या घटकातुन ८५ लाभार्थ्यांना अुनदान ४. ६१ लाख वितरण करण्यात आले आहे. |
| ३ | प्रशिक्षण योना | २६२५०० | ८७५०० | ३५०००० | प्रशिक्षण योजनामध्ये सन ०१—०२ या वर्षातील उद्दीष्टये ५२३ व सन ०२—०३ या वर्षाचे उदिष्ट ६३० मध्ये पुर्ण झाले आहे. लाभार्थी संख्या ११५३ असून खर्च २१.१३ लाख झालेला आहे. |
| ४ | महिला व बालके विकास गट | ३७५०० | १२५०० | ५०००० | ०८ डॉक्वागट स्थापन केलेली असुन त्याची कार्यवाही चालु आहे. |
| ५ | बचत व पतसंख्या | १५००० | ५००० | २०००० | ४५ बचत गट स्थापन केलेले असुन त्यांची कार्यवाही चालु आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | मुलभुत सोयी सुविधा | ७००० | ३००० | १०००० | लोकसेवा कंद्राच्या उद्‌घाटनाकरीता ०. ०२ खर्च करण्यात आला. |
| ७. | सामाजिक संरचना | ११२५० | ३७५० | १५००० | ९ ठिकाणी महिलांचे प्रशिक्षणार्थ शिबिर व चर्चासत्र घेण्यात आले त्यावर ७६४७ रूपये खर्च करण्यात आला. |
| एकुण | | ३३३२५० | १११७५० | ४४५००० | |

टिप :— सन २००१—२००२ पर्यंत व सन २००२—२००३ पर्यंतचा निधी शिल्लक होता प्रशिक्षण घटकाचे उदिष्टांची पुर्तता केल्याने २१. १३ निधी खर्च झाल्याने शिल्लक निधी सदर घटकांमध्ये उपलब्ध नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—मा. महापौरजी, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत या महानगनपालिकेमध्ये ही योजना राबविण्यात आली होती. तेव्हा या शहरातील लोकांना रोजगार देवुन प्रत्येक प्रभागात सी.सी. पॅसेज, ड्रेनेज,अंडर ग्राऊंड ड्रेनेज व ड्रेन अशी कामे हाती घेण्यात आली होती परंतु या ३—४ वर्षापासुन असे एकही काम या योजनेमार्फत या शहरात राबविण्यात आलेले नाही त्याचे कारण काय हे प्रशासनाने सांगावे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचे जे विविध घटक आहेत त्यामध्ये नागरी रोजगार हा एक घटक आहे. त्यानुसार काही कामे या शहरात केली गेली होती. त्याबाबतीत काही तक्रारी आल्या होत्या. व तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार आमचे काही कर्मचारी निलंबित सुध्दा झाले होते आपणांसर्वांना याची माहिती आहे. ही जी नागरी रोजगार योजना जी आहे. तीची सर्वात मोठी अट जी आहे की, या योजने अंतर्गत काम करणारी व्यक्ती ही दारीद्रय रेषेखालील असली पाहिजे. व उल्हासनगर शहरातील दारीद्रय रेषेखालील लोकांची जी यादी तयार केली आहे त्यामध्ये त्या व्यक्तीचे नाव समाविष्ट असले पाहिजे. व या शहरात अशी स्थिती आहे की, दारीद्रय रेषेखाली नाव असुनही ते लोक या योजनेअंतर्गत काम करण्यास येत नाहीत. व जर व्यक्ती काम करण्यास आली नाही तर ही जी योजना आहे तिची अंमलबजावणी करणे अशक्य होत आहे कारण की त्या व्यक्तींनाच रोजगार दयायचा आहे. व ती व्यक्ती रोजगार घेण्यासाठी येत नाही म्हणुनच नागरी रोजगार योजना या शहरातच नाही तर संपुर्ण महाराष्ट्रात यशस्वी होवु शकली नाही. जर कुण्याही गरीबाला रोजगार दयायचा असेल तर ते संभव आहे. परंतु महानगरपालिका क्षेत्रात दारीद्रय रेषेखालील ज्या व्यक्ती आहेत त्यांनाच रोजगार दयायचा आहे. तर या योजनेची अंमलबजावणी करणे शक्य नाही. यामुळेच येथे ही योजना सफल होवु शकली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—मा. आयुक्त साहेबांनी आता सांगितले की, या योजने अंतर्गत दारीद्रय रेषेखालील कुणी व्यक्ती काम करण्यास पुढे येत नाहीत. तर आयुक्तसाहेब आपण याबाबतीत वर्तमानपत्रात अशी काही जाहिरात दिली होती का की महानगरपालिकेच्या वतीने यायोजनेअंतर्गत रोजगार उपलब्ध होणार असल्याने आपण या संधीचा फायदा घ्यावा, एक चांगली योजना आपण बंद केली. आपण म्हणालात की पुर्ण महाराष्ट्रात योजना बंद आहे तर आपण महाराष्ट्रातील काही नगरपालिका/ महानगरपालिकांमधुन अशी माहिती घेतली आहे का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—नाही. नाही. योजना बंद केली आहे असे नाही मी म्हंटले. योजना तर चालु आहे. व ज्या ज्या शहरांना ही योजना लागु आहे. तेथे दारीद्रय रेषेखालील लोक काम

करण्यास येत नाहीत. दुसरे हे ही त्याचे एक कारण आहे की, जे पैसे दिले जातात ते सुध्दा कमी आहेत. या दोन कारणांमुळे काम होत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—साहेब, या शहरामध्ये एवढे लोक बेरोजगार आहेत आणि ते लोक या योजनेअंतर्गत काम करण्यास तयार आहेत. आपण कुठल्या आधारावर सांगितले की हे लोक काम करण्यास तयार नाहीत म्हणुन. आमच्याकडे काही लोक येतात म्हणतात की आम्हाला काही रोजगार दया. तर या योजनेमार्फत किती लोक काम करण्यास तयार आहेत. अशी चांगली योजना या शहरामध्ये आपण का राबवित नाहीत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, लोक काम करण्यास तयार असतील तर योजनेची अंमलबजावणी करण्यास आम्हास सुध्दा काही अडचण नाही. आम्ही पुन्हा स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवुन लोकांना विनंती करू की, त्यांना रोजगार हवा असेल तर त्यांना रोजगार उपलब्ध करून देवु.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—मा. आयुक्त साहेब, मागच्या वेळेस या योजने अंतर्गत काही कामे हाती घेण्यात आली होती. त्यामध्ये व्यायामशाळा होती. त्यानंतर या योजनेमध्ये काही भ्रष्टाचार झाल्यानंतर काही अधिका—यांवर पोलिस केसेस झाल्या. त्यातील काही अधिका—यांना आपण कामावर घेतले त्यांना कुठल्याआधारावर कामावर घेतले. दुसरे की जी कामे अर्धवट अवस्थेत आहेत त्यांचे काय? या योजनेअंतर्गत लाखो रूपये खर्च केले ती कामे अदयापही अर्धवट अवस्थेत आहेत. त्यामध्ये व्यायामशाळा आहेत समाजमंदीर आहे तर अशा कामांचे पुढे काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—माझ्यामते या योजनेतील भ्रष्टाचारामुळे ज्याकुणाला आम्ही सेवेतुन निलंबित केले आहे. त्यातील कुणालाही कामावर घेतले नाही. परंतु याबाबत माझ्याकडे सविस्तर माहिती आता उपलब्ध नाही. मा. महापौर महोदया,मी आपणांस विनंती करतो की, या प्रश्नाबाबत पुढील महासभेत सविस्तर माहिती दिली जाईल. या योजनेची कार्यवाही करण्याबाबत काय काय पावले उचलली आहेत. व या योजनेतील जे काही कर्मचारी निलंबित केले होते त्यातील लोकांना पुन्हा कामावर घेतले, का घेतले ते आपणांस सांगितले जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—दुसरे असे की जी कामे अर्धवट आहेत त्यांचे काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—त्याबाबत सुध्दा पुढील महासभेत माहिती दिली जाईल.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—महापौर महोदया, हा जो सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा विषय आहे. सध्या शहरामध्ये दारीद्रय रेषेखालील कुटूंबाचे सर्वेक्षण करण्याचे काम सुरू आहे. आता चर्चेमध्ये हा सुध्दा प्रश्न आला की, रोजगारासाठी मजुर उपलब्ध होत नाहीत. तर दारीद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करत असताना आता आपणास याबाबत माहिती देताना त्यामध्ये आणखी एक रकाना टाकणे शक्य आहे का की त्या कुटुंबामध्ये अशा प्रकारचे मजुरीचे काम करणारे लोक उपलब्ध आहेत का? आपणांस आवश्यक असलेले मजुर, मिस्त्री तेथे उपलब्ध होवु शकतील का?असे काम करणारे लोक उपलब्ध आहेत का? असा रकाना आपणांस समाविष्ट करता येवु शकेल का?अगोदर उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये या प्रकारचा रकाना समाविष्ट केल्यास सविस्तर माहिती आपल्याकडे उपलब्ध होवु शकेल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—दारीद्रय रेषेखालील कुटूंबाचे सर्वेक्षण कोण करत आहे?

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—आपणांकडे चालु आहे ना सध्या.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—नाही, नाही. दारीद्रयरेषेखालील कुटूंबाच्या सर्वेक्षणाचे जे काम आहे. याबाबतीत या अगोदर सर्वेक्षण झालेले आहे तहसिलदारांकडे त्याची यादी आहे. ती यादी पाहुनच आम्ही त्या लोकांना कामावर घेतो.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—महापालिका स्वत: नाही करत का?

<u>श्री. दुसाने (उपआयुक्त शहर):–</u>राज्य शासनाच्या आदेशानुसार संपुर्ण महाराष्ट्रात एप्रिल आणि मे महिन्यामध्ये सुवर्ण जयंती रोजगार योजनेच्या लाभीर्थीच्या सुधारीत सर्वेक्षणाचे काम करायचे आहे. केंद्र शासनाच्या ज्या नवीन मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. ज्यामध्ये कोणत्याही व्यक्तीच्या उत्पन्नाची जी मर्यादा होती. रूपये ४१९. ९५ पैसे त्याजागी रू. ५१९. ९५ पैसे या हिशोबाने पुन्हा सर्वेक्षण करायचे आहे आणि त्याबाबतीत जो फॉम तयार केला आहे तो संचालक नगरपालिका, प्रशासन , संचालनालय यांच्याकडुन तयार करण्यांत आलेला आहे. त्यामध्ये ही बाब सामील आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:–</u>सर्वेक्षण आपणच करतो ना? महापालिका.

<u>श्री. दुसाने (उपआयुक्त शहर):–</u>सर्वेक्षण महापालिकाच करणार आहे परंतु त्याबाबतीचे जे वेळापत्रक आहे. ते त्यांनी तयार केले आहे, त्याबाबतची पुर्ण माहिती संगणकीय स्वरूपात उपलब्ध होणार असल्याने सर्वेक्षणाचे स्वरूप चांगले राहणार आहे.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३०४ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३०४:–</u> श्री. डी.टी. देसाई राहणार पुष्पकुंज कैलास कॉलनी, ब्लॉक अे ९४४/१८८८, उल्हासनगर–५ यांनी रहिवाशी क्षेत्रात सुरु असलेल्या अनधिकृत गॅरेजबाबत तक्रार दिली असून रहिवाशी क्षेत्रातून गॅरेज हटविणेची विनंती केली होती त्या अनूषंगाने खालील प्रश्नाची माहिती दयावी.
उल्हासनगर शहरात एकूण मोटार गॅरेज किती? महापालिकेने त्यांना परवानगी दिली आहे का?
त्यातील परवानगी असलेले व अनाधिकृत गॅरेज किती?
महापालिका रहिवाशी क्षेत्रात गॅरेजला परवानगी देते काय?
रहिवाशी क्षेत्रात अनधिकृतपणे चालविल्या जाणा–या गॅरेजवर महापालिका कारवाई करते का? कोणती?
रहिवाशी क्षेत्रात पेट्रोल, डिझेल ऑईलचे अनधिकृतपणे साठे करता येतात का?
नसल्यास अश्याप्रकारे साठे करणा–यावर काय कारवाई केली जाते?
गॅरेजमूळे होणा–या हवा व ध्वनी प्रदुषणावर नियंत्रण ठेवणेसाठी महापालिका काय कारवाई करते?
अदयापपर्यंत अश्या किती गॅरेजवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे?
नसल्यास अदयापपर्यंत का कारवाई करण्यात आली नाही?
याचा अर्थ काय समजायचा? रहिवाशी क्षेत्रातील गॅरेज इतर ठिकाणी हलविता येतील काय?

कृपया सदर प्रश्नांची उत्तरे येत्या महासभेत दयावीत ही विनंती.

<u>उत्तर:–</u>माहिती उपलब्ध नाही तथापी सर्वेक्षण करून माहीती देण्यात येईल.
सर्वेक्षण झाल्यानंतर माहीती देण्यात येईल.
नाही.
कारवाई करण्यात येईल.
अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करता येवु शकते.
नाही.
कारवाई करण्यात येईल.
विकास आराखडयातील तरतुदीप्रमाणे अनुज्ञेय क्षेत्रात गॅरेज हटविण्याची कारवाई करणेत येईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u>मा. महापौरजी, सचिव साहेब जो प्रश्न महाराज भुल्लर यांनी उपस्थित केला तोच प्रश्न मी उपस्थित करणार आहे की, अधिका–यांना पाठीशी घालु नका. मी जो प्रश्न विचारला आहे तो ३० जानेवारीख, २००४ आहे. तो वरील प्रमाणेचा आहे. त्याचे उत्तर दिले आहे माहिती उपलब्ध नाही. सर्वेक्षण करून माहिती देण्यात येईल. माझा प्रश्न असा आहे की आतापर्यंत सर्वेक्षण झाले नाही का?

<u>श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):–</u>मा. महापौर महोदया, महापालिकेने अदयाप सर्वेक्षण केलेले नाही. परंतु जी गॅरेज होती त्यांचे आम्ही निष्कासन केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>कोणत्या तारखेला निष्कासन केले. काल परवा देसाई नावाची जी व्यक्ती आयुक्तांना भेटली. आठ दिवस अगोदर त्यांची तक्रार तीच होती की, अदयापपर्यंत तेथे गॅरेजेस आहेत. आणि आपण उत्तर दिले आहे की, गॅरेजेसवर कारवाई केलेली आहे.

<u>श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—</u>गॅरेजचे काम तेथे चालते अशी माझ्याकडे माहिती आहे. त्याबाबत माहिती घेवुन पुढच्या सभेत मी आपणांस सांगतो. गॅरेज चालु होते तेथे परंतु त्याचे बांधकाम आम्ही निष्कासित केले आहे. तारीख निश्चित पणे मला माहित नाही परंतु निष्कासित केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>आयुक्त साहेब हसत आहेत.

<u>श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—</u>गॅरेज का चालु आहे. परवानगी आहे किंवा नाही. परवानगी घेतली असेल तर ते मला पहावे लागेल. ती माहिती आता माझ्याकडे नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>याबाबत आयुक्त साहेबांना माहिती आहे. तुम्ही आयुक्त साहेबांशी चर्चा करा. आणि जिथे गॅरेज आहे त्यांना परवानगी आहे किंवा नाही, परवानगी नाही त्यांच्याकडे अशी माहिती आयुक्तांना आहे.

<u>श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त मुख्यालय):—</u>ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>मा. उपायुक्त साहेब, उल्हासनगर मध्ये राहणा—या सर्व लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. एका व्यक्तीने आपल्याकडे तक्रारी केल्या आपण त्याची दखल घेतली नाही म्हणुन मी हा प्रश्न या महासभेत उपस्थित केला. त्यानंतर त्या व्यक्तीचे असे म्हणणे आहे की, त्या त्रासाने माझी आई वारली. तर आपण अशा लोकांकडे लक्ष देत नसल्यामुळे असे अनेक प्रकार घडतात याला जबाबदार कोण? सामान्य माणुस या शहरामध्ये राहतो. या महापालिकेला टॅक्स भरतो. म्हणुन सर्व लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे. हे महापालिकेचे कर्तव्य आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—</u>महापौर महोदया, याच प्रश्नाच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे असे म्हंटले आहे की, सर्वेक्षण झाल्यानंतर माहिती देण्यात येईल. जानेवारी, २००४ चा प्रश्न त्याला जवळ जवळ आता एक वर्ष उलटुन गेले. असे प्रत्येक प्रश्नाच्या बाबतीत प्रशासनाने केले तर आणि ज्यावेळेस महासभेमध्ये एक—एक वर्षानंतर प्रश्न येणार त्यावेळेस पुन्हा तीच उत्तरे ऐकायची की पुढच्या महासभेत उत्तर देतो. याबद्दल काहीतरी उपाययोजना आपण केल्या पाहिजेत. असे स्पष्ट निर्देश, आदेश याबाबतीत आपण जारी केले पाहिजेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, हे सर्वेक्षण अदयाप पर्यंत सुरू झालेले नाही. हे मी सभागृहास सांगु इच्छितो की, गॅरेजेस वर ही जी कारवाई व्हावयास पाहिजे होती ती अदयाप झालेली नाही हे खरे आहे. हे जे एक गॅरेज आहे त्यावर कारवाई केली जाईल. आजपर्यंत कारवाई का झाली नाही. त्याची सुध्दा चौकशी केली जाईल. एकदा कारवाई केली होती परंतु तीचा जो परिणाम दिसावयास पाहिजे होता तो दिसुन आला नाही. सर्वेक्षण आम्ही लवकरच सुरू करू शकु. परंतु माझी सुध्दा सभागृहास एक विनंती आहे. धंदे व्यवसायांसाठी जर परवाने दयायचे असतील तर त्याच्यासाठी उपविधी असले पाहिजे. व दिड दोन वर्षापुर्वी आम्ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७६ नुसार शहरात जितके काही व्यवसाय केले जातात. ते मग गॅरेजेस असोत, सलुन असोत, किंवा कोणत्याही वस्तुची विक्री करायची असेल त्याबाबत ट्रेड लायसन्स घेणे बंधनकारक असते. लायसन्स दयायचे तर कोणत्या आधारावर? ट्रेड लायसन्स घेण्याबाबतचे आमचे उपविधी आम्ही आपल्या समोर ठेवले होते. त्यास अदयाप पर्यंत आपण मंजुरी दिली नाहीत. हे जर आपण केले तर आपल्या शहरामध्ये किती लोक लायसन्स घेवुन व्यवसाय करतात. किती लोक बिना लायसन्स घेवुन व्यवसाय करतात. कोण कुठे व्यवसाय करतो. याची माहिती गोळा करणे आम्हालाही सुकर होईल. त्यात गॅरेजवर ३१ जानेवारी, पुर्वी कारवाई केली जाईल. व सर्वेक्षण जे आहे व ट्रेड लायसन्स बाबतीत जे उपविधी आहेत. त्यांना मंजुरी मिळाल्यानंतर सर्वेक्षण केले जाईल. येथे जे व्यवसाय करतात. ते जर नॉर्मसच्या हिशोबाने जर ते व्यवसाय करत असतील तर परवानेही दिले जातील.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३०५ हा श्रीमती नंदीनी बामणकर यांचा आहे.

यावेळेस त्या सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ३०५:— उल्हासनगर शहरातील अनधिकृत बांधकामे तोडण्याचा आयुक्तांचा प्रामाणिक प्रयत्न चालू असतांना शहरातील जनजिवन अशा प्रकारच्या कॉंक्रिटीकरणामुळे विस्कळीत होवू नये व दिवसेंदिवस वाढत्या अनधिकृत बांधकामांमूळे लोकांच्या समस्या वाढू नये म्हणून आयुक्तांनी चालविलेल्या कामांच्या पध्दतीस अधिका—यांचे सहकार्य नसल्याचे संशयाचे वातावरण दिसत आहे.

त्याचेच उदाहरण म्हणजे खालील बांधकामांना सहकार्य असल्याशिवाय कामे चालू आहेत का?

येत्या महासभेत खालील प्रश्नांची उत्तरे मिळावीत ही विनंती.

१) फर्निचर बाजार, न्यूईरा हायस्कूल समोर व कॅनरा बॅकेच्या बाजूला, उल्हासनगर—३.

सदर इमारतीचे बांधकामास महापालिकेने मंजूरी दिली आहे काय? सदर बांधकाम मंजूर नकाशा प्रमाणे सुरु आहे का? सदर इमारतीचे बांधकामास पायाभरणीदाखला घेतला आहे का? सदर इमारतीचे बांधकामात वाढीव बांधकाम आहे का? असल्यास महापालिकेने कोणती कारवाई केली किंवा करणार आहे?

वरील माहितीसाठी सादर.

उत्तर:—१. होय, सदर इमारतीस या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. १. उमपा/नरवि/बांप/२२/०३/१३४ दि. ९.५.०३ २. उमपा/नरवि!बांप/२३/०३/१३६ दि. ९.५.०३ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

नाही.

नाही.

होय, त्याबाबत संबंधितास महापालिकेने एम.आर.टी.पी. कादयान्वये नोटीस बजावली आहे. त्यास सुनावणीही दिली असुन ती चालु आहे. याबाबत मात्र सिव्हील एच. सिनीयर डिव्हीजन न्यायालयाने जैसे थे स्थिती ठेवणेबाबत आदेश दिले आहेत.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३०६ हा श्री. नथु सोनावणे यांचा आहे.

प्रश्न क्र. ३०६:— उल्हासनगर—३ येथिल पप्पू गार्डनच्या मेन गेट समोर तळमाळा + २ माळयाच्या आर.सी.सी. इमारतीचे बांधकाम अनाधिकृतपणे नाल्यावर अतिक्रमण करुन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आहे. सदर नाला मोठा असल्याने संबंधीत बांधकामामूळे पावसाळयात पाणी अडून सदरचा विभाग जलमय होण्याचा धोका असल्याने संबंधीत बांधकामाची चौकशी होवून तात्काळ कारवाई करण्यात यावी व खालील प्रश्नाची सूचक अचूक समाधानकारक उत्तरे दयावी ही विनंती.

सदरचे बांधकामास महापालिकेने परवानगी दिली आहे काय?

सदरचे बांधकाम मंजूर आराखडयानुसार सुरु आहे का?

सदरचे बांधकामात वाढीव / अनाधिकृत बांधकाम आहे का? असल्यास किती?

नाल्यावर बांधण्यात आलेले सदरचे बांधकाम महापालिकेचे दृष्टीने अनाधिकृत आहे का?

असल्यास अदयापपर्यंत कोणती कारवाई केली? नसल्यास केव्हा करणार?

वरील आपल्या माहितीसाठी सादर.

उत्तर:—होय, सदर इमारतीस या कार्यालयाचे बांधकाम प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/४५/०३/७७६, दि. १६.८.०३ अनवये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

नाही.

होय, १९.२६ चौ.मी

नाल्यावर बांधकाम करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात आली आहे.

<u>मा. सचिव:—</u>उत्तर ठिक आहे?

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनावणे:—</u>ठिक आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. ३०७ हा श्री. पृथ्वी वलेचा यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३०७:—</u> प्लीज मेक इट कनवीनीएंट टू लिस्ट माय फॉलोविंग क्वेश्चंन इन द नेक्स्ट जनरल बॉडी मिटींग.

१.वन बोर्ड ऑफ पॉलिटीकल पार्टी वॉज प्लेसड् ऑन गव्हनमेंट लॅन्ड. निअर बॅरेक नं. ५७०, उल्हासनगर—२ वीथ व माटीव्ह टू ग्रॅप द लॅन्ड ॲन्ड टू डिसकंन्टीन्यु द युज ऑफ लॅड फॉर स्टोरेज ऑफ म्युनिसिपल वेस्टस.
२. कन्सक्युइन्ट अपॉन कम्प्लेंन्टस द सेड बोर्ड ऑफ पॉलीटिकल पार्टी वॉज रीमुव्ह बाय मिस्टर. सेठ ऑफीसर ऑन स्पेशल डयुटी ऑन ९.२.२००४. देअर आफ्टर द अजीटेशन वाज इनबाय द रिलेटेड पोलीटिकल से ८ वॉज अब्युझड फॉर द अक्ट ऑफ रिमोवल ऑफ बोर्ड देअर अफ्टर मिस्टर. सेठ आणि डेप्युटी कमिश्नर (इएनसी) थ्रो देअर ओन मेन इनस्टॉलड द बोर्ड ॲट द सेम साईट व्हाय?
३. वेदर द ऑफीशियल इन क्वेश्चन कॅन डु द ॲक्ट ऑफ इनस्टॉलेशन ऑफ बोर्ड वन्स रिमुव्हड.
४. नाऊ द  कन्स्ट्रक्शचन इज इन प्रोग्रेस ऑन द सेम पार्ट ऑफ द लॅन्ड व्हेअर द बोर्ड वॉज प्लेसड, व्हॉट ॲक्शन इज टेकन बाय दिज ऑफीशियलस?

<u>उत्तर:—</u>होय.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणुन.

नाही.

अतिक्रमण करणा—यांनी स्वत:हुन दिनांक १३.२.२००४ रोजी बांधकाम काढून घेतले आहे.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—</u>उल्हासनगर मध्ये एकुण किती सार्वजनिक शौचालये आहेत. दुसरा प्रश्न असा आहे की, किती शौचालयांची स्थिती बिकट आहे. त्याबाबतीत काही कार्यवाही झाली आहे किंवा नाही. प्रश्न तिसरा असा आहे की, शौचालये कशी साफ केली जातात. जर तेथे पाण्याची सुविधा नाहीच आहे. तर शौचालये आपण कशी साफ करून घेता?

<u>मा. पीठासीन अधिकारी:—</u>३०७ क्रमांकाचा आपला जो प्रश्न आहे.  त्या प्रश्नाबाबतीत आपण बोला.

<u>मा. सचिव:—</u>बॅरेक नं. ५७० च्या बाजुला कुणी बोर्ड लावला आहे त्याबाबतचा आपला प्रश्न होता.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—</u>बॅरेक नं. ५७० च्या बाजुला शिवसेनेने एक बोर्ड लावला आहे. मी आयुक्त साहेबांना एक अर्ज दिला होता तो फलक हटविण्याबाबत. परंतु तो अदयाप पर्यंत हटविला नाही. आता त्यामागे २०‘ X  ५०’ फुटाचा मंडप लावला आहे. तेथे जुगार व काही चुकीची कामे सुध्दा होतात. परंतु त्याबाबतीत आम्हास काही उत्तर मिळाले नाही. ना काही त्यावर कार्यवाही केली आहे असे का?

<u>मा. सचिव:—</u>योग्य आहे की अयोग्य आहे? योग्य असेल तर का?

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—</u>अयोग्य आहे. इतके अयोग्य की, विचारूच नका.

<u>मा. सचिच :—</u>चुकीचे का आहे?

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—</u>आताच त्यांनी ते तयार केले आहे. रस्त्यावरच झोपडे तयार केले आहे. तर मग काय? रस्त्यावरच शौचालये बांधायची का?

<u>मा. पीठासीन अधिकारी:—</u>आयुक्त साहेब आपण त्यांना उत्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—</u>साहेबांनी स्वत: ते पाहिले आहे.

मा. पीठासीन अधिकारीः—साहेब उत्तर देत आहेत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे)ः—मा. महापौर महोदया, येथे हा जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबतीत एक वेळ कारवाई करण्यात आली होती. तो फलक कोणत्याही राजकीय पक्षाचा नाही तो एका संघटनेचा फलक आहे. तो फलक हा प्रश्न जेव्हा विचारला गेला तेव्हाच लावण्यात आलेला नव्हता. त्या अगोदर पासुन तो फलक तेथे होता. या शहरामध्ये ब—याचशा संघटनांनी आपापले बोर्ड परवानगी न घेता लावलेले आहेत. जेव्हा आमच्याकडे तक्रार आली की हा बोर्ड नव्यानेच लावण्यात आलेला आहे. आम्ही जावुन पाहीले तेव्हा असे आढळुन आले की, तो नव्याने लावलेला नव्हता. तेथे काही बांधकाम झाले होते ते आम्ही त्वरीत निष्कासीत केले. परंतु आजसुध्दा, दोन—तीन दिवसापुर्वी मी तेथे जावुन पाहुन आलो. तेथे मागील बाजुस जी जागा शिल्लक होती तेथे पैसे दया आणि वापरा या तत्वावर सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम सुरू केले आहे. व त्याच्या पुढे काही लोकांनी प्लास्टिकच्या शिट लावुन तेथे ते बसतात. त्या व्यतिरिक्त तेथे काहीही नाही. परंतु प्रश्न जो आहे त्याच्या त्याबाबतीत आपणांस उत्तर दिले होते. ते उत्तर बरोबर आहे. व आजसुध्दा तेथे अशी कोणतीही स्थिती निर्माण झालेली नाही. ज्यामुळे तेथे एखादे बेकायदेशिर कृत्य तेथे झाले असेल ज्यामुळे तेथे बेकायदेशिर कामकाज तेथे चालु आहे.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः—सर्वात प्रथम तेथे प्लास्टिकच्या शिट लावल्या जातात. त्यानंतर तेथे शेड तयार होईल. हे पहिले पाऊल आहे. जसे की आमच्या श्री. पृथ्वी वलेचा साहेब यांचा प्रश्न आहे. त्यानुसार आपण कारवाई केलीत तर बरे होईल. नाहीतर उदया ते म्हणतील की आम्ही गेल्या अनेक दिवसापासुन प्लास्टिकच्या शिट लावुन बसत होतो तर आता ही जी शेड आहे त्यावर आतापासुनच कारवाई केलीत तर बरे होईल.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे)ः—मा. महापौर महोदया, त्या शौचालयाचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर ती शेड तेथुन हटविली जाईल. ते काम करणारे जे मजुर आहेत ते मजुर त्या शेडमध्ये बसतात. उन्हामुळे त्या मजुरांना बसण्यासाठी शेडची आवश्यकता पडते म्हणुन ते तेथे बसतात. त्या शौचालयाचे बांधकाम त्वरीत पुर्ण होईल. व त्यानंतर ही शेड हटविली जाईल.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः—ती शेड मजुरांनी तयार केली नसुन शिवसेनावाल्यांनी तयार केलेली आहे. आपण माझ्या बरोबर चला मी आपणांस ती दाखवुन देतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—शिवसेनेचे नाव का घेता? आम्ही लोकांनी राष्ट्रवादींचे नाव घेतले तर. बेकायदेशिर कामे करत आहेत. पक्षाचे नाव का घेता? शिवसेना, शिवसेना म्हणत आहात.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः—मी स्वतः पाहिले आहे रोज पहातो आहे. आज सुध्दा मी आपणांस दाखवु का? चला बरोबर.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—कधीही पक्षाचे नाव घेवु नका.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः—चला आता मी आपणांस दाखवितो. नसेल तर दंड भरण्यास मी तयार आहे.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)ः—श्री. वलेचाजी, आयुक्त साहेबांनी आता सांगितलेच आहे. त्यावर थेट कार्यवाही होईल आपण निश्चिंत रहा.

मा. सचिवः—प्र श्न क्र. ३०८ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा असुन त्यांनी तो मागे घेतला आहे.

मा. सचिवः—प्राश्न क्र. ३०९ हा श्री. नथु सोनावणे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३०९:–</u> प्रभाग १ मधील आरती अपार्टमेंट मंदिराजवळ श्री. दिनेश छापरु बिल्डर यांनी तळमजला + दोन माळयाचे आर.सी.सी इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे. सदर बिल्डरने इमारतीचे मागील व पूढील बाजूस महानगरपालिकेने तयार केलेल्या सी.सी. पायवाट खोदून त्यावर इमारतीचे अनधिकृतरित्या बांधकाम केले आहे. सदर बांधकामात अधिकृत व अनाधिकृत बांधकाम किती?

अनधिकृत व वाढीव बांधकाम केले असल्यास सदर इमारतीचा प्लॉन रद्द का केला नाही?

वाढीव व अनाधिकृतरित्या सदर बिल्डरने प्रभागात दोन तीन इमारतीचे काम केले असल्याने सदर बिल्डरवर विरुध्द गुन्हा का दाखल केला नाही. विलंबाबाबतचे कारण काय?

सदर अनधिकृत बांधकामाबाबत महापालिका काय कारवाई करणार?
कृपया सदर प्रश्नाची माहिती मिळावी ही विनंती.

<u>उत्तर :–</u>सदर इमारतीमध्ये अनाधिकृत वाढीव बांधकाम २०४.३ चौ.मी. इतके ओह.
वरीलप्रमाणे जागेवर २०४.३० चौ.मी. वाढीव बांधकाम केल्याचे अनाधिकृत विभागाने नमुद केले आहे. त्यानुसार मंजुर नकाशाव्यतिरिक्त केलेले वाढीव बांधकाम हे अनाधिकृत विभागाने निष्कासित करणे आवश्यक आहे.

बिल्डरवर गुन्हा दाखल करण्याचे काम अतिक्रमण विभागाशी संबधित आहे.

सदर इमारतीच्या विकासकास महाराष्ट्र प्राद्रशिक नगररचना अधिनियम तरतुदीनुसार नोटीस देण्यात आली आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:–</u>काय केले?

<u>श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त अतिक्रमण):–</u>त्या ठिकाणी जे वाढीव बांधकाम केले होते ते दि. २७.१०. २००४ला निष्कासित केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:–</u>बांधकाम कधी तोडले?

<u>मा.सदस्य श्री. नथु सोनवणे:–</u>आता परत तेथे बांधकाम केले असेल तर काय करणार?

<u>श्री. उत्तम लोणारे (उपायुक्त अतिक्रमण):–</u>आम्ही आमच्या क्षेत्र निरीक्षकाला पाठवुन अहवाल घेवु आणि त्यानंतर योग्य ती कार्यवाही करू.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:–</u>ठिक आहे.

<u>मा. सचिव:–</u>प्र श्न क्र. ३१० हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३१०</u>:– उल्हासनगर कॅम्प १ ब्लॉक नं. अे २६ कला पॅलेसचे मागे श्री. संतोष मांधानी व श्री. भागचंद मांधानी यांचा स्विकार मिनरल वॉटर या नावाने मोठा कारखाना चालू आहे. सदर कारखाना सकाळी ८.०० ते सायंकाळी ६ पर्यंत सर्व बाजूने बंद करुन कारखान्यात २० लिटर बॅरल, १ लिटर बाटली व ३०० मि.ली. पिशवी अशी स्विकार मिनरल वॉटरची पॅकिंग केली जाते व संध्याकाळी ६.०० नंतर सदर पॅकींग

केलेला माल बंद गाडीतून गोल्डन टॉवर उल्हासनगर–३ येथिल गोदामात रात्रभर नेला जातो. त्यामुळे या संशयीत हालचाली मागचे गूपीत काय? याबाबत संशय निर्माण होतो.

सदर व्यक्ती नागरीकांना उपलब्ध असलेल्या पाण्याचे जलवाहिनीतून पंपाने दररोज लाखो लिटर पाणी खेचून मिनरल वॉटर म्हणूल विक्री करीत आहे. सन १९९६ पासून चालू असलेल्या या कारखान्याने आजपर्यंत पाण्याचे बिल किती भरले आहे?

जर पाण्याचे देयक भरले नसेल तर हया कारखान्याचा पाणी पुरवठा आजपर्यंत सुरु कसा?

तो खंडीत का करण्यात आला नाही?

सदर कारखान्यास महानगरपालिकेने पाणी विकण्याची परवानगी दिली आहे काय?

नसल्यास लोकांनी वारंवार तक्रारी सूचना करुनही सदर कारखान्यावर कारवाई का होत नाही?

सदर कारखाना रहिवाशी क्षेत्रात आहे. रहिवाशी क्षेत्रात कारखाना चालविणेचा परवाना घेतला आहे काय?

त्याची कर आकारणी रहिवाशी / व्यापारी यापैकी कुठल्या तत्वावर करण्यात येते?

सन १९९६ पासून दररोज महानगरपालिकेचे लाखो लिटर पाणी खेचून मिनरल वॉटर म्हणून विक्रि करण्यास महानगरपालिकेने परवानगी / मान्यता दिली आहे काय?

नसल्यास कारवाई का केली जात नाही? याची चौकशी करुन येत्या महासभेत सूचक, समर्पक उत्तरे मिळावी ही विनंती.

उत्तर :—दि. ५.३.०४ रोजी उल्हासनगर कॅम्प १ मधील ब्लॉक क्र. अे २६ कला पॅलेसच्या मागे श्री. भागचंद माथानी यांचे मालमत्तेची खात्याकडुन तपासणी करण्यात आली. सदर ठिकाणी उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे फक्त एकच नळजोडणी असून ती मंजुर आहे. तिचा ग्राहक क्र. यु/१/५६/७ असा आहे ती नळजोडणी सोडुन इतर कोणतीही नळजोडणी आढळुन आली नाही. तसेच अस्तित्वावरील नळजोडणीमधुन जमिनी मधील टाकीत पाणी जमा केले जाते. सदर जोडणी घरगुती वापरासाठी देण्यात आली आहे.

सदर नळजोडणीचे थकबाकीबाबत पाणी देयक विभागाकडे चौकशी केली असता रू. ५६७/— इतकी थकबाकी दि. १३.४.०४ रोजी भरण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी पंपाचे पाणी खेचण्याचे आढळुन आले नाही.

रहिवाशी क्षेत्रात कारखाना चालविणेचा परवाना दिलेला नाही. विषयांकीत मालमत्ता धारकाचे नावाने कर विभागात संगणकात नोंद आढळुन येत नाही. तथापि पार्वतीबाई भागचंद यांच्या नावाने ब्लॉक क्र. ए. २४, रूम नं. १३९, अक्र. ७२५ या मिळकतीस रहिवासी दराने आकारणी केली जाते.

सन १९९६ पासून या ग्राहकाने रू. ५५८८ एवढी रक्कम वेळोवेळी नियमीतपणे पाणी बिलांचा भरणा केलेला आहे. (सोबत स्टेटमेंट जोडलेले आहे) सबब या ठिकाणी कोणतेही बेकायदा जोडणी किंवा पाणी चोरी आढळुन आले नाही. म्हणुन कारवाईचा प्रश्न उद्भवला नाही.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—</u>पाण्याच्या संदर्भात लोकांना एवढा त्रास होतो आणि एक व्यक्ती ज्याची मी तक्रार करून करून थकलो आहे. पण कुणीही लक्ष घालत नाही. सदरची व्यक्ती ३ मशिनी लावुन २१,८०० लीटर्स पाणी खेचुन घेते व त्यानंतर सदरचे पाणी एक एक लिटरच्या बाटल्यांमध्ये भरून त्याची विक्री केली जाते. त्यापासुन त्याचा फायदा होतो आणि पैसे महापालिका भरते. तरी देखिल महापालिका काहीच करत नाही.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>जेव्हा हा विषय माझ्याकडे आला होता तेव्हा याची चौकशी करण्यासाठी मी पाणी पुरवठा विभागातील अधिका—यांचे पथक त्या ठिकाणी चौकशी करण्यासाठी पाठविले होते. चौकशी केल्यानंतर सदरची तक्रार ही तथ्यहीन असल्याचे आढळुन आले. यामुळे सदर ठिकाणी कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—</u>तुम्हाला वाटत असेल की मी उगाचच तक्रार करीत आहे तर तुम्ही माझ्या बरोबर माणसे दया मी त्याठिकाणी जावुन त्यांना दाखवतो की काय होत आहे. जर माझ्या तक्रारीत तथ्य नसेल तर नगरसेवक पदाचा राजीनामा देण्यास तयार आहे. आणि माझ्या तक्रारीत तथ्य असेल तर आपण राजीनामा देवुन दाखवावा.

**मा. सदस्य श्री. मुलचंदानी महेंद्र हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>हा काही कुस्तीचा आखाडा नाही मी आधीच सांगितले ज्यावेळी आमचे पथक त्या ठिकाणी गेले. त्यावेळी त्या ठिकाणी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे काहीच आढळुन आले नाही. जर आपणांस वाटत असेल की तेथे काही चुकीचे काम होत आहे तर मी माझी माणसे तुमच्या बरोबर देतो. त्यावेळी तेथे काही आढळुन आल्यास संबंधितावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—</u>मी आयुक्त साहेबांना आदेश देते की त्यांनी सदर प्रकरणी चौकशी करून अहवाल दयावा.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—</u>सदरचा प्रश्न पुढच्या महासभेत ठेवण्यात यावा.

<u>मा. सचिव:—</u>प्र श्न क्र. ३११ हा श्रीमती जयश्री सुर्वे आहे.
यावेळेस त्या अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३११:—</u>शॉप नं. २२४ साईवसणशाह बाजार, उल्हासनगर—५ येथे अनधिकृतरित्या बांधलेले आर.सी. सी. चे बांधकाम महानगरपालिकेच्या अनाधिकृत बांधकाम विभागाने अनधिकृत ठरवून दिनांक २९/३/२००४ ते ३१/३/२००४ या कालावधीत तोडले. सदर बांधकाम दिनांक ९/४/२००४ ते ११/४/२००४ या शासकिय सुट्टीचा फायदा घेवून पुन्हा बांधण्यात आले आहे.
सदर बांधकाम महापालिकेच्या दृष्टीने अधिकृत किंवा अनधिकृत आहे?
सदर बांधकामास कायदेशीर परवानगी दिली आहे काय?
दिली असल्यास ती कोणत्या कागदपत्राच्या आधारे देण्यात आली आहे?
सदर कागदपत्राची माहिती महासभेत मिळावी किंवा सदर बांधकाम अनधिकृत असल्यास ताबडतोब निष्कासित करण्यात यावे ही विनंती.

<u>उत्तर :—</u>अनधिकृत बांधकाम आहे.
नगररचना विभागाशी सबंधित आहे.
वरीलप्रमाणे
अनधिकृत बांधकामाबाबत नियमबध्द कारवाई करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्र श्न क्र. ३१२ हा श्री. रामदास उमाप यांचा असुन त्यांनी तो मागे घेतला आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्र श्न क्र. ३१३ हा श्रीमती जयश्री सुर्वे आहे.

यावेळेस त्या अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>**प्रश्न क्र. ३१३:—**</u> उपरोक्त विषयानुसार प्लॉट नं.१२२९,१२३०,१०८९ व १०९० चालता नं.२९४ अे व २९५ अे, सिट नं.७७ उल्हासनगर—५ हा श्री. जी चंद्रशेखर शिवम रा. मुंबई यांचे मालकीची असुन त्याबाबतचे दस्तऐवज, करपावती प्दकमग ￼ व इतर कागदपत्र त्यांचेकडे उपलब्ध आहेत. वरील प्लॉटवर श्री. नानीकराम लक्ष्मणदास रोहडा नायक व्यक्तीने अतिक्रमण केल्याने त्यांनी संबधीतांची तक्रार पोलीस निरिक्षक हिललाईन पोलिस स्टेशन, आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका व नगररचनाकार उमपा यांना केलेल्या असून मा. चिफ सेंटलमेन्ट कमिशनर महाराष्ट्र राज्य यांचे आदेश दि. १६.४.२००३ अन्वये स्टे आणला आहे. संबंधीत कागदपत्राच्या छायांकित प्रती सोबत जोडत आहे.

भगवानदास हॉस्पीटलचे मागे ओ.टी. सेक्शन बॅरेक नं.१९६९ उल्हासनगर ५ प्लॉट नं. १२२९,१२३०,१०८९ व १०९० चालता नं. २९४ अे व २९५ अे सिट नं.७७ या ठिकाणी बांधण्यात आलेल्या संरक्षण भिंतीस व शेडला महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय? सदरचे बांधकाम महापालिकेचे दृष्टीने अधिकृत आहे का अनाधिकृत आहे? अनाधिकृत असल्यास अद्यापपर्यंत कारवाई का करण्यात आली नाही? यावरून संबंधीत अधिकारी अनाधिकृत बांधकामांना संरक्षण देत आहेत असे आपणांस वाटत नाही काय? सदर जागेवरील बांधकामास चिफ सेटलमेंन्ट कमिशनर महाराष्ट्र राज्य यांचे आदेश दि. १६.४.२००४ अन्वये स्टे असताना केलेले भिंतीचे व शेडचे बांधकाम बेकायदेशिर नाही का? हा चिफ सेटलमेंन्ट कमिशनर यांचे आदेशाचा अवमान केलेला असल्याने संबंधीताविरूध्द पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविणार आहात काय? सदर बांधकामाची चौकशी करून अनाधिकृत असल्यास निष्कासनाची कारवाई केव्हा करणार? कृपया वरील प्रश्नाची माहिती येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर :—</u>प्रश्नांकित मिळकतीचे मालकी/ वहीवाटी संबधी कादपत्र दाखल करणेस श्री. नानीकराम रोहडा यांस रितसर नोटीस दिली आहे. ती प्राप्त झालेवर कागदपत्रांची छाननी करून तसेच बिगर परवाना बांधकामाबाबत चौकशी करून संबंधीताविरूध्द आवश्यक ती कायदेशिर कारवाई करण्यात येत आहे. बिगर परवाना बांधकामास संरक्षण देण्यात येत नाही.

भगवानदास हॉस्पीटलच्या मागे, ओ.टी. सेक्शन, बॅ. नं. १९६९, उल्हासनगर—५, प्लॉट नं. १२२९, १२३०,१०८९ व १०९० चालता क्र. २९४ ऐ व २९५ ऐ, शिट नं. ७७ या ठिकाणी बांधण्यात आलेल्या संरक्षण भिंतीस व शेडला महापालिकेने (नगररचना विभागाने) कोणत्याही प्रकारची परवानगी किंवा दुरूस्ती परवानगी दिलेली नाही.

<u>मा. सचिव:—</u>प्राश्न क्र. ३१४ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

<u>**प्रश्न क्र. ३१४**</u>:— उपरोक्त विषयानुसार उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत किती बियरबार, हॉटेल व चहाची दुकाने आहेत? त्यांना कोणत्या दराने पाण्याचे बिल आकारण्यात येते? कधी पासुन आकारण्यात येते? त्यांची प्रत्येकी रक्कम किती? २० एप्रिल २००२ ते आजपर्यंत महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाअंतर्गत किती कामे मंजुर झाली? त्याची प्रभागवार माहिती दयावी? सदर कामापैकी किती कामे पुर्ण, अपुर्ण व प्रलंबित राहीलेली आहेत? सदर का प्रलंबित राहीलीत? काही कामे प्रभाग समिती निधीतुन मंजुर करण्यात येऊन देखिल नगरसेवक निधी फंडात वर्ग का करण्यात आली? (उदा. राजीव गांधीनगर, ब्राम्हणपाडा इ.) तरी कृपया वरील प्रश्नाचा सविस्तर खुलासा येत्या महासभेत व्हावा ही विनंती.

<u>उत्तर :—</u>उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत किती बियरबार, हॉटेल व चहाची दूकाने आहेत. या विषयाची माहिती कर विभागाकडे उपलब्ध नाही. तसेच त्यांना कोणत्या दराने पाणीबील आकरण्यात येते या विषयीची माहिती पाणी पुरवठा विभागाशी संबंधीत आहे.

उमपा यांच्या अधिपत्याखालील पाणी पुरवठा विभागांतर्गत पाणी पुरवठा देयक उपविभागाकडे कार्यालयीन अधिकृत नोंदणीप्रमाणे ८७ बियरबार, १३७ हॉटेल व १०२ चहाची दुकाने आहेत.

सदर ग्राहाकंना बिगर घरगुतीप्रमाणे पाण्याच्या प्रत्येक हजार लिटरला रू. १८/– याप्रमाणे दि. २०. १२.०४ पासुन आकारणी करण्यात येते. सदर ग्राहकांकडे मार्च २००५ अखेर १७.७० लक्ष इतकी थकबाकी आहे. त्या थकबाकीच्या वसुलीची कारवाई चालु आहे.

एप्रिल ०२ पासून आतापर्यंत ३४८ कामे मंजुर झाली आहेत. त्याची प्रभागवार माहीती यादीसह उत्तरासोबत स्वतंत्ररित्या जोडली आहे.

सदर कामापैकी २६८ पुर्ण झालेली आहेत व ११६ कामे प्रगतीपथावर आहेत. कामाची प्रभागवार माहिती पाणी पुरवठा मुख्यालयात उपलब्ध आहे.

राजीव गांधी नगर, ब्राम्हणपाडा व रोहीदास नगर या ३ कामांपैकी प्रथम २ कामांचे आदेश देवूनही ठेकेदाराने काम सुय केले नव्हते. आता ही कामे नगरसेवक निधीतून प्रस्तावित केली आहेत. कारण प्रभाग समिती निधीतून दुरूस्ती स्वरूपाची कामे करणे लेखा प्राक्षेपानुसार मंजुर नव्हते. वरीलपैकी रोहीदास नगर मधील जलवाहिनीचे कामी नगरपालिका निधीतून मंजूर केले आहे. सध्या हे काम ही प्रगतीपथावर आहे.

## उल्हासनगर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग
## पाणी पुरवठा विभागांतर्गत कामांची प्रभाग वार यादी:–

| प्रभाग क्र. | सन २००२–२००३मधील मंजूर कामे | सन २००३–२००४ मधील मंजूर कामे |
|---|---|---|
| १. | १ | ६ |
| २ | ३ | ४ |
| ३ | २ | ७ |
| ४ | १ | २ |
| ५ | २ | ५ |
| ६ | २ | १४ |
| ७ | ७ | ९ |
| ८ | ३ | ९ |
| ९ | १ | ५ |
| १० | ७ | ७ |
| ११ | १ | १८ |
| १२ | ५ | ९ |
| १३ | ९ | १७ |
| १४ | ४ | ७ |
| १५ | १ | ७ |
| एकुण | ४९ | १२६ |
| १६ | – | ३ |
| १७ | १ | २ |
| १८ | ६ | १ |
| १९ | ७ | ११ |
| २० | २ | ६ |
| २१ | २ | – |
| २२ | ३ | ६ |
| २३ | ४ | ४ |
| २४ | ५ | ५ |
| २५ | १२ | १३ |
| सर्वसाधारण (जनरल) कामे | २२ | ९४ |
| एकुण | ११३ | २७१–३८४ |

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील अधिकृत व्यावसायिक नोंदणी असलेली हॉटेलाची माहिती.

| कॅम्प निहाय | बिअर बार | हॉटेल | चहा हॉटेल |
|---|---|---|---|
| १ | १७ | २३ | १९ |
| २ | १२ | २२ | १५ |
| ३ | ३३ | ५५ | ४२ |
| ४ | १८ | २४ | ५ |
| ५ | ९ | १३ | २१ |
| एकुण | ८७ | १३७ | १०२ |

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—किती हॉटेलस् व बियर बार आहेत. पाण्याचे कनेक्शन एक इंचीचे असताना त्यांना अर्ध्या इंचाची बिल आकारणी करण्यात येते. तुमच्याकडे याची सविस्तर माहिती आहे का?

मा. प्रभारी आयुक्त:—तुमच्या प्रश्नाचे उत्तर पहिल्या परिच्छेदात दिले आहे. त्यांना पाणी पट्टीची आकारणी नोंदणीच्या आधारे केली जाते.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—साहेब यापासुन महापालिकेला उत्पन्न काय? तेथे मोठया प्रमाणात पाण्याची चोरी केली जाते. महापालिकेला काही फायदा होत नाही. नुकसान होत आहे.

मा. पीठासीन अधिकारी:—श्री. नथु सोनवणे साहेब, अशा कोणत्या ठिकाणी चोरी होत असेल तर त्याचे उदाहरण दया. नुसते आरोप नका करू. तुमच्याकडे काही पुरवा असेल तर तो दया. अथवा अशा ठिकाणांची यादी दया म्हणजे कारवाई करता येईल.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—मी प्रत्येक हॉटेलात जावुन याची चौकशी करू का? हे काम प्रशासनाचे आहे. त्यांनी उत्तर दिले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—तुमच्याकडे अशा हॉटेलांची यादी असल्यास तुम्ही ती आयुक्तांकडे दयावी त्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

मा. सचिव:—प्र श्न क्र. ३१५ हा नथु सोनवणे यांचा असुन तो त्यांनी मागे घेतला आहे.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३१६ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे. त्या अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३१६:— कंवारामचौक ते अमन टॉकीज रोडवर संतोषी माता मंदीरामागे, उल्हासनगर—३ येथे तळमजला अधिक तिन माळयाचे मा. पोखरकर साहेब आयुक्त असतांना अनधिकृत ठरवून दोन वेळा निष्कासित करण्यात आले. सदर जागी पुन्हा पूर्वी इतकेच बांधकाम पूर्ण करण्यात येवून एक माळा अधिक वाढविण्यात आला असल्याने सदर बांधकामास दुरुस्तीची परवानगी दिली काय?

बेकायदेशीर इमारतीचे कायदेशीर इमारतीत रुपांतर कसे झाले?

सदर बांधकाम आपल्या मंजूरीने सुरु आहे काय?

अनधिकृत असल्यास पुरावे दयावे असा प्रश्न क्र. २५३, दिनांक ७/११/२००३ अन्वये विचारला होता त्या संदर्भात प्रशासनाने दिलेली उत्तरे अपूर्ण व अर्धवट वाटत असून सदस्यांना व सभागृहास चूकीची माहिती देण्याचा प्रकार वाटत आहे. त्यानुसार सदर इमारतीस महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय?

सदर इमारतीचे परवानगीसाठी वापरण्यात आलेली सनद खरी आहे काय? का खोटी आहे.

सनद खोटी असल्याने संबंधित अधिकारी कर्मचारी व जागेचा मालक यांचेवर गुन्हे दाखल झाले आहेत काय?

झाले असल्यास कोणाकोणावर याची माहिती दयावी?

सनद खोटी असल्यास आपण दिलेली परवानगी अदयापपर्यंत रद्द का केली नाही?

प्रशासन (नगररचनाकार) याबाबतीत वेळ काढु धोरण अवलंबून अनधिकृत बांधकामास संरक्षण देत आहेत असे आपणास वाटत नाही? याला जबाबदार कोण?

संबंधितावर आयुक्त म्हणून (स्वच्छ नि:कलंक) आपण केव्हा व कोणती कारवाई करणार?
सदर इमारत कधीपर्यंत निष्कासीत करण्यात येईल?

याची येत्या महासभेत सविस्तर व सत्य पुराव्यासहित माहिती दयावी मोघम अर्धवट अपूर्ण माहिती देवू नये ही विनंती.

<u>उत्तर :—</u>सदर इमारतीला नगररचना विभागाकडुन कोणत्याही प्रकारची दुरूस्ती परवानगी दिलेली नाही.

अतिक्रमण नियंत्रण विभागाकडुन झालेले नाही.
नाही.
जादा बांधलेले चौथ्या मजल्याचे काम दि. २४.२.०४ व २५.२.०४ रोजी निष्कासीत केले आहे. अनधिकृत बांधकामाची सर्व अनाधिकृत भिंत व स्लॅपचे निष्कासन केलेले आहे. त्यानंतर प्लॅट नं. १२ (भाग) बॅ. नं. ४५५, उल्हासनगर—३ यावर इमारत बनविलेली आहे. तो सर्व भाग तळमजला व ३ मजला अधिकृत आहे. किंवा अनधिकृत आहेत. न्यायालयाचा काय आदेश केलेले आहे ते इ.बाबत दि. २७.५.०४ व दि. ७. ६. ०४ च्या पत्राने नगररचनाकार यांना विचारणा केली आहे. तथापी त्यांचेकडुन तपशिल प्राप्त होणेचा आहे. अनधिकृत बांधकाम या विभागाकडुन पुढील कारवाइ करण्यात येत आहे.
सदर इमारतीला परवानगीसाठी वापरण्यात आलेली सनद खरी आहे. त्याबाबत उप विभागीय कार्यालयाकडुन सनद पडताळणीचे पत्र क्र. उपविभागीय/ <u>सी—२/वशी/११३</u>, दि. ३.६.२००० रोजी पत्र आलेले आहे.
सनद खरी असल्याने गुन्हा दाखल करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सदर प्रकरण कोर्टात गेलेले असल्याने न्याय प्रविष्ट असल्यामुळे त्याच्यावर पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**<u>मा. सचिव:—</u>**प्र श्न क्र. ३१७ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. ३१७</u>**:—यु. नं. शिट नं. ८१, , सी. ब्लॉक रोड, उल्हासनगर—१ मधूल जाणारा मोठा नाला अस्तित्वात आहे. उमपा/टीडीपी/सामान्य/२४२/९०/२९१, दिनांक १२/८/२००२ च्या तत्कालीन मा. आयुक्तांच्या आदेशान्वये सदरचा नाला महापालिकेने जेसीबी मशिन, प्रोकलेन, डंम्पर व इतरांच्या द्वारे नाला खोलण्यात (मोकळा) आला. सदर नाला खोलण्यासाठी महापालिकेला जो काही खर्च झाला तो सर्व खर्च दोषी व्यक्ती श्री. चंदर बाबलानी, सौ. विनिता बाबलानी व इतर यांचेकडुन वसुल करण्याचा आदेश मा. आयुक्तांनी दिला होता त्याच्या आधारे खालील विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकार उत्तरे संबंधितांनी पुढील महासभेत देण्याची कृपा करावी ही विनंती.
१. अ) उमपा/टीडीपी/सामान्य/२४२/९०/२९१, दिनांक १२/८/२००२ च्या तत्कालीन मा. आयुक्तांच्या आदेशान्वये यु. नं. २, शिट नं. ८१, सी ब्लॉक रोड , उल्हासनगर—१ मधुन जाणा—या नाला खुला करण्यास जो काही खर्च आला तो खर्च दोषी व्यक्ती (चंदर बाबलानी, विनिता बाबलानी) कडुन वसुल केला आहे का,
वसुल केला गेला असल्यास किती खर्च वसुल केला?
१. ब) नसल्यास दोषी व्यक्ती श्री. चंदर बाबलानी, विनिता बाबलानी व इतर यांच्याकडुन सदर नाला खुला करण्यात येणारा खर्च वसुल करणे किंवा मालमत्ता करात टाकण्याचा आदेश असतांना सदर नाला खुला

करण्याचा खर्च दोषी व्यक्तींच्या श्री. चंदर बाबलानी, विनिता बाबलानी व इतरांकडुन मालमत्ता कराच्या बिलात टाकण्यात आले आहे का?
मालमत्ता कराच्या बिलात टाकले असल्यास ती रक्कम किती?

उत्तर :—नाही.
वसुल केला गेला नाही.
मालमत्ता करात टाकलेला नाही कारण दिनांक ३०.१०.२००२ रोजी सदर कामास स्टेऑर्डर मिळाली.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सध्या तेथे काय परिस्थिती आहे?

श्री. एस.व्ही. जाधव (शहर अभियंता):—हा नाला खुला करण्यात रूपये ८० हजार पर्यंत खर्च झालेला आहे. सदरचा खर्च संबंधिताकडुन वसुल केलेला नाही कारण सदर प्रकरणात न्यायालयाकडुन स्थगन आदेश प्राप्त झालेला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—सदरचे स्थगन आदेश उठवावा. त्या ठिकाणचा माणुस महापालिकेच्या माणसांना दम देत आहे. हे कसे काय चालु आहे. स्थगन आदेश आहे तर त्याठिकाणी त्याला माती का भरू देता?

मा. प्रभारी आयुक्त:—मा. महापौर महोदया, या कामासाठी जो ४६ हजार रूपये खर्च झाला आहे त्याची वसुली व्हायला हवी परंतु सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाच्या आदेशानंतर कारवाई करू.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—न्यायालयाचा स्थगन आदेश असला तरी नाला बंद व्हायला नको. चालुच राहायला हवा. तो बंद करण्याचा कोणालाही अधिकार नाही.

मा. प्रभारी आयुक्त:—जे नैसर्गिक प्रवाह असतात ते बंद करू शकत नाही अथवा बदलु शकत नाही. मी या प्रकरणाची माहिती घेवुन योग्य ती कारवाई करेन.

मा. सचिव:— प्रश्न क्र. ३१८ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे. त्या अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३१८:— उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या अडीअडचणी, नागरी समस्या, विकासकामाबाबत माहिती, कामगार, कर्मचारी अधिकारी यांच्या बाबतच्या तक्रारी व त्यांची माहिती अनधिकृत बांधकामे, पाणी समस्या व इतर अनेक बाबी यांची अचुक, समाधानकारक माहिती मिळावी, नागरीकांचे प्रश्नांना वाचा फोडुन त्याच्या समस्या कमी व्हाव्या म्हणून महासभेत पालिका सदस्य म्हणून नागरीकांचे वतीने प्रश्न विचारुन भ्रष्टाचारावर अंकूश ठेवावा, प्रशासनाचे काम व्यवस्थित पार पाडले जाते किंवा नाही? त्यात विलंब किंवा हेतूपूरस्कर दुर्लक्ष होत नाही ना? याची माहिती मागत असतो. पालिका सदस्यांना सभागृहात मिळणारी माहिती प्रश्नांची उत्तरे ही अपूर्ण अर्धवट चुकीची वेळ काढु धोरण अवलंबीणारी नसावी ही अपेक्षा असते, परंतू महासभेत देण्यात येणारी उत्तरे अर्धवट,त्रुटक या विभागाशी संबंधीत नाही. नगररचना, पाणीपुरवठा, अतिक्रमण, करविभाग इत्यादी विभागाशी संबंधीत आहे. कारवाई करण्यात येईल. अश्या प्रकारची पालिका सदस्य व नागरीकांची दिशाभुल करणारी असतात. अनेक प्रश्न विचारुन महिनोनमहिने उलटून गेल्यानंतरही कारवाईचे आश्वासन देवून कारवाई होत नाही. हेतूपुरस्कर टाळाटाळ केली जाते. मूळ प्रश्नास बगल देवून इतर अनावश्यक माहिती पुरविली जाते. तरी या संदर्भात खालील प्रश्नांची उत्तरे महासभेत मिळावी.
महासभेत विचारलेल्या प्रश्नांची अचूक माहिती व कारवाई सर्व साधारण किती दिवसात करणे आवश्यक आहे? एखादया प्रश्नाची अपूर्ण त्रुटक अर्धवट दिशाभूल करणारी माहिती व हेतूपुरस्कर प्रकरण प्रलंबित ठेवणा—या अधिका—यावर कर्मचा—यावर काय कारवाई केली जाते? अदयापपर्यंत किती जणावर कारवाई केली आहे? एखादया प्रश्न महापालिकेतील विविध विभागाशी संबंधित असल्यास त्याची एकत्रीत उत्तरे देता येत नाही काय? सदरचे विभाग महापालिकेचे अखत्यारीत व इमारतीचे आवारात नाहीत काय? विभागाअंतर्गत प्रश्नाची माहिती मिळविणे प्रशासनाला अशक्य, त्रासदायक वाटते का? विभागाअंतर्गत व इतर विभागातील प्रश्नांची एकत्रित माहिती देणेसाठी महापालिकेस आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो का? अशी

माहिती एकत्र देणे शक्य आहे काय? प्रश्नावर कारवाई करणेत येईल, नोटिस दिली आहे. अशी उत्तरे दिलेल्या प्रश्नाची कारवाई पूर्ण झाल्यावर संबंधित प्रश्नकर्त्यास लेखी कळविले जाते काय? अदयापपर्यंत किती प्रलंबीत प्रश्न, अपूर्ण कारवाई पूर्ण झाल्यानंतर प्रश्न कर्त्यास लेखी कळविले आहे? वरील प्रश्नाची सूचक समर्पक पूर्ण उत्तरे येत्या महासभेत मिळावीत ही विनंती.

उत्तर :—महापालिका स्थायी समिती, परिवहन समिती, इत्यादीचे कामकाजा विषयीचे नियम ५ ते १८ चे विर्निदिष्ट केलेली आहे आपला प्रश्न सदर पध्दतीशी विसंगत असल्याचे सकृत दर्शनी आढळुन येत असल्याने नियम १२ मधील तरतुदीनुसार आपल्या प्रश्नास परवानगी नाकारण्यांत येत आहे.
कारण,

१. अत्याधिक लांबट असलेला प्रश्न
२. युक्तीवाद अनुमान हेत्वारोप असणारे प्रश्न
३. मागील ३ महिन्यामध्ये महासभेत दिलेल्या उत्तरासंबंधी असणारे प्रश्न

| | | | |
|---|---|---|---|
| २७३ | ४.१२.०३ | श्री. विश्वनाथ पाटील | उपायुक्त (शहर) |
| २७५ | ८.१२.०३ | श्री. दिलीप लालवानी | उपायुक्त (अबावि) |
| २७७ | १०.१२.०३ | श्री. विश्वनाथ पाटील | शहर अभियंता |
| २८० | १.१.०४ | श्री. विश्वनाथ पाटील | उपायुक्त (अबावि) |
| २९१ | ९.१.०४ | श्रीमती जयश्री सुर्वे | उपायुक्त (शहर) |
| २९७ | २९.१.०४ | श्रीमती जयश्री सुर्वे | मु.ले. अधिकारी |
| ३०२ | २९.१.०४ | श्री. धनंजय बोडारे | उपायुक्त (मालमत्ता) |
| ३०३ | ३१.१.०४ | श्री. राजेंद्र चौधरी | मु. ले. अधिकारी |
| ३०४ | ३०.१.०४ | श्री. राजेंद्र चौधरी | उपायुक्त (अबावि) |
| ३०५ | ७.२.०४ | श्रीमती. नंदीनी बामणकर | उपायुक्त (अबावि) |
| ३०६ | ७.२.०४ | श्री. नथु सोनवणे | उपायुक्त (अबावि) |
| ३०९ | १०.२.०४ | श्री. नथु सोनवणे | उपायुक्त (शहर) |
| ३१० | ३१.३.०४ | श्री. नथु सोनवणे | उपायुक्त (शहर) |
| ३११ | १३.४.०४ | श्रीमती जयश्री सुर्वे | उपायुक्त (अबावि) |
| ३१३ | ३०.४.०४ | श्रीमती जयश्री सुर्वे | नगररचनाकार |

वरीलप्रमाणे काही अपुर्ण त्रुटक असमाधानकारक कारवाई अपुर्ण त्रुटक असामाधानकारक कारवाई अपुर्ण असलेल्या प्रश्नांची यादी देत आहे कृपया अपुर्ण कारवाई पुर्ण झाली का? तसेच अपुर्ण त्रुटक इतर विभागाशी संबंधित माहिती एकत्रित करून उत्तर मिळणेस विंनती आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्राश्न क्र. ३१९ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

यावेळेस त्या सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३१९:—</u> उल्हासनगर महानगरपालिकेतील करविभागाअंतर्गत भ्रष्टारचार सुरु असून श्री. अनिल ईश्वरलाल पहूजा या कर्मचा—याने घरपट्टीची रुपये अडीच ते तिन लाख रुपये वसूलीची रक्कम दोन तीन महिने वापरुन दिनांक १९/३/२००४ रोजी भरली आहे. म्हणजेच त्याने पैशाचा अपहार केला आहे. असे समजते तरी सबंधीत कर्मचा—याविरुध्द बडतर्फ, निलंबन अश्या प्रकारची कारवाई करणेत आलेली नाही? याचा अर्थ काय समजायचा?

कर विभागातील वरिष्ठ अधिकारी संबंधीतास संरक्षण देवून पाठीशी घालत आहेत असे वाटत नाही काय?

संबंधीत कर्मचारी चतुर्थश्रेणी कर्मचारी असूनही त्यास घरपट्टी वसूलीचे पैसे वसूली करणे सांगणे नियमात बसते काय?

बसत असल्यास कोणत्या नियमात बसते?

नसल्यास नियमबाहय नियुक्तीचे आदेश कोणी दिले?

कर विभगातील श्री. शिवकुमार व श्री.  जाधव यांना अल्प कालावधीसाठी गैरहजर राहिल्याने निलंबित केले होते.  श्री. अनिल खतुरानी व सावल कुकरेजा यांनी रक्कमेचा अपहार केलयाने त्वरीत निलंबीत केले होते.  मग श्री. अनिल पहूजा यांना संरक्षण देण्यामागे कारण काय?

त्यांना अदयाप निलंबित न करण्याचे मागे उद्देश कोणता?

महापालिकेच्या कर्मचा—यांना वेगवेगळा न्याय दिला जातो का?

जर एकच नियम असेल तर पहूजाने निलंबन का झाले नाही?

संबंधिताने उशिराने भरलेल्या पैशाचे व्याज वसूल करणार का?

किती वसूल करणार?

संबंधित पैशाचे अपहाराची चौकशी करुन संबंधीता विरुध्द व वरीष्ठा विरुध्द काय करवाई करणार?

किती दिवसात?

कृपया वरील प्रश्नाची सूचक, समाधानकारक माहिती येत्या महासभेत देण्यात यावी ही विनंती.

उत्तर :—श्री. अनिल ईश्वरलाल पहुजा यांनी दिनांक ९.२.०४ पासून दि. २०.२.०४ पर्यंत मालमत्ता कराचे वसुलीपोटी केलेल्या तात्पुरत्या अपहाराचे रक्कमेबद्दल तपासणी सुरू आहे.

नाही कारवाई सुरू आहे.

नाही. चौकशी सुरू असून अहवाल प्राप्त होणेचा आहे.

कर वसुलीचे अधिकार दिले नाहीत.

श्री. अनिल पहुजा यांची खाते निहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

नाही.

चौकशी सुरू आहे.

होय.

नियमाप्रमाणे.

चौकशीचे निर्णय प्राप्त झालेवर त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

साधारण १ ते अर्धा महिन्यात.

मा. सचिव:—प्र श्न क्र. ३२० हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

प्रश्न क्र. ३२०:—  उल्हासनगर —५ येथिल वसंत बहार मार्गावरील पारुशा मार्केटचा अनधिकृत इमारतीच्या गच्चीवर २१ दुकानांचे अनधिकृत बांधकाम झालेले आहे.  सदरच्या बांधकामा विरोधात निष्कासनाची आणि बांधकामधारका विरोधात फौजदारी स्वरुपाची कारवाई अदयापी का झालेली नाही?

उत्तर :—वसंत बहार मार्गावर पारूशा मार्केट इमारतीवर ९ गाळयांचे बांधकाम झाले आहे. नगररचनाकार यांनी दिनांक २९.८.२००३ चे पत्राने विकासकास दुरूस्तीची परवानगी दिली आहे. तथापि बेकादेशिर कार्य पध्दतीचा अवलंब करून पुढील कार्यवाही सुरू आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—कारवाई काय केली पुढे? की पुन्हा तेच कायदेशिर कारवाई सुरू आहे?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—जेथपर्यंत मला माहिती आहे. मागील आठवडयात नोटीस बजावली आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—साधा प्रश्न असल्यामुळे सविस्तर बोलायला काही हरकत नाही. हा प्रश्न आहे ४. ६.२००४ चा जुन महिन्यातील प्रश्न आहे. त्यामध्ये आपण वरील प्रमाणे उत्तर दिले आहे. तर आपण पुन्हा एकदा सभागृहाला स्मरण करून दया की, ही कायदेशीर कारवाई काय असते. आणि तिचा नेमका कालावधी काय असतो? कारण की मागच्या वेळेस तुम्ही एकदा बोलला होतात की, विसरलो......

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—</u>मी आयुक्त साहेबांना आदेश देते की, तात्काळ कारवाई केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—</u>तेच आहे ना? तेच आहे ना?

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—</u>मी पुन्हा त्यांना सांगितले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—</u>असे आहे की, कोणत्याही अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्याआधी त्यास नोटीस दयावी लागते. ती नोटीस जास्तीत जास्त ३० दिवस कालावधीची असते.

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—</u>आजची जी काही स्थिती आहे. तेथे जेवढे काही अनाधिकृत बांधकाम आहे ते तोडण्यास मी आदेश देत आहे. व या प्रकरणांची पुर्णपणे चौकशी केली जावी.

<u>मा. सचिव:—</u>प्राश्न क्र. ३२१ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३२१:—</u> शिट नं. ४८, कॅम्प नं. १,२,३ साईट नं. १४८ हा शॉपींग डिस हाऊसिंगसाठी राखीव असून ८० फुट डी.पी. रोड जात आहे. प्लॉट नं. १४ ते १४ पर्यंत च्या प्लॉटमध्ये ६ महिन्यापूर्वी इमारत बनविण्यात आली असून सदर इमारतीला बांधकामाची परवानगी दिली आहे काय?

परवानगी दिली असल्यास कोणत्या नियमानुसार देण्यात आली आहे?

कृपया सदर प्रश्नाची सूचक, समाधानकारक माहिती येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर :—</u>होय, त्यांचे क्र. /उमपा/नरवि/बांप/१९/००/७८९, दि. १९.८.०३ च्या पत्रान्वये सुधारीत मंजुरी देण्यात आली आहे.

सदर मंजुरी समावेशक आरक्षणाचे माध्यमातुन शासनाचे दि. ७.४.९४ च्या आदेशानुसार देण्यात आली आहे.

<u>श्री. दुसाने (उपआयुक्त शहर):—</u>त्या इमारतीला जी बांधकाम परवानगी दिली आहे. १९. ८.२००३ ला सुधारित बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. आणि दुसरी ही जी मंजुरी दिलेली आहे शासनाने एम. आर.टी.पी. ॲक्टचे कलम ५४ नुसार ते निर्देश दिलेले आहेत. समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकासनाचे त्यानुसार परवानगी देण्यात आलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राज्रेंद चौधरी:—</u>त्याची सद्यस्थिती काय आहे? आपण ती जागा त्या विकासकर्त्याकडुन घेतली का?

<u>मा. सदस्य राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>साहेब, तोच भुखंड आहे तो आपण शाळेसाठी पाहण्यास गेलो होतो.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>सपना गार्डनच्या समोरचा आहे? ती जी जागा आहे ती आम्ही ताब्यात घेतली आहे. माझ्यामते त्या जागेचे इनडेक्स टु सुध्दा झालेले आहे. व आर.ओ.बी. आहे त्यामध्ये बाधित झालेल्या लोकांना महासभेच्या संमतीने, महासभेच्या मंजुरीनंतर तेथे पुर्नवसित केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>अजुन पर्यंत त्याने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही. त्या अगोदरच त्याच्याशी लेखी व्यवहार करणे चालेल का? त्या विकासकर्त्याने अदयाप पर्यंत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही. त्याने चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला न घेता तो आपणांस ती जागा देत आहे. असे तर नाही की आपण बेकायदेशिर वास्तु ताब्यात घेत आहोत? आमच्या अधिका—यांनी याबाबत चौकशी करावी. इनडेक्स टु पाहुन आपण फसु शकतो. यावर जरा प्रकाश झोत टाकावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, याबाबत आता माझ्याकडे माहिती नाही. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला पुर्ण बांधकाम झाल्यानंतरच दिला जाईल. महानगरपालिकेत जेवढा भाग दिला आहे. त्याबाबत आजपर्यंत जेवढया काही रहाण्याच्या जागा आरक्षणानुसार विकसित करण्यात आल्या त्या फक्त तेथे जागेवर विकसित झाल्या. महानगरपालिकेला कधीही प्रत्यक्ष स्वरूपाचा ताबा मिळाला नव्हता. जी सहा आरक्षणे रहाण्याच्या जागा आरक्षणानुसार विकसित झाली त्यामधील तीन आरक्षणांचे इनडेक्स टु घेतले आहे. याबाबत जर चटई क्षेत्राचे उल्लंघन झालेले असेल तर त्याची चौकशी केली जाईल व चटई क्षेत्राचे उल्लंघन असेल तर त्यावर सुध्दा कारवाई केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>कारवाई करा. नाही तर जेवढे चटई क्षेत्राचे उल्लंघन असेल १०० मीटर बांधकाम तेवढे बांधकाम आपल्या ताब्यात घ्या. दूसरे कुणाला तरी देण्यासाठी उपयोगात येईल.

<u>सचिव:—</u>प्रश्न क्र. ३२२ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३२२</u>:—यश अपार्टमेंट प्लॉट नं. ६११—६१२ मधूबन हॉटेल समोर, उल्हासनगर—३ येथे भव्य इमारतीचे बांधकाम सुरु आहे. सदर इमारतीस बांधकामाची परवानगी दिली आहे काय?

बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे झाले आहे काय?

त्यात वाढीव माळयाचे बांधकाम केले आहे काय?

सदर मजला महापालिकेच्या दृष्टीने अनाधिकृत आहे काय?

तेथिल रहिवाश्यांना महापालिकेने नोटिस बजावल्या होत्या का?

कृपया वरील प्रश्नाची सूचक समाधानकारक उत्तरे येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर:—</u>होय, सदर जागेत खालील प्रमाणे बांधकाम परवानगी देण्यात आली.

१. यश अपार्टमेंट क्र. उमपा/नरवि/बांप/७२/९८/११४८, दि. ४.२.२०००

२. पुष्कर अपार्टमेंट क्र. उमपा/नरवि/बांप/७०/९८ ११४९, दि. ४.२.२०००

३. क्र. उमपा/नरवि/बांप/७१/९८/९४०, दिनांक ४.३.२००३

नाही.

नाही. तथापि १९३.१९ चौ.मी. वाढीव बांधकाम केले असल्याचे आढळुन आले आहे.

वाढीव बांधकाम अनाधिकृत आहे.

होय.

अधिनियम तरतुदीनुसार कारवाई सुरू आहे.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्री. अशोक ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>अधिनियमाच्या तरतुदी अनुसार कारवाई सुरू आहे. परंतु कारवाई काय सुरू आहे त्याचे उत्तर पाहिजे. सात महिन्यानंतर आतापर्यंत कारवाई काय?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>यामध्ये १०० टक्के चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>याबाबत जे विकासकर्ते आहेत त्यांना कलम ५२ नुसार नोटीस सुध्दा बजावली होती. व त्यांच्यावर एम.आर.टी.पी. चे कलम ३२ नुसार गुन्हा दाखल करण्याचे आदेश सुध्दा दिले आहेत. आज त्याची स्थिती काय आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला किंवा नाही याची माहिती सध्या माझ्याकडे नाही. परंतु असे आदेश दिले आहेत की, एफ.आय. आर. दाखल करा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—</u>तोपर्यंत हा प्रश्न प्रलंबित ठेवला जावा.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>तोपर्यंत हा प्रश्न प्रलंबित ठेवण्यास हरकत नाही.

<u>मा. सचिवः—</u>प्रश्न क्र. ३२३ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३२३:—</u> सन २००२—२००३ / सन २००३—२००४ या आर्थिक वर्षात विकर सेक्शनसाठी असणारा ५ टक्के निधी किती होता?

वरील आर्थिक वर्षात असणारा हा निधी कुठल्या प्रभागात व कोणत्या स्वरुपात वापरला गेला आहे?

विस्तृत माहिती दयावी.

<u>उत्तरः—</u>सन २००२—२००३ व २००३—२००४ या आर्थिक वर्षात विकर सेक्शनसाठी ५ टक्के निधी खालील प्रमाणे.

सन २००२—२००३— १,२४,००,०००/—

सन २००३—२००४ — ८४,००,०००/—

१. सन २००२—२००३ या वर्षात एकुण १२ कामे रू. ४१.५० लक्ष ची होती सर्व कामे पुर्ण झाली आहेत.
२. सन २००३—२००४ या वर्षात एकुण २८ कामे रू. ५२ लक्षची होती त्यापैकी १७ कामे पुर्ण झाली आहेत.

(कामांची यादी सोबत जोडली आहे)

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—उत्तर ठिक आहे.

सचिव:—प्रश्न क्र. ३२४ हा श्री. दिलीप गायकवाड यांचा आहे.

प्रश्न क्र. ३२४:— उल्हासनगर कॅम्प नं. १ येथे खालील ठिकाणी बांधकाम सुरु असल्याचे समजते. सदर बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय?

सदर बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे काय?

सदर बांधकामात वाढीव बांधकाम आहे काय?

असल्यास महानगरपालिकेने सदर बांधकामाविरुध्द काय कारवाई केली?

नसल्यास अदयापपर्यंत का कारवाई केली नाही?

सदर प्रश्नाची सुचक, समाधानकारक उत्तरे येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

१) कल्याणी रेसीडेन्शल कॉम्पलेक्सच्या बाजूला सी ब्लॉक
उल्हासनगर—१.

उत्तर:—सदर इमारतीचे बांधकाम आजपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे चालु आहे.
आजपर्यंत सदर इमारतीमध्ये वाढीव बांधकाम नाही.
उमपा/नरवि/बांप/१८३/०१/६६ दि. १८.४.०२ ने नगररचना विभागाने परवानगी दिली आहे. विकासकाने अंतर्गत बदल केले आहेत.
प्रश्न उद्‌भवत नाही.

मा. सचिव:—उत्तर ठिक आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—प्लान नं. १८३ /१ हे अतिक्रमण, वाढीव बांधकाम केले आहे. त्याबाबत सद्य परिस्थिती काय आहे? ती सांगावी.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, एकदाका बांधकाम परवानगी दिली तर आजची स्थिती काय आहे हे तर प्रश्नाच्या माध्यमातुन सांगितले जावु शकत नाही. फक्त आपला प्रश्न होता की काय ते बांधकाम अधिकृत आहे. त्याचे उत्तर दिले की होय. नगररचना विभागाकडुन त्यास परवानगी दिली आहे. आजच्या स्थितीला त्या बांधकामाची स्थिती काय आहे, एक वेळ बांधकाम परवानगी दिल्यांनतर बांधकाम पुर्ण झाल्याशिवाय जोपर्यंत ते बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेण्यास येत नाही किंवा परवानगीची जी मुदत आहे ती संपत नाही तोपर्यंत आम्ही तेथे जावुन माहिती घेत नाही. किंवा कारवाई करत नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—चटई क्षेत्राचे काही उल्लंघन केले आहे काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—त्याबाबतची माहिती सध्या माझ्याकडे नाही. बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेण्यासाठी येतील किंवा परवानगीची जी मुदत आहे. तीन वर्षाची, एक वर्षाची बांधकाम परवानगीची आणि त्यानंतर दोन वेळा नुतनीकरणाची अशी एकुण कालावधी जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत तेथे चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे किंवा नाही याबद्‌दल काही सांगितले जावु शकत नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—तक्रार केल्यानंतर तुम्ही सर्वे करून रिपोर्ट देता ना? तर त्या रिपोर्ट मध्ये तुम्हाला काही आढळले किंवा नाही. आम्ही तक्रार दिल्यानंतर तुमचे अधिकारी त्याठिकाणी भेट देवुन रिपोर्ट तयार करतात. व नोटीसा काढतात. काही काही ठिकाणी सांगतात ३० दिवसाची नोटीस आहे. ४० दिवसाची नोटीस आहे. त्याच्यानंतर काय? कायदेशिर कारवाई त्याच्यावर काय करता तुम्ही?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, जी कायदेशिर कारवाई करायची आहे तिचा प्रश्न तेव्हा उपस्थित होईल जेव्हा तेथे चटई क्षेत्राचे उल्लंघन झालेले असेल. आता तर तेथे बांधकाम परवानगी दिलेली आहे, बांधकाम चालु आहे. बांधकाम अदयाप पुर्ण झालेले नाही. म्हणुन चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले किंवा नाही हे कसे सांगु शकतो. जर आपणांस वाटत असेल की तेथे चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले आहे. परवानगी नुसार काम चाललेले नाही. असे जर आपण निर्दशनास आणुन दिले तर मी आमच्या नगररचना विभागातील अधिका—यांचे पथक तेथे पाठवु. ते तेथे जावुन चौकशी करतील. जर तेथे चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले आहे असा जर आपला आरोप असेल तर.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—आहे ना? आरोप आहे ना? चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—आपल्या प्रश्नामध्ये असे कुठेच लिहिलेले नाही. की त्याठिकाणी चटई क्षेत्राचे उल्लंघन झाले आहे. आपण फक्त माहिती मागितली होती. ती माहिती आपल्या समोर व सभागृहासमोर ठेवली आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—तेथे जर चटई क्षेत्राचे उल्लंघन असेल तर किती दिवसात आपण अहवाल दयाल? आणि आताची स्थिती काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, चटई क्षेत्राचे उल्लंघन असेल तर हा एक काल्पनिक प्रश्न आहे. व काल्पनिक प्रश्न विचारला जावु शकत नाही. सचिव साहेब, जरा सभागृहाला याबाबत माहिती दया.

मा. सचिवः— प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—साहेब, आपण या प्रश्नाची माहिती दिली नाहीत.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मी सभागृहाला सांगितले आहे की, जे प्रश्न अशा गृहीतावर आधारीत जर असतील तर काय करणार? याचे उत्तर या सभागृहात दिले जावु शकत नाही. जर असे आहे असा जर आपला दावा असेल तर आपण येथे सांगा त्यानंतर आम्ही आमचे पथक तेथे पाठवु. असेल तर काय करणार याचे उत्तर येथे नाही.

**मा. सदस्या श्रीमती मीना सोंडे, श्रीमती माया मसंद हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—याची आपण चौकशी करणार आहात किंवा नाही.

मा. सचिवः—साहेबांचे म्हणणे आहे की हा काल्पनिक प्रश्न आहे.

पाच लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या आहेत. एक लक्षवेधी सूचना अशी आहे की तीला स्थगन प्रस्तावाचे स्वरूप आहे. ती लक्षवेधी सूचना होवू शकत नाही.

एक लक्षवेधी सूचना आहे जिचे सूचक आहे श्री.राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदक आहेत श्री. राजेंद्र चौधरी लक्षवेधीचा विषय असा आहे की, डॉल्फिन क्लब येथे ६१ झोपडया होत्या त्यातील ४७ झोपडया तोडल्या आहेत. व मागील इतिहास असा आहे की, ज्या झोपडया तोडल्या जातात. त्याचे पुनर्वसन केले जात नाही.

दुसरी एक सूचना आहे त्याचे सूचक आहेत श्रीमती भावना रवी खिलनानी व अनुमोदक आहेत श्री. सतरामदास जेसवानी त्यांची सूचना अशाप्रकारची आहे की, शहरामध्ये महानगरपालिकेचे जे आरक्षित भुखंड आहेत ते हडप केले जात आहेत. याबाबतीत प्रशासनाकडुन काही निवेदन आले पाहिजे. व त्यांना या

विषयावर चर्चा करायची आहे. या विषयास लक्षेवधीचे स्वरूप नाही. प्रत्यक्षात हे लक्षवेधीचे स्वरूप नाही. जर आपणांस घ्यायचे असेल तर स्थगन प्रस्ताव म्हणुन घेवु शकतात परंतु त्यासाठी दोन तृतियांश बहुमत असले पाहिजे.

तिसरी लक्षवेधी सूचना आहे, तिचे सूचक आहेत श्री. नाना पवार व अनुमोदक आहेत श्री.शांताराम निकम. त्यांची सूचना अशी आहे की, शहरामध्ये एक चुकीचा संदेश जात आहे की झोपडपट्ट्या तोडल्या जातील. जर असे असेल तर प्रशासनाकडुन निवेदन आले पाहिजे की, प्रशासनाची काय तयारी आहे. व जर ही गोष्ट खरी आहे तर त्याबाबतीत निवेदन दिले जावे.

श्री. प्रमोद टाले यांची एक सूचना आहे. व तिचे अनुमोदक आहेत श्री. गौतम भालेराव त्यांची सूचना अशी आहे की, दारीद्रय रेषेखालील जे लोक आहेत. त्यांच्या कर माफीचा जो प्रस्ताव होता त्याचा फायदा केवळ समाजातील उच्चभ्रु लोकच घेत आहेत.

कृपया माफ करा या सूचनेचे सुचक आहेत श्रीमती जयश्री सुर्वे व अनुमोदक आहेत श्रीमती नंदीनी बामणकर हया आहेत. यांचे म्हणणे आहे की, दारीद्रय रेषेखालील कुटूंबांना मिळकतकर माफ करण्याच्या प्रस्तावाचा फायदा फक्त श्रीमंत लोकच उठवत आहेत. म्हणुन यावर प्रशासनाच्यावतीने निवेदन केले पाहिजे.

आणि दुसरी सूचना आहे. श्री. प्रमोद टाले यांची या लक्षवेधीचे अनुमोदक आहेत श्री. गौतम भालेराव विधानसभा निवडणुकीच्या अगोदर कर माफीबद्दल जे अर्ज आले होते त्यातील कित्येक अर्ज अदयाप पर्यंत प्रलंबित आहेत. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. यासाठी प्रशासनाकडुन निवेदन करण्यात यावे. या ज्या पाच लक्षवेधी सूचना आहेत. यातील फक्त दोन लक्षवेधी सूचनांवर मा. महापौरांच्या आदेशानुसार स्विकृती दयायची आहे. श्री. राजेंद्रसिह भुल्लर यांची जी लक्षवेधी सूचना आहे. व श्री. नाना पवार यांची जी लक्षवेधी सूचना आहे. या दोन्ही लक्षवेधी सूचनांचे विषय जवळ जवळ एकच आहे. झोपडपट्टयांचे संरक्षण झाले पाहिजे.

श्री. नाना पवार यांची जी लक्षवेधी सूचना आहे. ती स्विकृत केली जात आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—दोन्ही लक्षवेधी सूचना एकसारख्या नाहीत. त्यांच्या लक्षवेधीचा विषय वेगळा आहे. माझ्या लक्षवेधीचा विषय वेगळा आहे. झोपडपट्टी हटविण्याची जी अफवा आहे त्याबाबतची त्यांची लक्षवेधी आहे. व दुसरी लक्षवेधी, जी झोपडपट्टी हटविली आहे. रस्ता रूंदीकरणात जी बांधकामे तुटली आहेत त्यांचे पुनर्वसन कसे केले जावे. त्यासाठी ती लक्षवेधी सूचना आहे.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—महाराजजी, आपली जी लक्षवेधी सूचना आहे. त्याबाबत मी आयुक्त साहेबांना आदेश देते की, त्यांनी समाधानकारक उत्तर दयावे. व दोन लक्षवेधी सूचना आम्ही स्विकृत करत आहोत. एक श्रीमती भावना खिलनानी व दुसरी आहे.........

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—सचिव साहेबांनी सांगितले ना की ती लक्षवेधी सूचना होवू शकत नाही. आपण ती घेवू शकता.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—नाही. नाही. स्थगन प्रस्ताव घेत आहोत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—स्थगन प्रस्ताव आपण घेवु शकता.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—दोन लक्षवेधी सूचना स्विकृत करू शकतात.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—ठिक आहे, महाराज भुल्लर यांची एक व दुसरी श्री. नाना पवार यांची लक्षवेधी सूचना स्विकृत करत आहे. व श्रीमती भावना खिलनानी व सतरामदास जेसवानी यांचा स्थगन प्रस्ताव स्विकृत करीत आहे. या तिन्ही विषयांवर चर्चा करू.

मा. सचिव:—श्रीमती भावना खिलनानी यांचा जो प्रस्ताव आहे. स्थगन प्रस्ताव म्हणुन आपण तो स्विकृत करीत आहात. व श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्री. नाना पवार यांची जी लक्षवेधी सूचना आहे. या दोन्ही लक्षवेधी सूचना दाखल करून घेतल्या जात आहेत. व उर्वरित दोन लक्षवेधी सूचना रद्द केल्या जात आहेत. व आयत्यावेळचे तीन विषय आहेत. एक दरसुची लागु करण्यासाठीचा विषय आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग यामध्ये जी विकास कामे केली जातात. त्यांचे जे दर असतात त्यास मंजुरी दयायची

आहे. हा विषय सभेच्या कामकाज सामावुन घेतला जावा? दुसरा विषय आहे पार्कींगसाठी ज्या सुविधा करायच्या आहेत. त्यासाठी जे शुल्क आकारायचे आहे त्यासाठीचा एक प्रस्ताव आहे. हा प्रस्तावही सभेच्या कामकाजात सामावुन घेतला जावा काय? व तिसरा विषय खुप चांगला विषय आहे. विद्युत विभागातील जे निरूपयोगी सामान आहे. त्याचा विनियोग करायचा आहे. हे तिन्ही विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतले जावेत?ठिक आहे? तर पहिली लक्षवेधी जी आहे ती श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांची आहे. त्यांनी कृपया आपला प्रस्ताव विषद करावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—साहेब, डॉल्फिन क्लब येथे जी बांधकामे तोडण्यात आलेली आहेत. त्यांचे जे सर्वेक्षण आहे ते योग्य प्रकारचे नाही. आपण जर म्हणत असाल की ते योग्य प्रकारचे आहे. तर पुन्हा एकदा सर्व अधिका—यांना बोलावले जावे. व आपण काय करणार आहात ते जरा सांगा. यावर चर्चा होणे जरूरीचे आहे. यांना आपण कुठे बसविणार आहात. कारण की आपणांस ब—याचशा जागा संपादित करायच्या आहेत. जसे श्री. नाना पवार यांनी सांगितले . अमुक एका ठिकाणची वस्ती उध्द्वस्त होईल, दुस—या एका ठिकाणची वस्ती उध्दवस्त होईल. ही जी कुटूंबे उध्द्वस्त होणार आहेत त्यांना कुठे बसविणार आहात. उध्दवस्त होण्यास सर्व तयार आहेत. संपुर्ण उल्हासनगर शहर आपण उध्दवस्त करा. परंतु त्यांना आपण बसविणार कुठे? आपणांकडे पुरेशी जागा आहे का? आपण या लोकांना कुठे बसविणार आहात.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, डॉल्फिन रस्त्यावर रस्ता रूंदीकरणामध्ये बाधित झालेल्या लोकांची पर्यायी व्यवस्था करावी अशी लक्षवेधी सूचना सभागृहात मांडण्यात आली आहे. मा. आयुक्त साहेब जे ३३ रस्ते श्री. आर.डी. शिंदे साहेब यांनी हाती घेतले होते. त्यातील काही रस्ते आपण पुर्ण करण्याचे काम हाती घेतले आहे. ज्या तातडीने डॉल्फिनच्या रस्त्याची आपण सुरूवात केली आहे. लोकांच्या घरावर दोन दिवसात बुलडोझर चालवुन रस्त्यांच्या कामाला सुरूवात केली आहे. तातडीने त्याच गंभीरतेने आपण अजुन काही रस्ते राहीलेले आहेत ते हाती घ्यावेत. त्यामध्ये खेमाणीचा एक रस्ता आहे तो पण रस्ता घेण्यासाठी आपण तेवढे धाडस दाखवाल का? हा या लक्षवेधी सूचनेव्दारे प्रश्न आहे. दुसरे याठिकाणी जे डॉल्फिन क्लबच्या रस्त्यावरील बाधीत झालेले लोक आहेत ते १९८२च्या पुर्वीपासुन तेथे राहतात. आणि शासनाचा नियम आहे की, १९९५ च्या अगोदर जर कुणी तेथे रहात असेल तर त्यांना पर्यायी व्यवस्था केल्याशिवाय हटवु नये. उल्हासनगर महानगरपालिकेने पर्यायी व्यवस्था न करता त्यांची घरे तोडली त्या लोकांची पर्यायी व्यवस्था कधी करणार व कशी करणार? त्याचाही खुलासा या लक्षवेधी सूचनेव्दारे येथे व्हावा.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, डॉल्फिन क्लब येथुन जाणारा रस्ता जो शांतीनगर येथील साईबाबा मंदीरापासुन सी ब्लॉक पर्यंत जातो. तो या शहराचे विकास आराखडयातील रत्यातील एक महत्वाचा रस्ता आहे. १९९९ साली त्यास या सभागृहाने मंजुरी दिली होती. जानेवारी, २००० मध्ये या बाबत कार्यादेश देण्यांत आले होते. व ते पुर्ण काम सात महिन्याच्या आत पुर्ण करायचे होते. परंतु ते काम अदयाप पर्यंत पुर्ण झालेले नाही. त्यामध्ये काही इमारती काही झोपडया बाधित होत होत्या. म्हणुन ते काम अर्धवट राहिले होते. उर्वरित जे ३३ रस्ते आहेत त्यामधील जवळ जवळ २८ रस्त्यांचे काम पुर्ण होत आहे. दोन रस्ते त्यामध्ये आयडीआयचा एक रस्ता व डॉर्ल्फिन क्लबचा एक रस्ता अर्धवट अवस्थेत आहे. व तीन रस्त्याचे कामाबाबत महापालिकेने ठराव करून ते काम सोडुन दिले आहे. तर हा जो रस्ता आहे यावर पहिल्यांदा २००० सालामध्ये कारवाई करायची होती. काही न्यायालयीन आदेशामुळे कारवाई होवू शकली नाही. नंतर या सर्व लोकांना नोटीसा बजावण्यात आल्या. सुनवाई देण्यात आल्या. बहुतांश लोक सुनवाई दिल्याचे मान्य करीत नाहीत. आमच्याकडे दस्तऐवज उपलब्ध आहेत. त्यानुसार सुनवाई दिलेली आहे. आता प्रश्न उपस्थित होतो. त्यांचे पुनर्वसन करण्याचा आपण आता या प्रकल्पास मंजुरी दिली आहे. यामध्ये जवळ जवळ १४० कुटूंबाचे पुनर्वसन केले जाईल. व शहाड स्टेशनच्या बाहेरचा जो भुखंड आहे. तेथे फक्त १११ कुटूंबाचे पुनर्वसन केले जाईल व आम्ही १४० फ्लॅटस् तयार करत आहोत. शहरामध्ये अशीच दुसरी एक जागा आहे. महात्मा फुले झोपडपट्टी आहे तेथे वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत पुनर्वसन केले जावु शकते. ती जी जागा आहे ती जवळ जवळ ३८ हजार चौ. मीटर जागा उपलब्ध आहे. व तेथे जवळ जवळ ४००० लोकांचे पुनर्वसन केले जावु शकते. व या शहराच्या विकास आराखडयामध्ये जी आरक्षणे आहेत. त्यांची अंमलबजावणी करताना जेवढे काही लोक बाधित होतील त्यांचे पुनर्वसन अशा जागी केले जाईल की जेथे हरीत पट्टा आहे. तेथील आरक्षणात बदल करून की जेथे वाल्मिकी आंबेडकर आवास

योजनेनुसार अंमलबजावणी करून करू शकतो. हे जे लोक आहेत त्यांना सुनवाई दिली आहे. त्यांचे जर म्हणणे असेल की पुन्हा सुनवाई दया. त्यांच्याकडे काही कागदपत्र असतील तर त्यांना पुन्हा सुनवाई दिली जाईल. व शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार १ जानेवारी, १९९५ च्या अगोदरचा जर एक सुध्दा पुरवा मिळाला तर भले तो रेशनकार्डचा असो, मतदार यादीमध्ये नाव असो अगर मतदार ओळखपत्र असेल तर त्यांचे पुनर्वसन केले जाईल. सुनवाई दिल्यांनतर आम्ही जे आदेश दिले आहेत त्यामध्ये सुध्दा असे स्पष्टपणे लिहिलेले आहे की तुमचे पुनर्वसन केले जाईल. ही ही कागदपत्रे आपण दया. हा जो प्रकल्प आम्ही हाती घेत आहोत. त्यामध्ये पुनर्वसन होईल. व मी सभागृहाला आश्वासन देवू इच्छितो की, ही जी ६१ घरे तोडली आहेत. व त्या अगोदर काही लहान लहान झोपडया तोडल्या या सर्व पात्र लोकांचे पुर्नवसन केले जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—पुनर्वसन कधी करणार व कोठे? गुलशन नगरबाबत आपण जे बोलत आहात. तेथे पुन्हा आपण सर्वेक्षण केले तर १४०च्या पुढे आकडा जाईल. १११चा आकडा आपण सांगत आहात ना तो १४० चा आकडा पार करेल. कित्येक ठिकाणी आपल्या लोकांनी सर्वेक्षण केलेच नाही. ही गोष्ट मी आपणांस खात्री देवुन सांगु इच्छितो की आपल्या लोकांनी योग्य त्या प्रकारे सर्वेक्षण केले नाही. तेथे जर पुन्हा सर्वेक्षण करावयास गेले तर १४० चा आकडा पार केला जाईल. आपण हे जे म्हणत आहात की, १३८ फ्लॅटस् तयार होणार आहेत ते तर गुलशन नगर येथील लोकांना पुरे पडणार नाहीत. या लोकांचे काय होईल?

**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर, श्री. सुरेश गायकवाड हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—सन्माननिय सदस्य महादेय, मी आपणांस सांगु इच्छितो की, गुलशन नगर मध्ये होवु शकते १९९५ नंतरचे अधिक लोक आहेत. आता आम्ही जेव्हा सर्वे केला तेव्हा १११ कुटूंबे होती. आपण जे उदाहरण दिले की, आपले त्यामध्ये नाव आले नाही. बांधकाम आहे पण नाव आले नाही. किंवा नाव सांगण्यांत आले नाही. पुन्हा पुन्हा तेच सांगत आहे. तेथे पुन्हा सर्वे करूच परंतु तेथे जी घरे शिल्लक राहतात तेथे, व दुसरे मी जे सांगितले तेथे ३८००० चौ. मी. हरीत पट्टयामध्ये आता जागा उपलब्ध आहे. व आज तेथे फक्त ४०० लहान लहान झोपडया आहेत. हरीत पट्टयाचे आरक्षण बदलुन वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत आरक्षणात बदल करण्याचे अधिकार आहेत. त्यास जास्त काही वेळ लागत नाही. ती माझी योजना सुध्दा तयार आहे. पुढील महासभेत मी ही योजना महासभेपुढे घेवुन येईन. तेथे या लोकांचे पुनर्वसन केले जाईल. त्यामध्ये कोणतेही दुमत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—सन्माननिय आयुक्त साहेब, लक्षवेधीवर चर्चा करताना. मी दुसरा प्रश्न विचारला होता की, ज्या तातडीने आपण हा रस्ता हाती घेतला. त्याच तातडीने खेमाणीचा रस्ता आपण हाती घेणार आहात का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—महासभेने जर आदेश दिला की, या रस्त्याचे सुध्दा रूंदीकरण करायचे आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आता ज्या झोपडवासियांची घरे उध्दवस्त झाली तेथील रस्त्याचे रूंदीकरण करण्यासाठी महासभेने आदेश दिला होता का?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—नाही. नाही. ३३ रस्त्यांचे रूंदीकरण करण्याचा महासभेचाच आदेश होता. बांधकाम निष्कासित करण्यासाठी आदेशाची आवश्यकता नाही. रस्ता रूंदीकरणासाठी महासभेच्या आदेशाची आवश्यकता आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—जर ३३ रस्त्यांबाबत अगोदरच महासभेचा आदेश आहे तर मग आणखी आदेशाची आवश्यकता काय?

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—मा. महपौर महोदया, ३ रस्ते जे आहेत कल्याण अंबरनाथ रोड, पंचवटी स्टीलपासुन जाणारा लिंक रोड व एक खेमाणी डाईंग कडुन येणारा रस्ता या तीन रस्त्यांना

महासभेने ठराव पारीत करून रद्द केले आहे. जर महासभेकडुन पुन्हा ठराव होत असेल तर खेमाणीचा तो रस्ता सोडा, कल्याण अंबरनाथ रस्त्याचे सुध्दा आम्ही रूंदीकरण करू.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—श्री. हरदास माखिजा यांचा प्रश्न राहुन गेला आहे. निष्कासनानंतरही ज्या लोकांचे काही बांधकाम शिल्लक राहिले आहे ते लोक तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करू शकतात ना? हा श्री. माखिजा साहेब यांच्या प्रश्नाशी संबंधित असा प्रश्न आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—याबाबत मी जाहिरपणे उत्तर देवू शकणार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—जाहिरपणे उत्तर का देणार नाहीत?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—हे महासभेचे एकमत आहे. तेव्हा श्री. चंद्रशेखर साहेबांच्या कालावधीत श्री. आर.डी. शिंदे साहेबांच्या काळात जे काही रस्ते तयार झाले त्यात बाधित झाले त्यांनी तळमजला अधिक दोन माळे बांधकाम करावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—आयुक्त साहेब, रस्ता रूंदीकरणामध्ये ज्यांचे बांधकाम बाधित होते. अशा लोकांना आपले अधिकारी तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्याची लेखी परवानगी आपले अधिकारी देतात. काही लोकांना अशाप्रकारची परवानगी दिलेली आहे. आपण याची चौकशी करा. ज्यांचे बांधकाम रस्तारूंदीकरणात गेले नाही त्यांना सुध्दा अशी परवानगी दिलेली आहे. अगोदर जर कुणाला परवानगी दिलेली असेल तर या लोकांना सुध्दा परवानगी दया.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—जर त्या लोकांनी असे बांधकाम केंले तर त्यांच्यावर कारवाई होता कामा नये.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—परंतु प्रथम काही लोकांना परवानगी दिलेली आहे. त्यानुसार यांना सुध्दा परवानगी दिली पाहिजे. तळमजला अधिक दोन माळे अशा बांधकामाची......

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:'—ज्या लोकांची बांधकामे रस्ता रूंदीकरणामध्ये बाधित होतात अशा लोकांना तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्याची परवानगी दिली जावी.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—महपौरजी, या प्रकरणामध्ये आपण आदेश दया की ज्यांचे रस्ता रूंदीकरणामध्ये बांधकाम बाधित झाले आहे. अशा सर्वांना तळमजला अधिक दोन माळे असे बांधकाम करण्याची परवानगी दया.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी:—कसे आदेश देवू. जे काही होते ते समजुतदारपणे होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—आपल्या अधिका—यांनी लेखी स्वरूपात परवानग्या दिल्या आहेत. त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—त्या अधिका—यांवर कारवाई करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:— ज्या अधिका—यांनी अशा प्रकरणांमध्ये लेखी स्वरूपात परवानग्या दिल्या आहेत त्या अधिका—यांवर आपण काय कारवाई करणार?

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी:—ही एक सहकार्याची भावना असते. अनाधिकृत बांधकामांसाठी मी औपचारीकपणे कसे आदेश देवू शकते?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—</u> त्यांनी ज्यांचे बांधकाम रस्ता रूंदीकरणामध्ये निष्कासित झाले नाही त्यांना सुध्दा बांधकाम परवानगी दिली आहे. व अशी कशी सहकार्याची भावना ठेवणार?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>महापौरजी, मी आणखी एक खुलासा करू इच्छितो. आमच्या एका पत्रकाराने इमारतीचे बांधकाम केले होते. ते प्रकरण तत्कालिन नगरसेवक श्री. बी. बी. मोरे यांनी महासभेत उपस्थित केले होते. त्यावेळी श्री. आर.डी. शिंदे आयुक्त यांनी महासभेत उत्तर दिले होते की २७ जुलै १९९९ पासुन श्री. चंद्रशेखर साहेबांनी आयुक्त पदाचा कार्यभार स्विकारला होता. त्याआधी जे काही बांधकाम झाले असेल, एका दिवसापुर्वीही जे बांधकाम झाले असेल ते आम्ही तोडणार नाही. यानंतर जी काही अनाधिकृत बांधकामे तयार होतील ती तोडु. व याबाबत १०० वेळा जेव्हा प्रश्न विचारले जात होते तेव्हा तत्कालिन आयुक्त श्री. आर.डी. शिंदे साहेब महासभेत उत्तर देत होते. जे बांधकाम रस्तारूंदीकरणामध्ये निष्कासित झाले त्यांनी तळमजला अधिक दोन माळे बांधकाम करायचे. आयुक्त साहेबांनी महासभेमध्ये सहकार्याचे निवेदन केले व महासभेत सुध्दा संमती झाली होती. ३३ रस्त्यांच्या रूंदीकरणामध्ये जे लोक आपले बांधकाम तोडण्यासाठी सहकार्य करतील. ते त्याजागी तळमजला अधिक दोन माळे बांधकाम करू शकतील.

<u>मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—</u>अशा प्रकारची संमती देण्यास आयुक्त साहेब तयार नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>हे आयुक्त मानत नाहीत परंतु बाकीच्या आयुक्तांनी यास संमती दर्शविली आहे.

<u>मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—</u>माझे असे मत आहे की रस्ता रूंदीकरणाबाबत आयुक्त साहेब, याबाबत विचार करतील. औपचारीकपणे तर ते सांगु शकत नाहीत की अनाधिकृत बांधकाम करा. सभागृहाची अशी भावना आहे. मी सभागृहाची भावना आपणांस विशद करत आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>आयुक्त साहेबांनी अनौपचारीकपणे तरी हे स्विकृत केले आहे काय?

<u>मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—</u>आयुक्त साहेबांना मी सभागृहाची भावना विशद करत आहे. ते सभागृहाच्या भावनांची कदर करतील.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे)ः—</u>मा. महापौर महोदया, चुकीच्या कामास मी ना औपचारीकपणे स्विकृती देईल ना अनौपचारीकपणे स्विकृती देईन. याअगोदर सुध्दा सभागृहात मी सांगितले होते की यापुर्वीच्या आयुक्तांनी जे काही निर्णय घेतलेले आहेत त्यांच्यावर मी काही टिका टिप्पणी करणार नाही. बरोबर किंवा चुकीचे आहे असे काही बोलणार नाही. परंतु या सभागृहास मी आधी हे सांगु शकतो की, ही मागणी बेकायदेशिर आहे. भले ही आपला तसा ठराव असो, बेकायदेशिर मागणीबाबत मी विचार करू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—</u> मा. आयुक्त साहेब, जर आपल्या कालावधीत आपल्या अधिका—यानी अशा प्रकारची बांधकाम परवानगी दिली असेल तर आपण त्या अधिका—यांवर काय कारवाई करणार?त्यांनी परवानगी दिली आहे ती चुकीच्या मार्गाने दिली आहे असे आपले म्हणणे आहे? त्यांच्या कालावधीत दिली आहे.

<u>मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—</u>जे काही होईल, सन्मान झाला पाहिजे. आयुक्त साहेब सर्वांचा सन्मान होईल असे पहा.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः—</u>रस्ता रूंदीकरणामध्ये एखादे जे बांधकाम निष्कासित झाले असेल त्यांना आपण बांधकाम परवानगी जर देवु शकत नसाल तर कमीत कमी त्यांचे बांधकाम रस्ता रूंदीकरणात निष्कासित झाले आहे. असे पत्र तर तुम्ही देवु शकता किंवा नाही? म्हणजे रस्ता रूंदीकरणामध्ये त्याची जागा गेली आहे हे तर सिध्द होईल. म्हणजे त्या लोकांना क्षेत्र. निरिक्षक वगैरे त्रास देणार नाहीत. बाकीचे लोक जसे पत्रकार वगैरे......

मा. सचिवः—पुढील लक्षवेधी सूचना श्री. नाना पवार यांची आहे.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः—मा. महापौरजी, ज्यांची दुकाने रस्ता रूंदीकरणामध्ये पुर्णपणे तुटली आहेत. त्यांना पर्यायी जागा मिळाली नाही. त्यासाठी काय केले पाहिजे?

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—कुठे दुकाने तुटली आहेत?

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः—माझ्या प्रभागात पाच दुकाने तुटली आहेत.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—होय, त्यांना पर्यायी जागा मिळाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः—परंतु त्यांना जागा दिलेली नाही.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—आपल्या नजरेत असे काही असेल तर आपण लेखी स्वरूपी आयुक्तांना दया ते काम होईल.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः—आभारी आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. नाना पवारः—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब, सभागृहातील उपस्थित सदस्य, आज मी एक लक्षवेधी सूचना सभागृहासमोर ठेवत आहे. उल्हासनगर शहरात एक असे वादळ आले आहे. सर्व लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे की उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगरमधील सर्व झोपडपट्टया तोडणार आहे व काही वर्तमानपत्रामध्ये असे वृत्त आल्याचे आम्ही सुध्दा वाचले आहे आयुक्त साहेबांनी म्हंटले आहे की हजारो झोपडया निष्कासित होणार आहेत. व सर्व शहरात काही लोक मुव्ही घेवून फिरत आहेत. ते झोपडपट्टयांमध्ये जातात तेथे व्हीडीओ शुटींग करतात. लोक त्यांना विचारतात त्या नंतर त्यांना सांगितले जाते की, आपली झोपडपट्टी तुटणार आहे. अशाप्रकारच्या वातावरणामुळे उल्हासनगर महानगरपालिकेवर रिपब्लिकन पार्टीने हजारो नागरिकांचा एक मोर्चा आणला होता. ही जी परिस्थिती निर्माण झाली आहे. ती आपणां सर्व नगरसेवकांसाठी सन्मानाची गोष्ट नाही. आता जे लोक इमारतीत राहतात. ज्यांना झोपडपटटीबाबत आत्मियता नाही. मला वाटते त्यांनी सुध्दा या लक्षवेधीचा विचार करावा. परंतु मी झोपडपट्टीत राहणारा एक सर्वसाधारण कार्यकर्ता आहे. मी तेथील लोकांच्या अडचणी समजु शकतो. लोक आम्हाला येवून सांगतात की, आमची झोपडपट्टी तुटणार आहे. आपण आमचे नगरसेवक आहात म्हणुन मी सभागृहासमोर आज ही लक्षवेधी सूचना मांडली आहे. आता यावर आयुक्त साहेब उत्तर देतील. यात कोणतीही शंका नाही. १९९५ नंतरचे जे बांधकाम आहे ते तोडले जाईल. याबाबत महाराष्ट्र शासनाचे आदेश आहेत. त्या आदेशांनुसार कारवाई केली जाईल. अशा प्रकारचे उत्तर आयुक्तांकडुन मिळेल याची आम्हास अपेक्षा आहे. परंतु जर महाराष्ट्र सरकारचा आदेश आहे की १९९५ नंतरची झोपडपट्टी हटविली जावी. याचा अर्थ असा थोडाच आहे की, काही लोकांनी झोपडपट्टयांमध्ये जावुन त्याची व्हीडीओ शुटींग करून भितीचे वातावरण निर्माण करावे. जर असे काही धोरण असेल तर लोकांना त्याची माहिती असावयास हवी. जे लोक जात आहेत त्यांना मार्गदर्शन करावयास पाहिजे की आपण का जात आहात? परंतु असे काहीच नाही, लोक येतात , लोक जातात, मोर्चा आला साहेबांना निवेदन दिले निघुन गेले. आता यापुढे तरी हे थांबणार आहे कींवा नाही माहित नाही. नाहीतर उदयापासुन पुन्हा ते व्हिडीओवाले पुन्हा झोपडपट्टयांमध्ये जावुन मोठया प्रमाणावर लोकांना सांगतिल की आम्ही मुव्ही काढत आहोत. आपली झोपडपट्टी हटविली जाणार आहे. यामध्ये माझा एक उद्देश आहे की, सभागृहाने चर्चा करावी. आयुक्त साहेबांचे काय उत्तर आहे. व सभागृहाने सुध्दा चर्चा करावी. या ज्या हजारो झोपडया आहेत त्या कोणत्या आहेत? झोपडी व झोपडपट्टया? झोपडी आहे की झोपडपट्टया आहेत? आमच्या मनामध्ये अशा ब—याचशा शंका निर्माण होतात की एक झोपडपट्टी जी ३०—४० वर्षापुर्वी वसली आहे. त्या झोपडपट्टीमध्ये हजारो घरे आहेत व त्या हजारो झोपडयांमध्ये २०—२५ —५० झोपडया जर १९९५च्या आहेत. तर त्या १००० घरांमधुन त्या २०—२५ झोपडया भलेही १९९५ नंतर बांधलेल्या असतील तर काय त्या निवडुन निवडुन महापालिका तोडणार आहे का? हा एक माझ्या मनामध्ये प्रश्न आहे व दुसरे असे की साहेबांनी आताच एक

वक्तव्य केले की पुनर्वसन ही जी महाराष्ट्र शासनाची योजना आहे व त्या पुनर्वसन योजनेनुसारही आरक्षीत भुखंडावर वसलेल्या ज्या झोपडपट्टया आहेत. त्यांच्यावर सुध्दा कारवाई होवू शकते.असे संकेत आता आताच काही वेळे पुर्वी आयुक्त साहेबांकडुन मिळाले आहेत. तर माझे असे एक म्हणणे आहे की, उल्हासनगर शहराचा जो विकास आराखडा आहे. तो विकास आराखडयास अजुन पर्यंत अंतिम स्वरूप प्राप्त झालेले नाही. त्यामध्ये शासनाचा निर्णय शिल्लक आहे. आमच्या सभागृहाच्या सूचना शिफारशी बाकी आहेत. मागील काही महिन्यापुर्वीच्या महासभेत एक ठराव पारीत केला होता की हा सुधारित विकास आराखडा आम्हास मंजुर नाही. याबाबतीत एक सूचना राज्य शासनाकडे पाठविण्यांत आली होती. अशा परिस्थितीत १९७४ चा विकास आराखडा आपल्या समोर ठेवुन झोपडपट्टयांचे नुकसान करण्याचे जे बोलत आहोत. मला वाटते ते बरोबर नाही. पहिले उल्हासनगरचा जो विकास आराखडा आहे. तो स्पष्ट व्हावा. त्यावर महाराष्ट्र शासनाने, सभागृहाने निर्णय घ्यावा. आपल्या शहरासाठी कसा विकास आराखडा तयार करायचा हे सभागृहाने ठरवावे. आम्हाला कुठे उदयान पाहिजे. कुठे रूग्णालय पाहिजे. यासर्व गोष्टी सभागृहाने ठरवाव्यात व त्यानंतर पुनर्वसनाचा जो प्रश्न आहे.......

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी:—श्री. नाना पवारजी, आपणांस आयुक्तांचे निवेदन पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. नाना पवार:—माझ्या ज्या शंका आहेत.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी:—आपल्या ज्या भावना आहेत त्या आमच्या लक्षात आल्या आहेत.

मा. सदस्य श्री. नाना पवार:—मा. महापौर महोदया, मी आपणांस एक गोष्ट सांगितली की माझी अपेक्षा अशी आहे की, व माझी भावना अशी आहे की, सभागृहात यावर चर्चा सुध्दा व्हावी. ती चर्चा कोणती व्हावी. ते मी आपणांस व सभागृहास सांगितले पाहिजे ना?

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी:—या प्रकरणी आयुक्तांचे निवेदन पाहिजे ना?

मा. सदस्य श्री. नाना पवार:—माझे बोलणे पुर्ण झाल्यानंतर आयुक्तांनी निवेदन करावे.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी:—थोडे संक्षिप्तपणे बोलावे.

मा. सदस्य श्री. नाना पवार:—मा. महापौर महोदया, मी आपणांस किंवा सभागृहास कंटाळवाणे करू इच्छित नाही. आपण पाहिले असेल की हजारो लोक आपल्या घरापासुन चालत चालत येथेपर्यंत मोर्चा घेवुन आले होते. व आम्ही या शहरातील प्रतिनीधी आहोत. लोक आमच्याकडे मोर्चा घेवुन का येतात. याचा विचार करणे आमचे कर्तव्य आहे. महापौर महोदया, आपणांस एक सांगु इच्छितो की, हा मोर्चा काही आयुक्त साहेबांवर नव्हता, हा मोर्चा उल्हासनगर महानगरपालिकेवर होता. महानगरपालिका कोण तर आम्ही लोक, आयुक्त साहेब तर शासनाचे जे आदेश असतील, आमचे जे आदेश असतील त्याचे पालन करतील. परंतु तो मोर्चा जो होता तो आमच्यावर होता. आम्ही लोकांनी त्या मोर्चास तर उत्तर दिले नाही. आयुक्त साहेबांनी त्यांच्या पध्दतीने उत्तर दिले. तर ही जी परिस्थिती उल्हासनगर मध्ये चालली आहे ती अत्यंत खराब परिस्थिती आहे. मला तर असे वाटते की, उल्हासनगर मधील झोपडपट्टीवासियांचे दिवस खराब आहेत. त्यांना कुणी तरी वाली असला पाहिजे. जशी शहरात हवा चालेल तशी चालत रहावी. तर माझी ही भावना समजुन मी सभागृहासमोर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी जे प्रयत्न केले. माझ्या भावना समजुन घ्या की विषय काय आहे? व मी हे मान्य करतो की उल्हासनगर महानगरपालिकेत कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस , आर.पी.आय. यांची सत्ता आहे. मला विश्वास आहे की ही महानगरपालिका, ही सत्ता, झोपडपट्टीवासियांवर अन्याय होवु देणार नाही. शहरात हे जे संभ्रमतेचे वातावरण निर्माण झाले आहे. लोकांमध्ये गैरसमज निर्माण झाले आहे. याबाबत सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षातील आमचे सन्माननिय सदस्य यावर विचार करतील व अशी परिस्थिती निर्माण होवु नये म्हणुन जरूर प्रयत्न करतील. अशी भावना व्यक्त करून मी माझ्या लक्षवेधी सूचनेवर ही जी चर्चा केली ती संपवतो. धन्यवाद.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी:—आयुक्त साहेब, आपण त्यांना उत्तर दया.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः—</u>मा. महापौरजी, मला बोलायचे आहे.

<u>मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—</u>बोला. बोला.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकमः—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव, सन्माननिय सदस्य मला माहित आहे की, खुप उशिर झालेला आहे. व एकाच दिवशी तीन तीन सभा ठेवण्याची आम्हाला ही सवय सुध्दा आहे . व नंतर वेळेचे निर्बंध घालणे याची सुध्दा सवय आहे. सकाळ पासुन आम्हाला येथे बोलावले आहे. १२. ०० वाजेपासुन आम्ही येथे आहोत. मी आपली भावना समजतो की, आपणांस घरी जायचे आहे परंतु यापुढे एकाच दिवशी दोन दोन , तीन—तीन सभांचे आयोजन करण्याचा प्रयत्न करू नये. सर्वांचे बोलणे लक्षपुर्वक ऐकुन घेतले जावे. आता ही जी लक्षवेधी श्री. नाना पवार व मी मांडली आहे. त्याचे कारण हेच आहे की, काही दिवसापुर्वी वर्तमानपत्रामध्ये एक वृत्त प्रसिध्द झाले होते की, येथील ३५ हजार झोपडया तोडल्या जातील. ज्या की १.१.१९९५ नंतर च्या आहेत. तर माझा प्रश्न असा आहे की या ज्या झोपडया तोडल्या जात आहेत तर महाराष्ट्र शासनाचा आदेश आहे म्हणुन तोडल्या जात आहेत की त्या जागेवर काही आरक्षण आहेत म्हणुन विकास आराखडयामध्ये तरतुद केल्याप्रमाणे त्याठिकाणी काही विकास कामे करायची आहेत. म्हणुन काही महिन्यापुर्वी आम्ही येथे एक ठराव पारीत केला होता की, जो सुधारीत विकास आराखडा आहे. तो आम्ही रद्द केला आहे. परंतु त्या सुधारित विकास आराखडयामध्ये अशी काही आरक्षणे आहेत की त्यांच्यावर ज्या झोपडपट्टया वसल्या आहेत त्या १९९५ पुर्वीच्या आहेत. तर त्याठिकाणचे आरक्षण रद्द करून तेथे निवासी क्षेत्र ठेवले जावे. आता जो नविन आपणां सर्वांच्या संमतीने विकासआराखडा येणार आहे. त्यामध्ये निवासी क्षेत्र ठेवले जावु शकते. १९९५ पुर्वीच्या ज्या झोपडपट्टया आहेत त्यांच्यावरील आरक्षण हटवुन ते क्षेत्र रहिवासी क्षेत्र म्हणुन ठेवणार आहेत. तर त्या झोपडपट्टया सुध्दा आपण तोडणार आहात का? त्या झोपडपट्टया जर आपण तोडणार असाल महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाची जर आपण आजपासुन अंमलबजावणी करणार असाल तर ब—याच लोंकांवर अन्याय होवु शकतो. आयुक्त साहेबांनी एकदा म्हंटले होते की, येथील ७५ टक्के नगरसेवक अनाधिकृत बांधकामांमध्ये राहतात. तर ७५ टक्के नगरसेवकांचा प्रश्न आहे. त्यांच्या झोपडपट्टया आज तुटू शकतात. आपणांसर्वांची वेळ मी येथे वाया घालवणार नाही. अतिशय महत्वाचा असा हा मुद्दा आहे. शेवटचे एक वाक्य म्हणुन मी माझे बोलणे संपवतो. ही गोष्ट मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छितो, की एकदा भगवान गौतम बुध्द एका घनदाट अरण्यातुन जात होते व त्यावेळी तेथे अंगुली नामक एक दरोडेखोर त्यांच्या समोर आला व त्यांना म्हणाला की, आपणाकडे जे काही असेल ते दया. मी येथिल दरोडेखोर आहे. नाहीतर मी आपणांस मारेन. आपले एक बोट कापून मी माझ्या गळयात बांधेन. तर त्या जंगलामधून जेजे प्रवासी जात असत त्यांना मारुन त्यांचेकडील धनसंपत्ती लूटून त्यांची बोटे गळयामध्ये त्याने बांधली होती व भगवान गौतम बुध्दाची बोटे सुध्दा तो गळयामध्ये बांधू इच्छित होता. तर भगवान गौतम बुध्दांनी त्यांना असे विचारले की, आपण हे कश्यासाठी करत आहात. यापासून तुम्हांला काय मिळेल? व आपण गरीब लोकांना लुटत आहात, तर त्यांनी सांगितले की, मी हे माझ्या परिवारासाठी करीत आहे हा माझा धर्म आहे. तर त्यावर गौतम बुध्दांनी म्हटले हे ठिक आहे. तुम्हांला फक्त तोडणे माहित आहे तर तुम्ही एक काम करा, समोर जे झाड आहे त्याचे एक पान तोडुन आणा, त्यावर तो दरोडेखोर म्हणाला यामध्ये अशी कोणती मोठी गोष्ट आहे. अंगुलीमल धावत गेला आणि त्याने झाडाचे एक पान तोडुन आणले. व भगवान गौतम बुध्दांना दिले व म्हणाला हे घ्या पान. किती साधेसे काम आपण सांगितले. त्यावर भगवान गौतम बुध्द म्हणाले ठिक आहे. पान आपण तोडुन दाखविले. आता आपण ते जोडुन दाखवा. त्यावर त्यांनी प्रयत्न केले परंतु तो ते पान जोडु शकला नाही. त्यावर भगवान गौतम बुध्दाने सांगितले की, तोडु नको, जोड. तर मी आयुक्तांना सांगू इच्छितो की, जे लोक ३५—४० वर्षापासून राहत आहेत. त्यांना तोडु नका, त्यांना जोडा. नविन विकास आराखडा येई पर्यंत आपण थांबा. एवढे बोलून मी माझे निवेदन संपवितो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u> आयुक्त साहेब, मी एकच सांगतो सर्वांनी आपले लक्ष वेधले आहे. या अगोदर सुध्दा याच विषयावर चर्चा झाली आहे. तुमचे लक्ष एवढयासाठी वेधतो की, झोपडपट्टया वाल्यांना उध्दवस्त करतांना तेथे धनदांडग्यांना पाठीशी घालताना मघाशी तुम्ही जो प्रकार सांगितला, भुल्लर महाराजांच्या लक्षवेधीला उत्तर देतांना की, तीन रस्त्यांचे काम वगळले आहे. डॉल्फीनच्या रस्त्याला आम्ही सहमती दर्शविली. तेथे रस्ता रुंदीकरणामध्ये येणारी बांधकामे तुम्ही तोडा किंवा उध्दवस्त करा. त्यांचे पुनर्वसन न करता अगोदरच कारवाई केलीत ठिक आहे. गुलशन नगर येथिल प्रस्तावास आम्ही मान्यता

दिली. परंतु विकासाच्या नावाखाली झोपडपट्टया उध्दवस्त करत असतांना, इमारती तुटतात म्हणून तेथिल रस्ते वगळायचे. हा जो प्रकार आहे, शासन आणि प्रशासन मिळून तो तुम्ही बंद करा. यापूढे आम्ही त्याग करायचा, आम्ही कुर्बानी दयायची. आणि आमच्या जिवावर मजा बाकीच्या लोकांनी करायची हे कुठेतरी थांबले पाहिजे. यापूढे प्रशासन जर पारदर्शी आहे प्रशासन कुठलाही भेदभाव करीत नाही असे जर दाखवायचे असेल तर हया तीन रस्त्याचे काम प्रशासनाने महासभेसमोर आणावे. त्यांना मंजूरी घ्यावी. व त्यानंतरच झोपडपट्टयांविषयीचा कुठलाही प्रस्ताव प्रशासनाने महासभेपूढे आणावा. त्या व्यतिरिक्त प्रशासनाने जर तो प्रस्ताव आणला, आणि महासभेने तो मंजूर केला आणि तो जर कायदेशीर जरी असेल तरी आम्हांला कायदा हातात घ्यावा लागेल. हे मी प्रशासनाला व शासनाला निक्षून सांगतो. झोपडपट्टयांना उद्‌वस्त करण्याचा जो मनसूभा आहे तो बंद करा. त्याला कायदेशीर म्हणा किंवा बेकायदेशीर कुठल्याही पध्दतीने आम्ही उत्तर देवू.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—</u> महापौर महोदया, आयुक्त महोदयांनी थोडया वेळापूर्वीच एका विषयावर सांगितले की, १ जानेवारी, १९९५ नंतरच्या झोपडया पाडणे ही शासनाचे धोरण आहे. आणि शासनाचे धोरण हे महापालिकेचे धोरण आहे. परंतु मला असे वाटते की, केवळ झोपडपट्टयाच विशेष करुन नाहीत तर १ जानेवारी, १९९५ च्या नंतरची अनधिकृत बांधकामे पाडणे हे शासनाचे धोरण आहे आणि त्यामुळे शासनाचे जे धोरण आहे, तसे १ जानेवारी, १९९५ ची अनाधिकृत बांधकामे पाडणे हे महापालिकेचे धोरण असले पाहिजे. तर १९९५ नंतरची अनाधिकृत बांधकामे पाडतांना अशा प्रकारची परिणामकारक कारवाई या शहरामध्ये करतांना त्याच्यामध्ये जर काही झोपडया तुटल्या गेल्या तर मला वाटते की, जितका लोकोक्षोभ आज झाला आहे, तो त्या वेळच्या कारवाईत होणार नाही. परंतु एका बाजूला काय दिसते की, मघाशी प्रश्नोत्तराचा तास झाला. व लक्षवेधीचा विषय होता म्हणून मी बराच वेळ मुद्दाम गप्प बसलो होतो कारण की, प्रत्येक प्रश्नाला अनाधिकृत बांधकामाचे प्रश्न ४०० प्रश्नांमध्ये जवळ—जवळ १५०—२०० हून अधिक प्रश्न आहेत. अनाधिकृत बांधकामाशी संबंधीत आहेत. त्याच्यामध्ये प्रशासनाने अनेक प्रश्नांच्या उत्तरामध्ये हे मान्य केले आहे की, अनाधिकृत बांधकामे झाली आहेत. परंतु त्यापूढे एकच उत्तर आहे. कायदेशीर कारवाई सुरु आहे. परंतु ज्यावेळेला अशा प्रकारचा झोपडपट्टयांचा प्रश्न येतो, त्यावेळेला आपली महापालिका यंत्रणा ही संपूर्णपणे सज्ज होते. त्याची संपुर्ण तयारी केली जाते. पुर्णपणे यंत्रणा उभी करण्यासाठी आर्थिक बाकीचे सर्व पाठबळ उभे केले जाते. हा जो फरक आहे. या फरकामुळे लोकांमध्ये विरोध आहे. तो त्यामुळे कदाचित पुढे येत असेल. त्यामुळे प्रशासनाकडे आमची महत्वाची जी मागणी आहे, ती ही आहे की, झोपडपट्टयांबाबत किंवा असे विशेष करुन धोरण ठरविण्याबाबत या शहरामधल्या अनधिकृत बांधकामांबाबतचे अधिक स्पष्ट असे धोरण प्रशासनाने ठरविले पाहिजे. कारण एका बाजुला २००५ मध्ये आपल्या डोळयादेखत जर नवीन अनाधिकृत बांधकाम उभे राहणार असेल आणि त्याचवेळला या महापालिकेत आपण हे ऐकणार असु की, १९९५ नंतर च्या झोपडया म्हणजे जवळ जवळ १० वर्षापुर्वीच्या झोपडया ज्या आपण पाडणार आहोत. तर मला असे वाटते की अशा प्रकारची जी कारवाई आहे. ती एकतर्फी आणि अन्यायकारक होणार आहे. एका बाजुला आपले जे धोरण आहे. आपले जे सर्वेक्षण आहे. ते १ जानेवारी, १९९५ नंतरच्याच झोपडया शोधुन काढण्यासाठीचे आहे. त्यानंतर पुन्हा आरक्षित भुखंडावरील ज्या झोपडया आहेत. किंवा आरक्षित भुखंडावरील जी बांधकामे आहेत. ती पाडण्याचे धोरण पुढे येवु शकते. एकाबाजुला आपल्या घराचे हाऊसटॅक्सची थकबाकी माफ झाल्याच्या खुशीत असताना आज त्यांच्या घराच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तर अशाप्रकारे विसंगत असे धोरण आहे. तर त्यावर लक्षवेधण्याचा उद्‌देश हाच आहे की आयुक्तांनी त्यावर निवेदन करावे. निवेदन करत असताना कुठल्याही प्रकारचे भयाचे थेट वातावरण या शहरामधील लोकांमध्ये जावु नये. आणि तशा प्रकारची कारवाई करण्याचे धोरण जर आपण आखलेच तर ही कारवाई समान अर्थाने असावी. अन्यायकारक असु नये. हे खरे म्हणजे आपण धोरण ठेवले पाहिजे. मी या महासभेमध्ये विषय जरी झोपडपट्टयांचा असला सरकारचे धोरण, आपले धोरण त्याची अंमलबजावणी करायची आहे. हे जरी मान्य असले तरी किमान अनाधिकृत बांधकामाच्या शेकडो तक्रारी तुमच्याकडे येत असतात. शेकडो तक्रारधारक त्या करत असतात. त्यामध्ये आपण किती लक्ष घालतो, किती बांधकामे तुटतात. हा जरी प्रश्न असला तरी किमान २००२ साली ही बॉडी अस्तित्वात आल्यानंतर या महासभेमध्ये महासभांच्या प्रश्नांना उत्तरे देताना आपण कबुल केले आहे की, याठिकाणी अनाधिकृत बांधकाम झालेले आहे. आणि उत्तरामध्ये असे दिसुन येते की, जवळ जवळ १०—२० चौ. मी. पासुन ते ५००—६०० चौ.मी. पर्यंत विकासकर्त्यानी चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे. प्रशासनाने आपल्या उत्तरामध्ये हे कबुल केलेले आहे. अशाप्रकारची डोळयासमोर सुरू असलेली बांधकामे जोपर्यंत तुटत नाहीत किंवा प्रशासन त्यावर कठोर कारवाई करत आहे असे चित्र लोकांमध्ये जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत सरकारचे जरी धोरण असले तरी सुध्दा

लोकप्रतिनिधी या नात्याने अशाप्रकारच्या कारवाईला विरोध करण्यासाठी, विरोध कशासाठी तर अन्यायकारक कारवाई, एकतर्फी कारवाईला विरोध करण्यासाठी येथील सदस्यांना उभे रहावे लागेल हे मी स्पष्टपणे नमुद करतो. जयहिंद.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**मा. महापौरजी, या लक्षवेधी सूचनेवर आयुक्त साहेबांचे लक्ष वेधु इच्छितो की, आयुक्त साहेबांनी अगोदरच्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले की १९९५ च्या नंतरची अनाधिकृत बांधकामे तोडली जातील. असा शासनाचा आदेश आहे. जर शासनाचा लेखी आदेश आपणांकडे असेल तर त्याचा खुलासा करावा. दुसरे असे की, आपण काही दिवसापुर्वी वर्तमानपत्रामध्ये बातमी देताना म्हटंले होते की, त्या अनाधिकृत बांधकामावर न म्हणता अनाधिकृत झोपडपट्टीवर व आरक्षण असलेल्या जागेवर ज्या जागेवर झोपडपट्टी आहे तिच्यावर कारवाई केली जाईल. असे म्हंटल्याचे वृतपत्रामध्ये वृत्त प्रसिध्द झाले होते. पण आताच श्री. राज असरोंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये तशी बातमी दया की १९९५ नंतर जी अनाधिकृत बांधकामे झाली ती आरक्षीत भुखंडावर झाली असतील. त्यासर्व अनाधिकृत बांधकामावर कारवाई होईल केवळ झोपडपट्टीवर होणार नाही.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—**मा. महापौरजी, मी ब—याच वेळेस उभा राहुन बोलण्याचा प्रयत्न केला परंतु..............

**मा पीठासीन अधिकारी (श्रीमती. जया साधवानी):—**श्री. लालवानीजी, कृपया त्यांना बोलु दया.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, मा. सदस्य श्री. नाना पवार व श्री. शांताराम निकम यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली आहे. संपुर्ण महाराष्ट्रामध्ये झोपडपट्टया तोडण्याचे एक वारे वाहत आहे. कॉग्रेस, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे महाराष्ट्रात जेव्हा सरकार अस्तित्वात आले. त्यांचे विधानसभा निवडणुकीतील जे आश्वासन होते ते २००० सालापर्यंतच्या झोपडया नियमीत करण्याचे ते सोडुन आता १९९५ नंतरच्या झोपडया तोडत आहेत. मुंबई मध्ये झोपडया तोडल्या, कुणी काही वाकडे करू शकले नाही. त्याचे वारे या उल्हासनगरमध्ये येत आहे. उल्हासनगरमध्ये अजुनही मा. आयुक्तांनी त्यावर कुठलेही भाष्य केले नाही. झोपडया तोडायच्या की अनाधिकृत बांधकामे तोडायची, राज्य सरकारचे धोरण नेमके काय आहे. तोडायचे तर त्यास पर्यायी व्यवस्था काय आहे? याआधीच्या महासभेत गुलशन नगरचा प्रश्न आला. गुलशन नगर हे कधी तोडत आहेत आणि कुठल्या विकास आराखडयानुसार तोडत आहेत. गुलशन नगरला तुम्ही १९७४ चा विकास आराखडा वापरला तुमचे जिथे काही प्लान पास होतात. तिथे तुम्ही नविन प्रारूप आराखडयाप्रमाणे कायदे बदलवितात. कधी १९७४चा विकास आराखडा वापरतात तर कधी प्रारूप विकास आराखडा वापरतात. आणि ही आता झोपडपट्टी तोडत असताना शिवाय अनाधिकृत बांधकाम तोडत असताना तुम्ही १९७४चा आराखडा वापरणार की प्रारूप विकास आराखडा वापरणार? याबाबत आयुक्तांनी निवेदन करायला पाहिजे. झोपडया तोडत असताना आपण ज्या १९९५ नंतरच्या झोपडपट्टया तोडणार आहात. पहीले गोंष्ट या स्वायत्त संस्थेला हा अधिकार आहे का? हे आधी आयुक्तांनी स्पष्ट केले पाहिजे महासभेने ठराव पारीत केला की झोपडया तोडुच नये तर त्याची अंमलबजावणी होवु शकते का? राज्य सरकारचे जे धोरण आहे. स्वायत्त संस्थेला तिथे काही अधिकार आहेत का की झोपडया तोडु नयेत की तोडाव्यात. या मुदयाचेच इथे विश्लेषण व्हायला पाहिजे. दुसरे असे की, ९५ नंतरच्या झोपडया किंवा ९५ नंतरची अनाधिकृत बांधकामे ही तुम्ही कुठल्या निकषावर ठरविणार आहात हा एक भाग आहे. टॅक्स पावती हा निकष लावणार आहात की फोटो पास हा निकष लावणार आहात. किंवा मतदार ओळखपत्र यावर निकष लावणार आहात. नेमका निकष कुठला लावणार आहात तुम्ही? याचे आयुक्तांनी इथे निवेदन दयायला पाहिजे त्यानंतर आज अनेक अशा झोपडपट्टया आहेत किंवा अनेक इमारती अशा आहेत की त्यांचे आजपर्यंत कधी ॲसेसमेट झालेले नाही. त्या ९५ च्या अगोदरच्या आहेत. परंतु त्यांचे ॲसेसमेंट झालेले नाही. त्यांच्यावरही तुम्ही अन्याय करणार आहात का? त्यांना काय निकष लावणार आहात तुम्ही याचेही विश्लेषण व्हायला पाहिजे. आज फोटो पास वाटप करताना जी गोरगरीब जनता फोटोपास घेण्यासाठी धावते परंतु तुमच्या प्रशासनातर्फे त्यांना फोटो पास देण्यासाठी हजारो रूपयाची लाच मागितली जाते. ती लाच दिल्याशिवाय त्यांना फोटो पास मिळत नाही. जे गरीब लोक आहेत ज्यांना सरकारी शुल्क भरणे मुश्किलीचे होते. फोटो पास देण्यासाठी त्यांच्याकडुन लाच मागितली जाते. अशा लोकांना फोटो पास मिळत नाही. फोटो पास मिळाले

नाहीत म्हणुन तुम्ही त्यांच्या झोपडया तोडणार आहात का हा एक प्रश्न आहे. ॲसेसमेंट साठी, टॅक्स पावती साठी अनेकदा लोक टॅक्स पावती काढण्यासाठी जातात परंतु लाच दिल्याशिवाय त्यांना टॅक्स पावत्या मिळत नाहीत. त्या टॅक्स पावत्या न मिळाल्यामुळे त्यांच्या झोपडया तुम्ही अनाधिकृत ठरविणार आहात का? त्यांना तुम्ही तोडणार आहात का? याचेही विश्लेषण तिथे व्हायला पाहिजे. आणि इथे जे शहरामध्ये वातावरण तयार झाले आहे. झोपडपट्टीमध्ये राहणारे लोक आहेत. त्यांचे बाबतीत आयुक्तांनी स्पष्टपणे निवेदन केले तर त्यांचे निवारण निश्चित होईल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:</u>—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, या महानगरपालिकेचे सभागृहात जेव्हापासुन माझे येणे झाले आहे. पहिले पत्रकार म्हणुन मी पत्रकार कक्षात बसत होतो. आता नगरसेवक या नात्याने येथे बसतो. एक गोष्ट मी ब—याच जवळुन पाहिली आहे की या शहरामध्ये, सभागृहाममध्ये अनाधिकृत बांधकामाबाबत कितीही प्रश्न उपस्थित झाले असोत परंतु कुणीही झोपडी बाबत तक्रार कधीही केली नाही. भलेही तो पक्ष राष्ट्रवादी कॉग्रेस असो, कॉग्रेस असो, आर.पी.आय असो, शिवसेनेचा असो किंवा भारतीय जनता पार्टी असो. प्रत्येक नगरसेवकाची भावना मानवतेच्या दृष्टीकोनातुन हीच असते की, कोणत्याही गरीबाचे छप्पर हिरावुन घेण्याचा आम्हास कोणताही अधिकार नाही. झोपडपट्टयांना वाचविण्यासाठी भलेही ते मनमोकळेपणाने, उघडपणे काही बोलत नसोत. नियम आहे , कायदे आहेत परंतु मानवतेच्या दृष्टीकोनातुन मानवतेच्या दृष्टीकोनातुन अंर्तमनातील भावना लक्षात घेवुन. कधीही कुठल्याही नगरसेवकाने कुठल्याही अनाधिकृत झोपडीची तक्रार केली असेल याचे मला स्मरण नाही. याचा अर्थ हाच आहे की भलेही नगरसेवक इमारतीत रहात असो, पक्या बांधकामात रहात असो परंतु ते झोपडपट्टीवासियांच्या समस्यांपासुन अवगत आहेत. त्यांच्या सुख दुखाची त्यांना चांगली जाणीव आहे. आमचे नगरसेवक श्री. नाना पवार यांनी जे म्हंटले की जे लोक पक्क्या घरांमध्ये राहतात त्यांनी या मुद्दयावर जोर दिला पाहिजे. व झोपडपट्टीवाशियांची समस्या आहे तिच्याकडे लक्ष दयावे. तर हा आमच्या आरपीआय, राष्ट्रवादी कॉग्रेस, कॉग्रेस या मित्र पक्षांचा व शिवसेना, भाजपा तील सदस्य हे सर्व सदैव विकासासाठी संघर्ष करत राहिले आहेत. या गोष्टीमध्ये कुठलेही दुमत नाही की, नगरसेवक कोणत्याही राजकिय पक्षाचा असो, गरीबांसाठी तो नेहमीच संघर्ष करत राहिला आहे. ती गोष्ट वेगळी आहे की, अनाधिकृत बांधकामांबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत, त्यांची कारणेही अनेक आहेत. राहिला प्रश्न झोपडपट्टयांमध्ये जे दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे, ते कोणत्याही परिस्थितीत कधीही त्याला योग्य ठरविले जाणार नाही. कदाचित कोणी म्हटले असेल की, झोपडपट्टी तुटेल आणि ती तुटली असे कधीही होवू शकत नाही. ब—याचशा अनाधिकृत बांधकामांबाबत असे आश्वासन देण्यात येते की, ती तुटतील, तोडु परंतु याबाबत महापालिकेकडे ना मनुष्यबळ आहे ना यंत्र साम्रुग्री आहे. ना महापालिकेकडे यासाठी वेळ आहे. महापालिकेकडे बरीचशी कामे आहेत. अगोदरचीच अनाधिकृत बांधकामे तुटली नाहीत. तर गरीबांच्या या झोपडया तुटतील ही प्रत्यक्षातील गोष्ट नाही. यासाठी दहशतीचे वातावरण संपुष्टात आणले पाहिजे. या लोकांमध्ये जी असुरक्षिततेची भावना आहे कारण की गरीब माणुस रोज हातावर मिळवुन पानावर खात असतो. तोच जर मोर्चे घेवुन आला तर तो कमविल काय आणि खाईल काय? गरीब माणसाने एक दिवस धंदा केला नाही तर दोन दिवस त्याचे खराब जातात. यामुळे उल्हासनगर शहराची उन्नती मागे पडते. जेथे कुठे गुलशन नगरसारखा प्रकल्प असेल जेथुन झोपडपट्टी हटविणे आवश्यक आहे. व झोपडपट्टी हटविण्याच्या अगोदर त्यांची पुनर्वसन करण्याची योजना आहे. अशा योजनेचे सभागृहातील सर्व पक्षाच्या नगरसेवकांनी एकमताने स्वागत केले आहे. भलेही तो पक्ष शिवसेना असो, भाजपा असो, कॉग्रेस असो, राष्ट्रवादी कॉग्रेस असो किंवा आर.पी. आय असो. आम्ही विकासाच्या नावावर झोपडपट्टयांना पक्क्या स्वरूपाच्या घरामध्ये वसलेले पाहु इच्छितो. झोपडपट्टी शहरातुन नष्ट व्हावी. असे आम्हाला जरूर वाटते. परंतु ती उध्दवस्त व्हावी असे आम्हाला वाटत नाही. म्हणुन शहरामध्ये गुलशन नगरसारखे जे प्रकल्प आहेत. असे आणखीही प्रकल्प तयार केले पाहिजेत. जेवढे काही झोपडपट्टयांमध्ये लोक असतील त्यांना पक्या इमारतीमध्ये राहण्यास जागा मिळो. जेणेकरून आम्ही त्या जागेवर विकास कामे करू शकतो. राहिला प्रश्न अनाधिकृत बांधकामाचा व आरक्षित भुखंडाचा तर कमीत कमी प्रशासकीय स्तरावर या गोष्टीकडे आवश्यक लक्ष दिले जावु शकते की आजही जेव्हा कुठे अनाधिकृत बांधकाम चालु आहे, जेव्हा कुठे जमिन बळकावली जात आहे तर त्यास अग्रक्रमाने थांबविले जावे. कारण की, उदयाही लहानशी गोष्ट मोठी होवु नये. व पुन्हा कधी अशी समस्या आमच्या समोर उभी न राहो. यासाठीच आरक्षित भुखंडाचे संरक्षण झाले पाहिजे. व नव्याने जी अनाधिकृत बांधकामे होत आहेत. त्वरीत थांबविली जावीत. व हे जे दहशतीचे वातावरण आहे ते संपुष्ठात आले पाहिजे. असे मी या सभागृहामध्ये निवेदन करत आहे. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—**महापौर महोदया, गेल्या ५० वर्षापासुन सिंधी समाज, महाराष्ट्रीयन समाज सख्या भावांसारखे वागत आहेत. सिंधी समाज सुरवातीपासुन बॅरेक मध्ये राहत होता. हळु हळु मेहनतीने त्यांनी आपली घरे पक्की केली. त्याचप्रमाणे आमचे जे गरीब बंधु झोपडपट्टयामध्ये राहात होते. त्यांची कच्ची घरे होती. त्या गरीबांनी बांधकाम करून आपली पक्की घरे बांधली. शासनानेही वेळोवेळी गरीबांना सहकार्य करून त्यांना त्यांचा हक्क देण्यासाठी प्रत्येक नगरसेवकाने, प्रत्येक आमदाराने, प्रत्येक जनप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडुन मागणी करून १९६५ पुर्वीच्या ज्या जागा होत्या त्यांना मान्यता मिळवुन घेतली. त्यानंतर १९८५ पर्यंत जी बांधकामे झाली होती त्यास मान्यता मिळवुन घेतली. त्यानंतर आता जी मान्यता मिळाली आहे. शासनातर्फे ती १९९५ च्या बांधकामांना, आम्हा सर्व जनप्रतिनिधींची हीच भावना असली पाहिजे की, कोणत्याही गरीबाचे, कोणत्याही मध्यम वर्गीयाचे घर तुटू नये. जे कोणत्याही रस्ता रूंदीकरणात येत नसेल. जे कोणत्याही विकास कामांमध्ये येत नसेल आवश्यक कामासाठी असलेल्या भुखंडावरील जे कोणतेही झोपडे हटविले जाते तर त्यांचे सर्वात प्रथम पुनवर्सन करून नंतरच हटविले पाहिजे. बाकी असा कोणताही उल्हासनगरवासी नसेल जो कोण्या गरीबाच्या दु:खात सहभागी झाला नसेल. किंवा गरीबांना सहकार्य करण्यासाठी त्यांच्याबरोबर उभा राहीला नसेल. आमच्या कोणत्याही राजकीय पक्षामध्ये अशी कोणतीही भेदभावाची भावना नाही. आम्ही सर्वजण एकसाथ आहोत. व एकत्रच आहोत. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—**मा. महापौरजी, पहिले १९८५ त्यानंतर आता १९९५ पर्यंतची बांधकामे तोडु नयेत असे शासनाचे धोरण आहे. मी आपणांस विनंती करतो की, झोपडपट्टीमध्येच माझा प्रभाग आहे. तेथे गरीब लोक राहातात. एक दिवस त्यांना जेवण मिळते तर एक दिवस जेवण मिळत नाही. म्हणुन माझे अशी विनंती आहे की दहा दहा वर्षानंतरचे म्हणजे २००५ पर्यंतची बांधकामे तोडु नयेत. त्यांनतरची तोडवीत.

**मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब व सभागृहातील सहकारीहो, मी पण झोपडपट्टीमध्ये राहणारा आहे. झोपडपट्टीवासियांच्या समस्या जाणणारा, झोपडपट्टीयांमधुन निवडुन येणारा सदस्य आहे. सर्व झोपडपट्टीवासियांच्या समस्यांची जाणीव ठेवुन श्री. नाना पवार साहेबांनी जे मुद्दे मांडले त्याचे मी समर्थन करतो. माझी अशी विंनती आहे की, १९६५ ते १९८५ , १९८५—१९९५ पासुन २००५ पर्यंतची झोपडपट्टीयांमधील बांधकामे तोडली जावु नयेत.अशी माझी विनंती आहे. जयहिंद, जयमहाराष्ट्र, जय झुलेलाल.

**मा. सदस्या श्रीमती संगिता जावळे, श्रीमती रेखा कृष्णानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**झोपडपट्टयांच्या विषयावर बरीच चर्चा झाली आहे. जास्त काही न बोलता एक मुद्दा आयुक्तांच्या निर्दशनास आणुन देवू इच्छितो. ते जवळ जवळ दोन वर्षापासुन आयुक्तांच्या खुर्चीत बसले आहेत तेव्हापासुन ते म्हणत आहेत की, हा शासनाचा आदेश आहे यावर तीन वर्षापुर्वीच अंमलबजावणी व्हावयास पाहिजे होती. हे काम चार वर्षापुर्वीच व्हावयास पाहिजे होते. या कामाची अंमलबजावणी दोन वर्षापुर्वीच व्हावयास पाहिजे होती परंतु ती अदयाप पर्यंत झालेली नाही. आज महाराष्ट्र शासनाचा जो आदेश आहे. तो जरूरी नाही की उल्हासनगरमध्ये सर्व प्रथम लागु व्हावा. मी आयुक्त साहेबांना विनंती करेन की, जेव्हा पुर्ण महाराष्ट्रात याची अंमलबजावणी होईल त्यानंतरच उल्हासनगरचा नंबर आला पाहिजे. आज मी आपणांस एका गोष्टीची आठवण करुन देवू इच्छितो, आज मा. मुख्यमंत्री महोदयांनी हा आदेश दिला आहे की, त्यांच्याजवळ एक शिष्ट मंडळ जात आहेत, बरेचसे मंत्री महोदय, बरेचसे आमदार, बरेचसे खासदार सर्वजण विनंती घेवून जात आहेत, मेहरबानी करुन झोपडपट्टया तोडु नका. जर आम्ही घाईघाईने एखादी कारवाई केली व नंतर एका वर्षानंतर, सहा महिन्यानंतर पुन्हा काही आदेश आला की, आपण झोपडपट्टयांचे निष्कासन करु नका, त्यावेळेस आपण ज्या झोपडया तोडलेल्या असतील त्यावेळेस आपण काय कराल? यासाठी आमची आपणाकडे विनंती आहे की, हा जो महाराष्ट्र शासनाचा प्रस्ताव आला आहे, उल्हासनगर सारखी महाराष्ट्रात लाखो शहरे आहेत. हे जरुरी नाही की, प्रत्येक शहरास हे लागू व्हावे. तर हा जो आदेश आहे, आपण पहा की, महाराष्ट्रात पुर्णपणे सर्वांना लागू होतो आहे का? त्यावर न्यायालयाचा काही स्थगिती आदेश येत नाही ना? किंवा महाराष्ट्र शासन हे थांबवत नाही ना? आपण तोंपर्यंत थांबा जोपर्यंत ते मुख्यमंत्री महोदयांकडुन वेळ घेत आहेत, तर मी समजतो की, सर्व झोपडपट्टीवासियांना, सर्व महाराष्ट्रवासियांना, महाराष्ट्र शासनाकडुन जरुर न्याय मिळेल. म्हणून आपण घाई—घाईने असे कोणतेही पाऊल उचलू नये जेणेकरुन गरीब लोक बेघर होवू नयेत. व मेहरबानी करुन आमच्या महासभेचे जे हे मत आहे, हे लक्षात घेवून आपण ही कारवाई थांबवाल तर मा. मुख्यमंत्री महोदयांनी जो आदेश काढला आहे, तो जरुर रद्द करतील. सर्व महाराष्ट्र विध्दंव्साच्या तोंडावर आहे.

कधीच कुठली झोपडपट्टी तुटु शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेवून मेहरबानी करुन ही कारवाई करण्यामध्ये आपण थोडा विलंब करावा अशी आम्ही अपेक्षा करतो. धन्यवाद.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :—आयुक्त साहेब, यावर आपण निवेदन करावे.

मा. प्रभारी आयुक्त श्री. आर.के. सोनवणे:— मा. महापौर महोदया, जेव्हा ही लक्षवेधी सूचना सभागृहासमोर मांडली त्यावेळेस, लक्षवेधी ज्यांनी मांडली आहे, त्यांनी म्हटले की, आयुक्त साहेब यावर काय उत्तर देतील ते आम्हांला माहित आहे. जर त्यांना हे माहित आहे तर यावर अधिक काही बोलणे ठिक नाही. राज्य सरकारचे जे काही धोरण असते, मार्गदर्शक सुचना असतात त्यांच्यावर अंमलबजावणी करणे महापालिका प्रशासनाचे काम असते. येथे प्रत्येकाने झोपडपट्टीवासियांबाबत आपली संवेदना, अनाधिकृत बांधकाम ज्यांनी केले आहे, त्यांच्याबाबत व्यक्त केली आहे. व मानवतेच्या दृष्टीकोनातून या सभागृहात ज्या काही भावना व्यक्त करण्यात आल्या आहेत, त्या कदाचित योग्यही असतील, परंतु कायदेशीर दृष्टया, जे काही येथे सांगितले गेले, ते बरोबर नाही. माझ्या हातात आता सुध्दा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच म्हणजे जानेवारी महिन्यात निर्णय दिला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने अतिशय स्पष्टपणे म्हंटले आहे की, जेथे पण अनाधिकृत बांधकामे होतात. तर अशी अनाधिकृत बांधकामे ज्या अधिका—यांच्या कार्यकालावधीत होतात. ज्या लोकसेवकांच्या काळात होतात, आपण लोक सुध्दा लोकसेवक आहात. ज्या लोकांकडे हे बांधकाम अनाधिकृत नाही. अशी माहिती नसते. अशा लोकांनी अश ठिकाणी जर सदनिका किंवा इतर बांधकाम खरेदी केले तर आणि नंतर जर ते बांधकाम निष्कासित झाले तर याबाबत जेवढे काही नुकसान होते. ते सर्व संबंधित अधिका—याच्या पगारातुन वसुल केले पाहिजे. अशी कठोर भुमिका सर्वोच्च न्यायालयाने आता घेतलेली आहे. प्रत्येक शहराच्या विकासामध्ये जमिनीचा जो वापर झाला पाहिजे. त्या जमिनीच्या वापराबाबत काही बंधने जरूर असतात. व आता आम्ही असे पाहतो की जमिनीच्या वापराबाबत विकास आराखडयामध्ये ज्या काही तरतुदी केल्या आहेत. त्या सर्वांचे उल्लंघन करून म्हणजे राखीव भुखंड आहे त्यांच्यावर अतिक्रमण झाले आहे. त्यांच्यावर अनाधिकृत बांधकामे झाली आहेत. सोयींसाठी, जसे रस्त्यांसाठी ज्या जागा राखीव होत्या त्यांच्यावर सुध्दा अतिक्रमणे झाली आहेत. म्हणजे लोकांना जाण्या येण्यासाठी रस्ता नाही. पार्कींगसाठी जी जागा पाहिजे ती पार्कींगसाठी जागा नाही. उद्याने जी शहराची फुफूसे असतात. उद्यांनासाठी जागा नाही. तर पर्यावरणाच्या दृष्टीकोनातुन पाहता म्हणजे शहरामध्ये प्रत्येक माणुस राहतो. म्हणजे ज्याने कायदेशिर बांधकाम केले आहे तो माणुसही म्हणजे ज्याने अनाधिकृत बांधकाम केले आहे. तो माणुसही, माझी आपणांस विनंती आहे की आपण या गोष्टींकडे लक्ष दिले तर बरे होईल.व मला वाटते की, ही विनंती समजु शकाल. तेथे शहरामध्ये जे लोक कायदेशिर, अधिकृत बांधकामामध्ये राहतात. व बेकायदेशिर व अनाधिकृत बांधकामामध्ये राहतात. परंतु त्या सर्वांच्या जीवनाला, पर्यावरणाला थेट हानी पोहचत आहे. आणि त्यामुळेच मा. सर्वोच्च न्यायालय व राज्य सरकार याबाबतीत अतिशय कठोर अशी भुमिका घेत आहेत. व राज्य सरकारची भुमिका एवढी कठारे नाही की, ज्या कुणी १९९५ पुर्वी अनाधिकृत बांधकाम केले आहे. त्यांना सुध्दा तेथुन हटवावे. त्यांच्या बाबतीत मानवतेचा दृष्टीकोन ठेवुन राज्य सरकारने नेहमी हीच भुमिका घेतली आहे की त्यांचे योग्य प्रकारे पुनवर्सन झाले पाहिजे. आज सुध्दा सभागृहामध्ये आपण ही जी चर्चा करत आहात. त्याबाबत मी हे समजु शकतो जे संरक्षित भोगवटादार आहेत. त्यांचे पुनवर्सन झाले पाहिजे. ती बांधकामे निष्कासित केली नाही पाहिजेत ही भूमिका ठिक नाही. त्यांचे पुनवर्सन कायदयाच्या चौकटीत झाले पाहिजे अशी भुमिका या सभागृहाने घेतली पाहिजे. व त्यास सुध्दा काही तरी कालावधी ठरवुन दिला पाहिजे. आजपर्यंत नेहमी असेच झाले १९८५ पर्यंतची अनाधिकृत बांधकामे संरक्षित झाली. नंतर १९९० पर्यंतची अनाधिकृत बांधकामे संरक्षित झाली. आता १९९५ पर्यंतची अनाधिकृत बांधकामे संरक्षित झाली. ही राज्य शासनाची भुमिका आहे यावर मी अधिक भाष्य करणार नाही. परंतु जोपर्यंत लोकप्रतिनिधी अशी भुमिका घेत राहतील........नगरपालिका प्रशासन असो, राज्य शासनाचे प्रशासन असो, लोकप्रतिनधी असोत आम्ही सर्वजण यामध्ये आजपर्यंत असफल राहिलो आहोत. हे आम्हा सर्वांना मान्य केले पाहिजे. परंतु आता राज्य शासनाकडुन जी भुमिका घेतली जात आहे. हा जो निर्णय आहे तो आज झालेला नाही तर तो ४ मार्च, १९९६ रोजीचा शासन निर्णय आहे. तो जर आपण पाहिला तर त्यानुसार ही भुमिका घेण्यात आली आहे. त्यापासुन असे ठरले आहे की, १९९५ पुर्वीची जी अनाधिकृत बांधकामे आहेत ती संरक्षित करावीत. ती जर संरक्षित होत असतील तर त्यांचे पुनवर्सन करा. त्यानंतर जेवढी काही अनाधिकृत बांधकामे उरतील ती सर्व निष्कासित करा. हा जो राज्य शासनाचा निर्णय झालेला आहे त्याच्यावर अंमलबजावणी करायची आमची आपणां सर्वांची जबाबदारी आहे. व आम्हास ही जबाबदारी पार पाडावी लागेल जर राज्य शासनाकडुन नविन काही धोरण ठरणार असेल तर ते त्यावेळेस पाहिले जाईल परंतु आज

जी काही राज्य सरकारची निती आहे तिच्यावर अंमलबजावणी करावी लागेल. ते प्रशासनाचे व आपणां सर्वांचे उत्तर दायित्व आहे.

**मा. सदस्या श्रीमती प्रेमा खांडेकर, श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—**मी आपणांस सांगु इच्छितो की, आयुक्त साहेब, आपल्या महानगरपालिकेचा जो अधिकारी वर्ग आहे. त्यांचे मन परिवर्तनाचा वर्ग उघडा जोपर्यंत त्यांच्या मनामध्ये परिवर्तन येणार नाही तोपर्यंत यापुढे नुकसान होत राहिल. व त्यास जोपर्यंत कोणी थांबविणार नाही. तोपर्यंत हे होतच राहिल. व जोपर्यंत हे काम होत राहील म्हणुन मन परिवर्तन वर्ग उघडा अधिका—यांना समजवा. तेव्हाच हे थांबेल व कायदयानुसार सर्व चालणे सुरू होईल. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—**बांधकाम निष्कासित करण्याबाबत काही योजना ठरविली आहे का? झोपडपट्टया तोडण्याबद्दल तुम्ही असे काही धोरण ठरविले आहे का? कुठल्या झोपडपट्टया तोडणार वगैरे.

**मा. प्रभारी आयुक्त श्री. आर.के. सोनवणे:—** मा. महापौर महोदया, आता पर्यंत फक्त सर्वेक्षणच चालु आहे. असा कोणताही निर्णय झालेला नाही. सर्वेक्षण चालु आहे. व ते ही १.१.१९९५ नंतरचे जेवढे काही लोक आहेत व आता जे नव्याने येत आहेत. त्यांच्या बद्दल सर्वेक्षण चालु आहे. झोपडपट्टी तोडण्याचे आम्ही कुठेही मोहीम हाती घेतलेली नाही. राज्य सरकारचे जे धोरण आहे. आता मुंबई मध्ये जे होत आहे. इतर महानगरांमध्ये जे होत आहे. तेथे सुध्दा हे चालु राहिल. याबाबतीत सर्वेक्षण व प्रत्येक व्यक्तीस त्याची बाजु मांडण्याचा, १९९५ पुर्वीचे जे संरक्षित भोगवटादार आहेत त्यांना त्यांची बाजु मांडण्याचा अधिकार दिला जाईल.

**मा. सदस्य श्री. नाना पवार:—**मा. आयुक्त साहेब, आपल्याकडे महाराष्ट्रामध्ये इतर शहरे आणि आपले हे शहर यामध्ये फरक आहे हे आपणां सर्वांना माहित आहे. फरक म्हणजे असा की या शहरामध्ये एकही ७/१२ नाही. उल्हासनगर शहरामध्ये एकही ७/१२ नाही म्हणजे हे शहर संपुर्णपणे सरकारी जागेवर वसलेले शहर आहे. आणि दुसरी अडचण इथे अशी आहे की, १९७४ मध्ये जो विकास आराखडा बनविण्यात आला. त्या विकास आराखडयामध्ये उल्हासनगरमधील या ज्या सर्व झोपडपट्टया आहेत. एकही झोपडपट्टी त्या विकास आराखडयात दाखविण्यांत आलेली नाही. आणि त्यावेळेला झोपडपट्टया वसलेल्या होत्या. म्हणजे उल्हासनगरची परिस्थिती अशी आहे. १९५०, १९६०, १९६५, १९७० अशा पध्दतीने याठिकाणी झोपडपट्टया वसलेल्या आहेत. १९७२—७४च्या पुर्वी या शहरामध्ये झोपडपट्टयांचे वास्तव्य होते. मग त्या विकास आराखडयामध्ये निवासी क्षेत्रामध्ये दाखवावयास पाहिजे होत्या. त्यामुळे आपण निर्णय घेताना एक सहानुभूतिपुर्वक पाहायला पाहिजे की, एखादया झोपडपट्टीमध्ये त्या रस्त्याची आवश्यकता आहे का? यासर्व गोष्टी सुध्दा आपण मनात ठेवल्या पाहिजेत. नुसते आरक्षण आहे म्हणुन त्या ठिकाणी विकास करायचा श्रीमंताना धंदे करण्याची संधी दयायची. आणि झोपडपट्टी वासियांना सांगायचे जा आता तुम्ही गावी आपल्या असा प्रकार कृपया होवु नये.

**मा. सचिव:—**एक स्थगन प्रस्ताव, श्रीमती भावना खिलनानी यांचा आहे.

**मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—**मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब, ज्या भुखंडावर महापालिकेने संरक्षण भिंत किंवा तारेचे कुंपण घातलेले आहे व जो भुखंड महापालिकेच्या ताब्यात आहे. त्यांबाबत कागदोपत्रीची कार्यवाही करून ते महापालिकेने ताब्यात घ्यावेत. १९९५ पुर्वी जे लोक राहतात त्यांच्या बाबतीत सरकारने सुध्दा त्यांचा मालकी हक्क मान्य केला आहे. तर आमचे जे भुखंड आहेत ज्यांवर संरक्षण भिंत बांधली आहे किंवा तारेचे कुंपण घातले आहे.त्यांच्या बाबतीत कागदोपत्री कारवाई पुर्ण करून ते महापालिकेने ताब्यात घेतले जावेत. व ना हरकत दाखला देण्या अगोदर महापालिकेमध्ये एक प्रस्ताव आणला जावा. किंवा सूचना दिली जावी महासभेमध्ये. नाहीतर असे होईल की, दशेहरा मैदान किंवा शोभराज गार्डनची कधी कुणी सनद काढुन घेईल. धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती माने किरण, श्रीमती नंदीनी बामणकर हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–</u>महापौर महोदया, आयुक्त साहेब आमची आपणांस विनंती आहे की, महानगरपालिकेची जी काही जमिन आहे. जिच्यावर महानगरपालिकेने पुर्वश्रमीच्या नगरपालिकेने संरक्षण भिंत घातली होती. किंवा तेथे समाज मंदीर बांधले आहे. किंवा सार्वजनिक शौचालये आहेत. मुतारी आहे. अशी जी काही महानगरपालिकेची संपत्ती आहे त्या संपत्तीच्या सुरक्षिततेसाठी जी कागदी कारवाई आहे. ती करणे अत्यंत जरूरीचे आहे. कारण की, १९९५ चा शासनाचा जो आदेश मिळाला आहे. १९९५ पुर्वीचा ज्याचा कब्जा आहे. तर महानगरपालिकेचा जर कब्जा आहे. तर महापालिका मालक आहे. तेथे महानगरपालिकेने जी संरक्षण भिंत घातली होती त्यामुळे महापालिकेची ती जागा आज जनतेच्या कामी येत आहे. जनतेच्या कामी येणारी जागा आपण जर सोडली. कुण्या व्यक्तीसाठी तर कसे चालेल? बॅरेक नं १८४१च्या समोर एक खेळाचे मैदान होते त्यावर एका विकासकर्त्याने इमारत बांधली. न्यु क्लॉथ मार्केट या नावाने या मार्केट बाबत जेव्हा कुण्या एकाने तक्रार केली असता ते तोडले गेले. खेळाचे मैदान होते तर तेथे इमारत कशी बांधली गेली. जर ती इमारत तोडली गेली तेव्हा त्या लोकांना महापालिका आयुक्तांनी, अधिका–यांनी त्यांना पर्यायी जागा दिली. ठिक आहे. कोणत्या रस्ता रूंदीकरणात एखादया नागरिकाचे घर गेले, दुकान गेले. जर आपणांस जरुरीचे वाटले तर आपण त्यांना पर्यायी जागा दिली त्याबद्दल आपणांस धन्यवाद आहेत. आता एका ठिकाणचे खेळाचे मैदान आपण हटविले त्या ऐवजी दुसरे खेळाचे मैदान तर ठेवा. सहयाद्री नगर येथे ७१७ नंबरचा जो प्लॉट आहे, त्या प्लॉटवर संरक्षण भिंत बांधलेली आहे. तो प्लॉट आपण दुस–यास देत आहात. बॅ. नं. १७४४, शांती भवन, गांधी रोड, येथे १९८४ मध्ये तत्कालीन नगरसेवकाने तेथे चर्त:सिमा लावल्या होत्या. त्यानंतर १९८६ मध्ये आमचे आमदार श्री. पप्पु कालानी साहेब त्यावेळेस नगराध्यक्ष होते, त्यांनी तेथे यात्री निवास बांधले जावे असे त्यावेळी अशी त्यावेळी जनतेची मागणी होती. त्या भुंखंडावर संरक्षण भिंत बांधली होती. तो भुखंड अचानकपणे कुण्या विकासकर्त्याने हडप केला. १९८६ मध्ये त्या प्लॉटवर आपला कब्जा होता. १९८४ मध्ये आपला कब्जा होता. खरेदी आपल्या लोकांनी केली. तर तो प्लॉट दुस–याच्या हातात कसा गेला? त्याची सनद कशी निघाली? आपला मालकी हक्क आपण त्याच्यासाठी कसा सोडला? याचप्रकारे १८२९ नं. चा जो बॅरेक आहे, तेथे आमचे समाज मंदिर बांधलेले आहे. आमचे देविदास, आमचे मोठे भाऊ यांनी तेथे लहानशी संरक्षण भिंत बांधली होती. बॅरेक नं. १८२९ ची आपणाकडे नोंद करुन ठेवा. त्यानंतर मी नगरसेवक झालो १९९५ मध्ये. आणखी थोडी मोठी संरक्षण भिंत बांधली. त्यानंतर जेव्हा श्रीमती मोना वनवारी नगरसेविका म्हणुन निवडुन आल्या. त्यांनी तेथे समाजमंदिर बांधले. आज तेथे महापालिकेचे समाजमंदिर आहे. व त्याची महापालिकेला माहिती नाही. ते आम्हांस सांगावे लागते? की ही महापालिकेची संपत्ती आहे. तेथे लाईटचे मिटर लावा. तेथिल चावी आपणाकडे ठेवा, हे आम्ही सांगायचे? महानगरपालिकेची ही स्थिती आहे तर महापालिकेची संपत्ती सुरक्षीत कशी राहिल? उदया कोणी दसरा मैदानाची सनद घेवून येईल तर आम्ही गप्प बसायचे? नगसवेकांचा मान काय राहिला आहे? नगरसेवक काय करत आहे? चार नगरसेवकांची इज्जत जात आहे? आता आपण विचार करा, १८४० क्रमांकाचा बॅरेक आहे. तेथे एक मुतारी बांधली आहे. मुतारीच्या बाजूला कचरा कुंडी आहे. कचरा कुंडीवर एक दुकान तयार होत आहे. लोकांचे मनोबल वाढले आहे.

<u>मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :–</u>मी आयुक्त साहेबांना आदेश देते की, जी काही महानगरपालिकेची संपत्ती आहे, भुखंड आहेत, त्यांच्यावर तात्काळ तारेचे कुंपण घातले जावे किंवा संरक्षण भिंत बांधली जावी. व श्री. सतरामदास जेसवानी यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत, त्यांच्यावर विशेष करुन लक्ष दिले जावे. व हे काम लवकरात लवकर झाले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> बॅरेक नं. १८४० च्या जवळचे जे ठिकाण मी सांगितले तेथे लवकरात लवकर संरक्षण भिंत बांधली जावी.

<u>मा. सदस्य श्री. बच्चराम रुपचंदानी :–</u> महापौर महोदया, महानगरपालिकेने तेथे बांउन्ड्रीज लावली आहे. मालकी हक्क अदयापपर्यंत महापालिकेने घेतला नाही............

<u>मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :–</u>मी तोच आदेश दिला आहे की, महापालिकेची जी काही मिळकत आहे, महापालिकेने ती आपल्या ताब्यात घ्यावी. जी सुध्दा संरक्षण भिंत आहे, ती जमिन महापालिका आपल्या ताब्यात घेईल. जेथे भुखंड खाली आहेत, ज्यांच्या संरक्षण भिंती तुटल्या आहेत त्या ठिकाणी एक महिन्याच्या आत संरक्षण भिंती बांधल्या जाव्यात.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— महापौरांना  माझी विनंती आहे की,  जी कागदी कारवाई करायची आहे,  कागदी कारवाई होणे अतिशय जरुरीचे आहे.  ती होणे जरुरीचे आहे.  बॅरेक नं. १८४० च्या जवळील सुलभ शौचालय जवळील जो भुखंड मी सांगितला याबाबत मी अर्जही दिला आहे, बॅरक नं. १८४० जवळ एक सुलभ शौचालय बांधले जावे.  तेथे जी मुतारी आहे ती जुनी आहे, तेथे जी कचरा कुंडी आहे, तेथिल कचरा बरोबर उचलला जात नाही.  तर तेथे एक सुलभ शौचालय बांधले जावे.  याबाबतचे विनंती पत्र मी दिले आहे.  पुढे जावून जर तो भुखंड हडप केला तर तुम्ही महापालिकेचे भुखंड कसे वाचवू शकाल?  अशी जी गरजेची वस्तु आहे. त्यांना वाचविणे, जी आमची संपत्ती आहे त्याची आपणांकडे नोंद करणे. बॅरेक नं. १७८२ जवळील सार्वजनिक शौचालय तेथील नागरिक ५० वर्षापासुन वापरत आहेत. आज आपण बारकाईने विचार करत नाहीत. सार्वजनिक शौचालय आहे ते सुध्दा १० लाखाची मिळकत आहे. या दहा लाखाचे मिळकतीबाबत आपण कागदोपत्राची कार्यवाही करत नसाल त्याची आपणांकडे नोंद ठेवत नसाल ५० वर्षापासुनचा आपला जो मालकी हक्क होता. कारण की त्याचा वापर जनता करत होती. आज एक साधारण भुमाफीया येवून सांगतो की या जागेचा मालकी हक्क माझा आहे. ५० वर्षामध्ये आम्ही लोकांनी काय केले? आमच्याकडे त्याचा पुरावा काय आहे.जर अशी स्थिती राहीली तर महापालिकेच्या संपत्तीस धोका पोहचतो. म्हणुन कृपया आपले डोळे उघडे ठेवावे लागतील. व अधिका—यांसाठी मन:परिवर्तनाचे वर्ग उघडावे लागतील. माझी ही जी विंनती आहे तिच्यावर विचार करा. धन्यवाद.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :—सुलभ शौचालयाबाबतचे ज्यांचे आणि जेवढे काही प्रस्ताव असतील पुढील सभेत ते सभा सूचनेवर आणले जावेत. आपणां सर्वांना आमचे निवेदन आहे की, आपणांकडे सार्वजनिक शौचालयांची जी काही समस्या असेल त्याबाबत आपण आयुक्त साहेबांना अर्ज दया. ते पुढील महासभेत आम्ही सभा सूचनेवर ठेवु.

मा. सदस्य श्री. भावना खिलनानी:—महापौर महोदया, जिल्हाधिका—यांकडे जे काही शुल्क भरावे लागते. ते भरून जमिन आपल्या ताब्यात घ्या. जर निधीची कमतरता असेल तर आमचा नगरसेवक निधी घ्या. व कोणताही ना हरकत दाखला  देण्या अगोदर त्या बाबतचा प्रस्ताव महासभेपुढे आणला जावा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदया, आयुक्त महोदय, हा जो स्थगन आदेश येथे मांडण्यात आला आहे. १९९५च्या अगोदर अतिक्रमण जरी झाले असेल तरी सरकार त्यास मान्य करीत आहे. व महानगरपालिकेची बॉउंड्री लागलेली आहे. म्हणुन आपण त्याबाबतीत आपला हक्क सांगावा. एक प्रस्ताव तर हा आहे की त्याबाबतची कागदी कार्यवाही करून ती जागा आपल्या ताब्यात घ्यावी.  दुसरी गोष्ट अशी की १९८६ मध्ये जेव्हा तत्कालिन नगराध्यक्ष आमचे श्री. पप्पु कलानी साहेब होते. त्यावेळेस त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाने भुखंड हस्तांतरीत केले होते. ते भुखंड आमच्याकडे असुन सुध्दा त्यावर अतिक्रमणे होत गेली. व येथ पर्यंत तर कित्येक मुद्यांबाबतीत आम्ही असे पाहिले की जे आम्हाला भुखंड मिळाले होते. किंवा ज्यांना आम्ही आरक्षित केले होते. त्या भुखंडावर इमारती तयार झाल्या. किंवा बांधकामे झाली. त्याबाबत महानगरपालिकेने बांधकाम परवाने मंजुर केले. तर असे कसे होवु शकते. आमच्या समोर आमच्या पत्नीस मंगळसुत्र घालावे. व आम्ही म्हणावे ही माझी पत्नी आहे. जावु दे. तर आमची ही जबाबदारी आहे की आम्ही अशा गोष्टींचा विरोध करावा. आमच्या पत्नीस आमच्या समोर मंगळसुत्र घालुन ते तीला आपली पत्नी कसे म्हणतात? जर आम्ही आमचे भुखंड प्रामाणिकपणे वाचविले नाहीत तर आम्ही आपल्या शहरास कसे वाचवणार? या शहरामध्ये जेवढे काही नदीचे किनारे आहेत. जेवढे काही नाले आहेत. नाल्या आहेत. रस्ते आहेत. उद्याने आहेत, मैदाने आहेत. ज्यावर अद्याप पर्यंत अतिक्रमण झालेली नाहीत तर मेहरबानी करून ते भुखंड वाचवा यासाठी शासन, प्रशासन, विरोधी पक्ष या सर्वांनी एक होवुन ही मोहीम सुरू करावी लागेल. जेणे करून शहराचे काहीतरी भले होईल. धन्यवाद.

मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी :—आम्ही आपल्या भावना समजलो. याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आयुक्तांना आदेश सुध्दा दिलेले आहेत.

मा. सचिव:—विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. २ :—** महापालिका फंडातुन सुनामीग्रस्तांना रु २५ लक्ष रक्कमेची मदत देण्याकामी मान्यता देणे.

**काही सदस्य :—**पास. पास.

**मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. २ :—** महापालिका फंडातुन सुनामीग्रस्तांना रु २५ लक्ष रक्कमेची मदत देण्याकामी मान्यता देणे.

**प्रस्तावना:—**

नुकत्याच माहे डिसेंबर, २००४ मध्ये झालेल्या भुकंपामुळे इंडोनेशिया , श्रीलंका व दक्षिण भारतात लाटांच्या प्रकोपाने सागर किनारी रहाणा—या अनेक लोकांचे बळी गेले असून त्यात प्रचंड प्रमाणात जिवित व वित्तहानी झालेली आहे. अशा निराधार लोकांना सहाय्य करणेसाठी महाराष्ट्र राज्याची सर्व कार्यालये त्याचप्रमाणे सर्व नगरपालिका /महानगरपालिका या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी हे सर्व मदतीचा हात देणार असुन महापालिका फंडातुन ही रक्कम देण्याचे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी जनतेला आव्हान केले आहे.

दि. ३.१.२००५ रोजी मा. पालकमंत्री, गणेश नाईक यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, ठाणे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस सर्व आमदार, खासदार, आयुक्त, महापौर उपस्थित होते. बैठकीत मा. मंत्री महोदय यांनी प्रकोपाने बळी गेलेल्या लोकांना आपापल्या परीने जास्तीत जास्त रक्कम देण्याचे आदेश निर्गमित केले असुन उल्हासनगर या शहरासाठी रक्कम रूपये २ कोटीचा निर्देशांक देण्यात आलेला आहे. त्यानुसार उल्हासनगर महापालिका निधीतुनही जास्तीत जास्त रक्कम देण्याचा मानस आहे.

सबब महापालिका फंडातुन प्रलयाने बळी, पडलेल्या लोकांना मदत करण्यासाठी मा. मुख्यमंत्री सहाय्य निधीस उल्हासनगर महानगरपालिकेच्या महापालिका फंडातुन रक्कम रूपये २५ लाख मा. मुख्यमंत्री निधीस अदा करणेस प्रस्तावित आहे.

तरी सदरची तरतुद सन २००४—२००५ च्या सुधारित अंदाजपत्रकात करण्यात येवून उल्हासनगर महानगरपालिका फंडातुन रक्कम रूपये २५ लाख शासन मंजुरीच्या अधिन राहुन मा. मुख्यमंत्री सहाय्य निधीस देण्याबाबत मा. महासभा यांच्या मंजुरीसाठी सादर करीत आहे.

**महासभा ठराव क्र:— ५५** **दिनांक:—२०/१/२००५.**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सन २००४—०५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात समायोजनास व शासन मंजुरीस अधिन राहुन उल्हासनगर महानगरपालिका फंडातुन दक्षिण भारतात लाटांच्या प्रकोपाने बळी पडलेल्या सुनामीग्रस्तांसाठी रु २५ लाख मदत म्हणुन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्यासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३:— शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियमास मान्यता देणे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ३:—</u> शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियमास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०२००४ / प्र.क्र. १६८/ नवि २०, नगरविकास विभाग, मुंबई—३२, दि. ३ डिसेंबर, २००४ चे पत्रान्वये राज्यातील शालेय शिक्षण तसेच उच्च शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांना पुस्तके कमी किंमतीत उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत शालेय व उच्च शिक्षण संबंधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावर आकारण्यात येणारा जकात कर माफ करण्यात यावा. व त्या दृष्टीने आवश्यक ती पुढील वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेने त्वरीत करावी असे निर्देश शासनाने दिले आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेने तयार केलेल्या जकात नियमांमध्ये शालेय व उच्च शिक्षण संबंधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यांना जकात करातुन सुट देणे कामी तरतुद नाही.

उक्त नियमामध्ये शहरातील शालेय शिक्षण तसेच उच्च शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांना पुस्तके कमी किंमतीत उपलब्ध होण्याच्या दृष्टीने यावर आकारण्यांत येणारा जकात कर माफ करणेच्या प्रयोजनार्थ शासनाचे निर्देशनानुसार उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ मध्ये सुधारणा करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४ अन्वये महापालिकेला प्रदान करण्यात आलेलया अधिकाराचा व त्याबाबतीत महापालिकेला संमत करणा—या इतर अधिकाराचा वापर करून उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी मराठी व इंग्रजी प्रारूप नियमांचा मसुदा तयार करण्यांत आला असुन तो महासभेपुढे मंजुरीस्तव प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र:— ५६** दिनांक:—२०/१/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियमांस मान्यता देत आहे व सदरचा मसुदा शासकीय राजपत्रात प्रसिध्द करणे व स्थानिक वृत्तपत्रांत सूचना देणे कामी प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:—वि</u>षय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ४:—</u> श्री.सु.के.बनसोडे यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

**मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)**:—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ४:—</u> श्री.सु.के.बनसोडे यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

वित्त विभाग शासन आदेश क्र. संलेको—११ ०३/प्र. क्र. १५१/२००३/कोषा—प्रशा—१, दि. ३/८/२००४ अन्वये, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट—अ (कनिष्ठ) मधील श्री. सु. के. बनसोडे यांची या महापालिकेत 'मुख्य लेखापरिक्षक' या पदी ०२ वर्षासाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री. सु. के. बनसोडे, हे या महापालिकेत मुख्य लेखापरिक्षक या पदावर दि. २३/८/२००४ पासून कार्यरत आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५ नुसार श्री. सु. के. बनसोडे, 'मुख्य लेखापरिक्षक' यांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:— ५७** **दिनांक:—२०/१/२००५.**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. सु. के. बनसोडे यांच्या मुख्य लेखापरीक्षक या पदावरील प्रतिनियुक्तीस दि. २३.८.०४ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५ः— महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ३३'' मुख्य जलवाहिनीवरील असलेल्या निरनिराळया नळजोडण्या खंडित करणे आणि त्याजागी नवीन वितरण वाहिन्या टाकणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—पास करा परंतु जोपर्यंत पर्यायी व्यवस्था करत नाही तोपर्यत नळजोडण्या खंडीत करू नका.

काही सदस्य :—पास. पास.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी)ः—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ५ः— महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ३३'' मुख्य जलवाहिनीवरील असलेल्या निरनिराळया नळजोडण्या खंडित करणे आणि त्याजागी नवीन वितरण वाहिन्या टाकणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

प्रस्तावनाः—

उपरोक्त विषयास अनुसरून उल्हासनगर महापालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून शुध्द पाण्याचा पुरवठा निरनिराळया नळजोडण्यातून करण्यात येतो.

मा. प्रधान सचिव, नगर विकास खाते, यांच्या समवेत दि. ०३.१२.२००० रोजी झालेल्या बैठकीनुसार सी ब्लॉक या भागात पर्यायी जलवाहिनी उपलब्ध नसल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या ३३'' जलवाहिनीवर असलेल्या नळजोडण्या खंडीत न करता महापालिकेने 'ना हरकत दाखला' दिल्यास नळजोडण्या नियमीत करण्याचे निर्देश दिले होते. तसेच नळजोडण्या खंडीत केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. त्यामुळे ३३'' जलवाहिनीवरील नागरिकांच्या नळजोडण्या खंडीत न करता संबंधीतांकडून कार्यवाही करून नळजोडण्या नियमीत करण्याबाबत या महापालिकेची हरकत नाही असे त्यावेळचे आयुक्त यांनी दि. १६.१.०१ च्या पत्रान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कळविले होते. त्यानंतर जानेवारी २००१ पासुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २ द.ल.लि. अतिरिक्त देयक

आकारत होते. सद्यस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उल्हासनगर महानगरपालिकेस एकूण १२० द. ल. लि. पाण्याचे देयक आकारत असून यामध्ये अनधिकृत नळजोडण्याच्या पाणी वापरापोटी १० द. ल. लि. अतिरिक्त आकारणी करित होती. माहे नोव्हेंबर २००४ च्या देयकामध्ये अनधिकृत नळजोडणी करिता १३ द.ल.लि. देयक आकारण्यात आलेले आहे. सन २००१ पासून ते २००४ पर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने अनधिकृत नळजोडण्यांचा पाणी वापरापोटी २ द. ल. लि. पासुन ते १३ द. ल. लि. पर्यंत वाढ करून देयक पाठविले आहे.

सबब, ३३'' जलवाहिनी वरील अनधिकृत नळजोडण्या काढण्याच्या दृष्टीने एकुण ६ टप्पे करून एक एक टप्प्याने एका वेळी काम हाती घेवुन अनधिकृत नळजोडण्या तोडण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबतच्या दृष्टीने प्रथम टप्यात ज्या भागात अधिक अनधिकृत जोडण्या घेण्यात आलेल्या आहेत (उत्तर क्षेत्र–सी. ब्लॉक रोड, ए ब्लॉक, सचदेव नगर, डॉलफीन क्लब, प्रभात नगर, क्रांती नगर, करोतीया नगर, गौतम नगर, गुरूव्दारा परिसर) या भागातील अनधिकृत नळजोडण्या खंडीत करणे आवश्यक आहे. सदर वरील भागातील अनधिकृत नळजोडण्या खंडीत करण्यापुर्वी वितरण वाहिन्या नव्याने टाकणे आवश्यक आहे. त्यासाठी नव्याने २०० मि. मि. व्यासाची नळजोडणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ३३'' जलवाहिनीवर घेवुन १५० मि. मि. १०० मि. मि. व्यासाच्या लोखंडी जी. आय. जलवाहिन्या टाकण्याचे प्राकलन तयार केले असुन , त्याची अंदाजे किंमत रू. ५२.७४ लक्ष इतकी आहे. याकामासाठी सुधारीत अंदाज पत्रकांत तरतुद करून काम करणे आवश्यक आहे.

नव्याने जलवाहिनी टाकण्याचे काम वरील भागात पुर्ण केल्यानंतर ३३'' जलवाहिनीवरील अनधिकृत नळजोडण्या खंडीत करण्यात येतील. नळजोडण्या खंडीत केल्यानंतर अंदाज ८ द. ल. लि. पाण्याची दररोज बचत होईल. प्रतिदिन रू. ५६०००/– व वार्षिक रू. २०४ लक्ष इतकी बचत होऊ शकेल.

उपरोक्त कामांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १८९ अन्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी महासभेपुढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्र:–५८ दिनांक:–२०/१/२००५.

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सी ब्लॉक येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ३३'' मुख्य जलवाहिनीवर असलेल्या निरनिराळया अनाधिकृत नळजोडण्या खंडीत करणेस व सदर ठिकाणी२०० मि. मी, १५० मि.मी व १०० मि.मी व्यासाच्या जी.आय लोखंडी जलवाहिन्या नव्याने टाकणेकामी रु. ५२.७४ लाखाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व त्या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय अंदाजात समायोजन करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ६:— अंध, अस्थीव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणा—या महापालिका कर्मचा—यांना शासनाच्या धोरणाप्रमाणे वाहन भत्ता देणे मान्य करणे.

काही सदस्य :—पास. पास.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ६:— अंध, अस्थीव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणा—या महापालिका कर्मचा—यांना शासनाच्या धोरणाप्रमाणे वाहन भत्ता देणे मान्य करणे.

प्रस्तावना:—

शासनाने वित्त विभाग शासन निर्णय क्र. वाहभ—१००३/प्र. क्र. ६४/सेवा—५, दि. ०४/८/२००४ अन्वये अंध, अस्थीव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पीडित असणारे राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना शासनाच्या दि. १४.१२.९८ च्या आदेशानुसार देण्यात येणा—या वाहन भत्यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा केली आहे.

| अ. क्र. | कर्मचा—याची वेतनश्रेणी | दरमहा वाहतुक भत्याचा दर (रूपये) | |
|---|---|---|---|
| | | ''अ—१'' आणि''अ'' वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १. | रू. ८०००—१३५०० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | १,६०० | ८०० |
| २. | रू. ६५००—१०५०० किंवा त्याहून वरच्या परंतु रू. ८०००—१३५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | ८०० | ५०० |
| ३. | रू. ६५००—१०५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | ५०० | ५०० |

महापालिकेतील कर्मचा—यांना शासनाच्या धोरणाप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात येतात. वाहन भत्ता वेतनाचाच भाग असल्याने वरील शासन निर्णयामधील शर्ती व अटीनुसार महापालिकेतील वरील कर्मचा—यांना वाहन भत्ता मंजुर करण्याचा प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:—५९ दिनांक:—२०/१/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अंध, अस्थीव्यंगाने अधू व कण्याच्या विकाराने पीडित असणा–या सर्व कर्मचा–यांना शासकीय धोरणा अनुसार उपरोक्त उल्लेखलेल्या दराप्रमाणे दरमहा वाहन भत्ता मंजुर करित आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:–</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ७:–</u> उल्हासनगर महानगरपालिकेच्या साधु वासवानी उद्यानातील जागा १० वर्षांच्या कालावधीसाठी 'द वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट' या संस्थेस सुशोभिकरण व सौंदर्यीकरण करण्यासाठी वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर देण्यात आलेली असुन त्यांना दरमहा रु १००/– ऐवजी दरवर्षी रु १००/– असे नाममात्र भाडे फेरनिश्चित करणे.

<u>काही सदस्य :–</u>पास. पास.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:–</u>मा. महापौरजी, प्रस्ताव काय आहे तो तर मी समजलो. विषय असा आहे की, लोकांच्या हिताचा विषय असला पाहिजे. या संस्थेचा मला असा अनुभव आला आहे की, यांना आपण सुशोभिकरण व सौदर्यीकरणासाठी जागा दिली आहे. तेथुन माझ्या सारख्या माणसाला सुध्दा एके दिवशी तेथुन परत पाठविण्यांत आले की, आपण बाहेर निघा आतमध्ये जायचे नाही. आत जाण्याची आता वेळ नाही. मी अशी विंनती करतो की, ही जागा अशा संस्थेत दिली पाहिजे की, तिचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना झाला पाहिजे. आपण ही जागा या संस्थेस १० वर्षासाठी देत आहात. या संस्थेला जागा देणे मला उचित वाटत नाही. माझा यास प्रखर विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>जी संस्था महिन्याला १०० रूपये भरू शकत नाही. ती संस्था ही जागा विकसित करण्यासाठी खर्च करू शकेल का? या जागेच्या विकासासाठी एवढया मोठया प्रमाणावर पैशाची आवश्यकता असताना..........

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):–</u> महाराजजी १०० रूपयाचा मुद्दा आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>महिन्याला १०० रूपये आहे त्याचे वर्षाला १०० रूपये असे करत आहेत. जी संस्था वर्षाला १२०० रू. भरू शकत नाही. तिची काय कुवत आहे ही जागा विकसित करण्याची? जी संस्था १२०० रू. चे १०० रूपयांवर आणत आहेत. आमचा हया प्रस्तावास विरोध आहे.

<u>मा. सचिव :–</u>विरोध आहे. मतदान घ्यायचे आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>या अगोदर दिले असेल तर वर्षाचे १२०० रूपये घेतले पाहिजेत.

<u>मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):–</u>सचिव साहेब, कृपया मतदान घ्या.

<u>मा.सचिव:–</u>जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने :–३० मते.</u>

१. श्री. टेकचंदानी राजू
२. श्री. लिंगे सुर्यकांत
३. श्री. ऐडके गणपत
४. श्रीमती शर्मा कमला
५. श्री. वलेचा पृथ्वी
६. श्री. रोहरा श्यामसुंदर
७. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८. श्री. पवार नाना
९. श्री. जग्यासी राजू
१०. श्री. निकम शांताराम
११. श्री. वनवारी किशोर
१२. श्री. जेसवानी सतराम
१३. श्री. लुंड गोविंदराम
१४. श्रीमती खिलनानी भावना
१५. श्री. खेमानी दर्शनसिंग
१६. श्रीमती कारीरा रेखा
१७. श्री. पमनानी ईश्वर
१८. श्री. साधवानी मनोज
१९. श्री. रामरख्यानी मोहनदास
२०. श्री.लबाना होशियारसिंग
२१. श्री. तलरेजा विनोद
२२. श्रीमती रिजवानी सुजाता
२३. श्री. मोकल चंदाराम
२४. श्री. म्हस्के अंकुश
२५. श्री. यादव लालबिहारी
२६. श्री. जाधव प्रशांत
२७. श्री. जाधव सुरेश
२८. श्रीमती साधवानी जया
२९. श्री. भालेराव गौतम
३०. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार

<u>मा.सचिव:–</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात :– ९ मते.</u>

१. श्रीमती मोकल सिमा
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. रुपचंदानी बच्चाराम
४. श्री. असरोंडकर राज
५. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
६. श्री. सोनवणे नथु
७. श्री. गायकवाड दिलीप
८. श्री. पाटील विश्वनाथ
९. श्री. चौधरी राजेंद्र

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ७:— उल्हासनगर महानगरपालिकेच्या साधु वासवानी उद्यानातील जागा १० वर्षांच्या कालावधीसाठी 'द वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट' या संस्थेस सुशोभिकरण व सौंदर्यीकरण करण्यासाठी वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर देण्यात आलेली असुन त्यांना दरमहा रु १००/— ऐवजी दरवर्षी रु १००/— असे नाममात्र भाडे फेरनिश्चित करणे.

प्रस्तावना:—

मा. महासभा ठराव क्र. १०४ दि. २०.११.२००३ अन्वये साधु वासवानी उद्यानातील १४५०८ चौ.मी. जागा उल्हासनगर—१ जवळील महानगरपालिका मालकीचे उद्यानातील १० वर्षाचे कालावधीसाठी 'द वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट' या संस्थेस सुशोभिकरण व सौदर्यीकरण वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देणेस मान्यता मिळालेली आहे. यासाठी नाममात्र भाडे दरमहा रू. १००/— ठरावाव्दारे निश्चित करणेत आले आहे.

तथापि सदर संस्थेने भाडयाची रक्कम कमी करून वार्षिक १००/— रू. ठेवावी अशी विनंती केली आहे.

मुळ ठरावातील ही अटी बदल करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार याबाबीस महासभेची मान्यता असणे आवश्यक असल्यामुळे हा प्रस्ताव महासभेकडे विचारार्थ सादर करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र:—६०                                        दिनांक:—२०/१/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुजाता रिझवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—१ येथील महापालिका निहित साधु वासवानी उद्यानातील १४५०८ चौ.मी जागा उद्याना प्रयोजनार्थ विकास, सुशोभिकरण व सौंदर्यीकरणासाठी पुर्वीच्या महासभा ठराव क्रमांक १०४, दिनांक २०.११.२००३ प्रमाणे 'द वर्ल्ड रिन्युअल स्पिरिच्युअल ट्रस्ट' या संस्थेस दहा वर्षाच्या कालावधीसाठी दरमहा रू. १००/— या दराने भाडेपट्टयाने देण्यात आली असुन त्या भाडयाची रक्कम कमी करून वार्षिक नाममात्र भाडे रू. १००/— असे निश्चित करीत आहे. व त्या प्रयोजनार्थ उक्त महासभा ठरावात अंशत: बदल मानण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ८:–** उल्हासनगर–४ येथील गोकुळधाम इमारती समोरील उद्यानातील जागा सौंदर्यीकरण व नुतनीकरण करणेकामी प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय या संस्थेस देण्यात आलेली असुन त्याची कालमर्यादा १ वर्षा ऐवजी १० वर्षे निश्चित करणेकामी मान्यता देणे.

**मा. सचिव:–**मतदान घ्यायचे की, मागच्या प्रस्तावाप्रमाणे नोंद घ्यायची. बहुमताने मंजुर?

**मा. पीठासीन अधिकारी तथा उपमहापौर:–** सचिव साहेब, या प्रस्तावावर मतदान घ्या.

**मा. सचिव:–**जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**प्रस्तावाच्या बाजुने :–३० मते.**

१. श्री. टेकचंदानी राजू
२. श्री. लिंगे सुर्यकांत
३. श्री. ऐडके गणपत
४. श्रीमती शर्मा कमला
५. श्री. वलेचा पृथ्वी
६. श्री. रोहरा श्यामसुंदर
७. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८. श्री. पवार नाना
९. श्री. जग्यासी राजू
१०.श्री. निकम शांताराम
११.श्री. वनवारी किशोर
१२.श्री. जेसवानी सतराम
१३.श्री. लुंड गोविंदराम
१४.श्रीमती खिलनानी भावना
१५.श्री. खेमानी दर्शनसिंग
१६.श्रीमती कारीरा रेखा
१७.श्री. पमनानी ईश्वर
१८.श्री. साधवानी मनोज
१९.श्री. रामरख्यानी मोहनदास
२०.श्री.लबाना होशियारसिंग
२१.श्री. तलरेजा विनोद
२२.श्रीमती रिजवानी सुजाता
२३.श्री. मोकल चंदाराम
२४.श्री. म्हस्के अंकुश
२५.श्री. यादव लालबिहारी
२६.श्री. जाधव प्रशांत
२७.श्री. जाधव सुरेश
२८.श्रीमती साधवानी जया
२९.श्री. भालेराव गौतम
३०.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार

**मा.सचिव:–**जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरोधात :— ९ मते.

१. श्रीमती मोकल सिमा
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. रुपचंदानी बच्चाराम
४. श्री. असरोंडकर राज
५. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
६. श्री. सोनवणे नथु
७. श्री. गायकवाड दिलीप
८. श्री. पाटील विश्वनाथ
९. श्री. चौधरी राजेंद्र

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ८:— उल्हासनगर—४ येथील गोकुळधाम इमारती समोरील उद्यानातील जागा सौंदर्यीकरण व नुतनीकरण करणेकामी प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय या संस्थेस देण्यात आलेली असुन त्याची कालमर्यादा १ वर्षा ऐवजी १० वर्षे निश्चित करणेकामी मान्यता देणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिकेने ब्रम्हकुमारी उद्यानमधील देण्यात आलेली जागा (६६६५ चौ. फुट) प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरी विश्वविद्यालय यांना उद्यानांचा विकास करणेसाठी १० वर्षाची मुदत वाढ मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८९, दि. ८.३.२००२ च्या अनुषंगाने प्रजापती ब्रम्हकुमारी यांना यापुर्वी १ वर्षासाठी सदरचे उद्यान भाडेपट्टयाने दिलेले असुन सदरची मुदत दि. ३०.६.२००३ रोजी संपलेली आहे. तथापि अद्यापपर्यंत बगीचाचे सौदर्यीकरण व नुतनीकरणाचे काम सुरूवात केलेली असुन अद्यापपर्यंत अपुर्ण अवस्थेत आहे.

सबब, संस्थेने त्याचे दि. २४.८.२००४ पत्रान्वये भाडेपट्टयाची मुदत १० वर्ष एवढी वाढवुन मिळणेस विनंती केलेली आहे. सदरच्या जागेची मालकी महानगरपालिकेची राहील. महानगरपालिका निधीतुन उद्यान विकासासाठी खर्च करणे शक्य नसल्याने केवळ उद्यानाच्या विकास करण्याच्या प्रयोजनासाठी संस्थेस उद्यानाचा वापर करण्याची परवानगी द्यावी. असा प्रस्ताव महापालिकेकडे इतर अटी व शर्तीसह ठेवण्यात यावा.

तरी सदर मागणी केलेले ब्रम्हकुमारी विश्वविद्यालय उद्यानातील जागा (५५० चौ. मी.) १० वर्षाचे मुदतीसाठी वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर प्रजापती ब्रम्हकुमारी विश्वविद्यालय या संस्थेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये चर्चा करून खालील अटी व शर्तीस अधिन राहुन उचित निर्णय मा. महासभेच्या परवानगीने घेणे आवश्यक आहे.

अटी व शर्ती

१. संस्था/ परवानाधारकास महापालिकेच्या मालमत्तेवर कोणताही मालकी हक्क सांगता येणार नाही.
२. सदर परवाना संस्थेला / परवानाधारकास फक्त बगिच्याचे सुशोभिकरण व सौदर्याीकरण स्वखर्चाने करण्याकरीता दिले जात आहे.
ज्या उद्देशासाठी परवानगी देण्यात आलेली आहे त्या उद्देशाकरीताच मैदानाचा वापर करण्यात यावा.
संस्थेने / परवानाधारकाने सुशोभिकरण व सौदर्यीकरणासाठी लागणारा खर्च, विद्युत व्यवस्था, पाणी पुरवठा व इतर कर महापालिकेकडुन दिले जातील.

संस्थेने / परवानाधारकाने मैदानात ‘२. ५ ग १०’ मापाचे दोन पेक्षा जास्त जाहीरात फलक लावु नयेत व लावलेल्या दोन जाहीरात फलकांची फी महापालिकेत वेळोवेळी भरणा करावी.

संस्थेने / परवानाधारकाने जाहीरात फलक निओत फलकाप्रमाणे दर्शवु नयेत.

संस्थेने दरवर्षी नाममात्र भाडे म्हणुन रक्कम रू. 100/- महापालिकेत जमा करावी लागेल.

संस्थेने / परवानाधारकाने परवान्याचे नुतनीकरण दरवर्षी करावयाचे आहे.

सदर जागेवर कोणतेही बांधकाम करणेपुर्वी महापालिकेची पुर्व परवानगी घ्यावी.

उद्यानातील विकासकाने पुर्ण करणे संस्थेस बंधनकारक असुन मुदतीत कामे पुर्ण न झाल्यास महापालिका उद्यानाचा ताबा स्वत:कडे घेईल व संस्थेने त्या तारखेपर्यंत केलेल्या खर्चाची कोणतीही भरपाई मागण्याचा अधिकार संस्थेला असणार नाही.

उद्यानामध्ये सर्वांना विनामुल्य व मुक्त प्रवेश देण्यात येईल व नियोजनाचे हक्क महापालिकेकडे राहतील जागेचे कोणतेही हक्क संस्थेला / परवानाधारकास राहणार नाहीत.

संस्थेला / परवानाधारकास सदर जागेचा हक्क किंवा जागेचे हस्तांतरण इतर कोणत्याही संस्थेस किंवा व्यक्तीस करता येणार नाही किंवा अन्य कोणत्याही मार्गाने अन्य पक्षांचे हित संबंध निर्माण करता येणात नाहीत.

संस्थेने / परवानाधारकाने उद्यानाचे सुशोभिकरण व सौदर्यीकरण करतेवेळी सदर उद्यान विकासासाठी नकाशे व साहित्य याकरिता शहर अभियंता यांची मान्यता घ्यावयाची आहे.

संस्थेत अथवा परवानाधारकास पुर्व नोटीस वेळ देवुन परवाना रद्द करण्यात येईल.

परवान्याच्या कालावधीत उद्यानामध्ये परवानाधारकाकडून किंवा

परवानाधारकास सुशोभिकरण व नुतनीकरणाबाबत कोणताही मालकी हक्क सांगता येणार नाही.

संस्थेला/ परवानाधारकांस दिलेल्या कालावधीत संस्थेमार्फत कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची दखल घेणे बंधनकारक राहील.

सदर उद्यान विकासासाठी नकाशे व साहित्य संस्थेने तयार करून आयुक्तांना सादर करावे. आयुक्त त्यात जे बदल सुचवतील त्याप्रमाणे उद्यान विकसित करणे संस्थेवर बंधनकारक राहील. उद्यान विकसित करताना जो खर्च संस्था करेल त्याचा तपशिल वेळोवेळी महापालिकेस सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेला आजुबाजुचे रस्ते चौक उद्यान विकसित व सुशोभिकरण करणेसाठी किंवा किमान २५ लाख खर्च करावा लागेल.

वरील अटी व शर्तीस अधिन राहुन प्रस्तावित उद्यान प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरी विश्वविद्यालय यांना १० वर्षासाठी, ‘वापरा व हस्तांतरीत करा’ या तत्वावर देणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये चर्चा करून उचित निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

<u>महासभा ठराव क्र:–६१</u>

<u>दिनांक:–२०/१/२००५.</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. कमला शर्मा

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–४ येथील गोकुळधाम इमारती समोरील उद्यानातील ६६६५ चौ.फुट जागा उद्याना प्रयोजनार्थ विकास, सुशोभिकरण व सौंदर्यीकरणासाठी पुर्वीच्या स्थायी समिति ठराव क्रमांक ८९, दिनांक ८.३.२००२ प्रमाणे वेळोवेळी एका वेळी एका वर्षापेक्षा जास्त नसेल एवढया कालावधीसाठी सदरचे उद्यान प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय या संस्थेस बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर देण्यात आले असुन त्याचे कालावधीत वाढ करण्यासाठी त्याचे भाडेपट्टयाचा कालावधी एका वर्षाऐवजी दहा वर्षासाठी असा फेर निश्चित करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ९:— फेरीवाल्यांना परवाना देणेकामी मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—एक मिनिट, या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे की किती लोकांना आपण परवाने देणार आहोत. त्यावर चर्चा झाली पाहिजे.

मा. सचिव:—या प्रस्तावामध्ये तीन मुद्दे आहेत. कोणत्या तारखेपासुन आपण हे लागु कराल. व याकामी अभिकर्ता सुध्दा नेमावयाचा आहे त्यास परवानगी दयायची आहे. पास? १ एप्रिल पासुन लागु करायचा? प्रस्ताव १ एप्रिल पासुनचा आहे, यावेळेस अभिकर्त्याची नेमणुक करणेस परवानगी घ्यायची आहे. व ज्या अटी शर्ती यांनी प्रस्तावित केल्या आहेत त्या मान्य करायच्या आहेत. व कोणत्या तारखेपासुन करायच्या आहेत. पास?

काही सदस्य :—पास. पास. हा प्रस्ताव दि. १ एप्रिल २००५ पासून लागु करा.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ९:— फेरीवाल्यांना परवाना देणेकामी मान्यता देणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता विभागाच्या वतीने '' ना फेरीवाला क्षेत्र'' व ''फेरीवाला क्षेत्र'' घोषीत करून फेरीवाला क्षेत्रामध्ये फेरीवाल्यांना परवाना देणेबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर दि. १९/०७/२००२ रोजी सादर करण्यात आला होता. त्यावर महासभेने सादर केलेला प्रस्ताव अंशत: मान्य करून शहरातील १९ रस्ते '' ना फेरीवाला क्षेत्र'' म्हणुन जाहीर करणेचा ठराव क्र. १२, दि. १९/०७/२००२ पारीत केला. त्याप्रमाणे सदर रस्ते 'ना फेरीवाला क्षेत्र' म्हणुन जाहीरकरण्याची कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली आहे. तथापि, 'ना फेरीवाला क्षेत्रा' व्यतिरिक्त इतर ठिकाणी फेरीचा व्यवसाय करणेसाठी फेरीवाल्यांना परवाना देणे, यासाठीच्या अटी व शर्ती निश्चित करण्यात आलेल्या नाहीत.

उल्हासनगर शहरातील वाहतुक संमस्ये बाबत महानगरपालिका, पोलिस विभाग, व्यापारी संघटना, फेरीवाला संघटना यांच्या विविध बैठका घेवुन शहरातील वाहतुक समस्या व त्यावरील उपाययोजना याबाबत संबंधितांचे मत जाणुन घेवुन यासंबंधी करावयाची कार्यवाही निश्चित करण्यात आली.

यावेळी शहरातील वाहतुक समस्येचे निराकरण करणेसाठी शहरात विविध भागातील रस्त्यावरील फेरीवाल्यांचे नियमन करणे आवश्यक असल्याचे सर्व संबधितांनी नमुद केलेले आहे. सद्या शहरातील १९ रस्ते जरी 'ना फेरीवाला क्षेत्र' म्हणुन जाहीर केलेले असले तरी अद्यापपर्यंत इतर भागात जे काही फेरीवाले व्यवसाय करतात त्यासाठीचे परवाना बाबत कोणतेही अटी व शर्ती निश्चित करून त्यांना परवाना न दिल्याने त्यांचे प्रभावी नियंत्रण करणेत अडचणी येतात.

त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाचे मुंबई महाराष्ट्र हातगाडी एकता युनियन विरूद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर याप्रकरणी हातगाडी व्यवसाय परवाना देणेसाठीचे निश्चित स्वरूपाचे असे निकष व नियम अटी निश्चित केलेल्या आहेत.

यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३८४ व ३८६ प्रमाणे उल्हासनगर शहरात 'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन इतर विशिष्ट रस्त्यावर व्यवसाय करणेसाठी फेरीवाल्यांना विक्रेत्यांना व रस्त्यावर, फुटपाथवर किंवा सार्वजनिक ठिकाणी विक्री करणारे विक्रेते यांना खालील निर्देशित दराने फी आकारून त्यांना महापालिकेच्या वतीने परवाना देणेसाठीच्या 'उल्हासनगर महानगरपालिका फेरी विक्री व्यवसाय परवाना अटी व शर्ती' यांचे प्रारूप तयार करण्यात आलेले आहे.

या अटी व शर्तीप्रमाणे फेरी व्यवसायास परवाना देणेस महानगरपालिकेने मान्यता दिल्यास फेरी धारकांकडुन दैनिक व दंडनीय शुल्क वसुल करण्याचा महानगरपालिकेस अधिकार प्राप्त होईल. अशी दैनिक वसुली महानगरपालिका कर्मचा—याची आवश्यकता लागेल तसेच या परिस्थितीत वसुली करणेकरीता होणारा खर्च अधिक असेल. त्याकरीता वार्षिक मक्त्याद्वारे खाजगी अभिकर्त्यामार्फत या शुल्काची वसुली करणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. व त्यासाठीच्या प्रारूप अटी व शर्ती तयार करण्यात आलेल्या आहेत.

त्यामुळे १) प्रारूप 'उल्हासनगर महानगरपालिका' फेरी विक्री व्यवसाय परवाना अटी व शर्ती'
२) महानगरपालिकेने परवाना दिलेल्या फेरीधारकाकडुन दैनिक शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुकीसाठीच्या अटी व शर्ती यांना महासभेकडुन मान्यता मिळणेस व त्याची अंमलबजावणीचा दिनांक निश्चित होणेसाठी मा. महासभेकडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> ६२ <u>दिनांक:—२०/१/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरात ना फेरीवाला क्षेत्र वगळुन फेरीवाल्या क्षेत्रात फेरी, विक्री व व्यवसाय करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनानुसार फेरिवाल्यांना परवाना देणे. परवाना दिलेलया फेरीवाल्यांकडून परवाना फी, दैनिक भाडे शुल्क, दंडात्मक शुल्क, वसुल करणे व त्यासाठी अभिकर्ता नेमणे या सर्व कामी प्रशासनाकडुन सुचविलेल्या अटी व शर्तीसहचा प्रस्ताव जसा आहे तसा मान्य करीत आहे व सदरहु प्रस्ताव दिनांक १.४.२००५ पासुन लागु करण्यास प्रशासनास निर्देशित करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

सोबत प्रशासनाचा प्रस्ताव, अटी, शर्ती व शुल्काबाबत विवरणः—

**उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर**
**फेरीधारकांना 'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन**
**परवाना देणेसाठी 'उल्हासनगर महानगरपालिका फेरी विक्री व्यवसाय परवाना अटी व शर्ती'**

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३८४ व ३८६ नुसार शहरातील सार्वजनिक जागेवर विक्री परवाना देणेचा महानगरपालिकेस अधिकार प्रदान आहे. त्याप्रमाणे 'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन इतर विशिष्ट रस्त्यावर व्यवसाय करणेसाठी फेरीवाले विक्रेते, विक्रेत्यांना व रस्त्यावर, फुटपाथवर विक्री करणारे विक्रेते यांना निर्देशित दराने फी आकारून त्यांना महापालिकेच्या वतीने परवाना देणे व त्यासाठीचे परवाना नमुना व त्यातील अटी व शर्ती निश्चित करणेत येत आहे.

कायदेशीर तरतूद
**मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तुरतुदी.**

**१) कलम ३८४: सार्वजनिक जागी विक्री करण्यासाठी लायसन्स**

कोणत्याही व्यक्तीस, याबाबत आयुक्ताने दिलेल्या लायसन्सच्या अटी व तरतुदी या अन्वये आणि त्यास अनुसरून असेल, त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने, कोणतीही वस्तु मग ती मानवी आहारासाठी असो किंवा नसो—फेरीने विकण्याच्या किंवा विक्रीसाठी मांडण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही सार्वजनिक जागेचा किंवा कोणत्याही सार्वजनिक रस्त्याचा वापर करता येणार नाही.

**२) कलम २३१: आयुक्तांस या अधिनियमाचे उल्लंघन करून उभारलेली, ठेवलेली, फेरीने विकण्यात येणारी किंवा विक्रीसाठी मांडलेली कोणतीही वस्तू, नोटीस न देता काढुन टाकता येईल.**
आयुक्तास नोटीस न देता—
(अ) नियत दिवसांनंतर, या अधिनियमाच्या तरतुदीविरूद्ध कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्यावर किंवा कोणत्याही उघडया पाटावर, नालीवर, विहीरीवर किंवा टाकीवर उभारण्यात किंवा उभी करण्यात येईल अशी कोणतीही भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप किंवा अन्य बांधकाम, मग ते पक्के बसविलेले असो किंवा हलविण्याजोगे असो, आणि कायम स्वरूपाचे असो किंवा तात्पुरत्या स्वरूपाचे असो किंवा कोणतीही खिळणी:

(ब) या अधिनियमाचे उल्लंघन करून कोणत्याही जागेत किंवा जागेवर ठेवलेला, मांडलेला किंवा जागेपासुन पुढे आणलेला, तिला जोडलेला किंवा तिच्यापासुन लोंबते सोडलेला, कोणताही गाळा, खुर्ची, बाक पेटी, शिडी, गासडी, फळी खण किंवा अन्य कोणतीही वस्तु:

(क) या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करून कोणत्याही सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक रस्त्यावर फेरीने विकण्यात येणारा किंवा विक्रीसाठी मांडलेला कोणताही जिन्नस व असा जिन्नस किंवा ज्यावर ठेवला असे कोणतेही वाहन, पुडके, पेटी किंवा अन्य कोणतीही वस्तू काढुन टाकण्याची व्यवस्था करता येईल.

**३) कलम ३८६: लायसन्स व लेखी परवानगी देणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे आणि फी इत्यादी बसविणे यासंबंधी सर्वसाधारण तरतुदी—**

(१) जेव्हा जेव्हा कोणत्याही प्रयोजनासाठी लायसन्स किंवा लेखी परवानगी देता येईल अशी या अधिनियमान्वये किंवा तदनुसार तरतुद करण्यात आली असेल तेव्हा तेव्हा अशा लायसन्समध्ये किंवा लेखी परवानगीत, ज्या कालावधीसाठी आणि

ज्या निर्बंधाच्या व शर्तीच्या अधीन ते देण्यात आले आहे तो कालावधी आणि ते निर्बंध व त्या शर्ती, आणि त्याच्या नवीकरणासाठी ज्या तारखेस अर्ज करता येईल ती तारीख विनिर्दिष्ट केली पाहिजे आणि असे लायसन्स किंवा लेखी परवानगी आयुक्तांच्या किंवा ते देण्यास कलम ६९ अन्वये अधिकार देण्यात आलेल्या नगरपालिका अधिका—याच्या सहीने दिली पाहीजे.

(२) या अधिनियमान्वये किंवा तदनुसार अन्यथा तरतुद करण्यात येईल त्याव्यतिरिक्त, अशा प्रत्येक लायसन्ससाठी किंवा लेखी परवानगीसाठी, आयुक्त महानगरपालिकेच्या मंजुरीने वेळोवेळी ठरवील अशा दराने फी आकारता येईल.

(३) कलम ३७८, पोट—कलम(१) च्या परंतुकाच्या तरतुदींच्या अधिन, या अधिनियमान्वये दिलेले कोणतेही लायसन्स किंवा लेखी परवानगी ही, धारकाने विपर्यस्त माहिती देऊन किंवा लबाडीने मिळविली हे, किंवा ती ज्या व्यक्तींस देण्यात आली आहे त्या व्यक्तीने त्याच्या कोणत्याही निर्बंधाचे किंवा शर्तीचे उल्लंघन केले आहे किंवा परवानगी ज्या बाबींशी संबंधित असेल अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा कोणत्याही नियमाचे, उपविधीचे किंवा स्थायी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल सिध्दापराध ठरविण्यात आले असेल तर, आयुक्तांस असे लायसन्स किंवा परवानगी कोणत्याही वेळी निलंबित करता येईल किंवा रद्य करता येईल.

(४) असे कोणतेही लायसन्स किंवा लेखी परवानगी निलंबित केली असेल किंवा रद्द केली असेल तेव्हा, किंवा ती ज्या कालावधीसाठी देण्यात आली होती तो कालावधी संपला असेल तेव्हा, असे लायसन्स किंवा लेखी परवानगी निलंबित करण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी आयुक्तांने दिलेला आदेश, त्याच्याकडुन रद्द करण्यात येणार नाही तोपर्यत किंवा यथास्थिती, अशा लायसन्सचे किंवा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यात येणार नाही तोपर्यंत, या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांसाठी, ज्या व्यक्तींस असे लायसन्स किंवा लेखी परवानगी देण्यात आली होती अशा व्यक्तीजवळ असे लायसन्स किंवा लेखी परवानगी नाही, असे मानले जाईल:

परंतु लायसन्सचे किंवा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यासाठी, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपर्यंत अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, अर्जदारास आदेश मिळेपर्यंत, जणू त्या लायसन्सचे किंवा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यात आले असे समजुन वागण्याचा हक्क असेल.

(५) ज्या व्यक्तींस असे कोणतेही लायसन्स किंवा लेखी परवानगी देण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, अशी लेखी परवानगी किंवा लायसन्स अमलात असेपर्यंत, सर्व वाजवी वेळी, आयुक्ताने तसे करण्यास सांगितल्यास, असे लायसन्स किंवा लेखी परवानगी सादर केली पाहिजे.

(६) लायसन्ससाठी किंवा परवानगीसाठी करावयाचा प्रत्येक अर्ज आयुक्ताला उद्देशून केला पाहिजे.

(७) आयुक्ताने किंवा त्याच्या वतीने लासयन्ससाठी किंवा परवानगीसाठी फी स्वीकारली आहे एवढयाच कारणावरून फी देणा—या व्यक्तींस लायसन्स किंवा परवानगी मिळण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

## व्याख्या

अटी व शर्तीतील नमुद शब्दांच्या खालील व्याखेव्यतिरिक्त इतर शब्दांच्या व्याख्या या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये नमुद केलेप्रमाणेच्या असतील.

१) **अधिनियम**:— मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.

२) **अटी व शर्ती:—** यापुढे नमुद करण्यात आलेल्या 'उल्हासनगर महानगरपालिका फेरी विक्री व्यवसाय परवाना अटी व शर्ती'

३) **परवाना दिलेला फेरीधारक**:— मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३८४ व ३८६ त्याखालील महानगरपालिकेने मान्य केलेल्या अटी व शर्तीनुसार परवाना दिलेला परवाना धारक.

४) **स्थानिक रहिवासी** — म्हणजे जो रस्त्या फेरी व्यवसायासाठी प्रस्तावित आहे अशा रस्त्या लगतचे जागेतील रहिवासी/मालक/भाडेकरू/दुकानदार/व्यावसायिक.

५) **फेरी व्यवसाय**:— शहरातील सार्वजनिक रस्त्यावर नागरीकांच्या सर्वसाधारण दैनंदिन उपयोगाच्या वस्तुची विक्री आर्थिक मुल्य वसुल होत असलेल्या स्वरूपातील व व्यावसायिक देवाण—घेवाण यात व्यावसायिक कामासाठी वस्तुचे प्रदर्शन याचा समावेश असेल.

६) **'ना फेरीवाला क्षेत्र'** :— महानगरपालिकेने यथास्थित जाहीर केलेले

'ना फेरीवाल क्षेत्र'.

७) **कुटूंबातील सदस्य:—** यात व्यावसायिकाचे आई/वडील/पत्नी/ मुलगा/मुलगी/भाऊ/बहीण यांचा समावेश असेल.

भाग एक

## सर्वसाधारण अटी

**नाव:—** या अटी व शर्तीना 'उल्हासनगर महानगरपालिका फेरी विक्री व्यवसाय परवाना अटी व शर्ती' असे म्हणण्यात येईल.

## अ) फेरी व्यवसायास परवाना देणे

१) शहरात सार्वजनिक रस्त्यावर/जागेत व्यवसाय करणा—या फेरीधारक मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८४ व ३८६ नुसार महानगरपालिकेकडुन परवाना घेतले शिवाय वस्तूची विक्री/देवाण— घेवाण/प्रदर्शन/साठवण या स्वरूपाचा व्यवसाय करणे अनुज्ञेय असणार नाही.

२) जे रस्ते किंवा रस्त्याचा भाग महानगरपालिकेने 'ना फेरीवाला क्षेत्र' म्हणुन घोषित केले आहेत किंवा भविष्यात जाहीर करील अशा रस्त्यावर कोणत्याही फेरीधारकांना व्यवसाय करणे अनुज्ञेय असणार नाही.

३) कोणत्याही फेरी धारकास १ मी. ґ १ मी. पेक्षा अधिक क्षेत्र फेरी व्यवसायासाठी अनुज्ञेय असणार नाही.

४) व्यवसायासाठी परवाना दिलेला व्यवसायिकास महानगरपालिका ठरवेल त्या दराने वार्षिक परवाना शुल्क व दैनिंक फेरी शुल्क तसेच लागू असतील त्याप्रमाणे सेवा शुल्क भरणा करावे लागेल.

५) ज्या रस्त्यावर फेरी व्यवसाय परवानगी देण्यात आली आहे. परंतु आयुक्तांचे कोणत्याही वेळी असे मत होईल सार्वजनिक आरोग्य सुरक्षितता व सोय यादृष्टिने 'ना फेरीवाला क्षेत्र' यामध्ये वाढ करणेचा किंवा एखादया विशिष्ठ रस्त्यावरील फेरीवाल्यांची संख्या कमी अधिक करणेचा अधिकार असेल.

६) परवान्यासाठी निश्चित केलेल्या अटी व शर्ती व नियमात आवश्यकतेनुसार मुळ अटी व शर्तीत बदल करणेचा, त्यात नवीन अटी व शर्ती अर्तंभुत करणे, परवाना पद्धतीत बदल करणे यांचा मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांना अधिकार असुन त्याबाबत परवाना धारकास आक्षेप घेता येणार नाही.

७) दैनिक फेरी शुल्क किंवा वार्षिक परवाना शुल्क अदा केलेमुळे परवाना धारकास विहीत वेळेच्या मर्यादेच्या नंतर किंवा आधी व्यवसाय करणेचा तसेच एका निश्चित जागेवर व्यवसाय करणेचा अधिकार प्राप्त होणार नाही व तसा दावा करता येणार नाही.

## ब) कालावधी

१) परवान्याची मुदत ही परवाना दिल्यापासुन ३ वर्षाच्या कालावधीसाठी राहील. तथापि, वर्षाच्या मध्यांतरात परवाना दिला असल्यास तो ३ वर्षाच्या दि. ३१ डिसेंबर रोजी परवाना कालावधी समाप्त होईल. व पुढील दरवर्षी दि. ३१ डिसेंबर पर्यंत

२) वरील मुदतीनंतरच्या पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी परवान्याचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

३) त्यासाठी व्यवसायिकाने परवाना ज्या वर्षी संपणार आहे त्यावर्षाचे दि. १५ डिसेंबर ते दि. ३१ डिसेंबर या कालावधीत परवान्याचे नुतनीकरण करून घेणे आवश्यक आहे.

४) नुतणीकरणासाठी दि. १५ जानेवारी पर्यत अर्ज केल्यास प्रत्येक दिवसासासाठी रू. १०/— एवढे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

५) परवान्याची मुदत संपल्यानंतर येणा—या वर्षाचे १५ जोनवरी पर्यंत कालावधीत नुतणीकरण न केलेस परवानाधारकास यापुढे व्यवसाय करावयाचा नाही असे समजण्यात येईल.

## क) फेरी परवाना समिती

### १) फेरी परवाना समितीचे गठण

फेरी व्यवसाय परवाना समिती महानगरपालिका क्षेत्रातील 'ना फेरीवाना क्षेत्रात वाढ करणे किंवा असलेले क्षेत्र कमी करणे याबाबत महासभेस शिफारस करणे तसेच फेरी व्यवसायासंबंधी इतर बाबी निश्चित करणे यासाठी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली फेरी व्यवसाय परवाना समिती असेल.

### २) समितीची रचना

१) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर:— अध्यक्ष
२) पोलिस उप—आयुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर
३) सहाय्यक आयुक्त, वाहतूक शाखा
४) प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रतिनिधी
५) आयुक्त ठरवतील असा मान्यताप्राप्त फेरीधारक संघटनांपैकी एक प्रतिनिधी
६) आयुक्त ठरवतील असा स्थानीक रहिवाशी व दुकानदार यांचे संघटनेचे प्रतिनिधी
७) विधी अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका
८) महानगरपालिकेचे संबंधित उपायुक्त — समितीचे सदस्य सचिव

### ३) अ) समितीची कार्यकक्षा

१) महानगरपालिका क्षेत्रातील कोणते रस्ते ना फेरीवाला क्षेत्र म्हणून जाहिर करणेची शिफारस करणे.
२) विशिष्ट रस्त्यावर अनुज्ञेय फेरीधारकांची संख्या निश्चित करणे.
३) विशिष्ट रस्त्यावर विशिष्ट व्यवसायासाठी किती फेरीधारकांना परवानगी दयावयाची हे निश्चित करणे.
४) परवाना देणेसाठी निश्चित केलेल्या रस्त्यावरील फेरीधारकांनी रस्त्याचे / फुटपाथ पैकीचे कोणत्या बाजूस व्यवसाय करावयाचा ती बाजू व आवश्यक वाटेल तर त्यासाठीचे दिवस निश्चित करणे.
५) फेरी व्यवसायासंबंधि अटी व शर्ती बाबत महानगरपालिकेस शिफारस करणे
६) शहरातील फेरी व्यवसायामुळे सर्वसामान्य नागरीकांना त्रास होवु नये यासाठी नियमित आढावा घेवुन निर्देश देणे.

### ब) समिती बैठक

समितीची दर दोन महिन्यातून किमान एकदा बैठक घेण्यात येईल. या व्यतीरिक्त प्रशासनाकडील महत्वाचे प्रस्ताव किंवा नागरीकांकडून तातडीचे विषयानुसार आयुक्त केंव्हाही समितीची बैठक आयोजीत करू शकतील.

### ४) समितीने सुनावणी देणे

१) एखादा रस्ता ना फेरीवाला क्षेत्रात समाविष्ट करणेचा किंवा वगळणेचा असेल त्या संबंधी समितीने सर्वसामान्य नागरीकांकडुन हरकती मागवुन त्याबाबत नागरीकांना सुनावणी देवुन त्यावर आपली शिफारस करेल.

२) एखादा रस्ता ना फेरीवाला क्षेत्रात समाविष्ट करणेचा किंवा वगळणे संबंधी कुठल्याही रहिवाशांच्या संघटनेने विनंती केल्यास त्याबाबत आयुक्तांना वाटल्यास तो प्रस्ताव ते समितीकडे पाठवु शकतील. अशाप्रकरणी अर्जदाराने रू. १५००/— एवढी अनामत रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

## ड) फेरी व्यवसायासाठी परवाना देणेचे रस्ते व त्यामधील त्यावरील स्थळ निश्चित करणे.

१) 'ना फेरीवाला क्षेत्र' बाहेरील असला तरीही ८ मी. पेक्षा कमी रूंदीच रस्त्यावर कोणत्याही परिस्थितीत फेरी व्यवसायास परवानगी देण्यात येणार नाही.

२) ९ मी. पेक्षा कमी रूंदीच्या रस्त्यांबाबत व्यवसाय परवाना देण्यात यावा किंवा नाही याचा निर्णय मा. आयुक्त फेरी व्यवसाय समितीच्या शिफारसीने करतील.

३) महानगरपालिका क्षेत्रातील ना फेरीवाला क्षेत्रा व्यतिरिक्त ज्या रस्त्यांवर दुकान लाईन नाही अशा पुर्णत: रहिवासी रस्त्यावर फेरी व्यवसास परवानगी देण्यात येणार नाही.

४) एखादया रस्त्यावर फेरी व्यवसाय अनुज्ञेय केला असला तरी कोणत्याही धार्मिक, प्रार्थनास्थळ, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक रूग्णालय यापासुन १०० मी. अंतरात व महानगरपालिका मंडई किंवा रेल्वे स्थानक यापासुन १५० मी. अंतरात फेरी व्यवसाय अनुज्ञेय असणार नाही.

५) परंतू धार्मिक ठिकाणा जवळ फुले हार/नारळ/ अगरबत्ती या वस्तूंची विक्री परवानगी अनुज्ञेय असेल. यास इतर सर्व अटी व शर्ती लागु असतील.

६) कोणत्याही रस्त्यावर फेरी व्यवसायासाठी परवानगी दिली असली तरीही त्या रस्त्यावर जेथे चौक किंवा इतर रोड जंक्शन असले अशा ठिकाणी त्या रस्त्यावर चौक अथवा जंक्शन पासुन ५० मी. अंतरात व्यवसाय करणे अनुज्ञेय नसेल.

७) प्रत्येक इच्छुक फेरी धारकाने आपले अर्जात किमान तीन रस्ते प्राधान्य क्रमाने व्यवसायासाठी नमुद केले पाहिजे. महानगरपालिका आयुक्तांनी निश्चित केलेल्या निकषाप्रमाणे या रस्त्यावर जागा उपलब्ध नसल्यास अर्जदार यांचा इतर ठिकाणी जागेसाठी विचार करता येईल. परंतू त्यात त्यांना अग्रक्रम नसेल.

८) एकाच रस्त्यावर व्यवसायासाठी अनुज्ञेय संख्येपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास त्यासाठी कोणते प्राधान्य क्रम निश्चित करावयाचे किंवा कोणास परवाना द्यावा यासंबंधीचे सर्व अधिकार मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांना असतील. त्याबाबत अर्जदारास कोणताही वाद निर्माण करता येणार नाही.

९) मा. आयुक्तांचे जेव्हा कधीही असे मत होईल की, एखाद्या विशिष्ट रस्त्यावर अनुसूचित फेरीवाल्यांची संख्या ही जास्त किंवा कमी होत आहे. त्यावेळी फेरीव्यवसाय समितीचे शिफारसीने आयुक्त तसा निर्देश देतील. अशा बदलामुळे कोणत्याही परवाना धारकांस इतर रस्त्यावर स्थानांतरीत करावयाचे याबाबत आयुक्तांचा निर्णय अंतिम असेल.

१०) वरील शर्तीमुळे परवाना धारकास व्यवसायाबाबत कोणतीही नुकसान भरपाई देय असणार नाही किंवा इतर जागांवर हक्क सांगता येणार नाही. तथापि शक्य असेल तोवर या विस्थापित फेरीधारकांना उपलब्धतेच्या आधारे इतर रस्त्यावर अग्रक्रमाने फेरी परवाना देण्यात येईल.

११) ज्या रस्त्यावर फेरीवाल्यास पुर्वी परवाना दिला आहे तेथेच पुढील वर्षासाठी व्यवसाय करण्यास परवाना मिळणेचा हक्क आहे असे समजण्यात येणार नाही.

१२) फेरी विक्रीचा परवाना हा रस्त्या संदर्भात असुन विशिष्ठ फेरी धारकांस विशिष्ठ जागा निश्चित करणे अशा स्वरूपाचा नाही.

## इ) व्यवसायाची वेळ

१) फेरीधारकांना सकाळी ७.०० ते रात्री १०.०० या कालावधीत व्यवसाय करणे अनुज्ञेय असेल.

२) 'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन ज्या रस्त्यावर व्यवसाय परवाना देण्यात आला आहे अशा प्रत्येक रस्त्यासाठी आठवडयातील, मा. आयुक्त यांना उचित वाटेल असा कोणताही एक दिवस फेरी बंद दिवस म्हणुन आयुक्त जाहीर करू शकतील. व त्या दिवशी व्यवसाय करणे अनुज्ञेय असणर नाही.

३) ज्यावेळी महत्वाचे सण, मिरवणूका असतील किंवा इतर कारणाने महानगरपालिकेस प्रस्तुत क्षेत्र जेंव्हा मोकळे असावे असे वाटेल किंवा तशी आवश्यकता वाटेल त्या कालावधीत परवाना दिलेला असला तरी तेथे व्यवसाय करता येणार नाही. व त्याबद्दल कुठलीही पर्यायी जागा वा नुकसान भरपाई मागणेचा अधिकार फेरीधारकास असणार नाही.

## ई) परवाना हस्तांतरण

१) परवाना कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तीस हस्तांतरीत करता येणार नाही किंवा भाडयाने देता येणार नाही.

२) परवानाधारक व्यक्तीस उचित कारणामुळे व्यवसाय करणे शक्य नाही अशी आयुक्ताची खात्री झाल्यास किंवा परवानाधारकाचे निधन झाल्यास सदर व्यक्तीचे पती/पत्नी/मुले/मुली/आई/वडील या जवळच्या व

प्रत्यक्षत: परवानाधारकाच्या कुटुबापैकी व्यक्तीच्या नावे सदर परवाना हस्तांतरीत करणेस मा. आयुक्त परवानगी देतील.

भाग दोन

## परवाना मिळणेसाठी पात्रता

१) परवान्यासाठी अर्ज करणारी व्यक्तीही उल्हासनगर शहराची कायम रहिवासी असणे आवश्यक आहे. यासाठी अर्जदाराने आपल्या अर्जासोबत त्यासंबंधीचा रेशनकार्ड किंवा मतदार यादीचापुरावा जोडणे आवश्यक आहे.

२) एका कुटूंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींना परवाना अनुज्ञेय असणार नाही.

३) परवान्यासाठी अर्ज करणारी व्यक्तीने संबंधित पोलिस स्टेशन कडील चारित्र पडताळणीचा दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

४) परवान्यासाठी अर्ज करणारी व्यक्ती ही सज्ञान व स्वत: व्यवसाय करणारी असणे आवश्यक आहे. व त्या व्यक्तीनेच व्यवसाय करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही व्यक्तींस हा परवाना हस्तांतरीत करता येणार नाही.

५) परवाना धारकासोबत व्यवसायाच्या ठिकाणी कुटूबातील एका सहका—यापेक्षा अधिक सहकारी अनुज्ञेय असणार नाही. अशा सहका—याचे नाव, संपुर्ण पत्ता याचा तपशिल अर्जात नमुद केला पाहीजे. परवाना धारकाच्या सहका—याने स्वतंत्रपणे किंवा डोक्यावर, हातात माल घरून व्यवसाय करणे अनुज्ञेय असणार नाही.

६) कोणत्याही व्यक्तीला यापुर्वी परवाना दिलेला असेल. परंतु ती अपात्र असलेचे आयुक्तांचे निदर्शनास येईल त्यावेळी त्याचा परवाना रद्द करणेत येईल.

७) महानगरपालिका क्षेत्रात कुटूबातील एकापेक्षा अधिक सदस्यास फेरीवाला व्यवसायासाठी परवाना हे अनुज्ञेय नाही. अशी बाब आढळल्यास सर्व परवाने रद्द करण्याचा महानगरपालिकेस अधिकार असेल.

८) ज्या अर्जदार किंवा त्यांचे कुटुबीय यांचेकडेस महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकाराचे कर किंवा भाडे थकीत असेल अशा अर्जदारास परवाना देण्यात येणार नाही.

९) ज्या अर्जदारांबाबत वरील सर्व अटींची पुर्तता होत असल्यास उल्हासनगर शहराचा १५ वर्षाचा अधिवासी असलेल्या अर्जदारास फेरी वाला परवाना देणेसाठी प्राधान्य देण्यात येईल. तथापि, यासाठी अर्जदाराने आपल्या अर्जासोबत योग्य त्या प्राधिका—याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

भाग तीन

## अ) आरोग्य स्वच्छता व सार्वजनिक सुरक्षितता

१) खाद्यपदार्थांचे विक्रिचे व्यवसाय करणारे परवानाधारक व त्यांची कामावरील सहकारी यांना कोणताही सांसर्गिक रोग नसलेबाबत उल्हासनगर शहरातील नोंदणीकृत पदवीधारक वैद्यकिय अधिका—याचा दाखला अर्जासोबत तसेच दरवर्षी नुतनीकरण अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

२) परवानाधारक कोणत्याही प्रकारचा तयार खाद्यपदार्थ विक्रिचा व्यवसाय करीत असल्यास सर्वप्रकारचे खाद्यपदार्थ हे योग्य प्रकारे आच्छादित केलेली व आरोग्य पुर्ण स्थितीतील असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अशा ठिकाणी रस्त्यावर वा फुटपाथवर पाण्याचे डबा, मडके ठेवता येणार नाही.

३) कायद्याने अनुज्ञेय नसलेला किंवा ज्या व्यवसायासाठी विशिष्ट प्रकारच्या परवान्याची आवश्यकता आहे. किंवा ज्या पासुन दुर्गंधी निर्माण होईल/रोगराई पसरेल/इतर सर्वसामान्य नागरीक यांना इजा होईल/ज्या व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारचा स्फोटक रसायने, ज्वलनशील पदार्थ यांचा वापर होईल किंवा त्याचा साठा होईल अशा प्रकारचा व्यवसाय अनुज्ञेय असणार नाही.

## ब) महानगरपालिका सेवा व घनकचरा विल्हेवाट

१) फेरी धारकाने व्यवसाय करीत असतांना महानगरपालिका किंवा त्याचा नेमलेला अधिकर्ता यांचे सफाई कर्मचा—यांना त्यांचे स्वच्छतेचे काम पार पाडणेसाठी आवश्यक ते सहकार्य करणे बंधनकारक आहे.

२) महानगरपालिकेच्या विविध सेवा उदा. सार्वजनिक बांधकाम, पाणीपूरवठा तसेच इतर शासकीय विभाग उदा. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ/भारत संचार निगम लिमिटेड या कंपन्यांचे विकास व देखभाल दुरूस्ती संबंधी कामात आवश्यक ते परिपूर्ण सहकार्य करणे बंधनकारक राहील.

३) प्रत्येक व्यवसायिकाने आपल्या सोबत त्याच्या व्यवसायामुळे निर्माण होणारा ओला व सुका कचरा जमा करणेसाठी दोन स्वतंत्र रंगाच्या योग्य आकाराच्या कचराकुंडी स्वत: जवळ बाळगावयाची आहे.

४) निर्माण होणारा सर्व कचरा मग तो व्यवसायिकाकडुन अगर त्याचे गि—हाईक वा संबंधित व्यक्ती यांच्याकडुन निर्माण झालेला असो तो जमा करून या बंद कचराकुंडीत साठवणेची जबाबादारी व्यवसायिकाची असेल.

५) त्याचप्रमाणे वरील अटी प्रमाणे निर्माण झालेंला कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडी वाहनापर्यंत पोचविणे किंवा त्याची विल्हेवाट लावणेची जबाबदारी व्यवसायिकाची असेल.

६) अशा ठिकाणाचा कचरा जमा करणेसाठी कोणत्याही अभिकर्तास नेमले किंवा इतर खाजगी व्यक्तीस अशाप्रकारे परवाना दिल्यास त्याच्याकडे कचरा देणेस व त्यासाठी महानगरपालिका निश्चित करून देईल असे शुल्क संबंधितस देणेची जबाबादारी व्यवसायिकाची असेल.

भाग चार

## व्यवसाय करताना पालन करावयाचे नियम

१) ज्या रस्त्यावर फेरीव्यवसायासाठी परवाना धारकास परवाना देण्यात आलेला आहे अशा रस्त्यावर पादचा—यांना पायी चालणे, स्वयंचलित वाहनांची वाहतूक यास अडथळा निर्माण होणार किंवा त्या रस्त्यास लागून असलेल्या रहिवाशांची घरे किंवा दुकाने यांचा प्रवेशा मार्ग रोखला/बंद किंवा कमी होणार नाही अशा प्रकारे १.० मी. × १.० मी. क्षेत्रात रस्त्याच्या ठरवून दिलेल्या एका कडेच्या बाजूने व्यवसाय करणे अनुज्ञेय असेल.
२) अ) काही रस्त्याावर एका वेळी सर्व फेरीधारकांनी कोणत्याएकाच बाजूने व्यवसाय करणे अनुज्ञेय असेल. ती बाजु आयुक्त निश्चित करतील.

ब) त्याचप्रमाणे आवश्यकते नुसार वेगवेगळया दिवसांसाठी वेगवेगळी बाजु निश्चित करता येईल. व ते बंधनकारक राहील.
क) कोणत्याही परिस्थितीत दोन्ही बाजून फेरीधारकांनी व्यवसाय करणे अनुज्ञेय नाही.

ड) फेरीधारकास रस्त्यावर कोणत्याही प्रकारे टेबल/स्टॉल/स्टॅन्ड ठेवता येणार नाही. किंवा कोणत्याही प्रकारे ढाचा उभारता येणार नाही. तसेच व्यवसायासाठी हातगाडीचा वापर करता येणार नाही.

३) नेमुण दिलेल्या रस्त्यालगत असलेले जागेतील रहिवासीघर/दुकान/जागा यांच्या मुख्य रस्त्यावरील प्रवेश मार्गात जाण्यासाठी कोणत्याही रहिवाश्यास/त्याच्या गि—हाईकास अडथळा होईल किंवा घर किंवा दुकानाचे वायुवीजन किंवा रस्त्यावरून दिसणारा दुकानाचा/घराचा भाग झाकला जाईल अशा प्रकारे आपल्या सामानाची रचना अनुज्ञेय असणार नाही.

४) अ) फेरी व्यवसाय धारकांस कोणत्याही प्रकारे अन्न शिजविणे/कुठल्याही वस्तुवर कुठल्याही स्वरूपाची प्रक्रिया करणे याबाबी अनुज्ञेय असणार नाही.

ब) कापलेल्या फळांचा रस व इतर तसेच तयार शिजावलेले अन्न पदार्थांची विक्री व्यवसाय करतांना फेरी धारकाने महानगरपालिकेचे अशा पदार्थांचे विक्री संबंधी सर्व नियम त्यांचे परवाना संबंधी असलेल्या शर्ती यांचे व अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियमाचे सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क) परवाना धारकास किमती वस्तू यांचा विक्री व्यवसाय करता येणार नाही. फेरीधारकांनी सर्वसाधारण हया शहरातील नागरीकांना दैनंदिन आवश्यक अशा बाबींचा व्यवसाय करावा. ही धारणा आहे.

५) प्रत्येक परवाना धारकाने त्यास दिलेला परवाना व ओळखपत्र हे प्रत्येक वेळेस आपल्या जवळ बाळगले पाहिजे. ते प्रत्येक वेळी सहजपणे दिसेल अशा पध्दतीने शरीरावर लावले पाहिजे व मनपा अधिकारी, कर्मचारी/याकामी नेमलेला अभिकर्ता, त्याचे कर्मचारी यांनी मागितल्यास ते त्याच वेळी सादर केले पाहिजे. याचे पालन न केल्यास त्याचा माल जप्त करणेचा व परवाना रद्य करणेत येईल.

६) फेरीधारकाने व्यवसाय करतांना गि—हाईकांना आकृष्ट करणेसाठी संगीत वाजवीणे किंवा आवाज/गोंगाट निर्माण होईल अशी कोणतीही यंत्रणा वापरणे हे अनुज्ञेय नसेल

७) प्रत्येक व्यवसायिकाने सकाळी ७ ते रात्री १० या वेळेनंतर सर्व माल व वस्तू हा परवाना दिलेल्या ठिकाणाहुन स्वत:च्या जागेत घेवुन जावयाचा आहे. अन्यथा या वस्तु बेवारस समजुन जप्त करण्यात येतील व त्याची विल्हेवाट लावण्यात येईल.

८) परवानाधारकाच्या व्यवसायामुळे कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल असे कृत्य अनुज्ञेय असणार नाही.

९) परवाना दिलेल्या जागेचा वापर कोणत्याही राजकीय प्रचार किंवा इतर कामासाठी करता येणार नाही.

१०) परवाना धारकास रस्त्यापैंकीची कोणतीही जागेत कोणतीही होर्डिंग/खुण/मंडप/फलक याची उभारणी करता येणार नाही तथापी त्यास आपले मालाचे उन, वारा, पाऊस यांचे पासून संरक्षणाची उपाययोजना करता येईल.

## भाग पाच

## परवाना शुल्क आकारणी

### अ) शुल्क वसुली

१) अ) परवानाधारकास महानगरपालिका वेळोवेळी निश्चित करेल तेवढे वार्षिक परवाना शुल्क भरणे आवश्यक आहे.

ब) वार्षिक परवाना शुल्का व्यतिरिक्त प्रत्येक परवाना धारकाने जागेच्या वापराबद्दल महानगरपालिका निश्चित करेल तेवढे दैनिक फेरी शुल्क त्याच दिवशी अदा करणे बंधनकारक राहील.

क) प्रत्येक दिवशी दैनिक शुल्क हे व्यवसायाच्या ठिकाणीच महानगरपालिका कर्मचारी किंवा याकमी नेमलेल्या अभिकर्ता किंवा त्याचा कर्मचारी यांचेकडेस ज्यावेळी तो मागणी करेंल त्यावेळीच भरणा करून, त्याबद्दल देण्यात आलेली पावती ही व्यावसायिकाने त्या दिवशी पुर्ण वेळ स्वत: जवळ बाळगणे आवश्यक आहे.

२) अ) त्यानंतर व्यवसायिकाने आपल्या परवान्याचे दि. १५ डिसेंबर ते दि. ३१ डिसेंबर या कालावधीत नुतनीकरण करून घेणे आवश्यक आहे. त्यानंतर अर्ज केल्यास दि. १५ जानेवारी पर्यत प्रत्येक दिवसास रू. १०/— एवढे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

ब) व्यावसायिकाने कोणत्याही महिन्यात परवाना घेतला तरी त्यास पूर्ण वर्षाचे परवाना शुल्क दयावे लागेल.

३) अ) या अटी व शर्तीनुसार निश्चित करणेत आलेले दैनिक शुल्क व दंडात्मक शुल्क वसुली हि महानगरपालिका स्वत:चे कर्मचारी यांचे मार्फत करेल किंवा तीने तसे ठरविल्यास या शुल्काच्या वसुलीसाठी खाजगी अभिकर्ता नेमुण त्यामार्फत करता येईल.

ब) ज्याप्रमाणे महानगरपालिकेने नेमलेला कर्मचारी दैनिक व दंडानीय शुल्काची वसुली करेल. त्याप्रमाणे या अभिकर्तास किंवा त्याने नेमलेल्या कर्मचा—यास ही वसुली करता येईल. व त्यासाठी आवश्यक ते नियम व अटी व शर्ती ठरविण्याचा महानगरपालिकेस अधिकार असेल.

४) परवाना हरविल्यास/गहाळ झाल्यास/खराब झाल्यास/फाटल्यास किंवा चोरीस गेल्यास दुसरी नक्कल त्वरीत घ्यावी व परवाना हरविल्याची पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवावी. त्याची नक्कल सादर केल्यानंतरच रू. ५०/— भरणा करून दुय्यम प्रत देण्यात येईल.

५) अशी पावती महानगरपालिकेच्या याकामासाठी प्राधिकृत केलेल्या कर्मचारी किंवा अभिकर्ता/त्याचा कर्मचारी यांना मागणी केल्यास दाखविणे आवश्यक आहे. अशाप्रकारे पावती उपलब्ध करून शकल्यास पून्हा दैनिंक फेरी शुल्क अदा करावे लागेल.

## ब) दंडात्मक शुल्क

१) महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास संबंधित व्यवसायिकाकडुन या अटी व शतीनुसार ठरविलेप्रमाणे दंडात्मक शुल्क वसुल करण्यात येईल.

२) वार्षिक परवाना फी किंवा दैनिक फेरी शुल्क अदा न केल्यास अशा व्यावसायिकास महानगरपालिका कर्मचारी किंवा अभिकर्त्यास व्यावसायिकास व्यवसाय करणेस प्रतिबंध करता येईल व अशा वेळी परवानाधारकाने आपल्या मालासह जागा खाली केली जाईल.

३) परवाना धारकाने नेमूण दिलेल्या १ मी. × १ मी. या क्षेत्रात व्यवसाय करता येईल. त्यापेक्षा अधिकचे क्षेत्राचा कोणत्याही प्रकारे रस्त्यावर माल ठेवणे/साठविणे/प्रदर्शन करणे, आढळुन आल्यास तो स्वतंत्र. व्यवसाय समजुन तो विना परवाना असल्याचे गृहीत घरून त्याविरूद्ध नियमाप्रमाणे कार्यवाही करणेत येईल.

४) जे व्यावसायिक वार्षिक परवाना न घेता व्यवसाय करताना आढळुन आल्यास त्यांचेकडुन दंडात्मक भाडे वसुल करण्यात येईल. ही रक्कम भरणा करणेस नकार दिला किंवा ३ पेक्षा अधिक वेळा अशाप्रकारे आढळुन आल्यास संबंधीताचा माल जप्त करून त्याची विल्हेवाट लावणेत येईल.

## क) दंडात्मक कारवाई

१) दंडात्मक शुल्क वसुल केल्यानंतरही खालील अटींचा भंग करणा—या फेरीधारकांस या ठिकाणावरून निष्कासीत करण्यात येईल.

(अ) ना फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणार
(ब) नेमुन दिलेल्या रस्त्याऐवजी दुस—या ठिकाणी व्यवसाय करणार
(क) परवाना न घेता व्यवसाय करणार
(ड) अनुज्ञेय नसलेल्या बाबींचा व्यवसाय करणार
(इ) भाग तीन 'अ' — अट क्र. १ व ३ चा भंग
(ई) भाग चार — अट क्र २,४,८,९ चा भंग

२) पुढील बाबींबाबत दंडात्मक शुल्क वसुल केले तरीही व्यावसायिकाने अटी प्रमाणे त्याचवेळी पुर्तता करावयाची आहे. अन्यथा त्यांना त्या जागेवरून निष्कासीत करण्यात येईल.

१) भाग तीन 'अ मधील अट क्र. २.
२) भाग तीन ब मधील अटी व शर्ती
३) भाग एक (ड)मधील अट क्र. ४, ६
४) भाग चार मधील अट क्र. १ ते ३, ५ ते ७, १०.

## ड) नमुने

### १) पावती पुस्तके

अ) दैनिक वसुलीसाठी या अटी व शर्तीनुसार निश्चित करण्यात आलेल्या दर्शनी मुल्य असलेल्या छापिल स्वरूपाच्या पावतीद्वारे वसुल करावयाचे आहे. तीचा नमुना परिशिष्ठ एक प्रमाणे असेल.

ब) दैनिक वसुलीसाठी वापरावयाचे पावती पुस्तक नंबरींग असलेले व या कामासाठी प्राधिकृत केलेल्या अधिका–याकडुन सांक्षकित करून घेवुन पुस्तकातील प्रत्येक पावतीच्या मागील बाजुस पावतीची स्थळ प्रत व दुसरी प्रत या दोघांवर येईल अशा पदृधतीने महानगरपालिकेची गोल रबरी मुद्रा उमटवुन घेण्यात येईल.

क) दंडात्मक शुल्क वसुलीसाठी या अटी व शर्तीतील परिशिष्ठ दोन नुसार निश्चित करून दिलेले नमुन्याप्रमाणे असतील.

२) अर्ज व परवाना नमुना

अ) फेरी धारकाने परवाना मिळणेसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना परिशिष्ठ 'तीन' प्रमाणे राहील.

ब) फेरी धारकांस फेरी व्यवसाय परवाना व ओळखपत्र परिशिष्ठ ४, ४अ नमुन्याप्रमाणे असेल.

आयुक्त या नमुन्यात आवश्यकतेनुसार योग्य ते बदल करू शकतील.

क) ना फेरीवाला क्षेत्राची यादी.

आजपर्यंत जाहीर करण्यात आलेले ना फेरीवाला क्षेत्रांची यादीपरिशिष्ठ ५ मध्ये नमुद आहे. या यादीत ज्याप्रमाणे महानगरपालिका फेरीवाला क्षेत्रात बदल करेल त्याप्रमाणे बदल होतील.

## महानगरपालिकेच्या वतीने परवाना देण्यास 'शुल्क आकारणी' दर सुची

### वार्षिक परवाना फी व दैनिंक भाडे शुल्क

| अ. क्र. | वस्तूचे नांव | वार्षिक परवाना शुल्क प्रथम ३ वर्षासाठी एकत्रित | नुतनीकरण शुल्क पुढील ३ वर्षासाठी | दैनिक भाडे शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण फेरीधारक | रू. १०००/– | रू. १०००/– | रूपये १०/– |
| २ | डोक्यावर भाजीपाला विक्रि (२मी.x १.५मी.क्षेत्रा पर्यंत) | रू. १०००/– | रू. १०००/– | १) एक टोपली रू. ५/–<br>२) एकापेक्षा अधिक टोपली रू. १०/– |

### इतर शुल्क

| अ.क्र | तपशिल | शुल्क |
|---|---|---|
| १ | परवाना दुय्यम नक्कल प्रत | रू. ५०/– |
| ग२ | ओळखपत्र फी | रू. ५०/– प्रति |

### दंडात्मक शुल्क

| अ.क्र | तपशिल | दंडात्मक शुल्क |
|---|---|---|
| १ | नुतणीकरण न करता व्यवसाय करणे बद्दल | दैनिक बाजार फी सर्वसाधारण दराचे दुप्पट दराने |
| २ | वार्षिक परवाना न घेता व्यवसाय करणे बद्दल दंडात्मक दैनिक शुल्क | रू. १००/– |
| ३ | परवाना पत्र किंवा ओळखपत्र न सादर केल्यास | दैनिक बाजार फी चे तिप्पट दराने |
| ४ | ' ना फेरीवाला क्षेत्र' मध्ये व्यवसाय करताना आढळल्यास. | रू. २००/– प्रत्येक वेळी |
| ५ | रस्त्यातील विहीत ठिकाणऐवजी इतर ठिकाणी किंवा दुस–या रस्त्यावर व्यवसाय करताना आढळल्यास | रू. १००/–. प्रत्येक वेळी |
| ६ | कच–याचे संकलन व विल्हेवाट लावणेबाबत टाळाटाळ केल्यास | रू. ५०/– प्रत्येक वेळी |
| ७ | नियमीत जागेपेक्षा रस्त्याचे इतर भागात कोणतेही सामान ठेवल्यास | रू. ५०/– प्रत्येक वेळी |

| | | |
|---|---|---|
| ८ | परवाना दिला आहे ती व्यक्ती किंवा त्याचा नमुद साथीदार ऐवजी इतर व्यक्ती व्यवसाय करीत असल्याचे आढळले तर | रू. १००/— प्रत्येक वेळी |
| ९ | अनुज्ञेय नसलेल्या बाबींचा व्यवसाय करणार | रू. १००/— प्रत्येक वेळी |
| १० | वरील व्यतिरिक्त इतर शर्तीचे भंग केल्यास | रू. ५०/— प्रत्येक वेळी |

भाग सहा

## संकिर्ण व इतर अटी व शर्ती

१) परवाना धारकास या परवान्या आधारे कोणत्याही बॅक/वित्तीय संस्था/खाजगी व्यक्ती अगर कोणीही कर्ज किंवा इतर अर्थसहाय्य केले तरी त्याबाबतचे कोणतीही व्यवहारास उल्हासनगर महानगरपालिका जबाबदार असणार नाही. व त्या बाबतची सर्व जबाबदारी संबंधितांची असेल.

२) या अटी शर्तीतील खालील अटी वगळता उर्वरीत अटीबाबत फेरीधारकांने अटीचे पालन न केल्यास त्यावर या अटी व शर्तीतील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणेचा अधिकार महानगरपालिका सोबत महानगरपालिकेने याकामी नेमलेला अभिकर्ता व त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती यांनाही असेल.

| भाग क्र. | अट क्र. |
|---|---|
| २ | ६ व ७ |

३) परवान्यातील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ नुसार काढुन टाकण्याची तसेच दिलेला परवाना रद्द करणेचा अधिकार मा. आयुक्त उल्हासनगर महानरपालिका यांना असेल.

४) उल्हासनगर शहरातील प्रत्येक सार्वजनिक रस्त्यावरील विक्री व्यवसायासंबंधी 'उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती यातील तरतुदी या अंतिम असुन त्याचे पालन महानगरपालिका, फेरीधारक, वसुलीसाठी नेमण्यात येणारा अभिकर्ता यांनी करावयाचे आहे.

५) दैनिक शुल्क व दंडनीय शुल्क वसुलीबाबत उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती यातील तरतुदी या अंतिम असुन त्याचे पालन महानगरपालिका, फेरीवाला, वसुलीसाठी नेमण्यात येणारा अभिकर्ता यांनी करावयाचे आहे.

६) वरील अटी व शर्तीतील एखादया बाबीच्या अर्थासंबंधात वाद असल्यास त्याबाबत आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका जो निर्णय देतील तो सर्व पक्षांवर बंधनकारक असेल.

स्वाक्षरी
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ३८४ व ३८६ तसेच उल्हासनगर

| | |
|---|---|
| उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर<br>(अभिकर्ता असल्यास त्याचे नाव)<br>दैनिक फेरी शुल्क वसुली पावती<br>पावती क्रमांक<br>दिनांक: / /२००<br>रस्त्याचे नाव:– –––––––<br>दैंनिक फेरी शुल्कापोटी रू. १०/– (रू. दहा) रोख मिळाले.<br><br>वसुली लिपीकाची सही<br>उल्हासनगर महानगरपालिका | उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर<br>(अभिकर्ता असल्यास त्याचे नाव)<br>दैनिक फेरी शुल्क वसुली पावती पावती क्रमांक<br>दिनांक: / /२००<br>श्री./श्रीम. :– ––––––––––––––––––––यांचेकडुन<br>रस्त्याचे नाव:– ––––––––––––––– या ठिकाणी 'फेरी व्यवसाया बद्दल दैनिक फेरी शुल्क रू. १०/– (अक्षरी रूपये दहा) रोख मिळाले.<br><br>वसुली लिपीकाची सही<br>उल्हासनगर महानगरपालिका |

महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती नुसार'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन व्यवसायासाठी फेरीधारक परवाना दिलेल्या फेरी धारकांकडुन वसुल करावयाचे दैनिक शुल्क व दंडात्मक शुल्काची पावती नमुना.

परिशिष्ठ १

## दैनिंक फेरी शुल्क रक्कम वसुलीची पावतीचा नमुना

परिशिष्ठ २

## दंडनीय शुल्क वसुली पावती नमुना

| |
|---|
| उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर<br>(अभिकर्ता असल्यास त्याचे नाव)<br>दंडनीय फेरी शुल्क वसुली पावती<br>पावती क्रमांक<br>दिनांक: / /२००<br>श्री./श्रीम. :– ––––––––––––––––––––यांचेकडुन<br>रस्त्याचे नाव:– –––––––––––––––<br>––––––––––––––––––––––––––––––––––– या अटीचा भंग केल्याबद्दल 'दंडनीय फेरी शुल्क रू. ––––– (अक्षरी –––––––––––––––––)<br>रोख मिळाले.<br><br>वसुली लिपीकाची सही<br>फेरी धारकाची सही उल्हासनगर महानगरपालिका |

स्वाक्षरी
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

परिशिष्ट ४ नंबर

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## ‘ना फेरीवाला क्षेत्र’ वगळुन व्यवसायासाठी फेरीधारक परवाना

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ३८४ व ३८६ तसेच उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती नुसार)

रस्त्याचे नावः— ——————————————————

परवाना क्रमांकः— —————————————

——————————————————————————————————————————

परवाना धारकाचे नावः— ———————————————————

राहण्याचा पत्ता :— ———————————————————

———————————————————

व्यवसायाचे स्वरूप :— ———————————————————

परवानाधारकाचे साथीदारः— ——————————————————

असल्यास त्याचे नाव व ——————————————————

पत्ता ———————————————————

परवाना कालावधी दि. / /२०० ते दि. / /२००

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ३८४ व ३८६ तसेच ‘उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती’ नुसार ‘ना फेरीवाला क्षेत्र’ वगळुन वर नमुद केलेल्या रस्त्यावर फेरी व्यवसायाचा परवाना देण्यात येत आहे.

**आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**

फेरी परवान्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने निश्चिम केलेल्या ‘‘उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती’’ मी वाचल्या असुन त्या मला बंधनकारक आहेत.

परवाना धारकाची सही

वार्षिक परवाना शुल्कापोटी जमा केलेली रक्कम रू.
पावती क्रमांक
दिनांक

### परवाना नुतनीकरणाचा तपशिल

| अनुक्रमांक | नुतनीकरण दिनांक | नुतनीकरण कालावधी | भरणा केलेले शुल्क | नुतनीकरण अधिका—याची सही |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

परिशिष्ठ ४अ

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ३८४ व ३८६ तसेच उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती नुसार'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन व्यवसायासाठी फेरीधारक परवाना दिलेल्या फेरी धारकांसाठी ओळखपत्राचा नमुना

१) फेरी धारकांसाठी ओळखपत्र

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
फेरी धारकांसाठी ओळखपत्र
ओळखपत्र क्रमांक

परवाना क्रमांक
रस्त्याचे नाव :— ——————————
व्यवसाय :— ——————————
परवाना धारकाचे नाव :— ——————————
पत्ता:—

परवाना कालावधी दि. / /२०० ते दि. / /२००

उपायुक्त(मालमत्ता)
दिनांक:— / /२०० उल्हासनगर महानगरपालिका

**ओळखपत्राचा रंग**

कॅम्प नं. १:—पिवळा
कॅम्प नं. २:— गुलाबी
कॅम्प नं. ३:—निळा
कॅम्प नं. ४:—हिरवा
कॅम्प नं. ५:—पांढरा

२) फेरी धारकाच्या साथीदारासाठी ओळखपत्र

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
फेरी धारकाच्या साथीदारासाठी ओळखपत्र
ओळखपत्र क्रमांक

परवाना क्रमांक
रस्त्याचे नाव:— ——————————
व्यवसाय :— ——————————
परवाना धारकाचे नाव:— ——————————
साथीदाराचे नाव:— ——————————
पत्ता:—
परवाना कालावधी दि. / /२०० ते दि. / /२००

उपायुक्त(मालमत्ता)
दिनांक:— / /२०० उल्हासनगर महानगरपालिका

## परिशिष्ठ ५

## 'ना फेरीवाला क्षेत्र' घोषित केलेल्या रस्त्यांची यादी

| अ. क्र | 'ना फेरीवाला क्षेत्राचे नाव | कॅम्प नं. | रस्ता विभाग | | ना फेरीवाला क्षेत्राची एकुण लांबी, रूंदी (चौ.मी.) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | लांबी | रूंदी | क्षेत्रफळ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | उल्हासनगर | ३ | शांतीनगर जकात नाका | साईबाबा मंदिर कल्याण अंबरनाथ रोड | ३००० | २५.०० | ७५००० |
| २ | उल्हासनगर | ३ | शिवाजी चौक | नेहरू चौक | ६५० | १८ | ११७०० |
| ३ | उल्हासनगर | २ | नेहरू चौक | गोल मैदान | २७० | १८.३० | ४९४१ |
| ४ | उल्हासनगर | १ | गोल मैदान बीपील गॅलरी | २४ स्कुल | २७० | १३.७२ | ३७०४ |
| ५ | उल्हासनगर | १ | कॅम्प नं. १ | बिर्ला गेट | १८० | १०.६० | १९०८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | बस स्टॉप | | | | |
| ६ | उल्हासनगर | १ | नेहरू चौक | कॅम्प नं. १ बस स्टॉप | ९४५ | १०.६० | १००१७ |
| ७ | उल्हासनगर | २ | नेहरू चौक | अमन टॉकिज | ३३० | १३.७५ | ४५३८ |
| ८ | उल्हासनगर | ३ | शास्त्री चौक | हिराघाट व पुढे पवई चौकापर्यंत | ७०० | १८.२९ | १२८०३ |
| ९ | उल्हासनगर | ३ | शास्त्री चौक | महापालिका ते पवई चौकापर्यंत | ५१६ | १५.६७ | ७५७० |
| १० | उल्हासनगर | ४ | ओ. टी कॅम्प नं. ४ | मुख्य बाजार पेठ पासुन व्हिनस चौक | ९७५ | १३.७५ | १३४०६ |
| ११ | उल्हासनगर | ४ | व्हिनस सिनेमा चौक | नेताजी चौक | ३५० | २५ | ८७५० |
| १२ | उल्हासनगर | ५ | लाल चक्की ते मठ मंदिर जुना बस स्टॉप | दुध नाका कैलास कॉलनी | ९२५ | १४.५० | १३४१३ |
| १३ | उल्हासनगर | २ | नेहरू चौक | फॉलवर लाईन चौक (सेंट्रल हॉस्पिटल चौक रोड) | ११०० | १८.२९ | २१११९ |
| १४ | उल्हासनगर | २ | बॅक ऑफ बरोडा | मोनिका मॅरेज हॉल | १८५ | १९.१९ | ९९५५ |
| १५ | उल्हासनगर | २ | प्रजापती ब्रम्हकुमारी आश्रम | गार्डन नं. ४४४ ते पुढे कैलास बिल्डिंग पर्यंत | १८० | १२.१९ | २१९४ |
| १६ | उल्हासनगर | ३ | उल्हासनगर रेल्वे स्टेशन | संतु बिल्डिंग | ५५० | १८.२९ | १००६० |
| १७ | उल्हासनगर | ३ | संतु बिल्डिंग | शिवाजी चौक | ६२५ | १०.६० | ६६२५ |
| १८ | उल्हासनगर | २ | भारत चौक | साधुबेला स्कुल, झुलेलाल स्कुल, आवतमल चौक, शिरू चौक | १२५० | १०.६० | १३२५० |
| १९ | उल्हासनगर | १ | गोल मैदान संत निरंकारी हॉल | भारत चौक | ४७५ | १०.६० | ५०३५ |
| एकुण | | | | | १५८७३ | ५०११३ | ९५२१६३ |

## उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर

**‘महानगरपालिकेने परवाना दिलेल्या फेरीधारकाकडुन दैनिक शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुकीसाठीच्या अटी व शर्ती’**

भाग एक

### कामाचे स्वरूप

उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रातील ‘ना फेरीवाला क्षेत्र’ जाहीर केलेले रस्ते वगळता उर्वरीत सार्वजनिक रस्त्यावर व्यवसाय करणेसाठी फेरीधारकांना मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८४ व ३८६ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती निश्चित करून त्याचे तरतुदीनुसार परवाना दिलेला आहे. त्यानुसार या परवाना धारकांनी वार्षिक परवाना शुल्का व्यतिरिक्त महापालिकेने निश्चित केलेल्या दराने दैनिक शुल्क व्यवसाय करीत असलेल्या प्रत्येक दिवसासाठी वसुल करावयाचे आहे. त्याचप्रमाणे या व्यावसायिकांनी वर नमुद अटी व शर्तींचा भंग केल्यास त्यांचेकडुन महानगरपालिकेस किंवा तीच्या अभिकर्त्यांस दंडात्मक शुल्क वसुलीचा अधिकार आहे.

वरीलप्रमाणेचे दैनिक शुल्क व दंडात्मक शुल्क हे महानगरपालिका स्वत: किंवा अभिकर्ता नेमुण त्यामार्फत वसुल करू शकते. या दैनिक शुल्क व दंडात्मक शुल्काची तीन वर्षाचे कालावधीसाठी महानगरपालिकेच्या वतीने दररोज वसुली साठी इच्छुक व्यक्ती/संस्था यांचेकडुन प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

इच्छुक अभिकर्ता नेमणुकीसाठीच्या अटी व शर्ती या पुढे नमुद केल्याप्रमाणे असतील.

अ) सर्वसाधारण अटी व शर्ती

१) उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रातील 'ना फेरीवाला क्षेत्र' जाहीर केलेले रस्ते वगळता उर्वरीत सार्वजनिक रस्त्यावर व्यवसाय करणेसाठी फेरीधारकांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८४ व ३८६ चे तरतुदीनुसार परवाना दिलेला आहे. अशा परवाना धारकांकडुन उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या दराने दैनिक शुल्काची व दंडात्मक शुल्काची वसुली करण्याचा अभिकर्तास अधिकार असेल.

२) दैनिक शुल्क व दंडनीय शुल्क वसुलीबाबत उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती यातील तरतुदी या अंतिम असुन त्याचे पालन महानगरपालिका, फेरीवाला, वसुलीसाठी नेमण्यात येणारा अभिकर्ता यांनी करावयाचे आहे.

३) वरील अटी व शर्तीतील एखादया बाबीच्या अर्थासंबंधात वाद असल्यास त्याबाबत आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका जो निर्णय देतील तो सर्व पक्षांवर बंधनकारक असेल.

ब) कालावधी

१) कराराचा कालावधी हा तीन वर्षासाठी असेल.

२) वसुलीचा कालावधी हा निविदा धारकाचे निविदा मंजूर केले नंतर आयुक्त महानगरपालिका निश्चित करतील असा परंतु निविदा मंजुरी पासुन एक महिन्यापेक्षा अधिक नाही अशा दिवशी सुरू होईल.

३) तथापि, ज्यावेळी वसुलीसाठी पुर्वी अभिकर्ता नेमलेला असेल अशा वेळी त्या अभिकर्तांची मुदत संपल्या नंतरच्या दिवसापासुन किंवा वरील २ प्रमाणेची यापैंकी आयुक्त ठरवतील त्या दिनांकास हा कालावधी सुरू होईल.

क) क्षेत्र

१) अभिकर्त्यास उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील ' ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन ज्या ठिकाणी महानगरपालिकेने फेरीवाल्यास व्यवसायासाठी परवाना दिलेला आहे. अशा सर्व सार्वजनिक रस्त्यावरील फेरीधारकांकडुन दैनिक शुल्काची व दंडनीय शुल्काची विहीत दराने वसुली करणेचा अधिकार असेल.

२) परंतु महानगरपालिका सार्वजनिक ठिकाणी बनविलेल्या बाजार किंवा खाजगी बाजार एखादया किंवा धार्मिक उत्सवासाठी तीन दिवसापेक्षा कमी कालावधीची जत्रा, उत्सव अशा ठिकाणी शुल्क वसुलीचा अधिकार नसेल.

३) फेरी व्यवसायासाठी परवाना देणे व नुतनीकरण करणे

४) शहरातील 'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन शहरात कोणत्या भागात व किती संख्येने फेरीधारकांना फेरीसाठी परवाना देणेचा अधिकार महानगरपालिकेचा असुन याबाबत अभिकर्त्यांस हरकत घेता येणार नाही. किंवा वाद निर्माण करता येणार नाही.

भाग दोन

शुल्क वसुली

अ) दैनिक शुल्क

१) ज्या फेरीधारकांस महानगरपालिकेने फेरी व्यवसायास परवाना दिलेला आहे अशा प्रत्येक फेरीधारकाकडुन कराराच्या कालावधीत दररोज महानगरपालिकेने विहीत केलेल्या दरानुसार व 'उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्ती' मध्ये नमुद केल्या प्रमाणे दंडनीय शुल्क वसुली प्रत्येक दिवशी करता येईल.

२) महानगरपालिकेने ज्यास परवाना दिलेला नाही अशा फेरीधारकाकडुन दैनिक बाजार शुल्क वसुल करता येणार नाही. परंतु सार्वजनिक रस्त्यावर विना परवाना व्यवसाय करणा—यांकडुन दंडनीय शुल्क वसुल करणेचा अधिकार असेल.

ब) दंडनीय शुल्क

१) ना फेरीवाला क्षेत्र' जाहीर केलेल्या रस्त्यात व्यवसाय करणा—या फेरीवाल्या कडुन दंडात्मक शुल्क वसुली करणेचा अधिकार असेल. परंतु त्याचवेळी अशा फेरीधारकांस 'ना फेरीवाला क्षेत्रातुन निष्कासित करण्याची जबाबदारी अभिकर्तांची असेल.

२) 'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन ज्या ठिकाणी महानगरपालिकेने फेरीवाल्यास व्यवसायासाठी परवाना दिलेला आहे अशा ठिकाणी परवाना नसताना व्यवसाय करणा—या फेरीधारकाकडुन अभिकर्तांस दंडात्मक शुल्क वसुली करणेचा अधिकार असेल. परंतु अशा फेरीधारकांस त्याचवेळी फेरी धारकास निष्कासित करण्याची जबाबदारी अभिकर्तांची असेल

३) अ) फेरीवाला क्षेत्रातील फेरीधारकांचे नियमभंगाबाबत विहीत केलेल्या दराने दंडात्मक शुल्क खाली नमुद अटीस अधिन राहुन वसुल करणेचा अभिकर्तांस अधिकार असेल.

ब) फेरीधारकांना 'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन परवाना देणेसाठीचे उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्तीतील खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती चा फेरीवाला भंग करीत असेल अशा भंग केलेल्या अटीची पुर्तता करून घेतल्या नंतरच संबंधित फेरीधारकास व्यवसाय करण्यास संमती दिली पाहिजे. अन्यथा त्यास निष्कासित केले पाहिजे.

भाग एक अः— अट क्र. ३
ब:— अट क. २
ड:— अट क. ५, १२
इ:— अट क. १

भाग तीन अः— अट क्र. २
ब:— अट क. १ ते ६
भाग चार — अट क. १ ते ३, ४(ब), ५ ते ७, १०

क) फेरीधारकांना 'ना फेरीवाला क्षेत्र' वगळुन परवाना देणेसाठीचे उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्तीतील खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती चा फेरीवाला भंग करीत असेल त्यावेळी फेरीधारकास सदर क्षेत्रातुन निष्कासित करणेची जबाबदारी अभिकर्त्याची असेल.

भाग एक:— (अ) अट क्र. २, ५, ७
(ब) अट क. ५
(ड) अट क. १, ३, ४, ६, ९
(इ) अट क. १, २, ३
भाग दोन मधील (अ) अट क्र. ४, ५,

भाग चार मधील अट क. ४(अ,क), ८, ९
भाग पाच:— (अ) अट क्र. १

ड) जरी अभिकर्तांने दंडात्मक शुल्क वसुल केले नाही. तरीही अभिकर्तांने वरील अ व ब मध्ये नमुद केलेप्रमाणेची कार्यवाही करावी. तसेच या साठीच्या अटी व शर्तीचे पालन संबंधिताकडुन करून घेण्याची जबाबदारी अभिकर्तांची असेल. व त्यासाठी आवश्यक ती व्यवस्था व कारवाई अभिकर्त्याने करावयाची आहे.

इ) वरील क प्रमाणे जबाबादारी अभिकर्तांने आपले कर्तव्य पार न पाडल्यास व ते महानगरपालिका पार पाडु शकेल व त्यासाठी येणारा खर्च व याकरारात नमुद केलेला दंडात्मक भार अभिकर्ताकडुन त्याच महिन्यात वसुलीस पात्र असेल.

क) इतर बाबी

१) दैनिक बाजार शुल्क हे व्यवसायिक ज्या दिवशी परवाना दिलेल्या ठिकाणी व्यवसाय करीत असेल त्याच दिवशी वसुल करावयाचे आहे.

२) दंडात्मक शुल्क सुध्दा ज्या दिवशी अटीचा भंग झालेला आहे त्याच दिवशी वसुल करावयाचे आहे.

३) कराराप्रमाणे वसुलीसाठी नमुद केलेल्या कालावधीनंतर कोणत्याही सबबी खाली शुल्क वसुली करता येणार नाही.

४) अभिकर्त्यांने शुल्क वसुलीचे काम करताना रस्त्यावरील वाहतुकीस, पादचा–यांस, गि–हाईकास किंवा परिसरातील रहिवासी दुकानदार यांना त्यांच्या दैनदिन कामकाजात अडथळा होणार नाही याची खबरदारी घ्यावयाची आहे.

५) निविदा धारकाचे उल्हासनगर शहरात दुरध्वनी व्यवस्थेसह कार्यालय असणे आवश्यक असुन तेथे अभिकर्ता किंवा त्यांने प्राधिकृत केलेला जबाबदार कर्मचारी सतत हजर असला पाहिजे.
६) या करारासंबंधी कोणताही दावा कोणत्याही न्यायालयात झाल्यास दाव्याचा दोन्ही बाजूचा खर्च (म्हणजेच महानगरपालिकेचा खर्च धरून) अभिकर्त्यास करावा लागेल.

ड) दैनिक शुल्क व दंडनीय शुल्काचे दर

१) महानगरपालिकेने निविदा देते वेळी ‘उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्तीत’ निश्चित केलेले व त्या दिनांकास लागु असलेले दरानेच दैनिक शुल्क व दंडनीय शुल्काची वसुली करावयाची आहे. या अटी व शर्ती परिशिष्ठ ‘क’ मध्ये जोडल्या आहेत.

२) महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी किंवा अधिक दराने दैनिक शुल्क वा दंडनीय शुल्क वसुल करता येणार नाही.

३) दैनिक शुल्क व दंडनिय शुल्काच्या दरात महानगरपालिकेने कराराच्या कालावधीत वाढ केल्यास त्या दराने दैनिक शुल्क व दंडनिय शुल्क वसुल करणेचा अभिकर्तास अधिकार असेल. तथापि, त्याबद्दल या अटी व शर्तीत नमुद केलेल्या प्रमाणे त्या कालावधी पासुन अपेक्षित मासिक शुल्क व प्रत्यक्ष जमा दंडनीय शुल्काची रक्कम या दरांने ठरविण्यात येईल.

इ) शुल्क वसुलीची कार्यपद्धती

१) शुल्क वसुली कर्मचारी नेमुणक

अ) शुल्क वसुली अभिकर्ता स्वत: किंवा त्याने नेमलेल्या कर्मचा–यामार्फत करू शकेल.

ब) अभिकर्तांने शुल्क वसुलीसाठी कोणतेही कर्मचारी नेमल्यास अशा कर्मचा–याची संपुर्ण माहिती सोबतचे परिशिष्ठ ‘अ’ मधील नमुन्यामध्ये संबंधित कर्मचा–याचे पोलिस स्टेशनकडील चारित्र पडताळणीचे दाखल्यासह

त्यास कामावर ठेवावयाच्या किंवा कराराच्या सुरूवातीच्या वेळी कराराचा कालावधी सुरू होण्याच्या किमान सात दिवस पुर्वी महानगरपालिकेकडेस सादर केले पाहीजे.

क) शुल्क वसुलीसाठी नेमलेल्या प्रत्येक कर्मचा–यास अभिकर्त्यांने स्वतःचे व या कामासाठी महानगरपालिकेने प्राधिकृत केलेला अधिकारी यांनी सयुक्त स्वाक्षरी केलेले, छायाचित्रासह त्याची वसुलीचे क्षेत्र नमुद केलेले ओळखपत्र पुरविले पाहीजे. व त्याने वसुलीचे वेळी सहजपणे दिसुन येईल अशा त–हेने पोशाखावर लावले पाहीजे.

ड) शुल्क वसुलीसाठी नेमलेल्या प्रत्येक कर्मचा–यास अभिकत्यांने किमान वेतन कायदा तसेच कामगारांसबंधी अस्तिवात असलेले कायदयाच्या तरतुदीप्रमाणे आवश्यक तो लाभ दिला पाहिजे. व त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी ही अभिकर्ताची असेल. व त्या बाबतच्या कोणत्याही वादात महानगरपालिका सामील नसेल.

इ) सदरील कर्मचा–यांची महानगरपालिकेवर कोणतीही प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष जबाबदारी नसेल.

ई) अभिकर्त्यांने नेमलेल्या कर्मचा–यांनी केलेल्या चुका, नुकसान बेकायदेशिर वर्तन या सर्वांची जबाबदारी अभिकर्ता व संबंधिति कर्मचारी यांची असेल.

२) पावती पुस्तके

१) दैनिक वसुलीसाठी अभिकर्तांने उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्तीनुसार निश्चित करण्यात आलेल्या दर्शनी मुल्य असलेल्या छापिल स्वरूपाच्या पावतीद्वारे वसुल करावयाचे आहे.

२) दैनिक वसुलीसाठी वापरावयाचे पावती पुस्तक हे अभिकर्ता यांनी महानगरपालिकेने निश्चित करून दिलेलया नंबरींग प्रमाणे स्वतः छापुन घेवुन ती महानगरपालिकेने या कामासाठी प्राधिकृत केलेल्या अधिका–याकडुन सांक्षकित करून घेवुन पुस्तकातील प्रत्येक पावतीच्या मागील बाजुस पावतीची स्थळ प्रत व दुसरी प्रत या दोघांवर येईल अशा पद्धतीने महानगरपालिकेची गोल रबरी मुद्रा उमटवुन घेतली पाहीजे.

३) वरील अटी मधील नमुद असलेल्या नमुना व्यतिरिक्तच्या नमुन्यातील किंवा नंबर नसलेल्या किंवा सांक्षाकित न करून घेतलेल्या पावती पुस्तकाचा वापर करताना आढळल्यास या करारातील दंडात्मक तरतुदीप्रमाणे अभिकर्ताकडुन दंडात्मक भरपाई नमुद केलेल्या पद्धतीप्रमाणे वसुल करण्यात येईल.

४ अ) दंडात्मक शुल्क वसुलीसाठी महानगरपालिकेने उल्हासनगर महानगरपालिका फेरी व्यवसाय परवाना अटी व शर्तीनुसार निश्चित करून दिलेले नमुन्याप्रमाणे व महापालिकेने पुरविलेल्या पावती पुस्तकाद्वारे वसुल करावयाचा आहे. यासाठी अभिकर्तांस स्वतःची पावती पुस्तके छापता येणार नाहीत.

ब) पुरविण्यात आलेल्या पावती पुस्तका बद्दल महानगरपालिकेस जो खर्च आलेला आहे त्या प्रमाणेची किंमत सदर पावती पुस्तके प्राप्त करून घेताना अभिकर्तांने महानगरपालिकेच्या भांडार विभागाकडे रोख स्वरूपात भरणा करावयाचा आहे.

क) अभिकर्त्यास एका वेळी पुरविण्याच्या दंडानीय शुल्काच्या पावती पुस्तकांची संख्या एवढी असेल. एकदा यासंख्येने पुस्तक पुरविले नंतर पुढील वेळेच्या दुस–या वेळी पुस्तके पुरविताना पहिल्या वेळीची पुर्ण झालेली पुस्तके महानगरपालिकेकडेस जमा केल्याशिवाय नवीन पुस्तके अभिकर्तांस देण्यात येणार नाही. तथापि, काही पुस्तके वापरात असल्याचे अभिकर्त्यांने नमुद केल्यास तेवढी संख्या वजा करता उर्वरीत संख्ये इतकी पुस्तके अभिकर्त्यांस देण्यात येतील. या बाबतीत महानगरपालिका अधिका–याची खात्री पटविणेसाठी निर्देश दिल्यास ही पुस्तके तपासणीसाठी अभिकर्त्यांने सादर केली पाहीजे.

ई) शुल्क वसुली बाबत पावती देणे

१) दैनिक शुल्काची वसुली ही फेरीधारक ज्या ठिकाणी व्यवसाय करीत आहे अशा ठिकाणी अभिकर्ता किंवा त्याच्या कर्मचा—याने जावुन करावयाची आहे. व वरील नमुद केलेप्रमाणेची वसुल करीत असलेल्या रकमेच्या मुल्याएवढी दर्शनी मुल्य असलेली, दिनांकित केलेली व रक्कम वसुल करणा—याची स्वाक्षरी असलेली पावती रकमेच्या प्राप्ती नंतर फेरीधारकांस देईल. आवश्यकता वाटल्यास अभिकर्ता या पावतीवर फेरीधारकाचे नाव नमुद करू शकेल. व हा तपशिल दिलेलया पावतीच्या स्थळ प्रतिवर नमुद करेल.

२) दंडात्मक शुल्क वसुलीसाठी अभिकर्तांस पुरविण्यात आलेल्या पावती पुस्तकातील पावती मध्ये ज्या व्यवसायिकाकडुन दंडात्मक शुल्क वसुल करणेत येत आहे त्याचे नाव, व्यवसायाचे ठिकाण, ज्या अटी व शर्तीच्या भंगाबद्दल दंडात्मक शुल्क वसुल करण्यात येत आहे. तीचा तपशिल यासह वसुल होत असलेल्या दंडाची रक्कम अंकी व अंक्षरी मराठी भाषेत नमुद करील.

३) दररोज वसुल केलेले दंडात्मक शुल्काचा तपशिल दुस—या दिवशी परिशिष्ठ २ अ नमुन्यात भरून त्याच दिवशी महानगरपालिकेकडेस सादर करील.

४) अभिकर्ता दंडात्मक शुल्क वसुलीचा दर आठवडयाचा पावती पुस्तक निहाय तपशिल सोबतच्या परिशिष्ठ २ ब मध्ये नमुद केलेल्या नमुन्यात भरून किंवा संगणकीय टाईप करून व त्यावर आपली स्वाक्षरी करून महानगरपालिका या कामी प्राधिकृत केलेल्या अधिका—याकडेस सादर करेल. व त्या सोबत जी पावती पुस्तके पुर्ण झाली आहेत अशी पुस्तके तपासणीसाठी सादर करील.

५) असा तपशिल व पावती पुस्तके मिळाले बाबत संबंधित महानगरपालिका अंधिकारी अभिकर्तांस त्याची पोाहोच देईल.

भाग तीन
अभिकर्ता परवाना शुल्क निश्चिती व वसुली

१) मासिक अपेक्षित रक्कम निश्चित करणे

अ) दैनिक फेरी शुल्क

मासिक अपेक्षित रक्कम ही करार कालावधीतील प्रत्येक तिमाहीसाठी निश्चित करण्यात येईल. त्याची पद्धती खालीलप्रमाणे.

ब) फेरी धारकांची संख्या

ज्या महिन्यासाठी रक्कम निश्चित करावयाची आहे. त्या तिमाहीचे पहिल्या तारखेपर्यंत महानगरपालिकेने ज्या संख्येने फेरी धारकांना परवाना दिलेला आहे.

क) शुल्क वसुली दिवस

प्रत्येक महिन्यातील अटी व शर्ती प्रमाणे येणारे सप्ताहातील फेरी व्यवसाय बंद असण्याचा एक दिवस प्रमाणे येणारे दिवस हे महिन्याच्या एकुण दिवसातुन वजा केले नंतर येणारी संख्या.

अपेक्षित मासिक दैनिक फेरी शुल्क त्र फेरी धारकांची संख्या ☐ शुल्क वसुली दिवस.

हे मासिक अपेक्षित शुल्क हे पुढील तीन महिन्यांसाठी लागु राहील.

तिमाही शुल्क त्र ३ ☐ अपेक्षित मासिक दैनिक फी शुल्क.

२) मासिक दंडनीय शुल्क

मासिक दंडनीय शुल्क हे प्रत्येक महिन्यासाठी प्रत्यक्ष वसुल केलेले दंडनीय शुल्काप्रमाणे निश्चित करणेत येईल. त्यासाठी अभिकर्त्याने यापुर्वी नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे दंडनीय शुल्क वसुलीचा तपशिल सादर केला पाहिजे.

३) अभिकर्त्यांने सादर करावयाचा देकार

अभिकर्त्यांने महानगरपालिकेस खालील प्रमाणे देकार रक्कम अभिकर्त्यांस दिलेल्या परवाना पोटी दयावयाची आहे.

अ) अपेक्षित मासिक दैनिक शुल्काच्या रकमेची टक्केवारी
ब) प्रत्यक्ष जमा केलेल्या दंडनीय शुल्काच्या रकमेची टक्केवारी

वरील प्रमाणे प्रत्येक महिन्यासाठी परवाना फी पोटी अभिकर्त्यांने दयावयाची रक्कम त्याने सादर केलेल्या निविदेच्या आधारे निश्चित करण्यात येईल.
४) अपेक्षित मासिक दैनिक शुल्क व प्रत्यक्ष जमा केलेल्या दंडनीय शुल्क निश्चित करावयाचा संपुर्ण अधिकार महानगरपालिकेस राहील. व त्याबाबत वाद उद्‌भवल्यास महानगरपालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

५) महानगरपालिकेने मागील महिन्यात ज्या वाढीव फेरी धारकांना परवाना दिला त्याची संपुर्ण माहिती महिन्याच्या सुरूवातीच्या दिवशी अभिकर्त्यांस दिली पाहिजे.
६) अभिकर्त्यांने परवाना शुल्क महानगरपालिकेस अदा करणे.

१) अभिकर्त्यांने प्रत्येक तिमाहीचे सुरवातीस पुढील तीन महिन्यांसाठीचे जे अपेक्षित मासिक दैनिक शुल्क निश्चित करण्यात येईल. त्याच्या निविदेत नमुद दराच्या टक्केवारी नुसार येणा—या रकमे एवढी रक्कम त्या तिमाही पासुन दिनांक १ ते ५ या कालावधीत महानगरपालिका कोषागारात भरणा करावी लागेल.

२) वरील कारणासाठी पहिल्या तिमाहीची सुरूवात ही करार सुरू होणेच्या दिनांकापासुन असेल.

३) दंडनीय शुल्कापोटी तिमाहीत वसूल होणा—या रकमे एवढी रक्कम पुढील महिन्याच्या १ तारखेस निश्चित करून त्यानुसार निविदेतील टक्केवारी नुसारची रक्कम अभिकर्त्यांने सात दिवसाचे आत भरणा करावयाची आहे.

३) वर नमुद केलेले कालावधीत अभिकत्याने भरणा न केल्यास अभिकर्त्यांस त्या रकमेवर २४ टक्के व्याज देय राहील.

४) ज्या महिन्यात अभिकर्त्यांने शुल्क भरणा करणे आवश्यक आहे. त्या महिन्याचे २५ तारखेपर्यंत रक्कम न भरल्यास अभिकर्त्यांची निविदा रद्द करून अभिकर्त्यांकडुन घ्यावयाची रक्कम ही अभिकर्त्यांने दिलेल्या बॅंक गॅरंटी मधुन वसुल करण्यात येईल. व पुढील महिन्याच्या १ तारेखपासुन वसुलीचे काम महानगरपालिका स्वत: करेल किंवा नवीन अभिकर्ता नेमुन त्याकडुन करून घेईल.

या परिस्थितीत काही तोटा झाल्यास त्याची भरपाई अभिकर्त्यांने दिलेली सूरक्षा अनामत व बॅंक गॅरंटीतुन वसुल करण्याचा महानगरपालिकेस अधिकार असेल.

भाग चार,
संकिर्ण व इतर अटी.

१) अभिकर्त्याने निविदा सादर करताना आयुक्त ठरवतील एवढी सुरक्षा अनामत रक्कम भरणा केली पाहिजे.

२) ज्या निविदा धारकाची निविदा मंजुर करण्यात येईल त्याने पहिल्या महिन्याच्या अपेक्षित मासिक दैनिक शुल्क रकमेएवढी नॅशनल बॅकेची बॅक गॅरंटी दिली पाहिजे.

३) निविदा कालावधीत अभिकर्त्याने कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास अभिकर्त्यास दिलेला वसुली परवाना रद्द करण्यात येईल. बॅक गॅरंटी व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करेल. पुढील कालावधीत वसुलीसाठी महानगरपालिका योग्य ती पर्यायी व्यवस्था करेल. त्यामुळे होणा—या नुकसानीची जबाबदारी ही अभिकर्त्याची असेल.

मा. सचिव:—विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

विषय क्र. १०:— उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोरील वालधुनी नाल्यावरील अर्धवट अवस्थेत असलेले काम पुर्ण करणेकामी मान्यता देणे.

मा. सचिव:—पास? खर्च आहे ६० लाख. निधी बाबत जेव्हा नविन अर्थसंकल्प येईल तेव्हा माहित पडेल. पास सर्वसंमतीने?

काही सदस्य :—पास. पास.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १०:— उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोरील वालधुनी नाल्यावरील अर्धवट अवस्थेत असलेले काम पुर्ण करणेकामी मान्यता देणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास आराखडयामध्ये उल्हासनगर—४ व उल्हासनगर—३ यांचे दरम्यान उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे वालधुनी नाला पार करून ४०''. ००'' रूंदीचा रस्ता दर्शविलेला आहे. या रस्त्याच्या मार्गामध्ये वालधुनी नाल्यावर उल्हासनगर रेल्वे स्टेशनकडे येण्या—जाण्याकरिता वाहतुकीचा मार्ग होण्याच्या दृष्टीने पूल बांधण्याकरिता वर्ष १९८९ मध्ये तत्कालीन उल्हासनगर नगरपरिषदेने पूलाचे बांधकाम हाती घेतले होते. परंतु तेव्हा नगरपरिषदेमध्ये काही घडामोडी घडल्यानंतर आर्थिक कारणास्तव तसेच या पूलाच्या जोड रस्त्यामध्ये एका गुरूव्दाराचे 'निशाण साहेब' ( ध्वज स्तंभ) येत असल्याने व तो हटविण्याकरिता कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे यापूलाचे काम बंद झाले आहे. त्यानंतर सदर पुलाचे काम पुन्हा सुरू करण्याकरिता धोरणात्मक निर्णय न झाल्यामुळे आजतागायत त्याच स्थितीमध्ये आहे.

सद्यस्थितीत उल्हासनगर रेल्वे स्टेशनपासुन चांदीबाई कॉलेज समोरील रस्त्यापर्यंत येण्याकरिता पुजा हॉटेल बाजूस लागून असलेला पादचारी पूल वापरात आहे. या पुलाची स्थितीही खराब झालेली आहे. त्याशिवाय पूर्वीच्या फाटकाच्या रस्त्याच्या मार्गामध्ये सबमर्सिबल ब्रीज आहे. त्यांची उंची कमी आहे. पावसाळयामध्ये या दोन्ही पूलावरून पाणी वाहिल्यामुळे उल्हासनगर रेल्वे स्टेशन ते उल्हासनगर—३ यांचे दरम्यान वाहतुकीचा व पादचारी मार्ग बंद होता. त्यामुळे उपरोक्त अर्धवट अवस्थेत असलेल्या पुलाचे बांधकाम पुर्ण करून रेल्वे स्टेशन व नागरी वस्ती या दरम्यान असलेल्या वालधुनी नाल्यावरून पादचा—यांकरिता तसेच वाहतूकीस कायम स्वरूपी मार्ग उपलब्ध होईल व पावसाळयामध्ये स्टेशनकडे जाणा—या वाहनांना व पादचा—यांना अडचण होणार नाही.

या पुलाचे पूर्वी दोन अत्यंपाद (Abutments) व दोन खांब ;च्पससंतद्ध व एक स्लॅब चे काम झालेले आहेत. उर्वरित दोन खांब (Pillar) व चार स्लॅबचे काम करणे बाकी आहे. दुतर्फा जोड रस्त्यांचे काम झालेले नाही. नगरपालिकेने केलेली संविदा पाहता सदर संविदा कालमर्यादेमुळे Null & Void झालेली आह असे मत आहे. तथापि काम ज्या तारखेला बंद करण्यात आले त्या तारखेपर्यंत ठेकेदाराने केलेल्या कामाचे अंतिम देयक अदा करणे आवश्यक आहे.

या पुलाच्या जोड रस्त्याच्या मार्गामध्ये चांदीबाई कॉलेज कडील भागामध्ये एका गुरूव्दाराचे निशाण साहेब (ध्वजस्तंभ) काढून देण्याची या गुरूव्दारातर्फे श्री. गयानीबाबा नझर सिंगजी यांनी त्यांच्या दिनांक २६.७.२००४ च्या पत्रान्वये मान्य केले आहे.

या कामाची आवश्यकता पाहता उल्हसनगर महानगरपालिकेचे स्थापत्य अभियांत्रिकी सल्लागार मे. बंलचंद सोनेसर यांना या पुलाच्या उर्वरित कामाचे प्राकलन व नकाशे तयार करण्याकरिता सूचना देण्यात आल्या होत्या. त्यांचेतर्फे हे प्राकलन तयार करण्यात आले. त्यांनी तयार केलेल्या प्राकलनाप्रमाणे या कामाची किंमत रू. ६०. ६० लक्ष इतकी होत आहे. या प्रकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या बाबींचे दर जिल्हा दरसुची ठाणे २००३—२००४ वर आधारित असले तरी त्यामध्ये वाहतुक अंतर (Lead Charges) भरलेले नाहीत. तथापि, निविदा छाननीच्या वेळी ;स्मंक बैंतहमेद्ध मुळे वाढणारी प्राकलनीय किंमत विचारात घेतली जाऊन त्याप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करता येवू शकतो.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये रस्ते सुधारणा 'अ' अंदाजपत्रक भाग—२—(क—४ (iii) अंतर्गत रूपये १५. ०० कोटी इतकी तरतुद करतेवेळी महासभेने ५० रस्त्यांच्या कामांना प्राधान्य दिलेले आहे. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सद्याचे अस्तित्वात असलेले पादचारी मार्ग व सबमर्सिबल पूल हे खराब अवस्थेत व पावसाळयात धोकादायक असल्याने उक्त पुल रेल्वेस्टेशन व नागरी वसाहत यांना जोडणारा एकमेव कायम स्वरूपी मार्ग होणार असल्याने या पुलाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे रू. ६०. ६० लक्ष खर्चाचे या पूलाचे काम हाती घेण्याकरिता धोरणात्मक निर्णय होऊन या कामाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेकरिता महासभेच्या पटलावर ठेवण्यात यावा.

**महासभा ठराव क्र:—६३** **दिनांक:—२०/१/२००५.**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर रेल्वे स्टेशन समोरील वालधुनी नाल्यावरील अर्धवट अवस्थेत असलेल्या पुलाचे बांधकाम पुर्ण करणे कामी महापालिकेचे स्थापत्य अभियांत्रिकी सल्लागार यांनी तयार केलेल्या रू. ६०.६०लक्ष रक्कमेच्या प्राकलनास व नकाशास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ११:— विशेष समित्यांची स्थापना करणे.

मा. सचिव:—कोणकोणत्या समीतीवर कोणकोणते सदस्य असतील हे मला प्रस्तावाच्या स्वरूपात येथे देण्यात आले आहे. मी त्यांची नावे पुकारत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—सचिव साहेब,.......

मा. सचिव:—प्रथम नावे तर वाचुन दाखवु की नको?

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—नावे तर ऐका ना? त्यानंतर मतदान घेवु.

मा. सचिव:—नावे घोषित करू की नको?

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—नाही नावे तर घोषित करायची आहेतच ना?

मा. सचिव:—यांनी प्रस्ताव दिलेला आहे. भलेही त्यास आपला विरोध आहे. परंतु नावे घोषित करू किंवा नको?

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—होय. घोषित करा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आमचा विरोध आहे.

मा. सचिव:—व इतिवृत्त कायम होण्याच्या अगोदर या ठरावा अंतर्गतचा निर्णय लागु होईल अशा स्वरूपाचा प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आमचा विरोध आहे.

मा. सचिव:—नावे वाचायची की नाही?

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—वाचायची आहेत ना?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—जसा प्रस्ताव दिला आहे तसा पास.

मा. सचिव:— जसा प्रस्ताव दिला आहे, तीच नावे, पास?

जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने :—३० मते.

१. श्री. टेकचंदानी राजू
२. श्री. लिंगे सुर्यकांत
३. श्री. ऐडके गणपत
४. श्रीमती शर्मा कमला
५. श्री. वलेचा पृथ्वी
६. श्री. रोहरा श्यामसुंदर
७. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८. श्री. पवार नाना

९. श्री. जग्यासी राजू
१०.श्री. निकम शांताराम
११.श्री. वनवारी किशोर
१२.श्री. जेसवानी सतराम
१३.श्री. लुंड गोविंदराम
१४.श्रीमती खिलनानी भावना
१५.श्री. खेमानी दर्शनसिंग
१६.श्रीमती कारीरा रेखा
१७.श्री. पमनानी ईश्वर
१८.श्री. साधवानी मनोज
१९.श्री. रामरख्यानी मोहनदास
२०.श्री.लबाना होशियारसिंग
२१.श्री. तलरेजा विनोद
२२.श्रीमती रिजवानी सुजाता
२३.श्री. मोकल चंदाराम
२४.श्री. म्हस्के अंकुश
२५.श्री. यादव लालबिहारी
२६.श्री. जाधव प्रशांत
२७.श्री. जाधव सुरेश
२८.श्रीमती साधवानी जया
२९.श्री. भालेराव गौतम
३०.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार

मा.सचिव:—जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरोधात :— ९ मते.

१. श्रीमती मोकल सिमा
२. श्री. उमाप रामदास
३. श्री. रुपचंदानी बच्चाराम
४. श्री. असरोंडकर राज
५. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
६. श्री. सोनवणे नथु
७. श्री. गायकवाड दिलीप
८. श्री. पाटील विश्वनाथ
९. श्री. चौधरी राजेंद्र

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ११:— विशेष समित्यांची स्थापना करणे.

प्रस्तावना:—

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महानगरपालिकेस आवश्यक वाटतील त्याचप्रमाणे ठराव करून आपल्या पालिका सदस्यामधून विशेष समित्या नियुक्त करता येतील. महापालिका स्थायी समिती परिवहन समिती इत्यादीचे कामकाज विषयक नियमातील नियम ४ (अ) अनुसार निम्नलिखित एक वा अधिक विशेष समित्या नियुक्त करता येतील.

१. सार्वजनिक बांधकाम समिती.
२. नियोजन व विकास समिती
३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.
४. आरोग्य व परिरक्षण समिती
५. महिला व बालकल्याण समिती
६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती

दि.१५.५.९७ च्या महासभा ठराव क्र. ६ व्दारे प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र निश्चित केले आहे. आणि अशा कोणत्याही क्षेत्रात समावेश केलेल्या सर्व बाबी व प्रश्न प्रथमच समुचित समितीपुढे ठेवले जातील व ते अशा समितीच्या शिफारशीसह महासभेत येतील म्हणुन विशेष समित्यांची नेमणुक करणेस प्रस्तावित आहे.

**महासभा ठराव क्र. ६४** **दि. २०/१/२००५**

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :—श्री. चंदाराम मोकल

हि महासभा प्रत्येक विशेष समितीत ९ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या पुढील आठ विशेष समित्यांची नेमणूक करित आहे.

| **सार्वजनिक बांधकाम समिती** | **सदस्य** |
|---|---|
| १. श्री. ईश्वर पमनानी | सदस्य |
| २. श्री. श्याम रोहरा | सदस्य |
| ३. श्री. प्रभुनाथ गुप्ता | सदस्य |
| ४. श्रीमती कोमल बठिजा | सदस्या |
| ५. श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर | सदस्य |
| ६. श्री. विनोद तलेरजा | सदस्य |
| ७. श्रीमती भावना खिलनानी | सदस्या |
| ८. श्री. लालबिहारी यादव | सदस्य |
| ९. श्री. हरदास माखिजा | सदस्य |

| **२. नियोजन व विकास समिती** | **सदस्य** |
|---|---|
| १. श्री. मोहनदास रामरख्यानी | सदस्य |
| २. श्री. होशियारसिंग लबाना | सदस्य |
| ३. श्री. बबन लिंगे | सदस्य |
| ४. श्रीमती सुजाता रिझवानी | सदस्या |
| ५. श्रीमती कोमल बठिजा | सदस्या |
| ६. श्री. सुरेश जाधव | सदस्य |
| ७. श्री. अशोक ठाकुर | सदस्य |
| ८. श्री. नारायण पंजाबी | सदस्य |
| ९. श्री. प्रमोद टाले | सदस्य |

**३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती.** **सदस्य**

| | |
|---|---|
| १. श्रीमती नीता आहुजा | सदस्या |
| २. श्री. राजु जग्यासी | सदस्य |
| ३. श्री. मनोज साधवानी | सदस्य |
| ४. श्री. अंकुश म्हस्के | सदस्य |
| ५. श्री. गोविंदराम लुंड | सदस्य |
| ६. श्री. लालबिहारी यादव | सदस्य |
| ७. श्री. सुरेश गायकवाड | सदस्य |
| ८. श्री. मोहन साधवानी | सदस्य |
| ९. श्री. गौतम भालेराव | सदस्य |

**४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती** **सदस्य**

| | |
|---|---|
| श्रीमती मीनु दासानी | सदस्या |
| श्रीमती रेखा कारीरा | सदस्या |
| श्रीमती भावना खिलनानी | सदस्या |
| श्री. पृथ्वी वलेचा | सदस्य |
| श्री. राजु जग्यासी | सदस्य |
| श्री. नाना पवार | सदस्य |
| श्री. अंकुश म्हस्के | सदस्य |
| श्री. अशोक ठाकुर | सदस्य |
| श्री. सतरामदास जेसवानी | सदस्य |

**५. महिला व बालकल्याण समिती** **सदस्य**

| | |
|---|---|
| १. श्रीमती कमला शर्मा | सदस्या |
| २. श्रीमती भारती छाब्रिया | सदस्या |
| ३. श्रीमती माया मंसद | सदस्या |
| ४. श्रीमती दीपा पंजाबी | सदस्या |
| ५. श्रीमती किरण माखिजा | सदस्या |
| ६. श्रीमती भावना रामचंदानी | सदस्या |
| ७. श्रीमती अनिता गुप्ता | सदस्या |
| ८. श्रीमती रेखा कारीरा | सदस्या |
| ९. श्रीमती बेबी वसीटा | सदस्या |

**६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती** **सदस्य**

| | |
|---|---|
| १. श्रीमती मीना सोंडे | सदस्या |
| २. श्री. विनोद ठाकुर | सदस्य |
| ३. श्री. शांताराम निकम | सदस्य |
| ४. श्रीमती अनिता गुप्ता | सदस्या |
| ५. श्री. नाना पवार | सदस्य |
| ६. श्री. सुरेश गायकवाड | सदस्य |
| ७. श्री. गणपत एडके | सदस्य |
| ८. श्री. शामु बाबु वाघे | सदस्य |
| ९. श्रीमती नीना नाथानी | सदस्या |

**७. क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती** **सदस्य**

| | |
|---|---|
| १. श्रीमती नीता आहुजा | सदस्या |

२. श्री. चंदाराम मोकल सदस्य
३. श्रीमती माया मंसद सदस्या
४. श्री. गोविंदराम लुंड सदस्य
५. श्रीमती मोना वनवारी सदस्या
६. श्रीमती कमला शर्मा सदस्या
७. श्री. गणपत एडके सदस्य
८. श्री. किशोर वनवारी सदस्य
९. श्री. अनिल जयसिंघानी सदस्य

**८. माध्यमिक शिक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती सदस्य**

१. श्रीमती मीना सोंडे सदस्य
२. श्री. दर्शनसिंग खेमाणी सदस्य
३. श्री. प्रशांत जाधव सदस्य
४. श्री. विनोद ठाकुर सदस्य
५. श्रीमती नीना नाथानी सदस्या
६. श्री. संजय बठिजा सदस्य
७. श्री. राजु टेकचंदानी सदस्य
८. श्री. मनोज साधवानी सदस्य
९. श्री. महेंद्र मुलचंदानी सदस्य

तसेच पूढील सभेकडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पाहता वरील ठरावा अंर्तगतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

उपमहापौर/ पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—आयत्यावेळचा विषय आहे.

विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १२:— निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेकामी उच्चतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास मान्यता देणे.

काही सदस्यः—पास. पास.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—प्रशासनाच्या वतीने आयत्यावेळच्या विषयान्वये आणण्यांत आलेला विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यात येत असुन तो सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

आयत्यावेळचा विषयः—

**विषय क्र. १२:–** निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेकामी उच्चतम दराच्या निविदाकाराशी संविदा करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना:–**

विद्युत विभागा मार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी जनसंपर्क अधिकारी मार्फत ३ वर्तमान पत्र म्हणजे दै. दोपहर का सामना, दै. फ्रि प्रेस व दै. नगरन्यूज यात निविदा सुचना देउन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यांच्या प्रतिसादात मे. हिन्दुस्तान स्क्रेप, मे. साईनाथ इंटरप्राईसेस, मे. कुरेशी बद्रर्स, मे. हसमती इंटरप्राईसेस, श्री. हसन मोहम्द करीमुल्हा, मे. फरीन ट्रेडर्स, श्री. राम नारायण पांडे, श्री. सुदुभाई, मे. मरक्युरी सेल्स, मे. बी. आर. ट्रेडर्स, मे. फिन ट्रेडर्स, श्री. अबदुल्ला खांन, श्री. एन के. इंटरप्राईसेस यांनी कोरे निविदा चे कोरे प्रपत्र खरेदी केले

सदर निविदा इशारा रक्कमे सह सादर करण्याची मुदत १८/१२/०४ रोजी सायकाळी ५.०० वाजे पर्यंत होती, ३ निविदा धारकांनी इशारा रक्कमे सह सिलबंद निविदा सादर केल्या व ते दिनांक २०/१२/०४ रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात आल्या त्यांच्या तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

**COMPERATIVE STATEMENT**

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | Shri. R.N. Pandey Per Unit in Rs. | | M/s. Hindustan Scrap Per Unit in Rs. | Shri. Sainath Enterprises Per Unit in Rs. | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | *Inclusive of Tax* | *Exclusive of Tax* | *Exclusive of Tax* | *Exclusive of Tax* | |
| १. | ४० वॉ. कॉपर चोक | नग | 150 | १५.९२ प्रति नग | 15.00 | 13.00 | 12.12 | 14.01 | 2,115.00 |
| २. | ४० वॉ. टयुब लाईट | नग | 1200 | ३.७५ प्रति नग | 1.20 | 1.04 | 1.52 | 2.01 | 2,412.00 |
| ३. | २५० वॉ. सोडियम चोक | नग | 380 | १२०.०० प्रति नग | 121.00 | 104.94 | 101.00 | 120.01 | 45,603.80 |
| ४. | २५० वॉ. सोडियम बल्ब | नग | 400 | ३२.५२ प्रति नग | 36.53 | 31.68 | 18.00 | 41.01 | 16,404.00 |
| ५. | १०० ॲ. कटाउट | नग | 125 | ८.०० प्रति नग | 5.00 | 4.34 | 1.00 | 8.01 | 1,001.25 |
| ६. | २५० वॉ. होल्डर | नग | 300 | १.०० प्रति नग | 1.00 | 0.87 | 0.50 | 2.01 | 603.00 |
| ७. | इगनीटर | नग | 600 | १.५० प्रति नग | --- | --- | 0.50 | 2.01 | 1,206.00 |
| ८. | २५० वॉ सोडियम फक्त कॅप | नग | 550 | २.५० प्रति नग | 2.00 | 1.73 | 1.50 | 5.01 | 2,755.5 |
| ९. | अल्युमिनियम स्क्रॅप (शिट व कास्टींग मिक्स) | कि. | 100 | ७६.१४ प्रति कि. | 72.00 | 68.31 | 60.00 | 70.01 | 7,001.00 |
| १०. | अल्युमिनियम केबल /वायर | कि. | 50 | २५.०० प्रति कि. | 27.00 | 24.59 | 15.00 | 25.01 | 1,250.50 |
| ११. | जी. आय./ लोखंड स्क्रॅप (मिक्स) | कि. | 250 | १३.२० प्रति कि. | 13.00 | 12.33 | 10.50 | 12.01 | 3,082.50 |
| १२. | जुने पंखे | नग | 26 | १५६.१० प्रति नग | 157.10 | 136.25 | 120.00 | 201.00 | 5,226.00 |
| **Total** | | | | | | | | | 88,660.55 |

सदर तुलनात्मक तक्त्यात श्री. राम नारायण पांडे यांनी कर सह दर दिलेले आहे व बाकी दोन निविदा धारकांनी कर वगळुन दर दिलेले असुन श्री. राम नारायण पांडे यांनी दिलेले दरातून कर वगळुन तुलना करण्यात आलेली आहेत

सदर तुलनात्मक तक्त्या नुसार ॲटम क्रं. ३,४,५,६,७,८,१० व १२ मे. साईनाथ इंटरप्राईसेस यांनी दिलेल्या दर महापालिकेने ठरवलेल्या दरा पेक्षा जास्त किंवा ठरवलेल्या दरानुसार आहे.

अॅटम क्रं. ११ मध्ये श्री. राम नारायण पांडे याचे दर सर्वाधिक असून आणि अॅटम क्रं. १,२ व ९ मध्ये मे. साईनाथ इंटरप्राईसेस याचे दर सर्वाधिक असून ही आपल्या ठरवलेल्या दरा पेक्षा कमी आहे त्या मुळे त्यांना सदर अॅटमच्या वाटाघाटी साठी बोलविण्यात आला.

त्यांच्या प्रतिसाधात मे. साईनाथ एंटरप्राईजेस यांनी कुरियर मार्फत पत्र पाठवून अशे लिहून दिले आहे की त्यांनी निविदेत दिलेले दर अंतिम आहे आणि त्यांनी दिलेल्या निविदा दरा अनुसार ही साहित्य खरेदी करायला तैयार आहे.

श्री. राम नारायण पान्डे यांनी ज्या आयटम मध्ये त्यांचे दर जास्त आहे परंतु ठरलेल्या दरा पेक्षा कमी आहे त्यात वाढ करुण ठरलेल्या दरा आनुसार खरेदी करण्याची संमती दर्शविलेली आहे. तसेच ज्या दरात मे. साईनाथ एंटरप्राईजेस यांनी वाढ न करण्याचे सांगितलेले आहे ते ही आयटम श्री. राम नारायण पांन्डे यांनी त्यांच्या दरात वाढ करुन ठरलेल्या दरा अनुसार घेण्याची संमती दर्शविलेली आहे. ते पुढील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost<br>Per Unit rate in Rs. | Shri. R.N. Pandey After Negotiation Per Unit rate in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| १. | ४० वॉ. कॉपर चोक | नग | 150 | १५.९२ | 15.92 |
| २. | ४० वॉ. टयुब लाईट | नग | 1200 | ३.७५ | 3.75 |
| ९. | अल्युमिनियम सॅक्रप (शिट व कास्टींग मिक्स) | कि. | 100 | ७६.१४ | 76.14 |
| ११. | जी. आय./ लोखंड सॅक्रप (मिक्स) | कि. | 250 | १३.२० | 13.20 |

सदर सर्व वाटा घाटी अंती तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Description of Unserviceable articles | Unit | Approx Qty. | Expected cost<br>Per Unit in Rs. | Shri. R.N. Pandey Per Unit in Rs. | M/s. Hindustan Scrap Per Unit in Rs. | Shri. Sainath Enterprises<br>Per Unit in Rs. | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४० वॉ. कॉपर चोक | नग | 150 | १५.९२ प्रति नग | **15.92** | 12.12 | 14.01 | **2388.00** |
| २. | ४० वॉ. टयुब लाईट | नग | 1200 | ३.७५ प्रति नग | **3.75** | 1.52 | 2.01 | **4,500.00** |
| ३. | २५० वॉ. सोडियम चोक | नग | 380 | १२०.०० प्रति नग | 104.94 | 101.00 | **120.01** | **45,603.80** |
| ४. | २५० वॉ. सोडियम बल्ब | नग | 400 | ३२.५२ प्रति नग | 31.68 | 18.00 | **41.01** | **16,404.00** |
| ५. | १०० अॅ. कटाउट | नग | 125 | ८.०० प्रति नग | 4.34 | 1.00 | **8.01** | **1,001.25** |
| ६. | २५० वॉ. होल्डर | नग | 300 | १.०० प्रति नग | 0.87 | 0.50 | **2.01** | **603.00** |
| ७. | इगनीटर | नग | 600 | १.५० प्रति नग | --- | 0.50 | **2.01** | **1,206.00** |
| ८. | २५० वॉ सोडियम फक्त कॅप | नग | 550 | २.५० प्रति नग | 1.73 | 1.50 | **5.01** | **2,755.5** |
| ९. | अल्युमिनियम सॅक्रप (शिट व कास्टींग मिक्स) | कि. | 100 | ७६.१४ प्रति कि. | **76.14** | 60.00 | 70.01 | **7,614.00** |
| १०. | अल्युमिनियम केबल /वायर | कि. | 50 | २५.०० प्रति कि. | 24.59 | 15.00 | **25.01** | **1,250.50** |
| ११. | जी. आय./ लोखंड सॅक्रप (मिक्स) | कि. | 250 | १३.२० प्रति कि. | **13.20** | 10.50 | 12.01 | **3,300.00** |
| १२. | जुने पंखे | नग | 26 | १५६.१० प्रति नग | 136.25 | 120.00 | **201.00** | **5,226.00** |
| | Total | | | | | | | **91,852..05** |

वरील तुलनात्मक तक्ते नुसार मार्च २००५ आखेर पर्यंत जमा होणा–या सदर निरुपोयोगी आयटम क्र. ३, ४, ५, ६, ७, ८, १० व १२ मे. साईनाथ एंटरप्राईजेस, मुंबई यांना व आयटम क्रं १, २, ९ व ११ श्री. राम नारायण पान्डे यांना विकण्या करिता महासभेच्या मंजुरी साठी सादर.

महासभा ठराव क्र:– ६५      दिनांक:–२०/१/२००५.

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रशांत जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महापालिकेच्या विद्युत विभागातील निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेकामी मान्यता देत आहे व वर उल्लेखलेल्या बाब क्रमांक ३,४,५,६,७,८,१० व १२ करिता मे. साईनाथ एंटरप्रायजेस, मुंबई यांच्याशी व बाब क्रमांक १,२,९, व ११ करिता श्री राम नारायण पांडे यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:–</u>विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

<u>विषय</u> क्र. १३:– उल्हासनगर महापालिका सार्वजनिक रस्त्यांच्या किंवा जागेच्या भागामध्ये वाहने उभी करुन ठेवणे किंवा थांबविण्याच्या जागा निश्चित करणेस व या कामी वाहनतळ शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुकीच्या अटी व शर्ती निश्चित करणे.

<u>मा. सचिव:–</u>या प्रस्तावामध्येही आपणांस तारीख निश्चित करायची आहे का? १ एप्रिल पासुन शुल्क लागु करण्याचा हा प्रस्ताव आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:–</u>आमची हरकत आहे. दुकानांच्या समोर, दुकानदारांच्या ज्या गाडया उभ्या राहतात. त्यांना ही फी आकारली जावू नये.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):–</u>मा. महापौर महोदया, हा जो आपला विरोध आहे तो आपल्याकडे चुकीची माहिती असल्यामुळे आहे. जे पण दुकान किंवा इमारत लोकांनी बांधली आहे. जे लाईन ऑफ पब्लिक स्ट्रीट असते त्याच्या मागे कमीत कमी साडे चार मीटरचे अंतर त्यांनी ठेवले पाहिजे. आज या शहरामध्ये जेवढी काही दुकाने, घरे बांधण्यांत आली आहेत.त्यातील कुणीही रस्यापासून साडेचार मीटर अंतर ठेवलेले नाही. ते अंतर जर ठेवले असते तर ते स्वत:ची मोटरसायकल किंवा कार तेथे पार्क करू शकले असते. आज जे लोक या शहरात व्यवसाय करत आहेत. ते आपली स्वत:ची गाडी एवढेच नाही तर ते लोक आपल्या नोकरांना सुध्दा गाडया देतात. एका दुकानाच्या बाहेर ४–४, ५–५ गाडया उभ्या असतात. व त्याही सार्वजनिक रस्त्यावर व नागरिकांचे गैरसोयीसाठी त्यांच्यामुळे लोकांना गैरसोयीचे होते. लोकांना येण्याजाण्यासाठी जो रस्ता आहे त्यांना त्रासाचे होते. लोकांना गैरसोयीचे करून ते रस्त्यावर आपल्या गाडया उभ्या करतात. जर ते लोक अशाप्रकारे रस्त्यावर गाडया उभ्या करतात. तर त्याची पार्कीग फी त्यांनी दिली पाहिजे. काही विदेशामध्ये पार्कींगसाठी सुध्दा टॅक्स आहे. आम्ही तर फक्त फी वसुल करत आहोत. टॅक्स वसुल करत नाहीत. टॅक्स दिला पाहिजे. व तो आपण त्यांच्याकडुन घेतला पाहिजे, ते काही टॅक्स भरत नाहीत. सार्वजनिक रस्त्यावर गाडी उभी करून जनतेला जी असुविधा निर्माण करतात. त्यामुळे त्यांनी तो टॅक्स भरलाच पाहिजे. व ती फी दिलीच पाहिजे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:**—सोसायटयांमध्ये खाली जी पार्कींगची जागा आहे तिचाही टॅक्स भरला जातो. वर जे टॅरेस असते तिचाही टॅक्स घेतला जातो. जो दुकानदार आहे. त्याच्या दुकानासमोर गाडी उभी राहिली तर तिचाही तो टॅक्स भरेल? पार्कींगच्या जागा जेथे असतात, उल्हासस्टेशन..........

**मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):**—मा. महापौर महोदया, मी सभागृहासमोर हे ठेवु इच्छितो की याअगोदर काही विषय होते. आपणांस पाहिजे की सर्व आरक्षित भुखंडावर कुंपण घातले पाहिजे. भुखंडाचा विकास झाला पाहिजे, शहरात चांगले रस्ते असले पाहिजे यासाठी महसुल कोठुन येईल. इकडे सांगाल पार्कींग फी लावु नका. टॅक्स वाढवु नका, पाण्याचे दर वाढवु नका. व दुसरीकडे म्हणाल की हे हे झाले पाहिजे. म्हणुन या प्रस्तावावर सभागृहाने गंभीरतेने विचार केला पाहिजे. जेथे आम्ही काही महसुल वाढविण्याचे प्रस्ताव आपल्या समोर ठेवतो. ते अमान्य करणे हे योग्य नाही. महसुल वाढविण्याचे प्रस्ताव जेव्हा आपण पारीत कराल तेव्हाच या शहराचा विकास होईल. नाही तर खाली आपण सूचना करत राहाल. आपल्या सर्व सूचना आता कागदावर राहतील. इतिवृत्तांतात राहतील. त्यावर आम्ही अंमलबजावणी करू शकणार नाहीत. म्हणुन आपणां सर्वांनी याचा विचार केला पाहिजे. आम्ही प्रस्ताव आणला आहे त्यापासुन काही महसुल मिळेल. व महसुलानेच या शहराचा विकास होईल.

**मा. सदस्य श्री.बच्चाराम रूपचंदानी:**—आयुक्त महोदय मी काय म्हंटले की दुकानदाराची जी गाडी दुकानासमोर लावली जाईल. त्या गाडीवर पार्कींग फी वसुल करता कामा नये. पे अॅन्ड पार्क करा. परंतु दुकानदाराची दुकानासमोर जी गाडी लागली जाईल तिच्यावर पार्कींग फी घेता कामा नये. आमची हीच एक हरकत आहे. बाकी काही आमची हरकत नाही. पे अॅन्ड पार्क करा. सर्व काही करा.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:**—आयुक्त साहेब, अशी अशी जमिन पडुन आहे. आपल्या जमिनीवर, शासनाच्या जमिनीवर दुसरे लोक कमवत आहेत. ही आमच्या मध्ये कमी होती, महानगरपालिकेमध्ये कमी होती. महानगरपालिकेने आपल्या जमिनीला लोकांच्या चांगल्यासाठी, पार्कींगसाठी उपयोगात आणली नाही. यामध्ये महानगरपालिकेची कमी आहे. महापालिकेकडे जी जमिन रिकामी आहे. ती पार्कींगच्या कामासाठी उपयोगात आणली जावी. कुणी व्यापारी पार्कींगचे पैसे देणार नाही. कुणी नागरिक देणार नाही अशी काही गोष्ट नाही. येथील नागरिक असे नाही की आपणांस पार्कींगचे पैसे देणार नाहीत. पार्कींगची व्यवस्था अगोदर करून दया. लोक पार्कींगचे पैसे भरतील.

**मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):**—हा प्रस्ताव आम्ही नियमित सभा सूचनेवर आणु.

**मा. सचिव:**—हा प्रस्ताव या सभेच्या कामकाजातुन वगळुन नियमित सभा सूचनेवर आणला जाईल. कुणाची काही हरकत आहे? काही नाही ना?

**मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):**—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसूचीवरून वगळण्यांत येत आहे.

**विषय क्र. १३:—** उल्हासनगर महापालिका सार्वजनिक रस्त्यांच्या किंवा जागेच्या भागामध्ये वाहने उभी करुन ठेवणे किंवा थांबविण्याच्या जागा निश्चित करणेस व या कामी वाहनतळ शुल्क वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुकीच्या अटी व शर्ती निश्चित करणे.

**मा. सचिव:**—विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १४:—** उल्हासनगर महानगरपालिकेसाठी जिल्हा दर सुची लागु करणेस मान्यता देणे.

**काही सदस्य :**—पास. पास.

मा. पीठासीन अधिकारी (श्रीमती जया साधवानी):—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

आयत्यावेळचा विषय:—

विषय क्र. १४:— उल्हासनगर महानगरपालिकेसाठी जिल्हा दर सुची लागु करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिकेत पाणीपुरवठा व मलनिस्सारण विभाग, विद्युत विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात येणा—या महसुली व भांडवली कामासाठी जिल्हा दर सुचीनुसार प्राकलने तयार करण्यात येतात. प्रतिवर्षी शासनाचे विविध विभाग प्रत्येक जिल्हयातील जिल्हा दरसुची प्रसिध्द करीत असतात व संबंधीत विभागाने जिल्हा दरसुची प्रसिध्द केल्यानंतर उल्हासनगर महानगरपालिका सदर दरसुची लागु करण्याबाबत निर्णय घेते.

सदर बाब नियमित स्वरूपाच्या धोरणाची असल्यामुळे प्रत्येक वर्षी मंजुर करून घेण्याची आवश्यकता नाही.

सबब,असे प्रस्तावित करण्यात येते की, विद्युत विभागासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांनी प्रसिध्द केलेली दरसुची, पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभागासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने प्रसिध्द केलेली दरसुची व सार्वजनिक बांधकाम विभागासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रसिध्द केलेली दरसुची लागु करणे योग्य राहील.

महासभा ठराव क्र:— ६६ दिनांक:—२०/१/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रसिध्द् केलेली दरसूची महापालिकेच्या आवश्यक त्या विभागात लागु करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—मा. सदस्य श्री. मोहनदास रामरख्यानी यांचा आज वाढदिवस आहे. आपणां सर्वांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभुच्छा देत आहोत.

<u>मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—</u>कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५. ५५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पीठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानी यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:—१७/२/२००५

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१७/२/२००५ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १७.२.२००५ रोजी दुपारी ३. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा. महापौर श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१) मा. महापौर :—श्रीमती मालती करोतिया</u>
<u>२) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१ | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ४३. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४४. | श्री. सुरेश जाधव |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४५. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४७ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ५०. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५१. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५३. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ५५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५६. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५९. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २२. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ६०. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्री. नाना आनंदा पवार | ६१. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ६२. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २५. | श्री. जग्यासी राजु | ६३. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६४. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २७. | श्री. शांताराम निकम, | ६५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६६ | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६७. | श्री. विनोद तलरेजा |
| ३०. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६८. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६९ | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ७०. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| ३३. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ७१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७२. | श्री. बेहरानी मोहन |
| ३५. | श्री. मोहन साधवानी | ७३. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३६. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास, | ७४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७५. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३८ | श्रीमती भावना रवी खिलनानी | ७६. | श्री. हरदास माखिजा |
| ३९ | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७७. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ४० | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ७८. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य १. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, २.श्री. जयसिंघानी अनिल, ३. श्री. बेहरानी ठाकुरदास हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिव:—विषय क्र. १ वाचून दाखवितात.

मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा:—मा. महापौरजी, एक महिन्यापुर्वी माझ्या प्रभागामध्ये शिवसेनेने एक मोठा मंडप लावलेला आहे. त्याच बरोबर सहा सहा बोर्ड लावलेले आहेत. याविरूध्द अदयाप काहीही कारवाई केली

नाही ती का केली नाही. याबाबत मी १५–१६ वेळा अर्ज दिले आहेत. याबाबत कारवाई का केली जात नाही? कारवाई करण्यात काय अडचणीचे होत आहे. प्रभागातील लोकांनी सुध्दा पत्र दिली आहेत. हे पहा, मी आता काय करू? याबाबत काय केले पाहिजे, आपण उत्तर दया. कधी तोडाल?

मा. सचिव:–यावेळेस बजेटची मिटींग चालु आहे. याबाबत आपण मा. आयुक्त साहेबांच्या दालनात जावुन याबाबतचा आपला प्रश्न त्यांना विचारू शकता.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय :–स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००५–०६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००४–०५ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

या विषयावरील चर्चेस सुरूवात करण्या अगोदर मा. महापौरांच्या वतीने मा. स्थायी समिती सभापती यांना व्यासपीठावर निमंत्रित करण्यांत येत आहे. कृपया त्यांनी व्यासपीठावर यावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–मा. महापौरजी व सभागृहातील सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, आज आमच्या भाभी श्रीमती ज्योती कालानी ज्या स्थायी समितीच्या सभापती आहेत व भावी महापौर आहेत त्यांचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही सर्व सदस्य त्यांचे अभिनंदन करू इच्छितो त्यासाठी दहा मिनिटांची वेळ देण्यात यावी. त्याचबरोबर सभागृहातील सर्वांना पेढे वाटप करून त्यांचे तोंड गोड करू इच्छितो.

मा. महापौर:–आमचे आर.पी.आयचे काही कार्यकर्ते व श्री. बी.बी. मोरे सभागृहाबाहेर उभे आहेत. त्यांनी कृपया सभागृहात यावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–आमदार साहेब सुध्दा सभागृहात येतील.........

श्रीमती ज्योती कालानी यांना मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त , सभागृह नेता, सचिव, विरोधी पक्षनेता, सर्व पक्षाचे गटनेते, उपस्थित नगरसेवक इत्यादींनी पुष्पगुच्छ देवुन त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती करतो की, आजच्या या सभेचे कामकाज उदया दुपारी १ वाजे पर्यंत तहकुब केले जावे उदया आमचे मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी यांचा वाढदिवस असल्याने त्यांच्यावतीने दुपारी २ वाजता सर्व सदस्यांसाठी स्थायी समिती सभागृहात भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दुपारी १ वाजता बजेटची सभा, २ वाजता स्थायी समिती सभागृहात दुपारचे जेवण व ४ वाजता मा. महापौर व उपमहापौर निवडणूकीची सभा अशाप्रकारे कार्यक्रम निश्चित करण्यासाठी सभागृहातील सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, आजच्या या सभेचे कामकाज उदया दुपारी १ वाजेपर्यंत स्थगित केले जावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–सभागृह नेताजी, उदया किती वाजता सभा ठेवत आहात?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–१ वाजता.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–आपण म्हणत की दुपारचे जेवण २ वाजता?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–१ वाजता बजेटची मिटींग, त्यांनतर दुपारी २ वाजता जेवण आणि ४ वाजता महापौर, उपमहापौर पदाची निवडणूक.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–बजेटवर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ पाहिजे. मला वाटते की याकामी आपण वेळ न देण्यासाठी आपण असे करत आहात. हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>उदया आपण जेवढे काही बोलाल ते आम्ही ऐकुन घेवु.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>आमचा यास विरोध आहे. भलेही आपण या सभेचे कामकाज आजच पुर्ण करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>सभा उदया दुपारी १२.०० वाजता ठेवायची?

<u>मा. महापौर:—</u>उदया दुपारी १२ वाजता ही सभा ठेवली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>श्री. लाल पंजाबीजी उदया आपण जेवढे काही बोलाल आम्ही सर्व ऐकुन घेवु. उदया दुपारी १२ वाजता सभा ठेवु या.

<u>मा. सचिव:—</u>ठिक आहे? कुणाची काही हरकत?

<u>मा. महापौर:—</u>आजच्या या सभेचे कामकाज उदया दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>सर्व सदस्यांना विनंती आहे की कृपया त्यांनी ठिक १२ वाजता सभागृहात उपस्थित रहावे.

<u>मा. सचिव:—</u>कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायना नंतर सायंकाळी ४. ४५ वाजता सभेचे कामकाज दिनांक १८.२.२००५ रोजी दुपारी १२. ०० वाजे पर्यंत स्थगित केल्याचे मा. महापौर श्रीमती मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

<u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:—१८/२/२००५

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१८/२/२००५ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दिनांक १७.२.२००५ रोजी दुपारी ३. ०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करून ही सभा शुक्रवार दिनांक १८.२.२००५ रोजी दुपारी १२. ०० वाजता घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१) मा. महापौर :—श्रीमती मालती करोतिया</u>
<u>२) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१ | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ४३. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४४. | श्री. सुरेश जाधव |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४५. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४७ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ५०. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ५१. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्री. ऐडके गणपत गोविंद | ५३. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १६. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ५६. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १९. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २०. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २१. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५९. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ६०. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ६१. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २४. | श्री. नाना आनंदा पवार | ६२. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २५. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ६३. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २६. | श्री. जग्यासी राजु | ६४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २७. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २८. | श्री. शांताराम निकम, | ६६ | श्री. विनोद तलरेजा |
| २९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६७. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६८. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६९ | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| ३२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ७०. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ७१. | श्री. बेहरानी मोहन |
| ३४. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ७२. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७३. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३६. | श्री. जेसवानी सतराम पुनमदास, | ७४. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७५. | श्री. हरदास माखिजा |
| ३८ | श्रीमती भावना रवी खिलनानी | ७६. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३९ | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७७. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ४० | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. मोहन साधवानी, २.श्री. जयसिंघानी अनिल, ३. श्रीमती किरण लखी माखिजा, ४. श्री. बेहरानी ठाकुरदास हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन दुपारी १२.३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव:—</u>मा. स्थायी समिती सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी कृपया व्यासपीठावर यावे.

विषय :—स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००५—०६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००४—०५ चे सुधारित अर्थसंकल्पीय

अंदाजास अंतिम स्विकृती देणे

**मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी:–** मा. महापौर, मा. उपमहापौर, मा.आयुक्त, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, सर्व सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी, कर्मचारी, उपस्थित नागरिक तसेच पत्रकार आपणांसर्वांचे मी हार्दीक अभिनंदन करते.

महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेली साधनसामुग्री एकवटुन वर्ष २००५–२००६साठी ३६५ दिवसाच्या कार्यकालासाठी जे उद्दीष्ठ साध्य करायचे आहे. त्याबाबतचे अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सदस्यांकडुन तयार करण्यांत आलेले आहे. सलग पाचव्या वर्षी आपणांसमोर ते प्रस्तुत करण्याचे भाग्य मला प्राप्त झाले आहे. याबद्दल मी आपली आभारी आहे.

माझा पक्ष तसेच मित्रपक्षांच्या सदस्यांच्या इच्छेनुसार दिनांक १८ फेब्रुवारी, २००५ रोजी होणा–या महापौर निवडणूकीसाठी मी नामांकन पत्र दाखल केले आहे. आमच्या सदस्यांना विश्वास आहे की, या निवडणूकीमध्ये आमचा विजय होईल. त्यानुसार स्थायी समितीची सभापती या नात्याने आपल्या समोर अंदाजपत्रक सादर करण्याची माझी ही पाचवी वेळ आहे. मागील चार वर्षामध्ये महानगरपालिकेने ज्याकाही योजना हाती घेतल्या त्या जनतेसमोर ठेवण्याची माझी इच्छा आहे. आणि त्या योजना या प्रकारच्या आहेत.

१. रस्ते विकास कार्यक्रम
२. उल्हास रेल्वे उड्डाण पुल
३. पवई रेल्वे उड्डाण पुल
४. नागरी सुविधा केंद्राची स्थापना
५. सौर उर्जा निर्मिती प्रकल्प
६. सार्वजनिक दिवाबत्ती–हायमास्ट
७. सपना गार्डन गोल मैदान तसेच इतर उद्यानांचा विकास
८. पाणी पुरवठा योजना
९. एम.जे. पी. कडुन आकारण्यांत आलेल्या ५८ कोटी रूपयांचा विलंब शुल्क आकारात सुट
१०.आमदार निधी तसेच महापालिका निधीतुन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्याबाबतचा कार्यक्रम
११.पाणी पुरवठा, अग्निक्षमण तसेच विद्युत विभागासाठी उपकरणांसहित वाहने
१२.कर्मचा–यांना पाचव्या वेतन आयोगानुसार मिळणारी रक्कम अदा करणे
१३.मागासवर्गीयांच्या भरतीतील अनुशेष
१४.दारीद्रय रेषेखालील कुटूंबांना मिळकतकरातुन सुट देणारी योजना
१५.घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कचरा मुक्त तसेच सुलभ शौचालयांची व्यवस्था
१६.प्रभाग समित्यांची स्थापना
१७.म्हाडा तसेच महापालिका निधी अंतर्गत झोपडपट्टी सुधार कार्यक्रम
१८.जकातीचे खाजगीकरण तसेच महापालिकेकडुन जकात वसुली या दोन्ही पर्यायामध्ये यशस्वीता
१९.मालमत्ता कर वसुलीमध्ये वाढ

२०. दुकानदार बंधुच्या दुकानासाठी आकरण्यात येणा–या पाणी पट्टीपासुन सुट
२१. पावसाळयापुर्वी नियोजनबध्द नाले सफाई केल्याने पुरापासुन मुक्ती
२२. तरण तलावाचे नुतनीकरण
२३. शिक्षण मंडळास नियमितपणे अनुदान

हे शहर आमच्या येणा–या पिढीसाठी सौदर्यकारक असावे. त्यास योग्य त्याप्रकारे सजवुन आम्ही आमच्या नव्या पिढीकडे सोपविण्यासाठी आम्ही जे प्रयत्न केले आहेत ते यापुढे सुध्दा चालु राहतील हे आश्वासन मी शहरवासियांना देत आहे. आजच्या या विशेष सभेपुढील विषय

आहे २००४—२००५च्या सुधारित अर्थसंकल्पास तसेच २००५—२००६ च्या अर्थसंकल्पास मंजुरी देणे. यावर चर्चा करू या.

## वर्ष २००४—२००५

वर्ष २००४ हे सुनामी लाटांच्या प्रकोपाबाबत नेहमीच स्मरणात राहील. सुनामी ही एक अशी घटना की ज्या घटनेमुळे लाखो लोकांचे प्राण गेले तसेच हजारो लोक बेघर झाले. सुनामी ग्रस्तांच्या मदतीसाठी महापालिका निधीतुन २५ लाख रूपये मा. मुख्यमंत्री निधीमध्ये देण्यासाठी मंजुरी देण्यात आली. आमच्या महापालिका कर्मचा—यांनी सुध्दा यासाठी एक दिवसाच्या पगाराची रक्कम दिली. यासाठी मी त्यांचेसुध्दा अभिनंदन करते. सर्व सदस्यांना मी विनंती करते की, आपण सर्वजण आपला एक महिन्याच्या मानधनाची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करू या. वित्तिय वर्ष २००४—२००५साठी १८५. ५० कोटी उत्पन्न, कर विभागात कर्मचा—यांची कमतरता असल्यामुळे ते १२०. २७ कोटी रूपयांपर्यंत सिमित करण्यांत येत असुन यावर्षी खर्च सुध्दा १२०. १० कोटी पर्यंत सिमित ठेवला जाईल.

## वर्ष २००५—२००६

आमचे आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे यांनी आपल्या वाढदिवसाच्या दिवशी २ फेब्रुवारी, २००५ रोजी विविध करांमध्ये ३५ कोटीची वाढ सूचविणा—या प्रस्तावासह १२६. ६३ कोटी उत्पन्न तसेच १६१. ७० कोटी रूपये खर्चाचा अंदाज स्थायी समितीस सादर केला होता. करांमध्ये वाढ सुचविण्याचा जो प्रस्ताव ठेवला होता तो याप्रकारचा आहे.

१. जकात

शहरामध्ये आयात होणा—या २४ वस्तुंच्या जकात दरामध्ये वाढ करून २०. ०९ कोटी रूपयांची वसुली

२. पाणी पट्टी

| बांधकाम प्रकार | प्रचलित दर प्रतिमहा | प्रस्तावित दर प्रतिमहा | उत्पन्न |
|---|---|---|---|
| १. आर. सी. सी. | रूपये १०० | रूपये २०० | रूपये ६. ४७ कोटी |
| २. ए.सी.सी | रूपये ५० | रूपये ७५ | |
| ३.झोपडी | रूपये ४० | रूपये ५० | |
| मीटर पध्दती : (प्रति १०, ००० लिटर साठी) | | | |
| अ. निवासी वापर | रूपये ६ | रूपये ९ | रूपये ८७ लाख |
| ब. वाणिज्य वापर | रूपये १८ | रूपये २४ | |
| क. औदयोगिक वापर | रूपये १८ | रूपये ३० | |
| ड. सार्वजनिक/ धर्मदाय संस्था वापर | रूपये १२ | रूपये १२ | |
| | | एकुण | ७. ३४ कोटी |

३. मालमत्ता कर

मिळकतींना आकारण्यांत येणारा ४१. ५० टक्के करामध्ये १५ टक्के वाढ तसेच वाणिज्य वापर असलेल्या मिळकतींना ३० टक्के वाढ करून ६. ६० कोटी रूपये उत्पन्न वाढीचा प्रस्ताव.

४. पाणी टॅकर भाडे

| टॅंकर क्षमता | प्रस्तावित दर |
|---|---|
| ७००० लिटर | रु. २५० प्रती फेरी |
| १०००० लिटर | रु. ३०० प्रती फेरी |

*आमच्या आयुक्तांचे म्हणणे आहे की, ''कॅश इज किंग'' एम.आय.डी.सी कडुन महागडया दराने होत असलेली पाणी खरेदी नागरी सुविधा केंद्रासाठी दिवसेंदिवस होणारा वाढता खर्च तसेच जुने कर्ज फेडण्यासाठी त्वरीत पैशाची उपलब्धता करणे आवश्यक आहे. परंतु स्थायी समिती सदस्यांनी शहरामध्ये आयात होणा-या फक्त आठ वस्तुंवर नाममात्र वाढ करून तसेच टॅंकरभाडयास मंजुरी देवून फक्त ६. ५० कोटी रूपये वाढीच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. मालमत्ता कर तसेच पाणी पटटीची करोडो रूपयांची थकबाकी आहे. हे लक्षात घेता राहिलेली तुट या करांची थकबाकी वसुली करून पुर्ण केली जावी असा निर्णय स्थायी समितीने घेतला आहे. आर्थिक परिस्थिती हळुहळु मजबुत करण्यासाठी स्थायी समिती सदस्यांनी ज्या सूचना दिल्या आहेत त्या याप्रकारच्या आहेत.*

१. उल्हासनगर महानगरपालिका जकात नियमांमध्ये जे बदल केले आहे त्यास तात्काळ शासकीय मंजुरी घेवुन एक्सकॉट (निर्गमित) फी मध्ये वाढ केली जावी.
२. एम.आर.टी.पी. ॲक्ट नुसार बाल्कनी, त्यांनतर जीना तसेच इतर जागी मंजुर नकाशा व्यतिरिक्त जे काही फेरफार केले जातात त्याबाबत फी वसुल करणे.
३. हॉकर्सना लायसन्स देवुन त्यांच्याकडुन फी वसुल करणे.
४. पे ॲण्ड पार्क पध्दतीनुसार फी वसुल करणे
५. थकबाकीची त्वरीत वसुली
६. जल शुध्दीकरण प्रकल्पासाठी मागविण्यांत आलेली निविदा त्वरीत निकाली काढुन येणा—या भविष्य काळामध्ये पाणी खरेदी खर्चामध्ये कपात करणे.

## वर्ष २००५—२००६ मध्ये अपेक्षित उत्पन्नाचा अंदाज याप्रकारे आहे.

| | |
|---|---|
| १. प्रारंभिची शिल्लक:— | १७ लाख |
| २. जकात :— | ७७. ५० कोटी |
| ३. मालमत्ता कर:— | ५० कोटी |
| ४. पाणी पुरवठा:— | ४५ कोटी |
| ५. अनुदाने:— | ७. ०९ कोटी |
| ६. कर्ज:— | ३. ५० कोटी |
| ७.संकीर्ण :— | ६. ८७ कोटी |
| एकुण:— | १९०. १३ कोटी |

## <u>खर्च बाजु :—</u>

१. <u>पगार भत्ते आणि प्रशासकीय खर्च</u>

महानगरपालिकेमध्ये जवळ जवळ २, ६०० कर्मचारी आहेत या व्यतिरिक्त ८५० पेन्शनर्स आहेत. या कर्मचा—यांचा पगार भत्ते तसेच प्रशासकीय खर्चासाठी ३२. ९२ कोटी रूपयांची तरतुद केलेली आहे.

२. सार्वजनिक आरोग्य

शहरामध्ये स्वच्छता राखण्याकामी कचरा वाहतुक, जंतुनाशके तसेच इतर सामानाची खरेदी या कामी ५. ६५ कोटी रूपयांची आरोग्य विभागासाठी तरतुद ठेवली आहे.

३. पाणी पुरवठा

एम.आय.डी.सी कडुन मुक्ती मिळविण्यासाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर एक योजना तयार केली असुन याकामी निविदा मागविण्यांत आली आहे जी नुकतीच प्राप्त झाली आहे. याकामी आयुक्तांना विश्वास आहे की, या योजने अंतर्गत पाणी खर्चामध्ये दरवर्षी अंदाजे आठ ते दहा कोटी रूपयांची कपात होईल ही योजना सुरू होण्यास थोडाच कालावधी लागणार असुन वर्ष २००५–२००६ साठी ३३. ४० कोटी रूपयांची एम.आय.डी.सी. च्या पाणी खरेदीसाठी तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

शहरातील अधिकतर विभागातील पाणी वितरण व्यवस्था सुधारण्यांत आम्हाला यश आले आहे. परंतु तरीही ही व्यवस्था सुस्थितीत ठेवण्यासाठी ७. ७९ कोटी रूपयांची पाणी पुरवठा विभागासाठी तरतुद ठेवली आहे.

४. बांधकाम विभाग

मागील वर्षी आम्ही काही नविन रस्त्यांचा विकास करण्याची योजना प्रस्तावित केली होती. त्यामध्ये ज्या रस्त्यांचे काम पुर्ण होत आले आहे. ते रस्ते खालीलप्रमाणे

१. शिवाजी चौक ते संतु बिल्डींग
२. सिरू चौक ते गुरूव्दारा
३. बसंत बहार ते स्वामी शांतीप्रकाश आश्रम
४. बसंत बहार ते बुस्टर पंपीग स्टेशन
५. करूणा अपार्टमेट ते दसेरा मैदान
६. न्यु इंग्लिश स्कुल ते बॅरेक नं. ९२६, कुर्ला कॅम्प
७. आंबेडकर चौक ते उल्हास आर.ओ.बी
८. सी. ब्लॉक चौक ते डॉल्फीन क्लब
९. राधास्वामी सतसंग हॉल जवळील कलवर्ट
१०.आवत चौक ते ढोलुराम दरबार

पैशाच्या कमतरतेमुळे ज्या रस्त्यांचे काम सुरू होवु शकले नाही ते काम पुढील वर्षी आम्ही सुरू करू. त्यासाठी बांधकाम विभागांअतर्गत नविन रस्त्याच्या विकासासाठी २२. ५ कोटी रूपयांची तरतुद ठेवली आहे. बांधकाम विभागाअंतर्गत सर्व प्रभागांमध्ये जेष्ठ नागरिकांसाठी लायब्ररीची व्यवस्था तसेच इतर विकास कामांसाठी १५ कोटी रूपयांची तरतुद ठेवली आहे.

५. प्राथमिक शिक्षणः–

महापालिका शिक्षण मंडळाव्दारे चालविण्यांत येणा–या २८ शाळांमध्ये जवळ जवळ ११ हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ५. ५० कोटी रूपयांचे अनुदान दयायचे आहे. याशिवाय नविन शाळा तसेच जुन्या इमारतींची दुरूस्ती यासाठी २. १० कोटी रूपयांची तरतुद ठेवली आहे. माध्यमिक शिक्षण प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यासाठी २० लाख रूपयाची आरंभिक तरतुद केली आहे.

६. सौरउर्जा तसेच पवन चक्की निर्मिती, विद्युत व्यवस्थाः–

आपणांस माहित आहेच की महानगरपालिका इमारतींच्या काही भागांमध्ये विजेचा पुरवठा १० किलो वॅट क्षमतेच्या सौरउर्जा प्रकल्पाव्दारे केला जात आहे. वर्ष २००५—२००६मध्ये १० किलो वॅट क्षमतेचा आणखी एक नविन सौरउर्जा प्रकल्प तयार करण्याची योजना आहे. या योजनेसाठी केद्रसरकारकडुन २० लाख रूपये मंजुर केले आहेत तसेच २० लाख रूपयाची आपल्या अर्थसंकल्पात तरतुद केली आहे.

७. माहिती तंत्रज्ञान आणि मनोरंजन पार्क

*शहाड स्टेशन जवळ बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर माहिती तंत्रज्ञान पार्क तसेच बहुमजली सिनेमागृह तसेच वाणिज्य मार्केट तयार करण्याचा प्रस्ताव आहे त्यास काही महिन्यापुर्वीच महापालिकेने मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प सन २००५-२००६मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे.*

*८. गटारे व भुयारी गटार योजनाः-*

*सेंच्युरी रेयॉनच्या जवळील उल्हास नदी, जेथुन आपणांस पिण्याचे पाणी पुरविले जाते हे पिण्याचे पाणी प्रदुषित होवु नये म्हणुन या नाल्याचे कामाबाबत निविदा सूचना वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यांत आली आहे या कामासाठी ४. ५० कोटी रूपयांची तरतुद २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात केली आहे. गटारे व भुयारी गटार योजनेअंतर्गत शहरातील सर्व प्रभागातील मुता-यांची व्यवस्था तसेच मुलभुत नागरी सुविधा देण्यासाठी ४. ५० कोटी रूपयांची तरतुद करण्यांत आलेली आहे.*

*९. उद्यान विकासः-*

*शहरातील उद्याने विकसित करण्यासाठी तसेच त्यांची देखभाल व दुरूस्तीसाठी १. ६५ कोटी रूपयांची उद्यान विकासासाठी तरतुद केली आहे.*

*१०. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती तसेच नगरसेवक निधीः-*

*प्रशासनाच्या वतीने प्रत्येक नगरसेवकासाठी नगरसेवक निधी म्हणुन फक्त २ लाख रूपयांची तरतुद ठेवण्यांत आली होती. महापौर, उपमहापौर तसेच स्थायी समिती सभापती निधीसाठी कोणत्त्याही प्रकारचा निधी ठेवला नव्हता. परंतु स्थायी समिती सदस्यांनी नगरसेवकनिधी ४ लाख, महापौर निधी ५० लाख, उपमहापौर निधी २५ लाख तसेच स्थायी समिती सभापती निधी २५ लाख अशी तरतुद केली आहे.या योजने व्यतिरिक्त कर्ज फेडीसाठी २९ कोटी, शहरातील दिवाबत्तीसाठी १. ८८ कोटी दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्यासाठी ५ टक्के रक्कमेची तरतुद, अपंग व्यक्तींच्या कल्याणकारी योजनेसाठी २५ लाख, वेडे आणि कुष्ठरोगी कल्याणकारी योजना २५ लाख, महिला व बालकल्याणसाठी १५ लाख याप्रकारे तरतुद केली आहे. महानगरपालिका कर्मचा-यांस पाचव्या वेतन आयोगाच्या थकबाकी पोटी देण्यांत येणारी रक्कम जवळ जवळ पुर्ण झाली आहे. जी काही थोडी फार रक्कम देणे बाकी आहे ती सन २००५-२००६ या वर्षामध्ये दिली जाईल. सन २००५-२००६मध्ये अपेक्षित उत्पन्न साध्य करण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्त्नशिल रहाल व अर्थसंकल्पात ज्या योजना प्रस्तावित केल्या आहेत त्यांच्याबाबतीत त्वरीत अंमलबजावणी करण्याची कार्यवाही कराल अशी अपेक्षा व्यक्त करते.*

*शेवटी आपण सर्वजण असे म्हणु या*

*" हिमालय सी हो हिंमत, सागर सा हो उल्लास!*

ऐसा करे प्रयास की, बुलंदीयोंको छु लें इस नगर का विकास"!

जयहिंद, जय महाराष्ट्र, जय भिम, जय झुलेलाल.

__मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः-__मा. महापौरजी, उपमहापौरजी, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, तसेच सर्व नगरसेवक बंधु, भगिनी. ज्याप्रकारे आम्ही आपले अर्थसंकल्पीय भाषण शांततेने ऐकुन घेतले. मला वाटते त्याचप्रकारे माझेही भाषण आपण शांततेने ऐकुन घ्याल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. जेव्हा अर्थसंकल्पीय भाषण दिले जात होते तेव्हा मनात एक विचार येत होता की, अर्थसंकल्पीय भाषण तर खुपच चांगले दिले जात आहे. वाजवी पेक्षाही चांगले. माझ्या मनात असा विचार येतो, ज्याने हे अर्थसंकल्पीय भाषण लिहिले असेल किंवा जो कोणी लिहितो जर मला सुध्दा असा कुणी एखादा माणुस मिळाला असता. तर मी सुध्दा असे सुंदर अर्थसंकल्प लिहु शकलो असतो. सुधारित अर्थसंकल्पावर जेव्हा सभापती महोदया बोलत होत्या, हे जे भाषण वाचुन दाखविले जाते ते मी अतिशय लक्ष देवुन ऐकत असतो. भाषण वाचुन दाखविले जात होते. त्यामध्ये असे सांगितले जात होते की, जसे मी म्हंटले की मला ब-याचशा गोष्टी शिकावयास मिळतात. अर्थसंकल्पाचे दोन भाग असतात. एक मागील वर्षाचा आणि दुसरा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प. तर माझे लक्ष गेले, मागील वर्षाचा अर्थसंकल्प किती सुंदर दर्शविण्यांत आला होता. त्यातील एक वाक्य मला फारच चांगले वाटले. व त्यातुन मला शिकायला सुध्दा मिळाले. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजाची दिशा व दशा दर्शविणारा दस्तऐवज आहे हा अर्थसंकल्प. यावरून मी विचार करू लागलो आत्मचिंतन झाले. दिशा काय होती दशा काय झाली? दिशा काय ठरविली होती व आज दशा काय आहे? दिशा ठरविली होती. अर्थसंकल्प असेल १८५ कोटीचे, दशा काय झाली ते आता मी सांगतो. दशा झाली १२० कोटीची, मिळकतकराच्या वसुलीची दिशा दिली होती , वसुली होईल ५० कोटी, दशा काय झाली २३ कोटी, पाणी पुरवठयाच्या वसुलीची दिशा ठरविण्यात आली होती, पाणी पुरवठयाची वसुली होईल ४५ कोटी, दशा काय झाली? वसुली झाली १५ कोटी, दिशा काय ठरविली होती, आम्हाला अनुदाने मिळतील ८ कोटी ७२ लाखाची, सरकारकडुन अनुदान आले ५ कोटी ४७ लाखाचे, दिशा व दशेबाबत सांगत आहे. दिशा व दशेचा परिणाम कामकाजावर होतो. व हे स्वाभाविकच आहे. सांगण्यांत आले होते की, बांधकामावरील आमचा खर्च, विकास कामांवर आम्ही खर्च करू ३८. ८७ कोटी, दशा काय झाली? खर्च केला १९. ५ कोटी. प्रभाग समित्त्यांसाठी आम्ही खर्च करू ३. ०८ कोटी, खर्च केला २. १९ कोटी. व एक महत्त्वाचे सांगु इच्छितो की, सर्वात मोठी दिशा आपण ठरविली होती. नविन रस्ते तयार करण्यासाठी आम्ही प्रस्तावित दिशा ठरविली होती. आम्ही खर्च करू १७. ५ कोटी व त्या वर्षामध्ये रस्ते जे तयार झाले व त्यावर खर्च केले ४. ५ कोटी, दिशा व दशामध्ये काय फरक आहे? दिशा काय सांगितली, दशा काय झाली? मी आणखी पुढे सांगतो. बजेटच्या वेळेस येथे जी आश्वासने दिली. मागील वर्षीच्या गोष्टीचा मी पुर्नउच्चार करू इच्छित नाही. मागील वर्षाच्या बजेटमध्ये आम्हास सांगण्यांत आले होते. ४० रस्त्यांची कामे अंडर डिफरर्ड पेमेंट स्कीममध्ये हाती घेण्यात येतील. त्याअगोदरचे जे बजेट होते. २००३व २००४ या वर्षाचे त्यामध्ये सुध्दा ते लिहिले होते की, डिफरर्ड पेमेंट स्कीम मधुन आम्ही रस्त्त्यांचे काम हाती घेवु. दशा काय आहे ? अदयाप पर्यंत डिफरर्ड पेमेंट स्कीमचे काय झाले ते सर्व लोकांना माहित आहे. शहरासाठी एक दिशा ठरविण्यांत आली होती. दोन वर्षापुर्वी, मागील वर्षी सुध्दा लिहिले होते आम्ही शहरामध्ये प्रदुषण नियंत्रणासाठी हवा प्रदुषण नियंत्रण मॉनिटर लावु. त्यासाठी १९ लाख रूपये बजेटमध्ये ठेवण्यांत आले होते. दोन वर्षापासुन याकामी अर्थसंकल्पामध्ये पैसे ठेवण्यात येत आहेत. दशा ही आहे की, आयुक्त

साहेब, आजपर्यंत प्रदुषण नियंत्रण सेंटर उघडले नाही. एक दिशा आणखी ठरविण्यात आली होती. सरकारकडुन एक निर्भय योजना आखण्यांत आली होती. त्यामध्ये आम्ही १९ कोटी सरकारला देवु त्यामुळे आपणांस विलंब शुल्क लागणार नाही. बरेचसे फायदे होतील म्हणुन सांगण्यात आले होते. त्यामध्ये विस्तारात मी जावु इच्छित नाही. परंतु आताच आयुक्त साहेबांचा अहवाल मला वाचण्यासाठी प्राप्त झाला आहे. आयुक्त साहेबांचा अहवाल मला वाचण्यास मिळाला. तो मराठीत आहे परंतु मला जे समजले त्यामध्ये असे लिहिले होते की, ते १९ कोटी आम्ही शासनास देवु शकलो नाही. त्यामुळे सहा कोटी विलंब शुल्क म्हणुन दयावा लागणार आहे. तेच सांगु इच्छितो दिशा काय होती, दशा काय दिली होती व आमची दशा काय झाली? आपली अंतिम दशा काय आहे? जेव्हा काल मी अर्थसंकल्पाचे काही कागदपत्र उपलब्ध करून घेत होतो. तेव्हा मला एक रकाना आढळुन आला. ३१.३.२००५ पर्यंतची देणी. या वर्षाच्या शेवटची स्थिती अशी आहे . जी आयुक्त साहेबांनी या अगोदर सांगितली ते असे आहे. जे पैसे दयायचे बाकी आहेत तर ते आहेत ४३ कोटी ६३ लाख ही आहे अंतिम दशा यावर्षाची. दिशा एक दशा दुसरी. व आता मी वळतो आहे पुढील वर्षाकडे म्हणजे आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पाकडे. या अर्थसंकल्पाला ना दिशा आहे ना दशा आहे. या अर्थसंकल्पाची स्थिती किंवा हा जो अर्थसंकल्प आहे तो एका हिंदी सिनेमातील गाण्यांसारखा आहे.

'' मै तो चला जिधर चला रस्ता,
मुझे क्या खबर है कहॉ मेरी मंजिल
मै तो चला जिधर चला रस्ता''

व यावर्षी सुध्दा तीच गोष्ट आहे. दिशा व दशेची. यावर्षी सुध्दा तोच फुगवलेला बजेट आहे. आयुक्त साहेबांचा जो बजेट होता, प्रशासनाचा जो बजेट होता तो १२६ कोटीचा. व पुन्हा तेच कुठलीही दिशा नसलेला बजेट आकडे वाढवुन तयार केला आहे. तो १९० कोटीचा आहे की, जे कधीच होणार नाही. मिळकत कर वसुली ज्याचा इतिहास आहे. २३ कोटीच्या वसुलीचा, तो आकडे वाढवुन लिहिला आहे. ५० कोटीचा. पाणी पट्टीची वसुली जी प्रस्तावित होती १५ कोटी ती वाढवुन लिहिली जात आहे ४५ कोटी व आज पर्यंतची मी स्थिती सांगतो. भलेही आपण ४५ कोटी लिहा, ५० कोटी लिहा. कितीही मोठमोठे आकडे लिहा . महापालिकेचा आजपर्यंतचा जो इतिहास आहे तो मी सांगु इच्छितो की, मिळकत कराची जी वसुली आहे. ती १९९८-९९ यावर्षी वसुली झाली ७ कोटी ९९ लाख. १९९९-२००० मध्ये वसुली झाली २० कोटी २५ लाख. २०००-२००१मध्ये वसुली झाली ८. ५७ कोटी. २००१-२००२ मध्ये वसुली होती ११ कोटी ०७ लाख. २००२-२००३ची वसुली होती १९ कोटी व २००३-२००४ ची वसुली होती १५ कोटी ७३ लाख. आजपर्यंत आमची वसुली २३ कोटी पर्यंत सुध्दा पोहोचली नाही. ५० कोटीची ही जी वसुली दर्शविली आहे. ती आकडे वाढवुन दर्शविली आहे.

पाणी पुरवठा विभागाची वसुली १९९८-१९९९ पासुन आजपर्यंत १३ कोटी च्या पुढे कधी गेली नाही. आज त्यांचे आकडे दर्शविले जात आहेत ५० कोटीचे, ४५ कोटीचे हे आकडे वेगळया पध्दतीने लिहिले जात आहेत. या गोष्टीवरून मला एका गोष्टीची आठवण होते. आमच्या सिंधीमध्ये एक म्हण आहे, एक बुध्दीमान साधु होता, तो एका कार्यक्रमामध्ये जातो. त्या कार्यक्रमामध्ये शहरातील प्रतिष्ठित, दानशुर, सावकार इत्त्यादी व्यक्ती होत्त्या. शहरामधील कॉलेज, रूग्णालय अशा चांगल्या प्रकल्पावर चर्चा चालु होती . दान देण्याची गोष्ट चालु होती. त्यावेळी एका सावकाराने म्हंटले की, माझ्या नावे आपण एक लाख रूपये लिहा. त्यानंतर दुस-या सावकाराने म्हंटले माझे दोन लाख रूपये लिहा. त्यानंतर तिस-या सावकाराने म्हंटले की, साहेब माझे दहा लाख रूपये लिहा. त्यानंतर ४ था एक जण उठला त्याने म्हंटले की माझ्या वतीने २५ लाख रूपये लिहा. त्यांनतर हा फकीर व्यक्ती उठला व

म्हणाला की साहेब माझेही ५० लाख रूपये लिहा. यावर सर्वजण आश्चर्यचकीत झाले. व या फकीरास एका व्यक्तीने विचारले आपण तर लोकांकडे भिक्षा मागुन पोट भरता व ५० लाख रूपये देणगी देण्याची गोष्ट करता. त्यावर तो म्हणाला साहेब आपण पाहिलेत, कुणी पैसे दिले का? जो व्यक्ती अनाउंसमेंट करत होता, पैसे लिहीत होता त्याने कुणाकडुन पैसे घेतले का? जर आम्ही पैसे देत नसु तर लिहिणार सुध्दा नाहीत का? पैसा देत नसु तर लिहिणार सुध्दा नाहीत का? अशी येथील परिस्थिती आहे. आम्ही वसुली करू शकत नसु तर लिहु सुध्दा शकत नाहीत काय? तर माझा तर असा विचार आहे की आपण कशासाठी जकात व मालमत्ता कर वाढवता? पाणी टॅंकर भाडयाच्या सहा कोटीसाठी आपण कशासाठी एवढे मोठे वादळ उभे करता? श्री. हरेश इदनानी यांना सांगा जिथे ४५ कोटी लिहीले आहेत त्या ठिकाणी ५० कोटी लिहा. पाणी पुरवठा विभागातील पाणी पट्टी वसुलीची रक्कम १ कोटीने वाढवा. सहा कोटी रूपयांची जुळवाजुळव करायची आहे. तर जिथे ४५ कोटी येणार नाहीत तेथे ५० कोटी येणार नाहीत. काय फरक पडणार आहे. तर अशी गोष्ट आहे देणार नाहीत तर लिहिणार सुध्दा नाहीत काय? हा जो बजेट आहे मी म्हंटले की, बजेटमध्ये मोठमोठी स्वप्ने दाखविली जातात. कधी कधी मी तर असे म्हणतो की, सत्ताधारी पक्षाचे सदस्य हे स्वप्नांचे व्यापारी आहेत. एक गाणे आहे ''स्वप्नांचा व्यापारी आला, घ्या घ्या स्वप्ने घ्या''. तर लोकांना बरीचशी स्वप्ने दाखविली जातात. मागील वर्षी सुध्दा मी म्हंटले होते , एक स्वप्न दोन वर्षापुर्वी आम्हाला हे सुध्दा दाखविले होते की, शहरातील चटई क्षेत्र निर्देशांक वाढविले जाईल. परंतु ते अदयाप पर्यंत झाले नाही. महापालिका क्षेत्रात चार गावे समाविष्ट करण्याची गोष्ट चालु होती. ती गावे अदयाप समाविष्ट करण्यांत आली नाहीत. बोट क्लब बांधा वापरा व हस्तांतरीत करा. या तत्त्वावर देण्याबाबत बोलले जात होते. पिकनिक स्पॉट तयार करण्याचे बोलले जात होते, रस्ते तयार करण्याचे बोलले जात होते. अधिक विस्तारात मी जावु इच्छित नाही. परंतु जेव्हा जकातीचा मुददा येतो. जकात दरामध्ये वाढ केली जाते. १९९८-१९९९ मध्ये आम्ही सुध्दा एक वेळ जकात दरामध्ये वाढ केली होती. त्यानंतर आणखी दोन वेळा जकात दरामध्ये वाढ झाली. परंतु त्यावेळेस जकातीचे उत्त्पन्न २५ कोटी होत होते. त्यानंतर दोन वेळा जकात दरामध्ये वाढ केली आहे. मला असे वाटते की आता जकात दरामध्ये वाढ करण्याची काही आवश्यकता नाही. जे पाण्याचे टॅंकर्स आहेत ते अशा ठिकाणी जातात जेथे लोकांना पिण्यासाठी पाणी येत नाही, लोक संबंधित नगरसेवकाकडे जातात. कधी दुस-या अधिका-यांकडे जातात. त्यावेळेस पाण्याचे टॅंकर्स मागविले जातात. तर आता टॅंकर्स ही एक जरूरीची बाब झाली आहे. मागील वेळेस आपण एक आश्वासन दिले होते की जोपर्यंत योग्य त्या प्रमाणात पाणी पुरवठा केला जात नाही. तोपर्यंत आम्ही टॅंकरव्दारे केलेल्या पाण्याचे शुल्क आकारणार नाही. कारण की टॅंकर आता प्रत्त्येक ठिकाणी जरूरीचे झाले आहे. व या टॅंकर्सवर भाडे आकारणे योग्य नाही. जकातीचा मुददा होता त्याबाबत मी सांगितले आहे की महापालिका झाल्यानंतर कमीत कमी तीन वेळा जकात दरांमध्ये वाढ करण्यांत आली आहे. व या अगोदर आम्ही सुध्दा जकात दरामध्ये वाढ केली होती. तेव्हा जकातीचे उत्त्पन्न मिळत होते २४-२५ कोटी व आता जकातीचे उत्त्पन्न ७२ कोटीच्या आसपास पोहोचले आहे. व आजची जी स्थिती आहे शहरातील व्यापारी स्पर्धात्त्मक वातावरणात व्यापार करत आहेत. त्यावर मला असे वाटते की आणखी जकात दरामध्ये वाढ करणे योग्य होणार नाही. म्हणुन जेव्हा जकात दर व टॅंकरव्दारे पुरविलेल्या पाण्याबाबत आकार वसुल करण्याचा जेव्हा मुददा येतो. त्यावेळेस मला आणखी एका स्वप्नाची आठवण येते. २००२ या वर्षामध्ये असे सांगण्यांत आले होते की शहरामध्ये ज्या काही अनाधिकृत इमारती आहेत, ज्यांनी चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे. त्यांना नियमित केली जाईल. व याबाबतचे मी जेव्हा इतिवृत्त पाहिले ऑक्टोबर २००२चा जो ठराव आहे. त्यावेळी असे वातावरण तयार केले होते. श्री. हरदास माखिजा यांनी म्हंटले होते की, हा एक ऐतिहासिक ठराव आहे. आपण जर इतिहासाचे

एक पान बनु इच्छित आहात तर आजच आपण ठराव पारीत करा. तर त्यावेळेस आम्ही हे दोन तीन ठराव पारीत केले होते व आम्हास असे सांगण्यात आले होते. शहरास एक स्वप्न दाखविण्यात आले होते. या अनाधिकृत इमारती नियमित केल्या तर आपणांस सव्वा दोनशे कोटी रूपये मिळतील तो ठराव मी दोन तीन वेळा पाहिला वाचला. नक्की सव्वा दोनशे कोटी आहेत की सव्वा दोन कोटी आहेत तर मी तो ठराव पाहिला त्यामध्ये असे दर्शविण्यात आले आहे सव्वा दोनशे कोटी रूपयांचे उत्पन्न आपणांस मिळेल. अडीच वर्षे झाले त्या सव्वा दोनशे कोटीतुन सव्वा दोन कोटी सुध्दा आपणांस मिळाले नाहीत. परंतु स्थिती अशी आहे की त्या इमारतींच्या नियमितीकरणाचा मुददा तर सोडुनच दया. इमारतींचे नियमितीकरण न झाल्याने शहरातील काही इमारतीचे निष्कासन होत आहे. सतनाम साकी इमारतीची स्थिती आपण पाहिलीत. रूकमिणी सागर आहे. त्याबाबत आम्हास माहित आहे. उच्च न्यायालयात त्यांनी अदयाप पर्यंत हमीपत्र दिलेले नाही. व आता आता पाली हिल बाबत कोर्टाकडुन आदेश प्राप्त झाला आहे. आम्हास जे स्वप्न दाखवले होते ते जर पुर्ण झाले असते तर आज जकात दर किंवा टॅकर्सवरचे भाडे आकारण्याची आवश्यकता पडली नसती. व या सर्व गोष्टी पुर्ण झाल्या असत्त्या. भाभीं श्रीमती ज्योती कालानी जेव्हा भाषण वाचुन दाखवत होत्त्या तेव्हा त्यांनी त्यांच्या भाषणाचा शेवट एका काव्य पक्तीने केला. मी सुध्दा माझ्या भाषणाचा शेवट एका काव्य पक्तीने करू इच्छितो. शहरवासियांना हे जे स्वप्न दाखविले जाते लोकांची स्थिती अशी आहे ती या काव्य पक्तीतुन आपणांस दिसुन येईल.

''वादा किया था, उन्होने आने के ख्वॉब में,
हम जागते रहें उनके इंतजार में''

लोकांना सुध्दा याबाबत वाट पहात राहतील. सर्व स्वप्न पुर्ण होतील? अर्थसंकल्पाची दिशा आणि दशा पुढील वर्षे शहराला कुठे घेवुन जाईल. याबाबत परमेश्वरच जाणो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सभागृहातील सर्व सदस्य, माझे सहकारी श्री. लाल पंजाबी यांनी ब-याचशा सविस्तरपणे अर्थसंकल्पाबाबत सांगितले. परंतु ज्या बाबी त्यांनी सांगितल्या नाहीत त्या मी आपणांस सांगु इच्छितो. जेव्हा आम्हाला या अर्थसंकल्पाची प्रत मिळाली. वरून पाहताना ती अतिशय सुंदर वाटली. मला वाटले की ती आतुन सुध्दा तेवढीच सुंदर असेल. परंतु हा अर्थसंकल्प तर मागील वर्षी सारखेच आहे. येथे दर्शविले होते की, उद्यानांसाठी पैसे ठेवलेले आहेत परंतु प्रत्यक्षात काहीच काम होत नाही. मी आयुक्त साहेबांना आठवण करून देवु इच्छितो की, उल्हासनगरमध्ये जेवढी काही उद्याने आहेत त्यांच्या देखभाल दुरूस्तीबाबत नोव्हेंबर, २००३मध्ये मी प्रश्न विचारला होता व आयुक्त साहेबांनी आश्वासन दिले होते की, दोन महिन्याच्या आत ही जी काही उद्याने असतील त्यांची देखभाल, दुरूस्ती होईल परंतु दुःखाने असे म्हणावे लागत आहे की, या आश्वासनास एक वर्ष पुर्ण झाल्यानंतरही एका सुध्दा उद्यानाची दुरूस्ती झालेली नाही. व साधु वासवानी उद्यान हे सुध्दा एका संस्थेस विकसित करण्यासाठी दिले गेले. विकले गेले. कधी रोटरी क्लबला दिले गेले. कधी ब्रम्हकुमारीला दिले गेले. एक जे गार्डन आहे ते गार्डन सुध्दा महापालिका सांभाळु शकत नाही. अशी आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेची स्थिती आहे. दोन वर्षापुर्वी अग्निशमन विभागासाठी एका मशिनचा आम्ही प्रस्ताव दिला होता. नविन फायर व्हॅन येणार होती. ती सुध्दा दोन वर्षात आली नाही. भुयारी गटार योजनेसाठी एका मशिनचा प्रस्ताव होता. दोन वर्षामध्ये भुयारी गटार योजनेसाठीची ती मशिन सुध्दा आली नाही. एकच गाडी आहे ती कॅम्प नं. १ ते ५ पर्यंत चालते. आठवडयामध्ये पाच दिवस बंद असते. अशी आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेची स्थिती आहे. ब-याचशा गोष्टी आमच्या श्री. लाल पंजाबी यांनी येथे सांगितल्या त्यांचा पुर्नउच्चार मी करू

इच्छित नाही. परंतु मी आपणां सर्वांना सांगु इच्छितो की जकात दरामध्ये ही जी वाढ केली आहे. ती त्वरीत मागे घेतली जावी. कारण की उल्हासनगरची जनता, उल्हासनगरचे व्यापारी कमी नफ्यामध्ये व्यापार करतात. कारण की अंबरनाथ मध्ये जकात कर नाही व येथे जकात कर असल्यामुळे स्पर्धात्मक परिस्थितीत अतिशय कमी नफा मिळवुन व्यापार करावा लागतो. माझी सभागृहास खासकरून सत्ताधारी पक्षास अशी विनंती आहे की, ही जकात दरवाढ आहे ती त्वरीत मागे घेतली जावी. तसेच पाणी टॅकर भाडयाचा जो मुददा आहे तो सुध्दा मागे घेतला जावा. प्रत्येक फ्लॅट मागे १०० रूपये पाणी पटटी आकारली जात आहे. आयुक्त साहेबांनी आम्हाला हमी दिली होती जोपर्यंत आम्ही नळाव्दारे पुरेशा दाबाने पाणी देवु शकत नाही तोपर्यंत आम्ही टॅकरर्सद्वारे पाणी पुरवठा करू म्हणुन, माझे असे निवेदन आहे की, टॅकरर्सद्वारे करण्यांत येणा-या पाणी पुरवठयाबाबत शुल्क आकारले जावु नये. त्याबाबतचा जो प्रस्ताव आहे तो मागे घेतला जावा. तसेच जकात दर वाढीचा जो प्रस्ताव आहे तो सुध्दा मागे घेतला जावा.

<u>मा. सचिवः-</u>आणखी कुणाला बोलायचे आहे?

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानीः-</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब मागील वर्षी नविन फायर फायटर खरेदी करण्यासाठी बजेट मध्ये तरतुद करण्यांत आली होती. परंतु अदयाप पर्यंत फायर फायटर खरेदी करण्यात आली नाही. त्यावर विचार केला जावा.

<u>मा. सचिवः-</u>फायर फायटर खरेदी केला आहे. परंतु अदयाप तो आलेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u> सन्माननिय महापौर, मा. आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, आज या बजेटच्या बाबतीत भारतीय जनता पक्षाचे सन्माननिय गटनेते श्री. लाल पंजाबी साहेब यांनी दशा आणि दिशेच्या बाबतीत अर्थसंकल्प कशाप्रकारे दिशाहीन झाला आहे. हे त्यांनी चांगल्या पध्दतीने चांगल्या भाषेमध्ये आपल्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या बजेटला, बजेटमध्ये सुचविलेल्या वाढीस आमचा विरोध आहे. त्याचा योग्य तो विचार करून सत्ताधारी पक्षाने आमच्या ज्या काही मागण्या आहेत त्या पुर्ण करण्यात अशी याठिकाणी अपेक्षा करतो. उदाहरणार्थ मिळकत कर जो आपण वाढवित आहात. खरे म्हणजे तो वाढवायला नको होता. कारण निवडणूकीच्या काळामध्ये दारीदय रेषोखालील लोकांचे, ज्यांचे वार्षिक उत्पन्न २४ हजाराच्या आत आहे. अशा झोपडपटटी विभागात राहणा-या लोकांकडुन आपण घरपटटी घेणार नव्हतात. अशाप्रकारच्या चिठठया सुध्दा आमदारांनी दिल्या होत्त्या. परंतु त्याबाबतीत त्यांना या महापालिकेने कुठपर्यंत न्याय दिला हे समजलेले नाही म्हणुन मी याठिकाणी सन्माननिय महापौर, सन्माननिय उपमहापौर व आयुक्त साहेबांना विनंती करेन की आपण आपल्या कायदयानुसार झोपडपटटी विभागातील या दारीदय रेषोखालील लोकांसाठी ज्या योजना आहेत त्या योजनेनुसार त्यांची घरपटटी माफ झाली पाहिजे होती. ती माफ झालेली नसुन पुन्हा त्यांना घरपटटी, करवाढ करून, त्यांना मिळकत कराची बिले पाठविली आहेत. त्यांची घरपटटी न वाढविता ती कमी करावी त्याचप्रमाणे दारीदय रेषोखालील जे लोक आहेत. त्यांना कर माफ करण्यांत यावा त्याच बरोबर उल्हासनगर महापालिकेच्या हददीत काही प्रभागात गेल्या अनेक वर्षापासुन टॅकरव्दारे पाणी पुरवठा केला जातो. मोफत पिण्याचे पाणी दिले जाते. त्या ठिकाणी जोपर्यंत नळाव्दारे लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. तोपर्यंत अशा लोकांसाठी आता जे टॅकरव्दारे पिण्याचे पाणी दिले जाते. त्यांना आपण जे दर आकारणार आहात. ते दर त्यांना आकारू नयेत. जोपर्यंत त्यांना नळाद्वारे पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत तरी टॅकरवर दर (भाडे) लावु नये असे मी या ठिकाणी सांगु इच्छितो. त्याचबरोबर या ठिकाणी आवर्जुन मी एक छोटीशी गोष्ट सांगु इच्छितो ब-याचशा विकास कामांसाठी येथे तरतुदी केल्या आहेत.

निधी ठेवले आहेत. त्यातील छोटेसे एक उदाहरण मी या ठिकाणी सांगु इच्छितो प्रत्येक महिन्यातील महासभेमध्ये, स्थायी समिती सभेमध्ये काही नगरसेवकांकडुन रस्ते, चौक यांचे नामकरणाचे काही प्रस्ताव येत असतात. या शहरामध्ये अनेक चौकांना रस्त्यांना राष्ट्र पुरूषांची, संताची नावे दिलेली आहेत. नामकरण केले जाते. या कामासाठी किती लाखाची तरतुद आहे. मग ते २ लाख असोत की ४ लाख असोत ज्या रस्ते, चौकांना राष्ट्र पुरूषांची, संताची नावे दिली आहेत. त्यांचे नामफलकासाठी पुरेसा निधी वापरला जात नाही. नामकरणाचे फलक कसे लावले जातात? २' x २' फुटाचा फलक लावला जातो. सन्माननिय महापौरांना मी सांगु इच्छितो की, ज्या ज्या चौकांना राष्ट्र पुरूषांची, संताची नावे दिली आहेत तेथे चांगल्या प्रकारचे फलक लावले जावेत. एवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपवतो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय स्थायी समिती सभापती आणि सन्माननिय सदस्य. सभापती महोदया, आजचा हा जो बजेट आहे हा एक वास्तववादी बजेट आहे. आणि तो शहराच्या विकासाची कास धरणारा आहे. असे या बजेटचे थोडक्यात वर्णन करता येईल. आणि हे वर्णन करत असताना आमच्या सारखे जे जनप्रतिनिधी आहेत. मला वाटते आयुक्त साहेब कवी मनाचे आयुक्त आहेत. कवी मनाच्या लोकांना गरीबीची जाण असते. खालच्या तळागाळाच्या प्रत्येक व्यक्तीची जाण असते. जेव्हा मी बजेटचे भाषण ऐकले आणि बजेटचे वाचन केले. त्यावेळी एक जाणवले

''आयुष्याच गणित मी मांडलय,
आयुष्याचे गणित मी मांडलय''
पण सापडत नाही उत्तर,
बेरीज वजाबाकी, भागाकार आणि गुणाकार
बेरीज वजाबाकी, भागाकार आणि गुणाकार
गुंतावळ आकडयांची पण सापडत नाही उत्तर''
आयुष्याचे गणित मी मांडलय''
पण सापडत नाही उत्तर,

संपुर्ण शहराच्या विकासासाठी जेव्हा आपण बजेटची तरतुद करतो. तेव्हा एक चौफेर बजेट मांडण्याची कल्पना असली पाहिजे. संपुर्ण शहराचा विकास तेव्हाच होतो जेव्हा तळागळातील व्यक्तीच्या विकासाची योजना आपण हाती घेतो. तर मला वाटते संपुर्ण शहराचा विकास व्हायला काही हरकत नाही. बजेट वाचत असताना ज्या दोन तीन गोष्टी माझ्या निर्दशनास आल्या त्याचे स्पष्टीकरण झाले तर जरा बरे होईल. पाण्याच्या टॅकर्सबाबत तुम्ही येथे दर दर्शविले आहेत. ७००० लिटर पाणी क्षमतेच्या टॅकरला २५० रूपये आणि १०,००० लिटर क्षमतेच्या टॅकरला ३०० रूपये मान्य आहे आम्हाला. तुम्ही पाणी पोहचवु शकला नाहीत. माझ्या प्रभागामध्ये भरत नगर हा असा एक विभाग आहे. तिथे पाण्याची पाईप लाईनच गेलेली नाही. तिथे ४-४ दिवसांनी टॅकर पाठवित जातो. ते लोक टॅक्स भरतात. पाण्याची बिले भरतात. अशांना पुन्हा तुम्ही टॅकरचे भाडे लावणार आहात का? हा एक प्रश्न आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा जो प्रश्न बघितला. चौफेर विकासासाठी आपण ज्या ज्या योजना राबविल्या आहेत. त्या त्या योजना तुम्ही या बजेटमध्ये घेतल्या आहेत. त्या त्या योजनेमध्ये रस्त्याची कुठे तरतुद ठेवली आहे का? झोपडपटटयांमधील रस्त्यांची कुठे तरतुद ठेवली आहे का? शहरातील मुख्य रस्ते विकसित झाले पाहिजेत. त्याचबरोबर झोपडपटटयामधील जे रस्ते आहेत ते ही महत्त्वाचे आहेत. त्याचा इथे कुठे उहापोह नाही. मला वाटते बजेटमध्ये झोपडपटटयांतील रस्त्यांची सुध्दा तुम्ही तरतुद ठेवली पाहिजे. शासन आणि प्रशासन हे दोघे मिळुन जेव्हा सत्ता चालवितात ही एकाच गाडीची दोन चाके आहेत. शासनाने ब-याचशा योजना अंमलबजावणीत आणण्याचे ठरविले. परंतु प्रशासनाने पण तेवढी साथ दिली पाहिजे. आज दारीद्रय रेषेखालील कुटूंबांना मालमत्ता करातुन सुट देण्याची योजना लागु असताना या योजनेमध्ये किती लोकांना आपण न्याय देवु

शकलो. शासनाची खुप इच्छा आहे त्यांना न्याय देण्याची पण प्रशासन काय करते? प्रशासन का नाही करत? बी.पी.एल. योजने अंतर्गत जे सहा, साडे हजार अर्ज आले त्यातील किती लोकांना प्रशासनाने फायदा दिला. ही चुक शासनाची नाही, ही चुक प्रशासनाची आहे. टॅक्स वसुलीचा जेव्हा मुददा येतो, तेव्हा आपण एक उददीष्ठ ठेवलेले असते की वर्षभरात अमुक एवढा कर गोळा झाला पाहिजे. परंतु हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाने तेवढा कर गोळा करण्याची ताकद ठेवली पाहिजे. आणि हे करत असताना बी.पी. एल. योजना तुम्ही अमंलात आणत नाहीत. जर त्या योजना तुम्ही अंमलात आणल्या तर तेवढे उददीष्ट तुमचे साध्य होवु शकते. संपुर्ण अनाधिकृत शहर म्हणुन हे शहर ओळखले जाते. खरेदी खत होत नाही. खरेदी खत बंद आहे. मिळकत कर पावती वर जर तुम्हाला हस्तांतरकारांची नावे नोंदवायची असतील किंवा तुम्हाला महसुल मिळवायचा असेल. तुम्ही जर एकाचेही काम करत नसाल तर टॅक्स कसा वसुल होणार आहे? असे बरेचसे मुददे आहेत. आणि हे करत असताना शासनाला प्रशासनाची साथ आवश्यक असते. झोपडपटटीवासीयांना फोटोपास देण्याचा मुददा आहे. लोक पैसे भरायला तयार आहेत. झोपडपटटीवासियांना फोटो पास देण्यासाठी तुमचे कर्मचारी, तुमचे अधिकारी झोपडपटटीवासियांना एवढा त्रास देतात की, झोपडपटटी फोटोपास घेण्यासाठी कुणी पुढे येत नाही. तुमचा महसुल गोळा होवु शकत नाही. आणि आमच्या सभापती महोदयांनी जर असे काही उददीष्ठ ठेवले असेल की, आम्हाला अमुक एवढा टॅक्स वसुल झाला पाहिजे. प्रशासनाने त्यांना जर साथ दिली नाही. तर वसुलीचे उददीष्ठ साध्य होणार नाही. त्या दृष्टीने आयुक्त महोदयांनी या मुददयाचा विचार करून त्यामध्ये योग्य त्या तरतुदी कराव्यात. जय भिम.

<u>मा. सदस्य श्री राज असरोंडकरः</u>-महापौर महोदया, बजेटवरील चर्चा ऐकताना आणि बजेट चाळताना एक गोष्ट अशी लक्षात येते की, पुन्हा पुन्हा तेच तेच मुददे तेच तेच आकडे त्या सर्व कल्पना तीच रडगाणी याचे प्रतिबिंब या सर्व अंदाजपत्रकातुन ध्वनीत होत असते. गेल्यावर्षीच्या अंदाजपत्रकाबाबत बोलताना याठिकाणी एक मुददा अत्यंत प्रकर्षाने मी आपल्या समोर मांडला होता की जमेची जी बाजु आहे जे आपले अंदाजित उत्पन्न आहे. आणि खर्चाची बाजु हे सुध्दा आपले अदांजित उत्पन्न असते. परंतु ज्या वेळेला आपण तीन तीन चार-चार महिन्यांनी आपल्या तिजोरीचा, जमा बाजुचा अंदाज घेत असतो. आणि त्या अंदाजावरच तुमचा जो प्रत्यक्षातील खर्च आहे. तो व्हावा अशी अपेक्षा असते. अशा प्रकारे जर अंदाजपत्रक राबविले गेले तर ख-या अर्थाने ते अंदाजपत्रक वास्तवात उतरू शकते. परंतु जमेचा कुठल्याही प्रकारचा अंदाज नसताना खर्चाची वारेमाप उधळपटटी मात्र होत राहते. आणि मग शेवटी त्यावर्षाचे बजेट सुध्दा मागच्या वर्षाच्या बजेट प्रमाणे कोलमडुन पडते. हा आतापर्यंतचा आपला अनुभव पण असे दिसते की या अनुभवातुन आपण काही शिकण्याचा प्रयत्न करत नाही किंवा आपल्याला कळल्या तरी काही गोष्टी, आपण कधी कधी म्हणतो की, कळते पण वळत नाही. तशी परिस्थिती उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये दरवर्षी दिसते. एक पत्र मी आपल्याला वर्षभरापुर्वी आपल्याला दिले होते. सार्वजनिक बांधकाम विभागातील कारभारा संदर्भामध्ये, त्या पत्रामध्ये मी असा आरोप केला होता की, सार्वजनिक बांधकाम विभाग जो आहे तो या उल्हासनगर महानगरपालिकेमधील भ्रष्टाचाराचे सर्वात मोठे कुरण जे असेल तर ते हे आहे आणि अक्षरशः काही ठराविक लोकप्रतिनिधी काही ठराविक ठेकेदार आणि या महापालिकेतील त्या विभागातील ठराविक अधिकारी यांचे एक रॅकेट बनवुन त्या विभागात कशा प्रकारे काम करतात. कशी महापालिकेच्या बजेटमधील लेखाशिर्ष उडवतात. आणि त्यावेळेला त्यांच्या कामाचा प्रस्ताव सादर करण्याचा जो हेतु आहे. तो हेतु त्या त्या प्रभागामध्ये विकासकाम करण्याचा नसतो तर त्यावर्षीचे जे लेखाशिर्ष आहे. त्यामध्ये जी रक्कमेची तरतुद आहे ती तरतुद केलेली रक्कम कशाप्रकारे खर्च होईल. याच्यावरती त्यांचा जास्त भर असतो. परंतु त्याची जबाबदारी प्रशासनाचा प्रमुख म्हणुन आपल्यावर असते. ही अशी अनेक कामे

जेव्हा प्रस्तावित होत असतात. त्यातील नेमकी कोणती कामे मंजुर करावीत व कोणती कामे मंजुर करू नयेत. हे द्गोवटी आपल्या हाती असते. त्याची चौकद्गाी करण्याची मागणी मी त्या पत्रामध्ये केली होती. ती चौकद्गाी कितपत झाली मला माहित नाही परंतु तो मुददा आपण आपल्या भा८ाणामध्ये स्विकारलेला दिसतो. आयुक्त महोदयांच्या निवेदनामध्ये असे आले आहे की, स्थायी समितीने तयार केलेले अर्थसंकल्प अवास्तव असल्याने व त्या प्रमाणात उत्त्पन्न येत नसल्याने आर्थिक तुट मोठया प्रमाणावर जाणवत असल्याचे दिसुन येते. अंदाज पत्रकात विविध कामांच्या तरतुदी असल्याने जी कामे प्रस्तावित केली जातात व त्यांना मंजुरी दिली जाते परंतु त्या प्रमाणात उत्त्पन्न प्राप्त न झाल्याने आपण दरव८ीि उत्त्पन्नापेक्षा जास्त आर्थीक दायित्त्व ओढवुन घेतली आहेत. असा आयुक्तांच्या निवदेनामध्ये स्प८टपणे मुददा आलेला आहे. आणि त्यावरून आयुक्तांची ही स्प८टपणे कबुली दिसते अंदाजपत्रकाच्या बाबतीमध्ये की उत्त्पन्नाचा अंदाज न घेता खर्चाचे प्रस्ताव जे आहेत ते मंजुर केले जातात. प्रद्गन असा निर्माण होतो की हे प्रस्ताव मंजुर कोण करतो? त्याची नेमकी प्रक्रिया काय आहे, मंजुर करण्याची? स्थायी समिती किंवा महासभा मोठे प्रस्ताव मंजुर करत असतील परंतु ते प्रस्ताव सुरवातीला प्रद्गाासनाकडुन पुढे येत असतात. त्यामुळे प्रद्गाासनाला याबाबतीतील जबाबदारी टाळता येणार नाही हे या ठिकाणी स्प८टपणे नमुद करणे आवद्गयक आहे. आणि जर अद्गाी मंजुरी होत असेल तर जमेचा अंदाज नसताना खर्चाचे प्रस्ताव मंजुर होत असतील एका पाठोपाठ एक एक असे त्याची नेमकी जबाबदारी कोणाची असते आणि असे प्रस्ताव जेव्हा लेखा विभागाकडुन येत असतात. तेव्हा लेखा विभाग त्यावर टिप्पण्या करत असताना नेमकी कुठली परिस्थिती डोळयासमोर ठेवुन टिप्पण्या करत असतो. आणि त्याच वेळेला लेखा परिक्षक विभाग यावर कद्गाा प्रकारच्या टिप्पण्या करत असतो. याची खरे म्हणजे गंभीर चौकद्गाी होणे आवद्गयक आहे. जर एखादया खर्चाच्या अनेक अनेक प्रस्तावामुळे या महापालिकेचे अंदाजपत्रक म्हणजे संपुर्ण विकासाची घडीच जर कोलमडणार असेल तर हा वि८ाय मला असे वाटते की अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे आणि त्या पध्दतीने त्यावर विचार केला पाहिजे. मी पुन्हा एकदा माझ्या मागच्या व८ीिच्या मुददयाचा पुर्नउच्चार करू इच्छित आहे. मी याठिकाणी बघितले की अनेक ठेकेदार यांच्याकडे अनेक कामांचे कार्यादेद्गा प्रलंबित आहेत. खरे म्हणजे एखादया कार्यादेद्गााप्रमाणे ठराविक कालमर्यादेमध्ये त्यांनी काम सुरू करणे आवद्गयक असते. तद्गया प्रकारचे काम वेळेमध्ये सुरू होत नाही. त्याबददल त्या ठेकेदाराला कुठल्याही प्रकारचा मेमो, नोटीस स्मरणपत्र दिले जात नाही. काम जरी सुरू झाले तरी त्या कामाचा एक ठराविक कालावधी असतो. त्या कालावधीमध्ये ते काम पुर्ण होत नाही. त्याबददल सुध्दा ठेकेदाराला कुठल्याही प्रकारच्या सूचना नोटीस वगैरे दिली जात नाही. पुन्हा तेच प्रकार ........

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>महापौरजी, काही सन्माननिय सदस्य कसे बसले आहेत पहा. सभागृहात कसे बसावे याची त्यांना द्गिास्त द्गिाकवा. मागे तोंड करून बसले आहेत. बजेटवरील भा८ाण चालु आहे काय गंमत आहे काय? गंमत करायची असेल तर चला घरी जावून येवु या. नंतर भा८ाण करू या.

<u>मा. महापौरः-</u>कुणीही सन्माननिय सदस्य मागे तोंड करून बसणार नाहीत. समोर तोंड करून बसावे.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>आणि ज्यांच्याकडे अद्गाा प्रकारची अनेक कामे पुर्वीपासुन प्रलंबित असतात असे ठेकेदार पुन्हा पुन्हा जावुन त्या ठिकाणची कामे मिळवितात. ती कद्गाी काय मिळवितात आपल्या बांधकाम विभागातील कर्मचारी, अधिकारी, अभियंते हे त्यावेळेला नेमके काय करत असतात. ही कामे पुन्हा पुन्हा ज्यांच्याकडे आधीच प्रचंड कामे प्रलंबित आहेत. त्यांनाच कामे पुन्हा पुन्हाच कद्गाी मिळतात. आणि मग त्या ठेकेदाराने पुर्वीचे काम पुर्ण

करण्यासाठी आम्हाला एखादा चेक दया. आम्हाला एखादा चेक दया. ठराविक एक रक्कम दया. हे दुष्टचक्र या महापालिकेत निर्माण झालेले असते. हे आपल्या कडुन खरे म्हणजे रोखले गेले पाहिजे होते अशी अपेक्षा होती. परंतु अत्यंत हतबलतेने आपण यावर टिप्पणी केली आहे. त्या पचनी पडणा-या नाहीत. आपण सुरवातीला आपल्या निवेदनामध्ये म्हंटले आहे की, प्रशासनाचे कर दरवाढीचे प्रस्ताव लोकप्रतिनधींना पचनी पडणारे नाहीत याची जाणीव असुनही कर्तव्य भावनेतुन नव्हेत तर शहर विकासाची दुरदृष्टी व सामाजिक बांधिलकीच्या भावनेतुन सदरचे प्रस्ताव सुचविण्यात आले आहेत. असे आपल्या निवेदनामध्ये आले आहे. मला असे वाटते की, थोडे पुढे जावुन सामाजिक बांधिकलकीच्या भावनेतुन नको तर कर्तव्याच्या भावनेतुनच जर असे प्रस्ताव सुचविले गेले आणि त्याची अंमलबजावणी केली गेली तर कदाचित ते जास्त परिणामकारक होईल. या ठिकाणी ‘‘ विशेष अधिनियमातील वसुली ’’ या लेखा शिर्षाखाली असे म्हंटलेले आहे की, मालमत्तेचा विकास करताना.......

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचाः-</u>जरा हिंदीत बोला. हिंदीत बोला. मराठी आम्हाला समजत नाही. म्हणुन जरा हिंदीत बोला.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः-</u>मला हिंदी बोलता येत नाही. खाजगी मालमत्तेचा विकास करताना विकासकांनी दयावयाच्या अधिभारापोटी ११ लक्ष महसुल प्राप्त झाला असे म्हंटलेले आहे. या शहरामध्ये आज मोठया प्रमाणावर अनाधिकृत बांधकामे सुरू आहेत. आणि विशेषतः रस्ता रूंदीकरणामध्ये जी अनाधिकृत बांधकामे होत आहेत त्यांच्याकडे सहानुभूतिच्या दृष्टीकोनातुन म्हणा किंवा अन्य दुस-या कुठल्या दृष्टीकोनातुन, मानवतेच्या दृष्टीकोनातुन म्हणा. त्याकडे आपण दुर्लक्ष केले आहे. ज्यावेळेला अशा बांधकामांचे परवानगीसाठी अर्ज महापालिकेकडे येत नसतात. तेव्हा आपण विकास शुल्कावर तर पाणी सोडतच असतो. शिवाय त्याचबरोबर त्याच्या बांधकाम साहित्याच्या स्टॉकींग चार्जेसवर आपण पाणी सोडत असतो. जर एका दुस-या बाजुला जावुन आपला जो आरोग्य विभाग आहे. त्यांना याबाबतीत दंड वसुल करण्याचे अधिकार आहेत. जर या बांधकामाच्या ठिकाणी जावुन अशा प्रकारचा दंड जरी स्टॉकींग चार्जेस एवढा जरी वसुल करता आला असता तरी ते एक चांगले उत्पन्न उल्हासनगर महानगरपालिकेला एकापरीने मिळु शकले असते. दुस-या बाजुला जी मागील वर्षाचे दायित्त्व, या मुददयावर एक उल्लेख आला आहे. तो सुध्दा एक गंभीर उल्लेख आहे. त्यामध्ये असे म्हंटले आहे की, केवळ अदांजपत्रकात तरतुद केली म्हणुन सी.सी. पॅसेज दुरूस्ती, नविन नाले बांधणी, दुरूस्ती, समाजमंदीर बांधणे, एम-२५०, ३५०, अंतर्गत रस्ते, पायवाटा बांधणे, रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण करणे अशा स्वरूपांच्या अनियोजित व अनावश्यक कामांवर अनियंत्रित खर्च केल्यामुळे महापालिकेचे वित्तिय व्यवस्थापन कोलमडले आहे. हा खरे म्हणजे अत्यंत आश्चर्यकारक असा प्रशासनाचा अभिप्राय आहे. प्रशासनाने खरे म्हणजे कुठल्याही नगरसेवक किंवा लोकप्रतिनीधीं हे शिफारशी करणारे लोक आहेत. ते आपल्या प्रभागामध्ये अनेक प्रकारची विकास कामे सुचविणे हे नगरसेवक म्हणुन त्यांचे काम आहे परंतु त्याच वेळेला त्या सुचविलेल्या कामांना योजनाबध्द पध्दतीने त्याची अंदाजपत्रके, प्राकलने तयार करणे ते काम खरे म्हणजे आवश्यक आहे किंवा नाही. हे पाहणे प्रशासनाची जबाबदारी असते. मी असे पाहिलेले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाची जी प्राकलने आहेत त्या कामांचा जो फॉर्म आहे त्या फॉर्म मध्ये एक रकाना आहे कामाची आवश्यकता आहे किंवा नाही? आणि त्या ठिकाणी आपला शाखा अभियंता किंवा जे कुणी अधिकारी त्या रकान्यामध्ये माहिती लिहित असतात, ‘होय’ म्हणुन आणि त्याठिकाणी लिहिले गेले की कामाची आवश्यकता आहे काय? ‘होय’., त्यानंतर ते काम पुढे सरकुन मंजुर होत असते. परंतु अशाप्रकारची प्रक्रिया प्रशासनामध्ये चालत असतानाही अनियोजित आणि अनावश्यक कामांवर अनियंत्रित खर्च झाला आहे अशा प्रकारचे प्रशासनाचे जे शेरे आहेत ते आश्चर्यकारक वाटतात. अशा

प्रकारची अनावश्यक कामे गेल्या वर्षभरात कशी काय मंजुर झाली याची खरे म्हणजे चौकशी होणे आवश्यक आहे. प्रभाग समित्त्यांचा मुददा सुध्दा एक गंभिर मुददा आहे. तो या महानगरपालिकेमध्ये किती गांभीर्याने घेतला जातो हा सुध्दा एक मुददा असला तरी आपण नेहमी उल्लेख करतो की, ७४व्या घटना दुरूस्तीमध्ये असलेल्या तरतुदीनुसार प्रभाग समित्त्यांची रचना केली गेली आणि प्रभाग समित्यांच्या रचनांमध्ये शहरातले जे नागरिक आहेत त्यांना त्या त्या भागात जे तिथे राहतात. त्या विभागामध्ये त्यांना प्रशासनाची व्यवस्था, त्यांना सोय मिळणे, सुविधा मिळणे हा खरे म्हणजे प्रभाग समित्त्यांच्या स्थापनेमागचा हेतु आहे. परंतु एकंदरीत आपल्याकडे असे दिसते की जसे जेवणामध्ये तोंडी लावायला लोणचे हवे असते.तशा प्रकारे प्रभाग समित्त्यांची रचना हे एक आवश्यक बाब म्हणुन बंधनकारक असल्यामुळे केली गेलेली आहे. परंतु त्याकामी कुठल्याही प्रकारची निश्चित अशी तरतुद प्रभाग समित्त्यांसाठी केलेलीच नाही. त्याच्या बरोबरीने दुसरे असे की, तिथे होत असलेली कामे, आपण कौतुक करतो की एक चांगली गोष्ट आपल्याकडे झाली. त्याबददल अभिनंदन केले पाहिजे प्रशासनाचे की नागरी सुविधा केंद्र आपल्याकडे सुरू झाले. परंतु त्याची दुसरी जी बाजु आहे की नागरीक सुविधा केंद्रामध्ये सर्व प्रकारची लहान मोठी कामे, दुरूस्त्त्यांच्या परवानग्या यासर्व याठिकाणी आल्यामुळे प्रभाग समित्त्यांच्या कामाचे आपण जे विकेंद्रीकरण म्हणत होतो ते सुध्दा विस्कळीत झाले आहे. आणि त्याची दुसरी बाजुही आपण लक्षात घेतली पाहिजे की आज जन्म आणि मृत्युचा दाखला जो प्रभाग समिती स्तरावर नागरिकांना मिळत होता त्या दाखल्यासाठी सुध्दा नागरिकांना नागरी सुविधा केंद्रात यावे लागते. ही त्याची दुसरी बाजु आपण लक्षात घेतली पाहिजे. आणि तशा प्रकारे नागरी सुविधा केंद्रातुनच तुम्ही दाखले दया. परंतु त्यांची अर्ज स्विकारण्याची किंवा त्यांना प्रदान करण्याची व्यवस्था ही प्रभाग समिती स्तरावर करता येईल का? याचा विचार झाला पाहिजे. दुसरे एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे काही मुददे दुर्लक्षित होतील. अपंग कल्याणाचा कार्यक्रम आणि महिला बालकल्याणाचा कार्यक्रम हे नेहमी राज्य शासनाने व केंद्र शासनाने गांभीर्याने घेतलेले विषय आहेत. परंतु आपण बघतो की आपल्या महापालिकेमध्ये अपंग कल्याणाच्या कार्यक्रमासाठी गेल्या वर्षी ५० लाखाची तरतुद होती. त्यावर एक रूपया सुध्दा गेल्यावर्षी आपण खर्च केला नाही. आणि पुन्हा मला असे वाटते की २५ लाखाची तरतुद आपण ठेवलेली आहे. महिला बालकल्याण विभागाचा जो विषय आहे, विभाग आहे, समिती आहे. ती वैधानिक समिती म्हणुन गृहीत धरली जाते आणि त्या समितीवर आणि आर्थिक दुर्बल घटकांवर एकुण तुमच्या मुळ उत्त्पन्नाच्या ५ टक्के इतकी रक्कम ठेवायला पाहिजे. त्याबाबतीत येथे खुलासा झाला तर बरे होईल. अशी माहिती आहे की, महिला बालकल्याण समितीवर सुध्दा त्या बजेटच्या ५ टक्के एवढी तरतुद असली पाहिजे. अशी तरतुद केलेली काही दिसत नाही. त्यानंतर यु.एन. एफ.पी.ए. चा जो प्रकल्प आहे. त्याच्याअंतर्गत जी काही कामे चालतात त्याचा कुठल्याही प्रकारचा उल्लेख जमा आणि खर्चाच्या बाजुमध्ये आलेला दिसत नाही. गेल्या वेळच्या महासभेमध्ये आपण एक उल्लेख केला होता की, एक घोषणा केली होती की सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना त्यानंतर महिला बालकल्याण ही शासनाची योजना आणि यु.एन.एफ.पी. ए. या सर्वांचे समन्वय करून एक स्वतंत्र महिला बालकल्याण विभागाचा विभाग या महापालिकेमध्ये, याबाबतीतचा उल्लेख तुमच्या निवेदनामध्ये सामाजिक सुरक्षा आणि सामाजिक न्याय या मुददयामध्ये आलेला आहे. अशा प्रकारचा स्वतंत्र विभाग या ठिकाणी स्थापन झाला तर या ज्या योजना आहेत त्यांच्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होवु शकेल. व त्याची परिणामकारक अंमलबजावणीही होवु शकेल. दुसरा एक विषय सुरवातीच्या महासभेमध्ये जेव्हा नविन बॉडी स्थापन झाली होती. तर त्यावेळी लक्षवेधी सूचनेव्दारे महासभेमध्ये नाल्याचा विकास करण्याचा मुददा उपस्थित केला होता. आणि त्यावेळी या सभागृहात बरीच चर्चा झाली होती. त्या चर्चेमधुन तो नाला विकसित करण्याचा विषय उपस्थित केला होता. यावर्षी नाला विकासासाठी जवळ जवळ साडे चार कोटी रूपयांची तरतुद या

अदांजपत्रकामध्ये दिसते परंतु ज्या पध्दतीने रस्ते विकासाचा आपण ठोस कार्यक्रम पुर्ण विचाराने नियोजन करून आपण हाती घेतो. तशा प्रकारचे नियोजन नाला विकास करण्याच्या कामामध्ये, म्हणजे छोटे छोटे नाले प्रत्त्येक नगरसेवकाच्या प्रभागामध्ये, नगरसेवकांच्या शिफारशीप्रमाणे नाल्यांची कामे न करता संपुर्ण शहराच्या दृष्टीने परिणामकारक ठरेल अशा प्रकारे मोठया नाल्यांचा जो विकास आहे त्याची योजना तयार करून या तरतुदीखाली घ्यायला पाहिजे. आपल्या निवेदनामध्ये एकात्मिक सुविधा योजनेचा उल्लेख आहे. परंतु तशी सविस्तर योजना इथे आपण त्यामध्ये दर्शविलेली नाही. शाळांच्या बाबतीत आपण ज्या तरतुदी केल्या आहेत. शाळांच्या इमारतींची दुरूस्ती, कला आणि क्रिडा गुणांना वाव मिळण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांना उपकृत ठरेल अशा प्रकारची तरतुद आपण प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातुन राबविली पाहिजे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे महापालिकेची आर्थिक परिस्थिती अत्त्यंत खराब आहे. हे रडगाणे गात गात गात आपण खाजगीकरणाचा या महापालिकेमध्ये आणि शहरामध्ये इतका अतिरेक करीत आहोत की, प्रत्त्येक गोष्टीत, कोणतीही विकास योजना ही खाजगीकरणाशिवाय होवूच शकत नाही. खरे म्हणजे आपल्या शहरात सपना गार्डनचे एक चांगले उदाहरण आहे की जे महापालिकेने स्वतः विकसित केले आहे. व अत्त्यंत चांगल्या पध्दतीने केले आहे. आज गोल मैदानची सगळी गर्दी सपना गार्डनकडे वळलेली आहे. अशा प्रकारचे उदाहरण आपल्या समोर असतांना आपण पुन्हा-पुन्हा आर्थिक परिस्थितीचे रडगाणे गात खाजगीकरणाचा किती अतिरेक करणार आहोत? कारण खाजगीकरणाचा सर्वात मोठा फटका हा या शहरातील जो तळागाळातील गरीब वर्ग आहे, कारण मी बघितले माझ्या प्रभागात सुध्दा ब्रम्हकुमारीज ने विकसीत केलेलें एक उद्यान आहे. परंतु त्त्या उद्यानात सर्वसामान्य माणसांचा वावर कठिण आहे, प्रवेश कठिण आहे. त्याचा विनियोग, उपभोग हा सर्वसामान्य माणसाला घेता यायला पाहिजे. अशा प्रकारे त्याचा उपयोग व्हायला हवा. पण खाजगीकरणामधून आतापर्यंत जेवढे प्रकल्प झाले आहेत, आपण बघितले की, टाउन हॉलचा जो प्रकल्प आहे तो अदयापपर्यंत रखडलेला आहे. त्यामध्ये कोणतीही प्रगती, प्रशासनाने ठेकेदाराला कोणत्त्याही प्रकारची तंबी दिलेली नाही. तर अशा पध्दतीने केवळ जागा आणि वास्तु या खाजगी करणामध्ये अत्त्यंत स्वस्तामध्ये आपणांस मिळतात. म्हणून त्याचे खाजगीकरण व्हायला नको तर ख-या अर्थाने या शहरातील जो सर्वसामान्य माणुस आहे, तळागाळातील माणुस आहे, गरीब माणुस आहे. त्यांना सुध्दा विकासाची चव घेता आली पाहिजे. अशा पध्दतीने अंदाजपत्रकाची अंमलबजावणी आहे ती करण्याची जबाबदाची प्रशासनाची आहे. याची जाणीव खरे म्हणजे प्रशासनाने ठेवली पाहिजे. आणि ज्या मुददयांवरती काही ठिकाणी जसे सार्व.बांधकाम विभागातील प्रकरणे आहेत तर अशा प्रकरणांवर चौकशीची मागणी मी या महासभेत जाहिररित्त्या केलेली आहे. मला असे वाटते की, आयुक्त या मुददयांची गंभीरपणे दखल घेतील. आणि अशया प्रकारची चौकशी करतील. दुस-या एका भाषणाची आठवण त्यांना करून देतो. त्यांनी असे म्हटलेले आहे की, नागरीकांना समजावणे ही लोकप्रतिनिधींची सुध्दा जबाबदारी आहे. लोकप्रतिनिधी तुम्हांला चांगल्या प्रकारे सहकार्य करण्याचा प्रयत्त्न करतील. परंतु वेगळया वाटेने जाणा-या लोकप्रतिनिधींना सहकार्य करण्याची इच्छाशक्ती ही प्रशासनामध्ये किती आहे? हे येत्त्या आर्थिक वर्षामध्ये शहराला दिसू दया. एवढी अपेक्षा व्यक्त करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> मा. महापौर महोदया, ............

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :-</u> सन्माननिय महापौरजी, उपमहापौरजी, स्थायी समिती सभापती व आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापतींना माझे निवेदन आहे, त्यांनी प्रत्त्येक शिर्षामध्ये निधी दर्शविला आहे. उल्हासनगरसाठी अर्थसंकल्पात अजून एक लेखा शिर्षक दाखवायला हवे. जे महाराष्ट्राच्या कोणत्त्याही महापालिकेत नसेल. परंतु येथे बनवायला हवे कारण हे

उल्हासनगर आहे येथे काहीही होवू शकते. आमच्या सदस्यांना मराठी येत नाही. यासाठी त्यांना महापालिका निधीतून शिकवणी दिली जावी. अशा एका लेखा शिक्षकाची निर्मिती केली जावी. कारण येथे बोलतांना काही सदस्य मराठी येत नाही म्हणून हिंदीतून बोलावे असे सांगतात. अशा सदस्यांना महापालिकेने स्वतःच्या खर्चाने मराठी शिकवावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-</u> मा. महापौर महोदया, उप-महापौर महोदया, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेता व सभागृहातील सर्व सदस्य अर्थसंकल्प बघितल्यावर व स्थायी समिती सभापतींचे भाषण ऐकल्यावर मला एका गोष्टीत संशय येत आहे की, काही दिवसांपूर्वी जो सत्ताधारी पक्ष सभागृहामध्ये सभेचा त्याग करुन जमिनीवर बसले कारण मा. आयुक्त साहेबांनी जी करवाढ केली होती ती जोपर्यंत मागे घेत नाहीत तोपर्यंत सभा चालू देणार नाही. आज पर्यंत करवाढ रद्द झालेली नाही. त्यानंतरही या अर्थसंकल्पात तोच कर पुन्हा आणला आहे. तर मला असा संशय येत आहे की, आयुक्त साहेबांनी जी करवाढ केली आहे, त्याच्या मागे सत्ताधारी पक्षाचा हात असू शकतो. व तो फक्त देखावा होता. लोकांची दिशाभूल करण्यासाठी सभागृहात २ वेळा सभात्याग करण्यात आला. व ती सभा आजपर्यंत स्थगित आहे. जमिनीवर बसून एक नविन नाटक सभागृहात करण्यात आले. जर हे नाटक झाले नसते तर या अर्थसंकल्पात त्या करवाढीला संपविण्यात आले असते. तसेच स्थायी समिती अध्यक्षा म्हणत आहेत की, मला पाचव्यांदा अर्थसंकल्प सादर करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले आहे. तर मी असे म्हणेन की, मा. स्थायी समिती सभापतींना पाच वेळा सौभाग्य प्राप्त झाले आहे व उल्हासनगरला दुर्भाग्य प्राप्त झाले आहे.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :-</u>माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा. महापौर महोदया, आम्ही अजूनही त्या करवाढीच्या विरोधात आहोत.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः-</u>आमचे दुर्भाग्य आहे की, आम्हांला आपले म्हणणे ऐकावे लागत आहे. तुम्हाला शोभेल असे बोला. तुम्ही असे बोलुन मा. सभापतींचा अपमान करत आहात.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>शहराचे दुर्भाग्य आहे असे ते म्हणाले यामुळे सभापतींचा अपमान होत नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>हे आमच्या शहराचे सौभाग्य आहे. व संपुर्ण शहर याला आपले सौभाग्य मानते व यासाठी या शहराने ही सत्ता राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व आरपीआयला दिलेली आहे. संपुर्ण शहर आमच्या सोबत आहे. ही शहरासाठी सौभाग्याची बाब आहे. श्री. जमनु पुरस्वानी यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावेत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मी पुन्हा एकदा म्हणत आहे की हे शहराचे दुर्भाग्य आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u> हे आमचे दुर्भाग्य आहे की आम्ही आपणांस सहन करत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>सभापतींचा अपमान आपण लोकांनी केला आहे. आपणच त्यांना ''शेम शेम'' म्हणालात.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आम्ही श्री. जमनु पुरस्वानी यांना शेम शेम केले. त्यांना याची लाज वाटायला हवी. ते जे शब्द वापरत आहेत यासाठी त्यांना लाज वाटायला हवी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः-</u>सभापतींचा अपमान तुम्ही लोकांनीच केला आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>तुम्ही असे म्हणुन लोकांचा अपमान करीत आहात.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>लोकांचा अपमान तेव्हा होतो जेव्हा........

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>श्री. जमनु पुरस्वानी आपण स्वतःवर नियंत्रण ठेवावे. व जे चुकीचे बोलत आहात ते कृपा करून मागे घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मी पुन्हा एकदा म्हणत आहे की हे या शहराचे दुर्भाग्य आहे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>शहराचे दुश्मन श्री. जमनु पुरस्वानी आहेत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>वारंवार करवाढ, ............

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आम्ही आपले हे शब्द सहन करणार नाही. हे तुम्ही वारंवार एकच गोष्ट बोलत आहात. जेव्हा बहुसंख्य सदस्यांना आपल्या वक्तव्याबददल आक्षेप असताना आपण पुन्हा पुन्हा असे का बोलत आहात. आम्ही आपले प्रस्ताव शांततेने ऐकत आहोत तर आपण असे का बोलता.

<u>मा. पीठासीन अधिकारीः-</u>कृपया शांतता राखावी. अर्थसंकल्पावर चर्चा करावी.

<u>मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>श्री. जमनुजी आपण अर्थसंकल्पातील परिस्थिती व आकडेवारीवर बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः-</u>तुम्ही काय ठेका घेतलेला नाही सत्तापक्ष बघण्यासाठी आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>कमीत कमी श्री. जमनु पुरस्वानी यांनी यावर चर्चा करायला नको. चार वर्षापुर्वी यांनीच करवाढ केली होती. हे विसरले का?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>जेव्हा आपली वेळ येईल तेव्हा आपण बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आम्ही कोणाही सदस्यास अडथळा केलेला नाही. येथे सर्व शांततेने ऐकत आहेत. आपला काही सल्ला असेल तर तो शहराच्या हितासाठी समोर आणावा. परंतु अशाप्रकारे टिका टिप्पणी करून आपण शहराचाच नाही तर लोकांनी दिलेल्या कौलाचाही अपमान करत आहात. व हे पुर्ण शहर सहन करणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>जर आपण जनादेशाचा सन्मान करीत नसाल तर जसे आपणांस योग्य वाटेल तसे करा.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-लोकांची दिशाभुल करून जनादेश प्राप्त करणे व वारंवार करवाढ करणे..........

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः</u>-मा. महापौर महोदया, सदस्य बोलत आहेत......

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहेत ते नेमके कळुन येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः</u>-तुम्ही वारंवार तीच गोष्ट का बोलत आहात? पुढे बोला ना.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहेत ते नेमके कळुन येत नव्हते.

<u>मा. पीठासीन अधिकारीः</u>-मी सर्वांना विनंती करते की कृपया शांतता राखावी. श्री. जमनुजी मी आपणांस निर्देश देते की आपण फक्त अर्थसंकल्पावर व वस्तुस्थितीवर चर्चा करावी.

<u>मा. सदस्य श्री.नारायण पंजाबीः</u>-आधी आपले शब्द मागे घ्यावेत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-मी काहीही चुकीचे बोललेलो नसल्याने शब्द मागे घेण्याचा प्रश्नच उदभवत नाही. या अगोदर जेव्हा मालमत्तेप्रमाणे पाण्याचे देयक स्थायी समितीमध्ये मंजुर झाले. प्रत्येक सदनिकेकडुन रूपये १०० व प्रत्येक बॅरेकमधुन रू. ६० याप्रकारचा जेव्हा प्रस्ताव आला त्यावेळी आम्ही प्रश्न उपस्थित केला होता की मा.महापौर महोदया, अशा प्रकारे आवाज केल्यास आम्ही अर्थसंकल्पाची बैठक चालु देणार नाही. तुमच्या सदस्यांना साधी अक्कल नाही.....

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः</u>-आपण असे कसे बोलता. आम्ही आपणांस बोलु देणार नाही.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहेत ते नेमके कळुन येत नव्हते.

<u>मा. पीठासीन अधिकारीः</u>-मी सर्वांना विनंती करते की आपण आपल्या जागेवर बसावे व सभागृहात शांतता राखावी. तसेच आपण वस्तुस्थितीवरच बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः</u>-श्री. जमनुजी आपण बोलावे मात्र आपण आपले विचार येथे सांगा, आकडयांवर, वस्तुस्थितीवर बोला. आम्ही आपले बोलणे शांततेने ऐकत आहोत.

<u>मा. पीठासीन अधिकारीः</u>-सर्वांना विनंती आहे की शांतता राखावी. श्री. जमनुजी आपणांस विनंती आहे की आपण वस्तुस्थितीवर व आकडेवारीवरच बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः</u>-मा. महापौर महोदया, यापुर्वी जेव्हा पाणीपट्टीची देयके सदनिकेप्रमाणे व बॅरेकप्रमाणे दिले होते त्यावेळी मी आक्षेप घेतला होता की ब-याचशा लोकांकडे व ब-याचशा सदनिकांमध्ये फक्त एक अथवा दोन जोडण्या आहेत. मग त्यांच्याकडुन रूपये १०० प्रमाणे देयक कसे काय घेणार? त्यावेळी आमच्या स्थायी समिती सभापती श्रीमती ज्योती कलानी यांनी आम्हाला सांगितले होते की जो या शहरामध्ये राहतो. मग तो कोणत्त्याही सदनिकेत अथवा खोलीत रहात असेल तो या शहराचे पाणी वापरत आहे. त्याच्याकडे जोडणी असो अथवा नसो तो महापालिकेचे पाणी वापरतो. ज्यांना

पाणी येत नाही त्यांना आपण टँकरने पाणी देतो व पाण्याची पुर्तता करतो. त्यामुळे आपला अधिकार आहे की आपण त्यांच्याकडुन रूपये १०० प्रमाणे बिल घ्यावे. व आम्ही त्यांच्या बोलण्याचा सन्मान ठेवुन ते स्विकारले होते. त्यानंतर आयुक्तांद्वारे टँकरच्या भाडयाचा जो प्रस्ताव आला होता रूपये २५० व रूपये ३०० प्रती टँकर प्रमाणे . या सभागृहाचे सर्व सदस्य मग ते सत्ताधारी पक्षाचे असोत अथवा विरोधी पक्षाचे असोत त्यांनी सर्व संमतीने तो प्रस्ताव फेटाळला होता. ही गोष्ट सभागृहातील सर्व सदस्यांना माहित आहे. स्थायी समिती सभापती यांनी देखिल त्याचा विरोध केला होता परंतु दुर्भाग्य या गोष्टीचे आहे की आज पुन्हा त्याच गोष्टीला, स्थायी समिती सभापती देखिल त्याच आहेत. सभागृहातील सदस्य देखिल तेच आहेत. अशाप्रकारे शहरातील जनतेकडुन टँकरसाठी रूपये २५० घ्यावेत ही एक दुःखद बाब आहे. आज ब-याचशा झोपडयामध्ये टँकर जातो. जेथे टँकर १००-२०० घरांमध्ये वाटला जातो. ज्यामधुन लोक १००-२०० लिटर पाणी घेवुन जातात. मला हे समजत नाही की याप्रकारचा जो प्रस्ताव आणला आहे त्याप्रमाणे झोपडपट्टीतील लोक कशाप्रकारे २५०, ३०० रूपये भरतील. तसेच यामध्ये जकात दरात वाढ दाखवली आहे. काल अर्थसंकल्पाच्या सभेस सुरूवात होण्यापुर्वी श्री. किशोर वनवारी यांनी एक पत्र माझ्या हातात दिले त्यांचा उददेश असा होता की, आपण सुध्दा जकात दरात वाढ केली होती व १९९९-२००० मध्ये त्याचा अनुमोदक मी होतो. श्री. किशोर वनवारी यांनी माझ्या हातात पत्र दिले याबददल मी सांगु इच्छितो की जेव्हा नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत झाले त्यावेळी आमच्या जकातीचे उत्पन्न रूपये १८ कोटी होते. या शहराचे विकासकार्य जे आमच्या वेळेस झाले आजही सर्वांच्या तोंडावर आहे की जे ३३ रस्ते . ३३ रस्ते आम्ही बनवले. त्यानंतर पाच वर्षात काय विकासकार्य झाले आहे हे येथे कुणी सांगेल काय? ३३ रस्त्यांचे विकासकार्य करण्यासाठी १९९९ मध्ये आम्ही जकात दरात वाढ केली होती. त्यावेळी जकातीपासुन रूपये २५ कोटी मिळत होते. आज तेच उत्पन्न रूपये ७० कोटी प्राप्त झाल्यानंतरही ५ कोटी वाढवत आहेत. जेव्हा अंबरनाथ मध्ये जकात सुरू होती. त्यावेळी या शहरातील व्यापा-यांना काही त्रास नव्हता. कारण अंबरनाथ येथेही जकात होता. परंतु आज अशी स्थिती आहे की अंबरनाथमध्ये जकात नाही. अशाप्रकारे जकातीत वाढ करून आपण येथील व्यापा-यांना शहराच्या बाहेर पाठविण्याचा एक नविन मार्ग काढला आहे. आज आपण यामध्ये धान्य, पेट्रोल, कपडे या सर्व गोष्टींवर जकात वाढ दर्शविली आहे. गरीबातील गरीब व्यक्ती व श्रीमंतातील श्रीमंत व्यक्तींना याची शिक्षा भोगावी लागेल. याप्रकारचा अर्थसंकल्प येथे सादर करण्यात आलेला आहे. व अशा अर्थसंकल्पाची स्तुती केली जाते ही एक शरमेची बाब आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आपण पुन्हा शरमेची गोष्ट काढत आहात. आपणांस चांगली भाषा वापरता येत नाही का? आम्हाला लाज वाटते.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>आपण सरळ का नाही बोलत?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:-</u>आपणांस लाज वाटत असेल तर आपण बाहेर जावु शकता.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:-</u>तुम्ही सभ्य भाषेत बोलु शकत नाही का?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:-</u>आता आम्ही यांना बोलुच देणार नाही.तुम्ही नेहमी काहीही बोलता.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:-</u>तुम्हाला लाज वाटत नसेल परंतु आम्हाला लाज वाटते.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>सभागृहात कसे बोलावे हे त्यांना माहित नसल्याने ते असे बोलत आहेत. कृपया त्यांना शिकवावे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, माझी एक सूचना आहे की आमच्या श्री. महाराज भुल्लर यांनी थोडया वेळापुर्वी एक सूचना केली होती की एक विशेष निधी स्थापन केला जावा. व त्यातून सदस्यांना मराठी शिकविले जावे. मी असे सांगेन की, सभ्य भाषेचा उपयोग करण्यासाठी श्री. जमनु पुरस्वानी यांच्या नावाने एक निधी बनविण्यात यावा.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>यांना शिकविण्यासाठी एका शिक्षकाची नियुक्ती करण्यात यावी जेणेकरून यांना देखिल असा अर्थसंकल्प पाहुन लाज वाटेल.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत असल्याने कोण काय बोलत आहेत ते नेमके कळुन येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>आम्ही वारंवार आक्षेप घेवुन देखिल ते शरमेची बाब येथे काढत आहेत. आधी त्यांनी स्वतःची शरम बघायला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>मा. महापौरजी, यांचे संतुलन बरोबर नसल्याचे दिसुन येत आहे. त्यांनी काही न बोलता खाली बसावे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>यांची मानसिक अवस्था व्यवस्थित नाही.

<u>मा. सदस्य श्री. देवेंदसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, श्री. जमनु पुरस्वानी यांच्या आधी श्री. दिलीप गायकवाड व श्री. लाल पंजाबी, श्री. भुल्लर महाराज बोलले, श्री. राज असरोंडकर बोलले. आम्ही सर्वांचे ऐकुन घेतले. परंतु हे वारंवार प्रक्षोभक भाषेत बोलुन आम्हाला भडकवत आहेत. हे असे चालणार नाही. तुम्हाला बोलायचे असेल तर सरळ बोला नाही तर बाहेर निघुन जा.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>यांना एक वेळ माऊन्टअबु येथे प्रशिक्षणासाठी पाठवा.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण सुरू नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मला माहिती आहे. आम्ही तर प्रत्येक महासभेचे प्रक्षेपण दाखविण्याच्या बाजुने आहोत जेणेकरून लोक तुमचे विचार ऐकु शकतील.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबानाः-</u>विचार पण ऐकतील आणि तुमची घाणेरडी भाषा देखिल ऐकतील.

<u>मा. सदस्य श्री. सुरेश जाधवः-</u>श्री. जमनुजी आपण खाली बसावे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबीः-</u>श्री. देवेंदसिंग खेमाणी पुढच्या वेळी प्रशिक्षणासाठी श्री. जमनु पुरस्वानी यांना सोबत घेवुन जावे अशी माझी विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>जर आमच्या बोलण्यात मध्ये कोणी अडथळा आणला तर आम्ही सभा चालु देणार नाही.

<u>मा.महापौरः-</u>बरीच चर्चा झाली आहे. वेळेचा देखिल विचार करायला हवा. सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की बरीच चर्चा झाली आहे. पुढील कार्यक्रमाचा विचार करून बोलावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः-</u>मा. महापौर महोदया मी स्थायी समिती सभापतीना विनंती करेन की, ज्या करवाढीच्या विरोधात सत्तापक्ष जमिनीवर बसला होता. त्या करवाढीला अर्थसंकल्पातुन रदद करण्यात यावे. पाण्याच्या टॅकरवर जे शुल्क आकारले आहे ते रदद करण्यांत यावे. जकात दरवाढ रदद करण्यांत यावी. बाकी शहरातील जनता जी येथे चांगल्या प्रकारे रहात आहे. ती याच प्रकारे पुढेही राहु शकेल एवढे सांगुन माझे दोन शब्द संपवतो कारण काही सदस्य माझे बोलणे सहन करू शकत नाही. एक म्हण आहे ''सतसैया के द्वारे, रामचंद्र के तीर, देखन में छोटे लगे, घाव करें गंभीर''.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणीः-</u>मा. महापौरजी, श्री. जमनु पुरस्वानी जर त्यांच्या असभ्य भाषेला श्रीरामचंद्राचे बाण म्हणत असतील तर मला लाज वाटत आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>असभ्य भाषेत बोलु नये. मा. महापौर महोदया, आयुक्त महोदय, स्थायी समिती सभापती, सचिव महोदय, विरोधी पक्षनेता, सर्व गटनेते, उपस्थित सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी वर्ग व प्रेक्षागृहात उपस्थित असलेले सन्माननिय नागरिक व पत्रकार बंधु मला हे माहित आहे की, श्री. राजेंद्र चौधरी यांनी आठवण करून देवु नये, श्री. लाल पंजाबी हे निघुन गेले आहेत. सर्व प्रथम राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, उल्हासनगर तर्फे या अर्थसंकल्पाचे मी स्वागत करण्यासाठी येथे उपस्थित झालो आहे. परंतु येथे काही सूचना व निवेदन माझ्या पक्षाच्या वतीने स्थायी समिती सभापती, महापौर व आयुक्त महोदयांसमोर ठेवु इच्छितो. आमचे भारतीय जनता पार्टीचे गटनेता श्री. लाल पंजाबी यांनी दिशा व दशेवर बरेच सांगितले. महानगरपालिकेच्या हलाखीच्या आर्थिक स्थितीबददल बरेच काही सांगितले. जकात दरवाढीबाबत बरेच काही सांगितले पेट्रोलियम पदार्थाच्या जकात दरवाढीबाबत देखिल त्यांच्या भावना प्रकट केल्या. आम्ही त्यांच्या भावनांची कदर करतो. परंतु आपण हे का विसरतो की या शहरामध्ये महानगरपालिका जर आणली नसती तर आज हा जकात दरवाढीचा बोजा आपल्यावर आला नसता. महानगरपालिका आणण्याचा जो प्रयत्न झाला व तथाकथित स्वरूपात या शहराला एक बक्षिस देण्याचा जो एक प्रयत्न झाला. त्यावेळी आम्ही ओरडत होतो की, येथे जी महापालिका आणली जात आहे. येत्त्या काळात आपण तो भार सहन करू शकत नाही. येणा-या पीढया आम्हाला शिव्या घालतील की तुम्ही हे काय केले? महानगरपालिकेला येथे आणल्या नंतर आमच्यावर पाणी पुरवठा विभागाचा एक बोजा ठेवला गेला. आमचे आमदार श्री. पप्पु कलानी जेव्हा नगराध्यक्ष होते १९८६ मध्ये या शहरात एवढा विकास झाला की, कल्याण, ठाणे, मुंबई व अन्य महापालिका क्षेत्रात व दक्षिण अफ्रिका येथील लोक येथे विकास कसा झाला ते बघण्यासाठी येत होते. तो विकास आमचे आमदार मा. श्री. पप्पु कलानी यांनी करून दाखवला होता. विकास कसा करायचा हे आम्हाला माहित आहे. या शहराच्या विकासासाठी आम्ही कटीबध्द आहोत. आम्हाला मा. आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे यांची साथ प्राप्त झाली आहे. ते एक चांगले अधिकारी आहेत. अशावेळी आम्ही शहराचा विकास करणार नाही असे कसे शक्य होईल. आमची ही जी नीती आहे,जी नियत आहे त्यावर या शहरातील जनतेला अजिबात संदेह नाही. जर संदेह असता तर ज्या ज्या वेळी निवडणूक झाल्या त्यावेळी शहरातील जनता श्रीमती ज्योती कलानी व श्री. पप्पु कलानी यांच्या नेतृत्त्वाखाली एक झाली नसती. सर्व विरोधी पक्ष एकत्र झाले परंतु आमचे आमदार श्री. पप्पु कलानी व श्रीमती ज्योती कलानी एका बाजुस आले. व त्यानंतर या शहराचा जनादेश आला की, आपल्या निति व नियतीवर या शहराला अजिबात संदेह नाही. व हे शहर

निसंशयपणे तुमच्या हातात सुरक्षित आहे. जकात दरवाढ करण्याचे दुःख जसे आपणांस आहे तसे आम्हास देखिल आहे. कारण या शहराच्या विकासाची नैतिक जबाबदारी आमच्यावर आहे. या शहरातील जनतेने आपणांस सुध्दा एक वेळा संधी दिली होती. त्यावेळी आपण किती बाबींमध्ये जकात वृध्दी केली याची पुर्ण माहिती माझ्याकडे आहे. त्या आकडेवारीला कुणी नाकारू शकत नाही. व आज जेव्हा कपडयाच्या एका मीटरवर फक्त २० पैशाच्या वाढीची बाब येते. तर एवढा गोधंळ का होतो. पेट्रोलियम पदार्थावर २५ पैसे वाढविण्याची गोष्ट येते तर एवढा गोधंळ होतो. तुमच्या श्री. वाजपेयी यांच्या काळात गॅस सिलेंडरची किंमत रूपये ३०० झाली. तेव्हा तुमच्या तोंडाला टाळे लागले होते. तो शहरावर बोजा नव्हता का? तो जनतेवर बोजा नव्हता का? तुमची जनतेच्या प्रती जबाबदारी नव्हती का? त्यावेळी आपण का ओरडले नाही? त्यावेळी आपण आवाज का उठवला नाही. ६० रू. चा गॅस सिलेंडर रूपये ३०० वर पोहचला. आणि आता फक्त एका मीटरमागे कपडयावर २० पैशाची वाढ होत आहे. तर आपण धरणे देता. आम्ही सत्तापक्षवाले लोकांसाठी खुर्च्या सोडुन जमिनीवर बसलो यासाठी तुम्ही आमचा सन्मान करायला पाहिजे. जे काम विरोधी पक्षाचे होते ते आम्ही केले. कारण आता श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी सांगितले शहराचा विकास होत नाही. मी त्यावर बोलतो. श्री. बच्चारामजी जेव्हापासुन आमची सत्ता आली आहे. आपण सांगा की आपल्या प्रभागात किती विकासाची कामे झाली आहेत? ही आमची राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व आरपीआयची नीती आहे, श्री. रमेश चव्हाण यांनी त्यांच्या प्रभागात विकासाची किती कामे केली? श्री. बोडारे साहेब तुमच्या प्रभागात किती कामे झाली? आम्ही काही भेदभाव करत नाही. पुर्ण शहर आमचे आहे. तुम्ही माझे ऐकत आहात यासाठी मी आपणांस धन्यवाद देतो. तुम्हाला माझे ऐकावे लागेल कारण तुमचा नाईलाज आहे. आम्ही देखिल तुमचे ऐकुन घेतले आहे. म्हणुन मी श्री. जमनु पुरस्वानी यांच्या प्रमाणे वागणार नाही. ज्यामुळे सभागृहाच्या मर्यादेला कलंक लागेल व असभ्य भाषेची येथे परंपरा सुरू होईल. असे कोणतेही व्यक्तिगत लांच्छन कोणावर लावणार नाही. कारण की आमच्याकडे आकडेवारी आहे. या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी बरेच काही आहे. आमच्या आयुक्त साहेबांनी एक अर्थसंकल्प स्थायी समितीत सादर केला होता. ते एखादया माते प्रमाणे आमच्याकडे आले होते की मुलगा आजारी आहे. जकात दरवाढ जरूरी आहे. पाण्याची वाढ करणे जरूरी आहे. महापालिकेची हलाखीची आर्थिक परिस्थिती पाहुन आम्हाला असे वाटले की, आयुक्त जे म्हणत आहेत त्यामध्ये एक कटु सत्य आहे. या शहराच्या प्रती जबाबदारी देखिल आम्हाला निभवायची आहे. या शहरावर करांचा कोणताही बोजा न टाकता शहराचा चौमुखी विकास करणे यालाच क्रांतीकारी नेतृत्त्व असे म्हणतात. जे श्रीमती ज्योती कलानी यांच्याकडे आहे, जे आमचे आमदार श्री. पप्पु कलानी यांच्याकडे आहे. जर आमच्याकडे १०० रूपये आहेत व बाजारात जावुन १०० रू.ची वस्तु आणली तर हे काम लहान मुले देखिल करू शकतात. परंतु हातात काही नसताना देखिल शहराचा विकास करून दाखवणे यालाच म्हणतात की श्रीमती ज्योती कलानी व श्री. पप्पु कलानी. मा.महापौर महोदया, आमच्यासाठी गर्वाची बाब आहे की, आता काही तासांमध्येच आमच्या भाभी श्रीमती ज्योती कलानी महापौर बनणार आहेत. हे शहर एका नविन युगात प्रवेश करणार आहे. ही बाब त्या स्वतः देखिल जाणतात की येणा-या वर्षात महापौर बनुन मला शहराला विकासाच्या रस्त्यावर पुढे न्यायचे आहे. व यासाठीच हे क्रांतीकारी अंदाजपत्रक आपल्या समोर सादर करण्यात आले आहे. जेणेकरून खुल्या मनाने त्यावर चर्चा करता येवु शकेल. खुल्या मनाने यावर निर्णय होवु शकेल. जर आमच्या विरोधी पक्षाच्या कुणा सदस्यांने चांगली सूचना केली असती तर त्यावर विचार करण्यास देखिल काही हरकत नाही. कारण आम्हाला माहिती आहे की, सर्वांना सोबत घेवुन चालायचे आहेत. आपल्याकडुन देखिल चांगली सूचना येण्याची शक्यता असु शकते. होवु शकते की यामध्ये शहराचे हित असेल. आम्ही असे म्हणत नाही की आपली सूचना घेणार नाही. परंतु आपण देखिल या मानसिकतेला बदला की विरोधी आहोत म्हणुन विरोधच करणार.

जर अर्थसंकल्प चांगला असेल तर आपण त्याची प्रशंसा देखिल करायला हवी. आता श्री. लाल पंजाबी हे बोलले की यामध्ये स्वप्न दाखविले आहे, हे पुर्ण नाही झाले. महापालिकेची आर्थीक अवस्था एवढी बिकट आहे. तर श्री. लाल पंजाबी आम्हाला सल्ला देतील का की आयुक्त साहेबांनी जी करवाढ सूचविली आहे ती आम्ही मान्य करावी. जर असे असेल तर भाजपा व शिवसेनेच्या वतीने सर्व गोष्टी समोर यायला हव्यात. महापालिकेची आर्थिक अवस्था खराब आहे हे आम्हाला माहिती आहे. आम्हाला हे देखिल माहिती आहे की, कडु औषधाची आवश्यकता आहे. आम्हाला हे सुध्दा माहित आहे की, आमचे श्री. आर. के. सोनवणे यांच्या निती व नियतीवर आमचे आमदार श्री. पप्पु कलानी व श्रीमती ज्योती कलानी यांच्याप्रमाणेच संशय घेता येणार नाही. आम्ही हे जाणुन आहोत की तीन किंवा पाच वर्ष असे आयुक्त आम्हाला प्राप्त झाले तर या शहराचा चौमुखी विकास हा होणारच आहे. हे शहर ठाणे महापालिकेच्या पुढे देखिल जावु शकते यासाठी येथे भाजपा व शिवसेनेच्या नगरसेवकांनी अर्थसंकल्पावर जी चर्चा केली त्या चर्चेचे आम्ही स्वागत करतो. व एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की शहराची अशी आर्थिक अवस्था बघुन आपण जागे व्हायला हवे, आपण पळुन जायला नको. पळाल्याने समस्येचे निराकरण होणार नाही. जागे राहिल्याने समस्येचे समाधान नक्कीच होईल. यासाठी श्री. लाल पंजाबी आमची दिशा योग्य आहे. व देवीकृपेने दशादेखिल योग्य राहील. आपण आम्हाला सहाय्य दया शहराच्या विकासासाठी विरोधासाठी विरोध करू नका. आपण जागे रहावे अशी आमची इच्छा आहे. शहराच्या विकासासाठी आम्ही कटीबध्द आहोत. परंतु आपण एवढे सतर्क रहावे की जेणेकरून आमच्या कडुन एखादी चुक झाली तर आम्हाला त्वरीत जागेवर आणाल व चुक होवु देणार नाही. हीच विरोधी पक्षाची भुमिका असते व असायला हवी. मागील गोष्टी काढुन काही साध्य होणार नाही. कारण त्यावेळी बरेच ओरडले होते कारण श्रीमती ज्योती कालानी या नगराध्यक्षा असताना नगरपालिका बरखास्त करायची होती. कारण सर्वांना माहिती होते की, श्रीमती ज्योती कलानी यांचे पद शासनाने नगरपालिका बरखास्त करून उखडुन टाकले होते. प्रशासक बसवला होता. त्यांना वाटले आता येथे आमची सत्ता येणार नाही. लोकांना देखिल वाटले की चला एकदा परिवर्तन करून बघु. हा इतिहास आहे की, लोकांनी वेळोवेळी परिवर्तन केले आहे. कधी श्री. मोरारजी देसाई यांची सत्ता आली आहे, कधी श्री. अटल बिहारी वाजपेयी यांची सत्ता आली आहे पंरतु या देशाच्या जनतेला नेहमी असे वाटले आहे की, प्रत्येक वर्गाला, प्रत्येक समाजाला सोबत घेवुन जाणारे कोणी नेते असतील तर ते कॉग्रेस, राष्ट्रवादी कॉग्रेस व आरपीआय चे आहेत हेच कारण आहे की नेहमी जनादेश आम्हाला प्राप्त होत असतो. येथे प्रदुषणाचा मुददा उपस्थित केला गेला. मी या सभागृहाला माहिती देवु इच्छितो की, काल एक फारच चांगली बैठक स्थायी समिती सभागृहात झाली व आयुक्त साहेबांनी एक फार चांगला प्रयत्न केला आहे. या शहराचे पर्यावरण कसे सुधारावे. मी आयुक्त साहेबांना उल्हासनगरची माता म्हणुन बोलावले तर त्यात काहीही चुक होणार नाही कारण एक माताच तिच्या मुलासाठी अशाप्रकारे गंभीर प्रयत्न करू शकते. तसेच काल झालेल्या बैठकीत काय निर्णय झाले व त्याचे काय परिणाम होतील हे येणा-या काही दिवसात आपणांस कळुन चुकेल. राहिला प्रश्न हिंदी चित्रपटाप्रमाणे ''मैं तो चला जिधर,जिधर चला रस्ता'' तर असे नाही. असे झाले असते तर आमची पतंग एवढया उंच आभाळात उडाली नसती यासाठी जेथे रस्ता जातो तेथे आम्ही जात नाही तर आम्ही जेथे जातो तेथे रस्ते बनवत जातो. व यापुढेही अशाच प्रकारे रस्ते बनवत जावु. अशाप्रकारे आम्ही सात गावे अजुन घेवुन दाखवु व तेथे देखिल रस्ते बनवुन दाखवु. तेथे देखिल दिवे लावु. आपण आमच्यासाठी काहीही बोललात तरी देखिल आम्ही आपले म्हणणे सकारात्मकरित्या घेवु. तसेच या शहराचा विकासाच्या दृष्टीने पुढे करू. कारण जनतेने आम्हाला ही जबाबदारी सोपविली आहे की आपणांसच या शहराचा चौमुखी विकास करायचा आहे. याच बरोबर मी काही गोष्टी येथे ठेवु इच्छितो. महापौर महोदया पेट्रोलियम पदार्थांची जी दरवाढ करण्यात आली आहे.

यामध्ये कमीत कमी केरोसिन जे शिधापत्रिकेवर दिले जाते. त्यात दरवाढ करण्यात येवु नये. जे टॅंकर पुरविले जातात त्यामध्ये दरवाढ करण्यांत येवु नये अथवा कमी करावी. जेथुन टॅंकरची मागणी केली जाते त्या विभागात तीन महिन्याच्या आत जलवाहिनीद्वारे पाणी येईल याची काळजी घेतली जावी. अशाप्रकारे क्रांतीकारी कार्य करून या शहराला टॅंकरपासुन मुक्ती मिळवुन दयावी. या शहराला खरोखर २१व्या शतकात घेवुन जावे. हे स्वप्न आपणांस साकार करायचे आहे. येथे बोलले गेले की सत्तापक्षवाले स्वप्ने बघतात. जे स्वप्ने बघतात त्यांचीच स्वप्ने साकार होतात. आमचे मा. राष्ट्रपती नेहमी सांगतात की, मोठी स्वप्ने बघावित. तसेच या देशाचे प्रसिध्द उद्योगपती श्री. धिरूभाई अंबानी नेहमी म्हणायचे की मोठी स्वप्ने बघायला हवीत. ही दोन मोठी माणसे आम्हाला शिकवतात की, मोठी स्वप्ने बघावित. त्याप्रमाणे आम्ही मोठी स्वप्ने बघितली आहेत म्हणुन आम्ही प्रत्येक संघर्ष जिंकला आहे. व आज हि एक मोठी उपलब्धी आम्ही मिळविली आहे. मी येथे आपणांस एक निवेदन करेन की एक म्हणजे केरोसिन जे राशन दुकानांवर विकले जाते त्यावर वाढ करू नये व दुसरे म्हणजे शिक्षण मंडळासाठी रूपये २ कोटी ठेवले आहेत शाळा बनविण्यासाठी. शिक्षण मंडळाकडुन रूपये २ कोटी ठेवण्यासाठी प्रस्ताव आलेला आहे काय? माझ्या माहितीप्रमाणे असा कोणताही प्रस्ताव नाही. त्यामधुन रूपये १.५० कोटी कमी केले जावे व मागील महासभेत आम्ही शिक्षण मंडळासाठी जो निधी मंजुर केला होता. रूपये ६८लाखाची जी रक्कम कमी केली होती ती त्यांना देण्यात यावी. आयुक्त महोदयांना माझी विनंती आहे की त्यांनी असे अवश्य करावे, अशी माझी विंनती आहे. बाकी आयुक्त महोदय आम्ही सर्व सोबत आहोत. आपले शहराच्या प्रती जे दायीत्त्व आहे व आपली जी आकांक्षा आहे, जे प्रेम आहे त्यासाठी आम्ही आपणांसमोर नतमस्तक होत आहोत व आशा करतो की या शहराला आपण आमचे आमदार श्री. पप्पु कालानी व श्रीमती ज्योती कलानी यांच्या सोबत राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस, आरपीआय यांच्यासोबत या शहराला खरोखरच एवढया उंचीवर नेवुन पोहचवाल ज्याचे स्वप्न आम्ही बघितले होते. जयहिंद, जय महाराष्ट्र, जय भिम, जय झुलेलाल. धन्यवाद. पुन्हा एकदा श्रीमती ज्योती कालानी यांना धन्यवाद देतो.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः</u>-मा. महापौर, मा. सभापती स्थायी समिती, सचिव, सभागृहात उपस्थित सर्व सदस्य आज सभागृहात स्थायी समिती सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी सलग पाचव्यांदा सभागृहात अर्थसंकल्प सादर केला आहे त्याबददल मी त्यांना धन्यवाद देतो. एवढेच नाही तर या सभागृहास मी हे सांगु इच्छितो की, माझी बहीण दिड तासानी या शहराची महापौर बनणार आहे. व त्याचबरोबर एक नविन इतिहास देखिल स्थापित होणार आहे. इतिहास यासाठी म्हणतो जेणेकरून माझ्या सहका-यांना कळेल की, आमची बहीण जगातील पहिली सिंधी महिला असेल जी कोणत्त्या महापालिकेची महापौर बनणार आहे. असा इतिहास जो आता होणार आहे. त्यांनी आज जो अर्थसंकल्प सभागृहास सादर केला आहे त्याबददल मी त्यांना धन्यवाद देतो कारण त्यांनी याच्या माध्यमातुन या शहरातील नागरिकांच्या ज्या अपेक्षा आहेत त्या कायम ठेवल्या आहेत. कशा ठेवल्या आहेत याचा खुलासा मी करतो. माझे विरोधी पक्षातील जे मित्र आहेत त्यांनी अथंसंकल्पातील आकडेवारीवर सभागृहात बरीच चर्चा केली मी त्यांना सांगु इच्छितो की, कथनी व करणी मध्ये बराच फरक असतो. अर्थसंकल्पातील आकडेवारीवरून सभागृहात चर्चा करणे. व अर्थसंकल्पावर टिका करणे व एखादया शहराच्या महापालिकेचा कारभार चालविणे व त्याद्वारे शहराला विकासाच्या दिशेने नेणे व शहरातील जनतेवर कमीत कमी करांचा बोजा टाकणे ही सर्व आकडेमोड जी व्यक्ती अर्थसंकल्प बनविते त्यालाच माहिती असते. फक्त टिका करून काही होणार नाही. सर्वसामान्य जनतेवर कमीत कमी कर व शहराचा जास्तीत जास्त विकास करणे हे जर अर्थसंकल्पाचे उददीष्ठ असेल तर यापेक्षा चांगला एक अर्थसंकल्प कोणीही सादर करू शकत नाही. मी हे दाव्याने सांगु इच्छितो की मागील पाच वर्षात आमच्या भगिनी श्रीमती ज्योती कलानी यांनी जे

अर्थसंकल्प सादर केले आहेत त्यामध्ये त्यांनी या शहरातील जनतेवर कमीत कमी करवाढ करण्याकडे लक्ष दिले आहे. आम्ही ते सिध्द करून देखिल दाखवले आहे. मागील कित्येक वर्षातील, चार-पाच वर्षातील विकासाकडे आपण लक्ष दिले तर एक गोष्ट सिध्द होते की मागील चार-पाच वर्षात शहराचा जो विकास झाला आहे तो यापुर्वी कधीही झाला नाही. शहरामध्ये पवई येथे उड्डाण पुलाचे काम झाले, उल्हासनगर स्टेशन येथे उड्डाण पुलाचे काम झाले. ज्या ३३ रस्त्यांचे श्रेय श्री. जमनु पुरस्वानी हे घेत आहेत त्याबददल मी त्यांना सांगु इच्छितो की, ते देखिल याच कार्यकाळात ते रस्ते तयार झालेले आहेत. आपण या शहरातील जनतेवर, व्यापा-यांवर जकातीचा जो बोजा टाकला तर हे शहर या बोज्यातुन कधीही मुक्त होवु शकणार नाही. आपण या शहरातील व्यापाराला जो एवढा मोठा धक्का दिला आहे की आज उल्हासनगर शहर जे संपुर्ण देशात येथील व्यापारासाठी प्रसिध्द होते की हे व्यापा-यांचे शहर आहे. तर या शहराला सांभाळुन घेण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. आम्ही असे बघितले की या शहरात जकात दरात जास्त वाढ होणार नाही. ही आपल्या लोंकांची या शहराला दिलेली देणगी आहे. तरी शेजारील महापालिकांशी उल्हासनगरची तुलना केली तर आज या शहरात जकातीचा जो दर आहे तो त्यांच्या पेक्षा कमी आहे. जर करांची तुलना केली तर शेजारील महापालिकांपेक्षा आपल्या येथे त्याचा दर कमी आहे. ही गोष्ट कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस व आरपीआय यांच्या सहयोगाने आमच्या श्रीमती ज्योती कलानी मागील पाच वर्षात जे अर्थसंकल्प सादर केले आहेत तर त्यांनी या बाबीकडे विशेष लक्ष दिले आहे. तर अशा अर्थसंकल्पावर टिका करणे योग्य होणार नाही असे माझे मत आहे. तुम्ही कुठे तरी हरवला आहात. मी विरोधी पक्षाच्या माझ्या सहका-यांना सांगेन की आज जो अर्थसंकल्प आला आहे त्याला सर्व संमतीने पारीत करण्याची आपणांस संधी आहे. आयुक्त साहेबांनी अर्थसंकल्प सादर करताना स्थायी समिती समोर त्यांचे जे विचार मांडले होते की जकात दरात वाढ करावी, पाणी पटटीचा जो दर आहे तो दुप्पट करावा, अथवा कर वाढ करायला हवी त्याला स्थायी समितीने मान्यता दिलेली नाही. त्याला सत्ता पक्षाने अनुमोदन दिले नाही. आयुक्त साहेबांनी टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात असेही सांगितले आहे की, अशा परिस्थितीत मी या महापालिकेत आयुक्त म्हणुन काम करू शकत नाही परंतु मला पुर्ण विश्वास आहे की उल्हासनगर महानगरपालिकेचे सत्तापक्षातील जे नेते आहेत, वेगवेगळया पक्षाचे, शहराचे जे आमदार आहेत अथवा विरोधी पक्षातील सदस्य आहेत त्यांनी आयुक्त साहेबांना मागील दोन वर्षात जे सहकार्य दिले आहे ते बघुन ते आपला निर्णय बदलतील व तशी ग्वाही या सभागृहात देखिल देतील. कारण आम्हाला असे वाटते की, या शहराच्या विकासाचे श्रेय जेवढे सत्ताधारी पक्षाला दिले जाते तेवढेच आयुक्तांनाही दयायला हवे. या शहरात जे मोठे प्रकल्प येत आहेत, आता थोडया दिवसापुर्वीच मागील बैठकीत आम्ही शहाड येथील जो प्रकल्प मंजुर केला आहे, आरक्षित भुखंडावर ज्यामध्ये झोपडपटटीतील रहिवास्यांना निवासी संकुलन व दुकानदारांना वाणिज्य संकुलन मध्ये पुनर्वसन करणार आहोत. तेथे आयटी पार्क होणार आहे. पार्कींग स्पेस तयार होत आहे. असे मोठे मोठे प्रकल्प आहेत. उल्हासनगर स्टेशन व विठ्ठलवाडी स्टेशन येथे विकास होणार आहे. तो आम्ही आपल्या शिवाय करू शकत नाही. यासाठी श्री. सोनवणे साहेब माझी आपणांस विनंती आहे की, संपुर्ण सभागृहाच्या वतीने विनंती आहे की, तुम्ही तुमचा निर्णय बदलुन आजच वर्तमानपत्रामध्ये तुमचे म्हणणे सांगावे की मी येथे राहु इच्छितो व या शहराचा लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने विकास करू इच्छितो. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातुन श्रीमती ज्योती कलानी यांनी दर्शविले आहे की, या शहरातील जनता ही आमची जनता आहे. आमचे स्वत:चे लोक आहेत. मग ते झोपडपटटीतील असोत अथवा बॅरेक अथवा इमारतीतील लोक असोत, व्यापारी वर्ग अथवा सर्वसामान्य माणुस कोणीही कोणत्त्याही वर्गाचा व्यक्ती असला व तो या शहराचा नागरिक असला तर त्याला जास्तीत जास्त विकासाच्या संधी प्राप्त होतील. त्याच्यावर कमीत कमी करांचा बोजा लादला जाईल. आमची ही

एक विश्‍वेषता आहे की, जी आपणही शिकायला हवी. श्री. पंजाबी साहेब आपण विशेष लक्ष दयावे. या विशेषतेचा फायदा आपणही घ्यावा. जेणेकरून अर्थसंकल्पावर टिका करण्याची आपणांस संधी प्राप्त होणार नाही. असा अर्थसंकल्प एखादया एजन्सी समवेत अथवा तज्ञव्यक्तींसमवेत बसुनच तयार होवु शकतो. व अशा अर्थसंकल्पावर टिका करणे उचित नाही. मला असे वाटते की, विरोधी पक्षातील माझे जे मित्र आहेत त्यांनी वास्तविकतेचा विचार करायला हवा. त्यांनी सद्यस्थितीचा विचार करायला हवा. अशा अर्थसंकल्पाला त्यांनी पुर्ण समर्थन दयायला हवे. या शहराचा जो सत्ताधारी पक्ष या महापालिकेत आहे. ज्याच्यासमोर अदयाप दोन वर्ष शिल्लक आहेत. या दोन वर्षात या शहराच्या विकासाची गती आम्ही अजुन वेगवान करू इच्छितो. यामध्ये आपले सहकार्य व साथ आम्हाला हवी आहे. भाजपा शिवसेनेने मागील महापालिकेत सत्ताधारी पक्षाला जे सहकार्य दिले होते त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने आपले सहकार्य अपेक्षित आहे. आम्हाला असे वाटते की शहराच्या विकासामध्ये आपले देखिल योगदान असावे. आपणही त्यात सहभागी व्हावे. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा असा अर्थसंकल्प येतो त्याला आपण सर्वसंमतीने पास करण्यासाठी सहकार्य दयावे. मी अर्थसंकल्पातील आकडेवारीवर बोलणार नाही. श्रीमती ज्योती कलानी यांनी त्यांच्या भाषणात जे उददीष्ठ ठेवले आहे ते येत्त्या वर्षात पुर्ण होईल याचा मला पुर्ण विश्‍वास आहे. त्याच सोबत काही सूचना ज्या सभागृहनेता यांच्यातर्फे येणार आहे. तर मला असे वाटते की मा. महापौरांच्या अनुमतीने ज्या काही सुधारणा सूचविण्यात येतील त्या समाविष्ट करण्यात याव्यात. त्यानंतर या अर्थसंकल्पाला सर्व संमतीने पास करण्यात यावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुरः-</u>मा. महापौर, स्थायी समिती सभापती व आयुक्त साहेब, सचिव साहेब, अर्थसंकल्पात टॅकरबाबत जे शुल्क आकारणी केली आहे. ती पुर्णपणे चुकीची आहे कारण जे मोफत टॅकर आहेत. महापालिका तेथे देते जेथे महापालिका पाणी पुरविण्यात असक्षम ठरली आहे. तेथे टॅकर देते जेथे वितरण व्यवस्था कोलमडलेली आहे. याप्रकारे जर पाण्याच्या टॅकरवर थोडा देखिल आकार घेतला तर हा पुर्णपणे उल्हासनगर शहरातील जनतेवर अत्त्याचार होईल. शहरात अशांती होईल, दंगे होतील, टेबलावर बसुन टॅकरसाठी पैसे घेण्याचा जो निर्णय झाला आहे हे पुर्णतः चुकीचे आहे. व आमच्या कॉग्रेस पक्षाच्या  सर्व नगरसेवकांचा टॅकरसाठी पैसे घेण्याचा पुर्ण विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासीः-</u>मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब,सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व उपस्थित सर्व सदस्य मी फक्त शिक्षण मंडळाबाबत काही सूचना ठेवु इच्छितो. शिक्षण मंडळाच्या वतीने जे अंदाजपत्रक श्रीमती ज्योती कालानी यांच्याकडे आले होते त्यामध्ये तीन लेखा शिर्ष असे होते ज्यात रूपये ६० लाख दर्शविले होते. ज्यामध्ये रूपये ३० लाख शाळांच्या देखभालीसाठी, रूपये ३० लाख नविन इमारतींसाठी, १० लाख शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत बुट व सॉक्स इत्त्यादी देण्यासाठी ठेवले होते. या बाबी अर्थसंकल्पातुन वगळण्यांत आलेल्या आहेत. जर हे ६० लाख रूपये पुन्हा अर्थसंकल्पात दर्शविण्यात यावेत. आयुक्त साहेबांनी त्यांच्या वतीने शाळांच्या नवीन इमारतींसाठी रूपये २ कोटी ठेवलेले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे शिक्षण मंडळाकडुन अशी कोणतीही मागणी करण्यात आली नव्हती. माझी आपणांस विनंती आहे की, ते २ कोटी रूपये तेथुन काढुन हे ६० लाख रूपये तेथे ठेवल्यास आपला रूपये १.५० कोटीचा खर्च देखिल वाचेल व नवीन इमारतींसाठी आपणांस सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत रूपये ४५-५० लाख शासनाकडुन देखिल मिळणार आहेत. हे लक्षात घेतले तर रूपये १.५० कोटीचा आपला खर्च वाचु शकेल. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>मा. महापौर महोदया, उपमहापौर महोदया, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, सर्व सदस्य अंदाजपत्रक आणि अर्थसंकल्प हे दोन्ही शब्द आहेत. अर्थसंकल्प म्हंटल्यावर तुम्ही मागच्यावर्षी असे म्हंटले होते की हे अंदाजपत्रक आहे. आणि यानुसार वाटचाल करायची आहे. चर्चा बरीच झालेली आहे. त्यातील वाटा, दिशा दाखवुन देण्याचा प्रयत्न केला आमच्या सदस्यांनी, माजी महापौरांना वाटले की आम्ही टिका केली. परंतु टिका नाही. सत्ताधा-यांची चुक काय आहे हे विरोधी पक्षाने दाखविले आहे. हे विरोधी पक्षाचे कामच आहे. चुक असेल तर तुमची पाठ थोपटायची की तुम्ही बरोबर चालले आहात. तुम्हाला वाटत असेल की आम्ही असे करू परंतु त्यामुळे शहराची वाट लागेल, शहराची दिशा बदलेल, दशा बदलेल. या ठिकाणी सर्वात खेदाची बाब आज पहिल्यांदा मला सिंधी नसल्याचा अपमान वाटला. आज उल्हासनगरचे महापौर पद भुषविलेल्या श्री. हरदास माखिजा यांनी एक सिंधी महिला या ठिकाणी बसली म्हणुन आम्हाला अभिमान वाटतो याप्रकारचे उदगार काढले. हा बाकीच्या बिगर सिंधी लोकांचा अपमान आहे असे मला वाटते. आता पर्यंत ज्या महिला होत्या त्यांचा तुम्हाला अभिमान वाटला नाही का? फक्त सिंधी महिलेचाच तुम्हाला अभिमान वाटला.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजाः-</u>मी आपली माफी मागतो. आपण मला चुकीचे समजला आहात. मी म्हंटले की श्रीमती ज्योती कालानी हया इतिहास घडविणार आहेत. कारण की त्या जगातील पहिल्या सिंधी महिला असतील ज्या कोण्या महापालिकेच्या महापौर असतील. आपल्या महापालिकेच्या यापुर्वी ज्या श्रीमती यशस्विनी नाईक या महापौर होत्या त्यांच्यासाठी देखिल आम्हास तेवढाच आदर आहे. श्रीमती मालती करोतिया यांच्यासाठी आहे व येत्या काळातील ज्या महिला महापौर असतील त्यांच्यासाठी देखिल तेवढाच आदर राहील. मी असे बोललो की त्या इतिहास घडविणार आहेत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>ठिक आहे. अर्थसंकल्पावर चर्चा सुरू आहे. श्री लालवानी यांना एवढा राग येण्याचे कारण नव्हते. नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत झाले. ते का केले? हे आम्ही वारंवार तुम्हाला सांगतो. मागील बैठकीत मी एक शब्द वापरला होता ''तुणतुणा'. सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे की, महानगरपालिका आणली म्हणुन नुकसान झाले. त्यानंतर तुम्ही काय केले? तुम्हाला जर नगरपालिकेच्या वेळेचे अंदाजपत्रक मंजुर होते तर तेच ठेवा. लागोपाठ १९९२ पासुन ते १९९६ पासुन महापालिकेचा अर्थसंकल्प ३२ ते ३६ कोटीचा होता. जकातीचे उत्पन्न रूपये १४-१५ कोटी वर जात नव्हते. उद्योगधंदे तेच होते. तुमच्या म्हणण्याप्रमाणे आज त्यापेक्षा कमी उद्योग राहिले आहेत.जर व्यापार कमी झालेला आहे तर उत्पन्न त्यावेळेस जास्त होते. ते उत्पन्न कुठे जात होते ते शोधण्यासाठी आम्ही महानगरपालिका आणली कारण त्यावेळचे अधिकारी हे नगराध्यक्षांच्या इशा-यावर चालत होते आणि उल्हासनगर महानगरपालिकेतील जनता त्याच स्थितीमध्ये सात-आठ वर्षापासुन खितपत पडली होती. म्हणुन केवळ येथील भ्रष्टाचार रोखण्यासाठी, त्यावर अंकुश ठेवण्यासाठी सर्व पक्षीय त्यामध्ये कॉंग्रेसचे लोक सुध्दा होते. फक्त शिवसेना, भाजपा हे दरवर्षी आम्ही स्पष्ट करतो. पण सत्ताधारी पक्षातील सदस्य हे पध्दतशीरपणे विसरायचे काम करत असतात. ज्यासाठी नगरसेवक म्हणुन तुमची नियुक्ती झाली आहे ते काम पध्दतशीरपणे सुरू आहे. त्यात तुम्ही कुठेही कमी पडत नाही. त्याबाबत आम्ही तुम्हाला शाबासकी देतो. परंतु जे चुकीचे आहे ते कशाला गळी उतरवु. त्यावेळी नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर झाले त्यावेळी धनुर्धारीचे संपादक असणारे श्री. दिलीप लालवानी यांनी सुध्दा युती शासनाचे फार कौतुक केले होते त्यावेळचे त्यांचे लेख वाचावेत. त्यावेळेस आमचे श्रीगोपाळ राजवानी व श्रीमती सुनिता राजवानी.............

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>धनुर्धारीने नगरपालिकेचा विरोध केला होता. नगरपालिका बरखास्त करून महानगरपालिका आणण्याचा विरोध केला होता. तो विरोध अजुनही आहे. तुम्ही म्हणालात की दरवेळी आम्ही हेच बोलतो तर देश १९४७ मध्ये स्वतंत्र झाला हे वारंवार सांगितले जाईल कारण तसा इतिहास झालेला आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे</u> :-हे कधी काळी आमच्या सोबत होते. श्री. गोपाळ राजवानी यांचे मित्र होते. त्यावेळी यांनी साथ सोडली नव्हती.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः-</u>आम्ही आजही आपल्या सोबत आहोत. आम्ही वेगळे थोडे आहोत.*

*<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः-</u>असे असेल तर आमच्या सोबत या. आम्ही जे बोलत आहोत ते समजुन घ्या. आम्ही जे बोलतो त्याला आपण टिका समजत आहात. यानंतर आपण बोललात की, विरोधी पक्ष विरोधासाठी विरोध करीत आहे. त्यासाठी नाही तर जनतेच्या भावना आम्ही येथे ठेवत आहोत. यांनतरही आपण आपली नीती व नियती साफ आहे असे म्हणता कारण लोकांनी तुम्हाला निवडुन दिले आहे. बिहारची जनता देखिल हेच करीत आहे. परंतु संपुर्ण देश सांगत आहे की बिहारची सत्ता कशी आहे. बिहार या देशातच आहे. श्री. लालु यादव यांना लोकांनी तेथुन तीन वेळा निवडुन दिले आहे परंतु याचा अर्थ त्यांची निती व नियती साफ आहे असा होत नाही. आपण याचे उत्तर मला दया. परंतु आज अर्थसंकल्पाबाबत चर्चा करताना आपण बोललात की आम्ही स्वप्न बघत आहोत. स्वप्ने बघायला ही हवीत आणि दाखवायलाही हवीत. परंतु स्वप्ने साकार देखिल व्हायला हवीत. मागील तीन वर्षाचे अर्थसंकल्प पाहिले तर दिसुन येईल की, तेच तेच होत आहे. श्री. राज असरोंडकर देखिल तेच सांगत आहेत, श्री. हरदास माखिजा देखिल तेच बोलले होते. काहीही करवाढ केलेली नाही. तरी श्री. हरदास माखिजा बोलले की इतिहासात असा अर्थसंकल्प झालेला नाही. आमचे श्री. किशोर वनवारी बोलले होते की, यापुर्वी असा अर्थसंकल्प झाला नाही व यापुढे होणार नाही. अशाप्रकारचे वक्तव्य त्यांनी मागील वर्षी केले होते. माखिजा साहेब बरोबर ना? असे बजेट की अमेरीकेचा विकास झाला नाही, ब्रिटनचा विकास नाही झाला, रोमचा विकास, रोम पर्यंत गेले होते परंतु आज यांनी सांगितले की आमचे आयुक्त साहेब नाराज आहेत व त्यांनी या अर्थसंकल्पामुळे विकास करू शकत नसल्यामुळे परत जाण्याचा निर्णय घेतला आहे असे आपण सांगितले आहे. जर अंमलबजावणी करणारा अधिकारी असे बोलत असेल व आपण त्याची तुलना रोम, ब्रिटन, जर्मनी, अमेरीका याच्याशी करत असाल तर ही स्वप्ने आहेत काय? जर मुंगीने हत्ती होण्याचा प्रयत्न केला तर ते शक्य आहे काय? बेडकाने बैल बनण्याचा प्रयत्न केला तर ते शक्य आहे काय? अशा प्रकारची अवस्था उल्हासनगरची होत आहे. हे आपण समजवुन घ्या. विरोधी पक्षाची भावना उल्हासनगरला वाचविण्याची आहे. आपण जेथे घेवुन जाल मग त्याचा अर्थ मुके, बहिरे अथवा आंधळयांप्रमाणे नाही.तुम्ही जेथे घेवुन जाल तेथे जावु. तुम्ही दरीत ढकलाल तर दरीत जावु असे होणार नाही. जेथे विरोध करायला हवा तेथे विरोध होईल. जेथे विरोध करण्याची गरज नाही जेथे लोकांच्या फायदयाचे काम आहे. त्यासाठी आम्ही सहयोग देवु व देत राहु. परंतु आपण हे काय ठेवले आहे? दशा व दिशा आमच्या श्री. लाल पंजाबी यांनी म्हंटले. २००२-२००३चा श्रीमती ज्योती कालानी यांचा सभापती म्हणुन लेख आहे. त्यामध्ये आपण म्हंटले आहे की अर्थसंकल्पाला आधी नियंत्रण मानायचे. आता नियोजन करण्याचे साधन मानतात. आमचे आयुक्त म्हणतात की, यामध्ये काही विकास करू शकत नाही. नियंत्रण कोणावर आहे, नियोजन कसले आहे? जे आमचे उत्पन्न आहे त्याचे नियोजन करायला हवे. नियंत्रण खर्चावर व्हायला हवे. येथे खर्चावर नियंत्रण नाही. खर्च रू. १९० कोटी आहे व त्याचा समतोल साधण्यासाठी उत्पन्न १९० कोटी दाखवले आहे. हे काय आहे? हे काय नियोजन आहे? जर*

तुम्हाला नियंत्रण, नियोजन करायचे होते तर आधी उत्त्पन्न जसे आयुक्त साहेबांनी सांगितले की, रूपये १२६ कोटी उत्त्पन्न आहे. खर्चही तेवढाच मर्यादीत असायला हवा. मागील तीन वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या वेळी आमचे श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की, म्युनिसिपल कोड व त्याप्रमाणे अर्थसंकल्प तयार करायला हवा. परंतु मागील वर्षी व पुढील दोन वर्षी प्रशासनाने देखिल याकडे लक्ष दिले नव्हते की मागील तीन वर्षाप्रमाणे उत्त्पन्नाच्या आकडयांचे विवरण दयायला हवे. परंतु यावर्षी आयुक्तांनी ते केले आहे असे वाटते. मागील वर्षी २००२-२००३ चा अर्थसंकल्प होता. त्यामध्ये उत्त्पन्न रूपये १४८ कोटी दाखवले होते. प्रशासनाचे अंदाज होते आणि खर्च होता रू. १६८ कोटी म्हणजे त्यावेळेस रूपये २२ कोटीचा तुटीचा अर्थसंकल्प होता. आणि २००३-२००४ साली उत्त्पन्न दिले आहे १५७ कोटी अपेक्षित कुठून आले आणि कसे आले त्यावेळी आम्ही तोच प्रश्न विचारला होता. प्रशासनाने १५७ कोटी उत्त्पन्न दिले होते व खर्च रू. १८६ कोटी दिला होता. आज प्रशासनाने दोन वर्षापुर्वी जे रू. १४८कोटी होते. मागच्या वर्षी रू. १५७ कोटी होते ते आज १२६ कोटीवर आले आहे. ही जी चुक प्रशासनाने केली होती. आणि त्याचा परिणाम उल्हासनगरवासियांना भोगावा लागत आहे आणि तरी प्रशासन लोकप्रतिनीधींवर त्याचा ठपका ठेवत आहे की लोकप्रतिनिधींनी सवंग प्रसिध्दीसाठी नको ते निर्णय घेतले. तुम्ही त्याच वेळेस आम्ही तुम्हाला सांगितले होते की आयुक्त साहेब प्रशासनाचा प्रतिनिधी म्हणुन तुमचा काय अंदाज आहे? हे बजेट वास्तविक आहे का? की आकडयांची जुळवा जुळव करून वास्तविकतेला सोडुन फक्त लोकांना भुलावणी देण्यासाठी लोकांची फसवणुक करण्यासाठी आणि नको त्या दिशेने नेणारा हा अर्थसंकल्प आहे. तुम्ही सांगितले हा अर्थसंकल्प नाही अंदाजपत्रक आहे. आमच्या श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की, हे अंदाजपत्रक नसुन अंदाजपंचेपत्रक आहे. तुम्ही सांगितले हे असुही शकते. आम्ही कसोशिने प्रयत्न करू आणि आता तुम्ही हताश व हतबल आहात असे श्री. हरदास माखिजा सांगत आहेत. हे होवु शकत नाही म्हणुन तुम्ही चाललेले आहात. आणि तुमचा तो निर्णय रदद करण्यासाठी सभागृहामध्ये त्यांनी तुम्हाला विनंती केली आहे. ही चुक तेव्हाच सुधारली असती तर आज ही वेळ आली नसती. तेव्हा प्रशासनाने सुध्दा अंमलबजावणी होवु शकते किंवा नाही हे कठोरपणे त्यावेळी सांगायला हवे होते जसे यावेळेस तुम्ही सांगितले आहे. यावेळेस ही जी तुमची भाषा अर्थसंकल्पामध्ये आहे. तीच भाषा महासभेमध्ये सुध्दा असणे आवश्यक होते की याची अंमलबजावणी होवु शकत नाही. तुम्ही हे स्विकारले आणि त्याचे पथ्य यांच्या पचनी पडले. दरवर्षी आम्ही तेच तेच बोलायचे. यावर बोलण्यासारखे काही नाही. सध्याच्या अर्थसंकल्पावर बोलायचे झाले तर एवढेच सांगतो की आमचे एक किर्तनकार आहेत. कुठल्याही बाबतीत संकल्प केला असेल तर तो सिध्दीस जाण्यासाठी सत्यनारायणाची पुजा घालतात. पण त्यामध्ये भक्ती असावी लागते. बाजुचा पुजा घालतो म्हणुन आपण पुजा घातली तर त्याचे त्यांनी एक उदाहरण दिले आहे की भटजी असतात आणि एक जोडपे असते. येथे प्रशासन म्हणजे भटजी आहे. तर भटजी पुजावाल्याला काय सांगतो ते त्याला कळत नाही. भटजींनी सांगितले गंधात हात बुडव, गुलालात हात बुडव सांगितले तर तो गुलालात हात बुडवतो, बुक्यात सांगितले तर तो हळदीत बुडवतो. अशा प्रकारे त्यांचे चाललेले असते. आणि जी पत्नी असते तीने त्याच्या हाताला हात लावलेला असतो की तु काहीही केलेस तरी तुझ्या पापात सहभागी आहे. तु पाप कर अथवा पुण्य कर. हा काय करतो ते त्याला कळत नाही. भटजी काय म्हणतात ते त्यांना कळत नाही. आणि तीला उमजत नाही. अशा प्रकारची अवस्था उल्हासनगर महापालिकेच्या अर्थसंकल्पाची झालेली आहे. प्रशासनाला काय करावे हे समजत नाही. खर्च तर भरपुर आहे परंतु उत्त्पन्न मिळत नाही. तुम्ही सांगितलेले यांना कळत नाही. आणि जनता नुसती हातात हात घेवुन बसली आहे. तुम्ही काही केले तरी आमचे आम्ही सहन करीत राहणार आहोत. अशा पध्दतीचा हा अर्थसंकल्प या ठिकाणी सादर केलेला आहे. या ठिकाणी अर्थसंकल्पामध्ये टॅक्सवाढ, लोकांकडुन दुहेरी बाजुने करवाढ घेण्यात येत आहे.

एकाबाजुला तुम्ही घरपटटीमध्ये पाणीपटटी लावत आहात. आणि पुन्हा टॅंकर वर शुल्क आकारणी केली आहे. त्याला आमचा विरोध आहे. दुस-या बाजुला मालमत्ता कराचे मी एक उदाहरण देतो. आमच्या श्री. रमेश चव्हाण यांच्या प्रभागामध्ये ज्या इसमाने मागच्या वर्षी रू. १३५ रू. घरपटटी आणि रूपये ६०० पाणी पटटी भरलेली आहे. त्या इसमाला यावर्षी रू. ४८००/- पाणीपटटीसह देयक आले आहे. काल व्यापारी आले होते त्या व्यापा-यांना मागच्यावर्षी रू. ७२० घरपटटी आकारली होती. यावर्षी त्यांना रूपये ६१८१/- घरपटटी आकारली आहे. ही कुठली पध्दत आहे. ७२० कुठे आणि ६१८१ कुठे? म्हणजे ८ पटीने करवाढ करून सुध्दा तुम्ही म्हणता आम्ही मालमत्ता करामध्ये वाढ केलेली नाही. श्री. मारिवजा साहेब हे आमच्या लोकांची दिशाभुल करीत आहेत. आम्ही काही करत नाही पंरतु वाढ करीत आहोत. नगरपालिकेचा अर्थसंकल्प रू. २५ कोटीचा होता. तो वाढविण्यासाठी आम्ही सर्व संमतीने अर्थसंकल्पात, जकात व करामध्ये वाढ केली. परंतु तुम्ही हे वारंवार केले आहे.एकदा केले तर ठिक असते, वारंवार केले तर अन्याय होतो. तुम्ही शहरातील जनतेवर वारंवार अन्याय, अत्त्याचार करीत आहात. त्याला आम्ही विरोध करतो. जर या अर्थसंकल्पाने आपण पुढे गेलो तर दोन वर्षापुर्वी ज्याप्रमाणे आयुक्तांनी या महापालिकेत दिवाळखोरी जाहिर केली होती.त्याच मार्गाने आता आपण पुढे जात आहोत असे मला वाटते. म्हणुन यासाठी मागील वर्षी आयुक्तांचे जे रू. १५७ कोटीचे अंदाज होते. त्याप्रमाणे आपण जर खर्चात कपात केली तर आमची त्याला सहमती असेल अन्यथा हाच अर्थसंकल्प राहील्यास आमचा शिवसेना भाजपाचा त्याला विरोध आहे.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम:-</u>मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, स्थायी समिती सभापती, सचिव, आमचे आयुक्त साहेब, हा जो अर्थसंकल्प सादर केला आहे. हा आमच्या शहराच्या विकासासाठी चांगला अर्थसंकल्प आहे असे मी या ठिकाणी सांगेन. जे विरोधी असतात त्यांचे काम विरोध करण्याचेच असते. तर ते त्यांचे काम करीत आहेत. जेव्हा मी बारावीला होतो. त्यावेळी इंग्रजीमध्ये एक कविता होती. त्या कवितेत एका न्हाव्याच्या दुकानात एक टिकाकार जातो तेव्हा त्या दुकानात एक घुबड बसलेला असतो. त्याला बघुन टिकाकार बोलतो की या घुबडाला ज्यांने बनविले आहे त्यांनी फार चांगले बनविले आहे परंतु याचे पाय थोडे लांब आहेत. याचे पाय थोडे लहान असायला हवेत. नंतर तो पुन्हा म्हणतो की याचे पंख थोडे मोठे आहेत ते थोडे छोटे असायला हवेत. जो खरा घुबड असतो त्याचे पंख थोडे छोटे असतात. याचा रंग जास्त भडक झाला आहे तो थोडा हलका असायला हवा होता. नंतर म्हणतो की त्याची चोच थोडी वाकडी असायला हवी होती ती जरा जास्त वाकडी झालेली आहे. नंतर म्हणतो याची मान थोडी जाड झाली आहे ती थोडी लहान असायला हवी होती. अशाप्रकारे तो टिका करत राहतो. तो स्वतःच्या हुशारीवर गर्व करतो की, मी कशाप्रकारे यांना शिकवत आहे. घुबडाची मला किती माहिती आहे. अशाप्रकारे तो त्याच्यातील त्रुटी सांगत जातो. त्यांनतर ते घुबड त्याची मान थोडी वाकडी करतो, डोळे फिरवतो. म्हणजेच जो खराखुरा घुबड असतो त्याला देखिल टिकाकार बनावट दाखवतात. तर हा अर्थसंकल्प फार चांगला आहे. टॅंकरवर जी वाढ करण्यात आली आहे ती ठिक आहे. आपल्याला घरात सर्व काही हवे, तर उत्त्पन्न देखिल वाढायला हवे. महापालिकेला उत्त्पन्न प्राप्त झाले नाही तर ते काम कुठून करतील. जी करवाढ केली आहे ती थोडी कमी करण्यात यावी. कारण उल्हासनगर शहरात ब-याच प्रकारचे कर आहेत. दुसरे............

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> मा. महापौरजी, उपमहापौरजी, सभापती स्थायी समिती, सचिव साहेब, आयुक्त साहेब, सर्व सदस्य जसे की वर्ष २००४-२००५ चे सुधारित अंदाजपत्रक व २००५-२००६ चा जो अर्थसंकल्प मंजुर होणार आहे. त्याबददल सर्व सदस्यांनी आपल्या भावना येथे प्रकट केल्या आहेत. मला असे वाटते की आमचे श्री. लाल पंजाबी हे एक चांगले वक्ते

आहेत. मी त्यांची प्रशंसा केल्याशिवाय राहु शकत नाही. परंतु सविस्तर माहिती सह बोलायला हवे. ते फक्त स्थायी समिती सभापती यांच्या भाषणावर बोलतात. कधी कधी ते एखादा डायलॉग शोधुन आणतात जसे हे होवु शकले नाही, ते होवु शकले नाही. त्यामधुन वास्तव प्रकट होत नाही. आज मी पण येथे दोन कविता ऐकवतो. एक माणुस पाच वाजताच्या गाडीने व्हीटी स्टेशन येथुन निघाला. ती पाच वाजेची गाडी व्हीटीहुन ठाणे व ठाणे येथुन दादर येथे थांबते. त्याला घाटकोपर येथे उतरायचे होते. त्याने दादर येथे विचारले की मला घाटकोपरला उतरायचे आहे, घाटकोपर कधी येईल? तर लोकांनी सांगितले की ही गाडी घाटकोपर येथे थांबणार नाही. तर त्यांनी सांगितले की मला महत्त्वाची बैठक आहे, भाषण करण्यासाठी जायचे आहे. मी दोन तीन दिवस मेहनत केली आहे, संगणकावर बसलो आहे. जर मी ठाणे येथे जावुन पुन्हा मागे फिरलो तर माझे भाषण निघुन जाईल. आम्ही तुम्हाला तीन तास सहन केले आहे जरा ऐकुन घ्या. तर तो बोलला की, जेव्हा घाटकोपर स्टेशन येईल तेव्हा मी पळत जाईन तुम्ही मला फेकुन दया. तर जेव्हा घाटकोपर स्टेशन येवु लागले. त्याला लोकांनी फेकुन दिले. स्टेशनवर पण तो पळत होता तर लोकांना वाटले की त्याला गाडीमध्ये चढायचे आहे त्यामुळे त्याला लोकांनी पुन्हा गाडीत टाकले. तर आता हे गाडीत चढत आहेत की उतरत आहेत हे मला काहीच कळले नाही. दुसरे म्हणजे एक माणुस पोपट पाळायचा. येथे देखिल बोलणारे पोपट आहेत. परंतु एका माणसाने विचारले की तुम्ही पोपट पाळता तर त्यामध्ये नर, मादीला कसे काय ओळखता? तो बोलला फार सोपे आहे. जी खात आहे ती मादी आहे व जो खात आहे तो नर आहे. आता हे काही सांगण्याचे कारण नाही झाले. यावर मी सांगु इच्छितो की जे लोक फक्त बोलतात ते होत नाही. १९९७-१९९८-१९९९मध्ये जसे श्री.बोडारे साहेब सांगतात की आम्ही त्यांना तुम्ही महापालिका आणली असे नेहमी बोलतो. तुम्ही पण अर्थसंकल्पावर दरवर्षी तेच तेच बोलता आम्ही पण तुमचे ऐकुन घेतो. पाच वर्षापासुन तुम्ही अर्थसंकल्पावर तेच तेच बोलता की, हे नाही झाले, बजेट वास्तविक नाही, येथे आकडे वाढविले आहेत, हे आम्हाला दरवर्षी ऐकावे लागते. तर तुम्हाला देखिल आमचे ऐकावे लागेल. तर तुम्ही सुध्दा जे बोलत असता तेच बोलत राहता. जसे एक उदाहरण देतो, देवआनंद चित्रपट बनवायचा ते कधीही पास होत नव्हते. तरी देखिल तो चित्रपट बनवायचा. तेव्हा दर्शकांनी विचारले की तुम्ही हे काय करत आहात. तेव्हा लोकांनी ठरविले की, हे चित्रपट काढायचे बंद करणार नाही तर आम्ही देखिल चित्रपट बघत राहु. तर आम्ही देखिल आपले ऐकत राहु. आमच्याकडे दुसरा कोणताही मार्ग नाही तर यासर्व गोष्टी लक्षात घेवुन मी स्थायी समितीत जो अर्थसंकल्प सादर केला आहे. श्री. पंजाबी यांनी म्हंटले की, अर्थसंकल्पात आपण नेहमी कर वसुली एवढी दाखवतो, पाणी पट्टीची वसुली एवढी दाखवतो. काही ना काही आम्ही त्यामध्ये वसुली व खर्च दोन्ही कमी दाखवतो. मी सर्वांना त्याचे विवरण देत आहे व त्याच बरोबर हे देखिल सांगतो की, १९९९ मध्ये जेव्हा जागेचे दर वाढविले होते तेव्हा सुचक होते श्री. प्रकाश महाडिक व अनुमोदक होते श्री. जमनादास पुरस्वानी व स्थायी समिती सभापती होते श्री. प्रकाश माखिजा. तुम्ही करवाढीबददल बोललात. मी काल तुम्हाला ठराव दिला होता. त्यामध्ये मागील बाजुस बघितले तर दिसुन येईल की, आपण पाण्याचा दर रूपये ३ वरून रूपये ४. ५० एवढा केला होता. पाण्याचा दर आपण आपल्या कार्यकाळात वाढवला होता. श्री. गोपाल राजवानी यांच्या काळात एवढा भ्रष्टाचार या महापालिकेत झाला तेवढा ४०वर्षात कधी झाला नव्हता. ते आपल्या कार्यकाळात झाले होते. आज ज्याला सत्तापक्ष मिळेल तो जरूर बोलेल, आज आम्ही फक्त एक निवडणूक जिंकलो नाही. सात पोटनिवडणुका जिंकल्या आहेत. आता थोडया दिवसांपुर्वीच आमदारकीची निवडणुक जिंकली आहे. २००२ मध्ये झालेल्या निवडणूकीत २/३ मते राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस व आरपीआयला मिळालेली आहेत. लोक आमच्यावर विश्वास ठेवतात तर आम्हाला ते बोलावे लागेल. तुमच्याकडे सत्ता आहे व आम्ही बोलतो असे नाही. आज जी बीपीएल योजना आहे त्यासाठी मी खुलासा करू इच्छितो की, स्थायी

समितीत निर्णय झाला आहे की, कर्मचारी ३१ मार्च पर्यंत वसुलीच्या कामात व्यस्त असल्याने ही योजना येत्या वर्षात देखिल पुर्ण वर्ष चालु राहील. जेणेकरून याचा फायदा गरीबांना मिळु शकेल. त्याचबरोबर महासभेच्या माध्यमातुन मी सांगु इच्छितो की काही बाबींवर कर आकारणी करण्यांत यावी. ते म्हणजे रस्ता कर ३ वरून ६ टक्के केला जावा. पाणीपुरवठा लाभ कर १ वरून ३ टक्के करावा. विशेष स्वच्छता कर दहा टक्के लावण्यांत यावा व तो फक्त तबेले, लग्न हॉल, इस्पीतळे व हॉटेलांवर लागेल. परंतु तो देखिल फक्त त्याच इस्पीतळांवर लागेल जेथे खाटा असतील. ज्या डॉक्टरकडे दाखल करून घेण्याची सुविधा नसेल त्यांना हा कर लागणार नाही. त्याचबरोबर पाणी पुरवठयाच्या ज्या बिगर घरगुती नळजोडण्या आहेत. घरगुतींना ६ वरून ९ व बिगर घरगुतीला १८ वरून २४, औदयोगिकसाठी १८ वरून २४ व धर्मदाय ट्रस्टला १२चे १२च राहतील. तसेच टॅकरवर जी आकारणी करण्यात येणार आहे. ७ हजार लिटरसाठी रूपये २५०, १० हजार लिटरसाठी ३०० रूपये ती यासाठी करण्यांत येत आहे कारण ज्या विभागात पाणी जात नाही त्या विभागात सध्या टॅकरने पाणी जात असल्याने प्रशासन सध्या जलवाहिन्या टाकत नाही. परंतु त्याचबरोबर ज्या नगरसेवकांच्या प्रभागात पाणी येत नाही. त्या प्रभागात नगरसेवकाची मागणी असल्यास महापौर व आयुक्त साहेबांनी मोफत टॅकर द्यावा. जोपर्यंत तेथे पाणी उपलब्ध होत नाही तोपर्यंत. ही आकारणी जे खाजगी व्यक्ती टॅकर घेवुन जाते त्यांच्यावर करण्यात यावी. आज टॅकरचे काही चालक नगरसेवकांनी नाही सांगितले तरी देखिल कोणालाही पाणी देतात. तर ज्या नगरसेवकांच्या प्रभागात पाण्याची टंचाई आहे ते मा. महापौरांना सांगतिल व त्या आयुक्तांना सांगतील. आयुक्त साहेब त्या प्रभागात पाण्याची आवश्यकता बघुन कितीही टॅकर लागले तरी ते मोफत देतील. असे या महासभेत आज ठरले आहे. त्याचबरोबर जसे आमचे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की जकातीच्या दरामध्ये स्थायी समितीत रूपये ५. ५० कोटी वाढ करण्यात आली होती तीला आता रूपये ८. ५० कोटी करण्यांत येत आहे. परंतु आम्ही मार्गस्थ शुल्कामध्ये वाढ करीत आहोत. जी कल्याण डोंबिवली व ठाणे तसेच पुर्ण महाराष्ट्राच्या महापालिकांमध्ये रू. १०० घेतली जाते येथे २५ रूपये आहे. शहरातून बाहेरच्या बाहेर वाहने निघुन जातात त्यासाठी मार्गस्थ शुल्क घेतले जाते. त्याचे रूपये १ कोटी जास्त येतील. ज्या बाबींचा उल्लेख दरांमध्ये नसतो तीचा य बाब क्र ८६ मध्ये समावेश करण्यात येतो. आम्ही महासभेत मंजुर करून शासनाकडे पाठविले आहे ते जर पास झाले तर त्यामुळे रूपये २ कोटी आपणांस सेंन्चुरी रेयॉन कंपनीकडुन प्राप्त होतील. ती तरतुद आम्ही या ठिकाणी केली आहे. ८. ५० कोटीची जकात वसुली त्यापासुन प्राप्त होईल. बिनकामाच्या वस्तुंची विल्हेवाट लावणे यापासुन रूपये २ कोटी प्राप्त होतील. विकास शुल्क, बाल्कनी, जीने जे आम्ही शासनाकडे पाठविले असुन लवकरच प्राप्त होणार आहे असे कळते. त्याची तरतुद रूपये ५० लाख ठेवण्यात यावी. पाणी पटटी वसुली ९ कोटी अजुन तरतुद केली जावी. घरपटटी वसुली रूपये १६ कोटी. म्हणजेच आम्ही जे रूपये ५० कोटी व ४५ कोटी ठेवले होते आज आम्ही पाणी पटटीची वसुली रूपये २४ कोटी दाखविली आहे. व घरपटटी ही रूपये ३९ कोटी करणार आहोत. वसुली होण्याची अपेक्षा कमी आहे. जे रूपये ४५ व ५० कोटी आहेत ते आम्ही दरवर्षी दाखवतो कारण लोकांकडे आमची तेवढी थकबाकी आहे. आम्ही दरवर्षी तेवढी तरतुद ठेवतो. कारण की विरोधी पक्षाचे म्हणणे आहे रूपये १५ कोटी मिळतात, रूपये २३ कोटी मिळतात. ते लक्षात ठेवुन यावेळी आम्ही तरतुद कमी ठेवली आहे. यानुसार अर्थसंकल्प जो १८९ कोटीचा होता तो १६२६२५० हजार एवढा होईल. खर्चाच्या बाजुस आम्ही एम.आय.डी.सी. चे रूपये २० कोटी वजा दाखवत आहोत. शिक्षण उपकर अधिक, २८८. ००, महापौर निधी तसाच ठेवला आहे रू. ५० लाख. उप महापौर निधी रूपये २५ लाख जसा पुर्वी होता. स्थायी समिती सभापती निधी रू. २५ लाख, शिक्षण मंडळासाठी जे रू. २ कोटी ठेवले होते ते काढुन घेतले आहे व शिक्षण मंडळाने जे रू. ६० लाख मागितले आहेत. ते त्यांना देण्यात येत आहे. शाळांच्या

बांधणीसाठीचे रूपये २ कोटी वजा करून शिक्षण मंडळाने जे रूपये ६० लाख मागितले होते ते देण्यात येत आहेत. शाळांच्या दुरूस्तीसाठी रूपये १० लाख जास्तीचे देण्यात येत आहेत. उद्यानांच्या देखभालीसाठी रू. ३५ लाख वाढवत आहोत. ज्यापैकी २५ लाख रूपये फक्त कॅम्प नं. ५ साठी जे दसेरा मैदान आहे त्याला विकसित करण्यासाठी ठेवले आहेत. नगरसेवक निधी रूपये ४ लाख एवढाच ठेवला जावा. व प्रभाग समितीसाठी जे रू. २ लाख ठेवले होते ते ३ लाख केले जावे. या हिशोबाने खर्च १६२४२५४ हजार एवढा होईल. जेणेकरून जे रूपये १९० कोटीचे अंदाजपत्रक होते ते आम्ही खर्च कमी करून रूपये १६२ कोटीवर आणत आहोत. सुरवातीची शिल्लक १९. ९६ लाख असेल. तर मला असे वाटते की, या अर्थसंकल्पात ज्या बाबी वाढविण्यात आल्या आहेत. तर जास्तीत जास्त १० ते २० पैशाची वाढ करण्यात आली आहे. ही वाढ जास्त नाही. तसेच पाणी पट्टीचे प्रत्येक घराचे जे रूपये १२०० होते ते तसेच ठेवण्यात आले आहेत. आयुक्तांनी १२०० चे २४०० केले होते व ६०० चे १२०० केले होते व झोपडपट्टीला ४० चे ५० केले होते. ते वाढविण्यात आलेले नाही. बाकीचे जे दर आहेत त्यामध्ये कोणत्त्याही प्रकारची वाढ केलेली नाही. शेवटी मी असे म्हणेन की आयुक्त साहेबांनी करात वाढ केली. त्याला सर्व पक्षांनी विरोध केला आहे. करवाढीच्या बाजुने आम्ही देखिल नाही. आयुक्त साहेबांनी तर करवाढ केली आहे परंतु आमचे असे म्हणणे आहे की, जुन्या दराने घरपट्टीची देयके देण्यात यावी. आमचे मा. सदस्य श्री. बोडारे साहेब यांनी जे सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. जी करवाढ केली आहे ती ५० टक्के केली तर लोक भरण्यास तयार आहेत. लोकांवर जो बोजा टाकला आहे त्याच्या विरोधात आम्ही सत्ताधारी पक्षातील सदस्य जमिनीवर बसलो होतो त्यासाठी आमचा जो विरोध आहे तो, कारण नविन कर निर्धारण करण्याचे अधिकार महासभेला नाहीत. बी.पी.एम.सी. ॲक्ट प्रमाणे ते आयुक्तांनी ते त्यांच्या अधिकारात वाढविले आहेत. यासाठी स्थायी समिती अथवा महासभेने कोणतीही अनुमती दिलेली नाही त्याचबरोबर काल जे आंदोलन केले गेले. माझी विरोधी पक्षातील सर्व सदस्यांना विनंती आहे की, जेव्हा १९९९ मध्ये तुम्ही ४० वस्तुंवर दरवाढ केली, आम्ही कधीही स्टुडीओच्या बाहेर शुटींग केली नव्हती. जे पण बोलायचे आहे ते महासभेत बोलु शकता. हा जो अर्थसंकल्प आहे तो विरोधी पक्षांना देखिल चांगला वाटत आहे. परंतु दुर्दैवाने भारत्ताच्या राज्य घटनेत मी कधीही एकमताने अर्थसंकल्प पास झाल्याचे बघितलेले नाही परंतु मी विनंती करेन की, आजचा हा अर्थसंकल्प एकमताने पास केला जावा. मी ठाण्याचे एक उदाहरण देतो. तेथे शिवसेना व भाजपाची सत्ता आहे. महापौर पदाच्या निवडणूकीच्यावेळी तेथे कॉंग्रेस, राष्ट्रवादी व आरपीआयच्या वतीने निवडणूकीचा अर्ज दाखल केला होता. परंतु सत्ता त्यांच्याकडे नसल्याने त्यांनी त्यांचा अर्ज मागे घेतला व महापौर पदाची निवडणूक बिनविरोध पार पडली. जेथे विरोध करायला हवा तेथे विरोध करा. जेथे सहयोग दयायला हवा तेथे सहयोग दया. मी सर्व सदस्यांना विनंती करेन की, आजचा अर्थसंकल्प व त्यानंतरची निवडणूक देखिल सर्वानुमते करू या. जो देखिल महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती बसतात तर सभागृहात असे बोलले जाते की, महापौर सर्वांचे आहेत. जर महापौर, उपमहापौर सर्वांचे असतील तर सर्वांनी येवुन सहकार्य दयायला हवे. महापौर व उपमहापौर यांच्या निवडीच्या वेळी विरोध करायचा व नंतर ते आमचेच आहेत असे म्हणायचे हे योग्य नाही. जर आज आपल्याला आपलेपण राखायचे असेल तर सर्वांनुमते मंजुर करा. आणि हा अर्थसंकल्प सर्वानुमते पास केला तर बरे होईल. आम्ही आपले म्हणणे लक्षात घेवुन १९० कोटीवरून १६२ कोटी एवढा कमी अर्थसंकल्प केला आहे. खर्चात कपात केली आहे. हे देखिल आकडे आम्ही यासाठी ठेवले आहेत कारण करवाढ केली आहे. व्यापारी दराने आकारणी केली आहे. यामुळे अपेक्षित उत्त्पन्न तेवढे प्राप्त होणार आहे. मला असे वाटते की आता ३. २५ वाजले आहेत. ४ वाजता बैठक आहे. आता कृपया हा अर्थसंकल्प मंजुर करून अर्ध्या तासासाठी विश्राम घेवुन सर्व अधिकारी व नगरसेवक प्रीती भोजन करतील व ४ वाजेनंतर महापौर, उपमहापौर पदाची जी निवडणूक आहे त्यामध्ये सर्व पक्ष

सहकार्य देवून बिनविरोध महापौर, उपमहापौर निवडतील अशी आशा करतो. सरते शेवटी माझे दोन शब्द संपविण्या अगोदर सांगु इच्छितो की आजचे जेवण हे श्री. नारायण पंजाबी यांचा वाढदिवस असल्याने ठेवण्यात आले आहे. सर्व लोकांनी त्यांना शुभेच्छा देवुन आजच्या बैठकीतील विषय सर्वानुमते मंजुर करून ४ वाजता होणा-या बैठकीत सर्व सदस्य उपस्थित राहतील अशी आशा करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले की, जेथे जेथे आम्ही मोफत टॅंकर देवु तेथे संबंधित नगरसेवक, आयुक्त ,महापौर पहाणी करून नंतर देणार. मी एक गोष्ट सांगु इच्छितो की या शहरात जेथे पाणी जात नाही तेथे आपण टॅंकर पाठवतो. जी शेवटची टोके आहेत तेथे आपण टॅंकर पाठवतो. अन्यथा टॅंकरची काही आवश्यकता नाही. दुसरे यांनी जसे सांगितले की, मोफत टॅंकरसाठी आम्ही मंजुरी देवु परंतु अर्थसंकल्पात त्याची तरतुद केलेली नाही. कमीत कमी आपण तशी तरतुद ठेवावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>अर्थसंकल्पात यासाठी रू. ५० लाखाची तरतुद ठेवली होती. स्थायी समितीने ती एक कोटी केलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>१ कोटीने काम होईल असे तुम्हाला वाटते का?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आता काही दिवसापुर्वी टॅंकरची जी निविदा उघडली ती देखिल १ कोटीचीच आलेली आहे. त्यानंतरही निधी कमी पडल्यास आम्ही सुधारित अर्थसंकल्पात त्याची तरतुद करू शकतो. नगरसेवकांना मोफत देण्यात येईल मात्र खाजगी व्यक्तींकडुन शुल्क वसुल करण्यांत येणार आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>ज्या लोकांना पाणी येत नाही तेच लोक टॅंकरने पाणी मागतात.

**मा. सदस्य श्री. रोहडा श्यामसुंदर हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आपले म्हणणे असे आहे का की नगरसेवका बरोबर जे लोक येतील त्यांना देखिल मोफत टॅंकर देण्यात यावेत.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>माझे म्हणणे असे आहे की ज्या ठिकाणी पाणी जात नाही त्या ठिकाणी मोफत टॅंकर दयायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>त्या ठिकाणी नगरसेवकाच्या सांगण्यावरून पाणी देण्यात येईल. मी आयुक्त साहेबांना अशी देखिल विनंती करेन की ज्या ठिकाणी पाणी येत नाही त्या ठिकाणी आधी जलवाहिन्या टाकाव्यात व त्यानंतरच टॅंकरवर शुल्क आकारणी सुरू करावी.

**मा. सदस्या श्रीमती वसिटा बेबी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:-</u>मी श्री. किशोर वनवारी यांना सांगु इच्छितो की, आमच्या आयुक्त साहेबांनी जेव्हा सुरवातीला कार्यभार घेतला होता. तेव्हा मी टाईम्स ऑफ इंडियामध्ये त्यांची मुलाखत वाचली होती. त्यामध्ये त्यांनी लिहिले होते की, आपल्याकडे पुरेसे पाणी आहे. एका व्यक्तीला ८० लिटर पाणी पुरेसे आहे. परंतु आपण १२० द.ल. लि. पाणी घेतो. जे निकषांपेक्षा जास्त आहे. त्यावेळी त्यांनी संपुर्ण शहराला सांगितले होते पाणी कमी नसुन पाण्याचे वितरण व्यवस्थीत करावे लागेल. परंतु दु:खाने म्हणावे लागते की ३

वर्षात वितरणासाठी करोडो रूपये खर्च झाले आहेत. परंतु त्यानंतर देखिल शेवटच्या टोकांना अदयाप पाणी मिळत नाही. आपल्या म्हणण्याप्रमाणे तीन महिन्यामध्ये हे कसे काय शक्य आहे. मला संशय आहे की असे होणार नाही. जी शेवटची टोके आहेत त्या ठिकाणी टॅंकर चालु ठेवा. शहरात कोणालाही त्रास होता कामा नये. ही आमची आपणांस विनंती आहे.

<u>काही सदस्य :-</u>पास, पास.

<u>काही सदस्य :-</u>आमचा विरोध आहे.

<u>मा. महापौरः-</u>सचिव साहेब, कृपया प्रस्तावावर मतदान घ्यावे.

<u>मा. सचिवः-</u>जे सदस्य महापालिका अर्थसंकल्प व शिक्षण मंडळाचा अर्थसंकल्पामध्ये श्री किशोर वनवारी यांनी सुचविलेल्या सुधारणांशी सहमत आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने मते :-५१</u>

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती. रामचंदानी भावना
३. श्री. लिंगे सुर्यकांत
४. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
५. श्रीमती कालानी ज्योती सुरेश
६. श्री. चंदाराम मोकल
७. श्री. वाघे शामु बाबु
८. श्री. ऐडके गणपत
९. श्रीमती. शर्मा कमला
१०. श्री. वलेचा पृथ्वी
११. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१२. श्रीमती गुप्ता अनिता
१३. श्री. पवार नाना
१४. श्रीमती आहुजा निता
१५. श्री. राजु जग्यासी
१६. श्री. निकम शांताराम
१७. श्री. ठाकुर विनोद
१८. श्रीमती. सोनेजी मीना
१९. श्रीमती मंसद माया
२०. श्री. गायकवाड सुरेश
२१. श्रीमती. वनवारी मोना
२२. श्री. वनवारी किशोर नारायणदास
२३. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२४. श्री. लुंड गोविंदराम
२५. श्रीमती खिलनानी भावना रवी
२६. श्री. खेमाणी देवेंदसिंग
२७. श्रीमती रेखा कारीरा
२८. श्री. पमनानी ईश्वर
२९. श्री. पंजाबी नारायण
३०. श्रीमती पंजाबी दिपा

३१. श्री. साधवानी मनोज
३२. श्रीमती भठिजा कोमल
३३. श्री. रामरख्यानी मोहनदास
३४. श्री. लबाना होशियारसिंग
३५. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
३६. श्री. तलरेजा विनोद
३७. श्रीमती नाथानी निना
३८. श्रीमती. रिझवानी सुजाता
३९. श्रीमती. छाब्रिया भारती
४०. श्री. संजय बठिजा
४१. श्रीमती. दासानी मिनु
४२. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
४३. श्री. लाल बिहारी यादव
४४. श्री. जाधव प्रशांत
४५. श्री. जाधव सुरेश
४६. श्री. टाले प्रमोद
४७. श्रीमती साधवानी जया
४८. श्री. भालेराव गौतम
४९. श्री. ठाकुर अशोक
५०. श्री. बेहरानी मोहन
५१. श्रीमती करोतिया मालती

<u>मा. सचिवः-</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात मते :-१९</u>

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती मोकल सिमा
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. पुरस्वानी जमनादास
५. श्री. रूपचंदानी बच्चाराम
६. श्री.राज असरोंडकर
७. श्रीमती. कृष्णानी रेखा
८. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
९. श्री. सोनावणे नथु
१०. श्री. गायकवाड दिलीप
११. श्रीमती बामणकर नंदीनी
१२. श्रीमती खांडेकर प्रेमा
१३. श्रीमती माने किरण
१४. श्री. चव्हाण रमेश
१५. श्री. धनंजय बोडारे
१६. श्री. पाटील विश्वनाथ
१७. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१८. श्री. चौधरी राजेंद्र
१९. श्रीमती. सुर्वे जयश्री

<u>मा. महापौरः-</u>सदरचे प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहेत.

विषय :— स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन

२००५—०६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००४—०५ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

<u>प्रस्तावना</u>

स्थायी समितीने दि. ९.२.२००५ च्या ठराव क्र. १५८ प्रमाणे सन २००५—२००६ चा रूपये ६५.९६ लाख शिल्लकीचा अर्थसंकल्पीय अदांज व सन २००४—२००५ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजाचे अंतिम स्विकृती बाबतचा प्रस्ताव महासभेपुढे प्रस्तावित केलेला आहे त्यासोबत मुख्य लेखा अधिकारी यांनी विविध उत्पन्न व खर्चाच्या शिर्षाखाली अंदाजित केलेल्या रक्कमेबाबतची छापील प्रत महासभेपुढे ठेवली आहे.

सन २००४—२००५चे सुधारित अर्थसंकल्पिय अंदाज :—

उत्पन्न :— रू. १२०.२७ कोटी

खर्च :— रू. १२०.१० कोटी

अखेरची शिल्लक :— रू. १७.०० लाख

सन २००५—२००६ साठी आयुक्तांनी स्थायी समिती समोर सादर केलेले उत्पन्न व खर्चाचे अंदाज :—

उत्पन्न :— रू. १२६.६२ कोटी

खर्च :— रू. १६१.६९ कोटी

तुट :— रू. ३५.०७ लाख

आयुक्तांचे अंदाज विचारात घेऊन सन २००५—२००६ साठी स्थायी समितीने तयार केलेला अर्थसंकल्पिय अंदाज :—

उत्पन्न :— रू. १९०.१२ कोटी

खर्च :— रू. १८९.४६ कोटी

अखेरची शिल्लक :— रू. ६६.०० लाख

स्थायी समितीने शिफारस केलेले विविध कर व दराचे प्रस्ताव

अ. <u>जकात</u> :

| वस्तू गट क्रमांक | वस्तूचे नांव | प्रचलित दर (%) | प्रस्तावीत वाढीव दर (%) | अंदाजीत वाढीव उत्पन्न (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १३ | कॅन्फेशनेरी, जेली,मासळी,,किराणा माल इ . | ३.०० | ४.०० | १२८ |
| ३८अ | सर्व प्रकारचे पेट्रोल व स्पिरीट इत्यादी | ३.५० | ४.०० | १०० |
| ३८अ | सर्व प्रकारचे खनिजतेल , पेट्रोलियम पदार्थ | २.५० | ३.०० | |
| ४०ब | केमिकल्स | ३.२५ | ४.०० | ५६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५३ क | प्लॅस्टिक व बेकालाईट इ. | २.४० | २.६० | ३१ |
| ६१ | सर्व प्रकारचे कापड | १.६० | १.८० | १८८ |
| ६५ | सुत | १.९० | २.०० | ११ |
| ७१ | हार्डवेअर, लोखंड व पोलाद | ३.०० | ३.२० | २३ |
| ७७ | पितळ,तांबे,टिन,ॲल्युमिनियम व इतर अलोह धातू | १.४० | १.५० | १८ |
| | एकुण अपेक्षित उत्पन्न :— | | | ५५५ |

ब. पाणी टॅंकर भाडे :

| टॅंकर क्षमता | प्रस्तावित दर |
|---|---|
| ७००० लिटर | रु. २५० प्रती फेरी |
| १०००० लिटर | रु. ३०० प्रती फेरी |

क. मालमत्ता कर :

मालमत्ता कराच्या प्रचलीत दरात कोणत्याही प्रकारची दरवाढ करण्यात आलेली नाही .

ड. पाणी पट्टी दर :

पाणीपट्टीच्या प्रचलीत दरात कोणत्याही प्रकारची दरवाढ करण्यात आलेली नाही .

आयुक्तांचे सन २००४—२००५ चे सुधारीत अंदाजपत्रक सन २००५—२००६ चे जमा खर्चाचे अंदाज, स्थायी समितीने वर्ष २००५—२००६ साठी शिफारस केलेले विविध कर व दरांचे प्रस्ताव व तयार केलेले अंदाजपत्रक तसेच प्रशासनाकडून तपशिलवर माहिती घेऊन अधिनियमाचे कलम १०० नुसार अर्थसंकल्पिय अंदाजास अंतिम मंजूरी देण्यास प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र.:—६७ दिनांक:—१८/२/२००५.

सुचकाचे नाव :— श्रीमती ज्योती कालानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०० मधील सर्व तरतुदी व सभेत चर्चेअंती सुचविलेले फेरफार विचारात घेवून विविध करांचे दर खालील प्रमाणे मंजूर करीत आहे.

१. जकात

| वस्तू गट क्रमांक | वस्तूचे नांव | प्रचलित दर (%) | प्रस्तावीत वाढीव दर (%) | अंदाजीत वाढीव उत्पन्न (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १३ | कॅन्फेशनेरी, जेली,मासळी,किराणा माल इ . | ३.०० | ४.०० | १२८ |
| ३८अ | सर्व प्रकारचे पेट्रोल व स्पिरीट इत्यादी | ३.५० | ४.०० | १०० |
| ३८अ | सर्व प्रकारचे खनिजतेल , पेट्रोलियम पदार्थ | २.५० | ३.०० | |
| ४०ब | केमिकल्स | ३.२५ | ४.०० | ५६ |
| ५३ क | प्लॅस्टिक व बेकालाईट इ. | २.४० | २.६० | ३१ |
| ६१ | सर्व प्रकारचे कापड | १.६० | १.८० | १८८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६५ | सुत | १.९० | २.०० | ११ |
| ७१ | हार्डवेअर, लोखंड व पोलाद | ३.०० | ३.२० | २३ |
| ७७ | पितळ,तांबे,टिन,ॲल्युमिनियम व इतर अलोह धातू | १.४० | १.५० | १८ |
| | एकुण अपेक्षित उत्पन्न :– | | | ५५५ |

२. <u>पाणी टॅंकर भाडे :–</u>

| टॅंकर क्षमता | प्रस्तावित दर |
|---|---|
| ७००० लिटर | रु. २५० प्रती फेरी |
| १०००० लिटर | रु. ३०० प्रती फेरी |

३. <u>मालमत्ता कर :–</u>

| अ.क्र. | करांचे नाव | प्रचलित दर | मंजूर वाढीव दर |
|---|---|---|---|
| १ | पथ कर | ३ | ६ |
| १ | पाणी पुरवठा लाभ कर | १ | ३ |
| ३ | विशेष साफसफाई कर | निरंक | १० |

<u>विशेष साफसफाई कर :</u>

**टीप :–** अ) तबेले, मंगल कार्यालय (खुले व बंद) आणि अंतररुग्ण दवाखाने अशा सर्व मालमत्तावर कर योग्य मुल्याचे १० टक्के विशेष साफसफाई कर लागू राहील.

ब) ज्या हॉटेल्सचे करयोग्य मुल्य १०,०००/–पेक्षा जास्त आहे अशा सर्व हॉटेल्स मालमत्तावर कर योग्य मुल्यांचे १० टक्के विशेष साफ सफाई कर लागू राहील. विशेष साफ सफाई कर लागू होणारी हॉटेल्स म्हणजे ज्या मालमत्तेमध्ये खान्या पिण्याची विक्री होते अशा सर्व मालमत्ता.

४. <u>पाणी पट्टी दर</u> :–

अ) ज्या मालमत्तावर बांधकामाच्या स्वरुपा नुसार पाणीपट्टी आकारण्यात येते अशा मालमत्तावर कोणत्याही प्रकारची दर वाढ न करता प्रचलित दर कायम करण्यात येत आहेत.

किंवा

ब) स्थायी समितीने सामान्यपणे मान्यता देईल अशा बाबतीत कोणत्याही जागेला घरगुती/वाणीज्य प्रयोजनासाठी पाणी पुरवल्या बद्ल मोजणी व्दारे आकारावयाचे दर.

| अ.क्र. | उपभोक्ता प्रकार | प्रचलित दर हजार लिटर्स साठी) | वाढीव दर (हजार लिटर्स साठी) |
|---|---|---|---|
| १ | घरगुती वापर | रुपये ६.०० | रुपये ९.०० |
| २ | वाणीज्य वापर | रुपये १८.०० | रुपये २४.०० |
| ३ | औद्योगिक वापर | रुपये १८.०० | रुपये २४.०० |
| ४ | सार्वजनिक संस्था वापर | रुपये १२.०० | रुपये १२.०० |

वर्ष २००४–२००५ चे सुधारीत अंदाजपत्रक :–

वर्ष २००४–२००५ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज शिफारीश केल्याप्रमाणे जसेच्या तसे स्विकृत करण्यात येत आहेत.

वर्ष २००५–२००६ चे मुळ अंदाजपत्रक :–

स्थायी समितीने वर्ष २००५–२००६ साठी शिफारीश केलेले अर्थसंकल्पीय अंदाज अमान्य करुन आयुक्तांनी सादर केलेले उत्पन्न व खर्चाचे अंदाजात पुढीलप्रमाणे फेरफार करुन तयार करण्यात आलेल्या रुपये १६२.८७ कोटीचे उत्पन व रुपये १६२. ८२ कोटी खर्चास अंतीम मान्यता देण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| अ.क्र. | उत्पन्न | रुपये १२६६२५० | खर्च | रुपये: १६१६९५४ |
|---|---|---|---|---|
| १ | जकात | + ८५००० | एम्. आय्. डी. सी. पाणी पुरवठा बिल | – २०००० |
| २ | महापालिका मालमत्ता विनियोग | + २०००० | शिक्षण कर | + २५६०० |
| ३ | विकास शुल्क | + ७५०० | रोजगार हमी कर | + ३२०० |
| ४ | पाणी बिल वसुली | + ९०००० | महापौर निधी | + ५००० |
| ५ | सर्व साधारण कर | + ८१६०० | उपमहापौर निधी | + २५०० |
| ६ | महापालिका शिक्षण कर | +१६००० | स्थायी समिती सभापती निधी | + २५०० |
| ७ | वृक्ष कर | +१६०० | शिक्षण मंडळ वर्गणी | + ६००० |
| ८ | पथ कर | +९६०० | महापालिका शाळा बनविणे | – २०००० |
| ९ | शिक्षण कर | +२५६०० | महापालिका शाळा दुरुस्ती | – १००० |
| १० | रोजगार हमी कर | +३२०० | उद्यान दुरुस्ती व निगा | + ३५०० |
| ११ | पाणी पुरवठा कर | +३२०० | दिवाबत्ती दुरुस्ती व निगा | + १५०० |
| १२ | मलप्रवाह सुविधा लाभ कर | +३२०० | अनधिकृत बांधकाम निस्काशित करणे | + २५०० |
| १३ | मलप्रवाह कर | +१६००० | | |
| | एकुण :– | १६२८७५० | एकुण :– | १६२८२५४ |
| | | | अखेरची शिल्लक :– | ४९६ |

तसेच रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या कामामध्ये एक अतिरिक्त रस्त्याचा समावेश करण्यात येत आहे. तो याप्रमाणे "पवई उड्डाण पुल ते उल्हास स्टेशन पर्यंत लोहमार्गा लगतचा रस्ता " –

दारिद्रय रेषेखालील मालमत्ताधारकांना देण्यात येणारी कर माफीची मुदत ३१/३/२००६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

ही महासभा उपरोक्त फेरफारासह सन २००५–२००६ चा रु. ४.९६ **लाख** शिल्लकीच्या अर्थसंकल्पिय अंदाजास आणि सन २००४–२००५ च्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देत आहे आणि मुख्य लेखा अधिकारी याबाबतची छापील प्रत प्रसिध्द करील ती प्रत या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

बहुमताने

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

विषय :– उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास मंजुरी देणे

प्रस्तावना :

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे शिक्षण मंडळ ठराव क्रमांक १०५ दिनांक १८/८/२००४ अन्वये खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये: १००७८९५००/–
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १००७८९५००/–

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ३९२८१००० /– शासकीय अनुदान अपेक्षित असून उर्वरित रक्कम ६०६८१५०० /– महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून अदा करावयाची आहे . शिक्षण मंडळाने सादर केलेल्या अंदाजपत्रकात काही लेखाशीर्षातर्गत बाबीमध्ये पुढील प्रमाणे फेरफार करुन स्थायी समिती ठराव क्र. १५९ दिनांक ९/२/२००५ अन्वये सिमित करण्यात आलेले आहे.

| **INCOME**/उत्पन्न | **Rs. 100789500** | **EXPENDITURE/** खर्च | **Rs.** १००७८९५०० |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| Umc Contribution उमपा देणगी | (-) 6000000 | Electricity Charges of Schools शाळांचे विदयुत बिल. | |
| | | Maintenance of Existing Primary School Buildings | (-) ३०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सध्या कार्यरत शाळांचा देखभाल खर्च | |
| | | Construction of New School Buildings शाळांच्या नविन इमारतींचे बांधकाम. | (-) २०००००० |
| | | Providing free shoe boots & Socks to all Mpl. Primary School Children' म. न. पा शाळेतील विद्यार्थ्यांना मौफत पादत्राणे व मौजे पूरवणे. | (-)१०००००० |
| **TOTAL/ एकूण** | ९४७८९५०० | **TOTAL/ एकूण** | ९४७८९५०० |

सदर खर्चापोटी महापालिकेचा हिस्सा म्हणून रुपये ५४६८१५००/— ची तरतुद करण्यात आलेली आहे . शिवाय महापालिका शाळा दुरुस्तीसाठी व नविन शाळा बनविणेसाठी महापालिका अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब शिक्षण मंडळाचे सन २००५—२००६ चे अंदाजपत्रक महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावीत करीत आहे .

**महासभा ठराव क्रमांक : ६८** **दिनांक : १८/२/२००५**

सुचकाचे नांव : श्रीमती ज्योती कालानी
अनुमोदकाचे नांव : श्री. किशोर वनवारी

ही महासभा स्थायी समितीने सुचविलेले फेरफार अमान्य करुन शिक्षण मंडळाने ठराव क्रमांक १०५ दिनांक १८/८/२००४ अन्वये तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देत आहे. सदर खर्चापोटी महापालिकेचा हिस्सा म्हणून रुपये ६,०६,८१,५००/— ची तरतुद करण्यात येत आहे, तसेच महापालिका शाळा दुरुस्तीसाठी व नविन शाळा बनविण्यासाठी महापालिका अंदाजपत्रकात करण्यात आलेली तरतुद रद्द करण्यास मंजूरी देत आहे.

**सुचकाची सही /—**

**अनुमोदकाची सही /—**

**बहुमताने**

महापौर / पिठासिन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दया.

जन गण मन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायना नंतर दुपारी ३. ३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती मालती करोतिया यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१८/२/२००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१८/२/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.२.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता घेण्यांत आली. सदर सभेत मा. महापौर श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती मालती करोतिया

२) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१ | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ४३. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४४. | श्री. सुरेश जाधव |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४५. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४७ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ५०. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्रीमती. कालानी ज्योती सुरेश | ५१. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १४. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्री. एडके गणपत गोविंद | ५३. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १६. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १७. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ५६. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १९. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५७. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २०. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २१. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५९. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ६०. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २३. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ६१. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २४. | श्री. नाना आनंदा पवार | ६२. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २५. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ६३. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २६. | श्री. जग्यासी राजु | ६४. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २७. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६५. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २८. | श्री. शांताराम निकम, | ६६ | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६७. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| ३०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६८. | श्री. विनोद तलरेजा |
| ३१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६९ | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ७०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ७१. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| ३४. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ७२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७३. | श्री. बेहरानी मोहन |
| ३६. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ७४. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ७५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३८ | श्रीमती भावना रवी खिलनानी | ७६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३९ | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७७. | श्री. हरदास माखिजा |
| ४० | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ७८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ७९. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. मोहन साधवानी, २. श्री. बेहरानी ठाकुरदास हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>मा. महापौरजी, सभागृहातील कामकाजाचे व्हीडीओ शुटींग करण्याची यांना जी परवानगी दिली आहे. तर यांना सभागृहात कसे वागावे याचीही शिस्त शिकवा. यांचे नाचगाणे बघण्यासाठी काही आम्ही त्यांना बोलवत नाही. वंदेमातरम व राष्ट्रगीत चालु असताना व्हीडीओ शुटींगसाठी यांनी सभागृहात इकडे तिकडे नाचत फिरावे? हे एका जागी उभे राहु शकत नाहीत काय? यापुढे जर यांना व्हीडीओ शुटींगसाठी बोलाविले तर त्यांना सभागृहात कसे वागावे याबाबत शिस्त शिकविली जावी. अशाप्रकारचे नाटक पुन्हा होता कामा नये.

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १:— निर्वाचित पालिका सदस्यांमधुन एकाची महापौर म्हणुन निवड करणे.</u>

***महापौर पदासाठी यावेळेस केवळ दोन उमेदवार आहेत ज्यांची नावे याप्रकारे आहेत. पहिल्या क्रमांकावर आहेत श्रीमती कालानी ज्योती सुरेश (पप्पु) दुसरे उमेदवार आहेत श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहीदास यामधील कुणा एकास आपणांस निवडायचे आहे. नविन नियमानुसार उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी दिला जात आहे.***

मागील नियमानुसार नामनिर्देशन पत्रांची छाननी दुस—या दिवशी होत होती. नविन नियमानुसार आता छाननी मा. महापौर आता करतील. तसे तांत्रिक बाबीनुसार सर्व नामनिर्देशन पत्र बरोबर आहेत. परंतु याबाबतची घोषणा मा. महापौर करतील. त्यानंतर उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटाची वेळ आपणांस दिली जाईल. जर कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवु इच्छित असेल तर, त्यासाठी १५ मिनिटांची वेळ दिली जाईल. त्यानंतर मागील नियमानुसार जे गुप्त मतदान होत होते परंतु यावेळेस गुप्त मतदान होणार नाही. यावेळेस उभे राहुन उमेदवाराच्या बाजुने आपणांस हात वर करावयाचा आहे. व मागील नियमानुसार हे एक आवश्यक होते की, जेव्हा दोन उमेदवारांना समसमान मते पडतात त्यावेळेस मा. पीठासीन अधिका—यांना अधिकार होता की, ते आपल्या मर्जीनुसार कुण्या एका उमेदवारास आपले दुसरे निर्णायक मत (कॉस्टिंग वोट) देवु शकत होते. तर ज्यावेळेस अशी काही परिस्थिती निर्माण झाली की दोन्ही उमेदवरांना समसमान मते पडली तर यावेळेस त्यांना दुसरे निर्णायक मत (कॉस्टिंग वोट) देता येणार नाही. यासाठी चिठ्ठया टाकुन

लॉटरी काढायची आहे. हे नियमांमधील बदल आहेत जे आताच मी आपणांस सांगितले या व्यतिरिक्त जसेही नविन महापौर निवडले जातील तेव्हा ज्या आताच्या महापौर आहेत त्या आपले आसन नवनिर्वाचित महापौरांना प्रदान करतील. व स्वत: मागे येतील व महापौर पदाचा जो कार्यभार आहे तो २१ तारखेला नविन महापौरांना सुपूर्द करावयाचा आहे. कार्यभार आज सोपवणार नाहीत. हीच पध्दत मा. उपमहापौर या पदासाठी सुध्दा लागु आहे. तर आता नामनिर्देशन पत्रांची छाननी केली जाईल. व त्यानंतर मा. महापौर त्याबाबतीत घोषणा करतील.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—मा. महापौरजी, सचिव साहेब आपणांकडुन थोडी माहिती हवी आहे. आपण आता ही जी निवडणूकीची नविन प्रक्रिया सांगितली याबाबतीत इतर महानगरपालिकांतील काही नगरसेवक दाद मागण्यासाठी उच्च न्यायालयात गेले आहेत. त्याचेकडील काही निर्णय आपणांकडे आले आहेत काय? येणार आहे काय?

मा. सचिव:—अशी काही सूचना नाही. व अनौपचारीक माहितीच्या हिशोबाने नाशिक महानगरपालिकेच्या वतीने जी याचिका दाखल केली होती ती याचिका केवळ दाखल करून घेतली आहे.याबाबतीत कोणताही अंतरिम आदेश अदयाप देण्यात आलेला नाही.

महापौर पदासाठी चार उमेदवारांनी आपले नामांकन पत्र दाखल केले होते. त्यांची नावे याप्रमाणे होती.

१. श्रीमती ज्योती सुरेश (पप्पु) कालानी
२. श्रीमती शर्मा कमला गंगाधर
३. डॉ. नीना प्रकाश नाथानी
४. श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहीदास

या सर्वांचे नामांकनपत्र मा. महापौरांकडून वैध घोषीत करण्यात आले आहे.

यावेळी ४ वाजुन ४० मिनिटे झाली आहेत. १५ मिनिटाची वेळ दिली जात आहे. कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवु इच्छित असेल तर तो १५ मिनिटांमध्ये आपली उमेदवारी मागे घेवु शकतो.

या दरम्यान डॉ. निना नाथानी व श्रीमती कमला शर्मा यांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, जसे की या अगोदरच्या सभेत सुध्दा विनंती केली होती की, आता मा. महापौर पदाची जी निवडणूक होत आहे. त्यासंदर्भात विरोधी पक्षातील सर्व सदस्यांना मी विनंती करतो की, त्यांनी त्यांच्या उमेदवाराची उमेदवारी मागे घेतली तर महापौर पदाची निवडणूक बिनविरोध व सर्वसंमतीने होईल जसे ठाणे महानगरपालिकेत झाले तसे येथे सुध्दा करता येईल.म्हणुन माझी विरोधी पक्षातील सर्व सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांच्या उमेदवाराची उमेदवारी मागे घेतली तर फार चांगले होईल.

<u>मा. सचिव:—</u>कृपया सर्वांनी आपापले मोबाईल फोन बंद ठेवावेत. तसेच प्रेक्षा गॅलरीतील प्रेक्षकांनी कृपया बसुन घ्यावे. सर्वांनी कृपया बसुन घ्यावे. सर्वांना बसण्यासाठी तेथे पुरेशी बैठक व्यवस्था आहे. कृपया सर्वांनी बसुन घ्यावे. पंधरा मिनिटांची वेळ संपली. कोणही उमेदवार उमेदवारी मागे घेण्यास तयार नाही ना? यावेळी दोन उमेदवार आहेत. पहिल्या क्रमांकावर आहेत श्रीमती कालानी ज्योती सुरेश आणि दुस—या क्रमांकावर आहेत श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहीदास या दोघांमधुन आपणांस एकाची निवड करायची आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>साहेब, उभे राहुन हात वर करायचा आहे काय?

<u>मा. सचिव:—</u>त्याबाबत मी आपणांस सांगत आहेच. कारण की आपण आपल्या इच्छेनुसार मतदान करत आहात हे त्यातुन जाहिर होईल. कारण की शासन निर्णयामध्ये लिहिले आहे की, मतदान करण्यासाठी आपणांस योग्य आणि पुरेशी संधी दिली पाहिजे.

श्रीमती ज्योती कालानी या उमेदवाराच्या बाजुने जे सदस्य मत देवु इच्छितात त्यांनी कृपया उभे राहुन हात वर करून आपले मत प्रदर्शित करावे. नामनिर्देशित सदस्यांनी कृपया आपल्या आसनावर बसुन घ्यावे.

***श्रीमती ज्योती कालानी यांच्या बाजुने :- ५७ मते***

१. श्रीमती करोतिया मालती
२. श्रीमती साधवानी जया
३. श्री. टेकचंदानी राजु
४. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर
५. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे
६. श्री. वाघे शामु बाबु
७. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
८. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
९. श्री. मोकल चंदाराम विठोबा
१०. श्री. ऐडके गणपत गोविंद
११. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
१२. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१३. श्री. यादव लालबिहारी बुझारत

१४. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल

१५. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती

१६. श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र

१७. श्री. नाना आनंदा पवार

१८. श्रीमती आहुजा निता प्रकाश

१९. श्री. जग्यासी राजु

२०. श्री. शांताराम निकम,

२१. श्री. टाले प्रमोद नामदेवराव

२२. श्री. ठाकुर विनोद लालसिंग

२३. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)

२४. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास

२५. श्री. सुरेश नामदेव गायकवाड

२६. श्रीमती वनवारी मोना अशोक

२७. श्री. वनवारी किशोर नारायणदास

२८. श्री. जेसवानी सतराम पुनमदास,

२९. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल

३०. श्रीमती भावना रवी खिलनानी

३१. श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ

३२. श्री. सुरेश जाधव

३३. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

३४. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल

३५. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास

३६. श्री.भालेराव गौतम यशवंत

३७. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास

३८. श्री. ठाकुर अशोक भगवानदास

३९. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के

४०. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास

४१. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण

४२. श्री. साधवानी मनोज लालचंद

४३. श्रीमती. भटीजा कोमल अमृत

४४. श्री. जयसिंघानी अनिल

४५. श्री. रामरख्यानी मोहनदास

४६. श्रीमती किरण लखी माखिजा

४७. श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना

४८. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

४९. श्री. विनोद तलरेजा

५०. डॉ. निना प्रकाश नाथानी

५१. श्रीमती. छाबरीया भारती पहलाज

५२. श्री. संजय रामचंद्र बठीजा

५३. श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश

५४. श्री. बेहरानी मोहन

५५. श्रीमती मीनु राजकुमार दासानी

श्रीमती लक्ष्मीबाई रोहीदास ससाणे या उमेदवाराच्या बाजुने जे सदस्य मत देवु इच्छितात त्यांनी कृपया उभे राहुन हात वर करून आपले मत प्रदर्शित करावे.

श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे यांच्या बाजुने :— १९ मते

१. श्रीमती. संगिता रमेश जावळे

२. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर

३. श्री. सोनवणे नथु काशिराम

४. श्रीमती मोकल सीमा

५. श्री. दिलीप गायकवाड

.६. श्री. उमाप रामदास राघोजी

७. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन

८. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा

९. श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी

१०. श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर

११. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण

१२. श्री. चव्हाण रमेश महादेव

१३. श्रीमती. जयश्री सुर्वे

१४. श्री. बोडारे धनंजय बाबुराव

१५. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश

१६. श्री. पाटील विश्वनाथ गौतम

१७. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे

१८. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम

१९. श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद

विषय : निर्वाचित पालिका सदस्यांमधुन एकाची महापौर म्हणुन निवड करणे.

प्रस्तावना :

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नवीन महापौर निवडणेबाबत दिनांक १८.२.२००५ रोजी सभा आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेमध्ये निर्वाचित पालिका सदस्यांमधुन एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १९ च्या तरतुदीप्रमाणे महापौर पदावर निवड करावयाची आहे. या पदासाठी खालील ४ उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली असुन पीठासीन अधिकारी यांनी सदरची नामनिर्देशनपत्रे वैध घोषित केलेली आहेत.

१) श्रीमती कलानी ज्योती सुरेश
२) श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास
३) डॉ. नाथानी निना प्रकाश
४) श्रीमती शर्मा कमला गंगाधर

विहीत मुदतीत उपरोक्त उमेदवारांपैकी श्रीमती नाथानी निना प्रकाश व श्रीमती शर्मा कमला गंगाधर यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने रिंगणात दोन उमेदवार शिल्लक आहेत. त्यामुळे हात उंचावुन मतदानाची पध्द्त अवलंबली जावी व तद्नंतर निवडणूक निकाल जाहीर करणेसाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्रमांक ६९ दिनांक : १८.०२.२००५

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार ७४ पालिका सदस्यांनी हात उंचावुन केलेल्या मतदानाअंती खालील दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारासमोरील मिळालेली मते जाहीर करीत आहे व सर्वात जास्त मते प्राप्त केलेल्या उमेदवार श्रीमती कलानी ज्योती सुरेश या महापौर पदावर निवडून आल्याबाबत घोषित करीत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | मिळालेली एकुण मते |
|---|---|---|
| १ | श्रीमती कलानी ज्योती सुरेश | ५५ |
| २ | श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहिदास | १९ |
| | एकुण मते — | ७४ |

मतदानाद्वारे मंजुर

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.महापौर:—</u> मतदानाचा निर्णय घोषित करण्यापुर्वी  एक जरूरी सूचना आहे की, नवनिर्वाचित ज्या कुणी मा. महापौर येथे व्यासपीठावर येतील त्यांचे स्वागत यावेळेस न करता मा. उपमहापौर पदाच्या निवडणूकीनंतर त्यांचे स्वागत करता येईल. म्हणुनच यावेळेस सभागृहाचे प्रवेशव्दार बंद केले आहे जेणेकरून सभागृहात शांतता राहिल. मी निवडणूक निकाल घोषित करित आहे. श्रीमती कालानी ज्योती सुरेश यांच्या बाजुने ५५ मते आहेत. व श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहीदास यांच्या बाजुने १९ मते आहेत. श्रीमती कालानी ज्योती सुरेश यांना नवनिर्वाचित महापौर म्हणुन घोषित केले जात आहे.

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.२ :—** निर्वाचित पालिका सदस्यांमधुन एकाची उप महापौर म्हणुन निवड करणे.

<u>मा. सचिव:—</u>उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी सुध्दा हीच प्रक्रिया अवलंबिली, अंगीकारली जाईल. उपमहापौर पदासाठी श्रीमती जया मोहन साधवानी , श्रीमती रिझवानी सुजाता रमेश , श्री. तलरेजा विनोद चंदीराम, श्री. ठाकुर विनोद लालसिंग , श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद या उमेदवारांनी नामांकन पत्र दाखल केले आहेत.

कृपया लक्ष दया.  उप—महापौर पदासाठी दाखल केलेले सर्वांचे नामनिर्देशन पत्र मा. महापौरांनी वैध घोषित केले आहे.  जर कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ इच्छित असेल तर त्यासाठी १५ मिनिटाची वेळ दिली जात आहे.  व्यासपीठावरील घडयाळातील वेळेनुसार यावेळेस ५. ०० वाजले आहेत.

१५ मिनिटांची वेळ संपली आहे.  यावेळेस उपमहापौर पदासाठी श्रीमती जया मोहन साधवानी यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे.  श्रीमती रिझवानी सुजाता रमेश यांनी सुध्दा आपली उमेदवारी मागे घेतली आहे.  त्याच बरोबर श्री. ठाकुर विनोद लालसिंग यांनी सुध्दा आपली उमेदवारी मागे घेतली आहे. यावेळेस फक्त २ उमेदवार रिंगणात आहेत.  त्यांची नावे याप्रकारे आहेत—— श्री. तलरेजा विनोद चंदीराम  हे मराठी मुळ अक्षरा प्रमाणे पहिल्या क्रमांकावर आहेत व श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद हे दुस—या क्रमांकावर आहेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे):—</u>इंग्रजी मुळ अक्षराप्रमाणे श्री. पुरस्वानी हे पहिल्या क्रमांकावर येतील.

<u>मा. सचिव:—</u>इंग्रजी मुळाक्षरांप्रमाणे श्री. पुरस्वानी  जमनादास खुबचंद हे प्रथम क्रमांकावर येतात.   व श्री. तलरेजा विनोद चंदीराम हे दुस—या क्रमांकावर येतात.  म्हणून आता प्रथम श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद यांच्या बाजुने मतदान घ्यायचे आहे.

उमेदवार श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद यांच्या बाजूने जे सदस्य मतदान करु इच्छितात त्यांनी उभे राहून आपला हात वर करुन कृपया आपले मत दर्शवावे.

<u>श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद यांच्या बाजुने १९ मते.</u>

१. श्रीमती. संगिता रमेश जावळे
२. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर
३. श्री. सोनवणे नथु काशिराम
४. श्रीमती मोकल सीमा
५. श्री. दिलीप गायकवाड
.६. श्री. उमाप रामदास राघोजी
७. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन
८. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
९. श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी
१०. श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर
११. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१२. श्री. चव्हाण रमेश महादेव
१३. श्रीमती. जयश्री सुर्वे
१४. श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१५. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
१६. श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१७. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे
१८. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम
१९. श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद

व उमेदवार श्री. तलरेजा विनोद चंदीराम यांच्या बाजुने जे सदस्य मतदान करु इच्छितात त्यांनी उभे राहून हात वर करुन कृपया आपले मत दर्शवावे.

श्री. तलरेजा विनोद चंदीराम यांच्या बाजुने    ५५ मते.

१. श्रीमती करोतिया मालती
२. श्रीमती साधवानी जया
३. श्री. टेकचंदानी राजु
४. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर
५. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे
६. श्री. वाघे शामु बाबु
७. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
८. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
९. श्री. मोकल चंदाराम विठोबा
१०. श्री. ऐडके गणपत गोविंद
११. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
१२. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१३. श्री. यादव लालबिहारी बुझारत
१४. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
१५. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१६. श्रीमती गुप्ता अनिता धर्मेन्द्र
१७. श्री. नाना आनंदा पवार
१८. श्रीमती आहुजा निता प्रकाश
१९. श्री. जग्यासी राजु
२०. श्री. शांताराम निकम,
२१. श्री. टाले प्रमोद नामदेवराव
२२. श्री. ठाकुर विनोद लालसिंग
२३. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
२४. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
२५. श्री. सुरेश नामदेव गायकवाड
२६. श्रीमती वनवारी मोना अशोक
२७. श्री. वनवारी किशोर नारायणदास
२८. श्री. जेसवानी सतराम पुनमदास,
२९. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल
३०. श्रीमती भावना रवी खिलनानी
३१. श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ

३२. श्री. सुरेश जाधव

३३. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

३४. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल

३५. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास

३६. श्री.भालेराव गौतम यशवंत

३७. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास

३८. श्री. ठाकुर अशोक भगवानदास

३९. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के

४०. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास

४१. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण

४२. श्री. साधवानी मनोज लालचंद

४३. श्रीमती. भटीजा कोमल अमृत

४४. श्री. जयसिंघानी अनिल

४५. श्री. रामरख्यानी मोहनदास

४६. श्रीमती किरण लखी माखिजा

४७. श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना

४८. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

४९. श्री. विनोद तलरेजा

५०. डॉ. निना प्रकाश नाथानी

५१. श्रीमती. छाबरीया भारती पहलाज

५२. श्री. संजय रामचंद्र बठीजा

५३. श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश

५४. श्री. बेहरानी मोहन

५५. श्रीमती मीनु राजकुमार दासानी

**विषय : निर्वाचित पालिका सदस्यांमधुन एकाची उप महापौर म्हणुन निवड करणे.**

**प्रस्तावना :**

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नवीन उप महापौर निवडणेबाबत दिनांक १८.२.२००५ रोजी सभा आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेमध्ये निर्वाचित पालिका सदस्यांमधुन एका सदस्याची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १९ च्या तरतुदीप्रमाणे उप महापौर पदावर निवड करावयाची आहे. या पदासाठी खालील ५ उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली असुन पीठासीन अधिकारी यांनी सदरची नामनिर्देशनपत्रे वैध घोषित केलेली आहेत.

१) श्री ठाकुर विनोद लालसिंग
२) श्री तलरेजा विनोद चंदिराम
३) श्री पुरस्वानी जमनादास खुबचंद
४) श्रीमती रिझवानी सुजाता रमेश
५) श्रीमती साधवानी जया मोहन

विहीत मुदतीत उपरोक्त उमेदवारांपैकी श्री ठाकुर विनोद लालसिंग, श्रीमती रिझवानी सुजाता रमेश व श्रीमती साधवानी जया मोहन यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने रिंगणात दोन उमेदवार शिल्लक आहेत. त्यामुळे हात उंचावुन मतदानाची पध्द्त अवलंबली जावी व तद्नंतर निवडणूक निकाल जाहीर करणेसाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्रमांक ७०** **दिनांक : १८.०२.२००५**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार ७४ पालिका सदस्यांनी हात उंचावुन केलेल्या मतदानाअंती खालील दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारासमोरील मिळालेली मते जाहीर करीत आहे व सर्वात जास्त मते प्राप्त केलेले उमेदवार श्री तलरेजा विनोद चंदिराम हे उपमहापौर पदावर निवडून आल्याबाबत घोषित करीत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | मिळालेली एकुण मते |
|---|---|---|
| १ | श्री तलरेजा विनोद चंदिराम | ५५ |
| २ | श्री पुरस्वानी जमनादास खुबचंद | १९ |
| | एकुण मते — | ७४ |

**मतदानाद्वारे मंजुर**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

***<u>मा.महापौरः-</u> मी निवडणूक निकाल घोटित करित आहे. श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद यांच्या बाजुने १९ मते पडली आहेत. तर श्री. तलरेजा विनोद चंदीराम यांच्या बाजुने ५७ मते पडली आहेत.***

श्री. तलरेजा विनोद चंदीराम यांना उप—महापौर पदी निवडुन आल्याचे मी घोषित करित आहे.

<u>मा. सचिव :—</u>मा. महापौरांचे म्हणणे आहे की, नवनिर्वाचित महापौर, उप—महापौरांचे सर्वांना स्वागत करु दिले पाहिजे. यासाठी काही वेळ दिली जात आहे. सर्वांना नवनिर्वाचित महापौर, उप—महापौरांचे स्वागत करण्याची संधी दिली जात आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सन्माननिय महापौरजी, भाभी श्रीमती ज्योती कालानी या महापौर पदी व श्री. विनोद तलरेजा हे उपमहापौर पदी निवडुन आल्याबद्दल आम्हा विरोधीपक्षीयांच्या वतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> महापौर महोदया, बाहेरगावावरुन अलेल्या आमच्या पाहुणे मंडळीसह आमच्या जिल्हा कमीटीचे पथक नवनिर्वाचित महापौरांचे स्वागत करण्यासाठी आलेले आहे. त्यांना सुध्दा सभागृहात येवुन अभिनंदन करण्यासाठी परवानगी दिली जावी.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—</u> मी श्री. देवेंद्रसिंह खेमाणी उल्हासनगर मधील समस्त शिख समाजाच्या वतीने, लबाना शिख पंचायत व विश्व लबाना शिख परिषदेच्या वतीने भाभी श्रीमती ज्योती कालानी व श्री. विनोद तलरेजा यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा देतो.

<u>मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—</u> मी पृथ्वी वलेचा आपल्या सोनार समाजाच्या वतीने व मोतीमल ज्वेलर्सच्या वतीने मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी व उपमहापौर श्री. विनोद तलरेजा यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा देतो.

<u>मा. सचिव :—</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१८/३/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/३/२००५
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.३.२००५ सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :— श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :— श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१ | श्री. राज असरोंडकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ४३. | श्री. रमेश चव्हाण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४४. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४५. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४७ | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४८. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५१. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ५२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५४. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १७. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ५५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५७. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २१. | श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेंद्र | ५९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ६०. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २३. | श्री. नाना पवार | ६१ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २४. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६२ | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २५. | श्री. जग्याशी राजु | ६३ | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६४. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २७. | श्री. शांताराम निकम | ६५. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६६. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| ३०. | श्रीमती सोनेजी मिना | ६८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६९. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ७०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३३. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ७१. | श्री. संजय बठिजा |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३५. | श्री. मोहन साधवानी | ७३. | श्री. बेहरानी मोहन |
| ३६. | श्री. सतरामदास जेसवानी | ७४. | श्रीमती मालती करोतिया |
| ३७. | श्रीमती जया साधवानी | ७५. | श्रीमती मिनु राज दासानी |
| ३८. | श्री. लुंड गोविंदराम | ७६. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३९. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ७७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ४०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ७९. | श्री. राजेश वदारिया |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्री. बेहरानी ठाकुरदास, २. श्री. माखिजा हरदास हे सभेस अनुपस्थित होते.

वंदेमातरम म्हणून सांयकाळी ४.३० वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १ वाचून दाखवितात.

दिनांक १ एप्रिल, २००५ पासुन निवृत्त होणा—या ८ स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणुक करणे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, निवडणुक प्रक्रिया सुरु होण्या अगोदर सभागृहातील सर्व सदस्यांना मी विनंती करेल की, या सभेचे कामकाज सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित केले जावे. ज्या लोकांना आपली उमेदवारी मागे घ्यायची आहे, त्याबाबत एकमत घेण्यासाठी, संमती घेण्यासाठी जर कुणी उमेदवार उमेदवारी मागे घेत असेल तर ठिक आहे, नाहीतर सायंकाळी ६.०० वाजता निवडणुक प्रक्रिया चालु केली जावी. व आमच्या काही सदस्यांना सायंकाळी ५ ते ५.३० या वेळेत ''तिज्याला'' जायचे आहे. तर मला असे वाटते की, आता या सभेचे कामकाज दिड तासासाठी स्थगित करुन सायंकाळी ६.०० वाजता घेतले तर खुप चांगले होईल. धन्यवाद.

**मा. सचिव :—** कुणाची काही हरकत? ठिक आहे? तर ही सभा सायंकाळी ६.०० वाजता पुन्हा सुरु केली जाईल.

**मा. महापौर :—** या सभेचे कामकाज आज सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

---

सायंकाळी ४.३० वाजता स्थगित केलेल्या सभेचे कामकाज सायंकाळी ६.३० वाजता पुन्हा सुरु करण्यात आले. त्यावेळी मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी, २) श्रीमती निना नाथानी, ३) श्री. ठाकुर बेहरानी, ४) श्री. हरदास माखिजा हे सन्माननिय सदस्य अनुपस्थितीत होते.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी हया अनुपस्थितीत असल्याने त्यांच्या जागी उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणून आसनस्थ होते.

**मा. सचिव :—** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

दिनांक १ एप्रिल, २००५ पासुन निवृत्त होणा—या ८ स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणुक करणे.

मागील वेळेस स्थायी समितीची जी रचना करण्यात आली होती. त्यामधील ८ सन्माननिय सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नावे याप्रमाणे आहेत .......

१. श्रीमती ज्योती कालानी
२. श्री. मोहन बेहरानी
३. श्री. रामदास उमाप
४. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
५. श्रीमती भारती छाब्रिया
६. श्रीमती नंदीनी बामणकर
७. श्री. सतरामदास जेसवानी
८. श्री. नारायण पंजाबी

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, स्थायी समितीच्या सदस्य पदाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्या अगोदर सभागृहातील सर्व सदस्यांना मी विनंती करेन उमेदवारी मागे घेण्याबाबत अदयाप पर्यंत एकमत /संमती झालेली नाही म्हणून बुधवार दिनांक २३/३/२००५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सभेचे कामकाज स्थगित करण्यात यावे.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड / श्री. धनंजय बोडारे:—** आमचा विरोध आहे. ४ वाजल्यापासुन ६ वाजेपर्यंत आपण वेळ घेतलीत तरीही अदयाप उमेदवारी मागे घेण्याबाबत एकमत झाले नाही काय?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर /श्री. धनंजय बोडारे :—</u> आपणांस कुणाचे मत घ्यायचे आहे? आपणांस कुणाचे मत घ्यायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे /श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> सभेचे कामकाज आपण कितीवेळा तहकुब करत आहात?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> याबाबत मतदान सुध्दा होईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> सभागृहाच्या कामकाजाचा खेळ मांडला आहे? या अगोदर उमेदवारी मागे घेण्याकामी संमती मिळविण्याकामी दिड तास सभेचे कामकाज स्थगित केले. हा विषय काय तात्काळ आलेला नाही. सभा सुचना निघाल्यापासुन एवढा वेळ आपण काय करत होतात? या अगोदर ४ वाजता सभा होती. ४ ची सभा आता ६.३० वाजता सुरु होत आहे. या दोन—अडीच तासामध्ये काय केलेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> पगडी होती.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> श्री. किशोर वनवारीजी, आपण म्हणत होतात, पगडी होती तर पगडी कुणाची होती?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> ज्यांची पगडी होती त्यांचे नाव सांगु? ते श्रीमती नीना नाथानी सांगत आहेत. ऐकुन घ्या.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u> एकमत / संमतीची आम्हांला आवश्यकता नाही.

<u>मा. सचिव :—</u>आपली हरकत आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> होय, आमची हरकत आहे.

<u>मा. सचिव :—</u> मतदान घेतले जावे काय?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> चुकीची प्रथा चालु झाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> हे कोणासाठी चालले आहे हे सुध्दा माहित आहे.

<u>मा. उप—महापौर / पीठासीन अधिकारी :—</u> मी सदरचा प्रस्ताव मतास टाकीत आहे.

<u>मा. सचिव :—</u> जे सन्माननिय सदस्य सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत, ४७ आहेत ना? ४८? सन्माननिय सदस्या श्रीमती मालती करोतिया जी आपला हात वर आहे ना? महोदया आपण कुणाच्या बाजुने मत देत आहात? आपण सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या बाजुने आहात की नाही? आपला हात वर होता. आपल्या मताची नोंद कोणत्या बाजुने घ्यायची?

सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या बाजुने ४७ मते.

## <u>सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या बाजुने ४९ मते.</u>

१. श्री. टेकचंदानी राजु
२. श्रीमती रामचंदानी भावना
३. श्री. लिंगे सुर्यकांत
४. श्री. मुचंदानी महेंद्र

५. श्री. वाघे शामु बाबु
६. श्री. एडके गणपत
७. श्रीमती शर्मा कमला
८. श्री. वलेचा पृथ्वी
९. श्री. रोहडा श्यामसुंदर
१०.श्री. गुप्ता प्रभुनाथ
११.श्रीमती गुप्ता अनिता
१२.श्री. पवार नाना
१३.श्रीमती अहुजा निता
१४.श्री. जग्याशी राजु
१५.श्री. निकम शांताराम
१६.श्री. ठाकुर विनोद
१७.श्रीमती सोनेजी मीना
१८.श्रीमती मसंद माया
१९.श्री. गायकवाड सुरेश
२०.श्रीमती वनवारी मोना
२१.श्री. किशोर वनवारी
२२.श्री. जेसवानी सतरामदास
२३.श्री. लुंड गोविंदराम
२४.श्रीमती खिलनानी भावना
२५.श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
२६.श्रीमती कारीरा रेखा
२७.श्री. पमनानी ईश्वर
२८.श्री. पंजाबी नारायण
२९.श्रीमती पंजाबी दिपा
३०.श्री. जयसिंघानी अनिल
३१.श्रीमती भठिजा कोमल
३२.श्री. साधवानी मनोज
३३.श्री. रामरख्यानी मोहनदास
३४.श्रीमती माखिजा किरण
३५.श्री. लबाना होशियारसिंग
३६.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
३७.श्री. तलरेजा विनोद
३८.श्रीमती रिझवानी सुजाता
३९.श्रीमती छाब्रिया भारती
४०.श्री. भठिजा संजय
४१.श्री. मोकल चंदाराम
४२.श्रीमती दासानी मिनु
४३.श्री. म्हस्के अंकुश
४४.श्री. यादव लालबिहारी
४५.श्री. जाधव प्रशांत
४६.श्री. जाधव सुरेश
४७.श्री. टाले प्रमोद

जे सन्माननिय सदस्य या सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत, कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात २६ मते.</u>

१. श्री. साधवानी मोहन
२. श्रीमती साधवानी जया
३. श्री. भालेराव गौतम
४. श्रीमती वसिटा बेबी
५. श्री. ठाकुर अशोक
६. श्री. बेहरानी मोहन
७. श्रीमती करोतिया मालती
८. श्रीमती जावळे संगिता
९. श्रीमती मोकल सिमा
१०. श्री. उमाप रामदास
११. श्री. पुरस्वानी जमनादास
१२. श्री. रुपचंदानी बच्चाराम
१३. श्री. असरोंडकर राज
१४. श्रीमती कृष्णानी रेखा
१५. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
१६. श्री. सोनवणे नथु
१७. श्री. गायकवाड दिलीप
१८. श्रीमती बामणकर नंदीनी
१९. श्रीमती खांडेकर प्रेमा
२०. श्रीमती माने किरण
२१. श्री. चव्हाण रमेश
२२. श्री. बोडारे धनंजय
२३. श्री. पाटील विश्वनाथ
२४. श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई
२५. श्री. चौधरी राजेंद्र
२६. श्रीमती जयश्री सुर्वे

मा. उपमहापौर / पीठासीन अधिकारी:— या सभेचे कामकाज बहुमताने बुधवार दिनांक २३/३/२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केले जात आहे.

मा. सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.३५ वाजता सभेचे कामकाज सोमवार दिनांक २३.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२३/३/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २३/३/२००५
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.३.२००५ रोजी ४.०० वाजता आयोजित केली होती. सदर सभेचे कामकाज त्याच दिवशी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर सदर सभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा बुधवार दिनांक २३.३.२००५

रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उपमहापौर, श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :– श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. टेकचंदानी राजु | २८. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| ३. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | २९. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ४. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३०. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. वाघे शामु बाबु | ३१. | श्री. जाधव सुरेश |
| ६. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ३२. | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| ७. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३३. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. एडके गणपत गोविंद | ३४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३५. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १०. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३६. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| ११. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ३७. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १२. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ३८. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १३ | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ३९. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| १४. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४० | श्री. जयसिंघानी अनिल |
| १५. | श्री. नाना पवार | ४१ | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| १६. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ४२. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| १७. | श्री. जग्याशी राजु | ४३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| १८. | श्री. शांताराम निकम | ४४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| १९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४५. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४६. | श्री. संजय बठिजा |
| २१. | श्रीमती सोनेजी मिना | ४७ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ४८. | श्रीमती मिनु राज दासानी |
| २३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ४९. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २४. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २५. | श्री. जेसवानी सतरामदास | | |
| २६. | श्रीमती जया साधवानी | | |
| २७. | श्री. लुंड गोविंदराम | | |

तर,

१) मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी तसेच, मा. सदस्य / सदस्या २. श्रीमती. संगिता रमेश जावळे, ३. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, ४. श्री. सोनवणे नथु काशिराम, ५. श्री. उमाप रामदास राघोजी, ६. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ७. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ८. श्री. वनवारी किशोर नारायणदास, ९. श्री. मोहन साधवानी, १०. श्री. राज असरोंडकर, ११.श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, १२. श्री. रमेश चव्हाण, १३. श्रीमती. जयश्री सुर्वे, १४. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १५. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, १६.श्री. पाटील विश्वनाथ गौतम, १७. श्री.भालेराव गौतम यशवंत, १८. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १९. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, २०. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे, २१. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, २२. श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद, २३. डॉ. निना प्रकाश नाथानी, २४. श्री. बेहरानी मोहन, २५. श्रीमती करोतिया मालती, २६. श्री. बेहरानी ठाकुरदास, २७. श्री. माखिजा हरदास, २८. श्री. वदरीया राजेश नानिकराम , २९. श्रीमती सिमा मोकल , ३०. श्री. दिलीप गायकवाड, ३१. श्री. पंजाबी लाल हे सभेस अनुपस्थित होते.

वंदेमातरम म्हणून सायंकाळी ४.२२ वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. महापौरजी, माझा असा प्रस्ताव आहे की, आजच्या सभेचे कामकाज दिनांक २८.३.२००५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केले जावे.

**मा. उप–महापौर /पीठासीन अधिकारी :–** ठिक आहे, सभेचे कामकाज आपणा सर्वानुमते सोमवार दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केले जात आहे.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–**मा. महापौर, काही गरीब फेरीवाले आपल्या काही मागण्यांच्या पुर्ततेसाठी महापालिका मुख्यालयासमोर उपोषणास बसले आहेत. मला असे वाटते की, सभा संपल्यानंतर त्यांच्याकडे जावून त्यांच्या काय मागण्या आहेत त्या जरा समजावून घेवुन त्यांना आश्वासन देवून त्यांचे उपोषण समाप्त करावे.

**मा. उप–महापौर /पीठासीन अधिकारी :–** ठिक आहे, सभा संपल्यानंतर आपण सर्वजण जावु या.

**मा. सचिव :–**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४.२७ वाजता सभेचे कामकाज मंगळवार दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर**

दिनांकः–२९/३/२००५

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २९/३/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा त्याचदिवशी सांयकाळी ६.०० वाजता आयोजित केली होती. यावेळी सदरच्या सभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा बुधवार दिनांक २३/३/२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. यावेळी पुन्हा सदरच सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा सोमवार दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. दिनांक २८.३.२००५ रोजी शिवजयंती असल्यामुळे या सभेचे कामकाज दिनांक २९.३.२००५ रोजी ठेवण्याबाबत विरोधी पक्षाच्या सन्माननिय सदस्यांनी विनंती केल्यानुसार सदरची सभा मंगळवार दिनांक २९.३.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केली होती. त्यावेळी सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

**१) मा.महापौर :– श्रीमती ज्योती कालानी**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३१. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३२. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३४. | श्रीमती. वनवारी मोना अशोक |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३६. | श्री. मोहन साधवानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ३७. | श्रीमती जया साधवानी |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ३८. | श्री. लुंड गोविंदराम |
| १० | श्री. दिलीप गायकवाड | ३९. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४० | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४१ | श्री. राज असरोंडकर |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४३. | श्री. रमेश चव्हाण |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४४. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४५. | श्री. जाधव सुरेश |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ४६. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४७ | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४८. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| २०. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ४९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| २२. | श्री. नाना पवार | ५१. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| २३. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| २४. | श्री. जग्याशी राजु | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| २५. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५४ | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| २६. | श्री. शांताराम निकम | ५५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५७. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २९. | श्रीमती सोनेजी मिना | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | **५९.** | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |

| | | | |
|---|---|---|---|
| ६०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद | ६७. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ६१ | श्रीमती. भटीजा कोमल अमृत | ६८. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ६२ | श्री. जयसिंघानी अनिल | ६९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ६३ | श्री. रामरख्यानी मोहनदास | ७०. | श्री. बेहरानी मोहन |
| ६४. | श्रीमती किरण लखी माखिजा | ७१. | श्रीमती मिनु राज दासानी |
| ६५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना | ७२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ६६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर | ७३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| | | ७४. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा. उप–महापौर १. श्री. विनोद तलरेजा, मा. सदस्य / सदस्या २. श्री. जेसवानी सतराम फतनदास, ३. श्री. संजय रामचंद्र बठीजा, ४. श्रीमती करोतिया मालती, ५. श्री. बेहरानी ठाकुरदास, ६. श्री. माखिजा हरदास, ७. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

वंदेमातरम म्हणून दुपारी १२.२० वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u>मा. महापौरजी, उल्हासनगर कॅम्प ४ आणि ५ मध्ये फार मोठया प्रमाणावर पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे बरेचसे नगरसेवक मा. आमदार साहेबांबरोबर मंत्रालयात एका बैठकीत व्यस्त असल्याने आम्ही या सभेचे कामकाज सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करु इच्छित आहोत.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> ५.०० वाजता स्थायी समितीची सभा आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—</u> स्थायी समिती बाबत नंतर विचार करु. प्रथम आपण महासभेबाबत बोलू या.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :—</u> त्या अगोदर स्थायी समितीची सभा आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—</u> ठिक आहे, त्याबाबत स्थायी समितीत पाहू या. या सभेचे कामकाज ५.३० वाजता ठेवले जावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, प्रत्येक वेळा सभा आयोजित करुन सभेचे कामकाज स्थगित करणे माझ्या मते योग्य नाही. सर्व नगरसेवक आपले कामकाज सोडुन सभेसाठी येथे आले आहेत, आणि तीही स्थायी समितीच्या सदस्यांच्या निवडणूकीची सभा आहे. अशाप्रकारे वारंवार सभा स्थगित करणे योग्य नाही. कारण की, या अगोदरसुध्दा दोन—तीन वेळा असे झालेले आहे. व आज पुन्हा असे होत आहे. यामुळे संपुर्ण दिवस व्यर्थ जात आहे. मला असे वाटते की, या सभेचे कामकाज चालु ठेवावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, आमचे बंधू श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आता हे सांगितले की, आजच्या सभेचे कामकाज स्थगित केले जावू नये, त्याबाबत मी थोडा खुलासा करु इच्छितो, त्या दिवशी महासभेमध्ये सभा स्थगित करण्याबाबत मी जे सांगितले होते, त्यावेळेस आम्ही त्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी २८ तारखेस सभा ठेवण्याबाबत सुचविले होते. परंतु आमच्या सचिव साहेबांकडे शिवसेना भाजपाचे एक शिष्ट मंडळ आले होते व त्यांनी असे म्हटले होते की, २८ तारखेस शिवजयंती असल्यामुळे आम्ही या सभेस येवू शकणार नाही म्हणून या सभेचे कामकाज २९ तारखेस ठेवण्यात यावे. म्हणूनच महासभेचे कामकाज व्यवस्थित चालावे म्हणून आम्ही या बाबतीत आपले जे म्हणणे होते ते मान्य केले होते. २८ तारखेस आम्ही ही सभा आयोजित केली होती. २८ तारखेस या सभेचे कामकाज झाले असते तर आजची ही अडचण आली नसती. उल्हासनगर कम्प ४ व ५ मध्ये पाण्याची जी कपात करण्यात आलेली आहे त्याबाबत संबंधीत मंत्री महोदयांनी मंत्रालयात बैठक आयोजित केलेली आहे. आणि त्या बैठकीसाठी काही नगरसेवक मंत्रालयात गेले असल्याने तसेच पाण्याच्या या कपाती बाबत काल मला सुध्दा उपोषणास बसावे लागले होते. पाणी कपातीबाबत संबंधीत मंत्री महोदयांबरोबर आज ११.०० वाजता बैठक आहे. तर आमचे उप—महापौर व अन्य बरेचसे नगरसेवक त्या बैठकीसाठी गेले आहेत, पाण्याची जी कपात करण्यात आलेली आहे ती रद्द केली जावी. उल्हासनगर कॅम्प ४ व ५ मध्ये पाण्याची जी टंचाई निर्माण झाली आहे ती दूर होईल. म्हणून आम्ही आपणांस विनंती करतो की, या सभेचे कामकाज सांयकाळी ५.३० वाजेपर्यंत स्थगित केले जावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> ही गोष्ट खरी आहे की, शहरामध्ये पाणी टंचाई आहे म्हणून सभा स्थगित करण्याबाबत आपण विनंती करीत आहात. परंतु अशी विनंती जर आपण विरोधी पक्षास केली तर आम्ही कोणत्याही गोष्टी बाबत कधीही हरकत घेतलेली नाही. या अगोदर सुध्दा दोन—दोन, तीन—तीन वेळा सभेचे कामकाज स्थगित करण्यात आले होते परंतु त्याबाबत विरोधी पक्षीयास विनंती केली नव्हती. त्यावेळी सत्ताधारी पक्ष आपल्या बहुमताच्या जोरावर मतदान घेवून काम करत असतो. जर आपण विनंती केलीत तर आम्ही कोणत्याही बाबींवर सहकार्य देण्यास तयार आहोत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> मा. महापौर महोदया, आता येथे सांगण्यात आले की, पाणी कपातीबाबत चर्चा करण्यासाठी एक शिष्ट मंडळ मंत्रालयात गेले आहे. आम्ही मान्य करतो व विश्वास ठेवतो की, पाणी कपातीबाबत चर्चा करण्यासाठी नगरसेवकांचे एक शिष्ट मंडळ चर्चेसाठी गेले असल्याने आजच्या सभेचे कामकाज स्थगित करत आहात परंतु या अगोदरचा जो अनुभव आहे, तो कोणतेही कारण नसतांना या अगोदर तीन वेळा सभेचे कामकाज स्थगित करण्यात आले. महापौर पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर दुस—या सभेचे हे कामकाज आहे. पहिली सभा बजेट बाबतची होती आणि दुस—या या सभेचे कामकाज तीन वेळा स्थगित झाले आहे. हे बरोबर नाही. सभागृहाच्या मर्यादेचे हे उल्लंघन आहे. वारंवार स्थगित होणा—या या सभांमुळे सत्ताधारी व विरोधी पक्षांतील सदस्यांची सभेबाबत अनास्था निर्माण होवून विश्वासच उडुन जाईल. म्हणून सभागृहाचे पावित्र्य राखून यापूढे तरी अशी प्रथा पडणार नाही. याची काळजी घ्यावी व आज आपण जे

कारण सांगितले ते खरे मानुन आजच्या सभेचे  कामकाज ४.०० वाजेपर्यंत किंवा ५.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यास आम्ही सहमती देतो. परंतु कृपया सदस्यांचा व अधिका–यांचा आपल्यावरील, सभेवरील विश्वास उडणार नाही, अश्या विश्वासाचे वातावरण तयार करण्याचे प्रयत्न करावे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–मा. महापौरजी, मागच्या वेळेस आपण सभेचे कामकाज स्थगित केले होते, तर त्यावेळेस आमची शिवजंयती होती व शिवजयंती मुळे आम्ही विंनती केली होती की, २८ तारखेची सभा २९ किंवा ३० तारखेस ठेवा. तर त्यावेळेस आपण आमची विंनती मान्य करुन २८ तारखेस सभा न ठेवता ती २९ तारखेस सकाळी ठेवली. त्यावेळेस आम्हांस सचिव साहेबांनी सांगितले की, महापौर महोदयांना बाहेर जायचे आहे, मिरा भाईंदर येथे त्यांचा सत्कार होणार आहे, त्यामुळे या सभेचे कामकाज २९ तारखेला सकाळी १२.०० वाजता ठेवत आहेत व आज अचानक पाणी कपातीचे कारण दाखवून या सभेचे कामकाजही स्थगित केले जात आहे. हे मला चुकीचे वाटत आहे आणि यामध्ये काहीतरी राजकारण आहे असे वाटत आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :– सन्माननिय महापौरजी, या उल्हासनगर शहरामध्ये कॅम्प ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या आजच नाही तर गेल्या अनेक महिन्यापासून , गेल्या दोन –तीन वर्षापासून कॅम्प ४ व ५ मध्ये पाणी नाही. सभेचे कामकाज वारंवार, ४ थ्यांदा पाण्याचे कारण सांगुन स्थगित करणे योग्य नाही. हा सभागृहाचा अपमान आहे. सत्ताधारी पक्ष मनमानी करण्याचा प्रयत्न करत आहे. अशी शंका या ठिकाणी वाटते. तरी पण मी या ठिकाणी सांगु इच्छितो की, वारंवार सभेचे कामकाज स्थगित केल्याने या सभागृहातील सर्व नगरसेवकांचा वेळ व्यर्थ जातो. हया सर्व नगरसेवकांना आपली प्रभागातील कामे सोडुन वारंवार येथे यावे लागते. यापूढे आपल्या नेतृत्वाखाली या सभागृहात ज्या सभा होतील, त्यामध्ये असे पुन्हा होवू नये, असे मी या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो आणि पाण्याचे जे कारण आहे, ते कारण आजचेच नाही कित्येक महिन्यांपासुन, तीन वर्षापासुन आम्ही मोर्चे काढत आहेत. आता ही काही दिवसापूर्वी कॅम्प ४ व ५ मधील नागरीकांचा श्री. धनंजय बोडारे व श्री. रमेश चव्हाण यांनी एक संयुक्तरीत्या मोर्चा काढला होता. त्यामध्ये हजारोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या. पाण्याची जी समस्या आहे ती दुर झालेली नाही, आणि ती पुढेही दूर होईल किंवा नाही याची शंका वाटते, परंतु आजच्या सभेचे कामकाज स्थगित करण्यासाठी हा जो मुद्दा घेतला आहे तो चुकीचा आहे एवढेच सांगु इच्छितो धन्यवाद.

मा. महापौर :– सन्माननिय सदस्य हो, २९ तारखेला सांयकाळी ५.०० वाजता मिरा–भाईंदर येथे महापौरांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. परंतु तो रद्द झाल्यामुळे आज संध्याकाळी स्थायी समितीची आम्ही सभा बोलावली आहे. आपली ही शंका मी दूर करु इच्छित आहे व ही वस्तुस्थिती आहे की, काल रात्री उशिरा अचानक एका बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले. मंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली पाणी प्रश्नांसंबंधीत जे अधिकारी  आहेत त्यांना बोलाविण्यात आले आहे. आमच्या शहरात कॅम्प नंबर ४ व ५ मधील पाण्याचा दाब कमी करण्यात आला आहे त्या बाबतीत आम्ही दुरवर धावपळ केली. व त्याचा परिणाम असा झाला की, काल रात्री आम्हांला असे माहित पडले की, याबाबतीत विधानसभेमध्ये एका सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे, आणि म्हणून त्या सभेसाठी आमचे उप–महापौर व काही सन्माननिय सदस्य गेले आहेत आपणास जे गैरसोयीचे होत आहे त्याबद्दल आम्हांस खेद आहे व हया सभेचे कामकाज सांयकाळी ५.३० वाजेपर्यंत स्थगित केले जात आहे.

दुपारी १२.२८ वाजता सभेचे कामकाज सांयकाळी ५.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२९/३/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २९/३/२००५ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा त्याचदिवशी सांयकाळी ६.०० वाजता आयोजित केली होती. यावेळी सदरच्या सभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा बुधवार दिनांक २३/३/२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. यावेळी पुन्हा सदरच सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा सोमवार दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. दिनांक २८.३.२००५ रोजी शिवजयंती असल्यामुळे या सभेचे कामकाज दिनांक २९.३.२००५ रोजी ठेवण्याबाबत विरोधी पक्षाच्या सन्माननिय सदस्यांनी विनंती केल्यानुसार सदरची सभा मंगळवार दिनांक २९.३.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केली होती. यावेळीया सभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा त्याच दिवशी सांयकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आली यावेळी सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :— श्रीमती ज्योती कालानी
२) मा. उपमहापौर :— श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३३. | श्रीमती. वनवारी मोना अशोक |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३५. | श्री. मोहन साधवानी |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३६. | श्री. जेसवानी सतरामदास |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३७. | श्रीमती जया साधवानी |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३८. | श्री. लुंड गोविंदराम |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ३९. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४१. | श्री. राज असरोंडकर |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्री. रमेश चव्हाण |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ४४. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. जाधव सुरेश |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| १७. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ४८. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| २१. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ५१. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| २३. | श्री. नाना पवार | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| २४. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५४. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| २५. | श्री. जग्याशी राजु | ५५ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| २७. | श्री. शांताराम निकम | ५७. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| ३०. | श्रीमती सोनेजी मिना | ६०. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६१. | श्री. साधवानी मनोज लालचंद |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ६२. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |

| | | | |
|---|---|---|---|
| ६३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत | ७१. | श्री. संजय बठिजा |
| ६४. | श्री. जयसिंघानी अनिल | ७२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ६५. | श्री. रामरख्यानी मोहनदास | ७३. | श्री. बेहरानी मोहन |
| ६६. | श्रीमती किरण लखी माखिजा | ७४. | श्रीमती मिनु राज दासानी |
| ६७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना | ७५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ६८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर | ७६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ६९. | डॉ. निना प्रकाश नाथानी | ७७. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ७०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज | ७८. | श्री. राजेश वदारिया |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती करोतिया मालती, २. श्री. बेहरानी ठाकुरदास, ३. श्री. माखिजा हरदास हे सभेस अनुपस्थित होते.

मा. सचिव :—स्थायी समितीचे ८ सदस्यांचे पदासाठी १० उमेदवार रिंगणात असून त्यांची नावे येणेप्रमाणे आहेत.

१) श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल
२) श्रीमती कालानी ज्योती सुरेश
३) श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
४) श्री. जग्याशी राजु किशनचंद
५) श्री. जाधव सुरेश मधुकर
६) श्री. ठाकुर अशोक भगवानदास
७) श्रीमती मसंद माया घनश्यामदास
८) श्री. मोकल चंदाराम विठोबा
९) श्री. वाघे शामु बाबु
१०) श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास

यामधून आपणांस केवळ ८ सदस्यांची निवड करायची आहे. ८ जागांसाठी १० उमेदवार आहेत. आपणामधील कुणी उमेदवार जर आपली उमेदवारी मागे घेवू इच्छित असेल तर त्यासाठी ५ मिनिटाची वेळ दिली जात आहे.

श्रीमती कारीरा रेखा मनुमल यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. आता केवळ ९ उमेदवार निवडणुकसाठी सज्ज आहेत. आणि यासाठी आता निवडणुक घ्यावीच लागेल.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. सचिव साहेब, या निवडणुकीमध्ये जर कुण्या दोन उमेदवारांना एकसारखीच मते मिळाली तर ............

मा. सचिव:— याबाबतच्या सर्व सुचना मी आपणांस देत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मी जे—जे आपणांस विचारतो त्याची कृपया मला माहिती दया.

मा. सचिव :— मी आपल्या शंकांचे निरसन करत आहे, त्या व्यतिरिक्त जी काही आपणांस शंका असेल ती आपण विचारा.

निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी अवश्यक त्या सुचना मी आपणांस देत आहे.

प्रत्येक सन्माननिय सदस्यास ८ मते देण्याचा अधिकार राहिल.
एका मतासाठी एक फुली अशाप्रकारे एकुण ८ फुल्या ते मारु शकतात. त्यांना पाहिजे तर ते आठही मते एका उमेदवारास देवू शकतात. किंवा त्यांचे विभाजन करुन अन्य उमेदवारांना सुध्दा देवू शकतात. परंतु एकुण ८ फुल्यांपेक्षा जास्त फुल्या होता कामा नयेत.

आपणांस या प्रकारची मतपत्रिका दिली जाईल. या मतपत्रिकेचे दोन भाग केले जातील. या मतपत्रिकेवर लहान लहान छिद्रे करण्यात आलेली आहेत. ज्यास इंग्रजीमध्ये परपोरेशन म्हटले जाते. मतपत्रिकेच्या या दोन भागांना वेगवेगळे करण्यासाठी ही छिद्रे करण्यात आली आहेत. आपणांस मतपत्रिका देतांना मतपत्रिकेवर आपले नाव लिहून आपली स्वाक्षरी घेतली जाईल. व या दोन्ही भागांच्या मध्यभागी महानगरपालिकेची मुद्रा उमटविलेली आहे. हे दोन्ही भाग वेगवेगळे करतांना महापालिकेच्या मुद्रीकेचा अर्धा भाग या प्रत्येक भागावर उमटविलेला असेल. व प्रत्येक मतपत्रिकेच्या मागील भागावर मा. महापौराची स्वाक्षरी असेल. आता नऊ उमेदवार रिंगणात आहेत.

पहिल्या क्रमांकावर आहेत श्रीमती कालानी ज्योती सुरेश, त्यांच्या नावासमोर आठ रकाने तयार करण्यात आले आहेत. या एका रकान्यामध्ये एक फुली करायची आहे.

जे नऊ उमेदवार रिंगणात आहेत त्यांची नावे याप्रमाणे आहेत.

१) श्रीमती कालानी ज्योती सुरेश
२) श्रीमती क्रिष्णानी रेखा हरेश
३) श्री. जग्याशी राजु किशनचंद
४) श्री. जाधव सुरेश मधुकर
५) श्री. ठाकुर अशोक भगवानदास
६) श्री. वाघे शामु बाबु
७) श्रीमती मसंद माया घनश्यामदास
८) श्री. मोकल चंदाराम विठोबा
९) श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास

प्रत्येक सदस्याने ८ मते दयायची आहेत, प्रत्येक रकान्यामध्ये एक मत याप्रमाणे ८ रकान्यांमध्ये ८ मते दर्शवायची आहेत. मत दर्शविण्यासाठी १ मतासाठी १ फुली याप्रमाणे ८ मतांसाठी ८ फुल्या मारायच्या आहेत. जर कुण्या एका उमेदवाराच्या नावापूढील रकान्यात ८ पेक्षा जास्त फुल्या मारल्या किंवा अन्य उमेदवारांच्या नावांपुढील रकान्यांमध्ये मारलेल्या फुल्यांची एकुण संख्या ८ पेक्षा जास्त झाली तर आपली जी मतपत्रिका आहे ती अवैध मानली जाईल. आपल्याला जे मत दर्शवायचे आहे ते मतपत्रिकेवरील मी जे आपणासं रकाने दाखविले त्यांच्या आतच मत दर्शवायचे आहे. व आपणांस हे जे फुली मारुन मत दयायचे आहे ते आम्ही आपणांस या कामी जे साहित्य पुरविणार आहोत, त्याचा वापर करुन आपणांस मत दर्शवायचे आहे. आपण कुठल्याही मतपत्रिकेवर आपली स्वाक्षरी किंवा निशानी किंवा अशी काही ओळख दर्शविणारी खुण करता कामा नये ज्यामुळे संशय निर्माण होईल की ज्यामुळे आपण इशारा करु इच्छित आहात हे स्पष्ट होईल. मतपत्रिकेचा खालील भाग मतदर्शविण्यासाठी आपणांस दिला जाईल. व मतपत्रिकेचा वरील भाग मतदान अधिकारी आपणाकडे ठेवेल. आपण मतदान करावयास जात आहात तर आपण काळजीपुर्वक मत दयायचे आहे. आपण ज्या उमेदवारास मत देवू इच्छित आहात, त्याच उमेदवाराच्या नावासमोरील रकान्यात आपणांस मत दर्शवायचे आहे. व जे रकाने तयार करण्यात आलेले आहेत त्या रकान्यांच्या आतच मत दर्शवायचे आहे. व याचीही आपणांस पडताळणी करायची आहे की, आपणांस आठपेक्षा जास्त फुल्या मारायच्या नाहीत. त्याप्रमाणे आपण आठच फुल्या मारत आहोत. पाहिजे तर आपण आठही मते एकाच उमेदवारास देवू शकता. आपणांस वाटत असेल तर आपण त्यांचे विभाजन करुन अन्य उमेदवारांना सुध्दा विभागुन मते देवू शकता. परंतु एकुण आठच मते झाली पाहिजेत. उमेदवाराच्या नावासमोर आम्ही जे रकाने तयार केले आहेत त्या रकान्यांच्या बाहेर आपण फुली मारता कामा नये. रकान्यांच्या आतच फुली मारायची आहे. हे मतदान सुरु केल्यापासुन एक तास चालेल. आपण ही वेळ कमी सुध्दा करु शकतो. कारण की

यावेळेस आम्ही मतदान कक्ष जे ठेवले आहेत ते  दोन ठेवले आहेत. म्हणून ही जी वेळ ठेवली जात आहे ती जर कमी करायची असेल तर आपण सांगा. नाहीतर मतदानासाठी आम्ही एक तासाची वेळ ठेवत आहोत.

होवू शकते कुणी एखादा सदस्य यावेळेस उपस्थित नसेल व जर तो एक तासाच्या आत आला तर त्यास मतदान करण्याचा अधिकार राहील. त्यास मतदानाचा अधिकार नाकारला जावू शकत नाही. मतदान झाल्यानंतर जेव्हा मतमोजणी केली जाईल, मत मोजणीच्या वेळी मत वैध आहे किंवा अवैध आहे याचा निर्णय मा. महापौर घेतील. किंवा त्यांच्या जागी जे पीठासीन अधिकारी राहतील ते घेतील. मतमोजणी या प्रकारे राहील, ज्या उमेदवारास सर्वात जास्त मते मिळतील त्यास प्रथम निर्वाचित घोषित केले जाईल. त्यानंतर जो राहील याप्रमाणे.. पहिल्या आठ सर्वाधीक मते मिळविणा–या उमेदवारांची नावे घोषित केली जातील. आणि नवव्या उमेदवारास जर कमी मते मिळाली असतील तर त्यास पराभूत उमेदवार म्हणून घोषित केले जाईल.

काही वेळेस अशी परिस्थिती निर्माण होते की, सहा उमेदवार निवडल्यानंतर २ उमेदवार शिल्लक राहतात, त्यांना सम–समान मते पडतात, अशा परिस्थीतीत मा. महापौर आपले दुसरे निर्णायक मत देतील. मा. महापौर आपले दुसरे निर्णायक मत ज्याच्या बाजुने देतील तो उमेदवार निवडुन येईल. मत पत्रिकेबाबत आणि मतदानाबाबत ही जी मी सुचना दिली, ती सर्व लक्षात ठेवून आपणांस मतदान करायचे आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. सचिव साहेब, सभागृहामध्ये जी व्यक्ती उमेदवार असते ती व्यक्ती पीठासीन अधिकारी म्हणून बसु शकते का? याबाबत जरा माहिती दिली जावी.

मा. सचिव :– श्री. जमनादास पुरस्वानी यांचा हा जो प्रश्न आहे तो योग्य असाच आहे. कारण की, पीठासीन अधिकारी मा. महापौर स्वत: स्थायी समिती सदस्य पदासाठी उमेदवार आहेत, म्हणून या सभेच्या पीठासीन अधिकारी म्हणून त्या व्यासपिठावर बसू शकत नाहीत. त्यांनी उप–महापौरांना पीठासीन अधिकारी म्हणून आसन ग्रहण करण्यास सांगितले पाहिजे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. सचिव साहेब, जी मतपत्रिका आहे, तिच्यावर मा. पीठासीन अधिका–यांचीच स्वाक्षरी असली पाहिजे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– मा. सचिव साहेब, मतदान या बाजूला होईल की त्या बाजूला? नाही, या बाजुलाही मतदान कक्ष आहे, त्या बाजुलाही मतदान कक्ष आहे, म्हणून विचारले. सचिव साहेब, मतदान काय त्या बाजुला होईल काय? दोन्ही बाजुला होईल?

मा. सचिव :– या बाजुचे सन्माननिय सदस्य या बाजुच्या मतदान कक्षात जावुन मतदान करतील, त्या बाजुचे सन्माननिय सदस्य त्या बाजुच्या मतदान कक्षात जावून मतदान करतील. तसेच ज्या वेळेस जे मतदान कक्ष खाली असेल तेथे जावून सन्माननिय सदस्य मतदान करतील.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– ठिक आहे, माझी एक सुचना आहे.

मा. सचिव :– आपणा सर्वांच्या सोयीसाठी ही व्यवस्था केली आहे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :– ठिक आहे. माझी एक सुचना आहे, आमचे जे वयोवृध्द सदस्य आहेत, त्यांच्यासाठी मतदान कक्षात खुर्चीची व्यवस्था केली जावी. खुर्ची किंवा स्टुलची व्यवस्था केली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. महापौरजी, माझ्या दोन सुचना आहेत, एक तर आमची नगरसेविका, श्रीमती किरण लखी माखिजा यांना लवकर जायचे आहे, तर माझी आपणांस एक विनंती आहे, व दुस–या एक सदस्या आहेत, श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांना सुध्दा लवकर जायचे आहे. तसेच तिस–या श्रीमती भावना रामचंदानी, हया तीन महिला सदस्यांना लवकर जायचे आहे. तर माझी आपणांस अशी विनंती आहे की, त्यांना सर्वप्रथम मतदान करु दिले जावे. विरोधी पक्षीयांमधील कुणा सदस्यास लवकर घरी जायचे

असेल तर त्यांना सुध्दा प्रथम मतदान करण्यास संधी दिली जाईल. तर या तीन सदस्यांना प्रथम मतदान करु दिले जावे. श्रीमती कोमल बठिजा यांना सुध्दा लवकर जायचे आहे. जरुरी काम आहे तर या चार सन्माननिय सदस्यांना सर्वप्रथम मतदान करण्यास परवानगी दिली जावी. व त्याचबरोबर डॉ. निना नाथानी यांना सुध्दा लवकर जायचे आहे. व दुसरे असे की, जे मत दयायचे आहे, फुली मारायची आहे, ती कशी मारायची? याबाबत मतपत्रिकेवर मागील बाजुस छापलेले आहे. त्याचप्रमाणे मत दर्शवायची किंवा कसे दर्शवायचे? त्याचबरोबर सन्माननिय सदस्यांना समजावले जावे. जर कुणी सदस्य मत कसे नोंदवायचे हे जर विसरला असेल तर तो मतपत्रिकेच्या मागील बाजुस मत कसे दर्शवावे. हे जे छापले आहे त्याप्रमाणे आपले मत दर्शवु शकतो. धन्यवाद.

<u>मा. सचिव :—</u> ही मतपेटी आहे, ती पुर्णपणे खाली आहे, याबाबत कुणाला काही शंका, काही प्रश्न आहे का? मतपेटी आपणा सर्वांसमोर बंद केली जात आहे. व मतदानास सुरुवात केली जात आहे.

१. श्रीमती किरण लखी माखिजा
२. श्रीमती दिपा पंजाबी
३. श्रीमती भावना रामचंदानी
४. श्रीमती कोमल बठिजा
५. डॉ. निना नाथानी
६. श्रीमती कारीरा रेखा
७. श्री. पमनानी ईश्वर
८. श्री. बोडारे धनंजय
९. श्रीमती क्रिष्णानी रेखा
१०.श्री. विश्वनाथ पाटील
११.श्री. गौतम भालेराव
१२.श्री. अशोक ठाकुर
१३.श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे
१४.श्री. अंकुश म्हस्के
१५.श्री. अनिल जयसिंघानी

<u>मा. सचिव :—</u> श्री. अंकुश म्हस्के यांची मतपत्रिका खराब झाली आहे. ते ती मतपेटीत टाकण्यापूर्वी बदलून घेवू इच्छितात.

<u>मा. उप—महापौर /पीठासीन अधिकारी :—</u> त्यांना दुसरी मतपत्रिका दिली जावी.

१६.श्री. राजेंद्र चौधरी
१७.श्री. नारायण पंजाबी
१८.श्री. मनोज साधवानी
१९.श्री. जमनादास पुरस्वानी
२०.श्री. मोहनदास रामरख्यानी
२१.श्री. होशियारसिंग लबाना
२२.श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
२३.श्री. विनोद तलरेजा
२४.श्रीमती भारती छाब्रिया

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सचिव साहेब, पीठासीन अधिका—यांची खुर्ची रिकामी आहे.

<u>मा. सचिव :—</u> मत देण्यासाठी जावू शकतात ना? ते मत देण्यासाठी गेले आहेत.

२५.श्री. संजय बठिजा
२६.श्रीमती बेबी वसिटा
२७.श्रीमती सुजाता रिझवानी

२८.श्री. मोहन बेहरानी
२९.श्रीमती मालती करोतिया
३०.श्रीमती. संगिता रमेश जावळे
३१.श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर
३२.श्री. सोनवणे नथु काशिराम
३३.श्री. टेकचंदानी राजु
३४.श्रीमती रामचंदानी भावना मनोहर
३५.श्रीमती ज्योती कालानी
३६.श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे
३७.श्री. वाघे शामु बाबु
३८.श्रीमती मोकल सीमा
३९.श्री. दिलीप गायकवाड
४०.श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४१.श्री. मोकल चंदाराम विठोबा
४२.श्री. एडके गणपत गोविंद
४३.श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
४४. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
४५. श्री. उमाप रामदास राघोजी
४६. श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत)
४७ श्रीमती बामणकर नंदिनी गजानन
४८ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
४९ श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेंद्र
५०. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
५१. श्री. नाना पवार
५२. श्रीमती. आहुजा निता प्रकाश
५३. श्री. जग्याशी राजु
५४.. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
५५  श्री. शांताराम निकम
५६. श्री. टाले प्रमोद नामदेवराव
५७. श्री. ठाकुर विनोद लालसिंग
५८. श्रीमती सोनेजी मिना
५९ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
६० श्री. सुरेश नामदेव गायकवाड,
६१ श्रीमती. वनवारी मोना अशोक
६२ श्री. वनवारी किशोर नारायणदास
६३.श्री. मोहन साधवानी
६४.श्री. जेसवानी सतरामदास
६५.श्रीमती जया साधवानी
६६.श्री. लुंड गोविंदराम
६७श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी
६८.श्री. राज असरोंडकर
६९ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
७०.श्री. रमेश चव्हाण
७१.श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ
७२. श्री. जाधव सुरेश
७३. श्रीमती. जयश्री सुर्वे
७४. श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

सभेत उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांनी मतदान केले आहे, केवळ श्रीमती मालती करोतिया व श्री. ठाकुरदास बेहरानी हे सभेस उपस्थित नसल्याने ते मतदान करु शकले नाहीत. ७४ सदस्यांनी मतदान केले आहे. मतदान संपले आहे.

मा. महापौरांच्या आदेशानुसार श्री. बनसोडे साहेब व श्री. भदाणे साहेब यांना मतमोजणीसाठी आपल्या समोर येथे बसविले जाईल. प्रत्येक उमेदवाराच्या एका प्रतिनिधीने मतगणना टेबला शेजारी यावे. म्हणजे मतमोजणी करतांना त्यांना जवळून पाहता येईल. सर्वात प्रथम मतपेटीतून सर्व मतपत्रिका बाहेर काढल्या जातील. व त्यांची मोजणी केली जाईल.

<u>मा. उप–महापौर/पीठासीन अधिकारी :–</u>कृपया सर्व सदस्यांनी आपापल्या आसनावर बसून घ्यावे, मतमोजणी झाली आहे व एकही मत अवैध नाही.

<u>विषय क्र. १ :–</u> दि. १ एप्रिल, २००५ पासुन निवृत्त होणा–या ८ स्थायी समिति सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये प्रत्येक वर्षी स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षानंतर त्या कलमाचे पोटकलम ३ अन्वये कोणते निम्मे सदस्य व कशाप्रकारे निवृत्त होतील हे विर्निदिष्ट करण्यात आलेले आहे. त्याअर्थी स्थायी समितीचे जे सदस्य जास्तीत जास्त कालावधीपर्यंत आपल्या पदावर असतील ते सदस्य निवृत्त होतील. त्यानुसार दिनांक १/४/२००५ पासून निवृत्त होणा–या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१. श्रीमती ज्योती कालानी
२. श्री. मोहन बेहरानी
३. श्री. रामदास उमाप
४. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
५. श्रीमती भारती छाब्रिया
६. श्रीमती नंदीनी बामणकर
७. श्री. सतरामदास जेसवानी
८. श्री. नारायण पंजाबी

निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नविन आठ सदस्यांची नेमणूक केली पाहिजे. त्यामुळे या आठ पदांच्या रिक्त जागा भरण्यासाठी दिनांक २९/३/२००५ रोजीच्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. १ चा विषय असून निवडणूक कार्यक्रमाच्या तरतूदीप्रमाणे दिनांक ११/३/२००५ रोजी ज्या उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली व ज्यांची नामनिर्देशन पत्रे दिनांक १४/३/२००५ रोजी वैधरित्या घोषित करण्यात आली. त्यांची नावे येणेप्रमाणे.........

१. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल
२. श्रीमती कालानी ज्योती सुरेश
३. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
४. श्री. जग्यासी राजु किशनचंद
५. श्री. जाधव सुरेश मधुकर
६. श्री. ठाकुर अशोक भगवानदास
७. श्रीमती मसंद माया घनश्यामदास
८. श्री. मोकल चंदाराम विठोबा
९. श्री. वाघे शामु बाबु

१०.श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास

वरील उमेदवारांपैकी विहित मुदतीत खालील उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली.

१. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल

वरील उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतल्या अंती रिंगणात ९ उमेदवार शिल्लक राहिले त्यामुळे गुप्त मतदानाची आवश्यकता भासल्याने निवडणुक प्रक्रिया सुरू करून व गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेवुन मतदानाअंती ९ उमेदवारांना स्थायी समिती सदस्य पदासाठी मिळालेली मते पूढील प्रमाणे

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते |
|---|---|
| १. श्रीमती कालानी ज्योती सुरेश | ७६ |
| २. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश | ६१ |
| ३. श्री. जग्यासी राजु किशनचंद | ६८ |
| ४. श्री. जाधव सुरेश मधुकर | ६६ |
| ५. श्रीमती मसंद माया घनश्यामदास | ६५ |
| ६. श्री. मोकल चंदाराम विठोबा | ६४ |
| ७. श्री. वाघे शामु बाबु | ६० |
| ८. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास | ७६ |
| ९. श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ५६ |

श्री. ठाकुर अशोक भगवानदास यांचे व्यतिरिक्त ८ सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणुन नेमणूकीस प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ७६ अ</u> <u>दिनांक :– २९/३/२००५.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार ७४ पालिका सदस्यांनी केलेल्या गुप्त मतदानाअंती खाली दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारास मिळालेली मते त्याचे नावा समोर दर्शवुन अ.क्र. १ ते ८ वर दर्शविलेले उमेदवार निवडून आल्याचे जाहिर करीत आहे आणि त्यांची स्थायी समिती सदस्य म्हणुन नेमणुक करीत आहे.

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते | |
|---|---|---|
| १. श्रीमती कालानी ज्योती सुरेश | ७६ | निर्वाचित |
| २. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश | ६१ | निर्वाचित |
| ३. श्री. जग्यासी राजु किशनचंद | ६८ | निर्वाचित |
| ४. श्री. जाधव सुरेश मधुकर | ६६ | निर्वाचित |
| ५. श्रीमती मसंद माया घनश्यामदास | ६५ | निर्वाचित |
| ६. श्री. मोकल चंदाराम विठोबा | ६४ | निर्वाचित |
| ७. श्री. वाघे शामु बाबु | ६० | निर्वाचित |
| ८. श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास | ७६ | निर्वाचित |
| ९. श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ५६ | पराभूत |

<u>मतदानाद्वारे</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

मा. सचिव :— कृपया लक्ष दया, पीठासीन अधिकारी निवडणुक निकाल जाहिर करीत आहेत.

मा. उप—महापौर /पीठासीन अधिकारी :— सर्व सदस्यांनी कृपया लक्ष दयावे.

मा. सचिव :— कृपया सर्व सन्माननिय सदस्यांनी आपापल्या आसनावर बसुन घ्यावे.

मा. उप—महापौर/ पीठासीन अधिकारी :— श्रीमती कालानी ज्योती सुरेश (पप्पु) ७६ मते निर्वाचीत घोषित

| | | |
|---|---|---|
| श्रीमती कृष्णानी रेखा हरेश | ६१ मते | निर्वाचीत घोषित |
| श्री. जग्याशी राजु किशनचंद | ६८ मते | निर्वाचीत घोषित |
| श्री. जाधव सुरेश मधुकर | ६६ मते | निर्वाचीत घोषित |
| श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ५६ मते | पराभुत |
| श्री. वाघे शामु बाबु | ६५ मते | निर्वाचीत घोषित |
| श्रीमती मसंद माया घनश्यामदास | ६४ मते | निर्वाचीत घोषित |
| श्री. मोकल चंदाराम विठोबा | ६० मते | निर्वाचीत घोषित |
| श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास | ७६ मते | निर्वाचीत घोषित |

श्री. ठाकुर अशोक भगवानदास हे निवडणुकीत पराभुत झाले आहेत. बाकी ८ सदस्य निवडुन आल्याचे आम्ही निकालपत्र जाहिर केले आहे.

मा. सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.१५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३१ मार्च , २००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.३१/३/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दिनांक ३१.०३.२००५ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | २९. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ५. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३१. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ७. | श्रीमती मोकल सीमा | ३३. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ८. | श्री. दिलीप गायकवाड | ३४. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ३५. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ३७. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३८ | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३९ | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४० | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १५. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४१ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४२. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ४३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| १८. | श्री. नाना आनंदा पवार | ४४. | श्री. जयसिंघानी अनिल |
| १९. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ४५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २०. | श्री. जग्यासी राजु | ४६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २१. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४७ | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २२. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २३. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ४९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २४. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५०. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| २५. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५१. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २६. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २७. | श्री. मोहन साधवानी | ५३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २८. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ५४. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर,२. श्री. टेकचंदानी राजु, ३.श्री. वाघे शामु बाबु,४. श्री. यादव लालबिहारी बुझारत,५. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन,६. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ७. श्री. शांताराम निकम,८. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास,९. श्रीमती साधवानी जया,१०. श्रीमती भावना रवी खिलनानी, ११.श्री. चव्हाण रमेश महादेव, १२.श्री. सुरेश जाधव,१३. श्रीमती. जयश्री सुर्वे, १४.श्री. पाटील विश्वनाथ गौतम, १५.श्री.भालेराव गौतम यशवंत, १६.श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १७.श्री. ठाकुर अशोक भगवानदास, १८. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, १९.श्री. साधवानी मनोज लालचंद, २०.श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद, २१.श्री. रामरख्यानी मोहनदास ,२२. श्रीमती किरण लखी माखिजा , २३.श्रीमती. छाबरीया भारती पहलाज, २४.श्रीमती करोतिया मालती, २५.श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, २६. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २७.श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सकाळी ११. ५५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिव:—विषय क्र. १.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी:—मा. महापौरजी, उपमहापौर, आयुक्त साहेब आपणांस मी एक माहिती देवु इच्छितो. काल याच विषयावर माझे आयुक्तांशी बोलणे झाले होते. पंधरा दिवसापुर्वी माझ्या प्रभागात कर वसुलीसाठी कॅम्प लावला होता. तेथे आमचे आयुक्त, आमदार व महापौर महोदया या देखिल उपस्थित होत्या. तेथे माझ्या प्रभागातील लोकांची तक्रार होती की माझ्या प्रभागात अशी एक जागा आहे. आपल्या महापालिकेची जागा आहे.जेथे काही लोक फलक लावुन जागा बळकावण्याचा प्रयत्न करीत आहेत. पंधरा दिवसापासुन त्या तक्रारीचा मी पाठपुरावा करीत आहे. आपला जो अभियंता जितु आहे त्यांना मी याबद्दल नियमित दुरध्वनी करीत आहे परंतु मला काही एक प्रतिसाद मिळालेला नाही. नाईलाजाने मला काल आयुक्तांकडे जावे लागले व सांगावे लागले की त्या जागेवर फलक लावुन काही लोक ती जागा बळकावण्याचा प्रयत्न करीत आहेत. आज सकाळची स्थिती अशी आहे की तेथे ब—याच लोकांचा जमाव जमला आहे. सामान उतरविण्यात आले आहे. व ती जागा बळकावण्याचा प्रयत्न केला जात आहे. मी आपल्याला सांगु इच्छितो की ती जागा महापालिकेची आहे व त्या ठिकाणी महापालिकेतर्फे वाचनालयाचे काम मंजुर झाले आहे.कृपा करून महासभेची कारवाई नंतर चालवावी आधी या विषयावर निर्देश दयावेत तसेच जे लोक ही जागा बळकावण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यावर एफ.आय.आर दाखल केला जावा अशी माझी आपणांस विनंती आहे. तसेच एफ.आय.आर दाखल झाल्यानंतर मला त्याची लेखी माहिती देण्यात यावी. सभेची कारवाई निर्देश दिल्यानंतरच चालवावी.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदया, उपमहापौर हा जो जागा बळकावण्याचा प्रयत्न चालु आहे याबद्दल आमच्या सदस्यांनी वेळोवेळी आवाज उठविला आहे. तरी देखिल असे प्रकार व्हावेत हे उचित नाही. या महासभेचे कामकाज सुरू करण्यापुर्वी आयुक्त साहेबांना आमची विनंती आहे की तेथे महापालिकेचे पथक पाठवावे तसेच पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केल्यानंतर कारवाई करून त्यांच्याकडील सामानही जप्त करण्यात यावे. त्यानंतरच सभेचे काम सुरू करण्यांत यावे. कारण आमच्या शहरात जागा बळकावण्याचे बरेच प्रकार होत आहेत. आम्ही कोणतीही जागा वाचवु शकलेलो नाही. कधी कधी आम्हाला असे वाटते की नगरसेवक झाल्यानंतर देखिल आम्ही या शहराचे काय भले करू शकतो? म्हणुन मेहरबानी करून या बैठकीचे कामकाज नंतर सुरू करावे. महापौर महोदया व आयुक्त साहेब आपण महापालिकेच्या पथकाला त्या ठिकाणी जाण्यासाठी आधी त्वरीत आदेश दयावेत. धन्यवाद.

मा. महापौर:—आयुक्त साहेब, त्यांचे पथक तेथे पाठवित आहेत.

मा. सचिव:—विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १:— मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २७/०८/२००४ (त्यात दिनांक २०/१/२००५) दिनांक २०/१/२००५ व दिनांक १७/२/२००५ (त्यात दिनांक १८/२/२००५) चे इतिवृत्त कायम करणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, १८.२.२००५ च्या बैठकीचे जे इतिवृत्त आले आहे, जी बजेटची बैठक होती, त्यामध्ये दोन ठिकाणी चुकांची दुरूस्ती करायची आहे. मला असे वाटते की त्यावेळी बोलताना माझ्या तोंडुन चुकून शब्द निघाले आहेत. मी असे बोललो होतो की सर्व प्रकारचे खनिजतेल, पेट्रोलियम पदार्थ, केमिकल रू. २.५० वरून रू. २.७० येथे रूपये ३ आले आहेत. दुसरे होते त्याच्याच बरोबर केमिकलचे. त्यामध्ये रू. ३.२५ वरून रू. ३. ४५ तर येथे रू. ४.०० आले आहेत. तर इतिवृत्त कायम करण्याच्या वेळेस वरील प्रमाणे दोन चुकांच्या दुरूस्त्या झाल्या तर बरे होईल. अशी माझी सभागृहास विनंती आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—मा. महापौरजी, मला असे वाटते की, आम्ही कोणत्याही प्रकारच्या कर वाढीच्या, जकात वाढीच्या विरोधात आहोत व आम्ही त्यावेळी जेव्हा मुळ ठराव आला होता त्याचा देखिल विरोध केला होता. त्यासाठी एक दिवसाचे धरणे देखिल दिले होते. आम्ही कोणत्याही प्रकारच्या कर वाढीच्या विरोधात आहोत. परंतु ज्याप्रकारे ही चुकांची दुरूस्ती करण्यात येत आहे. मला असे वाटते की आपण जसा ठराव पास केला होता त्यामध्ये आपण म्हणता त्याप्रमाणे कोणतीही चुक नसुन आपणांस आता असे वाटत आहे की शहरवासी जकात दर वाढीच्या विरोधात आहेत व विशेष करून जी बाब क्र. ४५ आहे मला असे वाटते की ते प्लास्टिक व बेकालाईट संबंधात आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—सर्व प्रकारचे खनिज तेल, पेट्रोलियम पदार्थ व दुसरे आहे, हे ३८ अ आहे व ते ४० बी मध्ये केमिकल आहे. आपण जे बोलत आहात ते यामध्ये नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—तर मला असे वाटते की ती बाब तशी नव्हती परंतु जो मुळ ठराव आहे त्याच्या विरोधात आम्ही आहोत असे गृहीत धरावे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त कर वाढीमध्ये जी दुरूस्ती करत आहात त्याला आमचा विरोध नाही. आपण त्यामध्ये दुरूस्ती करू शकता.

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, येथे इतिवृत्त कायम करण्याचा विषय आलेला आहे. इतिवृत्त कायम करताना सभेत जे झाले त्याची तशी नोंद झाली नाही तर आपण त्यामध्ये बदल करू शकता. आपण जर आता असे म्हणाल की त्यावेळी बोलताना चुक झाली व ती चुक आपण आता सुधारू इच्छिता तर तसे होवु शकणार नाही. इतिवृत्ताचा अर्थच असा आहे की, जे झाले, जसे झाले तसेच त्यामध्ये यायला हवे. जर आपण आता इतिवृत्त कायम करताना त्या ठरावात दुरूस्ती करणार असाल तर ते कायदेशिर रित्या योग्य होणार नाही व असा ठराव पास जरी केला तरी त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडुन करण्यात येणार नाही. ही जी चुकीच्या प्रकारे इतिवृत्तामध्ये दुरूस्ती केली जात आहे त्याला माझा आक्षेप आहे. माझ्या आक्षेपाची नोंद करून आपणांस जो निर्णय घ्यायचा आहे तो आपण घेवु शकता, सभागृह सार्वभौम आहे. परंतु माझा आक्षेप या ठिकाणी इतिवृत्तात नोंदविण्यात यावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, आयुक्त साहेबांना काही आक्षेप घ्यायची आवश्यकता नाही. जर ते कायदेशिर नाही व ते आम्हाला तसे सांगत असतील तर मला असे वाटते की यासाठी विशेष महासभेचे आयोजन केले जावे मग ती सभा पाच–सहा–सात दिवसात आयोजित केली जावी, त्याची तारीख येथे जाहिर करावी. जर इतिवृत्तात सुधारणा करता येत नसेल तर आम्ही विशेष महासभा आयोजित करून त्यामध्ये दुरूस्ती करू.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—बरोबर आहे. हे कायदेशिररित्याच व्हायला हवे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—आपण पाच–सहा दिवसात कधीही बैठक ठेवा. आम्ही त्यामध्ये दुरूस्ती करून ठरावात सुधारणा करू. मा. महापौरांनी अनुमती दिली आहे ८ एप्रिलला संध्याकाळी ४. ०० वाजता बैठक घेण्यात येईल. धन्यवाद.

मा. सचिवः—इतिवृत्त पास?

काही सदस्यः—पास. पास.

मा. महापौरः— मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २७/०८/२००४ (त्यात दिनांक २०/१/२००५) दिनांक २०/१/२००५ व दिनांक १७/२/२००५ (त्यात दिनांक १८/२/२००५) चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

मा. सचिवः—विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २ः— श्री संतोष नागेश लोणे यांच्या कनिष्ठ अभियंता (संगणक) या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—एक वर्षासाठी पास.

मा. सचिवः—यांना स्थायी पदावर नियुक्ती दयायची आहे. त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी असेल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—यामध्ये पण काही वेळा कागदपत्रांची आवश्यकता असते.

मा. सचिवः—दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी आहे. त्यामध्ये सर्व आले आहे. प्रस्ताव तसाच आहे. त्यामध्ये आपत्तीजनक काही नाही. आधी त्यांचे काम बरोबर आहे की नाही ते बघतिल त्यानंतर त्यांचे काम समाधानकारक असले तर कायम करतील. पास. सर्वसंमतीने?

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौरः—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावनाः—

विषय क्र. २ः— श्री संतोष नागेश लोणे यांच्या कनिष्ठ अभियंता (संगणक) या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये वापरात असलेले संगणक, प्रिटर्स व इतर साहित्य यांच्या देखभाल व दुरूस्तीसाठी ०१ अनुभवी संगणक अभियंता भरणे आवश्यक होते. परंतु सदर पद महापालिकेच्या आस्थापनेवर मंजुर नसल्याने व नागरी सुविधा केंद्राच्या मागणीस अनुसरून महासभा ठराव क्रमांक २५, दिनांक २६/७/२००४ अन्वये विद्युत विभागातील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या ०३ रिक्त पदांपैकी एका पदाचे 'कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/ इलेक्ट्रॉनिक्स) असे पदनामात बदल करण्यात मंजुरी मिळालेली आहे.

कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/ इलेक्ट्रॉनिक्स) हे ०१ पद भरण्यासाठी सेवायोजन कार्यालयातुन एकूण ०६ उमेदवरांची नावे आली होती. तसेच 'दैनिक नवशक्ती' व जीम थ्तमम च्तमे ळमदमतंसष या वृत्तपत्रातसुध्दा जाहिरात देण्यात आली होती. दिनांक २९/१२/२००४ रोजी 'कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/इलेक्ट्रॉनिक्स) या पदाच्या चालत्या मुलाखतीसाठी सेवायोजन कार्यालयातुन ०५ उमेदवार व खुल्या जाहिरातीमधुन ०४ उमेदवार असे एकूण ०९ उमेदवारांपैकी ०८ उमेदवार हे प्रत्यक्ष मुलाखतीच्यावेळी उपस्थित होते. त्यापैकी श्री. संतोष नागेश लोणे यांची अर्हता व अनुभव लक्षात घेऊन त्यांची 'कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/इलेक्ट्रॉनिक्स) या पदासाठी निवड केलेली आहे. कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/प्र.क्र. १७७/७२८/०४, दिनांक ३१/१२/२००४ नुसार श्री. संतोष नागेश लोणे यांची कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/इलेक्ट्रॉनिक्स) या पदावर ०२ वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीसाठी नियुक्ती केलेली आहे.

सबब, सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५३ (१)मधिल तरतुदीनुसार महासभेपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र:— ९०
दिनांक:—३१/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्रीमती कमला शर्मा
अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

***ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री संतोष नागेश लोणे यांच्या कनिष्ठ अभियंता (संगणक) या पदावरील २ वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीस अधिन राहुन नियुक्तीस मान्यता देत आहे.***

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३:— श्री.टी.के.ढेंगळेपाटील यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—मा.महापौर, आयुक्त साहेब माझी आपणांस विनंती आहे की, आपण येथे ज्या अधिका—यांची नियुक्ती करणार आहात याकरिता नीट चौकशी करण्यात यावी, विचार करण्यांत यावा व त्यांनतरच येथे ठेवले जावे. या अधिका—यामुळे आमच्या शहराचे नाव खराब होईल असे व्हायला नको. यांना आधी नियम समजवा की नियम काय आहेत. कोणतीही कारवाई करण्यापुर्वी नियम बघायला लागतात. जे कायदयाचे पुस्तक आहे ते आधी वाचा त्यांनतरच काही कारवाई करा. माझी आपणां सर्वांना विनंती आहे की याला मान्यता देण्यापुर्वी त्यांना नियम वाचायला सांगा किंवा त्यासाठी आधीच विचार करा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, आता जो विषय सुरू आहे त्याकरिता ज्या अधिका—याचा प्रस्ताव आला आहे. त्याला आम्ही एक वर्षासाठी मंजुरी देत आहोत. परंतु जसे श्री. सतरामदास जेसवानी यांनी सांगितले त्याकडेही लक्ष दयायला हवे कारण नोटीस न देता थेट निष्कासन केले जाते. काही ठिकाणी रस्ता रूंदीकरणात तळ मजला अधिक तीन मजले अशी परवानगी देण्यात येते तर काही ठिकाणी तळ मजला अधिक एक मजला असेल तरी देखिल तोडले जाते. तर जे धोरण आहे, नियम आहे ते पुर्ण उल्हासनगरसाठी समान असायला हवेत. या ठिकाणी हजारो प्रश्न येतात त्यावर उत्तर दिले जाते की, नोटीस दिली आहे. आतापर्यंत त्याची मुदत झाली नाही. काही ठिकाणी नोटीस न देता थेट निष्कासन करण्यात येते अशी प्रकरणे कोर्टात गेली तर प्रशासनाला त्रास होवु शकतो. यासाठी जसे श्री. सतरामदास जेसवानी यांनी सांगितले त्याप्रमाणे कायेदशिर कारवाई पुर्ण झाल्यावरच निष्कासनाची कारवाई करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आयुक्त साहेब, कायदेशिर कारवाई केल्याशिवाय कुठे काही तोडले आहे काय?

काही सदस्य :—पास. पास.

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र. ३:—</u> श्री.टी.के.ढेंगळेपाटील यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ—१२०२/७३/प्र.क्र. २१/०५, दि. ०५/०३/२००५ च्या आदेशान्वये श्री. त्रिंबक कृष्णा ढेंगळेपाटील मुख्याधिकारी वर्ग—२ यांची या महापालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने प्रतिनियुक्तीने प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीस अधीन राहुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री. त्रिंबक कृष्णा ढेंगळेपाटील या महापालिकेत सहाय्यक—आयुक्त या रिक्त पदावर दिनांक ९/३/२००५ पासून रूजू झाले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार श्री. त्रिंबक कृष्णा ढेंगळेपाटील यांच्या सहाय्यक—आयुक्त पदावरील प्रतिनियुक्तीच्या नियुक्तीस ०३ वर्षासाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत

<u>महासभा ठराव क्र:—</u> ९१
<u>दिनांक:—३१/३/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.टी.के.ढेंगळेपाटील यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक ९/३/२००५ पासुन एक वर्षासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ४:—</u> शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियम अंतिम करणे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>प्रस्तावनाः—</u>

<u>विषय क्र. ४ः—</u> शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियम अंतिम करणे.

उपरोक्त नमुद विषयान्वये शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२००४/प्र.क्र.१६८/नवि २०, नगरविकास विभाग, दिनांक २९/१२/२००४ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील महानगरपालिकांच्या क्षेत्रात आयात करण्यात येणा—या शालेय व उच्चशिक्षण संबंधीत शैक्षणिक पुस्तके संदर्भ ग्रंथ या पुस्तकांवर जकात न आकारण्याबाबत नियमांमध्ये बदल करणे आवश्यक होते. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी सदर प्रस्ताव महासभेमध्ये दिनांक २०.१.२००५ रोजी ठेवण्यात आला व सर्वानुमते महासभा ठराव क्र. ५६ नुसार तो मान्य करण्यात आला.

सदर मसुदा महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी साठी देण्यात आली असुन उक्त मसुद्याच्या संदर्भात उल्हासनगर शहरातील रहीवाशीयांच्या ज्या काही हरकती किंवा सूचना असतील त्या मागविण्यासाठी दिनांक १/२/२००४ रोजीच्या नवशक्ती या दैनिक समाचार, नगरन्युज (सिंधी) व द फ्रि. प्रेस जनरल (इंग्रजी) य समाचार पत्रांमध्ये सदरची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली होती.

उक्त मसुद्याच्या संदर्भात नागरिकांच्या याबाबत हरकती व सुचना प्राप्त होण्याची अंतीम तारीख संपली असुन अदयाप एक ही हरकती व सुचना कार्यालयास प्राप्त न झाल्याने सदर प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महासभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्रः—</u> ९२
<u>दिनांकः—३१/३/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

***ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियम अंतिम करण्यास मान्यता देत आहे.***

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. ५:—</u> राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेणेकामी महापालिकेतर्फे देण्यात आलेले अंशदान रु १९,५०,०६५/— यांस कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र. ५:—</u> राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेणेकामी महापालिकेतर्फे देण्यात आलेले अंशदान रु १९,५०,०६५/— यांस कार्योत्तर मंजुरी देणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८ अ याद्वारे महानगरपालिकांच्या निवडणूकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याची तरतूद करणेत आलेली आहे. या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, हैद्राबाद या भारत सरकारच्या अंगीकृत व्यवसायाच्या सहकार्याने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र विकसित केलेले आहे. या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा काही पोटनिवडणूकीमध्ये यशस्वी रित्या वापर करण्यात आला आहे असे मा.राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक.५ जानेवारी,२००५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

*मा.राज्य निवडणूक आयोगाने नागपूर, नाशिक, अमरावती व पुणे विभागातील महानगरपालिकांच्या आयुक्तांची बैठका विभागीय पातळीवर आयोजित केल्या होत्या. या बैठकीमध्ये सर्व महानगरपालिका आयुक्तांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर महानगरपालिका निवडणूकीत करण्यात यावा, असे मत व्यक्त केले आहे. काही महानगरपालिकांनी स्वत: मतदान यंत्रे घेण्याची तयारी दर्शविली आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने या सर्व बाबींचा विचार करुन असे मत व्यक्त केले की, महानगरपालिका स्वत: मतदान यंत्रे खरेदी केल्यास खर्च जास्त प्रमाणात होणार आहे. मतदान यंत्रे घेताना प्रत्येक महानगरपालिकावर जास्त खर्चाचा बोजा पडू नये अशी ही राज्य निवडणूक आयोगाची इच्छा आहे.*

*विधान सभा व लोक सभा निवडणूकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर सरसकट सुरु झाल्याने महाराष्ट्रातील मतदाराकडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करणेची मागणी मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र मुंबई यांचेकडे करण्यात येत आहे.*

*इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे सहाय्य घेतल्याने मतपत्रीकांची छपाई, मतमोजणीवरील होणारा खर्च इत्यादी बाबींवर होणारा खर्चाची देखील बचत होणार आहे.*

निवडणूक प्रक्रिया अधिक गतीमान व्हावी, निकालावरील वेळ व खर्च वाचावा यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर निवडणूकीत करणे गरजेचे आहे.

एक इलेक्ट्रॉनिक यंत्राची किंमत रुपये १०,५००/— आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी ५५ उल्हासनगर विधान सभा मतदार संघातील एकूण मतदारांची संख्या (३,९०,०१३) लक्षात घेता त्या आधारे आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत एकूण ४८७ एवढी मतदान केंद्रे निश्चित होण्याची शक्यता

आहे. एका मतदान केंद्रासाठी एक याप्रमाणे एकूण ४८७ मतदान यंत्राची आवश्यकता भासणार आहे. तसेच १० : अधिक याप्रमाणे एकूण ५३६ मतदान यंत्राची गरज लागणार आहे. त्यासाठी एकूण रुपये ५६,२८,०००/–खर्च करावा लागणार आहे.

तथापी मा.राज्य निवडणूक आयोगामार्फत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेतल्यास ब–याच प्रमाणात खर्च कमी होणार आहे. त्यानुसार मा.राज्य निवडणूक आयोगाने असे स्पष्ट केले आहे की, प्रत्येक महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रातील मतदारांची संख्या विचारात घेऊन रुपये ५/–प्रति मतदार याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी प्रत्येक महापालिकेने अंशदान द्यावे.

मा.राज्य निवडणूक आयोग यांचे सुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी ५५ उल्हासनगर विधान सभा मतदार संघाची सध्याची एकूण मतदार संख्या ३,९०,०१३ एवढी आहे. रुपये ५/–प्रति मतदार याप्रमाणे रुपये १९,५०,०६५/– एवढी रक्कम अंशदान रुपये भरावी लागणार आहे. वरील दोन्ही खर्चाची तुलना केली असता तसेच सन फेब्रुवारी२००२ सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतपत्रिका छपाईचा निव्वळ खर्च रुपये ९ लाख एवढा असून मतपत्रिका तपासणीसाठी सुमारे ३५ ते ४० कर्मचारी/अधिकारी सुमारे १२ ते १५ दिवस प्रिन्टींग प्रेसमध्ये पाठवावे लागतात त्याचा खर्च एकूण मनुष्यबळ, भत्यावरील खर्च इत्यादी खर्चाचा विचार करता रुपये १९,५०,०६५/–ही रक्कम कमी आहे.

प्रस्तुत प्रकरणी अंशदान प्रित्यर्थ जमा करावयाचा निधी हा विहित मुदतीत मा.राज्य निवडणूक आयोगाकडे भरावयाचा होता. त्यानुसार रुपये १९,५०,०६५/–रक्कमेचा धनाकर्ष आयोगाकडे जमा केला आहे.

***निवडणूक खर्चास मंजूरी होणेस महासभा ही सक्षम प्राधिकारी आहे. तरी रुपये १९,५० ,०६५/-या रक्कमेस कार्योत्तर मंजूरी घेणेस महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.***

<u>महासभा ठराव क्र:–</u> ९३

<u>दिनांक:–३१/३/२००५.</u>

सुचकाचे नाव :–श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेणेकामी महापालिकेतर्फे देण्यात आलेले अंशदान रु १९,५०,०६५/– यांस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. प्रभारी आयुक्त:–</u>जागतिक महापौर परिषदेसाठी आमच्या महापौर महोदया कोचिन येथे जात आहेत त्यांना प्रशासनाच्या वतीने मी शुभेच्छा देत आहे.

<u>मा. सचिव :–</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सकाळी १२. १५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१८/१२/२००४

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.१८/१२/२००४ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १८.१२.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :— श्रीमती. मालती करोतिया
२) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३४. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३५. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३६. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३७. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३८ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३९ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४० | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४१ | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४२. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ५०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २०. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५१. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५२. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५५. | श्री. विनोद तलरेजा |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५६. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २६. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ५७. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. मोहन साधवानी | ६०. | श्री. बेहरानी मोहन |
| ३०. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६१ | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्री. लुंड गोविंदराम | ६२ | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ६३ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३३. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६४. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्री. वाघे शामु बाबु, २. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ३. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश, ४. श्री. नाना आनंदा पवार, ५. श्री. शांताराम निकम, ६. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ७. श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, ८. श्री. सुरेश जाधव, ९. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, १०. श्री. रामरख्यानी मोहनदास ११. श्रीमती किरण लखी माखिजा, १२. श्री. साधवानी मनोज लालचंद, १३. श्रीमती मीनु राजकुमार दासानी, १४. श्री. बेहरानी ठाकुरदास , १५. श्री. हरदास माखिजा, १६. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश, हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४ .३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—</u>मा.महापौरजी, सभा सुरू होण्यापुर्वी माझी आपणांस एक विनंती आहे की, मराठी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार, महान कलाकार श्री. लक्ष्मीकांत बेर्डे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. हिंदी चित्रपटात सुध्दा त्यांनी अत्यंत चांगली भुमिका वठवली असे महान कलाकार यांना श्रध्दांजली अर्पित करावी अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–</u>मी पण हेच म्हणु इच्छितो की आमचे उप लेखापाल श्री. ईश्वर रामचंदानी यांचे देखिल निधन झाले असुन त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–</u>या श्रध्दांजली सोबत एक विनंती करतो की, त्यांच्या मुलाला इथे कामावर ठेवले तर हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल.

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

<u>शोक प्रस्ताव :–</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे उप लेखापाल श्री. ईश्वर रामचंदानी यांचे दिनांक १४.१२.२००४ रोजी अकस्मिक निधन झाले.

तसेच रंगभुमी आणि चित्रपटसृष्टीत विनोदी अभिनेते म्हणुन कारकीर्द गाजविणारे लक्ष्मीकांत बेर्डे यांचे गुरूवार दिनांक १६.१२.२००४ रोजी पहाटे पावणेतीन वाजता अंधेरी येथील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले ते ५० वर्षाचे होते. त्यांचा जन्म दिनांक २६ ऑक्टोबर, १९५४ रोजी मुंबईतील गिरगाव येथे झाला. लक्ष्मीपुजनाच्या दिवशी जन्म झाल्याने त्यांचे नाव लक्ष्मीकांत ठेवल्याचे ते त्यांच्या खास पध्दतीने सांगत असत. लहानपणापासुनच त्यांना अभिनयाचे वेड होते. टुरटुर, शांतेचं कार्ट चालू आहे ही त्यांची नाटके बरीच गाजली तसेच चिमणराव गुंडयाभाऊ, लेक चालली सासरला, पछाडलेला हया मराठी चित्रपटात त्यांनी भुमिका केल्या.

तसेच मैने प्यार किया, साजन, हम आपके है कौन, बेटा, अनाडी, दिल क्या करें अशा १०० ते १५० हिंदी चित्रपटात त्यांनी भुमिका केल्या. तर २५० हून अधिक मराठी चित्रपटांत त्यांनी अभिनय केला . सचिन दिग्दर्शित अशी ही बनवाबनवी ’ या चित्रपटीतील त्यांची स्त्री वेशातील भुमिका खुपच गाजली होती.

वर उल्लेखिलेल्या मृतात्म्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र.</u> ५२ ब <u>दिनांक:–१८.१२.२००४.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. ईश्वर रामचंदानी व श्री. लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी<br>
सर्वसाधारण महासभा<br>
उल्हासनगर महानगरपालिका

इकडे सर्वांनी उभे राहुन दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पण केली.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—**मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना एकदा एक पत्र दिले होते की,...

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—**सभागृह नेताजी एक मिनिट.मी तुम्हाला विनंती करतो तुमचा विषय दुसरा आहे. अभिनंदनासाठी उल्हासनगरचे एक रहिवासी श्री. रामनाथ दादा मोते, ५६ वर्षात पहिल्यांदा असे झाले आहे की, उल्हासनगरचा रहिवासी शिक्षक मतदार संघ कोकण विभागातुन विधान परिषदेसाठी सदस्य म्हणुन निवडुन आले आहेत. आपण त्याचे अभिनंदन करू. तरी अभिनंदन ठराव करण्याचे सुचित करतो.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—**त्याच बरोबर आमचे श्री. मोकल साहेब हे राष्ट्रवादी पक्षातर्फे निवडुन आले आहेत. त्यांच्यासाठी देखिल अभिनंदन प्रस्ताव पास करण्यात यावा व सर्वांचे तोंड गोड करण्यात यावे.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

**अभिनंदन प्रस्ताव :—**

श्री. रामनाथ दादा मोते, हे कोकण विभाग शिक्षक मतदार संघातुन विधान परिषदेवर आमदार म्हणुन निवडुन आले आहेत. श्री. मोते हे उल्हासनगर ४ येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयात अनेक वर्ष मुख्याध्यापक म्हणुन कार्यरत होते. तसेच महाराष्ट्र खाजगी शाळा शिक्षक, शिक्षकेतर संघटना कोकण विभाग या संघटनेचे ते कार्यवाहक होते. ५६ वर्षाच्या इतिहासात हे पहिल्यांदाच झाले आहे की, उल्हासनगरचा रहिवासी असलेला एक शिक्षक, आमदार झाला आहे.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ४ (क) मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष पुरस्कृत श्री. चंदाराम विठोबा मोकल हे सदस्य म्हणुन निवडुन आले आहेत.

उपरोक्त दोघांचे उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने यांचे अभिनंदन करण्याचे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.** ५२ क **दिनांकः—१८.१२.२००४.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. रामनाथ दादा मोते हे विधानपरिषदेवर आमदार निवडून आल्याबद्दल व श्री. चंदाराम विठोबा मोकल हे प्रभाग क्र. ४ (क) मध्ये पालिका सदस्य म्हणुन निवडुन आल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>आता जो मी विषय घेत आहे. आयुक्तांचे लक्ष वेधु इच्छितो की, यावर्षी जी घरपावती आहे. महासभेत सर्व पक्षांतर्फे सर्व संमतीने ठराव पास करण्यात आला होता की, घरपावतीचे जे दर आहेत. जे जुने आहेत तेच लागु होतील. परंतु यावेळी दर वाढवुन जी बिले पाठवुन गेली आहेत. जर ते वृध्दीदराने लावले गेले असतील तर येणा—या महासभेत मी व आमचे जितके नगरसेवक आहेत ते सर्व जमिनीवर बसतिल व तोपर्यंत जमिनीवरून नाही उठणार जोपर्यंत जुन्या दराने कर पावती पाठवत नाहीत. करात जी दरवाढ करण्यात आली आहे ती रद्द करण्यात यावी नाहीतर तोपर्यंत आम्ही जमिनीवर बसु.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>यापुर्वी देखिल आम्ही हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी जर तुम्ही आम्हाला सहकार्य दिले असते तर बरे झाले असते.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उपमहापौरजी आताच लोकसभेमध्ये एक प्रस्ताव पास करून एफ—आय चॅनेल चालु गेले. लोकसभेचे थेट प्रक्षेपण पुर्ण देशात सुरू आहे. तसेच मी आपणांस निवेदन करतो की या महासभेचे थेट प्रक्षेपण सुरू करण्यात यावे. जेणेकरून या शहरातील सत्ताधारी व विपक्ष पक्ष कशात—हेने काम करत आहे हे शहराची जनता पाहु शकेल. मी आपणांस निवेदन करतो की, लोकसभेचे थेट प्रक्षेपण जसे सुरू करण्यात आले आहे. कमीत कमी इथे टीव्ही चॅनेल व्दारा थेट प्रक्षेपण करून या शहरात काय काय घटना होतात हे जनता पाहु शकतील. असे मी आपणांस निवेदन करतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>रद्द करा रद्द करा, करवृध्दी रद्द करा. लोकांवर अन्याय चालणार नाही, चालणार नाही.

इकडे सत्ताधारी पक्षातील सदस्य अशा घोषणा देत खाली जमिनीवर धरणे धरून बसले.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप:—</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब मी तुमच्या हे लक्षात आणुन देवू इच्छितो की, सत्ताधारी पक्षातील लोक आमच्या समोर खाली जमिनीवर बसले आहेत हे योग्य वाटत नाही. तुम्ही सत्ता चालवत आहात. तुमचा जो अनुभव आहे आणि हे जे अभियान चालु आहे. त्यानुसार सत्ता चालविण्याचा अनुभव आम्हाला चुकीचा वाटतो. करवाढ नाही झाली पाहिजे असा विरोध विरोधी पक्षाने केला होता. आमचेच अनुकरण करून यांनी असे जमिनीवर बसणे, असे प्रदर्शन करणे योग्य नाही. सत्ता चालविण्याचा योग्यतेचा हा विषय नाही.

<u>मा. महापौर:—</u>मी आयुक्त साहेबांना आदेश देते की त्यांनी उत्तर दयावे.

<u>काही सत्ताधारी सदस्य:—</u>आम्ही केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—</u>मा. महापौरजी, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब हा विषय आम्ही उपस्थित केला होता. चार महिने अगोदर देखिल जेव्हा आयुक्तांनी उत्तर दिले होते मी अमान्य करेल त्यावेळी देखिल आम्ही हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता की हे जे काम होत आहे ते चुकीचे आहे. आम्ही भले यांच्या आंदोलनाशी सहमत नाही. परंतु हा आमचाच मुद्दा होता. त्यावेळी तुम्ही आम्हाला पाठिंबा नव्हता दिला. तरी पण आम्ही या विषयाला संपुर्णपणे पाठींबा देत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>सहकार्य दया, सहकार्य दया. सत्ताधारी पक्षांना साथ दया. हा शहराच्या हिताचा प्रश्न आहे. खुर्ची सोडुन खाली बसा.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u>तुम्ही साथ मागितली नव्हती, आम्हाला कुणाला विश्वासात घेतले नव्हते. तुम्ही आधीच आम्हाला विश्वासात घ्यायला पाहिजे होते. आम्ही तुमच्या सोबत राहिलो असतो. मी आतापण तुमच्या सोबत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—मा. महापौरजी, हा प्रस्ताव सर्वसंमतीने इथे पास झाला होता. तरी पण जर ठरावाची अंमलबजावणी होत नाही तर हा महासभेचा अपमान आहे. जोपर्यंत ही करवाढ संपत नाही. तोपर्यंत शिवसेना व भाजपा पक्ष सभात्याग करतील.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानीः—आम्ही सुध्दा सभात्याग करतो.

इथे भाजपा शिवसेनेचे उपस्थित सर्व सदस्य , महापौर, उप—महापौर सोडुन कॉग्रेस पक्षाचे उपस्थित सर्व सदस्य सभागृहा बाहेर गेले.

इकडे सत्ताधारी सदस्य टॅक्स वृध्दा रद्द करा, रद्द करा अशा घोषणा देत होते.

मा. महापौरः—मी अर्ध्या तासासाठी ही सभा स्थगित करत आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—अर्ध्या तासासाठी सभा स्थगित करण्यांत येत आहे.

अर्ध्या तासानंतर पुन्हा सभा सुरु झाली. इकडे मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाल्या.

मा. पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—मी सभागृहातील सदस्यांची भावना लक्षात घेवून सर्व पक्षीय गटनेत्यांची २८ तारखेला महापौरांच्या दालनात या विषयावर चर्चेला बसु. मी सर्व गटनेत्यांना निवेदन करते त्यांनी तिकडे त्यादिवशी उपस्थित राहवे व ही सभा दि. ३०.१२.२००४ रोजी सायंकाळी ४. ०० वाजेपर्यंत स्थगित करत आहे व श्री. कुमारी यांचे अभिनंदन करते ते महसुल समितीचे सभापती झाले आहेत. पुन्हा एकदा सांगते २८ तारखेला सर्व गटनेत्यांनी महापौरांच्या दालनात चर्चेसाठी उपस्थित रहावे. सूचना पत्र पाठविण्यात येणार नाही. ४ वाजता उपस्थित रहावे. लक्षवेधी व आयत्यावेळच्या विषय दाखल करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आयत्यावेळचा विषय नियमित कार्यसूचीवर आणावा.

मा. पिठासीन अधिकारी श्रीमती जया साधवानीः—ठिक आहे. तो नियमित कार्य सूचिवर आणावा. लक्षवेधी दाखल करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—आयत्यावेळचे विषय का नाही?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आयत्यावेळचे विषय नियमित कार्यसूचीवर येवू दया. घाई काय आहे.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—फक्त लक्षवेधी दाखल करण्यात येत आहे. आयत्यावेळचे विषय नाही.

मा. सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा):—कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५ .१५ वाजता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे मा. पीठासीन अधिकारी श्रीमती. जया साधवानी यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/१/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/१/२००५ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शनिवार दिनांक १८/१२/२००४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करून ही सभा गुरूवार दिनांक ३०/१२/२००४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करावयाची होती पण सर्व पक्षाच्या गटनेत्यांच्या लेखी मागणीवर मा. महापौरांनी ती सभा दिनांक ३०/१२/२००४ रोजी न ठेवल्याने सदर सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात आले होते. पुन्हा मा. महापौरांच्या आदेशान्वये सदरची सभा गुरुवार दिनांक २०/०१/२००५ रोजी दुपारी १२—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती मालती करोतिया हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :— श्रीमती. मालती करोतिया

२) मा. उपमहापौर श्रीमती जया साधवानी

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३२. | श्री. लुंड गोविंदराम |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३३. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३४. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३५. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३६. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३७. | श्री. सुरेश जाधव |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ३८ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ३९ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४० | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्रीमती कालानी ज्योती सुरेश | ४१ | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४२. | श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४४. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४६. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४७ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४८. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्री. नाना आनंदा पवार | ४९. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २१. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५०. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. जग्यासी राजु | ५१. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २३. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५२. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५३. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५४. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५५. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५६. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ५७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २९. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३१. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६०. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| | | ६१. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम, २. श्री. एडके गणपत गोविंद, ३. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ४. श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र ,५. श्री. शांताराम निकम, ६.श्री. मोहन साधवानी ७. श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, ८.श्री. रमेश चव्हाण, ९. श्रीमती. जयश्री सुर्वे, १०.श्री. पाटील विश्वनाथ गौतम, ११.श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १२.श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास,१३. श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, १४. श्री. जयसिंघानी अनिल, १५. श्री. विनोद तलरेजा,१६. श्री. संजय रामचंद्र बठीजा, १७. श्री. बेहरानी मोहन, १८. श्रीमती किरण लखी माखिजा, १९. श्री. बेहरानी ठाकुरदास , २०. श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी १२.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—**सर्व प्रथम मी आमचे सदस्य श्री. राजु जग्यासी हे निवडुन आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.......

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—**एक मिनीट सभागृह नेताजी, आधी सुनामी लाटांमध्ये जे लोक मृत्युमुखी पडले त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—**आधी आपण श्रध्दांजली अर्पित करू. नंतर त्यांना अभिनंदन दया.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—**सुनामी लाटांमध्ये जे हजारो लोक मृत्युमुखी पडले.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—**हजारो नाही लाखो लोक मृत्युमुखी पडले.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—**आधी त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी. आणि आज १८ डिसेंबर नंतर पहिली सभा आहे. देशातील सर्वात मोठे नेते माजी पंतप्रधान श्री. नरसिंहराव यांना देखिल श्रध्दांजली अर्पित केली जावी.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—**जेष्ठ अभिनेते अमरीश पुरी यांना देखिल श्रध्दांजली अर्पित केली जावी.

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

**शोक प्रस्ताव :—**

२६ डिसेंबर, २००४ रोजी इंडोनेशियाजवळ समुद्रात झालेल्या प्रचंड भुकंपामुळे लाखो माणसे मृत्युमुखी पडले. या प्रचंड भुकंपामुळे पृथ्वी थरारली, समुद्रात खळबळ उडुन निर्माण झालेल्या हया पर्वतप्राय लाटा समुद्रकिनारी झेपावल्या आणि त्यांनी कित्येक मैलांचा प्रदेश आपल्या कवेत घेतला. त्यामुळे मोठ मोठया इमारती पत्यांच्या बंगल्यासारख्या कोसळल्या. बोटींचा, वाहनांचा चक्काचूर झाला. स्वत:ला अजिंक्य म्हणणारा मानव प्राणी एकामागून एक असा मृत्युमूखी पडला. या लाटांच आक्रमण इतकं भयानक होतं की त्यांना मृत्यूला सामोरे जाण्यावाचून काहीही करता येण्यासारखं नव्हत. या रौद्रकांडात भारत, लंका, इंडोनेशिया इत्यादी नऊ देशातील लाखो माणसे एका फटक्यात मृत्यूमूखी पडली.

तसेच माजी पंतप्रधान श्री. पी.व्ही. नरसिंहराव यांचे दि. २३ डिसेंबर, २००४ रोजी दिर्घ आजारामुळे निधन झाले.

तसेच जेष्ठ अभिनेते श्री. अमरीश पूरी यांचे दिनांक १२, जानेवरी, २००५ रोजी कॅन्सरच्या आजाराने निधन झाले. त्यांनी अनेक हिंदी चित्रपटात काम केले. त्यांनी मि. इंडिया, नगिना, त्रिदेव, इत्यादी चित्रपटात उत्कृष्टरित्या खलनायकाची भूमिका बजावली. तसेच काही चित्रपटात त्यांनी चांगल्या अभिनेत्याचीही भूमिका बजावली.

वर उल्लेखिलेल्या मृतात्म्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ५२ ड</u> <u>दिनांक:—२०.१.२००५.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार सुनामीत मृत्यूमूखी पडलेल्या लोकांना तसेच माजी पंतप्रधान श्री. पी.व्ही. नरसिंहराव व अभिनेते श्री. अमरीश पूरी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

इकडे सर्वांनी उभे राहुन दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पण केली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षातर्फे नवनिर्वाचित सदस्य श्री. राजु जग्यासी निवडुन आले आहेत म्हणुन ते पेढे वाटु इच्छितात. कृपया महापौरांनी अनुमती दयावी. ते सर्वांचे तोंड गोड करू इच्छित आहेत.

<u>मा. महापौर:—</u>ठिक आहे. आनंदाची गोष्ट आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>धन्यवाद महापौरजी.

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. १ प्रश्नोत्तरे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, प्रश्नोत्तरा आधी मी सभेमध्ये विनंती करतो की, ही सभा दोनदा स्थगित करण्यात आली आहे. एक सभागृहात तर एक होण्याआधी महापौरांनी स्थगित केली होती. त्याचे कारण हे आहे की, जेव्हा १८ तारखेला सभा होती तेव्हा आम्ही मुद्दा उपस्थित केला होता. सर्व राजकीय पक्षांनी मिळुन महासभेत ठराव केला आहे. करवाढ जी करण्यांत आली आहे ती रद्द करण्यात आली. ते रद्द न करता शासनाकडे मात्र तो ठराव रद्द करण्यासाठी पाठविण्यात आला आहे. त्याच्या विरोधात म्हणुन आम्ही मागच्या सभेत जमिनीवर धरणे धरले होते. तेव्हा मा. महापौरांनी सभागृहास आश्वासन दिले होते की, नगरविकास सचिवांकडुन ते परवानगी घेतील. सर्व राजकीय पक्षांच्या गटनेत्यांना मंत्रालयात घेवुन जावु त्यासाठी त्यांनी सर्व पक्षीय बैठक २७ तारखेला बोलावली होती. तेथे अर्बन डेव्हलपमेंट सेक्रेटरींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता परंतु ते होवु शकले नाही. वेळ घेतला नाही जोपर्यंत मा. महापौर वेळ घेत नाही व सर्व पक्षीय गटनेते तिथे जात नाही तो ठराव रद्द नाही झाला पाहिजे. तोपर्यंत ही सभा चालवली जाणार नाही. जर टॅक्स विषयी चर्चा करत असाल तर माझी काही हरकत नाही. तर कृपया ही सभा स्थगित केली जावी.

मा. महापौर:—ठीक आहे. आम्ही ही सभा स्थगित करतो कारण नगरविकास विभाग सचिवांकडुन आम्ही वेळ घेवु शकलो नाही. कारण व्यस्त होते म्हणुन.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—का? का नाही वेळ घेवु शकला. सेक्रेटरी काय राष्ट्रपतीच्या वर नाही.

मा. महापौर:— त्या दिवशी आम्ही फोन केला तर ते भेटु शकले नाही, आमचे बोलणे होवु शकले नाही म्हणुन ही आम्ही सभा स्थगित करत आहोत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—तुम्ही त्यांच्याकडुन वेळ घ्या. ते काय राष्ट्रपतीपेक्षा वर नाही. आपण राष्ट्रपतींना देखील भेटू शकतो. तुम्ही त्यांची वेळ घ्या. सर्व सभा तोपर्यंत स्थगित करा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—नाही, नाही नंतरची सभा होईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— कोणत्याही एका निर्णयावर ठाम रहा. असे आहे तर कोणतीही सभा नाही झाली पाहिजे. जोपर्यंत करवाढ रद्द होत नाही, तोपर्यंत एकही सभा झाली नाही पाहिजे. उगाच सर्वांचा वेळ घालवितात, एक पण मिटींग झाली नाही पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— कारण या सभेतच टॅक्स बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— सभागृह नेता, तुम्ही विषयांची सरमिसळ करत आहात. त्यामुळे विषयाचे गांभीर्य कमी होईल.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— मग ही सभा बोलविण्यांत अर्थ काय?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—याला काय अर्थ आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— दुस—या सभेचे आता कशाला बोलता, त्यावेळी बोला. नंतरच्या सभेची चर्चा आता कशाला? नंतर करु.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— महापौर महोदया, ही सभा तुम्ही बोलावली. सभा पण तुम्ही बोलावता, स्थगित पण तुम्ही करता.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—ते चार वाजता बघू, आता ही तर सभा स्थगित करा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—ठिक आहे, चार वाजता बघू.

मा. महापौर :—ही सभा सर्वानुमते पूढील सूचना निघेस्तोपर्यंत अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

कृपया राष्ट्रगितासाठी उभे रहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १२.३० वाजता मा. महापौर श्रीमती मालती करोतिया यांनी अनिश्चित कालावधीसाठी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

;श्री. प्रकाश पं. कुकरेजाद्ध

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३० मार्च , २००५

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.३०/३/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १८/१२/२००४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करून ही सभा दिनांक ३०/१२/२००४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. पण सर्व पक्षाच्या गटनेत्यांच्या लेखी मागणीवर मा. महापौरांनी ती सभा दिनांक ३०/१२/२००४ रोजी न ठेवल्याने सदर सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर सदरची सभा गुरुवार दिनांक २०/०१/२००५ रोजी दुपारी १२—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा पुनश्च स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर आता सदरची सभा दि. ३०/३/२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३२. | श्रीमती भावना रवी खिलनानी, |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३३. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३४. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३५. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ३६. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ८. | श्रीमती मोकल सीमा | ३७. | श्री. सुरेश जाधव |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ३८ | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| १०. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३९ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ४० | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४१ | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १४. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४३. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १५. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४४. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १६. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४६. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४७ | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १९. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ४८. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २०. | श्री. नाना आनंदा पवार | ४९. | श्री. साधवानी मनोज लालचंद, |
| २१. | श्री. जग्यासी राजु | ५०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २२. | श्री. शांताराम निकम | ५१. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५२. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५५. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५६. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २८. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५७. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५८. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३०. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ५९. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, २. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे,३. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम,४. श्रीमती आहुजा निता प्रकाश,५. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ६. श्री. मोहन साधवानी, ७. श्रीमती साधवानी जया,८.श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, ९.श्री.भालेराव गौतम यशवंत, १०. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, ११.श्री. ठाकुर अशोक भगवानदास, १२., श्रीमती. पंजाबी दिपा नारायण, १३. श्रीमती. भटीजा कोमल अमृत,१४.श्री. जयसिंघानी अनिल, १५. डॉ. निना प्रकाश नाथानी, १६. श्रीमती मीनु राजकुमार दासानी,.१७. श्रीमती करोतिया मालती, १८.श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, १९. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २०.श्री. हरदास माखिजा, २१.श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—मा. महापौर, सचिव साहेब जरा कर्मचा—यांना शिस्त शिकवा. वंदेमातरम् सुरू असताना येथुन तो पळत आहे हे काय आहे? तो काय पाकिस्तानचा नागरिक आहे काय?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:—सचिव साहेब, बैठक सुरू होण्यापुर्वी येथे अधिकारी येत नाहीत. बैठक सुरू झाल्यानंतर ते इथे येतात.

मा. सचिव:—विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**प्रश्नोत्तरे.**

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—मा. महापौरजी, आम्ही एक बैठक स्थगित केली होती. कर वाढीच्या विरोधात ती बैठक स्थगित केली होती. जोपर्यंत कर वाढ मागे घेतली जात नाही तोपर्यंत ती बैठक होवु देणार नाही असे ठरले होते. तर कर वाढ कमी झाली आहे का? लोकांच्या डोक्यावरील ओझे कमी झाले आहे का? महापौरांनी सांगितले तर बरे वाटेल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—मा. महापौरजी, कायदा असा आहे की ज्या ज्या वेळी विरोधी पक्षनेता बोलतील त्यावेळी त्यांच्यानंतर सभागृह नेता बोलतात. मला हे सांगताना फार दु:ख होत आहे की, ही सभा सर्व राजकीय पक्षांच्या सहमतीने दोन—तीन वेळा स्थगित करण्यात आली होती. त्यावेळी सत्ताधारी पक्षातील सदस्य जमिनीवर देखिल बसले होते. करवाढ करण्यासाठी जो ठराव शासनाकडे गेला होता तो रद्द होवु नये यासाठी मा.महापौर व उपमहापौर नगरविकास सचिवांकडुन वेळ घेवुन सर्व गटनेता, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेता व सभागृह नेता हे त्यांना भेटतील असे ठरले होते. परंतु मला अत्यंत खेदाने म्हणावे लागत आहे की माजी महापौर व उपमहापौर यांनी कधीही नगरविकास सचिवांना भेटण्यासाठी त्यांच्याकडुन वेळ घेतली नाही. तो ठराव शासनाकडुन रद्द होवुन परत सुध्दा आला आहे. आम्ही बैठक यासाठी स्थगित केली होती की आपण जावुन शासनाला भेटलो होतो तो ठराव रद्द न करण्याबाबत विनंती केली असती. परंतु त्यांनी वेळच घेतली नाही. आता यावेळी ते दोघे येथे उपस्थित सुध्दा नाही. जेणे करून आपण त्यांना विचारले असते की आपल्या कार्यकाळात तीन बैठका स्थगित करून आपणांवर वेळ घेण्याचे काम सोपवले होते. महापौर व उपमहापौर शासनाकडे गेले असते व मंत्रीमहोदय किंवा नगरविकास सचिव यांच्याकडुन वेळ घेऊन त्यांना विनंती केली असती. परंतु आता ठराव रद्द होऊन आला आहे तरी देखिल त्यांनी या कामासाठी वेळ घेतली नाही. तर आता सर्व खेळ संपला आहे, ठराव पण रद्द होवुन आला आहे. यावर पुढे काय करायचे हे सर्व पक्षाच्या सदस्यांनी ठरवायचे आहे. आता तो ठराव रद्द झाला आहे पुढे काय करायचे हे आपण सांगा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—ज्या सहजतेने सभागृह नेता यांनी सांगितले की, सर्व खेळ संपला आहे. तर असे काही नाही. ज्यावेळी ठराव रद्द झाला त्यावेळी जरी महापौर व उपमहापौरांनी वेळ घेतली नसली तरी ते देखिल सत्तापक्षाचे महापौर व उपमहापौर होते. आजही महापौर व उपमहापौर हे सत्तापक्षातील आहेत तर वेळ घेण्याचे त्यांचे काम आहे. हा जो ठराव रद्द केला आहे तो रद्द करतेवेळी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेण्यात आलेली नाही. ठरावाचे जे सुचक व अनुमोदक होते त्यांची देखिल सरकारने सुनावणी घेतली नाही.

आपण त्यावर अपिल करू शकत नाही असे नाही. ठराव जरी रद्द केला असला तरी ही महासभा शासनाकडे जावुन अपिल करण्यासाठी सक्षम आहे. आपण त्यांना सुनावणी घेण्यासाठी विनंती करू शकतो. येथे सत्ता आपली आहे व सरकार देखिल आपले आहे. मला असे वाटते की यामध्ये आपणांस काही अडचण येणार नाही. वेळ घेण्यासाठी व सुनावणी घेण्यासाठी आपणांस काही अडचण येणार नाही. आपण ठराव पास करून शासनास तुम्ही आम्हाला सुनावणी दिली नाही, सुनावणी घेणे हा नैसर्गिक न्याय आहे. कोणत्याही व्यक्तीला सुनावणी दिल्याशिवाय निर्णय होवु शकत नाही. त्यांनी आपल्या सर्वांचे ऐकायला तरी हवे होते. मी पुन्हा एकदा सांगतो की येथे सत्ता आपली आहे, सरकार आपले आहे तर आपणांस कोणत्याही प्रकारची अडचण यायला नको. जर आपण यामध्ये खरोखर काही मार्ग काढु इच्छित असल्यास महापौर व उपमहापौर वेळ घेवुन अपिल देखिल दाखल करू शकतात. हा निर्णय तर आपणांस घ्यावयाचा आहे कारण सत्ता व बहुमत आपल्याकडे आहे.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—मा. महापौर साहेब, फेब्रुवारी, २००३ मध्ये एका रस्त्याचे काम करण्यासाठी आम्ही पत्र दिले होते त्यामध्ये आम्ही २० फुटाचा रस्ता करण्यासाठी आयुक्तांना विनंती केली होती. त्यानंतर आम्ही स्वत: जावुन आयुक्तांना भेटलो तेव्हा त्यांनी सांगितले की, हा रस्ता विकास आराखडयामध्ये ४० फुटाचा असल्याने मी कोणत्याही परिस्थितीत तो २० फुटाचा करू शकत नाही. आता यानंतर एका अन्य नगरसेवकाच्या तोंडी सांगण्यावरून नोव्हेंबर २००४ मध्ये त्यांनी स्वत: जावुन पहाणी केली व तो रस्ता आम्हाला न कळवता, आमच्या संमतीशिवाय २० फुटाचा केलेला आहे. तसेच त्या रस्त्याचे काम सुरू केले आहे. असे कसे काय होवु शकते. जेव्हा आम्ही सांगतो तेव्हा ते सांगतात ४० फुट आहे, होवु शकत नाही. दुस—या नगरसेवकाने सांगितले तर त्याचे २० फुट कसे काय होवु शकते. तर हे कायदे कुठून येतात. आम्ही सांगितल्यावर कायदे येतात आता कायदे येत नाहीत का? याचा खुलासा आयुक्तांनी करावा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौरजी, सभागृह नेता कृपया आपल्या सदस्यांना मार्गदर्शन करावे. विषयावरच चर्चा करावी. जे विषय महासभेत नाही त्यावर चर्चा करू नये. आपण एवढे जुने नगरसेवक आहात, पाच वर्षापासुन सभागृह नेता आहात.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—जमनु पुरस्वानी आपण नेहमी विषयावरच बोलता का?

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—त्यांनी महापौरांची परवानगी घेतलेली आहे.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—तुम्ही नेहमी विषयावर बोलता का? विषय सोडुन दुसरे बोलत नाही का? आपणांस बोलण्याचा हक्क आहे तर आम्हाला नाही का?

मा. सचिव:—प्रश्नोत्तरे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—माझा हरकतीचा मुद्दा आहे.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—महापौर महोदया, कृपया आयुक्तांना यावर खुलासा करण्यासाठी निर्देश दयावेत.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—मी हरकतीच्या मुद्द्यावर बोलु इच्छितो. आज शहरात काय होत आहे? आयुक्त साहेब काय करत आहेत आम्हाला याचा खुलासा हवा आहे. आज शहरात अशांतीचे वातावरण आहे. आज काय झाले ते ऐका.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—मा. महापौर महोदया, आमच्या सदस्यांनी कोणता मुद्दा उचलला आहे ते वाचुन दाखविले तर आम्हाला समजु शकेल. तसेच आपली परवानगी घेवुन हरकतीच्या मुद्दयाद्वारे श्रीमती भावना खिलनानी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यावरही येथे खुलासा होणे आवश्यक आहे. एखादया सदस्याच्या मनात एखादा प्रश्न आला असेल तर त्याचा खुलासा देखिल व्हायला हवा. तसेच आमचे वरीष्ठ सदस्य यांनी जो मुद्दा उचलला आहे तो नेमका काय आहे ते देखिल वाचुन दाखववे जेणेकरून आम्हाला त्यांच्यां नाराजीचे कारण कळु शकेल.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:–**मा. महापौर, उपमहापौर दोन महिन्यापुर्वी श्री. सतरामदास जेसवानी जे वरीष्ठ नगरसेवक आहेत त्यांनी सांगितले होते की आमचे आयुक्त साहेब फार चांगले आहेत, चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. तर आज ते एवढे नाराज का झाले आहेत त्याचे स्पष्टीकरण करावे.

**मा. सदस्य श्री सतरामदास जेसवानी :–** प्रशासनाची गुंडागर्दी सुरु आहे, आतंक आहे............

यावेळी श्री. सतरामदास जेसवानी हे विरोध दर्शविण्यासाठी मा. महापौरां समोरील मोकळया जागेत जमिनीवर बसले.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–**मा. महापौरजी आज आमच्या सदस्यांनी जे दोन तीन मुद्दे उपस्थित केले आहे त्याचा खुलासा मी करतो. आज आमचे श्री. सतरामदास जेसवानी यांच्या प्रभागात एका व्यक्तीकडे सनद आहे. ज्यांचा १९६५ पुर्वी जागेवर ताबा असतो त्यांनाच सनद मिळते. त्या व्यक्तीने दुरूस्ती केली आहे. त्याचे बांधकाम तोडण्यात आले आहे. यांचे म्हणणे असे आहे की ज्याच्याकडे सनद आहे त्याचे बांधकाम तोडण्यात आले आहे. आमचे नविन उपायुक्त श्री. पाटील हे तेथे आले व त्यांनी सांगितले की आपण परवानगी घेतलेली नाही तसेच दुरूस्ती परवानगी देखिल घेतलेली नाही परंतु मी याचा खुलासा करू इच्छितो की दुरूस्ती परवानगी जी मागील ४० वर्षापासुन मिळत होती ती आता गेल्या दहा महिन्यांपासुन देण्याचे बंद करण्यात आले आहे. आधी ५०० रू. भरल्यावर दुरूस्ती परवानगी मिळायची परंतु त्यामध्ये अट असायची की, उपमहापौरजी, मी आपणांस सांगत आहे आपण थोडे लक्ष दयावे. दुरूस्ती परवानगीमध्ये एक अट असायची की आपण भिंती, छत याची दुरूस्ती करू शकतो परंतु आर.सी. सी. बांधकाम करू शकत नाही. त्यामध्ये फक्त आर.सी.सी बनविण्यात येवु नये ही अट असायची परंतु सनदेच्या क्षेत्रामध्ये जी काही दुरूस्ती करावयाची असेल ती करू शकत होते. परंतु गेल्या दहा–बारा महिन्यांपासुन दुरूस्ती परवानगी देण्याचे बंद करण्यात आले. याचे कारण सांगण्यात आले की, ज्या माणसाकडे सनद आहे, एम.आर.टी.पी ॲक्टच्या कलम ४३ अन्वये असे लिहिण्यात आले आहे की, आपण काहीही बांधकाम करू शकता फक्त खाली व वर बांधु शकत नाही. तर आज तो माणुस पत्रयाचे बांधकाम करीत होता तरी देखिल ते तोडण्यात आले. तर आमचे दादा तेथेही फार ओरडले आहेत. त्यामुळे त्यांचा गळा बसला आहे. ते म्हणतात की जर सनदेचे बांधकाम देखिल सुरक्षित नसेल, त्यांचे म्हणणे आहे की, हा मुद्दा फक्त माझाच नाही तर पुर्ण उल्हासनगरशी संबंधित आहे. यासाठी एक धोरण ठरवायला हवे. जेणेकरून बांधकाम परवानगी बंद केली तरी सनद असणारा व्यक्ती दुरूस्ती तरी करू शकेल. ज्यांला खाली व वर बांधकाम करायचे असेल तो नकाशा मंजुर करू शकतो. परंतु येथे परवानगी देखिल महिनोंनमहिने मिळत नाही. पायाचे दाखले मिळत नाहीत, पुर्णत्वाचे दाखले तर दोन वर्षापासुन मिळणे बंद झाले आहे. श्री. शिंदे साहेब यांच्या कालावधीत जेवढया परवानग्या देण्यात आल्या आहेत त्यापैकी कोणालाही पुर्णत्वाचे दाखले देण्यात आलेले नाही. यांचा हा मुद्दा आहे. व श्रीमती भावना खिलनानी यांचा मुद्दा आहे की, त्यांनी एक अर्ज दिला आहे की, एका अपंग व्यक्तीने पीसीओ बुथ मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तर त्याचा अर्ज देखिल स्विकारला जात नाही. सीएफसीमध्ये सांगतात की, आधीचेच ५०–६० अर्ज प्रलंबित आहेत जे महासभेसमोर जातील. आज पर्यंत एसटीडी. बुथसाठी जेवढया परवानग्या देण्यात आल्या त्यापैकी एकेक प्रकरण महासभेसमोर आलेले नाही. शहरामध्ये कमीत कमी १०० बुथ आहेत. त्यांना थेट परवानगी देण्यात आली आहे. आता अचानक महासभेचा कायदा आला आहे की, आता महासभेत पास होईल. त्या व्यक्तीने एक वर्षापुर्वी देखिल अर्ज केला होता. त्यांचे म्हणणे आहे की त्यांच्या प्रभागात अपंग व्यक्तीला एसटीडी बुथ साठी परवानगी देण्यात येत नाही. तसेच श्रीमती भावना खिलनानी यांचे म्हणणे आहे की, त्यांनी काही दिवसांपुर्वी एका रस्त्यांसाठी अर्ज केला होता की, या रस्त्याची रूंदी ४० फुट आहे ती २० फुट करण्यात यावी. तो रस्ता ४० फुटाचा २० फुट करता येणार नाही असे कारण देवुन त्यांचा अर्ज फेटाळण्यात आला होता. परंतु आज दुस–या नगरसेवकाच्या सांगण्यावरून ४० फुटाचे २० फुट मंजुर झाले आहे. त्याचे काम देखिल आता सुरू होणार आहे. तर यांचे म्हणणे आहे की जेव्हा मी अर्ज केला तेव्हा रूंदी कमी करण्यास नकार देण्यात आला. व सांगण्यात आले की हे अधिकार आम्हाला नाहीत. कलम ३७ अन्वये ते अधिकार महासभेला आहेत. ते देखिल शासनाच्या मान्यतेस अधिन राहुन आहेत. राजपत्रात आल्यानंतरच ४० फुटाचे वीस फुट करता येवु शकते. तर मग आता तो रस्ता २० फुट कसा काय करण्यात आला? तसेच आमच्या ब–याचशा सदस्यांचे असे देखिल म्हणणे आहे की, बरीच कामे मंजुर झाली आहेत, डी.डी.. आर कडुन मान्यता मिळाली आहे. आणि आता सांगतात की कार्यादेश दयायचे नाहीत. यांचे म्हणणे आहे की एक वर्षापुर्वी आयुक्त साहेबांनी यांचा अर्ज मान्यतेसाठी नगररचना विभागात पाठविला आहे. तो आजपर्यंत परत आलेला नाही. दुस–या माळयावरून पहिल्या माळयावर येण्यास एक वर्ष लागते. यांचे म्हणणे आहे की दोन वर्षापुर्वी आयुक्तांनी एस.टी.डी. बुथसाठी यांचा अर्ज दुस–या माळयावर पाठविला आहे. तरी अजुन तो आलेला नाही. समाज मंदीरासाठी. तर या ज्या आमच्या सदस्यांच्या भावना आहेत त्या लक्षात घेवुन त्यांना न्याय देण्यात यावा. जे नगरसेवक निवडुन आले आहेत ते स्वत:साठी काम न करता जनतेसाठी काम करीत असतात. तर त्यांना न्याय दयायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–</u>मा. महापौर महोदया, काही दिवसापुर्वी महापालिकेबाहेर हातगाडी संघटनावाल्यांनी उपोषण केले होते व आपण त्यांना आश्वासन दिले होते की, आपल्या ज्या वाजवी मागण्या आहेत त्यांच्यावर लक्ष देण्यात येईल. हातगाडीवाल्यांना परवाना देण्यासाठी जे अर्ज बनविण्यात आले आहेत त्यामध्ये वास्तव्याचा दाखला देणे आवश्यक असल्याचे दर्शविले आहे. दुसरे म्हणजे पोलिसांचा दाखला देखिल आवश्यक केला आहे की त्यांच्यावर कोणतीही केस असता कामा नये. तसेच मालमत्ता कराची पावती देखिल आवश्यक केली आहे. महापौर महोदया, उल्हासनगरमध्ये कित्येक लोक असे आहेत की ज्यांच्यावर कोठे ना कोठे एन.सी किंवा एफआयआर दाखल केला आहे. तर अशा लोकांना आपण रस्त्यावर अथवा हातगाडीवर धंदा करण्याचा हक्क देणार नाही का? व आपण त्यांना असा हक्क न दिल्यास असे लोक गुन्हेगारी कारवायांमध्ये सामील होतील. व या शहरामध्ये गुन्हे वाढतील. याकरिता अर्जात जो पोलिसांचा दाखला, वास्तव्याचा दाखला व मालमत्ता कराची पावती या अटी रद्द करण्यात याव्यात. कारण जो धंदा करेल त्याच्याकडे स्वत:चे घर असणे आवश्यक नाही. आपण राशन कार्डची प्रत घेवु शकता. जेणेकरून येथील रस्त्यावर उल्हासनगरचे लोक धंदा करतील तर त्यांना रोजगार मिळेल. यासाठी आपण आयुक्तांना या अटी रद्द करण्यासाठी निर्देश दयावेत.धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>मा. महापौरजी, उपमहापौर व आयुक्त साहेब यांनी जे सांगितले की, पोलिसांच्या दाखल्याची आवश्यकता नाही तर आमचे असे म्हणणे आहे की सर्व गोष्टींची पडताळणी होणे आवश्यक आहे. कारण की मध्यप्रदेश व उत्तरप्रदेश येथील तडीपार लोक येवुन येथे रहात आहेत, बाजारात धंदा करत आहेत. आमचे व्यापारी यासाठी आमच्याकडे आले होते तेव्हा देखिल आम्ही हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी आम्हाला त्यांचा तपशिल दाखवला. कोणी दोन खुन केले आहेत, कुणी हाफ मर्डर केला आहे, कुणावर २०–२५ गुन्हे दाखल आहेत यासाठी पोलिसांचा दाखला घेणे आवश्यक आहे. कोणताही परवाना दिला तरी त्यासाठी पोलिसांचा दाखला घेणे हे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय आपण परवाना दिल्यास त्याची जबाबदारी आपणांवर येवु शकते की यांनी तडीपार लोकांना बाहेरून आणुन येथे बसविले आहे. व्यापारी म्हणतील आपण गुन्हेगार व्यक्तींना आमच्यावर लादले आहे. या गोष्टीकडे विशेष करून लक्ष दिले जावे.

यावेळी मा. सदस्य श्री प्रमोद टाले व श्री शांताराम निकम हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>मा. महापौर महोदया, श्री. लालवानी यांनी सांगितले की आपण हातगाडीवाल्यांना आश्वासन दिले होते. जे आश्वासन दिले आहे त्याची पुर्तता होणे आवश्यक आहे परंतु जे प्रशासनाचे काम आहे ते त्यांना करू दया. हे करा, ते करू नका. परंतु जे योग्य आहे ते प्रशासनाने करायलाच हवे. जसे श्री. महाराज यांनी सांगितले की येथे तडीपार लोक आले आहेत व आपण त्यांना परवानगी दिली व त्यांनी लोकांना त्रास दिला. याचा अर्थ आपण त्यांना पाकीटमारी करण्यासाठी परवानगी दिली असा होतो. यासाठी जे प्रशासनाचे काम आहे ते प्रशासनालाच करू दया.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–</u>जे गुंड असतील, ज्याच्यावर गुन्हे दाखल असतील, ज्याला वाईट मार्गाने पैसे कमविण्याची सवय असेल तो माणुस कधीही हातगाडी लावुन धंदा करणार नाही. हातगाडी लावुन धंदा करणा–यांवर देखिल छोटेमोठे गुन्हे दाखल असतात. ज्याने मध्यप्रदेश अथवा बिहार येथे गुन्हे केले असतील त्याच्या चारीत्राचे प्रमाणपत्र येथील पोलिस देवु शकणार नाही म्हणुन एखादयावर छोटा मोठा गुन्हा दाखल असेल व आपण त्याला हातगाडी लावुन धंदा करण्याची परवानगी दिली नाही तर तो साखळया खेचेल, गुन्हे करेल दुसरा काही धंदा करेल. तो या शहरात जास्त गुन्हे करेल. यासाठी एखादा व्यक्ती मेहनत करून पैसे कमवु इच्छित असेल तर त्याला तो अधिकार आपण दयायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब हा जो विषय आहे याच्यावर आपण आपल्या दालनात चर्चा करावी. प्रशासनाचे जे काम आहे ते त्यांना त्यांच्या पध्दतीने करू दया. आता प्रश्नोत्तरे चालु करा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>प्रश्नोत्तरे चालु करण्यापुर्वी मी विचारू इच्छितो की आमचे सदस्य श्री. सतरामदास जेसवानी हे खाली बसले होते . तो विषय काय होता ते जरा आम्हाला सांगावे. हे महासभेत

झाले आहे जर आपल्या दालनात झाले असते तर  विषय वेगळा होता. कमीत कमी सभागृहाला ते जमिनीवर का बसले होते याचे कारण तरी सांगावे. आयुक्त अथवा महापौरांनी याची माहिती दयावी.

मा. महापौरः—सन्माननिय सदस्य, आमचे सदस्य श्री. सतरामदास जेसवानी जे महासभेत आपल्या समोर जमिनीवर बसले होते. विषय काय आहे ते त्यांनी आपल्याला चांगल्याप्रकारे सांगितले आहे. यांचे म्हणणे आहे की गेल्या ९—१० महिन्यांपासुन दुरूस्ती परवानगी बंद करण्यात आली आहे. लोकांना फार असुविधा व अडचणी येत आहेत. हा एक विषय आहे व जे दुसरे काही असेल ते आयुक्तां समवेत बसुन त्यावर आम्ही मार्ग काढु.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—आता मी मुळ विषयावर येतो. ज्या विषयावर सुरूवात झाली त्यावेळी दुस—या गोष्टी निघाल्या व मुळ प्रश्न बाजुलाच राहिला. ही सभा जी दोन वेळा स्थगित झाली होती. कर वाढीच्या विरोधात निषेध म्हणुन दोन वेळा सभा स्थगित झाली होती. माझे असे म्हणणे होते की आताचे महापौर व उपमहापौर यांना जर या विषयाबाबत खरोखर कळवळा असेल तर शासनाकडुन वेळ घेवु शकतात. तसेच आपल्याला या प्रकरणात सुनावणी देण्यात आलेली नसल्याने आपणांस अपिल करण्याचा हक्क आहे. तर आपण जर याबाबत प्रामाणिक असाल तर होवु शकते. यावर आपले काय म्हणणे आहे ते सांगावे.

मा. महापौरः—आपली सूचना आम्हाला मान्य आहे आम्ही शासनाकडे याविरूध्द अपिल करू.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब गेल्या अनेक महिन्यापासुन आम्ही सभागृहामध्ये सदस्यांकडुन मा. आयुक्तांची प्रशंसा ऐकत होतो. तेव्हा चांगले वाटायचे, चांगले काम केल्यानंतर अभिनंदन करतात. परंतु आज एका गरीबाचे झोपडे तोडल्यानंतर श्री. सतरामदास जेसवानी यांनी सांगितले की अन्याय झाला आहे हे खरे आहे त्याच्यावर अन्याय होत आहे. घराची दुरूस्ती चालु असताना ते तोडण्यात आले आहे. मा. आयुक्त साहेब मी तुम्हाला सांगु इच्छितो की शहरामध्ये तुमचे थोडे दुर्लक्ष झाले आहे. त्यामध्ये प्रशासनाचे किती अधिकारी सामील आहेत ते सांगता येणार नाही. मग त्यामध्ये तुमचे बीट इन्स्पेक्टर आहेत,कनिष्ठ अभियंता आहेत किंवा इतर उपायुक्त आहेत. तुम्ही सांगु शकत नाही परंतु ती वस्तुस्थिती खरी आहे. उल्हासनगर शहरामध्ये अतिक्रमण एवढे वाढले आहे की, रस्ता रूंदीकरणात ज्या इमारती येत आहेत. पारस नावाच्या इमारतीसमोर आपले लोक जावुन उभे राहिले आहेत परंतु ती तोडण्याची त्यांच्यात हिंम्मत नाही आहे. आयुक्त साहेब जरा लक्ष दयाल तर बरे होईल. तुमच्या माहितीसाठी सांगत आहे. डॉल्फिन रोडच्या रस्त्यावरील झोपडपट्टी तोडण्यात आली आहे. १९८० पासुन राहणारे लोक बेघर झाले आहेत. त्याच रस्त्यामध्ये पारस नावाची इमारत येत आहे ती तोडली जात नाही.

मा. महापौरः—सन्माननिय सदस्यांना विनंती आहे की त्यांनी कार्यसूचीवरील विषयांवर बोलावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—तुमच्या सदस्यांना परवानगी देता, आम्हाला देत नाही हे चुकीचे आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—ते लोक पैसेवाले आहेत. यांचे लोक तोडपाणी करण्यासाठी फक्त तेथे उभे आहेत. दोन तासांपासुन उभे आहेत पण अजुन एक हातोडा देखिल चालविलेला नाही. यामध्ये चुकीचे काय बोलले. जेथे पैसे मिळण्याची अपेक्षा आहे तेथे सकाळपासुन उभे आहेत.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—जो अतिक्रमण करतो, ज्याची आम्ही तक्रार करतो त्याचे तोडत नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—बोडारे साहेब म्हणत होते की, तुमच्या सदस्यांना विषयावरच बोलायला सांगा. त्यावेळी मी आमच्या सदस्यांना देखिल विषयावरच बोला असे सांगितले. तुम्हाला काही त्रास असेल तर तुम्ही नंतर महापौरांना भेटु शकता.

यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोरजोराने  बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिहं भुल्लरः—सर्वांनी ऐकावे मी आपल्या माहितीसाठी सांगत आहे. त्या ठिकाणी उंदीर व मांजराचा खेळ चालु आहे. बंदुक घेवुन उभे आहेत. तोडपाणी करत आहेत. बांधकाम तोडत नाही. जेथे काही मिळणार नव्हते ते जावुन तोडुन आले.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—आमच्या सदस्यांनी उठवलेल्या प्रश्नावर आपण सहानुभूती दर्शविली यासाठी आम्ही आपणांस धन्यवाद देतो. आता कृपया विषयावर चर्चा करावी.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—आयुक्त साहेबांच्या गुंडागर्दीवर आपले काय विचार आहेत ते जरा सांगावेत. आयुक्त साहेबांनी काय गुंडागर्दी केली आहे ते देखिल सांगावे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—आयुक्त साहेब एक चांगले अधिकारी आहेत यावर आम्हाला संदेह नाही. आम्ही आमचे शब्द पुन्हा बोलत आहोत. एवढे मोठे प्रशासन आहे त्यामध्ये छोटया मोठया चुका होणे संभव आहे. त्यावर लक्ष आकर्षित करणे हे आमचे काम आहे ते आम्ही केले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिहं भुल्लरः—आता विषय कुठे गेले?

**यावेळी काही सदस्य एकाचवेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळुन येत नव्हते.**

मा. सचिवः—आता प्रश्न उत्तरांना सुरूवात करण्यात येत आहे. माझ्या मागील घडयाळात यावेळी ५. २० झाले आहेत.

प्रश्न क्र. ३२५ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे. ते यावेळी सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३२५ः— सन २००३—२००४ या कालावधीत कॅम्प नं. १ ते ५ मध्ये महानगरपालिकेचे शौचालये तोडले गेले आहे.  कुठली शौचालये (प्रत्येक प्रभागवाईज) तोडली आहे?

ती शौचालये महानगरपालिके मार्फत तोडली आहेत त्याची कारणे काय?

तोडलेली सर्व शौचालये किती साली बांधली आहेत?

सदर शौचालये तोडल्यावर सदर जागेवर महानगरपालिका नेमके त्या जागेचा काय उपयोग करणार आहे?

विस्तृत माहिती दयावी.

उत्तरः— सदर प्रश्नाचे उत्तर सोबत जोडलेल्या आराखडयात देण्यात आलेले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—मा. महापौरजी, मी सचिव साहेबांच्या निदर्शनास आणु इच्छितो की, प्रश्न क्र. ३२२ हा प्रलंबित आहे. तो प्रश्न आधी सुरू करावा.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिहं भुल्लरः—प्रश्न क्र. २८९ व २९० बाबत आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, ३१ मार्च पुर्वी निष्कासन करेन. त्याचे काय झाले? उदया ३१ मार्च आहे. मी आपल्या निदर्शनास आणु इच्छितो.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३२२ चे उत्तर आयुक्त साहेब आपणांस पुढील वेळी देतील. यावेळी त्यांच्याकडे तपशिलवार माहिती नसल्याने ते उत्तर देवु शकत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—मा. महापौरजी, आयुक्त साहेब हा प्रश्न विचारून सहा महिने झाले आहेत त्यानंतर महासभेत चर्चेसाठी हा प्रश्न आला होता त्यावेळी आम्ही प्रशासनाला विचारले होते तेव्हा प्रशासनाने सांगितले की पुढील महासभेत आम्ही चांगल्या प्रकारे या प्रश्नाचे उत्तर देवु.

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, प्रश्न क्र. ३२२ मध्ये आम्ही अनाधिकृत बांधकामाबाबत जे आश्वासन दिले होते . तेथील निवासी व्यक्तींना जागा खाली करण्याची नोटीस देण्यात आली आहे. जागा खाली करून त्यानंतर निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—नोटीस कधी दिली, किती दिवसाची दिली, आतापर्यंत जागा रिकामी का केली नाही? हे प्रश्न विचारल्यानंतरही प्रशासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी मी उपायुक्तांस लेखी पत्र दिले होते त्याचे ही उत्तर अजुन मिळालेले नाही.

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, आजमितीस माझ्याकडे याची विस्तृत माहिती नाही. मी पुढील महासभेत आपणांस विस्तृत माहिती पुर्ण कारवाई करून देईन.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः—आयुक्त साहेब मागील महासभेत देखिल आपण हेच उत्तर दिले होते. तर अशा किती महासभा होतील?

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, गेल्या पंधरा दिवसापासुन मी कोणत्या कामामध्ये व्यस्त होतो ते आपणां सर्वांना माहिती आहे. आजच्या या महासभेची सूचना देखिल आज सकाळी माझ्या हातात आली. जरी दोन दिवसापुर्वी सूचना दिली असली तरी आज सकाळीच मला प्राप्त झाली. मी असे बोलायला नको. आपली उत्कंठा मी समजु शकतो त्याप्रमाणे काम देखिल होईल. वेळ काढण्यासाठी आम्ही आपणांस प्रत्येक वेळी पुढील वेळी बघु असे सांगतो असे नाही. जे बोलु ते करून दाखवु.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—मा. महापौर महोदया, एक माहिती विचारू इच्छितो. माहितीच्या अधिकारान्वये एखादया सामान्य व्यक्तीने अर्ज केल्यावर देखिल त्याला तातडीने उत्तर दिले जाते. व उत्तर वेळेत दिले नाही तर संबंधित अधिका—याला एका दिवसाचा रू. २५०/— दंड देखिल होतो. आपल्या उल्हासनगर येथील अधिका—यांना गेल्या काही दिवसात ब—याचवेळा दंड झाला आहे. जेव्हा एखादा नगरसेवक महासभेत प्रश्न विचारतो व त्याला सहा सहा महिने विलंब होतो. त्याचे उत्तर देखिल बरोबर दिले जात नाही. यासाठी दंड करता येणार नाही का? याबाबत जरा माहिती दयावी. जेव्हा एखादा साधारण व्यक्ती अर्ज करतो तेव्हा रू. २५०/— दंड केला जातो. तर याची येथे माहिती दयावी.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—मा. महापौरजी, आयुक्त साहेब पृष्ठ क्र. ३४ वर आपण म्हंटले आहे की, याबाबत कलम १५२ अनुसार नोटीस बजावण्यात आली आहे त्या अनुसार एम.आर.टी.पी. चे कलम ३२ अनुसार गुन्हा दाखल करण्याचे आदेश सुध्दा देण्यात आले आहेत. तर गुन्हा दाखल केलेला आहे का? मा. आयुक्त साहेब........

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, प्रश्नांबाबत बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये अशी तरतुद आहे की, आपण महापालिका प्रशासनाबाबत महासभेत प्रश्न विचारू शकता. आपले कडुन जेवढे प्रश्न येतात त्यांचे उत्तर आमच्याकडुन दिले जाते. उत्तर दिल्यानंतर देखिल प्रत्येक प्रश्नावर येथे चर्चा होते. आपण लोकसभेचे

अथवा विधानमंडळाचे कामकाज पाहिल्यास दिसुन येईल की तेथे सर्व प्रश्नांवर चर्चा होत नाही. प्रश्नांचे प्राथम्य ठरविण्यात येते व त्यानंतर मग एका दिवसात १०० प्रश्नांचे देखिल उत्तर दिले जाते. परंतु प्रश्नोत्तराच्या काळात ज्या प्रश्नांना प्राथम्य असते त्यांचीच उत्तरे दिली जातात. एका तासामध्ये जेवढे प्रश्न येतील मग ते ४ असो, २० असो, कधी २५ असतात तर कधी १ देखिल असतात. येथे आपणांस प्रत्येक प्रश्नाचे उत्तर व त्या प्रश्नावर चर्चा सभागृहात व्हायला हवी असते. यामुळेच सहा–सहा महिने लागतात. जर आपण पुढील महासभेसाठी प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर दिले जाईल. जेवढया प्रश्नांचे उत्तर दिले असेल तेवढया प्रश्नावर चर्चा देखिल केली जाईल. ज्यांचे उत्तर दिले जाते त्यांच्यावर पुढील महासभेत चर्चा केली जात नाही. प्रत्येंक महासभेत ८० पैकी ८० नगरसेवकांचे प्रश्न आले तरी देखिल एका तासात त्यावर ४,५ अथवा ज्यांना प्राथम्य दयायचे असेल त्याच्यावरच चर्चा करता येवु शकेल. उर्वरित प्रश्नांचे उत्तर दिले आहे असे मानले जाते. परंतु आपल्या येथे कायदयात स्पष्ट तरतुद नसल्याने प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले जाते. आयुक्तांकडे एखादया प्रश्नाची माहिती नसेल तर आयुक्त विनंती करून सदरचा प्रश्न पुढील महासभेत घेवुन त्यावर उत्तर देवु शकतो. अशी देखिल कायदयात तरतुद आहे. मी आताच तुम्हाला सांगीतले की आजच्या महासभेची माहिती मला आज सकाळीच समजली त्यामुळे मला असे वाटते की माझ्या दोन वर्षाच्या कालावधीत तुम्हाला पहिल्यांदा बोलण्याची संधी मिळाली आहे. आज माझी तयारी व्यवस्थित झाली नाही. आपणांस जे प्रश्न क्र.३२२ चे जे उत्तर दिले आहे त्यामध्ये लिहिले आहे की, निष्कासनाची नोटीस दिली आहे. पुढील कारवाई, निष्कासनाची कारवाई केली जाईल. तेथील लोकांना बाहेर काढुन त्यानंतर अनाधिकृत बांधकाम हटविले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>आयुक्त साहेब, आपले उत्तराशी मी सहमत नाही. जेव्हा विधान सभेत प्रश्न येतात तेव्हा त्यावर उत्तरे प्रामाणिकपणे दिली जातात. प्रश्नाचा उद्देश असा असतो की, ज्यावेळी प्रश्न विधानसभेत येतो. त्यावेळी आधी कारवाई होते. जेव्हा एखादा सदस्य प्रश्न टाकतो तेव्हा त्यामागे असे कारण असते की, त्यावर कारवाई होणे अपेक्षित असते. आम्ही येथे बघतो की, जानेवारी २००४चे प्रश्न, मागील वेळी जेव्हा येथे प्रश्न आला होता तेव्हा आपण बोलले होता की, ३१ मार्च पर्यंत निष्कासन केले जाईल. आता तर ३१ मार्च २००६ येईल तोपर्यंत देखिल ते होणार नाही. आपण प्रश्न बघितले तर त्यावर उत्तर काय असते हे बघा. नोटीस बजावली आहे. असे उत्तर देवुन उत्तर पुर्ण केले जाते. मी आपणांस मोजुन दाखवतो. सन २००४ मध्ये कमीत कमी २७ प्रकरणे अशी आहेत, अनाधिकृत बांधकामाबाबत ज्यावर काही एक कारवाई झाली नाही. फक्त नोटीस दिली असे लिहिले जाते. नोटीस दिली हे उत्तर होवु शकत नाही. कारवाई व्हायला हवी. कारवाई झाली असती तर प्रश्न आले नसते. कोणत्याही सदस्याने येथे चर्चा देखिल केली नसती. कारण येथे प्रामाणिकपणे उत्तर दिले जात नाही. प्रश्न ब–याच वेळा येतात व येथे चर्चा होते. विधानसभेत काय असते हे मी तुम्हाला सांगतो. तुम्हाला कदाचित माहिती असेल. तेथे '' आश्वासन पुर्तता समिति '' असते. तेथे मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनांची पुर्तता होते अथवा नाही हे पाहण्यासाठी पाठपुरावा केला जातो. येथे पाठपुरावा केलाच जात नाही. कमीत कमी आपण आपल्या कार्यालयात आश्वासन पुर्तता करण्यासाठी एखादा कक्ष स्थापित करावा. आपण येथे जे आश्वासन देता. त्याची अंमलबजावणी होते अथवा नाही हे बघा. जर असे झाले तर मला असे वाटते की येथे सभेचा व आपला वेळ जाणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u>मा. आयुक्त साहेब, आपण जानेवारी महिन्यात स्वत: महासभेमध्ये सांगितले होते की, एम.आर.टी.पी ॲक्ट कलम ५२ नुसार गुन्हा दाखल करण्यांत येईल. तो गुन्हा दाखल झालेला आहे काय याची माहिती मिळावी.

<u>मा. प्रभारी आयुक्त:–</u>मा. महापौर महोदया, मी आधीच निवेदन केले आहे की याबाबत मी आपणांस पुढील महासभेत माहिती देईन. मागील महासभेत जे आश्वासन दिले होते त्याबाबत आपणास माहित आहे की, एकही महापालिका अशी नाही की जेथे प्रशासनाच्या वतीने सभागृहात जी आश्वासने दिली जातात. त्याबाबत सभागृहात पुन्हा माहिती दिली जाते. मी येथे आल्यांनंतर त्याची सुरूवात केली. आपल्या समोर जी आश्वासने दिली त्याबाबतची लेखी माहिती मी सभागृहासमोर ठेवली आहे याआधी. २२ महापालिकां पैकी एकही महापालिका अशी नाही की जेथे असे केले जाते. आम्ही येथे याची सुरूवात केली. जी पण आश्वासने दिली जातात त्याची कारवाई पुर्ण होते. कारवाई पुर्ण झाल्यानंतर सभागृहासमोर आम्ही लेखी स्वरूपात त्याचा अहवाल पाठविलेला आहे. आजच्या महासभेत आम्ही लेखी अहवाल सादर करू शकलो नाही परंतु प्रश्न क्र. २८९ चे आम्ही उत्तर दिले होते की कारवाई केली जाईल. त्यामध्ये देखिल निष्कासनाची कारवाई आज सुरू आहे. प्रश्न क्र २९० बाबत निष्कासन झाले आहे. प्रश्न क्र. २९८ बाबत जागा खाली करण्यासाठी नोटीस

दिली आहे. प्रश्न क्र. ३०४ चे बांधकाम तोडण्यात आले आहे. प्रश्न क्र. ३२० चे जे बांधकाम होते ते तोडण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे. असे नाही की आपण प्रश्न विचारला त्यावर आम्ही उत्तर दिले आणि कारवाई केली नाही. आपणां सर्वांना हे माहित आहे की, उल्हासनगर शहरात आज सर्वात मोठी समस्या असेल तर ती अनाधिकृत बांधकामाची आहे. अनाधिकृत बांधकामाबाबत येथे प्रश्न विचारले जातात. लोकआयुक्तांकडे तक्रार केली जाते. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या जातात. या शहरात असे नाही की एक बांधकाम आहे. जेणेकरून आम्ही कारवाई करून येथे अहवाल दिला असता. या समस्येचे गांभिर्य आपण लक्षात घ्यायला हवे. आमच्याकडे जेवढा कर्मचारी वर्ग आहे त्यांनी एका दिवसात पाच अनधिकृत बांधकामे जरी निष्कासित केली तरी महिन्यात जास्तीत जास्त १५० अनधिकृत बांधकामांचे निष्कासन होवु शकते. व बनविणारे १५०० आहेत. मी आज येथे जे बोलत आहे ते यासाठी बोलत आहे की सर्व संभव प्रयत्न केल्यानंतर देखिल अनधिकृत बांधकामांची समस्या ही आज निर्माण झालेली नसुन ती १९४८ पासुन निर्माण झालेली आहे. याला अजुन पर्यंत कुणीही आवर घालु शकलेला नाही. गेल्या १ एप्रिल पासुन आम्ही ३५१ बांधकामे तोडलेली आहेत. त्यामधील ६२ आर.सी.सी. बांधकामे आहेत. ही बांधकामे २००४–२००५ यावर्षात तोडलेली आहेत. १ एप्रिल ते २९ मार्च पर्यंत ३५१ बांधकामे तोडलेली आहेत त्यापैकी ६२ आर.सी.सी बांधकामे आहेत. आता जी जनहित याचिका दाखल झाली आहे त्यामध्ये आम्ही विस्तृत माहिती दिली आहे की, १९४८ पासुन या शहरात कशाप्रकारे अनाधिकृत बांधकामे झाली आहेत. ११/५/६५ पुर्वी या शहरामध्ये ३० हजार पेक्षा जास्त अनधिकृत बांधकामे होती. १९६५ ते १९८१ दरम्यान या शहरात २७ हजार अनधिकृत बांधकामे झाली आहेत. १९८१ नंतर या शहरात किती अनाधिकृत बांधकामे झाली याची माहिती कोणाकडेही नाही. यासाठी आता सर्वेक्षण करणे बाकी आहे. अनाधिकृत बांधकामांची समस्या आपण प्रश्नांच्या माध्यमातुन प्रशासनासमोर आणता. आम्हाला जेवढे शक्य आहे तेवढी कार्यवाही आम्ही त्याच्यावर करतो. एखादा सदस्य एखादया विशिष्ट प्रकरणात कारवाई झाली नाही असे सांगु शकतो परंतु शहरात जेवढी अनाधिकृत बांधकामे बनतात त्यावर कारवाई करताना प्रशासनाच्याही काही मर्यादा आहेत. जर पुर्ण शहरातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करावयाची असतील तर त्यासाठी करोडो रूपयाच्या निधीची आवश्यकता आहे, मनुष्यबळ आवश्यक आहे, सामुग्री हवी व सर्वात महत्वाचे म्हणजे बांधकामे थांबविण्यासाठी राजकीय इच्छा शक्ती व जनतेची इच्छा शक्ती आवश्यक आहे. आता मी आपणांस तर प्रश्न विचारू शकत नाही परंतु तुम्हीच तुमच्या अंत:करणात झाकुन पाहिले की या शहरात अनधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती किती आहे व जनतेची इच्छशक्ती किती आहे तर आपणांस कळुन येईल. फक्त प्रशासनावर टिका करून हा प्रश्न सुटणार नाही. प्रशासनावर टिका करणे हे फार सोपे आहे की शेकडो अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. टिका करणे सोपे आहे परंतु प्रशासनाची जेवढी जबाबदारी आहे तेवढीच या शहरातील नागरिकांची देखिल जबाबदारी आहे. व जनतेचे प्रतिनिधी म्हणुन आपली देखिल जबाबदारी आहे. आम्ही आमच्या जबाबदारीपासुन मागे हटणार नाही परंतु आपणांसही या शहरातील नागरिकाची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:–</u>अनधिकृत बांधकामांची समस्या सोडविण्यासाठी एक समिती स्थापन करता येणार नाही का? यामध्ये विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, सर्व नेत्यांना सोबत घेता येईल.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३२६ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३२६:–</u> संतचेलाराम रोड सुलभ शौचालयास लागून उल्हासनगर–१ येथे अशोक रेडिओवाल्याचे (श्री. बसंतानी) आर.सी.सी. दुकानाचे बांधकाम केले आहे. सदर बांधकामास महानगरपालिकेने मंजूरी दिली आहे काय?

त्यांचे बांधकामाचा नकाशा मंजूर झाला आहे का?

झाला तर कश्याप्रकारे?

कृपया सदर प्रश्नाची सभागृहात चर्चा होऊन माहिती मिळावी.

<u>उत्तर:–</u> सदर बांधकामास या कार्यालयातर्फे परवानगी देण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब सदर ठिकाणी ज्याला सुलभ शौचालय बांधण्याचे काम दिले होते त्याने बाजुला तीन दुकाने बनवुन दुस—या व्यक्तीला दिलेले आहेत. तर इथे आपण असे नमुद केले आहे की, त्याच्यावर आम्ही कार्यवाही करू. तर आपण त्याच्यावर काय कारवाई केली आहे? यावर सविस्तर खुलासा करावा.

मा. प्रभारी आयुक्त:—मा. महापौर महोदया, प्रश्न विचारला आहे त्याच्या उत्तरात सांगितले आहे की, तेथे परवानगी देण्यात आलेली नाही. तेथे अनधिकृत बांधकाम केलेले आहे. व त्यावर एम.आर.टी.पी ॲक्टच्या कलमान्वये कारवाई करण्यात येईल.

मा. सचिव:—पुढील प्रश्न श्री. नथु सोनवणे यांचाच आहे.

प्रश्न क्र. ३२७:— आवतराम चौक, तेजूमल मटेरियल सप्लायर्सचे बाजूला उल्हासनगर येथे सार्वजनिक शौचालय तोडुन शासकिय जागेवर तीन दुकानाचे बांधकाम करण्यात आले आहे. सदर बांधकाम महापालिकेच्या दृष्टीने अधिकृत आहे की अनाधिकृत?

कृपया सदर बांधकामाबाबत सभागृहात चर्चा होऊन माहिती मिळावी ही विनंती.

उत्तर:— सदरचे तीन दुकान रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत झालेल्या मिळकत धारकास पर्यायी जागा दिले आहे किंवा कसे? याबाबत नगररचनाकार विभागातून अभिप्राय मागविण्यात आला आहे. अदयाप अभिप्राय मागविण्यात आला आहे. अदयाप अभिप्राय प्राप्त होणेचे आहेत. प्राप्त झालेवर पुढील कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—उत्तर ठिक आहे.

मा. सचिव:—पुढील प्रश्न श्री. प्रमोद टाले यांचा आहे. ते यावेळी सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद घेण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३२९:—सन २००३—२००४ मध्ये खालील बांधकामे कधी तुटली होती का?
सदर बांधकामे महानगरपालिकेतर्फे कधी तोडली होती?

आज तारखेला परत बांधकामे झालेली आहेत असे दिसून येते. महानगरपालिकेने त्यावर आज तारखेला काय कारवाई केली आहे का?

१. बॅरेक नं. १८९६, कन्हैयालाल तबेलावाला, उल्हासनगर—५.
२. प्रेम टेकडी, येथिल गुप्ता बांधकाम.

उत्तर:— होय.

१. बॅरेक नं. १८९६, कन्हैयालाल तबेलेवाला, उल्हासनगर—५ हे बांधकाम दिनांक २९.५.२००४ रोजी तोडले होते.
२. प्रेम टेकडी येथिल गुप्ता यांचे बांधकाम दिनांक २९.१०.२००३.
   अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत अधिनियमातील तरतूदीनुसार कायदेशीर कारवाई सुरु आहे.

मा. सचिव:—पुढील प्रश्न श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. ३३०:— श्री. राधामल खराजमल यांच्या मालमत्ता देयकात खाता नं. २५/५८ वार्ड नं. ३२, सिटी सर्व्हे नं. १९०/१, जागा ९३७ चौ. यार्ड राहणार बॅरेक नं. ८८७/१ सेक्शन १८, उल्हासनगर—३ येथिल त्याच्या मालकीच्या मिळकतीचे मालमत्ता कर देयकात झालेल्या घोटयाळयाबाबत विचारलेल्या खालील

प्रश्नांची योग्य सूचक व समाधानकारक उत्तरे संबंधीतांनी देवून त्याबाबत योग्य खुलासा करण्यात यावा ही विनंती.

प्रश्न क्र. १) सदर मिळकतीचे नावात बदल झाले आहे काय? नावात बदल करतांना आवश्यक कागदपत्र खरेदी खत INDEX II इत्यादी कागदपत्रांची योग्य पडताळणी केली आहे काय?
का कागदपत्र न पाहता पडताळणी न करता नावात बदल केला आहे?

उत्तर:— कार्यालयीन दप्तरी मिळकत क्रमांक ३२/५८५ ही श्री. राधेमल खेरोजमल राहणार बॅ.क्र. ८९७, रुम नं. १, उल्हासनगर—३ यांचे नाव असून मिळकतीच्या नावात बदल झालेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—याचे उत्तर आपण दिले आहे काय? अनधिकृत बांधकाम नाही. एकाचे बांधकाम दुस—याच्या नावावर करण्यात आले आहे. खाता नं. ३२, ५८५ आहे, बैरेक नं. ८९७ रूम नं. १ उल्हासनगर—३.

मा. प्रभारी आयुक्त:—मा. महापौर महोदया, ज्यावेळी प्रश्न विचारला त्यावेळी आमच्याकडील कर निर्धारण यादी बघितली. त्या यादीप्रमाणे ही मालमत्ता राधोमल खेरोमल, बॅरेक नं. ८९७ च्या मागे, रूम नं. १. तसेच त्याचा जुना खाता क्र. ५८३/ ५८२ व नंबर आहे ३२/५८५. सुरवातीपासुन याच नावाने या मालमत्तेचे कर निर्धारण झालेले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—याच्याच नावाने आहे. या मालमत्तेला लागुन दुसरी पावती काढली आहे. त्या माणसाने आतापर्यंत ५० तक्रारी केल्या आहेत. त्याची सुनावणीच घेतलेली नाही. त्याची मालमत्ता दुस—याच्या नावाने दाखविली आहे. अशा प्रकारे विभागात हेराफेरी केली जाते.

मा. प्रभारी आयुक्त:— म्हणजे एका माणसाची मालमत्ता दुस—याच्या नावाने दाखविली आहे. मा. महापौर महोदया, हा प्रश्न तेव्हा येईल जेव्हा एखादया मालमत्तेचे निर्धारण एक्सच्या नावाने झाले असेल व नंतर वाय येऊन त्यावर स्वत:चे नाव लावत असेल तर हा प्रश्न येईल. परंतु या मालमत्तेचे निर्धारण जेव्हा पहिल्यांदा झाले तेव्हाच ते एक्सच्या नावाने झालेले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—त्याच्या नावाने बिल येत आहे.परंतु दुस—याच्या नावाने देखिल ही मालमत्ता दाखविली आहे.

मा. प्रभारी आयुक्त:—एका मालमत्तेचे दोन वेळा निर्धारण झाले आहे. तसेच एक मालमत्ता दोन लोकांच्या नावाने नोंदविली आहे असे प्रकार देखिल येथे झाले आहेत.

यावेळी मा. सदस्य श्री नथु सोनवणे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—आम्ही आपणांस त्याची कागदपत्रे दाखवतो.

मा. प्रभारी आयुक्त:—परंतु आता जी व्यक्ती स्वत:च्या नावाने मालमत्ता असल्याचा दावा करीत आहे. त्यालाही सर्व कायदेशिर कागदपत्रे आमच्या समोर सादर करावी लागतील. त्यानंतरच आम्ही त्याचे काम करू शकतो अन्यथा करू शकत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—मी आपणासं कागदपत्रे दाखवतो.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३३१ श्री. नथु सोनवणे यांचा आहे. यावेळी ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद करण्यांत येत आहे.

प्रश्न क्र. ३३१:— उपरोक्त विषयानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सार्वजनिक शौचालये ''पैसे द्या व वापरा '' या तत्वावर शांतीसेवा संस्थेस चालविण्यास दिले आहे. त्यानुसार या संस्थेने गजानन मार्केट,

उल्हासनगर येथिल सार्वजनिक शौचालय बांधले असुन त्याच्या जवळील ३ ग ३० ची जागा खाजगी व्यक्तीला विकून तेथे चार दूकाने बांधली हे खरे आहे का? असेच प्रकार अन्य शौचालयाचे जागेत करण्यात आले आहेत काय? अश्या प्रकारे शौचालयाची जागा विकण्याची व बांधकाम करणेची परवानगी महानगरपालिकेने दिली आहे काय? सदरची बांधकामे महापालिकेच्या दृष्टीने अधिकृत आहेत का अनाधिकृत? अश्या बेकायदेशिर कामे करणा—या संस्थेचा ठेका रद्द करणार का? त्यांचेवर काय कारवाई करणार याची योग्य सूचक समाधानकारक उत्तरे मिळावी ही विनंती.

<u>उत्तर:—</u>खाजगी व्यक्तीला सदरची जागा विकलेली नाही. नविन बांधकामासाठी जूने शौचालय तोडतेवेळी शौचालय लगत असलेली दोन दुकान मिळकतीचे नुकसान झालेमुळे मिळकत धारकांनी सिमेंट पत्रे काढुन त्याऐवजी उंची वाढवून स्लॅब टाकला आहे.

निदर्शनास आले नाही.

अशी परवानगी महानगरपालिकेने दिलेली नाही. ठेका रद्द करण्याची कारवाई करणेची बाब सार्वजनिक बांधकाम विभागाचे अखत्यारीत आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. ३३२ श्री. शांताराम निकम यांचा आहे. यावेळी ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद करण्यांत येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३३२:—</u> प्रभाग क्र. ११ मधील गायकवाड पाडा येथिल
अ) १. राजेश जोशी भगवान वाटालेंच्या घरासमोरचे शेड
२. जोशींच्या मागे गोरपा गावचा बुवा याने बनविलेले शेड.
३. साई मेडिकल वाले यांनी बनविलेले शेड.
४. बसंत शेठ यांनी बनविलेले ट्रान्सफार्मच्या बाजूचे शेड.
हे राजरोक्षपणे सुरु असलेल्या मोठया रोडच्या बांधकामास महापालिकेने मंजूरी दिली आहे काय?

ब) नसल्यास साबर काय कारवाई केली आहे?
क) सदर बांधकामे कुणाच्या वरदहस्तावर सुरु आहेत?
ड) नसल्यास केव्हा निष्कासित करणार?

<u>उत्तर:—</u>१. नोटिस दिली आहे.
२. पत्ता अपुरा असलेने शोध घेणे सुरु आहे.
३. नोटिस दिली आहे.
४. पत्ता अपुरा असल्याने शोध घेणे सुरु आहे.
ब) कारवाई सुरु आहे.
क) नाही.
ड) कायदेशीर कारवाई पूर्ण करुन तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. ३३३ हा श्रीमती प्रेमा खांडेकर यांचा आहे. यावेळी त्या सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद करण्यांत येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३३३:—</u> उल्हासनगर शहरातील खालील ठिकाणी बांधकामे सुरु असून सदर बांधकामांना महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय?
बांधकामे मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहेत काय?
त्यात वाढीव बांधकाम केले आहे काय?
असल्यास अदयापपर्यंत कोणती कारवाई केली?
नसल्यास अदयापपर्यंत कारवाई का केली नाही?
कारवाई कधी पर्यंत करणार?

कृपया सदर प्रश्नांची सुचक समाधानकार उत्तरे येत्या महासभेत मिळावीत ही विनंती.

कुर्लाकॅम्प कालीमाता चौकाजवळ, उल्हासनगर–४ (संतोष कडलक यांच्या घरासमोर) खाजगी ३ माळयाची इमारत.

डॉ. नंदा लाड यांचे दवाखान्यासमोर धोबीघाट, उल्हासनगर–१.

शॉप नं. ४४ जपानी बाजार, उल्हासनगर–२.

बॅरेक नं. ४५३ रुम नं. ६/७ चेलाराम मार्केअ उल्हासनगर–२.

जयशंकर पिठाची चक्की शेजारी, सेक्शन २६३, उल्हासनगर–४.

उत्तर:–१) होय, या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बाप/२०२/०२/२०६, दिनांक २९/५/२००३ अन्वये बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आली.

सदर इमारतीचे बांधकाम आजच्या तारखेपर्यंत मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे. त्यात आजपर्यंत वाढीव बांधकाम केलेले नाही. वाढीव बांधकाम केलेले नसलयामुळे कारवाई केलेली नाही.

वरीलप्रमाणे.

२) सदर बांधकामास या कार्यालयातर्फे बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

कागदपत्र सादर करण्याची नोटिस मिळकतधारकास बजावली असता त्याजागी त्याने जूने एसी ि शिटचे बांधकाम मोडकळीस आल्याने ते बांधकाम केले आहे.

३) सदर बांधकामास या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बाप/३७/२००१/१२३५, दिनांक २५/७/२००१ अन्वये बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आली.

सदर इमारतीचे बांधकाम आजच्या तारखेपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे.

नाही.

वाढीव बांधकाम केलेले नसल्यामुळे कार्यवाही केलेली नाही.

वरीलप्रमाणे.

वरीलप्रमाणे.

४) सदर इमारतीस या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बाप/१२८/०३/१०१७ अन्वये, बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आली.

आजच्या तारखेपर्यंत सदर इमारतीचे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे चालु आहे.

नाही.

वाढीव बांधकाम केलेले नसल्यामुळे कार्यवाही करण्यात आली नाही.

वरीलप्रमाणे.

वरीलप्रमाणे.

५) सदर बांधकामास या कार्यालयातर्फे परवानगी देण्यात आलेली नाही.

वरीलप्रमाणे.

या विभागाकडुन दिनांक १६/८/२००४ नोटिस देण्यात आली.

वरीलप्रमाणे.

वरीलप्रमाणे.

मा. सचिव:–प्रश्न क्र. ३३४ हा श्रीमती नंदीनी बामणकर यांचा आहे.

प्रश्न क्र. ३३४:– उल्हासनगर कॅम्प २ व ३ मध्ये अनेक बहूमजली इमारतीची बांधकामे चालू आहेत, सदर इमारतीचे परवानगी व मंजूर नकाशाबाबत शंका निर्माण झाली आहे? गोरगरीब वस्त्यातील निवा–या करीता बांधण्यात आलेल्या बांधकामावर (घरांच्या) महापालिका अतिक्रमण विभागातील अधिकारी त्वरीत कारवाई करुन बांधकामे थांबवितात किंवा निष्कासित करीत आहे व दुसरीकडे धनाढय, श्रीमंत बांधकाम व्यवसायिकांचे बहूमजली व वाढीव बांधकामास संरक्षण देत असल्याचे निदर्शनास येत आहे, तरी अश्याप्रकारचे दुटप्पी वर्तन अतिक्रमण विभागाकडून मिळत असल्याने खालील प्रश्नांची सूचक समाधानकारक उत्तरे येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

१) आस्था हॉस्पीटलच्या बाजूला, उल्हासनगर–३ युएमसी/टीपीडी/डी.पी.नं. २१९/०२/२४६, दिनांक २६/५/२००३.

२) संत रोहिदास चौकाचे पूढे, रमेश मुकणे यांच्या घरासमोर, उल्हासनगर–३ /युएमसी/टीपीडी/डी.पी.नं. ११९/०३/९८३, दिनांक ९/१२/२००३.

३) साई आशिष हॉस्पीटलजवळ, सपना गार्डन समोर, उल्हासनगर–३/यूएमसी/टीपीडी/डी.पी. नं.

प्रश्न क्र. १) १. सदर बांधकामात चटई क्षेत्र किती मंजूर केले होते?
२. बांधकाम मंजूर नकाशा प्रमाणे झाले आहे का?
३. त्यात वाढीव बांधकाम आहे काय?
४. नगररचना विभागाकडून पायाभरणी व पूर्णत्वाचा दाखला घेतला आहे काय?

प्रश्न क्र. २) १. नगररचना विभागाकडून पायाभरणी व ३ सलग दाखला दिला आहे.
२. सदर बांधकामाचा नकाशा मंजूर करण्यात आला आहे काय?
बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे काय? त्यात वाढीव बांधकाम आहे काय?

उत्तर:–उल्हासनगर शहरासाठी मंजुर बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार व प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार चटई क्षेत्र निर्देशांक १ अनुज्ञेय आहे. सदर बांधकामात ०.८२ चटई क्षेत्र निर्देशांक मंजुर केलेला आहे.

आजपर्यंत मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे.

नाही.

नगररचना विभागाकडुन या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा / नरवि/बांप/२१९/०२/८०९, दिनांक २२.८.२००३ रोजीच्या पत्रान्वये पायाचा दाखला मंजुर करण्यात आला आहे. व बांधकाम पुर्णतेचा दाखला देण्यात आलेला नाही.

नगररचना विभागाकडुन पायाचा दाखला दिलेला आहे व ३ सलग दाखले दिलेले नाही.

या कार्यालयाचे बांधकाम प्रारुप प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/२१९/०२/२४६, दिनांक २५.५.२००३ च्या पत्रान्वये मंजुर करण्यात आला.

आजपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे.

नाही.

२) उल्हासनगर शहरासाठी मंजुर बांधकाम नियंत्रण नियमालवलीनुसार व प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार चटईक्षेत्र निर्देशांक॰ अनुज्ञेय आहे. सदर बांधकामात ०.९९ चटई क्षेत्र निर्देशांक मंजुर केलेला आहे.

आजपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे.

नाही.

नगररचना विभागाकडुन या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/११९/०३/११७०, दिनांक २.४.२००४ रोजीच्या पत्रान्वये पयाचा दाखला देण्यात आलेला आहे. बांधकाम पुर्णतेच्या दाखला देण्यात आलेला नाही.

नगररचना विभागाकडुन पायाचा दाखला दिलेला आहे व ३ सलग दाखले दिलेले नाही.

नगररचना विभागाकडुन या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/११९/०३/९८३, दिनांक ९.१२.२००३ च्या पत्रान्वये नकाशा मंजुर करण्यात आला.

आजपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे.

नाही.

३) उल्हासनगर शहरासाठी मंजुर बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार व प्रारुप बांधकाम नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार चटईक्षेत्र निर्देशांक १ अनुज्ञेय आहे. सदर बांधकामात ०.११ चटई क्षेत्र निर्देशांक मंजुर केलेला आहे.

आजपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे.

नाही.

पायाचा दाखला देण्यात आलेला नाही. सदर इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असल्यामुळे बांधकाम पुर्णतेचा दाखला देण्यात आलेला नाही.

नगररचना विभागाकडुन पायाभरणीचा दाखला व ३ सलग दाखले देण्यात आलेली नाही.

या कार्यालयाचे बांधकाम प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/६७/०३/७४४, दिनांक ४.६.२००३ अन्वये नकाशा मंजुर करण्यात आलेला आहे.

दिनांक ४.६.२००३ अन्वये नकाशा मंजुर करण्यात आलेला आहे.

आजपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे. फक्त बाल्कनजी बारी बंदीस्त केली आहे.

नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती नंदीनी बामणकर:—</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. ३३५ श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>**प्रश्न क्र. ३३५:—**</u> उल्हासनगर शहरातील रस्ते एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत ३३ रस्त्याचे रुंदीकरण व नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते, सदर रस्त्यांपैकी एक म्हणजे खेमानी ते बजरंग आईस फॅक्टरी हा रस्ता ७५ टक्के पूर्ण झाला असून २५ टक्के रस्ता रुंदीकरण बाकी आहे, त्यामुळे रस्ता विकसीत होऊ शकला नाही? याचे कारण काय?

रस्त्याची सद्यस्थिती काय?
सदर रस्त्याचे काम किती दिवसात पूर्ण करणार?
का अपूपर्णच काम ठेवणार?
कृपया सदर प्रश्नांची सूचक, सविस्तर माहिती येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर:—</u>या ठिकाणी रस्त्याचे काम ७ टक्के इतके आहे. या रस्त्यामध्ये एकंदर लांबी २५५ मिटर आहे. दुतर्फी लांबी ५०० मीटर आहे. त्यापैकी २४४ मीटर लांबीमध्ये अनधिकृत बांधकाम निष्कासीत झालेली आहे. एकतर्फी दुतर्फी लांबी पैकी ४८५ लांबीमध्ये निष्कासीत झालेली असल्याने व उर्वरीत रुंदीमधील ५१ टक्के लांबीमधील बांधकामाचे निष्कासीत झाली नाहीत. त्यामुळे एक सलग रस्ता बांधकामास उपलब्ध होत नसल्याने रस्त्याचे बांधकाम अपुर्ण अवस्थेत आहे.
रस्त्याचे काम बंद आहे.
काम चालू झाल्यावर ४ महिने लागतील.
नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. ३३६ श्री. दिलीप गायकवाड यांचा आहे. यावेळी ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद करण्यांत येत आहे.

<u>**प्रश्न क्र. ३३६:—**</u> दुनिचंद कालानी शाळा, रविंद्रनगर, उल्हासनगर—५ या शाळेविषयी खालील प्रश्नांची माहिती मिळावी.
अ) सदर इमारत महापालिकेची किंवा तत्कालीन नगरपालिकेची असून त्यावर किती खर्च झाला?
ब) सदर संस्थेला देणारा करार कोणत्या साली करण्यांत आला? करारानुसार किती भाडे आकारण्यात आले? व करार किती वर्षासाठी करण्यात आला?
क) ठरलेल्या करारानुसार संस्थेने भाडे भरले आहे काय? नसल्यास करार रद्द करण्याची कारवाई का केली नाही?
ड) करार संपृष्टात आल्यानंतर नविन करार कोणत्या साली करण्यात आला व त्याचे कायदेशीर भाडे किती ठरविण्यात आले? त्यापैकी आतापर्यंत संस्थेकडून वसूली किती झाली? व येणे बाकी किती आहे? इतर टॅक्स वगेरे येणे बाकी आहे का?
वरील प्रश्नाची सूचक समाधानकारक अचूक उत्तरे येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर:—</u>२७००,०००/— (२७. ०० लक्ष) खर्च झाला आहे.
सदर संस्थेला इमारत भाडेने देणे बाबतचा करार महासभा ठराव क्र. ५६९ दि. १२.१२.९० नुसार ३ वर्षाकरिता करण्यात आला होता. तद्नंतर महासभा ठराव क्र. २९, दि. २०.१२.०२ नुसार भाडेप्ट्टयाची मुदत ३० वर्ष पर्यंत राहील. तसेच भाडे आकारणी दि. १३.१.१९९१ पासुन सुरू होत असल्याचे मानले जाईल असे नमुद केले आहे.
अदयापपर्यंत भाडे निश्चिती करण्यात आली नसल्याने सदर संस्थेने भरणा केलेली रक्कम रू. २,४०,०००/— अनामत रक्कम या स्वरूपात स्विकारण्यात आलेली आहे.

करार संपुष्टात आलेनंतर महासभा ठराव क्र. २९ दि. २०.१२.०२ नुसार ठरावात नमुद केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहुन ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच ठरावामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीतील अट क्र. २ मध्ये सुचित केल्यानुसार सदर जमिनीचे वार्षिक भाडे शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे किंवा सहाय्यक नगररचना ठाणे यांचेकडुन निश्चित करून घेणे ही जबाबदारी कार्यकारी अभियंता उ.म.पा (सा.बा.वि) नगररचना उ.म.पा. व मालमत्ता व्यवस्थापक, उमपा यांची संयुक्तपणे राहील. असे नमुद केले आहे. त्यानुसार भाडे कर वसुलीबाबत सन २००३–२००४ पर्यंतचा सर्व कर भरणा केलेला आहे.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३३७ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३३७:–</u> उल्हासनगर शहरात मागील वर्षी मालमत्ताकर व पाणीपट्टीकर महापालिकेद्वारा जबरदस्तीने वसूल करण्यात आला. परंतू धनदांडग्यांना करमाफ किंवा सवलत देण्याचे प्रकार होत असून कालानी महल, इगल हॉटेल व दुनिचंद कालानी कॉलेज व दुनिचंद कालानी शाळा यांची थकित मालमत्ता कर व इतर देणी बाकी आहेत?

त्याची सविस्तर माहिती दयावी व वसूलीसाठी आपण काय प्रयत्न केले त्याची माहिती येत्या महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर:–१.</u> कालानी महल–थकबाकी नाही. सन २००३–२००४ पर्यंत कर भरणा केलेला आहे.
२.इगल हॉटेल– थकबाकी नाही. सन २००३–२००४ पर्यंत कर भरणा केलेला आहे.
३. दुनिचंद कालानी कॉलेज:–थकबाकी नाही. सन २००३–२००४ पर्यंत कर भरणा केलेला आहे.
४. दुनिचंद कलानी शाळा–थकबाकी नाही. सन २००३–२००४ पर्यंत कर भरणा केलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:–</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३३८ श्री. प्रमोद टाले यांचा आहे. यावेळी ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद करण्यांत येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३३८:–</u> सन २००२–२००३ व २००३–२००४ मध्ये आपल्या महानगरपालिकेच्या आस्थापनेमध्ये किती माणसे रुजू झाले?

त्याचे पद व वर्गवारी यांची विस्तृत माहिती दयावी.
सदर सर्व व्यक्तीची पदवार नियुक्ती तारखेवार देण्याची विनंती आहे.

<u>उत्तर:–</u>सन २००२–२००३ या वर्षात गट 'क' मध्ये एकूण –४ कर्मचारी व गट 'ड' मध्ये एकूण १०२ कर्मचा–यांना नियुक्त्या देण्यात आल्या.

१) लिपिक –०४
२) विदयुत मदतनीस–०५
३) शिपाई –०७
४) मजूर –१३
५) सुरक्षा रक्षक –१०
६) सफाई कामागर–६८

या पदनामात नियुक्त्या देण्यात आल्या.

सन २००३–२००४ या वर्षात गट 'क' मध्ये एकूण –६४ कर्मचारी व गट 'ड' मध्ये २१३ कर्मचा–यांना नियुक्त्या देण्यात आल्या.
१) प्रोगरॅमर –०१
२) कनिष्ठ अभियंता (वि)–०३

३) लघुलेखक (निम्न) —०१
४) कनिष्ठ अभियंता (सां.बां.) —०३
५) वरीष्ठ लिपिक—०३
६) आरोग्य निरिक्षक —०५
७) दुरध्वनी चालक—०१
८) संगणक चालक—०४
९) लिपिक—२७
१०) विदयुत मदतनीस —२१
११) सुरक्षा रक्षक—१०
१२) तारतंत्री—१०
१३) विजतंत्री —०१
१४) बाजार निरिक्षक—०१
१५) फायरमॅन—०४
१६) रोखपाल—०१
१७) समुह संघटक—०२
१८) प्रकल्प संचलक—०१
१९) शिपाई—०१
२०) सफाई कामगार—१७५

या पदनामात नियुक्त्या देण्यात आल्या.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३३९ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. ३३९:— दुनिचंद कालानी कॉलेज, उल्हासनगर—१ या कॉलेजचे संदर्भात खालील प्रश्नाची माहिती मिळावी.

अ) सदर कॉलेजची इमारत महानगरपालिकेची किंवा तत्कालीन नगरपालिकेची असून बांधकामास किती खर्च झाला?

ब) सदर संस्थेला देणारा करार कोणत्या साली करण्यात आला? करारानुसार किती भाडे आकारण्यात आले? व करार किती वर्षासाठी करण्यात आला?

क) ठरलेल्या करारानुसार संस्थेने भाडे भरले काय? नसल्यास करार रद्द करण्याची कारवाई का केली नाही?

ड) करार संपृष्टात आल्यानंतर नविन करार कोणत्या साली करण्यात आला? व त्याचे कायदेशीर भाडे किती ठरविण्यात आले? त्यापैकी आतापर्यंत संस्थेकडून वसूली किती झाली? व येणेबाकी किती आहे? इतर टॅक्स वगैरे येणे बाकी आहे का? ई) सदर इमारत महापालिकेची असल्याने सर्वसामान्यांना त्याचा उपयोग होण्याच्या दृष्टीने सदर संस्थेने फी आकारणी व देणगी निश्चित करतांना महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदर संस्था प्रत्येक विदयार्थ्याला किती फी आकारते तसेच प्रत्येक विदयार्थ्याकिडुन किती देणगी रक्कम घेतात? त्याची माहिती महापालिकेकडे आहे का? असल्यास दयावी.

वरील प्रश्नाची सुचक, समाधानकारक उत्तरे महासभेत मिळावी ही विनंती.

उत्तर:—सदर इमारत बांधकामास १५.५० लाख खर्च झाला आहे.

अतिरिक्त व वरील मजल्यासाठी ३५.०० लाख खर्च आला आहे.

एकुण मिळून ५०.५० लाख खर्च झाला आहे.

सदर संस्थेला तत्कालीन नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. ५८८ दिनांक ७/३/१९९१ नुसार कायमस्वरुपी देण्यात आलेली आहे.

महासभा ठराव क्र. ५८८, दिनांक ७/३/१९९१ नुसार भाडे आकारणी व करारनाम्या बाबत ठरावात काहीही नमुद केले नाही.

कायमस्वरुपी दिलेली असल्याने फेरफार केलेला नाही. भाडे बाबत वरील 'क' प्रमाणे सदर संस्थेने मालमत्ता कराची सर्व रक्कम भरणा केली आहे. नोटिस फी रुपये ३६/— बाकी आहे.

नाही

माहिती उपलब्ध नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—उत्तर ठिक आहे.

यावेळी मा. सदस्य श्री दिलीप गायकवाड यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३४० हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. ३४०:— उल्हासनगर–१ येथे उमपा/नरवि/२०००/७२८, दिनांक ८.१२.२००१ अन्वये इमारतीचे बांधकामासंबधी विचारलेल्या खालील प्रश्नाची उत्तरे व माहिती मिळावी.

१) सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे का?
त्यात वाढीव बांधकाम करण्यात आले आहे का? असल्यास किती?
वाढीव बांधकाम असल्यास अदयापपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली?
नसल्यास अदयापपर्यंत कारवाई का केली नाही?
कारवाई कधीपर्यंत करण्यात येईल?
वरील आपल्या माहितीसाठी सादर.

उत्तर:—नाही.

सदर इमारतीमध्ये पहिला ते चौथ्या मजला मिळून १२५.८४ चौ.मी. चे अनधिकृत बांधकाम केलेले आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार नोटिस देण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे.

वरीलप्रमाणे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—मा. महापौर व आयुक्त साहेब यामध्ये १२५.८४ चौ. मी. वाढीव बांधकाम आहे. प्रश्न ६/९/०४ ला विचारला आहे. आज सहा महिने झाले आहेत फक्त नोटीस बजावली आहे. तुम्ही येथे सांगता की प्रशासन सर्व कारवाई करते आहे. तर आता कसे काय करणार हे सांगावे. लोकप्रतिनिधी आपल्या लक्षात आणुन देत आहेत.

मा. प्रभारी आयुक्त:—मा. महापौर महोदया, हे जे बांधकाम आहे याला परवानगी दिली होती परंतु मंजुर नकाशाप्रमाणे त्यांनी बांधकाम केलेले नाही. त्यामध्ये १२५.८४ चौ.मी. चे वाढीव बांधकाम करण्यात आले आहे व ते निष्कासित करण्यासाठी त्याला नोटीस देण्यात आली आहे. त्याची सुनावणी घेतल्यानंतर निष्कासित करण्याचा आदेश देण्यात येईल. त्याने स्वत:हुन निष्कासित न केल्यास महापालिकेतर्फे निष्कासनाची कारवाई करण्यात येईल. तसेच हा जो विकासक आहे त्याच्या विरूध्द कलम ५२ प्रमाणे गुन्हा देखिल दाखल करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—कधी पर्यंत कारवाई होईल?

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३४१ हा श्री. दिलीप गायकवाड यांचा आहे.

प्रश्न क्र. ३४१:— उल्हासनगर–१ येथिल सेंच्युरी रेयॉन कंपनीचे कर्मचारी प्रवेश द्वारासमोर, शहाडगावठाण येथे त्रिमृर्ती अपार्टमेंट या बहूमजली इमारतीचे काम सुरु असून सदर ठिकाणी बांधकाम परवानगी दिल्याचा सूचना फलक लावण्यात आला आहे. त्या अनुषंगाने खालील प्रश्नाची उत्तरे व माहिती मिळावी ही विनंती.
सदर इमारतीस महानगरपालिकेने बांधकाम परवानगी दिली आहे का?
कोणत्या आदेशान्वये दिली आहे?
सदर इमारतीस पाया भरणी दाखला दिला आहे काय?
सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे काय?
त्यात वाढीव बांधकाम करण्यात आले आहे काय? असल्यास किती?

सदरचे वाढीव बांधकाम महापालिकेचे दृष्टीने अधिकृत आहे की अनधिकृत आहे?
अनधिकृत असल्यास आजतागायत कोणती कारवाई केली?

नसल्यास कारवाई न करण्याची कारणे कोणती?
कारवाई कधीपर्यंत अपेक्षीत आहे?
वरील माहितीसाठी सादर

उत्तरः—होय.

या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१४७/२०००/९९८, दिनांक ८. १२.२०००

नाही.

सदर भुखंडावर ५८०.४ चौ.मी. क्षेत्राची बांधकाम परवानगी देण्यात आलेली असुन आतापर्यंत ११४. ८३ चौ.मी. चे बांधकाम प्रगतीपथावर आहे व ते सध्या मंजुर नकाशाप्रमाणे चालु आहे.

वरीलप्रमाणे.

वरीलप्रमाणे.

सदयस्थितीत सदर इमारतीचे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे चालु असल्याने कारवाई केलेली नाही.

वरीलप्रमाणे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—वरील प्रमाणे प्रश्न वाचुन दाखविला. सदर ठिकाणची जागा ही गावकीची असल्याचे मी आपल्या निदर्शनास आणुन दिले आहे आणि त्यावेळी तुम्ही बोललात की मी याच्याविरूध्द नक्कीच कारवाई करणार आहे. आणि दुस—या बिल्डरला विकास करण्यासाठी ती जागा दिलेली आहे. शहाड गावठाण पंचायतीची जागा, सार्वजनिक जागा आहेत. सदर इमारतीस पाया भरणी दाखला सुध्दा दिलेला नाही. तुम्ही येथे उत्तर दिले आहे की दाखला दिलेला नाही. दाखला दिलेला नसताना देखिल सदर ठिकाणी ३—४ स्लॅबचे काम झालेले आहे. सदर इमारतीचे बांधकाम मंजुर नकाशा प्रमाणे सुरू आहे काय? हा एक प्रश्न मी याठिकाणी विचारला आहे. त्यावर मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम सुरू आहे असे उत्तर दिले आहे. परंतु पायाचा दाखला घेतलेला नाही. त्यात वाढीव बांधकाम करण्यात आले आहे काय असल्यास किती? यावर वरीलप्रमाणे उत्तर दिले आहे. याचे याठिकाणी उत्तर देण्यात यावे.

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, जो प्रश्न विचारला होता त्यावर स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे की त्याला बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आले आहे. आजमितीस त्या ठिकाणी जे बांधकाम सुरू आहे. ते बांधकाम परवानगी प्रमाणेच सुरू आहे. त्यांना जी बांधकाम परवानगी दिली आहे त्यापैकी फक्त ११४ चौ. मी. चे बांधकाम त्यांनी आतापर्यंत केले आहे. बांधकाम परवानगी त्यांना सन २००० मध्ये देण्यात आली आहे. व बांधकाम परवानगी प्रमाणे काम सुरू आहे. तर आता उत्तर कशाचे दयायचे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—पायाचा दाखला दिलेला नाही.

मा. प्रभारी आयुक्तः—याचे स्पष्ट उत्तर दिले आहे की पायाचा दाखला दिलेला नाही. जे बांधकाम केले आहे ते मंजुर नकाशाप्रमाणे नसेल तर पुर्णत्वाचा दाखल देते वेळी ते थांबविले जाऊ शकते. आपणांस सर्व माहिती आहे तरी आपण विचारता.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—आयुक्त साहेब, श्री. दिलीप गायकवाड यांचा प्रश्न असा आहे की, पुर्णत्वाचा दाखला न घेता त्या ठिकाणी वाढीव बांधकाम केले आहे यावर आपण काय कारवाई करणार आहात.

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, जोपर्यंत पुर्णत्वाचा दाखला दिला जात नाही तोपर्यंत किती वाढीव बांधकाम झाले आहे व त्यावर काय कारवाई करायची हे सांगणे शक्य नाही. मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर पुर्णत्वाच्या दाखल्यासाठी त्यांना अर्ज करावा लागेल. पुर्णत्वाच्या आधीच त्यांनी वापर सुरू केला तर आम्ही त्यांच्या विरूध्द बी.पी.एम.सी. ॲक्टच्या तरतुदीनुसार कारवाई करू शकतो. परंतु पुर्णत्वाचा दाखला देते वेळी त्यामध्ये काही वाढीव बांधकाम असेल तर ते काढण्यासाठी त्यांना आदेश देण्यात येईल.

त्यानंतरच पुर्णत्वाचा दाखला देण्यात येईल तोपर्यंत  देण्यात येणार नाही. तसेच वापर परवानाही देण्यात येणार नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—वाढीव बांधकाम केले आहे तर आता त्याच्यावर कारवाई होईल का?

मा. प्रभारी आयुक्त:—ज्यावेळी उत्तर दिले त्यावेळे पर्यंत तेथे वाढीव बांधकाम झालेले नव्हते. वाढीव बांधकाम होईल का? माझ्या मताप्रमाणे अशा प्रश्नांचे उत्तर देता येणार नाही. आपणही गृहीतकांवर आधारीत प्रश्न कसे काय विचारता. असे प्रश्न विचारता येवु शकत नाहीत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— मा. आयुक्त साहेब, त्या ठिकाणी जे वाढीव बांधकाम झालेले आहे, त्यावर महापालिका कार्यवाही करणार की नाही?  फक्त एवढेच विचालेले आहे.

मा. प्रभारी आयुक्त :— त्या ठिकाणी आतापर्यंत वाढीव बांधकाम झालेलेच नाही.  असे प्रशासनाचे मत आहे. परवानगी देण्यात आलेली आहे व आतापर्यंत परवानगी प्रमाणे काम झाले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— त्याने जास्तीचे बांधकाम केले आहे.  त्यामुळे पायाचा दाखलाही घेतलेला नाही.

मा. प्रभारी आयुक्त :— पायाचा दाखला घेतला नाही याचा अर्थ वाढीव बांधकाम केले आहे असा होत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— याचा अर्थ पायाचा दाखला घेतल्याशिवाय बांधकाम पुर्ण करता येवू शकते.

मा. प्रभारी आयुक्त :—ती अनिर्वाय अट होती.  त्या कारणावरुन आपण कार्यवाही करु शकतो.  परंतु पायाचा दाखला घेतला नाही याचा अर्थ असा नाही की त्यांनी वाढीव बांधकाम केले आहे.  त्यांनी बांधकाम परवानगीचा भंग केला आहे, असा त्याचा अर्थ होत नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. आयुक्त साहेब, याची तपासणी कोण करणार?  बांधकाम वाढीव केले आहे किंवा पायाचा दाखला घेतला नाही म्हणजे त्याने वाढीव बांधकाम केलेले नाही याची तपासणी कोण करणार?  फक्त बांधकाम उभे आहे म्हणुन त्याने पायाचा दाखला घ्यायचा नाही आणि पुर्णत्वाचा दाखलाही घ्यायचा नाही.  आता तुम्ही म्हणाले की ही जबाबदारी आमची आहे तर  ही जबाबदारी तुमची नाही का? आमची जबाबदारी ठिक आहे परंतु तुमची जबाबदारी काय आहे?

मा. प्रभारी आयुक्त:— मा. महापौर महोदया,  येथे जे प्रश्न विचारले जात आहेत ते असे झाले तर काय होईल?  अश्या स्वरुपाचे आहेत.  ते प्रत्यक्षात झाले आहे अथवा नाही हे तो जेव्हा पुर्णत्वाच्या दाखल्यासाठी अर्ज करेल तेव्हा कळेल.  जर आपणांस आता असे वाटत असेल की त्या ठिकाणी वाढीव बांधकाम झाले आहे तर आमचे पथक, नगररचनाकार त्या ठिकाणी वाढीव बांधकाम झाले आहे अथवा नाही याची पहाणी करतील.  परंतु या शहरात एवढी बांधकामे सुरु आहेत, जर आपण हा प्रश्न बघितला, महासभेत जेवढे प्रश्न विचारले आहेत ते अनधिकृत बांधकामांबद्दल आहेत तसेच परवानगी घेवून जी बांधकामे सुरु आहेत त्यांच्याबद्दल देखील आहेत.  बांधकाम पुर्ण झाले नाही तरी देखील त्यावर प्रश्न येतो.  मला हे कळत नाही की, याद्वारे आपण काय साधु इच्छिता. ज्या ठिकाणी बांधकाम परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणी पुर्णत्वाचा दाखला देण्याची तरी वाट बघा.  पुर्णत्वाचा दाखला चुकीचा दिला तर आपण प्रश्न विचारु शकता.  विकास आराखडयाप्रमाणे नसेल तरी देखील आपण प्रश्न विचारु शकता.  येथे जी माहिती दिली त्या दिवसाची परिस्थिती अशी आहे की, तेथे परवानगी पेक्षा कमी बांधकाम झाले होते.  आजची परिस्थिती मला ठाऊक नाही.  परंतु आजची परिस्थिती देखील माहित करुन घेवू.  आमचे नगररचनाकार व उपायुक्त त्या ठिकाणी जावून पाहणी करतील.  जर वाढीव बांधकाम असेल तर काम त्वरीत थांबविण्यात येईल.  असे नाही की, वाढीव बांधकाम नाही तर आम्ही काही करणार नाही.  परंतु जो विकास होतो, तो विकास होतेवेळी, बांधकामाच्या वेळी देखील काही बदल होवू शकतो.  विकास नियंत्रण नियमावलीनुसार काही फरक हे अनुज्ञेय आहेत.  ते सुधारीत परवानगीसाठी अर्ज करु शकतात.  मंजुर नियमावलीतील नियम १० बघितल्यास ती

तरतुद असल्याचे दिसून येईल. त्या तरतुदीनुसार बांधकामाच्या वेळी काही बदल करावे लागले तर ते सुधारीत अर्ज सादर करुन नियमित करता येवू शकतात.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. आयुक्त साहेब तुम्ही सांगितले की, येथे परवानगी घेतल्यानंतर सुध्दा तक्रारी करतात. तुमचे बरोबर आहे. तुमच्या एक निदर्शनास आणुन देतो. एम.आय.डी.सी. येथिल रस्त्याचे काम सुरु असतांना रस्ता रुंदीकरणात जागा गेली आहे, त्या ठिकाणी विना परवानगी २ माळयाचे आर.सी.सी स्लॅब टाकले गेले आहेत. तेथे काम चालु आहे. खालूनच त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु केले. तुमच्या श्री. लोणारे यांनी काही दिवसापूर्वी ते अतिक्रमण तोडले सुध्दा होते. त्यांना विचारा, पुर्ण इमारत पुर्ण व्हायच्या अगोदरच तो बिल्डर अनधिकृत बांधकाम करु लागला, तुम्ही परवानगी दिली असेल अथवा नसेल, आणि दिलेली जरी असेल तर त्या ठिकाणी त्याने अतिक्रमणाला खालूनच सुरुवात केली तर ४ थ्या, ५ व्या माळयापर्यंत जाईपर्यंत तुम्ही वाट बघणार का? नंतर ही इमारत तोडणार का? येथे अतिक्रमण करायला सुरुवातच खालून होते. आणि तुम्ही येथे सांगता की, आम्ही परवानगी दिल्यावर देखील आपण पत्र देतात. परंतु ज्या ठिकाणी खरोखर अतिक्रमण केलेले आहे त्या ठिकाणी तुमची कार्यवाही होत नाही. एक उपायुक्त तोडतात, दुसरे उपायुक्त आल्यानंतर त्या ठिकाणी पुन्हा परवानगी मिळते. तेच तोडलेले काम दोन दिवसापूर्वी पुन्हा चालु केलेले आहे. ते तुम्ही जावून बघून या. ही चुक कोणाची आहे? याला जबाबदार कोण आहेत? प्रशासनाचे अधिकारी आहेत की लोकप्रतिनिधी आहेत? तुम्ही आम्हांला जबाबदार धरता तशी तुमच्यावर पण जबाबदारी घ्या. जे काम एकदा तोडले ते पुन्हा कसे काय तयार होते? पुन्हा स्लॅब कसे टाकले जातात? ते पण त्याने नाल्यावर बांधकाम केलेले आहे. त्या बॅरेकच्या बाजुने एक नाला जातो त्या नाल्यावर बांधकाम करुन त्याने स्लॅब टाकला आहे. ते तोडले आणि पुन्हा बांधकाम झाले आहे, ही जबाबदारी आपण आपणावर घ्यायला हवी.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> आयुक्त साहेब, यापुर्वीच्या प्रश्नाला उत्तर देताना आपण सांगितले की, नागरिक आणि लोकप्रतिनीधींची जबाबदारी आहे. आणि अंतर्मुख होवुन........

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>मा. महापौर महोदया, मी असे बोललो की, जेवढी प्रशासनाची जबाबदारी आहे तेवढीच लोकप्रतिनीधींची व जनतेची जबाबदारी आहे. मी येथे असे कधीही बोललो नाही की प्रशासनाची जबाबदारी नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>पुर्णत्वाचा दाखला देताना वाढीव बांधकाम आहे अथवा नाही ते पाहणार आणि त्यानंतर कारवाई करणार. या ठिकाणी अनधिकृत बांधकामांची उत्तरे बघितली तर ती मोघम असल्याचे दिसुन येते. ११९.१९ चौ.मी. चे वाढीव बांधकाम केले आहे असे प्रशासनाचे उत्तर आहे. १६/४/२००४ चे. श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रश्न क्र. ३२२ ला हे उत्तर दिलेले आहे. म्हणजे लोकप्रतिनीधींनी तुमच्या निदर्शनास आणुन दिले आहे. यापुर्वीच्या अनधिकृत बांधकामांबद्दल देखिल अशीच उत्तरे दिलेली आहेत. कारवाई चालु आहे, नोटीस दिलेली आहे. म्हणजे लोकप्रतिनीधींनी तुमच्या निदर्शनास आणुन दिल्यांनतर देखिल तुम्ही काही कारवाई करत नाही. आणि पुन्हा लोकप्रतिनीधी त्यांची जबाबदारी पुर्ण करीत आहेत परंतु प्रशासनाकडुन त्याला प्रतिसाद मिळत नाही. श्री. लाल पंजाबी साहेब म्हणाले की वारंवार अनधिकृत बांधकामांवर प्रश्न येत आहेत. याचे कारण हेच आहे की, मोघम उत्तरे दिली जातात. कारवाई होण्याची अपेक्षा ठेवुन आम्ही प्रश्न विचारत असतो परंतु प्रशासनाकडुन कारवाई होत नाही. कुठेतर कुणी दबाव टाकल्यानंतर, लोकप्रतिनीधींनी प्रश्न विचारल्यानंतर कधी तरी कारवाई केली जाते परंतु कुणाच्या दबावाखाली पुन्हा कारवाई थांबवली जाते. उदाहरणे देवु का? श्री. किशोरजी जशी आपली अपेक्षा आहे तशी आमची नाही. आपल्या अपेक्षेची पुर्ण शहरात चर्चा चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>याचा अर्थ हे लोक काही अपेक्षा ठेवुन येथे प्रश्न देतात.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>असे तर नाही ना की मी बोललो मी जात आहे म्हणुन आज येथे जास्त चर्चा होत आहे. मी तर जाणारच आहे. त्यासाठी बोलण्याची आवश्यकता नाही. आज पहिल्यांदाच मी पाहिले की सभागृहात सर्व लोक प्रशासनावर ज्यारितीने टिका करीत आहेत. मला असे वाटले की मी एक विधान केले होते की मी जात आहे. त्यामुळे आपण जास्त बोलत आहात.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:–</u>अशी गोष्ट नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>हा आपला गैरसमज आहे. सुरूवातीपासुन ते आजपर्यंत. आपण काहीही विधान कराल व आम्ही त्याचे उत्तर देणार नाही का? आपण राजकीय पक्षांवर ढकलुन दयाल का? प्रशासनाच्या चुकाही आमच्यावर लादणार काय? जनतेवर लादणार? तुम्हाला कोणी थांबवले आहे कारवाई करण्यासाठी? आपण हे जे विधान केले मी जाण्यासाठी बोलत आहात तसे नाही. आपण आधी बोललात की राजकीय इच्छाशक्ती व जनतेची इच्छाशक्ती किती आहे. प्रशासनाचे देखिल त्या सोबत असायला हवे. प्रशासन मुख्य केंद्र बिंदु आहे. कायदयाचे पालन करणारे जर कायदा तोडायला निघाले तर जनता काय करणार? आपण जे विधान केले होते त्याची ती प्रतिक्रीया होती. आताही आपण जे बोललात ते देखिल चुकीचे आहे. हे सुरवातीपासुनच आहे ज्यावेळी आपण चुकीचे वागलात त्यावेळी आम्ही प्रश्न उपस्थित केले व ज्यावेळी आपण योग्य वागलात त्यावेळी आम्ही आपले अभिनंदन केले आहे.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३४२ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

प्रश्न क्र. ३४२:– अ)सदर ठेकेदार घनकचरा व्यवस्थापन नियम २००० व करारातील अटी व शर्ती नुसार काम करीत आहे का? ठेकेदाराकडून करारातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाले आहे काय? करारातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाईचे प्रावधान करारात आहे काय?अद्यापपर्यंत किती अटी व शर्तीचे उल्लंघन ठेकेदाराने केले आहे व त्याचेकडून किती दंड वसुल केला आहे?
ब) संबंधीत ठेकेदार करारातील अटीनुसार संपूर्ण शहरातील घराघरात जावून कचरा गोळा करतो काय?त्याने प्रभागावर नेमलेल्या घंटागाडया व कर्मचा–यांची संख्या किती? त्याचे प्रमाण पुरेसे आहे काय? का ठेकेदाराचे कामगार कमी पडत असल्याने महापालिकेच्या सफाई कामगाराकडून झोपडपट्टीतील व शहराचे आतील भागातील कचरा उचलुन ठेकेदारास मदत करण्यात येते आहे काय?
क)कचरा उचलणेसाठी करारातील अटीनुसार मध्यम आकाराच्या अपू–या गाडया पुरविल्या आहेत का? सदर ठेकेदार झोपडपट्टीतील, शहरातील आतील बाजूस असणा–या खत्यातील कचरा गोळा करून उचलतो का? का त्यास मदत म्हणुन सदरचा कचरा महापालिका कर्मचारी मेनरोडवर असलेल्या कुंडीत आणुन टाकतात हे खरे आहे काय?
ड)सदर ठेकेदाराने स्कीप लोडर वाहन पुरविले आहे का? रस्त्यावरील दगड विटा, माती उचलणेसाठी अनाधिकृत बांधकाम विभागातील कर्मचा–यांना नेमणुक केली आहे काय? त्यांना सदरचे काम करणेसाठी महापालिकेचे वाहन दिले जाते काय?

<u>उत्तर:–</u>अ) सदर ठेकेदार अटी व शर्तीनुसार काम करीत आहें. अटी व शर्तीचे उल्लंघन झालेली नाही. अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास कारवाईचे प्रावधान करारात आहे. अदयापपर्यंत अटी व शर्तीचे उल्लंघन ठेकेदाराने केलेले नाही. अटी व शर्तीचे उल्लंघन केले नसल्याने दंड वसुलीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
ब) करारातील अटी व शर्तीनुसार ठरविण्यात आलेल्या रुट प्लॅननुसार घंटागाडी घेऊन ठेकेदाराचे कर्मचारी कचरा गोळा करतात. प्रभागवार नेमलेल्या घंटागाडया व कर्मचा–यांची माहिती सोबतच्या प्रपत्र क्र. १ मध्ये नमुद केली आहे. करारातील अटी व शर्तीनुसार सदर प्रमाण पुरेसे आहे. कुंडीतील कचरा गोळा करुन डंपींग ग्राऊंडवर वाहून नेणे ही ठेकेदाराची जबाबदारी असून कचरा कुंडीपर्यंत कचरा आणून तो कचरा कुंडीत टाकण्याची जबाबदारी महापालिकेच्या सफाई कर्मचा–याची आहे. त्यानुसार सफाई कामगार कुंडीत कचरा आणून टाकतात.
क) कचरा उचलण्यासाठी पुरविण्यात आलेल्या विविध वाहनाचा सविस्तर तपशील सोबतच्या प्रपत्र क्र. २ मध्ये नमुद करण्यात आला आहे. यावरुन करारातील अटीनुसार वाहने पुरविल्याचे दिसुन येते. करारानुसार नियोजीत सर्व कचरा कुंडयातील कचरा ठेकेदारा मार्फत उचलण्यात येतो.
ड) सदर ठेकेदाराने स्कीप लोडर वाहन पुरविले आहे.

रस्त्यावरील दगड, विटा, माती, उचलण्यासाठी अनधिकृत बांधकाम विभागातील कर्मचा–यांना नेमुण दिलेली नाही. सदर काम करण्यासाठी त्यांना महापालिकेचे वाहन दिले जात नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>याचे काम व्यवस्थित चालु आहे का? कच–याबद्दल तुम्ही बोलले होते की मला वारंवार प्रश्न विचारून त्रास देवु नका. तर आता व्यवस्थित चालु आहे का? यापुर्वी श्री. धनंजय

बोडारे यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना आपण बोलले होतात की नंतर प्रश्न येणार आहे मी आताच उत्तर देतो. आमचे एवढेच म्हणणे आहे की काम व्यवस्थित चालु आहे अथवा नाही.

मा. प्रभारी आयुक्तः—आमच्या हिशोबाने व्यवस्थित चालु आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—उत्तर ठिक आहे.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३४३ ते ३४५ हे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचे आहेत.

प्रश्न क्र. ३४३ः— अ.)सफाईचे दैनंदिन कामावर देखरेखीसाठी वाहन व कर्मचारी वर्ग पुरविला आहे काय? असल्यास वाहन क्रमांक व कर्मचा—यांची नावे दयावीत.

ब)ठेकेदाराचा कर्मचारी वर्गाचा गणवेश, गमबूट, मास्क हॅन्डग्लोव्हज ओळखपत्र पुरविणेत आले आहेत काय? त्याचा वापर ठेकेदाराचे कामगार करीत आहेत का? कामगारांनी मागण्या मान्य करून घेणेसाठी संघटना स्थापन केली आहे का?

क)ठेकेदार कचरा कुंडयावर व कचरा वाहुन नेणा—या वाहनावर जंतुनाशक फवारणी करतो का? कधी, किती दिवसांनी यावर कोण लक्ष पुरवितो? कोणती जंतुनाशके नाव दयावी.

ड)कच—याची विल्हेवाट योग्य रितीने लावणेसाठी ठेकेदाराने जनतेत जागृती केली आहे का? केली असल्यास कधी व कोणत्या प्रकारे केली आहे कृपया माहिती दयावी.

उत्तरः—अ) सफाईच्या दैनंदिन कामावर देखरेखीसाठी कंत्राटदाराने पुरविलेल्या वाहने व कर्मचा—यांच्या सविस्तर तपशिल प्रपत्र क्र. ३ मध्ये देण्यात आला आहे.

ब) ठेकेदाराच्या कर्मचा—यांना गणवेश, गमबुट, हॅन्डग्लोव्हज ओळखपत्र पुरविणेत आले आहेत. त्याचा वापर ठेकेदाराचे कामगार अनियमीतपणे करीत आहेत. ठेकेदाराच्या कामगारांनी मागण्या मान्य करुन घेण्यासाठी संघटना स्थापन करण्यासंदर्भात ठेकेदार अथवा सदर कामगारांनी या कार्यालयास कळविले नाही.

क) ठेकेदार कचरा कुंडयावर व कचरा वाहून नेणा—या वाहनावर कचरा उचलल्यानंतर जंतुनाशक फवारणी करतो. यावर ठेकेदाराचे पर्यवेक्षक, महापालिकेचे स्वच्छता निरिक्षक, प्रभाग अधिकारी लक्ष पुरवितात. वापरण्यात येत असलेल्या जंतुनाशकाचे नाव डीडी १० असे आहे.

ड) ठेकेदारामार्फत जनतेत जागृती करण्याचे काम सुरु आहे. केबल टीव्हीवरुन, चित्रफिती दाखवून व वाहनातुन जनजागृती केली जाते. रस्त्यावरील खांबांवर होर्डिंग्ज लावलेली आहेत. दिनांक २७/१/२००४ रोजी कार्यशाळा घेतली आहे. मार्च व एप्रिल २००४ मध्ये शहरात एकूण २० ठिकाणी जनजागरण संत्राचे आयोजन करण्यात आले.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र. ३४४ः— अ) कचरा कुंडया ठेवणेसाठी उंचवटे बनविले आहेत काय? कुठे व किती?

ब)कचरा कुंडया व साहित्य यांचा विमा उतरवला आहे काय? असल्यास यादी व कागदपत्राच्या प्रती दयाव्यात.

क)जनता व पालिका सदस्य यांनी ठेका दिल्यापासुन साफसफाई बाबत किती लेखी तक्रारी ठेकेदाराचे विरोधात दिल्या आहेत? सदर तक्रारीची चौकशी केली गेली काय? ठेकेदारावर अद्यापपर्यंत अटी व शर्तीची पूर्तता

केली नाही म्हणुन दंडात्मक कारवाई झाली आहे का? आजतागायत किती रक्कम वसूल केली गेली? किंवा ठेकेदारास संरक्षण देवून कारवाई केलीच नाही?

ड) ठेकेदार बंद गाडयातून कचरा उचलतो का? का उघडया गाडयातून कचरा उचलत आहे? यासाठी म्हारळ गावातील नागरीकांनी आंदोलन केले आहे का?

उत्तरः—अ) कचरा कुंडया ठेवणेसाठी उंचवटे बनविण्याचे काम चालु आहे.

ब) कचरा कुंडयाचा विमा उतरविलेला नाही. वाहनांचा विमा उतरविलेला आहे.

क) जनता व पालिका सदस्य यांनी ठेका दिल्यापासून साफसफाई बाबत १७ तक्रारी दिलेल्या आहेत. सदर तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे. अटी व शर्तीची पुर्तता ठेकेदार करत असल्याने दंडात्मक कारवाई करण्याचा प्रश्न नाही.
ड) ठेकेदार बंद गाडयातून कचरा उचलतो. सदया उघडया गाडया वाहतुकीस वापरल्या जात नाहीत. पुर्वी म्हारळ गावातील नागरीकांनी आंदोलन केले होते. त्यावेळी गाडयांमधून झाडांच्या फांदया, गवत इत्यादी ग्रीन वेस्ट डंम्पींग ग्राउंडवर नेमण्यात येत होते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र. ३४५ः— अ) सदर ठेकेदारास ठेका देताना किती कच—याचे खत्यावरून कचरा उचलणेत सांगण्यात आले होते? त्यानंतर काही खत्ते कमी केले आहेत काय? यामुळे स्वच्छतेवर परिणाम होईल काय?

ब)कच—याचे गाडयाचे वजन करणेसाठी वजन काटयाची व्यवस्था कुठे केली आहे? सदरची नोंद कोण करतो? का गाडयांचे वजन केले जातच नाही?

क)संबंधीत ठेकेदार आयकर भरण्याचा पूरावा महापालिकेस सादर करतो काय? बॅलेन्सशिट सादर करतो काय? करीत असल्यास त्याची प्रत मिळावी.

उत्तरः—अ) ठेका देण्यापुर्वी शहरातुन ५१९ ठिकाणांहून कचरा उचलण्यात येत होता. घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये शहरातील कचरा कुंडयांची संख्या कमी करणे आवश्यक असल्याने ठेकेदाराशी केलेल्या करारानुसार १५० ते २०० ठिकाणांहून कचरा उचलण्याने निश्चित करण्यात आले. परंतु शहरवासियांच्या वर्षानुवर्षाच्या सवयी बदलण्यास उशीर लागणार असल्याने प्रत्यक्षात ३८४ ठिकाणांवर कचराकुंडया ठेवून कचरा उचलण्याचे काम सुरु करण्यात आले. हळूहळू सदर कचरा कुंडयांची संख्या कमी करण्यात येईल माहे ऑक्टोंबर ०४ मध्ये या ३८४ कुंडयांपैकी ३१ ठिकाणचे खत्ते कमी केले आहेत. खत्ते कमी केल्याने स्वच्छतेवर परिणाम होणार नाही.

ब) कच—याचे गाडयाचे वनज करणेसाठी वजन काटयाची व्यवस्था करण्याची अट करारात नाही. कारण कचरा उचलण्याचा ठेका हा दर दिवसावर ठरलेला आहे. वजनावर नाही. त्यामुळे वजनाची नोंद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

क) महापालिकेडुन ठेकेदाराच्या देयका मधून नियमितपणे प्रचलित दरानुसार आयकर कपात करण्यात येते व आयकर विभागाकडे जमा करण्यात येतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३४६ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३४६:–</u> श्री. पी. एम. चव्हाण यांचे मालकीचे सनद क्र.अेडीएम/प्लॉट/सी–४ अेसआर–८०/३ दि. ५.११.१९७९ यु. नं. ८० म्युनिसिपल खाता नं. ६७२ वार्ड २९ शॉप नं. १०७ उल्हासनगर–४ येथील ९ ग १५ चे दुकानाचे सन २००१ साली करण्यात आलेल्या ४० फुटी डी. पी. रोड मध्ये पुर्णपणे बाधीत झाले आहे काय? सदरचे दुकान (अधिकृत कागदपत्रे असल्याने) रस्ता रूंदीकरणात तोडल्याने त्यांना पर्यायी जागा दिली आहे का? नसल्यास अद्यापपर्यंत पर्यायी जागा का देण्यात आली नाही? संबंधीतास पर्यायी जागा कधीपर्यंत देण्यात येईल? रस्ता रूंदीकरणात बाधीत झालेल्या इतर नागरिकांना महापालिकेने पर्यायी जागा व सवलती दिल्या आहेत काय?

<u>उत्तर:–</u> सदर इमारतीच्या बांधकामास या कार्यालयाकडुन कुठल्याही प्रकारचे बांधकाम परवानगी देण्यात आलेली नसल्यामुळे पायाचा दाखला देता येत नाही. सदरची जागा ही रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेली असल्यामुळे इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:–</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३४७ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३४७:–</u> अ) मधुबन हॉटेलसमोर, लाहोरी बिल्डींग,गोल मैदान, उल्हासनगर–१ येथील मंजूर इमारत बांधकाम प्लॅन नं. १८३/०४ नुसार सदर इमारतीने पायाभरणीचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला घेतला? सदर इमारतीने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला घेतला? सदर इमारतीने वाढीव बांधकाम केले आहे काय? केले असल्यास किती? त्यावर वाढीव बांधकामावर कारवाई केली आहे काय? सध्या तेथे स्लॅबचे काम सुरू आहे का?
ब) सुमित चक्रवती नामक व्यक्तीने उल्हासनगर–५ बसंत बहार रोड येथील इमारत बांधकाम प्लॅन मंजुर झाला आहे का? सदर इमारतीचे पायाभरणीचा दाखला घेतला आहे का? सदर इमारतीचे वाढीव बांधकाम केले आहे काय? केले असल्यास किती? त्या बांधकामावर कारवाई केली आहे काय? सदर इमारतीचे बांधकाम प्लॅन नं. कोणता?
क) बालानी नामक व्यक्तीने बॅ. नं. १०६४ खो. क्र. १२, उल्हासनगर–३ येथील इमारत बांधकाम प्लॅन मंजूर झाला आहे का? प्लॅन नं. कोणता? सदर इमारतीने पायाभरणीचा दाखला घेतला आहे का? सदर इमारतीने वाढीव बांधकाम केले आहे काय? केले असल्यास किती? त्या बांधकामावर कारवाई केली आहे काय?
ड) लखी जसनानी नामक व्यक्तीने शिट नं. ४२, उल्हासनगर–४ प्लॉट नं. १११, चालता नं. १४२, येथील इमारत बांधकामाचे प्लॅन मंजुर झाला आहे का? प्लॅन नं. कोणता? सदर इमारतीने पायाभरणीचा दाखला घेतला आहे का? त्या इमारतीने वाढीव बांधकाम केले आहे काय? केले असल्यास किती? त्या बांधकामावर कारवाई केली आहे काय?
ई)डॉली नाश्तावाला समोर, उल्हासनगर–३ तळमजला अधिक दोन मजल्याचे काम सुरू आहे सदर बांधकाम प्लॅन मंजुर झाला आहे का? प्लॅन नं. कोणता? सदर इमारतीने पायाभरणी दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला घेतला? सदर इमारतीने वाढीव बांधकाम केले आहे का? केले असल्यास किती? त्या बांधकामावर कारवाई केली आहे का?

<u>उत्तर:–</u> अ) सदर इमारतीचा पायाभरणीचा दाखला दिनांक १४.८.२००२ पत्रान्वये देण्यात आलेला आहे. सदर इमारतीचे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला आहे. सदर मुळ नस्ती मा. संचालक, नगररचना, पुणे यांचेकडे पाठविण्यांत आलेली आहे. मंजुर नकाशाव्यतिरिक्त बांधकामाबाबतची माहिती वस्ती प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल.
ब) सदर इमारतीच्या बांधकामास या कार्यालयाकडुन कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यात आलेली नसल्यामुळे पायाचा दाखला देता येत नाही. सदरची जागा ही रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेली असल्यामुळे इमारतीचे बांधकाम केलेले आहे.

क) सदर इमारतीचे नकाशे मंजुर झालेले आहे. सदर इमारतीचे नकाशे क्र. उमपा/नरवि/बांप/११२/०३/८३६, दिनांक २७.८.२००३ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर इमारतीचे पायाचा दाखला दिलेला नाही. सदर इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर वाढीव बांधकाम झालेले आहे व त्याचे क्षेत्र ३१०.७९ चौ.मी. आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार ५२,५३ ची नोटिस देण्यात आली आहे.
ड) सदर नकाशांना मंजुरी दिलेली आहे. इमारतीचे बांधकाम नकाशे क्र. उमपा/नरवि/बांप/४७/०२/७९७, दिनांक १७.१.२००३ अन्वये देण्यात आले आहे. सदर इमारतीस पायाचा दाखला दिलेला आहे व त्याचे क्र. उमपा/नरवि/बांप/४७/०२/४९६, दिनांक १९.६.२००३

नगररचना विभागाकडुन माहिती उपलब्ध झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
ई) सदर बांधकाम रस्ता रुंदीकरणात करण्यात आले आहे. त्यास उल्हासनगर महानगरपालिकेने कोणतेही मंजुरी दिलेली नाही.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**यामध्ये काय करणार? साहेबांचे उत्तर पण तेच असेल.
**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—**प्रश्न पण तोच आहे, उत्तर पण तेच आहे, आयुक्त साहेब सक्षम यामध्ये संशय नाही.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—**ते असे म्हणत आहेत की राजकीय व्यक्तींनी यामध्ये साथ दयायला हवी.
**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**यासाठी सेनेचे सहकार्य असल्याचे मी स्पष्ट केले आहे.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—**तुम्ही कधी बोलता ते सक्षम आहेत, कधी बोलता गुंडागर्दी करतात.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—**आयुक्त साहेब सक्षम आहेत त्यामध्ये संदेह नाही तसेच आपले सहकार्य देखिल तसेच आहे.

**मा. सचिव:—**प्रश्न क्र. ३४८ हा श्री. रामदास उमाप यांचा आहे.

**प्रश्न क्र. ३४८:—** महापालिकेचे एकूण प्रभाग २५ मध्ये प्रत्येक प्रभागात पुरुष कामगार व महिला सफाई कामगार सध्या कार्यरत असलेली यादी उत्तराबरोबर देणे.

ब) प्रत्येक प्रभागात सफाई कामगार ठेवण्याची काय नियोजन पध्दत आहे? सध्या काम कोणत्या पध्दतीने चालते?

क) हातगाडया, टेकडया, धमेले, फावडे व झाडू इत्यादी साहित्याचे वितरण कसे केले जाते व साहित्य अस्तित्वात व वापरात येते की नाही याची जबाबदारी कोणाची?

ड) गलिच्छ वस्ती, झोपडपट्टी की ज्या ठिकाणी रोगराई निर्माण होण्याची शक्यता असते त्या ठिकाणी शौचालय व इतर भाग यावर औषध फवारणी कशी केली जाते कोण—कोणते औषधे फवारणी करतात पुर्ण माहिती दयावी.

**उत्तर:—**अ) महापालिकेचे एकुण प्रभाग २५ मध्ये प्रत्येक प्रभागात पुरुष कामगार व महिला सफाई कामगार सध्या कार्यरत आलेल्याचा सविस्तर तपशिील प्रपत्र क्र. १ मध्ये देण्यात आला आहे.
ब)प्रत्येक प्रभागात सफाई कामगार सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत काम करतात. रस्त्याच्या ५०० मीटर अंतरास ३ कामगार काम करतात. पैकी १ कामगार झाडु मारणे, १ हात गाडीने कचरा उचलणे, १ कामगार रस्त्याच्या बाजुची नाली सफाई करणे त्याच प्रमाणे दुपारी परिसरातील गल्ल्या व बॅरेकमधील राहिलेले काम पुर्ण करणे, १ सफाई कामगारास ५० ते ८० सिट्स शौचालये सफाईसाठी दिलेली आहेत.
क)प्रत्येक पॅनलमध्ये नविन बॉक्स असलेल्या ८ हातगाडया देण्यात आल्या आहेत. प्रत्येक पॅनलला १५ टोपल्या, १५ घमेले, २५ फावडे देण्यात आलेले आहेत. झाडु मारणा—या कामगारास मासिक २ झााडु देण्यात येतात. साहित्य अस्तित्वात असुन ते नियमित वापरात येते. त्याची नोंद व जबाबदारी संबंधीत स्वतच्छता निरिक्षकाची असते.
ड) नियमित औषध फावारणी केली जात असुन प्रत्येक प्रभागात पुरविलेल्या जंतुनाशक औषधांची माहिती सोबतच्या प्रपत्र क्र. २ मध्ये नमुद केली आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमापः—उत्तर ठिक आहे.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३४९ ते ३५२ हे श्री प्रमोद टाले यांचे आहेत ते यावेळी सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३४९:— कल्याण—अंबरनाथ रोड, शांतीनगर, शिव—बलदेव दुकानाजवळ चालू असलेले बांधकाम हे महानगरपालिकेमध्से नोंद आहे का? सदरील प्लॉटचे रिजर्व्हेशन कुठले स्वरुपात आहे? प्लॉन पास असल्यास त्या संदर्भात विस्तृत माहिती मिळावी.

उत्तरः—सदरच्या बांधकामास या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/६०/०३/५२२, दिनांक २५/६/२००३ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आली. सदर प्लॉटवर कुठल्याही प्रकारचे रिझर्व्हेशन नाही.

विकासकाने सदर इमारतीमध्ये वाढीव बांधकाम केलेले आहे व सदरच्या वाढीव बांधकामास महाराष्ट्र प्रदेश व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३ अन्वये नोटिस बजावण्यात आलेली आहे.

प्रश्न क्र. ३५०:—खालील दर्शविलेली कामे महानगरपालिकेच्या नियमानुसार आहे किंवा नाही नसल्यास आपल्यातर्फे काय कारवाई केली आहे?

१) कला निवासच्या बाजुला, भाजी मार्केट, उल्हासनगर—२.
२) रेखा अपार्टमेंट समोर, २४८ शाळेजवळ, उल्हासनगर—१.
३) मोती अपार्टमेंट समोर, साधुबेला शाळेजवळ, उल्हासनगर—१.
४) जनता वॉच समोर, जापानी बाजार, उल्हासनगर—२.

सदर कामे नियमानुसार नसल्यास एफ. आय.आर. करणेची कारवाई करण्यात येईल का?

कल्याण अंबरनाथ रोड, शांतीनगर, शिव बलदेव दुकानाजवळ चालु असलेले बांधकाम हे महानगरपालिकेमध्ये नोंद आहे काय? सदरील प्लॉटचे रिजर्व्हेशन कुठले स्वरुपात आहे? प्लॉन पास असल्यास त्या संदर्भात विस्तृत माहिती मिळावी.

उत्तरः—१) सदर बांधकामास या कार्यालयातर्फे परवानगी देण्यात आली नाही.
२) सदर इमारतीची दुरुस्तीचे काम केलेले आहे.
३) सदर इमारतीचा नकाशाचा कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१५/०३/७१३, दिनांक १५/९/२००३ च्या पत्रान्वये श्रीमती इंद्रदेवी फुलवती यांच्या नावे मंजुर करण्यात आलेला असुन सदर इमारतीमध्ये ३१.०२ चौ.मी. बांधकाम क्षेत्राची परवानगी देण्यात आलेली विकासकाने जागेवर १५३.०० चौ.मी.चे बांधकाम केलेले आहे.
४) सदर अनधिकृत बांधकामाबाबत या विभागात एम.आर.टी.पी. ॲक्ट ५२.५३ चे नोटिस बजावणेत आलेली आहे व सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

होय. सदरील प्लॉटवर कुठल्याही प्रकारचे रिजर्व्ह नाही. सदर इमारतीस या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/७०/०३, दिनांक २५/७/२००३ अन्वये बांधकाम परवानगी करण्यात आलेली आहे.

सदर इमारतीमध्ये विकासकाने अनधिकृत बांधकाम केलेले असुन सदरच्या अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९७७ चे कलम ५२,५३ अन्वये नोटिस बजावण्यात आलेली आहे.

प्रश्न क्र. ३५१:—खालील बांधकामे ही आपल्या दप्तरी नोंद आहे का?

दप्तरी नोंद असल्यास त्या व्यतिरिक्त अतिरिक्त बांधकाम किती केले आहे?

अतिरिक्त असलेले बांधकाम आजपर्यंत का तोडले गेले नाही?

नसल्यास किती मुदतीत तोडणार?

अ) निकु प्लाजा अपार्टमेंटच्या बाजुला स्टेशन रोड, उल्हासनगर—३.
ब) दौली नास्तावाल्याचे पाठीमागे,

पोस्टऑफिस स्टेशन रोड, उल्हासनगर–३.

क) विकास नर्सिंग होम समोर, हॉस्पीटल रोड, उल्हासनगर–३.

ड) पारुशा मार्केट समोर, मेन वसंत बहार, उल्हासनगर–५.

इ) शिवशक्ती सप्लायरच्या पाठीमागे पोस्ट ऑफिस, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर–१.

ई) प्रभाग ९ चावला यांचे बांधकाम, दहाचाळ, उल्हासनगर–४.

उत्तर:–अ) या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र.उमपा/नरवि/बांप/११२/०३/४६, दिनांक २७/८/२००३ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आलेली आहे.

या विकासधारकास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये नोटिस बजावण्यात आलेली आहे.

ब) सदरच्या बांधकामास कार्यालयातर्फे परवानगी देण्यात आलेली नाही.

सदर बांधकाम रस्ता रुंदीकरणात जागा बाधीत झाल्यामुळे बांधकाम केले आहे.

क) या कार्यालयातर्फे परवानगी देण्यात आलेली नाही.

सदरच्या अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई करण्यात येत आहे.

ड) सदरच्या बांधकामास या कार्यालयातर्फे परवानगी देण्यात आलेली नाही.

सदरच्या अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई करण्यात येत आहे.

इ) सदर बांधकामास या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणापत्र पत्र क्र. उमपा/नरवि/बांप/४८/०४/३११, दिनांक ६/११/२००४ रोजीच्या पत्रान्वये श्री. मुरमुखदास एल. चावला यांच्या नावे नकाशा मंजुर करण्यात आलेला असुन सध्या इमारतीचे बांधकाम सुरु आहे. बांधकाम पुर्ण झाल्यावर विकासकाकडुन बांधकाम पुर्णतेचा दाखला मिळण्या संबंधीचा अर्ज प्राप्त झाल्यावर त्यात अनधिकृत बांधकाम आढळून आल्यास अनधिकृत विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

ई) वरीलप्रमाणे अनधिकृत बांधकामाचा अहवाल प्राप्त झाल्यावर कारवाई करण्यात येईल.

सदरच्या बांधकामास या कार्यालयातर्फे परवानगी देण्यात आलेली नाही.

प्रश्न क्र. ३५२:– पेन्सील फॅक्टरी, उल्हासनगर–४ जवळ चालू असलेले रोडचे बांधकाम संदर्भात......

१) प्लॉन मंजुर आहे का?

२) सदर बांधकाम किती दिवसापासून सुरु आहे व कधी संपले याची आपणाकडे नोंद आहे का?

३) आपणाकडून आजपर्यंत काय कारवाई केली आहे?

४) बांधकाम अनधिकृत असल्यास किती मुदतीत निष्कासित करणार आहे?

उत्तर:– सदरच्या बांधकामास या कार्यालयातर्फे कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

सदरच्या अनधिकृत बांधकामाबाबत या विभागाकडुन कारवाई करण्यात येत आहे. विकासकास या कार्यालयात कागदपत्रे सादर करण्यास कळविले आहे.

मा. सचिव:–प्रश्न क्र. ३५३ ते ३५७ हे श्री.राजेंद्रसिंह भुल्लर यांचे आहेत.

प्रश्न क्र. ३५३:– उपरोक्त विषयानुसार संत आशाराम स्टील फर्निचर वर्कस आणि टिकमदास वखार दरम्यान जलाराम टिंबर मार्टसमोर, हॉस्पीटल रोड, उल्हासनगर–३ येथे गोल्डी नामक व्यक्तीने १५ ग ३५० चे दूकानांचे दोन गाळे अवैधरित्या अतिक्रमण करून बांधले आहेत त्या अनुषंगाने खालील प्रश्नाची सूचक, समाधानकारक माहिती महासभेत मिळावी.

अ. सदर जागी बनविलेले दुकानाचे गाळे कोणाचे आदेशाने बनविले आहेत? सदर दुकानाचे बांधकामास महापालिकेने परवानगी दिली आहे काय?

ब. सदर दुकानाचे बांधकामाची सनद व कागदपत्राची पडताळणी केली आहे काय? यापूर्वी सदर बांधकामावर कारवाई झाली आहे का? कोणत्या प्रकारची कारवाई केली तपशिल दयावा.

उत्तर:—सदरच्या दुकानास या महानगरपालिकेतर्फे कुठलीही परवानगी देण्यात आलेली नाही.
सदरच्या बांधकामास या विभागाकडुन २६० ची नोटिस बाजवण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र. ३५४:— उपरोक्त विषयानुसार टाटा ए. आय.जी. लाईफ इन्श्युरन्स (संजय गंत्रा) चंदर मोटार पार्टस् समोर बठीजा चौक, १७ सेक्शन, उल्हासनगर—३ येथे तळमजला अधिक दोन माळयाचे आर.सी. सी. इमारतीचे बांधकाम केले आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नाची सविस्तर सुचक माहिती मिळावी. ही विनंती.
अ. सदर इमारतीचा प्लॉन मंजुर झाला आहे का? त्या इमारतीचा प्लान नं. कोणता? कोणत्या तारखेला प्लान मंजुर झाला आहे? प्लान कोणाच्या नावे मंजुर झाला आहे?
ब. सदर इमारतीची सनद किती चौरस वॉल आहे? त्यामध्ये किती चौरस यार्ड प्लान पास आहे? जितकी चौरस यार्ड सनद आहे तितकी जागा इमारतीसाठी उपलब्ध आहे का? सदर इमारतीचा किती मजल्याचा प्लान पास आहे? इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर किती चौरस यार्ड प्लान पास आहे?
क. सदर इमारतीने पाया भरणीने दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला पायाभरणी दाखला घेतला आहे?
ड. सदर इमारतीत वाढीव बांधकाम केले आहे का? केले असल्यास किती? तसेच प्रत्येक मजल्यावर किती?
ई) सदर इमारतीने बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला घेतला आहे? सदर इमारतीचे सनद व कागदपत्राची पडताळणी केली आहे का?
फ)सदर इमारतीत वाढीव बांधकाम केले असल्यास प्रशासनाने कोणत्या प्रकारची नोटीस बजावली आहे? तसेच अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली?

उत्तर:—अ) होय, या कार्यालयात सुधारीत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/१२४/०१/४१५, दिनांक १२/६/२००३ रोजीच्या पत्रान्वये श्री. प्रभु के. चंदनानी यांच्या नावे नकाशा मंजुर करण्यात आलेला आहे.
ब) सदर इमारतीचा सनद ३४०.१३ चौ.मी. असुन बांधकामाचे क्षेत्र ३३८.७६ चौ.मी. आहे. सनदेच्या क्षेत्राएवढे भुखंड उपलब्ध आहे. सदर इमारतीस तळघर + तळमजला +२ मजलेची बांधकाम परवानगी देण्यात आलेली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.
तळमजला ——१०४.१२२ चौ.मी.
१ ला मजला —— १२९.०५६ चौ.मी.
२ रा मजला —— ९६.७३१ चौ.मी.
अतिरिक्त —— ८.९५२ चौ.मी.
बालकनी
क) होय, या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/ नरवि/बांप/१२४/०२/६७४, दिनांक ९.७.२००४ रोजीच्या पत्रान्वये पायाचा दाखला देण्यात आला आहे.
ड) नाही.
ई)या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/ नरवि/बांप/१२४/०२/८३०, दिनांक २५.८.२००३ रोजीच्या पत्रान्वये भाग बांधकाम पूर्णतेचा दाखला देण्यात आलेला आहे. सदर इमारतीची सनद व इतर कागदपत्रांची पडताळणी करुन नकाशा मंजुर करण्यात आलेला आहे.
इ) सदर इमारतीचे बांधकाम आजपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे असल्यामुळे कोणत्याही प्रकारची नोटिस बजावण्यात आलेली नाही.
फ) सदर इमारतीचे बांधकाम आजपर्यंत मंजुर नकाशाप्रमाणे असल्यामुळे कोणत्याही प्रकारची नोटिस बजावण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—उत्तर ठिक आहे.

<u>प्रश्न क्र. ३५५:—</u> रिजन्सी पार्क, सपना गार्डनसमोर शांती व गुरूदेव अपार्टमेंट जवळ, उल्हासनगर—३ येथील तळमजला अधिक सहा मजले व इमारतीतील नऊ दुकानासंबंधी खालील प्रश्नांची सुचक समाधानकारक माहिती महासभेत मिळावी ही विनंती.

अ. सदर रिजन्सी पार्क इमारतीचा प्लान मंजुर झाला आहे का? त्या इमारतीचा प्लान नं. कोणता? कोणत्या तारखेला पास झाला? कोणाच्या नावे पास झाला?

ब. सदर रिजन्सी पार्क इमारतीची सनद किती वॉल आहे? त्यामध्ये किती चौरस यार्ड प्लान पास झाला आहे? जितकी चौरस यार्ड सनद आहे तितकी जागा इमारतीसाठी उपलब्ध आहे का? सदर इमारतीचा प्लान किती मजल्यासाठी पास केला आहे? इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर किती प्लान पास आहे? सदर इमारतीचे तळमजल्यावर किती दूकाने बांधण्यासाठी प्लान पास आहे?

क. सदर इमारतीने पायाभरणी दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला पायाभरणी दाखला घेतला आहे?

ड. सदर इमारतीत वाढीव बांधकाम केले आहे का? केले असल्यास किती वाढीव बांधकाम केले आहे? तसेच प्रत्येक मजल्यावर किती चौरस मीटर वाढीव बांधकाम केले आहे?

ई. सदर इमारतीने बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला?

फ. इमारतीचा नकाशा मंजुरीसाठी सादर केलेले कागदपत्र व सनद यांची पडताळणी केली आहे का?

प. इमारतीत वाढीव बांधकाम असल्यास महापालिका प्रशासनाने कोणत्या प्रकारची नोटीस बजावली आहे? आजतागायत कोणती कारवाई केली आहे?

फ. इमारतीचा नकाशा मंजुरीसाठी सादर केलेले कागदपत्र व सनद यांची पडताळणी केली आहे का?

प. इमारतीत वाढीव बांधकाम असल्यास महापालिका प्रशासनाने कोणत्या प्रकारची नोटीस बजावली आहे? आजतागायत कोणती कारवाई केली आहे?

<u>उत्तर:—</u> अ) या कार्यालयाचे सुधारीत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/ नरवि/बांप/१९/२०००/७८९, दिनांक १९.८.२००३ रोजीच्या पत्रान्वये श्री. शारीत दासन कायनादासन व इतर यांच्या नावे मंजुर करण्यात आलेला आहे.

ब) सदर इमारतीची सनद १४९६.७३ चौ.मी. असून बांधकामाचे क्षेत्र १८६६.१६ चौ.मी. आहे व त्यापैकी ३७४.१८ चौ.मी. बांधकामाचे क्षेत्र उल्हासनगर महानगरपालिकेस विनामुल्य हस्तांतरण केलेले आहे. व सनदेप्रमाणे भुखंडाचे क्षेत्र उपलब्ध आहे.

सदर इमारतीस तळमजला + पोटमजला + ७ मजल्याची परवानगी देण्यात आलेली असून त्याचा
तळमजला —२०७.०० चौमी
पोटमजला — ७२.९६ चौमी
१ ला मजला
उल्हासनगर महानगरपालिकेस विनामुल्य ३७४.१८ चौमी हस्तांतरण केलेले क्षेत्र
२ रा मजला ते ६ वा मजला —— २१६.४५ चौमी
सातवा मजला ——१२९.७७ चौमी

क) होय, या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/ नरवि/बांप/१९/८०/७२५, दिनांक ३१.१२.२००४ रोजीच्या पत्रान्वये पायाचा दाखला देण्यात आला आहे.

ड) होय, सदर इमारतीमध्ये तळमजला व सातव्या  मजला मिळून एकुण ९५.२१ चौ.मी. चे वाढीव बांधकाम केलेले आहे.

ई) नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र. ३५६:— कैलाश पर्वत टॉवर, २ नं. ओटी. मच्छी मार्केटमागे, उल्हासनगर—२ येथे सहामजली इमारतीचे बांधकामासंबधी खालील प्रश्नाची सुचक समाधानकारक माहिती महासभेत मिळावी ही विनंती.

अ. सदर कैलाश पर्वत इमारतीचा प्लान मंजूर आहे का? त्या इमारतीचा प्लान नंबर कोणता? कोणत्या तारखेस मंजूर झाला? प्लान कोणाच्या नावे मंजुर झाला?

ब. सदर कैलाश पर्वत इमारतीची सनद किती चौरस वॉल आहे? त्यामध्ये किती चौरस यार्ड प्लान पास आहे? जितकी चौरस यार्ड सनद आहे तितकी जागा इमारतीसाठी उपलब्ध आहे का? सदर इमारतीचा प्लान किती मजल्यावर मंजूर केला आहे? इमारतीचे प्रत्येक मजल्यावर किती चौरस यार्ड प्लान पास आहे?

क. सदर इमारतीने पायाभरणी दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला घेतला आहे?

ड. सदर इमारतीत वाढीव बांधकाम केले आहे का? केले असल्यास किती वाढीव बांधकाम केले? प्रत्येक मजल्यावर किती?

ई. सदर इमारतीने पूर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला?

फ. सदर इमारत बांधकामासंबंधीची कागदपत्र व सनद इतयादीची पडताळणी केली आहे का?

प. सदर इमारतीत वाढीव बांधकाम असल्यास महापालिका प्रशासनाने कोणत्या प्रकारची नोटीस बजावली? तसेच आजतागायत कोणती कारवाई केली?

उत्तर:—या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/८०/०२/८९४, दिनांक १८.२.२००३ च्या पत्रान्वये विक्की चंदरलाल पाहुजा यांच्या नावे नकाशा मंजुर करण्यात आला आहे.

ब) सदर इमारतीचे क्षेत्र सनदेप्रमाणे ११७१.६८ चौमी आहे व बांधकामाचे क्षेत्र ११६३.०० चौ.मी. आहे.  व सनदेप्रमाणे भुखंडाचे क्षेत्र उपलब्ध आहे.  सदर इमारतीस तळमजला + ६ मजल्याचे बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.  त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.
तळमजला ——१२.०१ चौमी
१ ला मजला ते —१९५.७६ चौमी
५ वा मजला
सहावा मजला —— १७२.१२ चौमी

क) होय, या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/ नरवि/बांप/१९/०५/२१०, दिनांक १९.५.२००३ रोजीच्या पत्रान्वये पायाचा दाखला देण्यात आलेला आहे.

ड) सदर इमारतीमध्ये वाढीव बांधकाम केलेले नाही.

ई) सदर इमारतीस बांधकाम पुर्णतेचा दाखला देण्यात आलेला नाही.
फ) नाही.
प) सदर इमारतीचे बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे असल्यामुळे नोटिस बजावण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र. ३५७:— चोपडा कोर्टमागे, हनुमान मंदीरासमोर शिवसाई सर्व्हीस सेंटरजवळ असलेले सार्वजनिक शौचालयाचे जागी दुकानाच्या गाळयांचे अनाधिकृत बांधकाम केले आहे. त्यानुसार खालील प्रश्नाची सूचक समाधानकारक उत्तरे / माहिती महासभेत मिळावी ही विनंती.

अ. सदर जागी सार्वजनिक शौचालय होते ते कुणाचे आदेशाने व का तोडण्यात आले? आदेश क्र. / ठराव क्रमांकाचा दिनांक व क्रमांक मिळावा. सदर शौचालय तोडणेसाठी कोणी शिफारस केली होती?

ब. सदर शौचालयाचे जागी कोणी व कोणाचे आदेशाने दुकाने बनविली आहेत? सदर दूकानाचे बांधकामास महापालिकेची मंजूरी आहे का? असल्यास आदेशाचा क्रमांक व दिनांक दयावा.

क. सार्वजनिक शौचालयाचे जागी बांधण्यात आलेल्या दुकानांचे कागदपत्र व सनद याची पडताळणी केली आहे काय?

ड. यापूर्वी सदर बांधकामावर कारवाई केली आहे का? असल्यास तपशिल दयावा.

उत्तरः—अ) स्थायी समितीचा ठराव आदेश क्र. १२५, दिनांक २४/१२/२००३ उप—आयुक्त (आरोग्य) यांच्या दिनांक २/१२/२००३ च्या शिफारशीनुसार शौचालय तोडण्यात आले आहे.

ब) सदर शौचालयाच्या जागी दुकानास महानगरपालिकेतर्फे परवानगी देण्यात आलेली आहे व सदर शौचालयाचे जागी कोणतेही बांधकाम केलेले नाही.

क) सदर शौचालयाचे जागी महानगरपालिकेचे दुकानाच्या बांधकामास परवानगी दिलेली नसल्यामुळे कागदपत्र व सनद पडताळणी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
ड) नाही.

चोपडा कोर्टमागे हनुमान मंदिरा समोर शिवसाई सर्व्हीस सेंटर जवळ असलेले सार्वजनिक शौचालयांचे जागी दुकानाच्या गाळयांचे अनधिकृत बांधकाम झालेले नसुन तेथे सीसी पॅसेज झालेले आहे.

सदर शौचालय स्थायी समिती ठराव क्र. १२५ दिनांक २४/१२/२००३ नुसार तोडलेले आहे. सदर शौचालय तेथिल परिसरातील स्थानिक रहिवाशांच्या शिफारशीनुसार तोडण्यात आले आहे. सदर शौचालयाच्या जागेवर दुकानासाठी बांधकाम झालेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—उत्तर ठिक आहे.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३५८ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. ३५८:— उल्हासनगर महानगरपालिकेने २५ जुलै ०४ पासुन जकात वसुली स्वत:कडे घेतल्यापासुन जकात वसुलीबाबत खालील प्रश्नाची योग्य सुचक व समाधानकारक माहीती देवून चर्चा होवून योग्य खुलासा करण्याबाबत.
उल्हासनगर महानगरपालिकेने २५ जुलै, ०४ पासुन जकात वसुली स्वत:कडे घेतल्यापासुन ते आजतागायत प्रत्येक महिन्याला प्रत्येक दिवशी किती जकात वसुली झाली? त्याबाबत प्रत्येक महिन्याला प्रत्येक दिवशी झालेल्या जकात वसुलीचा तपशिल देण्यात यावी. तसेच सदर विषयावर योग्य चर्चा करून खुलासा व्हावा ही विनंती.
उत्तरः— उल्हासनगर महानगरपालिकेने २५ जुलै, ०४ पासुन जकात वसुली स्वत: कडे घेतल्यापासुन ते आजतांगायत पर्यंतच्या जकात वसुलीचा तपशील सोबत जोडत आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—उत्तर ठिक आहे.

यावेळी मा. सदस्य श्री नथु सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३५९ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

प्रश्न क्र. ३५९:— निक्को पॅलेसजवळ, सतगुरु एस.टी.डी. बुथला लागून, उल्हासनगर—३ येथिल तळमजला + चार माळयाचे इमारतीचे बांधकामाबाबत खालील प्रश्नांची सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.
१)सदर बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली आहे का?
२)सदर इमारत बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे का?
३)इमारतीत वाढीव बांधकाम केले आहे का?
४)असल्यास प्रत्येक माळयावर प्रत्येक सदनिकेत किती वाढीव बांधकाम आहे?
५)वाढीव बांधकामाबाबत महापालिकेने नोटीस बजावली आहे का? कोणत्या प्रकारची? तिचा कालावधी संपला का?
६)आजतागायत प्रशासनाने इमारतीवर कोणती कारवाई केली?
वरील आपल्या माहितीसाठी सादर.

उत्तर:— १) सदर इमारतीस या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा/नरवि/बांप/११२/०३/८३६, दिनांक २७.८.२००३ च्या पत्रान्वये बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आलेली आहे.
२) नाही.
३) होय.
४) सदर इमारतीमध्ये तळमजला + ४ माळयाचे मिळून एकूण ३१०.७९ चौ.मी. चे वाढीव बांधकाम आहे.
५) सदर इमारतीस दिनांक १८.१०.२००४ रोजी एमआरटीपी ॲक्टच्या कलम ५२,५३ ची नोटिस बजावण्यात आलेली आहे व तिचा कालावधी संपलेला आहे.
६) सदर इमारतीची सुनावणी सुरु आहे. यामध्ये निर्णय घेवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब आपण बोलता की आम्ही येथे काल्पनिक प्रश्न विचारतो. माझा जो प्रश्न आहे त्यामध्ये काल्पनिक काहीच नाही. मी एवढेच सांगु इच्छितो की आपण एवढे दिवस राहिलात, चांगले काम केले. आपले नाव सोनवणे आहे, माझे नाव देखिल सोनवणे आहे. हे जे सोनवणे असतात ते एकदम चांगले असतात. खोटे सहन करीत नाहीत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—हे होवु शकत नाही. सोनवणे साहेब वेगळे आहेत व नथु सोनवणे वेगळे आहेत.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—तुम्ही सत्य समोर आणण्यासाठी चांगले काम केले आहे. तुम्हाला यासाठी प्रतिसाद मिळाला नाही म्हणुन तुम्ही जात आहात.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—ते जात नाहीत. आयुक्त साहेब तीन वर्ष राहणार आहेत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—अजुन तीन वर्ष राहणार आहेत.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—आम्ही कोणाचीही इमारत तोडण्यासाठी कधीही आग्रह केला नाही. कर्मचा—यांना कळत नाही ज्या ठिकाणी दुरूस्ती सुरू असते त्या ठिकाणचे तोडण्यासाठी आधी जातात. हे आमचे दु:ख आहे. जे दुरूस्ती करतात ती केली नाही तर घर तुटून जाईल. मग त्याखाली दाबले जातील. मग मुख्यमंत्री येतील उपमुख्यमंत्री येतील, सर्व येतील. यासाठी तुटण्या अगोदर आपण दुरूस्ती करू दिली तर माणुस सुखाने झोपु शकतो. हीच आमची मागणी आहे. तुम्ही नेहमी म्हणता की आम्ही काल्पनिक प्रश्न विचारतो. जेव्हा माणसाला दु:ख होते, आपण गरीबाचे तोडण्यासाठी जाता. एवढे अनधिकृत बांधकाम होते ते आम्ही आपल्या नजरेसमोर आणण्याचा प्रयत्न करतो की आपण कारवाई करा. आपले यावर काय म्हणणे आहे याची मी चर्चा करू इच्छित नाही. तुम्हीच आम्हाला सांगा आम्ही काय करावे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः–</u>मा. महापौर महोदया, या प्रश्नाच्या उत्तरात दिले आहे की, ३१० चौ.मी. चे वाढीव बांधकाम झाले आहे. त्यांच्या विरूध्द एफ.आय.आर दाखल करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः–</u>ठिक आहे.

<u>मा. सचिवः–</u>प्रश्न क्र. ३६० हा श्रीमती नंदीनी बामणकर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३६०ः–</u> घनश्यामदास रोहरा यांचे बंगल्यासमोर, बॅ. नं. ६८१पूढे उल्हासनगर–२ येथे तळमजला + दोन माळयाच्या आर.सी.सी. इमारतीचे बांधकाम सुरु असून सदर बांधकामास महापालिकेने परवानगी दिली आहे काय?

परवानगी दिली असल्यास बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे का?

सदर बांधकामात वाढीव / अनाधिकृत बांधकाम आहे का?

सदरचे बांधकाम अनाधिकृत असल्यास संबधीत बिट निरिक्षकाने आजतागायत सदर बांधकामाविरुध्द कोणती कारवाई केली? का कारवाई केलीच नाही?

याचा अर्थ संबंधीत अनाधिकृत / वाढीव बांधकामास संरक्षण व सहकार्य करीत आहे असे समजावे का?

कारवाई न करणा–या बिट निरिक्षकावर प्रशासन काय कारवाई करणार?

इत्यादी प्रश्नाची सविस्तर, खुलासेवार माहिती मिळावी ही नम्र विनंती.

<u>उत्तरः–</u>बॅरेक नं. ६८१, पुढे उल्हासनगर–२ येंथे कोणतेही नविन बांधकाम चालू नाही.

या कार्यालयाची अभिलेख पडताळणी केली असता विषंयाकित जागेवर या विभागातर्फे कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी दिल्याचे आढळून येत नाही.

वरीलप्रमाणे.

सदरची माहिती उप–आयुक्त (अ.बां.नि.वि.) यांनी दिलेली आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती नंदीनी बामणकरः–</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिवः–</u>प्रश्न क्र. ३६१ ते ३६५ हे श्री.राजेंद्रसिंह भुल्लर यांचे आहेत.

<u>प्रश्न क्र. ३६१ः–</u> प्रेमनगर दरबारमागे, ब्लॉक नं. ए–७०७ मागे, उल्हासनगर–५ येथिल इमारत बांधकामाबाबत खालील विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्यात यावा ही नम्र विनंती.

अ) सदर इमारतीची सनद किती वॉल आहे? बांधकामासाठी किती वॉल सनद मंजूर झाली आहे? सदर इमारतीचा बांधकाम परवाना मंजूर आहे का? प्लॉन नं. व तारीख दयावी? सदर इमारतीने बांधकामाचा पायाभरणी दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला?

ब) सदर इमारतीने मारजीन (समास) सोडला आहे का? सदर इमारतीचे प्रत्येक मजल्यावर किती चौरस वॉल प्लॉन मंजूर आहे? सदर इमारत बांधकामात वाढीव बांधकाम झाले आहे का? असल्यास प्रत्येक मजल्यावर प्रत्येक सदनिकेत किती वाढीव बांधकाम झाले आहे?

क) सदर इमारतीने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला? सदर इमारतीत एकूण किती दुकाने व सदनिका आहेत?

ड) सदर इमारत अवैध व वाढीव बांधकाम असल्यास त्याबाबत कारवाई करण्यास कोणत्या प्रकारची नोटीस बजावली आहे का? नोटीस क्र. व तारीख दयावी?

फ) सदर इमारत बांधकामावर आजतागायत कोणती कारवाई केली आहे? कारवाई करण्यास विलंब का? यापूर्वी सदर इमारत बांधकाम तोडण्यात आले होते का?

<u>उत्तरः–</u>अ) सदर इमारतीची सनद ३०७.६८ चौ.मी. असुन बांधकामाचे क्षेत्र ३०७.३२ चौ.मी. मंजुर करण्यात आलेले आहे. सदर इमारतीचा प्लॉन नं. उमपा/नरवि/बांप/१०४/०३/८००, दिनांक २२.८.२००३ असून सदर इमारतीस पायाचा दाखला देण्यात आलेला नाही.

ब) सदर इमारतीमध्ये समोरील बाजूस व मागील बाजूस सामासिक अंतरे मंजुर नकाशाप्रमाणे सोडलेले असून बाजूचे सामासिक अंतरे ३.०० मी. ऐवजी २.९० मी. सोडलेले आहे. प्रत्येक मजल्यावर खालीलप्रमाणे बांधकामाचे क्षेत्र मंजुर करण्यात आलेले आहे.

| | |
|---|---|
| तळमजला | ९.४८ चौ.मी |
| पहिला मजला | १२३.९३ चौ.मी. |
| दुसरा मजला | १२३.९३ चौ.मी. |
| तिसरा मजला | ४९.५८ चौ.मी. |

विकासकाने तळमजल्यावर ७५.४१ चौ.मी. चे वाढीव बांधकाम केलेले आहे.

क) सदर इमारतीस बांधकाम पुर्णतेचा दाखला दिलेला नाही. सदर इमारतीमध्ये पहिला मजला ते तिसरा मजला मिळून एकूण ६ सदनिकांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

ड) सदरच्या वाढीव बांधकामास एमआरटीपी ॲक्टच्या कलम ५२,५३ अन्वये नोटिस बजावण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>उत्तर ठिक आहे.

<u>प्रश्न क्र. ३६२ः—</u> डॉबी नाश्तेवाला समोर, उल्हासनगर—३ या इमारत बांधकामासंबंधी येत्या महासभेत योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून सविस्तर खुलासा करण्यात यावा ही नम्र विनंती.

अ) सदर इमारतीची सनद किती वॉल आहे? बांधकामासाठी किती वॉल सनद मंजूर झाली आहे? सदर इमारतीचा बांधकाम परवाना मंजूर आहे का? प्लॉन नं. व तारीख दयावी? सदर इमारतीने बांधकामाचा पायाभरणी दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला?

ब) सदर इमारतीने मारजीन (समास) सोडला आहे का? सदर इमारतीचे प्रत्येक मजल्यावर किती चौरस वॉल प्लॉन मंजूर आहे? सदर इमारत बांधकामात वाढीव बांधकाम झाले आहे का? असल्यास प्रत्येक मजल्यावर प्रत्येक सदनिकेत किती वाढीव बांधकाम झाले आहे?

क) सदर इमारतीने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला? सदर इमारतीत एकूण किती दुकाने व सदनिका आहेत?

ड) सदर इमारत अवैध व वाढीव बांधकाम असल्यास त्याबाबत कारवाई करण्यास कोणत्या प्रकारची नोटीस बजावली आहे का? नोटीस क्र. व तारीख दयावी? फ) सदर इमारत बांधकामावर आजतागायत कोणती कारवाई केली आहे? कारवाई करण्यास विलंब का?

स) माहिती अधिकार अर्जानुसार दिनांक ८/११/२००४ रोजी मिळालेल्या उत्तरानुसार यु/३/४८३ नुसार नोटीस बजावली आहे. तर सदर नोटीसवर कोणती कारवाई केली?

<u>उत्तरः—</u> अ) सदर इमारतीस या विभागातर्फे कुठल्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यात आलेली नसल्यामुळे सदरची माहिती देता येत नाही.

ब) वरीलप्रमाणे

क) वरीलप्रमाणे.

ड) सदर बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये नोटिस बजावली आहे. दिनांक २०.१२.२००४ रोजी.

फ) सदर नोटिसीची मुदत संपल्यानंतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स) सदर बांधकामास कागदपत्र दाखविण्याची नोटिस बाजवली होती. त्याची कागदपत्र पडताळून त्याबाबत बांधकामास ५२ व ५३ अन्वये नोटिस बजावली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—</u>उत्तर ठिक आहे.

<u>प्रश्न क्र. ३६३ः—</u> उमपा/नरवि/बांप/११२/०३/८६३, बॅ. नं. १०६४, खो. क्र. १२, उल्हासनगर—३ या इमारत बांधकामासंबंधी येत्या महासभेत योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून सविस्तर खुलासा करण्यात यावा ही नम्र विनंती.

अ) सदर इमारतीची सनद किती वॉल आहे? बांधकामासाठी किती वॉल सनद मंजूर झाली आहे? सदर इमारतीचा बांधकाम परवाना मंजूर आहे का? प्लॉन नं. व तारीख दयावी? सदर इमारतीने बांधकामाचा पायाभरणी दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला?

ब) सदर इमारतीने मारजीन (समास) सोडला आहे का? सदर इमारतीचे प्रत्येक मजल्यावर किती चौरस वॉल प्लॉन मंजूर आहे? सदर इमारत बांधकामात वाढीव बांधकाम झाले आहे का? असल्यास प्रत्येक मजल्यावर प्रत्येक सदनिकेत किती वाढीव बांधकाम झाले आहे?

क) सदर इमारतीने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला? सदर इमारतीत एकूण किती दुकाने व सदनिका आहेत?

ड) सदर इमारत अवैध व वाढीव बांधकाम असल्यास त्याबाबत कारवाई करण्यास कोणत्या प्रकारची नोटीस बजावली आहे का? नोटीस क्र. व तारीख दयावी? फ) सदर इमारत बांधकामावर आजतागायत कोणती कारवाई केली आहे? कारवाई करण्यास विलंब का?

स) सदर इमारतीबाबत मला माहिती अधिकार अर्जानुसार दिनांक १३/१२/२००४ रोजी महापालिकेने सदर इमारतीत ३१०.७९ चौ.मी. वाढीव बांधकाम झाल्याबाबत व महाराष्ट्र प्रादेशिक नगरररचना अधिनियम १९६८ कलम ५२ व ५३ नुसार कारवाई सुरु असल्याचे उत्तर मिळाले आहे तर या नुसार सदर इमारत बांधकामावर कोणती कारवाई केली आहे?

<u>उत्तर:—</u>अ) सदर भुखंडाची सनद २२९.३७ चौ.मी. असुन बांधकामाचे क्षेत्र २२९.२२ चौ.मी. आहे. सदर इमारतीचा प्लॅन नं. उमपा/नरवि/बांप/११२/०३/७६३, दिनांक २७.८.२००३ असुन सदर इमारतीस पायाचा दाखला देण्यात आलेला नाही.

ब) सदर इमारतीमध्ये जागेवर मंजुर नकाशाप्रमाणे सामासिक अंतरे सोडलेली नाहीत. सदर इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर खालीलप्रमाणे बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आलेली आहे. त्यचाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| तळमजला | २०.०० चौ.मी. |
| पहिला मजला | ६९.६४ चौ.मी. |
| दुसरा मजला | ६९.६४ चौ.मी. |
| तिसरा मजला | ६९.६४ चौ.मी. |

सदर इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर खालीलप्रमाणे वाढीव बांधकाम झालेले आहे.

| | |
|---|---|
| तळमजला | ३६.०० चौ.मी. |
| पहिला मजला | ६९.५१ चौ.मी. |
| दुसरा मजला | ४१.५१ चौ.मी. |
| तिसरा मजला | ४१.५१ चौ.मी. |
| तळमजला | ५६.७० चौ.मी. |

क) सदर इमारतीस बांधकाम पुर्णत्वेचा दाखला देण्यात आलेला नाही. सदर इमारतीमध्ये दुकाने मंजुर करण्यात आलेली नसुन ३ सदनिकांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

ड) सदर इमारतीस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये नोटिस बजावली आहे. त्याची दिनांक १८.१०.२००४ आहे.

फ) सदर इमारतीची नोटिशीची मुदत संपल्यानंतर सदर इमारतीची सुनावणी सुरु आहे. त्यामध्ये निर्णय घेवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स) सदर इमारतीची नोटिस बजावल्यानंतर सुनावणी सुरु असून त्यात निर्णय घेवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u>उत्तर ठिक आहे.

<u>प्रश्न क्र. ३६४:—</u> बॅ. नं. ३८५, पोस्ट ऑफीसजवळ, उल्हासनगर—१ येथिल इमारत बांधकामाबाबत खालील विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्यात यावा ही नम्र विनंती.

अ) सदर इमारतीची सनद किती वॉल आहे? बांधकामासाठी किती वॉल सनद मंजूर झाली आहे? सदर इमारतीचा बांधकाम परवाना मंजूर आहे का? प्लॉन नं. व तारीख दयावी? सदर इमारतीने बांधकामाचा पायाभरणी दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला?

ब) सदर इमारतीने मारजीन (समास) सोडला आहे का? सदर इमारतीचे प्रत्येक मजल्यावर किती चौरस वॉल प्लॉन मंजूर आहे? सदर इमारत बांधकामात वाढीव बांधकाम झाले आहे का? असल्यास प्रत्येक मजल्यावर प्रत्येक सदनिकेत किती वाढीव बांधकाम झाले आहे?
क) सदर इमारतीने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला? सदर इमारतीत एकूण किती दुकाने व सदनिका आहेत?
ड) सदर इमारत अवैध व वाढीव बांधकाम असल्यास त्याबाबत कारवाई करण्यास कोणत्या प्रकारची नोटीस बजावली आहे का? नोटीस क्र. व तारीख दयावी?
फ) सदर इमारत बांधकामावर आजतागायत कोणती कारवाई केली आहे? कारवाई करण्यास विलंब का? यापूर्वी सदर इमारत बांधकाम तोडण्यात आले होते का?

उत्तर:— अ) सदर इमारतीची सनद ८०.२७ चौ.मी. असुन बांधकामाचे क्षेत्र ७९.८४ चौ.मी. मंजुर करण्यात आलीले आहे. सदर इमारतीचा प्लॅन नं. उमपा/नरवि/बांप/४८/०४/३११, दिनांक ६.११.२००४ असुन सदर इमारतीस पायाचा दाखला देण्यात आलेला नाही.
ब) सदर इमारतीमध्ये सामासिक अंतरे मंजुर नकाशाप्रमाणे सोडलेली नाहीत. प्रत्येक मजल्यावर खालीलप्रमाणे बांधकामाचे क्षेत्र मंजुर करण्यात आलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| तळमजला | ५.०४ चौ.मी. |
| पहिला मजला | ४४.०० चौ.मी. |
| दुसरा मजला | ३०.८० चौ.मी. |

सदर इमारतीस बांधकाम पुर्णत्वतेचा दाखला दिलेला नाही. सदर इमारतीमध्ये दोन सदनिका मंजुर करण्यात आलेल्या आहेत.
ड) सदरच्या वाढीव बांधकामाबाबत एमआरटीपीचे कलम ५२,५३ अन्वये नोटिस बजावण्यात आलेली आहे.
क) वरीलप्रमाणे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—उत्तर ठिक आहे.

प्रश्न क्र. ३६५:— ब्लॉक नं. ए—७५६, रुम नं. १५१०, प्रणिता इमारत लगत, उल्हासनगर—५ येथिल गुलशनसिंह नामक व्यक्तीचे इमारत बांधकामाबाबत खालील विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्यात यावा ही नम्र विनंती.

अ) सदर इमारतीची सनद किती वॉल आहे? बांधकामासाठी किती वॉल सनद मंजूर झाली आहे? सदर इमारतीचा बांधकाम परवाना मंजूर आहे का? प्लॉन नं. व तारीख दयावी? सदर इमारतीने बांधकामाचा पायाभरणी दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला?

ब) सदर इमारतीने मारजीन (समास) सोडला आहे का? सदर इमारतीचे प्रत्येक मजल्यावर किती चौरस वॉल प्लॉन मंजूर आहे? सदर इमारत बांधकामात वाढीव बांधकाम झाले आहे का? असल्यास प्रत्येक मजल्यावर प्रत्येक सदनिकेत किती वाढीव बांधकाम झाले आहे?

क) सदर इमारतीने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का? कोणत्या तारखेला? सदर इमारतीत एकूण किती दुकाने व सदनिका आहेत?

ड) सदर इमारत अवैध व वाढीव बांधकाम असल्यास त्याबाबत कारवाई करण्यास कोणत्या प्रकारची नोटीस बजावली आहे का? नोटीस क्र. व तारीख दयावी?

फ) सदर इमारत बांधकामावर आजतागायत कोणती कारवाई केली आहे? कारवाई करण्यास विलंब का? यापूर्वी सदर इमारत बांधकाम तोडण्यात आले होते का?

उत्तर:—अ) सदर इमारतीची सनद ६१८.१२. चौ.मी. असुन बांधकामाचे क्षेत्र ६१६.९७ चौ.मी. मंजूर करण्यात आलेले आहे. सदर इमारतीचा प्लॅन नं. उमपा/नरवि/बांप/१५७/०२/६३ , दिनांक २५.४.२००३ असुन सदर इमारतीस पायाचा दाखला देण्यात आलेला नाही.

ब) सदर इमारतीमध्ये समोरील बाजुस ४.५० मी. ऐवजी ४ मी. मागील बाजूस ७.७५ मी. ऐवजी १ मी. ते ७.७० व डाव्या बाजूस ३.५० मी. ऐवजी ३.१० मी. व उजव्या बाजुस ३.५० मी. ऐवजी २.१० मी. सामासिक सोडलेला अंतरे आहे. सदर इमारतीमध्ये प्रत्येक मजल्यावर खालीलप्रमाणे बांधकाम क्षेत्राची मंजुरी देण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| तळमजला | ४१.७४ चौ.मी. |
| पहिला मजला | १५५.२७ चौ.मी. |
| दुसरा मजला | १५५.२७ चौ.मी. |
| तिसरा मजला | १५५.२७ चौ.मी. |
| चौथा मजला | ८७.०६ चौ.मी. |
| अतिरिक्त बाल्कनी | १६.३७ चौ.मी. |

विकासकाने सदर इमारतीमध्ये तळमजल्यावरील दुकानांचे २७.७७ चौ.मी. चे वाढीव बांधकाम केलेले आहे.

क) सदर इमारतीस बांधकाम पुर्णतेचा दाखला दिलेला नाही. सदर इमारतीमध्ये एकुण ४ दुकाने व १४ सदनिका मंजुर करण्यात आलेले आहे.

ड) सदरच्या वाढीव बांधकामास एमआरटीपी ॲक्टची नोटिस बजावण्यात आलेली आहे.
फ) वरीलप्रमाणे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—उत्तर ठिक आहे.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३६६ हा श्री. विनोद ठाकुर यांचा आहे.

प्रश्न क्र. ३६६:— प्रभाग क्र. २० मधील जुना बस स्टॉप, उल्हासनगर—५ येथे चालू स्थितीत असणारे शौचालय व मुत्री महानगरपालिकेची कोणतीही पूर्व सुचना व परवानगी न घेता कोणाच्या सांगण्यावरुन तोडण्यात आले. तसेच सदर ठिकाणी अंदाजे दहा महिनेपूर्वी महानगरपालिकेने किमान एक लाख रुपये (१,००,०००/—रु.) दुरुस्तीसाठी खर्च केले आहेत. त्यास जबाबदार कोण?

त्या एक लाख रुपयांची भरपाई कोण भरणार?

उत्तरः— सदर शौचालय महापालिकेची परवानगी न घेता तोडल्याबद्दल संबंधीत स्वंयसेवी संस्थेस नोटिस बजावण्यात आली असून कार्यवाही सुरु आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः—मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, १६ नंबर शाळेच्या बाजुला जे एक चांगले शौचालय बाजारात होते ते अचानकपणे तोडण्यात आले आहे. जेव्हा याची चौकशी केली तेव्हा ते कोणी तोडले ते समोर आले नाही. का तोडण्यात आले याचा जरा खुलासा करा? कुणाच्या सांगण्यावरून तोडण्यात आले?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी यावर मी देखिल एक उपप्रश्न विचारू इच्छितो. १६ नंबर शाळेच्या बाजुला जी मुतारी होती ती तोडुन सुलभ शौचालय बनविण्यासाठी ज्या ठेकेदाराने तोडले त्याच ठेकेदाराने माझ्या प्रभागात देखिल चार महिन्यापुर्वी वसणशहा दरबारच्या समोर जुनी मुतारी तोडली व सांगितले की नविन बनवु. चार महिन्यांपासुन तोडले आहे व नविन देखिल बनविले नाही. जर तो ठेकेदार बनवत नसेल तर कमीत कमी त्याच्याकडुन पैसे परत घेवुन जसे चौदा बैठकीचे शौचालय होते तसे पुन्हा बनविण्यात यावे तसेच त्या ठिकाणी एक मुतारी देखिल होती.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः—</u>मा. महापौरजी, आजमीतीस तेथे सहा फुटाचा खड्डा केलेला आहे. तेथे शाळा आहे. शाळेतील मुले, कुणी माणुस त्या खड्डयात पडल्यास त्यासाठी जबाबदार कोण राहील?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः—</u>मा. महापौरजी, सुलभ शौचालयाबाबत माझे मित्र श्री. विनोद ठाकुर यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याआधी जवळपास चार महिन्यांपुर्वी मी आयुक्तांशी या विषयावर बोललो होतो. त्यांना याची माहिती दिली होती परंतु त्यांना देखिल याची माहिती नव्हती की तेथे महापालिकेने एक लाख रूपये खर्च करून चांगली मुतारी बनविली होती. त्यानंतर साहेबांनी मला नविन उपायुक्तांना भेटायला सांगितले. उपायुक्तांनी मला पत्र दिले की आम्ही ठेकेदाराला नोटीस दिली आहे व २८ तारखेला कामास सुरूवात होईल. २८ तारखेनंतर मी पुन्हा आयुक्तांकडे गेलो व सांगितले की २८ तारीख झाली आहे. आता काय करणार. त्यांनी मला पुन्हा उपायुक्तांना भेटण्यास सांगितले. जेव्हा मी उपायुक्त आरोग्य यांच्याकडे गेलो तेव्हा त्यांनी मला आयुक्तांना भेटण्यास सांगितले. मी विचारले का तर त्यांनी सांगितले की ठेकेदार म्हणत आहे मला आयुक्तांनी आश्वासन दिले होते की, आम्ही एवढी जागा देवु व आता जागा देवु शकत नाही. म्हणुन हे सुलभ शौचालय तयार होवु शकत नाही. मला हे कळुन येत नाही की सुलभ शौचालय कुणाच्या सांगण्यावरून बनविले त्याला कार्यादेश आहे की नाही. उपायुक्त आरोग्य सारखे जबाबदार अधिकारी पत्र लिहुन असे उत्तर देतात व शेवटी सांगतात की आयुक्तांना जावुन भेटा. जर सुलभ शौचालय बनविण्यासाठी अशाप्रकारे मनमानी सुरू राहील. दुसरे प्रभात टॉकीज शेजारी देखिल अशीच परिस्थिती आहे. चार महिन्यापुर्वी तेथे खोदुन ठेवले आहे. मुले पडतात. उपायुक्तांना आम्ही असे सांगतो तर त्याचे काहीच उत्तर मिळत नाही. महापालिकेला तेथे मोठा अपघात व्हावा असे वाटते का? तेथे एखादा लहान मुलगा पडल्यावर महापालिकेचे लक्ष जाईल काय? मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की तेथे सुलभ शौचालयाचे काम कधी सुरू होईल हे सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः—</u>मा. महापौरजी, हे शौचालय तोडण्यापुर्वी महापालिकेने त्यावर एक लाख रूपये खर्च केलेले आहेत. त्याचे सुशोभिकरण करून त्याला टाईल्स लावुन त्याची दुरूस्ती केली होती. त्यानंतरही हे तोडण्यात आले आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्तः—</u>मा. महापौर महोदया, हे खरे आहे की शाळा नं. १६ च्या बाहेर जी एक सार्वजनिक मुतारी बनविण्यात आली होती. जवळ पास एक लाख रूपये खर्च करून बनविण्यात आली होती. ती तोडण्यात आली. व तेथे पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बनविण्यासाठी आदेश देण्यात आले होते. दोन संस्थांमध्ये आपसात भांडण झाल्याने हा विवाद निर्माण झाला आहे. येथे महापालिकेचे रू. १ लाखाचे नुकसान झाले हे खरे आहे. परंतु ते नुकसान ठेकेदाराकडुन वसुल करण्यात येईल. ठेकेदारास समक्ष बोलवुन समजावण्यात आले आहे. ते एक लाख रूपये वसुल केले जातील. आपणा सर्वांना माहिती आहे, ब—याच लोकांनी या पैसे दया व वापरा या तत्वावरील शौचालयांचे प्रश्न उपस्थित केले आहेत. तर याबाबतीत आपणांस माहिती देणे मला आवश्यक वाटते. उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रात जवळपास ७०० सार्वजनिक शौचालये आहेत. त्यामध्ये ७००० बैठका आहेत. त्यापैकी बरेचसे शौचालय हे ज्यावेळेला येथे मिलिटरीच्या बॅरेक्स बनविल्या त्यावेळी त्यासोबत बनविण्यात आले होते. व नंतर त्या बॅरेक्स जेव्हा निर्वासितांना देण्यात आल्या त्यावेळी त्यांच्यासाठी त्या शौचालयांचा उपयोग करण्यात येत होता. येथे आमच्याकडे निधी नसल्यामुळे राज्य सरकारच्या धोरणाप्रमाणे पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बनविण्यासाठी येथे प्रस्ताव ठेवला होता. त्यांनतर लोकांकडुन अर्ज, ज्या सेवाभावी संस्था आहेत त्यांच्याकडुन अर्ज मागविले होते. त्यानुसार शहरात जवळपास ६० जागांवर सार्वजनिक शौचालये बनविण्याचा महापालिका प्रशासनाचा प्रयत्न होता. आपण या शहरात जेथे देखिल जाल तर जे मुख्य रस्ते आहेत त्या रस्त्यांवर उघडयावर मलविसर्जन करण्याचे प्रकार आपणांस दिसुन येतील. मग तो पवईचा चौक असो अथवा शांतीनगर येथील साईबाबा मंदीरापुढील रस्ता असो अशा ब—याच जागा आहेत जेथे उघडयावर मलविसर्जन केले जात होते. आपली जुनी शौचालये एवढी घाणेरडी होती की लोक त्यांचा वापर करण्या ऐवजी उघडयावर मी उदाहरण देतो गजानन मार्केट येथे बाहेर लोक उघडयावर लघुशंका करायचे. हे सर्व थांबविण्यासाठी पैसे दया व वापरा या तत्वावर शौचालय बनविण्यासाठी महासभेसमोर प्रस्ताव सादर केला. महासभेने त्याला मान्यता दिली.त्यानंतर वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवुन अर्ज मागविले. त्याला फार चांगला प्रतिसाद मिळाला. चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर वाटप करताना काही अडचणी आल्या व काही चुका देखिल झाल्या. मला येथे मानावे लागेल की वाटप करताना काही चुका झाल्या. दोन तीन संस्थांचे आपसात भांडण असल्याने थोडा त्रास झाला. परंतु मी त्या सर्व संस्था समवेत दोन वेळा बैठक घेवुन सर्व अडचणी दुर केल्या आहेत. शाळा क्र. १६ समोरील जे शौचालय आहे. त्याचे पुर्ननिर्माण करण्यात येईल. तेथे शाळेसाठी वेगळे शौचालय व मुतारी

बनविण्यात येईल. तेथील दुकानदारांसाठी पैसे दया  व वापरा या तत्वावर वेगळे शौचालय व मुतारी बनविण्यात येईल. शाळेसाठी जे शौचालय बनविण्यात येईल त्याचा खर्चही संस्थाच करेल. जे नुकसान झाले आहे ते अशाप्रकारे भरून काढण्यात येईल. उर्वरित शौचालयांचे शहरात काम सुरू आहे व मला वाटते की ते लवकरात लवकर पुर्ण होईल. आपणास कदाचित माहिती नसेल जे ६० शौचालय आम्ही बनवित आहोत त्यासाठी जवळपास रूपये ३ कोटी एवढा खर्च अपेक्षीत होता जर महापालिकेने बनविले असते तर. आमच्याकडे निधी नसल्याने हा एकच मार्ग आमच्याकडे होता. आता जवळपास ६० ठिकाणी आम्ही शौचालये बनवित आहोत. मुख्यतः बाजारांच्या ठिकाणी हे काम सुरू आहे. या शौचालयांच्या बांधकामांसाठी रूपये ३ कोटी एवढा निधी सेवाभावी संस्था देत आहेत. महापालिकेच्या निधीतुन एक रूपयाचाही खर्च होणार नाही. व शहराची जी मोठी समस्या आहे तीच्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. अंमलबजावणी करताना त्यामध्ये काय चुका राहण्याचा संभव असु शकतो. आता जेवढया चुका झाल्या आहेत त्या सुधारून पुढील काम करण्याची खात्री आमचे नविन उपायुक्त श्री. आरोटे साहेब हे देतील.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुरः—मा. महापौरजी, शहरात सध्या वांम्बी योजने अंतर्गत काही नविन शौचालये तयार करण्यात आली आहेत. ती शौचालये देखिल रूपये ४ ते ५ लाख खर्च करून ब—याच ठिकाणी बनविली आहेत. ती शौचालये देखिल देखभालीसाठी एखादया संस्थेस दिल्यास सुस्थितीत राहु शकतील अन्यथा त्यांची अवस्थाही खराब होईल.

मा. प्रभारी आयुक्तः—मा.महापौर महोदया, वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत जो निर्मल भारत अभियान म्हणुन जो घटक आहे. त्या घटकाच्या माध्यमातुन आम्हाला २८६ बैठकांचे शौचालयांचा निर्माण करण्यासाठी निधी प्राप्त झाला होता. रू. १.१४ कोटी. २८६ बैठकांच्या शौचालयांचे काम आम्ही काही ठिकाणी सहा बैठका, काही ठिकाणी दहा बैठका अशा २९ जागांवर शौचालयांचे काम सुरू केले होते. त्यापैकी जवळपास २२ जागांचे काम पुर्ण झाले आहे. सहा ठिकाणी जागा उपलब्ध न झाल्याने काम सुरू होवु शकले नाही. तेथे देखिल आता जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या २२ ठिकाणी आम्ही शौचालये बनविली आहेत ती व्यवस्थितरित्या चालविण्यासाठी श्री. विनोद ठाकुर यांच्याकडुन जो आता प्रस्ताव आला आहे. त्या प्रस्तावावर विचार करण्यात येईल. सेवाभावी संस्थानाच या कामासाठी विनंती केली जाईल की या शौचालयांची देखभाल आपणच करावी.

मा. सचिवः—प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—आयुक्त साहेब एक माहिती हवी होती आपल्या येथे बोगस सनदेवर नकाशे मंजुर केले जातात. तसेच जे पडताळणीचे पत्र असते ते देखिल बोगस आहे. तर अशा व्यक्तींवर काय कारवाई व्हायला हवी. ज्यांनी पास केला आहे व अधिकारी यांच्याविरूध्द काय कारवाई करणार. विधी अधिकारी यांनी अभिप्राय दयावा. महापौरजी जरा त्यांना सांगण्यासाठी निर्देश दयावेत. आज सर्व प्रश्न संपले हे चांगले झाले. महापौरांचे पाय लागले आणि नविन अभ्यास सुरू झाला. आम्हाला फक्त माहिती हवी आहे की बोगस सनदेवर आमच्या येथे परवानगी मंजुर झाली आहे. तसेच त्या सनदेचे पडताळणीचे पत्रही खोटे आहे. आपल्या महापालिकेत असे झाले आहे. ते कोण आहेत ते मी नंतर सांगेन आता सांगितले तर फायदा नाही.

मा. उपमहापौरः—तुम्ही आधी प्रकरण घेवुन या मग उत्तर देवु.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—विधी अधिकारी म्हणुन माहिती तर देवु शकतात ना?
मा. उपमहापौरः—हा विषय नाही आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—विषय नसला म्हणुन काय झाले माहिती तर घेवु शकतो ना?

मा. उपमहापौरः—कृपया आपण आधी विस्तृत माहिती घेवुन या नंतर बोला.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः—हे प्रकरण लक्षवेधी सूचनेद्वारे आणावे लागेल असे वाटते. कारण प्रश्नोत्तरात बराच वेळ जाईल.

<u>मा. सचिव:—</u>इकडे जे नविन अधिकारी उपस्थित आहेत त्यांची मी तुम्हाला ओळख करून देतो. श्री. संदीप आरोटे हे येथे उपायुक्त म्हणुन कार्यरत आहेत व श्री. ढेंगळेपाटील हे सहाय्यक आयुक्त म्हणुन काम करत आहेत त्यांनी कृपया मंचावर यावे व त्यांनी स्वत:ची ओळख करून दयावी.

**मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>श्री. संदीप आरोटे (उपायुक्त आरोग्य):—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, २० जानेवारी २००५ रोजी मी उपायुक्त म्हणुन येथे हजर झालो. माझे मुळगाव अहमदनगर जिल्हयातील अकोला येथे आहे. आयुक्त साहेब संगमनेरचे आहेत त्याच्या बाजुलाच अकोला आहे. ते पण आमच्याच जिल्हयाचे आहे. असे वाटते माझे शिक्षण संगमनेर येथे झाले. तेथे पदवी शिक्षण, बी.एस.सी. ॲग्रीकल्चर कोल्हापुर युनिव्हसिटी त्यानंतर पोस्ट गॅज्युएशन एम.एस.सी. ॲग्रीकल्चर इन केमेस्ट्री राहुरी कृषी विद्यापीठ, अहमदनगर येथे झाले. माझी पहिली नियुक्ती मंत्रालयात झाली. १९९३—१९९५ पर्यंत नंतर तहसिलदार म्हणुन धुळयाला दोन वर्ष होतो. १९९७ साली मी नाशिक येथे तहसिलदार म्हणुन होतो त्यांनतर दिंडोरी तहसिल नंतर संगमनेर येथे तहसिलदार होतो. त्यानंतर २००० साली माझी बढती झाली. भंडारा येथे डेप्युटी कलेक्टर होतो. त्यांनतर १ नोव्हेंबर २००१ पासुन येथे उल्हासनगरमध्ये एस.डी.ओ. म्हणुन कार्यरत होतो. माझी तर सर्वांशी ओळख आहे. बहुतेक करून सर्व मला ओळखत असतील. तिकडे मी खुप चांगले काम करण्याचा प्रयत्न केला. इकडे पण मी तसा प्रयत्न करेन तुम्ही पण मला पुर्ण सहकार्य दयाल. मला वाटते एवढी माझी ओळख भरपुर आहे. माझ्याकडे आता आरोग्य आणि वसुली हे दोन्ही विभाग आहेत. व मी माझ्याकडुन असेच प्रयत्न करेन की जास्तीत जास्त चांगले काम महापालिकेत करेन. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>हे म्हणावे लागेल की श्री. आरोटे साहेबांना कोण ओळखत नाही.

<u>श्री. ढेंगळेपाटील (सहाय्यक आयुक्त):—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, आयुक्त साहेब मी ज्यंबक कृष्णकांत ढेंगळेपाटील मी ९ मार्च पासुन सहाय्यक आयुक्त म्हणुन येथे रूजु झालो आहे. आता जो विभाग कोणाला आवडत नाही त्या विभागाचे जे प्रश्न होते त्या विभागाचा अतिरिक्त कार्यभार, उपायुक्त अतिक्रमण विभाग म्हणुन मला सोपवला आहे. साहेबांनी ज्या विश्वासाने माझ्यावर ही कामगिरी सोपवली आहे त्याला मी चांगल्या त—हेने न्याय देण्याचा प्रयत्न करेन. माझे शिक्षण पुणे येथे बी.एस.सी. ॲग्री झाले आहे. राहुरी येथे एम.एस.सी ॲग्री जेनेटीक्समध्ये केले आहे. पाच सहा महिने राहुरी येथे रिसर्च म्हणुन काम केले. नंतर मुख्याधिकारी म्हणुन जळगाव येथे, कोल्हापुर येथे व शेवटी उस्मानाबाद नगरपरीषदेत काम केले आहे. आता ९ मार्च पासुन येथे आलो आहे. नविन आहे. महापालिकेच्या कामाचा काही अनुभव नाही. इथे जी आयुक्त साहेबांची भुमिका आहे. मुख्याधिकारी म्हणुन नगरपरीषदेत आम्ही पार पाडली आहे. नविन वातावरण आहे. परंतु अनुभव आमच्या सोबत आहे. म्हणुन पुर्ण जबाबदारीने काम करू इच्छितो. धन्यवाद.

<u>मा.सचिव:—</u>एक लक्षवेधी सूचना आहे. याचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदक आहेत श्री. लाल पजांबी.

<u>लक्षवेधी सूचना:—</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

<u>विषय :—</u> १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात जकात वसुलीत झालेल्या प्रचंड तफावतीत जबाबदार असणा—या संबंधित अधिका—यांवर कारवाई करणेसाठी लक्षवेधी

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेने २५ जुलै, २००४ पासुन जकात वसुली स्वत:कडे घेतल्यापासुन जकात वसुलीमध्ये दर महिन्यात तफावत दिसुन येते. विशेषत: १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या दरम्यान जकात वसुली कमी प्रमाणात झाली आहे. तर चालू महिन्यात जकात वसुली मोठया प्रमाणात वसुली झाली आहे. सदर जकात वसुलीमध्ये झालेल्या तफावतीस व महापालिकेचा प्रचंड प्रमाणात बुडालेल्या

महसुलास जबाबदार असणा—या अधिका—यांवर कारवाई करण्यात यावी. सदर विषयावर सविस्तर चर्चा करुन खुलासा करावा व संबंधित अधिका—यावंर कारवाई करावी ही विनंती.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब व सन्माननिय सदस्य ही लक्षवेधी आम्ही १८ डिसेंबरला दिली होती व ती सभा दोन वेळा स्थगित झाली. ती सभा आज होत आहे. ही मुळ लक्षवेधी आम्ही डिसेंबर महिन्यात दिली होती. मुद्दा हा होता की, नोव्हेंबर महिन्यात आम्ही सर्वांनी पाहिले की, जकातीची जी वसूली आहे ती कमी झाली. यापूर्वी जो महिना होता ऑक्टोंबर व त्यानंतर नोव्हेंबर नंतर महिना होता डिसेंबर त्यात वसूली चांगली झाली. परंतु डिसेंबर महिन्यात जसे मी सांगितल्याप्रमाणे त्या दोन महिन्यात वसूली फार कमी झाली. पूर्वी २० लाख रुपये एव्हरेज वसूली होती. नोव्हेंबर मध्ये ती कमी होवून ३० दिवसाचे ६ करोड यायला पाहिजे होते. परंतु ती ४ करोड ६० लाख एवढी झाली. म्हणजे दिड करोड कमी म्हणजेच दिड करोडचे महापालिकेला नुकसान झाले. आणि ते पाहून जकात विभागाचा कार्यभार श्री. प्रकाश कुकरेजा, सचिव व विधी अधिकारी यांना सोपविण्यात आला, उपायुक्त जकात म्हणून. कारण हे होते की, नोव्हेंबर महिन्यात जकात वसूली खूपच कमी झाली. काही वेळा पूर्वी आपण पाहिले की, विनोद ठाकुर यांचा प्रश्न होता की, १ लाख रुपयाचे ठेकेदाराने नुकसान केले. त्याची भरपाई झाली पाहिजे. इकडे दिड करोड जकात वसूली कमी झाली. एवढे मोठे नुकसान होवून देखील कोणत्याही अधिका—यावर कसल्याही प्रकारची कार्यवाही देखील झाली नाही. १ लाखाच्या नुकसाना नंतर आपण कार्यवाही करावी अशी अपेक्षा करतो. परंतु महापालिकेचे दिड करोड नुकसान झाले. त्या विषयी आपण कधी विचार करीत नाही. हि महासभा २३ जानेवारीला स्थगित झाली होती. त्यानंतर झाली नाही. म्हणून आम्ही आयुक्त साहेबांना भेटलो आणि आम्ही मागणी केली की, याविषयी चौकशी झाली पाहिजे व जो कोणी दोषी अधिकारी आहे, त्यावेळी बहुतेक श्री. राजु कुकरेजा अधिकारी होते. आम्ही कुणा एका अधिका—याविषयी बोलत नाही. अजून काही लोकांचा त्यात समावेश असेल. त्यावेळी आम्ही सांगितले होते की, ट्रान्सफर करणे हा काही उपाय नाही किंवा शिक्षा नाही. त्यात दिड करोडच्या झालेल्या नुकसानी बाबत व्यवस्थित चौकशी झाली पाहिजे. त्यावेळी आयुक्त साहेबांनी त्या चौकशीची मागणी मान्य केली होती. परंतु आम्हांला कळले की, ती चौकशी आहे, ती अशीच पडून आहे. व कुणीही अधिकारी त्याबाबत गंभीर नाही. व ती जी चौकशी आहे, ती जशी आहे तशीच पडुन आहे. तर आम्ही या माध्यमाद्वारे सांगु इच्छितो की, ती चौकशी झाली पाहिजे. व नंतर त्यावर कार्यवाही देखील झाली पाहिजे. जे पण कर्मचारी त्यात दोषी आढळल्यास दीड करोडचे नुकसान केल्या बद्दल त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे. आणि विशेष करुन हे आमचे जे आयुक्त साहेब आहेत. ज्यांनी जकात वसूलीसाठी म्हणून कल्याण महापालिकेत नाव कमावले होते. पुर्ण महाराष्ट्रात त्यांचे नाव झाले होते. तर आमचे इच्छा आहे त्यांच्या कार्यकालात दोषी अधिका—यांवर कार्यवाही झाली पहिजे एवढे आमचे म्हणणे आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, ही जी वसूली कमी झाली आहे ती दर रविवारीच झाली आहे. त्या पूर्वीच्या महिन्यात ऑक्टोंबर महिन्यात तुम्ही पाहिले तर दर रविवारी जकात वसूलीची रक्कम बरोबर यायची. आणि नोव्हेंबर मध्ये सरळ अडीच लाख होतात. सहा लाखाचे ५ लाख होतात. हे समोरासमोर दिसते. त्या दिवशी कोण—कोण अधिकारी होते कामावर, रविवारी. त्या तारखाचे तुम्ही आधी डिटेल्स काढा. त्या अधिका—यांवर जरुर कारवाई झाली पाहिजे. ६०—७० लाख तर त्यांनीच गायब केले आहेत. रविवार—रविवार दाखवून. ऑक्टोंबर महिन्यात पाहिले तर वसूली बरोबर आहे. नोव्हेंबर मध्ये दर रविवारी त्यांनी वसूली कमी दाखविली आहे. तुम्ही काय करणार त्या अधिका—यावर कार्यवाही ? दोन लाख एवढी कमी वसूली झाली. तुमचे लक्ष नाही का गेले? २० लाखाचे २ लाखावर रक्कम आली तरी तुमचे लक्ष नाही गेले. दिड करोडचा घोटाळा करुन देखील तुम्ही त्यांना कामावर ठेवले आहे. नंतर तुम्ही दुसरा अधिकारी नियुक्त करतात, त्या पूर्वी तुमचे डोळे का नाही उघडले? १२ तारखेला ८ लाख , १३ तारखेला ६ लाख, १४ तारखेला २ लाख आहे. १५ ला ६ लाख आहे. तुम्ही कोठे होता साहेब, तुम्ही तर महापालिकेतच होता ना? तुमचे लक्ष तर गेले असेल ना या गोष्टीकडे तुमची टयुब उशिरा का पेटली? तुम्ही नंतर का अधिकारी नियुक्त केले? जेव्हा दोन लाख रिकव्हरी आली तेव्हाच तुम्हांला समजायला पाहिजे होते की, येथे काहीतरी घोटाळा होत आहे. तुम्ही उत्तर दया.

मा. उप—महापौर सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> आधी तुमचे सर्वांचे बोलणे होवू दया, मग मी नंतर उत्तर देतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मी बोललो ना, दोन लाख आल्यावर सुध्दा तुमची टयुब नाही पेटली का? काय कार्यवाही केली आहे? आमच्या समोर जर फलक लागला की, २० लाख रुपये रोज येतात आहे, नंतर थेट २ लाखाची संख्या समोर येते. तर आमची टयुब पेटणार नाही का? २० लाखाचे २ लाख कसे झाले? कुठे गेले १८ लाख रुपये? कोण—कोण सामील आहेत त्यांची नावे येथे दिली जावीत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> मा. महापौरजी, आम्ही आयुक्तांना २८ जानेवारी, २००५ रोजी या बाबतीत एक पत्र दिले होते. जे सहा कर्मचारी निलंबित केले गेले. त्यांना बिना चौकशीचे कसे घेण्यात आले? अजून चौकशी झाली नाही आणि आम्हांला माहित पडले तुम्ही त्यांना कामावर घेतले. मी आयुक्तांकडुन या बाबतीत खुलासा मागतो.

<u>मा. उप—महापौर :—</u> जर कुणाला या विषयाबाबत अजून बोलायचे तर त्यांनी अजून बोलावे.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u>मा. महापौर महोदया, माझी सदनाला विनंती आहे की, ज्या सदस्याला या विषयावर बोलायचे आहे त्यांनी आधी बोलावे , नंतर मी पुर्ण उत्तर देवू शकेल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> असे होवू शकते, तुमचे उत्तर मिळाल्यावर पुन्हा त्या मुद्दयावर चर्चा करावी लागेल.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> तुमचे नंतर प्रश्न असतील ती गोष्ट वेगळी आहे, पण आधी तुमचे प्रश्न कळू दया.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> ऑक्टोंबर महिन्यातील रविवार पहा, आणि नोव्हेंबर महिन्यातील रविवार पहा मग तुमच्या समोर पुर्ण दृश्य येईल.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> मला वाटते मी उत्तर दिल्यानंतर तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे जी तुम्ही नंतर पण विचारणार असाल तर ती पण उत्तरे मिळतील. मा. महापौर महोदया, २५ जुलै, २००४ पासून महापालिकेने जकात वसूलीचे काम हाती घेतले. जुलैच्या पहिल्या आठवडयात १ करोड १९ लाख वसूली केली. ऑगस्ट २००४ मध्ये ४ करोड ६५ लाख वसूली केली. सप्टेंबर २००४ मध्ये ५ करोड ६९ लाखाची वसूली झाली. ऑक्टोंबर मध्ये ६ करोड ५५ लाखाची वसूली झाली. नोव्हेंबर मध्ये ४ करोड ६० लाखाची वसूली झाली. डिसेंबर मध्ये ६ करोड २१ लाखाची वसूली झाली. जानेवारी, २००५ मध्ये ५ करोड ७७ लाख व फेब्रुवारी, २००५ मध्ये ५ करोड ५ लाखाची वसूली झाली. आणि आता २९ मार्च पर्यंतची संख्या जी माझ्या हातात आहे, ४ करोड ९१ लाख ही संख्या आहे. जर तुलना केली तर नोव्हेंबर मध्ये वसुली कमी झाली. सर्वात कमी वसूली त्या महिन्यात झाली ४ करोड ६० लाख हे खरे आहे. आता ती वसुली कमी का झाली त्याची दोन—तीन कारणे असू शकतात. एक आहे नाव्हेंबर मध्ये दिवाळी हा सण होता. येथे जकातीचे माहिती असणारे जाणकार लोक बसले आहेत. दिवाळीचे ३—४ दिवस जे असतात त्या ३—४ दिवसात वसूली होत नाही. कमी होते. तुम्हांला जी कमी संख्या दिसत आहे. कधी २० लाख तर कधी ४ लाख किंवा २ लाख , २ लाख तर कधीच नाही परंतु ६ लाख आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> १४ तारखेला २ लाख ५८ हजार आलेत.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> तुम्ही फक्त तारीख पाहिली. फक्त रविवार नाही तर दिवाळीच्या सणात एक तर १४ तारखेला भाऊबिज असेल किंवा काही तरी असेल.......

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—</u> ईद पण होती त्या दिवशी........
<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> त्या दिवशी भाऊबिज होती. प्रत्येक दिवसाचे मी सांगतो, तुम्ही एका महिन्याचे परिक्षण केले. एक आठवडयाचे तुम्ही परिक्षण केले. तर त्यात रविवार, सोमवार किंवा शुक्रवार या तीनही दिवशी वसुली नेहमी कमीच होते. व मंगळवार, बुधवार, गुरुवार, शनिवार, सर्वात जास्त वसुली शनिवारी होते. तुम्ही जर रोजचे आकडे पाहिले तर आठवडयातून ७ दिवसात सर्वात जास्त वसुली शनिवारची असते. व आठवडयातून ७ दिवसापैकी ३ दिवस वसुली कमी होते. सर्वात कमी वसुली रविवारी होते. रविवारीच

भाऊबिज होती त्यामुळे त्या दिवशीची वसुली बरीच कमी झाली. इथेच नाही तर महाराष्ट्रातील पुर्ण महानगरपालिकेची जकात वसुलीची माहिती जर तुम्ही काढली तर रविवारी ती कमीच असते. ज्या दिवशी बाजार बंद असतो त्या दिवसाची वसुली कमी असते. ज्या दिवशी मुंबई बंद असते, जिथे माल लोड होत नाही , विकला पण जात नाही, त्या दिवसाची वसूली कमी असते. तर ही ६ करोड ६० लाखाची जी वसुली आहे, इतर महिन्याच्या आकडयाची तुलना जर केली तर ती कमी आहे. व त्याचे कारण हे आहे की, नोव्हेंबर मध्ये ज्या सुट्टया होत्या. व जे सण होते हे एक कारण आहे. दुसरे कारण नोव्हेंबर मध्ये वसुली कमी होण्याचे उल्हासनगरची पीक्युलर परिस्थीती अशी आहे, इतर शहरात सणांच्या आधी जकात वसुली वाढते. कारण की, बाहेरुन लोक आयात करतात. उल्हासनगर मध्ये दिवाळी जर नोव्हेंबर मध्ये असेल तर आयात जास्त झाली ऑक्टोंबरमध्ये. ऑक्टोंबर महिन्याचा तुम्ही आकडा पहा. इकडे उल्हासनगर मध्ये बाहेरुन माल आयात होतो. नंतर त्याची विक्री होते व तो इतर ठिकाणी जातो. तर इतर ठिकाणी जर तुम्ही पाहिले तर दिवाळीच्या महिन्यात ज्या महिन्यात दिवाळी येते तिकडे जकात वसुली जास्त होते. उल्हासनगरमध्ये दिवाळी पुर्वी फटाके आधी येतात नंतर इकडुन जातात. कपडे आहेत, रेडिमेंट गार्मेंटस, विद्युत साहित्य जे काही आहे होलसेल व्यापार जे करतात ती लोक दिवाळीच्या पंधरा दिवस आधी माल हडप करतात. त्यामुळे ऑक्टोंबर मध्ये जकात वसुली जास्त होती मागच्या वर्षीची नोव्हेंबर महिन्याची जर तुम्ही ऑक्ट्राय रिकव्हरी पाहिली तर ज्या महिन्यात दिवाळी येते त्या महिन्याची रिकव्हरी कमी दिसते. दुसरे जे कारण येथे झाले वसुली कमी येण्याचे ते कारण आहे सेंच्युरी रेयॉन कार्पोरेशनचे वैयक्तीक स्टेटमेंट जर तुम्ही वाचले तर सरासरी एका महिन्यात ४० लाख ते ५५ लाख पर्यंत दर महिन्याचे स्टेटमेंट तुम्हांला दाखवतो. ते स्टेटमेंट नेहमीच जास्त दाखविले आहे. कधी ५५ तर कधी ५२ लाख. या महिन्यात त्यांची रिकव्हरी ३८ लाखाची आहे. सेच्युरीचा आमच्याकडे जेव्हा ठेका आला, तर ऑगस्ट मध्ये ४२ लाख व सप्टेंबर मध्ये ३९ लाख ऑक्टोंबर मध्ये ५२ लाख, नोव्हेंबर मध्ये ३८ लाख, डिसेंबर मध्ये ५३ लाख, जानेवारीमध्ये ५९ लाख आणि फेब्रुवारीत ४२ लाख. तुम्ही जर सेंच्युरीचे उदाहरण घेतले तर त्यांचा देखील नोव्हेंबर मध्ये कमी रिकव्हरी झाली. हे दोन कारण आहेत की ज्या कारणाने नोव्हेंबर मध्ये जकात वसुली कमी झाली. तिसरे जे कारण आहे, जे तुम्हां सर्वांच्या डोक्यात आहे, व जी काही मर्यादेपर्यंत खरे देखील असेल ऑक्ट्रॉय इव्हेन्जन. ऑक्ट्रॉय इव्हेजन (चोरी) त्याचे मी समर्थन कधी करणार नाही. परंतु जकात चुकवेगिरी न हो, विशेष करुन या दोन महिन्यात ऑक्टोंबर आणि नोव्हेंबर महिन्यात या मध्ये माल जास्त आयात होतो. त्या दोन महिन्यात जकात चोरी न हो. म्हणून मी आधीच काळजी घेतली. आणि मी जे आदेश काढले होते ५ ऑक्टोंबर २००४ रोजी महापालिकेचे जे सर्व विभागप्रमुख आहेत, त्यांना तिनही शिप्टमध्ये प्रत्येक नाक्यावर जावून इन्स्पेक्शन करणे व नाक्यावर लक्ष ठेवणे, जो माल आयात होत आहे, खरंच त्यावर जकात आकारला जातो की नाही, जो माल आयात होतो त्याची किमत मालाच्या योग्य ते नुसार घेतात की नाही? हे पाहण्यासाठी म्हणून मी ही जबाबदारी अधिका—यांवर सोपविली होती. ते अधिकारी, त्यातील काही अधिका—यांनी मनापासून काम केले. येथे मी उल्लेख करु इच्छितो की, आमचे मुख्य लेखा परिक्षक श्री. बनसोडे साहेब हे नेहमी रात्र पाळीत जकात नाक्यावर जायचे. त्यांनी जसे क्षेत्रीय कामगीरी आपण ज्याला म्हणतो तसे परिक्षण केले आहे. तरी देखील जी जकात चोरीमुळे काही मर्यादे पर्यंत दिड करोडचे तुमचे जे अनुमान आहे, ते मला योग्य वाटत नाही. कारण तुम्ही दर महिन्याचे सहा करोड धरले आहेत. असे कधी झाले नाही फक्त ऑक्टोंबर मध्ये ६ करोड ५५ लाख व श्री. कुकरेजा यांच्याकडे कार्यभार सोपविल्यानंतर ६ करोड २१ लाख एक महिन्याचे आले. नोव्हेंबर मध्ये देखील वसूली वाढली असती. ५ करोड पर्यंत गेली असती. जकात चोरी होवू नये म्हणून आम्ही पूर्ण प्रयत्न केले. अधिकारींच्या टिम व्यतीरिक्त जे ऑक्ट्रॉय इव्हेडर्स आहेत. जे हॅबीच्युअल इव्हेडर्स आहेत. त्यांच्या विरोधात आम्ही कार्यवाही देखील केली. येथे नाव सांगतांना देखील मला काही भिती नाही श्री. नरेश भाटिया यांचे बंधु जे नेहमी जकात चोरी करतात. त्यांच्या विरुध्द आम्ही पोलिसात देखील तक्रार केली. तिथे सहयोग नाही मिळाला म्हणून आम्ही कोर्टात देखील गेलो. परंतु जकात चोरीविषयीचे जे नियम आहेत, कायदयात जे प्रावधान आहे ते एवढे स्ट्रींजट नसल्याने जकात चोरी थांबविण्यासाठी खुप अडचणी येतात. हे जे ऑक्ट्रॉय इव्हेजन आहे, त्याला थांबविण्यासाठी काही तरी शिक्षा दंडाची जी शिक्षा आहे, त्यापेक्षा कैदेची जर शिक्षा असली तर होवू शकते ऑक्ट्रॉय चोरी थांबली असती. परंतु ही तरतुद नसल्याने आमच्या पुर्ण प्रयत्नानंतर देखील मी तर फक्त अधिका—यांचे सांगितले पण आमचे इतर देखील कर्मचारी त्यास स्कॉटने देखील खुप प्रयत्न केले. दंड देखील वसुल केला काही लोकांवर केस देखील दाखल केले. इतकेच नव्हे तर आताच आमच्या कर्मचा—यांवर हमले देखील झाले. आम्ही पोलिस मध्ये तसे प्रकरण देखील दाखल केले. एवढे सर्व होवून देखील खरे तर मी डोळे बंद करणार नाही. इतर महिन्याच्या तुलनेत नोव्हेंबर मध्ये रिकव्हरी कमी आहे. परंतु देखील खरे आहे की, ते थांबविण्यासाठी आम्ही हर त—हेने प्रयत्न केले. जेव्हा आम्हांला

वाटले की, आमचे अधिकारी इन्चॉर्ज जे आहेत त्यांच्यामुळे, त्यांच्या प्रयत्नामुळे ते जास्त प्रयत्न करत नसतील म्हणून जकात वसूली कमी होते. म्हणून आम्ही त्या अधिका–यांच्या ऐवजी सक्षम अधिका–यांना दिले. त्याचे परिणाम देखील चांगले मिळाले. डिसेंबर मध्ये ऑक्ट्रॉय ६ करोड २१ लाख वसूल झाला. परंतु तुम्ही जर पुन्हा आता पाहिले तर जानेवारीत देखील ते जकात ५ करोड ७७ लाख झाली आहे. आणि फेब्रुवारीत ५ करोड ५ लाख, व आता मार्च मध्ये जे एक्स्टरनल फॅक्टर असतात. जसे की आता वॅट लागू होणार आहे, आयात करांनी आयात कमी केला आहे. किंवा मार्च महिन्यात अंदाजपत्रक तयार होते. राज्य शासन, केंद्र सरकार यांचे अंदाजपत्रक त्यामुळे जे आयात करणारे व्यापारी आहेत ते माल कमी आयात करतात. हे जे एक्स्टरनल फॅक्टर आहेत, त्या एक्स्टरनल ॅफक्टरमुळे जकात कमी येवू शकते. नोव्हेंबरमध्ये जकात वसुली कमी झाली. दिड करोडची चोरी झाली. यामुळे जकात वसुली कमी आहे हे खरे नाही. जर जकात चोरी होत आहे आणि प्रशासन डोळे बंद करुन बसले आहे, हे पण खरे नाही. जे पण प्रयत्न करायचे आहेत ते प्रयत्न आम्ही केले आहेत. एवढेच नाही तर विभाग प्रमुख बदलून देखील आम्ही प्रयत्न केले. तिथे आम्हांला राहत मिळाली आहे. परंतु लक्षवेधी द्वारा तुम्ही जे प्रशासनाचे लक्ष वेधु इच्छिता की, जकात चोरी होत आहे. ती थांबली पाहिजे. त्यासाठी आम्ही आधीच प्रयत्न केले आहे. तुम्हां सर्वांना माहित आहे की ज्या दिवशी तुम्ही माझ्याकडे निवेदन घेवून आलात त्या आधीच मी जकातीचे हेड बदलून दिले. जे अधिक्षक होते त्यांची बदली केली होती. होवू शकते तुमच्या जर माहितीत असे असेल की आजही जकात चोरी होत असेल आयात करणारे व्यापारी जर काही चोरी करत आहे, किंवा आमचे कर्मचारी जर त्याला मदत करत असतील, तर आम्ही त्यांच्या विरुध्द नक्की कारवाई करु . आमच्याकडे जेव्हा तक्रार आली ज्यांची तक्रार होती त्यांना देखील विनंती केली. मा. सदस्य श्री. चौधरी साहेबांची तक्रार होती. त्यांना विनंती नाही केली, परंतु माजी उप–महापौर यांची देखील तक्रार होती. त्यांना आम्ही विनंती केली होती की तुम्ही तक्रार केली आहे की, जकात चोरी होत आहे. तुमच्याकडे जर तशी माहिती असेल काही पुरावा असेल तो आम्हांला दया. आजपर्यंत आमच्याकडे ना काही पुरावा आला ना काही माहिती. होवू शकते त्यांनी जी तक्रार केंली ती त्यांच्याकडे मौखिक जी माहिती त्यांना मिळाली असेल ती ऐकिव बातमी असेल त्यानुसार त्यांनी तक्रार केली असेल. तुमच्याकडे भले पुरावा असो नसो तुमच्याकडे जरी ऐकिव माहिती असेल कुठे काही तरी गडबड असेल जकात वसूली, किंवा जकात प्रशासनात तर तुम्ही प्रशासनाला जसे आता लक्षवेधी देवून लक्षवेधले तशी लक्षवेधी न देता माझ्या समोर देखील सांगितले तरी आम्ही प्रयत्न करु. माझाी आपणांस विनंती आहे की, तिथे जे कर्मचारी काम करत आहेत त्यांच्याकडुन पण चुका होतात, त्यांच्यावर देखील आम्ही कार्यवाही केली आहे. ती चुक आम्ही मानतो. त्यांना किरकोळ शिक्षा देवून पुन्हा कामावर घेतले जाते. जसे तुम्ही विचारले सहा लोकांना निलंबित केले पुन्हा त्यांना कामावर का घेतले, एकतर आमच्याकडे कर्मचारी वर्ग कमी आहे, महापालिकेने जकात हाती घेतल्यापासून कर्मचारी त्या विभागाला दयावा लागला. ते दिल्यामुळे आमच्या मालमत्ता कर वसूलीवर देखील फरक पडला आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेवून मला वाटते तुमच्या डोक्यात काही शंका राहिली नसेल. जी पण चोरी आता होईल त्यावर देखील आम्ही स्ट्रींजट एक्शन घेवू. पण आमचे कर्मचारी त्यात सामिल असतील तर त्यांच्यावर देखील कार्यवाही करु.

**मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता, श्रीमती माया मसंद व श्रीमती माखिजा किरण हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सचिव :–</u>ठिक आहे?

<u>काही सदस्य :–</u>ठीक आहे.

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.** २ :–मागील सभेचे दि. १९.११.२००४ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास.......

<u>मा. महापौर :–</u> सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वांनुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ३** :—माहे सप्टेंबर २००४ पर्यंतच्या महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परिक्षकांच्या अहवालावर स्थायी समितीने ठराव क्र. १३२, दिनांक २५/११/२००४ अन्वये दिलेले आदेश कायम करणे.

**मा. महापौर :—** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ३:—** माहे सप्टेंबर २००४ पर्यंतच्या महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परिक्षकांच्या अहवालावर स्थायी समितीने ठराव क्र. १३२, दिनांक २५/११/२००४ अन्वये दिलेले आदेश कायम करणे.

**प्रस्तावना:—**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व १०६ (१) नुसार माहे सप्टेंबर २००४ पर्यंतच्या कालावधीचा जमा खर्चाचा अहवाल.

वित्तिय वर्ष २००४ — २००५ च्या "अ" व "क" सुधारित अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व माहे सप्टेंबर २००४ पर्यत प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलेले आहे .

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| "अ" | १३२,०६,७०,००० |
| "क" | ५३,४३,००,००० |
| एकुण | १८५,४९,७०,००० |

*अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत.*

| अ. क्र. | बाब | अपेक्षित जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महसूल जमा | १६२,२५,१५,००० |
| २ | शासकीय अनुदान | ८,७२,००,००० |
| ३ | अनामत रकमा/दायित्वे इ. | १४,५०,५०,००० |
| | एकूण | १८५,४७,६५,००० |
| | प्रारभिंक शिल्लक | २,०५,००० |
| | एकुण :— | १८५,४९,७०,००० |

वित्तीय वर्ष २००४—२००५ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रु. १६२,२५,१५,०००/— अपेक्षित धरलेली आहे. माहे सप्टेंबर २००४ पर्यंत समप्रमाणात रु. ८१,१२,५७,५००/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. प्रत्यक्षात रु. ३२,५६,१८,०००/— (२०.०७ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे सप्टेंबर २००४ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षनिहाय खालील प्रमाणे आहे.

| | *लेखा शिर्ष* अर्थ संकल्प "अ" | अंदाजीत | माहे सप्टेंबर / २००४ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष जमा (रु. १००० पुर्णांकात) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जकात | ५९,२५,७५,००० | २९,६२,८७,५०० | २८,०५,११,००० | ९४.६८ |
| २ | मालमत्ता कर | ३४,००,१०,००० | १७,००,०५,००० | १,४४,१५,००० | ८४.७७ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ३ | एम आर टी पी वसुली | ५७,६०,००० | २८,८०,००० | ८,८७,००० | ३०.८० |
| ४ | मार्केट उत्पन्न | १०,००,००० | ५,००,००० | — | — |
| ५ | रुग्णालय फी | १,५०,००० | ७५,००० | ३१,००० | ४१.३३ |
| ६ | परवाना व इतर फी | ५२,८५,००० | २६,४२,५०० | ५,६३,००० | २१.३१ |
| ७ | संकिर्ण | ७,७५,४८,००० | ३,८७,७४,००० | ३८,९९,००० | १०.०६ |
| ८ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | ६,८९,३७,००० | ३,४४,६८,५०० | ६,४४,००० | १.८७ |
|  | एकुण — अ | १०९,१२,६५,००० | ५४,५६,३२,५०० | ३०,०९,५०,००० | ५५.१८ |
|  | अर्थ संकल्प "क" |  |  |  |  |
| १ | पाणी बिले वसुली | ४५,००,००,००० | २२,५०,००,००० | १,६९,९६,००० | ७.५५ |
| २ | मालमत्ता कर | ७,००,१०,००० | ३,५०,०५,००० | २९,०६,००० | ८.३० |
| ३ | परवाना/इतर फी | १,१०,७०,००० | ५५,३५,००० | १८,८५,००० | ३४.०६ |
| ४ | संकिर्ण | १,७०,००० | ८५,००० | २५,५१,००० | ३००१.२ |
|  | एकूण— "क" | ५३,१२,५०,००० | २६,५६२५,००० | २,४३,३८,००० | ९.१६ |
|  | एकूण— "अ" व "क" | १६२,२५,१५,००० | ८१,१२,५७,५०० | ३२,५६,१८,००० | ४०.१३ |

"अ" व "क" अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. १८५,४९,७०,०००/— ( प्रांरभिक शिलकेसह) अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात माहे सप्टेंबर २००४ पर्यंत रु. ३५,९८,०४,४८७/— उत्पन्न प्राप्त झाले आहे. उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही.

खर्च :—

माहे एप्रिल २००४ ते सप्टेंबर २००४ या कालावधीमध्ये रु. ३७,२८,२४,२८९/— खर्च लेखांकित झालेला आहे.

खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकांचे प्रदान झालेले आहे झालेला खर्च हा सक्षम प्राधिकाराच्या पुर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पिय तरतूदी अधिन आहे.

माहे सप्टेंबर २००४ पर्यंतची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडलेली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०६ (१) (अ) च्या तरतुदीप्रमाणे.)

मालमत्ता कर विभाग

आक्षेप क्र. १ :— श्री. रमेश पी. मुलचंदानी (लिपीक) कर विभाग यांनी रु. ५०,६७८/— महापालिका कोषागारात न भरल्याबाबत.

श्री. रमेश पी. मुलचंदानी (लिपीक) कर विभाग यांनी घरपट्टीची रोख रक्कम रु. ५०६७८/— (रुपये पन्नास हजार सहाशे अठ्याहत्तर मात्र) खालील पावत्याव्दारे वसूल केली आहे. परंतु त्यांनी सदर रक्कमेचा भरणा महानगरपालिका कोषागारात केलेला नाही. त्यामुळे सदर रक्कमेचा त्यांनी अपहार केल्याचे दिसून

आल्याने श्री. रमेश पी. मुलचंदानी यांचेकडून रक्कम रु. ५०६७८/— (रुपये पन्नास हजार सहाशे अठ्याहत्तर मात्र) तात्काळ वसूल करुन महापालिकेच्या कोषागारात जमा करण्याबाबत व संबंधीतांवर योग्य ती कारवाई करण्याकरिता लेखापरिक्षण विभागाचे अ.स.ज्ञा.प.क्र. उमपा/लेपवि/कर विभाग/१०८ दि. ९/८/०४ अन्वये उपआयुक्त (शहर) यांना कळविले आहे.

| अ.क्र. | पावती क्रमांक व दिनांक | रक्कम | ग्राहकाचे नावे |
|---|---|---|---|
| | २ | ३ | ४ |
| १ | १०२७७०/१८.११.०३ | ५९४३ | मे. संगतमल |
| २ | १०२७७१/१९.११.०३ | ८१४ | सुनिता भिशम समतानी |
| ३ | १०२७७२/१९.११.०३ | १९९३ | गविंदे जे. बदलानी |
| ४ | १११९५९/२२.१२.०३ | ८२१९ | काळूराम बारकू पावसे |
| ५ | १११९६०/२२.१२.०३ | १२७९३ | गोपाळ व्ही कोकल |
| ६ | १११९६१/२३.१२.०३ | १०१४५ | मनोज बाळाराम डावरे |
| ७ | १११९६२/२३.१२.०३ | १३६४ | जगनाथ बी. गोडे |
| ८ | १११९६३/२३.१२.०३ | ७९८ | सुनिता एस. वानी |
| ९ | १११९६४/२४.१२.०३ | २२६९ | गौतम मानिक कदम |
| १० | १११९६५/२४.१२.०३ | ९११ | हिराबाई मानिक कदम |
| ११ | १११९६६/२४.१२.०३ | १७२१ | विनोद यदंरलाल नागपाल |
| १२ | १११९६७/२४.१२.०३ | १९१८ | चंदरलाल पमनदास |
| १३ | १११९६८/२४.१२.०३ | १७९० | पारुमल वाटूमल |
| | एकुण :— | ५०६७८ | |

<u>आक्षेप क्र. २ श्री. जे. के.इसरानी , रोखपाल यांनी रक्कम रु. १,३६,२०१/— चा अपहार केल्याबाबत.</u>

कर विभागातील कर वसुली लिपिकांनी खालील तक्त्यानुसार वसूल केलेली घरपट्टीची एकुण रक्कम रु. ९६२१८/— (रुपये श्याहण्णव हजार दोनशे अठरा फक्त) युनिट क्र. ६, ७ व ८ चे रोखपाल श्री. जे.के. इसरानी यांचेकडे जमा केली आहे. परंतु श्री. जे.के. इसरानी यांनी सदरच्या रकमा महापालिका कोषागारात भरणा केलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी रक्कम रुपये ९६२१८/— (रुपये श्याण्णव हजार दोनशे अठरा मात्र) चा अपहार केल्याचे दिसून आले.

<u>तक्ता</u>

| अ.क्र. | खाता नं. | पावती क्र./दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | खाता — न्यू शॉप नं. २१२ | ४९२६० / २७.७.०१ | १०२८५ |
| २ | ८८/८८ | ०४९५७६ / १०.८.०१ | १३००० |
| ४ | न्यु | ०१५४९० / २१.१०.०२ | २००० |
| ५ | न्यु | ०१५४९१ / २१.१०.०२ | ३७९९ |
| ६ | १०४/न्यू | ०१५४९२/ २१.१०.०२ | १९०० |
| ७ | ३८३/३७९ | ०३२३५५ / १०.१.०३ | ३४०२ |
| ८ | ६८२/४६० | ३२३५६ / १०.१.०३ | ४००० |
| ९ | १७५३/न्यु | ३२३५७ / १०.१.०३ | १२३२ |
| १० | ६७४ए/९६६ | ३२३५८/ १०.१.०३ | १५१२ |
| ११ | खाता न्यु | ०३२३५९ / ११.३.०३ | २०४६ |
| १२ | खाता न्यु | ०३२३६० / ११.३.०३ | १४२६ |
| १३ | १००३ /८९ | ५१५५५ / ३०.७.०१ | ३९१७ |
| १४ | २८७ | ५१५५६ / ३०.७.०१ | ११९६ |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १५ | ८४/न्यू | ५१५५७ / ३०.७.०१ | १०५७ |
| १६ | १०८/१०६ | ५१५५८ / ३०.७.०१ | ११०८ |
| १७ | ७९३/सी–३७० | ०४८७४२ / २५.६.०१ | २६५६ |
| १८ | ७९३/सी३७० | ०४८७४३ / २५.६.०१ | २६५६ |
| १९ | ७९३/सी३७० | ०४८७४५ / २५.६.०१ | ४५७८ |
| २० | खाता न्यू | २७२४६ / ३०.११.०२ | ८९८८ |
| २१ | न्यू | २८०६३ / १३.१२.०२ | ८२०० |
| २२ | खाता न्यू | ६६५४८ / ३.१.०२ | १४९२६ |
| | | एकुण :– | ९३८८४ |
| २३ | १९४५/१३०३ | ४९२४२ / २.७.०१ | १५७५ |
| २४ | १९४५/१३०३ | ४९२४३ / २.७.०१ | १६६० |
| २५ | १९४५/१३०३ | ४९२४४ / ३.७.०१ | ३५०० |
| २६ | १९४५/१३०३ | ४९२४५ / ३.७.०१ | ३००० |
| | | एकुण :–<br>जमा केलेले रक्कम<br>जमा करावयाची बाकी | ९७३५<br>(–)७४०१<br>२३३४ |
| | | एकुण :– | ९६२१८ |

तसेच कर विभागातील कर वसुली लिपीक श्री. नरेश माखिजा यांनी मालमत्ता करापोटी न वटलेल्या धनादेश क्र. ३९६२६२/३१.३.०२ च्या बदल्यात रोख रक्कम रुपये ३९९८३/– (रुपये एकोणचाळीस हजार नऊशे त्र्याऐंशी मात्र) दिनांक १७.६.०२ रोजी स्विकारुन सदर रक्कम युनिट क्रमांक ६, ७ व ८ चे रोखपाल श्री. जे.के. इसरानी यांचेकडे भरणा केली आहे परंतु सदर रक्कमेचा भरणा श्री. इसरानी यांनी महापालिका कोषागारात केलेला नाही. याचाच अर्थ त्यांनी एकुण रक्कम रु. १३६२०१/– चा कायम स्वरुपी अपहार केल्याचे दिसून आल्याने सदर अपहाराची रक्कम श्री. जे.के. इसरानी यांचे कडून तात्काळ वसूल करुन ती महापालिका कोषागारात भरणा करण्याबाबत व संबंधीतांवर योग्य ती कारवाई करण्याकरितां लेखापरिक्षण विभागाचे अ.स.ज्ञा.प.क्र.उमपा/लेपवि/कर विभाग/असज्ञा/१०९ दि.१८/८/०४ अन्वये उपआयुक्त (शहर) यांना कळविले आहे.

स्थायी समिती ठराव क्र. १३२ दिनांकः– २५.११.२००४

सुचकाचे नाव :–श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :–श्री. मोहन बहरानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे माहे सप्टेंबर २००४ पर्यंतच्या महापालिका लेख्यांची छाननी व मुख्य लेखा परीक्षकांचा अहवाल विचारात घेऊन प्रशासनास खालील निर्देश देत आहे.

१ महापालिका उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.

२ उपरोल्लेखित कर्मचा–यांविरुध्द् अपहार केल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई करावी व योग्य वाटल्यास त्यांच्याविरुध्द् गुन्हा दाखल करावा.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती / पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

.............................................................. ........................................................

<u>महासभा ठराव क्रः—</u> ७७ दिनांकः—३०/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रामदास उमाप

ही महासभा वरील स्थायी समिती ठराव क्र. १३२, दिनांक २५/११/२००४ द्वारे मुख्य लेखा परिक्षकांचा माहे सप्टेंबर, २००४ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल व नियम बाहय प्रकरणी केलेले आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.** ४ :—श्री. आर.वाय. कांबळे यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक २३/५/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास.......

**मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी व श्रीमती मीना सोंडे सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ४:—</u> श्री. आर.वाय. कांबळे यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक २३/५/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावनाः—</u>

मुख्य अभियंता,(कोकण विभाग)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र मजीप्रा/मु.अ.(को.वि.)/आस्था—२/के.क्र.३६/३११९ दि.१७.५.०२ अन्वये श्री आर.वाय.कांबळे, यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री आर.वाय.कांबळे, शाखा अभियंता हे दि.२४.५.०२ रोजी पाणी पुरवठा विभागात मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत .

सदर प्रकरणी श्री आर.वाय.कांबळे, शाखा अभियंता यांना महासभा ठराव क्र ९७ दि.२०.११.०३ अन्वये महापालिकासेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह एक वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २३.५.०४ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना कार्यमुक्त केलेले नाही.

श्री आर.वाय.कांबळे, शाखा अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दि. २३.५.०५ पर्यत मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

<u>महासभा ठराव क्र:—७८</u> <u>दिनांक:—३०/३/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती जयश्री सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. आर.वाय. कांबळे यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर दिनांक २४/५/२००४ ते २३/५/२००५ पर्यंत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर व श्री. नारायण पंजाबी सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>विषय क्र. ५ :—</u>श्री. एस.टी.सभागाणी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक २८/५/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> पास एका वर्षासाठी.

<u>मा. सचिव :—</u> एका वर्षासाठीच दिले आहे.

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**<u>विषय क्र. ५:—</u>** श्री. एच.टी.सभागनी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक २८/५/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

मुख्य अभियंता,कोकण विभाग,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे जावक क्र: मजीप्रा/मु.अ./(कोवि)/प्रक्र ३२६/आस्था २/३११९/दि १७.०५.०२ श्री.एच.टी.सभागनी यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री.एच.टी.सभागनी,शाखा अभियंता हे दि.२९.०५.०२ रोजी पाणी पुरवठा विभागात मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

सदर प्रकरणी श्री.एच.टी.सभागनी,शाखा अभियंता यांना महासभा ठराव क्र ९६ दि.२०.११.०३ अन्वये महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह एक वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २८.०५.०४ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना कार्यमुक्त केलेले नाही.

श्री.एच.टी.सभागनी,शाखा अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दि. २८.५.०५ पर्यत मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

महासभा ठराव क्र:— ७९ दिनांक:—३०/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती नंदीनी बामणकर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. एच.टी.सभागनी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर दिनांक २९/५/२००४ ते २८/५/२००५ पर्यंत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

**मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**विषय क्र. ६ :—** श्री. एन.एन.जयसिंघानी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक १७/६/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास.......

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. ६:—</u> श्री. एन.एन.जयसिंघानी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक १७/६/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

मुख्य प्रशासकिय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,नवी मुंबई जा.क्र. मजीप्रा/प्रतिनि/२००२/१८/आ.६ दि. ०७.०६.०२ अन्वये श्री.एन.एन.जयसिंघानी यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता

प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री.एन.एन. जयसिंघानी,शाखा अभियंता हे दि.१८.६.०२ रोजी पाणी पुरवठा विभागात मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

सदर प्रकरणी श्री.एन.एन.जयसिंघानी,शाखा अभियंता यांना महासभा ठराव क्र ९५ दि.२०.११.०३ अन्वये महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह एक वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. १७.६.०४ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना कार्यमुक्त केलेले नाही.

श्री.एन.एन.जयसिंघानी,शाखा अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दि. १७.६.०५ पर्यत मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

**महासभा ठराव क्र:— ८०** **दिनांक:—३०/३/२००५.**

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. एन.एन.जयसिंघानी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर दिनांक १८/६/२००४ ते १७/६/२००५ पर्यंत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम, श्री. नथु सोनवणे हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**विषय क्र. ७:—** श्री एम.ए.खियानी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक २१/१/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटिल:—</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, हया ज्या अधिका—यांच्या नेमणुका केल्या जातात, जास्त करुन पाणी पुरवठा विभागात ज्या अधिका—यांच्या नियुक्त्या केल्या जातात, एक वर्षासाठी, दोन वर्षासाठी सभागृहाची परवानगी घेतली जाते. आणि त्यांना नियुक्ती दिली जाते. परंतु ते अधिकारी खरोखरच उल्हासनगर महानगरपालिकेच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रयत्न करतात. किंवा खरोखरच ही लोक महापालिकेची रहिवाशी आहेत ते काळजी पुर्वक विचार करतात का? हा सर्वात महत्वाचा विषय आहे. आता थोडयाच दिवसापूर्वी माझ्या पॅनल मधून १७ नंबर पॅनल मधून पाण्याच्या समस्येसाठी मोर्चा काढण्यात आला होता. तसेच श्री. रमेश चव्हाण यांच्या पण प्रभागातून मोर्चा काढण्यात आला होता. आणि खरोखरच येथे पाण्याची समस्या आहे. हे पाणी पुरवठा विभागाच्या अधिका—यांना तोंडी लेखी कळूवन त्यांना त्यांची सर्व कल्पना दिली आहे. तरी सुध्दा .............

<u>मा. उपमहापौर :—</u> हा विषय नाही आहे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :–</u> बरोबर आहे, हा विषयच आहे, पाणी पुरवठा विभागाचा विषय आहे. इथे अधिका–यांना मुदतवाढ देत आहेत, सर्वजण पास पास म्हणत आहेत, परंतु ते अधिकारी समस्याचे निवारण करतात की नाही, हे तर पाहिले पाहिजे.

<u>मा. उपमहापौर :–</u> ठिक आहे. पण हा विषय नाही.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :–</u> आहे. लोकप्रतिनिधींना बघण्याची ही एक गरज आहे, अधिकारी खरोखर उल्हासनगरच्या हिताचे विचार करतात की नाही? आज १७ नंबर पॅनलमध्ये कमीत कमी १–२ महिन्यापासून पाण्याची समस्या चालु आहे. व काल उल्हासनगर महानगरपालिकेच्या बाजुला कल्याण परिसरात एक इमारत उभी होत आहे. त्यांना महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाने पाणी पुरविण्यासाठी परवानगी दिली आहे. सर्वात मोठा मुद्दा हा आहे. १७ नंबर पॅनल मध्ये पाण्याची एवढी कमतरता असून देखील अधिकारी त्यांना परवानगी कशी देवू शकतात ही तर सर्वात मोठी समस्या आहे. तिकडे कमीत कमी दोनशे तीनशे लोक तिकडे उभे होते. तर उल्हासनगर मधून कल्याण हददीमध्ये येणा–या चार –पाच इमारतींना एक इंच व्यासाची लाईन दिली, खर तर त्या भागात पाण्याची समस्या आहे. हे मी सर्व सभागृहाच्या निदर्शनास आणुन दिले. व हे अधिकारी लोक कसे वागतात? हे मी तुम्हांला दाखवू इच्छितो. इथून पाण्याचे कनेक्शन कल्याण हद्दीत दिले जात आहे. तेथिल रहिवाशी जे आहेत त्यांनी थांबविण्याचा प्रयत्न केला मला तिथे फोन करुन बोलावले. तिकडे गेल्यानंतर त्यांना विचारले तुम्ही हे काय करत आहात, त्या बिल्डरचे असे म्हणणे आहे की आम्ही सर्वांना मॅनेज केले आहे, तुम्हांला किती पैसे हवेत असे थेट बोलून इतक्या लोकांसमोर मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. मी विठ्ठलवाडी पोलिस स्टेशनला जावून त्याची तशी तक्रार देखील केली. ही माझी बदनामी करत आहेत. मला असे म्हणायचे आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या ज्या भागात पाण्याचा त्रास आहे, त्याच भागातून कनेक्शन कल्याण भागात बनणा–या इमारतीला देण्यात आले ते कसे मंजुर केले? अधिकारींनी त्याचे उत्तर दयावे. त्यानंतर हे अधिकारी खरोखर लायक आहेत की नाहीत इकडे काम करण्यासाठी याचा विचार केला जावा. जर कनेक्शन मंजुर केले आहे कि नाही हे मला माहित नाही. परंतु तो बिल्डर म्हणतो कनेक्शन मंजुर आहे, मी त्याविषयी माहीती नाही. जर मंजुर आहे तर त्वरीत त्यास रद्द करावे. पाण्याचे जे कनेक्शन देतात ते बंद करावे जर परवानगी दिली नसेल तर ते थांबवा, व बिल्डरवर कारवाई करा. आणि जर असे असेल तर अजूनपण तेथे बांधकाम सुरु आहे, चाळीच्या चाळी उभारल्या जात आहेत, इमारती बनत आहेत. ते पण उदया तशी परवानगी मागतील. जर त्याला परवानगी दिली तर आम्हांला पण दया. आम्हांला पण पाणी पाहिले असे म्हणतील. उल्हासनगर मध्ये आधीच पाण्याची कमतरता आहे. काल तर पाण्यासाठी म्हणून १२ वाजताची मिटींग ५ वाजता ठेवली. आम्हांला सांगितले की, सर्वजण मंत्रालयात बसले आहेत. पाण्याच्या समस्येमुळे ४ व ५ नंबरमध्ये पाण्याची एवढी मोठी समस्या आहे, उल्हासनगर मधून कल्याण हद्दीत पाण्याचे कनेक्शन दिले जात आहे. त्याचा काय अर्थ आहे?

<u>मा. उप–महापौर :–</u> एक मिनीट, जरा बसा. सर्वात आधी तुम्हांला त्रास आहे की, कल्याण हद्दीत इथले पाणी जाते. आम्ही आयुक्त साहेबांना आदेश देतो, त्या बाबतीत चौकशी करुन जर चुकीचे असेल तर त्यांचे कनेक्शन कापले जाईल. दुसरी गोष्ट तुम्ही कुणा एका अधिका–याचे नाव घ्या. ज्यावर तुम्ही नाराज आहात. तुम्ही काय सर्व अधिका–यांवर नाराज आहात?

**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :–</u> नाराजीची गोष्ट नाही, आता येथे ४ नंबर प्रभागात पाणी पुरवठा विभागाचे श्री. सेलवन नावाचे अधिकारी आहेत, व आमच्या भागाचे जे अधिकारी आहेत श्री. विसपुते आहेत, ३–४ महिन्यापूर्वी तिथे मोठा खड्डा खोदुन , वास्तविक पाहता रस्त्याच्या मध्ये खड्डा करुन भुयार करुन, रस्त्याच्या मध्यावरती पाण्याचे कनेक्शन वॉटर सप्लायच्या लाईनवर देत होते. आम्ही माहिती दिली हे काम तेथे चालू आहे. ते लोक आले परंतु काही कार्यवाही केली नाही. फक्त खड्डा बुजविला, चार कनेक्शन ते घेत होते, ते पण अनधिकृत नळ जोडणी व ते पण कल्याण भागात कनेक्शन जात होते. आम्ही हे त्यांच्या लक्षात आणून दिले परंतु त्यांनी काही कार्यवाही केली नाही, असेच जर पाणी उल्हासनगरचे जर कल्याण हद्दीत जात राहिले तर आमच्या प्रभागात तर पाण्याची समस्या आहे, असेच जर कल्याण हद्दीत पाणी जात राहिले तर आणि जर कनेक्शन मंजुर केले असेल बिल्डरच्या म्हणण्यानुसार अजुन खुप सारी बांधकामे तेथे

चालु आहेत, ते लोक पण परवानगी मागतील. महापालिका पण परवानगी देईल. तर तुम्ही यावर काय मार्ग काढणार? अधिका–यांची याबाबतीत काय भुमिका आहे? त्यांचे काय म्हणणे आहे? जर असच विचार न करता परवानगी देत बसले तर हे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी उल्हासनगरचे खरोखर भले करु इच्छितात, समस्या सोडवु इच्छितात की नाही हे तर पाहिले पाहिजे? आधी यावर विचार करुन समस्यावर मार्ग काढा. त्यानंतर तुम्ही ही जी संमती देत आहात सहा महिन्यासाठी, एका वर्षासाठी, दोन वर्षासाठी याचा नंतर विचार करा.

**मा. सदस्या श्रीमती सुजाता रिझवानी, श्रीमती भारती छाब्रिया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** मा. महापौरजी, आता आमचे मा. सदस्याने जो मुद्दा उपस्थित केला, आधी तर आम्ही आशेळा व मानेरा गावात पाणी देण्याच्या बाजुनेच नव्हतो. आधी तुम्ही चौकशी करा हे पाणी कोणी दिले, व कोण–कोण आयुक्तांना या संबंधी भेटत आहेत, तिकडे कनेक्शन घेण्यासाठी. दुसरे आता तुम्ही सेलवान साहेब व विसपुते साहेबांचे नाव घेतले की, त्यांना का कायम करत आहात ते आरक्षणात आहेत आम्ही मागासवर्गीय आरक्षणात त्यांना घेवू इच्छितो तुम्ही त्यांच्या विरोधात बोलत आहात की त्यांना कायम नाही केले पाहिजे. तुम्ही जर त्यांच्या विरोधात आहात तर तुम्ही तसे मतदान करु शकतात. परंतु तुमचा जो मुद्दा आहे तो या कार्यसुचीवर नाही आहे. आपण लक्षवेधीद्वारे , प्रश्नाद्वारे महासभेमध्ये विचारु शकतात. इकडे आमच्या समोर जे विषय आहेत, ते हे आहेत की, जे प्रतिनियुक्तीवरील अधिकारी आले आहेत त्यांना कायम करायचे का परत पाठवायचे? आज जर तुम्हांला त्याविषयी विरोध करायचा असेल तर तुम्ही तसे मत देवू शकतात. आम्ही तुमच्या भावना समजतो. तुम्ही त्यांना कायम नाही करु इच्छितात त्यांच्या विरोधात बोलत आहात. परंतु आम्ही त्यांना कायम करण्याच्या बाजुने आहोत. जर तुम्हांला तसे करायचे नसेल तर तुम्ही मतदान करा. आम्ही त्यांना कायम करणार, धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. विश्‍वनाथ पाटील:–**कायम करण्याचा प्रश्‍न नंतर येतो, परंतु ते काय करत आहेत हे तर आधी पाहिले पाहिजे.

**मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–** आमचा विचार तुम्ही सांगितला तुम्हांला कोणी सांगितले? अधिकार कोणी दिला तुम्हांला?

**मा. सदस्य श्री. विश्‍वनाथ पाटील :–** पाणी पुरवठा अधिका–यांना येथे आणुन फायदा काय सर्व पाणी कल्याण मध्ये जाईल.
**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–** आमचे विचार प्रकट करण्याचा तुम्हांला अधिकार कोणी दिला?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** आम्ही काय बोलतो? ते काय म्हणत आहेत, पाणीचा प्रॉबलेम सॉल्व करा. पाण्याची समस्या आहे, त्यांनी विरोधात आहे.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–** त्यांनी तसा विरोध केला आहे का..............

सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

**मा. सदस्य श्री. विश्‍वनाथ पाटील :–**ते जर असेच करत राहिले तर त्यांना पाणी पुरवठा विभागात ठेवून फायदा काय?

**मा. उपमहापौर :–**पुढचा विषय घ्या.
**मा. सचिव :–**ठिक आहे?
**काही सदस्य :–** पास–पास................
**मा. सदस्य श्री. विश्‍वनाथ पाटील :–** आमचा विरोध आहे.
**मा. सचिव :–**एकमत आहे.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास.................

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> चौधरी कोण आहेत हे आम्ही पाहिले नाही अजून............

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:–</u> ठिक आहे, पास............

<u>मा. महापौर :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**<u>विषय क्र. ७:–</u>** श्री एम.ए.खियानी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक २१/१/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना:–</u>

अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र मजीप्रा/ठाणे/आस्था–१/१३८/२००१ दि. १०.१.०१ अन्वये श्री एम.ए.खियानी , यांची शाखा अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून एक वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री एम.ए. खियानी ,शाखा अभियंता हे दि.२२.१.०१ रोजी पाणी पुरवठा विभागात मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.

सदर प्रकरणी श्री एम.ए. खियानी ,शाखा अभियंता यांना महासभा ठराव क्र ३३ दि.२०/६/०३ अन्वये महापालिका सेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह एक वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २१/१/०४ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना कार्यमुक्त केलेले नाही.

श्री एम.ए. खियानी ,शाखा अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दि. २१/१/०५ पर्यत मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

महासभा ठराव क्र:– ८१ दिनांक:–३०/३/२००५.

सुचकाचे नाव :– श्री. श्यामसुंदर रोहडा

अनुमोदकाचे नाव :– श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. एम.ए.खियानी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर दिनांक २२/१/२००४ ते २१/१/२००५ पर्यंत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. रामरख्यानी मोहनदास सभागृहातुन बाहेर गेले.

**विषय क्र. ८:—** श्री. डी.बी.चौधरी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक ३१/५/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

काही सदस्य :— पास—पास.................

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव सर्वांनुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ८:— श्री. डी.बी.चौधरी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक ३१/५/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

प्रस्तावना:—

मुख्य अभियंता,(कोकण विभाग)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश क्र मजीप्रा/मु.अ.(को.वि.)/आस्था—२/के.क्र.३६/३११९ दि.१७/५/०२ अन्वये श्री डी.बी.चौधरी, यांची शाखा अभियंता (यांत्रिकी)या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री डी.बी.चौधरी शाखा अभियंता (यांत्रिकी) हे दि.०१/०६/०२रोजी पाणी पुरवठा विभागात मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत .

सदर प्रकरणी श्री डी.बी.चौधरी, शाखा अभियंता(यांत्रिकी) यांना महासभा ठराव क्र ९८ दि.२०/११/०३ अन्वये महापालिकासेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह एक वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. ३१/०५/०४ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना कार्यमुक्त केलेले नाही.

श्री डी.बी.चौधरी, शाखा अभियंता(यांत्रिकी), यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दि. ३१/५/०५ पर्यत मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

**महासभा ठराव क्रः— ८२** **दिनांकः—३०/३/२००५.**

सुचकाचे नाव :— श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नथु सोनवणे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. डी.बी.चौधरी यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता या पदावर दिनांक ०१/०६/२००४ ते ३१/५/२००५ पर्यंत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ९:–**श्री. एस.के.सेलवन यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात उपविभागीय अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक ३१/१०/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास.................

<u>मा. महापौर :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी व श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>विषय क्र. ९:–</u> श्री. एस.के.सेलवन यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात उपविभागीय अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक ३१/१०/२००५ पर्यंत मुदतवाढ देणे.

<u>प्रस्तावना:–</u>

मुख्य अभियंता,(कोकण विभाग)महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,ठाणे यांचे कार्यालयीन आदेश मजीप्रा/मु.अ.(को.वि.)आस्था–२/के.कु.३८३/४३५१ दिनांक२०/१०/०३अन्वये श्री एस.के.सेलवन, यांची उपविभागीय अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री एस.के.सेलवन उपविभागीय अभियंता हे दि.०१/११/०३ रोजी पाणी पुरवठा विभागात मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत सदर प्रकरणी श्री एस.के.सेलवन, उपविभागीय अभियंता यांना महासभा ठराव क्र .१२ दि. १९/५/०४ अन्वये महापालिकेच्या सेवेत दि.०१/०१/०३ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता दिली असून त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. ३१/१०/०४ रोजी संपुष्टात आला आहे. तथापी महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना कार्यमुक्त केलेले नाही.

श्री एस.के.सेलवन, उपविभागीय अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दि. ३१/१०/०५ पर्यत मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर मंजूरीसाठी प्रस्तावित केला आहे.

**महासभा ठराव क्र:– ८३** **दिनांक:–३०/३/२००५.**

सुचकाचे नाव :– श्री. ईश्वर पमनानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. एस.के.सेलवन यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात उपविभागीय अभियंता या पदावर दिनांक ०१/११/२००४ ते ३१/१०/२००५ पर्यंत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १० :—** श्री. एम.ए.जवादे यांच्या महापालिका सेवेत उपअभियंता या पदावर दिनांक १७/८/२००४ पर्यंत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे व दिनांक १८/८/२००४ पासुन सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यकारी अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस संमती देणे.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास.................

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>**विषय क्र. १०:—**</u> श्री. एम.ए.जवादे यांच्या महापालिका सेवेत उपअभियंता या पदावर दिनांक १७/८/२००४ पर्यंत प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे व दिनांक १८/८/२००४ पासुन सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यकारी अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस संमती देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

मुख्य अभियंता,कोकण विभाग,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे जावक क्र: मजीप्रा/मु.अ./(कोवि)/प्रक्र ३२६/आस्था/४१६७/दि.११.०६.२००२ अन्वये श्री एम.ए.जवादे यांची उप अभियंता पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री एम.ए.जवादे , उप अभियंता हे महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागात दि.१३.०६.०२ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत.
सदर प्रकरणी श्री एम.ए.जवादे , उप अभियंता यांना महासभा ठराव क्र ९४ दि.२०.११.०३ अन्वये महापालिकासेवेत वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह एक वर्षाच्या मुदतवाढीने प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. १२.६.०४ रोजी संपुष्टात आला आहे. तथापि महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांना कार्यमुक्त केलेले नाही.

तथापि मुख्य प्रशासन अधिकारी यांचे कार्यालयीन आदेश क्र. का.आ.प्रतिनि/२००४/११६१/आ—१ दि.१९. ११.०४ नुसार श्री एम.ए.जवादे ,उप अभियंता यांची पदोन्नतीने कार्यकारी अभियंता पदावर उल्हासनगर महानगरपालिकेत रितसर प्रतिनियुक्तीवर दोन वर्षाकरिता नियुक्तीचे आदेश प्राप्त झाले आहेत व त्यांनी महापालिकेत सार्वजनिक बांधकात विभागात कार्यकारी अभियंता या पदी दि. १८.८.०४ पासून पदभार स्विकारला आहे.

श्री एम.ए.जवादे,उप अभियंता यांचा दि. १७.८.०४ पर्यत वाढलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी व दि. १८.८.०४ पासून सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यकारी अभियंता पदावर रूजू झाले आहेत. तरी त्यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह व कार्यकारी अभियंता पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता घेणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

**महासभा ठराव क्र:— ८४** **दिनांक:—३०/३/२००५.**

सुचकाचे नाव :— श्री. रोहडा श्यामसुंदर

अनुमोदकाचे नाव :— श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. एम.ए.जवादे यांच्या महापालिका सेवेत पाणी पुरवठा विभागात उपअभियंता या पदावर दिनांक १३/०६/२००२ ते १७/०८/२००४ पर्यंत व दिनांक १८/०८/२००४ पासुन सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यकारी अभियंता या पदावर पुढील एक वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ११** :— श्री.आर.आर.सावकारे यांच्या कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक १७/०८/२००४ पासुन मान्यता देणे.

काही सदस्य :— पास—पास.................

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. ११:— श्री.आर.आर.सावकारे यांच्या कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक १७/०८/२००४ पासुन मान्यता देणे.

प्रस्तावना:—

मुख्य प्रशासकिय अधिकारी यांचे कार्यालयीन आदेश जा.क्र.नियुक्ती/का. आ/२००४/११५५/आस्था— १, दि.११.८.०४ अन्वये श्री आर.आर.सावकारे, यांची कार्यकारी अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आली आहे.

श्री आर.आर.सावकारे, हे या महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता या पदावर पाणी पुरवठा विभागात दि.१७.८.०४ रोजी मध्यान्हपूर्व रूजू झालेले आहेत . तरी त्यांच्या प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मंजूरीसाठी महासभेसमोर सादर केला आहे.

महासभा ठराव क्र:— ८५ दिनांक:—३०/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री.आर. आर.सावकारे यांच्या कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग या पदावर प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक १७/०८/२००४ पासुन एक वर्षासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १२** :— श्री डी.डी.पंजाबी, लिपीक, जकात विभाग यांना दिनांक १/१२/२००४ ते ३०/११/२००५ या एक वर्षाच्या कालावधीकरिता विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

काही सदस्य :— पास—पास.................

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय क्र. १२:— श्री डी.डी.पंजाबी, लिपीक, जकात विभाग यांना दिनांक १/१२/२००४ ते ३०/११/२००५ या एक वर्षाच्या कालावधीकरिता विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

प्रस्तावना:—

श्री. डी. डी. पंजाबी, लिपीक, जकात विभाग यांनी दिनांक १ डिसेंबर २००४ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २००५ या एक वर्षाच्या कालावधीची विशेष असाधारण रजा मंजुर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.

शासनाने वित्त विभागाकडील निर्णय क्र. अरजा २४०२/२५/सेवा—८, दिनांक ७ ऑक्टोबर २००२ नुसार शासकीय सेवेत प्रविष्ट झालेल्या किमान ५ वर्ष इतकी सतत सेवेत असलेल्या स्थायी—अस्थायी कर्मचा—यांना विशेष असाधारण रजा मंजुर करता येईल. अशी रजा संपूर्ण सेवेच्या कालावधीत ५ वर्षाच्या मर्यादिपर्यंत फक्त एकदाच घेता येईल ही योजना सदर आदेश निर्णयीत झाल्याच्या दिनांकापासुन ते दिनांक ३१.१२.२००४ पर्यंत अंमलात आहे. व जे कर्मचारी दि. ३१.१२.२००४ पूर्वी विशेष असाधारण रजेसाठी अर्ज करतील त्यांचेच रजेचे अर्ज विचारात घेता येतील मा. शासन निर्णयातील परिच्छेद ९ मध्ये विशेष असाधारण रजा मंजुर करण्यास नियुक्ती प्राधिकारी सक्षम असतील अशी तरतुद आहे.

वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. डी. डी. पंजाबी लिपीक, जकात विभाग हे स्थायी कर्मचारी असून त्यांची महापालिकेतील आतापर्यंत सेवा ९ वर्षे ७ महिने इतकी झाली असुन त्यांचा विशेष असाधारण रजेचा अर्ज दि. ३१.१२.२००४ पूर्वी या कार्यालयास प्राप्त झाल असुन दि. ७ ऑक्टोबर, २००२ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहुन त्यांची दि. १.१२.२००४ ते ३०.११.२००५ पर्यंतच्या ०१ वर्षाचा कालावधीची विशेष असाधारण रजा दि. ३०.११.२००४ च्या आदेशान्वये मंजूर केली आहे. सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्रः— ८६ दिनांकः—३०/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री डी.डी.पंजाबी, लिपीक, जकात विभाग यांना दिनांक १/१२/२००४ ते ३०/११/२००५ या एक वर्षाच्या कालावधीकरिता प्रशासनातर्फे मंजुर केलेली विशेष असाधारण रजा कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १३** :— सहा महापालिका कर्मचा—यांच्या राजीनाम्यांस कार्योत्तर मंजुरी देणे.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :—मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य हा जो अनुशेष आहे तो आपण पुर्ण भरुन काढणार का? जी सहा पदे रिक्त होणार आहेत त्या सहा पदावर नविन अनुशेष भरणार का?

मा. प्रभारी आयुक्त :— मा. महापौर महोदया, ज्या कर्मचा—यांनी राजीनामा दिला आहे, राजीनामा दिल्यावर जे रिक्त पद होते. त्याचा अनुशेष त्याच संवर्गात भरला जाईल.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— त्याच संवर्गातून भरला जाईल तर तुम्ही नव्याने कॉल लेटर काढणार का?

मा. उप—आयुक्त (श्री. लोणारे, मुख्यालय):— मा. महापौर महोदया, मा. आयुक्त, सन्माननिय सदस्य अनुशेष भरण्याबाबतचा जो मुद्दा सन्माननिय सदस्यांनी विचारला आहे, या संवर्गातुन कर्मचा—यांनी राजीनामा दिला आहे. त्याच संवर्गातुन ते भरले जातात. अनुशेष भरण्याची कार्यवाही शासन धोरणानुसार चालु राहील.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— नव्याने तुम्ही कॉल लेटर काढणार आहात का? की प्रतिक्षा यादीवर जे आहेत त्यांना घेणार आहेत?

मा. उप—आयुक्त (श्री. लोणारे, मुख्यालय):—प्रतिक्षा यादी आपण एक वर्षापर्यंत वापरु शकतो. प्रतिक्षा यादीची मुदत संपली आहे. पुढची जी भरती बाबतची कार्यवाही असेल, वर्तमानपत्रात जाहिरात देवून, रोजगार केंद्रातून यादी मागवून पूर्ण कार्यवाही करुन मग भरती केली जाईल.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— सहाची सहा पदे? पुर्ण सहा पदांचा कॉल काढणार आहात का?

**मा. उप–आयुक्त (श्री. लोणारे, मुख्यालय):–**महापालिका आस्थापनात फक्त सहा पदांसाठी अनुशेष नाहीत तर जास्त पदांसाठी आहे. प्रमोशनची पदोन्नतीने काही पदे आहेत. सरळसेवा भरतीने फक्त सहा पदे उरली आहेत. फक्त सहाच नाही जास्त पदे आहेत ती भरुन काढु.

**मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :–**अपंग आणि कुष्ठरोगांसाठी जे ३ टक्के आरक्षण आहेत, ते या महापालिकेत तुम्ही लागु करणार का? अदयाप झालेले नाही यापुर्वी देखील मी महापालिकेला पत्र दिले होते. मुख्यालयातुन मला पत्र दिले की जेव्हा आम्ही अनुशेष भरु तेव्हा त्या लोकांचा विचार करण्यात येईल. परंतु अदयाप अपंगांना आणि कुष्ठरोगांना कुठेच विचारात घेतले गेले नाही आता त्यांना विचारात घेणार का?

**मा. प्रभारी आयुक्त:–** अपंगांसाठी ३ टक्के जे आरक्षण आहे, त्याचे आम्ही कॅलक्युलेशन केले आहे, आपल्या आस्थापनेवर जे आज कार्यरत आहेत, ३ टक्यापेक्षा जास्त आहे. आता त्यामुळे वेगळे असे काही धोरण नाही. ३ टक्यापेक्षा जास्त आता पण आस्थापनेवर आहे.

**मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :–** आणि तसेच अनुकंपा तत्वावरील लोकांना कामावर घेणार आहात की नाही?

**मा. उप–आयुक्त (श्री. लोणारे, मुख्यालय):–** अनुकंपा तत्व लागू असणा–या ३४ लोकांची यादी आपणाकडे आहे, व जो ज्या संवर्गाचा आहे, त्या संवर्गाने भरला गेला पाहिजे. आमच्याकडे जी पदे रिकामी आहेत, ती आम्ही भरु कमीत कमी १०–१२ लोकांचे आम्ही करु शकतो. एक महिन्यात ते होवून जाईल.

**मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :–** एक महिन्यात होणार?

**मा. उप–आयुक्त (श्री. लोणारे, मुख्यालय):–**सर्व लोकांना सामावून नाही घेता येणार, पण जितकी पदे आहेत तितक्यांना घेवू शकतो.

**मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :–** धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. नाना पवार :–** मा. महापौरजी, हे जे ६ लोकांची नावे आहेत, यातून किती जागा रिक्त आहे व किती जागांवर या लोकांव्यतिरिक्त अजून उमेदवार घेतले आहेत. सहा पैकी सहाच्या–सहा रिक्त आहेत की त्यांच्या ठिकाणी घेतले आहेत? आणि रिक्त असतील तर किती रिक्त आहेत.

**मा. उप–आयुक्त (श्री. लोणारे, मुख्यालय):–** जी ६ पदे रिक्त झाली आहेत त्यापैकी एक पद संगणकचालक श्री. तुपे, अनुसुचीत जातीचे असून त्यांना त्या संवर्गात घेतले जेव्हा त्या संवर्गातील कर्मचा–यांनी राजीनामा दिला, तेव्हा घेतले. अशा पध्दतीने पदे भरता येतील. ही पदे एनटीची आहेत. प्रतिक्षा यादीची तारीख संपली आहे म्हणून वेगवेगळया संवर्गाची पदे आहेत. पुर्ण कार्यवाही करुन पदे भरली जातात.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** मा. महापौरजी, येथे जो मुद्दा सुरु आहे मी फक्त एक गोष्ट सांगु इच्छितो, जितका पण अनुशेष भरला जातो, त्याची कागदपत्र पाहणे प्रशासनाची जबाबदारी आहे. मागे पण एका उमेदवाराला नोकरी दिली गेली. त्याला नियुक्ती पत्र दिले गेले. नंतर त्याला कागदपत्र बरोबर नाही म्हणून रद्द केले. तो उच्च न्यायालयात गेला ही जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यांची कागदपत्र प्रमाणपत्र तपासणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, महासभा फक्त त्यांचा प्रस्ताव मान्य करते. परंतु इतर सर्व जबाबदारी प्रशासनाची राहिल. त्यांचे कागदपत्र व्यवस्थित तपासली जावीत.

**काही सदस्य :–** पास–पास.................

**मा. महापौर :–** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**विषय क्र. १३:–** सहा महापालिका कर्मचा–यांच्या राजीनाम्यांस कार्योत्तर मंजुरी देणे.

प्रस्तावना:—

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. बी. सी. सी.२००२/१३०६/१६/ब दि. २६ मार्च, २००३ च्या आदेशान्वये मागासवर्गीय सरळसेवा भरती तसेच पदोन्नतीमधील अनुशेष भरून काढणेसंबंधी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महापालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवा योजन कार्यालय, विद्यार्थी रोजगार व मार्गदर्शन माहिती व संचालनालय, मुंबई यांच्याकडुन रिक्त अनुशेषानुसार मागणी करून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या महापालिकेने गठीत केलेल्या निवड समितीमार्फत पहिल्या व दुस—या टप्प्यातील मुलाखती अनुक्रमे दि. ३.६.२००३ ते ५.६.२००३ व दिनांक २६.६.२००३ ते २९.६.२००३ रोजी घेण्यात येवून त्यांच्या निवड / प्रतिक्षा यादया अनुक्रमे महापालिका महासभा ठराव क्र. ३८ दि. २०.६.२००३ आणि महासभा ठराव क्र. ५९ दि. १८.७.२००३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार नियुक्त्या देण्यात आलेल्या कर्मचा—यांपैकीएकुण ०६ कर्मचा—यांनी दुसरीकडे नोकरी लागल्यामुळे महापालिकेतील आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. आणि सदर राजिनामे मंजूर करण्यात आलेले आहे. त्यांचा तपशील नावासह पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | कर्मचा—याचे नाव व पद | नियुक्ती आदेश | रूजु दिनांक | राजिनामा मजुर केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. राजू.डी. शेलार (कनिष्ठ अभियंता), स्थापत्य | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५३, दि. २ जुलै, २००३ | ८.७.२००३ | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२२५, दि. २५.९.२००३ |
| २ | श्री. विजय शंकर पवार (सुरक्षा रक्षक) | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/८७, दि. ३० जुलै, २००३ | १.८.२००३ | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२७०, दि. २४.१०.२००३ |
| ३ | श्री. तानाजी डी. कोकणी (विजतंत्री) | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/९२, दि. ३१ जुलै, २००३ | ३१.७.२००३ | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे. —८/८४, दि. २०.२.२००३ |
| ४ | श्री. संजीव गंगाराम परदेशी (कनिष्ठ लिपिक) | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/८६, दि. ३० जुलै, २००३ | ३१.७.२००३ | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे—४/६४, दि. २३.४.२००३ |
| ५ | कु. मंजूषा रघुनाथ कसाणे (कनिष्ठ लिपिक) | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/४१३, दि. १९ .१. २००४ | २३.१.२००४ | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे—४/६१, दि. ३१.३.२००४ |
| ६ | श्री. प्रशांत बी. तुपे (संगणकचालक) | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५३, दि. २ जुलै, २००३ | ७.७.२००३ | जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे—७/५४७, दि. २३.११.२००४ |

उपरोक्त कर्मचारी यांचे राजीनामे कार्योत्तर मंजुरीसाठी महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्रः— ८७ दिनांकः—३०/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार प्रशासनातर्फे स्विकृत करण्यात आलेल्या उपरोक्त सहा महापालिका कर्मचा—यांच्या राजीनाम्यांस कार्योत्तर मंजुरी देत आहे..

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १४ :—** उल्हासनगर शहराचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल व कृती आराखडयाप्रमाणे पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरण स्थापन करणे.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास.................

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, ही जी पर्यावरण समिती स्थापन करत आहात त्यामध्ये १ ते १५ जे सदस्य व अध्यक्ष आपण नियुक्त केले आहेत, महापालिका आयुक्त अध्यक्ष पद व त्यानंतर महापौर, उप—महापौर, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, सदस्य गण म्हणुन आहेत, तर माझा असा सुझाव आहे तुम्ही त्यात गट नेता का नाही सामिल करत? गटनेते असले पाहिजेत, कारण विरोधी पक्ष नेता स्वतःचे पक्षाचे बघेल की दुस—या पक्षाचे पण बघु शकतात? तर गटनेता त्यात सामिल असला पाहिजे असा माझा सुझाव आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> सर्व गटनेता आले तरी हरकत नाही. चालेल सर्व गटनेता असले पाहिजे.

<u>मा. सचिव :—</u> ठिक आहे.

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव वरील सुचविलेल्या सुधारणेसह सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. १४:—</u> उल्हासनगर शहराचा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल व कृती आराखडयाप्रमाणे पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरण स्थापन करणे.

<u>प्रस्तावना:—</u>

उल्हासनगर शहराचा वर्ष २००३—२००४ चा पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल व वर्ष २००४—२००५ करीता कृती आराखडा उल्हासनगर महानगरपालिकेने यशदा पूणे यांचेकडुन तयार करून घेतला आहे. सदर आराखडयास महासभेने ठराव क्रमांक. ५० दिनांक ४.११.२००४ अन्वये मान्यता दिलेली आहे. या आराखडयामध्ये खालील १७ अति महत्वाच्या विषयाबाबत कृती करणेसाठी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरण
प्रकल्प व्यवस्थापन गट
ई—गव्हर्नन्स आणि ई—नियोजन गट
पर्यावरण व आरोग्य विषयक धोरणांची कार्यक्षमता वाढविणे
आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा
परिसरातील हवा गुणवत्ता व्यवस्थापन
औद्योगिकरण झालेल्या भागांचे रेखांकन
मल निस्सारण प्रक्रिया केंद्र व्यवस्थापन
पाणी पुरवठा व्यवस्थापन
महानगरपालिका शाळा व्यवस्थापन
शेवटच्या व्यक्तीस प्रथम प्राधान्य : स्वयंरोजगार
नाला व्यवस्थापन—भाग —१
नाला व्यवस्थापन भाग—२
लोकसंख्या व गृहनिर्माण व्यवस्थापन
सामाजिक सहभाग व उद्योग
न्डब.ज्ञक्डब.डिब यांच्यातील समन्वय
झोपडपट्टी सुधार कार्य{म

अनुक्रमांक १ वरील पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरण स्थापन करणे या विषयाबाबत खालील प्रमाणे सादर करण्यास येत आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी उल्हासनगर शहरामध्ये विविध मुलभुत नागरी सोयी सुविधांचे नियोजन करणे गरजेचे आहे. विविध सार्वजनिक सेवाना पर्यावरण व्यवस्थापनाव्दारे प्राधान्य देणे आवश्यक आहे. पर्यावरण विषयक दृष्टीकोनातून नियोजीत विकास प्रकल्प व त्याकरिता अर्थ संकल्पिय तरतुद या करीता प्राधान्य ठरवुन देण्याकरिता सर्वमान्य नियोजन प्राधिकरण निर्माण करणे करिता पर्यावरण कृती आराखडयामध्ये सूचित करण्यात आलेले आहे. अशा स्थापन करावयाच्या पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरणामध्ये खालील प्रमाणे सदस्य ठेवणेकरीता या आराखडयामध्ये सूचित करण्यात आलेले आहे.

| | |
|---|---|
| महानगरपालिका आयुक्त | — अध्यक्ष |
| १. मा. महापौर | — सदस्य |
| २. मा. उप महापौर | — सदस्य |
| ३. मा. स्थायी समिती सभापती | — सदस्य |
| ४. सर्व राजकीय पक्षाचे गटनेता | — सदस्य |
| ५. मा. सभागृह नेता | — सदस्य |
| ६. मा. विरोधी पक्ष नेता | — सदस्य |
| ७. सर्व विशेष समित्यांचे सभापती | — सदस्य |
| ८. सर्व प्रभाग समित्यांचे सभापती | — सदस्य |
| ९. सर्व उपायुक्त | — सदस्य |
| १०. शहर अभियंता | — सदस्य |
| ११.कार्यकारी अभियंता (पा.पु.वि. / मल नि. विभाग) | — सदस्य |
| १२.कार्यकारी अभियंता (स्थापत्य /सा.बा.विभाग) | — सदस्य |
| १३. नगररचनाकार | — सदस्य |

१४. मुख्य लेखा अधिकारी — सदस्य

१५. विशेष कार्य अधिकारी पर्यावरण प्रकल्प व्यवस्थापन गट — सदस्य सचिव

उपरोक्त नमूद प्राधिकरणाची नेमणूक महासभेच्या मान्यतेने होणे आवश्यक आहे. या प्राधिकरणाची कार्यकरता व अधिकार खालील प्रमाणे असावेत.

पर्यावरण कृती आराखडयामध्ये नमूद केलेल्या सर्व विषयांबाबत प्राधान्य ठरवून घेणे

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विकासाकरीता आर्थिक नियोजन तपासणे व पुर्नविलोकन करून प्रकल्प अंमलबजावणी बाबत धोरण निश्चित करून महासभेकडून मंजुरी करीता शिफारस करणे.

पर्यावरण प्रकल्प गटामार्फत येणा—या प्रस्तावाकरीता धोरण निश्चित करणे व तसा प्रस्ताव महासभेपुढे शिफारस करून पाठविणे.

प्राधिकरणाची नियमित सभा घेऊन या सभेमध्ये नियोजित प्रकल्पांचा अंमलबजावणीबाबत आढावा घेणे. प्रस्तावाना मंजूरी देणे.

उपरोक्त कार्यकक्षा व सदस्य असलेले पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरण स्थापन करण्यासाठी महासभेच्या सभेमध्ये चर्चा होवून निर्णयाकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:— ८८** **दिनांक:—३०/३/२००५.**

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सुचविलेल्या सदस्यांचे ''पर्यावरण नियोजन व विकास प्राधिकरण'' स्थापित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १५ :—** तदर्थ समितीच्या शिफारसीनुसार शहरातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास.................

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव जसा आहे तसा सर्वांनुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>विषय क्र. १५:—</u> तदर्थ समितीच्या शिफारसीनुसार शहरातील रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नामकरण करणे.

<u>प्रस्तावना:—</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेल्या रस्त्यांचे व चौकांचे नामकरण करणेकरिता खालील प्रमाणे प्रस्ताव आलेले आहेत.

| अक्र | रस्त्या/चौक | प्रस्तावित नांव |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर–४, मधील प्रभाग क्रमांक.१४ मधील विनस टॉकीजमागे बबन एसटीडी टेलिफोन बुथ ते एकविरा देवीमंदिर या परिसरास | ''गुलमोहर नगर'' |
| २ | उल्हासनगर–५,मधील प्रभाग क्रमांक.१० वीर तानाजीनगर येथील आर.पी.आय. कार्यालयासमोरील चौकास | ''माता रमाबाई भिमराव आंबेडकर चौक'' |
| ३ | उल्हासनगर–५ प्रभाग क्रमांक.१० वीर तानाजीनगर येथील रघुनाथबाबा मंदिर आणि डि.टि कलानी हायस्कुलसमोरील चौकास | ''स्वर्गीय मीनाताई ठाकरे चौक'' |
| ४ | उल्हासनगर–४, मधील प्रभाग क्रमांक.१८ मधील वॉको जॅक्शन समोरील चौकास | ''महाराणा प्रताप चौक'' |
| ५ | उल्हासनगर–४ मधील प्रभाग क्रमांक.१८ मधील दौलतराम मंगतानी चौक ते नागेश्वरमंदिर पर्यंतच्या मार्गास | ''संत नामदेव कुकरेजा मार्ग'' |
| ६ | उल्हासनगर–२ प्रभाग क्रमांक.५ मधील, बॅ.नं.५७५ ते बॅरेक नं.६२५ व आजूबाजूच्या परिसरास | ''स्वामी अमरदास नगर'' |
| ७ | उल्हासनगर–५ मधील प्रभाग क्रमांक... मधील, व्हिनस कारंजा ते नेताजी चौकपर्यंतच्या मार्गास | ''राजा धहिरसेन मार्ग'' |
| ८ | उल्हासनग–४ प्रभाग क्रमांक.१४ मधील मेघदुत अपार्टमेंटसमोरील चौकास व रस्त्यास | ''क्रांतीकारक हुतात्मा भाई कोतवाल चौक आणि मार्ग'' |
| ९ | उल्हासनगर–५ प्रभाग क्रमांक.११ मधील विठ्ठलनगर मधील चौकास | ''लोकशाहिर अण्णाभाऊसाठे चौक'' |
| १० | उल्हासनगनर–५ प्रभाग क्रमांक.११ मधील बॅरेक नंबर २०७५ च्या रुम नंबर १० ते २० पर्यंतच्या मार्गास | ''समाजसेवक हर्दाराम जग्याशी मार्ग'' |
| ११ | उल्हासनगर–१, मधील प्रभाग क्रमांक.१ मधील डि.टि. कलाणी कॉलेजसमोरी ऐब्लॉक रोड महात्माफुले चौक पर्यतच्या रस्त्यास | ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग'' |
| १२ | उल्हासनगर–४, प्रभाग क्रमांक.२३ मधील महावीर हॉस्पीटल ते रतन शॉप फॅक्टरी ते ब्लॉक नं.५८४ ते टेकचंद निवास बॅरेक नं.१८७५ मार्गे महावीर हॉस्पीटल सेक्शन–२५ पर्यतच्या परिसरास | ''स्वामी नारायणदास उदासी नगर'' |
| १३ | उल्हासनगर–५, मधील प्रभाग क्रमांक.१३, मधील बॅ नं. २११९ ते २१२६ पोलिस स्कॉटर्स आणि करुणा अपार्टमेंटच्या परिसरास | '' हरि ओम नगर '' |
| १४ | उल्हासनगर–५ मधील प्रभाग क्रमांक.१३ मधील ब्लॉक नंबर ७३४ आणि ७३५ च्या समोरील परिसरास | '' गणेश कॉलनी '' |
| १५ | उल्हासनगर–३, प्रभाग क्रमांक.७ मधील बॅरेक नंबर ७३२ ते चरणजीत गीरणीपर्यंत रस्त्यास | '' स्वर्गीय गुप्ता दुखंन्ती मार्ग '' |
| १६ | उल्हासनगर–४,प्रभाग क्रमांक.९ मधील ब्लॉक नं. ऐ–३७२ समोरील भारतनगर येथील चौकास | '' महाराणा प्रताप चौक '' |
| १७ | उल्हासनगर–४ प्रभाग क्रमांक.१४ मधील, शिवलिला आर्केडच्या मागील परिसरास | '' बाबा साई नगर '' |
| १८ | उल्हासनगर–४ प्रभाग क्रमांक.१४ मधील शारदा सागर सोसायटी मागील चौकास | ''बाबा किमतराय चौक'' |
| १९ | उल्हासनगर–४ प्रभाग क्रमांक.१४ मधील शारदा सागर सोसायटी मागील रस्त्यास | ''बाबा राधेश्याम मार्ग'' |

| | | |
|---|---|---|
| २० | उल्हासनगर—२ प्रभाग क्रमांक.२२ बॅरेक नंबर ७४८ माखणशहा गुरुद्वाराजवळ गुरुतेगबहादूर कॉलनी येथील चौकास | ''माखणशहा लबाणा चौक'' |
| २१ | उल्हासनगर—३ प्रभाग क्रमांक.१९ मधील कल्याण अंबरनाथ रोड लगत साईबाबानगर मधून अनमोल टावरकडे जाणा—या शांतीनगर येथील रस्त्यास | ''संत गजानन महाराज मंदिर मार्ग'' |

उक्त रस्त्यांचे / चौकांचे नामकरण झाल्याचा कागदोपत्री पुरावा सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कार्यालयात आढळत नाही. तसेच उक्त चौकाला कोणताही नावाचा नामफलक लावलेला आढळलेला नाही. तदर्थ नामकरण समिती ठराव क्र. ७ दिनांक ८.१२.२००४ अन्वये उपरोक्त दर्शविलेले २१ नामकरण प्रस्ताव मान्य केलेले आहेत. सदरहू तदर्थ नामकरण समितीच्या बैठकीस मा. महापौर/अध्यक्ष व इतर चार सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते.

तदर्थ नामकरण समितीने शिफारस केलेल्या उपरोक्त एकूण २१ नामकरण प्रस्तावास अंतिम मंजूरी देणेस मा. महासभेसमोर प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्रः—</u>८९ दिनांकः—३०/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार नामकरण तदर्थ समितीच्या शिफारशीप्रमाणे उपरोल्लेखित रस्त्यांचे, सार्वजनिक जागांचे व चौकांचे नामकरण करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> सभा संपली असुन कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. महापौर श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–१८/३/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/३/२००५

सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.३.२००५ सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :– श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :– श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ४१ | श्री. राज असरोंडकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ४३. | श्री. रमेश चव्हाण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४४. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४५. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४६. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४७ | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४८. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ५१. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ५२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५४. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| १७. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ५५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५७. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २१. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ५९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ६०. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| २३. | श्री. नाना पवार | ६१ | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २४. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ६२ | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २५. | श्री. जग्याशी राजु | ६३ | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६४. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २७. | श्री. शांताराम निकम | ६५. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६६. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| ३०. | श्रीमती सोनेजी मिना | ६८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६९. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ७०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ३३. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ७१. | श्री. संजय बठिजा |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ७२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३५. | श्री. मोहन साधवानी | ७३. | श्री. बेहरानी मोहन |
| ३६. | श्री. सतरामदास जेसवानी | ७४. | श्रीमती मालती करोतिया |
| ३७. | श्रीमती जया साधवानी | ७५. | श्रीमती मिनु राज दासानी |
| ३८. | श्री. लुंड गोविंदराम | ७६. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३९. | श्रीमती भावना रवी खिलनानी | ७७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ४०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ७८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ७९. | श्री. राजेश वदारिया |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्री. बेहरानी ठाकुरदास, २. श्री. माखिजा हरदास हे सभेस अनुपस्थित होते.

वंदेमातरम म्हणून सांयकाळी ४.३० वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचून दाखवितात.

दिनांक १ एप्रिल, २००५ पासुन निवृत्त होणा—या ८ स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणुक करणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, निवडणुक प्रक्रिया सुरु होण्या अगोदर सभागृहातील सर्व सदस्यांना मी विनंती करेल की, या सभेचे कामकाज सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित केले जावे. ज्या लोकांना आपली उमेदवारी मागे घ्यायची आहे, त्याबाबत एकमत घेण्यासाठी, संमती घेण्यासाठी जर कुणी उमेदवार उमेदवारी मागे घेत असेल तर ठिक आहे, नाहीतर सांयकाळी ६.०० वाजता निवडणुक प्रक्रिया चालु केली जावी. व आमच्या काही सदस्यांना सांयकाळी ५ ते ५.३० या वेळेत ''तिज्याला'' जायचे आहे. तर मला असे वाटते की, आता या सभेचे कामकाज दिड तासासाठी स्थगित करुन सांयकाळी ६.०० वाजता घेतले तर खुप चांगले होईल. धन्यवाद.

<u>मा. सचिव :—</u> कुणाची काही हरकत? ठिक आहे? तर ही सभा सांयकाळी ६.०० वाजता पुन्हा सुरु केली जाईल.

<u>मा. महापौर :—</u> या सभेचे कामकाज आज सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

———————————————————————————————————————————————————————

सांयकाळी ४.३० वाजता स्थगित केलेल्या सभेचे कामकाज सांयकाळी ६.३० वाजता पुन्हा सुरु करण्यात आले. त्यावेळी मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी, २) श्रीमती निना नाथानी, ३) श्री. ठाकुर बेहरानी, ४) श्री. हरदास माखिजा हे सन्माननिय सदस्य अनुपस्थितीत होते.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी हया अनुपस्थितीत असल्याने त्यांच्या जागी उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणून आसनस्थ होते.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

दिनांक १ एप्रिल, २००५ पासुन निवृत्त होणा—या ८ स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणुक करणे.

मागील वेळेस स्थायी समितीची जी रचना करण्यात आली होती. त्यामधील ८ सन्माननिय सदस्य निवृत्त होणार आहेत. त्यांची नावे याप्रमाणे आहेत .......

९. श्रीमती ज्योती कालानी
१०. श्री. मोहन बेहरानी
११. श्री. रामदास उमाप
१२. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
१३. श्रीमती भारती छाब्रिया
१४. श्रीमती नंदीनी बामणकर
१५. श्री. सतरामदास जेसवानी
१६. श्री. नारायण पंजाबी

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, स्थायी समितीच्या सदस्य पदाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्या अगोदर सभागृहातील सर्व सदस्यांना मी विनंती करेन उमेदवारी मागे घेण्याबाबत अदयाप पर्यंत एकमत /संमती झालेली नाही म्हणून बुधवार दिनांक २३/३/२००५ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सभेचे कामकाज स्थगित करण्यात यावे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड / श्री. धनंजय बोडारे:–</u> आमचा विरोध आहे. ४ वाजल्यापासुन ६ वाजेपर्यंत आपण वेळ घेतलीत तरीही अदयाप उमेदवारी मागे घेण्याबाबत एकमत झाले नाही काय?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर /श्री. धनंजय बोडारे :–</u> आपणांस कुणाचे मत घ्यायचे आहे? आपणांस कुणाचे मत घ्यायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे /श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> सभेचे कामकाज आपण कितीवेळा तहकुब करत आहात?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> याबाबत मतदान सुध्दा होईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> सभागृहाच्या कामकाजाचा खेळ मांडला आहे? या अगोदर उमेदवारी मागे घेण्याकामी संमती मिळविण्याकामी दिड तास सभेचे कामकाज स्थगित केले. हा विषय काय तात्काळ आलेला नाही. सभा सुचना निघाल्यापासुन एवढा वेळ आपण काय करत होतात? या अगोदर ४ वाजता सभा होती. ४ ची सभा आता ६.३० वाजता सुरु होत आहे. या दोन–अडीच तासामध्ये काय केलेत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> पगडी होती.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> श्री. किशोर वनवारीजी, आपण म्हणत होतात, पगडी होती तर पगडी कुणाची होती?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> ज्यांची पगडी होती त्यांचे नाव सांगु? ते श्रीमती नीना नाथानी सांगत आहेत. ऐकुन घ्या.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u> एकमत / संमतीची आम्हांला आवश्यकता नाही.

<u>मा. सचिव :–</u>आपली हरकत आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> होय, आमची हरकत आहे.

<u>मा. सचिव :–</u> मतदान घेतले जावे काय?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> चुकीची प्रथा चालु झाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> हे कोणासाठी चालले आहे हे सुध्दा माहित आहे.

<u>मा. उप–महापौर / पीठासीन अधिकारी :–</u> मी सदरचा प्रस्ताव मतास टाकीत आहे.

<u>मा. सचिव :–</u> जे सन्माननिय सदस्य सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत, ४७ आहेत ना? ४८? सन्माननिय सदस्या श्रीमती मालती करोतिया जी आपला हात वर आहे ना? महोदया आपण कुणाच्या बाजुने मत देत आहात? आपण सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या बाजुने आहात की नाही? आपला हात वर होता. आपल्या मताची नोंद कोणत्या बाजुने घ्यायची?

सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या बाजुने ४७ मते.

सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या बाजुने ४९ मते.

४८.श्री. टेकचंदानी राजु
४९.श्रीमती रामचंदानी भावना
५०.श्री. लिंगे सुर्यकांत
५१.श्री. मुचंदानी महेंद्र
५२.श्री. वाघे शामु बाबु
५३.श्री. एडके गणपत
५४.श्रीमती शर्मा कमला
५५.श्री. वलेचा पृथ्वी
५६.श्री. रोहडा श्यामसुंदर
५७.श्री. गुप्ता प्रभुनाथ
५८.श्रीमती गुप्ता अनिता
५९.श्री. पवार नाना
६०.श्रीमती अहुजा निता
६१.श्री. जग्याशी राजु
६२.श्री. निकम शांताराम
६३.श्री. ठाकुर विनोद
६४.श्रीमती सोनेजी मीना
६५.श्रीमती मसंद माया
६६.श्री. गायकवाड सुरेश
६७.श्रीमती वनवारी मोना
६८.श्री. किशोर वनवारी
६९.श्री. जेसवानी सतरामदास
७०.श्री. लुंड गोविंदराम
७१.श्रीमती खिलनानी भावना
७२.श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
७३.श्रीमती कारीरा रेखा
७४.श्री. पमनानी ईश्वर
७५.श्री. पंजाबी नारायण
७६.श्रीमती पंजाबी दिपा
७७.श्री. जयसिंघानी अनिल
७८.श्रीमती भठिजा कोमल
७९.श्री. साधवानी मनोज
८०.श्री. रामरख्यानी मोहनदास
८१.श्रीमती माखिजा किरण
८२.श्री. लबाना होशियारसिंग
८३.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
८४.श्री. तलरेजा विनोद
८५.श्रीमती रिझवानी सुजाता
८६.श्रीमती छाब्रिया भारती
८७.श्री. भठिजा संजय
८८.श्री. मोकल चंदाराम
८९.श्रीमती दासानी मिनु
९०.श्री. म्हस्के अंकुश
९१.श्री. यादव लालबिहारी

९२.श्री. जाधव प्रशांत
९३.श्री. जाधव सुरेश
९४.श्री. टाले प्रमोद

जे सन्माननिय सदस्य या सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत, कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.

## सभेचे कामकाज स्थगित करण्याच्या प्रस्तावाच्या विरोधात २६ मते.

२७.श्री. साधवानी मोहन
२८.श्रीमती साधवानी जया
२९.श्री. भालेराव गौतम
३०.श्रीमती वसिटा बेबी
३१.श्री. ठाकुर अशोक
३२.श्री. बेहरानी मोहन
३३.श्रीमती करोतिया मालती
३४.श्रीमती जावळे संगिता
३५.श्रीमती मोकल सिमा
३६.श्री. उमाप रामदास
३७.श्री. पुरस्वानी जमनादास
३८.श्री. रुपचंदानी बच्चाराम
३९.श्री. असरोंडकर राज
४०.श्रीमती कृष्णानी रेखा
४१.श्री. भुल्लर राजेंद्रसिंग
४२.श्री. सोनवणे नथु
४३.श्री. गायकवाड दिलीप
४४.श्रीमती बामणकर नंदीनी
४५.श्रीमती खांडेकर प्रेमा
४६.श्रीमती माने किरण
४७.श्री. चव्हाण रमेश
४८.श्री. बोडारे धनंजय
४९.श्री. पाटील विश्वनाथ
५०.श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई
५१.श्री. चौधरी राजेंद्र
५२.श्रीमती जयश्री सुर्वे

मा. उपमहापौर / पीठासीन अधिकारी:— या सभेचे कामकाज बहुमताने बुधवार दिनांक २३/३/२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केले जात आहे.

मा. सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.३५ वाजता सभेचे कामकाज सोमवार दिनांक २३.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२३/३/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २३/३/२००५

सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.३.२००५ रोजी ४.०० वाजता आयोजित केली होती. सदर सभेचे कामकाज त्याच दिवशी सांयकाळी ६.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर सदर सभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा बुधवार दिनांक २३.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उपमहापौर, श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :— श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. टेकचंदानी राजु | २८. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| ३. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | २९. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ४. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३०. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ५. | श्री. वाघे शामु बाबु | ३१. | श्री. जाधव सुरेश |
| ६. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ३२. | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| ७. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३३. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्री. एडके गणपत गोविंद | ३४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३५. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १०. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३६. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| ११. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ३७. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १२. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ३८. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १३ | श्रीमती.गुप्ता अनिता धर्मेंद्र | ३९. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| १४. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४० | श्री. जयसिंघानी अनिल |
| १५. | श्री. नाना पवार | ४१ | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| १६. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ४२. | श्रीमती किरण लखी माखिजा |
| १७. | श्री. जग्याशी राजु | ४३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| १८. | श्री. शांताराम निकम | ४४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| १९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४५. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| २०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४६. | श्री. संजय बठिजा |
| २१. | श्रीमती सोनेजी मिना | ४७ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ४८. | श्रीमती मिनु राज दासानी |
| २३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ४९. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २४. | श्रीमती. वनवारी मोना अशोक | ५०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २५. | श्री. जेसवानी सतरामदास | | |
| २६. | श्रीमती जया साधवानी | | |
| २७. | श्री. लुंड गोविंदराम | | |

तर,

१) मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी तसेच, मा. सदस्य / सदस्या २. श्रीमती. संगिता रमेश जावळे, ३. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर, ४. श्री. सोनवणे नथु काशिराम, ५. श्री. उमाप रामदास राघोजी, ६. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ७. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ८. श्री. वनवारी किशोर नारायणदास, ९. श्री. मोहन साधवानी, १०. श्री. राज असरोंडकर, ११.श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, १२. श्री. रमेश चव्हाण, १३. श्रीमती. जयश्री सुर्वे, १४. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १५. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, १६.श्री. पाटील विश्वनाथ गौतम, १७. श्री.भालेराव गौतम यशवंत, १८. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १९. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, २०. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे, २१. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, २२. श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद, २३. डॉ. निना प्रकाश नाथानी, २४. श्री. बेहरानी मोहन, २५. श्रीमती करोतिया मालती,

२६. श्री. बेहरानी ठाकुरदास, २७. श्री. माखिजा हरदास, २८. श्री. वदरीया राजेश नानिकराम , २९. श्रीमती सिमा मोकल , ३०. श्री. दिलीप गायकवाड, ३१. श्री. पंजाबी लाल हे सभेस अनुपस्थित होते.

वंदेमातरम म्हणून सांयकाळी ४.२२ वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. महापौरजी, माझा असा प्रस्ताव आहे की, आजच्या सभेचे कामकाज दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केले जावे.

मा. उप–महापौर /पीठासीन अधिकारी :– ठिक आहे, सभेचे कामकाज आपणा सर्वानुमते सोमवार दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केले जात आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–मा. महापौर, काही गरीब फेरीवाले आपल्या काही मागण्यांच्या पुर्ततेसाठी महापालिका मुख्यालयासमोर उपोषणास बसले आहेत. मला असे वाटते की, सभा संपल्यानंतर त्यांच्याकडे जावून त्यांच्या काय मागण्या आहेत त्या जरा समजावून घेवुन त्यांना आश्वासन देवून त्यांचे उपोषण समाप्त करावे.

मा. उप–महापौर /पीठासीन अधिकारी :– ठिक आहे, सभा संपल्यानंतर आपण सर्वजण जावु या.

मा. सचिव :–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ४.२७ वाजता सभेचे कामकाज मंगळवार दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. उप–महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२९/३/२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २९/३/२००५ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा त्याचदिवशी सांयकाळी ६.०० वाजता आयोजित केली होती. यावेळी सदरच्या सभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा बुधवार दिनांक २३/३/२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. यावेळी पुन्हा सदरच सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा सोमवार दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. दिनांक २८.३.२००५ रोजी शिवजयंती असल्यामुळे या सभेचे कामकाज दिनांक २९.३.२००५ रोजी ठेवण्याबाबत विरोधी पक्षाच्या सन्माननिय सदस्यांनी विनंती केल्यानुसार सदरची सभा मंगळवार दिनांक २९.३.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केली होती. त्यावेळी सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :— श्रीमती ज्योती कालानी

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३१. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| ३. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३२. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३४. | श्रीमती. वनवारी मोना अशोक |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३६. | श्री. मोहन साधवानी |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ३७. | श्रीमती जया साधवानी |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ३८. | श्री. लुंड गोविंदराम |
| १० | श्री. दिलीप गायकवाड | ३९. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४० | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४१ | श्री. राज असरोंडकर |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४३. | श्री. रमेश चव्हाण |
| १५. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४४. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| १६. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४५. | श्री. जाधव सुरेश |
| १७. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ४६. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| १८. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४७ | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| १९. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४८. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| २०. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ४९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| २२. | श्री. नाना पवार | ५१. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| २३. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| २४. | श्री. जग्याशी राजु | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| २५. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५४ | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| २६. | श्री. शांताराम निकम | ५५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| २७. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| २८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५७. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २९. | श्रीमती सोनेजी मिना | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ३०. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |

| | | | |
|---|---|---|---|
| ६०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद | ६७. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| ६१ | श्रीमती. भटीजा कोमल अमृत | ६८. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज |
| ६२ | श्री. जयसिंघानी अनिल | ६९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ६३ | श्री. रामरख्यानी मोहनदास | ७०. | श्री. बेहरानी मोहन |
| ६४. | श्रीमती किरण लखी माखिजा | ७१. | श्रीमती मिनु राज दासानी |
| ६५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना | ७२. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ६६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर | ७३. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| | | ७४. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा. उप–महापौर १. श्री. विनोद तलरेजा, मा. सदस्य / सदस्या २. श्री. जेसवानी सतराम फतनदास, ३. श्री. संजय रामचंद्र बठीजा, ४. श्रीमती करोतिया मालती, ५. श्री. बेहरानी ठाकुरदास, ६. श्री. माखिजा हरदास, ७. श्री. वदरीया राजेश नानिकराम हे सभेस अनुपस्थित होते.

वंदेमातरम म्हणून दुपारी १२.२० वाजता सभेची सुरुवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u>मा. महापौरजी, उल्हासनगर कॅम्प ४ आणि ५ मध्ये फार मोठया प्रमाणावर पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे बरेचसे नगरसेवक मा. आमदार साहेबांबरोबर मंत्रालयात एका बैठकीत व्यस्त असल्याने आम्ही या सभेचे कामकाज सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करु इच्छित आहोत.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> ५.०० वाजता स्थायी समितीची सभा आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u> स्थायी समिती बाबत नंतर विचार करु. प्रथम आपण महासभेबाबत बोलू या.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> त्या अगोदर स्थायी समितीची सभा आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u> ठिक आहे, त्याबाबत स्थायी समितीत पाहू या. या सभेचे कामकाज ५.३० वाजता ठेवले जावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर महोदया, प्रत्येक वेळा सभा आयोजित करुन सभेचे कामकाज स्थगित करणे माझ्या मते योग्य नाही. सर्व नगरसेवक आपले कामकाज सोडुन सभेसाठी येथे आले आहेत, आणि तीही स्थायी समितीच्या सदस्यांच्या निवडणूकीची सभा आहे. अशाप्रकारे वारंवार सभा स्थगित करणे योग्य नाही. कारण की, या अगोदरसुध्दा दोन–तीन वेळा असे झालेले आहे. व आज पुन्हा असे होत आहे. यामुळे संपुर्ण दिवस व्यर्थ जात आहे. मला असे वाटते की, या सभेचे कामकाज चालु ठेवावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, आमचे बंधू श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आता हे सांगितले की, आजच्या सभेचे कामकाज स्थगित केले जावू नये, त्याबाबत मी थोडा खुलासा करु इच्छितो, त्या दिवशी महासभेमध्ये सभा स्थगित करण्याबाबत मी जे सांगितले होते, त्यावेळेस आम्ही त्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी २८ तारखेस सभा ठेवण्याबाबत सुचविले होते. परंतु आमच्या सचिव साहेबांकडे शिवसेना भाजपाचे एक शिष्ट मंडळ आले होते व त्यांनी असे म्हटले होते की, २८ तारखेस शिवजयंती असल्यामुळे आम्ही या सभेस येवू शकणार नाही म्हणून या सभेचे कामकाज २९ तारखेस ठेवण्यात यावे. म्हणूनच महासभेचे कामकाज व्यवस्थित चालावे म्हणून आम्ही या बाबतीत आपले जे म्हणणे होते ते मान्य केले होते. २८ तारखेस आम्ही ही सभा आयोजित केली होती. २८ तारखेस या सभेचे कामकाज झाले

असते तर आजची ही अडचण आली नसती. उल्हासनगर कम्प ४ व ५ मध्ये पाण्याची जी कपात करण्यात आलेली आहे त्याबाबत संबंधीत मंत्री महोदयांनी मंत्रालयात बैठक आयोजित केलेली आहे. आणि त्या बैठकीसाठी काही नगरसेवक मंत्रालयात गेले असल्याने तसेच पाण्याच्या या कपाती बाबत काल मला सुध्दा उपोषणास बसावे लागले होते. पाणी कपातीबाबत संबंधीत मंत्री महोदयांबरोबर आज ११.०० वाजता बैठक आहे. तर आमचे उप–महापौर व अन्य बरेचसे नगरसेवक त्या बैठकीसाठी गेले आहेत, पाण्याची जी कपात करण्यात आलेली आहे ती रद्द केली जावी. उल्हासनगर कॅम्प ४ व ५ मध्ये पाण्याची जी टंचाई निर्माण झाली आहे ती दूर होईल. म्हणून आम्ही आपणांस विनंती करतो की, या सभेचे कामकाज सांयकाळी ५.३० वाजेपर्यंत स्थगित केले जावे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> ही गोष्ट खरी आहे की, शहरामध्ये पाणी टंचाई आहे म्हणून सभा स्थगित करण्याबाबत आपण विनंती करीत आहात. परंतु अशी विनंती जर आपण विरोधी पक्षास केली तर आम्ही कोणत्याही गोष्टी बाबत कधीही हरकत घेतलेली नाही. या अगोदर सुध्दा दोन–दोन, तीन–तीन वेळा सभेचे कामकाज स्थगित करण्यात आले होते परंतु त्याबाबत विरोधी पक्षीयास विनंती केली नव्हती. त्यावेळी सत्ताधारी पक्ष आपल्या बहुमताच्या जोरावर मतदान घेवून काम करत असतो. जर आपण विनंती केलीत तर आम्ही कोणत्याही बाबींवर सहकार्य देण्यास तयार आहोत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, आता येथे सांगण्यात आले की, पाणी कपातीबाबत चर्चा करण्यासाठी एक शिष्ट मंडळ मंत्रालयात गेले आहे. आम्ही मान्य करतो व विश्वास ठेवतो की, पाणी कपातीबाबत चर्चा करण्यासाठी नगरसेवकांचे एक शिष्ट मंडळ चर्चेसाठी गेले असल्याने आजच्या सभेचे कामकाज स्थगित करत आहात परंतु या अगोदरचा जो अनुभव आहे, तो कोणतेही कारण नसतांना या अगोदर तीन वेळा सभेचे कामकाज स्थगित करण्यात आले. महापौर पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर दुस–या सभेचे हे कामकाज आहे. पहिली सभा बजेट बाबतची होती आणि दुस–या या सभेचे कामकाज तीन वेळा स्थगित झाले आहे. हे बरोबर नाही. सभागृहाच्या मर्यादेचे हे उल्लंघन आहे. वारंवार स्थगित होणा–या या सभांमुळे सत्ताधारी व विरोधी पक्षांतील सदस्यांची सभेबाबत अनास्था निर्माण होवून विश्वासच उडुन जाईल. म्हणून सभागृहाचे पाकिृय राखून यापूढे तरी अशी प्रथा पडणार नाही. याची काळजी घ्यावी व आज आपण जे कारण सांगितले ते खरे मानुन आजच्या सभेचे कामकाज ४.०० वाजेपर्यंत किंवा ५.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यास आम्ही सहमती देतो. परंतु कृपया सदस्यांचा व अधिका–यांचा आपल्यावरील, सभेवरील विश्वास उडणार नाही, अश्या विश्वासाचे वातावरण तयार करण्याचे प्रयत्न करावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>मा. महापौरजी, मागच्या वेळेस आपण सभेचे कामकाज स्थगित केले होते, तर त्यावेळेस आमची शिवजंयती होती व शिवजयंती मुळे आम्ही विंनती केली होती की, २८ तारखेची सभा २९ किंवा ३० तारखेस ठेवा. तर त्यावेळेस आपण आमची विंनती मान्य करुन २८ तारखेस सभा न ठेवता ती २९ तारखेस सकाळी ठेवली. त्यावेळेस आम्हांस सचिव साहेबांनी सांगितले की, महापौर महोदयांना बाहेर जायचे आहे, मिरा भाईंदर येथे त्यांचा सत्कार होणार आहे, त्यामुळे या सभेचे कामकाज २९ तारखेला सकाळी १२.०० वाजता ठेवत आहोत व आज अचानक पाणी कपातीचे कारण दाखवून या सभेचे कामकाजही स्थगित केले जात आहे. हे मला चुकीचे वाटत आहे आणि यामध्ये काहीतरी राजकारण आहे असे वाटत आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u> सन्माननिय महापौरजी, या उल्हासनगर शहरामध्ये कॅम्प ४ व ५ मध्ये पाण्याची समस्या आजच नाही तर गेल्या अनेक महिन्यापासून , गेल्या दोन –तीन वर्षापासून कॅम्प ४ व ५ मध्ये पाणी नाही. सभेचे कामकाज वारंवार, ४ थ्यांदा पाण्याचे कारण सांगुन स्थगित करणे योग्य नाही. हा सभागृहाचा अपमान आहे. सत्ताधारी पक्ष मनमानी करण्याचा प्रयत्न करत आहे. अशी शंका या ठिकाणी वाटते. तरी पण मी या ठिकाणी सांगु इच्छितो की, वारंवार सभेचे कामकाज स्थगित केल्याने या सभागृहातील सर्व नगरसेवकांचा वेळ व्यर्थ जातो. हया सर्व नगरसेवकांना आपली प्रभागातील कामे सोडुन वारंवार येथे यावे लागते. यापूढे आपल्या नेतृत्वाखाली या सभागृहात ज्या सभा होतील, त्यामध्ये असे पुन्हा होवू नये, असे मी या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो आणि पाण्याचे जे कारण आहे, ते कारण आजचेच नाही कित्येक महिन्यांपासुन, तीन वर्षांपासुन आम्ही मोर्चे काढत आहोत. आता ही काही दिवसापूर्वी कॅम्प ४ व ५ मधील नागरीकांचा श्री. धनंजय बोडारे व श्री. रमेश चव्हाण यांनी एक संयुक्तरीत्या मोर्चा काढला होता. त्यामध्ये हजारोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या. पाण्याची जी समस्या आहे ती दुर झालेली

नाही, आणि ती पुढेही दूर होईल किंवा नाही याची  शंका वाटते, परंतु आजच्या सभेचे कामकाज स्थगित करण्यासाठी हा जो मुद्दा घेतला आहे तो चुकीचा आहे एवढेच सांगु इच्छितो धन्यवाद.

मा. महापौर :– सन्माननिय सदस्य हो, २९ तारखेला सांयकाळी ५.०० वाजता मिरा–भाईंदर येथे महापौरांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती.  सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.  परंतु तो रद्द झाल्यामुळे आज संध्याकाळी स्थायी समितीची आम्ही सभा बोलावली आहे.  आपली ही शंका मी दूर करु इच्छित आहे व ही वस्तुस्थिती आहे की, काल रात्री उशिरा अचानक एका बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.  मंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली पाणी प्रश्नांसंबंधीत जे अधिकारी  आहेत त्यांना बोलाविण्यात आले आहे.  आमच्या शहरात कॅम्प नंबर ४ व ५ मधील पाण्याचा दाब कमी करण्यात आला आहे त्या बाबतीत आम्ही दुरवर धावपळ केली.  व त्याचा परिणाम असा झाला की, काल रात्री आम्हांला असे माहित पडले की, याबाबतीत विधानसभेमध्ये एका सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे, आणि म्हणून त्या सभेसाठी आमचे उप–महापौर व काही सन्माननिय सदस्य गेले आहेत आपणास जे गैरसोयीचे होत आहे त्याबद्दल आम्हांस खेद आहे व हया सभेचे कामकाज सांयकाळी ५.३० वाजेपर्यंत स्थगित केले जात आहे.

दुपारी १२.२८ वाजता सभेचे कामकाज सांयकाळी ५.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२९/३/२००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २९/३/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा त्याचदिवशी सांयकाळी ६.०० वाजता आयोजित केली होती. यावेळी सदरच्या सभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा बुधवार दिनांक २३/३/२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. यावेळी पुन्हा सदरच सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा सोमवार दिनांक २८.३.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. दिनांक २८.३.२००५ रोजी शिवजयंती असल्यामुळे या सभेचे कामकाज दिनांक २९.३.२००५ रोजी ठेवण्याबाबत विरोधी पक्षाच्या सन्माननिय सदस्यांनी विनंती केल्यानुसार सदरची सभा मंगळवार दिनांक २९.३.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केली होती. यावेळीया सभेचे कामकाज पुन्हा स्थगित करुन सदरची सभा त्याच दिवशी सांयकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आली यावेळी सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा.महापौर :— श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :— श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३३. | श्रीमती. वनवारी मोना अशोक |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर | ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास |
| ५. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३५. | श्री. मोहन साधवानी |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३६. | श्री. जेसवानी सतरामदास |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३७. | श्रीमती जया साधवानी |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३८. | श्री. लुंड गोविंदराम |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ३९. | श्रीमती भावना रवी खिलनानी |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४१. | श्री. राज असरोंडकर |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४३. | श्री. रमेश चव्हाण |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ४४. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४५. | श्री. जाधव सुरेश |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४६. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| १७. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४७ | श्री. देवेंद्रसिंह खेमाणी |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत) | ४८. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४९. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५०. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| २१. | श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र | ५१. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| २२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५२. | श्री. पाटील विश्वनाथ गौतम |
| २३. | श्री. नाना पवार | ५३. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| २४. | श्रीमती. आहुजा निता प्रकाश | ५४. | श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास |
| २५. | श्री. जग्याशी राजु | ५५ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| २७. | श्री. शांताराम निकम | ५७. | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| ३०. | श्रीमती सोनेजी मिना | ६०. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६१. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड, | ६२. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |

| | | | |
|---|---|---|---|
| ६३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत | ७१. | श्री. संजय बठिजा |
| ६४. | श्री. जयसिंघानी अनिल | ७२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ६५. | श्री. रामरख्यानी मोहनदास | ७३. | श्री. बेहरानी मोहन |
| ६६. | श्रीमती किरण लखी माखिजा | ७४. | श्रीमती मिनु राज दासानी |
| ६७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना | ७५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ६८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर | ७६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ६९. | डॉ. निना प्रकाश नाथानी | ७७. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ७०. | श्रीमती. छाबरीया भारती पहलाज | ७८. | श्री. राजेश वदारिया |

तर,

मा. सदस्य / सदस्या १. श्रीमती करोतिया मालती, २. श्री. बेहरानी ठाकुरदास, ३. श्री. माखिजा हरदास हे सभेस अनुपस्थित होते.

मा. सचिव :—स्थायी समितीचे ८ सदस्यांचे पदासाठी १० उमेदवार रिंगणात असून त्यांची नावे येणेप्रमाणे आहेत.

१) श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल
२) श्रीमती कालानी ज्योती सुरेश
३) श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
४) श्री. जग्याशी राजु किशनचंद
५) श्री. जाधव सुरेश मधुकर
६) श्री. ठाकुर अशोक भगवानदास
७) श्रीमती मसंद माया घनश्यामदास
८) श्री. मोकल चंदाराम विठोबा
९) श्री. वाघे शामु बाबु
१०) श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास

यामधून आपणांस केवळ ८ सदस्यांची निवड करायची आहे. ८ जागांसाठी १० उमेदवार आहेत. आपणामधील कुणी उमेदवार जर आपली उमेदवारी मागे घेवू इच्छित असेल तर त्यासाठी ५ मिनिटाची वेळ दिली जात आहे.

श्रीमती कारीरा रेखा मनुमल यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. आता केवळ ९ उमेदवार निवडणुकसाठी सज्ज आहेत. आणि यासाठी आता निवडणुक घ्यावीच लागेल.

मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. सचिव साहेब, या निवडणुकीमध्ये जर कुण्या दोन उमेदवारांना एकसारखीच मते मिळाली तर .............

मा. सचिव:— याबाबतच्या सर्व सुचना मी आपणांस देत आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मी जे—जे आपणांस विचारतो त्याची कृपया मला माहिती दया.

मा. सचिव :— मी आपल्या शंकांचे निरसन करत आहे, त्या व्यतिरिक्त जी काही आपणांस शंका असेल ती आपण विचारा.

निवडणुकीची प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी अवश्यक त्या सुचना मी आपणांस देत आहे.

प्रत्येक सन्माननिय सदस्यास ८ मते देण्याचा अधिकार राहिल.
एका मतासाठी एक फुली अशाप्रकारे एकुण ८ फुल्या ते मारु शकतात. त्यांना पाहिजे तर ते आठही मते एका उमेदवारास देवू शकतात. किंवा त्यांचे विभाजन करुन अन्य उमेदवारांना सुध्दा देवू शकतात. परंतु एकुण ८ फुल्यांपेक्षा जास्त फुल्या होता कामा नयेत.

आपणांस या प्रकारची मतपत्रिका दिली जाईल. या मतपत्रिकेचे दोन भाग केले जातील. या मतपत्रिकेवर लहान लहान छिद्रे करण्यात आलेली आहेत. ज्यास इंग्रजीमध्ये परपोरेशन म्हटले जाते. मतपत्रिकेच्या या दोन भागांना वेगवेगळे करण्यासाठी ही छिद्रे करण्यात आली आहेत. आपणांस मतपत्रिका देतांना मतपत्रिकेवर आपले नाव लिहून आपली स्वाक्षरी घेतली जाईल. व या दोन्ही भागांच्या मध्यभागी महानगरपालिकेची मुद्रा उमटविलेली आहे. हे दोन्ही भाग वेगवेगळे करतांना महापालिकेच्या मुद्रीकेचा अर्धा भाग या प्रत्येक भागावर उमटविलेला असेल. व प्रत्येक मतपत्रिकेच्या मागील भागावर मा. महापौराची स्वाक्षरी असेल. आता नऊ उमेदवार रिंगणात आहेत.

पहिल्या क्रमांकावर आहेत श्रीमती कालानी ज्योती सुरेश, त्यांच्या नावासमोर आठ रकाने तयार करण्यात आले आहेत. या एका रकान्यामध्ये एक फुली करायची आहे.

जे नऊ उमेदवार रिंगणात आहेत त्यांची नावे याप्रमाणे आहेत.

१) श्रीमती कालानी ज्योती सुरेश
२) श्रीमती क्रिष्णानी रेखा हरेश
३) श्री. जग्याशी राजु किशनचंद
४) श्री. जाधव सुरेश मधुकर
५) श्री. ठाकुर अशोक भगवानदास
६) श्री. वाघे शामु बाबु
७) श्रीमती मसंद माया घनश्यामदास
८) श्री. मोकल चंदाराम विठोबा
९) श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास

प्रत्येक सदस्याने ८ मते दयायची आहेत, प्रत्येक रकान्यामध्ये एक मत याप्रमाणे ८ रकान्यांमध्ये ८ मते दर्शवायची आहेत. मत दर्शविण्यासाठी १ मतासाठी १ फुली याप्रमाणे ८ मतांसाठी ८ फुल्या मारायच्या आहेत. जर कुण्या एका उमेदवाराच्या नावापूढील रकान्यात ८ पेक्षा जास्त फुल्या मारल्या किंवा अन्य उमेदवारांच्या नावांपुढील रकान्यांमध्ये मारलेल्या फुल्यांची एकुण संख्या ८ पेक्षा जास्त झाली तर आपली जी मतपत्रिका आहे ती अवैध मानली जाईल. आपल्याला जे मत दर्शवायचे आहे ते मतपत्रिकेवरील मी जे आपणासं रकाने दाखविले त्यांच्या आतच मत दर्शवायचे आहे. व आपणांस हे जे फुली मारुन मत दयायचे आहे ते आम्ही आपणांस या कामी जे साहित्य पुरविणार आहोत, त्याचा वापर करुन आपणांस मत दर्शवायचे आहे. आपण कुठल्याही मतपत्रिकेवर आपली स्वाक्षरी किंवा निशानी किंवा अशी काही ओळख दर्शविणारी खुण करता कामा नये ज्यामुळे संशय निर्माण होईल की ज्यामुळे आपण इशारा करु इच्छित आहात हे स्पष्ट होईल. मतपत्रिकेचा खालील भाग मतदर्शविण्यासाठी आपणांस दिला जाईल. व मतपत्रिकेचा वरील भाग मतदान अधिकारी आपणाकडे ठेवेल. आपण मतदान करावयास जात आहात तर आपण काळजीपुर्वक मत दयायचे आहे. आपण ज्या उमेदवारास मत देवू इच्छित आहात, त्याच उमेदवाराच्या नावासमोरील रकान्यात आपणांस मत दर्शवायचे आहे. व जे रकाने तयार करण्यात आलेले आहेत त्या रकान्यांच्या आतच मत दर्शवायचे आहे. व याचीही आपणांस पडताळणी करायची आहे की, आपणांस आठपेक्षा जास्त फुल्या मारायच्या नाहीत. त्याप्रमाणे आपण आठच फुल्या मारत आहोत. पाहिजे तर आपण आठही मते एकाच उमेदवारास देवू शकता. आपणांस वाटत असेल तर आपण त्यांचे विभाजन करुन अन्य उमेदवारांना सुध्दा विभागुन मते देवू शकता. परंतु एकुण आठच मते झाली पाहिजेत. उमेदवाराच्या नावासमोर आम्ही जे रकाने तयार केले आहेत त्या रकान्यांच्या बाहेर आपण फुली मारता कामा नये. रकान्यांच्या आतच फुली मारायची आहे. हे मतदान सुरु केल्यापासुन एक तास चालेल. आपण ही वेळ कमी सुध्दा करु शकतो. कारण की यावेळेस आम्ही मतदान कक्ष जे ठेवले आहेत ते दोन ठेवले आहेत. म्हणून ही जी वेळ ठेवली जात आहे

ती जर कमी करायची असेल तर आपण सांगा. नाहीतर मतदानासाठी आम्ही एक तासाची वेळ ठेवत आहोत.

होवू शकते कुणी एखादा सदस्य यावेळेस उपस्थित नसेल व जर तो एक तासाच्या आत आला तर त्यास मतदान करण्याचा अधिकार राहील. त्यास मतदानाचा अधिकार नाकारला जावू शकत नाही. मतदान झाल्यानंतर जेव्हा मतमोजणी केली जाईल, मत मोजणीच्या वेळी मत वैध आहे किंवा अवैध आहे याचा निर्णय मा. महापौर घेतील. किंवा त्यांच्या जागी जे पीठासीन अधिकारी राहतील ते घेतील. मतमोजणी या प्रकारे राहील, ज्या उमेदवारास सर्वात जास्त मते मिळतील त्यास प्रथम निर्वाचित घोषित केले जाईल. त्यानंतर जो राहील याप्रमाणे.. पहिल्या आठ सर्वाधीक मते मिळविणा–या उमेदवारांची नावे घोषित केली जातील. आणि नवव्या उमेदवारास जर कमी मते मिळाली असतील तर त्यास पराभूत उमेदवार म्हणून घोषित केले जाईल.

काही वेळेस अशी परिस्थिती निर्माण होते की, सहा उमेदवार निवडल्यानंतर २ उमेदवार शिल्लक राहतात, त्यांना सम–समान मते पडतात, अशा परिस्थीतीत मा. महापौर आपले दुसरे निर्णायक मत देतील. मा. महापौर आपले दुसरे निर्णायक मत ज्याच्या बाजुने देतील तो उमेदवार निवडुन येईल. मत पत्रिकेबाबत आणि मतदानाबाबत ही जी मी सुचना दिली, ती सर्व लक्षात ठेवून आपणांस मतदान करायचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. सचिव साहेब, सभागृहामध्ये जी व्यक्ती उमेदवार असते ती व्यक्ती पीठासीन अधिकारी म्हणून बसु शकते का? याबाबत जरा माहिती दिली जावी.

<u>मा. सचिव :–</u> श्री. जमनादास पुरस्वानी यांचा हा जो प्रश्न आहे तो योग्य असाच आहे. कारण की, पीठासीन अधिकारी मा. महापौर स्वत: स्थायी समिती सदस्य पदासाठी उमेदवार आहेत, म्हणून या सभेच्या पीठासीन अधिकारी म्हणून त्या व्यासपिठावर बसू शकत नाहीत. त्यांनी उप–महापौरांना पीठासीन अधिकारी म्हणून आसन ग्रहण करण्यास सांगितले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. सचिव साहेब, जी मतपत्रिका आहे, तिच्यावर मा. पीठासीन अधिका–यांचीच स्वाक्षरी असली पाहिजे.

**<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–</u>** मा. सचिव साहेब, मतदान या बाजूला होईल की त्या बाजूला? नाही, या बाजुलाही मतदान कक्ष आहे, त्या बाजुलाही मतदान कक्ष आहे, म्हणून विचारले. सचिव साहेब, मतदान काय त्या बाजुला होईल काय? दोन्ही बाजुला होईल?

<u>मा. सचिव :–</u> या बाजुचे सन्माननिय सदस्य या बाजुच्या मतदान कक्षात जावुन मतदान करतील, त्या बाजुचे सन्माननिय सदस्य त्या बाजुच्या मतदान कक्षात जावून मतदान करतील. तसेच ज्या वेळेस जे मतदान कक्ष खाली असेल तेथे जावून सन्माननिय सदस्य मतदान करतील.

**<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–</u>** ठिक आहे, माझी एक सुचना आहे.

<u>मा. सचिव :–</u> आपणा सर्वाच्या सोयीसाठी ही व्यवस्था केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–</u> ठिक आहे. माझी एक सुचना आहे, आमचे जे वयोवृध्द सदस्य आहेत, त्यांच्यासाठी मतदान कक्षात खुर्चीची व्यवस्था केली जावी. खुर्ची किंवा स्टुलची व्यवस्था केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, माझ्या दोन सुचना आहेत, एक तर आमची नगरसेविका, श्रीमती किरण लखी माखिजा यांना लवकर जायचे आहे, तर माझी आपणांस एक विनंती आहे, व दुस–या एक सदस्या आहेत, श्रीमती दिपा नारायण पंजाबी यांना सुध्दा लवकर जायचे आहे. तसेच तिस–या श्रीमती भावना रामचंदानी, हया तीन महिला सदस्यांना लवकर जायचे आहे. तर माझी आपणांस अशी विनंती आहे की, त्यांना सर्वप्रथम मतदान करु दिले जावे. विरोधी पक्षीयांमधील कुणा सदस्यास लवकर घरी जायचे असेल तर त्यांना सुध्दा प्रथम मतदान करण्यास संधी दिली जाईल. तर या तीन सदस्यांना प्रथम मतदान करु

दिले जावे. श्रीमती कोमल बठिजा यांना सुध्दा लवकर जायचे आहे. जरुरी काम आहे तर या चार सन्माननिय सदस्यांना सर्वप्रथम मतदान करण्यास परवानगी दिली जावी. व त्याचबरोबर डॉ. निना नाथानी यांना सुध्दा लवकर जायचे आहे. व दुसरे असे की, जे मत दयायचे आहे, फुली मारायची आहे, ती कशी मारायची? याबाबत मतपत्रिकेवर मागील बाजुस छापलेले आहे. त्याचप्रमाणे मत दर्शवायची किंवा कसे दर्शवायचे? त्याचबरोबर सन्माननिय सदस्यांना समजावले जावे. जर कुणी सदस्य मत कसे नोंदवायचे हे जर विसरला असेल तर तो मतपत्रिकेच्या मागील बाजुस मत कसे दर्शवावे. हे जे छापले आहे त्याप्रमाणे आपले मत दर्शवु शकतो. धन्यवाद.

मा. सचिव :— ही मतपेटी आहे, ती पुर्णपणे खाली आहे, याबाबत कुणाला काही शंका, काही प्रश्न आहे का? मतपेटी आपणा सर्वांसमोर बंद केली जात आहे. व मतदानास सुरुवात केली जात आहे.

२. श्रीमती किरण लखी माखिजा
२. श्रीमती दिपा पंजाबी
३. श्रीमती भावना रामचंदानी
४. श्रीमती कोमल बठिजा
५. डॉ. निना नाथानी
३६. श्रीमती कारीरा रेखा
३७. श्री. पमनानी ईश्वर
३८.श्री. बोडारे धनंजय
३९.श्रीमती क्रिष्णानी रेखा
४०.श्री. विश्वनाथ पाटील
४१.श्री. गौतम भालेराव
४२.श्री. अशोक ठाकुर
४३.श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे
४४.श्री. अंकुश म्हस्के
४५.श्री. अनिल जयसिंघानी

मा. सचिव :— श्री. अंकुश म्हस्के यांची मतपत्रिका खराब झाली आहे. ते ती मतपेटीत टाकण्यापूर्वी बदलून घेवू इच्छितात.

मा. उप—महापौर /पीठासीन अधिकारी :— त्यांना दुसरी मतपत्रिका दिली जावी.

४६.श्री. राजेंद्र चौधरी
४७.श्री. नारायण पंजाबी
४८.श्री. मनोज साधवानी
४९.श्री. जमनादास पुरस्वानी
५०.श्री. मोहनदास रामरख्यानी
५१.श्री. होशियारसिंग लबाना
५२.श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
५३.श्री. विनोद तलरेजा
५४.श्रीमती भारती छाब्रिया

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— सचिव साहेब, पीठासीन अधिका—यांची खुर्ची रिकामी आहे.

मा. सचिव :— मत देण्यासाठी जावू शकतात ना? ते मत देण्यासाठी गेले आहेत.

५५.श्री. संजय बठिजा
५६.श्रीमती बेबी वसिटा
५७.श्रीमती सुजाता रिझवानी
५८.श्री. मोहन बेहरानी

५९.श्रीमती मालती करोतिया
६०.श्रीमती. संगिता रमेश जावळे
६१.श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर
६२.श्री. सोनवणे नथु काशिराम
६३.श्री. टेकचंदानी राजु
६४.श्रीमती रामचंदानी भावना मनोहर
६५.श्रीमती ज्योती कालानी
३६.श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे
३७.श्री. वाघे शामु बाबु
३८.श्रीमती मोकल सीमा
३९.श्री. दिलीप गायकवाड
४०.श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४१.श्री. मोकल चंदाराम विठोबा
४२.श्री. एडके गणपत गोविंद
४३.श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
४४. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
४५. श्री. उमाप रामदास राघोजी
४६. श्री. यादव लालबिहारी बुझारत (तुझारत)
४७ श्रीमती बामणकर नंदिनी गजानन
४८ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
४९ श्रीमती.गुप्ता अनिता धमेंद्र
५०. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
५१. श्री. नाना पवार
५२. श्रीमती. आहुजा निता प्रकाश
५३. श्री. जग्याशी राजु
५४.. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
५५ श्री. शांताराम निकम
५६. श्री. टाले प्रमोद नामदेवराव
५७. श्री. ठाकुर विनोद लालसिंग
५८. श्रीमती सोनेजी मिना
५९ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
६० श्री. सुरेश नामदेव गायकवाड,
६१ श्रीमती. वनवारी मोना अशोक
६२ श्री. वनवारी किशोर नारायणदास
६३.श्री. मोहन साधवानी
६४.श्री. जेसवानी सतरामदास
६५.श्रीमती जया साधवानी
६६.श्री. लुंड गोविंदराम
६७श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी
६८.श्री. राज असरोंडकर
६९ श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
७०.श्री. रमेश चव्हाण
७१.श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ
७२. श्री. जाधव सुरेश
७३. श्रीमती. जयश्री सुर्वे
७४. श्री. देवेंद्रसिंह खेमाणी

सभेत उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांनी मतदान केले आहे, केवळ श्रीमती मालती करोतिया व श्री. ठाकुरदास बेहरानी हे सभेस उपस्थित नसल्याने ते मतदान करु शकले नाहीत. ७४ सदस्यांनी मतदान केले आहे. मतदान संपले आहे.

मा. महापौरांच्या आदेशानुसार श्री. बनसोडे साहेब व श्री. भदाणे साहेब यांना मतमोजणीसाठी आपल्या समोर येथे बसविले जाईल. प्रत्येक उमेदवाराच्या एका प्रतिनिधीने मतगणना टेबला शेजारी यावे. म्हणजे मतमोजणी करतांना त्यांना जवळून पाहता येईल. सर्वात प्रथम मतपेटीतून सर्व मतपत्रिका बाहेर काढल्या जातील. व त्यांची मोजणी केली जाईल.

मा. उप–महापौर/पीठासीन अधिकारी :–कृपया सर्व सदस्यांनी आपापल्या आसनावर बसून घ्यावे, मतमोजणी झाली आहे व एकही मत अवैध नाही.

विषय क्र. १ :– दि. १ एप्रिल, २००५ पासुन निवृत्त होणा–या ८ स्थायी समिती सदस्यांच्या पदाच्या जागा भरणेसाठी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये प्रत्येक वर्षी स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षानंतर त्या कलमाचे पोटकलम ३ अन्वये कोणते निम्मे सदस्य व कशाप्रकारे निवृत्त होतील हे विर्निदिष्ट करण्यात आलेले आहे. त्याअर्थी स्थायी समितीचे जे सदस्य जास्तीत जास्त कालावधीपर्यंत आपल्या पदावर असतील ते सदस्य निवृत्त होतील. त्यानुसार दिनांक १/४/२००५ पासून निवृत्त होणा–या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

९. श्रीमती ज्योती कालानी
१०.श्री. मोहन बेहरानी
११.श्री. रामदास उमाप
१२.श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
१३.श्रीमती भारती छाब्रिया
१४.श्रीमती नंदीनी बामणकर
१५.श्री. सतरामदास जेसवानी
१६.श्री. नारायण पंजाबी

निवृत्तीच्या तारखेच्या मागील महिन्यातील आपल्या पहिल्या सभेत उक्त तारखेस जे सदस्य निवृत्त होणार असतील त्या सदस्यांच्या पदाच्या जागा भरण्यासाठी स्थायी समितीच्या नविन आठ सदस्यांची नेमणूक केली पाहिजे. त्यामुळे या आठ पदांच्या रिक्त जागा भरण्यासाठी दिनांक २९/३/२००५ रोजीच्या सभेच्या कार्यसूचीवर क्र. १ चा विषय असून निवडणूक कार्यक्रमाच्या तरतूदीप्रमाणे दिनांक ११/३/२००५ रोजी ज्या उमेदवारांनी आपली नामनिर्देशन पत्रे दाखल केली व ज्यांची नामनिर्देशन पत्रे दिनांक १४/३/२००५ रोजी वैधरित्या घोषित करण्यात आली. त्यांची नावे येणेप्रमाणे.........

११.श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल
१२.श्रीमती कालानी ज्योती सुरेश
१३.श्रीमती कृष्णानी रेखा हरेश
१४.श्री. जग्यासी राजु किशनचंद
१५.श्री. जाधव सुरेश मधुकर
१६.श्री. ठाकुर अशोक भगवानदास
१७.श्रीमती मसंद माया घनश्यामदास
१८.श्री. मोकल चंदाराम विठोबा
१९.श्री. वाघे शामु बाबु

२०.श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास

वरील उमेदवारांपैकी विहित मुदतीत खालील उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली.

२. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल

वरील उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतल्या अंती रिंगणात ९ उमेदवार शिल्लक राहिले त्यामुळे गुप्त मतदानाची आवश्यकता भासल्याने निवडणुक प्रक्रिया सुरू करून व गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेवुन मतदानाअंती ९ उमेदवारांना स्थायी समिती सदस्य पदासाठी मिळालेली मते पूढील प्रमाणे

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते |
|---|---|
| ९. श्रीमती कालानी ज्योती सुरेश | ७६ |
| १०.श्रीमती कृष्णानी रेखा हरेश | ६१ |
| ११.श्री. जग्यासी राजु किशनचंद | ६८ |
| १२.श्री. जाधव सुरेश मधुकर | ६६ |
| १३.श्रीमती मसंद माया घनश्यामदास | ६५ |
| १४.श्री. मोकल चंदाराम विठोबा | ६४ |
| १५.श्री. वाघे शामु बाबु | ६० |
| १६.श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास | ७६ |
| ९. श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ५६ |

श्री. ठाकुर अशोक भगवानदास यांचे व्यतिरिक्त ८ सदस्यांची स्थायी समिती सदस्य म्हणुन नेमणूकीस प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र. ७६ अ</u> <u>दिनांक :– २९/३/२००५.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार ७४ पालिका सदस्यांनी केलेल्या गुप्त मतदानाअंती खाली दर्शविलेल्या प्रत्येक उमेदवारास मिळालेली मते त्याचे नावा समोर दर्शवुन अ.क्र. १ ते ८ वर दर्शविलेले उमेदवार निवडून आल्याचे जाहिर करीत आहे आणि त्यांची स्थायी समिती सदस्य म्हणुन नेमणुक करीत आहे.

| उमेदवाराचे नाव | मिळालेली एकुण मते | |
|---|---|---|
| ९. श्रीमती कालानी ज्योती सुरेश | ७६ | निर्वाचित |
| १०.श्रीमती कृष्णानी रेखा हरेश | ६१ | निर्वाचित |
| ११.श्री. जग्यासी राजु किशनचंद | ६८ | निर्वाचित |
| १२.श्री. जाधव सुरेश मधुकर | ६६ | निर्वाचित |
| १३.श्रीमती मसंद माया घनश्यामदास | ६५ | निर्वाचित |
| १४.श्री. मोकल चंदाराम विठोबा | ६४ | निर्वाचित |
| १५.श्री. वाघे शामु बाबु | ६० | निर्वाचित |
| १६.श्रीमती ससाणे लक्ष्मी रोहीदास | ७६ | निर्वाचित |
| ९. श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ५६ | पराभूत |

<u>मतदानाद्वारे</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

<u>मा. सचिव :—</u> कृपया लक्ष दया, पीठासीन अधिकारी निवडणुक निकाल जाहिर करीत आहेत.

<u>मा. उप—महापौर /पीठासीन अधिकारी :—</u> सर्व सदस्यांनी कृपया लक्ष दयावे.

<u>मा. सचिव :—</u> कृपया सर्व सन्माननिय सदस्यांनी आपापल्या आसनावर बसुन घ्यावे.

<u>मा. उप—महापौर/ पीठासीन अधिकारी :—</u> श्रीमती कालानी ज्योती सुरेश (पप्पु) ७६ मते निर्वाचीत घोषित

| | | |
|---|---|---|
| श्रीमती कृष्णानी रेखा हरेश | ६१ मते | निर्वाचीत घोषित |
| श्री. जग्याशी राजु किशनचंद | ६८ मते | निर्वाचीत घोषित |
| श्री. जाधव सुरेश मधुकर | ६६ मते | निर्वाचीत घोषित |
| श्री. ठाकुर अशोक भगवानदास | ५६ मते | पराभुत |
| श्री. वाघे शामु बाबु | ६५ मते | निर्वाचीत घोषित |
| श्रीमती मसंद माया घनश्यामदास | ६४ मते | निर्वाचीत घोषित |
| श्री. मोकल चंदाराम विठोबा | ६० मते | निर्वाचीत घोषित |
| श्रीमती ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास | ७६ मते | निर्वाचीत घोषित |

श्री. ठाकुर अशोक भगवानदास हे निवडणुकीत पराभुत झाले आहेत. बाकी ८ सदस्य निवडुन आल्याचे आम्ही निकालपत्र जाहिर केले आहे.

<u>मा. सचिव</u> :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.१५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. उप—महापौर तथा पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी जाहिर केले.

( प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३१ मार्च ,
२००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.३१/३/२००५ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दिनांक ३१.०३.२००५ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | २९. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३०. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी |
| ५. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ३१. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३२. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण |
| ७. | श्रीमती मोकल सीमा | ३३. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ८. | श्री. दिलीप गायकवाड | ३४. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ३५. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ३७. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३८ | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३९ | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४० | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १५. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४१ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४२. | श्रीमती. पंजाबी दिपा नारायण |
| १७. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ४३. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| १८. | श्री. नाना आनंदा पवार | ४४. | श्री. जयसिंघानी अनिल |
| १९. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ४५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २०. | श्री. जग्यासी राजु | ४६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २१. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४७ | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २२. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २३. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ४९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २४. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५०. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| २५. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५१. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २६. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २७. | श्री. मोहन साधवानी | ५३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २८. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ५४. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर,२. श्री. टेकचंदानी राजु, ३.श्री. वाघे शामु बाबु,४. श्री. यादव लालबिहारी बुझारत,५. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन,६. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा, ७. श्री. शांताराम निकम,८. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास,९. श्रीमती साधवानी जया,१०. श्रीमती भावना रवी खिलनानी, ११.श्री. चव्हाण रमेश महादेव, १२.श्री. सुरेश जाधव,१३. श्रीमती. जयश्री सुर्वे, १४.श्री. पाटील विश्वनाथ गौतम, १५.श्री.भालेराव गौतम यशवंत, १६.श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १७.श्री. ठाकुर अशोक भगवानदास, १८. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, १९.श्री. साधवानी मनोज लालचंद, २०.श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद, २१.श्री. रामरख्यानी मोहनदास ,२२. श्रीमती किरण लखी माखिजा , २३.श्रीमती. छाबरीया भारती पहलाज, २४.श्रीमती करोतिया मालती, २५.श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, २६. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २७.श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सकाळी ११. ५५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिवः—विषय क्र. १.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासीः—मा. महापौरजी, उपमहापौर, आयुक्त साहेब आपणांस मी एक माहिती देवु इच्छितो. काल याच विषयावर माझे आयुक्तांशी बोलणे झाले होते. पंधरा दिवसापुर्वी माझ्या प्रभागात कर वसुलीसाठी कॅम्प लावला होता. तेथे आमचे आयुक्त, आमदार व महापौर महोदया या देखिल उपस्थित होत्या. तेथे माझ्या प्रभागातील लोकांची तक्रार होती की माझ्या प्रभागात अशी एक जागा आहे. आपल्या महापालिकेची जागा आहे.जेथे काही लोक फलक लावुन जागा बळकावण्याचा प्रयत्न करीत आहेत. पंधरा दिवसापासुन त्या तक्रारीचा मी पाठपुरावा करीत आहे. आपला जो अभियंता जितु आहे त्यांना मी याबद्दल नियमित दुरध्वनी करीत आहे परंतु मला काही एक प्रतिसाद मिळालेला नाही. नाईलाजाने मला काल आयुक्तांकडे जावे लागले व सांगावे लागले की त्या जागेवर फलक लावुन काही लोक ती जागा बळकावण्याचा प्रयत्न करीत आहेत. आज सकाळची स्थिती अशी आहे की तेथे ब—याच लोकांचा जमाव जमला आहे. सामान उतरविण्यात आले आहे. व ती जागा बळकावण्याचा प्रयत्न केला जात आहे. मी आपल्याला सांगु इच्छितो की ती जागा महापालिकेची आहे व त्या ठिकाणी महापालिकेतर्फे वाचनालयाचे काम मंजुर झाले आहे.कृपा करून महासभेची कारवाई नंतर चालवावी आधी या विषयावर निर्देश दयावेत तसेच जे लोक ही जागा बळकावण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यावर एफ.आय.आर दाखल केला जावा अशी माझी आपणांस विनंती आहे. तसेच एफ.आय.आर दाखल झाल्यानंतर मला त्याची लेखी माहिती देण्यात यावी. सभेची कारवाई निर्देश दिल्यानंतरच चालवावी.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—मा. महापौर महोदया, उपमहापौर हा जो जागा बळकावण्याचा प्रयत्न चालु आहे याबद्दल आमच्या सदस्यांनी वेळोवेळी आवाज उठविला आहे. तरी देखिल असे प्रकार व्हावेत हे उचित नाही. या महासभेचे कामकाज सुरू करण्यापुर्वी आयुक्त साहेबांना आमची विनंती आहे की तेथे महापालिकेचे पथक पाठवावे तसेच पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केल्यानंतर कारवाई करून त्यांच्याकडील सामानही जप्त करण्यात यावे. त्यानंतरच सभेचे काम सुरू करण्यांत यावे. कारण आमच्या शहरात जागा बळकावण्याचे बरेच प्रकार होत आहेत. आम्ही कोणतीही जागा वाचवु शकलेलो नाही. कधी कधी आम्हाला असे वाटते की नगरसेवक झाल्यानंतर देखिल आम्ही या शहराचे काय भले करू शकतो? म्हणुन मेहरबानी करून या बैठकीचे कामकाज नंतर सुरू करावे. महापौर महोदया व आयुक्त साहेब आपण महापालिकेच्या पथकाला त्या ठिकाणी जाण्यासाठी आधी त्वरीत आदेश दयावेत. धन्यवाद.

मा. महापौरः—आयुक्त साहेब, त्यांचे पथक तेथे पाठवित आहेत.

मा. सचिवः—विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

विषय क्र. १ः— मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २७/०८/२००४ (त्यात दिनांक २०/१/२००५) दिनांक २०/१/२००५ व दिनांक १७/२/२००५ (त्यात दिनांक १८/२/२००५) चे इतिवृत्त कायम करणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, १८.२.२००५ च्या बैठकीचे जे इतिवृत्त आले आहे, जी बजेटची बैठक होती, त्यामध्ये दोन ठिकाणी चुकांची दुरूस्ती करायची आहे. मला असे वाटते की त्यावेळी बोलताना माझ्या तोंडुन चुकून शब्द निघाले आहेत. मी असे बोललो होतो की सर्व प्रकारचे खनिजतेल, पेट्रोलियम पदार्थ, केमिकल रू. २.५० वरून रू. २.७० येथे रूपये ३ आले आहेत. दुसरे होते त्याच्याच बरोबर केमिकलचे. त्यामध्ये रू. ३.२५ वरून रू. ३. ४५ तर येथे रू. ४.०० आले आहेत. तर इतिवृत्त कायम करण्याच्या वेळेस वरील प्रमाणे दोन चुकांच्या दुरूस्त्या झाल्या तर बरे होईल. अशी माझी सभागृहास विनंती आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—मा. महापौरजी, मला असे वाटते की, आम्ही कोणत्याही प्रकारच्या कर वाढीच्या, जकात वाढीच्या विरोधात आहोत व आम्ही त्यावेळी जेव्हा मुळ ठराव आला होता त्याचा देखिल विरोध केला होता. त्यासाठी एक दिवसाचे धरणे देखिल दिले होते. आम्ही कोणत्याही प्रकारच्या कर वाढीच्या विरोधात आहोत. परंतु ज्याप्रकारे ही चुकांची दुरूस्ती करण्यात येत आहे. मला असे वाटते की आपण जसा ठराव पास केला होता त्यामध्ये आपण म्हणता त्याप्रमाणे कोणतीही चुक नसुन आपणांस आता असे वाटत आहे की शहरवासी जकात दर वाढीच्या विरोधात आहेत व विशेष करून जी बाब क्र. ४५ आहे मला असे वाटते की ते प्लास्टिक व बेकालाईट संबंधात आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—सर्व प्रकारचे खनिज तेल, पेट्रोलियम पदार्थ व दुसरे आहे, हे ३८ अ आहे व ते ४० बी मध्ये केमिकल आहे. आपण जे बोलत आहात ते यामध्ये नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—तर मला असे वाटते की ती बाब तशी नव्हती परंतु जो मुळ ठराव आहे त्याच्या विरोधात आम्ही आहोत असे गृहीत धरावे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त कर वाढीमध्ये जी दुरूस्ती करत आहात त्याला आमचा विरोध नाही. आपण त्यामध्ये दुरूस्ती करू शकता.

मा. प्रभारी आयुक्तः—मा. महापौर महोदया, येथे इतिवृत्त कायम करण्याचा विषय आलेला आहे. इतिवृत्त कायम करताना सभेत जे झाले त्याची तशी नोंद झाली नाही तर आपण त्यामध्ये बदल करू शकता. आपण जर आता असे म्हणाल की त्यावेळी बोलताना चुक झाली व ती चुक आपण आता सुधारू इच्छिता तर तसे होवु शकणार नाही. इतिवृत्ताचा अर्थच असा आहे की, जे झाले, जसे झाले तसेच त्यामध्ये यायला हवे. जर आपण आता इतिवृत्त कायम करताना त्या ठरावात दुरूस्ती करणार असाल तर ते कायदेशिर रित्या योग्य होणार नाही व असा ठराव पास जरी केला तरी त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडुन करण्यात येणार नाही. ही जी चुकीच्या प्रकारे इतिवृत्तामध्ये दुरूस्ती केली जात आहे त्याला माझा आक्षेप आहे. माझ्या आक्षेपाची नोंद करून आपणांस जो निर्णय घ्यायचा आहे तो आपण घेवु शकता, सभागृह सार्वभौम आहे. परंतु माझा आक्षेप या ठिकाणी इतिवृत्तात नोंदविण्यात यावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, आयुक्त साहेबांना काही आक्षेप घ्यायची आवश्यकता नाही. जर ते कायदेशिर नाही व ते आम्हाला तसे सांगत असतील तर मला असे वाटते की यासाठी विशेष महासभेचे आयोजन केले जावे मग ती सभा पाच—सहा—सात दिवसात आयोजित केली जावी, त्याची तारीख येथे जाहिर करावी. जर इतिवृत्तात सुधारणा करता येत नसेल तर आम्ही विशेष महासभा आयोजित करून त्यामध्ये दुरूस्ती करू.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—बरोबर आहे. हे कायदेशिररित्याच व्हायला हवे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—आपण पाच—सहा दिवसात कधीही बैठक ठेवा. आम्ही त्यामध्ये दुरूस्ती करून ठरावात सुधारणा करू. मा. महापौरांनी अनुमती दिली आहे ८ एप्रिलला संध्याकाळी ४. ०० वाजता बैठक घेण्यात येईल. धन्यवाद.

मा. सचिवः—इतिवृत्त पास?

<u>काही सदस्य:—</u>पास. पास.

<u>मा. महापौर:—</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २७/०८/२००४ (त्यात दिनांक २०/१/२००५) दिनांक २०/१/२००५ व दिनांक १७/२/२००५ (त्यात दिनांक १८/२/२००५) चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. २:—</u> श्री संतोष नागेश लोणे यांच्या कनिष्ठ अभियंता (संगणक) या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>एक वर्षासाठी पास.

<u>मा. सचिव:—</u>यांना स्थायी पदावर नियुक्ती दयायची आहे. त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी असेल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>यामध्ये पण काही वेळा कागदपत्रांची आवश्यकता असते.

<u>मा. सचिव:—</u>दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी आहे. त्यामध्ये सर्व आले आहे. प्रस्ताव तसाच आहे. त्यामध्ये आपत्तीजनक काही नाही. आधी त्यांचे काम बरोबर आहे की नाही ते बघतिल त्यानंतर त्यांचे काम समाधानकारक असले तर कायम करतील. पास. सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र. २:—</u> श्री संतोष नागेश लोणे यांच्या कनिष्ठ अभियंता (संगणक) या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये वापरात असलेले संगणक, प्रिंटर्स व इतर साहित्य यांच्या देखभाल व दुरूस्तीसाठी ०१ अनुभवी संगणक अभियंता भरणे आवश्यक होते. परंतु सदर पद महापालिकेच्या आस्थापनेवर मंजुर नसल्याने व नागरी सुविधा केंद्राच्या मागणीस अनुसरून महासभा ठराव क्रमांक २५, दिनांक २६/७/२००४ अन्वये विद्युत विभागातील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या ०३ रिक्त पदांपैकी एका पदाचे 'कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/ इलेक्ट्रॉनिक्स) असे पदनामात बदल करण्यात मंजुरी मिळालेली आहे.

कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/ इलेक्ट्रॉनिक्स) हे ०१ पद भरण्यासाठी सेवायोजन कार्यालयातुन एकूण ०६ उमेदवरांची नावे आली होती. तसेच 'दैनिक नवशक्ती' व जीम थ्तमम च्तमे ळमदमतंसष या वृत्तपत्रातसुध्दा जाहिरात देण्यात आली होती. दिनांक २९/१२/२००४ रोजी 'कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/इलेक्ट्रॉनिक्स) या पदाच्या चालत्या मुलाखतीसाठी सेवायोजन कार्यालयातुन ०५ उमेदवार व खुल्या जाहिरातीमधुन ०४ उमेदवार असे एकूण ०९ उमेदवारांपैकी ०८ उमेदवार हे प्रत्यक्ष मुलाखतीच्यावेळी उपस्थित होते. त्यापैकी श्री. संतोष नागेश लोणे यांची अर्हता व अनुभव लक्षात घेऊन त्यांची 'कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/इलेक्ट्रॉनिक्स) या पदासाठी निवड केलेली आहे. कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/प्र.क्र. १७७/७२८/०४, दिनांक ३१/१२/२००४ नुसार श्री. संतोष नागेश लोणे यांची कनिष्ठ अभियंता (कॉम्प्युटर/इलेक्ट्रॉनिक्स) या पदावर ०२ वर्षाच्या परिविक्षाधिन कालावधीसाठी नियुक्ती केलेली आहे.

सबब, सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५३ (१)मधिल तरतुदीनुसार महासभेपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्रः— ९०
दिनांकः—३१/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्रीमती कमला शर्मा
अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

*ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री संतोष नागेश लोणे यांच्या कनिष्ठ अभियंता (संगणक) या पदावरील २ वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीस अधिन राहुन नियुक्तीस मान्यता देत आहे.*

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ३ःे— श्री.टी.के.ढेंगळेपाटील यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः—मा.महापौर, आयुक्त साहेब माझी आपणांस विनंती आहे की, आपण येथे ज्या अधिका—यांची नियुक्ती करणार आहात याकरिता नीट चौकशी करण्यात यावी, विचार करण्यांत यावा व त्यांनतरच येथे ठेवले जावे. या अधिका—यामुळे आमच्या शहराचे नाव खराब होईल असे व्हायला नको. यांना आधी नियम समजवा की नियम काय आहेत. कोणतीही कारवाई करण्यापुर्वी नियम बघायला लागतात. जे कायदयाचे पुस्तक आहे ते आधी वाचा त्यांनतरच काही कारवाई करा. माझी आपणां सर्वांना विनंती आहे की याला मान्यता देण्यापुर्वी त्यांना नियम वाचायला सांगा किंवा त्यासाठी आधीच विचार करा. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, आता जो विषय सुरू आहे त्याकरिता ज्या अधिका—याचा प्रस्ताव आला आहे. त्याला आम्ही एक वर्षासाठी मंजुरी देत आहोत. परंतु जसे श्री. सतरामदास जेसवानी यांनी सांगितले त्याकडेही लक्ष दयायला हवे कारण नोटीस न देता थेट निष्कासन केले जाते. काही ठिकाणी रस्ता रूंदीकरणात तळ मजला अधिक तीन मजले अशी परवानगी देण्यात येते तर काही ठिकाणी तळ मजला अधिक एक मजला असेल तरी देखिल तोडले जाते. तर जे धोरण आहे, नियम आहे ते पुर्ण उल्हासनगरसाठी समान असायला हवेत. या ठिकाणी हजारो प्रश्न येतात त्यावर उत्तर दिले जाते की, नोटीस दिली आहे. आतापर्यंत त्याची मुदत झाली नाही. काही ठिकाणी नोटीस न देता थेट निष्कासन करण्यात येते अशी प्रकरणे कोर्टात गेली तर प्रशासनाला त्रास होवु शकतो. यासाठी जसे श्री. सतरामदास जेसवानी यांनी सांगितले त्याप्रमाणे कायेदशिर कारवाई पुर्ण झाल्यावरच निष्कासनाची कारवाई करण्यात यावी.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—आयुक्त साहेब, कायदेशिर कारवाई केल्याशिवाय कुठे काही तोडले आहे काय?

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र. ३:— श्री.टी.के.ढेंगळेपाटील यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासन आदेश क्र. एमसीओ—१२०२/७३/प्र.क्र. २१/०५, दि. ०५/०३/२००५ च्या आदेशान्वये श्री. त्रिंबक कृष्णा ढेंगळेपाटील मुख्याधिकारी वर्ग—२ यांची या महापालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने प्रतिनियुक्तीने प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीस अधीन राहुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री. त्रिंबक कृष्णा ढेंगळेपाटील या महापालिकेत सहाय्यक—आयुक्त या रिक्त पदावर दिनांक ९/३/२००५ पासून रूजू झाले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ नुसार श्री. त्रिंबक कृष्णा ढेंगळेपाटील यांच्या सहाय्यक—आयुक्त पदावरील प्रतिनियुक्तीच्या नियुक्तीस ०३ वर्षासाठी मान्यता देण्याचा प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत

महासभा ठराव क्र:— ९१
दिनांक:—३१/३/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री.टी.के.ढेंगळेपाटील यांच्या उल्हासनगर महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस दिनांक ९/३/२००५ पासुन एक वर्षासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ४:— शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर

महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियम अंतिम करणे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र. ४:—</u> शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियम अंतिम करणे.

उपरोक्त नमुद विषयान्वये शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२००४/प्र.क्र.१६८/नवि २०, नगरविकास विभाग, दिनांक २९/१२/२००४ रोजीच्या आदेशान्वये राज्यातील महानगरपालिकांच्या क्षेत्रात आयात करण्यात येणा—या शालेय व उच्चशिक्षण संबंधीत शैक्षणिक पुस्तके संदर्भ ग्रंथ या पुस्तकांवर जकात न आकारण्याबाबत नियमांमध्ये बदल करणे आवश्यक होते. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी सदर प्रस्ताव महासभेमध्ये दिनांक २०.१.२००५ रोजी ठेवण्यात आला व सर्वानुमते महासभा ठराव क्र. ५६ नुसार तो मान्य करण्यात आला.

सदर मसुदा महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी साठी देण्यात आली असुन उक्त मसुद्याच्या संदर्भात उल्हासनगर शहरातील रहीवाशीयांच्या ज्या काही हरकती किंवा सूचना असतील त्या मागविण्यासाठी दिनांक १/२/२००४ रोजीच्या नवशक्ती या दैनिक समाचार, नगरन्युज (सिंधी) व द फ्रि. प्रेस जनरल (इंग्रजी) य समाचार पत्रांमध्ये सदरची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली होती.

उक्त मसुद्याच्या संदर्भात नागरिकांच्या याबाबत हरकती व सुचना प्राप्त होण्याची अंतीम तारीख संपली असुन अदयाप एक ही हरकती व सुचना कार्यालयास प्राप्त न झाल्याने सदर प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी महासभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—९२</u> <u>दिनांक:—३१/३/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

*ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शालेय व उच्च शिक्षण संबधित शैक्षणिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ यावरील जकात कर माफ करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका जकात नियम १९९६ यात आणखी सुधारणा करणेकामी प्रारुप नियम अंतिम करण्यास मान्यता देत आहे.*

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ५ः— राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेणेकामी महापालिकेतर्फे देण्यात आलेले अंशदान रु १९,५०,०६५/— यांस कार्योत्तर मंजुरी देणे.

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौरः—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावनाः—

विषय क्र. ५ः— राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेणेकामी महापालिकेतर्फे देण्यात आलेले अंशदान रु १९,५०,०६५/— यांस कार्योत्तर मंजुरी देणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८ अ याद्वारे महानगरपालिकांच्या निवडणूकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्याची तरतूद करणेत आलेली आहे. या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, हैद्राबाद या भारत सरकारच्या अंगीकृत व्यवसायाच्या सहकार्याने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र विकसित केलेले आहे. या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा काही पोटनिवडणूकीमध्ये यशस्वी रित्या वापर करण्यात आला आहे असे मा.राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक.५ जानेवारी,२००५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

*मा.राज्य निवडणूक आयोगाने नागपूर, नाशिक, अमरावती व पुणे विभागातील महानगरपालिकांच्या आयुक्तांची बैठका विभागीय पातळीवर आयोजित केल्या होत्या. या बैठकीमध्ये सर्व महानगरपालिका आयुक्तांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर महानगरपालिका निवडणूकीत करण्यात यावा, असे मत व्यक्त केले आहे. काही महानगरपालिकांनी स्वतः मतदान यंत्रे घेण्याची तयारी दर्शविली आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने या सर्व बाबींचा विचार करुन असे मत व्यक्त केले की, महानगरपालिका स्वतः मतदान यंत्रे खरेदी केल्यास खर्च जास्त प्रमाणात होणार आहे. मतदान यंत्रे घेताना प्रत्येक महानगरपालिकावर जास्त खर्चाचा बोजा पडू नये अशी ही राज्य निवडणूक आयोगाची इच्छा आहे.*

*विधान सभा व लोक सभा निवडणूकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर सरसकट सुरु झाल्याने महाराष्ट्रातील मतदाराकडून स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करणेची मागणी मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र मुंबई यांचेकडे करण्यात येत आहे.*

*इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे सहाय्य घेतल्याने मतपत्रीकांची छपाई, मतमोजणीवरील होणारा खर्च इत्यादी बाबींवर होणारा खर्चाची देखील बचत होणार आहे.*

निवडणूक प्रक्रिया अधिक गतीमान व्हावी, निकालावरील वेळ व खर्च वाचावा यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर निवडणूकीत करणे गरजेचे आहे.

एक इलेक्ट्रॉनिक यंत्राची किंमत रुपये १०,५००/– आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी ५५ उल्हासनगर विधान सभा मतदार संघातील एकूण मतदारांची संख्या (३,९०,०१३) लक्षात घेता त्या आधारे आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत एकूण ४८७ एवढी मतदान केंद्रे निश्चित होण्याची शक्यता आहे. एका मतदान केंद्रासाठी एक याप्रमाणे एकूण ४८७ मतदान यंत्राची आवश्यकता भासणार आहे. तसेच १० : अधिक याप्रमाणे एकूण ५३६ मतदान यंत्राची गरज लागणार आहे. त्यासाठी एकूण रुपये ५६,२८,०००/–खर्च करावा लागणार आहे.

तथापी मा.राज्य निवडणूक आयोगामार्फत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेतल्यास ब–याच प्रमाणात खर्च कमी होणार आहे. त्यानुसार मा.राज्य निवडणूक आयोगाने असे स्पष्ट केले आहे की, प्रत्येक महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रातील मतदारांची संख्या विचारात घेऊन रुपये ५/–प्रति मतदार याप्रमाणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी प्रत्येक महापालिकेने अंशदान द्यावे.

मा.राज्य निवडणूक आयोग यांचे सुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठी ५५ उल्हासनगर विधान सभा मतदार संघाची सध्याची एकूण मतदार संख्या ३,९०,०१३ एवढी आहे. रुपये ५/–प्रति मतदार याप्रमाणे रुपये १९,५०,०६५/– एवढी रक्कम अंशदान रुपये भरावी लागणार आहे. वरील दोन्ही खर्चाची तुलना केली असता तसेच सन फेब्रुवारी२००२ सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतपत्रिका छपाईचा निव्वळ खर्च रुपये ९ लाख एवढा असून मतपत्रिका तपासणीसाठी सुमारे ३५ ते ४० कर्मचारी/अधिकारी सुमारे १२ ते १५ दिवस प्रिन्टींग प्रेसमध्ये पाठवावे लागतात त्याचा खर्च एकूण मनुष्यबळ, भत्यावरील खर्च इत्यादी खर्चाचा विचार करता रुपये १९,५०,०६५/–ही रक्कम कमी आहे.

प्रस्तुत प्रकरणी अंशदान प्रित्यर्थ जमा करावयाचा निधी हा विहित मुदतीत मा.राज्य निवडणूक आयोगाकडे भरावयाचा होता. त्यानुसार रुपये १९,५०,०६५/–रक्कमेचा धनाकर्ष आयोगाकडे जमा केला आहे.

***निवडणूक खर्चास मंजूरी होणेस महासभा ही सक्षम प्राधिकारी आहे. तरी रुपये १९,५०,०६५/-या रक्कमेस कार्योत्तर मंजूरी घेणेस महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.***

महासभा ठराव क्र:– ९३ दिनांक:–३१/३/२००५.

सुचकाचे नाव :–श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राज असरोंडकर

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे घेणेकामी महापालिकेतर्फे देण्यात आलेले अंशदान रु १९,५०,०६५/– यांस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. प्रभारी आयुक्त:–जागतिक महापौर परिषदेसाठी आमच्या महापौर महोदया कोचिन येथे जात आहेत त्यांना प्रशासनाच्या वतीने मी शुभेच्छा देत आहे.

मा. सचिव :– कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सकाळी १२. १५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२० एप्रिल , २००५

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/४/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०.०४.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती. संगिता रमेश जावळे | ३५. | श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशिराम | ३६. | श्री. सुरेश जाधव |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३७. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३८ | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ७. | श्री. वाघे शामु बाबु | ३९ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ८. | श्रीमती मोकल सीमा | ४० | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४१ | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १०. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४२. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ४३. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४४. | श्री.भालेराव गौतम यशवंत |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४५. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १४. | .श्री. उमाप रामदास राघोजी | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४७ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४८. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४९. | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १८. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र | ५०. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्री. नाना आनंदा पवार | ५१. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २०. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५२. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| २१. | श्री. जग्यासी राजु | ५३. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २२. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५६. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५७. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २६. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २७. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५९ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २९ | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६१. | श्रीमती करोतिया मालती |
| ३०. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६२. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३१. | श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी | ६३ | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३२. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ६४. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३३. | श्रीमती. माने किरण बाळकृष्ण | ६५. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | श्री. चव्हाण रमेश महादेव | ६६. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. राजेंद्रसिंह विरसिंह भुल्लर,२. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर, ३. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम,४.श्री. यादव लालबिहारी बुझारत,५. श्री. शांताराम निकम,६.श्री. टाले प्रमोद नामदेवराव , ७. श्री. मोहन साधवानी, ८. श्रीमती साधवानी जया,९. श्रीमती भावना रवी खिलनानी, १०. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, ११., श्रीमती. पंजाबी दिपा नारायण १२.श्री. साधवानी मनोज लालचंद, १३. श्रीमती किरण लखी माखिजा , १४.श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १५.श्री. हरदास माखिजा हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४. ३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. उत्तम लोणारे, उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

**<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी:—</u>**उल्हासनगर येथील हिंदु सिंधी या वर्तमानपत्राचे संपादक श्री. परसराम पंजवानी यांचे निधन झाले आहे त्यांना येथे श्रध्दांजली अर्पित करावी अशी मी सर्वांना विनंती करतो.

**<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी:—</u>**कार्यकारी अभियंता श्री. जवादे यांच्या वडीलांचे देखिल निधन झाले आहे त्यांना देखिल श्रध्दांजली अर्पित केली जावी.

## उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

**शोक प्रस्ताव :—**

उल्हासनगर येथील हिंदु सिंधी या वर्तमानपत्राचे मालक व ज्येष्ठ स्वांतत्र्य सैनिक श्री. परसराम पंजवानी व कार्यकारी अभियंता श्री. जवादे यांचे वडील श्री. आबाजी जवादे यांचे देखिल नुकतेच निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या मृतात्म्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १** — **दिनांक:—२०.४.२००५.**

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. परसराम पंजवानी व श्री. आबाजी जवादे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:—**आता महासभेत येताना आम्हाला एक अपिल प्राप्त झाले आहे. श्री. निकाळजे म्हणुन उल्हासनगरचे एक रहिवासी आहेत जे जसलोक हॉस्पीटल मुंबई येथे बोन मॉरो यावर उपचार करण्यासाठी दाखल आहेत. त्यांना उपचारासाठी शहरवासियांनी आतापर्यंत रूपये ५ लाखाची मदत केली आहे. यासाठी त्यांना अजुन ३ ते ३. ५० लाख रूपयांची आवश्यकता आहे. त्यांनी अपिल केले आहे की जे नगरसेवक बंधु भगिनी मदत करू इच्छितात त्यांनी मदत करावी.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**श्री. लाल पंजाबी यांनी आता जे सांगितले की श्री. अशोक निकाळजे उल्हासनगर मध्ये सुभाष टेकडी येथे राहणारे लांजामान थॉमसथिया हा आजार आहे यासाठी त्यांना बॉन मॉरो ट्रान्सप्लान्ट हा उपचार जसलोक हॉस्पीटल येथे करायचा आहे. जसलोक हॉस्पीटल येथील डॉक्टरांनी तसे लिहून दिले आहे. यासाठी जवळपास रूपये ८ लाख एवढा खर्च येईल असे सांगितले आहे. आजपर्यंत विविध संस्थांनी जसे टाटा ट्रस्ट, शिवसेना यांच्यातर्फे रू. ५ लाख १५ हजार एवढी मदत दिली आहे. यासाठी अजुन रूपये ३ लाखांची आवश्यकता आहे. आमच्या शिवसेना पक्षाचे सर्व नगरसेवक यासाठी त्यांचे एक महिन्याचे मानधन मदत म्हणुन देत आहेत कारण सामान्य परिस्थितीतुन आलेल्या व्यक्तीला हा खर्च झेपु शकत नाही. यासाठी शिवसेना पक्षाच्या वतीने एक महिन्याचे मानधन आम्ही देत आहोत. माझी सभागृहनेता व इतर सदस्यांना विनंती आहे की, अशा शुभ कार्यासाठी, चांगल्या कामासाठी आपण आपल्या इच्छेप्रमाणे मदत करावी. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—**मा.महापौरजी, आता येथे मा. सदस्य श्री. बोडारे साहेब यांनी सांगितले की जो रूग्ण जसलोक हॉस्पीटल येथे उपचारासाठी दाखल आहे. मी सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती करेन की, आपल्या मानधनातुन प्रत्येकी रू. १००० अशाप्रकारे ८१ नगरसेवक आहेत त्यामुळे त्यांना रू. ८१,००० प्राप्त होतील. सर्वानुमते ते त्यांना देण्यात यावे.

**मा. महापौर:—**सर्व सदस्यांच्या मानधनातुन रू. १००० याप्रमाणे रू. ८१,००० मदत श्री. निकाळजे यांना देण्यात यावी.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**मा. महापौर, उपमहापौर व सर्व सदस्य श्री. अशोक निकाळजे हे गेल्या अनेक महिन्यापासुन आजाराशी झुंजत आहेत. आर्थिक परिस्थितीनुसार त्यांना जेवढी मदत हवी होती ती शिवसेनेने व इतर पक्षांनी, उल्हासनगर मधील सेवाभावी मंडळांनी रू. ५ लाखा पर्यंत मदत केलेली आहे. त्यापुढील जी रू. ३ लाखाची मदत आहे त्यासाठी शस्त्रक्रिया थांबली आहे. आज या महापालिकेत विनंतीनुसार आम्ही जो प्रस्ताव मांडला त्यासाठी सन्माननिय महापौर यांनी मान्यता देवुन प्रत्येक सदस्यांनी रू. १००० दयावेत अशी मान्यता दिली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. जयहिंद.

**मा. महापौर :—** आपल्या सर्वांची यांस संमती आहे काय?

**काही सदस्य :—** होय.

<u>मा. महापौर :—</u> श्री. अशोक निकाळजे यांना उपचारासाठी महापालिकेतर्फे अंशदान देणेकामी पुढीलप्रमाणे सर्वानुमते ठराव संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावक : श्री धनंजय बोडारे

अनुमोदक : श्री किशोर वनवारी

<u>प्रस्ताव :</u>

उल्हासनगर कॅम्प नं ४ मधील सुभाष टेकडी येथील नागरिक श्री. अशोक निकाळजे हे बॉन मॅारोच्या आजाराने पिडीत आहेत यासाठी त्यांना जसलोक हॉस्पीटल, मुंबई बॉन मॉरो ट्रान्सप्लान्ट हा उपचार करायचा आहे. जसलोक हॉस्पीटल येथील डॉक्टरांनी तसे लिहुन दिले आहे. सदरच्या उपचारासाठी त्यांना जवळपास रूपये ८ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. आजपर्यंत विविध संस्थांच्या माध्यमातुन त्यांनी रू. ५.१५ लक्ष जमा केलेले असुन अजुन सुमारे रूपये ३ लाखांची आवश्यकता आहे. श्री अशोक निकाळजे हे सदरचा खर्च झेपु शकत नसल्याने सर्व महापालिका सदस्यांच्या एक महिन्याच्या मानधनातुन रु १,००० प्रत्येकी याप्रमाणे एकुण रु ८१,०००/— एवढी मदत करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १ अ</u> <u>दिनांक २०/४/२००५</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार या ठरावाद्वारे श्री अशोक निकाळजे यांना वैद्यकिय उपचारासाठी मदत म्हणुन महापालिका सदस्यांच्या एप्रिल २००५ च्या मानधनातुन प्रत्येकी रु १०००/— याप्रमाणे एकुण रु. ८१,०००/— एवढे अंशदान देण्यासाठी महापालिकेचे मुख्य लेखा अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभ
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—</u>मा. महापौरजी, मी सभागृहाला माहिती देवु इच्छितो की आमच्या मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांना स्थायी समिती सभापती या पदावर सहावे वर्ष सुरू झाले आहे. यासाठी मी निवेदन करेन की जगात असे पहिल्यांदा होत आहे. तर याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. भाभी श्रीमती ज्योती कालानी यांना आमच्या सर्वांच्या वतीने लाखो, करोडो शुभेच्छा देत आहोत. त्याचबरोबर आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांचे देखिल या पदावर सहावे वर्ष सुरू झाले आहेत तर त्यांना देखिल लक्ष लक्ष शुभेच्छा. भाभी श्रीमती ज्योती कालानी यांच्यासोबत श्री. किशोर वनवारी यांचे नाव देखिल गीनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये यायला हवे अशी मी आशा करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u>श्री. प्रमोद टाले यांनी देखिल गटनेता म्हणुन सहा वर्ष पुर्ण केली आहेत. त्यांचे नाव देखिल पाठवा.
<u>मा. सदस्य श्री. देवेदंसिंग खेमाणी:—</u>ते आता येथे उपस्थित नाही. अशा आनंदाच्या वेळी सर्वांचे तोंड गोड करण्यासाठी आम्हाला परवानगी देण्यात यावी. धन्यवाद.
<u>सचिव:—</u>विषय क्र. १. प्रश्नोत्तरे.

आता ४. ४० झाले आहेत. प्रश्न क्र. ३६७ ते ३७० हे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचे आहेत. ते यावेळी सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तरांची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

**प्रश्न क्र. ३६७:—**रुम नं. १५०८, ब्लॉ. नं. ए. ७५४, अभिषेक इमारत, उल्हासनगर—५ या इमारतीच्या वाढीव बांधकामासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करावा ही नम्र विनंती.

१) अ) महाराष्ट्र माहिती अधिकार अन्वये सदर इमारतीबाबत विचारलेल्या माहितीनुसार सदर इमारतीमध्ये १६४.०७ चौ.मी. वाढीव बांधकाम करण्यात आले आहे याचा अर्थ शंभर टक्के वाढीव बांधकाम करण्यात आली असताना त्या इमारतीवर काय कारवाई केली?

ब) सदर इमारतीने महापालिकेतून नकाशा मंजूर (प्लान पास) केल्या नंतर वाढीव बांधकाम करणे कायदान्वये गुन्हा ठरत नाही का? ठरत असल्यास त्यावर (क्रिमिनल) गुन्हा दाखल केला आहे का?

क) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चें कलम २६० व २६८ (१) अन्वये ज्या नोटिस बजावली आहे? कधी नोटिस बजावली? त्या नोटीसची मुदत किती दिवसाची आहे? मुदत संपृष्टात आली आहे का? त्यावर काय कारवाई केली? नोटिस बजावलीची तारीख कोणती?
ड) सदर इमारतीवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम (एमआरटीपी) अन्वये एफ आय आर दाखल केला आहे का?
इ) महाराष्ट्र माहिती अधिकार अन्वये सदर इमारतीबाबत विचारलेल्या माहितीनुसार सदर इमारतीच्या वाढीव बांधकामावर निष्कासन हे ॲक्शन प्लान नुसार होईल तर ॲक्शन प्लान म्हणजे काय? कोणत्या तारखेपासून ॲक्शन प्लान सुरु होणार आहे? कोणत्या तारखेपासून कारवाई होणार आहे? निष्कासन कारवाई कोणत्या तारखेला ठेवली आहे?

**उत्तर:—अ)**सदर इमारतीवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२ व ५३ अन्वये नोटीस बजावली व दिनांक २९.१०.०३ रोजी निष्कासनाची कारवाई केली.
ब)होय. वाढीव बांधकामाचे निष्कासन केल्यामुळे गुन्हा दाखल केला नाही.
क) होय. कलम ५२ व५३ ची नोटीस दिनांक २४.४.०३ रोजी बजावली. कलम २६८ (१) ची नोटीस दिनांक १३.१०.०३ रोजी बजावली सदर बांधकाम दि. २०.१०.०३ रोजी निष्कासित केले.
ड) नाही.
इ) शहरातील अनधिकृत बांधकामाबाबत कृती आराखडा नोव्हेंबर ०४ पासून चालु आहे. सदर कृती आराखडयामध्ये विचाराधीन बांधकामाचा अंतर्भाव आहे. सदर आराखडयानुसार कायदेशीर बाबींची पुर्तता करून निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

**प्रश्न क्र. ३६८:—** कचरा ढकलगाडी (व्हिल बॅरो) च्या खरेदीबाबत विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक, समाधानकारक उत्तरे देवून सविस्तर खुलासा करण्याबाबत.

१) अ) सदर व्हिल बॅरो गाडीची खरेदी कशाप्रकारे झाली? वर्कऑर्डरमध्ये नमूद केल्याप्रमाणे ठेकेदाराने किती दिवसात माल दयावेचे होते? कशाप्रकारे? सदर ठेकेदाराचे नाव व कंपनीचे नाव काय आहे? वर्कऑर्डरप्रमाणे ठेकेदाराने पुर्तता झाली आहे का? दिलेल्या आदेशाप्रमाणे माल आल्याबाबत दिनांक व वार कोणता?

ब) वर्कऑडरप्रमाणे पुर्तता न झाल्यास ठेकेदारावर कोणत्या प्रकारची कारवाई केली आहे? कारवाई न झालयास का नाही करण्यात आली? ठेकेदाराकडुन त्याचे निविदाचे इशारा रक्कम, अनामत रक्कम किंवा दंडात्मक कारवाई केली आहे का? तसेच ती रक्कम परत केली आहे का? सदर ठेकेदारावर नोटीस बजावली आहे का? कारवाई करण्याचा कालावधी किती? कारवाई करण्यास विलंब का? सदर ठेकेदारास देयक दिले आहे का? दिले असल्यास किती नगाचे देयक दिले आहे? एकूण नग किती होते? प्रत्येक नगाची किंमत किती?
क) सदर गाडयाच्या खरेदीबाबत मुख्य स्वच्छता निरिक्षक व स्वच्छता निरिक्षकांचा काय अहवाल आहे? या गाडया मागविण्याकरीता अत्यंत कामाची निकड (गरज) म्हणून कोणाचे अहवाल आहेत? निकडीची दिलेले

अहवाल खरे आहेत तर गाडया वाटप का केल्या नाहीत? सदर गाडया रिजेक्ट केल्या आहेत का? कोणाच्या अभिप्रायानुसार? का रिजेक्ट केल्या?

ड) सदर गाडया महापालिकेच्या आवारात पडून आहेत त्याची कारणे कोणती? त्या गाडया संबंधित विभागाला वापरासाठी का देण्यात आल्या नाहीत? सदर गाडया पडून आहेत अशी विषमता का? सदर गाडया रिजेक्ट केल्या असतील तर त्या गाडया अद्यापपर्यंत महापालिका आवारात का पडुन आहेत?

इ) सदर खरेदी जाणूनबुजून आर्थिक लाभ होण्याकरीता किंवा मनपाच्या महसूल बुडवण्यासाठी करण्यात आला आहे का? त्यास जबाबदार कोण?

फ) सदर गाडया खरेदीसाठी किती निविदा आल्या त्यापैकी किती उघडल्या? ज्या निविदा उघडल्या नाहीत त्याची कारणे कोणती? उघडलेल्या निविदाधारकांना बोलावून दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करण्यात आल्या आहेत का? निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार ठेकेदाराने दिलेल्या गाडया सद्यस्थितीत त्यानुसार आहेत का? यापूढे त्या गाडयाचा वापर होणार आहे का? नसल्यास विल्हेवाट कशी लावणार? त्या गाडया आता वापरात येवू शकणार आहेत का? इतर प्रभागात सदर गाडया वापरण्यास दिल्या आहेत का? दिल्या असल्यास कोणत्या प्रभागात? त्या गाडया वापरात देवू शकतात का?

<u>उत्तरः—१. अ)</u>दिनांक ३०.४.०४ रोजी सदर खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आली. दि. ५.६.०४ पर्यंत ५० टक्के पुरवठा करणे व उर्वरित ५० टक्के दिनांक १३.६.०४ रोजी किंवा त्यापुर्वी पुरवठा करावयाचा होता. वर्कऑर्डरप्रमाणे पुर्तता झाली नाही. दिनांक १८.६.०४ शुक्रवार रोजी ४५ नग मिळाले.

ब) पुरवठा दराचा माल न स्विकारता पुरवठा आदेश रद्द करण्यात आले. सुरक्षा अनामत रक्कम रू. २,३५,००/— घेण्यात आली. सदरची रक्कम परत करण्यात आली नाही. पुरवठा आदेश रद्द केल्यामुळे नोटीस बजावण्यात आली नाही. पुरवठा आदेश रद्द केल्यामुळे पुढील कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

क)हातगाडया निकृष्ट असण्याबाबतचा अहवाल आहे. उप—आयुक्त (आरोग्य) यांचा निकडीची गरज म्हणुन गाडया वाटप करण्यात आल्या होत्या. परंतु गाडयाचे चाके वाकत असल्यामुळे त्या परत जमा करण्यात आल्या आहेत. सदर गाडया रिजेक्ट करण्यात आल्या आहेत. गाडयांची चाके वाकतात (त्यामुळे) आयुक्तांच्या आदेशानुसार रिजेक्ट करण्यात आल्या आहेत.

ड) पुरवठादाराने परत नेल्या नसल्यामुळे पुरवठा आदेश रद्द केल्यामुळे पुरवठादराला सदरच्या गाडया परत नेण्यासाठी कळविण्यात आले आहे.

इ) असा प्रशासानाचा उद्देश नाही कोणीही जबाबदार नाही.

फ) एकुण ५ निविदा आल्या आहेत पैकी ८ निविदा उघडण्यात आल्या. विक्रीकर निपटास दाखला सादर न केल्यामुळे एक निविदा उघडली नाही. होय, वाटाघाटी करण्यात आल्यात. अटी व शर्तीनुसार गाडया नाहीत. महानगरपालिकेला सदर हातगाडयांची गरज आहे. पुरवठादाराने चाके बदलुन दिल्यास त्या स्विकारता येतील व त्याचा उपयोग होईल. इतर प्रभागात सदर गाडया वापरण्यास दिल्या नाहीत. चाके बदलण्यास वापरता येवू शकतात.

<u>**प्रश्न क्र. ३६९:—**</u> लष्करी अभियांत्रिकी सेवा (एमइएस) मालकीच्या उल्हासनगरमधील भुखंड क्र. १९२/यु. नं. ७३ ते ८५ व १०४, शीट नं. २६ संबंधित विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक माहिती देवून योग्य व सविस्तर खुलासा करावा ही नम्र विनंती.

१) अ) महासभा प्रश्न क्र. ५८४, दिनांक <u>५/३/२००१</u> नुसार सदर भुखंडाची चर्चा करतांना तत्कालीन उपायुक्त श्री. एस.एस. पानपट्टे यांनी सदर प्रश्नांची चर्चा करतांना स्पष्टीकरण केले होते की, सदर भुखंडासंबंधी सुनावणी मा. लोकायुक्त यांचेकडे असून महिण्याभरात निर्णय आल्यावर कारवाई होईल तर या भुखंडासंबंधी मा. लोकायुक्तांनी कोणती सुनावणी केली म्हणजेच कोणता निर्णय दिला?

ब) त्या सुनावणी (निर्णया) नंतर महापालिकेने कोणती कारवाई केली?

क) महासभा प्रश्न क्र. ५८४ च्या चर्चा करतांना तत्कालीन उपायुक्त श्री. पानपट्टे यांनी मा. लोकायुक्तांच्या सुनावणीनंतर कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट केले होते तर कारवाईस विलंब का?

ड) सदर विषय सध्या कोणत्या अवस्थत आहे?

इ) सदर भुखंडासबंधी नागरीकांनी महापालिकेस केलेल्या तक्रारीपत्रक, मा. लोकायुक्तांच्या निर्णय पत्रक व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग कक्ष अधिका—यांच्या पत्रकाच्या मुळपत्रक संचिकेत उपलब्ध नाही असे संबंधीत अधिकार स्पष्टीकरण देतात हे खरे आहे का? त्या मुळप्रती (पीसी) गहाळ (हरवल्या) कशा झाल्या? त्यास जबाबदार कोण?

ई) मा. लोकायुक्तांच्या सुनावणीच्या वेळी तत्कालीन आयुक्त मा. पोखरकर यांनी सदर भुखंडाच्या मुळप्रती (पीसी) संचिका उपलब्ध नसून गहाळ (हरवल्या) झाल्या आहेत असे स्पष्टीकरण दिले तर सदर संचिकातील मुळ प्रती (पीसी) हरवणारे (गहाळ करणारे) बेजबाबदार संबंधीत अधिकारी कोण? त्यांचेवर अदयापपर्यंत कोणती कारवाई केली आहे का? सदर बाब गंभीर व गुन्हा ठरत नाही का? त्यांचेवर (एफआयआर) एफ आय आर दाखल केले आहे का? दाखल न केल्यास का दाखल केले नाही व कधी एफआयआर दाखल करणार आहात? बेजबाबदार संबंधित अधिका—यांची (पीसी गहाळ करणारे) नावे दयावीत?

<u>उत्तर:—अ)</u>मा. लोकआयुक्त साहेब यांनी दिनांक १६.७.०१ रोजीच्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशाप्रमाणे संबंधीत बांधकामाची खालीलप्रमाणे सविस्तर माहिती मागितली होती.

१. संबंधीत बांधकाम नेमके कोणत्या जागेवर उभे आहे? जागेचा सविस्तर तपशिल.
२. बांधकामाचे सर्व माळयासह लांबी रूंदीसह क्षेत्रफळ किती
३. प्रत्येक मजल्यावर दुकाने किती? रहिवासी किंवा वाणिज्य वापर किती? प्रत्येक दुकान/घरे यांचा क्षेत्रफळासह तपशील.
४. सदर बांधकामांना दुरूस्ती परवानग्या कधी कधी देण्यात आलेल्या आहेत तसेच बांधकाम परवानग्या देण्यात आलेल्या आहेत किंवा कसे? असल्यास देण्यास जबाबदार कोण? किती क्षेत्रफळामध्ये बांधकाम करणेस परवानगी दिली आहे?
५. विकासधारक यांचेकडे जागेच्या मालकीची कागदपत्रे आहेत किंवा कसे? असल्यास त्यांचा तपशील.
६. संबंधीत बांधकामाखालील क्षेत्र विकास आराखडयात कोणत्या कारणासाठी आरक्षीत आहे किंवा कसे? असल्यास त्याचा तपशिल
७. संबंधीत बांधकामाचे अनुषंगाने न्यायालयात काही क्षेत्र आहेत किंवा कसे? असल्यास त्याचा तपशील अशी माहिती मागितलेली आहे.

ब. त्या सुनावणीनंतर वरील संबधीत विभागाकडुन माहिती मागितली होती. ती माहिती दिल्यानंतर अदयाप कोणतीही कारवाई केली नाही.

क. मा. लोक आयुक्त, यांचे कारवाई बाबत अंतीम आदेश अदयाप प्राप्त झाले नाही. तथापि इमारती संबंधी कागदपत्र तपासणी करून आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ड)सदर विषयाबाबत दि. १९.१.०५ रोजी नगररचना विभगास पत्र देवून माहिती खालीलप्रमाणे मागितली आहे.

१. महाराजा हॉल यु. नं. ७३,७४,७६,७७,८०,८१,८२,८३ व १०४ शिट नं. २६ कल्याण अंबरनाथ रोड, उल्हासनगर—३ येथील बांधकाम कल्याण अंबरनाथ रोड, उल्हासनगर—३, यथिल बांधकाम कल्याण अंबरनाथ रोड नियोजित शंभर फुट रूंदीकरणात समाविष्ट आहे. त्यामध्ये काही फेरफार झाला आहे काय?
२. प्रश्नांकित जागेतील काही भाग ग्रीन झोन या कारणासाठी आरक्षीत असलेचे नमुद केले आहे ते आरक्षण सदया त्याच स्थितीत आहे काय व असल्यास सदर मिळकतीचा किती भाग आरक्षणात बाधीत आहे. त्याचा भाग नकाशा जोडुन पाठवावा.
३. नियंत्रित रूंदीकरणानुसार सदर इमारत रस्त रूंदीकरणात बाधित होते का व असल्या किती बाधीत होते ते नकाशावर नमुद करून जागेवर सिमांकन करून घ्यावे.
४. सदर इमारतीस बांधकाम परवानगी दिली असल्यास त्याची प्रत दयावी. नसल्यास तसेच स्पष्ट अभिप्राय दयावेत.

५. इतर काही वर अनुषंगीक पुरक माहिती उपलब्ध असल्यास सविस्तर टिप्पणी दयावी. ही माहिती अदयाप प्राप्त झाली नसलेने त्याचा पाठपुरावा सुरू आहे.

इ) होय, सदर संचिकेत मा. आयुक्त यांचे निर्णय पत्र या संचिकेत नाही. निर्णय झाला किंवा कसे हा संचिका पाहून बोध होत नाही. तसेच सुनावणीसाठी १ (अ) प्रमाणे मागितली होती.

ई)सदर बाबीशी कोण संबंधीत आहे. त्याची चौकशी करून कारवाई करण्यात येईल.

प्रश्न क्र. ३७०:—रुम नं. १५०९, ब्लॉ. नं. ७५५, प्रणिता इमारत, उल्हासनगर—५ या इमारतीच्या वाढीव बांधकामासंबंधी विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करावा ही नम्र विनंती.

१) अ) महाराष्ट्र माहिती अधिकार अन्वये सदर इमारतीबाबत विचारलेल्या माहितीनुसार सदर इमारतीमध्ये १६४.०७ चौ.मी. वाढीव बांधकाम करण्यात आले आहे याचा अर्थ शंभर टक्के वाढीव बांधकाम करण्यात आली असताना त्या इमारतीवर काय कारवाई केली?

ब) सदर इमारतीने महापालिकेतून नकाशा मंजूर (प्लान पास) केल्या नंतर वाढीव बांधकाम करणे कायदान्वये गुन्हा ठरत नाही का? ठरत असल्यास त्यावर (क्रिमिनल) गुन्हा दाखल केला आहे का?

क) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चें कलम २६० व २६८ (१) अन्वये ज्या नोटिस बजावली आहे? कधी नोटिस बजावली? त्या नोटीसची मुदत किती दिवसाची आहे? मुदत संपृष्टात आली आहे का? त्यावर काय कारवाई केली? नोटिस बजावलीची तारीख कोणती?

ड) सदर इमारतीवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम (एमआरटीपी) अन्वये एफ आय आर दाखल केला आहे का?

इ) महाराष्ट्र माहिती अधिकार अन्वये सदर इमारतीबाबत विचारलेल्या माहितीनुसार सदर इमारतीच्या वाढीव बांधकामावर निष्कासन हे ॲक्शन प्लान नुसार होईल तर ॲक्शन प्लान म्हणजे काय? कोणत्या तारखेपासून ॲक्शन प्लान सुरु होणार आहे? कोणत्या तारखेपासून कारवाई होणार आहे? निष्कासन कारवाई कोणत्या तारखेला ठेवली आहे?

उत्तर:—अ)सदर इमारतीवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२ व ५३ अन्वये नोटीस बजावली व दिनांक २९.१०.२००३ रोजी निष्कासनाची कारवाई केली होती.

ब) होय, त्यावर गुन्हा दाखल केलेला नाही.

क)होय, दिनांक २४.४.०३ रोजी सदर इमारतीस नोटीस बजावली होती. त्याची मुदत ३० दिवसांची होती. होय, मुदत संपल्यावर दिनांक २९.१०.०३ रोजी निष्कासन केले होते. नोटीस ५२ व ५३ अन्वये बजावली होती. तारीख २४.४.०३ व २६८ (१०) अन्वये १३.१०.०३ आहे.

ड) नाही.

ठ) सामान्य कृती आराखडयात निष्कासनासाठी क्रमवार ठेवलेले आहे. सदर इमारतीचे क्रम येताच सदर इमारतीच्या वाढीव बांधकामावर कारवाई करण्यात येईल.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३७१ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. ३७१— प्रकाश लालवानी बॅ. नं. १८४१, आनंदपूर आश्रमशाळेजवळ, सेक्शन ३९, उल्हासनगर—५ येथे बांधकाम केले असून त्याबाबत खाली विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर सुचक उत्तरे मिळावी ही विंनती.

प्र. क्र. १) सदर बांधकाम मंजूर नकाशा प्रमाणे सुरु आहे का?

सदर बांधकामात वाढीव अनधिकृत बांधकाम केले आहे का?

सदर बांधकामात अनधिकृत बांधकाम केले असल्यास प्रशासनाने अदयापपर्यंत कोणती कारवाई केली? का कारवाई केलीच नाही?

<u>उत्तर:—</u>नाही. सदर इमारतीमध्ये विकासकाने ३२३.७६ चौ.मी. अनधिकृत बांधकाम केलेले आहे.
सदर बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये व २३८ (१) अन्वये वास्तवखाली करण्यासंबधी नोटीस व निष्कासीत करण्याचे आदेशही बजावले आहेत.
सदर इमारतीचा निष्कासनाचा कार्यक्रम ठेवला होता. परंतु दि. ६.१.०५ व ११.१.०५ रोजी पोलीस बंदोबस्त न मिळाल्यामुळे कारवाई करता आली नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>मा. महापौरजी, उपमहापौरजी प्रश्न क्र. ३७१ व त्याचे उत्तर वरील प्रमाणे आहे. आयुक्त साहेब आतापर्यंत पोलिस बंदाबस्त आपल्याला मिळाला नाही की जाणुनबुजून त्यावर कारवाई होत नाही. आणि अडचण फक्त पोलिस बंदोबस्ताची सांगितली जाते आणि बिल्डरला प्रशासनातर्फे पाठीशी घातले जाते  असा आमचा आरोप आहे.

<u>श्री उत्तम लोणारे, आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—</u>मा.महापौर, उपमहापौर व सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी जो प्रश्न क्र. ३७१ विचारला आहे तर पोलिस बंदोबस्त न मिळाल्याने कारवाई झालेली नाही याबाबत मी एवढेच म्हणेन की पोलिस बंदोबस्त घेवुन आम्ही लवकरात लवकर तेथे निष्कासीत करून आपणांस त्याचा अहवाल देवु.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>पोलिस बंदोबस्त मिळाल्यावर आपण कारवाई कराल. आपणास आतापर्यत पोलिस बंदोबस्त मिळाला नाही का? त्यानंतर त्या विभागातील अनाधिकृत बांधकामे आपण तोडली नाहीत का? तोडली आहेत अशी माझी माहिती आहे.

<u>आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—</u>अतिरिक्त कार्यभार घेवुन मी या विभागात तीन महिने काम केले आहे. काही कामे तर मी पोलिस बंदोबस्त न घेता देखिल केली आहेत. परंतु काही ठिकाणी धोका येवु शकतो. परंतु आता सदरचे बांधकाम पोलिस बंदोबस्तात तोडण्यात येईल असे मी सांगतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>मा. आयुक्त साहेब माझ्या प्रश्नावरच यांच्याकडे उत्तर नसते. मागील महासभेत देखिल ३२२ क्रमांकाचा प्रश्न होता. त्यालाही उत्तर नव्हते. दुस—या महासभेत तो प्रश्न घ्या असे आयुक्त साहेबांनी सांगितले होते. तो प्रश्न दुस—या सभेत आणल्यानंतरही त्यावर बरोबर उत्तर दिले गेले नव्हते. आणि आजही त्या प्रश्नाची, क्र. ३२२ ची काय स्थिती आहे हे देखिल महासभेत सांगावे.

<u>आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—</u>क्र. ३२२ ची माहिती आम्ही तुम्हाला देतो. जो प्रश्न क्र. ३७१ आहे त्याबाबतीत पोलिस बंदोबस्त घेवुन आम्ही लवकरच कारवाई करतो. पुढील महासभेपुर्वी त्याचे निष्कासन झालेले असेल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>स्थिती काय आहे?

<u>श्री. टी.के. ढेंगळेपाटील उपायुक्त (अतिक्रमण):—</u>मा. महापौर, उपमहापौर व सर्व सदस्य प्रश्न क्र. ३२२ हा यश अपार्टमेंटशी संबंधित होता. दोन दिवसापुर्वी त्यावर एफ.आय.आर. दाखल केला आहे. त्याची प्रत देखिल माझ्याकडे आहे. तसेच निष्कासनासाठी पोलिस बंदोबस्त मागितला आहे. आजही ब—याच ठिकाणी निष्कासनाची कारवाई चालु आहे. दोन तीन दिवस सलग पोलिस बंदोबस्त उपलब्ध होत आहे. निष्कासनाचे काम देखिल सुरू करू. तसेच त्यांच्यावर एफ.आय.आर. दाखल केला आहे. आपणांस प्रत हवी असेल तर घेवु शकता.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. ३७२ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३७२:—</u> विधानसभा निवडणूक २००४   (कालावधी २५/८/२००४ ते २५/१०/२००४) या निवडणूक कालावधीत शहरात अनेक अनधिकृत बांधकामे करण्यात आली अश्या बांधकामावर निवडणूक

कालावधी असल्याने कारवाई न करता कलम ५२ व ५३ अन्वये नोटिसा बजावणेत आल्या आहेत. त्या अनूषंगाने खालील प्रश्नाची सूचक समाधानकारक सविस्तर उत्तरे येत्या महासभेत मिळावीत ही विनंती.

१) निवडणूक कालावधी अश्या किती बांधकामांना नोटिसा बजावणेत आल्या?
त्याचा कालावधी संपृष्ठात आला का?
त्याचा कालावधी किती होता?
नोटिस बजावणेत आलेल्या कामांची सद्यस्थिती काय आहे?
सदर बांधकामावर महापालिका प्रशासनाने कोणती कारवाई केली

उत्तर:—दिनांक २५.९.०४ ते २५.१०.०४ या कालावधीत एकूण २२ बांधकामांना कलम ५२ व ५३ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या आहेत.
होय.
३० दिवसांचा.
निष्कासन केलेले बांधकामे—५
आदेश पारीत केले—५
सुनावणी—१२
एकूण २२

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—प्रश्न क्र. ३७२ व त्याचे उत्तर वरील प्रमाणे आहे. तर बाकीच्या १२ कामावर सुनावणी झाली, ५ कामांचे आदेश पारीत झाले. अशा १७ बांधकामांचे पुढे काय झाले?

श्री. टी.के. ढेंगळेपाटील उपायुक्त (अतिक्रमण):—मा. महापौर महोदया, एकुण २२ बांधकामांना कलम ५२,५३ च्या नोटीसा दिल्या होत्या. त्यातील ५ बांधकामे तोडली आहेत. ५ बांधकामांचे आदेश पारीत केले आहेत. जागा खाली करण्याच्या नोटीसा आम्ही देत आहोत. आणि १२ लोकांची सुनावणी पुर्ण झाली नाही ती सुरू आहे. त्या सर्व सुनावण्या पुर्ण झाल्यांनतर जागा रिकामी करून निष्कासीत केले जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—मला असे वाटते की या बांधकामामध्ये प्रशासन फक्त ५२, ५३ अन्वये नोटीस देवुन त्या बांधकामांना वाचविण्याचे काम करीत आहे. तर या बांधकामांवर ज्या ५ लोकांवर जशी कारवाई केली तशीच कारवाई इतरांवर देखिल करायला हवी होती. ती अजुन पर्यंत झाली नाही आणि आपण आम्हाला सांगता की त्यांच्यावर कारवाई करू. जेव्हा जेव्हा अनाधिकृत बांधकामाविषयी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला जातो तेव्हा तेव्हा आपल्या विभागाकडुन अशीच उत्तरे आम्हाला मिळतात. कारवाई करू, बघु, बघितले जाईल तर कृपया अशी उत्तरे देवु नयेत. कारवाई काय झाली हे उत्तर हवे.

श्री. टी.के. ढेंगळेपाटील उपायुक्त (अतिक्रमण):—एकुण २२ बांधकामांपैकी ५ बांधकामे पुर्णपणे निष्कासीत केलेली आहेत. ५ बांधकामांचे आदेश पारीत केले आहेत जागा रिकामी करून त्याची कारवाई देखिल सुरू आहे आणि १२ बांधकामांची आता माझ्याकडे सुनावणी चालु आहे. आपली प्रक्रिया सतत सुरू आहे. ५ बांधकामे निष्कासीत केली आहेत. इतर बांधकामे देखिल प्राथम्याने निष्कासित करू व सभागृहाला अहवाल देवु.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—५ बांधकामांची सुनावणीही झाली आहे. त्यांचे काय झाले?

श्री. टी.के. ढेंगळेपाटील उपायुक्त (अतिक्रमण):—नाही नाही. सुनावणी फक्त ५ बांधकामांची झाली आहे. आदेश पारीत केले आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—आदेश पारीत केलेली ५ बांधकामे आहेत. त्यावर अजुन कारवाई का झाली नाही?

श्री. टी.के. ढेंगळेपाटील उपायुक्त (अतिक्रमण):—आम्ही जागा रिकामी करून घेत आहोत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—सदस्यांनी अनाधिकृत बांधकामांचा प्रश्न विचारल्यानंतरच हे विभाग काम करीत आहे.

श्री. टी.के. ढेंगळेपाटील उपायुक्त (अतिक्रमण):— माझ्याकडे एक महिन्यापुर्वीच या विभागाचे काम आले आहे. ही जुनीच प्रकरणे आहेत. ५ बांधकामांचे ज्यांचे आदेश पारीत केले आहेत त्यांची मी उद्याच नोटीस काढतो.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३७३ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. ३७३:— उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील रस्ता रुंदीकरणात बाधीत झालेल्या नागरीकांना तळमजला + दोन मजल्याचे बांधकामास दिलेल्या मंजूरी परवानगी बाबत विचारलेल्या खालील प्रश्नावर येत्या महासभेत चर्चा होवून सूचक, समाधानकारक सविस्तर उत्तर / माहिती मिळावी ही विनंती.

उल्हासनगर शहरात रस्ता रुंदीकरण मोहीमे अंतर्गत बाधित झालेल्या अश्या किती रहिवाश्यांना तळमजला + दोन माळयाचे बांधकामास नगररचना विभागाने लेखी परवानगी दिली आहे. अश्या रहिवाश्यांची / दुकानांची नावे व पत्ते याची माहिती मिळावी.

उत्तर:—रस्ता रूंदीकरणात बाधीत झालेल्या लोकांना या विभागाकडुन कोणत्याही प्रकारची बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—प्रश्न क्र. ३७३ व त्याचे उत्तर वरील प्रमाणे आहे. मा. आयुक्त साहेब माझ्याकडे अशी परवानगी आहे की आपल्या नगररचना विभागाने रस्ता रूंदीकरणात गेल्यामुळे दिलेली आहे. ती परवानगी खोटी आहे की हे उत्तर खोटे आहे?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—मा.महापौर महोदया, उत्तर बरोबर आहे. आपल्याकडे रस्ता रूंदीकरणात बाधीत झाल्याने कोणालाही आता पर्यंत बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही. आपल्याकडे अशी काही परवानगी असेल तर आपण ती महापालिकेत सादर करावी आम्ही त्याची चौकशी करून खात्री करून घेवु.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—जर आम्ही अशी परवानगी आपणांकडे आणुन दिली तर आपण ज्या अधिका—यांनी ती परवानगी दिली असेल त्यांच्यावर कार्यवाही कराल का?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—आपण सादर केल्यानंतर आम्ही नियमाप्रमाणे कारवाई करू.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—नियमाप्रमाणे कारवाई आणि जे बांधकाम झाले आहे त्यावरही कारवाई व्हायला हवी.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—परवानगी कशाप्रकारची आहे. परवानगी देताना सर्व कागदपत्रे पाहुन त्यांनतर परवानगी दिली जाते. ही परवानगी कशी दिली होती त्याची शहानिशा करून त्यानंतर आम्ही कारवाई करू. परंतु अशाप्रकारे रस्ता रूंदीकरणात बाधित झालेल्या कोणालाही बांधकाम परवानगी दिलेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—ठिक आहे. उत्तर पण तुमचेच आहे. मी तुमच्याकडे ती परवानगी आणुन दाखवतो.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३७४ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३७४:— प्रभाग १ मधील ब्राम्हणपाडा एज्येकशन सोसायटी संचालीत शांतीग्राम विद्यामंदिराने ब्राम्हणपाडा येथे श्री. पवार यांचे घरासमोरील नाल्यावर अतिक्रमण करुन संरक्षणभिंती बांधलेली आहे. त्यामूळे

सदर नाल्यात साचलेला कचरा काढणे अशक्य होत असल्याने सदर प्रकरणाची चौकशी करुन कारवाई होणेसाठी दिनांक २५/६/२००४ ते ५/८/२००४ रोजी पत्र दिली होती. त्या अनूषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेबाबत.

प्र. १) अ) शांतीग्राम विद्यालयाने बांधलेल्या संरक्षण भिंतीस महापालिकेने परवानगी दिली आहे का? दिली असल्यास क्रमांक व दिनांक दयावा.
ब) परवानगी दिली असल्यास संरक्षण भिंतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आहे काय? की त्यात अनधिकृत बांधकाम आहे.
क) महापालिकेचे मालकीचे नाल्यावर संरक्षण भिंत बांधता येते का? व बांधली असल्यास ती अधिकृत नियमास धरुन आहे का?
ड) सदरचे भिंतीचे बांधकामास परवानगी नसल्यास, मंजूर नकाशाप्रमाणे नसल्यास, अनधिकृत, वाढीव बांधकाम असल्यास अश्या बांधकामावर महानगरपालिका काय कारवाई करते?
ई) सदर संरक्षण भिंत निष्कासित करणेसाठी तक्रार अर्ज आले आहेत का? किती? कोणाचे त्यावर काय कारवाई केली? कारवाई केली नसल्यास का केली नाही? त्याची कारणे काय?
ऊ) सदरचे बांधकामास निष्कासीत करणेस विलंब लावणा—या / प्रलंबीत ठेवणा—या अधिकारी व कर्मचारी यांची नावे दयावी.
अश्या अधिका—यावर कामात हलगर्जीपणा दाखविल्याबद्दल काय कारवाई करण्यात येते?
संबंधीतावर कारवाई केली आहे का?

महापालिकेचे मालकीचे नाल्यावर अतिक्रमणाबाबत तक्रर करुनही महापालिकेचे मालमत्तेचे रक्षण करणेस संबंधीत अधिकारी टाळाटाह करीत असल्याने त्यांचे वर कोणता दबाव येत आहे का?

प) सदरचे बांधकाम चौकशी करुन निष्कासीत करणेस किती कालावधी लागेल त्याची मूदत दयावी व मूदतीत कारवाई पूर्ण करावी ही विनंती.

<u>उत्तर:—</u>अ) सदर शाळेच्या इमारतीस या कार्यालयाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र. उमपा / नरवि/बाप/२६५/९४/६० दि. ६.५.९५ रोजी बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.
ब)बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार नाल्यावर कुंपण भिंतीचे बांधकाम करता येत नाही. त्यामुळे नाल्यावर केलेले हे बांधकाम अनधिकृत आहे.
क)नाही. ती अनधिकृत आहे.
ड)सदरच्या नाल्यावर बांधलेल्या कुंपण भिंतीबाबत अदयापपर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही.
इ)होय. ३ तक्रार अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यावर कारवाई करण्याचे काम सुरू आहे.
ई)वरील प्रमाणे.
प)सदर बांधकामाची चौकशी करून लवकरात लवकर निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

<u>मा. सचिव:—</u>प्रश्न क्र. ३७५ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३७५:—</u> ए—१ बॅगवाला पवई चौक, उल्हासनगर—३ येथे तळमजला + चार मजल्याचे इमारतीचे बांधकाम सुरु असून सदर बांधकामाबाबत खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सूचक, सविस्तर माहिती मिळणेस विंनती आहे.

प्र. १) अ) सदर बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली आहे का?
ब) त्याचा प्लॅन क्रमांक व दिनांक दयावा.
क) सदर बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे का? कि त्यात अनधिकृत वाढीव बांधकाम केले आहे.
ड) सदर बांधकामात वाढीव अनधिकृत बांधकाम असल्यास महानगरपालिकेने आजतागायत कोणती कारवाई केली?
ई) सदरचे बांधकामास सार्वजनिक शौचालयाचे जागेवर परवानगी दिली आहे का? सदर बांधकाम सार्वजनिक शौचालयाचे जागेवर आहे का? शौचालयाचे जागेंवर बांधकाम करणे योग्य आहे का?

प) अश्याप्रकारे सार्वजनिक शौचालयाचे जागांवर आजतागायत किती बांधकामे झालीत? त्यांना महापालिकेने परवानगी दिली आहे का? कृपया यादी नावासह पत्यासह दयावी ही विनंती.

<u>उत्तर:—अ)</u>होय.
ब)उमपा/लरवि/बांप/५०/०४/३१९, दि.२३.११.०४
क)नाही. सदर इमारतीमध्ये ९२.९२ चौ.मी चे अनधिकृ बांधकाम केलेले आहे.
ड)सदरच्या अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई करण्याकरिता उप आयुक्त (अ.बा.नि.वि) यांना कळविण्यात आले आहे.
इ) सदरची जागा ही बॅरेकची केली आहे. या जागेवर शौचालय नाही.
प)शौचालयाच्या जागी मालकी हक्काचे कागदपत्रे सादर केल्यानंतर महानगरपालिकेकडुन रितसर परवानगी देण्यात येते.

<u>**मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:—**</u>मा. महापौरजी, सचिव साहेब, आयुक्त साहेब सदर बांधकामाबाबत कारवाई करिता उपायुक्त अनाधिकृत बांधकाम यांना कळविण्यात आलेले आहे. कळविल्यानंतर उपायुक्तांनी काय केले त्याचा खुलासा येथे दिलेला नाही.

<u>**श्री. टी.के. ढेंगळेपाटील उपायुक्त (अतिक्रमण):—**</u>मा. महापौर महोदया, प्रश्न क्र. ३७५ याची माहिती उपायुक्तांकडे दिल्यांनतर दि. १६.३.२००५ रोजी कलम ५२,५३ ची नोटीस काढलेली आहे. तीची मुदत १६.४.२००५ रोजी संपलेली आहे. सुनावणी चालु आहे. सुनावणी दोन दिवसात संपते आहे. सुनावणी झाल्यांनतर अंतिम आदेश पारीत करून आम्ही निष्कासन करू. नियमाप्रमाणे सुनावणी साठी १५ दिवस व जागा रिकामी करण्यासाठी १५ दिवस असे तीस दिवस तर लागतील.

<u>**मा.सदस्य श्री. नथु सोनवणे:—**</u>ठिक आहे.

<u>**मा. सचिव:—**</u>प्रश्न क्र. ३७६ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे.

<u>**प्रश्न क्र. ३७६:—**</u> महादेव कंपाउन्ड उल्हासनगर—१ या ठिकाणी ४० γ ३० चे २७० पञ्याचे रोडचे बांधकाम केले असून त्याबाबत खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सूचक, सविस्तर माहिती मिळणेस विंनती आहे.

प्र. १) अ) सदर बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली आहे का?
ब) सदर बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे सुरु आहे का? कि त्यात अनधिकृत वाढीव बांधकाम केले आहे.

क) सदर बांधकामात वाढीव अनधिकृत बांधकाम असल्यास महानगरपालिकेने किती वेळा निष्कासनाची कारवाई केली?
ड) आता सदर बांधकामास नविन (सुधारीत) मंजूरी दिली आहे का?
ई) मंजूरी दिली नसल्यास सदरचे बांधकाम महापालिकेच्या दृष्टीने अधिकृत / अनधिकृत आहे?
प) अनधिकृत/ वाढीव असल्यास आजतागायत कारवाई न होण्याची कारणे कोणती? कारवाई कधीपर्यंत अपेक्षित आहे.

<u>उत्तर:—</u>अ.विकासकाने एका जागेवर दुरूस्ती परवानगी घेवुन विषयांकित जागेवर बांधकाम केलेले आहे. त्यामुळे सदरचे बांधकाम पुर्णपणे अनधिकृत आहे.
ब. वरीलप्रमाणे

क. यापुर्वी एक वेळा निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.
ड. नाही.
इ. सदरचे बांधकाम पुर्णपणे अनधिकृत आहे.
प. मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९चे कलम २६० अन्वये दि. ९.२.०५ रोजी नोटीस बजावण्यात आली त्यानंतर उमपातर्फे बांधकाम निष्कासित करण्यात आले.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः—माईक चालत नाही.

मा. सचिवः—तुम्ही त्याला हात लावुन बोलु नका. तुमचा आवाज व्यवस्थित येईल.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः—साहेब आपण हे प्रश्नोत्तरे दोन दिवसांपुर्वी दिली आहेत. याला पीन अशी लावली आहे की, कागदे हातात येण्यापुर्वी निघुन जात आहेत. ती अनुक्रमाने देखिल नाही. शोधायला एक तास लागतो. आपण कधी बघितले आहे का? पाच—पाच प्रश्न मागे पुढे असतात. येथे श्री. नथु सोनवणे, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर असा उल्लेख आहे. ते समजुन येत नाही. ते कधीही अनुक्रमाने लावण्यात येत नाही. उचलतात, पीन लावतात आणि हातात देतात.

मा. सचिवः—मला असे वाटते की आपल्या शिवाय इतर कुणाचीही तक्रार नाही. ते सर्व अनुक्रमानेच लावण्यात येते. जर तुमची पीन लुज झाली असेल तर कागद बाहेर निघुन येईल.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः—नाव पण चुकीचे लिहिले आहे. श्री. भुल्लर यांचे भुल्लक लिहिले आहे. ८० नगरसेवकांचे नाव देखिल माहित नाही.

मा. सचिवः—तुम्ही तुमचा प्रश्न विचारा.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः—कसा काय विचारणार? यामध्ये प्रश्न सापडतच नाही. सध्या जागेवर परिस्थिती काय आहे.

श्री. टी.के. ढेंगळेपाटील उपायुक्त (अतिक्रमण):—९.२.२००५ रोजी बी.पी.एम.सी २६० ची नोटीस देवुन निष्कासित केले होते. सध्या तिथे निष्कासित केलेली जागा आहे. नविन बांधकाम बांधलेले नाही.

मा.सचिवः—कृपया माईकला हात लावु नका. त्यामुळे तो खराब होतो.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणेः—ठिक आहे.

मा. सचिवः—प्रश्न क्र. ३७७व ३७८ हे श्री. शांताराम निकम यांचे आहेत. ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३७७:—
प्रभाग ९ मधील 'दहाचाळ खन्ता'' ॲन्थोनी या कचरा उचलणा—या ठेकेदारांकडुन उचलण्याचे प्रशासनाने बंद केले आहे का? असल्यास पुढील प्रश्नांची उत्तरे मिळावीत.

प्र. १) अ) सदरचा खन्ता प्रभग ९ क मधील सफाई कामगार (नाली) उचलून अर्धा किलो मिटरवरच्या सुभाषटेकडी खन्यावर नेतात का?
ब) सद्या प्रभाग ९ क मध्ये सतत कामावर येणारे नाली कामगार किती आहेत? ते पुरेसे आहेत का?
क) नाली कामगार दहाचाळचा खन्ता सुभाषटेकडीला उचलून नेत असल्यामूळे नाली सफाई होत नाही त्यामुळे साथीचा रोग आल्यास महापालिका जबाबदारी घेईल का?

ड) नाली कामगार वाढविणे गरजेचे नाही का?
असल्यास विलंब का?
ई) दहाचाळ खन्ता पुन्हा ॲन्थोनी कंन्सल्टंसी उचलणार का?

उत्तर:—अ. सदरचा खत्ता प्रभाग क्र. ०९ 'क' मधील नुसन ०९ 'ब' मध्ये आहे. प्रभाग क्र. ०९ 'क' मध्ये पुरेसे कामगार आहेत.
ब. होय, प्रभाग क्र. ०९ 'ब' मधील खत्ता कामगार, सफाई कामगार उचलून सरासरी ३०० मी. अंतरावरील खत्यावर नेतात.
सद्या प्रभाग क्र. ०९ 'ब' मध्ये सतत कामावर येणारे नाली कामगार ०२ आहेत. पुरेसे नाहीत.
क. नाली कामगार दहा चाळचा खत्ता आंबेडकर चौकात उचलुन नेत असल्यामुळै साथीच्या रोगांचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
ड. नाली कामगार वाढविणे गरजेचे आहे.
इ. नाही.

प्रश्न क्र. ३७८:— सन २००४—२००५ या आर्थिक वर्षात उल्हासनगर महानगरपालिकेने किती लाखाची शहरातील खड्डे डांबराने (पाथोल्स) भरण्याची ाकमे मंजूर केली आहेत?

प्र. १) अ) त्यापैकी प्रत्येक प्रभाग क्षेत्रात किती लाखांची कामे मंजूर झाली? (प्रभाग १ ते ४)
ब) त्यापैकी किती लाखांची कामे प्रभागाप्रमाणे झाली?
क) किती लाखांची कामे मंजूर होवूनही झाली नाहीत?
ड) संपूर्ण कामे कव्हा मंजूर झाली व केव्हापर्यंत पूर्ण करुन घ्यायची आहेत?
इ) प्रभाग क्र. ९ मध्ये पाथोल्सचेकाम मंजूर आहे का? किती लाखांचे (कृपया प्रस्तावित ठिकाणचे नाव द्यावे)
ई) प्रभाग क्र. ९ मध्ये काम होणार आहे का? असल्यास केव्हा? नसल्यास का?

उत्तर:—मंजुर काम रूप्ये ५९. ९० लक्ष
अ. प्रभाग क्षेत्र १ साठी रू.१३.२८ लक्ष
प्रभाग क्षेत्र २ साठी रू. १०.८४ लक्ष
प्रभाग क्षेत्र ३ साठी रू. १७. ६६ लक्ष
प्रभाग क्षेत्र ४ साठी रू. १८. १३ लक्ष
एकुण रूपये — रू. ५९.९० लक्ष
ब. अंदाजे
प्रभाग क्षेत्र १ साठी रू.९.१० लक्ष
प्रभाग क्षेत्र २ साठी रू. १०.३२ लक्ष
प्रभाग क्षेत्र ३ साठी रू. १४. ८४ लक्ष
प्रभाग क्षेत्र ४ साठी रू. ४. ५७ लक्ष
एकुण रूपये — रू. ३८.८३ लक्ष

क. एकुण १४.३७ लक्ष
ड. सप्टेंबर २००४ मध्ये मंजुरी व ती कामे निविदेप्रमाणे १ वर्षाचा कालावधी दिलेला आहे.

इ. खालील प्रमाणे काम मंजुर आहे. १. प्रभाग क्र.९ मधील हनुमान मंदीरचे मागील बाजुस मलसुलकर यांचे घर ते शेट्टे यांचे घरापर्यंतच्या रस्त्यावरील खड्डयांचे डांबरीकरण करणे (रूपये ५००००/—) २. प्रभाग क्र. ९ मधील क्रिष्णा यांचे घर ते अंकुश जानराव यांचे घरापर्यंत रस्त्यावरील खड्डयांचे डांबरीकरण करणे (रू. १०,००००/—)
ई. कामे लवकरच होणार आहे.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३७९ हा श्रीमती भावना खिलनानी यांचा आहे. त्या यावेळी सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३७९:–</u>आय रिक्वेस्ट दॅट प्लीज अॅन्सर द फॉलोव्हींग क्वेश्चन इन जनरल बॉडी मिटींग.
इज देअर अेनी प्रॅक्टीस इन उल्हासनगर म्युनिसिपल कॉर्पोरेशन टू नेम अॅज नंबर द प्रीमाइस विदीन द सीटी ऑफ उल्हासनगर?
इफ यस? हाऊ मेनी प्रीमाइसेस वीदीन द सीटी आर नेमड अॅज नंबरड्?
अे. इफ द सेड प्रॅक्टीस इज नॉट बीइंग फॉलोव्हड्. वेन आर यु गोइंग टू अॅडोप्ट धीस प्रॅक्टीस?
बी. इफ हाऊस टॅक्स अॅन्ड ऑदर लेटर्स आर रिचींग अॅट एक्सेट अॅडरेस अॅन्ड परसन? ऑर एक्सेट हाऊस इज बीइंग लोकेटेड अॅट प्रझेन्ट वीथआऊट हाऊस नं?
सी.इफ द सर्व्हे ऑफ हाऊस ऑर पॉप्युलेशन ऑर वोटींग लिस्ट इज बीइंग डन प्रॉपर्टी अॅट प्रझेन्ट वीथआऊट हाऊस नं?

<u>उत्तर:–</u>उल्हासनगर शहरातमध्ये कर विभागातर्फे १ ते ५८ वार्ड निहाय विभागणी करण्यात आली आहे. १ ते ५८ वार्डमध्ये प्रत्येक मालमत्तेला मालमत्ता क्र./ खाता क्र. देण्यात येतो. घर क्रमांक देत नाही.
अ. वरील प्रमाणे मालमत्तांची नोंद करण्यात येते.
ब. प्रत्येक वार्डमध्ये वसुली लिपिक बिल सर्व्हेर यांना सतत वार्डमध्ये कार्यरत असल्याने मालमत्ता धारकांना बिल लागु करण्यात येते.
क. मतदार यादी तयार करण्याचे काम मतदान नोंदणी अधिकारी यांचेकडून करण्यात येते व त्यासाठी त्यांचेकडुन वेळोवेळी स्वतंत्र सर्वेक्षण करणेत येते. त्यामुळे या बाबीचा त्या कामाशी थेट संबंध येत नाही.

<u>मा. सचिव:–</u>प्रश्न क्र. ३८० हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३८०:–</u>यश अपार्टमेंट, प्लॉट नं. ६११, ६१२, अनुक्रमांक ३२२, दिनांक ४/६/२००४ नुसार सदर इमारतीत १९३.१९ चौ. मी. वाढीव बांधकाम केले असून तेथिल रहिवाशीयांना नोटिस बजावून अधिनियम तरतुदीनुसार कारवाई सुरु असल्याचा खुलासा केला होता. त्या अनुषंगाने खालील प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे दयावी.
प्र. क्र. १ अ) सदर इमारतीतील रहिवाशीयांना किती तारखेला नोटिस बजावली?
ब) बजावलेल्या नोटीसची मुदत किती?
क) बजावलेल्या नोटीसची कालावधी संपली आहे का?
ड) अनधिकृत वाढीव बांधकामावर कारवाई करण्यास विलंब का?
इ) सदर प्लॉट नं. ६११ व ६१२ या जागेवर आरक्षण आहे का? असल्यास कशाकरीता आरक्षित आहे?

ई) दिनांक ४/६/२००४ ते २८/२/२००५ या कालावधीपर्यंत सदर वाढीव बांधकामावर कारवाई का केली नाही?
उ) सदर इमारतीच्या वाढीव अनाधिकृत बांधकामावर त्वरीत कारवाई करण्याबाबतची मुदत किती?

<u>उत्तर:–</u>सदर इमारतीतील रहिवाशंना वास्तव्य खाली करण्याची नोटीस दिली आहे.
दिनांक २९.१.०५ रोजी नोटीस बजावला.
नोटीसची मुदत ३० दिवस
होय.
सध्या मा. न्यायालयाचे आदेशानुसार प्रथम प्राधान्याने निष्कासनाची कार्यवाही चालु आहे.
नाही.
सदर प्रकरणी सुनावणी दिल्यानंतर दिनांक २६.७.२००४ रोजी निष्कासनाचे आदेश पारित केले.
मा. पोलिस उपायुक्त यांनी पोलीस संरक्षण मागितले आहे. तद्नंतर त्वरीत कारवाई करण्यात येईल.

<u>मा. सचिवः—</u>प्रश्न क्र. ३८१ हा श्रीमती भावना खिलनानी यांचा आहे. त्या यावेळी सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३८१:—</u>१) महानगरपालिका के अंतर्गत कितने आरक्षित भुखंड है ?

२) कितानों पर महानगरपालिका की कंम्पाउंड वॉल या तार कंम्पाउंड की लगी हुई है ? उनका सविस्तर विवरण दें (लोकेशन तथा माप साईज)

३) कितने भुखंड खाली पडे है ? जिन पर महानगरपालिका का कब्जा या कंम्पाउंड नही है?

४) ऐसे कितने भुखंड है जिन पर महानगरपालिका का पत्थर या तार कंपाउंड होने के बाद भुमाफियों ने हडप लिये है तथा महानगरपालिका ने ऐसे कितने कंपाउंडों पे प्लान पास किया है । जिनके प्लान पास हुए है उनसे कंपाउंड के पैसे लिए गए है या नही?

५) जिन भुखंडो पर कंपाउंड लगा हुआ है उन पर महानगरपालिका ने सरकार से अपने ताबे में ''मालिकाना हक्क'' लेने के लिए क्या कारवाई की है । नहीं कि गई है तो उनकी मोज—माप करके सरकार से जल्द से जल्द भेजकर अपने मालिकाना हक्क के या ताबे के लिए कारवाई कब शुरु कि जाएगी ?

<u>उत्तरः—</u>१. उल्हासनगर मंजुर विकास योजनाअंतर्गत एकुण १५९ भुखंड आरक्षीत आहेत.
२. ३९ भुखंडाना विकसित करण्यात आले आहे. त्यापैकी १२ भुखंड अर्धवट विकसित करण्यात आले आहेत. याशिवाय इतर भुखंड विकासाची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागासंबंधी आहे.
३. उर्वरित भुखंडावर अनधिकृत बांधकामे विकसित झालेली आहेत. ज्यावर महानगरपालिकेने कुंपणभिंत बांधलेली नाही.
४. असा कोणताही आरक्षीत भुखंड नाही की ज्यावर महानगरपालिकेने कुंपण घातले आहे व त्यावर बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आलेली नाही. कंपाऊडचे शुल्क घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
५. एकुण ८ भुखंडाची मोजणी झालेली आहे. व त्यातील तीन भुखंडाचे ताब्यात घेण्यासाठीचे प्रकरण उपविभागीय अधिकारी यांचेकडे सादर केलेले आहे. उर्वरित भुखंडाची मोजणीबाबतचे प्रकरण भूमापन विभागाकडे सादर केलेले आहेत.

<u>मा. सचिवः—</u>प्रश्न क्र. ३८२ व ३८३ हे श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचे आहेत. ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३८२:—</u> उल्हासनगर महानगरपालिका (मुख्यालय) इमारतीबाबत विचारलेल्या खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर खुलासेवार, सुचक व समाधानकारक माहिती मिळावी ही विनंती.

**प्र. क्र. १ अ)** महापालिका मुख्यालयाची इमारत कोणत्या वर्षी बनविली आहे?
**ब)** इमारत बांधकामास रितसर परवानगी घेतली आहे का?
**क)** बांधकाम परवानगीसाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तीची पूर्तता केली आहे का? सदरच्या अटी व शर्ती कोणत्या होत्या? माहिती मिळावी.
**ड)** ज्या भुखंडावर महापालिका मुख्यालयाची इमारत बांधली आहे सदरचा भुखंड कोणाच्या मालकीचा होता?
**ई)** महापालिका इमारती बांधतांना प्लान कोणाकडून मंजूर केला जातो? मुख्यालयाचे इमारतीचा प्लान कोणी मंजूर केला त्यांचा नंबर व तारीख दयावी.
**प)** सदर इमारतीचे बांधकामाचे प्राकलनाची अंदाजित रक्कम किती होती? व बांधकाम पूर्ण करण्यास किती खर्च झाला?
**फ)** मुख्यालयाचे इमारतीस पायाभरणी व पुर्णत्चाचा दाखला घेतला आहे काय? क्रमांक व तारीख दयावी.
**ब)** सदर कामाच्या निविदा कोणत्या व किती ठेकेदारांनी भरल्या होत्या त्यांची नावे दयावी.
**भ)** मुख्यालयाचे इमारतीचे बांधकामापूर्वी सदरचा भुखंड कोणत्या कारणासाठी आरक्षीत होता का?
**म)** मुख्यालयाचे इमारतीचे भुखंडाचा शिट नं. , प्लॉट नं., व यु. नं. दयावा.

<u>उत्तर:—अ</u>.३ जून, १९७६ साली पाया बांधण्यात आला.

ब. होय, रितसर परवानगी घेतली आहे. तथापी सदर परवानगीची प्रत कार्यालयाकडे उपलब्ध न झाल्याने सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडुन प्रत मागणी करण्यात आलेली आहे.

क. वरील पत्र प्राप्त झाल्यानंतर माहिती सादर करण्यात येईल.

ड. महाराष्ट्र शासनाच्या नावे नोंद आहे. उल्हासनगर शहरातील सर्व भुखंड सुध्दा महाराष्ट्र शासनाच्या नावे आहे व सदर भुखंडाचे नगरभुमापन क्र. ९११९, ९१२२ आहे.

इ. वरील ब व क प्रमाणे

प. कामाचे अंदाजित किंमत ३५ लाख रू. होती व त्याचा खर्च ३१,५३,५५८. ७० होता.

फ. सदर इमारतीचा पायाभरणी जून १९७६ मध्ये असुन काम १९७९ मध्ये पुर्ण झालेले होते.

म. मंजुर विकास आराखडयानुसार अस्तित्वातील नगरपालिका दर्शविली आहे.

भ. मुख्यालयाच्या इमारतीच्या भुखंडाचा शिट नं. ५०. ५१ प्लाट नं. ६८ आहे. नगर भुमापन क्रमांक ९११९, ९१२२

**<u>प्रश्न क्र. ३८३:—</u>** उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रारुप विकास आराखडयानुसार राखीव भुखंड क्र. ९८ हा मेलेल्या जनावरांच्या दफनभूमीकरीता राखीव होता. तत्कालीन मा. आयुक्त श्री. शूळ साहेबांनी सदर भूखंड वाहतूक केंद्र या करीता आरक्षीत करण्याचा प्रस्ताव महासभेपूढे मांडला होता. सदर प्रस्ताव महासभेने सर्व संमतीने मंजूर करुन महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला होता. याबाबत खालील प्रश्नांची सुचक, समाधानकारक उत्तरे मिळावीत ही विनंती.

प्र. क्र. १) महासभा मंजुरी नंतर महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची मंजूरी मिळाली आहे का?

सदरचा भूखंड सद्यस्थितीत महापालिकेच्या ताब्यात आहे का?

सदर भुखंडावर अतिक्रमण झाले आहे का? भुखंडाची सद्यस्थिती काय आहे?

<u>उत्तर:—</u>सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची मंजुरी मिळालेली नाही.

सदर भुखंड महापालिकेच्या ताब्यात आहे.

सदर भुखंडावर अतिक्रमण झालेले नाही. जागेवर एक देऊळ आहे.

पुर्वीपासुन कुंपणभिंत बांधलेली आहे.

**<u>मा. सचिव:—</u>**प्रश्न क्र. ३८४ हा श्री. सुर्यकांत लिंगे यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. ३८४:—</u>** उल्हासनगर महानगरपालिकेत दरमहा किमान एका महासभेचे आयोजन केले जाते. यावेळी जे सन्माननिय सदस्य महापालिकेत येतात त्यांच्यासाठी सभागृहाशेजारी किती शौचालये उपलब्ध आहेत?

त्याची स्थिती समाधानकारक आहे काय? शौचालयांची ही संख्या पुरेशी आहे?

सदरची शौचालये सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी कोणाची आहे? याबाबत महापालिकेने काही उपाययोजना करण्याचे ठरविले आहे काय?

कृपया याबाबतची सविस्तर माहिती पुढील महिन्याच्या महासभेत लेखी स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी ही विनंती.

<u>उत्तर:—</u>१. पत्रकारकक्ष, बाल्कनी सभागृह कक्षाजवळ दोन सिट्चे पुरूष व एक सीटचे स्त्री शौचालय.

२. सचिव कार्यालया शेजारी दोन सीट्सचे पुरूष व एक सीटचे स्त्री शौचालय

३. उप—आयुक्त (आरोग्य) यांचे कार्यालयासमोर एक सीटचे पुरूष शौचालय.

अशी शौचालयांची स्थिती समाधानकारक आहेत.

शौचालयांची संख्या पुरेशी वाटते.

शौचायांची साफ—सफाई व्यवस्थित राखणेची जबाबदारी आरोग्य विभागाची आहे. सदर विभागाकडुन शौचालय दिवसातून तीन वेळा फिनाईलने स्वच्छ करण्यात येतात. नियमित औषध फवारणी व दुर्गंधी नाशकाची फवारणी करण्यात येते.

सदर शौचालयांची दुरूस्ती, देखभाल सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जाते.

सदर शौचालय सुस्थितीत रहावे याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आलेले आहे.

सभागृहाशेजारी २ शौचालये असुन पुरूषासाठी १ व स्त्रियांसाठी १ शौचालय उपलब्ध आहे.

होय.

होय.

सार्वजनिक बांधकाम विभाग व आरोग्य विभाग संपुर्ण मुख्यालय इमारतीचे नुतनीकरण विचाराधीन आहे. त्यासाठीचे नकाशे व प्रस्ताव करण्याचे काम चालु आहे.

मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे:—मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब माझा वरीलप्रमाणे प्रश्न होता. या प्रश्नाचे उत्तर बिल्कुल चुकीचे दिले आहे. हे उत्तर देण्याऐवजी पत्रकार कक्षाचे दिले आहे, मी सभागृहाशेजारील विचारले होते त्यांनी बाल्कनी सभागृहाचे उत्तर दिले आहे. पत्रकार कक्ष तेथे जे शौचालय उपलब्ध आहे. त्याबद्दल सांगण्यात आले. सचिव कार्यालयाशेजारी जे शौचालय आहे ते आपण पाहिले असेल, सर्व सन्माननिय सदस्य रोज पहात असतील की त्यावर ''अधिका—यांसाठी '' असे लिहीले आहे. मला असे वाटते की ते सन्माननिय नगरसेवकांसाठी नाही. पण एक अतिक्रमण म्हणुन नगरसेवक तेथे जातात. जबरदस्ती जातात. आपल्या महानगरपालिकेत बरेचसे बाहेरचे लोक, निवडून आलेले प्रतिनिधी, खासदार, आमदार सुध्दा येतात. आपल्याकडे अशी व्यवस्था नाही आणि सभागृहात यावर प्रश्न विचारला असता प्रशासनाकडुन अशी उत्तरे मिळतात. ही उत्तरे योग्य नाहीत. दुसरे असे की स्थिती समाधानकारक आहे का? याबद्दल विचारले गेले असता त्यांना माहित नाही, सन्माननिय अधिका—यांनी किमान पाहणी करून तरी उत्तर दयायला हवे होते. यांनी उत्तर दिले आहे की स्थिती समाधानकारक आहे. सर्व व्यवस्थित चालु आहे काही त्रास नाही. परंतु आपण जर पाहिले तर जे उपलब्ध शौचालय आहे त्याचे फ्लश टॅक सुध्दा कास्टिंगचे आहेत. तोडक्या मोडक्या स्थितीत आहेत. त्याचे पाणी गळत आहे. परंतु आपले प्रशासन व अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करून उत्तर देतात की स्थिती समाधानकारक आहे. चुकीची उत्तरे देतात. मी विचारले होते की, सदर शौचालय सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी कोणाची आहे? उपायुक्त आरोग्य यांनी उत्तर दिले की ही जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे. उपाययोजनांबाबत मी विचारले असता त्यांनी पत्र लिहुन सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले आहे असे सांगितले. आणि आताच दुसरे उत्तर मला मिळाले आहे शहर अभियंता यांचेकडुन की आपण लेखी स्वरूपात किंवा सर्व महापालिका इमारतीच्या नुतनीकरणाचे काम विचाराधिन आहे. मी फक्त शौचालयाचे विचारले होते की आमच्या सन्माननिय नगरसेवकाची व्यवस्था काय केली? माझी मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेबांना विनंती आहे आपण त्याचा विचार करावा आणि त्वरीत प्राकलन बनवुन ते काम सुरू करावे जेणेकरून सन्माननिय नगरसेवक जे येतात त्यांना त्रास व्हायला नको. तसेच बाहेरून जे अभ्यांगत येतात त्यासाठी इतर शौचालये देखिल सुशोभित करावेत म्हणजे उल्हासनगरचे नाव, बाहेरून जेव्हा व्यापारी येतात तेव्हा हे पाहुन ते नावे ठेवतात. म्हणुन माझी साहेबांना विनंती आहे की आपण त्वरीत आदेश देवुन त्या कामास सुरूवात करावी.

शहर अभियंता (श्री. एस.व्ही. जाधव): —सन्माननिय सभागृह, सन्माननिय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. तर सभागृहाशेजारी दोन शौचालये आहेत. एक पुरूषांसाठी व एक महिलांसाठी. त्याची सर्वसाधारण स्थिती वाईट नसुन वापरण्या योग्य आहे. फक्त त्यामध्ये काही दुरूस्ती करावी लागणार आहे तर ती आम्ही लवकरच करून घेवु. आणि दुसरे म्हणजे मास्टर ॲन्ड असोशिएटस् यांच्या बरोबर आमची पहाणी झाली आहे त्यांना या इमारतीच्या नुतनीकरणाचे काम देण्याचे नियोजित आहे. त्यावेळेस या सर्व अडचणी दुर केल्या जातील.

मा. सचिव:—प्रश्न क्र. ३८५ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. यावेळी ते सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांत नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३८५:— महालक्ष्मी रेस्टारंट व बार उल्हासनगर—४ यांनी शासकिय भुखंडावर (शाळेसाठी आरक्षीत) केलेल्या बांधकामाबाबत खालील प्रश्नावर येत्या महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेबाबत.

१) सदरच्या बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली आहे का?

२) शासकिय भुखंडारवर (शाळेसाठी आरक्षित) केलेले बांधकाम महापालिकेचे दृष्टीने अधिकृत आहे का अनधिकृत आहे?

३)  अनधिकृत असल्यास आजतागायत नोटीस  बजावली आहे का?  तीचा कालावधी संपृष्टात आला का?
सदर बांधकामावर कारवाई केली का?  केली नसल्यास विलंबाचे कारण काय?  विलंबास जबाबदार अधिकारी कोण? सदरचे बांधकाम अनधिकृत असल्यास निष्कासनाची कारवाई कधीपर्यंत अपेक्षित आहे?

उत्तरः—नाही.
अनधिकृत आहे.
सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्याने कारवाई करता येत नाही.
होय.
मा. न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

मा. सचिवः—प्रश्न उत्तरे संपली असल्याने पुढील विषयास सुरूवात करण्यात येत आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

विषय क्र. २ः— मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/१२/२००४ (त्यात २०/१/२००५ व ३०/३/२००५) दिनांक १८/२/२००५, दिनांक ७/३/२००५, १८/३/२००५ (त्यात दिनांक २३/३/२००५ व २९/३/२००५),दिनांक ३१/३/२००५ व दिनांक ८/४/२००५ चे इतिवृत्त कायम करणे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—मा. महापौर महोदया, ३०.३.२००५ रोजी जी बैठक झाली होती. तिच्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १३ वर काही चुका आहेत. इतिवृत्त म्हणजे जसे होते तसे त्यामध्ये यायला हवे. काही घटना अशा असतात ज्या सभागृहातील सदस्य, अधिकारी व पदाधिकारी विसरत नाहीत. त्या दिवशी श्री. सतरामदास जेसवानी यांनी प्रशासनाविषयी त्यांची जी नाराजी होती ती सभागृहात येवुन जमिनीवर बसुन जाहिर केली होती. त्यावेळी त्यांनी प्रशासनाच्या गुंडागर्दी विरूध्द आतंकवादी असे शब्द वापरले होते. आतंक पसरवत आहेत, गुंडागर्दी करत आहेत असे ते म्हणाले होते. तर तसा उल्लेख येथे इतिवृत्तात केलेला नाही. अशाप्रकारच्या चुका व्हायला नकोत. जी वास्तविकता आहे ती यायला हवी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—त्यादिवशी त्यांचा आवाज बंद होता.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—त्यांचा आवाज जोरात होता. मी सांगितले की काही गोष्टी अशा असतात ज्या पुढे देखिल कोणी विसरणार नाही. तशी ती घटना होती. ते एवढे नाराज होते, त्यांनी जी नाराजी व्यक्त केली होती ती येथे यायला हवी. त्याचे कारण काय होते? त्यादिवशी ते येथे का बसले होते ते देखिल येथे नमुद केलेले नाही. अशा घटना जाणुनबूजुन गाळल्या जातात. आपण असे कसे विसरता.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—त्यांचा आवाज बंद होता. म्हणुन मी त्या दिवशी खुलासा केला होता. त्यांचा गळा खराब होता.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—आवाज बंद केला गेला होता. ही चुक आहे, आपल्या निर्दशनास आणुन दिली.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटीलः—मा. महापौर, या चार पाच महासभांच्या बैठकीचे इतिवृत्त महासभेच्या एक दिवस अगोदर आम्हाला देण्यात आले आहे. तर हे चार पाच बैठकांचे इतिवृत्त फार जास्त आहेत. जर ते तीन चार दिवस अगोदर मिळाले, एक दिवसात वाचुन होवु शकत नाही. तर यापुढे इतिवृत्त जास्त असेल तर ते कमीत कमी तीन ते चार दिवस अगोदर देण्यात यावे ही आयुक्तांना विनंती आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—मा. आयुक्त साहेब, महापौर महोदया, आता आमच्या सहयोगींनी सांगितले की, तीन चार महासभांचे इतिवृत्त एकत्र दिले आहे व आम्ही त्यावर अभ्यास केलेला नाही. यासाठी इतिवृत्त पास करण्याचा प्रस्ताव पुढील महासभेत आणला जावा.

<u>मा. सचिवः—</u>टेप मध्ये श्री. सतरामदास जेसवानी यांच्या वाक्याचा उल्लेख न आल्याने तसे काही लिहिले गेले नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>ते जमिनीवर बसले होते त्याचा तरी उल्लेख व्हायला हवा.

<u>मा. सचिवः—</u>ती त्यांची कृती होती.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>सभागृहात कुणी आले अथवा बाहेर गेले तर त्याचा उल्लेख देखिल इतिवृत्तात येतो. तर मग ते जे समोर जमिनीवर बसले होते त्याचा उल्लेख का नाही?

<u>मा. सचिवः—</u>ते जे जमिनीवर बसले होते त्याचा उल्लेख केला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>प्रशासनाची गुंडागर्दी आहे, आतंक आहे हा उल्लेख देखिल केला जावा. जर ते तसे बोलले नसतील तर त्यांनी तसे सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>एवढा विरोध होतो तर त्याचा उल्लेख येथे व्हायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>त्या दिवशी त्यांचा गळा खराब होता. त्याचा खुलासा मी केला होता. त्यांनी अशा कुठल्याही शब्दाचा उल्लेख केला नव्हता. बाकी श्री. बोडारे यांनी जसे सांगितले की ते जमिनीवर बसले होते तर त्याचा उल्लेख करण्यात यावा. आमच्या सदस्यांकडे एवढे लक्ष ठेवतात यासाठी मी श्री. बोडारे यांचा आभारी आहे. जमिनीवर बसले होते ते ठिक आहे, लोकशाही आहे. कर वाढीच्या विरोधात आम्ही देखिल जमिनीवर बसलो होतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः—</u>आम्ही तुमच्यासाठी बोलत नाही. आम्ही सचिवांना सांगत आहोत की ते इतिवृत्तात यायला हवे. तुमच्या बद्दल नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>इतिवृत्तात काय येईल ते सभागृहच ठरवेल.

<u>मा. सचिवः—</u>यांचे म्हणणे असे आहे की जो विरोध झाला त्याचा उल्लेख व्हायला हवा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>श्री. सतरामदास जेसवानी यांच्या बद्दल आमचे काही म्हणणे नाही. इतिवृत्त प्रशासनाकडुन दिले जाते ते व्यवस्थित दयायला हवे.

<u>मा. सचिवः—</u>ते जे खाली बसले होते त्याचा उल्लेख केला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः—</u>सभागृह नेता मी आपल्या निर्दशनास आणुन देवु इच्छितो की, इतिवृत्तात माझे नाव आले आहे. मी प्रश्न विचारला होता की, ते तुम्हाला गुंडागर्दी करतात असे बोलले आहेत यावर तुमचे काय म्हणणे आहे? खुलासा करावा. पृष्ठ क्र. १७ वर बघितल्यास दिसुन येईल. श्री. सतरामदास जेसवानी जे बोलले होते ते त्यावर आले आहे. सचिव साहेब आपण बघावे.

**मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता, श्रीमती मोना वनवारी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबीः—</u>पृष्ठ क्र. १७ वर श्री. दिलीप गायकवाड यांचे वक्तव्य आहे की आयुक्त साहेबांच्या गुंडागर्दीवर आपले काय विचार आहेत, ते जरा सांगावे. आयुक्त साहेबांनी काय गुंडागर्दी केली आहे ते देखिल सांगावे. तर त्यांचे म्हणणे आहे की त्यापुर्वीचे संभाषण इतिवृत्तात आलेले नाही. ते देखिल यायला हवे.

**मा. सचिव:—**ठिक आहे. ते जे जमिनीवर बसले होते  त्याचा उल्लेख करण्यात येईल. तसेच श्री. दिलीप गायकवाड यांनी सांगितल्याप्रमाणे जे वाक्य राहुन गेले आहे त्याचा उल्लेखही करण्यात येईल.

**काही सदस्य :—**पास. पास.

**मा. महापौर:—** सर्वसाधारण महासभा दिनांक १८/१२/२००४ (त्यात २०/१/२००५ व ३०/३/२००५, दिनांक ३०/३/२००५ च्या इतिवृत्तात सुचविलेल्या सुधारणेसह) दिनांक १८/२/२००५, दिनांक ७/३/२००५, १८/३/२००५ (त्यात दिनांक २३/३/२००५ व २९/३/२००५),दिनांक ३१/३/२००५ व दिनांक ८/४/२००५ चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

**मा. सचिव:—**विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ३:—** श्री संजय युवराज पवार यांच्या महापालिका सेवेत कनिष्ठ अभियंता या पदावरील
नियुक्तीस मान्यता देणे.

**काही सदस्य :—** पास, पास.........

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल:—**मा. महापौर, उपमहापौर, सचिव साहेब, आयुक्त साहेब व सर्व सदस्य आपण जो विषय घेतला आहे. हा विषय सदस्यांनी तर पास केला आहे परंतु आपण निरखुन पाहिल्यास दिसुन येईल की स्थापत्यासाठी २६ पदे रिक्त आहेत त्यापैकी सरळ सेवेने १९, पदोन्नती ७. १९ पैकी १० पदे आरक्षणाने भरलेली आहे आणि १ पद भरायचे आहे. तर माझे असे म्हणणे आहे की ७ पदे जी पदोन्नतीने भरायची आहेत तर आपल्याकडे पदोन्नतीच्या लायकीचा कर्मचारी वर्ग नाही का? आणि ती का भरली नाहीत याचे उत्तर आपण देवु शकाल का? दुसरे असे की आरक्षणांपैकी ४ पदे रिक्त आहेत त्याचे कारण काय? ही ४ पदे रिक्त ठेवण्याचे कारण काय? आणि आतापर्यंत २६ पदांपैकी फक्त १४ पदे ही कार्यरत आहेत. मग एवढया मोठया प्रमाणात या जागा तुम्ही रिकाम्या ठेवल्या आहेत आणि तुम्ही असे म्हणता की प्रशासनावर कामाचा फार मोठा बोजा आहे, जबाबदारी आहे आणि कामासाठी कर्मचारी कमी आहेत. श्री. संजय युवराज पवार हे प्रकल्पग्रस्त उमेदवार आहेत. तर हे कोणत्या प्रकल्पग्रस्ताच्या अंतर्गत येतात. तर माझे असे म्हणणे आहे की प्रकल्पग्रस्त हे आपण उल्हासनगरमधुन घेवु शकत नाही का? आज आपण शहाड स्टेशन जवळ मोठा प्रकल्प उभारणार आहोत तेथील आताचे जे रहिवासी आहेत ते प्रकल्पग्रस्त होवु शकत नाहीत का? तर पहिले प्राधान्य जे उल्हासनगरमध्ये प्रकल्पग्रस्त लोक आहेत त्यांना दयावे अशी माझी विनंती आहे आणि ५ टक्के आधी माझ्यामते उल्हासनगरमधुन भरावेत. आणि नंतर ठाणे जिल्हयातुन भरावेत आणि नंतर महाराष्ट्रातुन भरावेत. तर शहाड स्टेशनला आता जो प्रकल्प राबविणार आहोत त्या प्रकल्पग्रस्तामध्ये त्याची सूची तयार करून कोण लोक बाधीत होणार आहेत. तर त्यांना प्राधान्य देवुन जे पदोन्नतीचे ७ उमेदवार आहेत ते आपल्याकडे आहेत अथवा नाहीत याची सूची तयार करून महासभेसमोर आणावी आणि जर आपल्या महापालिकेत त्या पदाच्या लायक उमेदवार नसतील तर ती पदे तुम्ही बाहेरून भरावीत अशी माझी विंनती आहे. आणि जी २६ पदे आहेत ती आपण भरावी अशी मी विंनती करतो. श्री. संजय युवराज पवार हे चांगले अभियंता आहेत. माझा त्यांच्याशी संबंध आलेला आहे. त्यांनी कामही चांगले केले आहे. परंतु यापुढे ही जी रिक्त पदे आहेत, ४ रिक्त पदे, ६ रिक्त पदे, ७ रिक्त पदे ती तुम्ही भरावीत आणि तुमच्या वरचा कामाचा बोजा जो आहे तो कमी करावा ही मी सूचना देवु इच्छितो.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—**महापालिकेच्या आस्थापनेवर कनिष्ठ अभियंत्यांची २६ पदे मंजुर आहेत. त्यापैकी १४ कार्यरत आहेत. त्यामधील ७ पदे पदोन्नतीची आहेत. ९६ साली महापालिकेचे जे सेवा भरती नियम प्रस्तावित केले होते त्यामध्ये सरळ सेवेसाठी ७५ टक्के प्रमाणे १९ आणि पदोन्नतीसाठी २५ टक्के प्रमाणे ७ पदे प्रस्तावित केली होती. कनिष्ठ अभियंता  या पदासाठी पदोन्नतीची साखळी उपलब्ध नाही यासाठी प्रस्तावित नियमामध्ये दुरूस्ती करायला हवी. त्यानंतरच  ही ७ पदे आपल्याला भरता येतील. दुसरी बाजु अशी आहे की, पाणी पुरवठा विभागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील शाखा अभियंता काम करीत आहेत. कोणत्याही पदावर प्रतिनियुक्तीने काम करायचे असेल तर त्यासाठी महापालिकेत पद रिक्त असायला हवे त्यामुळे ही पदे रिक्त आहेत. आणि याच्यामध्ये अनुशेषाची, अनुसूचित जमातीची पदे रिक्त आहेत. तर ही जी ७ पदे आहेत ती भरण्यासाठी सेवाभरती नियम शिथील करून भरता येतील. दुसरे म्हणजे अनुशेषाची

जी पदे आहेत ती भरण्यासाठी मागच्यावेळी प्रयत्न केला होता. यावेळी सर्व पदांची जाहिरात काढुन ही पदे भरली जातील. प्रकल्पग्रस्ताबाबत आपण जे बोललात तर त्यामध्ये कुठल्याही जिल्हयातील प्रकल्पग्रस्त असला तरी महाराष्ट्रामध्ये कोणताही नियुक्ती प्राधिकारी त्याला नियुक्ती देवु शकतो. यासाठी शासनाची मार्गदर्शक तत्वे आहेत. शक्यतो प्राधान्य देताना त्या जिल्हयासाठी प्राधान्य दिले पाहिजे. पण आपल्याकडे आपण जी यादी बनवतो त्यातुन नियुक्ती देतो. आपण शहाड येथील प्रकल्पग्रस्तांसाठी जे बोललात त्याबाबत शासनाचे जी मार्गदर्शक तत्वे आहेत ती विचारात घेवुन त्यांना सेवेत सामावुन घेता येईल.

काही सदस्य:—पास. पास.

**मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे, श्रीमती कारीरा रेखा हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. महापौर:—सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र. ३:— श्री संजय युवराज पवार यांच्या महापालिका सेवेत कनिष्ठ अभियंता या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गाची एकूण २६ पदे मंजुर आहेत. सेवाभरती नियमाप्रमाणे सरळसेवेने १९ पदे व पदोन्नतीने ०७ पदे भरावयाची आहेत. सरळसेवेने भरावयाच्या १९ पदांपैकी १० पदे आरक्षणाची व ०९ पदे खुल्या प्रवर्गासाठी आहेत. खुल्या प्रवर्गातील ९ पदांपैकी ०८ पदे भरलेली असुन ०१ पद रिक्त आहे. आरक्षणाच्या १० पदांपैकी ०६ पदे भरलेली असुन ०४ पदे रिक्त आहेत. अशाप्रकारे कनिष्ठ अभियंता संवर्गातील २६ पदांपैकी १४ पदे कार्यरत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासनाच्या विविध नागरी सुविधाविषयक योजना राबविल्या जातात त्यासाठी उपलब्ध कर्मचारी वर्ग अपुरा पडत असुन त्याचा परिणाम सार्वजनिक बांधकाम विभागातील कामकाजावर होत आहे. ही बाब विचारात घेवून श्री.संजय युवराज पवार, प्रकल्पग्रस्त उमेदवार हे कनिष्ठ अभियंता या पदाची सेवाभरती नियमावलीतील अर्हता धारण करित असल्याने त्यांना अनुक्रमे का. आ. क्र. उमपा साप्रवि आस्था / मुली /४७०, दि. २७.२.०४ व का.आ. क्र.उमपा/आस्था/टे—१२/४२, दि. २७.८.२००४ अन्वये ६—६ महिन्याच्या कालावधीसाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या मंजुर व रिक्त पदावर नियुक्ती करण्यात आली होती शासनाचे दि. ३ जानेवारी १९९७ च्या परिपत्रकामध्ये प्रकल्पग्रस्त उमेदवारांना वर्ग क व ड संवर्गात परस्पर नियुक्ती देताना एकूण संवर्ग बळाच्या ५ टक्के इतकी पदे भरता येईल असे निर्देश दिलेले आहेत.

सदर शासन परिपत्रकातील तरतुदीच्या अनुषंगाने श्री. संजय युवराज पवार यांनी ६—६ महिन्याच्या म्हणजे एकूण ०१ वर्षाच्या कार्यालयीन सेवेत समाधानकारक काम केले असल्याने शहर अभियंता यांनी केलेल्या शिफारसी नुसार व कामाची निकड हा निकष लक्षात घेवून त्यांना रू. ४५००—१२५—७००० या वेतनश्रेणीत (अधिक नियमानुसार मिळणारे इतर भत्ते) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या मंजूर व रिक्त पदावर नियमित नियुक्तीसाठी २ वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येईल. तथापि परिवीक्षाधीन कालावधी प्रथम नियुक्तीपासुन गणण्यात येईल.

सदर प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) मधील तरतुदीनुसार मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र:— २ दिनांक:—२०/४/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री संजय युवराज पवार यांच्या महापालिका सेवेत कनिष्ठ अभियंता या पदावरील नियुक्तीस २ वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीस अधिन राहुन मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:—</u>विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

<u>विषय क्र. ४:—</u> श्री व्ही.डी.गोसावी, कनिष्ठ अभियंता यांचे विरुध्द् लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली अभियोग चालविणेकामी आयुक्तांतर्फे दिलेल्या मंजुरीस कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—</u>महापौर महोदया, आयुक्त महोदय, उपमहापौर महोदय, आजच्या या महासभेत विशेष करून तीन मुद्दे असे आहेत, एक नियुक्तीचा मुद्दा आहे श्री. पवार यांचा, एक श्री. गोसावी यांचा मुद्दा आहे आणि त्याचप्रकारे क्र. ६ चा मुद्दा कनिष्ठ अभियंता यांच्याशी संबंधित आहे. यामध्ये महासभेची मंजुरी घेण्यासाठी हे विषय येथे ठेवलेले आहेत. परंतु यापैकी जो विषय क्र. ४ आहे श्री. गोसावी यांचा या मुद्दयावर मी बोलु इच्छितो की, हा महासभेचा अधिकार आहे. महासभेकडुन परवानगी घेवुन नंतर मंजुरी देणे या मुद्दयावर प्रशासनाने आधीच निर्णय घेतलेला आहे. तर मग महासभेला काय रबर स्टॅम्प समजले जात आहे का? महासभेत हा मुद्दा पुर्वी आणला होता का? गोषवा—यात लिहिले आहे की एक वर्षापासुन हा मुद्दा मंजुरीसाठी ठेवलेला आहे. महासभेवर एक गंभीर आरोप लावण्यात आला आहे. हा मुद्दा कधी ठेवला होता? अशाप्रकारे आपण महासभेचे अधिकार वापरून तुमच्या आयुक्त कार्यालयातुन मंजुरी देता आणि नंतर मान्यतेसाठी विषय येथे आणता. येथे निवडून आलेले प्रतिनिधी हे फक्त रबरी शिक्का आहेत का? या गोष्टीचा येथे खुलासा व्हायला हवा. आपण २४.३.२००५ ला महासभेच्या मंजुरीशिवाय मान्यता दिलेली आहे तर मग आज या महासभेत परवानगी घेण्याची आपणांस काय आवश्यकता आहे? प्रशासनाच्या नजरेत महासभेचे काही महत्व आहे अथवा नाही? येथे फक्त दाखवले जाते की तुम्हाला विचारून काम होत आहे. शासन व प्रशासनात ताळमेळ साधण्यासाठी प्रयत्न का केला जात नाही? जर आयुक्तांनी आधीच त्यांचे अधिकार वापरले आहेत तर महासभेची रबरी शिक्क्याप्रमाणे परवानगी मागणे उचित नाही. आपण परवानगी दिली आहे ठिक आहे परंतु महासभेची नंतर मंजुरी घेणे हा महासभेचा अपमान आहे. या विषयासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती तीन नगरसेवकांची श्री. गणपत एडके, श्री. राजेश वदारिया व श्री. अंकुश म्हस्के. त्यांच्या अहवालाची देखिल प्रतिक्षा केली गेली नाही. त्यांना विचारले देखिल नाही व आपण परवानगी देवुन टाकली. तर मग समिती स्थापन करण्याची आवश्यकता काय होती. या महासभेत हा विषय का ठेवला. आपण जेव्हा परवानगी दिली आहे तेव्हा येथे विषय आणण्याची गरज काय आहे? प्रशासन आपण चालवत आहात तर आपणांस आमची आवश्यकता काय आहे? अशाप्रकारे आपण महासभेच्या अधिकाराचे उल्लंघन केले आहे. जर आपणांस वाटत असेल की आपणांस याचे अधिकार आहेत तर येथे

विषय आणण्याची काही गरज नाही. माझे सर्व सदस्यांना निवेदन आहे की, आयुक्तांनी त्यांच्या मताप्रमाणे जो निर्णय घेतला आहे तो ठिक आहे. परंतु यासाठी महासभेला विचारण्यात आले नाही तसेच समितीचा अहवालही विचारात घेतला नाही. आताच आम्हाला समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. पुर्ण तर वाचला नाही परंतु जेवढा वाचला आहे त्यामध्ये समितीने बरेचसे प्रश्न उपस्थित केले आहेत. याबद्दल काहीही विचार करण्यात आलेला नाही. श्री. गोसावी हे माझे मित्रही नाहीत व शत्रुही नाहीत. मी सांगु इच्छितो की महापालिकेचे प्रशासन कशाप्रकारे काम करीत आहेत. व्यवस्था नावाची कोणती गोष्ट आहे अथवा नाही? लोकप्रतिनिधींची इज्जत आहे अथवा नाही? महासभेचा काही मान आहे अथवा नाही? जर आपण तो मान लक्षात घेत नसाल तर कृपा करून महासभेला रबरी शिक्का समजण्याची चुक करू नका. जर आपण ती चुक केली असेल तर कृपा करून आमच्याकडुन मंजुरी घेण्याचा प्रयत्न करू नका. आपण जे केले आहे ते आपल्या हिशोबाने ठिक असेल. परंतु हे उचित नाही की आपण आधी काम कराल व नंतर आमच्याकडुन मंजुरीची अपेक्षा कराल. यासाठी मा. महापौर महोदया जर लोकप्रतिनिधींची काही इज्जत असेल तर प्रशासनाला यासाठी आधी आपण निर्देश दयावेत की असे मुद्दे जर महासभेत आणणे आवश्यक आहेत, नियुक्तीचे आणणे आवश्यक आहे अथवा दंड करण्याचे आवश्यक आहे, केस दाखल करण्यासाठी आवश्यक आहेत तर अशी प्रकरणे आधी महासभेत आणायला हवीत. यामध्ये लिहिले आहे की, एक वर्षापासुन हा मुद्दा प्रलंबित आहे. हा मुद्दा महासभेत कधी आणला होता याबद्दल सांगायला हवे. अशाप्रकारे महासभेवर आरोप लावता येणार नाही. येथे असे म्हंटले आहे की जर आपण मंजुरी दिली नाही तर याबद्दल आपल्यावर शिंतोडे उडविले जातील. आमच्यावर शिंतोडे का उडतील. श्री. गोसावी हे देखिल प्रशासनाचे अंग आहे. आपणही प्रशासनाचे अंग आहात. प्रशासनाने त्यांचे बघावे आमच्यावर शिंतोडे उडवू नयेत. आपण निर्णय घेता, आपल्या कर्मचा–यांसाठी घेता आणि शिंतोडे आमच्यावर उडतात हे बिल्कुल ठिक नाही, कदापि ठिक नाही. महासभेला माझा अनुरोध आहे की प्रशासनाला संकेत देण्यासाठी, आपण आधी काम करून नंतर रबर स्टॅम्प प्रमाणे आमची मंजुरी घ्याल अशाप्रकारे काम होणार नाही म्हणुन महासभेने या गोष्टीचा विरोध करण्यासाठी या विषयावर कोणताही निर्णय घेण्यात येवु नये. जे आयुक्तांनी केले ते त्यांच्या मर्जीप्रमाणे केले ते तसेच राहु दयावे. जेणेकरून प्रशासनावर दबाव राहील. यापुढे अशा कोणत्याही प्रकरणावर निर्णय घेण्यापुर्वी विषय महासभेपुढे यायला हवा. जेणेकरून प्रतिनिधी येथे चर्चा करून त्यानंतर प्रस्ताव पारीत करतील. हीच लोकशाहीची मर्यादा आहे, काम करण्याची पध्दत आहे व हा महासभेचा गौरव आहे. या गौरवाची रक्षा व्हायला हवी.जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर, श्री. पंजाबी नारायण हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल</u>:–मा. महापौर महोदया, सचिव साहेब या विषयाचा जो गोषवारा दिला आहे, प्रशासनाने जो गोषवारा दिला आहे त्यामध्ये लिहिले आहे हरेश जयसिंग साधवानी व याच गोषवा–यात लिहिले आहे राहणार उल्हासनगर–३. पुन्हा याच गोषवा–यात नाव महेश जयसिंग साधवानी, रा. उल्हासनगर –३ असे दिले आहे. एकाच कागदावर या दोन विसंगती दिसत आहेत. तर प्रशासन अशाप्रकारे कागद तयार करते का? दुसरे माझे म्हणणे आहे, श्री. दिलीप लालवानी यांनी देखिल सांगितले आहे की, यावरून महासभेचे धोरण वेळकाढुपणाचे व अप्रत्यक्षपणे मदत करण्याचे दिसुन येते. श्री. विजय गोसावी व श्री. हरेश अथवा महेश साधवानी हे आमचे कोणी लागत नाही. परंतु आपण जसे म्हंटले आहे की फेब्रुवारी महिन्यात महासभेमध्ये प्रश्न आला होता. त्यानंतर एप्रिल महिन्यात समिती नियुक्त केली. महासभेत त्यानंतर हा प्रश्न आलेलाच नाही. तर मग आम्हाला दोष देण्याचा अधिकार आपणास कोणी दिला. आपण असे म्हणालात की महासभेमध्ये वेळ काढुपणा होत आहे. महासभेसमोर आपण प्रस्ताव आणलेलाच नाही तर वेळकाढुपणाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सचिव साहेब, आयुक्त साहेबांनी यामध्ये शेवटी लिहिले आहे की लोकसेवक यांना नेमण्याचे व काढुन टाकण्याचे अधिकार मला आहेत. म्हणुन मी रामनाथ सोनवणे आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका वरील गुन्हयाच्या संदर्भात श्री. विजय गोसावी कनिष्ठ अभियंता उल्हासनगर महानगरपालिका अतिक्रमण विभाग यांच्यावर कारवाई केली आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी जो एक वर्षाचा कालावधी गेला आहे. आपल्याकडे अधिकार असताना एवढा वेळ जाण्यास काही कारण नव्हते. आपण कारवाई करू शकला असतात. समिती स्थापन केल्यानंतर महासभेसमोर आपण प्रस्ताव आणलेलाच नव्हता. आपण यामध्ये महासभेवर स्पष्ट आरोप लावला आहे, मला असे वाटते हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी</u>:–हा जो विषय आहे, हा विषय लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाशी संबधित आहे. आपण निवडुन आलेले प्रतिनिधी अथवा राजकीय व्यक्ती नेहमी भ्रष्टाचारा विरूध्द बोलतो परंतु जेव्हा

आपली परिक्षा घेण्याची वेळ येते की आपण  भ्रष्टाचारा सोबत आहोत अथवा नाही, जेव्हा असा विषय येतो की एखादया कर्मचा–याविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाखाली मंजुरी दयावी अथवा नाही त्यावेळी आपण खरोखरच त्याच्या विरुध्द् आहोत अथवा नाही हे दाखवु शकतो. आम्ही नेहमी कोणीही व्यक्ती असला, कर्मचारी कोणत्याही जातीचा असला अथवा पक्षाचा असला आमच्या भाजपा व शिवसेना पक्षाच्या नगरसेवकांनी एकच भुमिका घेतली आहे की, लाचलुचपत कायदयानुसार ज्या व्यक्तीविरूध्द कारवाई करण्याची मागणी होईल त्यावर मंजुरी देण्यात येईल. त्याच्या विरूध्द खटल्यासाठी मान्यता देण्यात येईल. ज्याप्रमाणे इंग्रजीत एक म्हण आहे की '' लेट द लॉ टेक इटस् ओन कोर्स'' याप्रमाणेच व्हायला हवे.  मग तो गोसावी असो अथवा इतर कोणी कर्मचारी असो.

**मा. सदस्य श्री. रामरख्यानी मोहनदास, श्री. जयसिंघानी अनिल हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–**मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त व सचिव साहेब आधी ही कागदे कधी दिली गेली ते सांगावे. तसेच हे काय आहे याची देखिल माहिती दयावी. हे सर्व मराठीत लिहिले आहे. हे वाचायला किती वेळ हवा ते देखिल सांगावे. कृपया हे काय आहे हे आम्हाला आधी समजवुन दयावे. निर्णय तर आम्ही नंतर घेवु. आधी जरा समजवुन तर सांगा. हे कधी दिले? याचा आधी खुलासा करावा त्यानंतरच आम्ही यावर निर्णय घेवु शकु. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**सचिव साहेब, हे जे पत्रक वाटले आहे, तीन सदस्यीय समितीचे त्यावर वरील बाजुस गोपनिय असे लिहीले आहे तरी देखिल ते उघडपणे वाटले जात आहे. याचा अर्थ हे ओपन सिक्रेट आहे. मा. महापौर महोदया,..........

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–**प्रशासनाने या अहवालाची दखल घेतली नाही. न विचारता स्वत:च निर्णय घेतला यासाठी आम्ही हा गोपनिय अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला आहे. जेणेकरून आमचे विरोधी पक्षातील सदस्य व सत्तापक्षातील सदस्य यांना वस्तुस्थिती कळुन येईल.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:–**मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, श्री. गोसावी यांचे प्रकरण खटला दाखल करण्यासाठी महासभेची मंजुरी मिळणेकामी मागील वर्षी फेब्रुवारी २००४ मध्ये महासभेत सादर केले होते. नंतर एप्रिल २००४ मध्ये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदरच्या समितीला एक महिन्यात अहवाल देण्यासाठी आदेश देण्यात आले होते. परंतु एक वर्ष झाले कोणताही अहवाल आला नाही, महासभेकडुन मंजुरी मिळाली नाही. ए.सी.बी. कडुन परवानगीसाठी महापालिकेला वारंवार विचारणा होत होती. याबाबत आम्ही अभ्यास केला असता आढळुन आले की सर्वोच्च न्यायालयाचे अशा प्रकरणात निर्देश आहेत की, प्रशासनाला योग्य वाटले तर प्रशासन परवानगी देवुन नंतर कार्योत्तर मंजुरीसाठी अशी प्रकरणे महासभेसमोर सादर करू शकते. हीच कारवाई या प्रकरणात केली आहे. काहीही चुकीचे केलेले नाही. प्रशासनाने महासभेच्या अधिकाराचे काहीही उल्लंघन केलेले नाही, जी परवानगी दिली आहे ती स्वत:च्या अधिकारात दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे आम्ही महासभेसमोर कार्योत्तर मंजुरीसाठी सदरचे प्रकरण आणले आहे. येथे जो निर्णय घ्यायचा आहे तो महासभेला घ्यायचा आहे. प्रशासनाने स्वत:चा निर्णय घेतला आहे.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–**मा. महापौर महोदया, जसे आताच श्री. लोणारे यांनी येथे सांगितले की महासभेत बारा महिन्यापुर्वी सदरचा विषय ठेवला होता त्यांनतर एक समिती स्थापन केली होती. हा निर्णय महासभेचा होता. समिती स्थापन झाल्यांनतर तीन महिन्यापर्यंत प्रशासनाने सदरच्या समीतीला काही माहिती उपलब्ध करून दिली का? त्यांना बोलावुन तुमच्या समितीने काय केले आहे असे विचारले का? त्यानंतर तुम्ही सदरचा प्रस्ताव महासभेत का ठेवला नाही. दर १५ दिवसांनी, प्रत्येक महिन्यात महासभा होत आहे. तुम्ही कधी महापौरांशी या विषयावर बोललात का? तुम्ही महासभेचे अधिकार स्वत:च्या मर्जीप्रमाणे का वापरत आहात? सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आहे हे ठिक आहे परंतु आम्ही देखिल महासभेत कधीही भ्रष्टाचाराला पाठिंबा दिलेला नाही. आमचा हा मुद्दा आहे की महासभेचे अधिकार महासभेचेच राहायला हवे. लोकप्रतिनिधींचे अधिकार प्रशासन स्वत:च्या हातात का घेत आहेत? महासभेच्या बैठका १२ महिन्यात झाल्या नाहीत का? तुम्ही महापौरांशी या विषयावर बोललात का? तुम्ही आमच्या समिती सदस्यांशी बोललात का? आपण महासभेला रबरी शिक्का समजला आहात काय? महासभेत कोणताही प्रश्न विचारल्यावर तुम्ही फिरवुन

उत्तर देता. प्रशासन काही तयारी करत नाही. लोकप्रतिनीधीची येथे काय इज्जत आहे हे कोण स्पष्ट करेल. आम्ही भ्रष्टाचाराच्या विरोधात आहोत. आम्ही कोणाला वाचवु इच्छित नाही. आम्ही नेहमी भ्रष्टाचार करणा–यांविरूध्द आवाज उठविला आहे. परंतु आम्ही स्वच्छ व पारदर्शी शासन व प्रशासन देण्यासाठी कटीबध्द् आहोत. परंतु सिध्दांन्त, संविधान, कायदा नावाची वस्तु असते. जर नियम व कायदयाचे आपण पालन केले नाही तर प्रशासनाचे काम काय आहे. आमचे जे अधिकार आहेत त्याचे उल्लंघन होताना आम्ही पाहु का? महापौर महोदया माझे आपणांस निवेदन आहे की, आयुक्त महोदयांनी या बाबत आपला निर्णय घेतला आहे व येथे महासभेचा उपयोग रबरी शिक्का म्हणुन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याच्या विरोधात आम्ही येथे तटस्थ राहणे व आमच्या तर्फे कोणतीही मंजुरी न देणे कारण आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे म्हणुन आम्ही सांकेतिक भाषेत प्रशासनाला संदेश देवु इच्छितो की लोकप्रतिनिधी त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन सहन करणार नाहीत. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. बेहरानी मोहन हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>मा. महापौर महोदया, मराठीमध्ये एक म्हण आहे की, ''खोटे बोला परंतु रेटून बोला'' श्री. दिलीप लालवानी यांना असे वाटते की जे खोटे आहे ते ओरडुन बोलले तर खरे वाटेल. कारण ते जेव्हा पण बोलतात तेव्हा माईकची आवश्यकता नसते असे वाटते माईक उडुन जाईल. परंतु जसे आमचे श्री. दिलीप गायकवाड बोलतात की कानपुर लाईन बंद आहे. तर येथे सर्वांची कानपुर लाईन मोकळी आहे. जसे श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की आपण जर महापालिकेतुन भ्रष्टाचार मिटवू इच्छित असु तर प्रशासनाच्या नजरेत एखादया व्यक्तीने आणुन दिले की महापालिकेचा कर्मचारी भ्रष्ट आहे, त्याने आमच्याकडुन लाच मागितली आहे व प्रशासनाने त्याचे ऐकुन कारवाई केली, जेथे धुर आहे तेथे आगही नक्कीच असेल. आपण कितीवेळा गोसावीला वाचविणार. गोसावी काही माझा शत्रु नाही जसे श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले. परंतु यापुर्वी कर्मचा–यांचे अशाप्रकारचे जेवढे पण प्रस्ताव आले त्यांना आपण मंजुरी दिली आहे. अनिल खतुरानी आहे अथवा इतर आहेत. प्रशासनाने आपल्या समोर जे जे प्रस्ताव ठेवले होते त्यावर कृती करण्याचे काम प्रशासनाचे होते. जर आपणांस कारभारात पारदर्शकता हवी असेल तर यासाठी असे जे प्रस्ताव आहेत त्यांना मंजुर करणे आपले काम होते. पुढील कारवाई कायदयाने व न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे होईल. परंतु जेव्हा २००४ मध्ये हा प्रस्ताव आपल्या समोर आला होता तेव्हा आपण पळवाट काढुन त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. श्री. गोसावी यांना या महासभेने एवढे महत्व का दिले हे फक्त देवाला व श्री. दिलीप लालवानी यांनाच ठाऊक असेल. कारण काय आहे? श्री. गोसावी यांना एवढे महत्व दिले जसे काही सामान्य जनतेचा महत्वाचा प्रश्न असतो जसे पाण्याचा प्रश्न आहे तशी श्री. गोसावी यांची समस्या आहे. यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. त्याची चौकशी एक वर्ष केली. माझ्या माहितीप्रमाणे १९/४/२००५ला त्यांनी त्यांचा अहवाल दिला आहे. याप्रकारे भ्रष्टाचाराचा आरोप असणा–या कर्मचारी अथवा अधिका–यांना आपण वाचविले तर या महापालिकेचे भगवानच भले करेल. दुसरी गोष्ट म्हणजे या महासभेच्या अधिकाराचा प्रश्न येथे आला. या गोसावीसाठी तुम्ही एवढा गोंधळ घालत आहात अथवा बोलत आहात तेवढाच गोंधळ ज्यावेळी आयुक्त साहेबांनी टॅकरचा ठराव शासनाकडुन रद्द करून आणला, करवाढीचा प्रस्ताव जो या शहरातील नागरिकांवर लादला, जकातीचा प्रस्ताव, जे प्रस्ताव शासनाकडुन विखंडीत करून महासभेवर चपराक लगावली त्यावेळी तुम्ही काही बोलला नाही. परंतु गोसावीसाठी एवढे बोलत आहात जसे काही यामुळे महापालिकेचे फार मोठे नुकसान होणार आहे. माझ्या मताप्रमाणे आपणांस पारदर्शकता हवी असेल, उल्हासनगरसाठी आपण भ्रष्टाचार मुक्त प्रशासन देवु इच्छित असाल तर अशा कर्मचा–यांचे प्रश्न कायदयावर, प्रशासनावर सोडणे आपल्या भलाईचे होईल. नगरपालिकेच्या वेळेस जे झाले आहे त्याची पुनरावृत्ती महापालिकेत व्हायला नको. प्रशासनातर्फे जो प्रस्ताव आला आहे त्याला शिवसेना–भाजपाच्या वतीने मान्यता देत आहोत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–</u>मी हरकतीच्या मुद्दयाद्वारे बोलु इच्छितो. मी श्री. धनंजय बोडारे यांना आधी पुर्ण बोलु दिले कारण ते बोलले असते की मी मध्ये बोलतो. पुन्हा उठावे लागले असते. माझे शरीर मोठे आहे. सुमारे १५० किलो एवढे वजन आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u>१७५ किलो असेल.

**मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया व डॉ. नीना नाथानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—कदाचित श्री. लाल पंजाबी यांना जास्त माहित असेल. सर्वात प्रथम मी सांगु इच्छितो की, समिती स्थापन करण्याचा निर्णय हा संपुर्ण महासभेचा होता, कोणा एका व्यक्तीचा अथवा एका नगरसेवकाचा नव्हता. आयुक्त महोदय आपण याच्याशी सहमत आहात का?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारीः—सहमत आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—दुसरे म्हणजे तुम्ही या समितीचा अहवाल वाचला का? निर्णय घेण्यापुर्वी तुम्ही समिती सदस्यांशी विचार विनिमय केला का एवढे सांगा. तुम्ही विचारले नाही.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारीः—मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांना जे काही बोलायचे आहे ते मोकळेपणाने बोलावे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानीः—धन्यवाद. तर आमचे तीनही समिती सदस्य येथे उपस्थित आहेत. त्यांचा कोणत्याही प्रकारचा सल्ला घेण्यात आला नाही, समितीचा अहवाल मागविला नाही. त्यांना काहीही विचारले नाही. यासाठीच ही गोपनिय कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर आली आहेत. राहिला प्रश्न पाण्याच्या टॅकरचा तर श्री. बोडारे आम्ही याचा पुरेपुर विरोध केला होता. कर वाढीच्या विरोधात देखिल आम्ही पुरेपुर विरोध केला होता. तसेच या शहराचे जे काही संघर्ष अथवा समस्या असतील त्यासाठी आम्ही आपल्यापेक्षा जास्त स्वत:ला जबाबदार मानतो. कारण या शहराने आम्हाला सत्ता दिली आहे, बहुमत दिले आहे. त्यामुळे आपल्या पेक्षा आमची जबाबदारी जास्त आहे हे आम्ही मानतो. आम्ही प्रत्येक वेळी आमची जबाबदारी पुर्ण करतो. यामुळेच शहरातील जनता आमच्या पक्षावर विश्वास ठेवते. यासाठी हे सांगण्याची आवश्यकता नाही की पाण्याच्या टॅकरसाठी आम्ही बोललो नाही, करवाढीसाठी आम्ही बोललो नाही, खरे सांगायचे म्हणजे आम्ही आपल्या पेक्षा जास्त लढा दिला आहे.तसेच ज्या मुद्दयावर तुम्ही आमची साथ दिली आहे त्याबद्दल आम्ही आपणांस धन्यवाद देखिल दिले आहेत. भविष्यात देखिल आमच्या सोबत राहिल्यास आम्ही आपणांस धन्यवाद देवु. राहिला प्रश्न श्री. गोसावी यांचा तर मी येथे श्री. गोसावी यांचा मुद्दा मोठा मानत नसुन मी येथे नियम व कायदयाबद्दल बोलत आहे. महासभेच्या अधिकारांच्या उल्लंघनाबाबत बोलत आहे. तो मुद्दा श्री. गोसावी यांच्या मुद्दयाशी संलग्न आहे. श्री. गोसावी यांच्या प्रकरणात मला काही रस नाही. जेव्हा पासुन मी या महापालिकेत येतो तेव्हा पासुन श्री. गोसावी यांच्याशी दोन तीन वेळा देखिल माझे बोलणे मुश्किलीने झाले असेल. माझा श्री. गोसावी यांच्याशी काहीही व्यक्तिगत संबंध नाही.श्री. गोसावी देखिल महापालिका प्रशासनाचे एक अंग आहे व आयुक्त देखिल महापालिका प्रशासनाचे अंग आहेत. आमचे म्हणणे सिध्दांत, नियम व कायदयाशी संबंधित आहे. येथे सचिव महोदय उपस्थित आहेत. मी जे बोललो ते चुकीचे अथवा बरोबर आहे हे त्यांनी सांगावे. आयुक्त महोदय आपण स्पष्टीकरण दयावे. श्री. बोडारे साहेब मी पुन्हा एकदा आपणांस निवेदन करतो की, या शहरातील कोणत्याही समस्येसाठी आम्ही सदैव लढत असतो. आपण ज्या मुद्दयांवर आमची साथ दिली त्याबद्दल आम्ही आपणांस धन्यवाद देतो. आम्ही नेहमी तुमची साथ घेण्याचा प्रयत्न केला आहे. माझा मुद्दा श्री. गोसावी यांच्याशी संबंधित नाही. माझा मुद्दा भ्रष्टाचाराविरूध्द लढण्याचा आहे परंतु हे महासभेच्या अधिकारांचे उल्लंघन आहे. माझे लक्ष तेच आहे. माझे हेच म्हणणे मी प्रशासनापर्यंत पोहचवु इच्छितो. या गोष्टीचे आपण समर्थन करावे, याचा विरोध करू नये. भविष्यात महासभेला रबरी शिक्का समजण्यात येवु नये. आज आपण येथे आहोत भविष्यात येथे नसु परंतु कमीत कमी जनतेने ज्यांना निवडुन पाठवले आहे त्यांच्या हातात अधिकार राहावेत, उल्लंघन होवु नये असे आम्हाला वाटते. महापौर महोदया, माझे आपणांस निवेदन आहे की, आयुक्त साहेबांनी या प्रकरणात त्यांचा निर्णय घेतला आहे. महासभेला फक्त रबरी स्टॅम्प म्हणुन वापरले जात आहे. असे करणे आवश्यक नाही. आपणांस हवे असेल तर आपण यावर आमच्या नगरसेवकांचे मत देखिल विचारात घेवु शकता.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकरः—मा. महापौर महोदया,.........

मा. सदस्य श्री. राजेश वदारियाः—मा. महापौरजी, २८/४/२००४ला जो ठराव क्र. २ पास केला गेला होता. जी समिती स्थापन केली होती त्या समितीचा मी एक सदस्य आहे. त्यानात्याने मी जो अहवाल संपुर्ण सभागृहाला दिला आहे त्यातील काही गोष्टींचा मी आपणांस खुलासा करू इच्छितो की ते काय आहे. कुणावर आरोप लागल्याने हे सिध्द होत नाही की तो गुन्हेगार आहे. जोपर्यंत गुन्हा सिध्द होत नाही तोपर्यंत तो

निर्दोष असतो. जर कुणावर आरोप लावले गेले व आपण असे मानले की ती व्यक्ती गुन्हेगार आहे तर त्या व्यक्तीला न्याय मिळणार नाही. याच गोष्टी लक्षात घेवुन महासभेमध्ये या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. आम्ही चौकशी मध्ये पाहिले की, श्री. महेश साधवानी यांनी श्री. गोसावी यांच्यावर आरोप लावला होता की त्यांनी त्यांच्याकडुन दहा हजार रूपये घेतले होते. दि.५/९/२००३ला रूपये १० हजार घेतले होते व ११/९/२००३ ला रू. ५ हजार घेण्यासाठी गोसावी त्यांच्याकडे गेले होते. परंतु पोलीसांनी ते रूपये १० हजार जमा केलेले नाहीत. दुसरे म्हणजे या प्रकरणाचे पोलीसांनी कोणत्याही प्रकारे ध्वनीमुद्रण केले नव्हते. जेणेकरून भक्कम पुरावा मिळाला असता. दुसरे म्हणजे श्री. कोळेकर साहेब यांचे उत्तर आहे त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, यांना बांधकाम परवानगी घेण्याची आवश्यकता नव्हती. जर छोटी दुरूस्ती असेल तर. असे असताना श्री. गोसावी यांना तो पैसे का देईल? मी जे काम करीत आहे ते अधिकृत असुन अनधिकृत नाही तर अधिकृत बांधकामाचे कोणी पैसे कशाला देईल? दुसरे म्हणजे यामध्ये त्यांचे संभाषण दर्शविण्यात आले आहे. त्यामध्ये श्री. गोधु क्रिशनानी यांचे नाव आले आहे की श्री. गोधु क्रिशनानी यांचे काम चालु आहे. श्री. गोधु क्रिशनानी यांनी पोलीसांना जबाब दिला आहे की माझा श्री. गोसावी यांच्याशी काही एक संबंध नाही. त्यानंतर मालमत्तेबाबत श्री. महेश साधवानी यांचे म्हणणे होते की, ती मालमत्ता माझ्या आईची असुन मी तेथे ४० वर्षापासुन धंदा करीत आहे. ज्यावेळी हे प्रकरण झाले त्यावेळी त्यांचे वय ३७ वर्षे होते. त्यांचा जन्म होण्यापुर्वी ते ३ वर्ष आधी पासुन तेथे धंदा करीत होते. व ज्या मालमत्तेचे ते दुरूस्ती करत होते त्याबद्दल सर्वांना माहित आहे की, ती इमारत तळमजला अधिक दोन मजले स्वरूपाची आहे. पहिल्या मजल्यावर बॅक ऑफ इंडीया आहे आणि दुस–या माळयावर आधी टेलिफोन विभागाचे ऑफीस होते. जर दोन माळयाचे बांधकाम होते तर त्यावर पत्रे टाकण्याची आवश्यकता काय होती. यावरून हे स्पष्ट होते की त्यांनी केलेल्या आरोपात काही तथ्य नाही. आमचा जो अहवाल आहे तो आपण वाचा त्यानंतर आपणांस त्यामध्ये तथ्य आढळुन येईल. प्रशासनाने मंजुरीसाठी मागणी केली होती परंतु आम्ही आमच्या लक्षपुर्वक तपासणीद्वारे परवानगी नाकारू देखिल शकतो. तर माझी महासभेला विनंती आहे की आमचा अहवाल काळजीपुर्वक वाचावा, जर आमच्या अहवालाशी सहमत असाल तर प्रशासनाचा प्रस्ताव नाकारावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौर महोदया, मा. सचिव साहेब अशा प्रकारचे विषय यापुर्वीही ब–याचवेळा महासभेत आलेले आहेत. ज्यामध्ये कारवाईसाठी मंजुरी मागीतली जाते व आयुक्तांकडुन आधीच मान्यतेचे पत्र दिले जाते व महासभा त्याला नंतर मंजुरी देते. काही वेळेस अधिकारी देखिल महापालिकेत नव्याने येतात त्यांचे विषय देखिल सहा ते नऊ महिन्यानंतर महासभेत मान्यतेसाठी येतात आणि आम्ही अशा विषयांवर जास्त चर्चा करत नाही. हा एक छोटासा विषय आहे ज्यामध्ये अभियोग चालविण्यासाठी आमची परवानगी मागितली आहे. आपण येथे कोणालाही शिक्षा देत नसुन फक्त मान्यता देत आहोत. पुढील कारवाई कायदयाप्रमाणे होईल. जर आपण आज येथे हा विषय पारीत केला नाही तरी आयुक्तांतर्फे आधीच परवानगी देण्यात आली आहे. एवढया छोटया विषयाला एवढे वाढविणे योग्य होणार नाही. श्री. राजेश वदारिया अशाप्रकारे खुलासा करीत आहेत की त्यांना येथे नाही तर लाचलुचपत प्रतिबंधक विभागात असायला हवे होते. आपणांस हे काही बघायचे नाही की, त्यांनी दहा हजार रूपये घेतले की श्री. गोधु क्रिशनानी यांचे नाव घेतले. त्यांनी जी लाच घेतली आहे त्याबद्दल जी कारवाई करायची आहे ती पोलीस विभागाचे अधिकारी करतील. सत्य परिस्थिती जी असेल ती समोर येईल. महासभेचे काम अभियोग चालविण्यासाठी परवानगी देणे हे आहे जी आयुक्तांनी आधीच दिली आहे. आपण येथे जर हा विषय मंजुर नाही केला तर आयुक्तांवर खटला दाखल होणार आहे का? सचिव साहेब आपण सांगावे. हे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत की अशा प्रकरणात आयुक्तांना योग्य वाटले तर त्यांनी आधी परवानगी दयावी व नंतर मान्यतेसाठी विषय महासभेत आणावा. ही केवळ औपचारीकता आहे. तरी देखिल येथे पराचा कावळा केला जात आहे. येथे हा गोपनीय अहवाल देण्याची देखिल आवश्यकता नव्हती. मी सचिव साहेबांना विनंती करेन की त्यांनी खुलासा करावा. जर आयुक्तांनी परवानगी दिली आहे, महासभा यावर काय निर्णय घेईल? जर सत्तापक्ष तटस्थ राहीला तर आयुक्तांवर खटला दाखल होईल का? त्यांच्यावर कारवाई होणार नाही का? कारवाई थांबेल का? कृपया आपण विधी अधिकारी म्हणुन खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:'–</u>मा. महापौरजी, मी सांगु इच्छितो की, या समितीची स्थापना महासभेच्या निर्णयाने झालेली आहे. समितीच्या सदस्यांची नेमणुक ही देखिल महासभेच्या विचाराने झालेली आहे. जर आता या महासभेने मंजुरी दिली तर समितीने सर्व बाबींवर विचार करून जर आपला निर्णय महासभेसमोर सादर केला असेल तर तो निर्णय मान्य करण्यास काय हरकत आहे? दुसरे म्हणजे या प्रकरणात मा.

आयुक्तांनी आधीच परवानगी दिलेली आहे तर हा विषय महासभेत का आणला गेला? तर मला असे वाटते की समितीने जो अहवाल दिला आहे तो आपण मान्य करायला हवा.

मा. सदस्य श्री. विश्‍वनाथ पाटील:—मा. महापौर, आयुक्त साहेब या गोषवा—यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की प्रशासनाकडुन महासभेपुढे प्रस्ताव ठेवल्यानंतर एक वर्षाचा कालावधी उलटुन गेला तरीही महासभेचे धोरण वेळकाढुपणाचे व अपचा—यास अप्रत्यक्षरित्या मदत करण्याचे दिसुन येते. हे स्पष्ट शब्दात लिहिलेले असताना देखिल आणि आयुक्तांनी त्याच कारणासाठी महासभेची मंजुरी न घेता त्यांना खटला दाखल करण्यासाठी परवानगी दिली हे एक बोलके उदाहरण आहे त्यासाठी निपक्षपातीप्रमाणे या खटल्याची चौकशी होण्यासाठी जी समिती स्थापन केली होती त्या समितीचा जो अहवाल आहे तो यानंतर कोर्टामध्ये येईल, त्यावर चर्चा होईल, त्यावर निर्णय येईल ते या सभागृहापुढे नंतर येणारच आहे. तर मग आता या प्रस्तावाला मंजुरी देण्यात काय अडचण आहे? जी चौकशी होणार आहे ती आपल्याला माहिती पडणारच आहे, महासभेपुढे येणारच आहे. फक्त त्यांनी स्पष्टपणे यात लिहिले आहे की महासभेने वेळकाढुपणाचे धोरण अवलंबल्याने आयुक्तांनी त्यांना स्वत:हुन परवानगी दिलेली आहे आणि त्या मंजुरीसाठी त्यांनी महासभेसमोर हा प्रस्ताव आणलेला आहे. जरी समितीने अहवाल दिलेला असला तरी त्याची चौकशी ही होणारच आहे. तर मला असे वाटते की आयुक्तांनी जी परवानगी दिली आहे त्यामध्ये काही गैर नाही आणि समितीने जरी चौकशी केली तरी न्यायालयासमोर त्याचा अहवाल येणार आहे. तरी याला मंजुरी देण्यात यावी.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—या सभागृहात या विषयावर, एकच विषय लक्षात घेवून दोन मुद्‌दयांवर चर्चा सुरू आहे. त्यापैकी एक मुद्‌दा असा आहे की श्री. विजय गोसावी यांच्याविरूध्द खटला दाखल करण्यासाठी परवानगी देण्यात यावी अथवा नाही. दुसरा विषय येथे असा चालु आहे की जर आयुक्तांनी कायदेशीररित्या श्री. विजय गोसावी यांच्यावर खटला दाखल करण्यासाठी परवानगी दिली आहे तर हा मुद्‌दा महासभेसमोर आणण्याची आवश्यकता काय आहे? यामध्ये दोन प्रश्‍न उपस्थित होतात. पहिला प्रश्‍न असा की आयुक्तांनी जर परवानगी दिली असेल आणि महासभा काही परिस्थितीमध्ये ती परवानगी नाकारत असेल तर आयुक्तांनी दिलेल्या मंजुरीची अंमलबजावणी होणार आहे का? या प्रश्‍नाचे उत्तर आधी मिळायला हवे. मी आयुक्तांकडुन खुलासा घेवु इच्छितो की जर काही कारणास्तव महासभेने परवानगी नाकारली तर आयुक्तांनी तेथे अगोदरच जी परवानगी दिली आहे तिची अंमलबजावणी होईल का? दुसरा प्रश्‍न असा की येथे सर्वोच्च न्यायालयाच्या एका प्रकरणाचा उल्लेख केला आहे त्याआधारे आयुक्तांनी परवानगी दिली आहे. याआधी महासभेत अशाप्रकारचे बरेच प्रस्ताव आले होते परंतु आता पहिल्यांदाच अशाप्रकारे यावर चर्चा होत आहे. यापुर्वी जे विषय यायचे त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार महासभेला असायचा. त्यामुळे निर्णय घेणे सोपे व्हायचे. मी आमचे गटनेता श्री. लाल पंजाबी यांच्याशी पुर्णत: सहमत आहे की भ्रष्टाचाराच्या प्रकरणात आपली भुमिका कशी असायला हवी. परंतु या विषयाचा गोषवारा ज्याप्रकारे महासभेसमोर आला आहे की आयुक्तांनी अगोदरच परवानगी दिली आहे व त्यास महासभेला कार्योत्तर मंजुरी दयायची आहे. महासभेसमोर पहिल्यांदाच असा मुद्‌दा आला आहे. या मुद्‌दयावर चर्चेअंती निर्णय होण्याआधी येथे खुलासा होणे आवश्यक आहे. आयुक्त अथवा विधी अधिकारी यांनी सुस्पष्ट खुलासा करायला हवा की आयुक्तांनी जे अधिकार वापरले आहेत ते महासभेची मान्यता न घेता वापरले आहेत. तर आयुक्तांनी सक्षम प्राधिकरणाचे अधिकार वापरले आहेत का? आणि जर त्यांनी सक्षम प्राधिकरणाचे अधिकार वापरले असतील तर अशाप्रकारे आपण पुन्हा त्याची पुनरावृत्ती करू शकतो का? त्याला काही अर्थ आहे का? हा थोडा नाजुक मुद्‌दा आहे. या मुद्‌दयावर सभागृहात खुलासा झाला तर मला असे वाटते की सदस्यांना या मुद्‌दयावर चांगल्या प्रकारे निर्णय घेणे सोपे होईल. मी महापौर महोदयांच्या माध्यमातुन आयुक्तांना विनंती करतो की या मुद्‌दयावर खुलासा केले तर बरे होईल. कारण त्यांचा गोषवाराच विसंगत आहे. आयुक्तांनी त्यात स्वत: म्हंटले आहे की, उल्हासनगर महानगरपालिका नियुक्ती प्राधिकारी म्हणुन सक्षम असल्याने श्री.गोसावी यांच्याविरूध्द खटला दाखल करण्यास मंजुरीचा प्रस्ताव फेब्रुवारी मध्ये आणला गेला होता. तर आयुक्तांनी गोषवा—यातच हे स्विकारले आहे की महापालिका नियुक्ती प्राधिकारी आहे, सक्षम प्राधिकारी आहे. परंतु त्यांचे पत्र जे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला देण्यात आले आहे त्यात त्यांनी स्पष्ट लिहिले आहे की कर्मचा—याला नेमण्याचा आणि त्याला काढुन टाकण्याचा अधिकार मला आहे. या विषयावर जी चर्चा होत आहे त्या चर्चेतुन या सभागृहात जे मुद्‌दे उपस्थित केले गेले आहेत, महासभेच्या अधिकारांचे उल्लंघन करण्याचे अथवा आयुक्तांनी त्यांचे अधिकार वापरण्याचे. गोषवा—यात ज्या विसंगती आहेत त्यावर आयुक्तांनी अथवा विधी अधिका—यांनी समाधानकारक खुलासा केला तर निर्णय घेण्यासाठी ते उपयोगाचे ठरेल.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल:—**मा. महापौरजी, हा जो गोपनिय अहवाल दिला आहे. हा अहवाल महासभेच्या पाच मिनिटे आधी आम्हाला दिला गेला आहे. हा १४ पानांचा अहवाल वाचण्यासाठी आता वेळ नाही. तरीही यातील पान क्र. ५ वर जो क्रमांक ४ आहे. तक्रारदारांनी केलेल्या दुरूस्तीच्या कामाचा तपशिल दर्शविणारा पंचनामा आहे काय? आजपर्यंत जी समिती स्थापन केली गेली होती. श्री.वदारिया यांनी सांगितले की ती दोन माळयांची इमारत होती. तर या अहवालात अथवा प्रशासनाने जो गोषवारा दिला आहे त्यामध्ये असे काही दिसुन येत नाही की प्रशासनाने श्री. गोसावी यांच्यानंतर अन्य कुणी अधिकारी तेथे पाठवुन श्री. साधवानी यांच्या मालमत्तेचे निरीक्षण केले आहे का? त्याचा काही अहवाल महापालिकेकडुन देण्यात आला आहे का? ते आपण महासभेसमोर आणलेले नाही. यामध्ये दोष फक्त श्री. गोसावी यांना दिला आहे. परंतु महासभेसमोर श्री. गोसावी यांचा विषय आणण्याआधी प्रशासनाने स्वत:चा अहवाल सादर केलेलाच नाही. तर मी महापौरांना विनंती करेन की, प्रशासनाने स्वत:चा अहवाल सादर करायला हवा त्यांनतरच या विषयावर कारवाई व्हायला हवी. या विषयामध्ये श्री. विजय गोसावी यांना लक्ष बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे असे मला वाटते. आणि जे हरेश किंवा महेश साधवानी आहेत यांच्यावर प्रशासनाचाच हात जास्त आहे असे मला वाटते. तर आम्ही अधिका—यावर दोष ठेवण्याआधी प्रशासनाने स्वत:चा अहवाल येथे सादर करावा. मा. महापौरजी, आपण प्रशासनाला तशी विनंती करावी अथवा आदेश दयावेत की जे हरेश किंवा महेश साधवानी आहेत यांच्या मालमत्तेची चौकशी करून महासभेसमोर त्याचे विवरण सादर करावे.

**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी:—**मा. महापौरजी, उपमहापौर व आयुक्त साहेब श्री. दिलीप लालवानी जे बोलले त्याचे मी येथे समर्थन करीत आहे की आम्ही येथे कोणाही भ्रष्ट अधिका—याच्या बाजुने नाही. प्रश्न एवढाच आहे की, जी समिती महासभेने स्थापित केली होती त्या समितीचा अहवाल येण्याआधीच आमच्या आयुक्त साहेबांनी निर्णय घेतला, हे योग्य आहे का? जर त्यांनी निर्णय घेतला आहे तर आज येथे चर्चा कशासाठी होत आहे. आज येथे हा अहवाल दयायला नको होता. मा. महापौरजी या समितीच्या अहवालावर आपण निर्णय घेतला तर योग्य होईल असे मला वाटते. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—**मा. महापौर, मला असे वाटते की या मुद्दयावर चर्चा बरीच झाली आहे. विरोधी पक्षातील आमच्या मित्रांनी देखिल त्यांचे मत मांडले आहे. मला असे वाटते की आता या विषयावर मतदान घेण्यात यावे की कोण कोणाला समर्थन करत आहे आणि बहुमताने निर्णय घेण्यात यावा.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**कोण भ्रष्टाचारासोबत आहे ते देखिल सांगा.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—**माझा श्री. धनंजय बोडारे यांच्या वक्तव्यावर आक्षेप आहे. ज्यांनी हे आरोप आमच्यावर ब—याचवेळा लावले आहेत की आम्ही भ्रष्टाचारा सोबत आहोत. या केबिनमध्ये जे अधिकारी बसले आहेत ते देखिल प्रशासनाचे अंग आहे. आज श्री. गोसावी यांच्याबद्दल काही झाले आहे उदया यांच्या सोबतही तसे काही होवु शकते. आम्ही शासनात असल्याने प्रशासनातील अधिका—यांना सांभाळुन घेणे हे देखिल आमचे काम आहे. महासभेने जेव्हा समिती स्थापन केली त्यानंतर समितीने अहवाल दिला की हे सर्व आरोप खोटे आहेत. त्यानंतरही जर आयुक्तांनी त्यांच्या मर्जीप्रमाणे परवानगी दिली असेल तर महासभा रबरी शिक्का नाही. याचा विरोध म्हणुन आम्ही याला मंजुरी देणार नाही. हवे असेल तर मतदान घ्या. जेणेकरून नेहमी लोकप्रतिनिधींचे ऐकले जाईल.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**येथे गोसावी बद्दल एवढे बोलले जात आहे तर गोसावी याआधी तीन वेळा निंलबीत झालेले आहेत. ही माहिती मी सभागृहाला देवु इच्छितो.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—**मा. महापौरजी ज्या गोसावीला वाचविण्याचा येथे प्रयत्न केला जात आहे तो आतापर्यंत तीन वेळा निलंबित झालेला आहे. एवढया भ्रष्ट अधिका—याला वाचविण्याची गरज काय? श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की ते आमचे मित्रही नाहीत व शत्रुही नाहीत. आम्ही तर त्यांच्यावर काही आरोप लावला नाही.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—**गोसावी यांच्याबद्दल बोलले तर यांना राग येतो. श्री. गोसावी हे तुलसीदास आहेत काय?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>मा.महापौरजी,  येथे जे श्री. गोसावी यांच्या बाजुने बोलत आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार ते देखिल सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u>गोसावी यांच्याबद्दल बोलले तर यांना राग यायला नको.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—</u>मा. महापौर, या विषयावर सभागृहात जो निर्णय होईल, गोषवा—यामध्ये आपण महासभेची जी परवागनी मागितली आहे त्यामध्ये काय फरक पडेल हे येथे सांगावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौर,  आज हा श्री. गोसावी साहेबांचा जो मुद्दा आहे. एवढी चर्चा झाल्यांनतर देखिल मला श्री. गोसावी यांना साहेब म्हणावे लागत आहे. विरोधी पक्षातील सदस्यांकडुन देखिल ब—याचशा सूचना आल्या. सत्ताधारी पक्षातील सदस्यांच्या वतीने देखिल सूचना आल्या.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u> दुसरे मी असे बोललो की आज सर्वांच्या भावना सारख्याच आहेत. आयुक्तांनी महासभेचे जे अधिकार वापरले आहेत, ठराव होण्याआधीच परवानगी दिलेली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक कायदयान्वये जी कारवाई होते, कर्मचा—यांवर आरोप सिध्द होत नाही तोपर्यंत त्यांना कामावर घेतले जात नाही. सर्वोच्च न्यायालयाचे जे आदेश आहेत ते आम्ही नाकारत नाही. फक्त महासभेसमोर ठराव आणताना ज्या प्रकारे जखमेवर मीठ चोळले जाते त्याप्रमाणेच परवानगी आधीच दिली आहे. येथे फक्त मान्यतेसाठी आणले आहे. याबद्दल सदस्यांना वाईट वाटले आहे. आज येथे जो मुद्दा आहे तो गोसावीला दोषमुक्त करून कामावर घेणे हा नसुन महासभेने लाचलुचपत प्रतिबंधक कायदयान्वये जी मंजुरी दयायला हवी ती महासभेने दयायला हवी. महासभेसमोर प्रस्ताव मंजुरीसाठी येतो अथवा पुढे ढकलला जातो. परंतु आयुक्तांनी या प्रकरणात जी परवानगी दिली आहे तर या ठरावात स्पष्टपणे लिहिले जावे की आयुक्तांनी जी परवानगी दिली आहे त्याबद्दल सभागृहाला वाईट वाटत आहे. यासाठी आम्ही परवानगी देत नसुन आयुक्तांना जे करायचे आहे ते आयुक्तांनी केले आहे, ए.सी.बी. ला जे करायचे आहे ते ते करतील. त्यामध्ये आम्ही कोणतीही बाधा आणत नाही. परंतु महासभेच्या अधिकारावर त्यांनी आधीच जो निर्णय घेतला आहे. तर आमच्या समोर प्रस्ताव आणायची गरजच नव्हती. यामध्ये त्यांनी स्पष्ट लिहिले आहे की कर्मचा—यावर कारवाई करायचे निलंबित करायचे अधिकार मला आहेत. जर त्यांना अधिकार आहेत तर महासभेसमोर कशाला आणतात. आज आमच्या समोर विषय आणण्यापुर्वीच परवानगी देण्यात आलेली आहे. ही बाब लक्षात घेवुन महासभेत समिती स्थापन करण्यात आली होती. आयुक्तांनी या समितीला कधीही पत्र दिले नाही, त्यांच्याशी चर्चा केली नाही. आम्ही समितीचा निर्णय लक्षात न घेता आयुक्त साहेबांनी जी परवानगी आधीच दिली आहे. त्यानंतर महासभा परवानगी देणार नाही. आम्ही अॅन्टी करप्शनच्या केसच्या विरूध्द नाही. अॅन्टी करप्शन जो निर्णय घेईल त्याच्याशी आमचा संबंध नाही ते त्यांचे त्यांचे बघुन घेतील. कोणत्याही कर्मचा—याला अॅन्टी करप्शनची केस पुर्ण झाल्यावर नोकरीवर घेतले जाते. त्यासाठी आम्ही बाधा आणत नाही. परंतु आयुक्तांनी परवानगी दिली आहे त्यानंतर महासभा परवानगी देणार नाही. त्यांनी जो निर्णय घेतला त्याला आम्ही विरोध करीत नाही. आज महासभा एखादा ठराव करते तर आयुक्त रद्द करण्यासाठी पाठवतात. आज नगरसेवकांची कामे पास होत नाहीत, डी.डी.आर कडुन पास होवुन आले तर त्याला कार्यादेश देखिल दिले जात नाही. तर ही प्रथा पुर्णत: बंद व्हायला हवी. आज प्रशासन अनुशेष भरते त्यानंतर महासभेसमोर आल्यावर आम्ही पास केले परंतु त्यानंतर ब—याचशा कर्मचा—यांकडे आवश्यक प्रमाणपत्रे नसल्याचे दिसुन आले. मग त्यांना काढुन टाकण्यात आले. त्यांनतर ते कर्मचारी न्यायालयात गेले. यासाठी प्रशासनाने विचार करून निर्णय घ्यायला हवा. आज एका कनिष्ठ अभियंत्याचा प्रस्ताव सुध्दा येथे आहे. महासभेने प्रस्ताव पास केल्यानंतर कागदपत्राची तपासणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. लोकप्रतिनीधी त्यासाठी जबाबदार राहणार नाहीत. आणि आज तुम्ही खटला दाखल करण्यासाठी जी आधीच परवानगी दिली आहे. ही गोष्ट लक्षात घेवुन आम्ही परवानगी देत नाही.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील:—</u>आयुक्त साहेब, महासभेने मंजुरी नाकारल्यानंतर यावर काय परिणाम होणार आहे एवढेच सांगा. सचिव साहेब आपण सांगा.

<u>मा. महापौर:—</u>सचिव साहेब या विषयावर मतदान घ्यावे.

<u>मा. सचिव:—</u>जे आयुक्त साहेबांच्या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

१७ मते :–

१. श्रीमती. जावळे संगिता
२. श्रीमती मोकल सिमा
३. श्री. उमाप रामदास
४. श्री. पुरस्वानी जमनादास
५. श्री. रूपचंदानी बच्चाराम
६. श्री.राज असरोंडकर
७. श्रीमती. कृष्णानी रेखा
८. श्री. सोनावणे नथु
९. श्री. गायकवाड दिलीप
१०. श्रीमती बामणकर नंदीनी
११. श्रीमती खांडेकर प्रेमा
१२. श्रीमती माने किरण
१३. श्री. चव्हाण रमेश
१४. श्री. धनंजय बोडारे
१५. श्री. पाटील विश्वनाथ
१६. श्रीमती. ससाणे लक्ष्मी
१७. श्री. चौधरी राजेंद्र

<u>मा. सचिव:–</u>जे प्रती प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

३३ मते :–

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्री. लिंगे सुर्यकांत
३. श्रीमती कालानी ज्योती सुरेश
४. श्री. चंदाराम मोकल
५. श्री. ऐडके गणपत
६. श्रीमती. शर्मा कमला
७. श्री. वलेचा पृथ्वी
८. श्री. रोहडा श्यामसुंदर
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ
१०. श्री. पवार नाना
११. श्रीमती आहुजा निता
१२. श्री. राजु जग्यासी
१३. श्री. ठाकुर विनोद
१४. श्रीमती. सोनेजी मीना
१५. श्रीमती मंसद माया
१६. श्री. गायकवाड सुरेश
१७. श्री. वनवारी किशोर नारायणदास
१८. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
१९. श्री. लुंड गोविंदराम
२०. श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
२१. श्री. पमनानी ईश्वर
२२. श्रीमती भठिजा कोमल
२३. श्री. लबाना होशियारसिंग
२४. श्री. तलरेजा विनोद

२५. श्रीमती. रिझवानी सुजाता
२६. श्रीमती. छाब्रिया भारती
२७. श्री. संजय बठिजा
२८. श्रीमती. दासानी मिनु
२९. श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती
३०. श्री. जाधव प्रशांत
३१. श्री. जाधव सुरेश
३२. श्री. भालेराव गौतम
३३. श्री. वाघे शामु

<u>मा. महापौरः—</u>सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे बहुमताने संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र. ४:—</u> श्री व्ही.डी.गोसावी, कनिष्ठ अभियंता यांचे विरुध्द् लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली अभियोग चालविणेकामी आयुक्तांतर्फे दिलेल्या मंजुरीस कायम करणे.

श्री. विजय दामोदर गोसावी, हे उल्हासनगर महानगरपालिकेत १९७८ पासुन महापालिकेच्या आस्थापनेत कार्यरत आहेत. दि. १९.९.२००३ रोजी अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागांत प्रभारी कनिष्ठ अभियंता पदावर कार्यरत असतांना श्री. गोसावी विरूध्द श्री. महेश जयसिंग साधवानी यांनी ठाणे ॲन्टी करप्शन ब्युरोकडे केलेल्या तक्रारीनुसार सदर विभागाने सापळयाचे आयोजन करून त्याबद्दल सेंट्रल पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं. १०६/२००३ प्र.का.सन १९९८ चे कलम ७,१३ (१) (ड) सह १३ (२) प्रमाणे दि. ११.९.२००३ रोजी २०. ०० वाजता गुन्हा दाखल केला होता.

भारतीय राज्य घटनेच्या कलम ३११ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १९ (१) (क) अन्वये न्यायालयात खटला दाखल करणेसाठी नियुक्ती प्राधिकारी यांच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने मा. उप—आयुक्त / पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक <u>सी.आर./३६२/ठाणे</u> /२००३/१२४० दि. ६.२.२००४ अन्वये संबंधित कर्मचारी यांचेवर अभियोग दाखल करणेसाठी मंजुरीची मागणी केली होती.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.सी.डी.आर. /१०९९/प्र.क्र. ६२/९९/११ अ. दि. ३.४.२००० च्या भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९९८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजुरी देण्याबाबत असून सदर आदेशात यापूर्वीचे सर्व आदेश / परिपत्रके यांचा आढावा घेवुन निर्णय घेण्यात आला आहे. तो खालील प्रमाणे...........

सदर निर्णयात लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून लाचेचा सापळा किंवा अपसंपदेच्या बहुतांशी प्रकरणी करावयाच्या तपासाच्या दरम्यान फार मोठा कालावधी विचारात घेतला जातो. कागदपत्रे व तपशीलही क्लिष्ट व मोठा असतो. या बाबी विचारात घेता सक्षम प्राधिका—याने प्रकरण तपासतांना लक्षपुर्वक तपासणी (Application of Mind) केली किंवा नाही असा संशय घेण्यास न्यायालयाला वाव मिळू नये या दृष्टीने छाननी टप्पावर पुरेसा कालावधी मिळणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने मा. आयुक्त यांनी माहे २००४ मध्ये महासभेपुढे श्री. गोसावी कनिष्ठ अभियंता यांचे विरूध्द अभियोग दाखल करणेसाठीचा मंजुरी प्रस्ताव सादर केला होता. परंतु सदर प्रस्तावात गुन्हा सिध्द होण्या बाबत तपासाच्या कागदपत्रातील समर्थनार्थ कोणते मुद्ये, बाबी आढळून आल्या हे नमुद केले नसल्याने, मा. महासभेने उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रशासनास सदर विभागाकडून प्राप्त झालेलया तपासाच्या कागदपत्रांची लक्षपूर्वक तपासणी (Application of Mind) करून अहवाल सादर करणे करीता तीन सदस्य

समिती, ठराव क्रमांक २ दि. २८.४.२००४ रोजी  गठत करण्याचा निर्णय घेतला होता. प्रशासनाकडून सदर समितीस माहे जुलै २००४ मध्ये तपासाच्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त झाल्यानंतर समितीने सदर तपासाच्या कागदपत्रांची लक्षपुर्वक तपासणीचे काम सुरू केले होते.

दरम्यान मा. आयुक्तांनी सदर समितीस अहवाला बाबतच्या प्रगतीची विचारणा न करता, तसेच सदर विभागा कडून प्रशासनास खटला दाखल करणेसाठी सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी मिळणेसाठी वारंवार विचारणा होत असलेबद्दलची कल्पना समितीस न देता परस्पर लाचलुचपत प्रतिबंधक विभागास आपले अधिकारात खटला दाखल करणेसाठी मंजूरी दिली असून महासभेसमोर कार्योत्तर मंजुरी व माहितीसाठीचा प्रस्ताव सादर केला आहे.  मा. आयुक्तांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास दि. २४.३.२००५ रोजीच्या मंजुरी आदेश मसुदा मध्ये नमुद केले आहे की, श्री. विजय दा. गोसावी कनिष्ठ अभियंता लोकसेवक असल्याने त्यांना नेमण्याचे व काढण्याचे (नियुक्तीचे व बडतर्फीचे अधिकार) आहे. मात्र मा. आयुक्त यांनी आज दि. २०.४.२००५ च्या सर्वसाधारण महासभेत उपरोक्त बाब कार्योत्तर मंजूरीसाठी ठेवली आहे, तर विषय क्र. ३ मध्ये कनिष्ठ अभियंता पदावर नियुक्ती करणेस महापालिका सक्षम प्राधिकारी असलेने त्यास मंजुरी मिळणेसाठीचा प्रस्ताव सादर केला आहे. आणि विषय क्र. ६ अन्वये कनिष्ठ अभियंता यांचेवर अधिनियमातील तरतूदी नुसार शास्तीचे अधिकार महापालिका सक्षम प्राधिकारी असल्याने त्याबाबत मंजूरीचा प्रस्तावही सादर केला आहे. सदर तीनही विषय (विषय क्र. ३,४ व ६ ) हे एकसारखे असून महापालिका सक्षम प्राधिकारी असतांना

मा. आयुक्त निर्णय घेण्यासाठी वेगवेगळी पध्दत अवलंबली असल्याचे आढळुन येते. सदर प्रकरणी विषय क्र. ४ बाबत सक्षम प्राधिकारी यांचे अधिकार स्वत: मा. आयुक्त यांनी वापरले असल्याने त्याबाबत न्यायालयात संशय घेण्यास वाव मिळेल असे वाटते.

महासभा ठराव क्र. २ दिनांक २९.४.२००४ अन्वये गठीत करणेत आलेल्या समीतीने अहवाल सादर केला असुन सर्व सन्माननिय सदस्यांनी त्याचे अवलोकन केले आहे. समितीने सादर केलेल्या अहवालावरून प्रकरणी संबंधित विभिन्न मुद्दांची सखोल चौकशी व शहानीशा केल्याचे निदर्शनास येते. सदर अहवालात खटला दाखल करणेसाठीच्या मंजुरी समर्थनार्थ कोणतीही बाब, मुद्दा आढळुन येत नसल्याने श्री. गोसावी, कनिष्ठ अभियंता यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना मंजुरी देण्यासाठीचा प्रस्ताव अमान्य करणेची शिफारस केली आहे.

सबब सदर विषयी निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा. महासभेसमोर सादर.

<u>महासभा ठराव क्रः— ३</u>                    <u>दिनांकः—२०/४/२००५.</u>

सुचकाचे नाव :—    श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा नियुक्ती प्राधिकारी असल्याने वरील प्रस्तावनेनुसार समितीने प्रशासनाकडुन प्राप्त झालेलया तपासाच्या कागदपत्रांची लक्षपुर्वक तपासणी करून महासभेस सादर केलेल्या अहवालातील मुद्दे आणि शिफारस लक्षात घेवुन, या पुर्वी मा. आयुक्तांनी श्री. गोसावी कनिष्ठ अभियंता यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागास न्यायालयात खटला दाखल करणेसाठी दिलेल्या मंजुरीस, कार्योत्तर मंजुरीच्या प्रस्तावास मंजुरी देत नाही. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने खटला दाखल करणेसाठी मागीतलेली मंजुरी नाकारण्यात येत आहे.

सबब प्रशासनास निर्देश देण्यात येत आहेत की लाचलुचपत प्रतिबंधक विभागास सदर निर्णय सुचीत करणेत यावा.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

विषय क्र. ५:— श्री चंद्रकांत र. सानप यांची ठोक पगारावर एक वर्षासाठी करार तत्वावर जे.सी.बी ऑपरेटर म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल:—मा. महापौरजी, उपमहापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब श्री. चंद्रकांत सानप यांची एक वर्षासाठी जे.सी.बी. ऑपरेटर म्हणुन नियुक्ती करण्यासाठी परवानगी मागितली आहे. पंरतु एक वर्षासाठी जेव्हा हा ऑपरेटर म्हणुन काम करेल तर त्याचे २४० दिवस पुर्ण झाल्यावर नियमानुसार महापालिकेला त्याला सेवेत कायम करावे लागेल. तर माझी अशी सूचना आहे की जो एक वर्षाचा कालावधी आहे तो चुकीचा आहे. हा कालावधी कमीत कमी आठ महिन्याचा असायला हवा. त्यामध्ये २४० दिवस होत नाहीत आणि २४० दिवस झाल्यावर तो महापालिकेवर खटला दाखल करून कायम होवु शकतो. आपण यामध्ये लिहिले आहे की वाहनचालकाची ६० पदे मंजुर आहेत त्यापैकी २८ वाहन चालक कार्यरत असुन ३२ जागा रिक्त आहेत तर या ३२ जागा रिकाम्या ठेवण्याचे प्रयोजन काय आहे? ही पदे आतापर्यंत का भरली नाहीत? माझी प्रशासनास विनंती आहे की त्याला एक वर्षासाठी रू. ४००० याप्रमाणे जी नियुक्ती देणार आहे तर २४० दिवसांवर त्याची सेवा झाल्यानंतर त्यास कायम करावे लागेल. तर प्रशासनाने यावर विचार केला आहे का की त्याला कायम करायचे आहे. की त्याला करार पध्दतीवरच ठेवायचे आहे. पंरतु एका वर्षाने तो प्रशासनावर केस करू शकतो यासाठी आयुक्त साहेब आपण उत्तर दयावे.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—मा. महापौर महोदया, श्री. सानप यांना जेसीबी ऑपरेटर म्हणुन नियुक्ती दिली आहे. आपल्या महापालिकेत जे.सी.बी. मशिन आहे पंरतु ते पद निर्माण करण्यात आलेले नाही. जर पद नसेल तर नियुक्ती देखिल करता येणार नाही. यासाठी येथे जे.सी.बी. ऑपरेटर म्हणुन घेण्याचा प्रस्ताव आला आहे. दुसरे म्हणजे याला करार तत्वावर घेतले आहे. जो नियमित कर्मचारी असतो त्याला सर्व फायदे मिळतात. याला सदरचे फायदे मिळणार नाही. त्यामुळे येथे २४० दिवसांनंतर स्थायी पद मिळण्याची शक्यता नाही. जर तो न्यायालयात गेला तर त्याची केसच दाखल करून घेण्यात येणार नाही. यामुळे त्याला फायदा मिळणार नाही. दुसरे आपण ६० पदांबाबत बोललात की ३२ पदे रिक्त आहेत तर येथे जी वाहने आहेत ती आपण ठेकेदाराकडुन उपलब्ध करून घेतो. त्यामुळे जास्तीची पदे भरणे आवश्यक नाही. आपल्याकडे जेवढी वाहने आहेत तेवढे वाहन चालक आहेत. यामुळे बाकीची पदे आपण भरली नाहीत.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल:—परंतु यामध्ये ठेकेदारांचे नाव दिले नाही. कोणत्या ठेकेदाराचा माणुस आहे ते दिले नाही.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—हा ठेकेदाराचा माणुस नसुन याची नियुक्ती करताना जाहिरात दिली होती.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल:—जाहिरात दिली असली तरी २४० दिवसानंतर तो दावा करेल.

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—हे नियमित पद नसुन करार तत्वावर दिलेली नियुक्ती आहे. करार तत्वावर केलेल्या नियुक्तीला २४० दिवसाचा फायदा मिळत नाही.

<u>काही सदस्य:—</u>पास. पास.

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र. ५:—</u> श्री चंद्रकांत र. सानप यांची ठोक पगारावर एक वर्षासाठी करार तत्वावर जे.सी.बी ऑपरेटर म्हणुन नेमणुकीस मान्यता देणे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील आरोग्य विभाग, अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, अग्निशमन विभाग या विभागांतर्गत महापालिका क्षेत्रातील उदा. मोठे नाले सफाई करणे, तोडलेली झाडे उचलणे, नैसर्गिक आपत्ती नियंत्रण कक्ष व मा. न्यायलयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे निष्कासित केलेल्या इमारतींना मलबा उचलणे या कामासाठी महापालिकेकडे जे.सी.बी. मशीन उपलब्ध आहे. ते चालविण्यासाठी व देखभालीसाठी महापालिकेमार्फत क्र. उमपा/पीआरओ/१२०५, दि. १२ जानेवारी, २००५ अन्वये दि. १६.१.२००५ च्या पुण्य नगरी व दैनिक सकाळ या वर्तमानपत्रामध्ये जे.सी.बी. ऑपरेटर हे पद ०१ वर्षासाठी रू. ४०००/— इतक्या ठोक वेतनावर भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली होती. जे.सी. बी. ऑपरेटर या पदाच्या प्रत्यक्ष मुलाखती दि. ४.२.२००५ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर मुलाखतीसाठी ०५ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ०२ उमेदवार महापालिकेने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये दिलेली अर्हता धारण करीत नसल्याने त्यांना मुलाखतीस अपात्र ठरवून उर्वरित ०३ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यामध्ये गुणवत्तेनुसार जास्तीत जास्त गुण प्राप्त करणारे उमेदवार श्री. चंद्रकांत रघुनाथ सानप यांची जे.सी.बी. ऑपरेटर या पदावर निवड करण्यात आली असुन अनु. क्र. २ वरील उमेदवार श्री. भास्कर कटाळु कांबळे यांना प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात आले आहे. महापालिका आस्थापनेवर वाहनचालक या संवर्गातील ६० पदे मंजुर असून २८ पदे कार्यरत आहेत व ३२ पदे रिक्त आहेत. महापालिकेच्या आस्थापनेवर जे.सी.बी. ऑपरेटरचे पद मंजुर नाही. त्यामुळे वाहनचालक या रिक्त पदावर निवड यादीतील श्री. चंद्रकांत रघुनाथ सानप यांना रू. ४०००/— दरमहा वेतनावर/ठोक मानधनावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ चे पोट कलम (१) अन्वये ०१ वर्षासाठी करार तत्वावर नेमणुक करण्यास महासभेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> ४ <u>दिनांक:—२०/४/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मीनु दासानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गौतम भालेराव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री चंद्रकांत र. सानप यांची ठोक पगारावर एक वर्षासाठी करार तत्वावर जे.सी.बी ऑपरेटर म्हणुन नेमणुकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः—विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ६:— उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील चार कर्मचा—यां विरुध्द् शास्ती लादणे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकलः—मा. महापौरजी, ही जी चार कर्मचा—यांवर कारवाई केली आहे. यामध्ये एका कर्मचा—याला दोषमुक्त केले असुन उर्वरित तीन कर्मचा—यांवर कारवाई केली आहे. त्यापैकी दोघांची वेतनवाढ बंद केली आहे व एकाची एक वर्षासाठी वेतनवाढ बंद केली आहे. परंतु यांचा दोष काय होता हे गोषवा—यात स्पष्ट लिहिलेले नाही की कोणत्या कामांमुळे यांच्यावर आरोप लावले होते व वेतनवाढ बंद केली होती. दुसरे असे की वेतनवाढ बंद केल्याने हे लिपिक सुधरणार आहेत का? तर या लोकांची दुसरीकडे बदली का केली जात नाही. या कर्मचा—यांची आपल्या महापालिकेतुन दुस—या महापालिकेत लांबवर बदली करायला हवी. वेतनवाढ थांबवल्याने फक्त रू १२५ ते १४० एवढे वर्षाला कमी होतात. बाहेर फिरून आले तरी ते दहा हजार रूपये जमा करून येतात त्यामुळे वेतन थांबवुन काय होणार आहे. यावर मी प्रकाश टाकु इच्छितो की २६ एप्रिलच्या दैनिक लोकमत मध्ये ''उल्हासनगर महानगरपालिका आयुक्तांचे आदेश कनिष्ठ अभियंता यांनी फेटाळले'' अशी बातमी आली होती. आयुक्त साहेब यावर आपले काय म्हणणे आहे. व या कर्मचा—यांवर आपण काय कारवाई करणार?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारीः—मा. महापौर महोदया, विषय क्र. ६ बाबत सन्माननिय सदस्यांनी जे विचारले आहे की त्यांना कोणत्या आधारावर शिक्षा दिली आहे तर त्यांच्यावर दोषारोप ठेवण्यात आले होते. त्यानंतर चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या अहवालाची प्रत सदस्यांना देण्यात येईल. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) मधील तरतुदीच्या आधारे त्यांना शिक्षा देण्यात आलेली आहे. त्यांचा दोष सिध्द झाल्यावरच त्यांना शिक्षा देण्यात आलेली आहे. ज्यांचा दोष सिध्द झाला नाही त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे. याचे तपशिलवार विवरण सन्माननिय सदस्यांना देण्यात येईल.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकलः—वर्तमानपत्रात जी बातमी आली आहे त्याबद्दल आपले काय म्हणणे आहे?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारीः—वृत्तपत्रात आलेली बातमी खरी नाही अशी माझी माहिती आहे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकलः—जर हे खरे नाही तर आपण या वर्तमानपत्रावर केस का करीत नाही. हे जे दैनिक लोकमत आहे हे मुंबई येथील एक विख्यात वर्तमानपत्र आहे. ही बातमी येवुन ४ दिवस झाले आहेत आपण यावर केस का केली नाही.

यावेळी श्री. चंदाराम मोकल यांनी वर्तमानपत्रातील बातमीच्या कात्रणाची प्रत सभागृहात सर्व उपस्थित सदस्यांना दिली.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबीः—श्री. मोकल यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्याची चौकशी करण्याची काय आवश्यकता आहे. आयुक्त साहेबांनी एफ.आय.आर. करण्यासाठी आदेश दिले होते अथवा नाही याची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्याची आवश्यकता आहे का?

आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारीः—आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. आज आयुक्त साहेब नसल्याने मी येथे उपस्थित आहे. आयुक्तांनी काय आदेश दिले हे मला माहिती नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—मा. महापौरजी, मी एका गोष्टीवर खुलासा करू इच्छितो. महासभेत वारंवार बोलले जाते की येथे कोणत्याही वर्तमानपत्रातील बातमीचा उल्लेख केला जात नाही. माझी सर्व सदस्यांना विंनती आहे की महासभेत वर्तमानपत्रातील बातम्यांवर चर्चा केली जात नाही. यापुढे हे लक्षात ठेवावे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकलः—श्री. किशोर वनवारी ही बातमी या विषयाशी संबंधित आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>आपण बोलले की त्या वर्तमानपत्रावर केस करा म्हणुन मी आपणांस सांगितले.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>वर्तमानपत्रात आयुक्तांबद्दल जी बातमी येते त्याची माहिती सभागृहात आयुक्तांकडुन घेवु शकतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>या आधी या विषयावर दहा वेळा चर्चा झाली आहे. श्री. राजेंद्रजी आपण तिस—यांदा निवडून आले आहात. येथे वर्तमानपत्रातील बातमीवर चर्चा केली जात नाही. त्यांनी वर्तमानपत्रावर केस करण्यासाठी सांगितले म्हणुन मी त्यांना वर्तमानपत्राचा उल्लेख न करण्याबद्दल सांगितले.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर:—</u>मा. महापौर महोदया, हे जे चार कर्मचारी आहेत ज्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रस्ताव येथे आला आहे. तर मागील वर्षी हे जेव्हा निलंबित झाले होते तेव्हा त्यांचे निलंबन कायम करण्याचा विषय देखील महासभेत आला होता. त्यावेळी या प्रत्येक कर्मचा—याच्या कार्यक्षेत्रात किती बांधकामे झाली, ती बांधकामे त्यांनी कशी वाचवली यासर्व गोष्टी त्यावेळी गोषवा—यामध्ये होत्या. त्यावेळी चर्चा करताना हा मुद्दा समोर आला होता की कर्मचा—यावर तर आपण कारवाई करतो परंतु कर्मचा—यावर आपण ज्या कारणासाठी कारवाई करतो. जो गुन्हा त्यांनी केला आहे अथवा जो अनधिकृत बांधकामाचा प्रश्न आहे तर त्यावर काय कारवाई झाली. हे देखिल प्रशासनाने सभागृहासमोर ठेवायला हवे. जर अनधिकृत बांधकामासाठी एखादया कर्मचा—यावर अथवा अधिका—यावर कारवाई होत असेल तर त्या चुकीच्या कामाचे काय झाले ते देखिल सभागृहासमोर यायला हवे. या कर्मचा—यांनी ज्या बांधकामांना वाचवले आहे त्याबाबत प्रशासनाने काय कारवाई केली आहे. याबाबत प्रशासनाने येथे माहिती दिली तर कारवाई करणे उचित होईल.

<u>आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—</u>मा. महापौर महोदया यानंतर कर्मचा—यावर कारवाई करण्याचे जे प्रस्ताव येथे आणण्यात येतील त्यामध्ये पुर्ण माहिती दिली जाईल.

<u>मा.सचिव:—</u>यामध्ये तीन कर्मचा—यांवर कारवाई करण्यात आली असुन एका कर्मचा—याला दोष मुक्त करण्याचे प्रस्तावित केले आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास. पास.

<u>मा. महापौर:—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विषय क्र. ६:—</u> उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील चार कर्मचा—यां विरुध्द् शास्ती लादणे.

शासनाने महापालिका व नगरपरिषद क्षेत्रामधिल अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यांना आळा घालण्यासाठी व अस्तित्वात असलेली बांधकामे निष्कासनासाठी त्वरेने उपाययोजना करणेकामी नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र. जीईएन—१०९६/४५/प्र.क्र.१५/नवि—२७, दि. ४ मार्च, १९९६ अन्वये अनधिकृत बांधकामाविरूध्द करावयाची कारवाई विषयक निर्देश दिले होते. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे विरूध्द तत्कालीन आयुक्त यांनी परिपत्रक क्र. उमपा/अबांवि/का/२०९, दि. २२ ऑक्टोंबर, २००० व क्र. उमपा/आका/३६८२००२, दि. ९ ऑगस्ट,२००२ अन्वये वर्ष २००१—२००२ मध्ये एक विशेष मोहिम सुरू करून क्षेतीय अधिकारी, कनिष्ठ अभियंता, लिपीक यांचेवर महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरूध्द करावयाच्या कारवाईची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यावेळी सदर मोहिमेतर्गत(१) श्री. उध्दव लुल्ला, लिपीक, अनधिकृत बांधकाम

निष्कासन विभाग (२) श्री. चंदर साधवानी, लिपीक, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग (३) श्री. प्रकाश म्हात्रे, लिपीक, अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग (४) श्री. कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग यांचेविरूध्द दोषारोप ठेऊन महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे नियम ८ मधील पोटनियम (३) ते (२७) मध्ये निर्धारित केलेल्या पध्दतीनुसार विभागीय चौकशी करण्यात आली होती. चौकशी अधिकारी यांनी सदर कर्मचा—यांची विभागीय चौकशी पूर्ण करून अंतिम निष्कार्ष अहवाल दिला आहे. त्यात संबधीत कर्मचा—यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ चे नियम ५ मधिल तरतुदीनुसार त्यांच्या नांवापुढे दर्शविल्याप्रमाणे शिक्षा प्रस्तावित करणेत आल्या आहेत.

| अ.क्र. | कर्मचा—यांचे नांव | पदनाम | प्रस्तावित करणेत आलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| १. | श्री. उध्दव लुल्ला | लिपीक | एक वेतनवाढ कायम स्वरूपी रोखण्यात यावी. |
| २. | श्री. चंदर साधवानी | लिपीक | एक वेतनवाढ कायम स्वरूपी रोखण्यात यावी. |
| ३. | श्री. प्रकाश म्हात्रे | लिपीक | एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणामन करता एक वर्षासाठी रोखण्यात यावी. |
| ४. | श्री. कुमार जग्यासी | क. अभियंता | दोषारोप मुक्त करणेत यावे |

सक्षम प्राधिकारी मा. महासभा, उल्हासनगर महानगरपालिका असल्याने सदर प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> ५ <u>दिनांक:—२०/४/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका सेवेत लिपीक पदावर कार्यरत असलेल्या खालील ३ कर्मचा—यांविरुध्द् कर्तव्यात हयगय केल्याबद्दल दोषी असल्याची खात्री झाली असुन पुढील शास्ती लादण्यास व श्री कुमार जग्यासी, कनिष्ठ अभियंता यांना दोषमुक्त करण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कर्मचा—यांचे नांव | पदनाम | प्रस्तावित करणेत आलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| १. | श्री. उध्दव लुल्ला | लिपीक | एक वेतनवाढ कायम स्वरूपी रोखण्यात यावी. |
| २. | श्री. चंदर साधवानी | लिपीक | एक वेतनवाढ कायम स्वरूपी रोखण्यात यावी. |
| ३. | श्री. प्रकाश म्हात्रे | लिपीक | एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणामन करता एक वर्षासाठी रोखण्यात यावी. |

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव:—**विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ७:—**उल्हासनगर महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकारी यांचे प्रशिक्षण वर्गासाठी अतिथी व्याख्याने व प्रशिक्षणास लागणारे शैक्षणिक साहित्य व अन्य साधन सामुग्री यासाठी नागरी प्रशिक्षण केंद्र, यशदा, पुणे यांना कायम स्वरुपी रु. १० लक्ष निधी देण्यास मान्यता देणे

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**मागच्या वर्षीचे अथवा दोन वर्षापुर्वी महापालिकेतून यशदाला किती रक्कम दिली आहे व त्याचा फायदा या महापालिकेच्या अधिकारी व पदाधिका—यांनी किती घेतला याचे विवरण भेटले तर बरे होईल.

**आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी:—**सदरचा निधी देण्यासाठी शासनाने आदेश दिले आहेत.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल:—**मा. महापौरजी, ....

**मा. उपमहापौर:—**आपण खाली बसावे.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल:—**हा निधी देण्यासाठी काही अडचण नाही परंतु माझ्या प्रभागात तीन वर्षापासुन एक काम बंद पडले आहे. निधी नाही म्हणुन बंद आहे. नगरसेवक निधीचे काम बाकी आहे. तीन वर्षापासुन काम बंद पडले आहे. ठेकेदाराला पैसे दिले नाहीत म्हणुन बंद आहे तर आपण ते पैसे का देत नाहीत.

**मा. उपमहापौर:—**हे विषयाशी संबंधित नाही.

**काही सदस्य :—**पास, पास............

**मा. महापौर:—**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

**प्रस्तावना:—**

**विषय क्र. ७:—** उल्हासनगर महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकारी यांचे प्रशिक्षण वर्गासाठी अतिथी व्याख्याने व प्रशिक्षणास लागणारे शैक्षणिक साहित्य व अन्य साधन सामुग्री यासाठी नागरी प्रशिक्षण केंद्र, यशदा, पुणे यांना कायम स्वरुपी रु. १० लक्ष निधी देण्यास मान्यता देणे

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मुंबई शासन निर्णय क्र. जीईएन/१०९६/१००१/प्र. क्र. ९८/९६/नवि—२७, दिनांक १३ जून, २००२ अन्वये शासनाचे यशदामध्ये नागरी प्रशिक्षण व संशोधन केंद्राची स्थापना केलेली आहे.

राज्यातील महापालिकेचे पदाधिकारी अधिका—याच्या प्रशिक्षण वर्गासाठी अतिथी व्याख्याने व प्रशिक्षणास लागणारे शैक्षणिक साहित्य व अन्य साधन सामुग्री यासाठी काही निश्चित स्वरूपाचा खर्च यशदा या संस्थेस येणार आहे. नागरी प्रशिक्षण केंद्रास प्रभावीपणे व परिणामकारकपणे काम करता यावे. यासाठी केंद्रापुरती स्वतंत्र साधनसामुग्री निर्माण करावी लागणार आहे. यामध्ये शैक्षणिक साहित्यावरील खर्च व महापालिकेकडून पाठविलेल्या समस्यावर तोडगा काढण्यासाठी करावा लागणारा खर्चाचा समावेश असेल वरील खर्च भागविण्यासाठी नागरी प्रशिक्षण केंद्राकडे कायम स्वरूपी निधी असणे आवश्यक आहे.

शासनाच्या वरील दि. १३.६.२००२ च्या आदेशानुसार या महापालिकेस एकाच वेळी वर्गणीच्या स्वरूपात नागरी प्रशिक्षण केंद्र यशदा, पुर्ण यांना कायमस्वरूपी (One Time Contribution) निधी रू. १० लाख मात्र जमा करावयाचा आहे.

तरी रू. १० लाख (रूपये दहा लाख मात्र) या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेस महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र:— ६ दिनांक:—२०/४/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. होशियारसिंग लबाना
अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकारी यांचे प्रशिक्षण वर्गासाठी अतिथी व्याख्याने व प्रशिक्षणास लागणारे शैक्षणिक साहित्य व अन्य साधन सामुग्री यासाठी नागरी प्रशिक्षण केंद्र, यशदा, पुणे यांना कायम स्वरुपी रु. १० लक्ष अंशदान देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते
महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ८:— महापालिका सेवेतील कु. पुष्पा भाटीया, लिपीक यांची महापालिका सेवेतुन दिनांक ७/५/२००५ पासुन स्वेच्छानिवृत्ती मंजुर करणे.

काही सदस्य :—पास. पास.

मा. महापौर:—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

प्रस्तावना:—

विषय क्र. ८:— महापालिका सेवेतील कु. पुष्पा भाटीया, लिपीक यांची महापालिका सेवेतुन दिनांक ७/५/२००५ पासुन स्वेच्छानिवृत्ती मंजुर करणे.

कु. पुष्पा भाटीया, लिपीक सध्या कार्यरत कर विभाग, उल्हासनगर महानगरपालिके मध्ये दि. २.१. १९७५ पासून कार्यरत असून त्यांची सेवा ३० वर्षे ०१ महिना ०५ दिवस झालेली आहे. त्यांनी दि. ७.२. २००५ च्या अर्जान्वये तीन महिन्याची स्वेच्छा सेवा निवृत्ती नोटीस दिली आहे. त्यांच्या विरूध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी अथवा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती नियम) नियम १९८२ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकारी सदर स्वेच्छा निवृत्ती मंजूर करण्यास सक्षम असल्याने कु. पुष्पा भाटिया, कनिष्ठ लिपिक यांना दिनांक ७.५.२००५ पासुन महापालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्ती मंजूर करण्याचा प्रस्ताव महासभेपुढे मंजूरीसाठी प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> ७ <u>दिनांक:—२०/४/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्री. ईश्वर पमनानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सेवेतील कु. पुष्पा भाटीया, लिपीक यांची महापालिका सेवेतुन दिनांक ७/५/२००५ पासुन स्वेच्छानिवृत्ती मंजुर करीत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.२० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

आपण लोकांनी एक गोष्ट बघितली असेल ब—याच वेळा महासभेत आम्ही अधिका—याची जेव्हा सुट्टी पास करीत नाही तेव्हा आपण म्हणता की ते महाराष्ट्रीयन आहेत, अनुशेषातील आहेत. परंतु आज आपण बघितले असेल की जरी श्री. गोसावी हे महाराष्ट्रीयन असेल तरी सिंधी देखिल त्यांच्या बाजुने बोलले. महाराष्ट्रीयन आहेत, अनुशेषातील आहेत. परंतु आज आपण बघितले असेल की जरी श्री. गोसावी हे महाराष्ट्रीयन असेल तरी सिंधी लोक देखिल त्यांच्या बाजुने बोलले. महाराष्ट्रीयन लोक देखिल त्यांच्या बाजुने बोलले.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>आमची हरकत आहे. येथे सिंधी व मराठी यामध्ये भेद करू नये. जे चुकीचे आहे ते चुकीचेच आहे. येथे फक्त भ्रष्ट व प्रामाणिक अधिका—यांबद्दल बोलले जात आहे, सिंधी व मराठी याबद्दल नाही. तुम्ही वातावरण खराब करू नका.

<u>मा. सदस्य श्री.किशारे वनवारी:—</u>जेव्हा अनुशेषाचे बोलता तेव्हा काय होते.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>मा. महापौर महोदया, आमचा श्री. किशोर वनवारी यांच्या वक्तव्यावर आक्षेप आहे.ही भाषा चुकीची आहे. येथे वातावरण चांगले आहे ते खराब करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण / श्री. विश्वनाथ पाटील:—</u>सिंधी मराठी काय आहे? येथे ही चुकीचे चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>आपणांस वाईट वाटावे म्हणुन मी असे बोललो नाही. मी असे बोललो की महाराष्ट्रीयन व सिंधी सर्व श्री. गोसावी यांच्या बाजुने बोलले. श्री. मोकल हे देखिल बोलले.

<u>मा. महापौर:—</u>येथे सर्व जाती धर्मांचे सदस्य आहेत, सर्व सदस्य समान आहेत, श्री. किशोर वनवारी यांचे आक्षेपार्ह वक्तव्य इतिवृत्तातून काढुन टाकण्यात येईल.

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२० मे, २००५

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/५/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०.०५.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३२. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ४. | श्रीमती रामचंदानी भावना | ३३. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ५. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ६. | श्रीमती मोकल सीमा | ३५. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ७. | श्री. दिलीप गायकवाड | ३६. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ८. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३७. | श्री. पाटील विश्वनाथ |
| ९. | श्री. एडके गणपत गोविंद | ३८ | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| १०. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३९ | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| ११. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४० | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १२. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४१ | श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास |
| १३ | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४२. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १४. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४३. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| १५. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४४. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १६. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ४५. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| १७. | श्री. जग्यासी राजु | ४६. | श्रीमती. भटीजा कोमल अमृत |
| १८. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ४७ | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| १९. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ४८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २०. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४९. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २१. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५०. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २२. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५१. | श्री. संजय रामचंद्र बठीजा, |
| २३. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २४. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५३. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५४. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| २६. | श्री. साधवानी मोहन | ५५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २७. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ५६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २८. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ५७. | श्री. हरदास माखिजा |
| २९. | श्रीमती भावना खिलनानी | ५८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३०. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, | ५९. | श्री. वदरीया राजेश नानिकराम |
| ३१. | श्रीमती. जयश्री सुर्वे | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती. संगिता रमेश जावळे, २. श्री. सोनवणे नथु काशिराम, ३. श्री. टेकचंदानी राजु, ४.श्री. वाघे शामु बाबु, ५. श्री. उमाप रामदास राघोजी, ६. श्रीमती गुप्ता अनिता धमेंन्द्र, ७. श्री. नाना आनंदा पवार, ८. श्री. बच्चाराम बी. रूपचंदानी, ९. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण, १०. श्री. चव्हाण रमेश महादेव, ११. श्री.जाधव प्रशांत जगन्नाथ, १२. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, १३. श्री. जयसिंघानी अनिल, १४. श्रीमती किरण लखी, १५. श्री.भालेराव गौतम यशवंत, १६. श्री. सुरेश जाधव, १७. श्रीमती वसीटा बेबी तुलसीदास, १८. श्रीमती करोतिया मालती, १९. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २०. श्री. निकम शांताराम, २१. श्रीमती साधवानी जया , २२. श्री. महेंद्र मुलचंदानी हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ६.३० सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. आयुक्त श्री. आर. के. सोनवणे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री. उत्तम लोणारे, उपायुक्त (मुख्यालय) हे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

<u>मा. सचिव :—</u>भारतीय जनता पार्टीकडुन एक सुचना प्राप्त झाली आहे. ती सूचना अशी आहे, श्री. जमनादास पुरस्वानी यांना भाजपाचे गटनेते म्हणून नियुक्त केले आहे. मा. महापौरांनी या पत्रास स्विकृती दिली आहे व घोषणा सुध्दा करु इच्छित आहेत. श्री. जमनादास पुरस्वानी यांना या पदाबाबत हार्दिक शुभेच्छा.

<u>मा. महापौर :–</u> श्री. जमनादास पुरस्वानी यांचे संपुर्ण सभागृहाच्या वतीने श्री. किशोर वनवारी हे स्वागत करत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–</u>श्री. जमनादास पुरस्वानी यांना आमच्याकडुन हार्दिक शुभेच्छा.

<u>मा. महापौर :–</u> श्री. नारायण पंजाबी हे उपमहापौरांच्या वतीने श्री. जमनादास पुरस्वानी यांचे स्वागत करत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u>श्री. जमनादास पुरस्वानी हे आज भाजपाचे गटनेते झाल्याने ते यापुढे सत्ताधारी पक्षाला भरपुर सहकार्य करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे.........
प्रश्न क्र. ३८७ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३८७ :–</u> प्रभाग क्र. १९ मधील कल्याण अंबरनाथ रोडवरील शांतीनगर जकात नाका ते प्रकाश आटो उल्हासनगर–३ पर्यंत टेलिफोन विभागाने खोदकाम केले आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

१) संबंधीत विभागाने खोदाई केली असुन त्याची रितसर परवानगी घेतली आहे का?
घेतली असल्यास त्याचा आदेश क्र. व दिनांक दयावा.

२) सदर खोदकाम करणेसाठी (परवानगीसाठी) कोणत्या तारखेला अर्ज केला होता व परवानगी कोणत्या तारखेस दिली?

३) परवानगी देतांना आर.सी.सी./डांबरी/ व कच्चा रस्ता किती खोदणार याची चौकशी केली आहे का?

४) सदर रस्ते खोदाईसाठी किती दर आकारण्यात येतो?
आतापर्यंत सदर कामात किती खोदाई करण्यात आली व त्याप्रमाणात किती शुल्क आकारण्यात आले?

<u>उत्तर :–</u>१) परवानगी घेतली आहे. आदेश क्र. उमपा/साबांवि/काप्र/२६७, दिनांक ३/२/२००४
२) दिनांक १७/९/०३ रोजी अर्ज केला व परवानगी दिनांक ३/२/२००४ दिली आहे.
३) परवानगी डांबरी रस्त्याची २४०० मीटर लांबी चौकशी करुन दिली आहे.
४) डांबरी रस्त्याच्या खोदाईसाठी दर रु. ७५०/– २४०० मीटर लांबीच्या प्रमाणे रुपये १८,००,०००/–महापालिकेकडे भरणा केला आहे. अंतीम मोजमाप काम पुर्ण झाल्यानंतर घेतली जातील.

<u>मा. सचिव :–</u> प्रश्न क्र. ३८८ हा श्री. नथु सोनवणे यांचा असून यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३८८ :–</u> हिराघाट जवळ, उल्हासनगर–३ येथे नव्याने पेट्रोलपंप बांधण्यात आला असून त्या अनुषंगाने खालील विचारलेल्या प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणे बाबत विनंती आहे.

१) सदर पेट्रोलपंप बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय?
आदेश क्रमांक व दिनांक दयावा.

२) नदी व नाल्यापासुन किती अंतर सोडुन बांधकामास परवानगी देण्यात येते?
सदर पेट्रोल पंप बांधतांना नदीपासुन नियमाप्रमाणे जागा सोडली आहे का? की सोडली नाही?

३) पेट्रोलपंप बांधतांना नियमाप्रमाणे किती जागा आवश्यक आहे?
आवश्यक असलेली जागा संबंधीताकडे उपलब्ध आहे का? की नाही?

४) सदर पेट्रोल पंप बांधतांना सर्व नियमांचे पालन करण्यात आले आहे का?
का त्यात अनियमितता आहे कोणत्या नियमांचे उल्लंघन झाले आहे का?

उत्तर :—१) होय.
उमपा/नरवि/बांप/३०/०४/१७३, दिनांक ५.८.२००४
२) ६ मीटर
होय
३) कमीत कमी ४८०.३७५ चौ.मी. आवश्यक आहे. व विकासकाकडे ५३४.८० चौ.मी. जागा उपलब्ध आहे.
४) होय, सदरची जागा हरीत पट्टयात येत असल्याने शासनाच्या आदेशानुसार सदर पेट्रोलपंपास मंजुरी देण्यात आलेली आहे.
मा. सचिव :—प्रश्न क्र. ३८९ हा श्री. नथु सोनवणे यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र.३८९:—शवकला टेक्सटाईल्स आर.सी.व्ही. इन्डस्ट्रीयल उल्हासनगर—३ येथे १०० X ७० फुटाचे तळमाळा + १ माळयाचे आर.सी.सी. बांधकाम सुरु असून सदर बांधकामाबाबत विचारलेल्या खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

१) सदर बांधकामास महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय?

२) परवानगी दिली असल्यास आदेश क्रमांक व दिनांक दयावा.

३) सदर बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे काय?

४) सदर बांधकामात अनधिकृत वाढीव बांधकाम आहे का?

५) असल्यास किती? सदर बांधकामास पायाभरणी दाखला दिला आहे का? कोणत्या तारखेस?

६) वाढीव बांधकामाबाबत नोटीस बजावली आहे का?
तिचा कालावधी किती होता?
तो संपृष्टात आला का?
सदर बांधकामावर आजतागायत कोणती कारवाई करण्यात आली? का कारवाई केलीच नाही?

उत्तर :—१) नाही
२) नाही
३) नाही

४) सदर बांधकामास परवानगी दिलेली नसल्यामुळे सदरचे बांधकाम पुर्णपणे अनधिकृत आहे.
५) सदर बांधकामास परवानगी दिलेली नसल्यामुळे सदरचे बांधकाम पुर्णपणे अनधिकृत आहे.
६) सदरील बांधकाम विषयी विकास धारकास कागदपत्र दाखल करण्यासाठी दिनांक १६.५.२००५ रोजी नोटिस बजावण्यात आली आहे. कागदपत्र पडताळून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ३९० हा श्री. रामदास उमाप यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद करण्यात येत आहे.

प्रश्न क्र. ३९०:—१) साधुवासवानी गार्डन (गोल मैदान) या गार्डनचे कोण—कोणते भाग कोण—कोणत्या स्ट्रस्ट, सामाजिक संस्था यांना वापरासाठी दिलेली अटी व शर्ती सह माहिती देणे.

२) वरील गोल मैदान गरीब, कष्टकरी, लाचार नागरीकांना त्याचा वापर करता यावा अशी काही व्यवस्था महापालिकेने केली असल्यास माहिती दयावी.

३) तेथे चालणारे खेळणी व इतर व्यवसाय आपल्या परवानगीने चालतात का?
तसे असेल तर सर्वसाधारण असे व्यवसाय चालविण्यासाठी महापालिकेचे ठराव काय झालेले आहेत ते दयावेत.
त्या ठरावानुसार गोल मैदान या बागेत व्यवसाय चालु आहेत का?

४) वरील संदर्भात मी नगरसेवक म्हणून दिलेले पत्राचे उत्तर आपण किती दिवसात दिले आहे की नाही?

उत्तर :—१) अ) महापालिका मालकीचे साधुवासवानी उदयानातील लाडसन अपार्टमेंट समोरील एकुण १४५०८ चौ.मी. जागा १० वर्षाचे कालावधीसाठी द वर्ल्ड रिन्युअल स्प्रिरिच्युअल ट्रस्ट या न्यायास महासभा ठराव क्र. १०४, दिनांक २०/११/२००३ अन्वये देण्यास मंजुरी दिली आहे.

याच उदयानातील एकुण जागेपैकी ५३०० चौ.मी. जागा रोटरी क्लब ऑफ मिड टाऊन यांना १० वर्षाचे कालावधीसाठी महासभा ठराव क्र. ६३, दिनांक २०/८/२००३ अन्वये देण्यास मंजुरी दिलेली आहे.

वरील उदयानातील भगवंती नावानी स्टेज समोरील मोकळे मैदान नागरीकांच्या सार्वजनिक वापरासाठी मा. महासभा ठराव क्र. ८, दिनांक २४/५/२००५ मधील तरतुदप्रमाणे उपलब्ध करुन दिले जाते.

२) अ) सदर मैदान नोंदणीकृत ट्रस्ट/ संस्था व इतरांना धार्मिक प्रयोजनार्थ किंवा राजकीय पक्षांचे सभेसाठी तसेच ज्यांचा फायदा मिळवण्याचा उद्देश नाही. अशा वापरासाठी महासभा ठरावातील तरतुदीप्रमाणे नागरीकांना सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध करुन दिले जाते.
ब) सदर मैदानातील बगीचे / उदयाने नागरीकांना विनामुल्य प्रवेश देणेबाबत संबंधीत महानगरपालिका ठरावामध्ये तरतुद आहे.
३) नाही. ज्यावेळी वाणिज्य वापरासाठी मैदानाची मागणी केली जाते तेव्हा महासभा ठरावातील स्तंभ क्र. ६ मध्ये नमुद रक्कमेच्या पाचपट रक्कम आकारणी करणेबाबत तरतुद आहे.
४) नाही.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ३९१ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

प्रश्न क्र. ३९१ :— नगरीकांनी मागितलेली घरपट्टीची पावती मिळत नाही यावर महासभेत उत्तर मिळणे बाबत.

माझ्या प्रभागातील श्री. सुनिल गोपाळदास उदानी, राहणार आकाश कॉलनी यांनी वर्ष २००३ मध्ये घरपट्टी मिळणेसाठी अर्ज केला आहे. त्याच प्रमाणे श्रीमती शोभा साधवानी यांनी दिनांक २७/१/२००४ रोजी घरपट्टीची पावती मिळणेसाठी अर्ज केला आहे. त्यांना आजपर्यंत घरपट्टीची पावती मिळाली नाही, सदर बाब हि महानगरपालिकेच्या उत्पन्नाशी निगडित आहे. तरी त्यांना आजपर्यंत पावती का दिली नाही याचे महासभेत उत्तर मिळावे.

तरी आपण या बाबत संबंधीत विभागास महासभेत उत्तर देणेसाठी सुचित करावे.

<u>उत्तर :—</u> श्री. सुनिल गोपाळदास उदासी, आकाश कॉलनी चाळ नं. ११ए रुम नं. २१ तसेच सौ. शोभा दामोदर साधवानी, आकाश कॉलनी चाळ क्र. ११, रुम नं. १७ या मालमत्तांचे सन २००५—२००६ या वर्षात सर्वेक्षण झालेले असल्याने सदर मालमत्तांना सन २००५—२००६ पासुन मालमत्ता कराचे बिल देण्यात येईल.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर, श्री. रामरख्यानी मोहनदास सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, दोन लोकांनी २००३—२००४ पासून नविन हाऊस टॅक्स पावतीची मागणी केली आहे. आता २००५ हे वर्ष चालु झाले असून आजपर्यंत त्यांना हाऊस टॅक्सची पावती मिळाली नाही. माझा प्रश्न असा आहे की, यांनी उत्तरात लिहिले आहे की, २००५—२००६ मध्ये दिली जाईल ती कधी दिली जाईल याचा जरा खुलासा केला जावा. किती दिवसामध्ये होईल? २ वर्ष झाले, २ वर्षापासुन २ लोक हाऊस टॅक्सची नविन पावती मागत आहेत. व त्यांना ती मिळत नाही. ती केव्हा मिळेल याचा आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

<u>श्री. संजय दुसाने (उप—आयुक्त , शहर):—</u> प्रत्येक वर्षी आपण पुरवणी अॅसेसमेंट करतो, तरीही काही मिळकतींची अॅसेसमेंट करायची राहून जाते. त्यामुळे या वर्षी आम्ही लवकरच सर्वेक्षणाचे काम सुरु केले आहे. त्याच बरोबर आम्ही जीआयएस (भौगोलिक माहिती) ची सुध्दा या कामी मदत घेत आहोत. असेसमेंट बाबत आमच्या ज्या एक—दोन अडचणी आहेत. काही मिळकतींची अॅसेसमेंट न होणे किंवा काही मिळकतींची दोन वेळा असेसमेंट होणे, या सर्व अडचणी आपण सोडवु शकु. खास करुन या मिळकती नोंदीसाठी घेंतल्या आहेत. व अशा आणखी ज्या काही असतील त्या सुध्दा या बरोबर घेतल्या जातील. हाऊस टॅक्स पावती जी आहे ती आपली जी बिले निघतील त्याबरोबर पाठविली जाईल. यावर्षीची टॅक्सची बिले ऑगस्ट महिन्यापर्यंत निघतील.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> सर्वेक्षणाचे काम चालु आहे की, बंद आहे?

<u>श्री. संजय दुसाने (उप—आयुक्त , शहर):—</u> सर्वेक्षणाचे काम चालु आहे. याचे सर्वेक्षण केलेले आहे.

<u>मा. सचिव :—</u> प्रश्न क्र. ३९२ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३९२ :—</u> उपरोक्त नमुद केलेल्या प्रश्नाबाबत आगामी महासभेमध्ये प्रशासनातर्फे तपशिलवार खुलासा करणेत यावा.

१) उल्हासनगर प्रत्येक कॅम्पमध्ये १ या प्रमाणे एकुण ५ स्मशानभूमी असून त्या ठिकाणी अत्यंविधीसाठी येणा—या पार्थीवाची नोंदणी करण्यासाठी विविध प्रकारचे फॉर्म्स भरुन देण्याची सक्ती करणेत येत आहे काय? फॉर्म्स भरुन देणेसाठी ट्रस्टची जबाबदारी आहे काय?

२) प्रत्येक स्मशानभूमीमध्ये महानगरपालिकेतर्फे नोंद ठेवणेसाठी महापालिकेचे कर्मचारी उपलब्ध करुन दिलेले आहेत काय? असल्यास त्यांची कामाची वेळ काय आहे?

३) सुमारे १ वर्षापूर्वी महापालिकेने ठराव मंजूर केला होता की, उल्हासनगरमधील स्मशानभूमीमध्ये अंत्यविधीसाठी लागणारे लाकूड महापालिकेतर्फे विनामुल्य पुरविणेत येईल. त्याची अंमलबजावणी होत आहे काय? नसल्यास त्यांची

कारणे काय?

४) अंत्यविधीसाठी लागणारे लाकुड मोफत दिल्यानंतर ट्रस्टकडुन लाकडाची रक्कम भरण्याची पावती जमा करण्याचा प्रश्न येणार नाही.

५) ३० वर्षापूर्वीच्या मृत्यु दाखल्याची मागणी केल्यास त्या व्यक्तीस डॉक्टरांचे सर्टिफिकेट सादर करणेस सांगणेत येते ते कोणत्या नियमानुसार.

तरी उपरोक्त नमुद केलेल्या मुदयावर सर्वसाधारण महासभेमध्ये खुलासा करणेत यावा.

उत्तर :—अ) विकासकाने सदर इमारतीचा सुधारीत नकाशा या कार्यालयाकडे सादर केला आहे. परंतु, सदर इमारतीची मुळ नस्ती संचालक, पुणे यांचेकडे कार्यालयीन कामानिमित्त पाठविण्यात आल्यामुळे त्यास मंजुरी देण्याचे काम प्रलंबित आहे.
ब) सदर इमारतीचा सुधारीत नकाशा अदयापपर्यंत नामंजुर करण्यात आलेला असल्यामुळे सदरचे बांधकाम अनधिकृत ठरत नाही.
क) निरंक
ड) नाही. सदरच्या नकाशास मंजुरी देण्याचे काम प्रलंबित असल्यामुळे सदरचे बांधकाम थांबविण्यात आलेले नाही व नोटिस बजावण्यात आलेली नाही.
ई) वरीलप्रमाणे
प) वरीलप्रमाणे

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, हा असा प्रश्न आहे, संपुर्ण उल्हासनगर शहरवासियांना फिरविले जात आहे. मग तो जन्माचा दाखला असो किंवा मृत्युचा दाखला असो, या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, आमचे लिपिक तेथे बसविले आहेत. ते सकाळ पासुन संध्याकाळ पर्यंत तेथे बसतात. जसे की आताच मी आपणांस कॅम्प नं. २ येथिल स्मशान भुमीचे पत्र दिले. त्यात असे लिहिले आहे की, महापालिकेचा कोणताही कर्मचारी तेथे कामासाठी येत नाही. ५ नंबर येथिल स्मशानभुमीचा मी स्वत: ट्रस्टी आहे. तेथे कधीही महापालिकेचा कर्मचारी येत नाही. येथे श्री. राजेश वदारिया बसले आहेत ते कॅम्प नं. ३ येथिल स्मशानभुमीचे ट्रस्टी आहेत. श्री. विनोद तलरेजा, उप—महापौर हे स्वत: कॅम्प नं. २ येथिल स्मशान भुमीचे ट्रस्टी आहेत. कोणत्याही स्मशाानभुमीत महानगरपालिकेचा कर्मचारी बसत नाही. व या लोकांनी अशी पध्दत चालु केली आहे की, ज्या कुणाला मृत्युचा दाखला पाहिजे, त्यास सांगितले जाते की, प्रथम आपण स्मशानभुमीची पावती घेवून या. त्याचा स्मशानभुमीच्या पावतीशी काय संबंध आहे? जेव्हा महानगरपालिकेचा कर्मचारी तेथे बसुन याबाबतची नोंद करत असेल तेव्हाच ते शक्य आहे. व त्या नोंदीनुसार त्यास मृत्युचा दाखला मिळाला पाहिजे. वर्षानुवर्षे त्यांना फे—या माराव्या लागतात. याच बरोबर आपणांस मी दुसरे एक पत्र दिले आहे. विरोधी पक्ष नेत्यांना सुध्दा दिले, आपणांस सुध्दा दिले. आम्ही लोकांनी दोन वर्षापुर्वी एक ठराव पारीत केला होता. स्मशानभुमीमध्ये जे प्रेत अंत्यसंस्कारासाठी जाईल त्याचे अंत्यसंस्कारासाठी वापरण्यात येणा—या लाकडाचें पैसे घेतले जाणार नाही. आपण पहा या प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी लिहिले आहे, त्याची अदयापपर्यंत अंमलबजावणी सुरु केलेली नाही. म्हणजेच हा स्थायी समितीचा व महासभेचा अपमान आहे. २ वर्षापासुन ठराव पारीत झालेला आहे. व मी आपणांस जन्म व मृत्युची यादीसुध्दा दिलेली आहे. पुर्ण वर्षभरात २९१२ लोंक निधन पावले व जन्मास आले ९७३८ तर फक्त २९१२ मृत व्यक्तींसाठी लाकडे आम्हांस मोफत दयायची आहेत. जो आपणच ठराव पारीत केला आहे आपल्या अधिपत्याखाली ठराव पारीत झालेला आहे. त्याची आजपर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. आज तेथे जे काही प्रेत अंत्यसंस्कारासाठी जाते, त्याचे अंत्यसंस्काराच्या लाकडांचे पैसे घेतले जातात. तर याचा खुलासा झाला पाहिजे. तर हे लोक स्मशानभुमीची पावती का मागतात? हे स्वत: मान्य करतात की, जर तेथे मृत्युची नोंद करण्यासाठी क्लार्क बसविला जातो तर मग हे मृत्युचा दाखला का देत नाहीत? तेथे बसणारा तो क्लार्क दस्तऐवज का ठेवत नाही? पहिले असे म्हटले जात होते की, एखादया क्लार्कला स्मशानभुमीमध्ये कामास पाठविले तर ती त्याच्या दृष्टीने सजा मानली जात होती. कारण की तेथे प्रेते मोजावी लागत असत. परंतु आज ज्यांना प्रेते मोजण्यासाठी ठेवले आहे ते मौजमजा करत आहेत. संपुर्ण वर्षभरात ते कधी स्मशानभुमीमध्ये कामास जात नाहीत. त्यांना संपुर्ण वर्षभराचा पगार घरबसल्या मिळतो.

तर याचा खुलासा झाला पाहिजे की, क्लार्क जर मृत्युची नोंद करत असेल तर मग स्मशानभुमीची पावती व इतर कागदपत्रांची मागणी का करतात याचा खुलासा झाला पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी, श्रीमती रेखा कारीरा बाहेर गेल्या.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :— फक्त स्मशानभुमीची पावतीच नाही तर लाकडे किती जाळली याची सुध्दा पावती मागितली जाते. व ती देणे जरुरीचे आहे काय? किती रुपयांची लाकडे जाळली याची सुध्दा पावती मागितली जाते.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— मृत्युचा दाखला घेण्यासाठी जो कोणी व्यक्ती येतो, जेव्हा एखादी व्यक्ती निधन पावते त्याबाबत डॉक्टरांकडुन सर्टीफिकेट घेतले जाते. त्याची एक प्रत स्मशानभुमीमध्ये दिली जाते. व त्याची नोंद होते. स्मशानभुमीमध्ये स्मशानभमुमीने ठेवलेले जे कामगार आहेत, ते लोक नोंद करतात की, अमुक व्यक्ती अमुक या आजारामुळे अमुक या दिवशी अमुक या वेळेस निधन पावला यानंतर महापालिकेतील लोक पुन्हा प्रमाणपत्राची मागणी करतात, फॉर्म भरुन डॉक्टरची स्वाक्षरी आणावयास सांगतात. २०—२० वर्षापुर्वीच्या केसेस आहेत, त्यावेळस प्रमाणपत्र देणारे डॉक्टरसुध्दा निधन पावले असतील तर स्वाक्षरी कुठुन घेवून येणार? सही आणण्यासाठी आम्हांला सुध्दा वर जावे लागेल काय? मेहरबानी करुन याबाबतची जी नोंद झाली आहे, आपल्या संगणकामध्ये नोंद केलेली आहे, आपल्या स्मशानभुमीमध्ये दाखला आहे, तर पुन्हा डॉक्टर सर्टीफिकेटची मागणी का करतात? महानगरपालिका जनतेला सुविधा देण्यासाठी आहे, त्यांच्या समस्या दुर करण्यासाठी आहे, त्यांच्या तक्रारी कश्या दुर होतील? त्यामध्ये सुधारणा करुन लोकांना सहकार्य करा. धन्यवाद.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :— नगरसेवकांकडुन हे प्रमाणीत करुन मागितले जाते की तुमच्या प्रभागाचा नगरसेवक कोण आहे त्याची यावर स्वाक्षरी आणा. कोण—कोण जिवंत आहे, कोण—कोण निधन पावले आहे, याची मोजणी करण्यासाठी नगरसेवक जाईल काय?

डॉ. खरात (वेद्यकिय आरोग्य अधिकारी):— मा. महापौर महोदया, उल्हासनगरमध्ये चार स्मशानभुमी आहेत. चार स्मशानभुमींसाठी २४ तास लिपिकांची सुविधा दयायची झाली तर त्यासाठी तीन पायांमध्ये लिपिकांच्या नेमणुका कराव्या लागतील. त्यासाठी ४ स्मशानभुमींमध्ये १२ क्लार्कची आवश्यकता आहे. आजच्या तारखेला फक्त कॅम्प नं. ३ व कॅम्प नं. ५ मध्ये आम्ही लिपिक पुरविले आहेत. त्यामधील एक अनुपस्थित असतो. कॅम्प नं. ३ येथिल स्मशानभुमीत सोनवणे नावाचा लिपिक काम करतो. आम्ही सामान्य प्रशासन विभागाकडे लिपिकांची मागणी केली आहे. त्यांनी आता—आता आम्हांला १२ लिपिक देण्याचे मान्य केले आहेत. ते लवकरच आम्हांला मिळतील. आजच्या तारखेला ज्या काही समस्या अडचणी आहेत, त्या जसेही आम्हांला लिपिक उपलब्ध होतील, त्यानंतर या अडचणी येणार नाहीत. राहिला प्रश्न ३० वर्षापुर्वी जे मृत्यु झालेले आहेत, त्यांच्या मृत्यु बाबत डॉक्टरांकडुन मृत्यु प्रमाणपत्र मागितले जाते. याबाबत मी आमच्या डॉक्टर व कर्मचा—यांकडे शहानिशा चौकशी केली, तर त्यांनी असे सांगितले की, अशा प्रकारची त्यांनी कुणाकडे मागणी केली नाही. व यापुढे सुध्दा अशी मागणी करु नये म्हणून त्यांना निर्देश दिले आहेत.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— याबाबत मी आपल्या असे निदर्शनास आणुन देवू इच्छितो की, २ तारखेला माझा भाचा निधन पावला असतांना मी स्मशानभुमीमध्ये गेलो असतांना मला असे आढळून आले की, महापालिकेचा कुणीही कर्मचारी याबाबतची नोंद घेण्यासाठी तेथे उपलब्ध नाही. कॅम्प नं. १ व २ येथिल स्मशानभुमीत जानेवारी महिन्यापासुन रजिस्टरमध्ये नोंदी घेतलेल्या नाहीत. आता जर कुणी मृत्यु दाखल्याची मागणी केली तर त्यांना मृत्यु दाखला कसा तयार करुन दिला जाईल हे जरा सांगा. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा दस्तऐवज नाही. आपला कर्मचारी तेथे बसत नाही. रजिस्टरमध्ये नोंदी झालेल्या नाहीत, तर आपण मृत्यु दाखला कसा तयार करुन देणार? आपण म्हणतात की, अंत्यसंस्काराच्या लाकडाची पावती आणुन दिली जात नाही, परंतु आपल्याकडे काय दस्तऐवज आहेत, तेथे अंत्यसंस्कार झाले आहेत किंवा नाही याबाबत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— नाही—नाही, खरात साहेब आपण सभागृहाची दिशाभुल करत आहात. मा. महापौरजी, ऐकुन घ्या. आता यांनी असे म्हटले की, तीन पाळयांमध्ये तेथे लिपिकांच्या नेमणुका कराव्या

लागतील. मी तर असे म्हणतो की तेथे तीन पाळयांमध्ये कर्मचारी ठेवण्याची आवश्यकताच नाही. प्रेत अंत्यसंस्कारासाठी रात्री कुणी घेवून जातच नाही. सकाळ पासुन संध्याकाळ पर्यंत एखादा लिपिक जर तेथे बसला, स्मशानभुमीमधील ट्रस्टचे लिपिक आपणाकडुन याबाबतच्या नोंदी करुन घेतात. रजिस्टर महापालिकेचे असते परंतु त्यामध्ये नोंदी करुन घेणारा लिपिक मात्र ट्रस्टचा असतो. ट्रस्टच्या लिपिकाकडे महापालिकेचे रजिस्टर का दयायचे? तेथे नेमलेल्या महापालिकेच्या लिपिकाचे काम आहे अंत्यंसंस्कारासाठी येणा—या प्रेतांची नोंद करणे. व त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करणे त्यानंतर स्मशानभुमीची जी पावती मागीतली जाते स्मशानभुमी ट्रस्ट ही एक खाजगी संस्था आहे. कुणाचे निधन न होता जर कुणाला अशीच पावती दिली जात असेल तर त्यास मृत्युचा दाखला देणार काय?

<u>डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—</u> नाही अशा प्रकारचा दाखला कुणाला दिला जात नाही.

**<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** स्मशानभुमीची पावती मागण्याची आवश्यकताच नाही. सर्व सदस्यांना हे माहित आहे. मी येथे प्रश्नामध्ये असे विचारले आहे की, मागील वर्षामध्ये किती बालकांचा मृत्यु झाला? ज्यांना दफन केले आहे? याबाबत आपल्याकडे काही दस्तऐवज उपलब्ध आहेत काय? याबाबत रजिस्टरमध्ये महापालिका नोंद करत नाही. याचे कारण काय आहे? प्रश्नामध्ये अशी विचारणा केली आहे की, जी बालके मृत्यु पावतात, ५ वर्षापर्यंतच्या बालकांना न जाळता दफन केले जाते, त्यांची नोंद आपणाकडे कुठे आहे? आपणाकडे आहे?

<u>डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—</u> नाही.

**<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** याची नोंद घेतली पाहिजे की, किती बालके जन्म होताच निधन पावली, ज्यांना दफन केले गेले. त्याबाबतचा महापालिका कोणताही दस्तऐवज ठेवत नाही. याबाबत मी जो प्रश्न विचारला आहे, त्याच्या उत्तरात आपण म्हटले आहे, नाही याचे कारण काय? जी बालके मृत्युमुखी पडतात त्यांची सुध्दा आपणांस नोंद ठेवायची आहे.

<u>डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—</u> जसेही, लिपिक उपलब्ध होतील, हे दस्तऐवज ठेवले जातील. नोंदी घेतल्या जातील.

**<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** आपण आपल्या त्या निवेदनावर कायम आहात काय की सकाळ पासुन संध्याकाळ पर्यंत महापालिकेचा लिपिक स्मशानभुमीमध्ये बसुन असतो. जेव्हा पण मी आपणांस तेथे घेवून जाईल तेव्हा आपणांस असे दिसुन येईल की, तेथे लिपिक बसलेला नाही. आपण आपल्या त्या निवेदनावर कायम आहात काय?

<u>डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—</u> होय.

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** जर त्यावेळेस नसेल तर?

<u>डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—</u> त्या कर्मचा—यावर कारवाई केली जाईल.

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** स्मशानभुमीने आपल्या लेटरहेडवर लिहून दिले आहे. मी स्वत: स्मशानभुमीचा ट्रस्टी आहे. श्री. वदारिया हे ३ नंबर स्मशानभुमीचे ट्रस्टी आहेत ते सुध्दा म्हणतात की, स्मशानभुमीमध्ये नेमलेले महापालिकेचे लिपिक बसत नाहीत. आपण त्यांना संरक्षित करतात, चुकीचे उत्तर देता, आपण त्यांना कारणे दाखवा नोटिस बजावुन विचारणा करा.

**<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—</u>** मी स्वत: तीन दिवस लागोपाठ गेलो होतो मला असे सांगण्यात आले की, १० ते ११ च्या दरम्यान निरिक्षक स्वत: येतात. नोंदी करतात, त्यानंतर कुणी येत नाही. १० ते ११ च्या दरम्यान मी तीन वेळा गेलो मला कुणीही महापालिकेचा लिपिक तेथे आढळून आला नाही.

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** खरात साहेब, आपण चुकीची माहिती देत आहात. स्मशानभुमीमध्ये नेमणुन दिलेला कुणीही लिपिक तेथे नसतो.

डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):— ४ स्मशानभुमींसाठी फक्त एकच लिपिक आहे. त्यामुळे ही परिस्थिती आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— तर तो तेथे एकेक तास जातो काय?

डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):— नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— एक लिपिक चार स्मशानभुमींमध्ये जातो.

डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):— तो लिपिक फक्त कॅम्प नं. ३ येथील स्मशानभुमीत बसतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— बाकी तीन स्मशानभुमीमध्ये कुणी लिपिक नसतो. आयुक्त साहेब, आपण सांगा यावर आपण काय करणार आहात?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आयुक्त साहेब, एक सेकंद आपल्या सभागृह नेत्यांनी प्रश्न उपस्थित केला तो अतिशन महत्वपुर्ण असा प्रश्न आहे. व हे तर महापालिकेचे आदय व अत्यावश्यक असे कर्तव्य आहे. जन्म—मृत्युची २४ तासामध्ये नोंद झाली पाहिजे. हा काही सर्वसामान्य विषय नाही. अतिशय गंभीर असा विषय आहे. व महापालिकेचा कारभार असा चालत असेल तर प्रशासनास अतिशय तत्पर करावे लागेल. आज काहीही कामकाज होत नाही. व याबाबत आपण ठोस उपाययोजना केली पाहिजे व त्याबाबत येथे घोषणा केली पाहिजे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— शासनाच्या वतीने अशी जाहिरात का केली जात आहे की, जन्मास येणा—या प्रत्येक बालकाची २१ दिवसाच्या आत नोंद केली पाहिजे व प्रमाणपत्र घेतले पाहिजे. परंतु येथे तर याबाबत काही नोंदीच घेतल्या जात नाहीत.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझ्याकडे स्मशानभुमीच्या दोन पावत्या आहेत, २००२ मध्ये एक व्यक्ती निधन पावली आहे. तेथे आपल्या रजिस्टरमध्ये नोंद आहे. परंतु मृत्यू दाखल्याबाबत ती महिला रोज महापालिकेत फे—या मारुन थकली शेवटी त्या पावत्या माझ्याकडे दिल्या. मी सुध्दा या डॉक्टरांकडे १० वेळा गेलो आहे, आजपर्यंत ते प्रमाणपत्र मिळाले नाही. ५ नं. स्मशानभुमीमध्ये जो लिपिक बसला आहे त्याला बरोबर लिहिता येत नाही तो स्पेलिंग मध्ये चुका करतो. त्यामुळे मृत्युचा दाखला देण्यामध्ये सुध्दा अडचणीचे होते. असे सांगितले जाते की, हे नाव चुकीचे आहे, स्पेलिंग मध्ये चुक आहे. आपण सत्यप्रतिज्ञालेख लिहून आणा. ज्यामुळे अतिशय त्रासाचे होत आहे माझ्याकडे याबाबतच्या दोन पावत्या आहेत. तो व्यक्ती २००२ मध्ये निधन पावला आहे.

मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे :— माझ्या पॅनेल मध्ये सुध्दा असे झाले आहे. एखादयाच्या घरात आपली आई किंवा वडिल निधन पावतात, ते प्रेत आपल्या गावी घेवून जातात. मा. महापौरजी आपल्या माध्यमातुन मी डॉक्टर खरात यांना विचारु इच्छितो की, जेव्हा येथुन प्रेत आपल्या महापालिका क्षेत्राबाहेर नेले जाते, यासाठी त्यांच्याकडे स्थानिक पोलिस विभागाकडुन घेतलेली परवानगी सुध्दा असते. हे प्रेत एखादया खेडेगावात घेवून गेल्यांनतर तेथे ग्रामपंचायत क्षेत्रातील आजुबाजुच्या नदीच्या काठी त्या प्रेतावर अंत्यसंस्कार केले जातात. तेथे त्याची काही नोंद केली जात नाही. परंतु ते कुटुंब आपल्या महापालिका क्षेत्रात राहते म्हणून निधन पावलेल्या आपल्या आई किंवा वडिलांच्या मृत्यु दाखल्याची जेव्हा मागणी करतो त्यावेळेस त्यास सांगितले जाते की, स्मशानभुमीची पावती आणा. त्यांनी ती कोठुन आणायची? त्याच्याकडे मृत्युचे प्रमाणपत्र सुध्दा असते. आपल्या माध्यमातुन मी डॉक्टर साहेबांना विचारु इच्छितो की, आपणाकडे अशी काही सुविधा नाही का की, जेवढी काही पोलिस स्टेशन आहेत, उल्हासनगरचा एखादा रहिवाशी जर इथे निधन पावत असेल व त्याचे प्रेत अंत्यसंस्कारासाठी बाहेरगावी नेले जात असेल तर त्याची सुध्दा काही नोंद केली जावी. जेणेकरुन त्यांच्या कुटुंबियांना मृत्युदाखल्याची आवश्यकता पडली तर तो दाखला सहजासहजी देता येवू शकेल. धन्यवाद.

<u>मा. महापौर :—</u> ही अतिशय दु:खाची गोष्ट आहे व आमच्या सभागृहाचा अपमान आहे. आम्ही जे ठराव पारीत करतो त्याची अंमलबजावणी होत नाही. जवळ—जवळ ७—८ महिन्यापुर्वी आम्ही हा ठराव पारीत केला आहे की, स्मशानभुमीमध्ये प्रेतावर अंत्यसंस्कार करण्यासाठी जी लाकडे वापरली जातात त्यांचे पैसे घेतले जावु नयेत. परंतु आजपर्यंत त्याबाबतचे पैसे घेतले जातात. हा आमचा अपमान आहे. म्हणुन या आदेशाचे तात्काळ पालन करण्यात यावे. व आता सभागृहात जी काही चर्चा झाली, आमच्या आरोग्य अधिका—याने सांगितले की, प्रत्येक स्मशानभुमीमध्ये महापालिकेने नेमुन दिलेला एकेक लिपिक तेथे बसतो. परंतु या विषयावर प्रदिर्घ चर्चा झाल्यानंतर त्यांनी मान्य केले की, एकच लिपिक आहे जो चारही स्मशानभुमीमध्ये बसतो. उदया पासुन शहरातील चारही स्मशानभुमींमध्ये महापालिकेच्या एकेक लिपिकाची नेमणुक केली जावी. आजच्या तारखेला आपण पहाल की, आमच्या ज्या काही समित्या गठीत झाल्या आहेत त्या समित्यांना शिपाई सुध्दा पुरविले नाहीत तर कुणाला लिपिक सुध्दा पुरविले नाही. मी आयुक्त साहेबांना आदेश देते की, ज्या समिती कार्यालयांना लिपिक व शिपाई दिले नाहीत त्यांना उदयाच हे कर्मचारी पुरविले जावेत. व आरोग्य अधिका—यांनी जे सांगितले की, प्रत्येक स्मशानभुमीमध्ये एकेक लिपिक आहे तर याची सुध्दा चौकशी केली जावी. ते स्मशानभुमींना भेट देतात किंवा नाही, नाही तर ते कुठे जातात? कुठे काम करतात? काय काम करतात?

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ३९३ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३९३:—</u> तळमाळा + ४ मजल्याची बांधकाम परवानगी देण्यात आली असून विकासकाने पाचव्या मजल्याचे बांधकाम सुरु केले असल्याचे उप—आयुक्त (शहर) यांचे पत्र क्र. उमपा/नरवि/ममाअ/३६४/०४, दिनांक १६/१२/२००४ अन्वये कळविले आहे त्यानुसार खालील प्रश्नाची समाधानकारक सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

अ) सदर इमारतीचे पाचव्या मजल्याचे बांधकामास महापालिकेने परवानगी दिली आहे का? असल्यास आदेशाचा क्र. दिनांक दयावा.

ब) सदर इमारतीचे बांधकामास परवानगी दिली नसल्यास सदरचे बांधकाम महापालिकेचे दृष्टीने अधिकृत आहे का अनधिकृत आहे?

क) अनधिकृत बांधकाम सुरु असतांना महापालिका काय कारवाई करते?

ड) सदर इमारतीचे पाचव्या मजल्याचे बांधकाम अनधिकृतपणे सुरु असल्यास सदर बांधकाम थांबविणेचे आदेश देण्यात आले आहेत का? नोटीस बजावली आहे का? तिचा कालावधी संपृष्टात आला का?

ई) सदर बांधकाम अनधिकृतपणे सुरु असल्यास संबंधीत विकासक व आर्किटेक यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल केलेत का? केले नसल्यास का केले नाही? यावरुन सबंधीत बिट निरिक्षक अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत आहे असे वाटत नाही का?

प) सदर इमारतीचे पाचव्या माळयाचे बांधकाम अनधिकृतपणे झाले आहे काय? याची चौकशी होवून संबंधीत बिट निरिक्षकावर काय कारवाई करणार आहात? कधी पर्यंत?

<u>उत्तर :—</u>अ) विकासकाने सदर इमारतीचा सुधारीत नकाशा या कार्यालयाकडे सादर केला आहे. परंतु, सदर इमारतीची मुळ नस्ती संचालक, पुणे यांचेकडे कार्यालयीन कामानिमित्त पाठविण्यात आल्यामुळे त्यास मंजुरी देण्याचे काम प्रलंबित आहे.

ब) सदर इमारतीचा सुधारीत नकाशा अदयापपर्यंत नामंजुर करण्यात आलेला असल्यामुळे सदरचे बांधकाम अनधिकृत ठरत नाही.

क) निरंक

ड) नाही. सदरच्या नकाशास मंजुरी देण्याचे काम प्रलंबित असल्यामुळे सदरचे बांधकाम थांबविण्यात आलेले नाही व नोटिस बजावण्यात आलेली नाही.

ई) वरीलप्रमाणे

फ) वरीलप्रमाणे

मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :– उत्तर ठिक आहे.

मा. सचिव :– प्रश्न क्र. ३९४ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

प्रश्न क्र. ३९४:–

कृपया पुढिल नमुद केलेले प्रश्न आगामी सर्वसाधारण सभेमध्ये मांडणेत येवून प्रशासनातर्फे त्याबाबत योग्य तो खुलासा करणेत यावा.

अ) अपंग व्यक्तींना स्वंयरोजगार पुरविण्याचे दृष्टीकोनातून उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे अपंग व्यक्तीसाठी सार्वजनिक टेलीफोन बुथ चालविणेसाठी यापूर्वी नगररचना विभागाच्या शिफारसीनंतर स्थायी समितीची मंजुरीने परवानगी देणेत येत होती. ती कोणत्या नियमानुसार?

ब) तद्नंतर अशी प्रकरणे स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी न ठेवता नगररचना विभागाच्या शिफारसी अंती त्वरीत बुथ चालविणेत परवानगी देणेत येत होती. ती कोणत्या नियमानुसार?

क) तद्नंतर नविन बूथ विषयी विचारणा केली असता अचानक प्रशानातर्फे असे सांगणेत येत आहे की, अपंग व्यक्तीतर्फे बुळा चालविण्याचे सर्व प्रस्ताव महासभेसमोर ठेवणेत येतील व महासभेच्या मंजूरीनंतर परवानगी देणेत येईल. सदरची पध्दती कोणत्या नियमानुसार आता निश्चित करणेत आलेली आहे?

ड) आता पर्यंत एकूण किती प्रस्ताव महासभेच्या मंजूरीसाठी प्रलंबित आहेत. सदरचे प्रस्ताव किती कालावधीपासून प्रलंबित आहेत?

ई) अपंगासाठी बुथ वाटपाची प्रलंबित प्रकरणे मंजूरीसाठी किती कालावधीमध्ये महासभेसमोर ठेवण्यात येतील याची कालमर्यादा निश्चित केली आहे काय?

तरी उपरोक्त नमूद केलेले प्रश्नाबाबत महासभेसमोर खुलासेवार उत्तर मिळणेत यावे.

उत्तर :– अ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७८ चे तरतुदीप्रमाणे

ब) अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे ११ महिन्याच्या कालावधीसाठी जागा भाडेपट्टयाने देण्याचे अधिकार आयुक्तांना असल्याने त्यानुसार भाडेपट्टयाने मान्यता दिलेली आहे.

अर्ज प्रलंबित राहण्याची कारणे :–

क) अ) अर्जदार यांनी मागणी केलेल्या बहुतेक जागा या शहराच्या गर्दीच्या भागातील व मुख्य चौकात असतात व वितरणाच्या दृष्टीने योग्य नसतात.

ब) एकाच जागी अनेक अर्जदारांकडुन जागा मागणी करण्यात येते.

क) बहुतेक जागा या विकास योजनेतील रस्त्याच्या प्रयोजनाने बाधित असतात. या पध्दतीमुळे

अ) जागा उपलब्ध होण्यास मोठा कालावधी लागतो व वेगवेगळया ठिकाणी प्रत्येक वेळेस ना हरकत दाखला मिळवावा लागतो.

ब) यापुर्वी दिलेल्या टेलिफोन बुथपासुन महानगरपालिकेस कोणतेही उत्पन्न मिळत नाही.

क) शहरातील रहदारीच्या व मुख्य चौकांत एकापेक्षा अनेक बुथ असनुही तेथेच मोठया प्रमाणावर टेलिफोन बुथसाठी मागणी करण्यात येते व पर्यायाने रहदारीस अडथळा होतो.

ड) काही बुथधारक या ठिकाणी एसटीडी बुथशिवाय  इतर व्यवसाय करतात.

इ) संबंधीत भागातील नागरीकांकडुन काही बुथ बाबत तक्रारी प्राप्त होत असतात.

वरील सर्व कारणांमुळे शहरातील सार्वजनिक ठिकाणावरील एसटीडी पीसीओ बुथला परवानगी देणेबाबत महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

ड) आतापर्यंत एकुण ६८ प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. सदरचे प्रस्ताव माहे २/४/२००४ पासुन प्रलंबित आहेत.

इ) दिनांक २०/५/२००५ चे महासभेपुढे सदर बाबतचा गोषवारा सादर करण्यात आलेला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी हा मुद्दा सुध्दा अतिशय चांगला आहे. या अगोदर अपंग व्यक्तींना एस.टी.डी. पी.सी.ओ. बुथ देण्यासाठीचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे येत होता, त्यानंतर अचानकपणे त्यांनी असे प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणायचे बंद केले. नगररचनाकाराने आपल्या अधिकारामध्ये अश्या परवानग्या देण्याचे चालु केले. त्यानंतर आता मागील सहा महिन्यापासुन टेलिफोन बुथ देणे यांनी बंद केले आहे. प्रत्येक अर्जदाराला हे पत्र देतात, त्या पत्रावर दुसाने साहेबांची सही आहे. हे अतिशय चांगले अधिकारी आहेत, त्या पत्रामध्ये ते काय लिहितात? आपला प्रस्ताव महासभेपुढे पाठविला जाईल. या पत्राची मी आपणांस प्रत देत आहे. कमीत कमी ७०—८० लोकांना यांनी लिहून दिले आहे की, आपला जो प्रस्ताव आहे तो महासभेपूढे ठेवला आहे, महासभेने ठराव पारीत केल्यानंतर आपणांस एस.टी.डी. बुथ चालविण्यास परवानगी दिली जाईल. पहिले निशुल्क परवानगी दिली जात होती मी प्रश्न दिल्यानंतर आज हा मुद्दा महासभेपूढे आला आहे. त्यामध्ये त्यांनी दरमहा ३०० रुपये शुल्क आकारण्याचे प्रस्तावित केले आहे. या अगोदर निशुल्क दिले जात होते. तर याबाबत दुसाने साहेबांनी आम्हांला जरा सांगावे, ही लल्लु भाई, अमीरभाईची पेढी आहे काय? कधी स्थायी समिती, कधी नगररचनाकार, कधी महासभा, कधी मोफत, कधी ३०० रुपये तर हे कोण—कोणत्या कायदयानुसार यांनी बदल केले आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कोणत्या कलमानुसार यांनी हे केले आहे ते जरा सांगावे. कोणत्या कलमानुसार आपण सुरुवातीस स्थायी समितीकडुन मंजुर करुन घेत होतात, त्यानंतर नगररचनाकार मंजुरी देत होते, प्रथम निशुल्क त्यानंतर दरमहा ३०० रुपये, व मध्यंतरी १५० रुपये. तर कायदयानुसार काय आहे ते जरा सांगावे अमुक—अमुक या कलमानुसार एवढे—एवढे, कारण की आपण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार चालता.

श्री. दुसाने , उप—आयुक्त (मालमत्ता):— मा. महापौर महोदया, या अगोदर १९८७ पासुन आपल्या येथे एस. टी.डी. बुथला परवानगी दिली जात आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार सुरुवातीस ११ महिन्याच्या कालावधीसाठी नगररचना विभागाकडुन परवानगी दिली जात होती. जर परवानगी देतांना कोणतेही शुल्क आकारले जात नव्हते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७८ नुसार महापालिकेची कोणतीही मिळकत आपण जर लिज वर देत असाल तर त्याबाबतचे शुल्क आकारले पाहिजे अशी तरतुद आहे. व या अगोदर ज्या काही परवानग्या दिल्या होत्या त्या ११ महिन्यासाठी दिल्या होत्या. त्यानंतर त्यांचे नुतनीकरण केले नाही. दुसरे असे की, मालमत्ता विभागाची स्थापना झाल्यानंतर हे काम मालमत्ता विभागाकडे सोपविण्यात आल्याने ज्या कुणाला परवानगी दिली त्याच्याकडुन १५० रुपये फी आकारण्यात आली. कलम ७८ जे आहे, ते या तिघांना परवानगी देते. त्यामध्ये प्रथम आयुक्त हे ११ महिन्यासाठी एखादी मिळकत लिजवर देवू शकतात, स्थायी समिती ३ वर्षासाठी एखादी मिळकत लिजवर देवू शकते. व त्यांनतर महासभा ३० वर्षापर्यंतच्या दिर्घकालावधी साठी एखादी मिळकत लिजवर देवू शकते. त्यानंतर कायम स्वरुपी जर दयायची असेल तर त्याबाबत शासनाकडुन परवानगी घ्यायची आहे. परंतु प्रत्येक ठिकाणी हे स्पष्ट आहे की, एस.टी.सी. बुथ परवानगी निशुल्क दयायची कि बाजारभावानुसार? या अगोदर जे म्हटले गेले की, सहा महिन्यापासुन एस.टी.डी. बुथला परवानगी देण्याचे बंद केले आहे, सद्या आपणाकडे १२२ लोकांचे अर्ज प्रलंबित आहेत. या प्रकरणांमध्ये असे आहे की, अपंग व्यक्ती आपल्या हिशोबाने एखादी जागा शोधतो. व तेथे एस.टी.डी. पी.सी.ओ. बुथ लावण्यासाठी आपणाकडे परवानगी मागतो. एस.टी.डी. पी.सी. ओ. बुथला परवानगी देतांना ती जागा वाहतुकीस अडथळयाची होत नाही ना? हे पहावे लागते. दुसरे असे की, ती जागा विकास आराखडयानुसार देय असली पाहिजे. अर्जदाराला असे वाटते की, ही जागा बाजारपेठेमध्ये येते. येथे आपला अधिकाधिक व्यवसाय होवू शकेल त्यानुसार ते जागेची मागणी करतात. मागणी केलेल्या अश्या ब—याचशा जागा विकास आराखडयात बाधित होत असल्याने किंवा काही रस्ता रुंदीकरणात बाधित होत असल्याने एका ठिकाणची जागा रद्द झाल्यानंतर तो दुसरी जागा सुचवून अर्ज करत असेल म्हणून यासाठी आयुक्त साहेबांनी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आपणच जागा निश्चित करुन ती

जागा या सर्वांकडुन अर्ज मागवुन, जे अपंग आहेत, ज्यांचे या अगोदरच आमच्याकडे अर्ज आले आहेत, त्यामधील जे पात्र आहेत, व जी जागा देणे योग्य आहे, त्याच जागेवर आम्ही एस.टी.डी. पी.सी.ओस परवानगी देवू शकतो. यासाठी एक धोरण निश्चित झाले तर ते अपंगांसाठी सुध्दा चांगले होईल. राहिला प्रश्न भाडे किती आकारायचे? हे महासभेपूढे प्रस्तावित केले आहे. याबाबत आजच्याच सभेपुढे एक विषय आहे. यावर महासभा निर्णय घेवू शकते.

**मा. सदस्या श्रीमती भारती छाब्रिया, श्रीमती कोमल बठिजा या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा. महापौर महोदया, आता येथे एका अधिका–याने सांगितले की, ज्यांना पी.सी.ओ. भाडयाने दिलेला आहे ते लोक नुतनीकरण करत नाहीत. आपणांस माहित असेलच असे काही लोक आहेत की, जे प्रत्येक १५ दिवसांनी पत्र देतात. व म्हणतात की, कृपया आमच्या कडुन आपण भाडे घ्या. आम्हांला परवानगीचे नुतनीकरण करुन दया. स्मरणपत्रांवर स्मरणपत्र लिहितात परंतु आपण त्यांना उत्तर देत नाहीत. काय आपणांस हे माहित आहे? कागदपत्र दाखवु? हे झाले एक. दुसरे असे की, जे लोक पी.सी.ओ. बुथ मागतात आपणांस असे वाटत नसेल काय की, तो माणुस विकलांग असेल, किंवा आर्थिक दृष्टया मागासलेला असेल. बहुतेक करुन तर अपंग लोकच एस.टी.डी. पी.सी.ओ. बुथ घेतात. काय या लोकांबाबतीत आपणांस दया येत नाही? ज्या व्यक्तीने मेहनतीने दोन वेळची भाकरी मिळविण्याचा प्रयत्न केला, ज्यासाठी सामाजिक संस्था त्यांना मोफत बुथ पुरवितात. आम्ही त्यांना केवळ एका ना हरकत दाखल्यासाठी किती दिवस फे–या मारावयास लावतो? याचे ताजे उदाहरण मी सांगतो की एक अपंग की ज्याच्याकडे सर्व कागदपत्र आहेत, तो ४ वर्षापासुन फे–या मारत होता. मी सांगितल्यानंतर आणि मी दबाव आणल्यानंतर या महानगरपालिकेने त्यास एस.टी.डी. बुथ साठी १५० रुपये भाडयाने जागा दिली. ११ महिने पुर्ण झाल्यानंतर त्याने स्मरणपत्रावर स्मरणपत्र पाठविली. मेहरबानी करुन आम्हांस परवानगीचे नुतनीकरण करुन दया. या सर्व बाबींवर आपण गंभीरतेने विचार केला पाहिजे. आपण म्हणता की, विकास आराखडयामध्ये ती जागा येते वगैरे तर एस.टी.डी. पी.सी.ओ.साठी जागा कुठे मिळेल? शहरामध्ये यासाठी जागा आहे काय? जागा नाहीत म्हणुनच कुणी एखादा कोपरा यासाठी शोधतो आणि त्याची मागणी करतो. जेणेकरुन गरीब माणसाचा व्यवसाय चालु शकेल. राहिला प्रश्न परवानगी देण्याचा प्रस्ताव जो स्थायी समिती मंजुर करीत होती, प्रश्न असा होता कधी आपला विभाग, प्रशासन प्रस्ताव तयार करेल त्यानंतर तो स्थायी समितीपुढे जाईल. नंतर कधी महासभेपूढे जाईल. तर हे कोणत्या कायदयानुसार? आपण स्थायी समितीचे अधिकार वापरावयास सुरुवात केलीत जेव्हा असे प्रस्ताव स्थायी समितीपुढे असत तेव्हा लोक नियुक्त प्रतिनिधी त्यावर विचार करुन निर्णय घेत. त्यावर निर्णय घेण्याचा त्यांचा अधिकार आहे. राहिला प्रश्न भाडयाचा, तर ३०० रुपये भाडे आपण कुणाला विचारुन निश्चित केले? १५० रुपयामध्ये सुध्दा होवू शकते. महापौर महोदयांना माझे खास निवेदन आहे की, जे अपंग लोक यासाठी अर्ज करतात ज्यांना सामाजिक संस्था प्रमाणपत्र देवून मोफत एस.टी.डी. बुथ देतात, अश्या लोकांकडुन १५० रुपयापेक्षा आणखी काही कमी भाडे घेवून त्यांना परवानगी दिली पाहिजे. १५० रुपये सुध्दा भाडे घेतले नाही पाहिजे. अशा लोकांवर दया केली पाहिजे. मानवतेच्या दृष्टीकोनातुन अशा लोकांचा विचार केला पाहिजे. महानगरपालिकेचे काम आहे, लोकांना पुर्ण सुविधा देणे. यामुळे लोकांना मेहनत करुन दोन वेळची भाकरी मिळविण्याची संधी मिळते. ही संधी मिळवून देण्याची आम्हांला संधी मिळाली आहे. तिचा वापर झाला पाहिजे. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड :– महापौर महोदया, एक–दीड वर्षापासुन माझ्या प्रभागातील रायगड मंडळाचा कर्वे नावाचा माणुस रोज फे–या मारुन–मारुन थकला. त्याला सांगितले जाते की, तुमचा प्रस्ताव सभेत ठेवला जाईल. अजुनपर्यंत त्याचे काम झाले नाही. त्या माणसाबद्दल मी दुसाने साहेबांना विचारु इच्छितो की, त्या माणसाला मी घेवून येतो त्याचे आपण काम कराल की नाही? त्यांनी सर्व कागदपत्र दिली आहेत.

श्री. दुसाने , उप–आयुक्त (मालमत्ता):–महापौर महोदया, .................

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– दुसाने साहेब, आपण सर्वांना परवानग्या दया. फुटबॉल सारखे आपण लोकांना जे फिरवितात कधी स्थायी समिती कधी स्वत: तर कधी महासभा, आपण चुकीची माहिती देत आहात. आमचे म्हणणे आहे की, सर्वांना दया. कायदयानुसार दयायचे आहे की नाही दयायचे? याबाबत

आम्ही कधी विचारलेही नाही. ज्याचे बेकायदेशीर आहे तर त्याचा प्रस्ताव आपण नाकारता. त्याबाबत आम्ही कधी प्रश्न विचारतो का? आमचे म्हणणे आहे की, आपण हे जे कायदे फिरवत आहात..........

श्री. दुसाने , उप–आयुक्त (मालमत्ता):–यासाठीच आम्ही प्रस्ताव ठेवला आहे की शहरामध्ये ज्या काही शंभर एक जागा असतील त्या एकच वेळेस निवडल्या जातील. त्यांच्या निवडीचे मापदंड आपण ठरवु शकतात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– त्यांना १० महिने फिरविले का?

श्री. दुसाने , उप–आयुक्त (मालमत्ता):–१० महिन्याची गोष्ट नाही, तीन महिन्यापासुन आम्ही लोकांनी ........

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– जेवढे काही अर्ज येतील ते प्रत्येक महिन्याच्या महासभे पुढे आले पाहिजेत.

श्री. दुसाने , उप–आयुक्त (मालमत्ता):–एक धोरणात्मक निर्णयासाठी महासभेपुढे ठेवला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– यानंतर जे प्रस्ताव येतील ते पुढील महासभेत ठेवा त्यास उशिर करु नका.

**मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड सभागृहातुन बाहेर गेले.**

श्री. दुसाने , उप–आयुक्त (मालमत्ता):–ठिक आहे. एक काहीतरी धोरण ठरवा. आपण जे धोरण ठरवाल त्याची अंमलबजावणी होईल.

मा. सचिव :– प्रश्न क्र. ३९५ हा श्री. चंदाराम मोकल यांचा आहे.

प्रश्न क्र. ३९५:– आरोग्य खात्याविषयी.....................

१) आपणाकडे आरोग्य निरिक्षक आणि आरोग्य मुकादम किती आहेत?

त्यांची संख्या बरोबर आहे काय?

नसेल तर का नाही?

२) त्यांना गणवेश मिळतो का? त्यांचा रंग कोणता?

३) ते गणवेश घालतात का? जर घालत नसतील तर का नाही?

याचे उत्तर येणा–या महासभेत देण्याची कृपा करावी.

उत्तर :–१) आरोग्य निरिक्षकांची एकुण मंजुर पदे–१७ आहेत. त्यापैकी ११ आरोग्य निरिक्षक कायम स्वरुपी आहेत व ५ आरोग्य निरिक्षक प्रभारी आहेत. आरोग्य निरिक्षकांची संख्या एकने कमी आहे.
२) आरोग्य मुकादमाची एकुण मंजुर पदे ७० आहेत. त्यापैकी कायम स्वरुपी ३९ असून प्रभारी २४ आहेत असे एकुण ६३ आहेत. ७ जागा रिक्त आहेत. कारण काही मुकादम सेवानिवृत्त झाले काही मयत झाले.
३) त्यांना गणवेश मिळतो. कायम स्वरुपी मुकादमांना पांढरा गणवेश मिळतो. प्रभारी मुकादमांना खाकी गणवेश मिळतो. ते गणवेश घालतात. ऑक्टोंबर–०३ ला त्यांना गणवेश दिलेला आहे. ज्यांचा गणवेश फाटलेला आहे. ते गणवेश घालत नाहीत. ज्यांना गणवेश दिलेलाच नाही. ते गणवेश घालत नाहीत. गणवेशाची खरेदी भांडार विभागाकडुन म्हणजेच उप–आयुक्त (मुख्यालय) यांच्याकडुन करण्यात येते.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब मी असा प्रश्न विचारला होता आपल्याकडे किती आरोग्य निरिक्षक व मुकादम आहेत त्याचे उत्तर बरोबर यांनी दिले आहे. त्यापुढे विचारले होते त्यांना गणवेश मिळतो किंवा नाही. त्यांनी उत्तर दिले आहे त्यांना गणवेश मिळतो. जे कायमस्वरुपी मुकादम आहेत, त्यांना गणवेश मिळतो परंतु हे जे उत्तर दिले आहे ते मला चुकीचे वाटते. तर त्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले पाहिजे. कारण की, ३१ तारखेला स्थायी समितीची जी सभा झाली होती, त्यामधील विषय क्र. ४ मध्ये असे लिहिले आहे की, आरोग्य निरिक्षक व आरोग्य मुकादम ५६ आहेत व त्यांना गणवेश दिले जातात. आम्ही लोक प्रभागात फिरतो काही सफेद गणवेशधारी मुकादम मिळतात. परंतु त्यांचा एकही निरिक्षक गणवेशात मिळत नाही. याचा अर्थ स्थायी समितीचा विषय चुकीचा आहे किंवा यांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे. तर याचे स्पष्टीकरण त्या विभागाचे अधिकारी करतील काय?

<u>श्री. लोणारे, उप—आयुक्त (मुख्यालय) :—</u> मा. महापौर महोदया, जे आरोग्य निरिक्षक गणवेश परिधान करीत नाहीत त्यांच्याबाबतीत सन्माननिय सदस्यांने जो प्रश्न विचारला आहे, यानुसार जे आरोग्य निरिक्षक गणवेश परिधान करत नाहीत त्यांच्यावर कारवाई केली जाईल. जे गणवेश दिले जातात ते परिधान करण्याबाबत सक्त आदेश दिले जातील. व जे लोक गणवेश परिधान करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> परंतु त्यांना गणवेश मिळतो याबाबत आपण उत्तर दिले नाही. परंतु स्थायी समिती विषय क्र. ४ दिनांक ३१/३/२००५ मध्ये असा आपण निर्णय घेतला आहे की, आरोग्य निरिक्षकांना सुध्दा गणवेश दिला जातो. याचे आपण स्पष्टीकरण करा.

<u>श्री. लोणारे, उप—आयुक्त (मुख्यालय) :—</u> मा. महापौर महोदया, मी हेच स्पष्टीकरण केले आहे, ज्यांना—ज्यांना गणवेश दिले जातात, त्यांनी ते परिधान करणे बाबत त्यांना सक्ती केली जाईल. व जे ते परिधान करणार नाहीत त्यांच्यावर शिस्त भंगाची कारवाई केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u>माझा जो प्रश्न आहे तो अदयाप आपल्याला समजला नाही. या प्रश्नाचे आपण जे उत्तर दिले आहे ते आपल्याकडे असेल तर आपण ते जरा वाचा. त्यामध्ये असे लिहिले आहे की, कायम स्वरुपी मुकादमांना पांढरा गणवेश मिळतो, परंतु स्थायी समिती विषय क्र. ४ त्यामध्ये आपण असे लिहिले आहे की, आरोग्य निरिक्षक व आरोग्य मुकादम यांना गणवेश दिला जातो. तर या उत्तरामध्ये आरोग्य निरिक्षकाचा उल्लेखच नाही. ही प्रशासनाची चुक आहे की, लिहिण्यामध्ये चुक आहे.

<u>श्री. लोणारे, उप—आयुक्त (मुख्यालय) :—</u>आपण ज्या स्थायी समिती विषयाचा उल्लेख करत आहात तो सध्या माझ्याकडे नाही. आरोग्य विभागाचे जे लोक आहेत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे मुकादम आहेत, त्यांना पांढ—या रंगाचा गणवेश दिला जातो.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> प्रश्न आरोग्य निरिक्षकाचा आहे. यामध्ये आरोग्य निरिक्षकच लिहिला आहे. पाहिजे तर मी दाखवु शकतो.

<u>श्री. लोणारे, उप—आयुक्त (मुख्यालय) :—</u>जर लिहिले नसेल तर आरोग्य निरिक्षकाला जो गणवेश दिला जातो, त्याबाबत जर लिहिले नसेल तर, परंतु त्यांना गणवेश दिला जातो. व त्यांनी तो वापरलाच पाहिजे अशी त्यांना सक्ती केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> तसा आपण उल्लेख केला पाहिजे.

<u>श्री. लोणारे, उप—आयुक्त (मुख्यालय) :—</u>आपला जसा प्रश्न आहे तसे उत्तर दिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> नाही दिले आपण...........

<u>श्री. लोणारे, उप—आयुक्त (मुख्यालय) :—</u>आणखी काही अधिक माहिती असेल तर ती आम्ही आपणांस देवु.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> तर आपण जावुन पहा.

<u>मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–</u> महापौर महोदया, माझी एक विनंती आहे की, मी आपणांसही एक पत्र दिले आयुक्तांनाही दिले. श्री. गायकवाड साहेबांना सुध्दा दिले आहे. नळ जोडणीचे १२४० रुपये घेतले जातात. ५४० व ७०० रुपये खड्डा खोदण्याचे घेतले जातात. याबाबत मी आपणांस विनंती केली, आयुक्त साहेब भेटले नाही. खड्डा खोदण्याचे जे ७०० रुपये घेतले जातात, ते घेतले जावु नयेत म्हणुन लोक आमच्याकडे येतात. सांगतात की, सगळीकडे मोठ–मोठे दगड आहेत. खोदता येत नाही म्हणुन हे ७०० रुपये न घेता फक्त ५४० रुपये घ्यावेत अशी आमची विनंती आहे. नाहीतर सगळीकडे अनाधिकृत नळजोडण्या घेतल्या जातील.

<u>मा. सचिव :–</u> प्रश्नोत्तराचा कालावधी संपला. एक लक्षवेधी सूचना प्राप्त झाली आहे जीचे सुचक आहेत श्री. सतरामदास जेसवानी व अनुमोदक आहेत श्रीमती भावना खिलनानी. यांनी जी लक्षवेधी सुचना दिली होती ती याप्रकारे आहे.

<u>लक्षवेधी सुचना</u>

**विषय :–** ४०–५० वर्षो से बना घर दुकान मकान, मरमत करने नियमों के तहत मिलनी चाहिए परवानगी बाबत.

तारीख २०/५/२००५ महासभा में इस लक्षवेधीद्वारा इस विषय को लाकर महासभा के समक्ष लांए ताकि, इस पर विचार विमर्श, निर्णय हो पांए जनता के हित के लिये ।

४०–५० वर्षे पहले बने घर दुकान मकान को मरमत करने के लिये उल्हासनगर महानगरपालिका नियमों के तहत मरमत परवानगी देने के लिये कोई नियम है या नही आज तक ऐसी परवानगी दी गई है या नही? इस पर चर्चा व निर्णय हो विनंती।

<u>मा. सचिव :–</u> श्री. सतरामदास जेसवानी व श्रीमती भावना खिलनानी यांनी आपली लक्षवेधी सुचना मागे घेतली आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

**मा. सदस्या श्रीमती माया मसंद, श्रीमती निता अहुजा या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**विषय क्र. २ :–**मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०.४.२००५ व २८.४.२००५ चे इतिवृत्त कायम करणे.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास.............

<u>मा. सचिव :–</u>ठिक आहे, कुणाची काही हरकत?

<u>मा. महापौर :–</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०.४.२००५ व २८.४.२००५ चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

***<u>विषय क्र. ३:-</u> पावसाळयापूर्वी शहरातील लहान मोठे नाले सफाई करणेकामी दोन महिन्याकरिता सफाई कामगारांच्या नेमणुकी कामी स्थायी समितीचा दिनांक***

२५/४/२००५, ठराव क्र. ४ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेचे अर्थसंकल्पीय अनुदानात बदल करण्यासाठी मंजूरी देणे.

काही सदस्य :- पास, पास............

मा. महापौर :- सदरचा वि८ाय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

मा. सदस्या श्रीमती मीना सोंडे सभागृहातून बाहेर गेल्या.

विषय क्र. ३:- पावसाळयापूर्वी ५ाहरातील लहान मोठे नाले सफाई करणेकामी दोन महिन्याकरिता सफाई कामगारांच्या नेमणुकी कामी स्थायी समितीचा दिनांक २५/४/२००५, ठराव क्र. ४ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेचे अर्थसंकल्पीय अनुदानात बदल करण्यासाठी मंजूरी देणे.

प्रस्तावनाः—

पावसाळयात अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शहरातील भागात साठु नये, अतिवृष्टीमुळे शहरातील नागरीकांची वित्तहानी व प्राणहानी होवु नये तसेच पावसाळयात शहरात रोगराई होवु नये म्हणुन महानगरपालिकेला दरवर्षी पावसाळयापूर्वी शहरातील लहान मोठे नाले सफाईची कामे नियमित सफाई कामगारांकडुन चांगल्याप्रकारे करून घेणे शक्य होत नाही. त्यामुळे एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात रोजंदारी कामगार नेमणुक करून अथवा मजुर कामगार सहकारी संस्था यांना कामाचे वाटप करून नाला सफाईचे कामे करून घ्यावी लागतात. मागील दोन वर्षे हंगामी कामगारांची रोजंदारीवर नेमणुक करण्यात आली होती.

तरी वरील परिस्थिती पाहता चालु वर्षी सन २००४—२००५ मध्ये शहरातील लहान मोठे नाले सफाई कामे करून घेण्यास प्रत्येक वार्डात १० याप्रमाणे असे एकुण ७६० पुरूष कामगार ३० दिवसांसाठी सुट्टीचे दिवस सोडुन १६ मे, २००५ ते ३० जुन, २००५ याकालावधीत तात्पुरत्या स्वरूपात किमान वेतन कायद्यानुसार देय रोजंदारीवर नेमण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. या हंगामी कामगारांनी नाले सफाईसाठी लागणारे साहित्य फावडे, घमेले, टिकाव, कुदळ इत्यादी गतवर्षीप्रमाणे स्वतः घेवुन यावे. सदर खर्चाची सन २००५—२००६ च्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात तरतुद केलेली नाही. त्यामुळे सदर खर्चाची तरतुद सुधारीत अंदाजपत्रकात करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर प्रस्ताव वित्तिय व प्रशासकीय मंजुरीस स्थायी समितीस सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांकः—२५.४.२००५

सुचकाचे नाव :—श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :—श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पावसाळयापुर्वी शहरातील लहान व मोठे नाले सफाई करणेकरिता एक महिन्याऐवजी दोन महिन्यासाठी ६० दिवसांसाठी प्रत्येक प्रभागात १० कामगार याप्रमाणे एकुण ७६० पुरुष कामगार रूपये १००/— प्रति दिवस नेमणुकीस मान्यता देत आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

परंतु नाले सफाईसाठी लागणारे साहित्य उदा० फावडे, घमेले, टिकाव, कुदळ इत्यादी कामगारांना स्वत: आणावे लागतील, महापालिकेतर्फे सदरचे साहित्य पुरविण्यात येणार नाही.

सदर खर्चाची तरतुद करणेसाठी अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे बदल प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्या लेखा शीर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे त्याचे नाव | ज्या लेखा शीर्षातून रक्कम वर्ग करावयाची आहे त्याचे नाव | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | नाला व गटार साफसफाई खर्च (क–अंदाजपत्रक, प्रभाग समिती–१) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क–अंदाजपत्रक, भाग–२–ड–जलनिस:रण खाते) | १२,५०,०००/– |
| २ | नाला व गटार साफसफाई खर्च (क–अंदाजपत्रक, प्रभाग समिती–२) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क–अंदाजपत्रक, भाग–२–ड–जलनिस:रण खाते) | १२,५०,०००/– |
| ३ | नाला व गटार साफसफाई खर्च (क–अंदाजपत्रक, प्रभाग समिती–३) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क–अंदाजपत्रक, भाग–२–ड–जलनिस:रण खाते) | १२,५०,०००/– |
| ४ | नाला व गटार साफसफाई खर्च (क–अंदाजपत्रक, प्रभाग समिती–४) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क–अंदाजपत्रक, भाग–२–ड–जलनिस:रण खाते) | १२,५०,०००/– |
| | | एकूण | ५०,००,०००/– |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ मधील २ नुसार कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानातून दुस–या अर्थसंकल्पीय अनुदानात बदली करण्याची तरतुद आहे.

त्यानुसार सदर रक्कम एका लेखा शीर्षातून दुस–या लेखा शीर्षात बदल करणेसाठी स्थायी समिती मा. महासभेस शिफारस करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महासभा ठराव क्र:–</u> ११ <u>दिनांक:–२०/५/२००५.</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा, पावसाळयापुर्वी शहरातील लहान–मोठे नाले सफाई कामाकरीता दोन महिन्याकरीता हंगामी कामगारांचे नेमणुकी प्रयोजनार्थ सन २००५–२००६ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम एका लेखा शिर्षातुन दुस–या लेखा शिर्षात बदली करण्याकामीचा स्थायी समितीचा दिनांक २५.४.२००५ रोजीचा ठराव क्र. ४ कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

***विषय क्र. ४:-*** ***पावसाळयापूर्वी उल्हासनगर महापालिका हददीतील नाले प्रोक्लेन मशिनद्वारे सफाई करणेकामी स्थायी समितीचा दिनांक २५/४/२००५ ठराव क्र ५, प्रमाणे सन २००५-२००६ चे उल्हासनगर महानगरपालिका अर्थसंकल्पीय अनुदानात बदल करण्याची मंजूरी देणे.***

***काही सदस्य :-*** ***पास, पास............***

***मा. महापौर :-*** ***सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.***

***मा. सदस्य श्री. राज असरोंडकर हे सभागृहातुन बाहेर गेले.***

***विषय क्र. ४:-*** ***पावसाळयापूर्वी उल्हासनगर महापालिका हददीतील नाले प्रोक्लेन मशिनद्वारे सफाई करणेकामी स्थायी समितीचा दिनांक २५/४/२००५ ठराव क्र ५, प्रमाणे सन२००५-२००६ चे उल्हासनगर महानगरपालिका अर्थसंकल्पीय अनुदानात बदल करण्याची मंजूरी देणे.***

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ४१ लहान मोठे नाले प्रतिवर्षी कंत्राटी पध्दतीने ठेकेदारामार्फत पोक्लेन मशीनने साफ करण्यात येतात. कॅम्प क्र. १ ते ५ मधील सर्व नाले गाळ काढुन साफ करण्यासाठी सन २००५—०६ या वर्षाकरिता रू. ९९६०००/— खर्च येईल.

सदर प्राकलनास कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी तांत्रिक मंजूरी दिली असून, मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी प्रस्तावाची छाननी करून मंजुरीची शिफारस केली आहे.

सदर काम तातडीच्या स्वरूपाचे व नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत असून हे काम पावसाळयापूर्वी करणे अत्यंत जरूरीचे आहे. सदर प्राकलनास प्रशासकीय, वित्तिय मान्यतेकरिता व स्पर्धात्मक जाहीर निविदा (बी—१) मागविण्याकरिता स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर.

स्थायी समिति ठराव क्र. ५ दिनांकः—२५.४.२००५

सुचकाचे नाव :—श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :—श्री. नथु सोनवणे

ही स्थायी समिति वरील प्रस्तावने अनुसार महापालिका हद्दीतील एकुण ४१ लहान मोठे नाले पावसाळयापुर्वी पोक्लेन मशिनद्वारे साफ करणे कामी रू. ९,९६,०००/— च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदर खर्चाची तरतुद करणेसाठी अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे बदल प्रस्तावीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | ज्या लेखा शीर्षात रक्कम वर्ग करावयाची आहे त्याचे नाव | ज्या लेखा शीर्षातून रक्कम वर्ग करावयाची आहे त्याचे नाव | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | नाला व गटार साफसफाई खर्च (क—अंदाजपत्रक, भाग—१—ड—जलनिसःरण खाते — अ.क्र. ४ ) | सार्वजनिक नाला व गटार बांधणी (क—अंदाजपत्रक, भाग—२—ड—जलनिसःरण खाते अ. क्र. १ ) | ५,००,०००/— |
| | | एकुण | ५,००,०००/— |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ मधील २ नुसार कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानातून दुस—या अर्थसंकल्पीय अनुदानात बदली करण्याची तरतुद आहे. त्यानुसार सदर रक्कम एका लेखा शीर्षातून दुस—या लेखा शीर्षात बदल करणेसाठी स्थायी समिती मा. महासभेस शिफारस करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&&

महासभा ठराव क्रः— १२ दिनांकः—२०/५/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

*ही महासभा, पावसाळयापुर्वी उल्हासनगर महापालिका हददीतील नाले प्रोक्लेन मशिनद्वारे सफाई प्रयोजनार्थ सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम एका लेखा शिर्षातुन दुस-या लेखा शिर्षात बदली करण्याकामीचा स्थायी समितीचा दिनांक २५/४/२००५ रोजीचा ठराव क्र. ५ कायम करीत आहे.*

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर व श्री. विनोद ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

*विषय क्र. ५:- महापालिकेच्या विदयालयात माध्यमिक शिक्षणाच्या शाळा सुरु करण्याकामी महापालिका शिक्षण मंडळाचा ठराव क्र. १११९, दिनांक ५/८/२००० कायम करणे.*

*मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :- मा. महापौरजी, महापालिकेच्या पुर्व प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांसाठी जो ठराव पारीत केला होता त्यानंतर १९९८-९९ मध्ये जेव्हा श्री. जयकुमार केणी हे पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समितीचे सभापती होते त्या अगोदर १९९७ मध्ये जेव्हा मी त्याच शिक्षण समितीचा सभापती होतो. पुर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा प्रत्येक कॅम्पामध्ये एक अशा शाळा तयार करण्यासाठी आम्ही ठराव केला होता. त्याचे काय झाले? त्याच ठरावाची पुनरावृत्ती होत आहे. आम्ही ठराव पारीत करतो परंतु त्याची कार्यवाही होत नाही. सांगायचे एवढेच आहे की, फक्त ठराव पारीत होणार नाही त्याची अंमलबजावणी झाली आहे काय? ठरावाची कार्यवाही झाली पाहिजे. त्याचा पाठपुरावा केला पाहिजे.*

*मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :- मा. महापौरजी, उप-महापौरजी, सचिव साहेब व आयुक्त साहेब, यामध्ये असे लिहिले आहे की, काही विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती साधारण चांगली असल्यामुळे ते खाजगी शाळेत प्रवेश घेतात. परंतु ज्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची व बिकट आहे व ज्यांना हातमजुरी केल्याशिवाय गत्यंतर नाही अशा विद्यार्थ्यांच्या पालकांना इतर खाजगी शाळांमध्ये देणगी देवुन प्रवेश घेता येत नाही. त्यामुळे असे विदयार्थी शिक्षणाची आवड असूनही वंचित राहतात. शिक्षण मंडळ ठराव क्र. १११९, दिनांक ५.८.२००० अन्वये अनुमती दिली आहे. माध्यमिक शिक्षण पुरविण्याची बाब महापालिकेस बंधनकारक नाही. परंतु शिक्षण मंडळाचा जो ठराव दिला आहे, त्याबाबत माझे असे म्हणणे आहे की आपण कमीत कमी ५ नंबरमध्ये ५ शाळा उघडाव्यात. कारण या २८ शाळांमधुन १०१८६ विदयार्थी शिक्षण घेतात. नगरपालिकेच्या*

*शाळेमध्ये जे विदयार्थी शिक्षण घेतात त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते. कारण की, माझ्याकडे असे काही विदयार्थी आले होते की, ७ वी नंतर त्यांना शिक्षण घेण्याची आर्थिक कुवत नसल्यामुळे ते घरी बसतात. तर १ ते ५ नंबर मध्ये होवू शकत असेल तर आपण शाळा चालु केल्या पाहिजेत. १० हजार विदयार्थ्यांमधील कमीत कमी २० टक्के विदयार्थ्यांनी या शाळांचा फायदा घेतला तर ४००-५०० विदयार्थी ज्यांची पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असेल तर ते पुढील शिक्षण घेवु शकतात.*

*मा. सचिव :-* *पास,?*

मा. महापौर :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

मा. सदस्या श्रीमती दिपा पंजाबी, श्रीमती भावना रामचंदानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.

*विषय क्र. ५:-* *महापालिकेच्या विदयालयात माध्यमिक शिक्षणाच्या शाळा सुरु करण्याकामी महापालिका शिक्षण मंडळाचा ठराव क्र. १११९, दिनांक ५/८/२००० कायम करणे.*

प्रस्तावना:–

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत शिक्षण मंडळाच्या अधिपत्याखाली एकूण २८ शाळा इ. १ ते ७ वी पर्यत असून त्या शाळामध्ये उल्हासनगर शहरातील गरीब विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेच्या ७ वी पर्यतच शाळा असून काही विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती साधारण चांगली असल्याकारणाने खाजगी शाळेत प्रवेश घेतात. परंतू ज्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची व बिकट आहे व त्यांना हातमजुरी केल्या शिवाय गत्यंतर नाही अशा विद्यार्थ्यांच्या पालकांना इतर खाजगी शाळेत देणगी देवून प्रवेश घेता येत नाही. त्यामुळे असे विद्यार्थी शिक्षणाची आवड असून देखील शिक्षणापासून वंचित राहतात.

सध्या १ ली ते ७ वी पर्यंतच्या प्राथमिक शिक्षणासाठी महापालिकेच्या एकूण २८ शाळा आहेत. सदर शाळांमध्ये एकूण १०८८६ इतके विद्यार्थी शिक्षण घेतात. त्याअनुषंगाने शिक्षण मंडळाने प्राथमिक शाळेतील इ. ७ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांसाठी इ. ८ वी ते १० वी पर्यत माध्यमिक शाळा येत्या शैक्षणिक वर्ष २००५–०६ पासून सुरू करण्याचे ठरविले आहे. त्यास शिक्षण मंडळ ठराव क्र. १११९ दि. ५/८/२००० ने अनुमती दिलेली आहे. माध्यमिक शाळा सुरू केल्यानंतर त्या प्रित्यर्थ होणारा खर्च हा महापालिका निधीमधून करावा लागणार आहे.

माध्यमिक शिक्षण पुरविणे ही बाब महापालिकेस बंधनकारक नाही. तसेच महापालिका क्षेत्रामध्ये खाजगी माध्यमिक शाळांची एकूण संख्या १०५ इतकी असून ती पुरेशी आहे. त्यामुळे महापालिकेने अशी शाळा सुरू केल्यास महापालिकेवर अनावश्यक आर्थिक बोजा पडणार आहे. त्यामुळे इतर आवश्यक विकास योजनांवर ताण पडेल. ही वस्तुस्थिती विचारात घेता महापालिकेने स्वत:च्या खर्चाने माध्यमिक शाळा सुरू करण्याची जरूरी दिसत नाही. या अभिप्रायासह शिक्षण मंडळाचा ठराव क्र. १११९ महासभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:– १३ दिनांक:–२०/५/२००५.

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेने स्वखर्चाने महापालिका शाळांमध्ये माध्यमिक शिक्षण सुरु करणे कामीचा महापालिका शिक्षण मंडळाचा ठराव क्र. १११९, दिनांक ५/८/२००० कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

***विषय क्र. ६:- नियोजन व विकास समितीच्या सदस्या श्रीमती सुजाता रिजवानी यांचा राजीनामा मंजुर करणे व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.***

***काही सदस्य :- पास-पास........***

मा. सचिव :—विरोधी पक्षाच्या सदस्यांचा विरोध आहे काय? नियोजन समितीच्या सदस्या श्रीमती सुजाता रिजवानी या राजीनामा देत आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—श्रीमती सुजाता रिजवानी यांचा राजीनामा मंजुर केला जावा. व त्यांच्या जागी श्री. मनोज साधवानी यांना त्या समितीवर घेतले जावे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आमचा विरोध आहे. शिवसेना—भाजपाचा विरोध आहे.

मा. सचिव :— तर मग मतदान घ्यावे लागेल.

मा. महापौर :— सचिव साहेब या विषयावर मतदान घ्या.

मा. सचिव :— जे या विषयाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या बाजुने २७ मते.........

१. श्री. लिंगे सुर्यकांत
२. श्रीमती कालानी ज्योती सुरेश
३. श्री. ऐडके गणपत
४. श्रीमती. शर्मा कमला
५. श्री. वलेचा पृथ्वी
६. श्री. रोहडा श्यामसुंदर
७. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८. श्रीमती मोना वनवारी

९. श्री. वनवारी किशोर नारायणदास
१०.श्री. जेसवानी सतराम पुनमदास
११.श्री. लुंड गोविंदराम
१२.श्रीमती खिलनानी भावना
१३.श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
१४.श्री. पमनानी ईश्वर
१५.श्री. नारायण पंजाबी
१६.श्री. मनोज साधवानी
१७.श्री. लबाना होशियारसिंग
१८.श्री. तलरेजा विनोद
१९.श्रीमती. रिझवानी सुजाता
२०.श्री. संजय बठिजा
२१.श्री. मोकल चंदाराम
२२.श्रीमती. दासानी मिनु
२३.श्री. यादव लालबिहारी
२४.श्री. प्रमोद टाले
२५.श्री. साधवानी मोहन
२६.श्री. मोहन बेहरानी
२७.श्री. जग्याशी राजु

मा. सचिव :— जे या विषयाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरोधात १२ मते............

१. श्रीमती मोकल सिमा
२. श्री. पुरस्वानी जमनादास
३. श्रीमती. कृष्णानी रेखा
४. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
५. श्री. गायकवाड दिलीप
६. श्रीमती बामणकर नंदीनी
७. श्रीमती खांडेकर प्रेमा
८. श्री. धनंजय बोडारे
९. श्री. पाटील विश्वनाथ
१०.श्रीमती. ससाणे लक्ष्मी
११.श्री. चौधरी राजेंद्र
१२.श्रीमती जयश्री सुर्वे

मा. सचिव :— ठिक आहे, बहुमताने?

मा. महापौर :—सदरचा विषय बहूमताने संमत करण्यात येत आहे.

*विषय क्र. ६:- नियोजन व विकास समितीच्या सदस्या श्रीमती सुजाता रिजवानी यांचा राजीनामा मंजुर करणे व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.*

प्रस्तावना:—

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये महापालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून*

विक्षोट समित्त्यांची नेमणुक करता येते . त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. ६४ , दिनांक २०.१.२००५ अन्वये ८ विक्षोट समित्त्यांची नेमणूक केली असून त्यामधील नियोजन व विकास समितीच्या ९ सदस्यांमध्ये श्रीमती सुजाता रमेक्ष रिजवानी यांची सदस्य म्हणून नेमणूक केली आहे

श्रीमती रिजवानी सुजाता रमेक्ष यांनी त्यांचेकडील दिनांक १०/५/२००५ रोजीच्या पत्रान्वये नियोजन व विकास समिती सदस्य पदाचा राजीनामा सादर केला आहे.

तरी श्रीमती रिजवानी सुजाता रमेक्ष यांचा राजीनामा मंजुर करणे कामी व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करण्याकामी महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्रः— १४ दिनांकः—२०/५/२००५.

सुचकाचे नाव :-श्री. किक्षोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्रीम. कमला ष्शर्मा

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार नियोजन व विकास समितीच्या सदस्या श्रीमती रिजवानी सुजाता रमेक्ष यांचा राजीनामा मंजुर करीत आहे व त्यांच्या जागी श्री. मनोज साधवानी यांची नेमणुक करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

विषय क्र. ७:- ष्शासनाच्या आदेक्षाप्रमाणे महापालिका सदस्यांना रुपये ४,०००/- प्रतिमाह मानधन व बैठक भत्ता रुपये १००/- (रुपये ४०० दरमहा कमाल मर्यादेपर्यंत) निक्ष्चित करणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— पास—पास............

मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर, श्रीमती प्रेमा खांडेकर, श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे या सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

## *विषय क्र. ७:- शासनाच्या आदेशाप्रमाणे महापालिका सदस्यांना रुपये ४,०००/- प्रतिमाह मानधन व बैठक भत्ता रुपये १००/- (रुपये ४०० दरमहा कमाल मर्यादेपर्यंत) निश्चित करणे.*

प्रस्तावना:—

महानगरपालिका सदस्यांना सद्यस्थितीत रुपये १००/— प्रति बैठक भत्ता व रुपये ३०००/— दरमहा मानधन (दुरध्वनी लेखन सामुग्री व टपाल या बाबीवरील खर्च लक्षात घेवून) देय आहे.

महानगरपालिकेतील सदस्याचे मानधन व बैठक भत्ता वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण २००४/४६८/प्र.क्र. ८४/०४/नवि—२०, दिनांक २४ जानेवारी, २००५ अन्वये राज्यातील महानगरपालिकेतील सदस्यांना रुपये ४०००/— प्रतिमहा मानधन (दुरध्वनी लेखन सामुग्री व टपाल या बाबीवरील खर्च लक्षात घेवून) व प्रती बैठक भत्ता रुपये १००/— (कमाल मार्यादा रुपये ४००/— दरमहा) वाढविण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. व सदर आदेश हे शासन निर्णयाच्या दिनांकापासुन लागू करण्यात आले आहेत.

सदर शासन आदेशाप्रमाणे महानगरपालिका सदस्यांना वाढीव मानधन व बैठक भत्ता अदा करण्याचा प्रस्तावास मंजूरी मिळणेस महासभेपूढे सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्रः— १५ दिनांकः—२०/५/२००५.

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा शासनाचे आदेशास अनुसरुन उल्हासनगर महानगरपालिकेतील सदस्यांना रुपये ४०००/— प्रतिमहा मानधन व प्रती बैठक भत्ता रुपये १००/— किंवा जास्तीत जास्त रुपये ४०० दरमहा निश्चित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

## *विषय क्र. ८:- अपंग व्यक्तींना एस.टी.डी. /पी. सीओ. बुथ करीता परवानगी व जागा देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे.*

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– आज पर्यंत जेवढे काही अर्ज आले आहेत ते मंजुर केले जावेत. व या अगोदर मालमत्ता विभागाने प्रतिमहा १५० रुपये एवढे शुल्क निश्‍चित केले होते. त्या हिशोबाने लागु केले जावे.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– व या अगोदर ज्यांना परवानग्या दिल्या आहेत, त्यांचे नुतनीकरण केले जावे. हे लोक त्यांना नुतनीकरण करुन देत नाहीत.

मा. सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :– मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त साहेब, व मा. सचिव साहेब व सभागृहात बसलेले सर्व बंधु–भगिनींनो, मी महापौरांना निवेदन करतो की, नवजिवन बॅके समोर २० फुट जागेमध्ये ३ पी.सी.ओ. बुथ ठेवले आहेत. ते नकली आहेत की, असली आहेत? मा. महापौरजी, येथे असे दर्शविले आहे की, २०० मीटर अंतरावर दुसरा बुथ ठेवला पाहिजे परंतु येथेतर २० फुटामध्ये ३ पी.सी.ओ. बुथ आहेत तर ते असली आहेत की नकली आहेत? तसेच .............. बाजुला एक मुतारी आम्ही मंजुर करुन घेतली आहे. त्याचा टी.डी.आर. नंबर आहे ११६४. तेथिल व्यापारी असोसिएनचे लोक वारंवार येत होते. मी दुसाने साहेबांना सांगितले की, आम्ही तेथे मुतारी मंजुर करुन घेतली आहे. आपण तेथे पी.सी.ओ. स मंजुरी कशी दिलीत? त्याबाबत आम्ही अर्ज दिले होते व मा. आमदार साहेबांनी मला बरीचशी मदत केली. दुसाने साहेबांकडे तर फाईलच गायब होवून जाते अशी ब–याचशा नगरसेवकांची तक्रार आहे. माझ्या अशा दोन फाईली त्यांच्याकडुन गायब झाल्या आहेत. धन्यवाद.

मा. सचिव :– पास?

मा. महापौर :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

## *विषय क्र. ८:- अपंग व्यक्तींना एस.टी.डी. /पी.सी.ओ. बुथ करीता परवानगी व जागा देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे.*

प्रस्तावना:–

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी अपंग व्यक्तींना एस.टी.डी. पी.सी.ओ. करीता यापुर्वी एकुण ६७ ठिकाणी ११ महिन्यांच्या कालावधीसाठी खालीलप्रमाणे जागा मंजुर करण्यात आलेल्या आहेत.

| वर्ष | मंजुर करण्यात आलेल्या एस.टी. डी.पी.सी.ओ.ची संख्या | विभाग | मासिक भाडे रक्कम | मुदत वाढ देण्यात आलेली आहे का? |
|---|---|---|---|---|
| १९८७–२००३ | ५८ | नगररचना | –– | नाही |
| २००३ ते आतापर्यंत | ०९ | मालमत्ता | रुपये १५०/– | नाही. |

या जागा वितरणासाठी सद्यस्थितीत खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात येते.

१)　　　　　　　　　　　　　　　　　　　　जागेची निवड ही अर्जदार स्वत: करुन महानगरपालिकेकडे खाली

अ)　अपंग असल्याबाबतचा पुरावा

ब)　नगरसेवक, उल्हासनगर महानगरपालिका यांचा जागेबाबतचा ना हरकत दाखला

क)　मागणी केलेल्या जागेचा कच्चा नकाशा

ड)　रेशनिंग कार्डची झेरॉक्स

इ)　शाळा सोडल्याचा दाखला / जन्म नोंदणी दाखला

२)　मालमत्ता विभागाकडुन जागेची पाहणी केल्यानंतर नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडुन प्रस्तावित जागेसंबंधी विकास आराखडा बाबत व वरीष्ठ पोलिस निरिक्षक, शहर वाहतुक नियंत्रण शाखा, उल्हासनगर रहदारीच्या दृष्टीने अभिप्राय मागविण्यात येतात.

३)　वरीलप्रमाणे जागा विकास योजनेने बाधित होत नसल्यास व रहदारीस अडथळा नसल्यास सदर जागा मा. आयुक्त सो. यांचे मंजुरीने अर्जदारास वितरीत करण्यात येते.

४)　सन २००३ पर्यंत हे काम नगररचना विभागाकडुन करण्यात येत होते. त्यानंतर हे काम मालमत्ता विभागामार्फत करण्यात येत आहे.

५)　वरील मंजुर करण्यात आलेल्यापैंकी फक्त ०९ अर्जदारांकडुन रुपये १५०/— प्रमाणे मासिक भाडे आकारण्यात आलेले आहे. त्यापुर्वी मंजुर करण्यात आलेल्या इतर बुथ धारकांकडुन कोणतीही भाडयाची आकारणी करण्यात आलेली नाही.

६)　अर्जदार यांनी मागणी केलेली जागा नियमाप्रमाणे नसल्यास अर्जदार पुन्हा अन्य ठिकाणी परवानगी मिळणेबाबत विनंती अर्ज करतात व त्यानुसार पुन्हा वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत येते.

७)　महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत खालीलप्रमाणे अर्ज प्रलंबित आहेत.

| | |
|---|---|
| दि. २५/६/२००३ पर्यंत नगररचना विभागाने दिलेल्या एकुण परवानगी | ५८ |
| नगररचना विभागाने नामंजुर केलेले एकुण अर्ज | |
| मालमत्ता विभागाकडे अदयापपर्यंत आलेले एकुण अर्ज | १२२ |
| अ) परवानगी देण्यात आलेले अर्ज | ०९ |
| ब) नामंजुर अर्ज | २५ |
| वरीलपैकी नगररचना विभागाकडे प्रलंबित अर्ज | १८ |
| वरीलपैकी शहर वाहतुक नियंत्रण विभागाकडे प्रलंबित अर्ज | —— |
| वरीलपैकी मालमत्ता विभागात प्रलंबित अर्ज | ६८ |
| उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालयाकडील प्रलंबित अर्ज | २ |

८)　**अर्ज प्रलंबित राहण्याची कारणे.**

अ)　अर्जदार यांनी मागणी केलेल्या बहुतेक जागा या शहराच्या गर्दीच्या भागातील व मुख्य चौकात असतात. व वितरणाच्या दृष्टीने योग्य नसतात.

ब)　एकाच जागी अनेक अर्जदारांकडुन जागा मागणी करण्यात येते.

क)　बहुतेक जागा या विकास योजनेतील रस्त्याच्या प्रयोजनाने बाधित असतात.

९)　**या पध्दतीमुळे**

अ)　जागा उपलब्ध होण्यास मोठा कालावधी लागतो व वेगवेगळया ठिकाणी प्रत्येक वेळेस ना हरकत दाखला मिळवावा लागतो.

ब)　यापुर्वी दिलेल्या टेलिफोन बुथपासुन महानगरपालिकेस कोणतेही उत्पन्न मिळत नाही.

क)　शहरातील रहदारीच्या व मुख्य चौकात एकापेक्षा अनेक बुथ असुनही तेथेच मोठया प्रमाणावर टेलिफोन बुथसाठी मागणी करण्यात येते. व पर्यायाने रहदारीस अडथळा होतो.

ड)　काही बुथधारक या ठिकाणी एस.टी.डी. बुथशिवाय इतर व्यवसाय करतात.

इ)　सबंधित भागातील नागरीकांकडुन काही बुथ बाबत तक्रारी प्राप्त होत असतात.

वरील सर्व कारणांमुळे शहरातील सार्वजनिक ठिकाणावरील एस.टी.डी.पी.सी.ओ. बुथला परवानगी देणेबाबत महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

एस.टी.डी.पी.सी.ओ. साठी जागा निश्‍चितीचे निकष :—

१) प्रस्तावित जागा ही किमान ६० फुट रुंद रस्त्यावर असणे आवश्यक आहे.
२) प्रस्तावित जागा ही रहदारीसाठी वापरात असलेल्या रस्त्याच्या भागांपैकी नसावी.
३) प्रस्तावित जागा फूटपाथ पैकी असल्यास ६ फुट पेक्षा जास्त रुंदीच्या पदपथावर असावी.
४) केबिनची साईज ४' X ४' पेक्षा जास्त व उंची ७ फुट पेक्षा अधिक असता कामा नये.
५) जागा कोणत्याही विकास योजना प्रस्तावाने बाधित नसावी.
६) दोन बूथ मधील अंतर किमान २०० मी. पेक्षा कमी असता कामा नये.
७) कोणत्याही चौकामध्ये किंवा दोन रस्त्याच्या कॉर्नरवरती बुथ अनुज्ञेय असणार नाही.

अर्जदाराचे पात्रतेचे निकष :—

१) अर्जदार हा अपंग असावा व अपंगत्वाचे प्रमाण ५० टक्केपेक्षा अधिक असावे तसा जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडील दाखला सादर करणे आवश्यक आहे.
२) त्याने स्वत: व्यवसाय केला पाहिजे. इतर कोणासही या जागेवर व्यवसाय करता येणार नाही.
३) अर्जदार हा उल्हासनगर शहराचा कायम रहिवासी असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याने अधिवास प्रमाणपत्र सादर केले पाहिजे.
४) अर्जदार हा दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील असणे आवश्यक आहे.
५) अर्जदाराचा उल्हासनगर शहरात इतर कोणताही व्यवसाय असता कामा नये.
६) कोणत्याही कुटुंबातील एकच व्यक्ती यश योजनेच्या लाभासाठी पात्र असेल.

भाडेपट्टयाचा कालावधी :—

१) भाडेपट्टयाचा कालावधी कमाल ३ वर्ष असावा.
२) रस्ता रुंदीकरण किंवा इतर कोणत्याही कामासाठी महानगरपालिकेस जागेची आवश्यकता भासल्यास ७ दिवसाची नोटिस देवून कालावधी कमी करण्यात येईल व अर्जदार स्वखर्चाने सदर जागा मोकळी करुन देईल.
३) रस्ता रुंदीकरण किंवा इतर कोणत्याही कामासाठी महानगरपालिकेस जागेची आवश्यकता लागल्यास पर्यायी जागेची जबाबदारी महानगरपालिकेची असणार नाही.

भाडेपट्टयाची रक्कम :—

१) अनामत रक्कम रुपये १८००/— एवढी अर्जदाराने भरणा केली पाहिजे.
२) प्रतिमाह किमान भाडे रुपये १५०/— प्रमाणे बुथधारकाने रक्कम भरणा करावयाची आहे. जागा मंजुर केल्यानंतर अर्जदाराने तीन महिन्याचे भाडे आगाऊ भरणा करावयाचे असुन दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत भाडयाची रक्कम भरणा केली पाहिजे.
३) भाडयाची रक्कम मुदतीत न भरणा केल्यास अनामत रक्कमेतुन ती वसुल करण्यात येईल व शर्त भंगाची कारवाई करण्यात येईल.

जागा निश्‍चितीची कार्यपध्दती :—

१) प्रत्येक प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्षेत्र अधिकारी व सबंधीत प्रभागाचा उप अभियंता यांनी आपल्या प्रभागातील वरील निकषास पात्र असणा—या जागा शोधुन त्यांची नकाशासह यादी तयार करावी. यापुर्वी दिलेल्या जागाही यासाठी विचारात घेण्यात याव्यात.
२) प्रभाग निहाय तयार झालेल्या यादीतील जागांची छाननही नगररचना विभागाने करुन विकास योजना प्रस्तावाबाबत अभिप्राय नमुद करावे.

३)	वरीष्ठ निरिक्षक वाहतुक शाखा यांचेकडुन या यादीस संमती घेण्यात यावी.
४)	वरील अभिप्राय नुसार उप–आयुक्त (मालमत्ता) यांनी जागा निश्चित कराव्यात.

**जागा वितरणाची कार्यपध्दती :–**

१)	सर्व प्रभागातील निश्चित करण्यात आलेल्या जागांची यादी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन पात्र अपंगांकडुन अर्ज मागविण्यात यावे.
२)	प्रत्येक अर्जदाराने महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कोणत्याही ३ जागेसाठी आपला पसंतीक्रम सादर करावा.
३)	यापूर्वी ज्यांनी जागा मागणीसाठी अर्ज केलेला आहे त्यांनाही यात संधी देण्यात यावी.
४)	यापुर्वी परवानगी देण्यात आलेल्या व ज्याची मुदत पुर्ण झालेली आहे. अशा सर्व बुथधारकांनी नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.
५)	अर्जदार वरील निकषास पात्र आहेत किंवा कसे? याची छाननी मालमत्ता विभागाने करावी.
६)	मागणी केलेल्या अर्जदारांची संख्या बुथच्या संख्येपेक्षा कमी असल्यास सर्व पात्र अर्जदारांना नियमित अटी व शर्तीवर जागा वितरीत करण्यात याव्यात.
७)	मागणी केलेल्या अर्जदारांची संख्या बुथच्या संख्येपेक्षा अधिक असल्यास पसंतीक्रम विचारात घेवुन व आवश्यकता असल्यास सोडत पध्दतीने वितरणाचे उप–आयुक्त यांना अधिकार असतील.

**जागा वापरासंबधीच्या अटी व शर्ती :–**

१)	अर्जदाराने स्वच्छतेसंबंधीच्या सर्व नियमांचे पालन केले पाहिजे.
२)	अर्जदाराने बुथला पिवळा रंग दिला पाहिजे.
३)	प्रत्येक बुथवर उल्हासनगर महानगरपालिका अनुज्ञेय अपंग एस.टी.डी.पी.सी.ओ. बुथ असा फलक लावणे बंधनकारक राहील.
४)	अर्जदारास एस.टी.डी.पी.सी.ओ. बुथ व्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही.
५)	आजुबाजुच्या नागरीकांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही. याची बुथधारकाने दक्षता घ्यावी.

**शर्तीचा भंग** :–खालील बाबी या शर्त भंग समजण्यात येतील.

१)	अर्जदार किंवा त्यांचे कुटुंबाऐवजी इतर व्यक्ती व्यवसायक करीत असल्यास
२)	एस.टी.डी.पी.सी.ओ. ऐवजी इतर व्यवसाय करीत असल्यास
३)	मासिक भाडे भरणा न केल्यास

वरीलप्रमाणे शर्तीचा भंग केल्यास अर्जदारास दिलेला परवाना रद्द करुन त्याने भरणा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

वरीलप्रमाणे शहरात सार्वजनिक जागेवर एस.टी.डी.पी.सी.ओ. बुथ साठी अपंग व्यक्तींना जागा उपलबध करुन देणे बाबतचे प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीनुसार महासभेकडुन मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्रः– १६</u>		<u>दिनांकः–२०/५/२००५.</u>

सुचकाचे नाव :–श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार अपंग व्यक्तींना एस.टी.डी. / पी.सी.ओ. बुथ चालविणे प्रयोजनार्थ जागा उपलब्ध करुन देणे कामी भाडे पट्टयाची रक्कम, जागा निश्चितीचे निकष, भाडे पट्टयाचा कालावधी,

अर्जदाराचे पात्रतेचे निकष, जागा वितरणाची कार्यपध्दती व जागा वापरासंबंधीच्या अटी व शर्ती इत्यादीचे प्रशासनाचे प्रस्ताव मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

***विषय क्र. ९:- श्री. अनिल पहुजा, शिपाई, कर विभाग यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे.***

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, या कर्मचा—याला जे निलंबित केले होते, त्याचे निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव महासभेपूढे आलेला आहे. याला निलंबित करुन किती महिने झाले आहेत व किती महिन्यानंतर हा प्रस्ताव महासभेपूढे आला आहे? कुण्याही कर्मचा—यास निलंबित केल्यापासुन ६ महिन्याच्या आत त्याचे निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव महासभेपूढे आला पाहिजे. परंतु यास निलंबित करुन एक वर्ष झाले आहे. तेव्हा कुठे त्याचा प्रस्ताव महासभेपूढे आला आहे. आयुक्त साहेब कुणालाही निलंबीत करतात तो त्यांचा अधिकार आहे, परंतु त्याबाबत कोणत्याही ६ महिन्याच्या आत महासभेपूढे प्रस्ताव ठेवून निलंबन कायम करुन घ्यायचे आहे. यास ६ महिन्यापेक्षा अधिक काळ झाला आहे. आयुक्त साहेब, यास एक वर्ष झाले आहे ना? म्हणुन तर महासभेचा हा अपमान आहे. हे निलंबन कायम नाही केले पाहिजे. यापुढे हे ज्या कुणालाही निलंबित करतील, त्याचे निलंबन आदेश हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार ६ महिन्याच्या आत कायम करुन घेतील. त्याच्याविरुध्द जी काही खातेनिहाय चौकशी करायची आहे, किंवा त्याने पैसे वगैरे भरलेले नसतील तर ते भरुन घ्यावेत. खातेनिहाय चौकशी सर्वात प्रथमची गोष्ट आहे. त्या विषयात आम्ही जावु इच्छित नाही. परंतु निलंबन आदेश कायम करण्यासाठी महासभेपुढे ६ महिन्याच्या आत आले पाहिजे. परंतु यास १ वर्ष झाल्यामुळे याचे निलंबन कायम केले नाही पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, एका कर्मचा—यास त्याच्या सेवा कालावधीत किती वेळा निलंबित केले जाते व त्यास किती वेळा पुर्वव्रत सेवेत सामावुन घेतले जाते. याबाबतीत काही नियम आहे?

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:— मा. महापौर महोदया, उप—महापौर व सन्माननिय सदस्य, तर असा काही नियम नाही आहे. जर कर्मचा—याची चुक असेल तर प्रशासन कितीही वेळ त्याच्यावर कारवाई करु शकते. त्याच्यावरील दोषारोपाचे स्वरुप पाहून त्यास सेवेंतुन कमीही केले जावु शकते. परंतु असे किती वेळा करावे याबाबत काही निश्चित अशी मर्यादा नाही.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :— वारंवार चुका केल्याने वारंवार निलंबित करुन त्यास पुन्हा पुन्हा कामावर घेतले जाते, तर याचा अर्थ काय? याबाबतीत काहीतरी धोरण असले पाहिजे, तीन वेळा निलंबित करायचे? चार वेळा निलंबित करायचे?

**श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** यास ६ महिन्यापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. परंतु एक गोष्ट येथे मी स्पष्ट करु इच्छितो, ६ महिन्याच्या आत महासभेपूढे प्रस्ताव आणला पाहिजे. परंतु काही कारण वश प्रशासनाकडुन असा प्रस्ताव महासभेपूढे आणला नाही तरीही त्याच्यावर जे दोषारोप ठेवले आहेत त्यांचे स्वरुप पाहून त्यास कार्योत्तर मंजुरी घेवुन कार्यवाही करु शकतो.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** प्रशासन एवढे ढिल्ले आहे की, समित्यांना लिपिक देत नाही, शिपाई देत नाही, जे निलंबित होतात, त्यांचे प्रस्ताव एकेक वर्षापर्यंत महासभेपूढे आणत नाहीत. बाकी प्रशासन काय करत आहे?

**श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—**सभागृह नेता यांनी जे म्हटले त्याबाबत मी सांगु इच्छितो..........

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** ठराव पारीत होतात त्यांची अंमलबजावणी होत नाही. काही कामे मंजुर होतात ती होत नाहीत.

**श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—**सभागृह नेता यांनी आता जे मुद्दे येथे मांडले त्या बाबत मी सांगु इच्छितो, महानगरपालिका २१ ऑक्टोंबर, १९९६ रोजी स्थापन झाली. तेव्हा पासुन कोणत्या विभागास किती कर्मचारी दयायचे हे अदयापपर्यंत नेमुन दिलेले नाही. ३० एप्रिल रोजी आम्ही आदेश काढले आहेत. त्या हिशोबाने कोणत्या विभागात किती कर्मचारी आवश्यक आहेत याबाबत माहिती मागवली आहे. स्मशानभुमीबाबतीत जे काही बोलले गेले, तेथिल आवश्यकता पाहुन तेथे कर्मचारी वर्ग पुरविला जाईल. हे पहिल्यांदाच होत आहे. याअगोदर असे कर्मचा—यांचे वाटप झालेले नाही. जेथे—जेथे आवश्यकता आहे, त्याप्रमाणे कर्मचारी वर्ग पुरविला जात आहे. आणि त्या हिशोबाने कामामध्ये जर थोडी फार दिरंगाई होत असेल तर कारण की येथे प्रशिक्षित कर्मचारी नाहीत, अनुभवी कर्मचारी नाहीत. आपणाकडे पद सोपान श्रेणीची जी पदे आहेत ती अतिशय कमी आहेत. अधिका—यांचे जे कॅडर आहे ते पण कमी आहे. यासाठी एखादया विभागात जर जबाबदार अधिकारी राहिला तर या अडचणी कमी होतील. परंतु तसे नसल्यामुळे या अडचणी येत आहेत. परंतु आता सर्वीकडे कर्मचारी नेमुन दिल्यानंतर या अडचणी कमी होतील.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** आता आपण मागासवर्गीयांच्या अनुशेषा अंतर्गत किती कर्मचा—यांची भरती केली आहे? एक दीड वर्षामध्ये मागासवर्गीयांच्या अनुशेषांतर्गत आपण किती कर्मचा—यांची भरती केली आहे?

**श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—**अनुशेषाचा जो हिशोब असतो, तो मंजुर पदांच्या ५२ टक्के एवढा असतो.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** १५०, २०० असे किती कर्मचारी आपण नेमले आहेत?

**श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—**प्रत्यक्ष आकडा आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु १५० पर्यंत कर्मचा—यांची नेमणुक केली आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** १५० कर्मचा—यांची भरती केली आहे. आणखी दीड—दोन हजार पाहिजेत काय?

**श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** नाही, शासनाचे धोरण आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** आपण १५० कर्मचा—यांची भरती केली ते वाजवी पेक्षा जास्त आहेत. आपण परिणाम दया ना? पहिले कर्मचारी वर्ग बराचशा होता, त्यात आणखी १५० कर्मचा—यांची भरती केली, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असतांनाही १५० कर्मचा—यांची भरती केली. त्यानंतर सुध्दा कामाचा परिणाम दिसुन येत नाही. हे अतिशय वाईट आहे.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—शासनाच्या धोरणानुसार ही भरती केली आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— अमुक एका विभागाचे कर्मचारी काढुन दुस—या विभागात टाकतात, तिकडचे काढुन इकडे टाकतात.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:— आपले हे म्हणणे चुकीचे आहे, शासनाचे जे धोरण असते आपणांस त्यानुसार चालावे लागते. प्रत्येक ३ महिन्यात आपणांस त्यांना अहवाल दयावा लागतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आज भलेही आम्ही सत्ताधारी पक्षात असोत, परंतु जो अन्याय होत आहे. १५० कर्मचा—यांची भरती केल्यांनतर सुध्दा आपण कारणे सांगतात.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—आता सुध्दा आपणाकडे जवळ—जवळ ६५० पदे रिक्त आहेत.

मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— ती आपण भरा. कायदा काय आहे आपणांस माहित आहे? तो आज मी आपणांस सांगतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात स्पष्टपणे लिहिले आहे की, जी काही आपण मागासवर्गीय अनुशेषाची पदे भराल जेवढया काही मुलाखती घ्याल, मुलाखती घेतल्यानंतर महासभेपूढे आणाल की, अमुक हा प्रथम क्रमांकावर तर अमुक हा द्वितीय क्रमांकावर आहे. महासभा निर्णय घेईल की पहिल्या क्रमांकावरील उमेदवारास सेवत घ्यायचे आहे. आपण लोक निवड करुन निवड झालेल्या उमेदवारांची नावे महासभेपूढे आणतात. अमुक—अमुक यांची नियुक्ती केली आहे हे आपल्या माहितीसाठी, महासभेच्या माहितीसाठी प्रस्तावित. कायदा असा नाही, कायदा असा आहे की, आपण कोण—कोणत्या लोकांची भरती केली? समजा, ११ उमेदवार येतात, या ११ उमेदवारांपैकी प्रत्येक उमेदवाराकडे काय—काय पात्रता होती त्याचा सविस्तर अहवाल महासभेपूढे ठेवला पाहिजे. त्याबाबतीत महासभा निर्णय घेईल या कर्मचा—यांना सेवेत घ्यायचे आहे किंवा नाही? आपण एक समिती तयार केली आहे. हा त्याचा नातेवाईक तो त्याचा नातेवाईक अशा लोकांची आपण भरती केली आहे व त्यांचे प्रस्ताव महासभेपूढे कायम करुन घेता.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—मी येथे एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये या कामी जी समिती गठित करायची आहे त्यासाठी स्पष्ट आदेश आहेत. ती समिती महासभेपूढे शिफारस करते. महासभेच्या मान्यतेनंतरच आपण आदेश देतो. तर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमामध्ये ती तरतुद आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— याबाबत मी सचिव साहेबांना विचारु इच्छितो, सचिव साहेब आपण कायदा काय आहे ते सांगा. जी नविन भरती होते, त्याची नावांची संपुर्ण यादी महासभेपूढे येते. मुलाखतीमध्ये पहिल्या क्रमांकावर कोण होत, दुस—या क्रमांकावर कोण होत, याची यादी येते. त्यातुन महासभा निर्णय देते. कुणाला नियुक्ती दयायची? असे आहे की नाही? ती नियुक्त केलेल्या कर्मचा—यांची यादी येते की अमुक—अमुक याची नियुक्ती केली आहे ती कायम करा. कृपया आपण या बाबतीतील कायदा सांगा. मा. महापौरांना माझी विनंती आहे की याबाबतचा कायदा काय आहे ते सांगण्याबात सचिव साहेबांना सांगावे. महासभेची दिशाभुल केली जात आहे.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:— मा. महापौर महोदया, ...........

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—सचिव साहेब कायदा सांगत आहेत.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—त्यांच्या अगोदर मला बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मी महापौरांना विनंती केली आहे. त्यांनी सचिव साहेबांना आदेश दिला तर ........

<u>मा. सचिव :–</u> कायदा असा आहे की, जर कुणाला नियुक्त करायचे आहे, त्यासाठी एक निवड समिती असते. निवड समिती उमेदवारांच्या पात्रता व इतर बाबी पाहुन त्यांची एक प्राधान्य क्रमवारी नुसारची यादी तयार करते. पात्र कोण वाटते, सर्वात चांगला उमेदवार कोण आहे? दुस–या–तिस–या क्रमांकावर कोण आहे? त्या पात्रतेनुसार व पसंतीनुसार प्राधान्य क्रमवारीची यादी तयार करुन महासभेपुढे ठेवली पाहिजे. व त्याच बरोबर ही सुध्दा शिफारस असली पाहिजे, कोण लायक आहे, कुणाची निवड केली पाहिजे. त्यानंतर महासभेत निर्णय घ्यायचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> आमच्या समोर अशी यादी येते का? याचाही खुलासा व्हावा. थेट निवड झालेल्या उमेदवारांची थेट यादी येते.

<u>श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>मा. महापौर महोदया, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार याबाबत जी निवड समिती तयार केली जाते, या समितीकडुन त्या उमेदवारांची पात्रता/ गुणवत्ता पाहिली जाते. त्यानंतर त्यांची गुणवत्ता यादी तयार केली जाते. ती गुणवत्ता यादी आपल्या समोर येते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> आयुक्त साहेब आपणांस सचिव साहेबांनी काय सांगितले. सविस्तर माहिती, किती लोकांच्या मुलाखती घेतल्या? ११ लोकांमधील पात्र उमेदवार कोण आहे? त्यांची आपण शिफारस करणार. परंतु त्या सर्वांची यादी महासभेपूढे यावयास पाहिजे. परंतु अशी यादी आमच्यापुढे कधी आली नाही.

<u>श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>आम्ही आपणा समोर जी काही यादी पाठविली आहे ती प्राधान्य यादीच पाठविली आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>नियुक्ती प्राधिकारी कोण आहे? आपण आहात की, महासभा? नियूक्ती प्राधिकारी कोण आहे? आपण आहात?

<u>श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>महासभा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> तर आपण अशी यादी कधी आमच्या समोर ठेवली आहे? भरती करुन थेट यादी आमच्या समोर ठेवतात.

<u>श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>जेव्हा आम्ही गोषवारा महासभेपूढे पाठवितो त्याबरोबर संपुर्ण यादी पाठवितो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> यापुढे संपुर्ण माहिती महासभेपूढे आली पाहिजे.

<u>श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>पुर्ण माहिती महासभेपूढे येते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> नाही येत.

<u>श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>प्राधान्य क्रमांकानुसारची यादी महासभेपूढे येते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> १० लोकांनी मुलाखती दिल्या, १५ लोंकांनी मुलाखती दिल्या त्याबाबतची माहिती कधीही महासभेपूढे येत नाही. या–या लोकांनी मुलाखती दिल्या तेथिल हे–हे लोक पात्र आहे अशी आपण शिफारस करु शकतात. परंतु नियुक्ती प्राधिकारी महासभा आहे.

<u>श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–</u>कोणत्या पदासाठी मुलाखती झाल्या? त्यांची प्राधान्यक्रमानुसारची यादी तयार केली आहे व ती यादी महासभेपुढे येते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– नाही येत.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–या अगोदर आम्ही अशी यादी पाठविलेली आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– दाखवा.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–बिल्कुल पाठविले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– पुढील महासभेत यांनी सर्वांची यादी दाखवावी. आम्हांला त्या सर्वांची यादी पाहायची आहे.

मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :–मा. आयुक्त साहेब, या अगोदर महासभेपूढे असे सुध्दा प्रकरण आले होते की, त्याची आपण नियुक्ती केली होती त्याच्याकडे पुर्ण गुणवत्ता प्रमाणपत्र नव्हती. व त्यास निलंबित करण्याचा प्रस्ताव आपण आणला होता. व ती व्यक्ती न्यायालयात गेली होती.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–त्याबाबत मी सांगु इच्छितो जेव्हा आम्ही सेवायोजन कार्यालयाकडुन यादी मागविली होती. त्यांच्याकडे कागदपत्र नव्हती. जेव्हा मुलाखतीच्या वेळी प्रमाणपत्रे तपासली जातात, परंतु त्यावेळी समितीची चुक झाली. ती चुक आम्ही सुधारली आहे. ती व्यक्ती न्यायालयात सुध्दा गेली होती, परंतु न्यायालयाने त्याचे म्हणणे ग्राहय धरले नाही. चुक झाली असेल तर ती सुधारण्यासाठी न्यायालय सुध्दा अनुमती देते. आणि यासाठीच आम्ही ती चुक सुधारली आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– ती फक्त पाचच प्रकरणे महासभेपूढे आली होती त्या व्यतिरिक्त बरीचशी प्रकरणे आहेत ती जी महासभेपुढे आली नाहीत. अशी बरीचशी प्रकरणे आहेत ती आपण लपवुन ठेवली आहेत. पात्र नाहीत, प्रमाणपत्रे दिली नाहीत अशी बरीचशी प्रकरणे आपण महासभेपूढे आणली नाहीत. त्यास आपण दोषी आहात.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :– मा. महापौर महोदया, येथे अशा बरेचशा केसेस आहेत की, जे कर्मचारी निधन पावले आहेत, त्यांच्या जागी त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी दिली पाहिजे परंतु त्यांना दिली जात नाही. श्री. मिरचुमल रिझवानी यांच्या घरी खाण्यास काही नाही परंतु त्यांच्या कुटुंबियांना आपण कामावर घेत नाहीत.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–मा. महापौर महोदया, अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज केलेल्या ३८ लोकांचे आपणाकडे अर्ज आहेत. त्यामधील अधिकतर लोक अनुसुची जाती जमातीचे लोक आहेत, ती पदे आपणाकडे खाली नाहीत. मात्र खुल्या संवर्गातील ७ पदे खाली आहेत त्याबाबतीचा प्रस्ताव लवकरच आपल्या समोर आणला जाईल.

**मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी, श्रीमती नंदिनी बामणकर, श्रीमती प्रेमा खांडेकर, श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– मा. महापौर, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब हे जे निलंबन केले आहे, त्यास ६ महिन्यापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. तर सहा महिन्यानंतर त्यास काही पगार दिला जातो का? किती टक्के पगार दिला जातो? ७५ टक्के पगार दिला जात असेल तर महापालिकेचे नुकसान आहे ना? ७५ टक्के पगार देणे व घरी बसविणे. तर याने फक्त २४ दिवस उशिरा पैसे भरले आहेत. तर २४ दिवस उशिरा पैसे भरल्याबाबत किती दिवसाची शिक्षा झाली पाहिजे? याबाबतीत सुध्दा निर्णय घेतला पाहिजे.

श्री. लोणारे, आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:–अशा शिक्षेबाबत स्पष्टपणे तरतुद नाही. परंतु सक्षम प्राधिकारी शिक्षा ठरवु शकते.

**मा. महापौर :–**आयुक्त साहेब, आमच्या सर्व सन्माननिय सदस्यांच्या अशा काही तक्रारी असतात त्यामध्ये असे दिसून आले आहे की, महासभेचे अधिकार सुध्दा कमी करण्याचे आपण प्रयत्न करत असता व स्थायी समितीचे ७५ टक्के अधिकार आपण कमी केले आहेत. मी आपणांस निवेदन करते की, स्थायी समिती व महासभेचे जे अधिकार आहेत ते वापरण्याचे आपण प्रयत्न करु नका. असे जे काही प्रस्ताव असतील ते आपण महासभेपूढे आणावेत.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** श्री. अनिल पहूजा यांनी जो अपहार केला आहे त्याची रक्कम आहे २ लाख ७४ हजार , ही काही मामुली रक्कम नाही. प्रशासनाचे काम आहे की, कोणताही निलंबन आदेश कायम करण्यासाठी ६ महिन्याच्या आत महासभेपूढे आणणे. प्रशासनाने हा आदेश महासभेपूढे मंजुरीसाठी आणण्यास उशिर केला आहे, असे यापुढे होता कामा नये. परंतु प्रशासनाने उशिर केला आहे म्हणून यांनी जो अपहार केला आहे तो कमी नाही. तो माफ होत नाही. जसे की, भ्रष्टाचारास आम्ही या अगोदर सुध्दा विरोध केला आहे. व हा सुध्दा लहानसा भ्रष्टाचारच आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** पैसे त्यांनी भरले आहेत.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** परंतु आपण चुकीची सवय लावत आहोत. महापालिकेचे पैसे वापरायचे नंतर भरायचे जर कारवाईची वेळ येत असेल तर अशा प्रकारे आपण चुकीची सवय लावत आहोत. आम्ही या विरोधात आहोत. चोरी कोणती, मग ती लहान असो की मोठी, चोरीही चोरीच असते. गुन्हेगारास जर लहानशी चोरी सहजासहजी पचत असेल तर मोठयात मोठी चोरी करण्यात त्याचे मनोबल वाढते. असे मनोबल वाढु नये अशी आमची इच्छा आहे. या निलंबन आदेशाच्या आम्ही बाजुने आहोत. परंतु यापुढे सहा महिन्याच्या नंतर अशी कारवाई होता कामा नये.

**मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :–** ही चोरी नाही, चुक आहे.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**सचिव साहेब, आम्ही या विषयाच्या बाजुने आहोत.

**मा. सचिव :–**आपण प्रस्तावाच्या बाजुने आहात तर मग मतदान घ्यावे लागेल.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** आमचे सुध्दा असे म्हणणे आहे की, त्याच्या विरुध्द जी काही खातेनिहाय चौकशी करायची आहे ती त्यांनी करावी. आम्ही त्यास सहकार्य करत नाही. परंतु महासभेमध्ये त्यांचा प्रस्ताव ६ महिन्याच्या आत यावयास पाहिजे होता. तो एक वर्षापर्यंत आला नाही. याचा अर्थ असा आहे की, प्रशासनाने त्यास मदत केली आहे. जाणीव पुर्वक हा विषय १ वर्षापर्यंत महासभेपूढे आणला नाही. यासाठी आम्ही हा विषय कायम करत नाही. भलेही विरोधी पक्षाचा विरोध आहे तर आपण मतदान घ्या.

**मा. सचिव :–** जे सन्माननिय सदस्य निलंबन कायम करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

## निलंबन कायम करण्याच्या बाजुने ८ मते

१. श्रीमती मोकल सिमा
२. श्री. पुरस्वानी जमनादास
३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
४. श्री. गायकवाड दिलीप
५. श्री. धनंजय बोडारे
६. श्री. पाटील विश्वनाथ
७. श्री. चौधरी राजेंद्र
८. श्रीमती जयश्री सुर्वे

<u>मा. सचिव :–</u>:– जे सन्माननिय सदस्य निलंबन कायम करण्याच्या बाजुने नाहीत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत. श्री. सतरामदास जेसवानी आपण आपली भुमिका स्पष्ट करावी.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:–</u> तटस्थ................

## तटस्थ

१. श्री. सतरामदास जेसवानी
२. श्री. मोहन बेहरानी
३. श्री. मोहन साधवानी

## निलंबन कायम करण्याच्या विरोधात २५ मते

१. श्री. लिंगे सुर्यकांत
२. श्रीमती कालानी ज्योती सुरेश
३. श्री. ऐडके गणपत
४. श्रीमती. शर्मा कमला
५. श्री. वलेचा पृथ्वी
६. श्री. रोहडा श्यामसुंदर
७. श्री. गुप्ता प्रभुनाथ
८. श्रीमती मोना वनवारी
९. श्री. वनवारी किशोर नारायणदास
१०. श्री. लुंड गोविंदराम
११. श्रीमती खिलनानी भावना
१२. श्री. खेमाणी देवेंद्रसिंग
१३. श्री. पमनानी ईश्वर
१४. श्री. नारायण पंजाबी
१५. श्री. मनोज साधवानी
१६. श्री. लबाना होशियारसिंग
१७. श्री. तलरेजा विनोद
१८. श्रीमती. रिझवानी सुजाता
१९. श्री. संजय बठिजा
२०. श्री. मोकल चंदाराम
२१. श्रीमती. दासानी मिनु
२२. श्री. यादव लालबिहारी
२३. श्री. प्रमोद टाले
२४. श्री. जग्याशी राजु
२५. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

<u>मा. महापौर :–</u>सदरचा विषय बहुमताने पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे.

***<u>विषय क्र. ९:-</u> श्री. अनिल पहुजा, शिपाई, कर विभाग यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे.***

<u>प्रस्तावना:–</u>

श्री. अनिल ईश्वरलाल पहुजा, शिपाई हे कर विभागात कार्यरत असतांना त्यांनी मालमत्ता करापोटी दि. ९/२/२००४ ते २०/२/२००४ पर्यंत वसुल केलेली रूपये २,७४,१३२/– इतकी रक्कम स्वत: जवळ ठेवून दिनांक १४/३/२००४ रोजी महापालिका कोषागारात भरणा केली असल्याने त्यांनी दि. ९/२/२००४ ते २०/२/२००४ या कालावधीत वसूल केलेल्या रक्कमेचा अपहार केल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे त्यांना कार्यालयीन क्र उमपा/साप्रवि /आस्था/मुली/१६६/०४, दि. १७/६/२००४ अन्वये निलंबीत करणेत आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोट कलम (१) (ब) अन्वये श्री. अनिल पहुजा, शिपाई (निलंबीत) यांचे निलंबन कायम करणेसाठी प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी महासभेपुढे प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र:– १७ — दिनांक:–२०/५/२००५.

सुचकाचे नाव :–श्री. होशियारसिंग लबाना
अनुमोदकाचे नाव :–श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिका सेवेतील श्री. अनिल पहूजा, शिपाई , कर विभाग यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करत नाही.

## कारण ————

१. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (१) (ब) प्रमाणे महापालिकेने, आयुक्तांनी दिलेल्या निलंबनाच्या तारखेपासुन सहा महिन्याच्या मुदतीत निलंबन कायम केले पाहिजे. नाहीतर ते निलंबन संपृष्टात येते.
२. प्रस्तृत प्रकरणी आयुक्तांतर्फे श्री. अनिल पहूजा यांना दिनांक १७/६/२००४ रोजी निलंबित करण्यात आले होते व प्रशासनातर्फे सदरहू निलंबन कायम करण्यासाठी महासभेपूढे ११ महिन्यानंतर प्रस्ताव आणला आहे.
३. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे सदरहू निलंबन ६ महिन्याची मुदत संपल्यानंतर संपुष्टात आले असे मानण्यात येईल.
४. निलंबनाच्या तारखेपासुन ६ महिन्यानंतर महापालिकेने निलंबन कायम केले पाहिजे अशी कुठेही तरतुद नाही.
५. कायदयाच्या कक्षेबाहेर जावून अपेक्षित कार्योत्तर मंजुरी देता कामा नये.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

बहूमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :–विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

विषय क्र. १० :–महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट पुणे याचेंतर्फे उल्हासनगर महानगरपालिकेची व्दितीय पारीतोषीकासाठी राज्य पातळीवर निवड झाल्याने विद्युत विभागप्रमुख व त्यांचे कर्मचारी यांना गौरव प्रदान करण्याबाबत ठरविणे.

काही सदस्य :– पास–पास.............,

<u>मा. सचिव :–</u> त्यांना कोणता गौरव प्रदान करणार?

<u>मा. महापौर :–</u>महानगरपालिकेला याबाबत गर्व आहे विदयुत विभागाचे आमचे सर्व कर्मचारी तसेच आमचे श्री. मुकेश आयलानीजी ज्यांना मेडा, महाराष्ट्र एनर्जी डेव्हलोपमेंट एजन्सी कडुन विज वापरात कपात केल्यामुळे हा जो पुरस्कार मिळाला आहे, दुसरा क्रमांकाचा पुरस्कार आमच्या उल्हासनगर महागनरपालिकेला मिळाला आहे याचा आम्हाला अभिमान आहे. २००१ पासुन २००४ पर्यंत ७६ लाखाची बचत विदयुत विभागाने केली आहे. त्याचे श्रेय श्री. मुकेश आयलानी व त्यांच्या पुर्ण संघास जाते. माझे असे आदेश आहे की, श्री. मुकेश आयलानी यांना दोन आगाऊ अतिरिक्त वेतनवाढी दिल्या जाव्यात. व कर्मचा–यांना एक आगाऊ अतिरिक्त वेतनवाढ दिली जावी.

<u>मा. सचिव :–</u> पास, सर्व संमतीने?

<u>मा. महापौर :–</u>सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय क्र. १०</u> :– महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट पुणे याचेंतर्फे उल्हासनगर महानगरपालिकेची व्दितीय पारीतोषीकासाठी राज्य पातळीवर निवड झाल्याने विद्युत विभागप्रमुख व त्यांचे कर्मचारी यांना गौरव प्रदान करण्याबाबत ठरविणे.

**प्रस्तावना :**

आपल्या महानगरपालिकेतील विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या अथक परिश्रमामुळे आपल्या महानगरपालिकेस महाउर्जा महाराष्ट्र शासन उपक्रम यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या उर्जा संवर्धनेतंर्गत महापालिका क्षेत्रात सन २००१–०२, सन २००२–०३, सन २००३–०४ मध्ये केलेल्या कामगिरीबद्दल सन २००४ या वर्षासाठीचा व्दितीय पुरस्कार मा.ना.श्री. विनय कोरे अध्यक्ष, महाउर्जा व अपारंपारिक उर्जा स्तोत्र मंत्री (Non Conventional Sources) महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि. १३/०५/२००५ रोजी प्रदान केलेला आहे. तसेच राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानातंर्गत झालेल्या स्पर्धेत विद्युत विभांगानी गुणवत्ता व्यवस्थापन पध्दती यांची अंमलबजावणी केल्यामुळे आपल्या महानगरपालिकेला मा.आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी प्रथम पारितोषिक घोषित केले आहे. त्यामुळे आपल्या महानगरपालिकेची प्रतिमा महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर उचांवली आहे.यामध्ये विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचा मोलाचा वाटा आहे. महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष कामगिरी केली असल्याने म.ना.से.नि. (वेतन) १९८१ मधिल नियम क्र. ४० नुसार कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना दोन आगाउ वेतनवाढी व इतर अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्येकी एक आगाउ वेतनवाढ दि. ०१/१०/२००४ पासुन खालील अटींच्या अधिन राहुन मंजुरी साठी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) उल्हासनगर महानगरपालिकेत विद्युत विभागात सतत दोन वर्षे सेवा करणा–या अधिकारी /कर्मचारी यांना आगाउ वेतनवाढी/वेतनवाढ देय राहील.

२) दि. ३१/०३/२००४ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत विभागात कार्यरत असणा–या अधिकारी /कर्मचा–यांना आगाउ वेतनवाढी/वेतनवाढ देय राहील.

३) आगाउ वेतनवाढी/वेतनवाढ दि. ०१/१०/२००४ पासुन देय राहील.

४) सदरच्या आगाउ वेतनवाढीमुळे त्यांच्या नियत वेतनवाढीच्या तारखेवर काहीही परिणाम होणार नाही व या आगाउ वेतनवाढीनंतरची पुढील वेतनवाढ , वेतनवाढीच्या नियत तारखेस देय राहील.

<u>महासभा ठराव क्र.</u> १८ <u>दिनांक :</u> २०/५/२००५.

सुचकाचे नाव : श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव : श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेप्रमाणे विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना दि. ०१/१०/२००४ पासुन आगाउ वेतनवाढ देण्याचे प्रस्ताव मान्य करीत आहे व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही

अनुमोदकाची सही

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्व साधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

***विषय क्र. ११:- गुणवंत सफाई कामगारांना प्रत्येकी रुपये ५०० याप्रमाणे व इतर सत्कार समारंभ कार्यक्रमासाठी रुपये ५२ ,०००/- यास प्रक्षासकिय व वित्तीय मान्यता देणे.***

काही सदस्य :— पास—पास.................

मा. सचिव :— पास, सर्व—संमतीने?

मा. महापौर :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

***विषय क्र. ११:- गुणवंत सफाई कामगारांना प्रत्येकी रुपये ५०० याप्रमाणे व इतर सत्कार समारंभ कार्यक्रमासाठी रुपये ५२ ,०००/- यास प्रक्षासकिय व वित्तीय मान्यता देणे.***

प्रस्तावना:—

राज्य शासनाने संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छतेचे महत्वाकांक्षी अभियान राज्यभर सुरु केले आहे. या अभियानांतर्गत सन २००४ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने सुध्दा स्वच्छतेचे पारितोषिक पटकाविले आहे. सदर अभियानात उल्हासनगर शहर स्वच्छ ठेवणेकामी प्रशासनातील अधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांची महत्वाची भुमीका असली तरी प्रत्यक्ष गल्ली—बोळात मेहनतीने साफसफाईचे काम करणा—या सर्व सफाई कामगारांना या पारितोषिकाचे श्रेय जाते.

सदर अभियान व शहर स्वच्छतेचे काम अधिक चांगले होणेसाठी सफाई कामगारांमध्ये कामाबाबत निकोप स्पर्धा निर्माण व्हावी व त्यातुन शहर स्वच्छ व निरोगी ठेवणेसाठी हातभार लावणे या उद्देशाने गुणवंत सफाई कामगारांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात यावे, अशी सुचना मा. महापौर यांनी केली आहे. त्या अनुषंगाने सर्व स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्येक पॅनलमधील तीन गुणवंत सफाई कामगार व महापालिका मुख्यालयातील दोन असे एकूण ७८ नावे या कार्यालयास सादर केली आहेत.

सदर गुणवंत सफाई कामगार प्रत्येकी रुपये ५००/— याप्रमाणे व इतर सत्कार समारंभ कार्यक्रम खर्च असा अंदाजित खर्च रुपये ५२०००/— अपेक्षित आहे. सदरचा खर्च महापालिका कोषागारातुन व्हावा असे महासभेपूढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:— १९ दिनांक:—२०/५/२००५.

सुचकाचे नाव :—श्रीमती मोना वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार गुणवंत सफाई कामगारांना प्रत्येकी रुपये ५००/— याप्रमाणे व सत्कार समारंभ कार्यक्रमासाठी रुपये ५२,०००/—खर्चाच्या प्रशासकीय प्रस्तावास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

***<u>विषय क्र. १२:-</u> प्रकल्पग्रस्तांना महापालिकेच्या क व ड वर्ग पदांवर प्राथम्य क्रमाने नियुक्ती देणे कामी शासकिय धोरण अंगिकार करणे.***

<u>काही सदस्य :—</u> पास—पास.................

<u>मा. सचिव :—</u> पास, सर्व—संमतीने?

<u>मा. महापौर :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

***<u>विषय क्र. १२:-</u> प्रकल्पग्रस्तांना महापालिकेच्या क व ड वर्ग पदांवर प्राथम्य क्रमाने नियुक्ती देणे कामी शासकिय धोरण अंगिकार करणे.***

<u>प्रस्तावना:—</u>

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रकल्प—१००२/मुस १४२/प्र.क्र. २४/२००२/१६ अ, दिनांक २०/३/२००२ अन्वये प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबुन असणा—या व्यक्ती यांना शासन सेवा, शासन पुरस्कृत महामंडळे, शासनाकडुन सहाय्य मिळणारी महामंडळे, शासनाने चालविलेल्या संस्था , जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांच्या आस्थापनेवरील गट — क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अखत्यारीतील पदे वगळून) आणि गट —ड मधील पदांवरील नेमणुकीमध्ये एकूण जागांच्या ५ टक्क्यांपर्यंत सर्वोच्च प्राथम्यक्रम देण्यात आला आहे. त्यामध्ये दिनांक १७/११/१९९४ च्या शासन निर्णयानुसार भुकंपग्रस्तांचाही समावेश करण्यात आला आहे.

शासनाने दिनांक ७ जानेवारी, १९९७ च्या परिपत्रकानुसार प्राथम्यक्रमाने प्रकल्पग्रस्तांसाठी असलेली ५ टक्के पदे भरतांना नियुक्ती प्राधिका—यांनी हा सर्वोच्च प्राथम्यक्रम एकुण संवर्ग बळाच्या किमान ५ टक्के पदे पर्यंत देण्यात यावा व सदर ५ टक्के पदे भरतांना मागासवर्गीयांच्या आरक्षणाला बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी व त्यासाठी प्रकल्पग्रस्त व्यक्तींना प्राथम्यक्रम असलेल्या या ५ टक्के पदासाठी नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे परस्पर अर्ज करता येईल व नियुक्ती प्राधिका—यांनी प्रकल्पग्रस्त व्यक्तींच्या नियुक्त्या या त्यांच्या आस्थापनेवरील पदांच्या आढाव्याची कार्यवाही पुर्ण करुन करण्यात याव्यात.

दिनांक ३० मे, २००३ च्या शासन निर्णयामध्ये प्रकल्पग्रस्त व्यक्तींची वर्ग –क व वर्ग –ड वरील पदांवर नियुक्ती करतांना उच्चतम वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३५ व मागासवर्गीयांसाठी ४० वर्षापर्यंत शिथील करण्यात आलेली आहे.

शासनाने प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबुन असणा–या व्यक्तींना वरील आदेशानुसार शासन सेवेत एकुण पदांच्या ५ टक्के पदे भरावयाचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार या महापालिकेतर्फे राबविण्यात येणारे प्रकल्प उदा. पाणी पुरवठा योजना, डंपिंग ग्राऊंड यांसारख्या प्रकल्पांमध्ये बाधित झालेल्या कुटुंबांना अथवा त्यांच्यावर अवलंबुन असणा–या व्यक्तींनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या ५ टक्के आरक्षणामध्ये महापालिकेच्या वर्ग क व वर्ग ड वरील पदांवर प्राथम्यक्रमाने नियुक्ती देण्यात यावी, असे महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्रः– २० दिनांकः–२०/५/२००५.

सुचकाचे नाव :–श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :–श्रीमती सिमा मोकल

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार शासनाच्या धोरणास अनुसरुन महापालिका सेवेत प्रकल्पग्रस्त व्यक्ती व त्यांच्यावर अवलंबुन असलेल्या व्यक्तींना महापालिकेच्या क व ड संवर्गातील एकुण पदांपैकी ५ टक्के पदांवर प्राथम्य क्रमाने नियुक्ती देणे कामी शासनाच्या आदेशाशी विसंगत नसलेला प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :–विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

### *विषय क्र. १३:- श्री एन एन जयसिंगानी व श्री एम.ए. खियानी, शाखा अभियंता यांना महापालिकेच्या सेवेत सामावुन घेणे*

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– पास, एक वर्षासाठी...........

मा. सचिव :– एक वर्षासाठी कसे होईल? हे दोघे कायम स्वरुपी राहतील. हे सदया शासकिय कर्मचारी आहेत, ते महापालिकेचे कर्मचारी होवू इच्छितात.

काही सदस्य :– पास–पास.................

मा. सचिव :– पास, सर्व–संमतीने?

मा. महापौर :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

## *विषय क्र. १३:- श्री एन एन जयसिंगानी व श्री एम.ए. खियानी, शाखा अभियंता यांना महापालिकेच्या सेवेत सामावुन घेणे*

प्रस्तावना:—

उल्हासनगर पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती योजना दि. १९/१२/१९९४ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून उल्हसनगर महानगरपालिकेकडे कायमस्वरूपी वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे हया योजनेवर कार्यरत असणा—या सर्व कर्मचारी वर्ग उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी वर्ग करण्यात आला आहे. त्यापैकी काही तांत्रिक पदे, प्रशासकिय पदे, शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता ही पदे प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा(पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा) नियम १९८१ चे नियम ४० चे पोट नियम (४) परिशिष्ठ (II) (१९) मधील कायमचे समावेशन तरतूदीनुसार प्रतिनियुक्तीवर कार्यरत कर्मचा—यांची सेवा सार्वजनिक संस्था, स्वायत्त संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवेत कायमस्वरूपी समावून घेण्याबाबत कर्मचा—याने इच्छा प्रदर्शित केल्यास सामावून घेतल्याच्या तारखेपासून कर्मचारी खात्याच्या सेवेतून निवृत्त झाले असे समजले जाईल. त्यानुसार श्री. एन. एन. जयसिंघानी, शाखा अभियंता व श्री. एम. ए. खियानी, शाखा अभियंता यांनी त्यांची सेवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून उल्हासनगर महानगरपालिकेत उल्हासनगर महानगरपालिकेत सध्याच्यापदाचे वेतन संरक्षीत करून महापालिकेत कायमस्वरूपी वर्ग करणे बाबत संमती देवून विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार महापालिकेने इकडील पत्र क्र. उमपा/साप्रवि/आस्था/प्र.क्र.१४३/६०६/०४, दि. ९/१२/२००४ च्या पत्राद्वारे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांचेकडे तसेच इकडील उमपा/पापु/२३४४, दि. १६/१२/२००४ च्या पत्राद्वारे मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांचेकडे श्री. एन. एन. जयसिंघानी, शाखा अभियंता व श्री. एम. ए. खियानी, शाखा अभियंता यांचे उल्हासनगर महानगरपालिकेत समावेशनाबाबत संमती मागविली होती. त्यास अनुसरून कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मजीप्रा/प्रतिनि/२००४/१०८/आ—६, दि. ३१/१२/२००४ च्या पत्राद्वारे उक्त शाखा अभियंता यांना उल्हासनगर महानगरपालिकेकडे समावून घेण्याच्या प्रस्तावास अनुसरून त्यांचे रजा वेतन, निवृत्ती वेतनाचे अंशदान व इतर रक्कम भरणा करण्याची विचारणा केली आहे. तसेच सदर शाखा अभियंता यांना उल्हासनगर महानगरपालिकेकडे सामावून घेण्यास आम सभेचा ठराव पाठविणेबाबत कळविले आहे.

श्री. एम. ए. खियानी व श्री. एन. एन. जयसिंगानी, हे दोन अधिकारी शाखा अभियंता संवर्गातील असून त्यांची सदर पदावर अनुक्रमे १८ व १६ इतकी वर्ष सेवा झाली आहे. सदर कर्मचारी उप अभियंता या पदाच्या पदोन्नतीस पात्र आहेत. परंतु सदर संवर्गात ०३ पदे रिक्त असून ती अनुशेषाची आहेत. त्यामुळे सदर पदासाठी त्यांचा विचार करता येणार नाही. परंतू त्यांनी सध्याच्या पदाचे वेतन संरक्षीत करून महापालिकेतील कनिष्ठ अभियंता यापदावर सामावून घेण्यास संमती दिली असल्याने सदर पदासाठी त्यांच्या समावेशनाच्या प्रस्तावाचा विचार करता येईल.

*उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कनिष्ठ अभियंता या संवर्गातील २६ पदे मंजूर असून सेवा भरती नियमाप्रमाणे १९ पदे ही सरळसेवेने व ०७ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सरळसेवेने भरावयाच्या १९ पदापैकी सद्यस्थितीत १५ पदे कार्यरत असून ०४ पदे रिक्त आहेत. व ती अनुशेषाची आहेत. त्यामुळे सदर पदासाठी त्यांचा विचार करता येणार नाही. परंतु पदोन्नतीने भरावयाची ०७ पदे रिक्त असून पदोन्नतीने सदर पदे भरण्यासाठी पदोन्नती साखळीतील कनिष्ठ वेतनश्रेणीचे पद उपलब्ध नसल्याने श्री.एम. ए. खियानी व श्री. एन. एन. जयसिंगानी यांना उल्हासनगर महानगरपालिकेतील उपलब्ध*

कर्मचारी वर्ग व कामाची निकड लक्षात घेता कनिष्ठ अभियंता या मंजूर व पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्त) नियम १९८२ चे नियम ६७ व वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. पीई. एन/१०८०/सीआर/४, दि. २८/०४/८१ अन्वये प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार त्यांचे सध्याचे वेतन संरक्षीत करून त्यांची सेवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून उल्हासनगर महानगरपालिकेत कायम स्वरूपी वर्ग करणे कामी मान्यता मिळणेसाठी महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> २१ <u>दिनांक:—२०/५/२००५.</u>

सुचकाचे नाव :— श्रीम. मिनु दासानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री एन एन जयसिंगानी व श्री एम.ए.खियानी, शाखा अभियंता यांना महापालिका सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

<u>विषय क्र. १४:- प्रस्तावाची सुचना</u>

सन्माननिय सदस्य श्री. जाधव सुरेश मधुकर व श्रीमती खिलनानी भावना यांचा एक समिती रचनेचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>मा. सचिव :-</u>यामध्ये एक तांत्रिक अडचण आहे. सुचक येथे उपस्थित नाहीत. त्यामुळे ही प्रस्तावाची सुचना वगळावी लागेल.

<u>मा. सदस्य श्री. राजेश वधारिया :-</u> या सभेचे उर्वरीत कामकाज एक दिवसासाठी स्थगित करून ते उदया घेतले जावे असे माझे मत आहे.

<u>मा. सचिव :-</u>सुचक नाहीत म्हणून प्रस्ताव घेतला जावु शकत नाही.

***<u>मा. सदस्य श्री. राजेश वधारिया:-</u> साहेब मी सभा स्थगित करण्याबाबत बोलत आहे. उदया पुन्हा सभा होवू शकते.***

<u>मा. सचिव :—</u>सभेचे कामकाज स्थगित केव्हा होवू शकले असते जेव्हा सुचक स्वत: येथे उपस्थित असते तर. ते येथे उपस्थित नसल्यामुळे त्यांचा प्रस्तावच रद्द समजण्यात येईल.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:—२० जुन, २००५

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/६/२००५ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०.०६.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

<u>१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी</u>

<u>२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा</u>

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३६. | श्रीमती जया साधवानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३७. | श्री. जेसवानी सतराम फतनदास |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ३८. | श्रीमती भावना खिलनानी |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ३९. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४०. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्रीमती माने किरण |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्री. चव्हाण रमेश |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४३. | श्री. जाधव प्रशांत |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्री. जाधव सुरेश |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४५. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४६. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ४७ | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४९. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १७. | श्री. उमाप रामदास | ५०. | श्री. भालेराव गौतम |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५१. | श्रीमती वसिटा बेबी |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५२. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५३. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५४. | श्री. अंकुश म्हस्के |
| २२. | श्रीमती अनिता गुप्ता | ५५. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २३. | श्री. पवार नाना | ५६. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५७. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २५. | श्री. जग्यासी राजु | ५८. | श्रीमती भटिजा कोमल |
| २६. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५९. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २७. | श्री. निकम शांताराम | ६०. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २८. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ६१. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २९. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६३. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६४. | श्रीमती करोतिया मालती |
| ३२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६५. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३३. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६६. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री. साधवानी मोहन | ६८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती कृष्णानी रेखा हरेश, २. श्री. पाटील विश्वनाथ, ३. श्री. साधवानी मनोज लालचंद, ४. श्री. जयसिंघानी अनिल , ५. डॉ. निना प्रकाश नाथानी, ६. श्री. रामरख्यानी मोहनदास, ७. श्री. संजय रामचंद्र बठीजा, ८. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल, ९. श्रीमती माखिजा किरण, १०. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास, ११. श्री. हरदास माखिजा, १२. श्री. वदरीया राजेश नानिकराम, १३. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ६.३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :—</u> दुस—या सभेस प्रारंभ होत आहे तरी  सर्व सदस्यांनी हजेरी पटावर स्वाक्षरी करावी ही विनंती आहे.

पहिला विषय प्रश्नोत्तरे आहे.

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>**मा. महापौरजी, आता बराच उशिर झाला आहे.  ही सभा स्थगित केली जावी कारण ७.०० वाजता आम्ही ३५ सदस्य समितीची, व्यापारी महामंडळ व लायन्स क्लबची बैठक बोलावली आहे.  यासाठी आता लक्षवेधीवर निर्णय घेवुन बैठक स्थगित करावी.

<u>मा. सचिव :—</u> बैठक स्थगित करण्यास सर्वांची संमती आहे का?

<u>काही सदस्य :—</u> होय.

<u>मा. सचिव :—</u>शिवसेनेकडुन एक सुचना प्राप्त झालेली आहे.  श्री. धनंजय बोडारे यांची विरोधी पक्ष नेता या पदावर निवड करण्यात आली आहे.  आम्ही त्यांना शुभेच्छा देत आहोत.  मा. महापौरांनी यास संमती दिली आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u>श्री. धनंजय बोडारे यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे शुभेच्छा देण्यात येत आहेत.

<u>मा. महापौर :—</u> श्री. बोडारे यांना माझ्या तर्फे देखील शुभेच्छा देत आहे.

<u>मा. सचिव :—</u> पहिली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

## <u>लक्षवेधी</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

**विषय** :— मा. हायकोर्टाने पाडण्याचा आदेश दिलेल्या उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील ८५५ इमारतीपैकी ११२ इमारतीच्या फाईल्स आकस्मात गहाळ झाल्याबाबतची वृत्तपत्रातील बातमी बाबत.

उपरोक्त विषयानुसार लक्षवेधीने आपले लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील ८५५ अनाधिकृत इमारती पाडण्याचे आदेश मा. हायकोर्टाने दिले असून सदर ८५५ इमारती पैकी १२२ इमारतीच्या फाईल्स महानगरपालिकेतून अकस्मितपणे गहाळ झाल्याच्या बातम्या मागील काही दिवसापासून वृत्तपत्रात प्रसिध्द होत आहेत.  सदर वृत्तपत्रातील बातम्या ख—या आहेत काय? खरोखरच ११२ फाईल्स महापालिकेतुन गहाळ झाल्या आहेत काय?  याबाबत महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेबाबत विनंती आहे.

<u>मा. सचिव :—</u> दुसरी लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

# लक्षवेधी

सुचकाचे नाव :– श्री. मोहन बेहरानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

**विषय :–** जकात वसुलीतील घट रोखण्यासाठी खातेनिहाय चौकशी व जकात वसुली वाढविणेसाठी कठोर उपाययोजना करणे बाबत.

उपरोक्त विषयाबाबत लक्षवेधीने आपले लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २००५–२००६ चे अर्थसंकल्पीय अनुदानाप्रमाणे वर्षात ७८ कोटी रुपये जकात रुपाने महसूल अपेक्षित आहे. त्याप्रमाणे प्रत्येक महिन्यात सरासरी ६.५ कोटी रुपये जकात वसूली होणे अपेक्षित आहे. या वर्षी काही वस्तुंवर वाढीव जकात दर आकारण्यात आल्याने वाढीव जकात वसुली अपेक्षित आहे.

माहे एप्रिल महिन्याची जकात वसुली ५.२४ कोटी, मे महिन्याची ५.५३ कोटी आणि जून महिन्यात ५.५ कोटी च्या पुढे झाल्याचे दिसून येत नाही. दर महिन्यास सरासरी एक कोटी जकात वसुलीत घट दिसून येते आहे. जकातीतील घट रोखण्यासाठी प्रशासनातर्फे कोणत्याही स्वरुपाची ठोस उपाययोजना केल्याचे दिसून येत नाही. तसेच जकातीतील घट पहाता याबाबत खातेनिहाय चौकशी करणे व जकात वसुली वाढविण्यासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. म्हणून या प्रस्तावाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

# लक्षवेधी

१) श्री. नाना पवार

२) श्री. विनोद ठाकुर

अनुमोदकाचे नाव :–१) श्री. शांताराम निकम

२) श्री. सुरेश जाधव

उल्हासनगर शहरामध्ये मोठया प्रमाणात १९९५ पुर्वीच्या वसलेल्या गलिच्छ वस्त्या आहेत. गलिच्छ वस्तीमध्ये राहत असलेल्या नागरीकांना त्यांचे राहते घराची दुरुस्तीची परवानगी महानगरपालिकेने देणे आवश्यक आहे.

करीता दिनांक २०/६/२००५ रोजी होणा—या महासभेमध्ये महासभेचे लक्ष वेधने करीता सदरिल लक्ष वेधी सुचना स्विकारण्यात यावी ही विनंती.

<u>मा. सचिवः—</u>यापैकी दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करायच्या आहेत. याबद्दल मा. महापौर निर्णय घेतील. चौथा अशासकिय प्रस्ताव प्राप्त झाला आहे, ज्याचे सुचक श्री. प्रमोद टाले व अनुमोदक श्री. संजय बठिजा आहेत. एका आजारी व्यक्तीस सन्माननिय सदस्यांच्या मानधनातुन काही रक्कम देण्यात यावी अशी यांची विनंती आहे. आपण जे ठरवाल त्याप्रमाणे निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे एक आयत्यावेळचा विषय प्राप्त झाला आहे. त्याचा विषय पुढीलप्रमाणे आहे.

**विषय** :— आर.सी.एच - II प्रकल्प राबविणेसाठी अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनापोटी अनुदान देण्यास मान्यता देणे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> माझी मा. महापौरांना विनंती आहे की, आपल्या शहरात जकातीचा महत्वाचा मुद्दा आहे. आता आयुक्तांनी सांगितले की, आपल्याकडे निधी नाही. येथे दर महिन्याला एक कोटी रुपये कमी प्राप्त होत आहेत. हा गंभीर मुद्दा असल्याने घेतला जावा. अथवा अनुक्रमाने घेतले जावे अशी माझी विनंती आहे.

<u>मा. महापौर :—</u> तिन्ही लक्षवेधी सुचना महत्वाच्या आहेत. ११२ फाईली गहाळ झाल्याबाबत श्री. भुल्लर यांनी सुचना दिली आहे, श्री. मोहन बेहरानींनी जकातीबाबत दिली आहे की, वसुली कमी होत आहे व आमच्या श्री. नाना पवार यांनी दिले आहे की, १९९५ पुर्वीच्या झोपडयांना दुरुस्तीची परवानगी दिली जावी. परंतु मी असे म्हणेन की, फक्त झोपडपटट्याच नाही तर इतर लोक जे चकरा मारतात त्यांनाही दुरुस्तीची परवानगी दिली जावी.

तिन्ही सुचना महत्वाच्या आहेत परंतु एका वेळी फक्त दोनच लक्षवेधी घेवु शकतो. यावर सभागृहच निर्णय घेईल की कोणत्या दोन सुचना स्विकृत केल्या जाव्यात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u> मा. महापौरजी श्री. मोहन बेहरानी यांची जी लक्षवेधी सुचना आहे, त्याच विषयावर आमचे प्रश्न आहेत, त्यावर चर्चा होणारच आहे. त्यामुळे ती लक्षवेधी सुचना न घेता प्रश्नोत्तरावर चर्चा केली तर तिन्ही लक्षवेधी सुचनांवर चर्चा होवू शकेल.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> तिन्ही लक्षवेधी सुचना महत्वाच्या आहेत. तिन्ही घेतल्या जाव्यात. अन्यथा आयुक्तांनी एकावर निवेदन करावे. व दोन लक्षवेधी सुचनेवर चर्चा करावी.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> मा. महापौरजी फाईलचा जो मुद्दा आहे त्याबाबत आयुक्त साहेबच उत्तर देवु शकतील. फाईल त्यांच्याकडे आहे आमच्याकडे नाही. ज्या लक्षवेधी सुचना आधी आल्या आहेत त्या आधी घ्या.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवार :–</u> मा. महापौरजी, ................

<u>मा. उप–महापौर :–</u> श्री. नाना पवारजी, तिन्ही सुचनांवर चर्चा होईल. दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करु व आपल्या लक्षवेधीवर आयुक्त साहेब खुलासा करतील.

<u>मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u> मा. महापौरजी, जकातीच्या मुद्दयावर दोन महिन्यांपुर्वी चर्चा झाली आहे. आता पावसाळा सुरु होणार आहे, त्यापुर्वी झोपडपट्टीवाल्यांना दुरुस्तीची परवानगी मिळायला हवी. यासाठी आमची लक्षवेधी सुचना स्विकृत करावी अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u>मा. महापौरजी, श्री. नाना पवार यांनी झोपडपट्टीची जी लक्षवेधी सुचना दिली आहे, त्याकडे विशेष लक्ष दयावे. कारण एखादयाचे पत्रे तुटले तर त्याने कुठे जावे?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :–</u> मा. महापौरजी, झोपडपट्टीवाल्यां बरोबरच बॅरेक व ब्लॉक वाल्यांना देखील दुरुस्ती परवानगी मिळायला हवी.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> माझा हरकतीचा मुद्दा आहे. मागील महिन्यात मी स्वत: लक्षवेधी सुचना आणली होती की, घर व दुकानला दुरुस्तीची परवानगी दिली जावी. त्यावेळी देखील मला आश्वासन देण्यात आले होते की, तुम्ही लक्षवेधी सुचना मागे घ्या. त्याप्रमाणे मी माझी सुचना मागे घेतली होती. माझी विनंती आहे की, आधी ती लक्षवेधी सुचना दाखल करुन घ्यावी.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवार :–</u> मा. महापौरजी आम्ही जी लक्षवेधी सुचना या ठिकाणी आणली आहे त्यामध्ये आमचा कोणताही राजकिय उद्देश नाही अथवा आमचा काही खाजगी हेतुही नाही. पुर्ण शहराचा विषय त्यामध्ये येतो. त्यामध्ये पक्षाचे राजकारण नाही. एक चांगला विषय आम्ही सभागृहात आणत आहोत. त्यामुळे शहरातील लोकांना फायदा होणार आहे. त्यामुळे कोणत्याही पक्षाला, गटाला अथवा नेत्यांना फायदा होणार नाही. एक चांगली लक्षवेधी सुचना आम्ही सभागृहात आणली आहे. त्यामुळे तीचे महत्व ओळखुन ती स्विकारली जावी.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u> मा. महापौरजी, जकात वसुलीत कोटींनी घट झाली आहे. ते कोणत्याही नेत्याच्या खिश्यात जात नसुन आपल्या शहराच्या संपत्तीचे नुकसान होत आहे. शहराच्या विकासाला कामी येणारा तो पैसा आहे. यामुळे आमच्या लक्षवेधीवर लक्ष दयावे ही विनंती. तसेच ती दाखल करुन घेतली जावी.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> मा. महापौरजी झोपडयांना दुरुस्ती परवानगी देण्याचा जो विषय आलेला आहे, तर आज पर्येत पाऊस आला नव्हता. परंतु आता पावसाळा जवळ आला आहे. झोपडयांची दुरुस्ती लोक करु शकत नाही. त्यांना परवानगी दयायला हवी. यासाठी ही लक्षवेधी सुचना दाखल करुन घ्यावी अशी माझी विंनती आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u>मा. महापौरजी माझी विनंती आहे की, जकातीचा व झोपडपट्टयांचा विषय महत्वाचा असल्याने या दोन सुचना दाखल करुन घ्याव्यात व संचिकांचा विषय आयुक्तांशी संबंधीत असल्याने त्यांनी त्यावर निवदेन करावे. असे केल्याने तिन्ही विषय येतील.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवार :–</u> मा. महापौरजी, गलिच्छ वस्त्यांचा विषय हा धोरणात्मक विषय आहे. महासभा यावर धोरणात्मक निर्णय घेवु शकते. हा प्रश्नोत्तराचा विषय नाही. इतर विषय प्रश्नांद्वारे होवू शकतात. यामध्ये महासभेला धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे. यावर आयुक्त साहेब काय खुलासा करणार?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, माझी आपणांस विनंती आहे की तिन्ही लक्षवेधी सुचनांवर चर्चा केली जावी. एकावर आयुक्तांनी निवेदन दयावे. आम्ही तिघांवर सहमती दर्शवितो. आता ७ वाजणार आहे तर कृपा करुन बैठक स्थगित करावी व येत्या बुधवारी अथवा योग्य दिवशी बैठक ठेवावी. आमचे श्री. बोडारे यांचे देखील स्वागत करायचे आहे, त्यामध्ये देखिल ५ मिनिटे लागतील तरी लवकर निर्णय घ्यावा. तसेच श्री. प्रमोद टाले यांनी जे निवेदन दिले आहे त्यावरही निर्णय घ्यावा. जे श्री. सतरामदास जेसवानी यांनी सांगितले त्यावर देखील चर्चा व्हायला हवी.

<u>मा. महापौर :—</u> यावर एक तोडगा निघु शकतो. श्री. नाना पवार यांचा विषय व फाईली गहाळ होण्याचा विषय एकत्र करण्यात येईल. दोघांवरही चर्चा होईल व जकातीच्या मुद्दयावरही होईल.

<u>मा. सचिव :—</u> श्री. प्रमोद टाले यांनी श्रीमती चंद्रा अरुण जुनघरे यांना हार्टचा व्हाल्व बदलायचा असल्याने १,८०,००० रुपये खर्च आहे त्यामुळे त्यांना मदत म्हणुन सन्माननिय नगरसेवकांच्या मानधनातुन काही रक्कम देण्यात यावी अशी अपेक्षा आहे. जर आपणांस रक्कम दयायची असेल तर निर्णय घ्यावा लागेल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> यावर आम्हांला चर्चा करायची आहे, चर्चेनंतर ठरवु. हे जे असे आजार आहेत यावर उपचार करण्यासाठी आपले आमदार साहेब संबंधीतांना शासनाकडुन मदत देवु शकतात. खासदार साहेब केंद्र सरकारकडुन मदत देवु शकतात. यासाठी त्यांची कागदपत्रे पुर्ण असायला हवीत. अशी मदत दयायची असेल तर यापुढे आम्हांला फक्त रुपये २००० मानधन दयावे व उर्वरीत २००० निधीमध्ये दयावेत. प्रत्येक महिन्यात दोन जणांना मदत करावी.

<u>मा. सचिव :—</u> हा प्रस्ताव दाखल करुन नंतर नामंजुर करायचा का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>यापुढे आम्हांला फक्त रुपये २००० मानधन दयावे व उर्वरीत २००० निधीमध्ये दयावेत. प्रत्येक महिन्यात दोन जणांना मदत करावी. मा. महापौरजी ब—याच लोकांना मदतीची आवश्यकता आहे. आपण येथे एक ठराव मंजुर करा व दर महिन्याला दोन जणांना मदत करा.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौरजी हा जो अशासकिय प्रस्ताव आणला आहे, याबद्दल आम्हांला आधी माहिती दिली असती तर आम्ही देखील आमच्या प्रभागातील दु:खी व आजारी लोकांचा विषय येथे आणला असता. या मानधनाचा काही उपयोग होणार असे आम्हांला वाटत नाही. तर मानधन असेच वाटले जाणार असेल तर आम्हांला देखील परवानगी दयावी. आम्ही देखील लोकांना शोधुन असे प्रस्ताव आणु.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर महोदया, येथे अजुन एक विषय आला आहे. एक तीन वर्षाचा मुलगा आहे त्याला उपचारासाठी रुपये ३ लाख खर्च आहे. त्याला कॅन्सर झाला आहे व टाटा हॉस्पीटलने तसे पत्र देखिल दिले आहे. तर मी निवेदन करीन की, यावरही विचार करावा.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> मागील महासभेत श्री. रमेश चव्हाण यांनी जो प्रस्ताव आणला होता तो सर्वांनी मंजुर केला होता.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> आमचे असे म्हणणे आहे की, एक ठराव मंजुर करुन सर्वांनाच मदत करा. दर महिन्याला २ लोकांना मदत करा.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—</u> मा. महापौरजी अशा प्रस्तावांसाठी पुढील बजेटमध्ये निधी राखुन ठेवला जावा.

<u>मा. सदस्य श्री. नथ्थु सोनवणे :—</u> मा. महापौरजी, प्रत्येक सदस्याचे दर महिन्याला रुपये २००० कापुन, प्रत्येक सदस्याकडुन नावे घ्यावीत व त्याची चिठ्ठी काढली जावी व ज्याचा नंबर येईल त्याला उपचारासाठी पैसे दिले जावेत. पुर्ण उल्हासनगर शहरासाठी.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> आयुक्त साहेबांनी व सचिव साहेबांनी माहिती दयावी की, नगरसेवक निधितुन अशी मदत करु शकतो का?

<u>मा. महापौर :–</u> सन्माननिय सदस्यांना निवेदन आहे की, सभागृहाचे मत पाहुन असे दिसुन येते की, सर्व सदस्य मनापासुन अशा प्रस्तावांवर अनुकुल नाहीत. ज्यांनी हा प्रस्ताव आणला आहे जे सुचक व अनुमोदक आहेत ते तर त्यांचे या महिन्याचे मानधन उपचारासाठी देतीलच. त्यानंतर देखील ज्या नगरसेवकांना मनापासुन मदत करायची असेल तर त्यांनी सचिवांना भेटुन स्वत:च्या मानधनातुन मदत देण्यासाठी सांगावे.

<u>मा. सचिव :–</u> आयत्यावेळच्या विषयाचे काय करायचे?

<u>मा. महापौर :–</u> तो विषय नियमित कार्यसुचीवर आणला जावा. आयत्या वेळचा विषय म्हणुन समाविष्ट करु नये.

**यावेळी उपस्थित सर्व सदस्यांनी नव नियुक्त विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे यांना हार व पुष्पगुच्छ अर्पण करुन स्वागत केले.**

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u> श्री. धनंजय बोडारे यांचे मी आरपीआय तर्फे अभिनंदन करुन स्वागत करतो.

<u>मा. सचिव:–</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.०० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभचे कामकाज पुढील सुचना देईपर्यंत पुढे ढकलल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:–६ जुलै, २००५

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ६/७/२००५ रोजीच्या</u>
<u>सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०.०६.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती त्यादिवशी सभा स्थगित झाल्याने सदरची सभा बुधवार दिनांक ०६.०७.२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३३. | श्री. लुंड गोविंदराम |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३४. | श्रीमती भावना खिलनानी |
| ५. | श्रीमती रामचंदानी भावना | ३५ | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ६. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३६. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ७. | श्रीमती मोकल सीमा | ३७. | श्री. चव्हाण रमेश |
| ८. | श्री. दिलीप गायकवाड | ३८. | श्री. जाधव प्रशांत |
| ९. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३९. | श्री. जाधव सुरेश |
| १०. | श्री. एडके गणपत गोविंद | ४०. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४१. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १३ | श्री. उमाप रामदास | ४३. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १४. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४४. | श्री. भालेराव गौतम |
| १५. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४५. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४६. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४७ | श्री. पंजाबी नारायण |
| १८. | श्रीमती अनिता गुप्ता | ४८. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १९. | श्री. पवार नाना | ४९. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| २०. | श्री. जग्यासी राजु | ५०. | श्रीमती भटिजा कोमल |
| २१. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ५१. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २२. | श्री. निकम शांताराम | ५२. | श्रीमती माखिजा किरण |
| २३. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५३. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २५. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५५. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५६. | श्री. बठिजा संजय |
| २७. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५७. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २८. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५८. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५९. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३०. | श्री. साधवानी मोहन | ६०. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्रीमती जया साधवानी | ६१. | श्री. दिलीप लालवानी |
| ३२. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. सोनवणे नथु, २. श्री. टेकचंदानी राजु, ३. श्री. वाघे शामु बाबु, ४. श्री. मुलचंदानी महेंद्र , ५. श्रीमती आहुजा निता प्रकाश, ६. श्रीमती माने किरण, ७. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास, ८. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, ९.श्रीमती वसिटा बेबी, १०.श्री. ठाकुर अशोक भगवानदास, ११.श्री. अंकुश म्हस्के, १२. श्रीमती करोतिया मालती, १३. श्री. साधवानी मनोज लालचंद, १४. श्री. जयसिंघानी अनिल, १५. डॉ. निना प्रकाश नाथानी, १६.श्रीमती मीनु राजकुमार दासानी, १७. श्री. बेहराणी

ठाकुरदास वर्यलदास, १८. श्री. हरदास माखिजा, १९. श्री. विश्वनाथ पाटील, २०. श्री. वदारिया राजेश हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सर्व प्रथम वंदेमातरम् म्हणुन सायंकाळी ४.३० सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** मा. महापौरजी, उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांनी ज्याच्या आजारासाठी आर्थिक सहाय केले होते असा तो अशोक निकाळजे जो जसलोक हॉस्पीटल मध्ये होता. त्याचा आता मृत्यु झाला आहे. त्यांना श्रध्दांजली देवु या. आणि दुसरे असे की, उल्हासनगर कॅम्प ५ येथे परवाच एक कामगार काम करत असतांना, त्याचा कुठलाही दोष नसतांना महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाची उच्च दाबाची वायर पडुन त्यामध्ये चार कामगार जखमी झाले व एक कामगार श्री. अशोक सुरडकर हा व्यक्ती निधन पावला आहे. तर अशोक निकाळजे व अशोक सुरडकर यांना श्रध्दांजली दिली जावी.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, याच बरोबर आमच्या स्वामी शांती प्रकाश आश्रमाचे सेवाधारी होते श्री. काका सोबराजमल त्यांचेही नुकतेच निधन झाले आहे यांना सुध्दा श्रध्दांजली दिली जावी.

## शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

श्री. अशोक निकाळजे हे अजारी असल्याने जसलोक हॉस्पीटल मध्ये दाखल होते, त्यांचे नुकतेच निधन झाले आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांनी त्यांच्या औषधोपचारासाठी आर्थिक सहाय केले होते.

उल्हासनगर कॅम्प ५ येथे काम करत असतांना महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाच्या उच्च दाबाच्या तारेशी संपर्क येवुन त्यात श्री. अशोक सुरडकर यांचे निधन झाले. व अन्य चार कामगार जखमी झाले.

तसेच स्वामी शांती प्रकाश आश्रमाचे सेवाधारी श्री. काका सोबराजमल यांचेही नुकतेच निधन झाले.

वर उल्लेखिलेल्या मृतात्म्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. २२ अ — दिनांक:—६.७.२००५.

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. अशोक निकाळजे, श्री.अशोक सुरडकर व श्री. काका सोबराजमल यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे.........
यावेळेस सायंकाळचे ४ वाजुन ३५ मिनिटे झाली आहेत.

मा. सचिव :—प्रश्न क्र. ३९६ हा श्री.दिलीप गायकवाड यांचा आहे.

प्रश्न क्र. ३९६ :— उल्हासनगर विधानसभा मतदारसंघ हा उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रापुरता मर्यादीत असुन स्थानिक आमदाराचा आमदार निधी हा शहरातील विकास कामासाठी उल्हासनगर पालिका क्षेत्रात वापरला जातो. सदर विकास कामावर नियंत्रण महापालिका अधिका—यांचे असते. त्याबाबत खालील प्रश्नांवर महासभेत सविस्तर चर्चा होवून सुचक, समाधानकारक माहिती मिळावी ही नम्र विनंती.

प्र. १ अ) मागील पाच वर्षात किती आमदार निधी महापालिकेस मिळाला?
त्यापैकी महानगरपालिकेने किती निधी वापरला?
कोणत्या कामासाठी वापरला? कामाचे नाव व ठिकाण व अंदाजित
रक्कम किती? कामाची सदयस्थिती काय आहे? कामाच्या निविदा
काढण्याची गरज भासली होती काय? किती कामाच्या निविदा काढण्यात
आल्या? त्यांचा निविदा क्रमांक दयावा.
सदरची माहिती प्रभाग निहाय दयावी.

ब) तसेच आमदार निधी व्यतिरिक्त कोणते व किती शासकिय निधी
महापालिकेस मागील पाच वर्षात मिळाले.
त्यापैकी किती निधी महानगरपालिकेने वापरला?
कोणत्या कामासाठी, कामाचे नाव, ठिकाणी व रक्कम किती होती?
कामाची सदयस्थिती काय आहे? कामाच्या निविदा काढण्याची गरज
भासली होती काय? त्यांचा निविदा क्रमांक दयावा.

उत्तर :— सोबत यादी जोडली आहे. सर्व कामे मजूर कामगार सहकारी संस्थेकडून जिल्हा उपनिबंधक यांच्या शिफारशीनुसार करुन घेण्यात आले आहे.

सोबत यादी जोडली आहे. एजन्सी बाबत अभिप्राय यादीवर नमुद आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u> मा. महापौरजी, याठिकाणी मी वरील प्रमाणे प्रश्न विचारला असता, त्याचे याठिकाणी पुर्णपणे उत्तर दिलेले नाही. तरीपण याचे सविस्तर उत्तर देण्यात यावे. आपण फक्त यादी जोडलेली आहे. एकुण निधी किती दिला आहे? त्याची सविस्तर माहिती दिलेली नाही.

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>मा. महापौर महोदया, मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड यांना त्यांच्या प्रश्नाच्या उत्तराबाबत आणखी काही विस्तृत माहिती हवी असेल तर ती देण्याचा मी प्रयत्न करेन.

<u>म. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u> मा. महापौरजी, पुढील महासभेत मला पुर्ण माहिती दया. पुर्ण माहिती दिलेली नाही. उत्तरच दिलेले नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> यामध्ये फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांचीच यादी दिलेली आहे. आमदार निधितुन किती कामे केली, किती निधी मिळतो? त्या व्यतिरिक्त शासनाकडुन येणारा निधी कोणता? याची काही माहिती दिलेली नाही. मागील पाच वर्षामध्ये किती निधी मिळाला याचा काही आकडा आहे का यामध्ये? फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामांची यादी दिलेली आहे. पुर्ण असेल तर यावर चर्चा करु. एवढाच निधी असेल तर, याव्यतिरिक्त नाही का?

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>मा. महापौर महोदया, या प्रश्नाच्या उत्तरात जी कमतरता आहे, तिची पुढील महासभेत पुर्तता केली जाईल.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ३९७ हा श्री.नथु सोनवणे यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांचा प्रश्न आणि त्याच्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३९७ :–</u> सती अपार्टमेंटजवळ सपनागार्डनसमोर उल्हासनगर–३ येथे तळमजला + ५ मजल्याचे आर.सी.सी. इमारतीचे बांधकाम सुरु असून त्यानुसार खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र. १ अ) सदर इमारत बांधकामास महानगरपालिकेने परवानगी / मंजुरी दिली आहे काय?
त्याचा आदेश क्रमांक व दिनांक दयावा.
बांधकामास मंजुरी दिली असल्यास बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे का?
सदर बांधकामात वाढीव अनधिकृत बांधकाम केले आहे काय?
असल्यास प्रत्येक मजल्यावर / सदनिकेत किती?

ब) सदर इमारतीचे तळमाळयाची उंची व बांधकाम मंजुर नकाशानुसार आहे काय?
नसल्यास काय कारवाई करणार? कधी पर्यंत कारवाई अपेक्षीत आहे?

<u>उत्तर :–</u> होय.
क्र.उमपा/नरवि/बांप/६७/०३/७४४, दिनांक ४/६/२००३.
नाही.
सदर इमारतीच्या तळ मजल्यावर मिटर रुम, पंप रुम, वॉचमेन रुम, सोसायटी रुम, जनरेटर रुम, यांना लावलेले शटर्स काढुन घेण्याबाबत विकासकास पत्र देण्यात आले आहे.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ३९८ हा श्री.नथु सोनवणे यांचा आहे. यावेळेस ते सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांचा प्रश्न आणि त्याच्या उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ३९८ :–</u> शांतीनगर, उल्हासनगर–३ येथे प्रकाश ऑटोचे लाईनमध्ये (जवळ) तळमाळा + ५ मजल्याचे आर.सी.सी. इमारतीचे बांधकाम सुरु असुन त्या अनुषंगाने विचारलेल्या खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक सविस्तर माहिती मिळणेस विंनती आहे.
प्र. १ अ) सदर इमारत बांधकामास महानगरपालिकेने परवानगी / मंजुरी दिली आहे का?
असल्यास आदेश क्रमांक व दिनांक दयावा.
बांधकामास मंजुरी दिली असल्यास बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे सुरु आहे का?

ब) सदर बांधकामात वाढीव अनाधिकृत बांधकाम केले आहे काय?
केले असल्यास प्रत्येक मजल्यावर प्रत्येक सदनिकेत किती?

क) सदर इमारतीचे तळमाळयाची उंची व बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे आहे काय?

<u>उत्तर :—</u> होय.
उमपा/नरवि/बांप/१०९/०३, दिनांक २८/१/२००४
नाही.
होय.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ३९९ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ३९९ :—</u>येत्या महासभेत प्रश्न घेण्यास विनंती आहे.

१) मागील वर्षी रुपये ६३,००,०००/— (अक्षरी त्रेसष्ठ लाख मात्र) बी.एम./ए.सी. चे काम ठेकेदाराला देण्यात आले होते त्यामधुन किती लाखाचे बी.एम. झाले आणि ए.सी. किती लाखाचे केले नाही याची सविस्तर माहिती दयावी.
अ) उपरोक्त रक्कमेमधुन कोणकोणते रोड झाले याची सविस्तर माहिती दयावी.

ब) यापैकी कोणकोणते रोड खराब / उखडले गेले आहेत.

क) जोपर्यंत खराब झालेले रोड दुरुस्त करत नाही तोपर्यंत सदर ठेकेदारांची अनामत रक्कम / सुरक्षा ठेव परत करण्यात येवु नये.

ड) आजपर्यंत ए.सी. चे काम केले नाही त्याचे जबाबदार कोण? ठेकेदार की संबंधीत अधिकारी?

२) सन २००२ ते २००५ पर्यंत महासभेमध्ये किती ठराव पारीत झाले व किती ठरावांची अंमलबजावणी करण्यात आली याची सविस्तर माहिती दयावी.
ज्या ठरावांची अंमलबजावणी झाली नाही. त्यांचे कारण काय?
३) सन २००२ ते २००५ पर्यंत स्थायी समितीमध्ये किती ठराव पारीत झाले.
किती ठरावांची अंमलबजावणी करण्यात आली.
याची सविस्तर माहिती दयावी.
ज्या ठरावांची अंमलबजावणी झाली नाही. त्यांचे कारण काय?

<u>उत्तर :—</u> सविस्तर माहिती यादी प्रमाणे आहे.

निरंक

अनामत रक्कम अद्याप परत केलेली नाही

कॅम्प क्र.४ व ५ येथे ए.सी.करण्याचे काम उशीराने करणेत आले. बी.एम.केले नंतर काही रस्त्यावर पाणी पुरवठा पाईपलाईन तसेच टेलिफोन केबलसाठी खोदाई करण्यात येत असल्याने, अशा खोदाईनंतर रस्ता दुरुस्त करुन एकसलग ए.सी.करण्याच्या दृष्टीने प्रलंबित ठेवले होते. सद्यस्थितीत ए.सी.चे काम पूर्ण करणेत आले आहे.

माहिती संकलीत करणे चालु आहे.
माहिती संकलीत करणे चालु आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, प्रत्येक वर्षी रस्त्याच्या डांबरीकरणाचे जे काम होते, त्याची यादी मागितली होती ती दिली आहे. परंतु जी कामे पुर्ण झालेली नाहीत. त्यांची माहिती दिली तर फार चांगले होईल. आपण यामध्ये लिहिले की, काही कामे पुर्ण झाली आहेत, काही प्रगती पथावर आहेत, ती कामे केव्हा पर्यंत पुर्ण होतील.

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—</u>मा. महापौर महोदया, मागील वर्षाच्या खड्डे भरण्याचे कामातील बहुतांश काम पुर्ण झाले आहे. त्यातील काही कामे अर्धवट आहेत तर काही कामे अदयाप पुर्ण झालेली नाहीत. त्यांची नावे मी सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांना वाचुन दाखवितो. त्याची कारणे काय आहेत तीही सांगतो. जे काम सुरु केले नाही त्यातील पहिले काम आहे पंचवटी स्टील ते राजीव गांधी चौक हा रस्ता पुर्णपणे खराब झाला होता. नव्याने हा रस्ता तयार करणे आवश्यक होते. नविन रस्ता तयार करण्यासाठी प्राकलन तयार केले व त्यास मंजुरीही मिळाली आहे. म्हणुन त्या रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामाची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाचे मत झाले. आणि म्हणुन त्यासाठी या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम केले नाही. दुसरा रस्ता आहे, सेच्युरी ग्राउंडचा रस्ता, तेथे काही जमिनीचा वाद आहे त्यामुळे तेथेही खड्डे भरण्याचे काम केले नाही. तिसरे काम आहे, गतिरोधकाची दूरुस्ती करण्याचा. सध्या गतिरोधकांची दुरुस्ती करण्याबाबत उच्च न्यायालयाच्या ज्या मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या आहेत, त्यांनी म्हटले आहे की, इंडियन रोड कॉग्रेसच्या हिशोबाने गतिरोधक बसविले जावेत. ते कोणत्या कलमाखाली करायचे यासाठी या कामाची अदयाप सुरुवात करण्यात आली नाही. रामभाऊ म्हाळजी मार्ग येथे सिमेंट कॉक्रिटचा रस्ता प्रस्तावित केला आहे यामुळे या रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामावर खर्च न करण्याचे ठरविले आहे. दुसरा रस्ता आहे, गिता कॉलनी ते यशवंत विदयालय येथे आमदार निधीतुन राज्य सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काम केले आहे. म्हणुन या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम केले नाही. आणखी एक काम असे आहे की, नेहरु चौक येथिल सिमेंट कॉक्रिटचा जो रस्ता आहे, त्याचे जोड सांधण्यासाठी खड्डे भरण्याकामीचे प्राकलन तयार केले होते. यावरील खड्डे भरण्याचे काम तांत्रिक दृष्टया योग्य होणार नाही. कारण की, यासाठी इफॉक्सी फिलींग करणे जरुरीचे आहे. त्यासाठी ते काम प्रलंबित ठेवले आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, येथे अनु. क्र. ३९ , ४० व गायकवाड पाडा या तिन्ही ठिकाणचे काम प्रगती पथावर दर्शविले आहे. कैलास कॉलनीचे काम पुर्ण झाले नाही परंतु प्रगती पथावर दाखविले आहे. ब्लॉक नं. ८८४ ते ८९० सुध्दा प्रगती पथावर दाखविले आहे, ते बी.एम. झाले आहे परंतु ए.सी. झालेले नाही. ते कधीपर्यंत होईल.

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—</u>पावसाळा झाल्यानंतर त्याचे जे काही काम राहिले आहे ते पुर्ण केले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जसे की वर्तमानपत्रात येत आहे जे रस्ते बनतात, ते रस्ते खराब झाल्यावर आपण ठेकेदारांकडुन दुरुस्त करुन घेतात. जोपर्यंत तो ते काम पुर्ण करत नाही, जोपर्यंत आपण त्याला पेमेंट देत नाही त्या ६ महिन्यापर्यंत त्याची सेक्युरीटी डिपॉझीट आपल्याकडे असते. ती यासाठीच जर एखादा रस्ता खराब होतो तो रस्ता ठेकेदारांकडुन दुरुस्त केला जावा.

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):—</u> होय, ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u> मा. महापौर महोदया, मी येथे काही विचारु इच्छितो येथे यादीत असे लिहिले आहे की, काम प्रगतीपथावर आहे. म्हणजेच २००२, २००४ व २००५ चे काम प्रगतीपथावर आहे. परंतु काम प्रगतीपथावर आहे याचा अर्थ काय? जसे की रस्ता तयार आहे? रस्ता तयार असला की, आपण काम प्रगतीपथावर आहे असे दाखवतात परंतु जर रस्ता तयार नाही तर आपण दाखवतात की, रस्ता तयार आहे. जेव्हा प्राकलन तयार केले जाते त्यावेळेस अभियंता साईडवर जात नाहीत का? त्यांना वाटत नाही का की हा रस्ता बनविला जावा किंवा न बनविला जावा? येथे ब—याचशा यादीत असे लिहिले आहे की, काम प्रगतीपथावर आहे. प्रगतीपथाचा अर्थ काय आहे? पॉटहोल्स आहे, रस्ता नाही. पॉटहोल्स म्हणजे १०—२० फुटाचा पॉटहोल्स असेल व पॉटहोल्स कशाला म्हणतात? २०० फुटाला पॉटहोल्स म्हणतात का? जे बाकीचे काम प्रगतीपथावर आहे.

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u> मा. महापौर महोदया, मागच्या वेळेस पॉटहोल्स चे जे टेंडर झाले होते त्याची ५० लाख रुपये प्राकलनीय किंमत होती. त्यावेळेस रोडवाईज प्राकलन बनविले होते. प्रत्येक रस्त्यावर १० जागेवर, ५ जागेवर पॉटहोल्स भरण्याचे काम चालु होते. यापैकी ज्या रस्त्यावर पुर्ण पॉटहोल्स भरले गेले. जर एक प्राकलन १ लाखाचे आहेव ५–१० हजाराचे काम बाकी आहे तर काम प्रगतीपथावर आहे असे लिहिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u> मी आपणांस येथे विचारु इच्छितो की, आपण लिहितात काम प्रगतीपथावर आहे तर ते काम पुर्ण का होत नाही?

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>यावर्षी पावसाळयापूर्वी खड्डे भरण्याचा प्रयत्न केला गेला होता.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> बी.एम.ए.सी.ने खड्डे भरले जातात हे आम्हांला माहिती आहे, परंतु हे काम पावसाळयापूर्वी का केले जात नाही? पावसाळा सुरु होतो आणि आपण खड्डे भरण्याचे काम सुरु करता याचे कारण काय?

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>मा. महापौर महोदया, रस्त्यावरील खड्डें भरण्याचे काम आम्ही ३ टप्प्यामध्ये करतो. पावसाळयापूर्वी, पावसाळयात व पावसाळयानंतर. तर पावसाळयापूर्वीची जी कामे आहेत......

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> आपण सांगु शकाल पावसाळयापूर्वी किती कामे केलीत? व पावसाळयात आता त्यावर पुन्हा खड्डे पडले आहेत. व्ही.टी.सी. ग्राउंडच्या रस्त्याने आपण जर गेलात तर आपणांस दिसून येईल की, त्या रस्त्यावर किती खड्डे आहेत, लोक पडतात, रस्त्याचे मध्ये केवढा मोठा चेंबर आहे त्यावर झाकण नाही. त्यामध्ये एका झाडाची फांदी उभी केली आहे, तेथुन सर्व अधिकारी व लोक ये–जा करत असतात. परंतु आपण त्याबाबत काही केले नाही. आता सुध्दा त्या रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत, त्यामुळे कितीतरी अपघात होतात, त्यानंतर पावसाळयाबाबत आपण काय विचार केला आहात? आपण म्हणता ना की तीन टप्प्यामध्ये रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम केले जाते. पावसाळयामध्ये हे काम आपण कसे कराल? आणि त्यानंतर चार महिने आम्हांला धक्केच खावे लागणार आहेत.

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य बच्चाराम रुपचंदानी जे बोलत आहेत, व्ही.टी.सी. ग्रउंड येथिल रस्त्याचा एक भाग १/४ भाग बाकी आहे. त्याच्या निविदेस आता अंतिम स्वरुप प्राप्त झाले आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम आता खड्डे भरण्याच्या कामामध्ये घेतलेले नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> मी एक सांगु इच्छितो की, तेथे एक मोठे चेंबर आहे. कदाचित आपण ते पाहिले असेल, त्यामध्ये झाडाची एक फांदी लावलेली आहे. तेथे कधीही एखादा मोठा अपघात होवू शकतो. मागील वर्षी सुध्दा माझ्या प्रभागात पेट्रोल पंपासमोर अशीच एक घटना घडली होती. एक १८ वर्षाचा मुलगा निधन पावला होता. त्यानंतर येथे आरडाओरड केली तेव्हा कुठे काम झाले होते. आपण या रस्त्यावरुन जाता येता आपण लोक सुध्दा तेथुन ये–जा करता ते काम होत नाही ते कधी होणार? एखादा अपघात झाल्यानंतर होणार काय? आपण एवढी लाखो करोडोची कामे करता हे काम का होत नाही? त्याचे कारण काय?

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–</u>मा. महापौर महोदया, त्या चेंबरवर उदयाच कव्हर घालुन ते बुजविले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u> मा. महापौरजी, मी हे विचारु इच्छितो, मा. आयुक्त साहेबांना, पावसाळयापूर्वी करावयाच्या कामांबाबत शासनाचे एक परिपत्रक आहे की, ही कामे पावसाळयाच्या एक महिन्यापूर्वी करावीत. हे परिपत्रक उल्हासनगरसाठी लागू आहे किंवा नाही? व शासनाचे असे परिपत्रक आहे किंवा नाही? याबाबत मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो.

**श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–**मा. महापौर महोदया, रस्ते दुरुस्तीमधील जे चालु दुरुस्तीचे काम आहे की जे राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थेकडुन केले जाते, त्यासाठी काही मार्गदर्शक सुचना अशा आहेत की, १५ मे नंतर रस्त्यावरील खड्डे भरले जावु नयेत. ती मार्गदर्शक तत्वे फक्त यासाठीच आहेत की रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम बी.एम.ए.सी. ने चालु केल्यास पाऊस पडल्यावर त्याचे नुकसान होईल, म्हणुन हे काम पावसाळयापूर्वीच्या एक महिन्यात झाले पाहिजे. अशी काही मार्गदर्शक सुचना असल्याचे माझ्या माहितीत नाही.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–**नाही, १५ मे च्या आत काम संपले पाहिजे असे आताच आपण स्वत: म्हणलात, तर अशी सुचना आहे ना? तर १५ मे नंतर काम कसे झाले? काम सुरुच उशिरा होते असे का? पैसा फुकट घालविण्याचे काम होत आहे का? १ कोटीचे काम अर्ध्या कोटीत करता? व शासनाच्या मार्गदर्शक सुचनाच्या विरुध्द जावुन काम करता? पावसाळयापूर्वी १ महिना रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पुर्ण केले पाहिजे. हे काम पावसाळयात सुरु होता कामा नये. शासनाचा याबाबतचा नियम उल्हासनगरसाठी लागु नाही का? की उल्हासनगर अलग आहे? यापुढे ? याअगोदर जो पैसा खर्च झाला त्यास कोण जबाबदार आहे?

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** या प्रश्नावर एक पुरवणी प्रश्न आहे. बी.एम.ए.सी.च्या रस्त्यांचा हा जो मुद्दा आहे. याचबरोबर सिमेंट कॉक्रिटच्या रस्त्यामध्ये जे खड्डे आहेत ते भरण्यासाठी आपण काय करत आहात? सिमेंट कॉक्रिट रोड ज्यामध्ये खड्डे पडले आहेत, ते भरण्यासाठी महापालिकेकडे काय योजना आहे?

**श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य):–**मा. महापौर महोदया, सिमेंट कॉक्रिट रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी आमची जी सध्याची पध्दत आहे बी.एम.ए.सी. करण्याची जी पध्दत आहे ती तर पध्दत नाही. यासाठी एखादी नॉन कन्व्हेसमेंट ट्रीटमेंट दिली जात असेल अश्या प्रकारचे प्रयत्न आम्ही आपल्या महानगरपालिकेत अदयाप पर्यंत तरी केलेले नाहीत.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–**होय माझे हेच म्हणणे आहे की, सिमेंट कॉक्रिटचे बरेचसे रस्ते आहेत पाहिजे तर मी त्यांची नावे सांगतो. रिजेन्सी टॉकीज पासुन सपना टॉकीजकडे जो रस्ता जातो, तेथे रस्त्यावर बरेच खड्डे आहेत. एक सिमेंट कॉक्रिटचा नविन रस्ता संतु बिल्डींग पासुन शिवाजी चौकापर्यंत तयार केला आहे. त्यावर सुध्दा एक मोठा खड्डा पडला आहे. आता त्याच्या सिमेंट कॉक्रिटच्या काम करण्याची पध्दत जर मी सांगितली तर त्याचे कदाचित पेमेंट सुध्दा बरोबर झाले नसेल. परंतु कोडुमल मिठाईवाला याचे दुकान आहे, त्याच्या दुकानाबाहेर रस्त्यावर एक फार मोठा खड्डा झाला आहे. त्यावरुन माझ्या लक्षात आले की, सिमेंट कॉक्रिटच्या रस्त्यावर, नविन काम चालु आहें तर आपण ते कसे करणार? सिमेंट कॉक्रिट रस्त्यावर जे खड्डे पडले आहेत त्यांच्या बाबतीत सुध्दा आपण उपाययोजना केली पाहिजे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–** मा. महापौर महोदया, जे जुने सिमेंट कॉक्रिटचे रस्ते आहेत, जसे की मच्छी मार्केट पासुन सिरु चौक मार्गे , नेहरु चौकापर्यंत त्यामध्ये सुध्दा ब्लॉक्स मध्ये भेगा आहेत. अशा भेगा नेहमी डांबराने भरल्या जातात. परंतु यावेळेस याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. रस्त्यावर असे बरेच खड्डे पडलेले आहेत. १९७८ साली जे सिमेंट कॉक्रिटचे रस्ते तयार झाले आहेत त्यांच्यावर, मध्ये–मध्ये ब्लॉक्स मध्ये भेगा पडल्या आहेत. त्यासुध्दा भरल्या जाव्यात.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–**आयुक्त साहेब, नविन रस्त्यांवर जे खड्डे पडले आहेत, ज्यांचे काम आता चालु आहे त्याबाबत आपण काय करत आहात? ज्यांचे पेमेंट सुध्दा झालेले नाही आणि आता त्या रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत, ही अतिशय गंभीर बाब आहे.

**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–** रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम नगरसेवकांनी सांगितल्यानंतरच केले जाते की अधिकारी स्वत:हून करुन घेतात? मला असे वाटते की, नगरसेवकांच्या सांगण्यावरुन हे काम केले जाते. तर मी श्री. जवादे साहेबांना सांगितले होते की, तक्षशिलेचा जो जलकुंभ आहे तेथून, आपले प्रभाग अधिकारी श्री. नितनवरे यांचे घरापर्यंत जलकुंभ तयार करण्याच्या वेळी पाईप लाईन टाकण्यासाठी रस्ता खोदण्यात आला होता. आज त्यास चार वर्ष झाली. त्या रस्त्यावरील खड्डे अदयापपर्यंत भरले नाहीत. तर यासाठी जवादे

साहेबांना खास करुन वेगळया अशा काही पध्दतीने सांगावे लागेल काय की माझ्या रस्त्यावरील खड्डे भरुन दया म्हणून.

मा. आयुक्त ( श्री. आर.के. सोनवणे ):—मा. महापौर महोदया, सिमेंट कॉक्रिटच्या नविन रस्त्याचे हे जे काम होत आहे यांवर जे खड्डे पडले असतील किंवा त्या कामामध्ये काही चुका असतील तर त्या चुका सुधारण्यासाठी संबंधीत ठेकेदारास नोटीस बजावली जाईल व त्याच्याकडुन या चुकांची दुरुस्ती करुन घेतली जाईल.

मा. सचिव :—प्रश्न क्र. ४०० हा श्री.जमानदास पुरस्वानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४०० :—१) उल्हासनगर १ से ५ तक एडवरटाईज (होर्डिंग) का ठेका किसे दिया गया है ।
२) यह कब दिया गया है तथा कब तक दिया गया है ।
३) इस होर्डिंग द्वारा महानगरपालिका को वर्ष में कितनी आय होती है ।
४) यह टेंडर देते समय जो शर्ते टेंडर में थी क्या वह ठेकेदार ने पुरी की है ।

उत्तर :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील कॅम्प नं. १ ते ३ करीता मे. किंग्ज एंटरप्रायझेस व कॅम्प नं. ४ ते ५ करीता पवन एंटरप्रायझेस या अभिकर्त्यास जाहिरातीचा ठेका देण्यात आलेला आहे.

अभिकर्त्यास ठेका दिनांक १९/३/२००४ पासुन ३ वर्षाकरीता देण्यात आला आहे.

महानगरपालिकेस यापासून रुपये ७,२४,८२४/— एवढे उत्पन्न प्राप्त होते.

करारातील अटी व शर्तीचे पालन अभिकर्त्याने केले असल्याने सदरचा ठेका त्यांना देण्यात आला आहे

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, माझ्या प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे की, जाहिरातीच्या ठेक्यातून आम्हांस दर वर्षी ७ लाख २४ हजाराचे उत्पन्न मिळते. तर मी विचारु इच्छितो की, जाहिरातीचे आम्ही जे कॉन्ट्रक्ट दिले आहे जसे की या अगोदर आमदारांची निवडणुक होती त्यावेळेस पोलवर ब—याचशा होर्डिंग लावण्यात आल्या होत्या. किंवा ब—याच ठिकाणी नविन नविन होर्डिंग्स लावण्यात आल्या होत्या. त्यामुळे आपले उत्पन्न वाढले. किंवा आपणांस काही निश्चित अशी रक्कम मिळत आहे, दर चौरस फुटाच्या हिशोबाने मिळत आहे. किंवा नविन नविन ज्या होर्डिंग्स लागत आहे त्याच्यामुळे जादा उत्पन्न मिळत आहे. याबाबतीत सविस्तर माहिती दिली जावी.

श्री. संजय दुसाने (उप—आयुक्त, शहर):— महापौर महोदया, आपल्या येथे जे कॉन्ट्रक्ट केले आहे ते कॅम्प नं. १, २ , ३ साठी ज्या एजन्सीला काम दिले आहे त्यात १२०० चौरस मिटरचा भाग कॉन्ट्रक्टच्या रक्कमेत समाविष्ट आहे. व त्यात १३६ पोल्स समाविष्ट आहेत. या व्यतिरिक्त जे काही होर्डिंग्ज लावयच्या असतील त्यासाठी त्यांनी वेगळे पैसे भरायचे आहेत, जसे की, मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आता सांगितले निवडणुकीच्या वेळी दोन महिन्यासाठी त्यांनी स्वतंत्रपणे परवानगी घेवुन त्याची वेगळी अशी रक्कम भरली आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— ते किती होर्डिंग्ज लावु शकतात. असे काही त्यांच्यावर बंधन आहे की नाही ते कितीही लावु शकतात?

श्री. संजय दुसाने (उप—आयुक्त, शहर):—जादा होर्डिंग्ज लावण्यासाठी आपणाकडुन परवानगी घेवुन त्याचे पैसे भरायचे आहेत त्यानंतरच त्यांनी होर्डिंग्ज लावायचे आहे. त्यांनी त्यांच्या अंदाजानुसार लावायचे नाहीत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— हे जे जादा होल्डिंग्ज लागतील ते फक्त ठेकेदारच लावु शकतो की, एखादा सर्व सामान्य माणुस पैसे भरुन लावु शकतो.

श्री. संजय दुसाने (उप—आयुक्त, शहर):— आता आपण तीन वर्षासाठी जो करार केला आहे त्यानुसार ठेकेदाराने लावायचे आहेत.

मा. सचिव :—प्रश्न क्र. ४०१ हा श्री. जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४०१ :– उल्हासनगर महानगरपालिका में ''जानकारी के अधिकार'' के अंतर्गत टोटल किस किस को माननिय आयुक्त द्वारा अर्थदंड हुआ है ।

१) अर्थदंड सबसे अधिक किस को हुआ है ।
२) कृपया यह प्रश्न महासभा में रखने की कृपा करें ।

उत्तर :– सोबतच्या विवरणपत्रानुसार आहे.

१) उप–आयुक्त (मुख्यालय)
मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया, हा जो प्रश्न आहे सर्व सामान्य जनतेद्वारा जे प्रश्न विचारले जातात, त्यांच्या अपिलावर अधिका–यांना जो दंड होतो, त्याबाबत मी एक प्रश्न विचारला होता, त्याच्या उत्तरात सांगितले आहे की, दंड कुणाकुणाला झाला आहे? तर याबाबत मी मा. आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, ही जी दंडाची रक्कम आकारण्यात आलेली आहे श्री. यु.एस. लोणारे यांच्यावर रुपये ९५,९८७/– , श्री. संजय दुसाणे यांच्यावर २५,५०८/– रुपये व या व्यतिरिक्त वेगवेगळे जो दंड आकारण्यात आला आहे, तर ही रक्कम वसूल केली आहे काय? फक्त दंड आकारला आहे की महापालिकेकडे पैश्यांचा भरणाही करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– ही दंडाची रक्कम काय १०–१५ वर्षात वसुल होईल?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):– १०–१५ वर्षाची जरुरत पडणार नाही. जोपर्यंत ते येथे आहेत त्याच कालावधीत. समजा त्यांच्याकडे दंडाची जास्त रक्कम बाकी आहे व त्यांची बदली होत आहे. त्यांना येथुन कार्यमुक्त करायचे आहे. अशा वेळेस त्यांच्या शेवटच्या पगारातुन दंडाची पुर्णच्या पुर्ण रक्कम वसुल केली जाईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– दोन वर्षात तर दंडाची रक्कम वसुल होईल ना? एवढया रक्कमेचा तर हप्ता ठेवला आहे ना?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):– यांच्या दंडाची रक्कम जास्त आहे. म्हणुन त्यास दोन वर्षापेक्षा जास्त वेळही लागु शकतो. परंतु जो पर्यंत ते येथे आहेत, त्याच कालावधीत त्यांच्याकडुन दंडाची रक्कम वसुल केली जाईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–योग्य तेवढया रक्कमेची कपात केली पाहिजे. असे नाही की, त्यांना येथुन जायचे आहे परंतु ते दंडाची रक्कम भरु शकत नाहीत.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):– त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होण्यासाठी सुध्दा काही रक्कम दिली पाहिजे याबाबतीत कायदयात तरतुद आहे की ७५ टक्यापेक्षा जास्त रक्कमेची कपात आपण करु शकत नाही. कमीत कमी २५ टक्के किंवा १/३ रक्कम त्यांना पगारापोटी देणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– १/३ पगाराची रक्कम तर आपण त्यांना दया.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–वजावटीच्या सर्व रक्कमा विचारात घेता १/३ पगार म्हणुन त्यांना दयायचा आहे. ते लक्षात घेवुन आम्ही दंडाच्या हप्त्याची रक्कम निश्चित केली आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– आम्हांलाही वाटते १/३ पगाराची रक्कम त्यांना मिळाली पाहिजे. त्यापेक्षा अधिक रक्कम त्यांना मिळता कामा नये.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :– मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आपण आताच श्री. मोहन बेहरानी यांना उत्तरात सांगितले की, श्री. लोणारे यांना पगारापोटी अमुक एवढी रक्कम दिली जात आहे. आमच्या

शहराचे नागरीक जेव्हा टॅक्स भरत नाहीत तेव्हा आपण त्या रक्कमेवर व्याज आकारता, तर आपण या दंडाच्या रक्कमेवर सुध्दा व्याज आकारा ना? हे लोक एवढया उशिराने पैसे भरत आहेत यांच्यावर सुध्दा व्याज आकारले जावे. आमच्या सर्व सामान्य शहरवाशियांवर टॅक्स न भरल्यामुळे व्याज आकारला जात आहे. तर आपल्या अधिका–यांवर व्याज का आकारला जावु नये?

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u> मा. महापौर महोदया, याबाबतीत जो कायदा आहे त्या कायदयामध्ये अशी तरतुद असली पाहिजे. जो महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम आहे त्याच्या कलम ११ मध्ये अशी तरतुद नाही.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u> असली पाहिजे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u> परंतु अशी तरतुद नाही.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४०२ हा श्री. जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४०२:–</u>१) टोटल कितने लोंगो पर (कितनी प्रापर्टी पर) एक लाख रुपये से जादा की टॅक्स बाकी है।

२) उनसे टॅक्स वसुल करने के लिए महानगरपालिका द्वारा क्या कार्यवाही की गयी है।

३) सबसे अधिक जिन १० लोंगो पर (१० प्रॉपर्टी पर ) टॅक्स जादा बाकी है उनपर Ten Tops के नाम तथा पत्ते तथा उनपर कितनी टॅक्स बाकी है कृपया जानकारी दे ।

<u>उत्तर :–</u>१) उल्हासनगर शहरातील एकुण १८० मिळकतीवर १ लक्ष पेक्षा जास्त कर आकारणी बाकी आहे.

२) सदरच्या मिळकतीवर मागणी बिले, नोटीस व अधिपत्रे बजावण्यात आलेली आहेत. सदर वसुली होण्याकरीता कार्यवाही चालु आहे.

**मा. सदस्य श्री. मोहन रामरख्यानी यांनी सभागृहात प्रवेश केला**

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

| अ.क्र. | मिळकत धारकांचे नाव | पत्ता | थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|
| १. | अमर डॉय के. लि. | शहाड स्टेशन जवळ, उल्हासनगर–१ | रु. २,०७,६२,१९२ |
| २. | आय.डी.आय.लि. | शहाड स्टेशन जवळ, उल्हासनगर–१ | रु. ७०,८७,९३० |
| ३. | ताराचंद नागदेव | बॅरेक नं. १०४१ जवळ, उल्हासनगर–३. | रु. १३,८८,२८३ |
| ४. | बी.आर.हरमन मोहता | शहाड स्टेशन कल्याण मुरबाड रोड, उल्हासनगर–१ | रु. ११,७३,९३० |
| ५. | संत श्री. आसारामजी बापु आश्रम | ओ.टी. सेक्शन, खेमानी, उलहासनगर–३. | रु. ११,३३,३९३ |
| ६. | अपार प्रा. लि. | विठ्ठलवाडी स्टेशन जवळ, उल्हासनगर–३. | रु. ७,९७,४७६ |
| ७. | सुंदर डेव्हलोपर्स | पेट्रोल पंप शातीनगर, उल्हासनगर–३. | रु. ६,८०,६५५ |
| ८. | हिरालाल कन्हैयालाल | सॉ मिल पेट्रोल पंप जवळ, | रु. ६,०१,१३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उलहासनगर—३. | |
| ९. | दुर्गाबाई / अनिल/ संगिता ए.ए.एन. | गुरुनानक मार्केट बस स्टाप जवळ, उल्हासनगर—१. | रु. ५,३४,२८३ |
| १०. | रेवाचंद सबारंगानी | रेशन ऑफिस सदारंगानी अपार्टमेंट, उल्हासनगर—३. | रु. ३,१५,६६१ |

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>माझ्या प्रश्नाचे एक साधारणसे उत्तर जे येथे दिले आहे शहरामध्ये असे एकुण किती लोक आहेत की ज्यांच्याकडे एक लाख रुपयापेक्षा जास्त रक्कमेचा टॅक्स बाकी आहे. येथे असे उत्तर देण्यात आले आहे की, १८० अशा मिळकती आहेत की ज्यांच्याकडे एक लाखापेक्षा जास्त टॅक्सची रक्कम बाकी आहे. व यामधील सर्वात जास्त रक्कम बाकी असलेले जे १० लोक आहेत त्यांची सुध्दा येथे यादी देण्यात आली आहे. तर मी हे जाणुन घेवु इच्छितो की, शहरामधील लहानात लहान एखादे घर ज्यावर तीन हजार, चार हजार, पाच हजार रुपये टॅक्स आहे त्याच्याकडे टॅक्स वसुलीसाठी वारंवार महापालिकेचे कर्मचारी जात आहेत. मग त्यास नोटिस बजावुन वसुली करण्याचे प्रयत्न करतात तर १८० मिळकतींवर ज्यांच्यावर जवळ जवळ पाच कोटीपेक्षा जास्त रक्कमेचे टॅक्सची रक्कम बाकी आहे याबाबतीत मा. आयुक्त साहेबांनी जर रोज एका व्यक्तीकडुन टॅक्सची वसुली केली तर हे ६ कोटी रुपये बसल्या जागी वसुल होवू शकतील. तर याबाबतीत पुर्ण वर्षभरात काय—काय कारवाई केली गेली. व ही वसुली का झाली नाही? येथे अशा काही कंपन्यांची नावे दिली आहेत, ज्यांच्याकडे दोन कोटीपेक्षा जास्त रक्कमेची टॅक्सची रक्कम बाकी आहे. अमरडाय कंपनीवर दोन कोटीपेक्षा जास्त रक्कमेचा टॅक्स बाकी आहे. मी मा. महापौरांबरोबर जेव्हा कोटा (राजस्थान) येथे प्रशिक्षणासाठी गेलो होतो, तेथे भोपाळ येथुन एक अधिकारी आले होते, त्यांनी अशी सुचना केली होती की, जर एखादी व्यक्ती टॅक्स भरत नसेल तर व वारंवार नोटिस देवुनही टॅक्सची वसुली होत नसेल तर अशा १० लोकांची नावे शहरातील प्रमुख चौकात होल्डींगस् वर लावून आपण त्यांचे प्रदर्शन करु शकतो. व पैश्यांची वसुली करु शकतो. तर अशा प्रकारची एक योजना आहे, दुसरी योजना तेथे आम्हांला एका अधिका—याने सांगितली की, आजारांसाठी जो एक विमा असतो मेडिक्लेम. शहराच्या बाबतीत त्यांनी एक उदाहरण दिले होते की, तेथे मेडिक्लेमची एक पॉलिसी तयार करुन पुर्ण शहराची मेडिक्लेम पॉलिसी काढुन, जो कुणी पुर्ण वर्षभराचा टॅक्स अगोदर भरतो त्यास महापालिकेच्या वतीने मेडिक्लेमची २० हजाराची पॉलिसी फुकटात दिली जाईल. अशी काही योजना किंवा आणखी कोणत्या प्रकारे आयुक्त साहेब या १८० लोकांकडुन, ज्यांच्याकडे ६ कोटी पेक्षा जास्त रक्कमेचा टॅक्स बाकी आहे तर त्याबाबतीत आपणाकडे काय योजना आहे? आपण या बाबतीत त्यांना किती नोटिसा दिल्या आहेत किंवा काय काय कारवाई केली आहे याची कृपया माहिती दिली जावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. जमनु पुरस्वानी यांनी विचारलेल्या प्रश्नाला महापालिकेने लेखी उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये अधिकाधिक टॅक्स बाकी असलेल्या १० मिळकत धारकांची नावे दिली आहेत. त्यातील अनुक्रमांक ७ वर जो सुंदर डेव्हलोपर्स आहे शांतीनगर येथिल पेट्रोल पंपा शेजारी, त्यांच्यावरही ६,८०,६५५/— रुपये थकबाकी आहे. आणि काही दिवसापुर्वी आपल्या महापालिकेने त्यांना भुखंड विकसित करण्यासाठी परवानगी दिली आहे. ती जागा आणि ही मिळकत, ज्यांच्या नावावर टॅक्सची थकबाकी आहे. ती व्यक्ती जर एक असेल तर त्याबाबतीत आयुक्तांनी खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> मला असे वाटते की, हा जो प्रश्न आहे, तो आयुक्त साहेबांसाठी व दुसरे जे अधिकारी आहेत, त्यांच्यासाठी डोळे उघडण्यासारखा हा प्रश्न आहे. या १८० मिळकतींच्या टॅक्स थकबाकींची जर आपण आकडेमोड केली, फक्त एक—एक लाख रुपये जरी पकडले , पहिल्या १० लोकांवर तीन कोटी पेक्षा जास्त रक्कमेची थकबाकी बाकी आहे. व या १८० लोकांवर सरासरी एक—एक लाख रुपये थकबाकी असल्याचे पकडले तर एक कोटी ८० लाख रुपये होतात. व जर याची एकुण बेरीज केली तर कमीत कमी ६ कोटी रुपये होतात. तर आमचे लोकांवर ६ कोटी रुपये येणे बाकी आहेत. मोठया लोकांकडुन आम्ही वसुली करु शकलो नाहीत. म्हणुन मला असे वाटते की, हा प्रश्न सर्वांचे डोळे उघडणारा आहे. १८० लोकांकडुन मग ते कंपनी धारक असोत किंवा मिळकती धारक असोत यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन त्यांच्याकडुन वसुली केली पाहिजे. व महासभेला वेळोवेळी कळविले पाहिजे की या लोकांमधुन आपण काय काय वसुली केलीत. यासाठी काही ठोस उपाय आपण सांगितले पाहिजेत.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u> मा. महापौर महोदया, या ज्या १८० मिळकती आहेत त्याचा पुर्ण तपशिल आमच्याकड उपलब्ध आहे. या १८० मिळकतींपैकी ५ मिळकती ज्या आहेत, त्यांच्या बाबत न्यायालयात वाद प्रलंबित असल्यामुळे त्यांच्याकडुन टॅक्स रक्कमेची वसुली झालेली नाही. तसेच यामधील ५ मिळकती या शासनाच्या आहेत. व २८ मिळकती अशा आहेत, की ज्या आढळून येत नाहीत. त्यांचे बिल जाते परंतु मिळकत नाही. २२ मिळकती अशा आहेत की ज्यांची दुबार नोंद आहे. म्हणजेच एकाच मिळकतीला दोनदा टॅक्स लावला आहे. २० मिळकतदार असे आहेत की जे हप्त्याहप्त्याने पैसे भरत आहेत. ८ मिळकती अशा आहेत की, ज्या नेहमी करीता बंद आहेत. पैसे मागण्यासाठी कुणाकडे जायचे हे समजुन येत नाही. दोन मिळकतींचे पुर्ण पैसे वसुल झाले आहेत. एका मिळकतीच्या मिळकत धारकाने धनादेश दिला होता, परंतु तो न वटता परत आला. त्यामुळे त्यांच्यावर खटला चालु आहे. ३४ केसेस अशा आहेत की, त्यांच्या काही हरकती आहेत. एकतर दर अधिक आकारला आहे असे त्यांचे म्हणणे आहे किंवा नाव चुकीचे लावले आहे. किंवा जो एरिया दर्शविला आहे तो चुकीचा दर्शविला आहे. याबाबतीत सुनावणी दिल्यानंतर व वाद मिटल्यानंतर ही रक्कम वसुल होण्यासारखी आहे. ३ मिळकती महापालिकेने निष्कासीत केल्या आहेत. ९ मिळकती आम्ही जप्त केल्या आहेत, टॅक्स वसुलीसाठी. ६ मिळकती, ज्या मिळकती धर्मादाय कार्यासाठी वापरात असल्यामुळे त्या लोकांनी सर्वसाधारण करातुन आपणांस सुट मिळावी म्हणुन अर्ज केले आहेत त्यावर निर्णय झाल्यानंतर या ६ मिळकती धारकांकडुन सुध्दा वसुली होवु शकेल. २ मोकळया जागा आहेत त्यांच्यावर सुध्दा आकारणी केली आहे. त्यासुध्दा जप्त करुन त्यांच्याकडुन पैसा वसुल होवू शकतो. महानगरपालिकेच्या स्वत:च्या दोन मिळकती आहेत, ज्यांना करातुन सुट आहे, या मिळकतींना कर आकारणी कशी झाली हे माहित नाही. २० मिळकती अशा आहेत ज्यांची माहिती आम्ही गोळा करत आहोत. आमच्याकडे अदयापपर्यंत त्या मिळकतींची माहिती आलेली नाही. व एक मिळकत अशी आहे, जीची कल्याण महानगरपालिकेत आकारणी झाली आहे. व आपल्या महानगरपालिकेनेही आकारणी केली आहे. याचाच अर्थ फक्त आपल्याकडेच दुबारा कर आकारणी होते असे नाही. ते लोक दावा करतात की, ती मिळकत कल्याण महानगरपालिकेच्या हद्दीत आहे. व विशेष करुन सिमा रेषेवर ज्या मिळकती आहेत, त्यांच्या बाबतीत नेहमी असे सांगितले जाते की, कल्याण महानगरपालिकेचे लोक जेव्हा येतील तेव्हा सांगा की, आम्ही उल्हासनगर महापालिका क्षेत्रात आहोत व उल्हासनगर महानगरपालिकेचे लोक जेव्हा वसुलीसाठी जातील तेव्हा त्यांना सांगायचे की, आम्ही कल्याण महापालिका क्षेत्रात राहतो या १८० मिळकतींसाठीच नाही तर अशा प्रकारचा तपशील, अशाच प्रकारचा पाठ पुरवा आम्ही यावेळेस करत आहोत. जेणे करुन कोणत्याही मिळकत धारकांकडुन टॅक्स वसुल करण्याचे राहता कामा नये. येथे मी मागच्या वेळेस सांगितले होते की, येथे अशा जवळ जवळ १३ हजार मिळकती आहेत की, ज्यांच्या मालकांचे नावच आमच्याकडे नाही. या मिळकतींचा टॅक्स कुणाकडुन वसुल करायचा? कर वसुलीसाठी यावर्षी आम्ही जी.आय.एस. टॅक्नॉलॉजी मार्फत कालच स्थायी समितीकडुन मंजुरी प्राप्त झाली आहे. जी.आय.एस. टॅक्नॉलॉजी मार्फत प्रत्येक मिळकतीचा, इमारतीचा, त्या इमारतीमध्ये किती भोगवटादार आहेत, त्यांच्या ताब्यात किती एरिया आहे, त्यांचा टॅक्स किती आहे, ही सर्व माहिती या अगोदर एक वेळ टाटा इन्फोटेक मार्फत असा एक प्रयत्न करण्यात आला होता. ते यामध्ये यशस्वी झाले नाहीत. परंतु आम्हांला असे वाटते की, आता जी.आय.एस. टॅक्नॉलॉजीचा उपयोग करुन प्रत्येक मिळकतीमध्ये राहणारा भोगवटादार त्यांचा तपशिल मिळाल्या नंतर मिळकत कराच्या वसुलीमध्ये सुध्दा सुलभता येईल. व यावर्षी काही सुधारणा होण्याची अपेक्षा मला वाटते.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना एक बांधकाम परवानगी दाखविली होती. त्याचा खुलासा आयुक्त साहेबांनी केला नाही.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>मा. महापौर महोदया, आता याची पडताळणी करुन आपणांस उत्तर देवु.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. आयुक्त साहेब, महासभेचे जेव्हा इतिवृत्त आमच्याकडे आले. या सभेची सभा सुचना आमच्याकडे आली त्यावेळेला मी आपल्याला एक पत्र दिलेले आहे, दिनांक २१.६.२००५ रोजी आपल्याला पत्र दिले आहे. ते पत्रही आपण बघितलेले नसेल असे मला वाटते. आपण आता जे उत्तर दिले त्याच्यावरुन असे वाटते की, पत्र आपण लक्षात घेतलेले नाही. जाणुनबुजुन ते पत्र लक्षात घेतलेले नाही. कारण या माणसाच्या नावे एका प्रॉपर्टीचा हाउस टॅक्स बाकी असतांना जर त्याला त्याच वर्षात मिळकत विकसित करण्याची परवानगी दिली जाते त्या माणसाचे एवढे हित कशाला बघितले गेले? याचाही महासभेत खुलासा व्हावा. त्यासाठीच हा प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे. तुमच्याशी चर्चा

करण्यासाठी किंवा तुम्हांला माहिती असावी यासाठी तो भुखंड विकसित करण्यासाठी दिलेल्या परवानगीचे पत्र तुमच्या हाती दिलेले नाही. दुसरे असे की ही मिळकत विकसीत होत असतांना सुध्दा मी हरकत घेतली होती तेव्हाही प्रशासनाने त्या विकासकर्त्याबाबत काहीही चौकशी तशी चौकशी का केली नाही? हाउस टॅक्स बाकी असतांना एखादया माणसाला नळ जोडणी घ्यायची असेल तर त्यास प्रथम हाउस टॅक्स पुर्ण भरावा लागतो. आयुक्त साहेब आपण त्यांना परवानगी दिली आहे. अशी परवानगी दिल्यानंतर सुध्दा आपण त्याचा हाउस टॅक्स का पुर्ण भरुन घेतला नाही, जाणुन बुजुन भरुन घेतला नाही असे मला या ठिकाणी नमुद करावेसे वाटते. एवढे हे कोणासाठी व कशासाठी ज्यांनी कोणी परवानगी दिली असेल त्यांनी ती का दिली? त्याची चौकशी व्हावी. यासाठी हा प्रश्न आम्ही येथे उपस्थित केला आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी सांगितले त्याची माहिती माझ्याकडे नाही आहे असे नाही. परंतु या सदनाला माहिती देण्यापूर्वी सभागृहात निवेदन केले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. जी माहिती सध्या माझ्याकडे आहे ती अशी आहे की ही मिळकत पहिल्यांदा परवानगी दिल्यानंतर तीच्यावर कर आकारणी झाली. ती फक्त मोकळी जागा आहे. खाली जागेवर बांधकाम परवानगी देण्याअगोदर कर आकारणी केलेली नव्हती. म्हणजेच थकबाकी असतांना सुध्दा परवानगी दिली असे नाही. मोकळया जागेस परवानगी दिल्यानंतर जेव्हा आम्ही कर आकारणी केली तर त्याबाबत आज आपण जेव्हा हा प्रश्न विचारला, त्यामध्ये एक लाखापेक्षा जास्त रक्कमेचे थकबाकीदार कोण आहेत त्यामध्ये यांचे नाव आले आहे. फक्त मोकळया जागेतील कर आकारणी, परवानगी दिल्यानंतर असेसमेंट झाली आहे. मी निवेदन का दिले नाही कारण की पुर्ण माहिती करुन, पुर्ण फाईल तयार करुन मग मी आपणांस निवेदन दिले असते. कोणाला वाचविण्यासाठी, नशिबाने आमचे कुणी साथीदार नाहीत, व हे जे विकासधारक आहेत ते आमचे कुठलेही दुरचे नातेवाईक नाहीत. कुणालाही सोडले जाणार नाही, जर एखादा नातेवाईक असेल तरी सुध्दा आम्ही त्याला सोडणार नाही. इतके मी सदनाला आश्वासन देवु शकतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— एका वर्षाचे हाउस टॅक्स बाकी आहे का त्याच्यावर? एका वर्षाची, ९४ साली तुम्ही परवानगी दिली.

**मा. सदस्या श्रीमती दिपा पंजाबी, श्रीमती भावना रामचंदानी, श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):— विकासाला परवानगी दिल्या नंतरची आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— २००४ साली तुम्ही परवानगी दिली आहे आणि २००५ सालामध्ये त्याच्यावर ६ लाख ८० हजार रुपये बाकी आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):— परवानगी कधी दिली गेली?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— २००४ मध्ये.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—याचाच अर्थ मागच्या वर्षी? २००३—२००४ मध्ये असेसमेंट झाली आहे. म्हणूनच मी सांगतो की, काही सांगण्यापुर्वी मी आधी पुर्ण तपासणी करुन, पुर्ण फाईल बघतो. ही जी परवानगी दिली गेली आहे ती २००४—२००५ साली दिली आहे. म्हणजेच ही मिळकत २००४—२००५ ला असेस झाली आहे यामध्ये थकबाकी नाही. मागील वर्षाची त्याची कर आकारणी आहे. आता ३१ मार्च, २००५ ला ती रक्कम थकबाकीमध्ये दिली आहे व सभागृहाला मी अस्वस्थ करु इच्छितो की, ही रक्कम वसुल केली जाईल. आजच्या तारखेला ही रक्कम भरली नाही म्हणुन तिचा उल्लेख आपल्या समोर आलेला आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मा. आयुक्त साहेब, जर मोकळया जागेला तुम्ही कर आकारणी केली आणि १ वर्षाला ती जर ६ लाख रुपये असेल तर जेव्हा पासुन ती जमिन त्यांच्या ताब्यात आहे तेव्हापासुनची त्यांच्याकडुन वसुली केली पाहिजे. किती वर्षापासुन त्यांच्या ताब्यात आहे? आपल्या विभागाच्या चुकीमुळे त्याची कर आकारणी झाली नव्हती. परंतु ती जमिन त्यांच्या ताब्यात आहे, त्याचे त्यांच्याकडे दस्तऐवज

आहेत. तर ती ५ वर्षापुर्वी त्यांच्या ताब्यात असेल, १० वर्षापुर्वी ताब्यात असेल तेव्हापासुनची वसुली झाली पाहिजे किंवा तेव्हापासुनची कर रक्कमेची वसुली झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आयुक्त साहेब, आपण त्यास ही मिळकत विकसित करण्यासाठी परवानगी दिली त्यांच्याकडुन आपण परवानगी शुल्क घेतले नव्हते. त्याबाबत सुध्दा आपणाकडे लेखी स्वरुपात तक्रार केली होती. तर ते शुल्क आपण घेतले किंवा नाही त्याचाही खुलासा करावा.

**मा. सदस्या श्रीमती किरण माखिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. आयुक्त साहेब, जसे की, आपण सांगितले मोकळी जागा आहे, त्यानंतर त्यावर बांधकाम झाले त्यावर आपण कर लावला नाहीत तर याबरोबरच मी एक प्रश्न विचारु इच्छितो की, उल्हासनगर शहरामध्ये बरेचसे लॉन्स आहेत मोकळी जमिन आहे त्यावर काही बांधकाम झालेले नाही. या लॉन्स लग्न कार्यासाठी भाडयाने दिल्या जातात. ज्यांना वर्षाला १०—१०, १२—१२ लाख रुपये भाडे मिळते. तर त्यांची आपण कर वसुली कशी करता? भाडयाच्या हिशोबाने करता, मोकळया जागेच्या हिशोबाने करता ती कशी करता? याची सभागृहाला माहिती दिली जावी.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, सर्वात प्रथम तर मी मा. विरोधी पक्ष नेता श्री. बोडारे साहेब यांनी जी सुचना केली त्याबाबत खुलासा करु इच्छितो. त्यांचे म्हणणे आहे की, जी मिळकत जेव्हापासुन त्या माणसाकडे आहे तेव्हापासुन त्यावरील कर वसुल केला पाहिजे. जर तशी कायदयात तरतुद असती तर सर्वात जास्त आनंद मला झाला असता. परंतु पुर्वलक्षी प्रभावाने मिळकत कर किंवा कोणताही कर वसुल केला जावु शकत नाही. आकारणी सुध्दा केली जावु शकत नाही व वसुली सुध्दा केली जावु शकत नाही. या शहरामध्ये अशा ब—याचशा मिळकती होत्या की ज्या १० वर्षापुर्वी, १२ वर्षापुर्वी बांधुन झाल्या होत्या परंतु त्यांना मिळकत कर आकारणी केली नव्हती. मागील दोन वर्षामध्ये आम्ही अशा ७ हजार मिळकतींना कर आकारणी केली. त्यामुळे वर्षाला जवळ जवळ ६ कोटीची मालमत्ता करामध्ये वाढ झाली आहे. यामध्ये काही हॉटेल्स आहेत काही इमारती आहे हे आपणा सर्वांना माहित आहेच. परंतु ही तर मोकळी जागा आहे जेव्हा या जागेस बिनशेती वापरासाठी परवानगी दिली गेली आणि ती ही फक्त संरक्षण भिंत बांधण्यासाठी तेथे कोणतेही बांधकाम नाही. असे असतांना आम्ही त्या मिळकतीची कर आकारणी केली. या अगोदर उल्हासनगर मध्ये फक्त इमारतींना कर आकारणी होत होती. मोकळी जागा जी बिनशेती वापरासाठी वापरली जाते त्याला सुध्दा कर आकारणी केली जात नव्हती. आम्ही जमिनीचीही कर आकारणी केली आणि जमिन व इमारती या दोन्हीची मागील वर्षी कर आकारणी केली. सन्माननिय श्री. राजेंद्र चौधरी साहेबांनी जे सांगितले की, त्यांच्याकडुन जे विकास शुल्क घ्यायचे होते, ते घेतले किंवा नाही, वसुल केले किंवा नाही, त्यांना आम्ही नोटिस बजावली आहे. बिलसुध्दा पाठविले आहे. परंतु वसुली झाली किंवा नाही याची माहिती सध्या माझ्याकडे नाही. तिसरे श्री. जमनादास पुरस्वानी साहेबांनी जे म्हटले की, जेवढया काही लॉन्स ज्यांचा व्यवसायिक वापर होतो त्यांना कोणत्या पध्दतीने कर आकारणी केली आहे. येथे शहरामध्ये लॉन्सच्या जागेची कर आकारणी व्यवसायिक वापराच्या हिशोबाने केलेली आहे. कशी केली याबाबत आता माझ्याकडे माहिती नाही. परंतु कायदयामध्ये जी तरतुद आहे ती अशी आहे की, जर मोकळी जागा असेल आणि तीचा बिनशेती वापर होत असेल तर तिला कर आकारणी केली पाहिजे. त्या जमिनीच्या मालकाला त्या जमिनीचे काय भाडे मिळू शकते? भलेही त्या जमिनीचा बिनशेती वापर होवो अगर न होवो परंतु जर बिनशेती वापरासाठी ते क्षेत्र वापरात असेल किंवा बिनशेती वापर परवानगी योग्य आहे, तर ती जमिन जे भाडे मिळण्याची क्षमता आहे. जी शक्यता आहे त्या हिशोबाने किंवा त्या जमिनीतुन जो फायदा मिळणार आहे त्या जमिनीचे किती भाडे मिळते जसे की, हॉटेल आहे किंवा सिनेमागृह असो किंवा व्यवसायिक वापर केला जात असलेल्या अशा लॉन्स असोत, त्यांची प्राफीट बेसिस मेथडने कर आकारणी केली पाहिजे. कर आकारणी साठी ब—याचशा पध्दती आहेत. कंपॅरिटीव्ह मेथड आहे. कॅपिटल व्हॅल्यु मेथड आहे. कॉन्स्ट्रक्टरर्स टेस्ट मेथड आहे. व प्राफिट बेसिस या ज्या मेथड आहेत त्यापैकी प्राफिट बेसिस ही जी मेथड आहे, त्या पध्दतीने त्या जागेची कर आकारणी केली पाहिजे. ती झाली आहे किंवा नाही ते पाहिले पाहिजे, झाली नसेल तर प्राफिट बेसिसवर ॲसेसमेंट केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. आयुक्त साहेब, जर असे झाले नसेल तर किती लॉन्स आहेत याची पुर्ण माहिती गोळा केली पाहिजे. भाडयाने कोणत्या लॉन्स दिल्या जातात त्यांची कर आकारणी करुन पुढील महासभेत सर्व नगरसेवकांना याची माहिती दिली जावी.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, पुढील महासभेत नाही तर याबाबतची माहिती घेवुन कर आकारणी करुन नंतर माहिती देईन.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४०३ हा श्री.राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

<u>**प्रश्न क्र. ४०३ :—**</u> उल्हासनगर महानगरपालिका (मुख्यालय) इमारतीचे बांधकामाबाबत प्रश्न क्र. ३८२, दिनांक २२.३.२००५ अन्वये माहिती मिळणेची विनंती केली होती. त्यानुसार प्रश्न १ (ब) इमारत बांधकामास रितसर परवानगी घेतली आहे का? या प्रश्नाचे उत्तर होय, रितसर परवानगी घेतली आहे. तथापी परवानगीची प्रत कार्यालयाकडे उपलब्ध न झाल्याने सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडुन प्रत मागणी करण्यात आलेली आहे असे दिले आहे.

प्र. १ ) सदर इमारतीचे रितसर परवानगीची प्रत उपलब्ध नसल्याने मा. सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडुन प्रत मागणी केली आहे. कृपया मागणी पत्राची प्रत मिळावी तिची तारीख व क्रमांक दयावा. सदर मागणीची (परवानगीची) प्रत महापालिकेस कधीपर्यंत उपलब्ध होईल. कालावधी दयावा.

प्र. १ अ) ज्या भुखंडावर महापालिका मुख्यालयाची इमारत बांधली आहे. सदरचा भुखंडा कोणाच्या मालकीचा होता. उत्तर महाराष्ट्र शासनाचे नावे नोंद आहे. उल्हासनगर शहरातील भुखंडसुध्दा महाराष्ट्र शासनाचे नावे आहे व सदर भुखंडाचे नगरभुमापन क्र. ९१११९ व ९१२२ आहे.

प्र. १ ब) महापालिका इमारतीचा भुखंड महाराष्ट्र शासनाचे नावे नोंद आहे. सदर बाब खरी आहे का?

प्र. १ प) फ) ब) सदर इमारतीचे प्राकलनाची अंदाजीत रक्कम किती होती व बांधकाम पुर्ण करण्यास किती खर्च झाला? मुख्यालयाचे इमारतीस पायाभरणी व पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे काय? क्रमांक व तारीख दयावी. सदर कामाच्या निविदा कोणत्या व किती ठेकेदारांनी भरल्या होत्या त्यांची नावे दयावी. वरील ३ प्रश्नांचे उत्तर सदर प्रश्न सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत.

प्र. १ क) सार्वजनिक बांधकाम विभाग महापालिकेचे अंतर्गत येत नाही का? सदर प्रश्नाचे दिलेले उत्तर योग्य आहे का? संबंधीत विभागाकडुन माहिती उपलब्ध करुन घेणेची जबाबदारी कोणाची आहे?

तरी कृपया वरील प्रश्न क्र. १ अ) ब) व क) चे सुचक , समाधानकारक उत्तर व प्रश्न क्र. ३८२ प) फ) व ब) ची माहिती (अपुर्ण उत्तरे) महासभेत मिळावी ही विनंती.

<u>उत्तर :—</u> मा. सहाय्यक संचालक, नगररचना यांनी महानगरपालिकेकडुन मंजुर नकाशाची बांधकाम परवानगी व मंजुर आदेश क्रमांकाची मागणी केलेली आहे. तथापी सदरचा क्रमांक व इतर अभिलेख या कार्यालयात उपलब्ध होत नाही.

होय.

होय.

सदर प्राकलनाची अंदाजित रक्कम ३५,५०,०००/— एवढी होती. व बांधकाम पूर्ण करण्यास ३६,०४,२५०/— एवढा खर्च झाला. पूर्णत्वाचा दाखला व ठेकेदारांची नावे याबाबत माहिती उपलब्ध नाही.

**मा. उप—महापौर श्री. विनोद तलरेजा हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> महापौरजी, उप—महापौरजी, व आयुक्त साहेब, मी महापालिकेच्या संदर्भात दिनांक २२/३/२००५ रोजी ३८२ क्रमांकाचा प्रश्न विचारला होता. ही जी महापालिकेची इमारत आपण बांधली आहे तिची रितसर परवानगी आपण घेतली आहे किंवा नाही? आपण लिहिले आहे की,

आमच्याकडे काहीही कागदपत्र उपलब्ध नाहीत. तर याचा काय अर्थ काढायचा हे तर जरा सांगाना? १० प्रश्न आहेत ते वेगवेगळे करुन विचारायचे आहेत.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u> मा. महापौर महोदया, मराठीमध्ये एक म्हण आहे ''दिव्याखाली अंधार'' आज ही स्थिती अशी आहे की, ज्या इमारतीचा आम्ही वापर करत आहोत, त्या इमारतीची जी जमिन आहे तिचेही कागदपत्र आमच्याकडे नाहीत. व ही जी इमारत आहे, तिची जी बांधकाम परवानगी घेतली आहे. त्याबाबतीत दस्तऐवजावरुन असे दिसून येते त्या परवानगीची जी प्रत आहे ती सहा. संचालक नगररचना यांच्याकडुन ती प्रत मिळत नाही. आम्ही त्यांना विनंती केली की, आपण आम्हांला ती प्रत दया. त्यावर त्यांनी लेखी आम्हांला कळविले आहे की, त्या परवानगीचा क्रमांक काय आहे तो दया म्हणजे आम्ही ती प्रत शोधुन देवु. परंतु जर आमच्याकडे तो क्रमांक असता तर त्या परवानगीची प्रतही आमच्याकडे असती. किंवा प्रत असती तर क्रमांकही आमच्याकडे असता. आमच्याकडे ना प्रत आहे ना क्रमांक आहे. तरीही आम्ही त्यांना विनंती करत आहोत की त्यांच्याकडे जे रजिस्टर असेल ते रजिस्टर पाहुन तो क्रमांक व बांधकाम सुरुवात केल्याचे प्रमाणपत्र दया ते प्राप्त करण्याचे आम्ही प्रयत्न करत आहोत प्राप्त होताच आपणांस या बाबत माहिती दिली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> व अतिक्रमणाचा अर्थ काय?

**मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा यांनी पुनः सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u> अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम हया दोन वेगवेगळया गोष्टी आहेत, अतिक्रमणाचा अर्थ आहे, एखादयाच्या मालमत्तेमध्ये त्याच्या परवानगीशिवाय प्रवेश करणे किंवा तिचा वापर करणे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> आपण ही जी महापालिकेची इमारत बांधली आहे, आपण अतिक्रमण केले आहे. हे कागदपत्र आहेत जिल्हा अभिलेख कक्षाकडील यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे अतिक्रमणदार उल्हासनगर नगरपालिका परिषद.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u> आहे ना, आम्हांला माहित आहे ना. जमिनीचे ते जे दस्तऐवज आहेत. त्या दस्तऐवजांमध्ये या जमिनिंच्या कागदपत्रांवर मालक म्हणुन शासनाची नोंद आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> या जमिनिचा पहिला मालक जो आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u> ते वेगळे. नंतर जेव्हा १२४८ हेक्टर जमिन जेव्हा संपादीत केली संरक्षण हेतुसाठी तेव्हा त्याचे कागदपत्र शासनाच्या नावावर झाले. केंद्र सरकारची ही जमिन जेव्हा तीचे नकाशे तयार करण्यात आले. त्या नकाशात व नंतरच्या विकास आराखडयात ही जमिन सार्वजनिक वापरासाठी आरक्षित ठेवण्यात आली. १९७४ च्या विकास आराखडयात ही जमिन सार्वजनिक वापरासाठी ठेवल्यामुळे तिचा ताबा आम्हांला मिळाला. परंतु कागदपत्रांवरील मालकी हक्क हस्तांतरीत झाला नाही. म्हणुन जमिनीच्या दस्तऐवजाची नोंदीमध्ये अतिक्रमणदार म्हणुन उल्हासनगर नगरपालिकेच्या नावाची नोंद आली आहे. व बरीचशी अशी जमिन आहे जसे की, बोट क्लब, गोल मैदान येथिल गार्डन याबाबतीत १९८७ मध्ये आम्हांला फक्त कागदोपत्री ताबा देण्यता आलेला आहे. या जमिनीचा जो मालकी हक्क हस्तांतरीत व्हायला पाहिजे होता तो अदयापपर्यंत झालेला नाही. व जोपर्यंत मालकी हक्क हस्तातरीत होत नाहीत तोपर्यंत त्या जमिनिच्या कागदपत्रांमध्ये मालकी हक्क राज्य सरकारचा किंवा केंद्र सरकारचा राहिल. व नगरपालिकेची अतिक्रमणदार म्हणुनच नोंद राहिल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> आपण एवढा जो पैसा या इमारतीवर खर्च केला तो असाच केला का? येथे दाखविले आहे की त्या काळामध्ये ३७ लाख रुपये खर्च केला आहे. व आज सुध्दा त्यामध्ये बांधकाम करुन लाखो रुपये खर्च करत आहात. उदया सकाळ हे बांधकाम निष्कासीत केले तर? तर याबाबत कोण जबाबदार असेल?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> साहेब, स्पष्ट मालकी हक्क नसतांना नकाशा कसा मंजुर झाला?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> नकाशा अदयापपर्यंत मंजुर झालेला नाही ना? आता होईल पास नकाशा, जवाहर हॉटेल बांधुन झाल्यानंतर त्याचा नकाशा मंजुर झाला होता. तसेच हेही बांधकाम झाल्यानंतर याबाबतचा नकाशा मंजुर होईल?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> आमच्याकडे हेही दस्तऐवज उपलब्ध नाहीत की, निविदा कोण—कोणी भरल्या होत्या? याचे सुध्दा दस्तऐवज आमच्याकडे नाहीत.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> मा. महापौर महोदया, जेवढे खरे बोलायचे तेवढे आम्ही बोललो आहोत. यापेक्षा अधिक खरे बोलायचे आहे तर तेही आम्ही तयार आहोत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> सत्य काय आहे ते सांगा ना? लोकांना माहित पडले पाहिजे सत्य काय आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> परंतु हे फक्त एक उदाहरण नाही आहे आपण जेथे रस्ते तयार करत आहोत. त्या जागेचाही मालकी हक्क आपण जेथे सी.सी.पॅसेज तयार करत आहोत त्या जागेचाही मालकी हक्क, आपण जेथे समाजमंदिर बांधत आहोत त्या जागेचाही मालकी हक्क, आपण जेथे उदयान तयार करत आहोत त्या जागेचाही मालकी हक्क, आजपर्यंत महापालिकेच्या नावावर नाही. तरीही आपण त्यावर खर्च करत आहोत. मालकी हक्क जर प्रथम पाहिला तर आपणांस आपल्या प्रभागामध्ये जी विकास कामे करायची आहेत मग ती सी.सी. पॅसेलची असोत किंवा नालीची असोत किंवा रस्त्याची असोत. कोणतीही कामे होवु शकणार नाहीत. मला वाटते यापेक्षा अधिक सत्य बोलणे आपणासाठी............

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—</u> आयुक्त साहेब, हरकतीच्या मुद्दयाद्वारे मी बोलु इच्छितो, आयुक्त साहेब महापौर महोदया, आयुक्त साहेबांनी जे सत्य सांगितले, त्या सत्याची आम्ही त्यांना आठवण करुन देवु इच्छितो. सत्य जाणुन त्यावर न्याय करा. आपणाकडे एक विनंती पत्र दिले आहे, आम्ही जो निवडुन आलो आहोत तो समाजासाठी निवडुन आलो आहोत. समाजासाठी आम्ही आपणाकडुन सुविधा मागत आहोत. आम्ही आपणांस कित्येक पत्र लिहिली. आमच्या महापौर भाभी ज्योती कालानी यांनी आपणांस एक पत्र पाठविले आहे. बॅरेक नं. १७८६ च्या मागे एक समाज मंदिर , बॅरेक नं. १७७९ च्या मागे बांधुन दया. भाभी ज्योती कालानी यांनी आपणांस त्यांच्या निधीतुन अडीच लाख रुपयाची रक्कम समाज मंदिर बांधण्यासाठी उपलब्ध करुन दिली. परंतु आपण सत्य ओळखले नाही. सत्य ओळखा आपली जी महानगरपालिका आहे, आपण सत्य सांगितले की, जे कागदपत्र आमच्याकडे उपलब्ध नाहीत. जे सी.सी. पॅसेज तयार करत आहोत त्याचे मालकी हक्काचे कागदपत्र आमच्याकडे नाहीत. आमची जी उदयाने आहेत त्यांची मालकी हक्काची कागदपत्रे आमच्याकडे नाहीत. दसेरा मैदानच्या मालकी हक्काची कागदपत्रे आपणाकडे नाहीत. अशी समाज मंदिरे किंवा उदयाने ज्यांच्या मालकी हक्काची कागदपत्रे आपल्याकडे नाहीत ते विकले जात आहेत. प्रशासक शहर वसाहत यांच्या कार्यालयातुन याबाबतची सनद दिली जात आहे. हे कधी थांबविले जाईल? आमची मुले कुठे खेळतील? जर दसेरा मैदानची दुस—या कुणाच्या नावावर सनद निघाली, तर आमची मुले कुठे खेळतील? व आमचे लालसाई हे जे गार्डन आहे त्याबाबत आमचे असे ऐकण्यात आले आहे की, त्या गार्डनची ही सनद कुणाला तरी दिली आहे हे काय होत आहे. आपण या जागेचा मालकी हक्क केव्हा घेणार? जेव्हा हया जागा दुस—या कुणाच्या ताब्यात जातील तेव्हा आपण त्या परत कशा मिळु शकणार? कृपया सत्यतेस ओळखा जनतेला ज्या ज्या सुविधा दिल्या पाहिजेत त्या दया. व महापालिकेचे जे नियम आहेत त्यानुसार या जागांचे मालकी हक्क आपण घ्या. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> मी धन्यवाद देवु इच्छितो श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांना. व मी धन्यवाद देवु इच्छितो आमचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे साहेब यांना. ज्यांनी एक अतिशय चांगला असा मुद्दा येथे प्रस्तृत केला. व काहीही न लपविता आमचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांनी सत्यता सभागृहासमोर ठेवली. व या मुद्दयावर जेवढी काही चर्चा होईल, जेवढी काही माहिती प्रकाशात येईल तर त्याच्या इतिवृत्तातांची एक प्रत कमीत कमी उच्च न्यायालयापर्यंत पोहचली पाहिजे की ८५५ इमारती तोडण्याचा हा जो मुद्दा निघाला आहे, तर या शहरामध्ये केवळ या ८५५ इमारतीच अवैध नाहीत, हे पुर्ण शहर ९० ते ९५ टक्के शहर अनाधिकृत बांधकामात वसलेले आहे. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांच्या प्रश्नातुन आमच्या समोर ही

जी माहिती आली आहे, ती खरच डोळे उघडणारी आहे. व या मुद्दयाबाबत मी सभागृहास आग्रह करीन की, या मुद्दयावर भरपुर चर्चा झाली पाहिजे. व त्याच्या इतिवृत्तंताची प्रत उच्च न्यायालयासमोर ठेवली पाहिजे की आमच्या शहराबाबत सत्यता काय आहे आणि आम्ही कोणत्या परिस्थितीत जीवन जगत आहोत. आमच्या मिळकतीची स्थिती काय आहे? ज्या महानगरपालिकेमध्ये बसुन आम्ही कायदयाच्या गोष्टी करतो, जी महानगरपालिका नागरीकांना घर दुरुस्तीची परवानगी देत नाही व म्हणतात की, जोपर्यंत सनद नाही, स्पष्ट मालकी हक्काचे कागदपत्र नाही तोपर्यंत काही होणार नाही. मिळकत कराच्या पावतीवरील नाव हस्तांतरीत करुन दिले जात नाहीत, कारण की त्यापुढे आम्ही अटी, शर्ती व नियम लावतो आमच्या महानगरपालिकेच्या इमारतीचा बांधकाम नकाशा मंजुर नाही तिच्या जमिनीच्या मालकी हक्काचे कागदपत्र आमच्याकडे नाहीत, तर काय उच्च न्यायालय महानगरपालिकेच्या इमारतीचे निष्कासन करण्यास आदेश देईल? हे कटु सत्य आयुक्त महोदयांनी या प्रश्नाच्या उत्तराच्या माध्यमातुन सभागृहासमोर ठेवले आहे. ही सत्यता सभागृहासमोर ठेवुन आपण शहरावर उपकार केले आहेत. कारण की, या इतिवृत्तांताची प्रत उच्च न्यायालयापर्यंत गेलीच पाहिजे. व उच्च न्यायालयासमोर व शासनासमोर ही सत्यता आलीच पाहिजे. जय हिंद।

**मा. सदस्य श्री. गोविंद लुंड हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी:—</u> मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, १९८७ मध्ये ज्या भुखंडांचा महानगरपालिकेस कागदोपत्री ताबा मिळाला ते भुखंड कोणते आहेत? त्याची माहिती महासभेपुढे ठेवली जावी व या भुखंडाचे मालकी हक्क आपणाकडे घेण्यासाठी कार्यवाही केली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, हा प्रश्न नगररचना विभागाशी सबंधीत आहे. नगररचना विभाग महानगरपालिकेच्या अंतर्गत येत नाही काय? उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> मा. महापौर महोदया, या प्रश्नाचे उत्तर जेव्हा मी वाचले त्यात असे दिसुन आले की, एका विभागाने दुस—या विभागाबाबतचे उत्तर दिलेले नाही. याबाबत मी हे सांगु इच्छितो की, महापालिकेशी संबंधीत असे सन्माननिय सदस्यांकडुन जे प्रश्न विचारले जातात, तर असे प्रश्न हे मुद्देसुद असावेत व त्यांची उत्तरेही मुद्देसुद असावीत. याबाबत विधी मंडळामध्ये जी पध्दती अंगिकारली आहे, तशी पध्दती येथे सुध्दा अंगीकारण्यासाठी मी एक प्रस्ताव आपल्या समोर पुढील महासभेत आणेन. सध्या आता एका विभागाने असे लेखी उत्तर दिले आहे की, नगररचना विभागाशी संबंधीत, बांधकाम विभागाशी संबंधीत यापुढे अशा प्रकारची उत्तरे आपणांस मिळणार नाहीत. व यापुढे प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आयुक्तांच्या स्वाक्षरीनेच मिळेल.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> माझी आयुक्त साहेबांना विंनती आहे की, हा प्रश्न प्रलंबित ठेवला जावा. याबाबत आपण जेव्हा नविन मसुदा सभागृहासमोर आणाल तेव्हा या प्रश्नाचे योग्य असे उत्तर मिळाले पाहिजे. म्हणुन हा प्रश्न तोपर्यंत प्रलंबित ठेवला पहिजे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> प्रश्नाचे उत्तर दिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—</u> नगररचना विभागाशी संबंधीत उत्तर जे आहे ते अर्धवट आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> कुठे उत्तर दिले आहे? किती लोकांनी निविदा भरल्या होत्या याचे उत्तर दिलेले नाही. त्याचेही दस्तऐवज उपलब्ध नाहीत.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> मा. महापौर महोदया, महानगरपालिकेच्या दस्तऐवजांमध्ये जी माहिती उपलब्ध नाही, त्याबाबत आपणांस सत्य ते सांगितले आहे की, ती माहिती उपलब्ध नाही. किती खर्च आला याबाबतची माहिती उपलब्ध आहे. निविदा कोणी भरली, कोण ठेकेदार होता, हे बांधकाम जेव्हा झाले

त्याबाबत जी माहिती येथे असावयास पाहिजे होती ती येथे मिळत नाही. व जी माहिती माझ्याकडे नाही ती मी सभागृहास कशी देवु शकतो?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> महाराजजी, ११२ फाईली गहाळ आहेत ना? त्यामध्ये आणखी ही एक फाईल समाविष्ट करुन ११३ फाईली गहाळ आहेत असे म्हणावे लागेल.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> नाही—नाही, कदाचित त्यापेक्षा अधिक फाईली गहाळ आहेत असे म्हणावे लागेल.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौरजी, उप—महापौरजी, व आयुक्त साहेब, महापालिका भवन हे अतिक्रमण आहे हे आता सिध्द झाले आहे. त्याबद्दल सन्माननिय सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी तुम्हांला धन्यवाद दिले आहेत. त्याचबरोबर या ठिकाणी मी तुम्हांला सांगु इच्छितो, या मुख्यालयाच्या इमारतीमध्ये पावसाळयाच्या सुरुवातीला पुन्हा एकदा अतिक्रमण करण्यात आले आहे. ते अतिक्रमण म्हणजे काही विभागांमध्ये पाण्याची गळती सुरु होती त्याच्या वरती पत्राची शेड टाकण्यात आली आहे. त्याची सुध्दा परवानगी आपण घेतलेली नाही असे दिसुन येते. पण गोर—गरीब लोक जे झोपडपट्टीमध्ये राहतात बॅरेक मध्ये राहतात, पावसाळयाच्या तोंडावर घरांची थोडी डागडुजी करायची आहे. फुटलेले पत्रे बदलायचे आहेत. त्यांना मात्र आपण परवानगी देत नाहीत. परवागनी देता म्हणुन सांगाता आणि त्या ठिकाणी अनेक कायदे आणि नियम लावता. तुमच्याकडे सनद आहे का? असेल तर जेव्हा २० वर्षापुर्वी तुम्ही घर बांधले तेव्हा परवानगी घेतली होती का? आता महापालिकेकडे मालकी हक्काचे कागदपत्र नाही तर झोपडपट्टी धारकांकडे कुठुन असणार? मा. महापौरजी मी आपणांस विनंती करु इच्छितो की, या शहरामध्ये झोपडपट्टयांमधील लोक भयभयीत झाले आहेत. ज्यांच्या घरांवर छप्पर नाही, ज्यांनी पत्रे उतरवून ठेवले आहेत. ते भर पावसात राहत आहेत, आज सुध्दा आपण जर जावुन पाहिले कित्येक विभागामध्ये आपणांस हे दृश्य पहावयास मिळेल लोक ताडपत्री किंवा प्लॅस्टिक पेपर छप्परावर टाकुन राहत आहेत. छप्परावर नविन पत्रा टाकला तर त्या व्यक्तिचे पुर्ण घर तोडले जात आहे व घर तोडल्यानंतर बेघर होवु नये म्हणुन तो घरांवर पत्रे टाकत नाही आहे. मी आपणांस विनंती करु इच्छितो व आयुक्त साहेबांच्या ही गोष्ट निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, या उल्हासनगरमध्ये झोपडपट्टीमध्ये जे गोर—गरीब लोक राहत आहेत त्यांना त्यांच्या घर दुरुस्तीसाठी परवानगीची आवश्यकता पडत नव्हती. परंतु आज दुरुस्तीच्या परवानगीसाठी जे लोक येतात त्यांना दोन—दोन महिने महापालिकेत फे—या माराव्या लागत आहेत. त्यांना आर्किटेक कडे नकाशा काढुन आणण्यासाठी पाठविले जाते. झोपडीमध्ये राहणारा गरीब माणुस आपले झोपडे दुरुस्त करु इच्छितो तो इंजिनिअर कडे जावुन काय नकाशा काढुन घेवु शकेल. तो बिचारा आपल्या घराचे जे पत्रे उतरवुन ठेवले आहेत त्यांच्या जागी ताडपत्री किंवा प्लॅस्टीक पेपर टाकुन राहत आहे. मी सभागृहास विनंती करतो की, ज्याप्रमाणे आयुक्त साहेबांनी सत्यता सभागृहासमोर ठेवली त्यांना ज्याप्रमाणे येथे धन्यवाद दिले गेले, परंतु मी धन्यवाद तेव्हा देईन, जेव्हा या शहरामध्ये गोर—गरीबांना घरावर छप्पर टाकण्यासाठी आपण परवानगी दयाल. त्यादिवशी आम्ही आपणांस भारतीय जनता पार्टी, व शिसेनेच्या वतीने मनापासुन धन्यवाद देवु. जयहिंद।

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, झोपडपट्टयांचे तर सोडाच, माझ्या प्रभागामध्ये एक नाल्याचे बांधकाम होत आहे ते होत असतांना मी आपणांस भेटलो होतो, मागच्या महिन्यात, त्या नाल्यामध्ये एका माणसाचे घर येते. २—३ माणसांची घरे येत होती त्यातील दोन तोडली. आणि तिस—याचे घर तोडण्यासाठी अनाधिकृत बांधकाम विभागाच्या उपायुक्तांना तुम्ही सांगितले. त्यानंतर अतिक्रमण केलेले त्याने तोडले १९८४ पासुन केलेले बांधकाम नाल्यामध्ये येत होते म्हणुन त्याने ते तोडले. त्यानंतर तुम्ही त्याला बांधकाम करु देत नाहीत. आजच्या स्थितीला परिस्थिती अशी आहे बांधकाम तुटलेल्या स्थितीत सारा संसार बाहेर आहे. तेथिल प्रभाग अधिकारी जे आहेत ते म्हणतात की, आम्ही त्यांना बांधकाम करु देणार नाहीत. आमचे काम तोडायचे आहे बांधायचे नाही. रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित झालेली बांधकामे तळमजला + दोन माळे असे बांधकाम करणा—यांकडे आपण डोळे—झाक करता. आणि नाल्यामध्ये जे बांधकाम बाधित होत होते ते बांधकाम तोडल्यानंतरही त्यास तुम्ही बांधकाम करु देत नाहीत. त्याचा सारा संसार बाहेर आहे. त्याचा सारा संसार पावसात भिजत आहे, त्यास बांधकाम करण्यासाठी तुम्ही परवानगी देत नाहीत. या महानगरपालिकेत बिना परवानगीने अंतर्गत बांधकामे करता. आणि त्यांना तुम्ही परवानगी देत नाहीत. साहेब, थोडया फार तरी माणुसकीच्या दृष्टीकोनातुन विचार करुन त्यास बांधकाम करण्यास परसानगी दिली पाहिजे. काल जवांदे साहेब याबाबत तुमच्याकडे आले होते. त्यांनाही तुम्ही सांगितले की, परवानगी

देणार नाही. आपण त्याच्याकडे सहानुभुतीने पाहिले पाहिजे. जवादे साहेब स्वत: पाहुन गेले तरीही त्याबाबत काही सहानुभुतीपुर्वक विचार केलेला नाही. आज त्याचा पुर्ण संसार उघडयावर आहे. ८४ पासुन तो टॅक्स भरत आहे. बाकी सगळीकडे रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली तळमजला + १ माळा, तळमजला + २ माळे अशी बांधकामे होत आहेत. नालीमध्ये जे बांधकाम बाधित झाले त्यांना तुम्ही बांधकाम करु देत नाहीत. प्रभाग अधिकारी म्हणतात आम्ही त्यांना बांधु देणार नाही. तोडायचे काम आमचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सर्व सन्माननिय सदस्स, श्री. रमेश चव्हाण यांनी आता जो मुद्दा उपस्थित केला आम्ही सहानुभुती कशासाठी मागायची? हा पहिला प्रश्न. आज या संपुर्ण शहरामध्ये जी ब्रिटीशांची राजवट होती ती बरी होती. परंतु आजच्या या क्षणाला या संपुर्ण शहरामध्ये ८५५ बिल्डींग तोडण्याच्या नावाखाली किंवा उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी संपुर्ण गरीब वर्गामध्ये, झोपडपट्टयांमध्ये प्रशासन दडपशाही करत आहे. आणि येथे साफसफाईचा बोजबारा उडाला आहे. येथे जकातीचाही प्रश्न आहे. आणि या प्रश्नामध्ये लक्ष विकेंद्रीत करण्यासाठी आज या सर्व झोपडपट्टीवाशियांवर अन्याय होत आहे. मघाशी कुणीतरी विचारले, अतिक्रमण म्हणजे काय? त्याबाबत आयुक्त साहेबांनी उत्तर दिले. परंतु जर एखादा माणुस दुरुस्ती करत असेल तर ते अतिक्रमण आहे का? हा पहिला प्रश्न आहे. आणि जर आमच्या सारख्या झोंपडपट्टयांमधील गोरगरीब लोकांना तुम्ही दुरुस्ती करु देत नाहीत, दुरुस्तीच्या नावाखाली तोडफोड करतात, दहशत माजवतात, प्रशासनाने संपुर्ण शहरामध्ये दडपशाहीचे वातावरण निर्माण केले आहे. त्यामुळे येथिल गोरगरीब जनतेच्या डोळयात अक्षरश: पाणी येते. आणि अशा परिस्थितीत तुम्ही सहानुभुती मागणार का? आणि आम्हांला त्यावेळेस वाटले होते आयुक्त साहेब तीन वर्षासाठी येथे आले आहेत. मला खुप आनंद झाला. आमच्या प्रभागामध्ये पाणी पण आणले. विकासाच्या समस्या सुधारल्या. आम्हांला खुप बरे वाटले. परंतु महापौर महोदया, मी मा. आमदार महोदयांना हे सांगु इच्छितो की, आमच्या राज्यामध्ये हे प्रशासन गोरगरीबांवर अन्याय करीत असेल तर हे चुकीचे आहे असे होता कामा नये. सर्वात प्रथम मी आपणांस विनंती करेल की याबाबत आपण लवकरात लवकर न्याय करावा. आमदार साहेबांना माझी ही विनंती राहील की, त्याच बरोबर महापौर महोदयांना ही विनंती राहील की, हे प्रशासन व्यक्ती केंद्रीत आहे त्यावर जरुर अंकुश राहिला पाहिजे. जर आमच्या सारख्या गोरगरीब लोकांवर अन्याय होत असेल जाणीवपुर्वक अन्याय होत असेल, प्रशासन अन्याय करत आहे. तर आम्ही लोक रस्त्यावर उतरण्यास तयार आहोत. आपण याची नोंद घ्या.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

पहिली लक्षवेधी जी आहे तिचे सुचक आहेत श्री. मोहन बेहरानी व अनुमोदक आहेत श्रीमती जया साधवानी, लक्षवेधी येणे प्रमाणे–––

## <u>लक्षवेधी</u>

सुचकाचे नाव :– श्री. मोहन बेहरानी

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

**विषय :–** जकात वसुलीतील घट रोखण्यासाठी खातेनिहाय चौकशी व जकात वसुली वाढविणेसाठी कठोर उपाययोजना करणे बाबत.

उपरोक्त विषयाबाबत लक्षवेधीने आपले लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २००५–२००६ चे अर्थसंकल्पीय अनुदानाप्रमाणे वर्षात ७८ कोटी रुपये जकात रुपाने महसूल अपेक्षित आहे. त्याप्रमाणे प्रत्येक महिन्यात सरासरी ६.५ कोटी रुपये जकात वसूली होणे अपेक्षित आहे. या वर्षी काही वस्तुंवर वाढीव जकात दर आकारण्यात आल्याने वाढीव जकात वसुली अपेक्षित आहे.

माहे एप्रिल महिन्याची जकात वसुली ५.२४ कोटी, मे महिन्याची ५.५३ कोटी आणि जून महिन्यात ५.५ कोटी च्या पुढे झाल्याचे दिसून येत नाही. दर महिन्यास सरासरी एक कोटी जकात वसुलीत घट दिसून

येते आहे. जकातीतील घट रोखण्यासाठी प्रशासनातर्फे कोणत्याही स्वरुपाची ठोस उपाययोजना केल्याचे दिसून येत नाही. तसेच जकातीतील घट पहाता याबाबत खातेनिहाय चौकशी करणे व जकात वसुली वाढविण्यासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. म्हणून या प्रस्तावाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मागील तीन महिन्यापासुन जकात वसुली कमी येत आहे. मी आयुक्त साहेबांना व लाच—लुचपत प्रतिबंधक विभागास बरीचशी पत्र लिहिली आहेत. जकात वसुली कमी आहे. माझा स्पष्ट आरोप आहे की, जकातीमध्ये चोरी होत आहे. त्याचे उदाहरण आहे की, आजच एक ट्रक पकडला गेला. की जो ७ हजार रुपये जकात कमी भरुन चालला होता. त्याच्याकडुन ६६ हजार रुपये वसुल केले. ही आजची गोष्ट आहे त्या ट्रकचा क्रमांक आहे एम.एच. ०५ ३८९२ आज एक ट्रकची ६६ हजाराची वसुली झाली. मी वारंवार ही गोष्ट सांगत आहे, ब—याच महिन्यापासुन सांगत आहे. जकातीमध्ये जी चोरी होत आहे ती थांबिवली पाहिजे. जकातीचे आमचे जे अधिक्षक आहे ते काही कामाचे नाहीत. श्री. होतचंदानी व इतर तीन लोकांची नावे माझ्याकडे आहेत. श्री. लच्छु होतचंदानी, श्री. अमर अहूजा, व श्री. राजु पिंजाणी या सर्वांना जो नियंत्रीत करतो तो श्री. अनिल खतुरानी, श्री. अनिल खतुरानी यांना जकात भांडार विभागात नेमणुक दिली आहे. परंतु जकात विभागाचा पुर्ण कारभार श्री. अनिल खतुरानी चालवितो. आमचे श्री. होतचंदानी जे जकात अधिक्षक आहेत ते श्री. अनिल खतुरानी या लिपिकास साहेब म्हणतात. जकात चोरी मध्ये अनिल खतुरानीचा फार मोठा हात आहे. दरमहा जी एक कोटी जकात वसुली कमी येत आहे त्यामध्ये प्रशासनाचा हात आहे. मी स्पष्टपणे आपणांस सांगतो तीन—चार वाहतुकदारांची माझ्याकडे नावे आहेत. एक बाबु आहे, सम्राट ट्रान्सपोर्टमध्ये आहे, श्याम आहे जय सिंधु नगर ट्रान्सपोर्टमध्ये, कांती आहे जयपुर गोल्डन ट्रान्सपोर्टचा व रमेश आहे गोपी अंगळयाचा, याच्या व्यतिरिक्त आणखी बरेचसे असतील मी आपणांस निवेदन करु इच्छितो हे अतिशय गंभीर असे प्रकरण आहे आमची महानगरपालिका ठेकेदारांचे पेमेंट करु शकत नाही. करोडो रुपये बाकी आहेत. या महापालिकेत तीन महिन्यापासुन जकातीची चोरी होत आहे. वारंवार पत्र देवुनही काही झाले नाही. आमचे नगरसेवक श्री. चौधरी यांनी आज एक ट्रक पकडला आहे. ट्रक पकडण्याचे आम्हां नगरसेवकांचे काम नाही. आम्ही कर्मचा—यांना जो पगार देत आहेत तो कशासाठी देत आहोत. त्या विभागासाठी उपायुक्त नेमला आहे, त्यांनी काय काम केले आहे? किती ट्रक पकडले आहेत. व त्यांनी किती वसुली केली आहे. वसुली का झाली नाही? या सर्व गोष्टी अतिशय गंभीर आहेत. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही ही लक्षवेधी दिली आहे. आपणांस आमचे निवेदन आहे की, यापुढे आपण लक्ष दयावे. जकात वसुलीतील चोरीस कोण जबाबदार आहे? कोणत्याही परिस्थितीत जकातीचे उत्पन्न वाढले पाहिजे. हे दोन शब्द म्हणुन मी लक्षवेधु इच्छितो. याचे आम्हांला उत्तर पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— मा. महापौरजी, सर्वात प्रथम मी आपणांस धन्यवाद देते. मला माहित आहे आम्ही जी लक्षवेधी मांडली आहे त्याबाबत मा. महापौर महोदयांनी गंभीरतेने विचार करुन तिला स्विकृती दिली आहे. मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छिते की, आमची महानगरपालिका कोणत्या श्रेणीची आहे, अ,ब की क ची? या प्रश्नावरच माझे दुसरे प्रश्न आधारीत आहेत. म्हणुन विचारले की, अ श्रेणीची आहे की तिला कोणती श्रेणीच नाही. माझ्या माहिती प्रमाणे आपली महापालिका अ श्रेणीची आहे. आपल्या महापालिकेचे अंदाजित उत्पन्न किती आहे ते सुध्दा आपणांस माहिती आहे. काय प्रस्तावित केले ते सुध्दा आपणांस माहिती आहे. जकात वसुली किती कमी येते ते सुध्दा आपणांस माहित आहे. वारंवार आपण जकात अधिक्षक बदली करत आला आहात. परंतु आपल्या पुर्ण शहराने व आम्ही आपल्या वर विश्वास ठेवला आहे. आपण जकातीचे खाजगीकरण केले तरीही आम्ही आपल्यावर विश्वास ठेवला. आपण स्वत: चालवत आहात तरीही आम्ही विश्वास ठेवला. आपण कधी कुणी जकात अधिक्षक ठेवता, कधी ........

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):— हरकतीचा मुद्दा.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी:—अगोदर माझ्या प्रश्नाचे उत्तर का नाही दिले?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):— माझा हरकतीचा मुद्दा आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u> भाषणानंतर आपण सुध्दा हरकतीच्या मुद्दयाद्वारे विचारणा करु शकता?

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> किती दिवसानंतर मला सभागृहात बोलण्याची संधी मिळाली आहे.

मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>पुर्ण शहराचा प्रश्न आहे. जकातीची वसुली काही माझ्या घरी जात नाही. आपली महानगरपालिका माझी आहे व आपलीही आहे. आपण कित्येक जकात अधिक्षक बदली केले. आपण या मुद्दयावर लक्ष दया. आपल्यावर आम्ही विश्वास ठेवला आहे. आपणांस आम्ही पुर्ण अधिकार दिले आहेत. कधी आपण श्री. प्रकाश कुकरेजा यांना नेमता तर कधी आपण होतचंदानी यांना नेमता? श्री. प्रकाश कुकरेजांच्या अगोदर कोण होते हे आम्हांला माहित नाही. याबाबत आम्ही जास्त काही माहिती ठेवत नाही. मला चांगल्या प्रकारे आठवते या सभागृहामध्ये श्री. अनिल खतुरानी यांचा विषय आला होता, तर त्यावेळेला आपणच आयुक्त होतात. आपण त्यास निलंबित करु इच्छित होतात, परंतु सभागृह त्यास निलंबित करु इच्छित नव्हते. आपण त्यावेळेस जे म्हटंले होते ते सत्य होते, परंतु त्याच अनिल खतुरानी यास आपण जकात विभागाची जबाबदारी दिलीत. आपण आताच म्हटले की, ''दिव्याखाली अंधार आहे'' आपण तर प्रकाशमान झाला आहात परंतु खाली तर अंधारच अंधार आहे असे माझे मानने आहे. प्रत्येक महिन्यास एक कोटी रुपये जकात वसुली कमी येणे, मिरा भाईंदरची जकात वसुली आपण पहा मागील वर्षी ठेकेदाराने ४० कोटी रुपयाची निविदा भरली होती यावेळी ६० कोटीची निविदा भरली आहे. मिरा भाईंदरमध्ये २० कोटीची अधिक विकास कामे होतील. मला असे वाटते की, येथे सुध्दा अधिकाधिक जकात वसुली व्हावी परंतु येथे तर उदिष्टापेक्षाही कमी वसुली येत आहे. मिरा भाईंदर ही एक लहानशी महानगरपालिका आहे, त्याचा अर्थसंकल्प सुध्दा लहान आहे. त्यांचे जकातीचे उत्पन्न एका वर्षात २० कोटींने वाढते तर मग आमचे जकातीचे उत्पन्न का कमीकमी होत आहे. ती कोणती कारणे आहेत? ती मला पहायची आहेत. म्हणुन आम्ही आपले लक्ष वेधत आहोत की, आपण ती कारणे पहा. शहर आपले आहे आपण मेहनत करत नाहीत असे मी म्हटलेले नाही. मी असे म्हटले की, ज्या गोष्टींकडे आपले लक्ष जात नाही आमचे काम आहे, त्या गोष्टीकडे आपले लक्ष वेधने. मी मा. महापौरांना सुध्दा धन्यवाद दिले. कारण त्यांनी सुध्दा या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेतली. त्या सुध्दा चिंतीत आहेत की, जकातीचे उत्पन्न एक कोटीने कमी का येत आहे? म्हणुनच त्यांनी या लक्षवेधीस स्विकृती दिली. मी आपल्यावर असा कोणताही आरोप लावलेला नाही परंतु जकातीचे उत्पन्न कमी येत आहे म्हणजे यामध्ये जरुर भ्रष्टाचार आहे. आम्ही आपणावर नेहमीच विश्वास दाखविला आहे. त्याबदृदल्यात आपण आम्हांस प्रत्येक महिन्यात एक कोटी जकात वसुली कमी दिली आहे याचे आम्ही आपणाकडुन उत्तर मागु. आपण याचे सत्यता पुर्वक उत्तर दयावे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जकात चोरी प्रकरणाविषयी लक्षवेधी सभागृहात आली. जकात चोरी कशी होते? याचे उदाहरण श्री. मोहन बेहरानी यांनी दिले. आज सकाळीच आम्ही श्री. रमेश चव्हाण व मी एक गाडी पकडुन जकात उपायुक्त श्री. संदिप आरोटे साहेब यांना बोलावुन कश्याप्रकारे जकात चोरी चालते हे त्यांच्या लक्षात आणुन दिले. त्यावर त्यांनी कारवाई केली आहे. परंतु जकात विभागात जे अधिकारी चांगले काम करतात त्यांची आयुक्त साहेब जाणुनबुजुन बदली करतात असे श्रीमती जया साधवानी यांनीच आता सांगितले. एक उदाहरण मी देतो श्री. प्रकाश केसवानी नावाचा एक शिपाई होता, त्याने सोन्यावर जी जकात चोरी होत होती ती त्याने चांगल्या प्रकारे पकडण्यास सुरुवात केली आणि त्यातुन एका महिन्यात ३—४ लाख रुपयाचा महापालिकेस फायदा करुन दिला. अशा जकात कर्मचा—याची त्यावेळचे जकात प्रमुख श्री. प्रकाश कुकरेजा यांनी त्यांची दक्षता विभागात बदली केली आणि त्या विभागात गेल्यानंतर त्यांनी आणखी जकात चोरीची प्रकरणे पकडण्यास सुरुवात केली. तो जकात चोरी प्रकरणे पकडायचा व विरोधी पक्ष नेते श्री. भुल्लर महाराज यांना सांगायचा की, आज आम्ही जकात चोरी पकडली आहे. ती सुटता कामा नये म्हणुन तुम्हांला सुचना देतो. आणि ती सुचना भुल्लर महाराजांना मिळाल्यानंतर आम्ही चौकशी करायचो. याचाच राग धरुन मला वाटते आयुक्तांनी त्यांची बदली करुन टाकली असावी. याचाही खुलासा याठिकाणी व्हावा.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>–मा. आयुक्त साहेब, मा. महापौर महोदया, जकात चोरी आहे त्यामध्ये कोणतेही दुमत नाही. २५ जुलै पासुन जकात वसूलीचे काम महापालिकेच्या हाती आले आहे तेव्हापासुन जर प्रत्येक महिन्याचे आकडे पाहिले तर १ एप्रिल पासुन १ ते दिड कोटी रुपये जकात वसुली कमी येत आहे. मी ते आकडे आपणासमोर प्रस्तृत करु इच्छितो. कारण की, ४०५ क्रमांकाचा माझा प्रश्न चर्चेस आता येणारच होता. परंतु तो प्रश्न चर्चेस आला नाही. तो प्रश्न सुध्दा मी चर्चेत घेत आहे. त्या प्रश्नाचे जे उत्तर दिले आहे, त्यामध्ये मला असे दिसुन येत आहे जे आकडे दिले आहेत ते चुकीचे दिले आहेत. महासभेत जेव्हा कुणी सदस्य प्रश्न विचारतो, उत्पन्नाच्या बाबतीत जी अचुक अशी आकडेवारी आहे ती दिली पाहिजे. दुसरी उत्तरे उलटसुलट दिली तर ती आम्हांला माहित पडत नाहीत. परंतु जर आज जकातीची वसुली २० लाख रुपये झाली आहे तर त्याबाबत दोन वर्षानंतरही जर कुणी विचारले तर त्यावेळेला हेच उत्तर दिले पाहिजे की, त्यादिवशी २० लाख रुपये जकात वसुली आली होती. परंतु या महासभेमध्ये मी हे सिध्द करतो की, प्रश्नाची उत्तरे एकदम चुकीची दिली आहेत. रोजचे जकातीचे जे उत्पन्न आहे ते चुकीचे दर्शविले आहे. त्याचे प्रश्न क्रमांक मी आपणास सांगतो प्रश्न क्र. ३५८ हा प्रश्न श्री. राजेंद्र चौधरी यांनी ९/१२/२००४ रोजी विचारला होता. त्याबाबत येथे उत्तर दिले आहे १/८/०४ ते ३१/८/०४ पर्यंत ४ कोटी ६५ लाखाचे उत्पन्न मिळाले. १/९/०४ ते ३०/९/२००४ पर्यंत ५ कोटी ६९ लाख, १/१०/२००४ ते ३१/१०/२००४ पर्यंत ६ करोड ५५ लाख व १/११/२००४ ते ३०/११/०४ पर्यंत ४ कोटी ६० लाख, व त्याच श्री. राजेंद्र चौधरी यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे, प्रश्न क्र. ४११. त्यामध्ये पुन्हा आपण याच तारखा घ्या. १/८/२००४ पासुन ३१/८/२००४ पर्यंत ४ कोटी ७१ लाख दाखविले आहेत. अगोदर दाखविले आहे ४ कोटी ६५ लाख जो १२ व्या महिन्यात प्रश्न विचारला होता आता जे उत्तर दिले आहे त्यात दर्शविले आहे, ४ कोटी ७१ लाख तोच महिना प्रश्न विचारणारे तेच श्री. राजेंद्र चौधरी ज्यांना वेगवेगळे उत्तर दिलेले आहे, त्याचा माझ्याकडे पुरावा आहे. ते हेच दर्शविते की, चुकीचे उत्तर दिले जाते, आपण आज वर्तमानपत्रामध्ये दया की, आम्ही १०० कोटी जकात वसुली केली व महानगरपालिकेत यावेत ६५ कोटी अशा प्रकारचे उदाहरण माझ्याकडे आहे. मी आयुक्त साहेबांना दाखवेन. अशा प्रकारची चुकीचे उत्तरे वेगवेगळया महिन्यामध्ये दिली आहेत. त्याबाबत मी आपणांस सांगु इच्छितो की, जकातीचे उत्पन्न कश्याप्रकारे कमी झाले? महानगरपालिकेने २५ जुलै, २००४ पासुन जकात वसुली आपल्या हाती घेतली. म्हणुन सर्वात प्रथम आपण ऑगस्ट महिना घेवु या. मागील वर्षी ऑगस्ट महिन्यामध्ये ४ कोटी ६५ लाख रुपये जकात वसुली झाली होती. नवव्या महिन्यामध्ये ५ कोटी ६९ लाख , दहाव्या महिन्यामध्ये ६ कोटी ५५ लाख व ११ व्या महिन्यात ४ कोटी ६० लाख. ४ महिन्याची सरासरी वसुली ५ कोटी ६० लाख रुपये त्यानंतर १२ व्या महिन्यामध्ये ६ कोटी ४२ लाख, जानेवारी मध्ये ५ कोटी ७७ लाख, फेब्रुवारी मध्ये ५ कोटी ५६ लाख व मार्च मध्ये ५ कोटी ३५ लाख. पुन्हा या ४ महिन्याची सरासरी काढली तर पुन्हा आम्हांला ५ कोटी ६० लाख रुपये सरासरी वसुली प्राप्त झाली. ३१ मार्च पर्यंतचे जेवढे काही महिने पाहाल तर जकातीचे सरासरी उत्पन्न ५ कोटी ६० लाख एवढे प्राप्त झाले आहेत व एप्रिलमध्ये आम्ही ८ कोटी रुपये पर्यंत जकातीमध्ये दर वाढवुन वाढ केली आहे. याचाच अर्थ ७५ लाख रुपये प्रत्येक महिन्यामध्ये वाढ केली आहे. म्हणजे ५ कोटी ६० लाख + ७५ लाख यांची बेरीज होते ६ कोटी ३५ लाख, ६.५० कोटी प्रत्येक महिन्यास आम्हांस जकातीचे उत्पन्न प्राप्त झाले पाहिजे. परंतु १ एप्रिल पासुन ३१ मे पर्यंतचे जकात वसुलीचे जे आकडे आहेत ५ कोटी २४ लाख व ५ कोटी ५७ लाख म्हणजेच २ महिन्यामध्ये २.५० कोटीचे आपणांस नुकसान झाले आहे. हे आमचे आकडे मागील वर्षाचे असून ते हे दर्शवितात की, मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी कमीत कमी जकात वसुलीमध्ये १० टक्याची वाढ झाली पाहिजे. आमच्या मा. आयुक्तांनी बजेटमध्ये जकात वसुलीचे जे उदिष्ट ठेवले आहे ते ८० कोटी रुपयाचे आहे. ८० कोटीच्या हिशोबाने आपण पाहिले तरी ६.५० कोटी पेक्षा जास्त उत्पन्न प्राप्त झाले पाहिजे. परंतु एप्रिल व मे महिन्याची वसुली पाहिली तर एप्रिल मध्ये ४.५० कोटी रुपयाची वसुली झाली आहे. तसेच आमचे श्री. राजेंद्र चौधरी यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्यांच्या प्रश्नांना आमच्या अधिका–यांनी वेगवेगळे उत्तर दिले आहे. प्रश्न क्र. ३५८ जो आहे त्यामध्ये वेगळे उत्तर व ४११ मध्ये वेगळे उत्तर त्याच महिन्याची जकात वसुली वेगवेगळी दाखविली आहे. तसेच आमच्याकडे ब–याचसा वाहतुकदारांची नावे व गाडयांचे नंबर आहेत जे मी आपणांस दाखवु इच्छितो. जर आपण या गाडयांचे नंबर लिहुन घेतले या अगोदर २० तारखेला श्री. राजेंद्र चौधरी व श्री. रमेश चव्हाण यांनी जकात नाक्यावर ३ गाडया अडविल्या होत्या. तर २० तारखेला जकातीची जी वसुली होती ती १७ लाख रुपये होती. व २१ तारखेला जकातीची वसुली २१ लाख रुपये झाली. २२ तारखेला जकातीची वसुली २३ लाख रुपये झाली. ६ लाखाची वाढ ३ दिवसामध्ये झाली. तर माझ्याकडे अशा काही गाडयांचे नंबरर्स आहेत जे मी आता आपणांस सांगेन. व आपण यांचा मागील महिन्याचे जर दस्तऐवज पाहिले व येणा–या महिन्याचे अभिलेख पाहिले तर जकातीमध्ये

निश्चितपणे वाढ होईल. उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथे जिन्सचे बरेचसे कारखाने आहेत. जेथे जवळ जवळ १ लाखापेक्षा अधिक जिन्स दररोज तयार होतात. याचाच अर्थ दिड करोड रुपयाचा कपडा तेथे येतो. त्याचे जकात ३ लाख रुपये झाली पाहिजे. परंतु जिनच्या या कपडयाची तीन लाखापर्यंतची वसुली येत नाही. विशाल ट्रान्सपोर्ट व करण ट्रान्सपोर्टच्या गाडया अंबरनाथचा एस्क्रोट काढुन, .... अंबरनाथ येथे जिन्सचा एकही कारखाना नाही. मग एस्क्रार्ट काढुन जिन्सचा कपडा अंबरनाथला कसा जातो? अंबरनाथला काही एखादी जिन्सची फॅक्टरी आहे? याची चौकशी केली जावी. मी आपणांस गाडीचे नंबर सुध्दा सांगत आहे. एम.एच. ११ ए–२५०४ ज्यांनी १०० वेळा एस्क्रार्ट घेतला. दुसरी प्रदिप ट्रान्सपोर्टची यार्नची गाडी येते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :– आयुक्त साहेब, आपले लक्ष आहे की नाही येथे एवढया मोठया मुद्दयावर चर्चा चालु आहे. आपण आपसामध्ये चर्चा करत आहात.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– गाडी क्र. एम.एच. ११ ए–२५०४ या गाडीचा मागील दोन महिन्यामध्ये २५ वेळा एस्कार्ट काढला आहे. अंबरनाथचा एस्कार्ट काढला जातो. व जिन्सच्या कारखान्यांबाबत विचार केला तर दररोज १ लाख जिन्स तयार होतात. यासाठी दिड कोटी रुपयाचा कपडा लागतो. तर हा दिड कोटी रुपयाचा कपडा दररोज येतो. याची दररोजची जकात ३ लाख रुपये मिळाली पाहिजे जी प्रत्यक्षात येत नाही. दुसरे प्रदिप ट्रान्सपोर्टच्या यार्नची गाडी दररोज येते. ज्याची जकात वजनाच्या हिशोबाने घेतली जाते. परंतु आजपर्यंत कोणत्याही गाडीचे मालासह वजन केलेले नाही. ट्रान्सपोर्टवाला मालाचे जेवढे काही वजन लिहून आणतो तेवढयाच मालावर रक्कम आकारली जाते. पुर्ण गाडी वजन काटयावर चढवून वजन घेतलेले नाही. यार्नची पुर्णच्या पुर्ण गाडी जर वजन काटयावर लावली व गाडी खाली केल्यानंतर पुन्हा तिचे वजन केले तर बरोबर असे वजन आपणासमोर येईल परंतु असे कोणत्याही उपायुक्तांनी केले नाही. मोटुमल ट्रान्सपोर्ट सुपर मार्केट इलेक्ट्रीक बाजार मध्ये येथे जकातीची फार मोठया प्रमाणावर चोरी होते. इलेक्ट्रानिक सामानावरील जकात चोरी होत आहे. त्याबाबत सुध्दा कोणी लक्ष देत नाही. भाटिया ट्रान्सपोर्ट जो आहे तेथे जग्गु नावाचा माणुस तो प्लॉस्टिकच्या पिशव्या व प्लॉस्टिकच्या दाण्याचे सामान जकात न भरता आज सुध्दा दुकानदारांना पोहचवत आहे. व जकातीचे पैसे वसुल करत आहेत. अशा प्रकारची माहिती आमच्याकडे आहे. व माझा सर्वात महत्वाचा मुद्दा जो आहे की श्री. राजेंद्र चौधरी यांच्या प्रश्नांना जी चुकीची उत्तरे दिली आहेत. एक वेळेस अलग आकडे दुस–या वेळेस आणखी अलग आकडे याचाही खुलासा केला जावा.

मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– जकात हा महापालिकेच्या उत्पन्नाचा महत्वपुर्ण भाग आहे. त्यामध्ये जर चोरी आहे त्यामुळे तो चिंतेचा विषय झाला आहे. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी नावे घेवुन, ट्रक मालकांची नावे घेवुन वाहतुकदाराची नावे घेवुन त्यांची यादी दिली आहे. त्याबाबत आयुक्तांनी उत्तर दिले पाहिजे. याच्याशी संबंधीत आणखी एक गोष्ट मी सांगु इच्छितो, जेव्हा सभागृहामध्ये जकातीचे दर वाढविण्याबाबत चर्चा चालु होती. त्यावेळेसच आम्ही म्हटले होते की, जकातीचे दर वाढवु नका. शहरवाशियांवर जकातीचे ओझे लादु नका आमचे म्हणणे ऐकुन घेतले नाही. व आज केवळ जकात चोरी मुळे आपणाला करोडो रुपयाचे नुकसान होत आहे. व त्यावर प्रशासनाचे लक्ष नाही. जकातीचे उत्पन्न कमी होत आहे. मी सर्वांच्या बोलण्याचा पुर्नउच्चार करु इच्छित नाही. आयुक्त साहेबांना माझे एक विचारणे आहे ज्या अनिल खतुरानी यांचे नाव आमच्या श्री. मोहन बेहरानी यांनी घेतले, इतरांनी घेतले. त्या अनिल खतुरानी यांचा निलंबन कायम करण्याविषयी जेव्हा महासभेत चर्चा चालु होती अनिल खतुरानी यास कामावर घेण्यास आमचा विरोध होता. ज्या व्यक्तीवर आरोप आहे अशा व्यक्तीस आपण जकात विभागाची जबाबदारी कशी दिलीत हा सुध्दा आम्हा सर्वांसाठी चिंतेचा विषय आहे. अशा व्यक्तीस जकात विभागामध्ये आपण महत्वपुर्ण जबाबदारी कशी दिली याचाही आपण खुलासा करावा. धन्यवाद.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–मा. महापौर महोदया, मागील वर्षी २५ जुलै, २००४ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेने जकात वसुलीचे काम आपल्या कर्मचा–यामार्फत सुरु केले. मागील वर्षी प्रतिमहा आम्ही जी जकात वसुली केली तिचे आकडे मी सभागृहासमोर ठेवु इच्छितो.

२५ जुलै, २००४ पासुन एका आठवडयाची वसुली — १ कोटी १९ लाख

| | |
|---|---|
| ऑगस्ट, २००४ | ४ कोटी ७१ लाख |

या रक्कमेमध्ये फरक असल्याचे आपण म्हणता, मी याबाबत चौकशी करेन.

| | |
|---|---|
| सप्टेंबर, २००४ | ५ कोटी ६१ लाख |
| ऑक्टोंबर, २००४ | ६ कोटी ६६ लाख |
| नोव्हेंबर मध्ये | ४ कोटी ६० लाख |
| डिसेंबर मध्ये | ६ कोटी ४२ लाख |

माझ्या मते या महिन्यामध्ये ६ कोटी २१ लाख आहेत.

| | |
|---|---|
| जानेवारी, २००५ मध्ये | ५ कोटी ७७ लाख |
| फेब्रुवारी, २००५ मध्ये | ५ कोटी ५ लाख |
| मार्च मध्ये | ५ कोटी ३५ लाख |
| एप्रिल मध्ये | ५ कोटी २४ लाख |
| मे मध्ये | ५ कोटी ५३ लाख |
| जुन मध्ये | ५ कोटी ४८ लाख |

जुलै , २००४ पुर्वी जकातीची वसुली खाजगी ठेकेदारामार्फत होत होती. ठेकेदारीचा कालावधी २५ जुलै पासुन २४ जुलै पर्यंतचा असायचा १ वर्षाचा असायचा. परंतु आमच्या वित्तीय वर्षामध्ये आम्हांला जकातीचे किती उत्पन्न प्राप्त झाले ते जर पाहिले तर

| | |
|---|---|
| २०००—२००१ या वित्तीय वर्षात | ४५ कोटी १५ लाख |

आपणांस अर्थ संकल्पाची जी प्रत दिली जाते त्यामध्ये पुर्ण वित्तीय वर्षामधील उत्पन्न दर्शविलेले असते. आपण त्या प्रती वरुन उत्पन्नाचे आकडे पडताळुन पाहु शकता.

| | |
|---|---|
| २००१—२००२ मध्ये | ४३ कोटी ७७ लाख |

म्हणजेच त्याच्या अगोदरच्या वर्षापेक्षा कमी, जकातीचे खाजगीकरण होवूनही मागील वर्षापेक्षा २ कोटीची कमी वसुली झाली.

| | |
|---|---|
| २००२—२००३ मध्ये | ५५ कोटी ६५ लाख |
| २००३—२००४ मध्ये | ५५ कोटी ७४ लाख |

२००४—२००५ मध्ये यामधील काही कालावधी १ एप्रिल २००४ पासुन २४ जुलै २००४ पर्यंत ठेकेदाराकडे होता. व २५ जुलै २००४ पासुन ३१ मार्च २००५ पर्यंतचा कालावधी महापालिकेकडे होता. या कालावधीत

६१ कोटी ६७ लाख

जकात वसुलीमध्ये चोरी नाही किंवा कधी होत नाही. असे म्हणण्याचे धाडस मी करणार नाही. मागील १६ —१७ वर्षामधील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये काम करण्याचा माझा जो अनुभव आहे तो लक्षात घेता, मिळकत कराच्या वसुलीमध्ये कधी चोरी होत नाही असेही मी कधी म्हटलेले नाही. नोव्हेंबर २००४ मध्ये जकातीची वसुली कमी होती याबाबत सभागृहामध्ये जेव्हा लक्षवेधी सुचना आली, त्यावेळी त्यावर निविदेन करतांना मी म्हटले होते की जकात वसुली करतांना चोरी होत नाही असे मी कधी म्हणणार नाही. जकात चोरी कशी होते? कोण लोक ती करतात? त्याबाबत मी उल्लेख केला होता. श्री. मोहन बेहरानी साहेबांनी तर फक्त दोन—तीन कर्मचा—यांची नावे सांगितली. आज जकात विभागामध्ये उपायुक्त म्हणुन जे काम करत आहेत त्यांनी ८ दिवसापुर्वी माझ्याकडे एक निवेदन दिले आहे. त्या निवेदनात ते म्हणतात, जकात विभागात २४० कर्मचारी आहेत. त्यातील एक सुध्दा कर्मचारी असा नाही की जो प्रामाणिक आहे. परंतु मी केवळ कर्मचा—यांना दोष देणार नाही. जी सत्यता आहे ती आपल्यासमोर ठेवत आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना असे वाटते की, २४० कर्मचा—यांमधील एकही कर्मचारी असा नाही की, त्याच्या प्रामाणीकतेवर त्याची प्रामाणीकता संशयातीत आहे. व एक उपायुक्त २४ नाक्यांवर २४ तास उपस्थित राहु शकत नाही. किंवा असा कुणी अधिकारी आपण दया की, जो एका संस्थेसाठी २४ तासाची वेळ देवु शकेल. त्यांनी स्वत: मला विनंती केली आहे की, जकात विभागातील त्यांच्या कामाचा एक महिन्याचा अनुभव लक्षात घेता, जकात विभागामध्ये जी चोरी होत आहे, ती तेही मान्य करत आहेत, मीही मान्य करत आहे. जकात चोरी करण्यासाठी आमच्या कर्मचा—यांकडुनच जकात चोरांना सहाय मिळत आहे. जसे की आजचे उदाहरण घ्या मी श्री. रमेश चव्हाण यांचे हार्दिक अभिनंदन करतो, त्यांनी जकात चोरीचे एक उदाहरण आमच्या समोर ठेवले. जकात नाक्यावरील कर्मचा—याच्या केवळ निष्काळजीपणामुळे हे घडले. एक आयातदार जकात नाक्यावर आला, आपले घोषणापत्र दिले. त्यावर विश्वास ठेवुन जकात कर्मचा—याने त्या

रक्कमेप्रमाणे त्यास जकातीची पावती दिली. त्या कर्मचा—याने जर आपले काम योग्य प्रकारे केले असते त्या वाहनाची जर त्याने पडताळणी केली असती तर त्या गाडीमध्ये २ हजार मिटरचा जो जास्त माल होता तो लक्षात आला असता. व त्यावर सुध्दा तो दंडासह जकात रक्कम वसुल करु शकला असता. हा निष्काळजीपणा आहे किंवा हातमिळवणी आहे, परंतु प्रथमदर्शनी तर आम्ही निष्काळजीपणा म्हणु. त्याच्या निष्काळजीपणामुळे किंवा हातमिळवणीमुळे एका आयातदाराने महानगरपालिकेस ६ हजार रुपयाच्या उत्पन्नापासुन वंचित ठेवले. ६ हजार रुपये जकात त्याने कमी भरली होती. अशी कित्येक वाहने जकात नाक्यावर येतात. ज्या वाहनांची व्यवस्थित तपासणी केली जाते, ज्या वस्तु आयात होतात, त्यांना योग्य त्या प्रकारे कर आकारणी होते किंवा त्यांचे किंमतीची योग्य त्या प्रकारे पडताळणी होत असेल तेथे जकातीची चोरी होत नाही. ही जबाबदारी जेवढी आमच्या जकात कर्मचा—याची आहे तेवढीच ती आयातदाराची आहे. येथे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी कित्येक आयातदारांची नावे दिली आहेत की जे जकात चोरी करत आहेत. त्यांनी जी नावे दिली त्यावरुन त्यांना असे वाटते की, प्रशासन काही करत नाही. जसे जकात विभागामध्ये जकात चोरांना मदत करणारे कर्मचारी आहेत. तसेच जकात चोरांना रोखणारे कर्मचारीही आहेत. श्री. जग्गु भाटिया व श्री. अशोक भाटिया यांचे वाहन प्रत्येक आठवडयात एक—दोन वेळा पकडली जाते. त्यांच्या विरोधात पोलिसात आम्ही गुन्हे दाखल केले आहे. ते प्रकरण न्यायालयात गेले आहे. इतकेच नव्हे तर आमच्या कर्मचा—यास त्यांनी मारझोड केली. जिवेनीशी ठार मारण्याची धमकी दिली. तरीही त्याच्या विरोधात आमचे काही कर्मचारी जे प्रामाणीकपणे काम करु इच्छितात, ते कर्मचारी दिवसरात्र मेहनत करत आहेत. मागील एक महिन्यामध्ये जी दंडाची रक्कम वसुल केली आहे, ती आहे २ लाख १८ हजार. फक्त जकात चोरांकडुन ती वसुल केलेली आहे. व जेव्हापासुन जुलै, २००४ पासुन जकात वसुलीचे काम आम्ही हाती घेतले आहे, आजपर्यंत ११ लाखापेक्षा अधिक दंड वसुल केला आहे. मी मागील वेळेस सुध्दा म्हटले होते की जकात चोरी कश्याप्रकारे होते? काही लोक पुर्णच्या पुर्ण गाडी जकात न भरता आणतात. काही लोक गाडी जकात नाक्यावर आंणतात परंतु मालाची किंमत कमी दाखवितात. किंवा माल कमी दाखवितात. व जकात चोरी थांबविण्यासाठी दोन गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. आमचे जे कर्मचारी जकात वसुलीचे काम करतात त्यांच्यावर पर्यवेक्षण करणारे अधिकारी अत्यंत प्रामाणिक असले पाहिजेत. व त्यांनी निर्भयतेने काम केले पाहिजे. असे झाले तर ब—याच प्रमाणात आपण जकात चोरी थांबवु शकतो. दुसरे असे की, नियम जे आहेत ते एवढे कठोर असले पाहिजे की, ज्यामुळे जकात चोरांना जकात चोरीची हिंमत होता कामा नये. परंतु आपण आमचे नियम पाहिले तर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३९८ जे आहे त्यानुसार जकात चोरास पकडल्यानंतर न्यायालयामध्ये दावा दाखल करावा लागतो. त्यानंतरच आम्ही १० पट दंड वसुल करु शकतो. आयुक्तांना किंवा जकात अधिका—यांना दंड वसुल करण्याचा अधिकार नाही. यामुळे बरीचशी प्रकरणे न्यायालयात जातात. त्याअगोदर आम्ही ही प्रकरणे पोलिस स्टेशनला दाखल करण्याचा प्रयत्न केला. परंतु तेथे आम्हांला उलट वागणुक मिळाली. जेव्हा आमचे अधिकारी पोलिस स्टेशनला केस दाखल करण्यासाठी जातात. तेव्हा त्यांनाच जास्त त्रास होतो. त्यांना चार—चार तास बसवुन ठेवले जाते व जकात चोर आहेत त्यांना पोलिस कर्मचारी चहा—पान देत असल्याने आढळून येते. ही सत्यता आहे. ते कर्मचारी आपणांस सांगु शकतील. व जेव्हा आमचे कर्मचारी एखादया जकात चुकवेदाराविरुध्द पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यासाठी जातो. परंतु तेथे तो जकात चुकवेदार पोलिसांकडुन चहा पित असतो. व आमचे अधिकारी चार—चार तास बाहेर जर बसुन राहत असतील तर मला असे वाटते की ही घटना जकात चोरांचे मनोबल वाढविणारी व जकात कर्मचा—यांचे मनोबल खच्ची करणारी अशी आहे. मी सदनाला सांगु इच्छितो की, जकातीची आम्ही जी वसुली केली आहे ती खाजगी ठेकेदारापेक्षा जास्त केली आहे. मागील एक—दोन वर्षाची जकात वसुली आपण पाहिली तर २००३—२००४ मध्ये ५५ कोटी ७४ लाख रुपये उत्पन्न मिळाले होते. २००४—२००५ मध्ये आम्ही ६१ कोटी ६७ लाखाची वसुली केली आहे. खाजगी ठेकेदार या कामी ५७० पेक्षा जास्त कर्मचारी कामास ठेवत होता. आमचे २४० कर्मचारी आहेत. व त्यांची यंत्रणा व आमची यंत्रण यांची जर तुलना केली तर, त्याच बरोबर त्यांनी केलेली वसुली व आम्ही केलेली वसुली याची जर तुलना केली तर मला असे वाटते की, जकात चोरी नंतरही आम्ही चांगली वसुली केली आहे. यावर आम्ही संतृष्ट नाहीत परंतु जकातीमध्ये चोरी होत आहे १ महिन्यामध्ये १ कोटीपेक्षा अधिक रक्कमेची चोरी होत आहे. हे सत्य नाही. चोरी होत आहे हे सत्य आहे परंतु चोरी होवुनही वसुलीही जी आहे ती चांगली आहे. कोणत्याही नगरपालिका किंवा महानगरपालिकेचे आपण उदाहरण घेतले तर सदया तर नगरपालिकांमध्ये जकात कर नाही. परंतु जर कोणत्याही महानगरपालिकेचे आपण उदाहरण घेतले तर जकातीमध्ये २० टक्यापर्यंत चोरी होतेच. तर काही ठिकाणी तर ४० टक्यापर्यंत जकात चोरी होते. सदया मी दोन उदाहरणे आपणांस देवु इच्छितो जी की येथे सुध्दा सांगितली आहे की, मिरा भाईंदर मध्ये मागील वर्षी ४० कोटीची वसुली झाली. व यावर्षी खाजगीकरण

केल्यावर ६० कोटी रुपास ठेका गेला. कल्याण महानगरपालिकेमध्ये मागील वर्षी ४३ कोटीची वसुली झाली होती. ८ महिन्यासाठी ४३ कोटी होती व या वर्षी ९ महिन्यासाठी ६१ कोटी ३० लाखाची खाजगी ठेकेदाराने निविदा भरली आहे. मिरा भाईंदरचे उदाहरण घ्या त्यांचे मागील वर्षी ४० कोटीचे जे उत्पन्न होते त्यावेळेसही जकातीचे खाजगीकरण होते. त्यानंतर तेथे जी निविदा भरली ती ६० कोटीची आली. म्हणजेच जेव्हा महापालिकेचे कर्मचारी जेव्हा वसुली करत होते तेव्हा ४० कोटीपेक्षा कमी येत होती. जेव्हा खाजगी ठेकेदाराने एक वर्ष स्वत: चालविले. त्यावेळेस त्यांनी ४० कोटी दिले. व दुस—या वर्षी जेव्हा स्पर्धा झाली तेव्हा त्यांनी ६० कोटी रुपयाचा देकार दिला. याचाच अर्थ असा आहे की, तेथील वसुली २० कोटी कमी होती. व जेव्हा ठेकेदार ६० कोटी देतो तेव्हा तेथील वसुली ७० कोटी झाली पाहिजे. किंवा ६६ कोटीपेक्षा जास्त तर झालीच पाहिजे. ६० कोटी तो महापालिकेस देईन. ३ कोटी रुपये प्रशासकिय खर्च होईल आणि ३ , ४ कोटी त्यांचा फायदा तर होईलच. म्हणजेच जेव्हा ठेकेदार ६० कोटी रुपये जेव्हा मिरा भाईंदर महापालिकेस देईल तेव्हा तो ६६ कोटी पेक्षा जास्त वसुली करेल. जेव्हा मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी जकात वसुली करत होते तेव्हा ती ४० कोटीपेक्षा कमी होती. येंथे स्थिती उलट आहे. ठेकेदारापेक्षा जास्त वसुली येथिल कर्मचारी करत आहेत. या सत्यतेनंतरही काही कर्मचारी काही प्रलोभनास बळी पडतात. ते आयातदारास किंवा वाहतुक दारास जकात चुकविण्यासाठी मदत करतात. तरीही जास्त रिकव्हरी होत आहे. कल्याणचेच उदाहरण घ्या, कल्याणमध्ये सुध्दा आम्ही १ वर्ष खाजगी ठेकेदारास अभिकर्ता म्हणुन नेमला. त्याने ७१. २१ करोड रुपये महापालिकेस दिले होते. त्यापुढील वर्षी कोणत्याही ठेकेदाराने निविदा भरली नाही. आम्ही तेथे ७३ कोटीची वसुली करुन दिली होती. तेथे ठेकेदारापेक्षा जास्त वसुली करुन दिली होती. त्यानंतर आता जी स्थिती आहे तेथे खाजगी ठेकेदार जो आहे ४३ कोटी पासुन ५३ करोडपर्यंत वसुली दिली आहे. याचाच अर्थ कल्याणमधील जकात वसुलीची क्षमता ५७ कोटीपेक्षा जवळ १५ टक्यांची प्रोत्साहन रक्कम आपल्या कर्मचा—यांना दिले पाहिजे. व्यापारी जेव्हा माल आणतात व आमच्या कर्मचा—यांना प्रलोभन दाखवतात त्या प्रलोभनांना आमचे कर्मचारी बळी पडु नयेत यासाठी आम्ही ती योजना स्थायी समिती समोर ठेवली होती. व स्थायी समितीने कालच तिला मंजुरी दिली आहे. तर मला असे वाटते की, आमचे कर्मचारी चुकीचे काम करत आहेत असे जे आपणांस वाटते ते या प्रोत्साहनात्मक रक्कमेमुळे खोटे ठरेल. स्थायी समितीने या प्रस्तावास जी मान्यता दिली आहे त्याबद्‌दल मी स्थायी समितीस धन्यवाद देतो. दुसरा रस्ता असा आहे की, जर या सभागृहास वाटत असेल की, कर्मचारी जकात चोरांना सामिल आहेत. तर त्याबाबतीत दुसरा रस्ता आपल्या सर्वांसमोर आहे तो हा आहे की, जकातीचे खाजगीकरण करणे ''ना रहेगा बास, ना बजेगी बासरी''. आपण जकातीचे खाजगीकरण करा. आमच्या कर्मचा—यांवर जे आरोप लावले जात आहेत ती संधी आपणांस मिळणार नाही. व मी स्वत: स्थायी समितीसमोर प्रस्ताव आणेन की, जकातीचे खाजगीकरण करा. ज्या माध्यमातुन जकात वसुलीमध्ये वाढ होवू शकते. व जो ज्यादा निधी येईल त्याचा उपयोग विकास कामांसाठी करता येवु शकेल. माझा तिसरा प्रस्ताव असा आहे की, आमचे सध्याचे जे नियम आहेत, ते नियम जकात चोरी थांबविण्यासाठी सक्षम नाहीत. सध्या आम्ही नविन नियम तयार केले आहेत. ते आपल्या समोर ठेवु. त्यानुसार प्रत्येक आयातदारास नोंदणी करावी लागेल. व प्रत्येक आयातदारास वस्तु आयात करतांना बिल प्रस्तृत करणे बंधनकारक राहील. प्रत्येक आयातदारास त्यांचे साठा रजिस्टर, विक्री रजिस्टर व माल खरेदीचे रजिस्टर म्हणजेच त्यांनी किती विक्री केली त्यांनी किती खरेदी केली, व त्यांच्याकडे साठा किती आहे? हे तिन अभिलेख त्यांनी जर व्यवस्थित ठेवले व आम्ही आमच्या नियमामध्ये अशी तरतुद केली तर मला असे वाटते की, जकात चोरी थांबिवली जावु शकेल. व हे नियम आज आमच्याकडे तयार आहेत. पुढील महासभेत त्यांचा मसुदा मी आपणासमोर ठेवेन. जकात चोरी थांबविण्याचा सर्वात प्रभावी उपाय हा ठरेल असा माझा विश्वास आहे. असे सांगण्यात आले की, काही कर्मचारी जकात चोरी प्रकरणांमध्ये सामिल आहेत. खास करुन श्री. अनिल खतुरानी यांचे नाव घेतले गेले मी सहमत आहे. मिळकत कराच्या रक्कमेच्या अपहार प्रकरणी त्यास निलंबित केले होते. त्यावेळेस मी एक वाक्य म्हटले होते की, तेलगी असेच निर्माण होतात. व तेलगी असेच मोठे होतात. मला त्या वाक्याची आठवण आहे, असे असुनही श्री. अनिल खतुरानी यांना जकात विभागामध्ये नेमणुक देण्यात आली. ती कशी दिली, कुणी दिली, कशी दिली यामध्ये मी अधिक जावु इच्छित नाही. परंतु जेव्हा माहित पडले की, त्यास जकात विभागात नेमणुक दिली आहे, तेव्हा आम्ही त्यास मध्यवर्ती जकात नाक्यावरुन हलवुन जकात विभागाच्या अभिलेख विभागात पाठविले जेथे फक्त पावती पुस्तके मोजली जातात, पैसे मोजले जात नाहीत. फक्त पावती पुस्तके मोजणे व ती जकात नाक्यांवर पोहचविणे एवढेच काम आहे. बाकी काही नावे आपण दिली आहेत त्यांची ही सचोटी पारखली जाईल. जर ते जकात चोरांना मदत करत असतील तर त्यांनाही तेथुन हटविले जाईल. एवढा विश्वास देवुन मी माझे निवेदन समाप्त करतो. या लक्षवेधीद्वारे सदस्यांनी

प्रशासनाचे जे लक्ष वेधले ज्या सुचना केल्या आपल्या प्रत्येक सुचनेवर अंमल केला जाईल. मला वाटते एवढे निवेदन येथे पुरेसे आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. आयुक्त साहेब, श्री. राजेंद्र चौधरी यांच्या प्रश्नाला दोन वेगवेगळया प्रकारची जी चुकीची उत्तरे दिली आहेत, ३५८ क्रमांकाच्या प्रश्नास व प्रश्न क्र. ४११ ला अलग उत्तर तसेच दुसरे असे की आता आपण जे सांगीतले एक कोटी पेक्षा अधिक रक्कमेची जकात चोरी नाही आहे. तर या अगोदर आम्ही कधी लक्षवेधी आणली नाही. ऑगस्टपासुन ३१ मार्च पर्यंत ५ कोटी ६० लाख रुपये सरासरी जकात वसुली येत होती व ८ कोटी रुपयाची जकात वाढ होवुनही आज सव्वा पाच कोटीची जकात वसुली येत आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>मा. महापौर महोदया, मी माझ्या निवेदनात म्हटले आहे की, प्रत्येक ठिकाणी जकात वसुलीमध्ये २० टक्यांपर्यंत चोरी होते. जे आज आपण १ कोटी रुपयांच्या जकात चोरीचे म्हणत आहेत आम्ही ५– ५.३० कोटी रुपयांची जकात वसुली करतो. २० टक्याची चोरी याचा अर्थ एक कोटी रुपयाची चोरी असा होतो. व हे प्रत्येक ठिकाणी आहे, येथेच नाही. मला हे माहित आहे याचे काय परिणाम होवु शकतात. मला कोठे कोठे उत्तर दयावे लागु शकते. परंतु ही सत्यता आहे. जेव्हा खाजगी करण केल्यानंतर जे मोठया प्रमाणावर उत्पन्न येवु लागले यावरुन हे प्रतीत होते की, जेव्हा महापालिकेचे कर्मचारी जकात वसुली करतात. तेव्हा चोरी होते. खाजगी ठेकेदार जकात वसुल करतो. तरीही जकात चोरी होते. त्याबाबतची सुध्दा बरीचशी उदाहरणे आपल्यासमोर ठेवु शकतो. येथे जेव्हा खाजगी ठेकेदार अभिकर्ता म्हणुन नेमला होता किंवा कल्याणमध्ये, मिरा भाईंदर , मालेगाव, अमरावती जेथे जेथे खाजगी ठेकेदार वसुली करतात, तेथे जकात चोरी थांबली आहे असे कधी झाले नाही. जकात चोरी होतच आहे. वाहतुक दाराची नावे आपण सांगितले आहेत. माझ्याकडे सुध्दा नावे आहेत. ती मी उघड करणे योग्य होणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> साहेब माझे एक निवेदन आहे जी यार्नची जकात वजनावर घेतली जाते यार्नच्या गाडयांचे सक्तीने वजन करुन जकात आकारली जावी. पुर्ण गाडीचे वजन करुन तशी पावती गाडी बरोबर असली पाहिजे. अशी तरतुद करा.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>ठिक आहे. ते करु.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u> मा. महापौर, मी आयुक्त साहेबांचे लक्ष वेधु इच्छिते, २४० जे जकात कर्मचारी आहेत या संख्येशी मी सहमत आहे. आज सुध्दा तेवढेच कर्मचारी आहेत. मला आठवण आहे जेव्हा जकात उपायुक्त म्हणुन श्री. प्रकाश कुकरेजा होते तेव्हा सुध्दा २४० सच कर्मचारी होते. त्यांना काही ५७२ किंवा ६०० कर्मचारी दिलेले नव्हते. तर तेव्हा जकात वसुली जास्त कशी येत होती. माझा दुसरा प्रश्न आपणांस हा आहे की, जर आपणांस असे वाटत असेल की कर्मचा–यांची संख्या वाढविली तर किंवा काही सामुग्री वाढविल्याने जसे आताच आपण ठेकेदाराचा प्रशासनीक खर्च आपण ३ कोटी सांगितला. परंतु जी वसुली आपण सांगितली २० कोटी, २५ कोटी पर्यंत जास्त आपण सांगितली किंवा येत आहे. जर आपणांस असे वाटत असेल, आम्ही तर पुर्ण अधिकार आपणांस दिले आहेत. जर आपण ३ कोटी रुपये खर्च केल्यानंतर २०–२५ कोटी रुपये करु शकतो. तर आपण सुध्दा जादा कर्मचारी नेमु शकता. दुसरा माझा हा प्रश्न आहे की, या दोन्ही प्रश्नांची आपण आता उत्तरे दयावीत किंवा सर्वांचे बोलुन झाल्यानंतर याचे आपण उत्तर दयावे. या दोन्ही प्रश्नांची उत्तरे दयायची आहेत म्हणुन आपण ते लिहुन घ्या. जेव्हा श्री. प्रकाश कुकरेजांकडे जकात विभागाचा कार्यभार होता तेव्हा वसुली कशी येत होती? व का येत होती? किंवा दुसरे जकात अधिक्षक त्यांच्यासारखे कार्यक्षम नाहीत. किंवा ते अधिक कार्यक्षम आहेत असे दाखवत आहेत असे काहीतरी असेल त्यांच्यामध्ये? किंवा त्यावेळेस आपण त्यांना जास्त कर्मचारी पुरविले होते? याचा आपण खुलासा करावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी चर्चा करतांना श्री. प्रकाश केसवानी यांच्या नावाचा उल्लेख केला होता. हा कर्मचारी या महापालिकेचा नाका शिपाई होता. त्याने चांगले काम केल्याबद्दल श्री. कुकरेजा साहेबांनी त्याला दक्षता पथकामध्ये काम दिले होते. परंतु काही दिवसानंतर , आयुक्त साहेब, आपण त्याची बदली केली. बदली करण्याचा अधिकार आपला आहे. परंतु सोन्यावर

उल्हासनगर मध्ये जकात चोरी होते. ती जकात चोरी पकडण्यासाठी आपण कुठला कर्मचारी नेमला आहे काय? आणि त्याने अशी काही जकात चोरी पकडली आहे काय? याचा पण खुलासा येथे व्हावा.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मा. महापौरजी व आयुक्त साहेब, आयुक्त साहेबांनी उत्तर देतांना एका गोष्टीचा उल्लेख केला व खाजगीकरणाचा एक सोपा मार्ग सांगितला. त्याचा आम्ही विरोध करतो व आपले जे म्हणणे आहे ते आम्ही खोडुन काढत आहोत. असे म्हणणे म्हणजे असे प्रतीत होते की, जसे एका गावात गुन्हा घडला व गुन्हेगार पकडले जात नव्हते नंतर हे प्रकरण गावाच्या प्रमुखाकडे गेले तेव्हा त्या प्रमुखाने सांगितले की, जोपर्यंत गुन्हेगार पकडले जात नाहीत तोपर्यंत आपण असे करु या, गावामध्ये जेवढे काही लोक राहतात प्रत्येक घरातील एक–एक माणसाने एक–एक दिवशी जेलमध्ये जावे. प्रयत्न झाला पाहिजे गुन्हेगारास पकडण्याचा व त्यास शिक्षा देण्याचा असे मी मानतो. म्हणुन आपली सुचना आम्ही खोडुन काढत आहोत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया शासन व प्रशासन यांच्या संगनमताने हे होत आहे. जेणे करुन जकातीचे उत्पन्न कमी होईल. व अशा प्रकारचा प्रस्ताव आणुन जकात खाजगीकरणासाठी कमी रक्कमेमध्ये ठेका देता येईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– शासनावर जो आरोप लावला जात आहे त्याबद्दल माझा हरकतीचा मुद्दा आहे.

यावेळी काही सन्माननिय सदस्य यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा. महापौर महोदया, शासनावर आरोप लावु नये.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– शासनाचे काम काय आहे? ते सांगितले जावे. त्याशिवाय काय चालु आहे? आता शासनाचे नाव घेतले तर राग आला? प्रशासन कोण चालवत आहे?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– जाणीवपुर्वक हे चालु आहे जेणेकरुन खाजगीकरण करता यावे. व कमी रक्कमेमध्ये ठेका देता यावा असा मी आरोप लावत आहे.

मा. महापौर :–याबाबत सत्ताधारी पक्षाकडुन कोणतेही उत्तर दिले जाणार नाही कृपया आपण बसुन घ्यावे. आयुक्त साहेबांनी अतिशय चांगल्याप्रकारे उत्तर दिले आहे. शासनामध्ये हे स्वतः सुध्दा येतात, कृपया आपण बसुन घ्यावेत.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– शासनावर कुणी आरोप करु नये.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–मा. महापौर महोदया, माझ्या निवेदनामध्ये श्री. प्रकाश केसवानी बाबतची एक बाब माझ्याकडुन राहुन गेली आहे. मला वाटते की, या माणसाची सचोटी त्याचे चालणे–बोलणे हे सर्व आपण पाहिले पाहिजे. त्यांनी निःसंदेह एक चांगले काम केले होते, सोन्यावर जकात वसुली होत नव्हती. ती पकडल्यानंतर सोन्यावर आता जकात कर भरत आहेत. परंतु जेवढा कर भरावयास पाहिजे तेवढा भरत नाहीत हे सुध्दा खरे आहे. सोनारांकडुन जी मागील दहा–अकरा महिन्यामध्ये जी जकात वसुली झालेली आहे, जुलै महिन्यामध्ये एकच आठवडा होता म्हणुन त्यावेळेस जकात वसुली शुन्य ऑगस्ट २००४ मध्ये शुन्य, सप्टेंबर २००४ मध्ये फक्त ५ हजार ६०० रुपये , ऑक्टोंबर मध्ये २ हजार १५० रुपये, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी या महिन्यामध्ये शुन्य फेब्रुवारीत १४ हजार ५७६ रुपये, मार्च शुन्य, एप्रिल ४० हजार ५१ रुपये, मे मध्ये १२ हजार ५०० रुपये व आता जुन मध्ये ६१ हजार ९४० रुपये म्हणजेच त्याला या विभागातुन काढल्यानंतरही ६१ हजार ९४० रुपये वसुली झालेली आहे. हा जो माणुस आहे तो शिपाई आहे. सोनार लोक जी जकात चोरी करतात त्याची त्याच्याकडे माहिती होती. त्यामुळेच की काय श्री. प्रकाश कुकरेजा यांनी त्याला एक संधी दिली. अधिकार मिळाल्यानंतर त्या व्यक्तीने विश्वासाने काम केले

पाहिजे. मला आठवते की श्री. भुल्लर महाराज जी  आपण श्री. केसवानी यास माझ्याकडे घेवुन आला होतात.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मी घेवुन आलेलो नव्हतो.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>नाही–नाही शिफारस नव्हती.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> त्याने चोरी पकडली होती. परंतु आपले लोक ती सोडुन देत होते. त्याने मला सांगितले की, साहेब आपण फोन करा या जकात चोरास सोडत कामा नये.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>मी आपणांस दोष देत नाही. फक्त साक्षीदार म्हणुन आपला येथे उल्लेख करत आहे. त्याचे मनोबल उंचावण्यासाठी त्यास बोललो होतो की, असेच निर्भय होवुन काम कर. आपण सुध्दा होतात. कोणत्याही राजकीय दबावाखाली न येता काम कर. प्रामाणीकपणे काम कर असे मी त्याचे मनोबल वाढविण्यासाठी बोललो होतो. त्यांनी आमच्या कर्मचा–यांना ब्लेकमेलींग करण्यास सुरुवात केले व सोनारांना सुध्दा ब्लेकमेंल करण्यास सुरुवात केली. माझ्याकडे लेखी तक्रार आहे त्याबाबत चौकशी सुध्दा झाली. जकात नाक्यावर जावुन  कर्मचा–यांचे फोटो घेणे लोकांना धमकी देणे व सांगणे की, तुम्ही व मी आता जे काही बोललो ते मी रेकॉर्डींग केले आहे. व ते मी आयुक्तांना ऐकवीन. त्यामुळे आमचे इतर कर्मचारी या प्रकारापासुन तंग झाले होते. एवढेच नाही तर महाराज व राजेंद्र चौधरी त्याला घेवुन जेव्हा माझ्याकडे आले होते तेव्हा माझ्याबरोबर जे बोलणे झाले होते ते सुध्दा त्याने टेप केले. तर मग तो प्रामाणिक आहे की, ब्लेकमेलर आहे हे ठरविले जावे. जो माणुस अधिकार मिळाल्यानंतर त्याचा दुरुपयोग करतो अशा माणसाला मी तर सहन करु शकत नाही. व मला खात्री आहे आपण सुध्दा सहन करणार नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> तो आपला अधिकार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> आपणाशी झालेले संभाषण त्याने टेप केले म्हणतात तो टेप आपण ऐकला आहे का?

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>मला कुणी सांगितले?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> जो माणुस जकात चोरी पकडतो त्याच्या विरोधात तर असे बोलले जाणारच ना? जो माणुस चांगले काम करतो त्याचे विरोधात काही लोक तक्रारी घेवुन येणारच? हा माणुस चुकीचा आहे असा आहे, तसा आहे. आपण तो टेप ऐकला आहे का?

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>मला वाटते की, त्या माणसाची मानसीक स्थितीही तपासून पाहवी लागेल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> मानसीक स्थितीची तर चैकशी करा. परंतु आपण तो टेप ऐकला आहात का?

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>त्याच्या मानसिक स्थितीची चौकशी करावी लागेल. ती सुध्दा मला बरोबर वाटली नाही. व जर आपणांस आठवत असेल तर त्याला पाहताच मी म्हटले होते याची मानसीक स्थिती मला काही बरोबर वाटत नाही. जर आपणांस आठवत असेल तर मी हे सुध्दा म्हटले होते त्याशिवाय आम्ही त्यास संधी दिली होती हे झाले प्रकाश केसवानी याचे, नाही सध्या तर त्याची चौकशी करुन फक्त त्याचे मानसीक स्थितीचीच चौकशी करणार. नाही तर त्याने ज्याला–ज्याला तंग केले, ब्लेकमेल केले त्या लोकाचे जबाब घेवुन त्याची सुध्दा सी.आय.डी. कडुन चौकशी करु.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– मा. आयुक्त साहेब, आम्ही अगोदरच आपणांस म्हटले होते की, कुणा कर्मचा–याला कोठे ठेवले पाहिजे हा आपला अधिकार आहे. परंतु तो जसा जकात चोरी पकडत होता तसा दुसरा कुणी जकात चोरी पकडत आहे का?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–नाही, आता तर आम्ही जकात वसुली करतो त्याचे परिणाम आता दिसुन येत आहेत. जुन महिन्यामध्ये ६१ हजाराची वसुली झाली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–जो चांगले काम करतो त्यास म्हणता ब्लेकमेलर आहे. तो चोरी पकडत होता महापालिकेचा फायदा करत होता. त्याची बाजु ऐकुन न घेता त्याच्याकडील कॅसेट न ऐकता आपण म्हणता तो चुकीचा माणुस आहे. ब्लेकमेलर आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–एका माणसाने सांगितले असते तर ठिक होते. सर्व लोक त्याचे विरोधात तक्रार करत आहेत आपणांस खात्री वाटत नसेल तर आम्ही संपुर्ण प्रकारणाची शहानिशा करु. व एवढेच नाही तर आपणांस वाटत असेल की, तो माणुस प्रामाणिक आहे, चौकशी अंती जर तो प्रामाणिक आहे असे आढळुन आले तर.......

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– अनिल खतुरानी याबद्दल जे म्हणालात त्याची सुध्दा चौकशी केली जावी. त्याला त्या विभागामध्ये कुणी आणले त्याची सुध्दा आपण चौकशी करावी.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–जरुर करु.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– अनिल खतुरानी विरुध्द एवढया तक्रारी आहेत. आपण म्हणालात की, आम्ही त्यास स्टोर विभागात बसविले आहे. मी आपणांस प्रथमच सांगितले की, स्टोर मध्ये राहुन सुध्दा तो इतरांपेक्षा एवढा सक्रिय कसा?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–याचीही चौकशी करु जर तो जकात चोरी मध्ये सक्रिय असेल तर त्यास सुध्दा तेथुन हटविले जाईल. जसे यास हटविले तसे त्यांना सुध्दा तेथुन हटवु.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– ज्या माणसाबद्दल आपण स्वत: म्हणाला होतात की, तेलगी असेच निर्माण होतात.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–बरोबर आहे ना? मी म्हटले होते ना?

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– त्यास जकात विभागामध्ये ठेवण्याची काय आवश्यकता होती? बरेचसे विभाग आहेत त्यामध्ये ठेवता आले असते.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–तो त्या विभागामध्ये कसा गेला यांची चौकशी करुन नंतर सांगु. परंतु तो जर जकात चोरीमध्ये शामिल असेल तर त्यासही तेथुन हटविले जाईल. असे मी सभागृहास आश्वासन देतो.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :– जकात चोरीमध्ये शामिल असल्याचे दिसते थोडेच. त्यास रंगेहात थोडेच पकडले जाते. श्री. अनिल खतुरानी बाबत सर्व उल्हासनगरला माहित आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–मा. महापौर महोदया, सर्वात महत्वाचा मुद्दा, नोव्हेंबर महिन्यामध्ये जकातीचे उत्पन्न सर्वात कमी आले. तेव्हा आम्ही महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांच्याकडे जकात विभागाचा कार्यभार दिला होता. सुरुवातीस ते या विभागाचे काम करण्यास तयार नव्हते. तरीसुध्दा आम्ही त्यांच्या इच्छेविरुध्द ते काम दिले होते. व जर आपण डिसेंबर २००४ ची जकात वसुली पाहिली, नोव्हेंबरची जकात वसुली ४ कोटी ६० लाखाची होती. डिसेंबर मध्ये ती ६ कोटी २१ लाख रुपये झाली. म्हणजेच त्यामध्ये बरीचशी वाढ झाली. त्यानंतर जानेवारी मध्ये ५ कोटी ७७ लाखाची वसुली झाली, फेब्रुवारी मध्ये

५ कोटी ५ लाखाची, मार्च मध्ये ५ कोटी ३५ लाखाची वसुली झाली. व ते १५ एप्रिल पर्यंत होते. एप्रिलचे पहिले १५ दिवस होते या १५ दिवसात त्यांनी २ कोटी ३१ लाखाची वसुली केली होती. त्यांनी स्वत: मला निवेदन दिले होते की, ते जकात विभागता जास्त दिवस काम करु इच्छित नाही. हे खरे आहे. त्यांच्या कार्यकालावधीत जकातीचे उत्पन्न वाढले होते परंतु त्यांच्या काही अडचणी होत्या, काही कौटुंबिक अडचणी होत्या असे स्वत: मला त्यांनी सांगितले. त्यामुळे जकात विभागाचा कार्यभार त्यांच्याकडुन काढुन श्री. ढेंगळेपाटील साहेबांना दिला. एप्रिल मध्ये पहिले १५ दिवस जेव्हा नविन वर्ष सुरु झाले, पहिले १५ दिवस व्हॅट (मुल्यवर्धित करामुळे) मुळे जकात वसुली कमी होती. श्री. ढेंगळेपाटील साहेबांकडे कार्यभार सोपविल्यामुळे २ कोटी ८२ लाखाची वसुली केली म्हणजेच तेथे सुध्दा वाढ झाली. नंतर श्री. ढेंगळेपाटील यांच्याकडे अतिक्रमण व जकात अशा दोन्ही विभागाचा कार्यभार होता. २७ एप्रिल २००५ रोजी उच्च न्यायालयाकडुन ८५५ इमारती निष्कासीत करण्याचा जो आदेश आला त्या आदेशाचे पालन करण्यासाठी त्या विभागात पुर्ण वेळ अधिकारी असणे जरुरीचे होते त्यामुळे श्री. ढेंगळेपाटील यांच्या ऐवजी जकात विभागाचा कार्यभार आम्ही श्री. आरोटे साहेबांकडे दिला. व जुन महिन्यामध्ये श्री. संदिप आरोटे साहेबांनी सुध्दा पावसाळयाचा मोसम असतांनाही बरीच चांगली वसुली केली आहे. प्रत्येक महिन्याची जर आपण सरासरी पाहिली, डिसेंबर मध्ये २० लाख १६ हजाराची सरासरी होती. जानवोरी मध्ये ३१ दिवसाचा महिना असुन सुध्दा १८ लाख ६२ हजाराची सरासरी होती. फेब्रुवारीमध्ये १८ लाखाची सरासरी होती. मार्चमध्ये १७ लाख २६ हजाराची सरासरी होती. एप्रिल मध्ये १७ लाख ४५ हजाराची सरासरी होती. मे मध्ये १७ लाख ८६ हजाराची सरासरी होती व मार्चच्या नंतर पुन्हा १७ लाखाची सरासरी आली. व आता जुन मध्ये १८ लाख २९ हजाराची सरासरी आहे. म्हणजेच व्हॅटचा थोडा फार परिणाम त्यावर पडला होता. आपण जर पाहिले तर असे दिसुन येईल की, श्री. कुकरेजा जेव्हा काम करत होते, तीच सरासरी श्री. ढेंगळेपाटील यांनी आपल्या कमी कार्यकालावधीत राखली होती. त्यांनी फक्त ५१ दिवस काम केले. व तीच सरासरी आता पुन्हा श्री. आरोटे साहेब यांच्याकडे कार्यभार आल्यानंतर येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> परंतु आम्ही जे जकात दर वाढविले त्यामुळे येणारे जे आठ कोटी आहेत.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u>सांगतो ना. तुम्ही सपरचंदाची केळयाशी तुलना करु नका. डिसेंबरची तुलना जुनशी होवु शकत नाही. किंवा जानेवारीची तुलना जुनशी होवु शकत नाही. जानेवारी, दिवाळी नंतरचा जो हंगाम आहे, साधारणत: आक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी लग्न समारंभाचा जो सिजन असतो. मे महिन्यापर्यंत किंवा जुनचा पहिला आठवडा ३१ मे पर्यंत नेहमी आयात जास्त होते. दिवाळीच्या अगोदर पासुन आयात वाढते. व दिवाळीनंतर मे महिन्यापर्यंत आयात जास्त प्रमाणात असते. नंतर पावसाळयाच्या काळात मालाची आयात जुन महिन्यामध्ये कमी होते, जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर........ आम्ही जे जकातीचे दर वाढविले ते व दुसरे असे की, आरोटे साहेबांनी कार्यभार स्विकारल्याने जे दिवसरात्र काम करणे सुरु केले त्यामुळे सुध्दा. मी आपणांस सांगितले की या एक महिन्यामध्ये पुर्ण १० महिन्यामध्ये आम्ही ९ लाखाचा दंड वसूल केला होता. त्यांनी एक महिन्यातच २ लाख १८ हजाराचा दंड वसुल केला. भाटिया किंवा त्यांच्याबरोबर जकात चोरी करणारे जे लोक होते त्यांच्यावर सुध्दा अंकुश लावला. आपणांस जर त्याचीही माहिती पाहिजे असेल तर भाटिया ज्या वस्तुची जकात चोरी करतो, जे प्लॅस्टीक ग्रन्युअल्स आहे, ग्रन्युअल्सची जी वसुली झाली आहे, त्याबाबत मी आपणांस निवेदन देवु इच्छितो. जुलै, २००४ मध्ये १ लाख ९५ हजार, ऑगस्ट मध्ये ५ लाख ८२ हजार, सप्टेंबर २००४ मध्ये १ लाख ८७ हजार, ऑक्टोंबर मध्ये ४ लाख ४३ हजार, नोव्हेंबर मध्ये फक्त ९८ हजार, डिसेंबर २००४ मध्ये २ लाख १२ हजार, जानेवारी २००५ मध्ये ३ लाख ४० हजार, फेब्रुवारी २००५ मध्ये २ लाख ७३ हजार, मार्च मध्ये ३ लाख ७३ हजार, एप्रिल मध्ये २ लाख ९५ हजार, मे मध्ये ७ लाख ५९ हजार, व जुन मध्ये ११ लाख ९८ हजार फक्त एक महिन्याची. श्री. आरोटे साहेब आल्यानंतर त्यांनी जकात चुकविणा—या विरुध्द कठोर उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. बाकी जकात चुकविण्या—यांविरुध्द सुध्दा आमच्याकडे माहिती उपलब्ध आहे. परंतु श्री. कुकरेजा यांच्याकडुन हा विभाग का काढुन घेतला? याबाबत मी सभागृहात निवेदन करु इच्छितो. त्यांच्या सांगण्यावरुन त्यांच्याकडुन त्या विभागाचा कार्यभार काढुन घेतला. जर त्यांना वाटत असेल किंवा आपणापैकी कुणाला वाटत असेल की, श्री. कुकरेजा साहेबांकडे जकात विभागाचा कार्यभार दिला पाहिजे तर जकात उप—आयुक्ताचे पद आजही रिक्त आहे. महापालिका सचिवांचे पद सोडुन जर ते उपायुक्त जकात हे पद घेवु इच्छित असतील, किंवा या सभागृहाची जर इच्छा असेल की त्यांना जकातीचा कार्यभार दिला पाहिजे तर आम्ही उपायुक्त, जकात म्हणुन त्यांची नेमणुक करण्यास तयार आहोत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> आपण आता जे सांगितले, आमचे जे उदिष्ट आहे, ८० कोटीचे आपले उदिष्ट असल्याचे अर्थसंकल्पात तरतुद आहे ८०.५० कोटी दोन बाबीवरील जकातीचा दर नंतर कमी करण्यात आला आहे. एक–दिड करोड रुपये सोडले तर ७९ कोटी होतात व त्या हिशोबाने मासिक सरासरी जी आहे ती आली पाहिजे ६ कोटी ६० लाख किंवा ६ कोटी ५० लाख, ६ कोटी ४८ लाख. ज्या प्रकारे जकातीची वसुली होत आहे, त्यावरुन काय आपले लक्ष पुर्ण होईल किंवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> उदिष्टाची गोष्ट तर वेगळी आहे. काल स्थायी समितीपुढे आपण हा जो प्रस्ताव आणला आहात. ७८ कोटीचे उदिष्टाची गोष्ट वेगळी आहे, कालच्या प्रस्तावात आपण ७२ कोटी दर्शविले आहेत. या हिशोबाने आपण एप्रिल पासुनच्या प्रत्येक महिन्याचे आकडे दिले आहेत. त्या हिशोबाने एकाही आकडयाची आजपर्यंत पुर्तता झालेली नाही. उदिष्ट पुर्ण झालेले नाही. जुन मध्ये आपण ६ कोटी २५ लाखाची वसुली दर्शविली आहे त्यामध्ये सुध्दा एक कोटीचे नुकसान झाले आहे. जुलै मध्ये पण ६ कोटी २५ लाख, आता आता आपण सांगितले की, जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या ४ महिन्यामध्ये माल कमी येतो. तर जरुर एप्रिल , मे पासुन जकात कमी येईल. म्हणजेच हा ७२ कोटीचा आकडा सुध्दा पार होणार नाही. याचाच अर्थ हा अर्थसंकल्प, या अगोदर जकात दरामध्ये जी वाढ केली, त्यानुसार पाहिले तर ६१ कोटी अधिक ८ कोटी, अशा प्रकारे ७० कोटी पर्यंत पोहचणे सुध्दा मुश्किल होईल.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>मा. महापौर महोदया, हा जो स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवला होता. कर्मचा–यांना प्रोत्साहन देण्यासाठी एप्रिल, मे मध्ये जी प्रत्यक्ष वसुली झाली तिच आम्ही दर्शविली आहे. त्यानंतर जुन पासुनचे उदिष्ट दिले आहे. या प्रस्तावामध्ये दोन भाग केले आहेत. जकातीचे ७२ कोटीचे कमीत कमी उदिष्ट जर साध्य झाले तर कोणतीही प्रोत्साहनात्मक रक्कम मिळणार नाही. व ७२ कोटी पेक्षा जर जास्त वसुली झाली तरच प्रोत्साहनात्मक रक्कम मिळेल. प्रोत्साहनात्मक रक्कम किती दिली पाहिजे? याबाबतचा प्रस्ताव आम्ही स्थायी समितीसमोर ठेवला होता. व मला पुर्ण खात्री आहे की, आम्ही ७२ कोटीपेक्षा अधिक वसुली तर करुच. परंतु ८० कोटीचे जे उदिष्ट ठेवले आहे ते साध्य करण्याचाही आम्ही प्रयत्न करु. ही पध्दत आंमलात आल्यानंतर आमच्या कर्मचा–यांच्या कार्यप्रणालीमध्ये व त्यांच्या विचारामध्ये निश्चितच बदल होईल असे मला वाटते. व एवढेच नाही तर जे जकात चुकविणारे लोक आहेत त्यांच्यावर सुध्दा सक्त कारवाई करुन ८० कोटीचे उदिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करु.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u> आपणांस जर असे वाटत असेल की कर्मचा–यांची संख्या वाढविल्यामुळे किंवा साधन सामुग्री वाढविल्यामुळे जकात उत्पन्नामध्ये जर २० कोटीची वाढ होत असेल तर यावर सुध्दा आपणांस लक्ष देण्याची गरज आहे.

**मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>आमच्याकडे कर्मचा–यांची जी मंजुर पदे आहेत, ती मर्यादीत आहेत. व नविन पद निर्माण करुन त्यांना राज्य शासनाकडुन मंजुरी आणने थोडेसे मुश्किलीचे आहे. यामुळे जर संभव असेल तर इतर विभागातुन कर्मचारी काढुन जकात विभागात जादा कर्मचारी दिले जातील. व तसे आजपर्यंत आम्ही दिले सुध्दा आहेत. परंतु यानंतरही जर आणखी कर्मचा–याची आवश्यकता असेल तर जकात विभागामध्ये जादा कर्मचारी देवु.

<u>मा. सचिव :–</u> दुसरी एक लक्षवेधी सुचना आहे. या लक्षवेधीचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदक आहेत श्री. जमनादास पुरस्वानी.

## <u>लक्षवेधी</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

**विषय :—** मा. हायकोर्टाने पाडण्याचा आदेश दिलेल्या उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील ८५५ इमारतीपैकी ११२ इमारतीच्या फाईल्स आकस्मात गहाळ झाल्याबाबतची वृत्तपत्रातील बातमी बाबत.

उपरोक्त विषयानुसार लक्षवेधीने आपले लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील ८५५ अनाधिकृत इमारती पाडण्याचे आदेश मा. हायकोर्टाने दिले असून सदर ८५५ इमारती पैकी १२२ इमारतीच्या फाईल्स महानगरपालिकेतून अकस्मितपणे गहाळ झाल्याच्या बातम्या मागील काही दिवसापासून वृत्तपत्रात प्रसिध्द होत आहेत. सदर वृत्तपत्रातील बातम्या ख—या आहेत काय? खरोखरच ११२ फाईल्स महापालिकेतुन गहाळ झाल्या आहेत काय? याबाबत महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेबाबत विनंती आहे.

<u>मा. सचिव :—</u>याच बरोबर पुढील एक लक्षवेधी सुचना आहे. तिचे सुचक आहेत श्री. नाना पवार व श्री. विनोद ठाकुर , अनुमोदक आहेत श्री. शांताराम निकम व श्री. सुरेश जाधव.

## लक्षवेधी

सुचकाचे नाव :— १) श्री. नाना पवार

२) श्री. विनोद ठाकुर

अनुमोदकाचे नाव :—१) श्री. शांताराम निकम

२) श्री. सुरेश जाधव

उल्हासनगर शहरामध्ये मोठया प्रमाणात १९९५ पुर्वीच्या वसलेल्या गलिच्छ वस्त्या आहेत. गलिच्छ वस्तीमध्ये राहत असलेल्या नागरीकांना त्यांचे राहते घराची दुरुस्तीची परवानगी महानगरपालिकेने देणे आवश्यक आहे.

करीता दिनांक २०/६/२००५ रोजी होणा—या महासभेमध्ये महासभेचे लक्ष वेधने करीता सदरिल लक्ष वेधी सुचना स्विकारण्यात यावी ही विनंती.

<u>मा. सचिव :—</u> या दोन्ही लक्षवेधी एकत्रितरित्या घेतल्या आहेत. तर कृपया आपण आपापला प्रस्ताव ठेवा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौरजी व आयुक्त साहेब, या ज्या संचिका गहाळ आहेत, ८५५ इमारतींच्या संबंधात ज्याबाबत रोज वर्तमानपत्रात बातम्या येत आहेत या संचिका कोण—कोणत्या इमारतींच्या आहेत? ते संगण्याची कृपा करावी, याबाबत या अगोदर दिनांक १७/१०/१९९७ रोजी मी एक लक्षवेधी सुचना मांडली होती. त्यावेळी सुध्दा १०१ संचिका गहाळ होत्या. तर त्यावेळचे जे आयुक्त होते श्री. काळे साहेब त्यांनी त्यावेळी सांगितले होते की, चौकशी करुन आम्ही हे सांगु की या संचिका कोठे आहेत. त्याबाबतही जर आपणांस काही माहित असेल तर ते सांगण्याची कृपा करावी. व कोण—कोणत्या इमारतींच्या संचिका गहाळ आहेत?

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. आयुक्त साहेब, हा जो ८५५ इमारतींचा विषय आहे, त्याबाबत काही वर्तमानपत्रामध्ये बातम्या आल्या आहेत की, काही संचिका गहाळ आहेत. त्याबाबत ही लक्षवेधी संचिका मांडली आहे. कोण–कोणत्या फाईली गहाळ झाल्या आहेत, याची माहिती सभागृहाला व शहराला असणे आवश्यक आहे. आम्हांला अशीही माहिती मिळाली आहे की काही संचिका बरोबर काही इमारतीही गायब झाल्या आहेत. की ज्या अदयापपर्यंत मिळुन येत नाही तर कृपया याची माहिती सभागृहाला दिली जावी. सत्यता काय आहे ते सांगितले जावे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u>मा. महापौर महोदया, ही लक्षवेधी सुचना काही संचिका गहाळ झाल्यामुळे येथे मांडण्यात आली आहे. अशाच प्रकारची लक्षवेधी सुचना महाराष्ट्र राज्याच्या विधासभेमध्ये , विधानपरिषदेचे सदस्य श्री. व्यंकप्पा पत्की यांनी मांडली होती. १९९६–९७ मध्ये वर्तमानपत्रामध्ये एक बातमी छापुन आली होती. त्यावर लक्षवेधी सुचना आल्याने त्यावेळचे आयुक्त श्री. बायस साहेब यांनी त्यावेळचे मुख्य लेखा परिक्षक श्री. नंदलाल विसपुतेजी यांचे नेतृत्वाखाली एक चौकशी समिती गठित केली होती. त्यांनतर या महासभेत एक लक्षवेधी सुचना सुध्दा आली होती. त्यावेळेसही श्री. भुल्लर महाराज यांनीच ती लक्षवेधी सुचना १७/१०/९७ रोजी मांडली होती. त्यानंतर महासभेमध्ये एक प्रश्न सुध्दा आला होता, या सभागृहाचे सदस्य श्री. पंढरीनाथ वारींगे यांनी तो प्रश्न विचारला होता. आज आमच्या समोर जे कागदपत्र उपलब्ध आहेत त्यानुसार असे वाटते की, या सभागृहामध्ये एक खात्री देण्यात आली आहे की, १०१ संचिका गहाळ आहेत. त्यातील किती संचिका कुणाकडे आहेत? नंतर त्या संचिका आणण्यासाठी त्यांच्याशी पत्रव्यवहार सुध्दा केला गेला. परंतु आज माझ्यासमोर जी संचिका आहे किंवा चौकशी अहवाल आहे त्यातुन असे प्रतीत होते की, त्यावेळेस १०१ संचिका गहाळ होत्या. व त्या चौकशीचा जो अंतिम अहवाल आहे, तो अदयाप आलेला नाही. ती चौकशी पुर्ण झालेली नाही. अंतरीम उत्तराच्या माध्यमातुनच त्यावेळेस लक्षवेधी सुचनेला उत्तर दिले होते. दोन अंतरिम अहवाल विसपुते साहेबांनी त्यावेळीस सभागृहात सादर केले. त्यानंतर त्याच अंतरिम अहवालांच्या आधारावर या सभागृहात लक्षवेधीला उत्तर दिले होते व प्रश्नालाही उत्तर दिले होते. ती चौकशी पुर्ण न झाल्याने आजच्या तारखेला संचिका गहाळ आहेत हे सांगणे किंवा चोरी झाली आहे हे सांगणे यामधील जी संभावना आहे त्याबाबत आज येथे काही सांगितले जावु शकत नाही. बायस साहेबांचा अहवाल जर आपण पाहिलात जो राज्य शासनाला त्यांनी सादर केला आहे, त्यांनी त्यात लिहिले होते की, चौकशी पुर्ण झाल्यानंतर अहवाल सादर केला जाईल. व त्यामध्ये त्यांनी हे सुध्दा म्हटले आहे की, असे असुनही अनाधिकृत बांधकामाविरुध्द जी कारवाई होत आहे त्या कारवाई मध्ये कुठलीही बाधा येणार नाही. त्यानंतर सभागृहामध्येही जेव्हा चर्चा झाली, आपणाकडे कदाचित १७/१०/९७ चे इतिवृत्त असेल ते जर आपण पुर्ण वाचलेत तर कुणाकडे किती संचिका आहेत ते सुध्दा त्यात दिले आहे. व त्यापुढे काय करणार याबाबत काहीही ठोस असा निर्णय झालेला नाही. परिणाम स्वरुप ही चौकशी अदयाप पुर्ण झालेली नाही. परंतु मला असे वाटते की, निश्चित स्वरुपात सत्यता आमच्यासमोर येईल की कोणती संचिका आज मिळत नाही. २७/४/२००५ रोजी उच्च न्यायालयाचा जो आदेश झालेला आहे तो आदेश लक्षात घेता जी कारवाई आम्हांला आता करायची आहे ती कारवाई करण्यासाठी आम्ही प्रत्येक संचिका शोधत आहोत. त्यामध्ये जी सत्यता समोर आली ती ही आहे की, काही संचिका चौकशीसाठी राज्य सरकारचे जे चौकशी अधिकारी जुन्या कस्टम हाउस मध्ये बसतात त्यावेळचे जे अधिकारी होते त्यांची चौकशी चालु आहे. म्हणुन संचिका पाठविली आहे. काही संचिका उपसंचालक नगररचना विभाग यांच्या कार्यालयात पाठविल्या होत्या काही संचिका संचालक नगररचना कार्यालयात पाठविल्या आहेत. काही संचिका विधी विभागाकडे पाठविल्या होत्या. महापालिकेच्या वकिलांना माहिती देण्यासाठी मुळ संचिका विधी विभागामार्फत वकिलांकडे पाठविल्या होत्या. त्या न्यायालयात सादर केल्या आहेत. तर या सर्व संचिका जेथे पण व ज्या पण स्थितीत आहेत, त्या परत करण्यासाठी आम्ही प्रत्येक विभागाशी संपर्क साधला आहे. संचालक, नगररचना विभाग यांच्याकडुन जवळ–जवळ २५ संचिका आम्हांला परत मिळाल्या आहेत. मला असे वाटते की, आता आम्ही जी कारवाई करणार आहोत, २५ जुलैला मला ते सत्यप्रतिज्ञा पत्र सादर करायचे आहे. ते सादर करण्यापुर्वी या प्रत्येक संचिकेबाबत माझ्याकडे माहिती असेल ही संचिका आहे किंवा नाही. त्यानंतरच सभागृहात मी निश्चितपणे असे काही निवेदन करु शकेल. आज आपण या लक्षवेधीद्वारे आमचे लक्ष आकर्षित केले. व पहिली जी चौकशी प्रलंबित आहे, ती पुर्ण करुन आम्ही सभागृहासमोर लवकरात लवकर सत्यता ठेवु. या पेक्षा जास्त काही सांगण्यासारखे माझ्याकडे नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब काही दिवसांपुर्वी वर्तमानपत्रामध्ये बातमी आल्यानंतर ही लक्षवेधी सुचना आल्यानंतरही लक्षवेधी सभागृहामध्ये मांडण्यात आली. ११२ संचिका गहाळ

झाल्या. त्यावर आयुक्तांचे निवेदन आले की, जरी संचिका गहाळ झाल्या असतील तरीही आम्ही कारवाई करु. त्यानंतर महानगरपालिकेतर्फे निवेदन प्रस्तृत करण्यात आले की, एकही संचिका गहाळ झाली नाही. या दोन्ही निवेदनामध्ये संदेह वाटतो याचाही खुलासा आपण करावा.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्री. मोहन साधवानी, श्रीमती जया साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेलेत.**

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—**मा. महापौर महोदया, हे सत्य आहे की, आमच्या मुख्यालयाच्या उपायुक्तांनी काार्यालयाच्या वतीने एक स्पष्टीकरण वर्तमानपत्रांना दिले आहे. कित्येक वेळा असे होते की, एखादी नकारात्मक बातमी येते तिचे त्वरीत खंडन केले जाते. त्यांनी जास्त घाई—घाईने खंडन केले. मी त्यांच्यावतीने दिलगिरी व्यक्त करु इच्छितो, ते खंडन त्यांनी एवढया लवकर करावयास नको होते. सर्व चौकशी केल्यानंतर, सर्व सत्यता बाहेर आल्यांनतर त्यांनी निवेदन दयावयास पाहिजे होते.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** काही वर्तमानपत्रांवर दबाव टाकण्यात आला की, तुम्ही जर खंडन छापले नाही तर तुम्हांला महापालिकेतर्फे जाहिराती प्रसिध्दीसाठी दिल्या जाणार नाहीत.

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—**अशी तक्रार तर माझ्या कडे नाही. व अशी जर काही कारवाई व कृती झाली असेल तर त्याबदृदल सुध्दा मी आज दिलगिरी व्यक्त करेन. व नंतर जेव्हा ८५५ इमारतींच्या संचिकांची पुर्ण चौकशी होईल.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** दिवस, कालावधी वगैरे काय?

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—**२५ जुलैला मला प्रतिज्ञापत्र दाखल करायचे आहे, व ८ ऑगस्टला केस बोर्डावर आहे. ८ ऑगस्टच्या नंतरच याबाबतीत सभागृहात मी निवेदन करु शकेन.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** मी आपणांस विचारु इच्छितो, संचिका गहाळ झाल्यामुळे इमारतींवरील कारवाई थांबेल असे तर काही नाही ना? कारण की, जेवढया काही संचिका गहाळ झाल्या आहेत त्या सर्व इमारत धारकांनी न्यायालयातुन स्थगिती आदेश प्राप्त करुन घेतला होता. व स्थगिती आदेशासाठी पुर्ण पत्रव्यवहार न्यायालयाकडे होता_त्यानुसार ती फाईल पुन्हा तयार केली जावु शकते ना? जर असे होवू शकत असेल तर आपण सभागृहाला हे सांगा की, यामुळे कोणतीही कारवाई थांबणार नाही. एवढेच आश्वासन आपण सभागृहाला दया.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—** मा. महापौरजी, व आयुक्त साहेब, ८५५ बांधकामांपैकी जर ११२ संचिका गहाळ आहेत तर आताच्या घडीला ८५५ इमारतींपैकी किती इमारतींच्या संचिका तुमच्याकडे आहेत. त्या तुम्ही महासभेपुढे दाखवु शकता का?

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर, श्री. भालेराव गौतम हे सदस्य सभागृहातुन बाहेर गेले.**

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—**मा. महापौर महोदया, मी अगोदरच सांगितले आहे. आम्ही २७/४/२००५ च्या न्यायालयाच्या आदेशानंतर सर्व संचिका शोधण्याचा प्रयत्न केला त्यानुसार ब—याचशा फाईल्स मिळत आहेत. १०१ संचिका ज्या गहाळ आहेत त्यांच्या बाबतीत सध्या तरी माहिती माझ्याकडे नाही. त्यामध्ये काय बरोबर काय चुकीचे हेही मी या ठिकाणी बोलणार नाही. परंतु ८५५ पैकी माझ्याकडे किती आहेत याचीही आपल्याला माहिती पाहिजे. त्याची सुध्दा माहिती आपणाला ८ ऑगस्ट नंतरच देवु शकेल.

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—** तुमच्याकडे किती फाईल्स उपलब्ध आहेत. न्यायालयामध्ये किती आहेत? गहाळ किती आहेत?

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—** मी एवढेच सांगु इच्छितो की, संचिका शोधण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. जसे की, श्री. बेहरानी साहेबांनी म्हटले की त्या ज्या संचिका आहेत, होवु शकते त्या आढळुन येत नसतील. किंवा न्यायालयामध्ये मुळ संचिका आहे. किंवा दुस—या कुठल्या विभागामध्ये जी छायांकित

प्रत आहे. त्यावरुन ती फाईल पुन्हा आम्ही तयार करु शकतो. एक विश्वास ठेवा यामुळे कारवाई थांबणार नाही. कारण की, इमारत तेथे जागेवर आहे. संचिका नाही तरी जागेवर जावुन त्या इमारतीची पाहणी करणे, मोजमाप घेणे, त्यास पुन्हा नोटिस बजावणे, व न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कारवाई करणे. यातील प्रत्येक गोष्ट संभव आहे जर कुणी माणुस या भ्रमात असेल की, संचिका गहाळ झाल्यामुळे त्यांची इमारत वाचु शकते. तर त्यांनी हा भ्रम कृपा करुन दुर करावा एवढेच मी निवेदन करु इच्छीतो.

<u>मा. सदस्य श्री. नाना पवार :—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उप—महापौरजी, मा. सचिव साहेब, सभागृहात उपस्थित असलेले सर्व सदस्यगण गलिच्छ वस्तीमध्ये राहणारा नागरीक आपले घर दुरुस्त करु इच्छित असेल तर कायदयानुसार काही अटी शर्तीवर महानगरपालिकेने त्यास मंजुरी दयावी म्हणुन ही लक्षवेधी सभागृहासमोर आली आहे. व ही लक्षवेधी आपण स्विकृत केली आहे म्हणुन मा. महापौरांचे मी या ठिकाणी आभार प्रकट करतो. लक्षवेधी मा. महापौरांना सादर केल्यानंतर मा. महापौरांनी आयुक्तांशी विचारविर्मश केल्याने आयुक्त साहेबांनी काही प्रमाणात तिला मंजुरी देण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणुन आयुक्त साहेबांचे सुध्दा आम्ही या ठिकाणी आभार प्रकट करतो. परंतु जे पत्रक आम्ही पाहिले त्यामध्ये फोटोपासची जी अट आहे, १९९५ च्या अगोदरच्या ज्या गलिच्छ वस्त्या आहेत त्याबाबत सरकारचे धोरण आहे की या अगोदरचा त्यांच्याकडे जर काही पुरावा असेल तो सुध्दा मान्य केला जावा. आपणाकडे सर्व गलिच्छ वस्त्यांमध्ये महानगरपालिकेने फोटोपास अदयापपर्यंत दिलेले नाहीत. अतिशय कमी प्रमाणात फोटोपासचे वितरण झालेले आहे तर याचबरोबर राज्य शासनाचे जे धोरण आहे, त्यानुसार ही महानगरपालिका जर झोपडे दुरुस्तीची परवानगी देत असेल तर ती फार चांगली गोष्ट हाईल. मी येथे एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो, गलिच्छ वस्तीतील नागरीकांना त्यांच्या झोपडयाची दुरुस्ती करण्याची परवानगी महापालिकेने दिली पाहिजे. ही जी लक्षवेधी मांडली आहे त्याचे कारण असे आहे की, आमच्या ब—याचशा सदस्यांच्या मनामध्ये असे असेल की, फक्त झोपडपट्टयांसाठीच का? तर सरकारचे जे धोरण आहे तेच असे आहे की, गलिच्छ वस्तीतील नागरीकाला जर त्याचे घरात दुरुस्ती करायची असेल तर त्यास परवानगी दिली जावी. असे जर होत असेल तर आयुक्त साहेबांनी अतिक्रमण शुन्यावर आणण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो एक चांगला निर्णय असल्याचे प्रतीत होईल. अतिक्रमणांवर सुध्दा आळा बसेल. जर आपण परवानगी देत असाल तर लोक अतिक्रमण का करतील? शहरात अतिक्रमण होवु नये ते शुन्यावर यावे यासाठी ही लक्षवेधी सभागृहात आणण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. याबाबतीत जवळ जवळ ५० टक्के निर्णयापर्यंत आयुक्त साहेब आलेले आहेत. व यापुढील ५० टक्याचा जो निर्णय आहे तो राज्य सरकारच्या धोरणानुसार आयुक्त साहेब लवकरात लवकर कार्यवाही करतील. शहरातील लोकांमध्ये अशा प्रकारचा संदेश लोकांमध्ये गेला पाहिजे. ही लक्षवेधी सुचना सभागृहात मांडल्यामुळे आयुक्त साहेब बरेच खुष आहेत. उल्हासनगर शहरामधील झोपडपट्याची संख्या मोठया प्रमाणावर आहे. आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या यादीमध्ये ४८ झोपडपट्टया या अधिकृत झोपडपट्टया किंवा संरक्षीत झोपडपट्टया म्हणुन घोषित आहेत. येथे २५—२५, ४०—४० वर्षापासुन लोक राहत आहेत. त्यांना घर दुरुस्तीची आवश्यकता पडते ती महानगरपालिकेने काही शर्तीवर देणे आवश्यक आहे. व मी येथे विनंती करतो की, आम्ही येथे लक्षवेधी सुचना मांडली आहे. ती योग्य अशीच असुन तिला मान्यता दिली जावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब , सचिव साहेब व सर्व सन्माननिय सदस्य , मा. आयुक्त श्री. सोनवणे साहेबांना मी धन्यवाद देईन कारण की आमचे शहर तीन बाबतीत बदनाम होते. एक तर डुप्लिकेट मालाबाबतीत, दुसरे अस्वच्छ शहर, व अनाधिकृत बांधकामांचे शहर. आज आयुक्त साहेबांनी आमच्या शहरामध्ये अनाधिकृत बांधकामांवर जो अंकुश लावला आहे यासाठी मी त्यांना धन्यवाद देवु इच्छितो. परंतु आमच्या शहरामध्ये ज्या ४८ शासन मान्य झोपडपट्टया आहेत त्यांना जे फोटोपास दिले आहेत ते सर्वांना मिळालेले नाहीत. जसे की, एका झोपडपट्टीत एका घरामध्ये फोटोपास दिला तर ४ लोकांच्या घरात फोटोपास दिलेला नाही. त्याचे कारण विचारले तर अधिका—यांकडुन उत्तर मिळते की, त्यांचे आमच्या यादीमध्ये नाव नाही. त्यामुळे ब—याचशा लोकांना फोटोपास मिळालेला नाही. दुसरे म्हणजे आमच्या शहरात ४८ झोपडपट्टयां व्यतिरिक्त आणखी ब—याच झोपडपट्टया आहेत. जे लोक गरीब आहेत, जे पक्के बांधकाम करु शकत नाहीत परंतु पावसाळयामुळे कुणाला आपल्या घराचे पत्रे बदली करावे लागतात. कुणाला आपल्या भिंतीची दुरुस्ती करावी लागते. कुणाच्या घरामध्ये स्वयंपाक घराचा ओटा बांधायचा असतो. कुणाच्या घरामध्ये टाईल्स लावायच्या असतात. अशा गरीब लोकांकडे जर सनदची मागणी केली तर ते कोठुन आणतील? जे लोक या शहरामध्ये ३०—४० वर्षापासुन राहत आहेत त्यांच्याकडे यु. नं. कदाचित असेल, काही—काही झोपडपट्टयांमध्ये तर काहींकडे यु. नंबर ही नसेल. तर अशा

झोपडपट्टी धारकांनी पावसाळयात काय करायचे? आपण शहरामधील अनाधिकृत बांधकामांवर अंकुश लावला आहे त्यामुळे जवळ–जवळ ९५ टक्के अनाधिकृत बांधकामे बंद आहेत. परंतु गरीब, झोपडपट्टीचे व असे काही बॅरेक आहेत की त्यांना पत्रे बदली करावी लागतात अशा लोकांचा विचार करुन आपण कायदयानुसार दुरुस्ती परवानगी दिलीत जेणेकरुन कुणी अनाधिकृत बांधकाम करु शकणार नाही व आपला जो उद्‌देश आहे तोही सफल होईल अशी मी आपणकडुन अपेक्षा करतो.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल</u>:–मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब मी श्री. नाना पवार यांचे हार्दिक अभिनंदन करतो की, झोपडपट्टीचा जो विषय त्यांनी येथे आणला आहे. कारण की, माझ्या प्रभागात सेंच्युरी रेयॉनची आमची कॉलनी सोडुन जवळ–जवळ ९० टक्के झोपडपट्टी आहे व घर दुरुस्ती परवानगीसाठी आयुक्त साहेबांनी ज्या अटी , शर्ती घातल्या आहेत त्यामुळे बरेच कठिण होत आहे यास्तव माझे असे म्हणणे आहे की, जो महाराष्ट्र शासनाचा निर्णय आहे, १९९५ पुर्वीच्या झोपडपट्टया ज्या आहेत त्या नियमित करण्या संदर्भात आपले जे करदाते आहेत १९९५ पासुन आजपर्यंत ज्यांनी पुर्ण मिळकत कर भरला आहे, अशा लोकांना घर दुरुस्ती परवानगी देण्यास कोणतीही हरकत असता कामा नये. व याबाबत प्रभाग समितीचे जे अधिकारी आहेत ते सर्व्हे करु शकतात. कारण की, मागील महिन्यामध्ये माझ्या प्रभागामध्ये एकाच्या घराची भिंत पडली व ती भिंत बांधण्यासाठी त्याने दरवाजा काढला. तो दरवाजा आजपर्यंत आपल्या अधिका–यांनी लावु दिला नाही हा कोणता प्रकार आहे की जो दरवाजा सुध्दा लावु शकत नाही. कारण की, कोणतेही विट काम करु शकत नाही. यास्तव आयुक्त साहेबांना आमची विनंती आहे की, १९९५ पुर्वीच्या ज्या काही झोपडया आहेत व ज्यांचेकडे महापालिकेचे कोणतेही येणे बाकी नाही, त्यांना सुध्दा दुरुस्ती परवानगी दिली पाहिजे धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, उल्हासनगरमध्ये आजच्या तारखेला दोन गोष्टींची चर्चा चालु आहे, शुन्य टक्का कचरा व शुन्य टक्का अनाधिकृत बांधकाम आम्ही लोकांनी निविदा दिली आहे रस्त्यावर कचरा कुंडीवर, गटारांमध्ये कचरा दिसता कामा नये. आज बांधकामे सुध्दा शुन्य टक्यावर आली आहेत. पावसात, वादळी वा–यात, हवेने कुणाच्या घराचे पत्रे उडतात. भिंती पडतात. कुणाचे नाल्याच्या किनारी घर असते, अशा घरांमध्ये नाल्याचे पाणी जाते तर अशा या बाबतीत काय केले जावे? समजा त्याच्याकडे १९९५ चा फोटोपास नसेल, सनद नाही, यु. नं. नाही असा व्यक्ती कुठे जाईल, त्याने कोठे जावे? त्याबाबतीत काही सहानुभुतीपुर्वक विचार केला जावा. व ज्याच्याकडे फोटोपास आहे त्यास महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार १४ फुटापर्यंत घराची उंची वाढविण्याची परवानगी आहे. त्यांना तेवढी परवानगी दिली जावी. कुणी व्यक्ती आपल्या घराचा दरवाजा बदली करु इच्छितो. कुणाच्या घराचा दरवाजा तुटला आहे तो दुरुस्त करु इच्छित असेल तर तो करु शकत नाही कारण तसे करणे आजकाल गुन्हयासारखे झाले आहे. यास्तव मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांनी या गोष्टीचा सहानुभुतीपुर्वक विचार करावा. आजच्या स्थितीत कुणी दरवाजा , खिडकी बदली करु इच्छित असेल तर कुणी करु शकत नाही. एकप्रकारे पुर्ण शहरामध्ये दहशत पसरली आहे. कुणी व्यक्ती दरवाजा बंद करुन आत मध्ये काम करतो तर अधिकारी दरवाजा उघडुन आतमध्ये प्रवेश करतात व काय काम करत आहात अशी विचारणा करतात. व माझ्या प्रभागात, माझ्या कार्यालयाच्या बाजुला सनद असलेला एक ब्लॉक आहे. एक महिला आपल्या घराचा दरवाजा दुरुस्त करत होती, तिच्या घरामध्ये अधिकारी गेले म्हणे दरवाजा बदली करता येणार नाही. तर कुणी तिच्याजवळ ५ हजार रुपयाची मागणी केली, ५ हजार दिले नाहीत तरीपण एक व्यक्ती तिच्याकडुन १५०० रुपये घेवुन आला व तिचे काम पण बंद केले त्यानंतर ते बांधकाम तोडुनही आला. तर कृपा करुन माझी मा. महापौर व आयुक्त साहेबांना विनंती आहे की, ही जी लहान–मोठी कामे आहेत त्यांच्यासाठी मानवतेच्या दृष्टीकोनातुन विचार केला जावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उप–महापौर, सचिव साहेब व सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य, श्री. नाना पवार, श्री. विनोद ठाकुर, मी व श्री. सुरेश जाधव यांनी येथे जी लक्षवेधी सुचना मांडली आहे ती या शहरामध्ये झोपडपट्टयांवर जी कारवाई केली जात आहे त्यांच्या संदर्भात आहे. १०–१२ दिवसांपुर्वी आयुक्त साहेबांनी झोपडी दुरुस्तीसाठी, इमारत दुरुस्तीसाठी परवानगी दिली आहे, परंतु त्यांनी काही अटी, शर्ती ठेवल्या आहेत. जर आपणाकडे सनद असेल, आर्किटेक्टचा दाखला असेल किंवा फोटोपास असेल तरच अशी परवानगी मिळेल. परंतु सर्व सन्माननिय सदस्यांनी जे म्हटले त्या सर्वांच्या भावना लक्षात घेवुन किरकोळ दुरुस्तीसाठी परवानगी दिली जावी. आपले जे अधिकारी आहेत ते जबरदस्ती करतात, व एवढी जबरदस्ती करतात की, आज पर्येत आम्ही अशी जबरदस्ती पाहिली

नाही. जेव्हा पासुन उच्च न्यायालयाचा आदेश आला आहे, तेव्हा पासुन त्यांनी एवढी जबरदस्त कारवाई करण्यास सुरु केली आहे की ज्याचा आम्ही स्वप्नातही विचार केला नव्हता, आपणासमोर मी काही उदाहरणे ठेवु इच्छितो, आमच्या येथे ए नंबर ब्लॉक आहे की त्यांच्याकडे सनद आहे. त्यांच्या ब्लॉकच्या भिंतीतुन पाणी आत येते. यासाठी त्यांनी त्या भिंतीस प्लॉस्टर करण्याचे ठरविले तर आपल्या अधिका—याने ते सुध्दा करु दिले नाही. म्हटले की, दुरुस्ती परवानगी घेवुन या. एकाने तर घराच्या जे दरवाजे होते तेथिल एका दरवाज्याच्या ऐवजी खिडकी लावली तर ते लोक खिडकी सुध्दा तोडुन आले. एकाने दरवाजा बाहेरचे गेट थोडे उंच केले तर ते उंच केल्यानंतर ते गेटही तोडण्यात आले. आम्ही जी लक्षवेधी आणली आहे , जे फोटोपास आहेत ते फोटोपास ब—याच लोकांना दिलेले नाहीत, तर मी आयुक्त साहेबांना विनंती करेन की, जर फोटोपास जरी नसेल तरी ज्यांना दुरुस्ती करायची आहे त्यांना दुरुस्ती करण्याची परवानगी दिली जावी. जसे की, आमचे सभागृह नेता यांनी सांगितले की, फोटोपासचे काम बंद आहे. व जसे आमच्या श्री. सुरेश जाधव यांनी सांगितले की, एका घराला फोटो पास दिला, व चार घरांना फोटोपास दिला नाही. मी तर असे म्हणेन की, असे काही विभाग आहेत त्या विभागांचा फोटोपाससाठी सर्व्हे झालेला नाही. फोटोपाससाठी सर्व्हे होईपर्यंत किरकोळ दुरुस्तीसाठी परवानगी दिली जावी.

<u>मा. महापौर :—</u>माझ्या मते याबाबत सर्वांचे मत एकसारखेच आहे. सर्वांच्या सुचना सारख्याच आहेत. याबाबतीत आयुक्त साहेबांनी उत्तर दयावे.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>झोपडपट्टयांच्या बरोबर मध्यमवर्ग जो आहे जो बॅरेक मध्ये राहतो, ज्यांची दुकाने आहेत, ज्यांच्याकडे यु. नं. आहे, ज्यांच्याकडे चालता नंबर आहे त्यांच्या बाबतीतही विचार केला जावा. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी आता जी दुरुस्ती परवानगी देण्याचे काम सुरु केले आहे, त्यामध्ये लिहिले आहे सनद , यु. नं., सिट नं., ई नं., चालता नंबर, फोटोपास ज्यांच्याकडे आहे त्यांना किरकोळ घर दुरुस्ती परवानगी दिली जाईल. परंतु प्रभाग अधिकारी व कनिष्ठ अभिंयता लोकांची दिशाभुल करतात. फोटोपाससाठी सर्व्हे बंद झाला आहे. उपायुक्त श्री. दुसाने साहेब, यांनी सांगितले की, तो चालु आहे. दुसरे असे की, यांनी घर दूरुस्ती परवानगी देण्याचे काम चालु केले त्यामध्ये काही अडचणी आहेत, एखादयास भिंतीची दुरुस्ती करायची आहे, म्हणुन त्याने पत्रे उतरवुन भिंतींची दुरुस्तीचे काम सुरु केले तर त्यास पत्रे चढवु दिले जात नाहीत. अशी व्यक्ती आपल्या घराचे पत्रे उतरवुन अडचणीत येतो. तर याचाही खुलासा केला जावा की, जो व्यक्ती आपल्या घराचे जुने पत्रे उतरवुन दुरुस्ती नंतर पुन्हा पत्रे तर बसवु शकतो ना? आयुक्त साहेबांनी सांगितले की, नागरीक सुविधा केंद्रामध्ये सर्वांना १५ मिनिटामध्ये फोटोपास मिळेल असा जर त्यांनी निर्णय घेतला असेल तर त्यांनी असेही आश्वासन दयावे की, लोकांना फोटोपासचे शुल्का व्यतिरिक्त जे जादा पैसे दयावे लागत होते ते दयावे लागणार नाहीत. त्यांची त्या पैश्याची बचत होईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः—</u> मा.महापौरजी, आयुक्त साहेबांकडुन मला हे स्पष्ट करुन घ्यायचे आहे की, प्लॉस्टरींग, पत्रे उतरवुन घेणे किंवा लिकेजेस दुरुस्त करणे किंवा अन्य जी काही छोटी मोठी दुरुस्ती करावयाची आहे हे काम अतिक्रमणामध्ये येते का?............

या कामांमध्ये अडचणी आणल्या जातात हे कुठ पर्यंत योग्य आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, उल्हासनगर शहरामध्ये जवळ—जवळ ७५ टक्यांपेक्षा जास्त इमारती अनाधिकृत आहेत. अशा प्रकारचे निवेदन यापुर्वी सुध्दा या सभागृहात मी केले आहे. आता २७/४/२००५ च्या उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर शहरामध्ये जर काहीही अनाधिकृत बांधकामे होत असेल त्याची पुर्ण जबाबदारी महानगरपालिका प्रशासनावर ठेवण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेचे क्षेत्र जे आहेत ते झोन्स मध्ये, प्रभागामध्ये विभाजन करावयाचे आहे. त्यानुसाार आम्ही आमचे जे प्रशासकीय विभाग आहेत, ते प्रभाग ४, जे आपले निवडणुक प्रभाग आहेत जसे २५ प्रभागांमध्ये प्रत्येक प्रभागांमध्ये एक या प्रमाणे एक मुकादम ६ कामगार एक कनिष्ठ अभियंता, एक उप—अभियंता, एक प्रभाग अधिकारी, व शहराच्या स्तरावर एक उपायुक्त, व प्रभागाच्या स्तरावर एक प्रभाग अधिकार, म्हणजेच प्रभाग, झोन व शहर स्तरावर एक अतिक्रमण निर्मुलन पथक तयार केले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जेथे कुठे अनाधिकृत रित्या विकास होतो तो विकास मग भलेही तो जुन्या इमारतीच्या दुरुस्तीचा असो, जर जुन्या

इमारतीची दुरुस्ती असेल तर दुरुस्ती सुध्दा विकासाच्या नावावर येते. व जर दुरुस्ती जर आपणांस करावयाची असेल तर परवानगी घेणे आवश्यक आहे. यासाठी ज्या जुन्या इमारती आहेत, अधिकृत इमारती आहेत, त्यांमध्ये दुरुस्तीची परवानगी देणे काही अडचणीचे नाही. जे यु. नं. किंवा ई. नं. आहेत त्यामध्ये सुध्दा किरकोळ दुरुस्तीची परवानगी देण्यास अडचणीचे नाही. ज्या झोपडपट्टया आहेत त्यांमध्ये ज्या संरक्षित झोपडपट्टया आहेत ज्यांना संरक्षित भोगवटादार आम्ही म्हणतो त्यांना दुरुस्ती परवानगी देण्याचे काही अडचणीचे नाही, याशिवाय बाकीची जी अनाधिकृत बांधकामे आहेत, जेथे लोक काही दुरुस्ती करु इच्छितात, तेथे परवानगी दिली जावु शकत नाही. ज्या परिपत्रकाचा उल्लेख श्री. नाना पवार साहेबांनी आपल्या लक्षवेधीमध्ये केला, त्या परिपत्रकानुसार १/१/१९९५ पुर्वीचे जेवढे काही झोपडीधारक आहेत त्यांना परवानगी दयायची आहे. व घराची उंची १४ फुटापर्यंत वाढविण्याबाबतचे जे परिपत्रक आहेत, ते फक्त मुंबई महानगरपालिकेला लागु आहे. बाकी महानगरपालिका क्षेत्रांमध्ये १४ फुटापर्यंत घराची उंची वाढविण्याची तरतुद त्यामध्ये नाही. बाकी महानगरपालिकांबाबतीत १/१/१९९५ पुर्वीचे जर बांधकाम असेल तर त्यास दुरुस्ती परवागनी दयायची तरतुद आहे. दुरुस्ती परवानगी का दयायची आहे कारण की जे झोपडीधारक तेथे राहतात ते अनारोग्य परिस्थितीत राहतात. त्यांना तेथे राहतांना काही अडचणीचे होवु नये, जर फक्त छप्पर गळत असेल, त्यामध्ये ते बदल करु इच्छित असतील तर त्याबाबतीत आमची तेथे काही हरकत नाही. त्यांनी आम्हांस संरक्षीत भोगवटाधारकाचा पुरावा दिल्यानंतर परवानगी देण्याचे आदेश आम्ही निर्गमित केले आहे. परंतु ज्याच्याकडे काहीच पुरावा नाही, त्या व्यक्तीस आम्ही घर दुरुस्ती परवानगी कशी देवु शकतो? एक तर आपणा सर्वांचे हा एक चुकीचा समज आहे, कुणालाही फोटोपास दिलेला नाही, आम्ही संपुर्ण शहराचा सर्व्हे केला व जे पात्र झोपडपट्टीधारक आहेत, त्यांना देण्यासाठी फोटोपास तयार करुन ठेवले आहेत. असे जवळ–जवळ ११ हजार फोटोपास आमच्याकडे तयार होते, परंतु ते फोटोपास सुध्दा काही शुल्क देवुन घ्यायचे होते. ते शुल्क देण्यासाठी लोक पुढे आले नाही. आम्ही असे प्रयत्न केले की, लोकांनी महानगरपालिकेचा टॅक्सही दयावा व फोटोपासचे शुल्कही दयावे. परंतु लक्षात आले की, टॅक्स देण्याची त्या लोकांची ऐपत नाही, आम्ही फक्त त्यांना सांगितले की, शासन परिपत्रकानुसार ३ मे २००४ च्या परिपत्रकानुसार जे शुल्क त्यांनी दयायचे आहे, ते शुल्क त्यांनी कमीत कमी देवुन फोटोपास घेवुन जावे. परंतु अधिकतर लोक पुढे आले नाहीत. माझ्याकडे तक्रार आहे की, आमचे काही कर्मचारी लोकांना तंग करतात. तेव्हा आम्ही असा निर्णय घेतला की, हे सर्व फोटोपास आपल्या नागरीक सुविधा केंद्रातुन वितरीत केले जावेत. जेणेकरुन लोकांना कोणतीही असुविधा होवू नये. परंतु लोकांनी पुढे आले पाहिजे. जर त्यांना घरदुरुस्तीची परवानगी पाहिजे असेल किंवा छप्पर बदली करायचे आहे, किंवा प्लास्टरींग करायचे आहे किंवा लादया बदलायच्या असतील तर त्यांच्याकडे कमीत कमी फोटोपास असणे किंवा १/१/१९९५ पुर्वी पासुन ते तेथे राहतात त्यासाठी रेशनकार्ड किंवा मतदार ओळखपत्र यापैकी काहीना काही पुरावा असणे जरुरीचे आहे. नाहीतर घर दुरुस्तीच्या नावापर्यंत नविन झोपडया येतील. दुरुस्तीच्या नावावर जुन्या झोपडयांचे आर.सी.सी. बांधकामांमध्ये रुपांतर होईल. टियर गर्डर बांधकामांमध्ये रुपांतर होईल व ही सर्व बांधकामे अनाधिकृत बांधकामे म्हणुन संबोधीली जातील. न्यायालयाचे असे सक्त आदेश आहेत की, (नो फर्दर अनऑथराईज डेव्हलोपमेंट शुड टेक प्लेस.) यापुढे कोणतेही अनाधिकृत बांधकाम होता कामा नये. आणि जर का असे झाले तर संबंधीत जे अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. आपणाकडे जे लोक येतात त्यातील बहुतांश लोकांकडे या प्रकारची कागदपत्रे नाहीत. ज्यांना आम्ही कायदेशीर घर दुरुस्तीची परवानगी देवु शकु. आम्ही त्यांना मदत करण्यास तयार आहोत. कायदेशीर परवानगी देण्यास तयार आहोत. परंतु त्या माणसाने फक्त जर एका पानावर अर्ज केला व नंतर तेथे छप्पर बदली करण्याऐवजी ९ फुट उंचीचे झोपडे १४ फुट उंचीचे करेल. आतमध्ये एक पोटमाळा काढेल. किंवा जिथे पत्रे आहेत तेथे तो टियर गर्डर करेल. हे सर्व यापुढे होण्याची संभावना आहे. व गैरवापर होण्याची शक्यता आहे. हे थांबविण्यासाठी आम्ही कठोरात कठोर उपाययोजना केली आहे. शहरामध्ये या अगोदर आर.सी.सी. बांधकामांचे अनाधिकृत बांधकाम होत होते. ते आता बरेचसे कमी झाले आहे. मागील एक महिन्यात आम्ही २८८ बांधकामांची पाहणी केली. त्यामध्ये फक्त १० ते १५ टक्के आर.सी.सी. बांधकामे आढळुन आली. ती सर्व बांधकामे आम्ही निष्कासीत केली. त्यातील फक्त दोन बांधकामे आता फक्त निष्कासीत करण्याची बाकी आहेत. व इतर जी बांधकामे विकसित झाले आहेत ती जादा तर विटकाम केलेली आहेत जी बांधकामे एक दिवसात किंवा २४ तासात केली जावू शकतात. व नंतर सांगु शकतात की, येथे अगोदर जुनी झोपडी होती. तिला फक्त आम्ही प्लास्टर केले आहे. एक जुनी इमारत होती. तिला फक्त प्लॅस्टर केले. तरीही आम्ही त्यास नोटिस बजावली आहे. कारण की, ती पुर्ण इमारत अनाधिकृत होती. येथे आमचा प्रयत्न असा आहे की, लोकांना असुविधा होवु नये. परंतु झोपडपट्टीच्या नावाने जे अनाधिकृतपणे विकास कार्य होईल ते थांबविणे हे आमचे प्रयत्न आहेत. मला आपणांस एक विनंती करायची आहे. ती फक्त कुणी प्लास्टर करत आहे म्हणुन आमचे लोक त्यास तंग

करत नाहीत.  फक्त पत्रे बदलवत आहेत म्हणुन  कोणी त्यास तंग करत नाही.  वॉटर प्रुपींग बाबत फक्त रिपोर्ट झाला त्याच्या पुढे काही झाले नाही.

**मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती रेखा कारीरा या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— अतिक्रमण विभागाने आणिबाणी लावली आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आपण जी परमिशन देत आहात त्यामध्ये नगररचनाकार साहेबांनी लिहिले आहे की, पत्र लावणार नाही, पत्राचे काम करणार नाही अशी त्यामध्ये अट टाकलेली आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):— नाही—नाही आम्ही हे लिहिले आहे की, छप्पर जसे आहे जर छप्पर ए.सी. शीटचे आहे तर त्यांनी ए.सी. शिटच लावले पाहिजे.  त्याचे टियर गर्डर करु नका.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— साहेब, असे सांगा ना?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):— त्यामध्ये लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. आयुक्त साहेब, मी व श्री. राजेंद्र चौधरी आपणाकडे आलो होतो, एक अपंग व्यक्ती जो मिलिटरी मध्ये असतांना त्यास गोळी लागली होती, अशा त्या अपंग व्यक्तीला मी आपणाकडे घेवुन आलो होतो.  त्याचे बांधकाम होते १९८० चे त्याने फक्त २ ब्रॉसचे प्लॉस्टर केले होते. आम्ही दोघे आपणाकडे आल्यानंतर आपण म्हणलात की, काहीही करायचे नाही, त्यास आपण असेच परत पाठविले होते.  ते बांधकाम तोडले जाईल म्हणुन आपण माझ्याकडे येवु नका.

**मा. सदस्या श्रीमती दिपा पंजाबी, श्रीमती भावना रामचंदानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):— जेवढी काही अनाधिकृत विकासकामे होत आहेत, जो माणुस परवानगी घेवुन बांधकाम करेल त्याचेच आम्ही संरक्षण करु.  प्रत्येक व्यक्तीस ज्याला छप्पर बदली करायचे आहे, त्याने ही परवानगी घेतली पाहिजे.  मी आपणांस केस लॉज दाखवेन. त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, दुरुस्ती ही सुध्दा एक विकास काम असुन त्या कामी परवानगी घेणे आवश्यक आहे.  व परवानगी कुणाला दिली जावु शकते हे मी सांगितले आहे.  ज्याच्याकडे अगोदर बांधकाम परवानगी आहे, ज्याच्याकडे यु. नं. आहे, ई. नं. आहे किंवा झोपडपट्टी आहे किंवा संरक्षित भोगवटादार आहे, सरंक्षित भोगवटादारास आम्ही आदेश दिले आहेत.  बाकी लोकांना आम्ही परवानगी देवु शकत नाही.  त्यांच्या अडचणी आम्ही समजवु शकतो त्यांच्या बाबत आम्हांला सहानुभुती आहे.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— साहेब एक मिनिट, जर एखादा व्यक्ती झोपडपट्टीत राहतो त्याच्याकडे फोटोपास आहे, तो जर येथे परवानगीसाठी येत असेल तर त्यांनी किती वेळा आले पाहिजे? एक वेळा, दोन वेळा, तीन वेळा जो व्यक्ती दिवसाला १०० रुपये कमवितो त्याला जर येथे ४—४ वेळा यायला लागले तर त्याच्या घरातील मुल—बाळं काय खातील?  दुसरी गोष्ट अशी की, यु. नं. , शिट नं. सनदची प्रत ज्याच्याकडे आहे, ज्या व्यक्तीने दुरुस्ती परवानगी साठी अर्ज केला आहे, त्यास सांगितले जाते की, मिळकत कर पावतीवर नाव हस्तांतरीत करतांना आर्किटेक्टचे प्रमाणपत्र घेवुन या.  नकाशा घेवुन या.  त्याचा दुरुस्ती परवानगीचा खर्च होतो ५ हजार रुपये व इतर खर्च येतो १० हजार रुपये हा खर्च तो कसा सहन करणार?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आर्किटेक्ट एका साईन करायचे अडीच हजार घेतो.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, आम्ही आर्किटेक्ट कडुन साईड प्लॉन काढुन आणण्यासाठी सागितले नाही, वैयक्तीक प्लॉन काढुन देण्याबाबत आम्ही सांगितले आहे.  आपण जे म्हणत आहात की तो माणुस १० हजार कोठुन आणेन, कसे करेल?  यासाठी आम्ही काही करु शकत नाही. त्यास आम्ही दुरुस्ती परवानगी तर देवु शकत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—दुरुस्ती परवानगी देण्यासाठी निश्चित अशी कालमर्यादा असली पाहिजे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** साहेब, साईड प्लॉन लागतो किंवा नाही याबाबत नगररचनाकारांना आपण विचारा ना? याबाबतचा खुलासा येथेच झाला पाहिजे.

**मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :—** साईड प्लॉन घेत आहेत, किती बाय कितीचे मोजमापे घेत आहेत?

**मा. सदस्या श्रीमती माया मसंद या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—** आयुक्त साहेब, आपण खुपच चांगले विचार करता व चांगले काम करता. परंतु आपले जे कनिष्ठ अधिकारी आहेत त्या अधिका—यांचे मन परिवर्तन करा. आपणांस आम्ही १० वेळा महासभेमध्ये विनंती केली आहे. आपण मनपरिवर्तनाचे क्लासेस उघडा की जेथे त्यांना माहिती दिली जावी की जनतेची कशी सेवा केली जावु शकते? याबाबत मी आपणांस १० वेळा विनंती केलेली आहे. आपण चांगले विचार करता, चांगले काम करता, यासाठी आम्ही आपणांस धन्यवाद देतो. आपण अनाधिकृत बांधकामांना आळा घातला याबाबत आम्ही आपणांस धन्यवाद देतो. परंतु याशिवाय आपले जे अधिकारी आहेत, त्यांनी सुध्दा आपल्या सारखे मन बनविले पाहिजे ना? जनतेला ज्या सुविधा दयायच्या आहेत त्या दिल्या पाहिजेत ना?

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** दर सोमवारी आपण जी सभा घेता त्या सभेमध्ये आपण त्यांना समजावा.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—** साहेब, आम्ही येथे यासाठी निवडुन आलो आहोत, जनतेला ज्या सुविधा मिळल्या पाहिजेत त्या मिळाव्यात म्हणुन महानगरपालिका यासाठी निर्माण झाली आहे. लोकांना नागरी सुविधा मिळाल्याच पाहिजे त्याच्या संघर्षासाठी आम्ही येथे निवडुन आलो आहोत. नियमामध्ये जे बसते त्यानुसार त्यांना दुरुस्ती परवानगी दिली जावी धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :—** आयुक्त साहेब, केवळ राजा युध्द जिंकु शकत नाही. सैनिक जिंकतात म्हणुन सैनिकांना सांगा की लोकांशी चांगल्या पध्दतीने वागा. परवानगी देण्यासाठी त्यांना ५ दिवस, ७ दिवस अशी काहीतरी वेळ मर्यादा निश्चित करुन दया. याबाबत त्यांना काहीतरी निर्देश दया. श्री. सतरामदास जेसवानी हे दुरुस्ती परवानगीसाठी एक महिनाभर फे—या मारत होते. त्या दिवशी संध्याकाळी त्यांनी नगररचना विभागामध्ये आरडा—ओरड केली त्यावेळी त्यांची संचिका शोधण्यात आली. ती शोधण्यासाठी अर्धा—एक तास लागला. यासाठी आपण आपल्या अधिका—यांना सांगावे की, दुरुस्ती परवानगी ७ दिवसात, १५ दिवसात किंवा १ महिन्यात केव्हा देणार? ती कालमर्यादा निश्चित करावी याबाबत निर्देश दया.

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—** परवानगी मिळाली आहे. निसर्गाने त्यास परवानगी दिली आहे त्याची भिंत पाडली आहे. सर्वांनी विनंती केली, आपणाकडे दुरध्वनी केले. महानगरपालिकेकडुन परवानगी मिळाली. तरीसुध्दा अधिका—यांना पैसा पाहिजे? तरी सुध्दा आज अधिकारी लोक त्याच्याकडे गेले. श्री. किशोर वनवारी यांना विचारा. श्री. सेवकानी हे तेथे गेले होते. कश्यासाठी गेले होते? काय आवश्यकता आहे? त्यास माहिती नाही की आपल्या महानगरपालिकेकडुन त्याने परवानगी घेतली आहे. खरच त्याच्या घराची भिंत पडली आहे याबाबत भाभी श्रीम. ज्योती कालानी यांनी त्यांच्या अर्जावर शेरा मारला आहे. ज्या कुणाच्या घराची भिंत पावसाने किंवा वादळी वा—याने पडते, अशा व्यक्तीस तात्काळ दुरुस्तीची परवानगी दिली पाहिजे. त्यास तर परवानगीची आवश्यकताच नसली पाहिजे. अशा परिस्थितीस शासन त्यास अर्थसहाय करते. महानगरपालिकेने त्यास घर दुरुस्तीची परवानगी दिली पाहिजे. आमचे लोक आपणाकडुन मदतीची तर अपेक्षा करत नाहीत परंतु त्यांचे जे झोपडे पावसामध्ये पडले आहे, त्यांच्यावर निसर्गाचा जो कोप झाला आहे, त्या परिस्थितीत त्यांना घर दुरुस्तीची परवानगी तर दया ना. भाभी ज्योती कालानी यांनी अर्जावर शेरा मारला, आपण म्हणलात की, परवानगी देण्यासाठी सांगतो. फक्त पुरावा देण्यास सांगा. आज श्री. शेवकानी तेथे गेला होता, कश्यासाठी श्री. सेवकानी तेथे गेला होता? श्री. शेवकानी महात्मा गांधी आहे? करा त्यास निलंबीत, श्री. किशोर वनवारी यांना विचारा की, परवानगी मिळाली आहे किंवा नाही? नगररचनाकारांकडुन परवानगी घेतली आहे किंवा नाही? श्री. विनोद ठाकुर यांना विचारा, हा काय प्रकार आहे? आयुक्त साहेब आपण चांगले आहात, बाकी लोकांना पण आपण चांगले करा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> कनिष्ठ अभियंत्याचे काम आहे. जागेवर जावुन पहाणी करायची. नकाशाप्रमाणे बांधकाम चालु आहे किंवा नाही? ते त्याचे काम आहे. परंतु जेव्हा त्यास आम्ही समजावले की परवानगी घेतलेली आहे तेव्हा तो तेथुन निघुन गेला.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u> श्री. किशोर लालजी, त्यास या सर्व गोष्टीची माहिती आहे की, निसर्गानेच त्यांच्या घराची भिंत पाडली आहे. त्या नंतरही शेवकानी तेथे जातो कश्यासाठी?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> जागेवर जावुन पाहणी करणे हे तर कनिष्ठ अभियंत्याचे काम आहे.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u> प्रभाग अधिका—याने अहवाल दिला आहे. पोलिसांनी अहवाल दिला आहे की, ती भिंत पडली आहे. यास्तव मेहरबानी करुन श्री. शेवकानी यांना निलंबीत करा अशी माझी आपणाकडे मागणी आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> आयुक्त साहेब, आपण यु.नं. , ई. नं. तसेच झोपडपट्टी बाबत आपण बोललात परंतु ब्लॉक मध्ये दुरुस्ती परवानगीची जेव्हा आम्ही मागणी करतो, त्यावेळेस आपण म्हणता की, अगोदरची परवानगी दाखवा. मी १९५३—५४ मध्ये ब्लॉक घेतला आहे. तो मी विकसीत केला आहे. आता त्याची दुरुस्ती परवानगी मागत आहे तर म्हणता की, अगोदरची परवानगी दाखवा. त्या जागेची आमच्याकडे सनद आहे. २५० वाराची जागा आहे, आम्हांला त्या बांधकामामध्ये काही बदल करायचे आहे त्यासाठी आम्ही परवानगी मागत आहोत तर आम्हांला सांगितले जाते की, अगोदरची परवानगी दाखवा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, संपुर्ण सभागृहाची या लक्षवेधीबाबत एकच सुचना आहे. निसर्ग आहे, निसर्गक्रमानुसार पाऊस पडणार, पावसाचे दिवस आहेत, मध्यंतरी वादळ झाले, उल्हासनगरमध्ये त्यादिवशी जवळपास ५५ झाडे पडली. त्यातील काही झाडे एम.एस.ई.बी. च्या पोलवर, तारांवर पडली तर काही झाडे घरांवर पडली. त्यामध्ये काही जिवितहानी झाली, काही वित्तहानी झाली. त्यांना तुम्ही घर दुरुस्ती परवानगी देणार, ती परवानगी देतांना ती लगेच कशी मिळेल याची व्यवस्था करा. आणि तुम्ही या सर्व ज्या अटी शर्ती सांगितल्या आहेत, यं. नं. ई. नं. सनद व ९५ पुर्वीचा काही पुरावा ज्या अधिकृत झोपडपट्टया आहेत, त्यांनाच परवानगी देणार का? ९५ पुर्वीच्या घोषित आणि अघोषित अशा दोन्ही प्रकारच्या झोपडपट्टयांवर तुम्हांला परवानगी दयावीच लागेल. म्हणजेच ९५ पुर्वीच्या त्या ज्या घोषित, अघोषित झोपडपट्टया आहेत, त्यामधील लोकांनी दुरुस्तीसाठी परवानगी मागीतल्यानंतर लवकरात लवकर त्यांना परवानगी कशी देता येईल तशी व्यवस्था तुम्ही करावी. एवढी एकच आणि समर्पक आणि माफक मागणी संपुर्ण सभागृहाची आहे. सभागृहाची मागणी तुम्ही मान्य करावी, ती करावीच लागेल. अनाधिकृत बांधकाम करण्यासाठी आम्ही प्रोत्साहन देत नाहीत. परंतु लोकांना राहण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, हे त्याचे एक आहे. पावसाळयामध्ये पाऊस झेलत तुम्ही झोपा किंवा रहा ते तुम्ही आणि आम्ही सुध्दा सुचविणार नाही. त्यादिवशी पटेल नावाचा एक गृहस्थ आला होता सुभाष टेकडीला त्याचे घर कच्चे होते ते त्याने कसे—बसे उभे केले. बायको आणि मुले काम करत असतांना भर पावसातच त्यांनी ते उभे केले. अगोदर निसर्गाचा कोप व नंतर महापालिकेचा कोप. खरी वस्तुस्थिती काय आहे? अतिक्रमण होवू देवु नका. लोकांना जे आवश्यक आहे त्याची शहनिशा करा. त्याची शहानिशा केल्याशिवाय लोकांना सारख्या चक्रा मारायला लावु नका एवढी माझी माफक अपेक्षा आहे.

**मा. सदस्या श्रीमती रेखा कृष्णानी, श्रीमती कोमल बठिजा या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> सदस्यांच्या भावना जर बघितल्या, तर मला एक निश्चित असे वाटते भारतामध्ये बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटना बनविली, त्यामध्ये ज्या मुलभुत समस्या होत्या, जे मुलभुत हक्क होते, ते मिळालेच पाहिजे. परंतु आज या शहरामधील संपुर्ण वातावरण बघितले, शहरातील संपुर्ण झोपडपट्टयांमधील वातावरण बघितले तर एक चित्र स्पष्ट होते. ती येथे ८५५ बांधकामांबाबतचा मुंबई उच्च न्यायालयाचा जो निर्णय आहे त्या निर्णयाचा गैर उपयोग करुन गोर—गरीबांवर येथे दडपशाही चाललेली आहे, हुकुमशाही चाललेली आहे. प्रशासन हे हुकुमशाही करते, दडपशाही करते. गोर—गरीबांना उल्हासनगरमधुन बाहेर काढण्याचा कट शिजत चालला आहे असे मला निश्चित वाटते आणि मी आयुक्तांना याबाबतीत पुन्हा एकदा सांगेन की, तुम्ही चळवळीतील आहात. तुम्हांला आंबेडकर चळवळ चांगली माहित आहे. आणि

तुम्हांला गोर–गरीबांच्या भावनाही चांगल्या माहिती आहेत. त्यांचे राहणीमान माहिती आहे. ते कश्या पध्दतीने राहतात ते माहिती आहे हा सर्व विचार करुन जर प्रशासनाने योग्य निर्णय घेतला तर जास्त बरे होईल. प्रशासनाने आज जी दडपशाही चालविलेली आहे, प्रशासनाने आज जी दहशत तयार केलेली आहे, ती या उल्हासनगर शहरामधुन नाहीशी करण्याचे काम आमच्या महापौर महोदया, आमचे आमदार साहेब करतील अशी मला खात्री वाटते.

मा. सदस्य श्री. नाना पवार :–मा. महापौर महोदया, आयुक्त साहेबांनी या परिपत्रकातील एक मुद्दा तपासुन घ्यावा अशी माझी विंनती आहे. आपणांला काही शंका असतील तर त्या बाबतीत भलेही शासनाकडुन तपासुन घ्याव्यात. मुद्दा असा आहे की, पात्र झोपडींची उंची १४ फुटापर्यंत वाढविण्यास परवानगी देण्याचे अधिकारी संबंधीत महानगरपालिका, नगरपालिका परिषद यांचे राहतील. अशा पध्दतीचे या ठिकाणी वाक्य आहे. परिषद म्हणजेच नगरपालिकेला जर अधिकार असतील आपली तर महानगरपालिका आहे, तर हा मुद्दा आपण तपासुन घ्यावा.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– आयुक्त साहेब, ही परवानगी त्यांना किती दिवसात देणार? याची जरा समय सिमा निश्चित करावी. लवकरात लवकर म्हणजेच जास्तीत जास्त किती लवकर आणि दुसरे एक महत्वाचे जे याच्याशी संबंधीत आहेत, उल्हासनगर नगरपालिकेचे विकास नियंत्रण नियमावलीचे नियम येथे आलेले आहेत. परंतु त्याबाबत आम्हां कुणालाही माहिती दिलेली नाही. ९ तारखेपर्यंत बघायचे आहे. ते बघुन होणार नाही. २४० पानांचे ते नियम आहेत. पाहण्यासाठी जी वेळ ठेवली आहे तीची मुदतवाढ व्हावी.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– विक्रीसाठी सुध्दा तुम्ही येथे ठेवलेले नाहीत. तर मग लोक येथे येवुन २४० पान वाचणार काय? त्यावर काय सुचना, हरकत घेणार?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–मा. महापौर महोदया, विकास नियंत्रण नियमावलीचे नियम सुचना–हरकती मागविण्यासाठी जे प्रसिध्द केले आहे, त्यासाठी कायदयात वेळेची जी ३० दिवसाची मर्यादा निश्चित करुन दिलेली आहे त्याप्रमाणे तेवढीच मुदत आम्ही दिलेली आहे. ती आम्ही वाढवु शकत नाही. कारण कायदयामध्येच तशी तरतुद आहे. दुसरे असे की, संपुर्ण सभागृहामध्ये जी चर्चा होत आहे, कोणी म्हणत आहे दडपशाही, कुणी म्हणत आहे हुकुमशाही, माझ्या लक्षात येत नाही, आपण जी मागणी करत आहात ती बरोबर आहे की, चुकीची आहे हे कोणी पाहत नाही. आपणांस वाटते की, आपला मतदार जसा आपणाकडे येईल जी काही कागदपत्रे घेवुन येईल, ती पाहील्याविना आम्ही परवानगी दिली पाहिजे व ते जे काही करु इच्छित आहेत, ते झोपडीच्या नावावर टियर गर्डर बांधकाम करु इच्छितात. तरीसुध्दा परवानगी दिली पाहिजे. प्लॉस्टरच्या नावाने ते जर पुर्ण नविन इमारत बांधु इच्छित असतील तरीसुध्दा परवानगी दिली पाहिजे. हे होणार नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की, मी जेवढी काही लिबरल भुमिका घेतली आहे, उच्च न्यायालयाचे एवढे सक्त आदेश असतांनाही पावसाळयात घरावर झाड पडल्यामुळे घर दुरुस्तीसाठी आम्ही परवानगी दिली आहे. पावसाळयामुळे किंवा पुरामुळे एखादी भिंत किंवा इमारत पडली असेल तर तीची दुरुस्ती करण्यासाठी आम्ही परवानगी दिली आहे. येथे लोक अश्या–अश्या सबबी घेवुन येतात की, ३ रिश्टर स्केलचा भुकंप झाला तरी म्हणतात की, आमचे घर पडले आम्हांला दुरुस्तीची परवानगी दया. म्हणजेच काही तरी सबब सांगणार, घर पडले नसेल तरी पाडणार आणि नव्याने बांधणार. मी यावर जास्त बोलू इच्छित नव्हतो. यामध्ये जेवढे काही वास्तव व कायदेशीर रस्ते आहेत ते रस्ते काढुन आम्ही ८ दिवसापुर्वी जनता दरबार झाला होता त्या जनता दरबारामध्ये आम्ही लोकांना आश्वासन दिले होते की, आपला पुर्ण अर्ज आल्यानंतर ८ दिवसामध्ये आम्ही परवानगी दिली. यापेक्षा अधिक वेगाने आम्ही काम करु शकणार नाहीत असे मला वाटते. अर्ज आल्यानंतर त्याची पडताळणी होणे जरुरीचे आहे. त्या बांधकामाची काय स्थिती आहे ती पाहणे जरुरीचे आहे व नंतर त्यास परवानगी दयायची आहे. फक्त अर्ज येईल आम्ही येथे बसुन परवानगी देवु. येथे अशीही परवानगी दिली आहे, फक्त घर दुरुस्तीची परवानगी व जागेवर इमारत उभी झाली आहे. माझ्याकडे अशी बरीच उदाहरणे आहेत. हे मी करु इच्छित नाही. या शहरामध्ये चुकीचे काम होवू नये यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत व आपले सहकार्य येथे जरुरीचे आहे.

मा. सचिव :–ठिक आहे?

**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—** विषयावरील कामकाज चालु करण्याअगोदर मा. महापौरांना माझी अशी विनंती आहे की, आपल्या महानगरपालिकेमध्ये बरीचशी दालने तयार झाली आहेत, आयुक्तांचे दालन आहे, महापौरांचे दालन तयार होत आहे, आपल्या शासन व प्रशासनाचा जो चौथा स्तंभ समजला जातो तो पत्रकाराचा तर आजच्या घडीला या महानगरपालिकेमध्ये बाहेरचा कुठलाही माणुस, जर बाहेरचा अति महत्वाचा कुणी व्यक्ती येथे आला, आणि तो जर पत्रकार कक्षामध्ये गेला, तर आपल्या पुर्ण महानगरपालिकेची इमेज, किंवा त्या शहराची इमेज त्या पत्रकार कक्षावरुन दिसून येते. मी आपणांस विनंती करेन की, लवकरात लवकर पत्रकार कक्ष अत्याधुनिक केला जावा.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—**मा. महापौरजी, माझा एक हरकतीचा मुद्दा आहे. सर्वसाधारणपणे आयुक्त आपले अधिकारांचा वापर करतात. कुण्या अधिका—याची बदली करणे किंवा त्यास अतिरिक्त कार्यभार सोपविणे किंवा त्याच्याकडुन एखादा पदभार काढुन घेणे यामध्ये सर्वसाधारणपणे आम्ही कधी हस्तक्षेप करत नाहीत. सभागृहात आम्ही असे समजतो की, हा आयुक्त साहेबांचा अधिकार आहे. परंतु काही दिवसापासुन १५—२० दिवसापासुन शहरामध्ये व वर्तमानपत्रामध्ये एक चर्चा चालु आहे की, आताचे जे सचिव आहेत, त्यांच्याकडे विधी विभागाचा कार्यभार होता, तो स्थानिक आमदारांच्या दबावामुळे त्यांच्याकडुन काढुन घेवुन तो दुसरा कुणाला दिला आहे, याबाबतची चर्चा न केवळ लोकांमध्ये आहे तर ब—याचशा वर्तमानपत्रांमध्ये सुध्दा आहे. व शहरासाठी व प्रशासनासाठी ही एक चुकीची प्रथा होईल. कुणाच्या दबावाखाली एखादयाची बदली करणे किंवा त्याच्याकडील कार्यभार काढुन घेणे यासाठी मला असे वाटते की, हा सुध्दा एक गंभीर असा मुद्दा आहे. त्यावर आयुक्त साहेबांनी खुलासा केला तर योग्य होईल.

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—** मा. महापौर महोदया, तसे तर हा विषय हरकतीचा मूद्दा होवू शकत नाही. माझे मित्र भाजपाचे नव्यानेच जिल्हाध्यक्ष झाले आहेत. व कायदयाविषयी अधिकाधिक माहिती ठेवणारे आहेत यामुळेच मी जाणीवपुर्वक या बाबतचे उत्तर देवु इच्छितो.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** आपणाकडुन आम्हांला उत्तर नको आहे आपण ज्या पध्दतीने बोलत आहात त्या पध्दतीचे उत्तर आम्हांला नको आहे. हरकतीच्या मुद्दयावर तुम्हांला उत्तर दयायचे नाही ना?

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—**हरकतीचा मुद्दा होवू शकत नाही.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—** आपण जे बोलत आहात ते चुकीचे बोलत आहात. असे आहे तसे आहे.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** कॉमेन्टस् करण्याची (भाष्य करण्याची) आपली पध्दत चुकीची आहे.

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—**मी बिल्कुल कॉमेंन्टस् (भाष्य) करत नाही.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** जे की फार हुशार आहेत वगैरे जे म्हणता.

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—** कायदयाची ते माहिती ठेवतात. त्यामुळे मी याबाबत माहिती देवु इच्छितो, व हे खरे आहे की कायदयाची माहिती ते ठेवतात. मी बिल्कुल सर्वसाधारण आवाजात (लाईट टोनमध्ये) त्यांना म्हटले आहे. कारण की, याबाबत त्यांना माझ्या दालनामध्ये उत्तर दिलेले आहे. दुसरे म्हणजे हा हरकतीच्या मुद्दयाचा विषय नाही. हे सभागृहासमोर ठेवणे माझे कर्तव्य आहे.

**मा. महापौर:—** साहेब, ठिक आहे, उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

**मा. सचिव:—**विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. २:—**मागील सभेचे दिनांक २०.५.२००५ रोजीच्या विशेष व सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, पुष्ठ क्र. १९ वर जो ठराव आला आहे, ३५ लोकांची जी आम्ही समिती तयार केली होती, त्यामध्ये सर्व पक्ष व्यापारी मंडळी, पत्रकार यांचा समावेश आहे. या समितीच्या सदस्यांच्या यादीमध्ये आम्ही एक दुरुस्ती करु इच्छितो. त्यावेळेस श्री. राजेंद्रसिंह भुल्लर विरोध पक्ष नेता, त्यांच्या जागी आता आमचे श्री. बोडारे साहेब, विरोधी पक्ष नेता आहे. त्याचबरोबर गटनेता म्हणुन श्री. लाल पंजाबी यांचे नाव लिहिले होते. आमचे श्री. जमनादास पुरस्वानी हे आता भाजपाचे गटनेते आहेत, भलेही श्री. लाल पंजाबी यांचे नाव सदस्य म्हणुन राहीले तरी चालेल. ठरावामध्ये ३५ लोकांच्या समितीमध्ये आणखी ५–६ नावे मी समाविष्ट करु इच्छितो. ही नावे जर आपण समाविष्ट करु शकत असु तर समाविष्ट केली जावी नाही तर या लोकांना विशेष निमंत्रित म्हणुन बोलविले जावे. नंतर आम्ही ठरावामध्ये बदल करु शकतो. ही जी नावे आहेत ती याप्रमाणे आहेत.

१. श्री. बच्चाराम रुपचंदानी
२. श्री. सच्चानंद गोपलानी (व्यापारी महामंडळाचे)
३. श्री. नानीकराम सिंधवानी
४. श्री. चंद्रकांत बोडारे
५. श्री. सुरेंद्र सावंत (शिवसेना शहर प्रमुख) यांची नावे ठरावामध्ये समाविष्ट केली जावीत. किंवा जोपर्यंत आम्ही त्या ठरावामध्ये दुरुस्ती करत नाही तोपर्यंत यांना विशेष निमंत्रित म्हणुन बोलाविले जावे व श्री. जमनादास पुरस्वानी हे गटनेता झाले आहेत यापुढे गटनेत्याचे पत्र त्यांना जायला पाहिजे. व श्री. राजेंद्रसिंह

भुल्लर व श्री. लाल पंजाबी हे या समितीमध्ये आहेत त्यांची नावे भलेही या समितीत असु दिली जावीत. परंतु श्री. बोडारे साहेब हे आता विरोधी पक्ष नेता असल्याने त्यांचे नाव समाविष्ट करुन श्री. लाल पंजाबी व श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचे नाव या समितीमध्ये सदस्य म्हणुन समाविष्ट केले जावे. धन्यवाद.

<u>मा. सचिव :–</u> या लोकांना विशेष निमंत्रित म्हणुन आपण बोलावणार ना? नंतर दुरुस्ती कराल? इतिवृत्त कायम?

<u>मा. महापौर :–</u>मागील सभेचे दिनांक २०.५.२००५ रोजीच्या विशेष व सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यात येत आहे.

**विषय क्र. २:–**मागील सभेचे दिनांक २०.५.२००५ रोजीच्या विशेष व सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>मा. सचिव :–</u>या महानगरपालिकेत नगररचनाकारांची नियुक्ती केली आहे, प्रतिनियुक्तीवर आले आहेत त्यांचे नाव आहे श्री. अ.पा. गुरगुळे साहेब, ते स्वतः आपली आपणासर्वांना ओळख करुन देतील.

<u>नगररचनाकार (श्री. अ.पां. गुरगुळे):–</u> मा. महापौर, मा. सर्व सदस्य व अधिकारी गण, मी अ. पां. गुरगुळे, नगररचनाकार, कोकण भवन येथुन आताआताच माझी येथे नियुक्ती झाली आहे. आता एक महिना झाला आहे, मी काम चालु केले आहे. एवढीच माझी ओळख पुरेशी आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–</u> मा. महापौरजी, सभागृहाच्या वतीने आम्ही यांचे हार्दिक अभिनंदन करतो. त्याच बरोबर यांना व सर्व अधिका–यांना विनंती करतो की, नागरीकांच्या कामासाठी आपण वेळ निश्चित करुन दया. कारण की, आपण पुर्ण वेळ सुनावणीमध्ये व्यस्त असतात. व आयुक्त साहेबांनी आपणांस आता ज्या–ज्या गोष्टी सांगितल्या, फक्त दुरुस्ती परवानगीबाबत तो मुद्दा लिहून घेवुन याबाबत जरा सहानुभुतीपुर्वक विचार करावा.

<u>मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u> नावासारखे काम करतील.

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.

**विषय क्र. ३ :—** कर्मचा—यांना गणवेश वाटप करण्याकामी या शिर्षाखालील अनुदानातुन रक्कम नविन जेस्टेटनर कॉपी प्रिंटर खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वर्ग करण्याकामी स्थायी समितीचा दिनांक ३०/५/२००५ रोजीचा ठराव क्र. ८ कायम करणे.

काही सदस्य :— पास—पास.............

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावनाः—

**विषय क्र. ३ :—** कर्मचा—यांना गणवेश वाटप करण्याकामी या शिर्षाखालील अनुदानातुन रक्कम नविन जेस्टेटनर कॉपी प्रिंटर खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदानात वर्ग करण्याकामी स्थायी समितीचा दिनांक ३०/५/२००५ रोजीचा ठराव क्र. ८ कायम करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेने आपले नागरी प्रशासन अधिकाधिक तत्पर व गतिमान बनविण्याचा निर्णय घेतला असून त्याचाच एक भाग म्हणून सचिव कार्यालयासाठी आय. एस. ओ. ९००१ —२००० प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून या कामीचे व्यवस्थापकिय आढावा समिती बैठकी मध्ये एक नविन जॅस्टेटर्नर प्रिंटर खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने मेसर्स जेस्टेटनर इंडिया लिमिटेड मुंबई —०२८ या कंपनीकडुन जेस्टेटनर कॉपी प्रिंटर (मॉडेल ५३०८) चे दरपत्रक प्राप्त झाले असून या मशिनची किंमत ४,३०,०००/— अधिक १० टक्के सेल्स टॅक्स रक्कम रुपये ४३००० /— अशी एकुण किंमत रुपये ४,७३,०००/— ( जकात व मुल्यवर्धीत करापोटी होणारी वाढ वगळून) असून महापालिकेकडे असलेले जुने प्रिंटर (मॉडेल ५३२३) कंपनीस परत केल्यास त्यापोटी महापालिकेस मिळणारे रुपये ६०,०००/— वजा जाता नविन जेस्टनर प्रिंटर खरेदीसाठी महापालिकेंस रुपये ४,१३,०००/— (+ मुल्यवर्धीत कर) जेस्टनर कंपनीस अदा करावे लागतील.

परंतु वरील झेरॉक्स मशिन खरेदी करण्याकरीता महानगरपालिकेच्या सन २००५ —२००६ चे अर्थसंकल्पात अ—३ (प्प्) या लेखा शिर्षात फक्त रुपय २,००,०००/— रक्कमेची तरतुद असून नविन जेस्टनर प्रिंटर खरेदीसाठी ही रक्कम पुरेशी नसल्याने या खर्चा कामी अब. अ २ (VIII) कर्मचा—यांना गणवेश , रेनकोट , चप्पल, छत्री इत्यादी साहित्य पुरविणे. या लेखा शिर्षाखाली असलेल्या तरतूद ६५ लक्ष मधून रुपये ५,००,०००/— इतकी तरतूद नविन जेस्टनर प्रिंटर खरेदीसाठी वर्ग करावी लागेल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ मधील २ नुसार कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानाच्या शिर्षातुन दुस—या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या शिर्षात बदली करण्याची तरतुद आहे. त्यानुसार सदर रक्कम एका लेखा शिर्षातुन दुस—या लेखा शिर्षात बदली करण्यासाठी महासभेच्या शिफारस करण्यासाठी स्थायी समितीपुढे ठेवण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८ दिनांकः—३०/५/२००५

सुचकाचे नाव :— श्री. वाघे शामु

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती संगिता जावळे

ही स्थायी समिती महासभेच्या मंजूरी अधिन राहून कर्मचा—यांना गणवेश वाटप करणेकामी या शिर्षाखालील अनुदानातून रु.५ लाखाची तरतूद नवीन जेस्टेटनर कॉपी प्रिन्टर खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदानात बदल करण्यास महासभेस शिफारस करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र:— २३ दिनांक:—६/७/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार ''महापालिका कर्मचा—यांना गणवेश वाटप करणे'' या लेखाशिर्षाखालील अनुदानातुन नवीन जेस्टेटपर कॉपी प्रिंटर मशिन खरेदी करण्यासाठी योग्य त्या अर्थसंकल्पीय अनुदानात बदल करणेकामी केलेला स्थायी समिती ठराव क्र. ८, दिनांक ३०/५/२००५ कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

**मा. सदस्या श्रीमती भारती छाब्रिया या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**विषय क्र. ४** :— शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन महापालिका आस्थापनेवर पर्यावरण संवर्धन अधिकारी या पद निर्मितीस मान्यता देणे व शासन मंजूरी प्रलंबित असे पर्यंत एका वर्षासाठी करार तत्वावर रुपये १०,०००/— इतक्या ठोक वेतनावर योग्य अधिका—याच्या नेमणुकीस मान्यता देणे कामीचा स्थायी समितीचा दिनांक ३०.५.२००५ रोजीचा ठराव क्र. ९ कायम करणे.

काही सदस्य :— पास—पास..................

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

**मा. सदस्या श्रीमती प्रेमा खांडेकर, श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

प्रस्तावना:—

**विषय क्र. ४ :—** शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन महापालिका आस्थापनेवर पर्यावरण संवर्धन अधिकारी या पद निर्मितीस मान्यता देणे व शासन मंजूरी प्रलंबित असे पर्यंत एका वर्षासाठी करार तत्वावर रुपये १०,०००/— इतक्या ठोक वेतनावर योग्य अधिका—याच्या नेमणुकीस मान्यता देणे कामीचा स्थायी समितीचा दिनांक ३०.५.२००५ रोजीचा ठराव क्र. ९ कायम करणे.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एकूण ९२ संवर्ग आहेत. परंतु, पर्यावरण संवर्धन अधिकारी हे पद मंजुर नाही वा तसे पद शासनाकडे मंजूरीसाठी प्रस्तावित केलेले नाही. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरण विषयक अहवाल तयार करण्यासाठी व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे यासाठी दिनांक १८ जून, २००४ पासून समन्वयक म्हणून श्री. मोहन एस. चिजवानी, सेवानिवृत्त शहर अभियंता यांची ०६ महिन्यांकरीता नियुक्ती करण्यात आली होती. परंतु, प्रशासकिय कारणास्तव सदर पद पुढे चालू ठेवता येत नसल्यामुळे सदर पदाची सेवा संपृष्टात आणण्यात आली आहे.

सध्या महापालिकेच्या वेगवेगळया विभागांतर्गत पर्यावरणविषयक संबंधित पुढील कामे पाहण्यासाठी पर्यावरणविषयक माहिती असलेला अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे.

पर्यावरण विषयक बाबी.
घनकचरा व्यवस्थापन विषयक बाबी (म्युनिसिपल सॉलिड वेस्ट)
बायोमेडिकल वेस्ट / प्लॅस्टिक वेस्ट
घरगुती सांडपाण्याचे शुध्दीकरण
वालधुनी नाल्याचे शुध्दीकरण
वायु प्रदुषण

सध्या महापालिकेची लोकसंख्या अंदाजे ६ लक्षपेक्षा अधिक आहे. शहरातील दररोज निघणारा २७० टन घनकचरा उचलणे व त्यावर वैज्ञानिकरित्या प्रक्रिया करणे, शहरातील प्लॅस्टीकची योग्य रितीने विल्हेवाट लावणे, सांडपाण्याचे शुध्दीकरण करणे, शहरातील वस्तीच्या ठिकाणचे, औद्योगिक क्षेत्रातील हवेचे नमुने घेणे त्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये पर्यावरण कक्ष निर्माण करण्यात आला आहे. परंतु सदर कामासाठी पर्यावरणविषयक ज्ञान असलेल्या अधिका—याचे पद मंजुर नसल्यामुळे पर्यावरणविषयक अधिका—याची नियुक्ती करता येत नाही. त्यासाठी प्रथम श्रेणीतील पद निर्माण करणे आवश्यक आहे.

ही बाब विचारात घेऊन रुपये ८०००—२७५—१३५०० या वेतनश्रेणीतील उप अभियंता संवर्गातील मंजूर रिक्त पदांपैकी एक पद व्यपगत करुन पर्यावरण संवर्धन अधिकारी या पदनामाचे पद महापालिकेच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात यावे. सदर पद एकाकी असल्यामुळे सरळसेवेने भरण्यात यावे. सदर पदासाठी शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे ठेवण्यात यावी.

मान्यताप्राप्त विद्यापिठाची बी.एस्सी. पर्यावरण विषयासह पदव्युत्तर पदवी किंवा बी.ई. पर्यावरण पदवी परिक्षा उत्तीर्ण. पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य.

शासकीय / निमशासकीय कार्यालयातील पर्यावरणविषयक कामाचा ०३ वर्षाचा अनुभव.

महापालिका सेवेत काम करीत असलेल्या कर्मचा—याव्यक्तीरिक्त अन्य उमेदवाराचे वय ४० पेक्षा अधिक असू नये.

सदर पदाची महापालिकेला आवश्यकता असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५१ खाली असलेल्या तरतुदीनुसार 'पर्यावरण संवर्धन अधिकारी' या पदनामाचे पद निर्माण करण्यात यावे. सदर पद निर्मितीस शासनाची मंजुरी मिळण्यास काही कालावधी लागणार असल्याने व सदर पदाची आवश्यकता विचारात घेता सदर पद ०१ वर्षासाठी करार तत्वावर रुपये १००००/— इतक्या ठोक वेतनावर भरण्यात यावे. या प्रस्तावास स्थायी समितीने महासभेस शिफारस करण्यासाठी स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात यावे.

स्थायी समिती ठराव क्र. ९ — दिनांकः—३०/५/२००५

सुचकाचे नाव :— श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुरेश गायकवाड

ही स्थायी समिती महापालिकेच्या व शासनाच्या मंजूरीच्या अधिन राहून महापालिका अस्थापनेवर पर्यावरण संवर्धन अधिकारी या पद निर्मीतीस मान्यता देत आहे. व शासन मंजूरी प्रलंबित रु. १०,०००/—दर महा इतक्या ठोक पगारावर योग्य व्यक्तीच्या नेमणूकीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र:—</u> २४ <u>दिनांक:—६/७/२००५.</u>

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महापालिकेच्या आस्थापनेवर ''पर्यावरण संवर्धन अधिकारी'' या पदाच्या निर्मितीस मंजुरी देणेकामी व शासन मंजुरी प्रलंबित असेपर्यंत एक वर्षासाठी करार तत्वावर रु १०,००००/— एवढया ठोक पगारावर योग्य अधिका—याची नेमणुक करणेकामी केलेला स्थायी समिती ठराव क्र. ९, दिनांक ३०/५/२००५ कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.** ५ :— श्रीमती मनिषा अर्जुन धरमपाल, अधिक्षक, कर विभाग यांना मंजुर केलेल्या ७४ दिवसांची अर्जित रजा, १८९ दिवसांची परावर्तीत रजा व ५४१ दिवसांची असाधारण (विना वेतन) रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास...........

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना:—

**विषय क्र.** ५ :— श्रीमती मनिषा अर्जुन धरमपाल, अधिक्षक, कर विभाग यांना मंजुर केलेल्या ७४ दिवसांची अर्जित रजा, १८९ दिवसांची परावर्तीत रजा व ५४१ दिवसांची असाधारण (विना वेतन) रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

श्रीमती मनिषा अर्जुन धरमपाल, अधिक्षक, कर विभाग यांनी दिनांक २/४/२००५ च्या अर्जान्वये दिनांक १६/५/२००५ ते दिनांक १५/५/२००७ पर्यंतची दोन वर्षाची तसेच दिनांक २४/१/२००४ ते ६/४/२००४ पर्यंतची ७४ दिवसांची रजा मंजुरीसाठी विनंती केली आहे.

त्यांचे सेवा पुस्तक तपासले असता त्यांचे रजा खाती ७४ दिवस अर्जीत रजा व १८९ दिवस परावर्तीत रजा शिल्लक असल्याकारणाने त्यांना दिनांक २४/१/२००४ ते ६/४/२००४ पर्यंतची ७४ दिवसांची अर्जीत रजा, दिनांक १६/५/२००५ ते २०/११/२००५ पर्यंतची १८९ दिवसांची परावर्तीत रजा, ५४१ दिवसांची असाधारण (विना वेतन) रजा जा.क्र./उमपा/साप्रवि/आस्था/टे—१२/२१२/२५०, दिनांक ५/५/२००५ अन्वये मंजुर करण्यात आलेली आहे.

सदर कर्मचारी श्रीमती मनिषा अर्जुन धरमपाल, अधिक्षक, कर विभाग हया स्थायी कर्मचारी असून त्यांची महापालिकेतील आतापर्यंत सेवा ३१ वर्षे ११ महिने इतकी झाली आहे. त्यामुळे त्यांना वरीलप्रमाणे अर्जीत, परावर्तीत रजा व असाधारण रजा मंजूर केली आहे. सदर रजा मंजुरीचा प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी महासभेपूढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:— २५** दिनांक:—६/७/२००५.

सुचकाचे नाव :—श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :—श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती मनिषा अर्जुन धरमपाल, अधिक्षक, कर विभाग यांना मंजुर केलेल्या ७४ दिवसांच्या अर्जित रजेस, १८९ दिवसांच्या परावर्तीत रजेस व ५४१ दिवसांच्या असाधारण (विना वेतन) रजेस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ६** :— श्री. अर्जुन धरमपाल, अस्थायी लिपिक यांना मंजुर केलेल्या दिनांक ९/५/२००५ ते ८/५/२००७ या दोन वर्षाच्या कालावधीची विशेष असाधारण रजेस कार्योत्तर

मंजुरी देणे.

<u>काही सदस्य</u> :— पास—पास...........

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>प्रस्तावना:—</u>

**विषय क्र. ६ :—** श्री. अर्जुन धरमपाल, अस्थायी लिपिक यांना मंजुर केलेल्या दिनांक ९/५/२००५ ते ८/५/२००७ या दोन वर्षाच्या कालावधीची विशेष असाधारण रजेस कार्योत्तर मंजुरी देणे.

श्री. अर्जुन धरमपाल, लिपिक, कर विभाग यांनी दिनांक ३१/३/२००५ च्या अर्जान्वये दिनांक ९ मे, २००५ ते दिनांक ८ मे, २००७ या दोन वर्षाच्या कालावधीची विशेष असाधारण रजा मंजूर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.

शासनाचे वित्त विभागाकडील निर्णय क्र. अरजा २४०४/२५/सेवा—८, दिनांक ७/१०/२००२ व शासन निर्णय क्र. अरजा २४०४/प्र.क्र. ५६/०४/सेवा—८, दिनांक १४ जानेवारी, २००५ नुसार शासकिय सेवेत प्रविष्ट झालेल्या किमान ५ वर्ष इतकी सतत सेवेत असलेल्या स्थायी अस्थायी कर्मचा—यांना विशेष असाधारण रजा मंजूर करता येईल. अशी रजा संपुर्ण सेवेच्या कालावधतीत ५ वर्षाच्या मर्यादेपर्यंत फक्त एकदाच घेता येईल ही योजना सदर आदेश दिनांक १/१/२००५ पासुन ते दिनांक ३१/१२/२००५ पर्यंत अंमलात आहे. मा. शासन निर्णयातील परिच्छेद ९ मध्ये विशेष असाधारण रजा मंजूर करण्यास नियुक्ती प्राधिकारी सक्षम असतील अशी तरतूद आहे. त्यांनी यापूर्वी दिनांक ३/४/२००४ ते ८/५/२००५ पर्यंतची एकूण ४०१ दिवसांची ( १ वर्ष ०४ महिने) विशेष असाधारण रजा उपभोगलेली आहे.

वरील शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री. अर्जुन धरमपाल, लिपिक, कर विभाग हे अस्थायी कर्मचारी असून त्यांची महापालिकेतील आतापर्यंत सेवा ८ वर्षे ४ महिने २९ दिवस इतकी झाली असून त्यांचा विशेष असाधारण रजेचा अर्ज दिनांक ३१/३/२००५ पूर्वी या कार्यालयास प्राप्त झाला असुन शासनाच्या वरील दिनांक ७/१०/२००२ मधील शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहुन त्यांची दिनांक ९/५/२००५ ते ८/५/२००७ पर्यंतच्या ०२ वर्षाचा कालावधीची विशेष असाधारण रजा दिनांक ५/५/२००५ च्या आदेशान्वये मंजुर केली आहे. सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी महासभेपूढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:— २६** **दिनांक:—६/७/२००५.**

सुचकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव :—श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री अर्जुन धरमपाल, लिपीक, कर विभाग यांच्या ९/५/२००५ ते ८/५/२००७ या २ वर्ष कालावधीच्या असाधारण (विना वेतन) रजेस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ७ :–** महापालिका कर्मचा–यास कर्तव्य बजावतांना झालेल्या अपघाताच्या प्रसंगी तातडीच्या औषधोपचारासाठी रुपये १० हजार इतकी अग्रीम रक्कम मंजुर करणे.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास............

<u>मा. महापौर :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

<u>प्रस्तावना:–</u>

**विषय क्र. ७ :–** महापालिका कर्मचा–यास कर्तव्य बजावतांना झालेल्या अपघाताच्या प्रसंगी तातडीच्या औषधोपचारासाठी रुपये १० हजार इतकी अग्रीम रक्कम मंजुर करणे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एमएजी–२००५/९/प्र.क्र. १/आरोग्य–३, दिनांक १९/३/२००५ नुसार शासकिय कर्मचा–यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून घेतलेल्या औषधोपचारांच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी २७ आकस्मिक व ५ गंभीर स्वरुपाच्या आजारांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासकिय कर्मचारी यांनी शासनाने घोषित केलेल्या आकस्मिक व गंभीर आजारांपैकी ज्या आजाराविषयी खाजगी रुग्णालयात उपचार घेतले असतील व सदर आजार शासनाने घोषित केलेल्या आजारांपैकी असल्याने संबंधित रुग्णालये व जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी प्रमाणित केल्यानंतर वैदयकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते.

परंतु कर्मचारी त्यांचे कर्तव्य बजावत असतांना त्यांना कोणताही अपघात झाल्यास त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागते. अशावेळी सदर कर्मचारी यांना तातडीने उपचार करण्याची जरुरी असते. सदर तातडीच्या उपचाराचा खर्च भागविण्यासाठी सद्याच्या नियमात अग्रीमाची तरतूद नाही. ही बाब विचारात घेवून महापालिकेतील कर्मचा–यांना तातडीच्या प्रसंगी औषोधोपचार करण्यासाठी रुपये १०,०००/– इतके अग्रीम देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. संबधीत कर्मचा–यांनी सदर खर्चाची देयके रुग्णालयामार्फत प्रमाणित करुन सदर करणे बंधनकारक राहील. सदर खर्च वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्तीसाठी लेखा शिर्षामधुन भागविण्यात येईल. प्रस्तृत प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:– २७** **दिनांक:–६/७/२००५.**

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिका कर्मचा–यांना कर्तव्य बजाविताना होणा–या अपघाताच्या प्रसंगी तातडीच्या औषधोपचारकामी रु. १०,०००/– एवढी अग्रीम रक्कम देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

**विषय क्र.** ८ :— श्रीमती पुनम ठोंबरे, सफाई कामगार यांचे निलंबन कायम करणे.

काही सदस्य :— पास—पास............

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना:—

**विषय क्र.** ८ :— श्रीमती पुनम ठोंबरे, सफाई कामगार यांचे निलंबन कायम करणे.

श्रीम. पुनम ठोंबर, सफाई कामगार यांना प्रभाग क्र. ७ मधील कार्यक्षेत्रात साफसफाई कामाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. दिनांक ४/१/२००५ रोजी उप—आयुक्त (आरोग्य) यांनी सदर प्रभागातील साफसफाईचे कामाचे पर्यवेक्षणासाठी संबंधीत प्रभाग अधिकारी व आरोग्य निरिक्षक यांचे समवेत भेट दिली असता श्रीमती पुनम ठोंबरे, सफाई कामगार हया स्वत: काम न करता परस्पर दुस—या महिलेस साफसफाईचे काम करण्यासाठी नेमले असल्याचे आढळून आले. याबाबत त्यांना विचारणा केली असता माहे सप्टेंबर—ऑक्टोंबरमध्ये दुस—या महिलेकडुन काम करुन घेतल्याचे त्यांनी मान्य केलेले आहे. यावरुन त्यांनी स्वत:च्या कामाची जबाबदारी टाळून पदाचा गैरवापर करुन तसेच महापालिकेची दिशाभुल करुन फसवणुक केली आहे. हे त्यांचे कृत्य आक्षेपार्ह व गंभीर स्वरुपाचे असल्यामुळे त्यांना कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/प्र.क्र./०४/०८/०५, दिनांक ४ जानेवारी, २००५ च्या आदेशान्वये निलंबीत करुन दिनांक ५/४/२००५ च्या ज्ञापनाद्वारे दोषारोपपत्र बजाविणेत आले आहे. याबाबत त्यांनी केलेला खुलासा हा असमाधानकारक असुन त्यांना नेमुन दिलेल्या कामात त्यांना रस नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम १ (ब) अन्वये श्रीमती पुनम ठोंबरे, सफाई कामगार यांचे निलंबन कायम करुन विभागीय चौकशी करण्यात यावी. प्रस्तृत प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:— २८ दिनांक:—६/७/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या गैरवर्तनाबद्दल श्रीमती पुनम ठोंबरे, सफाई कामगार यांना आयुक्तांतर्फे बजावलेला निलंबन आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :—विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. ९** :— श्री. विशाल कदम, वरीष्ठ लिपिक यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे बाबत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— दोन्ही विषय जे आहेत त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही, परंतु असाच एक विषयी पुर्वी आला होता. त्यावर आमच्या सभागृह नेत्यांनी म्हटले होते की, ६ महिने पुर्ण होण्याअगोदर असे विषय महासभेपुढे आले पाहिजे. तर या विषयामध्ये सुध्दा ८ महिने झालेले आहेत. त्यावेळेस प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले होते की, ६ महिन्याच्या पुर्वीच आम्ही आताच असे प्रस्ताव महासभेपुढे आणु. आणि संपुर्ण सभागृहामध्ये हे सांगितले होते. यापुढे तरी असे होवू देवु नका.

मा. सचिव :— निलंबन कायम?

काही सदस्य :— पास—पास............

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना:—

**विषय क्र. ९** :— श्री. विशाल कदम, वरीष्ठ लिपिक यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे बाबत.

श्री. विशाल कदम, वरीष्ठ लिपिक हे जनसंपर्क कार्यालयात कार्यरत असतांना महाराष्ट्र माहितीचा अधिकारान्वये नागरीकांचे प्राप्त झालेले अर्ज जनसंपर्क कार्यालयामार्फत माहिती अधिकारी यांचेकडे पाठविणेची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली असता, श्री. विशाल कदम, वरीष्ठ लिपिक यांनी त्याच्या कार्यकालावधीत माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेले अर्ज माहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणुन त्यांचेकडुन पुढील कार्यवाहीसाठी योग्य ते आदेश प्राप्त करणे जरुरीचे होते. परंतु त्यांनी तसे केले नाही. श्री. कदम यांनी महाराष्ट्र माहितीच्या अधिकारातील कामात अनियमितता दाखविल्यामुळे त्यांना कार्यालयीन दिनांक ४/१२/२००४ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम १ (ब) अन्वये श्री. विशाल कदम, वरीष्ठ लिपिक यांची विभागीय चौकशी होवून योग्य ती शिक्षा प्रस्तावित करणेसाठी निलंबन कायम करण्यात यावे. प्रस्तृत प्रस्ताव मा. महासभेपूढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:—२९ दिनांक:—६/७/२००५.

सुचकाचे नाव :– श्री. गणपत एडके

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या गैरवर्तनाबद्दल श्री. विशाल कदम, वरिष्ठ लिपीक यांना आयुक्तांतर्फे बजावलेला निलंबन आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :–विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

विषय क्र. १० :– प्रस्तावाची सुचना :–
५५ उल्हासनगर विधानसभा मतदार संघासाठी DENOVA प्रोग्राम नुसार बिनचुक मतदार यादी तयार करण्यासाठी उल्हासनगर तहसिलदारांना शिफारस करणे सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी व श्री. विनोद तलरेजा यांचा प्रस्ताव मान्य करणे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–मा. महापौरजी, फक्त एक मिनिट मी बोलेन. नवि मुंबई येथे मुख्य निवडणुक आयुक्त यांच्या वतीने ५ हजार कर्मचारी कामास लावुन सर्व्हे करुन मतदार यादी तयार केल्याने तेथे एक सुध्दा बोगस मकतदान झाले नाही, व त्यांनी बिनचुक अशी मतदार यादी तयार केली आहे. म्हणुन हा ठराव पारीत झाल्यानंतर जे मुख्य निवडणुक आयुक्त व राज्याचे निवडणुक आयुक्त आहेत, त्यांना पाठविला जावा. कारण की, सर्व्हे जो आहे तो डेनोव्हा प्रोग्राम नुसार केला जावा. जेणेकरुन उल्हासनगरमध्ये एक सुध्दा बोगस मतदान होवु नये. व एक सुध्दा मतदान राहु नये व जेथे किंवा कुणाच्या पत्यामध्ये चुक आहे, कुणी पुरुष आहे तर स्त्री लिहिले आहे, स्त्री आहे तर पुरुष लिहिले आहे. कुणाचे ४ मतदार पुढे आहेत तर कुणाचे ४ मतदार मागे आहेत. म्हणुन उल्हासनगरमध्ये सुध्दा नवि मुंबई सारखा सर्व्हे होणे फारच आवश्यक आहे. व असा हा ठराव मुख्य निवडणुक आयुक्त व महाराष्ट्र राज्य निवडणुक आयुक्तांना पाठविला जावा.

काही सदस्य :– पास–पास............

मा. महापौर :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

प्रस्तावना

विषय क्र. १० :– प्रस्तावाची सुचना
५५ उल्हासनगर विधानसभा मतदार संघासाठी DENOVA प्रोग्राम नुसार

बिनचुक मतदार यादी तयार करण्यासाठी उल्हासनगर तहसिलदारांना शिफारस करणे सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी व श्री. विनोद तलरेजा यांचा प्रस्ताव मान्य करणे.

प्रस्तावक :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदक :–श्री. विनोद तलरेजा

५५ उल्हासनगर विधानसभा मतदार संघासाठी तहसिलदार उल्हासनगर यांचेतर्फे तयार करण्यांत आलेली मतदार यादी चुकीची व खोटी आहे. त्यातील मतदारांची नावे, पत्ते, इत्यादी माहितीची नोंद दुरुस्तीपात्र आहे. उल्हासनगर तहसिलदार यांचेतर्फे मतदार यादीचा तपशिल तयार करतांना ब–याच चुका झालेल्या आहेत. व त्यांचे असे म्हणणे आहे की, उल्हासनगर महापालिकेतर्फे प्रत्येक घराला घर क्रमांक दिला नसल्याने अशा प्रकारच्या चुका झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

५४ बेलापुर विधानसभा मतदार संघासाठी डिनोव्हा प्रोग्राम नुसार परिपुर्ण व बिनचुक मतदार यादी तयार केली असून ती मतदार यादी सर्व मतदार संघासाठी एक चांगले उदाहरण आहे. या मतदार यादीच्या धर्तीवर राज्य निवडणुक आयोगाच्या मान्यतेनुसार उल्हासनगर विधानसभा मतदार संघासाठी डीनोव्हा प्रोग्राम नुसार मतदार यादी तयार करणे आवश्यक आहे. म्हणुन महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ३०** **दिनांक :–२०.६.२००५**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव निवडणुक आयोगाच्या मान्यतेस अधिन राहुन ५५ उल्हासनगर विधानसभा मतदार संघासाठी डीनोव्हा प्रोग्राम नुसार बेलापुर विधानसभा मतदार संघाच्या धर्तीवर मतदार यादी तयार करण्यासाठी उल्हासनगर तहसिलदारांना शिफारस करीत आहे.

प्रस्तावकाची सही /–

अनुमोदकाची सही /–

**एकमताने**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर रात्रौ ७.५५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२० जुलै, २००५

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२०/७/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०.०७.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३८. | श्रीमती माने किरण |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३९. | श्री. चव्हाण रमेश |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ४०. | श्री. जाधव प्रशांत |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४१. | श्री. जाधव सुरेश |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४२. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४३. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्री. वाघे शामु बाबु | ४४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४५. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४६. | श्री. भालेराव गौतम |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४७ | श्री. पाटील विश्वनाथ |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५१. | श्री. पंजाबी नारायण |
| १७. | श्री. उमाप रामदास | ५२. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५३. | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५४. | श्रीमती भटिजा कोमल |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५५. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५६. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २२. | श्रीमती अनिता गुप्ता | ५७. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २३. | श्री. पवार नाना | ५८. | डॉ. निना प्रकाश नाथानी, |
| २४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५९. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २५. | श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा | ६०. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २६. | श्री. निकम शांताराम | ६१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २७. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६२. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २८. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६३. | श्रीमती करोतिया मालती |
| २९. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६४. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३०. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६६. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६७. | श्री. माखिजा हरदास |
| ३३. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६९. | श्री. राजेश वदारिया |
| ३५. | श्रीमती भावना खिलनानी | ७०. | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ३६. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | ७१. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| ३७. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. जग्यासी राजु, २. श्री. टाले प्रमोद नामदेवराव, ३. श्री. साधवानी मोहन, ४. श्रीमती जया साधवानी, ५. श्रीमती. जयश्री सुर्वे, ६. श्रीमती वसिटा बेबी, ७. श्री. ठाकुर अशोक भगवानदास, ८. श्री. रामरख्यानी मोहनदास, ९. श्रीमती माखिजा किरण, १०. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> नेहमी प्रमाणे, सभेचे कामकाज चालु होण्याअगोदर एक श्रध्दांजली वाहण्याचा प्रस्ताव ठेवू इच्छितो. आमचे शिवसेनेचे उप—शहर प्रमुख श्री. राजेंद्र साहु यांच्या वडिलांचे दिर्घ कालीन आजारामुळे निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पित केली जावी.

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

**शोक प्रस्ताव :–**

शिवसेनेचे उप–शहर प्रमुख श्री. राजेंद्र साहु यांचे वडिल श्री. राधेशाम साहु यांचे दिनांक १०/७/२००५ रोजी दिर्घ कालीन आजारामुळे निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ३० अ** **दिनांक:–२०.७.२००५.**

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. राधेशाम साहु यांचे निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे.........
यावेळेस सायंकाळचे ४ वाजुन ३० मिनिटे झाली आहेत.

मा. सचिव :–प्रश्न क्र. ४०४ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे.

☝ **प्रश्न क्र. ४०४:–**येत्या महासभेत खालील विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून खुलासा करण्याबाबत.
खालील इमारती (१) रुम नं. ७०९ समोर, बॅ.नं. ७८४, शिट नं. ५० कॅम्प नं. ३
(२) ए.टी.एन्ड.टी. शोरुम, पेट्रोलपंप समोर, १७ सेक्शन कॅप नं. ३
(३) सपना गार्डन गेट समोर, शहंशहा टावर मागे, रेखा आलेख जयसिंगानी, कॅम्प नं. ३ सदर इमारतीच्या मंजुर आराखडयानुसार मारजीन (समास) बाबत विचारलेल्या प्रश्नांची योग्य, सुचक व समाधानकारक उत्तरे देवून सविस्तर खुलासा करणेबाबत.

प्र. क्र. १ अ) सदर इमारतींच्या सनद किती वॉल आहे?

ब) सदर इमारतींच्या मंजुर आराखडयानुसार इमारतींच्या चार बाजुंनी किती मारजिन (समास) सोडणे आवश्यक आहे?

क) सदर इमारतींच्या मंजुर आराखडयानुसार इमारतींच्या चार बाजुंनी किती मारजिन (समास) सोडला आहे?

ड) महापालिकेच्या संबंधीत अधिकारी विना मारजिन (समास) सोडल्याखेरील इमारतींचा प्लॉन पास होवू शकतो का?

प) होवु शकत असल्यास कोणत्या कलम व कायदयाअन्वये इमारतीचा प्लॉन मंजुर होवु शकतो?

फ) एक इंच ही मारजिन न सोडता इमारत बांधकाम करणे योग्य आहे का?

ण) विना मारजीन खेरीज प्लान पास करण्याचा अधिकार महापालिकेस आहे का?

उत्तर :—(१) रुम नं. ७०९ समोर, बॅ.नं. ७८४, शिट नं. ५० कॅम्प नं. ३

अ) १३९.८७ चौ.मी.

ब) समोर ३ मी.
मागे ३ मी
बाजूचे २.२५ मी.

क) समोर ३.०४ मी.
मागे ३.०४ मी.
बाजूचे ३.०४ मी.

ड) होय

प) बांधकाम नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ६.६.२.१ अन्वये सामासिक अंतरात सुट देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत.

फ) वरीलप्रमाणे.

ण) वरीलप्रमाणे.

(२) ए.टी.एन्ड.टी. शोरुम, पेट्रोलपंप समोर, १७ सेक्शन कॅप नं. ३

अ) ३४०.१३ चौ.मी.

ब) समोर ४.५०.मी.
मागे ३.०० मी
बाजूचे ३.०० मी.

क) नाही
ड) होय

प) बांधकाम नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ६.६.२.१ अन्वये सामासिक अंतरात सुट देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत.

फ) वरीलप्रमाणे

ण) वरीलप्रमाणे

३) श्रीमती रेखा आलेख जयसिंगानी या नावाने बांधकाम परवानगी मंजुर करण्यांत आलेली नसल्यामुळे सदरची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नाही.

ब) वरीलप्रमाणे

क) होय

ड) बांधकाम नियंत्रण नियमावलीत नियम क्र. ६.६.२.१ अन्वये सामासिक अंतरात सुट देण्याचे मा. आयुक्त यांना आहेत.

फ) वरीलप्रमाणे

ण) वरीलप्रमाणे

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— मा. महापौरजी, उपमहापौरजी व सर्व सन्माननिय सदस्य, मला माहिती पाहिजे ६.६.२.१ याची , याची पुर्ण व्याख्या काय आहे? हे केव्हा वापरता येते? योग्य प्रकारे माहिती दया. कारण की हे प्रकरण न्यायालयात जाणार आहे. चुकीची माहिती दिली तर उदया सकाळ आपणावर येईल.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—श्री. भुल्लर महाराजजी कृपया आपण बसुन घ्या ना. मी देतो ना उत्तर, मा. महापौर महोदया, या प्रश्नाच्या उत्तरात असे सांगितले गेले आहे की, काही इमारतींच्या बांधकाम परवानगी मध्ये समासिक अंतर जे आहे, त्याबाबत आयुक्तांना जे डिस्क्रीशनरी पॉवर आहेत त्याचा वापर केल्यानंतर समासिक अंतरामध्ये सुट दिली जावु शकते. त्यामध्ये फक्त दोन निकष आहेत, पहिला निकष जो आहे तो भुखंड जर बांधकाम करण्यायोग्य नसेल, जेथे बांधकाम परवानगीसाठी अर्ज केला आहे. तो प्लॉट जर अन् बिल्डेबल असेल तर डिस्क्रीशनरी पॉवर वापरुन समासिक अंतरामध्ये सुट दिली जावु शकते. व जेथे डेव्हलोपमेन्ट हार्डशिप आहे, म्हणजेच तेथे विकास काम करण्यासाठी विकासकर्त्यास डेव्हलोपमेन्ट हार्डशिप अशा प्रकारणांमध्ये समासिक अंतर म्हणजेच एकतर बाजुचे समासिक अंतर रिअर मार्जिन, पुढच्या बाजुच्या समासिक अंतराबाबत डिस्क्रीशनरी पॉवर वापरुन कोणत्याही प्रकारची सुट दिली जावु शकत नाही. पुढच्या बाजुच्या सामासिक अंतराबाबत डिस्क्रीशनरी पॉवर वापरुन जर सुट दिली गेली तर त्यामुळे विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन होईल. परंतु साईड व रिअर मार्जिन मध्ये जेथे बाजुच्या बिल्डींग मधील व्हेटीलेशन साठी किंवा बाजुच्या इमारतीत जर का काही त्रास होत नसेल तर डिस्क्रीशनरी पॉवर ऐच्छिक अधिकार वापरले जावु शकतात. व याबाबत काही मार्गदर्शक सुचना ज्या आहेत, त्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये दिलेल्या आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—मा. महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब, ए.टी.एन.टी.चे जे शोरुम आहे, कल्याण अंबरनाथ हा जो १०० फुट रुंदीचा रस्ता आहे त्यास काय म्हटले जाते? महामार्ग म्हटले जाते की काय? १०० फुट रुंदीचा रस्ता आहे. त्याची व्याख्या काय आहे?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— मा. महापौर महोदया, उल्हासनगर शहरामधुन २ राज्य महामार्ग जातात. १ जो आहे तो कल्याण — मुरबाड तसे पाहिले तर त्याचे रुपांतर राष्ट्रीय महामार्गात झालेले आहे. मुंबई —हैद्राबाद व दुसरा जो आहे तो कल्याणहुन अंबरनाथ कडे जाणारा जो रस्ता आहे, पुढे माथेरान व पुण्याकडे जाणारा, तो कल्याण — अंबरनाथ रस्ता परंतु तो राज्य महामार्गामध्ये येतो किंवा नाही याबाबतची निश्चित अशी माहिती सध्या माझ्याकडे नाही. परंतु आपला प्रश्न फक्त त्या रस्त्याची जी लाईन आहे, त्या लाईनपासुन समासिक अंतर किती ठेवले पाहिजे त्याबाबत जर असेल तर हे अंतर कमीत कमी ४.५० मीटरचे असते, एवढे असले पाहिजे. पुढील समासिक अंतर सुध्दा इमारतीच्या उंचीवर ठरविले जाते. परंतु सरासरी जे समासिक अंतर असते ते ४.५० मीटरचे ठेवायचे असते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— एटीएनटी वाल्यांनी कंम्पलीशन सर्टीफिकेट (बांधकाम पुर्णत्वाचा दाखला) घेतला आहे का? नगररचनाकारांना प्लॉन घेवुन उत्तर देण्यासाठी उभे राहण्यास सांगा.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—आपला प्रश्न व तो बांधकाम नकाशा सुध्दा मी पाहिला आहे. ती फाईल पाहिली असता त्यांनी बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतलेला नाही असे दिसुन येते.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— याबाबत मी माहितीच्या अधिकारान्वये विचारणा केलेली आहे. त्याबाबत मला जे उत्तर दिलेले आहे ते माझ्याकडे आहे. परंतु मी येथे घेवुन येण्यास विसरलो. त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, त्याने बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे. त्यामध्ये चटई क्षेत्राचे कोणतेही उल्लंघन नाही. परंतु त्यामध्ये बरेचसे चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे. आपल्या म्हणण्यानुसार ४.५० मीटर

समासिक अंतर सोडले पाहिजे, परंतु त्या रस्त्याच्या हिशोबाने ५.५० मीटर समासिक अंतर सोडले पाहिजे. परंतु त्याने बिल्कुल सोडलेले नाही.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> फाईल मागवितो तोपर्यंत पुढील प्रश्न घेतला जावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> तोपर्यंत पुढील प्रश्न घेतला जावा.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. आयुक्त साहेब, मागच्या महासभेत मी प्रश्न विचारला होता. आमदार साहेबांच्या निधी बाबतीत त्याचे या महासभेत उत्तर देईन म्हणुन सांगितले होते. परंतु या महासभेत तो प्रश्न आलेला नाही. मला त्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे. पुढच्या महासभेत तरी येईल का? एवढे सांगण्यात यावे. आमदार निधि बाबतचा प्रश्न होता, श्री. जवादे साहेबांनी मागच्या वेळेस सांगितले होते पुढील महासभेत उत्तर देतो म्हणुन तर श्री. जवादे साहेब आपण याबाबतीत सांगितले तर बरे होईल.

<u>श्री. जवादे (कार्यकारी अभियंता, स्थापत्य) :—</u> मा. महापौर महोदया, श्री. दिलीप गायकवाड साहेबांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात काही माहिती अर्धवट होती. ती अदयाप पर्यंत आमच्याकडुन तयार होवू शकली नाही. तर काही दिवसातच ती तयार करुन दिली जाईल.

<u>मा. सचिव :—</u> पुढील महासभेत?

प्रश्न क्र. ४०५ हा श्री.जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४०५:—</u>१) एक जनवरी से ३१ मई इन पांच महिनों में जकात की वसुली कितनी हुई है ।

२) कृपया हर महिने की वसुली अलग—अलग बताएँ ।

<u>उत्तर :—</u> सदर महिन्यांची जकात वसुली तक्ता सोबत जोंडण्यात आला आहे.

| अ.क्र. | महिना | एकुण दिवस | वसुली |
|---|---|---|---|
| १. | २५ जुलै, २००४ | ६ | ११९५७३७६ |
| २. | ऑगस्ट | ३१ | ४६५१६१६६ |
| ३. | सप्टेंबर | ३० | ५६९२८७३२ |
| ४. | ऑक्टोंबर | ३१ | ६५५८०३३९ |
| ५. | नोव्हेंबर | ३० | ४६०२१००४ |
| ६. | डिसेंबर | ३१ | ६२१९९१४४ |
| ७. | जानेवारी | ३१ | ५७७३२९८९ |
| ८. | फेब्रुवारी | २८ | ५०५६५९७५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | मार्च | ३१ | ५३५२६९५७ |
| १०. | एप्रिल | ३० | ५२४०७२७४ |
| ११. | मे | ३१ | ५५३५६७१८ |
| १२. | जुन | ३० | ५४८८२७३० |

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर महोदया, माझ्या प्रश्नाच्या उत्तरात दुरुस्ती करुन नविन उत्तर दिलेले आहे तर त्याबाबतीत मी मा. उप—आयुक्त (जकात) यांना विचारु इच्छितो की, ज्या उत्तरात चुक झाली होती ती सुधारुन जे आपण उत्तर देत आहात त्यामध्ये एकुण रक्कमेमध्ये सुधारणा केलेली आहे. ज्याप्रकारे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर या ५ महिन्यामधील जकातीच्या आकडयांमध्ये फरक आहे. या अगोदरच्या उत्तरामध्ये व आताच्या उत्तरामध्ये परंतु जानेवारी, २००५, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे महिन्याच्या जकात वसुलीमध्ये आता पुन्हा ३० हजार रुपयाची चुक आहे. मे ची जी वसुली आहे ती ५ कोटी ५३ लाख ५६ हजार ७१८, व आता जे उत्तर दिले आहे ५ कोटी ५३ लाख ८६ हजार ७१८ तर ३० हजार रुपयाचा फरक मे महिन्याच्या कोणत्या दिवसाचा आहे? दुसरे असे की या अगोदर सभागृहात जकातीबाबत लक्षवेधी सुचना झाली. शहरामध्ये जकातीची वसुली कशाप्रकारे वाढविता येईल? त्यावर बरीचशी चर्चा झाली. व आयुक्त साहेबांनी अतिशय प्रभावीपणे सांगितले होते की, जकात वसुली कश्याप्रकारे वाढविली जाईल. श्री. अनिल खतुरानी याचा येथे एक मुद्दा उपस्थित झाला होता. त्याबाबत सर्व सदस्यांनी हरकत घेतली होती की, त्याने या अगोदर मालमत्ता कर विभागामध्ये पैश्यांचा अपहार केला होता. त्यानंतर त्याचे निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव जेव्हा महासभेत आला होता तेव्हा आपणच म्हटला होता की, येथे तेलगी निर्माण होवू नये. तरीही त्यास जकात विभागामध्ये नेमणुक देण्यात आली. त्याबाबत सन्माननिय सदस्यांनी आक्षेप नोंदविला असता, आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, याबाबतीत चौकशी केली जाईल. श्री. अनिल खतुरानी हा तेथे कसा गेला? त्या चौकशीचे काय झाले? व त्यास जकात भांडार विभागात नेमणुक दिली असतांनाही जकात विभागामध्ये त्याचा हस्तक्षेप चालुच आहे. त्याबाबत काय म्हणायचे आहे व तिसरे असे की, काही दिवसापुर्वी, ६ तारखेनंतर, महासभा झाल्यानंतर, काही वाहतुकदारांनी एक पत्र लिहुन कुण्या एका वाहतुक दाराबाबत तक्रार केली होती. त्या तक्रारीचे काय झाले? ती तक्रार कोणत्या वाहतुकदाराबाबत होती? त्याबाबत महापालिकेने काय केले? मी काही वाहतुकदारांचे व गाडयांचे क्रमांक दिले होते. त्याबाबत ६ तारखेपासुन आजपर्यंत १४ दिवसामध्ये काय कारवाई झाली? व त्यांचा परिणाम काय आला? मी जे क्रमांक दिले होते त्यांची काही चोरी पकडली गेली? अशा काही चो—या पकडल्या आहेत काय? तसेच सर्व वाहतुकदारांनी मिळुन कुण्या एका वाहतुकदारा विरुध्द एक अर्ज केला होता अशी मला माहिती मिळाली आहे. त्याबाबत सुध्दा महासभेस सांगितले जावे. त्याबाबत महापालिका काय कारवाई करत आहे? मी जे गाडयांचे क्रमांक दिले होते त्या गाडया एस्कॉर्ट घेवुन जात आहेत तर त्याबाबत काही सत्यता समोर आली आहे का? माझ्याकडुन सांगण्यामध्ये काही चुक झाली होती किंवा अशा काही गाडया जकात चुकवुन जात होत्या अशी काही सत्यता समोर आली आहे काय? त्याची सुध्दा माहिती दिली जावी. जेणेकरुन शहराची जकात वसुली वाढविली जावु शकेल. त्याचबरोबर श्री. अनिल खतुरानी याचा जो विषय होता या सर्व विषयांची एकत्रितपणे माहिती दिली जावी.

<u>श्री. संदिप आरोटे (उपायुक्त, जकात):—</u> मा. महापौर महोदया, मागील महासभेत जकातीचे जे आकडे दरमहा व दरदिवसाचे दिले होते, काही आकडयांमध्ये चुक झाली होती. आता जे आकडे दिले आहेत ते आकडे कॅशिअरने दर दिवसाच्या वसुलीचे आकडे तपासुन दिले आहेत. सर्व महिन्यांच्या आकडयांमध्ये फरक झालेला नव्हता, फक्त दोन—चार महिन्यांच्या आकडयांमध्ये फरक झाला होता. म्हणुन आता जे आकडे दिले आहेत ते जकात विभागाच्या कॅशिअरने दर दिवसाच्या जकात वसुलीचे आकडे तपासुन दिलेले आहेत. व ते सर्व बरोबर आहेत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> आपला जो तक्ता आहे त्यामध्ये दिनांक १/५/२००५ पासुन २/५/२००५, ३/५/२००५ अशा सर्व तारखांचे महिन्याचा तक्ता दिला आहे. त्याची एकुण बेरीज पहा, ५ करोड ५३ लाख ८६ हजार ७१८ व आता आपण दुरुस्त करुन जे आकडे दिले आहेत त्यामध्ये ३०

हजार रुपयांची तफावत आहे. तर या ३० दिवसामध्ये हे ३० हजार रुपये कुठे जास्त वसुल झाले किंवा कमी दर्शविले आहेत त्याची मी माहिती घेवु इच्छितो. आपण १/५/२००५ पासुनच्या वसुलीचा तक्ता काढा, ३१ दिवसाचा आपण पुर्ण तक्ता दिला आहे त्याची बेरीज आहे ५ करोड ५३ लाख ८६ हजार ७१८ व आता आपण दुरुस्त करुन जे आकडे दिले आहेत त्यामध्ये ५ करोड ५३ लाख ५६ हजार ७१८, तर ३० हजार रुपयाची चुक कोठे आहे? ३१ दिवसामध्ये कोणत्या दिवशी ३० हजार रुपयाची चुक आहे. त्याबाबत माहिती दया.

<u>श्री. संदिप आरोटे (उप–आयुक्त , जकात) :–</u> १/५/२००५ ते ३१/५/२००५ या पुर्ण महिन्याची जकात वसुलीची ही जी माहिती दिलेली आहे, ती कॅशबुक नुसार दिलेली आहे व हा जो तक्ता तयार करण्यात आलेला आहे होवू शकते त्यामध्ये काही चुक झाली असेल. परंतु या रकान्यामध्ये जे आकडे दिलेले आहे ते बरोबर असे आकडे आहेत. यामध्ये जर काही मुद्रण दोष असेल ..........

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मुद्रण दोषाची सरकार महाराष्ट्रात तर चालुच आहे. परंतु आपल्या छोटयाश्या महानगरपालिकेमध्ये हे मुद्रण दोष दोन–दोन, तीन–तीन वेळ होत असतील.........

<u>श्री. संदिप आरोटे (उप–आयुक्त , जकात) :–</u> प्रत्यक्षात अशी माहिती मागितलेली नव्हती. दरमहाचे आकडे मागितले होते. त्यानुसार मे महिन्याचे आकडे दिले आहेत ते बरोबर आहेत.

<u>मा.सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> या महिन्यामध्ये ३१ दिवस आहेत, आपण प्रत्येक दिवसाची वसुली दिली आहे. व त्यांची एकुण बेरीजही आपण दिली आहे ५ करोड ५३ लाख ८६ हजार ७१८ ही बरोबर आहे की चुक आहे?

<u>श्री. संदिप आरोटे (उप–आयुक्त , जकात) :–</u>बरोबर आहे.

<u>म. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> बरोबर आहे? आपण दुरुस्तीच्या उत्तरामध्ये लिहिले आहे ५ करोड ५३ लाख ५६ हजार ७१८ तर ३० हजार रुपये कुठे गेले?

<u>श्री. संदिप आरोटे (उप–आयुक्त , जकात) :–</u> मे महिन्याचा ३१ दिवसांच्या वसुलीचा जो तपशील दिलेला आहे त्याचे जे आकडे आहेत ५ करोड ५३ लाख ८६ हजार ७१८ हा आकडा बरोबर आहे तोच गृहित धरला जावा. तो बरोबर आहे कारण की तो कॅशबुक वरुन घेतलेला आहे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> जकातीच्या विषयाबाबत आम्ही ज्या गाडयांचे क्रमांक दिले होते, वाहतुकदारांची नावे दिली होती. त्यांच्यावर काही कार्यवाही झाली का? त्यामध्ये सत्यता होती का? ते लोक पकडले गेले किंवा नाही? सर्व वाहतुकदारांनी मिळुन कुण्या एका वाहतुकदाराची तक्रार केली आहे. त्याबाबत महासभेला माहिती दया. त्याबाबत आपण काय कारवाई केलीत? श्री. अनिल खतुरानी बाबत साहेबांनी सांगितले होते की, आम्ही सभागृहात सांगु तो तेथे कसा गेला? त्याची जकात विभागामध्ये बदली कशी झाली? याबाबतची माहिती आम्ही पुढील महासभेत देवु असे आपण म्हणाला होता ते सुध्दा आपण अदयापपर्यंत सांगितलेले नाही.

<u>श्री. संदिप आरोटे (उप–आयुक्त, जकात) :–</u> येथे जे काही गाडयांचे क्रमांक व वाहतुकदारांची नावे दिली होती त्यामध्ये मोटुमल ट्रान्सपोर्ट नावाच्या एका वाहतुकदाराचे नाव होते. व मध्यवर्ती जकात नाक्यावर जेव्हा त्यांची कपडयाची एक गाडी आली होती. त्यावेळेस मी सुध्दा तेथे होतो. ती गाडी १०० टक्के तपासली त्या गाडीत १० नग जास्त निघाले. ते मध्यवर्ती जकात नाक्यावर पडुन आहेत. जोपर्यंत तो दंड भरत नाही तोपर्यंत ते १० नग दिले जाणार नाहीत. दुसरे म्हणजे त्याच वाहतुकदाराची जीप ३–४ दिवसापुर्वी सकाळी १०.३०– ११.०० च्या दरम्यान पकडली ती सुध्दा कालपर्यंत मध्यवर्ती जकात नाक्यावरच उभी आहे. आजच्या बाबतीत मला माहित नाही. जेव्हा तो दंड भरेल तेव्हा त्यास ते नग दिले जातील. बाकी ज्या गाडयांचे क्रमांक येथे दिले होते त्यामधील अदयापपर्यंत कुणी मिळाला नाही. परंतु त्या प्रत्येक गाडीवर आमची नजर आहे. जेव्हा कुणी त्यातील सापडेल तेव्हा बिल्कुल आपणांस व महासभेस कळविले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> सर्व वाहतुकदारांनी मिळुन कुण्या एका वाहतुकदाराविरुध्द तक्रार केली आहे काय?

<u>श्री. संदिप आरोटे (उप—आयुक्त , जकात) :—</u> विशाल ट्रान्सपोर्टबाबत आमच्याकडे एक लेखी निवेदन आले आहे. आम्ही त्यांच्यावर नजर ठेवुन आहोत.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> श्री. अनिल खतुरानीचा जो विषय आहे याबाबत आयुक्त साहेबांनी स्वत: म्हटले होते की, शहरामध्ये नविन तेलगी तयार होवू देवु नका. व हे सत्य असल्याबाबत आम्ही आपणांस सहकार्य दिले होते. व आपण मागील महासभेत म्हटले होते की, तो तेथे कसा पोहचला हे मला सुध्दा माहित नाही. म्हणुन मी याबाबतीत चौकशी बसवित आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u>सांगतो—सांगतो, मी सध्या ८५५ इमारतींच्या प्रकरणांमध्ये व्यस्त असल्यामुळे मी चौकशी सुरु करु शकलो नाही. याबाबत चौकशी करुन मी सभागृहास सांगेन.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौरजी, श्री. अनिल खतुरानी व श्री. प्रकाश केसवानी, नाका शिपाई यांचे बाबत मागील महासभेत एक विषय चर्चेस आला होता. श्री. केसवानी याची उपायुक्त, जकात यांच्या दालनात शिपाई म्हणुन नेमणुक केली होती. त्याची बदली करण्यासाठी आयुक्त साहेबांना वेळ मिळाला. परंतु श्री. अनिल खतुरानी जो भ्रष्ट आहे ज्याबाबत आयुक्त साहेबांनीच एका महासभेत म्हटले होते की, अशा तेलगीस उत्तेजन देवु नका. त्यालाच आपण जकात विभागामध्ये नेमणुक दिलीत त्याची बदली करण्यासाठी आपणांस वेळ मिळत नाही. हे या महासभेमध्ये आपण चुकीचे उत्तर देत आहात.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u>मा. महापौर महोदया, त्या महासभेत मी म्हटले होते की, श्री. खतुरानी यास आम्ही जकात नाक्यावर कुठेच नेमणुक दिलेली नाही. जकात विभागामध्ये जो जकात भांडार विभाग आहे तेथे त्यास काम दिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>हरकतीचा मुद्दा. मा. महापौरजी, आयुक्त साहेब जे उत्तर देत आहेत त्याबाबत मी उपायुक्त, जकात यांना समोर ठेवुन सांगतो की, तो श्री. अनिल खतुरानी आज सुध्दा यांच्या समोर जकात विभागात मध्यवर्ती जकात नाक्यावर हस्तक्षेप करत होता त्यावेळेला मी सुध्दा तेथे उपस्थित होतो. तर आयुक्तांचे जे उत्तर आहे ते चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—</u> मा. महापौर महोदया, श्री. संदिप आरोटे यांच्यावर दोन—दोन विभागाचा कार्यभार सोपविल्यामुळे ते बरोबर काम करु शकत नाहीत. आपण त्यांना कोणत्याही एकाच विभागाचा कार्यभार दया. अशा अधिका—याकडुन दोन—दोन विभागाचे काम करुन घेतल्यामुळे त्याच्यावर कामाचे ओझे वाढते. माझ्या प्रभागामध्ये एका महिन्यामध्ये ३ आरोग्य निरिक्षकांच्या त्यांनी बदल्या केल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> मा. आयुक्त साहेब, आमच्या कॅम्प ४ येथिल स्मशान भुमीत कित्येक दिवसांपासुन एक सुध्दा लिपिक नाही कृपया तुम्ही त्यास तिकडे पाठवुन दया ना. जकात विभागातच का ठेवता? तुम्ही स्वत: म्हणतात की तेलगी सारख्या माणसाला तुम्ही प्रोत्साहन देवु नका. त्यावेळेस आम्ही तुम्हांला सहकार्य केलेले आहे. आणि आता तुमचे विचार कसे बदललेत अजुनही तो जकात विभागा अंतर्गतच्या भांडार विभागात आहे असे आपण म्हणता. कॅम्प नं. ४ येथे स्मशानात लिपिक नाही. त्यामुळे खुप अडचणीचे व गैरसोयीचे होते. जर खरोखरच त्याची बदली करायची असेल तर त्याला तेथे पाठवुन दया.

<u>श्री. संदिप आरोटे (उप—आयुक्त, जकात) :—</u>श्री. अनिल खतुरानी यांच्या बाबत येथे जी चर्चा होत आहे, त्यास जकात भांडार विभागात ठेवले आहे. त्यास घोषणापत्र, गाडी तपासण्याचा काही अधिकार नाही. कॅश हाताळण्याचा काही अधिकार नाही. जेव्हा मी मध्यवर्ती जकात नाक्यावर पाहणी करतो त्यावेळेत तो घोषणापत्र, गाडी तपासत असल्याचे माझ्या कधीही निदर्शनास आलेले नाही. परंतु आपण एखादया ठराविक कालावधीत तो असे करत असल्याबाबतचे आपण तक्रार केलीत तर त्याबाबत चौकशी केली जाईल.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—मा. महापौरजी, सभागृहाची दिशाभुल केली जात आहे. पुर्ण शहराने पाहिले आहे तो जकातीच्या गाडया पकडत आहे. व हे त्यांच्या समोर उभे आहेत, सर्व कर्मचारी त्यांच्या समोर उभे आहेत. तो गाडया पकडतो, जनादेशची प्रत माझ्याकडे आहे. आपण सभागृहाची दिशाभुल करु नका.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— हा अतिशय गंभीर असा मुद्दा आहे. आपण चौकशी करा अथवा करु नका, उशिरा करा परंतु त्याची बदली तर करु शकता तोपर्यंत? हे तर असे झाले की आपण चोरीस प्रोत्साहन देत आहात.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—मा. महापौर महोदया, प्रशासनाची अशी इच्छा नाही की त्यांनी जकात चोरास मदत करावी व अशा कर्मचा—यास त्याच विभागात ठेवावे. आम्ही प्रथमपासुन म्हटले आहे की, असा जो कोणी भ्रष्ट कर्मचारी असेल त्यावर प्रथम कारवाई होईल. श्री. खतुरानी यांच्या बाबतीत आता आताच त्यांना जकात विभागामध्ये नेमणुक दिली आहे ती त्यांना का दिली आहे याची मी अदयाप चौकशी करु शकलो नाही. यामुळे मी अदयाप त्याची बदली केली नाही. परंतु मी सभागृहाला अश्वस्त करु इच्छितो की, त्यास त्वरीत तेथुन हटविले जाईल व दुस—या विभागामध्ये नेमणुक दिली जाईल.

मा. सचिव :—प्रश्न क्र. ४०६ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४०६:—येत्या महासभेत खालील विषयावर चर्चा होवून माहिती मिळणेबाबत.
उल्हासनगर कॅम्प नं. ३ शिवाजी चौक ते नेहरु चौक रस्त्यावर सत्यम फर्निचर ते हॅन्डसम प्रेसचे मध्ये संध्या तळमाळा + १ माळयाचे आर.सी.सी. इमारतीचे बांधकाम सुरु आहे. सदर इमारतीचे बांधकामास महापालिकेने पुर्व परवानगी दिली असल्यास महासभेत खुलासा होवून उत्तर दयावे व परवानगी दिली नसल्यास आजतागायत कोणती कारवाई केली याची सुचक, समाधानकारक सविस्तर माहिती मिळावी ही नम्र विनंती.

उत्तर :— नाही.
सदर इमारतीस दिनांक २६/५/२००५ रोजी ५२,५३ ची नोटिस बजावण्यात आलेली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:— मा. महापौरजी, आयुक्त साहेब, माझा वरील प्रमाणेचा प्रश्न आहे. त्याबाबतच्या उत्तरात असे म्हटले आहे की, सदर इमारतीस दिनांक २६/५/२००५ रोजी ५२,५३ ची नोटिस बजावण्यात आलेली आहे. दिनांक २६/५/२००५ आणि आज २०/७/२००५ म्हणजे जवळ—जवळ दोन महिन्याच्या कलावधीमध्ये एकतर ही कलम ५२, ५३ अन्वयेची नोटिस काय असते ती सभागृहाला सांगावी. दुसरे म्हणजे कलम ५२ , ५३ अन्वये काय कारवाई करण्यांत आली तेही प्रशासनाने सभागृहामध्ये समाजावुन सांगावे.

श्री. ढेंगळेपाटील (सहा. आयुक्त, अ.बां.वि.) :—मा. महापौर महोदया, संबंधिताला २६/५/२००५ रोजी कलम ५२, ५३ अन्वये नोटिस दिली होती. तिचा कालावधी ३० दिवसाचा होता. २६/६/२००५ ला ३० दिवसाचा कालावधी संपल्यानंतर त्याला सुनावणी देवुन बांधकाम निष्कासित करण्याची ३० दिवसाची ऑर्डर काढलेली आहे. त्याची मुदत २६/७/२००५ ला संपत आहे. निष्कासनाचे आदेश बजावल्यानंतर त्याला मुळ बॅरेकचे जे मालमत्ता करावरील नाव हस्तांतरणाचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. ही दोन्ही कागदपत्र त्याने निष्कासनाचा आदेश काढल्यानंतर कार्यालयास सादर केली आहेत. तर ती कागदपत्र तपासुन पाहुन २६/७/२००५ ला अंतिम निर्णय घेता येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:— साधारणत: त्याचे बांधकाम कधी निष्कासीत होईल? २६/७/२००५ पर्यंत बांधकाम निष्कासीत होईल?

श्री. ढेंगळेपाटील (सहा. आयुक्त, अ.बां.वि.) :— बांधकाम निष्कासनाचा आदेश काढल्यानंतर मिळकत करावरील नाव हस्तांतरणाचे प्रमाणपत्र व ओरीजनल मिलिटरी शॉप अलॉटमेंट लेटर ही दोन्ही कागदपत्र त्यांनी सादर केली आहेत. ही कागदपत्रे तपासुन २६/७/२००५ रोजी अंतिम निर्णय घेतला जाईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः— निर्णय घेणार की बांधकाम निष्कासीत करणार?

श्री. ढेंगळेपाटील (सहा. आयुक्त, अ.बां.वि.) :— जर ते ओरीजनल मिलटरी बॅरेक जर अलॉटमेंट केले असेल त्यापेक्षा जर जास्त असेल तर ते निष्कासीत करावे लागेल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः— मा. महापौरजी, मी प्रश्न विचारला आहे तो वरीलप्रमाणे आहे. तर तुम्ही सांगता की, चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे. बांधकाम परवानगी पेक्षा जास्त बांधकाम केलेले आहे. मी जेव्हा प्रश्न विचारला होता तेव्हा असा प्रश्न विचारला होता की, संपुर्ण बांधकाम अनाधिकृत बांधकाम झालेले आहे. तेव्हा तुम्ही मला अनाधिकृत बांधकामांबाबत उत्तर दिले होते व आता तुम्ही सांगाता की, बांधकाम परवानगी पेक्षा जे जास्त बांधकाम आहे चटई क्षेत्राचे जेवढे उल्लंघन आहे तेवढे बांधकाम निष्कासीत केले जाईल.

श्री. ढेंगळेपाटील (सहा. आयुक्त, अ.बां.वि.) :— उत्तर दिले तेव्हा आपण त्यांना ३० दिवसाची नोटिस दिली होती.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः— उत्तर नाही, बांधकाम काय झाले आहे त्या जागेवर? पुर्ण अनाधिकृत झालेले आहे की चटईक्षेत्राचे उल्लंघन झालेले आहे?

श्री. ढेंगळेपाटील (सहा. आयुक्त, अ.बां.वि.) :— प्लास्टर, फरशी व शटर या तीनच गोष्टी तेथे झालेल्या आहेत.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः— म्हणुन तुम्हांला मी आठवण करुन देतो. हा प्रश्न मी विचारला आहे ७/६/२००५ ला त्यावेळेस तुम्ही उत्तर दिलेले आहे. प्रश्न विचारलेला आहे तोही वाचुन दाखविला आहे सभागृहामध्ये. त्यानंतरही आपण उत्तर दिलेले आहे की, ५२,५३ ची नोटिस बजावुन कारवाई करण्यात येईल. तेथे पुर्णपणे अनाधिकृत इमारत उभी केलेली आहे. त्याबाबत प्रश्न विचारला आहे. त्यावर आपण उत्तर दिलेले आहे. त्यावेळेस आपल्याला लक्षात आले नाही का प्लास्टर, लादी याचे काम केले आहे म्हणुन?

श्री. ढेंगळेपाटील (सहा. आयुक्त, अ.बां.वि.) :— मी त्यावेळेला सुध्दा उत्तर दिलेले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः— या संपुर्ण अनाधिकृत बांधकामाला आपण नोटीस बजावली आहे असे उत्तर दिलेले आहे. ७/६/२००५ ला मी प्रश्न विचारला आहे.

श्री. ढेंगळेपाटील (सहा. आयुक्त, अ.बां.वि.) :— २६/६/२००५ ला पुर्ण बांधकामाला नोटीस बजावली होती.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः— ७/६/२००५ ला मी प्रश्न दिलेला आहे तेव्हा तुमच्या लक्षात आले नाही का? तेथे प्लास्टर केले आहे की नाही, लादी बसविली आहे?

श्री. ढेंगळेपाटील (सहा. आयुक्त, अ.बां.वि.) :— पुर्ण बांधकामाला आम्ही नोटीस बजावली होती. त्यानंतर त्यांची सुनावणी घेतली. त्यावेळेस त्यांनी सांगितले की, कागदपत्र सादर करतो, कागदपत्र तपासुन निर्णय घेतलेला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लरः— मा. महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब ही गोष्ट आम्ही आपल्या निदर्शनास आणली होती. यामध्ये पुर्ण देवाणघेवाण झालेली आहे मी पुर्ण जबाबदारीने हा आरोप लावत आहे. या कामामध्ये देवाणघेवाण झालेली आहे. कारण की हे प्रकरण आम्ही आपल्या निदर्शनास आणुन दिले होते. हा आपला अधिकारी ते बांधकाम बघुन आला आणि सांगितले की, ते बांधकाम तुटेल म्हणुन आणि आता हे प्लास्टर, फरशी आणि शटर बाबत उत्तर देत आहेत. आपण यांना विचारा किंवा

चौकशी बसवा किंवा लाचलुचपत विभागामार्फत चौकशी करा. या प्रकरणामध्ये किती रक्कमेची देवाणघेवाण झालेली आहे?

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u> मा. आयुक्त साहेब, चालु बांधकामाला नोटीस बजावतात का?

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> या प्रकरणामध्ये आपण स्वत: पाहणी करुन आला होतात. व आता आपला अधिकारी उत्तर देत आहे की, फक्त प्लास्टर आणि फरशीचे काम झाले आहे. केवढा मोठा भ्रष्टाचार करत आहेत ते?

<u>मा. आयुक्त (श्री. आर. के. सोनवणे) :—</u> मला दोन मिनिटे बोलु तर दया. तोपर्यंत आपण शांतपणे बसुन घ्यावे. मा. महापौर महोदया, जेव्हा हा प्रश्न आला होता, मागील महासभेत या प्रश्नाचे उत्तर वितरीत झाले होते. त्यामुळे ती पुर्ण संचिका मी पाहिली आहे. त्यामध्ये प्रथम एम.आर.टी.पी. ॲक्टचे कलम ५२ नुसार प्रथम नोटीस बजावली आहे. नंतर सुनावणी दिली गेली. त्यानंतर आदेश सुध्दा पारीत झाला आहे. हे जे बांधकाम आहे ते जुने आहे असा त्यांनी दावा केला होता. व जे बांधकाम झाले होते तेही प्लास्टर व काही किरकोळ दुरुस्तीचे असा त्यांचा दावा होता. बांधकाम जुने असो किंवा त्यांचे दुरुस्तीचे काम असो त्यांनी तेथे जे काही काम केले आहे, ते बिना परवानगीने केले आहे. एम.आर.टी.पी. ॲक्टनुसार महानगरपालिकेची जी परवानगी घेणे आवश्यक आहे ती परवानगी न घेता त्यांनी काम केले आहे. आणि त्यामुळे जे आदेश पारीत झाले आहेत, ते आदेश त्यांची जी पुर्ण इमारत आहे जेवढे काही चटई क्षेत्राचे उल्लंघन करुन केलेले बांधकाम आहे त्यांना जो बॅरेक मिळालेला आहे त्याचे क्षेत्र सोडुन बाकीचे जे अनाधिकृत बांधकाम झालेले आहे, ते पुर्ण अनाधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याचा आदेश दिला आहे. त्यांना ३० दिवसाची मुदत दिलेली आहे, त्यांनी ते निष्कासीत करायचे आहे. त्यांनी ते निष्कासीत केले नाही तर महानगरपालिकेच्या वतीने ते बांधकाम निष्कासीत केले जाईल व याकामी झालेला खर्च त्यांच्याकडुन वसुल केला जाईल. आपण जर आदेश पाहिला तर आदेशामध्ये हे स्पष्टपणे लिहिलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—</u> मा. आयुक्त साहेब, शहरामध्ये जेवढी काही बांधकामे चालु आहेत तुम्ही त्या सर्वांना नोटीस बजावता का? किंवा तुम्ही नोटीस कुणा—कुणाला बजावता? त्याची तुम्ही व्याख्या दया की अशा—अशा बांधकामांना आम्ही नोटीस बजावतो, अशा—अशांना नोटीस बजावत नाही, अशा—अशांना नोटीसा बजवायच्या नाहीत हे सर्व आम्हांला स्पष्ट सांगा ना. सर्व चालु बांधकामांना तुम्ही नोटीस बजावता का?

<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:—</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो, कुणी माणुस आपल्या घरामध्ये किचनचे बांधकाम करत आहे, दुरुस्ती करत आहे त्याच्या घरामध्ये शिरुन महापालिकेचे कर्मचारी त्याचे किचनचे बांधकाम तोडुन येतात व हे जे बांधकाम होत आहे त्यास ३० दिवसाची नोटीस बजावता अशी दुहेरी भुमिका असता कामा नये. एकच भुमिका असली पाहिजे.

**मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. संजय बठिजा हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> मा. महापौर महोदया, प्रशासनाच्या वतीने कोणतीही दुहेरी भुमिका किंवा कुणाचे संरक्षण करण्याची भुमिका घेतलेली नाही. आपण जर श्री. सोपान मारुती थोपटे विरुध्द पुणे महानगरपालिका या प्रकरणाबाबत उच्च न्यायालयामध्ये जो निर्णय झालेला आहे, तो जर पाहिला तर जे चालु बांधकाम आहे, जे आज होत आहे. त्यास नोटीस देवुन २४ तासात तोडले जावु शकते. जे बांधकाम नोटीस दिल्यानंतर पुन्हा झाले, ते सुध्दा २४ तासाची नोटीस देवुन तोडु शकतो. जे बांधकाम अगोदर झालेले आहे व ज्याची महानगरपालिकेच्या मिळकत कर दप्तरी नोंद आहे. व दोन वर्षापेक्षा जास्त काळ त्यास कर आकारणी झालेली आहे त्यास कमीत कमी १५ दिवसाची नोटीस देणे जरुरीचे होते. व जे बांधकाम त्यापेक्षा जास्त कालावधीचे आहे त्याबाबत एम.आर.टी.पी. ॲक्ट जर आपण पाहिला , एम.आर.टी.पी. ॲक्ट नुसार जर नोटिस दयायची झाली तर कमीत कमी ३० दिवसाची नोटीस देणे जरुरीचे आहे. हे अतिशय जुने बांधकाम आहे. त्याची दुरुस्ती केली आहे. जे ही बांधकाम आहे, जुने जरी असेल तरी बेकायदेशीर आहे. माझ्यामते त्यांच्याकडे जी सनद आहे त्यामधील क्षेत्रापेक्षा ५ पट क्षेत्राचे तेथे बांधकाम झालेले आहे. त्यांना

जी जागा वाटप झालेली आहे, त्या जागेचे जे क्षेत्र आहे तेथे जवळ जवळ ३२०० चौरस फुटाचे बांधकाम आहे. याचाच अर्थ त्यांना जे ३८० चौरस फुटाचे बांधकाम परवानगी योग्य आहे, त्यापेक्षा अधिक बांधकाम अनाधिकृत आहे व ते पुर्ण बांधकाम अनाधिकृत असल्याचे घोषित केले आहे. आम्ही जी स्पिकींग ऑर्डर पारीत केली आहे, त्यामध्ये ते बांधकाम अनाधिकृत असल्याचे घोषित केले आहे. हे जे श्री. सोपान मारुती थोपटे विरुध्द पुणे महानगरपालिकेचे प्रकरण मी सांगत होतो त्यामध्ये बांधकामाचा प्रकार व कालावधी जो आहे तो दिला आहे जर अस्तिवातील बांधकाम जुने असेल तर १५ दिवसाची नोटीस देणे बंधनकारक आहे. बांधकाम निष्कासीत केल्यानंतर एक वर्षात जर पुन्हा बांधले असेल तर त्यास २४ तासाची नोटीस दयायची आहे.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:— मा. आयुक्त साहेब, मी आपणांस जे सांगितले की, कुणी व्यक्ती आपल्या घरामध्ये किचनची दुरुस्ती करीत आहे त्याच वेळेस आपले अधिकारी, कर्मचारी तेथे जावुन तोडुन येतात. आता आपण आम्हांस सांगितले की, ज्याच्या मिळकतीची २ वर्षापुर्वी मिळकत कर रजिस्टर मध्ये नोंदणी झालेली आहे अशा मिळकती बाबत १५ दिवसाची नोटीस दिली पाहिजे. परंतु कुणी व्यक्ती जर किचनची दुरुस्ती करत आहे त्यास आपण १५ दिवसाची नोटीस थोडी दिली आहे? बाहेर पाहिले तर रेती पडली आहे, विटा पडल्या आहेत, काही तरी काम चालु आहे. असे पाहुन घरात शिरले व चालु असलेल्या किचनच्या दुरुस्तीचे काम तोडुन टाकले. याबाबत मी आपले लक्ष वेधले. आपण म्हटलात की जुन्या बांधकामाला १५ दिवसाची नोटीस दिली पाहिजे.

**मा. सदस्या श्रीमती कोमल बठिजा, श्रीमती मोना वनवारी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— मा. महापौर महोदया, जे बांधकाम चालु आहे, बांधकाम जर अगोदर झालेले असेल, जे बांधकाम चालु आहे कुणी जर भिंत बांधत असेल किंवा कुणी दरवाजा बदली करत असेल, आता कुणी जे काही बांधकाम करत असेल ते चालु बांधकाम म्हणुन संबोधीले जाईल. त्यास २४ तासाची नोटीस दयायची आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:— अशी २४ तासाची नोटिस तुम्ही दिली असेल तर त्याचे उदाहरण दया. शहरामधील, गलिच्छ वस्त्यांमधील चालु बांधकामे कुणाचे, किचनचे ओटे, संरक्षण भिंत तोडली, पत्रे काढले त्यांना तुम्ही नोटीस दिली का २४ तासाची? तुम्ही २४ तासाची नोटीस दिली नाही हा माझा तुमच्यावर आरोप आहे. तुम्ही थेट जावुन अशी बांधकामे तोडली आहेत. तुम्ही तुमच्या अधिका—यांना विचारा २४ तासाची नोटिस दिली आहे का? साहेब, आम्ही सांगतो दिली नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:— आपल्या भुमिकेवर आम्हांला काही संशय नाही. परंतु आपले अधिकारी आपल्या अधिकाराचा गैरवापर करत आहेत. आपण त्यांच्यावतीने नाही म्हणु नका. आम्ही आपणांस शेकडो उदाहरणे देवु शकतो. कारण की, त्यांनी जागेवर जावुन अशी तोडफोड करणे सुरु केले आहे. २४ तासाची नोटीस न देता.....

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:— साहेब, मी १० उदाहरणे देतो, १०, .....

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी:— हे स्वत: म्हणतात २४ तासाची नोटीस दिली पाहिजे. तर मग ती का नाही दिली? हे आपण त्यांना विचारा ना?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:— माझ्या येथे एक हेमंत भानुशाली नावाचे गृहस्थ आहेत, त्याचे बांधकाम तोडुन टाकले त्याला तुम्ही नोटीस दिली का? अधिका—यांना विचारा, श्री. पारकर यांचे शौचालय तोडले. त्यांना नोटीस दिली का?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— मा. महापौर महोदया, मी सभागृहासमोर प्रत्येक प्रकरण जे आहे प्रत्येक निष्कासनाची संचिका ठेवु शकतो. आम्ही आता जे आदेश दिले आहेत त्यामध्ये आमचे निरिक्षक, प्रभाग क्षेत्र अधिकारी त्यांना सक्त सुचना दिल्या आहेत की प्रत्येक बांधकाम निष्कासीत करण्याअगोदर त्याचा

पाहणी अहवाल , त्यांनतर नोटीस, नंतर आदेश, त्यानंतर निष्कासन, नंतर पंचनामा, व निष्कासनाचे फोटो, फोटो २ वेळचे, एक बांधकामाचे फोटो व बांधकाम निष्कासीत झाल्यानंतर त्या जागेचे फोटो. हे सर्व एका फाईलमध्ये ठेवणे जरुरीचे आहे. व ती फाईल मी स्वतः पाहिली आहे. आज जे काही बांधकाम निष्कासीत होत आहे त्यास २४ तासाची नोटीस दिली जात आहे. त्याचे फोटो घेतले जात आहेत. व ही पध्दत आता आम्ही १५, २० दिवसापासुन सुरु केली आहे. श्री. सोपान मारुती थोपटे यांचे जे प्रकरण मी येथे सांगत आहे, त्या प्रकरणामध्ये मुंबई उच्च न्यायालयाने मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत की कोणत्या प्रकारे निष्कासन झाले पाहिजे व निष्कासनाची जी प्रक्रीया आहे ती प्रक्रीया आम्ही १०० टक्के आता अंगिकारत आहोत.

**मा. सदस्य श्री. नाना पवार, श्री. राज असरोंडकर, श्री. शांताराम निकम यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आता आपण पुणे महानगरपालिकेचे उदाहरण दिले आणि सांगितले की, आम्ही ही प्रक्रीया १५ दिवसापासुन राबवत आहोत. लोकांना २४ तासाची नोटीस देत आहोत. ज्यांना कर आकारणी झालेली आहे त्यांना १५ दिवसाची नोटिस देतो परंतु या बांधकामा बाबतीत मी ७/६/२००५ ला तक्रार केली होती. तेव्हा तुमचे हे धोरण नव्हते. त्यावेळी त्याला कशी एक महिन्याची नोटिस दिली? त्यावेळी त्याचे बांधकाम चालु होते, तेव्हा त्यास २४ तासाची नोटिस देवुन त्याचे बांधकाम निष्कासीत करावयास पाहिजे होते. तर ही जी तुमची भुमिका आहे ही संशयास्पद आहे. आणि ज्या झोपडपट्टयांमध्ये लोकांकडे मिळकत कराच्या पावत्या आहेत त्यांच्याकडील बांधकाम तोडतांना त्यांना २४ तासाची नोटिस दिली आहे असे जे तुम्ही म्हणत आहात त्यावर आम्ही सांगतो की, अशी काही नोटिस दिलेली नाही दिली असेल तर २४ तासाची का? त्यांना पण १५ दिवसाची नोटिस दयायला पाहिजे. त्याच्याकडेपण हाउस टॅक्सची पावती आहे. जेव्हा धो—धो पाउस पडत होता तेव्हा त्यांच्या घराचे बांधकाम निष्कासीत केले. पावसाचे पाणी विदयुत मिटरमध्ये गेले त्यामुळे शॉर्ट सर्कीट झाले. आणि आग लागली. आपल्या अग्निशमन दलाच्या गाडया तेथे बोलवाव्या लागल्या. अग्निशमन दलाकडे त्याचा अहवाल आहे. अशा लोकांना जर आपण एका बाजुला एक न्याय देत असाल आणि दुस—या बाजुला मोठया बांधकाम व्यवसायिकांना वेगळा न्याय देत असाल तर आपली ही भुमिका चुकीची आहे.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:—** आणि त्यात जर तुमच्या अधिका—यांनी त्यांना नोटिस दिलेली नसेल तर अशा अधिका—यावर तुम्ही काय कारवाई करणार? साहेब मी तुम्हांला उदाहरण देतो.

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—** मा. महापौर महोदया, ही जी प्रक्रिया आम्ही ठरवुन दिली आहे तिचा अंगिकार न करता जर कुणी निष्कासनाची कारवाई करत असेल तर त्याच्यावर आम्ही योग्य ती कारवाई करु.

**मा. सचिव :—**चर्चा अर्धवट राहिलेला प्रश्न क्र. ४०४ पुन्हा घेण्यात येत आहे.

**मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—** मा. महापौर महोदया, प्रश्न क्र. ४०४ बाबत येथे जो उल्लेख केला तर त्या बांधकामाचे बांधकाम पुर्णत्वाचा जो दाखला आहे, तो त्यांना दिलेला नाही. परंतु अंशतः बांधकाम पुर्णतवाचा दाखला त्यांना २५/८/२००३ रोजी दिलेला आहे. ही जी पुर्ण संचिका माझ्यासमोर आहे त्यातुन हे प्रतीत होते की, नगररचनाकारांनी आयुक्तांसमोर जो प्रस्ताव ठेवला होता त्यामध्ये पुढील बाजुच्या समासिक अंतरामध्ये सुध्दा शिथीलता सुचविली होती नगररचनाकारांची ३/१२/२००२ ची जी टिप्पणी आहे त्या टिप्पणीनुसार पुढच्या बाजुला ४.५० मिटर समासिक अंतर ठेवणे जरुरीचे होते. बाजुच्या समासिक अंतरामध्ये ३ मीटरचे अंतर सोडणे प्रस्तावित होते. व मागील बाजुस सुध्दा नियमानुसार ३ मिटर समासिक अंतर ठेवणे जरुरीचे होते. परंतु पुढच्या बाजुने फक्त २ मिटर, बाजुच्या बाजुना ३ मिटर म्हणजेच नियमानुसारच व मागील बाजुस फक्त दिड मिटरचे अंतर ठेवले आहे. याचाच अर्थ आहे की, पुढील बाजुस अडीच मिटरची शिथीलता दिली गेली. जी की आमच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार दिली नाही

पाहिजे. बाजुच्या समासिक अंतरामध्ये कोणतीही शिथीलता दिलेली नाही. व मागील बाजुच्या समाासिक अंतरामध्ये ३ मिटराऐवजी दिड मिटर जी शिथीलता दिली आहे, दिड मिटर शिथीलता देण्याबाबत आयुक्तांना अधिकार आहे. त्यामध्ये मला काही चुक वाटत नाही. परंतु पुढील बाजुस समासिक अंतरामध्ये जी शिथीलता दिली आहे ती चुकीची आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— साहेब, जर हे चुकीचे झाले आहे तर त्यावर काय कारवाई केली पाहिजे?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— मा. महापौर महोदया, जर चुकीची परवानगी जर दिली जात असेल किंवा काही चुकीच्या बाबी समोार ठेवुन परवानगी दिली जाते अशा वेळी ती परवानगी रद्द करण्याचे अधिकार आमच्या एम.आर.टी.पी. ॲक्टमध्ये आहेत. परंतु हे जे करायचे आहे ते इमारतीचे बांधकाम पुर्ण करायच्या आत, बांधकाम थांबविण्याची नोटिस अदयापपर्यंत या प्रकरणामध्ये दिलेली नाही ती कलम ५१ नुसारची नोटिस येथे सुध्दा दिली जावु शकतें अदयाप पर्यंत बांधकाम पुर्ण झालेले नाही, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला अदयापपर्यंत दिलेला नाही. फक्त अंशत: बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिलेला आहे. सध्या बांधकाम पुर्ण झालेले नाही. बांधकाम थांबविण्याची शक्यता पडताळणी करण्याचे काम सुध्दा कायदेशीर सल्ला घेवुन आम्ही करु शकतो.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— विकास आराखडयामध्ये दर्शविलेला जो रस्ता आहे जो राज्य महामार्ग आहे. त्यावरील एखादया बांधकामाची परवागनी जेव्हा आम्ही मंजुर करतो तर आम्हांस त्यास ४० टक्के चटई क्षेत्र निदर्शाांक दयायचा आहे येथे १०० टक्के दिला आहे. ते कायदयानुसार बरोबर आहे का? विकास आराखडयातील नियमानुसार जेव्हा आम्ही राज्य महामार्ग शेजारी एखादया भुखंडाची बांधकाम परवानगी मंजुर करतो तेव्हा आपणांस त्यास ४० टक्के चटईक्षेत्र निर्देशांक दयायचा आहे. येथे तर त्यास १०० टक्के दिला आहे. ते नियमानुसार बरोबर आहे का?

मा. सदस्या श्रीमती नंदिनी बामणकर या सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— दाखवा जरा कुठे आहे? कोणत्या विकास नियंत्रण नियमात ४० टक्के चटई क्षेत्र निर्देशांक दयायचा आहे?

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— आपण म्हटलात १०० टक्के तर मुद्दा येथेच संपला ना? आपण १०० टक्के म्हणता मुद्दा येथेच संपला.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— नाही. असे नाही. जेव्हा सदस्यास बोलायचे आहे तेव्हा त्यांनी कायदयानुसारच बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :— मी जबाबदारी नुसार बोलत आहे. कायदयानुसारच बोलत आहे. माझ्यापेक्षा आपणांस जास्त माहित आहे म्हणुन आपण म्हणत आहात १०० टक्के, मला ही माहिती घेवुन उच्च न्यायालयात जायचे आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— प्रश्न विचारले जातात माहिती घेण्यासाठी. प्रश्न आपले स्वत:चे ज्ञान वाढविण्यासाठी विचारले जात नाहीत.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :— माझे ज्ञान वाढविण्यासाठी हा प्रश्न विचारलेला नाही. मला हे प्रकरण उच्च न्यायालयात घेवुन जायचे आहे. माझे म्हणणे आहे की, राज्य महामार्गाशेजारी भुखंडावर ४० टक्के चटई क्षेत्र निर्देशांक दिला पाहिजे. परंतु तो १०० टक्के दिला आहे. ते कायदयानुसार बरोबर आहे का? नसेल तर नाही म्हणा.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांने कृपया जरा बसुन घ्यावे. मा. महापौर महोदया, येथे स्थिती अशी आहे हा जो भुखंड आहे तो विकास आराखडयामध्ये दर्शविलेल्या

१०० फुट रुंद रस्त्यामध्ये बाधित होतो. त्यामुळे जे क्षेत्र रस्त्यामध्ये येते ती जमिन, तो जो भुखंड आहे, जेथुन १०० फुट रुंदीचा रस्ता जातो, ती जमिन महानगरपालिकेला दिली जाते. व उर्वरीत जो भुखंड आहे त्यावर त्याचा उर्वरीत चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यास परवानगी दिली जाते. हे आहे विकास नियंत्रण नियमावलीनुसार. ही जी परवानगी दिली जाते ती उदाहरण देवुन मी आपणांस सांगु इच्छितो जर १० हजार चौरस फुटाचा भुखंड असेल त्यातील २ हजार चौरस फुट जागा कुणी महानगरपालिकेस देत असेल तर त्यांचा जो भुखंड उरतो तो ८ हजार चौरस फुटाचा. त्यावर त्यांना जी बांधकाम परवानगी मिळाली पाहिजे, विकास नियंत्रण नियमावलीनुसार येथे चटई क्षेत्र निर्देशांक १ परवानगी योग्य आहे. म्हणजेच त्यांना त्या उर्वरीत ८ हजार चौरस फुट भुखंडावर १० हजार चौरस फुटाचे बांधकाम परवानगी योग्य आहे. परंतु जर त्यांचे १० हजार चौरस फुटाच्या ऐवजी त्यांचा भुखंड ४ हजार चौरस फुटच वाचत असेल तर हा जो ६ हजार चौरस फुटाचा चटई क्षेत्र निर्देशांक आहे तो पुर्णच्या पुर्ण चटई क्षेंत्र निर्देशांक या ४ हजार चौरस फुटाच्या जागेवर वापरु शकत नाही. त्यामध्ये फक्त ४० टक्के निर्देशांक त्यांना अनुज्ञेय आहे. म्हणजेच उरलेले जे ४ हजार चौरस फुटाचे क्षेत्र व जे ६ हजार चौरस फुटाचे क्षेत्र जे त्यांनी आम्हांला दिले त्याचे ४० टक्के म्हणजेच २४०० जे क्षेत्र उरलेल्या ४ हजार चौरस फुट क्षेत्रावर ते ६ हजार ४०० चौरस फुटाचे बांधकाम करु शकतात. विकास नियंत्रण नियमावलीतील नियमानुसार येथे नगररचनाकार आहेत मी जर चुकीचे बोलत असेल तर त्यामध्ये ते सुधारणा करु शकतील. परंतु ही विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद आहे की भुखंडाचे किती क्षेत्र वाचते? जर १० हजारामधुन ९ हजाराचे क्षेत्र वाचत असेल तर ४० टक्के ते वापरु शकतात म्हणजेच पुर्ण १० हजारचे १० हजार क्षेत्र ते वापरु शकतात. येथे किती क्षेत्र वाचते ते जरा संबंधित अधिका—यांनी तपासुन पहावे. तेथे ४० टक्यापर्यंतचे क्षेत्र त्यांना परवानगी योग्य करु शकतो. १० हजार चौरस मिटर क्षेत्र असेल तर १० हजार चौरस मिटरच मिळेल परंतु जर भुखंडाच्या आकारात जर लहान होत असेल तर त्यावर पुर्णच्या पुर्ण चटई क्षेत्र निर्देशांक ते वापरु शकत नाहीत. म्हणुन पुर्ण भुखंडाचे क्षेत्र किती आहे ते जरा मला सांगावे. याप्रकरणामध्ये पुढच्या बाजुच्या समासिक अंतरामध्ये सुट दिली गेली जे चुकीचे आहे. परंतु हे सत्य आहे. परंतु जो काही चटई क्षेत्र निर्देशांक वापरला जो भुखंडाच्या क्षेत्रावर अवलंबुन असतो, मा. महापौर महोदया, येथे भुखंडाचे एकुण जे क्षेत्र आहे ते ३४० चौरस मिटर आहे. ३४०.१३ चौरस मिटर त्यामधील रस्त्यासाठी जी वजावट आहे ३२.६२ , प्रस्तावित रस्त्यासाठी ८२.११ हे अ+ब+क जे आहे क चे जर आरक्षण असेल तर या तिघांची बेरीज ११४ होते. ३४० मधुन ११४ चौरस मिटर जागा रस्त्यासाठी गेली, त्यानंतर त्यांच्याकडे जी जागा वाचते, ती २२५.४० जागा वाचते. एवढी जागा वाचल्यानंतर त्यांनी जो प्रस्तावित बांधकामाचे क्षेत्र दर्शविले आहे ते ३३८ एवढे क्षेत्र प्रस्तावित केले आहे. चटई क्षेत्र निर्देशांक ०.९९ वापरला आहे. हा ०.४० च्या हिशोबाने जास्त वापरला आहे. ही सुध्दा दुसरी चुक कदाचित येथे आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> त्यानंतर जे बेसमेंट आहे तो २.४ मंजुर केला पाहिजे. परंतु मंजुर करतांना तो ३ मिटरचा मंजुर केला आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— </u>बेसमेंट किती असले पाहिजे?

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> २.४ बांधकाम नकाशातील नियमानुसार.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— </u>बसमेंटची उंची?

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> परंतु त्यास ३ मिटरची उंची मंजुर केली आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— </u>३.०४ मंजुर केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> ती २.४ असली पाहिजे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— </u>कदाचित ती कमीत कमी असेल.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> जास्तीत जास्त....

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— </u>जास्तीत जास्त? चांगले आहे आपणांस सुध्दा अधिक माहिती मिळाली आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> साहेब, अधिक माहिती घ्यावी लागते अशा प्रकरणांमध्ये. माझ्यामुळे यापुढे सर्वांना माहिती मिळेल ना?

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> बेसमेंट बाबत विकास नियंत्रण नियमावलीमध्ये ही जी तरतुद आहे, ती मी आपणांस वाचुन दाखवितो. बेसमेंट शॅल हॅव फोलोविंग रिक्वारमेंट, एव्हरी पार्ट, एट लिस्ट २.४ मिटर इन हाईट फॉर्म द फ्लोअर टु द अंडर साईड ऑफ द रुफ, स्लॅब ऑर सिलिंग. मिनिमम हाईट इज गिवन, मिनिमम हाईट इज २.४ मीटर, मॅक्झीमम हाईट इज, हिअर इज नॉट गिवन.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> या प्लॉन मध्ये खुपशे .........

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> कमीत कमी २.४ ही कमीत कमी उंची आहे. परंतु दोन व्हायोलेशन या प्लॅन मध्ये दिसत आहेत. चटई क्षेत्र निर्देशांक ०.९९ जो दिला गेला आहे, त्याबाबतची तपशीलवार माहिती घेवु या. व पुढच्या समासिक अंतराचे जे शिथीलता दिली गेली आहे जे चुकीचे आहे, व नगररचनाकाराने जी पण टिप्पणी ठेवली आहे ती व तत्कालीन आयुक्त महोदयांनी त्यास मान्यता दिली आहे जी पुढच्या समासिक अंतराची दिली नको हवी होती ती दिली गेली आहे. तर त्यात........

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> ज्या लोकांनी काम केले आहे..........

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> कलम ६, त्याच्या परवानगी बाबत त्यांनी विचारणा केली आहे. तेथे पुढच्या बाजुला ४.५० मीटर सामासिक अंतर बरोबर ठेवलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> साहेब, आपले हे जे उत्तर आहे हा जो बांधकाम नकाशा मंजुर केला आहे त्यामध्ये पुढच्या बाजुला ३.४ समासिक अंतर सोडलेले आहे, हे मी नाही बोलत. आपले उत्तरच बोलत आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u>दाखवा, दाखवा. प्रश्न क्र. ४०४ च आहे?

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> हो साहेब, ४०४ मध्ये ३ जागांचा प्रश्न होता.........

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> यात उत्तर नाही, या फाईलमध्ये उत्तर नाही आहे. आपल्याला उत्तरामध्ये ते दिलेले नाही. मंजुर विकास आराखडयानुसार ४.५० मीटर आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> परंतु त्याने तिथे ३.५० मीटर समासिक अंतर सोडले आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> जागेवर त्याने तेवढे अंतर सोडले नसेल तर ते डिव्हेशन आहे. ती त्यांची चुक आहे. जागेवर विकासकर्त्याने सामासिक अंतर सोडले नसेल तर ........

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> म्हणजेच तेथे चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे?

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> नाही, जागेवर काय आहे ते आता मला माहित नाही. जी फाईल माझ्यासमोर आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> साहेब, आपल्याच सहीचे उत्तर आहे. मी नाही तयार केले हे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> नाही, मंजुर विकास आराखडयानुसार जे उत्तर आहे, ते बरोबर आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> त्यानुसार ४.५० मीटर आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> होय, ४.५० मीटर.

<u>मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :—</u> परंतु तेथे ५.५ समासिक अंतर सोडले पाहिजे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— नाही, ४.५ समासिक अंतर सोडले पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :— ठिक आहे, व तेथे बाल्कनीमध्ये जी मार्जिन दिली आहे ती १० टक्के दिली पाहिजे तेथे ३३ टक्के दिली आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— नकाशा मंजुर करतांना विकास नियंत्रण नियमावलीचे मंजुर नियम आहेत व जे प्रस्तावित नियम आहेत या दोघांमधील जे कठोरात कठोर नियम आहेत, त्यानुसार त्यांना जी बाल्कनी अनुज्ञेय होती, त्यापेक्षा जास्त अनुज्ञेय केली. त्यामुळे या जागेवर जवळ–जवळ १०१ चौरस मीटर जास्त बांधकाम केले आहे त्यांनी जे अंशत: बांधकाम पुर्णत्वाच्या दाखल्यासाठी अर्ज केला होता, तो आम्ही नाकारला आहे.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :— अंशत: बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिलेला नाही परंतु यामध्ये चटईक्षेत्राचे उल्लंघन आहे?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— व चटई क्षेत्र निर्देशांक सुध्दा जास्त वापरला आहे. मंजुर नकाशापेक्षा जास्त बांधकाम केले आहे. प्लॉन रिव्होक करावा लागेल.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :— विकास आराखडयानुसार व मंजुर बांधकाम नकाशानुसार एकच गॅरेजला मंजुरी दयायला पाहिजे होती. आपण दोन गॅरेज मंजुर केले आहेत.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— मा. महापौर महोदया, समोर हा जो नकाशा आहे तो पहाता गॅरेज एकच आहे. एकाच गॅरेजचे त्यांनी दोन भाग केले आहेत.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :— यांनी २ गॅरेजना बांधकाम परवानगी दिली आहे. आपला जो नगररचनाकार आहे ज्याने हा नकाशा मंजुर केला आहे याबाबत त्याच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :— आपणांस माहित असेलच त्या नगररचनाकारांनी जेवढया काही अनियमितता केल्या आहेत त्याबाबत आम्ही संचालक नगररचना विभाग यांना एक अहवाल पाठविला होता. त्याची त्यांनी प्राथमिक चौकशी सुध्दा केली. प्राथमिक चौकशीमध्ये जेवढा कठोर अहवाल यावयास पाहिजे होता तेवढा कठोर तो आला नाही. त्यांनी अंबरनाथमध्ये सुध्दा काही अनियमितता केली. त्यांना सेवेतुन बडतर्फ करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. माझ्यामते त्यावर अदयाप अंतिम निर्णय झालेला नाही. परंतु आमच्याकडे जे पण नगररचनाकार होते त्यांच्या काम करण्याच्या पध्दतीवर आम्ही नगर विकास विभागास एक अहवाल पाठविला होता. संचालक नगररचना विभाग यांनाही रिपोर्ट पाठविला होता. नगररचनाकार यांनी प्रस्तावाची छाननी करतांना काही चुका केल्या आहेत यांनी जेवढया काही प्रस्तावाच्या छाननी केल्या आहेत ते सर्व प्रस्ताव काढले तर प्रत्येक प्रस्तावात काहीना काही अनियमितता यांनी केलेली आहे. काही मध्ये कठोर तरतुद पाहिलेली नाही. आजच्या तारखेला असे ४०० बांधकाम नकाशे आमच्याकडे पडुन आहेत ज्यांना आम्ही बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देवु शकत नाही. कारण की, बांधकाम नकाशा मंजुर करतांना नगररचनाकाराने मंजुर विकास नियमावलीतील नियम व प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीतील नियम यातील कठोरातत्मक कठोर तरतुद लक्षात घेतली नाही.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :— साहेब, या बांधकाम नकाशामध्ये जो तक्ता आहे, त्यामध्ये पॉईंट दर्शविला नाही, कोणता पॉईंट कुठे आहे? नकाशा पहा येथे कोठेही नाही. हे जावु दया आता दुसरा घ्या.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:— मा. आयुक्त साहेब, याच बांधकामाबाबत मी माहितीच्या अधिकारान्वये प्रश्न विचारलेला होता त्यावेळेस नंतरचे नगररचनाकार श्री. सोनवणे साहेब यांनी मला लेखी उत्तर दिलेले आहे की, हे जे बांधकाम आहे ते कायदेशीर बांधकाम आहे. यामध्ये चटई क्षेत्राचे उल्लंघन अजिबात नाही. तर कोणत्याही नगररचनाकाराने जर बेजबाबदारपणे उत्तर दिले असेल तर त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. माहितीच्या अधिकारान्वये याबाबत माझ्याकडे उत्तर आहे ते मी आपणांस दाखवितो. जर आम्हांला तुम्ही

चुकीची माहिती देत असाल एका सन्माननिय सदस्यांला चुकीची माहिती देत असाल तर हे चुकीचे आहे. आणि त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– आपल्या महानगरपालिकेसमोरचे ख्रिस्ती क्लासेस रुम नं. ७०९ समोर, बॅ.नं. ७८४, शिट नं. ५० कॅम्प नं. ३ यांनी बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :–मा. महापौर महोदया, हे जे तिसरे बांधकाम, भुल्लर महाराज यांनी दर्शविले आहे, यामध्ये बाल्कनी त्यांनी समाविष्ट केली आहे. त्यामुळे त्यांना अदयापपर्यंत बांधकाम पुर्णत्वाचा दाखला दिलेला नाही.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– बाल्कनी तर समाविष्ट केलीच आहे. त्याचबरोबर ४ फुटचा लाफ्ट मंजुर केला असतांना ६ फुटाचा लाफ्ट तयार केला आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :–त्याबाबत सुध्दा जागेवर पहाणी करुन जर काही चटई क्षेत्राचे उल्लंघन आहे असे आढळुन आले तर त्यांना नोटीस बजावली जाईल.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– समोर तीन मीटरचे समासिक अंतर सोडले आहे. काय ते नियमानुसार बरोबर आहे का?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :–जे समासिक अंतर सोडले आहे ते कायदयानुसार बरोबर आहे.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– आताच आपण ४.५० फुट समासिक अंतराबाबत सांगत होतात व या बांधकाम नकाशामध्ये ३ मीटर समासिक अंतर सोडले आहे असे दाखविले आहे. ४.५० व ३ मीटर यामध्ये काही फरक आहे की नाही? नाही, ३ मीटर त्याने समासिक अंतर तर सोडलेले नाहीच परंतु येथे ते सोडल्याचे दर्शविले आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :–हा जो बांधकाम नकाशा आहे या बांधकामकर्त्याने नियमानुसार रस्त्यापासुन ३ मीटर समासिक अंतर सोडावयास पाहिजे होते. त्यांनी ३.०४ मीटर समासिक अंतर सोडण्याचे प्रस्तावित केले आहे त्या हिशोबाने त्याने ते ठेवले आहे.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– ४.५० मीटर समासिक अंतर सोडणे या ठिकाणी जरुरीचे नाही?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :– हा जो बांधकाम नकाशा आहे यासाठी ४.५० मीटर समासिक अंतराची आवश्यकता नव्हती. छाननी अहवालानुसार इमारतीची जी उंची आहे व प्लॉटची जी साईज आहे त्या हिशोबाने प्लॉटची साईज १३९.८७ चौरस मीटरची आहे. व त्या हिशोबाने जे समासिक अंतर सोडायचे होते ते त्यांनी ठेवले आहे. जागेवर आमचा जो रस्ता तयार झालेला आहे तो रस्ता पुढे घेतलेला आहे. तेथे रस्त्याची जी रुंदी आहे ही जागा खाली होती. त्यामुळे रस्त्याची रुंदी मागे घेण्यात आली. व त्यांचे जे समासिक अंतर आहे त्यामध्ये आमचा फुटपाथ येत आहे.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– म्हणजेच तेथे ४.५० मीटर समासिक अंतर सोडणे जरुरीचे नाही?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :– ३ मीटर जरुरीचे आहे. छाननी अहवाल नुसार, त्यापेक्षा जास्त अंतर त्यांनी प्रस्तावित केले होते.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– ३ मिटर समासिक अंतर तेथे आजसुध्दा नाही.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :– ३ मीटर समासिक अंतर आपणांस तेथे मिळणार नाही, त्याचे कारण हे आहे की, जवळ–जवळ ३.५० फुट म्हणजे जवळ–जवळ १ मीटरचा फुटपाथ आम्ही तेथे तयार केला होता. सार्वजनिक रस्त्याची जी रुंदी आहे त्यापेक्षा जास्त.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– व त्या प्लॉनमध्ये आपण एक कठडा मंजुर केला आहात. विकास आराखडयानुसार असा कठडा मंजुर करु शकतो का?

श्री. गुरगुळे (नगररचनाकार) :– मा. महापौरजी, बाजुच्या समासिकेमध्ये ओटा असतो तो मंजुर केला जातो. पुढच्या बाजुच्या समासिकेमध्ये ओटा मंजुर केला जात नाही.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर व श्री. रमेश चव्हाण:– परंतु येथे तर मंजुर केले आहे. येथे ओटा मंजुर केलेला आहे. तर मग हे सुध्दा चुकीचे काम आहे. त्यानंतर १० फुट असे जे अंतर आहे त्यामध्ये आपण जिना मंजुर केला आहे. विकास आराखडयानुसार आपण असा जिना मंजुर करु शकत नाही. येथे आपण त्यास जिना मंजुर केला आहात. विकास आराखडयातील नियमानुसार त्या जागी जिन्यास मंजुरी देवु शकत नाही.

श्री. गुरगळे (नगररचनाकार) :–पुढील बाजुच्या समासिकेमध्ये हा जो ओटा दर्शविला आहे, जिना दिला आहे. वर चढण्यासाठी ....

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी, श्री. अनिल जयसिंघानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– नकाशामध्ये ओटा आहे. नकाशाची प्रत माझ्याकडे सुध्दा आहे. त्यामध्ये ओटा दर्शविलेला आहे. त्यानंतर जिना दाखविला आहे. एवढयाश्या जागेमध्ये विकास आराखडयाच्या नियमानुसार आपण जिना मंजुर करु शकता किंवा नाही हे सांगा. मला फक्त उत्तर पाहिजे बाकी काही नाही.

श्री. गुरगुळे (नगररचनाकार) :–समोरच्या समासिकेमध्ये ज्या बांधकामास मंजुरी दिलेली आहे, ते बांधकाम ओटयाचे नसुन पाय–यांचे आहे.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– पाय–या नाहीत ओटा आहे.

श्री. गुरगुळे (नगररचनाकार) :–जिन्याची जी समासिका आहे त्यामध्ये ओटा बनविलेला आहे. तो मोठया जिन्याचा ट्रेड तयार केलेला आहे.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. राजेद्रंसिंह भुल्लर :– यामध्ये जेथे पण दोन बाजुला आपण जिना दिलेला आहे तेथे जिना तयार न करता दुस–या ठिकाणीच तो तयार केला आहे. व जेथे तो मंजुर केला आहे नियमानुसार तो तेथे मंजुर करता येवु शकत नाही. आता हा बांधकाम नकाशा रद्द करण्याची आपण नोटीस दयाल का? हा बांधकाम नकाशा चुकीच्या पध्दतीने मंजुर केला आहे. चटई क्षेत्राचे उल्लंघन केले आहे, समोर जो चार फुटाचा लाफ्ट दर्शविला आहे त्याऐवजी तो सहा फुटाचा तयार केला आहे.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :–यामध्ये सुध्दा जर काही अनियमितता असेल तर त्याची सुध्दा चौकशी केली जाईल व जर चुकीचे असेल तर बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबत नोटिस सुध्दा दिली जाईल. मा. महापौर महोदया, मी सभागृहासमोर हे जाणीव पुर्वक ठेवु इच्छितो की, या शहरामध्ये जे दोन नगररचनाकार होते श्री. मिलिंद सोनवणी, व श्री. एस.टी. शिंदे या दोघांनी त्यांच्या कार्यकालावधीत (स्क्रुटनी) छाननी करतांना ब–याचशा चुका केल्या आहेत. व त्याचमुळे आमच्याकडे कुणीही नगररचनाकार येण्यास तयार नव्हता. ते नेहमी आपल्याकडे येवु इच्छिणा–या नगररचनाकारांना चुकीची माहिती देवुन येथे येण्यापासुन परावृत्त करत होते. आम्ही बरेच प्रयत्न करुन नियमित स्वरुपाचा नगररचनाकार येथे आणलेला आहे. व आज सभागृहामध्ये कायदयाविषयी जी जागृतता मला दिसुन आली, त्याबाबतीत मला अतिशय आनंद होत आहे की, सदर नगरररचना संदर्भातील नियमाबाबत सभागृहातील सदस्य खुपच जागृत झाले आहेत. याचे चांगले परिणाम शहरात होतील. व शहराचे नागरीक सुध्दा, जसे आता लोकप्रतिनिधी जागृत झाले आहेत, नागरीकसुध्दा जागृत होतील. व आमच्या सारखे जे अधिकारी आहेत ते सुध्दा अधिक जागृत

होवुन बांधकाम नकाशा मंजुर करतील. मला एका गोष्टीची भिती आहे की, सभागृहात असे बोलले जाईल की, फारच लहान–सहान गोष्टीकडे लक्ष देतात त्यामुळे बांधकाम नकाशा मंजुर करण्यास विलंब लावत आहेत. हे होवु शकते की, त्यांनी ज्या चुका केल्या आहेत, त्या सुधारण्याची संधी आपल्या या प्रश्नाच्या माध्यमातुन आमच्या अधिका–यांना मिळाली आहे. व मी सभागृहामध्ये अश्वस्त करु इच्छितो की, ज्या काही लहान–लहान चुका होतात यापुढे त्याही होवु नये म्हणुन यासाठी संबंधीत अधिका–याला सक्त सुचना दिल्या जातील.

**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–** मा. महापौरजी, मी आपणांस जी सुचना केली त्यावर आपण आपला निर्णय दयावा.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–**मा. महापौरजी...........

**मा. सचिव :–** प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** मा. महापौरजी, आताच आमचे सन्माननिय सदस्य श्री. नारायण पंजाबी यांनी जे म्हटले की, प्रश्नोत्तराची जी वेळ आहे जसे की, मिरा–भाईंदरमध्ये ती अर्ध्या तासाची आहे. बाकी महानगरपालिकांमध्ये सुध्दा ही वेळ अर्ध्या तासाची आहे. व आता तर महाराष्ट्र माहितीच्या अधिकारान्वये प्रत्येक बाबीची प्रत्येकजण माहिती घेत आहेच. अर्जावर फक्त १० रुपयाचा स्टॅम्प लावुन माहिती मागायची आहे. त्यानुसार सर्वांना आवश्यक ती माहिती मिळत आहे. ८० टक्के लोक तर माहितीच्या अधिकारानुसार माहिती घेत आहेत. व तिसरे असे की, आता प्रश्नपण खुपच कमी येतात. आता खुपच कमी प्रश्न विचारले जातात. व प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाचा झाल्यामुळे ज्या कुणा सदस्याला प्रश्न विचारण्याची संधी मिळणार नाही. कधी कधी तर आमचे सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज किंवा अन्य कुणा सदस्याचा प्रश्न कधी कधी एक–एक तास सुध्दा चालतो. तर जोपर्यंत त्यांचे समाधान होत नाही तोपर्यंत त्यापुढील प्रश्न चर्चेस घेतला जात नाही. तर या सर्व गोष्टी लक्षात घेवुन प्रश्नोत्तराचा जो कालावधी आहे तो १ तासाच्या ऐवजी कमी करुन अर्धा तास केला तर फार चांगले होईल. आमच्या सर्व पक्षाच्या सदस्यांमधील पुरुष सदस्यांपेक्षा महिला सदस्यांना खुपच त्रासाचे व गैरसोयीचे होते कारण की सभेमध्ये ३–३, ४–४ तास त्यांना बसावे लागते. मला वाटते की, या विषयाबाबत सभागृहाचे मत घेवुन कारण की, सुचना तर सर्व बाजुने येतच राहतील. सभागृहाचे मत घेवुन मा. महापौर याबाबतीत निर्णय घेतील. मा. श्री. नारायण पंजाबी यांनी जे म्हटले त्यास मी सहमत आहे. व मा. महापौरजी याबाबत आदेश देतील अशी मी त्यांना विनंती करतो धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** मा. महापौरजी, उप–महापौरजी व सभागृहात उपस्थित असलेल्या सर्व सन्माननिय माझ्या सहकारी मित्रहो, प्रश्नोत्तराचा कालावधी कमी करण्याच्या शिफारसीस आम्ही प्रखर विरोध करीत आहोत. हे प्रश्न आम्ही विचारतोच कशासाठी? हा काही सत्ताधारी पक्षाचा किंवा विरोधी पक्षाचा प्रश्न नाही. आम्ही जो प्रश्न विचारतो ते यासाठी असतात की आम्हांला असे वाटते की, जसे आता आयुक्त साहेबांनी म्हटले की प्रशासनाकडुन काही चुका होतात. व त्यास सुधारण्याची संधी मिळाली पाहिजे. तर प्रश्न विचारण्याबाबत सर्वांच्या मनामध्ये ही एकच भावना असते की, मग भलेही ती जागा स्थानिक स्वराज्य संस्थेची असो, विधानसभा असो, लोकसभा असो, प्रश्न विचारण्यामागे हा एकच हेतु असतो की, प्रशासनामध्ये ज्या काही त्रुटी आहेत, काही चुका असतात त्या सुधारल्या जाव्यात. व मी हे सुध्दा पाहिले आहे की, प्रश्न कधी–कधी ६–६ महिन्यानंतर चर्चेस येत असतो. त्यामुळे प्रश्न विचारण्याचा हेतु जो आहे तो निष्फळ होतो. सर्व प्रश्नांचे समाधान झाले पाहिजे. कारण की, प्रश्नोत्तरासाठी अर्ध्या तासाचा कालावधी हा खुपच कमी आहे. व येथे आम्हांला आढळुन आले आहे की, प्रश्नांची प्रशासनाकडुन जी उत्तरे दिली जातात ती कधीही समाधानकारक नसतात. व ब–याचशा वेळा आयुक्त साहेबांना असे म्हणावे लागते की, या प्रश्नाचे उत्तर मी नंतर देईन. याबाबत सध्या माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. तर प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचाच असला पाहिजे. नाही तर मला असे वाटते की, जसा आपण महिलांचा मुद्दा उपस्थित करता, जेव्हा आपण निवडणुकीसाठी उभे राहतो तेव्हा म्हणतो की, आम्ही आपली २४ तास सेवा करु. व जेव्हा आम्ही महापालिकेत येतो तेव्हा म्हणतो की, आम्हांस ७ वाजता येथुन बाहेर पडायचे आहे. ७.३० वाजेपर्यंत बसायचे नाही. तीन तास आम्ही बसु शकत नाही. याचा नागरीकांमध्ये चुकीचा संदेश जाईल. जर जनतेची सेवा करायची आहे, प्रशासनामध्ये सुधारणा आणायची आहे तर त्यासाठी पुर्ण वेळ

दयावा लागेल. होवु शकते आपण एक दिवसाऐवजी महिन्यातुन दोन–दोन दिवस सभा घेतल्या तर त्याचेही आम्ही स्वागतच करु. परंतु आम्ही प्रश्नोत्तराचा कालावधी अर्धा तास करण्याच्या शिफारसीचा विरोध करतो.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. महापौर महोदया, १९९७ मध्ये जेव्हा पहिल्यांदाच आम्ही या महानगरपालिकेमध्ये सदस्य म्हणुन निवडुन आलो. त्यावेळेस प्रश्नोत्तराचा कालावधी अर्धा तास चालत होता. व त्यावेळेस एवढे काही प्रश्न जमा होत असत की, ६ महिने, ८ महिन्यानंतर आम्हांस प्रश्नाचे उत्तर मिळत होते. व त्यावर चर्चा होत होती. व आम्ही प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाचा ऐवजी एक तासाचा केला. व आज जेव्हा प्रश्नोत्तर योग्य प्रकारे चालु आहेत वेळेवर उत्तरे येत आहेत, चर्चा होत आहे तर अशा प्रकारे बहुमताच्या जोरावर मा. महापौर जर हा निर्णय घेत असतील की प्रश्नोत्तराचा कालावधी आम्ही अर्ध्या तासाचा करत आहोत, तर शहरासाठी हा निर्णय अतिशय दुर्भाग्य पुर्ण असा निर्णय होईल. यापेक्षा अधिक काही न बोलता मी हेच निवेदन करेन की, ज्या प्रकारे प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा चालु आहे तो तसाच चालु रहावा.

**मा. सदस्य श्री. महेंद्र मुलंचदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, आमचे सभागृह नेता कधी काही नविन गोष्टी काढतील हे काही सांगता येत नाही. १९९७ पासुन प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाचा होता तो यांनीच एक तासाचा केला. यांची मागणी होती सभागृहाचे मत होते. हे सर्व वेगळे होते. व आज नविन महापौर आले तर सभागृहाचे मत बदलले? आपले मत काय आहे ते नंतर येईल परंतु यांनी जी शिफारस केली आहे ती चुकीची आहे. प्रश्नोत्तराचा कालावधी कमी करण्यासाठी शिफारस करावयास नको होती. महिन्यातुन एकदा आम्ही सभागृहात येतो. उल्हासनगर शहरातील समस्या काय आहे ते आम्ही सभागृहात प्रशासनासमोर मांडतो. प्रशासन त्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करते. प्रशासन जर व्यवस्थीतपणे चालत नसेल तर ते व्यवस्थीत चालविण्यासाठी या सभागृहात आम्ही मूद्दे उपस्थित करतो. परंतु आपणाकडुन अशा प्रकारची जी भाषा येते ती प्रश्नोत्तर व सभागृहाची वेळ फुकट जाते हे म्हणणे बरोबर नाही. प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा होता तो एक तासाचाच राहिला पाहिजे. १९९७ पासुन ते आजपर्यंत कोणत्याही महापौराने त्यामध्ये बदल केला नव्हता. व मला आज सुध्दा खात्री आहे की, आपण सुध्दा हा कालावधी बदलणार नाहीत कारण की आम्ही कोणतेही वैयक्तीक प्रकरण घेवुन येथे चर्चा करत नाही तर उल्हासनगर शहराच्या समस्या घेवुन त्यावर विचार विर्मश करत असतो. व त्यासाठी ७ वाजेपर्यंतच काय ८ वाजेपर्यंत सुध्दा आम्ही थांबण्यास तयार आहोत. व याबाबत यापुर्वी सुध्दा आम्ही समर्थन केले आहे. व यापुढे सुध्दा समर्थन करु. अर्ध्या तासात जर प्रश्नोत्तरे पुर्ण होत असतील तर त्यापुढे आम्ही सभा सुचनेवरील नियमित कामकाज सुरु करु शकतो. यामध्ये असे नाही की, जर प्रश्नच कमी येत असतील तर त्यासाठी आम्हांला १ तासाची वेळ पुर्ण होण्याची वाट पाहावी लागेल? जर प्रश्नोत्तरे लवकर पुर्ण होत असतील तर सभा सुचनेवरील कामकाज चालवता येईल. परंतु जर ही वेळ कमी केली तर त्याचा परिणाम प्रश्नोत्तरावर होईल. व त्याचा योग्य असा परिणाम मिळणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, आमचे विरोधी पक्ष नेते, साहेबांनी जे म्हटले मला असे वाटते कदाचित त्यांनी सुरुवातीस बरोबर ऐकले नाही. हा मुद्दा सुरुवातीस श्री. नारायण पंजाबी यांनी उपस्थित केला. ते आपण ऐकले नाहीत. मी नविन नविन गोष्टी सभागृहात आणत नाही. सभागृहात कदाचित आपले लक्ष नाही. श्री. जमनादास पुरस्वानी यांचे एक निश्चित आहे की जेव्हा कधी ते बोलतात तेव्हा ते चुकीचेच असे काहीतरी बोलतात. दुर्भाग्य होईल, हे होईल, मोठ–मोठी भाषणे देतात, प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाचा केला तर दुर्भाग्य होईल? तर मेहरबानी करुन आपण सभागृहात शिष्टाचारपुर्वक बोलावे. तिसरे असे की, महाराष्ट्रातील कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये जावुन आपण पहा. कल्याण–डोंबिवली , ठाणे, मुंबई अशा महानगरपालिकांमध्ये कोणताही सदस्य जर प्रश्न विचारत असेल, त्यावर जर प्रशासनाने चुकीचे उत्तर दिले तर पुढील महासभेत त्याबाबत उपप्रश्न विचारला जातो. कधीही व कोणत्याही महानगरपालिकेत एका प्रश्नावर एक तास चर्चा होत नाही. एका प्रश्नावर चर्चा करण्यासाठी सदस्य एक तास उभा राहतो असे संपुर्ण भारतवर्षामध्ये कोठेच होत नाही. हे फक्त उल्हासनगरमध्येच होत आहे. माझी आपणांस विनंती आहे की, कृपया आपण कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेची महासभा बघून

यावी. तेथे जर कोणत्याही सदस्याच्या प्रश्नास प्रशासनाने जर चुकीचे उत्तर दिले तर त्यावरील उपप्रश्न पुढील महासभेत विचारला जातो. परंतु येथे तर एकाचे बोलणे होते ना होते तर दुसरा सदस्य बोलण्यास उभा राहतो. व म्हणतो की, माझा यावर उपप्रश्न आहे. तर हे सुध्दा १९९७ पासुन २००५ पर्यंत फक्त उल्हासनगर महानगरपालिकेतच चालते. बाकी पुर्ण भारतभर असे कुठेच चालत नाही. आपण प्रश्न विचारु नये. आपल्यावर बंधन आणावे असे काहीही नाही. अर्ध्या तासाच्या प्रश्नोत्तराच्या कालावधीत सुध्दा आपला प्रश्न चर्चेस येईल. कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेमध्ये पहिले पहिले जो कोणता विषय आला, तर सर्वात प्रथम प्रत्येक पक्षाचा गटनेता बोलतो. त्यानंतर विरोधी पक्ष नेता बोलतो नंतर सभागृह नेता बोलतो व त्यानंतर मा. महापौरजी निर्णय देतात. येथे तर सर्वच सदस्य बोलतात. एकेक विषयावर दहा–दहा, बारा–बारा, पंधरा–पंधरा लोक बोलतात. परंतु तेथे तसे नसते. प्रत्येक पक्षाचा गटनेता बोलतो. त्यानंतर विरोधी पक्ष नेता, त्यानंतर सभागृह नेता व अंतिमतः मा. महापौर निर्णय देतात. किंवा एखादया सदस्याचा महत्वाचा मुद्दा राहुन गेला असेल तर तो बोलतो. येथे तर आठ–आठ, दहा–दहा, पंधरा–पंधरा सदस्य बोलतात. एकाच वेळेस सात–सात सदस्य बोलण्यास उभे राहतात. एखादा असा विषय येतो त्यावेळेस ७–८ सदस्य बोलण्यास उभे राहतात. म्हणून कृपा करुन प्रश्नोत्तराची वेळ अर्ध्या तासाची केली जावी त्याचबरोबर आणखी दोन गोष्टी सांगु इच्छितो, प्रश्नोत्तर पुर्ण झाले तर लक्षवेधी ४–४ असतात. तर कधी–कधी हरकतीचा मुद्दा तयार होतो. तर आपला मुद्दा उपस्थित करण्यासाठी आपणांस तीन–तीन रस्ते आहेत. म्हणुन हा जो प्रश्नोत्तराचा कालावधी आहे तो अर्ध्या तासाचा केला जावा. त्यानंतर लक्षवेधी आहे, हरकतीचे मुद्दे सुध्दा आहेत.

**मा. सदस्य श्री. टेकचंदानी राजु हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–मा. महापौरजी, मा. उप–महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहनेताजी आपण एक वर्ग चालू केला तर बरे होईल. त्यामध्ये आम्ही सर्वजण येवु सर्वप्रथम कुणी बोलले पाहिजे, कसे बोलले पाहिजे? आपण अतिशय चांगली सुचना केली आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–मा. महापौरजी, मी जी सुचना केली होती तिच्यावर निर्णय दिला जावा. प्रश्नोत्तराची वेळ १५ मिनिटाची केली जावी? नविन कायदा....? कारण की, सत्ताधारी पक्षाचे सदस्य तर काही प्रश्न विचारत नाहीतच.

मा. महापौरः–सन्माननिय सदस्यहो, अगोदर प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाचा होता हे बरोबर आहे त्यांनतर १९९७ मध्ये तो एक तासाचा केला. नियमानुसार प्रश्नोत्तराचा कालावधी सर्व ठिकाणी अर्ध्या तासाचाच असतो व दुसरे असे की, माहितीचा अधिकार हा जो नविन कायदा आहे त्या अंतर्गत सर्वांना माहिती मिळत आहे. त्यामध्ये सर्वांच्या अडचणींचे निवारण होते. त्या अधिकाराचा वापर करुन कुणीही प्रश्न विचारु शकतो. व त्याशिवाय या अगोदर आम्ही जो ठराव पारीत केला आहे त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. पुढील महासभेत या कामी आपले जर समर्थन मिळाले तर सर्व मिळुन निर्णय घेवु. प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाचा करण्याबाबत जो ठराव पारीत केलेला आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– एक तासाच्या कालावधी बाबत ठराव पारीत केला आहे. तर हा काही कायदा नाही का? आपण म्हणता कायदयामध्ये अर्ध्या तासाची तरतुद आहे. आपणच एक तासाच्या प्रश्नोत्तराची मागणी केली होती.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– हे चुकीचे होत आहे. जेव्हा सत्तारुढ व विरोधी पक्षाची गोष्ट येते जेव्हा लोकांची गोष्ट येते तेव्हा आपण म्हणता की, सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष असा मुद्दा उपस्थित होता कामा नये. आज आपण जाणीवपुर्वक प्रश्नोत्तराचा कालावधी कमी करुन लोकांच्या समस्यांपासुन दुर जावु पाहत आहात. लोकांच्या समस्यांबाबत आम्ही जे प्रश्न विचारु इच्छितो त्यापासुन आपण दुर जावु इच्छित आहात याचा आम्ही विरोध व निषेधही करीत आहोत. व जी परंपरा आहे ती आपण तोडत आहात.

मा. महापौरः–पुढील महासभेत याबाबत सुधारणा केली जाईल.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— मा. महापौरजी, १९९७ मध्ये जेव्हा मी येथे सदस्य म्हणुन निवडुन आलो त्यावेळस प्रश्नोत्तराचा कालावधी अर्ध्या तासाचाच होता. आत जर आपण अर्ध्या तासाचा करत असु तर त्यामध्ये कोणता गुन्हा केल्या सारखे होणार आहे?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— लोकांच्या समस्या सोडविण्यामध्ये आपणांस कोणताही रस नाही असे त्यातुन दिसुन येईल. त्यापासुन आपण दुर जात आहात. जे सन्माननिय सदस्य प्रश्न विचारत आहेत त्यांना आपण त्यापासुन वंचित ठेवण्याचा प्रयत्न करत आहात. त्यासाठी हा रस्ता शोधत आहात.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— मा. महापौर महोदया, येथे कुणी सदस्य जो प्रश्न विचारतो तो सार्वजनिक साफ सफाई किंवा पाण्याच्या वितरण व्यवस्थेबाबत विचारत नाही तर कुणी किती अनाधिकृत बांधकाम केले याबाबत प्रश्न विचारत असतात, शहराचा आणखी दुसरा काही फायदा होत नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— मा. महापौरजी आपण आता जे सांगितले की, या बाबतचा सुधारणा ठराव आम्ही पुढील महासभेत आणु इच्छितो. तर याबाबत सर्व गटनेत्यांची व विरोधी पक्ष नेत्याची एक बैठक बोलवा व त्यामध्ये आपण निर्णय घ्या.

मा. महापौरः—मी तेच म्हटले. पुढील महासभेत याबाबत सुधारणा करण्याचा ठराव पारीत करु.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— त्यासाठी सर्व गटनेत्यांची, विरोधी पक्ष नेता व सभागृह नेता याची एक बैठक बोलवा.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मी बैठक बोलवतो तेव्हा कुठे येता आपण?

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— मा. महापौर जेव्हा बैठक बोलवतात तेव्हा आम्ही येतो. आपण बोलवतात तेव्हा येत नाही. कारण की आपण तेथे राजकारण करता म्हणुन आपण बोलावलेल्या बैठकीत आम्ही येत नाही.

**मा. सदस्या श्रीमती दिपा पंजाबी, श्रीमती भावना रामचंदानी, श्रीमती नीना नाथानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. महापौर :— प्रस्ताव असाच ठेवलेला आहे की, आजच्या सभेत यावर निर्णय न घेता पुढील महासभेत प्रस्ताव ठेवुन आपण सर्वजणांनी त्यास संमती दिली तर..............

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः— आपणाकडे बहुमत असल्याने आपण असा एक चांगला निर्णय घेतला पाहिजे की याबाबत आम्ही प्रस्ताव आणणारच नाही. आम्ही प्रश्नोत्तराचा कालावधी एक तास चालु देवु. असा निर्णय घेतला असता तर त्यात आपले मोठेपण होते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—आता आपण आमचे म्हणणे मान्य करा. पुढील महासभेत आपले म्हणणे मान्य करु.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः— जर अशा प्रकारचा निर्णय आला तर या वर्षास आम्ही दुर्भाग्यपुर्ण वर्ष असे मानु.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः— आम्ही जमनुजी यांना दुर्भाग्य समजु?

मा. सचिवः—कृपया लक्ष दया. महापालिका शिवसेना पक्षातर्फे गटनेता पदासाठी श्री. विश्वनाथ पाटील यांना गटनेता म्हणुन निवडले आहे. ही सुचना शिवसेना पक्षातर्फे प्राप्त झाली आहे. यास मा. महापौरांनी मान्यता दिली आहे. या सभागृहातर्फे त्यांचे हार्दिक स्वागत करुन अभिनंदन करण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः—अभिनंदन, दोघेही एकाच पक्षाचे आहेत.

मा.महापौर :— सभागृहाच्या वतीने आपले अभिनंदन.

मा. सचिव :– एक लक्षवेधी सुचना प्राप्त झाली आहे. जिचे सुचक आहेत श्री. जमनादास पुरस्वानी व अनुमोदक आहेत श्री. रामदास उमाप. त्यांची लक्षवेधी सुचना याप्रमाणे आहे..........

---

## लक्षवेधी सुचना

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामदास उमाप

सदर लक्षवेधीने आपले विनंतीपुर्वक लक्ष वेधू इच्छितो की, सध्या पावसाळयाचा मौसम सुरु आहे. मुसळधार पाऊस व अतिवृष्टीमुळे उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाचे इमारतीतील रेकॉर्ड सेक्शन व लेखा विभागाचे छत गळत असल्याने संबधीत विभागात छतातून सर्व ठिकाणी पाणी गळत आहे. सदर दोन्ही विभागात महत्वाचे कागदपत्र, फाईल्स आहेत त्या खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यासाठी महानगरपालिकेने गळती थांबविणेसाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून भाडयाने पत्रे आणून इमारतीचे गच्चीवर (टेरसवर) शेड उभी केली असून महापालिकेचा निधी वाया घालविला जात असल्याचे निदर्शनास येत आहे. तरी कृपया सदर बाबतीत महासभेत चर्चा होवून माहिती मिळणेस विनंती आहे.

---

मा. सचिव :– या लक्षवेधीस मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. तसेच एक आयत्यावेळचा विषय आहे श्री. संजय दुसाणे, जे सध्या या महापालिकेत उपायुक्त म्हणुन कार्यरत आहेत, त्यांचा एक वर्षाचा कार्यकाळ ३० जुलैला समाप्त होत आहे. व एक वर्षाचा कार्यकाळ वाढविण्यासाठी प्रस्ताव महासभेपुढे ठेवला आहे. जर आपणा सर्वांची समंती असेल तर या प्रस्तावास आयत्यावेळचा विषय म्हणुन मान्यता दिली जाईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– हा विषय नियमित सभासुचनेवर घ्या.

मा. महापौरः– सदरहु आयत्यावेळचा विषय आपल्या सर्वानुमते या महासभेच्या कार्यसुचीवर घेता येत नाही.

---

## आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १३:–** श्री. संजय दुसाने यांचा उपायुक्त पदवरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणे कामी मान्यता देणे.

---

मा. सचिव :– लक्षवेधी सुचनेचे प्रस्तावक श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आपली लक्षवेधी सुचना मांडावी.

**मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, काही दिवसापुर्वी भारतीय जनता पार्टीचे आमदार श्री. गिरिष बापटजी जे पुर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिकांचे आघाडीचे भारतीय जनता पार्टीचे प्रमुख आहेत, ते उल्हासनगर महानगरपालिकेत आले होते. व सौभाग्याने आयुक्त साहेब सुध्दा आपल्या दालनामध्ये त्यावेळी उपस्थित होते. त्यांची परवानगी घेवुन मी आमच्या आमदार महोदयांना त्यांच्याकडे भेटण्यासाठी घेवुन गेलो. त्यानंतर सचिव साहेबांच्या कार्यालयात सुध्दा मी त्यांना घेवुन गेलो. मा. श्री. गिरीष बापट साहेबांनी आयुक्तांचे दालन पाहुन मोकळया मनाने त्याची प्रशंसा केली. त्यांनी म्हटले की, कोणतेही कार्य ते मा. आयुक्त असोत, सचिव असोत, किंवा विरोधी पक्ष नेता असोत, हे चांगल्याप्रकारे तेव्हा करु शकतात जेव्हा त्यांच्या सभोवतालचे वातावरण स्वच्छ व शुध्द असेल. आयुक्त साहेबांच्या कार्यालयाची त्यांनी प्रशंसा केली. व त्यांनी म्हटले की, आपल्या शहरात हे जे आयुक्तांचे कार्यालय आहे ते अतिशय चांगले आहे. व सचिव

साहेबांच्या कार्यालयात सुध्दा आम्ही त्यांना घेवुन गेलो. त्यांचे कार्यालयही दाखविले. सचिवांच्या कार्याची व कार्यालयाची प्रशंसा केली. त्यानंतर त्यांनी सभागृह पाहिले. व त्यांनी म्हटले की, सचिव कार्यालय आणखी सुंदर बनविले पाहिजे. हे तर चांगले झाले आम्ही त्यांना लेखा विभाग किंवा अभिलेखा विभागाकडे घेवुन गेलो नाही. नाहीतर पुन्हा तिच दुर्भाग्यवाली गोष्ट आली असती. व मला लोक नेहमी म्हणतात की, जमनु नेहमी दुर्भाग्याची गोष्ट करतो. जेव्हा दोन दिवसापुर्वी मी अभिलेख कक्ष पाहिले, वरच्या बाजुला पत्राची शेड व प्लॉस्टीकचे पेपर लावले आहेत. परंतु अभिलेख कक्षाच्या आत सुध्दा चारही बाजुने प्लॉस्टीकच्या पिशव्या बांधल्या आहेत व वर पत्राची शेड बांधूनही त्या प्लॉस्टीकच्या पिशव्यामध्ये पाणी पडत आहे. पावसाचे हे पाणी अशा दस्तऐवजांवर पडत आहे की, जे दस्तऐवज आम्हांला आयुष्यभर सांभाळुन ठेवायचे आहेत. प्लॉस्टीक पिशव्यांच्या खाली प्लॉस्टीकच्या बादल्या ठेवल्या आहेत. त्यामध्ये प्लॉस्टीक पिशव्यांमधील पाणी थेंब थेंब पडत आहे व तेथिल कर्मचारी बादल्या भरुन बाहेर टाकत आहेत. पुन्हा तीच दुर्भाग्याची गोष्ट. दुर्भाग्याच्या या वर्षास मी काय म्हणु? आयुक्त कार्यालय तयार झाले हे अतिशय खुषीची गोष्ट आहे, सकारात्मक विचार आहेत. महापालिकेचे सभागृह असेच सुंदर बनविले जावे ही सुध्दा सकारात्मक विचाराची गोष्ट आहे. महापौर कार्यालय तयार व्हावे, उपमहापौर कार्यालय तयार व्हावे, त्यास आमच्या शिवसेना—भाजपाचा कधीही विरोध झाला नाही. परंतु केवढी दु:खाची गोष्ट आहे की, लेखा विभाग व अभिलेखा विभाग ज्यामध्ये अभिलेख सुरक्षित ठेवले जातात, जर मंत्रालयातील एखादा अधिकारी तेथे पहाणीसाठी आला आणि तो जर अभिलेखा विभागात गेला किंवा पत्रकार कक्षामध्ये बसलेल्या पत्रकारांमधील कुणी बंधु किंवा सभागृहातील कोणी नगरसेवक बंधु तेथे गेला तर तो तेथिल परिस्थिती पाहुन दंग होईल. आजपर्यंत जो पाऊस झाला आहे तो पाहता या विभागांवर पत्राची शेड लावल्यानंतरही, आणि ही जी पत्राची शेड लावली आहे ती, पत्रे भाडयाने घेवुन शेड लावलेली आहे. यापेक्षा मोठे दुर्भाग्य ते काय आहे? १६२ कोटीचा अर्थसंकल्प असलेली महानगरपालिका ती आपल्या इमारतीचे टॅरेस वॉटर प्रुफ करु शकत नाही. किंवा ती स्वत: तेथे पत्राची शेड लावु शकत नाही. व तेथे भाडयानें पत्रे आणुन तीन महिने, चार महिन्यासाठी शेड उभी केली आहे. या पेक्षा मोठे दुर्भाग्य ते काय असेल? तर ही लक्षवेधी मांडण्याचा माझा मुख्य उद्‌देश जो होता की, जर कुणीही बाहेरचा अधिकारी मग तो मंत्रालयातील असो तो जर या शहरामध्ये आला तर तो या शहराची महानगरपालिका सर्वात प्रथम पाहु इच्छितो. व अभिलेख कक्ष, लेखा विभाग हे सर्व विभाग तो पाहु इच्छित असतो आमच्या शहराची प्रशंसा तेव्हा होईल जेव्हा आमच्या महापालिकेचे कार्यालय, अभिलेख कक्ष, आमचा लेखा विभाग अतिशय चांगल्या प्रकारे सुंदरपणे बनविलेले असतील. ही लक्षवेधी मांडण्याचा माझा उद्‌देश फक्त एवढाच आहे , पत्रे लावुन ही जी तात्पुरती व्यवस्था केली जाते ती न करता व या पावसाळयानंतर यासाठी एक ठोस अशी व्यवस्था तयार केली जावी. जेणेकरुन लिकेज बंद केले जावू शकेल. व त्यासाठी ठोस असा प्रस्ताव शासन व प्रशासनाकडुन सभेच्या पटलावर आला पाहिजे. धन्यवाद.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांनी जी लक्षवेधी सुचना मांडली आहे ती बिल्कुल बरोबर आहे. यावर्षी आम्ही टॅरेसचे वॉटर प्रुफींग करण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी एका तज्ञ व्यक्तीस बोलावले होते त्याने सांगितले की, टॅरेसचा पृष्ठभाग इतका खराब झाला आहे की, तो पुर्णच्या पुर्ण बदली करावा लागेल व बदली करण्यासाठी जवळ—जवळ ४ ते ५ लाख रुपये खर्च येईल. हे लिकेज काढण्याचा प्रयत्न यापुर्वी केला गेला. परंतु त्याचा काही परिणाम दिसुन आला नाही. ४—५ लाख रुपये खर्च केल्यानंतर ते जे लिकेजस आहे ते बंद होणार होते. आम्ही असा विचार केला की, यावर्षी काही तरी तात्पुरत्या स्वरुपाची उपाययोजना करावी. व नेहमीसाठी जी उपाययोजना करायची आहे त्यामध्ये एक माळयाचे बांधकामच करावे. आमच्या येथे आता जागेची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. यासाठी वरचा एक माळाच वाढवावा जेणेकरुन हे करत असतांना छप्पराच्या वॉटर प्रुफींगचाही विचार केला जावा. व आज जी अडचण येत आहे टॅरेसचा पृष्ठभाग खराब झाल्यामुळे लेखा विभाग, लेखा परिक्षण विभाग किंवा अभिलेख कक्षामध्ये सध्या ज्या काही अडचणी येत आहेत, गैरसायी होत आहेत त्या नेहमी करीता दुर होतील. यासाठी आम्ही लवकरच प्राकलन तयार करुन आणखी एक माळयाचे बाधंकाम करण्याचा विचार करु. जेणेकरुन आपली जी तक्रार आहे ती नेहमी करीता दुर होईल.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी या सभागृहातुन बाहेर गेल्या. व त्यांच्या जागी उप—महापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आयुक्त साहेब, भाडयाचे काय, दरमहिन्याला २२ हजार रुपये असे काही भाडे आहे काय?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, जे काही प्राकलन तयार केले ते जिल्हा दरसुचीनुसार तयार केले व हा जो पावसाळयाचा कालावधी आहे या पुर्ण कालावधीसाठी ७५ हजार रुपये भाडे त्यांना दिले गेले आहे, ५ हजार चौरस फुटापेक्षा जास्त छप्पर अच्छादित केले आहे. आपणांस स्वत:ला अनुभव आहे. जर कोणताही मंडप तात्पुरत्या स्वरुपाचा उभारायचा असेल, एक दिवसासाठी , दोन दिवसासाठी व कपडयाचा जरी लावयचा असेल तर त्यास सुध्दा जास्त खर्च येतो. जिल्हा दर सुचीनुसार प्राकलन तयार केले आहे. व पुर्ण पावसाळयाचा कालावधीचा खर्च जो आहे तो ७५ हजार रुपये आहे व मला वाटते तर तो काही जास्त नाही.

मा. सदस्या श्रीमती मीना सोंडे, श्रीमती नीना नाथानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आयुक्त साहेब, तुम्ही सांगितले की, यावर आणखी एक माळयाचे बांधकाम करणार, एक माळयाचे बांधकाम केले तर आमचा त्यास काहीही विरोध नाही. परंतु ते स्वप्न असु नये. आज उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अशी आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाची सर्व कामे बंद आहेत. ज्या वर्कऑर्डर दिल्या आहेत ते काम तुम्ही चालु करत नाहीत. ठेकेदाराला देण्यास पैसे नाहीत, आज पाण्याची सुध्दा २० टक्के कपात चालली आहे. कारण पाणी पुरवठा करणा—या एम.आय.डी.सी. ला तुम्ही बिले दिलेली नाहीत. जर पैसे तुम्ही लगेच दिले नाही तर ते कसे होईल, ते होणार आहे का? यावर्षी ८० हजार खर्च झाले तर पुढच्या वर्षी १.६० लाख होतील? तुम्ही आता जे उत्तर दिले आहे ती आर्थिक परिस्थिती पाहुनच उत्तर दिले असेल? त्यातुन काही होणार आहे का? त्यातुन नविन मार्ग निघेल का? की जादुची कांडी फिरणार आहे? एक तर तुम्ही नाटक करत आहात. म्हणजे पैसे असुन सुध्दा तुम्ही एवढे पटकन सांगितले की, पुढच्या वर्षी आम्ही एक माळयाचे बांधकाम करु? म्हणजेच उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती योग्य आहे. असे असतांना सुध्दा आज उल्हासनगर शहरातील लोकांना पाणी मिळत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे पुर्ण बंद आहेत. एकही विकासाचे काम उल्हासनगरमध्ये चालु नाही. महापालिका निधीच्या कामाचे कार्यादेश दिले ते थांबविले आहेत. जनरल फंडाच्या ज्या वर्कऑर्डर दिल्या आहेत, त्या थांबविल्या गेल्या आहेत की ते काम करु नका. पाणी पुरवठयाच्या सुध्दा वर्कऑर्डर थांबविल्या गेल्या आहेत. म्हणजे नक्की काय? होणार आहे काय? खरोखरच होणार आहे की ते स्वप्न असणार आहे?

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, या लक्षवेधीला अनुमोदन माझे होते. ज्यावेळेस मी अतिक्रमण विभागात वर जावुन पाहिले तर प्रत्यक्षात पाहिले की पाणी किती जमा झाले आहे ? प्रश्न असा आहे की, आपण जे तात्पुरत्या स्वरुपाचे जे शेड टाकले आहे ते सुध्दा लिकेज होत आहे. त्या ठेकेदाराला लिकेजबद्दल तुम्ही काही बोलला आहात काय? किंवा ते लिकेज होवु नये असा काही बंदोबस्त करुन घेतलेला आहे काय? ही माझी एक किरकोळ सुचना आपण लक्षात घ्या.

मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—मा. महापौर महोदया, महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही ही वस्तुस्थिती आहे. श्री. बोडारे साहेब यांनी जे म्हटले आहे की, आज पाण्याची कपात होत आहे, काही कामे थांबलेली आहेत. ही खरी वस्तुस्थिती आहे. परंतु हे जे काम आहे ते होणे सुध्दा जरुरीचे आहे. यासाठी सभागृहाला मी आश्वासन देतो की ही कामे लवकरात लवकर चालु केली जातील. त्याची प्रक्रिया पुर्ण करुन काम चालु केले जाईल. व जी थांबलेली कामे आहेत ती कामे सुध्दा चालु केली जातील. साधारणत: जुन, जुलै, ऑगस्ट महिन्यात आर्थिक परिस्थिती हलाखीची असते. दिवाळीच्या वेळेस जकातीचे उत्पन्न वाढते, टॅक्सचे उत्पन्न वाढते त्यावेळेस आर्थिक परिस्थती चांगली असते. त्यावेळेस ना आमच्याकडे एम.आय.डी.सी. देणे बाकी असेल ना तुमची कामे थांबलेली असतील. सर्व कामे आम्ही चालु करु.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, माझी सभागृहाला विनंती आहे की, ज्यावेळेस अर्थसंकल्प पास करणार होते, त्यावेळेस मी ओरडुन ओरडुन सांगितले होते की, सर्व नगरसेवकांचा निधी ४

लाख रुपये असला पाहिजे. परंतु दुर्भाग्य आहे की, जे श्री. जमनादास पुरस्वानी बोलतात, ते मी नाही बोलणार. परंतु एक उदाहरण देणार की, नगरसेवक निधी कायदयानुसार ठेवली जावी. जेवढे काही महानगरपालिकेचे उत्पन्न असते त्याचे २ टक्के नगरसेवक निधी असतो. या वर्षी आम्ही श्री. पंजाबी साहेबांच्या सहमतीने १५१ कोटीचे अर्थसंकल्प बनविले आहे, १९० कोटीमध्ये ४ लाख रुपये होत होते., १६१ करोड मध्ये २ टक्यांनी २ लाख होत होते. यासाठी नगरसेवक निधी २ लाख रुपये झाली आहे. यासाठी आमची आयुक्त साहेबांना विनंती आहे की, ज्यावेळेस श्री. चंद्रशेखर साहेब येथे आले होते तेव्हा आमच्या सर्व पक्षांच्या नगरसेवकांनी व सर्व राजकिय पक्षाने स्थायी समिती सभागृहात एक बैठक घेतली होती व त्यांना म्हटले होते की, आम्हांला ७ –७ लाख रुपये हवे आहेत, ४–४ लाख रुपये निधी नगरसेवक, ३–३ लाख रुपये सार्वजनिक कामासाठी तर त्यांनी आश्वासन दिले होते की आम्ही अर्थसंकल्पाच्या मिटींगमध्ये परत एकदा दुरुस्ती करुन २–२ लाख रुपये प्रत्येक नगरसेवकांचे २–२ लाख रुपये सार्वजनिक निधीत ठेवुन व प्रभाग समितीचा जो निधी आहे प्रत्येक वर्षी ३ लाख असतो तो या वर्षी १ लाख ठेवला गेला आहे. त्या १ लाख रक्कमेतुन ५० हजार तर बी.एम.ए.सी. साठी दिले गेले आहे. व ५० हजार पॅड लावण्यासाठी आम्ही घेत आहोत असे म्हणतात. म्हणजेच प्रभाग समितीचा जो निधी ३ लाख रुपये प्रत्येक वर्षी असतो या वर्षी १ रुपये सुध्दा नाही. ती सुध्दा कमीत कमी २–२ लाख रुपये ठेवली जावी. तर सर्वांना काम करण्याची संधी मिळेल, प्रत्येकाच्या प्रभागात पावसामुळे पूर येण्याची शक्यता असते, प्रत्येक सदस्याने आपल्या पॅनलमध्ये काम करण्याचे आश्वासन दिले आहे. या गोष्टी लक्षात ठेवुन मा. महापौरजी, आम्ही सर्व सदस्य अर्थसंकल्पात दुरुस्ती करण्यासाठी सांगतो की, त्यामुळे शहरातील कामे होवु शकतील. धन्यवाद.

**मा. महापौर यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला व त्यांच्या जागी आसनस्थ झाल्या.**

<u>मा. सचिव:–</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २** :–मागील विशेष महासभेचे दिनांक २०/६/२००५ रोजीचे व सर्वसाधारण महासभेचे दिनांक २०/६/२००५ रोजीचे (त्यात दि. ६/७/२००५ रोजीचे ) इतिवृत्त कायम करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u> मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, मागील महासभेत श्री. किशोर वनवारी यांचा रस्त्यातील खड्डयांविषयीचा प्रश्न होता तर त्यावेळेस मी एक हरकत घेतली होती की, व्ही.टी.सी. ग्राऊंड येथे फार मोठे चेंबर आहे त्यावर झाकण नाही त्यामुळे अपघात होतात. म्हणुन मी मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत आमचे कार्यकारी अभियंत्यांनी म्हटले होते की त्या चेंबरवर दोन दिवसात झाकण बसविले जाईल तो दिवस दिनांक ६/७/२००५ रोजीचा होता. आजची तारीख २०/७/२००५ ही तारीख आहे परंतु तो खड्डा अदयापपर्यंत बुजविला नाही. तिथे एक चेंबर होता तो चेंबर आजसुध्दा तेथे आहे. त्यानंतर तेथे ब–याचवेळा अपघात झाले. आता आपण म्हटले की, तो एक छोटासा चेंबर आहे त्याचे काम १४ दिवसात पुर्ण झाले नाही याबाबत माझा एक प्रश्न होता तो अदयाप चर्चेस आला नाही. म्हणुन माझी आपणांस एक सुचना आहे की, आपण हे जे प्रश्नाचे उत्तर देता, त्या प्रश्ना संदर्भात काय कारवाई केली ते पुढील महिन्यात सांगावे. कारण की आम्ही प्रश्न विचारतो आपण उत्तरे देतात त्यानंतर आम्ही निघुन जातो आणि त्यानंतर जेव्हा दुस–या महिन्यात मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा विषय येतो तेव्हा आम्हांला आठवण येते त्यावेळेस आम्ही याबाबत आपणांस विचारणा करतो. म्हणुन माझी आपणांस विनंती आहे की, येणा–या महासभेमध्ये आपण ज्या काही प्रश्नांची उत्तरे दयाल त्याबाबत काय कारवाई केंली याची पुढील महासभेत माहिती दयावी.

मा. सदस्य श्री. मनोज साधवानी, श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सचिव :–</u> इतिवृत्त कायम? कुणाची काही हरकत?

<u>काही सदस्य :–</u> पास...........

<u>मा. महापौर :–</u>मागील सभेचे दिनांक २०.६.२००५ रोजीच्या विशेष व सर्वसाधारण महासभेचे (त्यात दि. ६/७/२००५ रोजीचे ) इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ३:–** मा. महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती व इतर पदाधिकारी यांच्या अतिथी भत्त्यात वाढ करणेकामी स्थायी समिती ठराव क्र. २८, दिनांक ४/७/२००५ कायम करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मागील ७–८ वर्षापासुन जी परंपरा चालत आहे व आज उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नाही. यासाठी महापालिकेवर मी आणखी आर्थिक ओझे लादु इच्छित नाही म्हणुन मी व्यक्तीशः या प्रस्तावाचा विरोध करतो. अधिक अतिथी भत्ता असता कामा नये. मला अधिक अतिथी भत्ता नको आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सचिव :–</u> पास? सर्वसंमतीने?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> आमचा विरोध आहे. तसेच या वर्षी मा. महापौर व स्थायी समिती सभापती ही पदे एकाच व्यक्तीकडे आहेत या दोन पदांसाठी जो वेगवेगळा अतिथी भत्ता आहे. त्यामुळे दोन पदावरील एका व्यक्तीस दोन अतिथी भत्ते होतात, व उप–महापौर साहेब तर कुणाला चहा पाजतच नाहीत. राहीली गोष्ट सभागृह नेता यांची त्यांच्यासाठी अतिथी भत्ता दुप्पट–तिप्पट करा कारण ते नेहमीच सर्वांना चहा पाजत असतात. त्यांच्यासाठी आमचा विरोध नाही.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास..............

<u>मा. सचिव :–</u> मतदान घेतले जावे?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. श्री. बोडारे साहेब म्हणतात की, मला वाढीव अतिथीभत्ता नको आहे तर ते वगळता इतर पदाधिका–यांसाठी पास.............

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> सभागृह नेत्यांचा अतिथी भत्ता डबल–ट्रिबल करावा. बाकीच्यांबाबत आमचा विरोध आहे. सभागृह नेत्यांचा अतिथी भत्ता डबल–ट्रिबल करा त्यास आमच्या शिवसेना–भाजपाच्या सदस्यांचा विरोध नाही. इतर लोकांचा अतिथी भत्ता वाढवु नये. सभागृह नेता सर्वांना चहा पाजतात हे आम्ही पाहिले आहे.

<u>मा. सचिव :–</u>आपला विरोध आहे काय?

<u>मा. महापौर :–</u> सन्माननिय सदस्यांना याची माहिती असली पाहिजे की, महापौर व स्थायी समिती सभापती ही पदे माझ्याकडे असल्यामुळे जो अतिथी भत्ता मिळतो तो फक्त एकच मिळतो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> थोडा फार आपल्या खिश्यातुन गेला तरी चालेल ना?

<u>मा. महापौर :–</u> सदरचा प्रस्ताव मी मतास टाकते.

<u>मा. सचिव :–</u> जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.



## <u>प्रस्तावाच्या बाजुने ३९ मते</u>

१. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
२. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
४. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
५. श्री. वाघे शामु बाबु
६. श्री. ऐडके गणपत गोविंद
७. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
८. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१०.श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१२. श्रीमती. गुप्ता अनिता धर्मेंद्र
१३.श्री. पवार नाना आनंदा
१४.श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
१५.श्री. निकम शांताराम ओंकार
१६.श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१७.श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१८.श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१९.श्रीमती. वनवारी मोना अशोक
२०.श्री. वनवारी किशोर नारायणदास
२१. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२२. श्रीमती. खिलनानी भावना रवि
२३.श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२४.श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२५.श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२६.श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२७.श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
२८.श्रीमती. भठिजा कोमल अमृत
२९.श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
३०.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
३१.श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३२.श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
३३.श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज
३४.श्रीमती. दासानी मिनु राजकुमार
३५.श्री. लाल बिहारी यादव
३६.श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
३७.श्री. जाधव सुरेश मधुकर
३८.श्री. भालेराव गौतम यशवंत
३९.श्रीमती. करोतिया मालती राधाचरण

<u>मा. सचिव :–</u> जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.



## <u>प्रस्तावाच्या विरोधात १६ मते</u>

१. श्रीमती. जावळे संगिता रमेश
२. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
३. श्री. उमाप रामदास राघोजी
४. श्री. पुरस्वानी जमनादास
५. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाशोमल
६. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
७. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
८. श्री. भुल्लर राजेंद्रसिंग विरसिंग
९. श्री. गायकवाड दिलीप
१०. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
११. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
१२. श्री. चव्हाण रमेश महादेव
१३. श्री. बोडारे धनंजय बाबुराव
१४. श्री. पाटील विश्वनाथ गौतम
१५. श्रीमती. ससाणे लक्ष्मी रोहिदास
१६. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम

**मा. महापौर :—** सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

---

प्रस्तावना:—

**विषय क्र. ३ :—** महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती व इतर पदाधिकारी यांच्या अतिथी भत्तयात वाढ करणेकामी स्थायी समिती ठराव क्र. २८, दिनांक ४/७/२००५ कायम करणे.

शहराचा प्रथम नागरीक महापौर या नात्याने महापौर यांचे कार्यालयामध्ये तसेच उप—महापौर आणि स्थायी समिती सभापती यांचे कार्यालयामध्ये विविध मान्यवर नेतागण विशेष अतिथी शासकिय अधिकारी, महापौर कार्यालय, उप—महापौर कार्यालय आणि स्थायी समिती कार्यालयामध्ये विविध विषयावर चर्चासत्र व आयोजित बैठकीसाठी येत असतात. महापौर कार्यालय, उप—महापौर कार्यालय आणि स्थायी समिती कार्यालयामध्ये येणारे मान्यवर अतिथी व शासकिय अधिकारी यांना बैठकीचे वेळेस चहा, कॉफी, थंड पेये इत्यादीसाठी होणा—या खर्चाची सध्याची तरतुद पुरेशी पडत नाही. त्यामुळे इतर महानगरपालिका प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये मा. महापौर, मा. उप—महापौर व इतर पुढील सर्व पदाधिकारी यांना पुढीलप्रमाणे अतिथी भत्ता स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | | प्रचलित अतिथी भत्ता<br>; दरमह्द्व | प्रस्तावित अतिथी भत्ता<br>; दरमह्द्व |
|---|---|---|---|---|
| १. | मा. महापौर | —— | रुपये ५, ०००/— | रुपये ०७, ५००/— |
| २. | मा. उप—महापौर | —— | रुपये १, ५००/— | रुपये ०३, ०००/— |
| ३. | मा. सभापती स्थायी समिती | —— | रुपये १, ५००/— | रुपये ०३, ०००/— |
| ४. | मा. सभागृह नेता | —— | रुपये ५००/— | रुपये ०१, ०००/— |
| ५. | मा. विरोधी पक्ष नेता | —— | रुपये ४५०/— | रुपये ०१, ०००/— |

वरील प्रस्तावित सुधारीत अतिथी भत्ता स्थायी समिती व मा. महासभेच्या मंजूरी नंतर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १९;अद्व ;स्द्व मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या मान्यतेनंतर अदा करणेत यावा असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

सदर प्रस्तावात चर्चेअंती स्थायी समिती सदस्यांनी उपसूचना मांडली असुन पुढीलप्रमाणे भत्त्यात वाढ करणेबाबत प्रस्तावित केले आहे.

| स्थायी समिती सदस्यांनी | | प्रचलित अतिथी भत्ता | प्रस्तावित केलेला अतिथी भत्ता |
|---|---|---|---|
| | | | ;दरमहद्ध |
| ;दरमहद्ध | | | |
| १. मा. महापौर | —— | रुपये ५, ०००/— | रुपये ०७, ५००/— |
| २. मा. उप—महापौर | —— | रुपये १, ५००/— | रुपये ३७५०/— |
| ३. मा. सभापती स्थायी समिती | —— | रुपये १, ५००/— | रुपये ०३, ७५०/— |
| ४. मा. सभागृह नेता | —— | रुपये ५००/— | रुपये ०१, ५००/— |
| ५. मा. विरोधी पक्ष नेता | —— | रुपये ४५०/— | रुपये ०१, ५००/— |

**स्थायी समिती ठराव क्र. २८** **दिनांकः— ४/७/२००५**

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. गणपत एडके

ही स्थायी समिती महापालिकेच्या व शासन मंजुरीस अधिन राहुन वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती, सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांच्या कार्यालयासाठी खालीलप्रमाणे अतिथी भत्ता मान्य करीत आहे.

अतिथी भत्ता (दरमहा)

| | | |
|---|---|---|
| १. | मा. महापौर | रुपये ०७, ५००/— |
| २. | मा. उप—महापौर | रुपये ३७५०/— |
| ३. | मा. सभापती स्थायी समिती | रुपये ०३, ७५०/— |
| ४. | मा. सभागृह नेता | रुपये ०१, ५००/— |
| ५. | मा. विरोधी पक्ष नेता | रुपये ०१, ५००/— |

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती /पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्रः— ३१ दिनांकः— २०/७/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा मा. महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती व इतर पदाधिका—यांच्या अतिथी भत्त्यात वाढ करणेकामी स्थायी समिती ठराव क्र. २८, दिनांक ४/७/२००५ कायम करीत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी

**मा. सचिव :–**विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**विषय क्र. ४:–** सन २००६, २००७ व २००८ मध्ये आर.सी.एच–II प्रकल्प राबविणेकामी आय.पी. डी. पी अंतर्गत नेमण्यात आलेल्या १५ अधिकारी व कर्मचा–यांचे वेतनासाठी खर्चास मान्यता देणे.

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–** मा. महापौरजी, मा. उप–महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब, व सन्माननिय सदस्य , हा जो प्रस्ताव आपल्या समोर आलेला आहे की, आय.पी.डी.पी. अंतर्गत मागील पाच वर्षापासुन जे अधिकारी गण काम करत आहेत परंतु या प्रस्तावामध्ये असे काही सुचीत केले नाही की, ५ वर्षामध्ये त्यांनी काय काम केले आहे? एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प म्हणजे काय? त्याचे कोणतेही स्पष्टीकरण यामध्ये दिलेले नाही. हा प्रकल्प बंद करण्यासाठी मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा ३१ मार्च २००५ रोजी हुकुम आला आहे. हा प्रकल्प जेव्हा सुरु केला व त्या अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेत जे कर्मचारी काम करत होते त्यांचा वैयक्तीक तपशिल उपलब्ध नाही. आपण जर तो तपशिल उपलब्ध करत असाल तर त्याच्यावर काही विचारविमर्श होवु शकतो. आपल्या उल्हासनगरमध्ये ५ कॅम्प आहेत. ५ कॅम्पामधुन ५–५ उदाहरणे म्हणुन जरी दिलीत तर आमचे शासनाचे जे प्रतिनिधी आहेत किंवा महापालिकेचे जे नगरसेवक आहेत, ते जावुन चौकशी करु शकतात की, या प्रकल्पाचा आमच्या लोकांना काय फायदा झाला आहे? या प्रकल्पा अंतर्गत ज्या लोकांनी काम केले आहे, त्यामध्ये आर.सी.एच. II असा प्रकल्प येथे आणला आहे. आर.सी.एच. II असे पाहिले तर आपल्या येथे जेवढे काही सदस्य आहेत, आर.सी.एच. II काय असते? आर.सी.एच. II याचा अर्थच कोणाला माहित नसेल तर हे काय करणार, पास करायचे आहे किंवा नाही? आर.सी.एच. II म्हणजेच प्रोडक्टीव्ह चाईल्ड हेल्थ. आणि यावर ज्या अधिका–यांनी काम केले आहे, डॉक्टर लोकांनी काम केले आहे, तर त्याचा काही फायदा उल्हासनगर मधील लोकांना झाला आहे काय? त्याबाबत त्यांच्याकडे काही पुरावा आहे काय? व हा जो प्रकल्प आहे ५ वर्षानंतर, कर्मचा–यांचा जो तपशिल आहे, तो उपलब्ध झाला पाहिजे. प्रशासनाने जो पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल २००३–२००४ , व कृति आराखडा २००४–२००५ हा जो प्रकल्प ठेवला आहे त्याचा यामध्ये काहीही उल्लेख नाही. तर मला असे वाटत नाही की हा प्रकल्प पुढे चालु ठेवला पाहिजे. आता या प्रकल्पाअंतर्गत जे कर्मचारी , वैद्यकिय अधिकारी काम करत आहेत, त्यांची शैक्षणिक अर्हता काय आहे? प्रोडक्टीव्ह चाईल्ड हेल्थ नुसार एक डॉक्टर प्रिओडीक्स असला पाहिजे व दुसरा गायॅनो स्पेशॅलिस्ट असला पाहिजे. तर त्यांची ही शैक्षणिक अर्हता आहे काय? माझ्या माहितीनुसार यामध्ये फक्त एक प्रिओडीक्स डॉक्टर आहे व दुसरा एम.बी.बी.एस. डॉक्टर आहे. तर जी प्रोडटीव्ह चाईल्ड हेल्थ, या प्रकल्पामध्ये जे एम.बी.बी.एस. डॉक्टर आहेत, ते आपणांस काय परिणाम देवु शकतात? तेथे आपणांस गायॅनो स्पेशल डॉक्टर ठेवला पाहिजे. या प्रस्तावामध्ये खाली जो तक्ता दिला आहे, त्यामध्ये आर. सी.एच. I व आर.सी.एच. II नूसार शहराच्या सार्वजनिक आरोग्यामध्ये काही सुधारणा झाली आहे काय? मला तर असे काही वाटत नाही, मागील एक दोन वर्षामध्ये या प्रकल्पाअंतर्गत ज्या लोकांनी काम केले आहे त्यांनी सभागृहासमोर असा काही अहवाल सादर केला आहे म्हणुन तर मला असे वाटते हा जो प्रस्ताव येथे आणला आहे त्यानुसार वैदयकिय अधिकारी २, पी.एच.एन. ३, ए.एन.एम. ८, डाटा एन्ट्री ऑपरेटर १, आय. ई.सी. अधिकारी १ यांचा पगार १ लाख रुपये होतो. यामध्ये दुस–या तक्यात असे दर्शविले आहे की २००६ व २००७ मध्ये अर्धा पगार शासन देईल व अर्धा पगार महानगरपालिका देईल. व त्यानंतर २००८ नंतर पुर्ण पगार म्हणजेच प्रतिमहा रुपये १ लाख आपल्या महानगरपालिकेस दयावा लागेल. म्हणजेच वर्षाला १२ लाख रुपये दयावे लागतील. व हे काम २०१० पर्यंत चालेल. त्यापुढे सुध्दा चालु राहील काय? ५ वर्षामध्ये यांनी जे काम केले आहे त्याचा अहवाल सभागृहासमोर आला पाहिजे. व तो रिपोर्ट वाचल्यानंतरच आमच्या उल्हासनगरमधील रहिवाश्यांना काय फायदा झाला आहे व त्या फायदयानंतरच या प्रकल्पाबाबत विचार केला जावा.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे यांनी पुन: सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–</u> एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्पाअंतर्गत रिप्रोडक्टीव्ह ॲण्ड चाईल्ड हेल्थ आर.सी.एच. I हा प्रकल्प आमच्या येथे कार्यान्वीत होता. पहिल्या ५ वर्षामध्ये आम्हांला अनुदान मिळाले त्यातुन आम्ही मुलभुत सोयी–सुविधा निर्माण केल्या, ६ नागरी सुविधा केंद्रे सुरु केली. ३० जुन पासुन महाराष्ट्रातील ज्या ५ महानगरपालिकांमध्ये हा कार्यक्रम चालु आहे, तेथे हा कार्यक्रम बंद करुन आर.सी. एच. II ज्यात काही वेगळी उदिष्टे ठेवली आहेत, तो कार्यक्रम सुरु करायचा आहे. परंतु याबाबत अदयाप अंतिम निर्णय झालेला नाही. हा जो कार्यक्रम ३० जुनला बंद करायचा होता तो जर बंद केला असता तर ही जी ६ नागरी आरोग्य केंद्र आम्ही सुरु केली आहेत ती बंद करावी लागली असती. आज उल्हासनगर महानगरपालिकेकडे आपल्या स्वत:ची काही नागरी आरोग्य सोयी–सुविधा नाहीत. एक जो दवाखाना आहे ते मध्यवर्ती रुग्णालय राज्य सरकारच्या निधीतुन चालते. एक प्रसुतीगृह आहे ते सुध्दा राज्य सरकारच्या निधीतुन चालते. व आज ते शहरवासियांना सेवा देत आहे. परंतु महानगरपालिकेच्या ज्या आरोग्य विषयक सोयी सुविधा असल्या पाहिजेत, त्या आमच्याकडे काहीच नाहीत. नॉर्मस नुसार ५० हजार लोकसंख्येसाठी एक नागरी आरोग्य सुविधा केंद्र असले पाहिजे. आमची आजची लोकसंख्या जी आहे ५.५० ते ६ लाखाच्या दरम्यान आहे. त्या हिशोबाने आपणाकडे १२ नागरी आरोग्य केंद्र असली पाहिजे होती. आजपर्यंत आपणांस शासनाकडुन विविध संस्थांकडुन जे अनुदान मिळते, युनिसेफ किंवा जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यु.एच.ओ. च्या) माध्यमातुन आम्ही ही ६ नागरी आरोग्य केंद्रे चालु केली होती. आर.सी.एच. II हा प्रकल्प राज्य सरकारला सादर करायचा आहे. त्या कार्यक्रमाचे जे प्रमुख निकष आहेत किंवा अटी, शर्ती आहेत त्यानुसार सन २००६ साठी जो एकुण खर्च येईल त्यामधील ६ लाखाची तरतुद महानगरपालिकेला करावी लागेल. २००७ साठी सुध्दा ६ लाख रुपयांची तरतुद करावी लागेल. व २००८ नंतर १२ लाख रुपये आम्हांला दरवर्षी या कार्यक्रमासाठी खर्च करावे लागतील. या कार्यक्रमाची उदिष्टे जर पाहिली तर माता व बालक यांच्या आरोग्यासाठी, रक्षणासाठी हा कार्यक्रम महानगरपालिका क्षेत्रामध्ये हाती घेतले जातात, मागील तीन चार वर्षामध्ये आर.सी.एच. I मध्ये आम्ही खुपच चांगले काम केले आहे. एक अहवाल आम्ही मागच्या वर्षी आपल्या समोर ठेवला होता हा जो आर.सी.एच. II प्रकल्प आहे तो मंजुर होण्यासाठी काही कालावधी लागेल. त्या अगोदरच आम्ही आर.सी. एच. I हा सलग पणे चालु ठेवला आहे. आय.पी.डी.पी. सोसायटी चे अस्तित्व ३० जुनला संपृष्टात आल्यानंतर सुध्दा आम्ही हा कार्यक्रम पुढे चालु ठेवला आहे. जेणेकरुन शहरातील जनता आरोग्य विषयक सुविधांपासुन वंचित होवु नये.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u>आयुक्त साहेब, आपण आता सांगितले की, ६ केंद्रे आपण चालु केली आहेत परंतु जो पर्यावरण स्थितीविषयक आराखडा आहे २००३–२००४ व कृती आराखडा २००४ व २००५ त्यामध्ये याचे काहीही वर्णन आलेले नाही. जो रकाना क्र. ६ आहे त्यामध्ये आरोग्य व रुग्णालयांची स्थिती व उल्हासनगरमधील पायाभुत सोयी–सुविधा त्यामध्ये आरोग्य अधिका–यांचा सामावेश नाही. व ही जी ६ केंद्रे आपण चालु केली आहेत ते त्यामध्ये यावयास पाहिजे होते. त्याठिकाणी वैद्यकिय क्षेत्राशी संबंधीत नसलेल्या माणसाने काम केले आहे. तर ज्यांचा त्या क्षेत्राशी संबंध नाही अशी माणसे त्याबाबत काय सांगतील? तर ज्या पायाभुत सुविधा किंवा कृती आराखडा याचा यामध्ये काही उल्लेख आलेला नाही. हा प्रकल्प गेल्या ५ वर्षापासुन चालु आहे. व ५ वर्षापासुन आपली ६ आरोग्य केंद्रे चालु आहेत. या ६ केंद्रांचा कोणताही तपशिल किंवा दस्ताऐवज याचा उल्लेख त्यामध्ये का आला नाही? याचे सुध्दा आपण उत्तर दया.

<u>डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):–</u> मा. महापौर महोदया, हा जो आर.सी.एच. II प्रकल्प आहे २००५ च्या मध्यापासुन २०१० पर्यंत महाराष्ट्र राज्य सरकार या महानगरपालिकेस देवु इच्छित आहे. महाराष्ट्रात काही महानगरपालिकांमध्ये आय.पी.डी.पी. हा प्रकल्प आहे काही महानगरपालिकांमध्ये आर.सी.एच. II हा प्रकल्प चालु आहे. काही ठिकाणी युरोपीयन कमिशनचा प्रकल्प चालु आहे. या सर्व प्रकल्पांमध्ये एक सारखापणा आणण्यासाठी सर्व महानगरपालिकानी आर.सी.एच. II च्या बॅनरखाली एकच प्रकल्प चालु ठेवला पाहिजे. हा मुद्दा समोर ठेवुन महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेला आर.सी.एच. II प्रकल्प दिला जाईल. या प्रकल्पानुसार जी काही कार्यप्रणाली आय.पी.डी.पी. मध्ये केली जात होती, बहुसंख्य तीच कार्यप्रणाली आर.सी.एच. II मध्ये होणार आहे. येथे प्रश्न विचारण्यात आला होता की,

आय.पी.डी.पी. मध्ये काय कार्यप्रणाली झाली होती  मी येथे सांगु इच्छितो की, आर.सी.एच. II मध्ये जी काही कार्यप्रणाली आम्ही घेवु इच्छित आहोत जी कार्यप्रणाली आय.पी.डी.पी. मध्ये होत होती तीच कार्यप्रणाली आर.सी.एच. II मध्ये सलगपणे कार्यरत राहणार आहे.  आय.पी.डी.पी. प्रकल्पांतर्गत या शहरामध्ये चार गैरसरकारी संस्था काम करत आहेत. त्यांची नावे याप्रकारे आहेत...........

१. टाटा इन्स्टीटयुट ऑफ सोशल सायन्स, मुंबई ही संस्था येथे, ज्या पिडीत महिला आहेत, ज्या घरगुती किंवा सामाजिक अत्याचाराने पिडीत असतात त्यांना कायदेविषयक सल्ला पाहिजे असतो तो सल्ला या संस्थेकडुन दिला जातो. यासाठी पोलिस उपायुक्त यांच्या कार्यालयात एक केंद्र कार्यान्वीत आहे. ते केंद्र आजच्या तारखेला सुध्दा चालु आहे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—डॉ. साहेब याबाबत मी आपणांस विचारु इच्छितो आपण म्हणालात की ज्या महिला गरोदर आहेत त्यांच्या उपचारासाठी ही संस्था सुध्दा काम करते. परंतु आपण ज्या दोन वैद्यकीय अधिका—यांची नेमणुक केली आहे माझ्या माहितीनुसार त्यातील एक पी.डी. याट्रीक्स तज्ञ आहे व दुसरा फक्त एम.बी.बी.एस. आहे. तर जो एम.बी.बी.एस. डॉक्टर आहे त्यास गॉयनालॉजीबाबत काय ज्ञान असेल? व तो काय उपचार देवु शकतो? पी.डी.याट्रिक्स डॉक्टर बाळाचा जन्म झाल्यानंतर उपचार देवु शकतो परंतु बाळ पोटात असतांना एम.बी.बी.एस. डॉक्टर त्यास काय संरक्षण देवु शकतो? तर यासाठी आपण गॉयना तज्ञ का नेमला नाही? मागील ५ वर्षामध्ये ज्या महिलेने काम केले आहे ती गरोदर महिलांबाबत काय लिहु शकते किंवा सांगु शकते?

डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—मा. महापौर महोदया, येथे नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिका—यांबाबत विचारणा केली आहे, सदनाला या प्रकल्पाबाबत सांगु इच्छितो की, ज्या काही कर्मचा—यांची भरती केली आहे ती ठेकेपध्दतीवर केली आहे. वैद्यकीय अधिका—याचा पगार रुपये १३ हजार प्रतीमहा असे निश्चित केला आहे. प्रकल्पाच्या ज्या मार्गदर्शक सुचना आहेत त्यामध्ये याबाबतची शैक्षणिक अर्हता पी.डी.याट्रिशन पाहिजे किंवा गॉयनाक्लॉजिस्ट पाहिजे असे नाही.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— परंतु जो विषय आहे तो पी.डी.याट्रिक व गरोदरपणा याच्याशी संबंधीत आहे.

डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—सांगतो आहे, आर.सी.एच. II चा अगोदर अर्थ सांगतो, जन्मापासुन मरणापर्यंत जे काही वयोगट आहेत भलेही ते जेष्ठ नागरीकांचा गट असो, त्यांनाही आर.सी.एच. II अंतर्गत सेवा दयायची आहे. ही सेवा फक्त महिला व बालकांसाठी नाही. हे मी येथे स्पष्ट करत आहे. वैद्यकीय अधिका—यांची नेमणुक करण्यासंबंधी ज्या मार्गदर्शक सुचना आहेत त्यामध्ये असे लिहिले आहे की,..........

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— परंतु आर.सी.एच. II आहे यामध्ये नॉर्मस जे आहेत त्यास आपण नाव काय दिले आहे? प्रॉडक्टीव्ह चाईल्ड हेल्थ याचा अर्थ काय आहे?

डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):— याचा अर्थ जो आहे, रिप्रॉडक्टीव्ह चाईल्ड हेल्थ, जन्मापासुन मरणापर्यंत ज्या काही सेवा दयायच्या आहेत, भलेही मग त्या जेष्ठ नागरीकांना दयायच्या असोत, अंध लोकांना दयायच्या असोत, कुणाच्या डोळयाचे ऑपरेशन करण्याची सेवा असो या सर्व सेवा आर.सी.एच. II अंतर्गत आहेत व त्या आम्हांला दयायच्या आहेत. येथे मी एक सांगु इच्छितो, एक पीरॅडीशन मुलांसाठी नेमला आहे. आमचे काम स्वतंत्रपणे नसुन ते मध्यवर्ती रुग्णालय व शासकिय प्रसृतीगृह यांच्या संयुक्त विद्यमाने, शासकिय प्रसृतीगृहामध्ये दोन गॉयनालॉजिस्ट घेतलेले आहेत व तिसरा जो डॉक्टर आहे तो आम्ही नेत्रतज्ञ यासाठी घेतला आहे कारण की, मध्यवर्ती रुग्णालय किंवा शासकिय प्रसृतीगृह येथे डोळयाच्या ऑपरेशनची काही सोय नाही. त्याठिकाणी शासनाकडुन डोळयांचा डॉक्टर दिलेला नाही. संयुक्तीरित्या सर्व सेवा देण्यासाठी आम्ही हा निर्णय घेतलेला आहे. हे दोन्हीही वैद्यकीय अधिकारी खुपच चांगल्याप्रकारे काम करत आहेत. आम्ही प्रत्येक वर्षी आय.पी.डी.पी.चा अहवाल जाहिर करुन शासनाला दिला जातो. हा अहवाल युएनएफटीएन पर्यंत पाठविला जातो. या अहवालाची प्रत आम्ही आपणांस केव्हाही उपलब्ध करुन देवु शकतो.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> डॉक्टर साहेब, आपण मला सांगा की, जो रकाना क्र. ६ येथे दिला आहे, पर्यावरण स्थिती व कृति आराखडा त्यामध्ये याचा काही उल्लेख का नाही आला?

<u>डॉ. खरात (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):—</u> त्यामध्ये का नाही दिला गेला की, हा जो कर्मचारी वर्ग आहे तो ठेकेपध्दतीचा कर्मचारी वर्ग आहे त्यांचे २००७ नंतर सलग होण्याची शक्यता नव्हती. जर आम्हांला शासनाकडुन आर.सी.एच. II मिळत असेल तर २०१० पर्यंत हा प्रकल्प चालेल त्यामुळे याचा उल्लेख पर्यावरण स्थिती व कृति आराखडयात केलेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मग त्यात जे डॉक्टर येतील तेथे गॉयना तज्ञ असतील किंवा नाही? की तेच डॉक्टर सलग करणार? ठेकेपध्दतीने आपण कुठलाही डॉक्टर घेवु शकता काय? का जरुरी नाही की तोच डॉक्टर घेतला पाहिजे? आज आपण सांगितले की, रुपये १३००० पगारावर एक डॉक्टर मिळतो तर मी असे बोलतो की, ७०००—८००० मध्ये सुध्दा गॉयना तज्ञ डॉक्टर मिळतो. आज जी स्थिती आहे त्यामध्ये डॉक्टर व अभियंता तर नाहीतच. एम.बी.बी.एस, एम.डी, एम.एस. रुपये ७०००/—, ९०००/—, १००००/— मध्ये काम करतात. तर येथे नियमित डॉक्टर असला पाहिजे अशी माझी आपणांस विनंती आहे. जेव्हा—जेव्हा आपण हा प्रकल्प हाती घेतला आहे, प्रॉडक्टीव्ह चाईल्ड हेल्थ त्यामध्ये गॉयना तज्ञ असणे जरुरी आहे इतकीच माझी विनंती आहे. व दुसरे म्हणजे व जो पर्यावरण स्थिती आराखडा आहे त्यामध्ये आपण अवैद्यकीय तज्ञ ठेवला आहे जो आरोग्य कक्षात काम करतो त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी का नाही आपण नियुक्त केला? याचे सुध्दा उत्तर तुम्ही दिले पाहिजे?

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> मा. महापौर महोदया, येथे जो पर्यावरण स्थिती दर्शक आराखडा आहे ती एक वेगळी कार्यप्रणाली आहे वा हेल्थ बाबत आहे. आपण जे अवैद्यकिय अधिकारी बाबत बोलत आहात ते श्री. चिजवानी यांच्या बाबतीत बोलत आहात काय?

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> श्री. के.एन. म्हात्रे यामध्ये कार्यरत आहेत.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> श्री. म्हात्रे हे आरोग्य अधिकारी आहेत त्यांचे हेल्थविषयी काही संबंध नाही.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> नाही आहे परंतु हॉस्पिटल ॲण्ड इन्फ्राक्ट्रक्चर इन उल्हासनगर.

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):—</u> ते माहिती देण्यासाठी आहे, माहिती गोळा करण्यासाठी आहे. उल्हासनगरमध्ये किती रुग्णालय आहेत, काय आहेत, त्यात कोणती सुविधा दिली जाते? ती माहिती गोळा करण्याचे काम ते करत होते. जेव्हा पर्यावरण स्थिती आराखडा बनत होता, त्यावेळेस माहिती गोळा करण्याचे काम त्यांचे होते. ना काही श्री. म्हात्रे हे अधिकारी आहेत ना म्हात्रे याची जबाबदारी आहे. आपण जर पाहिलात तर काही माहिती उप—अभियंता शिर्के, व काही माहिती दुस—या अधिका—यांनी गोळा केली, तर काही माहिती श्री. भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांनी गोळा केली आहे, याचाच अर्थ असा की, ते या विभागाचे अधिकारी नाहीत व आपण जे हेल्थ विषयी पर्यावरण स्थिती आराखडा विषयी बोलत आहात त्याचे या उपाययोजनेत उल्लेख नाही आहे. त्यांची ही योजना महापालिकेच्या निधीतुन चालत नव्हती.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> नाही, चालत होती परंतु ५ वर्षानंतर येणा—या कार्यप्रणालीत तर ते व्हायला पाहिजे होते?

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, हा प्रस्ताव जो महाराष्ट्र शासनाकडुन आलेला आहे, भारतीय जनता पार्टी व शिवसेनेचा त्यास विरोध नाही परंतु अशा काही गोष्टी आहेत की, आरोग्य विभाचे काम उल्हासनगर शहरामध्ये शुन्य आहे. महाराष्ट्र शासनाकडुन उल्हासनगर महापालिकेत आरोग्य विषयक किती पुस्तके आली आहेत? जर आपण आरोग्य विभागाकडे जाल तर रस्त्यावर पडलेल्या पुस्तकांचा ढिगारा आपणांस दिसुन येईल. भलेही ती पुस्तके कोणत्याही विषयावरचे असोत फारच मोठ—मोठी पुस्तके तेथे पडुन आहेत व ही पुस्तके नंतर रद्दी वाल्यांना दिली जातात याचे प्रत्यक्ष उदाहरण, व याचा प्रत्यक्ष पुरावा माझ्याकडे आहे, आज पर्यंत ही पुस्तके आरोग्य विभागामार्फत कुठेच

वाटलेली नाहीत. व आपणांस जर पाहायचे असेल तर आज सुध्दा आपण तेथे २५–५० पुस्तके तेथे पडुन आहेत. या पुस्तकांवर जर शहराचा पैसा खर्च होतो व त्यामुळे आरोग्य विभागात काही सुधारणा होत असेल, तर आमच्या कोणत्याही सदस्याचा त्यास विरोध नसेल. परंतु पैसा फुकट खर्च होतो व शहराचे सार्वजनिक आरोग्य सुधारत नसेल अशा प्रकारची जर स्थिती असेल तर ते बरोबर नाही.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– आयुक्त साहेब, सचिव साहेब, आरोग्य विषयक हो जो प्रस्ताव आहे तो आम्हांस बंधनकारक आहे कारण की लोकांच्या दैनंदिन गरजा पुरवितांना त्यांच्या आरोग्याची निगा राखणे हे महापालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. हा एकात्मिक लोकसंख्या प्रकल्प त्या अंतर्गत चालणारी कामे , किंवा मागच्या वर्षी त्याचा किती लोकांना फायदा झाला ते जरा विस्तृतपणे सांगा.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– डॉक्टर साहेब, आपण पुस्तकांविषयी सांगा की, ही जी पुस्तक येतात...

मा. सदस्य श्री. धनंयज बोडारे :– ही जी योजना आहे, ती राबविल्यावर त्याचा मागच्या वर्षी लोकांनी घेतलेला फायदा, भविष्यात ही चालु ठेवल्याने लोकांसाठी जे चांगले परिणाम आहते ते जरा सांगितले तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– मा. महापौर महोदया, आता डॉक्टर साहेब, आय.पी.डी.पी. चा जो अहवाल दाखवत आहेत किंवा जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हटले की, हा अहवाल तो नगरसेवकांना सुध्दा वाटला जात नाही, तो पडुन असतो, एखादया नगरसेवकांनी तो बघितला असेल व घेतला असेल ही वेगळी गोष्ट आहे परंतु अशा कामाचा जो अहवाल आहे तो नगरसेवकांना वितरीत झाला पाहिजे. कारण तो वितरीत न झाल्याने चुकीची समज होतो व लोकांना असे वाटते की, आमचा आरोग्य विभाग काहीही काम करत नाही की तो झोपलेला आहे हे माहित होत नाही. या माहितीसाठी जो काही अहवाल आहे तो दिला पाहिजे. तसेच याबाबतीत माझा अजुन एक सल्ला आहे की बरीचशी माहिती नगरसेवकांना मिळत नाही. जसे टॅक्सच्या कामाबाबत आम्ही लोकांसाठी माहिती मागवतो तर ती जी माहिती आहे ती नगरसेवकांना मिळाली पाहिजे. अशी माहिती वर्तमानपत्रात आपण भलेही देत असाल की १५ दिवसात आपण टॅक्स भरा परंतु लोकांना माहिती दया, नगरसेवकांना दया. जसे हे पुस्तक आहे सर्वांना निदान वितरीत तरी केले पाहिजे. नगरसेवकांनाच जर माहित नसेल तर लोकांना सांगणार तरी काय? तर माहिती देण्यासाठी योग्य पध्दतीने वितरण झाले पाहिजे अशी माझी सुचना आहे.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– मा. महापौरजी, हा जो प्रकल्प आहे त्यासाठी आमचा विरोध नाही परंतु आम्हांला त्याची माहिती नाही. प्रकल्प काय आहे? डॉक्टरांचे शिक्षण काय आहे? व आपल्या उल्हासनगर शहरात त्याचा किती लोकांना फायदा झाला आहे? आपण जर आम्हांस ५–५ केसेस दिल्या तर आम्ही त्याचा सर्व्हे सुध्दा करु शकतो, डॉक्टर लोकांनी बरोबर काम केले आहे किंवा नाही? जर आपण त्यावर लाखो रुपये खर्च करणार तर त्या खर्चाचा फायदा नागरीकांना झाला आहे किंवा नाही? याची माहिती आमच्या सर्व सन्माननिय सदस्यांना असली पाहिजे. नाहीतर आम्हांला माहित नसतांना आम्ही प्रभागात असेच फिरत असणार?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–मा. महापौर महोदया, जे आय.पी.डी.पी. सोसायटीतर्फे आर.सी.एच. I कार्यक्रम येथे अंमलात आणला आहे त्याच्या ३–४ वर्षातील एकंदरीत कामाचा अहवाल सदनासमोर पुढच्या महासभेत ठेवला जाईल. व दुसरे म्हणजे जो आर.सी.एच. II चा अहवाल आम्ही राज्य शासनास प्रस्तुत करतो तो प्रस्तृत केल्यानंतर त्याची सुध्दा माहिती सदनासमोर ठेवली जाईल.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :– धन्यवाद.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:– पुस्तक शासनामार्फत..........

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–ज्या पुस्तकाबाबत आपण बोलत आहात, ती पुस्तके आलीत व प्रत्येकाला वाटली आहेत असे नाही, ती पुस्तके ठराविक एका वयोगटातील लोकांना वाटली जातात जसे की

ती पुस्तके प्रोढ व्यक्तींसाठी आहेत, ही पुस्तके ज्या विभागात वाटप केली पाहिजे अशा विभागातील शाळा आम्ही निवडल्या आहेत. राहणीमान आणि शैक्षणिक अशा पातळयांवरुन आपण आता वर आला आहात.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–ही पुस्तके कधी वाटप केली आहे ते सांगा. व बाहेर जी पुस्तके पडुन आहेत........?

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे):–ती जी पुस्तके आहेत ते ठराविक एका वयोगटाच्या लोकांसाठी वाटप केली जातात. जसे आम्ही जे प्रियर अॅज्युकेटर्स यांची ओळख पटविली आहे त्यांना सुध्दा ती पुस्तके दिली आहेत. व ज्या शाळांमध्ये ती वाटप करायची आहेत त्या शाळांची सुध्दा निवड केली आहे व जी पुस्तके उरलेली आहेत ती वाटप करण्याचे काम सलगपणे चालु आहे.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप:– मा. आयुक्त साहेब, व सचिव साहेब आमच्या प्रभाग समितीचे जे नविन अधिकारी आलेले आहेत सभागृहास त्यांचा परिचय करुन देण्याचे कदाचित आपण विसरला आहात. ते कोण अधिकारी आहेत, त्यांचा जरा परिचय करुन दिला जावा.

मा. सदस्य श्री. नाना पवार :– त्यांचा परिचय करुन दिला जावा.

मा. सचिव :– श्री. काटे साहेब यांची या महापालिकेत सहा. आयुक्त पदावर नियुक्ती झाली आहे. ते स्वत: आपली ओळख करुन देतील.

श्री. काटे (सहा. आयुक्त) :–मा. महापौर महोदया, मा. उप–महापौर, मा. आयुक्त, मा. सचिव, तसेच सर्व उपस्थित सदस्यगण व आमचे सर्व अधिकारी, मी मराठीत बोललो तर चालेल ना? मी श्री. अनिल महादेवराव काटे, संशोधन अधिकारी, नियोजन विभाग, मला शासनाने उल्हासनगर महानगरपालिका येथे सहा. आयुक्त पदी प्रतिनियुक्ती दिली आहे. मा. आयुक्त साहेब यांनी मला प्रभाग समिती क्र. २ येथे प्रभाग अधिकारी म्हणुन नियुक्त केले आहे. दिनांक ७ जुलै, २००५ रोजी श्री. भदाणे यांचेकडुन तेथिल कार्यभार स्विकारला आहे. माझी शासकिय सेवा ११ नोव्हेंबर, १९८२ पासुन सुरु झाली. त्यात मी एक वर्ष उदयोग विभाग, ११ वर्ष ग्रामविकास विभाग, ११ वर्ष विक्रीकर विभागात व १ वर्ष नियोजन विभागात संशोधन सहायक व संशोधन अधिकारी या पदावर कार्यरत होतो. माझ्या वरील पदाच्या कार्यकाळात मी सुरुवातीला राज्य औदयोगिक उत्पादन काढण्याचे काम केले. तर आर.डी.डी.मध्ये आय.आय.डी.पी.पी. या प्रोग्रॅमचे मॉनेटरिंग केले. तर ११ वर्ष विक्रीकर विभागात विक्रीकराच्या विविध कायदयाअंतर्गत घेण्यात येणा–या करांचे नियोजन केले. ग्राम विकास विभाग व विक्रीकर विभागात मला एक–एक जादा वेतनवाढ प्राप्त झाली आहे. मी महानगरपालिकेच्या कामांचे आकलन करुन माझ्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी प्रभावीपणे व निष्ठेने पार पाडेन. धन्यवाद.

मा. उप–महापौर :– हे पहा आमच्या प्रभागाचे प्रभाग अधिकारी आहेत, खुप हुशार आहेत.

मा. सचिव :– त्यांचे हार्दिक स्वागत आहे.

काही सदस्य :– पास–पास.............

मा. उप–महापौर श्री. विनोद तलरेजा हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. महापौर :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

☑

**विषय क्र.** ४:— सन २००६, २००७ व २००८ मध्ये आर.सी.एच—II प्रकल्प राबविणेकामी आय.पी. डी. पी अंतर्गत नेमण्यात आलेल्या १५ अधिकारी व कर्मचा—यांचे वेतनासाठी खर्चास मान्यता देणे.

प्रस्तावना:—

मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयाचे पत्र जा. क्र. SFWB/IPDP/D-7/2005, Date 31st March 2005 अन्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सुरु असलेला एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प दिनांक ३० जून, २००५ रोजी बंद करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत.

तसेच सदर पत्रान्वये एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्पा अंतर्गत सुरु असलेले विविध आरोग्य विषयक कार्यक्रमाची अंमलबजावणी आर.सी.एच—II प्रकल्पाअंतर्गत सुरु ठेवण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प सुरु असल्याने महाराष्ट्र शासनाकडून आर.सी.एच.—II प्रकल्पासाठी अनुदान देण्यात आलेले नाही. दिनांक ३० जून, २००५ पासून एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्प बंद करण्यात येत असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात आर.सी.एच.—II प्रकल्प सुरु करण्यासाठी राज्य शासनाकडे उल्हासनगर महानगरपालिकेचा ''प्रकल्प अंमलबजावणी आराखडा'' [ "Project Implementation Plan"(PIP)] माहे जून २००५ मध्ये सादर करण्यात येईल.

आय.पी.डी.पी. साठी नेमण्यात आलेल्या करारतत्वावरील अधिकारी व कर्मचा—यांबाबत—

मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य सेवा, पुणे यांच्या दिनांक ३१/५/२००५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे की, आय.पी.डी.पी. प्रकल्पाअंतर्गत नेमलेल्या करारतत्वावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाची ५० टक्के रक्कम २००६ व २००७ (जानेवारी २००६ ते डिसेंबर २००७) या दोन वर्षासाठी उल्हासनगर महानगरपालिकेने दिल्यास व जानेवारी २००८ पासून पुढे सदर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन १०० टक्के उल्हासनगर महानगरपालिकेने देण्याचे मान्य केल्यास सदर पदांचा अंतर्भाव आर.सी.एच.—II प्रकल्पात करता येईल सध्या एकात्मिक लोकसंख्या विकास प्रकल्पात नेमलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची आर.सी.एच.—II प्रकल्प अंमलबजावणीसाठी आवश्यकता आहे. आय.पी.डी.पी. व आर.सी.एच.—II प्रकल्पांतर्गत दिल्या जाणा—या आरोग्य सेवा सारख्याच असल्याने सध्या आय.पी.डी.पी. अंतर्गत काम करणा—या अधिकारी व कर्मचारी यांच्या अनुभवाचा आर.सी.एच.—II प्रकल्प राबवितांना फायदा होईल.

आय.पी.डी.पी. अंतर्गत नेमण्यात आलेल्या करारतत्वावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावर खालीलप्रमाणे खर्च आय.पी.डी.पी. कडुन करण्यात येतो.

तक्ता क्रमांक —१

| अ.क्र. | संवर्ग | एकूण पदे | दरमहा ठोक वेतन प्रति कर्मचारी | दरमहा वेतनाची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | वैदयकिय अधिकारी | २ | १३,००० | २६,००० |
| २. | पी.एच.एन. | ३ | ६,००० | १८,००० |
| ३. | ए.एन.एम. | ८ | ५,५०० | ४४,००० |
| ४. | डाटा एन्ट्री ऑपरेटर | १ | ५,००० | ५,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | आय. ई.सी. अधिकारी | १ | ७,००० | ७,००० |
| एकुण रुपये—— | | | | १,००,००० |

याप्रमाणे दरमहा रुपये १,००,०००/— खर्च वेतनावर आय.पी.डी.पी. कडुन करण्यात येतो. आर. सी.एच.—II प्रकल्प अंमलबजावणीसाठी शासनाच्या निर्देशानुसार सन २००६ व २००७ मध्ये ५० टक्के व २००८ पासून १०० टक्के वेतनाची जबाबदारी उल्हासनगर महानगरपालिकेने उचलणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे खर्च उल्हासनगर महानगरपालिकेस करावा लागेल. यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने आर.सी.एच. सोसायटीस खालीलप्रमाणे अनुदान देण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

तक्ता क्रमांक —२

| अ. क्र. | वर्ष | वेतनावरील एकुण वार्षिक खर्च | उल्हासनगर महानगरपालिकेने करावयाचा वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| १. | २००६ | १२,००,००० | ६,००,००० |
| २. | २००७ | १२,००,००० | ६,००,००० |
| ३. | २००८ पासुन २०१० पर्यंत दर वर्षी | १२,००,००० | १२,००,००० |

सन २००६ व २००७ मध्ये आर.सी.एच.—II प्रकल्प राबविण्यासाठी सदर अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनासाठी ५० टक्के रक्कम आर.सी.एच.—II प्रकल्पांतर्गत राज्य शासनाकडुन मिळेल. तेव्हा वरील तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविल्यानुसार खर्चास मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. मा. महासभेच्या मंजुरीनंतर सदर बाबींचा अंतर्भाव करुन आर.सी.एच.—II प्रकल्प अंमलबजावणी आराखडा माहे जून २००५ अखेरपर्यंत राज्य शासनास सादर करता येईल.

महासभा ठराव क्र:— ३२ दिनांक:—२०/७/२००५.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विश्वनाथ पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव विविध आरोग्य विषयक शासन पुरस्कृत आय.पी.डी.पी. प्रकल्प अंतर्गत नेमलेल्या करार तत्वावरील एकुण १५ अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाची ५० टक्के रक्कम २००६ व २००७ (जानेवारी २००६ ते डिसेंबर २००७) या दोन वर्षाकरीता व सन २००८ ते २०१० पर्यंत सदर अधिकारी व कर्मचा—यांचे १०० टक्के वेतनाची उल्हासनगर महानगरपालिकेने स्वखर्चाने जबाबदारी घेवुन आर.सी.एच II प्रकल्प राबविण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती कोमल बठिजा, श्रीमती अनिता गुप्ता हे सभागृहातुन बाहेर गेले.

---

**विषय क्र. ५ :—** श्री. उत्तम लोणारे यांचा उपायुक्त पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

---

काही सदस्य :— पास—पास.............

मा. सचिव :— १ वर्षासाठी आहे, पास?

**मा. उप—महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी पुनः सभागृहात प्रवेश केला.**

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. ५ :—** श्री. उत्तम लोणारे यांचा उपायुक्त पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

प्रस्तावना:—

महाराष्ट्र शासन, गृह विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ३१ मे, २००३ च्या आदेशान्वये श्री. उत्तम शिवराम लोणारे यांची या महापालिकेत उप—आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने दिनांक २/६/२००३ पासुन नेमणुक केलेली असून सदर पदी ते कार्यरत आहेत.

श्री. उत्तम लोणारे दिनांक २/६/२००३ पासुन ०१ वर्षाच्या प्रतिनियुक्तीस महासभेने महासभा ठराव क्र. ४९, दिनांक १८/७/२००३ अन्वये ०१ वर्षासाठी मुदतवाढ दिली. त्यानंतर त्यांच्या प्रतिनियुक्तीस दिनांक ३१/५/२००५ पर्यंत महासभा ठराव क्र. २३, दिनांक २३/६/२००४ अन्वये मंजुरी दिली आहे.

श्री. उत्तम लोणारे यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीतील काम पाहता व त्यांच्या प्रशासकिय कामाचा अनुभव पहाता त्यांच्या सेवेची महापालिकेला आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ३१/५/२००६ पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:— ३३ दिनांक:— २०/७/२००५

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव श्री. उत्तम शिवराम लोणारे यांच्या उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील उपायुक्त पदावरील प्रतिनियुक्तीच्या कालावधीस दिनांक १/६/२००५ ते ३१/५/२००६ पर्येत वाढविण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————————

**विषय क्र. ६ :–** उल्हासनगर शहरातील खाजगी शुश्रुषागृह, प्रसुतीगृह, धर्मादाय रुग्णालये इत्यादींची नोंदणी व नियंत्रण करणेकामी महापालिकेतर्फे तयार करण्यात आलेल्या प्रारुप उपविधीस अंतीम मान्यता देणे.

————————————————————————————————————————————

<u>काही सदस्य :–</u> पास–पास.............

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> एक मिनिट, नोंदणी करतांना, मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये जे छापुन येत होते की, उल्हासनगरमध्ये बोगस डॉक्टर्स आहेत, त्यांच्याबाबत सुध्दा गांभीर्यपुर्वक दखल घेवुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

<u>मा. सचिव :–</u> पास?

<u>मा. महापौर :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ६ :–** उल्हासनगर शहरातील खाजगी शुश्रुषागृह, प्रसुतीगृह, धर्मादाय रुग्णालये इत्यादींची नोंदणी व नियंत्रण करणेकामी महापालिकेतर्फे तयार करण्यात आलेल्या प्रारुप उपविधीस अंतीम मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:–</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी शुश्रुषागृहे/प्रसृतिगृहे /धर्मदाय/रुग्णालये/व कृतीचिकित्सा प्रयोगशाळा यांची नोंदणी करण्यासाठी ''प्रारुप उपविधी'' बनविण्यात आलेली आहे. सदर उपविधी महाराष्ट्र शासन राजपत्रात (१ फेब्रुवारी, २००५) मध्ये प्रकाशीत झाली आहे.

सदर प्रारुप उपविधी सार्वजनिक आरोग्य विभागाने जनतेकडुन प्रतिक्रिया, सूचना जाणून घेण्यासाठी महानगरपालिकेच्या सूचना फलकावर लावली होती. सदर प्रारुप उपविधीवर चार आठवडयाच्या कालानंतरही प्रतिक्रिया किंवा सूचना आलेली नाही, तरी सदर उपविधी महासभेच्या अंतिम मंजुरीस सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:–</u> ३४ <u>दिनांक:– २०/७/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती भावना खिलनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भालेराव गौतम

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील खाजगी शुश्रुषागृह, प्रसुतीगृह, धर्मादाय रुग्णालये इत्यादींची नोंदणी व नियंत्रण करणेकामी उल्हासनगर महापालिकेतर्फे तयार करण्यात आलेल्या प्रारुप उपविधीस अंतीम मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

मा. सदस्या श्रीमती निता अहुजा , श्रीमती मिनु दासानी, श्रीमती माया मसंद या सभागृहातुन बाहेर गेल्या.

---

**विषय क्र. ७ :—** श्री. अनंता चिंतामण भोपी, विद्युत मदतनीस हे महापालिका सेवेत परिविक्षाधीन कालावधीत कार्यरत असताना त्यांचे पूर्वचरित्र गुन्हेगारी स्वरुपाचे आढळल्याने त्यांच्या सेवामुक्तीस कार्योत्तर मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, हा जो विषय आला आहे, सर्वांचे निलंबन कायम केले पाहिजे असे माझे मत आहे. परंतु महासभेमध्ये निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव जेव्हा येतो........

<u>मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :—</u> निलंबन कायम करण्याचा विषय नाही. सेवामुक्तीचा आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> नाही, दुसरा मुद्दा आहे. महासभेमध्ये ज्या कुणाचे निलंबन कायम होते किंवा ज्या कुणाला सेवामुक्त केले जाते, नंतर जेव्हा निलंबन संपृष्टात आणुन कामावर घेतले जाते. तेव्हा महासभेपुढे कधीही विषय आणला जात नाही. कर्मचा—याचा रोष / नाराजी आम्ही सहन करतो आणि त्यास पुन्हा कामावर घेतल्याचे श्रेय मात्र प्रशासन घेते. सभागृहाला आमची विनंती आहे. सर्व सदस्य ही गोष्ट मान्य करतील की, ज्या कुणाचे निलंबन संपृष्टात येते, जेव्हा आपण त्यास दोषमुक्त करता त्याचाही प्रस्ताव महासभेपुढे आला पाहिजे. श्री. चंदर धिरमलानी याचे बाबतीत स्थायी समिती व महासभेमध्ये ठराव पारीत करुन महापालिका सेवेतुन त्यास बडतर्फ केले त्यानंतर पुन्हा त्यास कामावर घेण्यात आले. तर महासभेपुढे असा विषय आणला पाहिजे. म्हणुन माझी मा. महापौरास अशी विनंती आहे की, यानंतर ज्या कुणाचा निलंबनाचा विषय असेल, यासाठीच मी निलंबन व बडतर्फी हे दोन्ही मुददे मांडले. असे कर्मचारी जेव्हा न्यायालयात दाद मागतात, ते न्यायालयातुन जिंकुन येतात, न्यायालयातून जिंकुन आल्यावर त्यांना पुन्हा कामावर घेतले जाते. यांचा प्रस्ताव पुन्हा महासभेत आला पाहिजे. ज्या कुणाचे निलंबन कायम केले जाते त्याची नाराजी आम्ही ओढवुन घेतो. परंतु त्यास जेव्हा पुन्हा कामावर घेतले जाते तेव्हा त्याचे श्रेय सुध्दा आम्हांलाच मिळाले पाहिजे. तर मेहरबानी करुन माझी अशी विनंती आहे की, हा प्रस्ताव आम्ही पारीत करतो परंतु अश्या कर्मचा—यास जेव्हा पुन्हा कामावर घेतले जाते तेव्हा तो प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे आला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, आता थोडया वेळेपुर्वी चर्चा चालु होती, प्रश्नोत्तराचा कालावधी एक तासाच्या ऐवजी अर्ध्या तासाचा केला जावा व आता असे म्हणतात की, निलंबन रद्द झाल्यानंतर प्रस्ताव महासभेपुढे आणला जावा. तर यामध्ये सुध्दा वेळेचा अपव्यय होईल म्हणुन याबाबत सचिव साहेबांनी सांगावे की, असा प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे आणणे जरुरीचे आहे काय?

<u>मा. सचिव :—</u> कृपया आपण आपला प्रश्न जरा स्पष्ट करावा.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> श्री. किशोर वनवारी यांनी आता काय म्हटले की हे जे निलंबन कायम करण्याचे प्रस्ताव आणले जातात आणि यानंतर जर त्यांना पुन्हा कामावर घेतले जात असेल तर तो प्रस्ताव सुध्दा महासभेत आणला जावा. तर असा प्रस्ताव आणणे जरुरीचे आहे काय? की निर्णय झाल्यानंतर त्यास पुन्हा कामावर घ्यायचे किंवा नाही घ्यायचे हा आयुक्त साहेबांचा अधिकार आहे?

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया या सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. सचिव :—</u> मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६ अनुसार चौकशी अंती जर कुणी कर्मचारी दोषी असल्याचे आढळुन आले, ज्या किरकोळ शिक्षा आहेत, त्या देणे हे मा. आयुक्त साहेबांच्या

कार्यक्षेत्रात आहे. त्या शिक्षा देवुन ते अशा कर्मचा—यास पुन्हा कामावर घेवु शकतात व जेथे त्यास कामावरुन काढुन टाकायचे आहे अशा वेळी त्यास कारणे दाखवा नोटिस बजावयाची आहे. व त्यास कामावरुन काढुन टाकायचे असेल तर तो प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणला जातो. बडतर्फ केलेला कर्मचारी जर अपिल करु इच्छित असेल तर तो प्रस्ताव महासभेपुढे येवु शकतो.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> म्हणजेच श्री. किशोर वनवारी यांनी म्हंटल्याप्रमाणे असा प्रस्ताव पुन्हा महासभेपुढे आणणे जरुरीचे नाही ना?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, मी खुलासा करु इच्छितो की, श्री. चंदर धिरमलानी यास बडतर्फ केले होते. जेव्हा न्यायालयातुन त्याला आदेश प्राप्त झाला तेव्हा त्याचा प्रस्ताव महासभेपुढे आला होता की श्री. चंदर धिरमलानी यांस न्यायालयाकडुन आदेश प्राप्त झाला आहे त्याबाबत आता महासभेने निर्णय घ्यावा. असा विषय महासभेपुढे आला होता की नाही?

<u>मा. सचिव :—</u> आला होता.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> तर महासभेपुढे त्याचा प्रस्ताव कसा आला होता? आज जर या कर्मचा—यास आम्ही सेवेतुन बडतर्फ केले तर या कर्मचा—यास अधिकार आहे की, त्याने न्यायालयात दाद मागावी, कामगार न्यायालयात जावे किंवा औद्योगिक न्यायालयात जावे. त्यामागुन तो जर जिंकुन येत असेल किंवा काही निर्णय होत असेल तर त्याबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे आला पाहिजे. जसे श्री. चंदर धिरमलानी याचा प्रस्ताव आला होता मी हे म्हंटले. व ज्या कर्मचा—याचे येथे निलंबन कायम केले जाते व त्यास जर नंतर दोषमुक्त केले जात असेल तर त्याचाही प्रस्ताव माहितीसाठी महासभेपुढे आला पाहिजे.

**मा. सदस्य श्री. भालेराव गौतम हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वनी :—</u> माहितीसाठी आपण पत्र पाठवु शकतात. महासभेपुढे प्रस्ताव आणणे जरुरीचे नाही. आता आताच सचिव साहेबांनी सांगितले, आपण अगोदरच म्हणता की, वेळ कमी आहे, माहितीसाठी आपण पत्र देवु शकतात की, आम्ही त्यास कामावर पुन्हा घेतले आहे परंतु त्याचा प्रस्ताव चर्चेसाठी महासभेत आणणे जरुरीचे नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> निलंबनाचा माहितीसाठी महासभेत पत्र दयावे. व ज्यास बडतर्फ केले जाते तो जर न्यायालयातुन जिंकुन येत असेल तर त्यास पुन्हा कामावर घेण्यासाठीचा प्रस्ताव महासभेपूढे आणला जावा.

<u>मा. सचिव :—</u> पास?

<u>काही सदस्य :—</u> पास—पास..............

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

**विषय क्र.** ७ :— श्री. अनंता चिंतामण भोपी, विद्युत मदतनीस हे महापालिका सेवेत परिविक्षाधीन कालावधीत कार्यरत असताना त्यांचे पूर्वचरित्र गुन्हेगारी स्वरुपाचे आढळल्याने त्यांच्या सेवामुक्तीस कार्योत्तर मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

श्री. अनंता चिंतामण भोपी, विदयुत मदतनीस यांची जा. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२२२, दिनांक २५/९/२००३ च्या आदेशान्वये दोन वर्षाच्या परिक्षावधीन कालावधीसाठी आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहुन नियुक्ती केली होती. त्यानुसार ते दिनांक २५/९/२००३ रोजी विदयुत विभागात रुजु झाले.

दिनांक २५/९/२००३ च्या नियुक्ती आदेशातील अट क्र. ०३ नुसार त्यांचा वर्तवणूक पडताळणीचा अहवाल वरीष्ठ पोलिस निरिक्षक, मुरबाड यांच्याकडुन दिनांक २२/१०/२००३च्या पत्राने मागविला होता. परंतु सदर अहवाल प्राप्त झाला नसल्याने व परिविक्षाधिन कालावधी संपत येत असल्यामुळे दिनांक १५/७/२००५ आणि ११/४/२००५ रोजी स्मरणपत्र पाठवुन त्यानुसार पोलिस अधिक्षक ठाणे, ग्रामीण यांच्या दिनांक २७/४/२००५ रोजी स्मरणपत्र पाठवुन त्यानुसार पोलिस अधिक्षक ठाणे, ग्रामीण यांच्या दिनांक २७/४/२००५ च्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता श्री. अनंता चिंतामण भोपी यांचे पुर्वचरित्र हे गुन्हेगारी स्वरुपाचे असुन त्यांच्याविरुध्द सी.आर.पी. खाली गुन्हा दाखल असल्याने त्याच्या सेवा नियुक्ती आदेशातील अट क्र. ०३ नुसार त्यांना उमपा/साप्रवि/आस्था/मुली/४०८/०५, दिनांक १३/६/२००५ च्या आदेशान्वये त्यांची सेवा तात्काळ संपृष्टात आणण्यात आली आहे. सबब सदर प्रस्ताव मा. महासभेच्या कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u>३५ <u>दिनांक:— २०/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लालबिहारी यादव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अनंता चिंतामण भोपी, विद्युत मदतनीस यांचे महापालिका सेवेतील परिक्षावधीन कालावधीत पूर्वचरित्र गुन्हेगारी स्वरुपाचे असल्याचे आढळल्याने प्रशासनातर्फे त्यांना बजावलेला सेवामुक्तीचा आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ८:—** महाराष्ट्र शासनाच्या शहर व्यवस्थापक, व्यवस्थापन, महाराष्ट्र या संघटनेचे सभासद होणेकामी वार्षिक फि व कॉर्पस फंडपोटी रु ३ लक्ष अदा करण्यास मान्यता देणे.

———————————————————————————————————————————

**काही सदस्य :—** पास—पास.............

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

☑

**विषय क्र.** ८:— महाराष्ट्र शासनाच्या शहर व्यवस्थापक, व्यवस्थापन, महाराष्ट्र या संघटनेचे सभासद होणेकामी वार्षिक फि व कॉर्पस फंडपोटी रु ३ लक्ष अदा करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना:—

महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता शहर व्यवस्थापक, व्यवस्थापन, महाराष्ट्र City Managrer, Association, Maharashtra, (CMAM) — ची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर असोसिएशन मध्ये महानगरपालिका आयुक्त हे सभासद होणे बाबत सुचित केलेले आहे. ''शहर व्यवस्थापक, व्यवस्थापन (City Manager Association) जे कार्यक्रम / योजना राबवित आहेत, त्या राबवित असलेल्या कार्यक्रम / योजना याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

1. Development Urban Water Shed Management Plans.
2. Prepare Environmental Management Report.
3. Action plans for SW and DMW Mngt.
4. Conduct Energy Audit for energy efficiency in street lighting etc.
5. Conduct water audit.
6. Conduct HR study.
7. Facilitate-e-government
8. Facilitate double entry accrual based accounting system.
8. Documentation and transfer of best practices in areas of SWM, DMWM, Street Lighting, Water mngt. bus transport system, etc.
9. Performance measurement of ULB's to help them set development targets on their own.
10. Facilitate preparation of City Development Strategies.
11. Facilitate preparation of City profiles and master plans by involving
12. students of architecture and urban planning colleges.
13. Prepare Databank of Agreement and Tender Documents of Various cities for different projects.
14. Database of various GOM and GOI schemes for ULB's.
15. Information of various agencies that support development projects.
16. Monthly Newspapers.
17. Conducting Workshops and training.

सदर संघटना ही नावाजलेली समूह संघटना असून अंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता पावलेली आहे. शिवाय सदर योजना / कार्यक्रम समूहाच्या रुपाने आयोजित केल्याने इतर महानगरपालिका आयुक्त वा सदस्यांचा एकमेकांत सुसंवाद होवुन विचारांची देवानघेवान होते. व वरील विषयाचे ज्ञान पुरेपुर ज्ञान मिळणेस मदत होते.

सचिव, सिटी मॅनेजर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, संचालक, नगरपालिका प्रशासन, जी.टी.एस. बिल्डींग, सर पोचखनवाला रोड, वरली, मुंबई यांनी सदर असोसिएशन मध्ये सभासद होणेसाठी कॉर्पस फन्ड म्हणुन २,५०,०००/— (दोन लाख पन्नास हजार फक्त) वार्षिक फी म्हणुन ५०,०००/— (पन्नास हजार फक्त) असे एकुण ३ लाख पाठविणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार रक्कम रुपये ५०,०००/— (पन्नास हजार फक्त) वार्षिक फी म्हणुन दरवर्षी भरावी लागेल.

सबब सदर असोसिएशन मध्ये सभासद होणेस रक्कम रुपये ३,००,०००/— (तीन लाख फक्त) अदा करणेबाबत मान्यता मिळणेसाठी महासभेपूढे ठेवणेसाठी प्रस्तावित करीत आहे.

महासभा ठराव क्र:— ३६ दिनांक:— २०/७/२००५

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती प्रेमा खांडेकर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव महाराष्ट्र शासनाच्या शहर व्यवस्थापक, व्यवस्थापन या संघटनेचे सभासद होणे कामी वार्षिक फि व कॉर्पस फंडपोटी रु ३ लक्ष अंशदान करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————
—

⇨ **विषय क्र. ९ :—** श्री नरेश शौकिन, कनिष्ठ लिपीक, यांचा स्वेच्छानिवृत्तीचा प्रस्ताव मंजुर करणे.

———————————————————————————————————————

<u>काही सदस्य :—</u> पास—पास.............

<u>मा. महापौर :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ९ :—** श्री नरेश शौकिन, कनिष्ठ लिपीक, यांचा स्वेच्छानिवृत्तीचा प्रस्ताव मंजुर करणे.

<u>प्रस्तावना:—</u>

श्री. नरेश शौकीन, लिपिक सध्या कार्यरत पाणी पुरवठा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका मध्ये दिनांक १/४/१९८४ पासुन कार्यरत असून त्यांची सेवा २१ वर्षे ०२ महिना ०२ दिवस झालेली आहे. त्याची दिनांक ०३/०६/२००५ च्या अर्जान्वये तीन महिन्याची स्वेच्छा सेवा निवृत्ती नोटीस दिली आहे. त्यांच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित नाही.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ च्या कलम ६५ मधील तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकारी सदर स्वेच्छा निवृत्ती मंजुर करण्यास सक्षम असल्याने श्री. नरेश शौकीन, कनिष्ठ लिपिक यांना दिनांक ३१/८/२००५ पासुन महापालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्ती मंजूर करण्याचा प्रस्ताव महासभेपूढे मंजुरीसाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> ३७ <u>दिनांक:— २०/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील श्री नरेश शौकिन, कनिष्ठ लिपीक, यांच्या स्वेच्छानिवृत्तीच्या प्रस्तावाची सुचना मान्य करत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १०:–** निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री बबन शंकर पवार यांच्या ''उद्यान अधिक्षक'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे

---

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>** मा. महापौरजी, या कर्मचा–याची जर नविन नियुक्ती असेल तर याबाबत खुलासा झाला पाहिजे कारण की, मागील वेळेस मा. महापौरांनी निर्णय दिला होता की, त्याची जी स्थिती आहे ती सभागृहापुढे ठेवली जावी. किती लोकांच्या मुलाखती घेतल्या? कोण पात्र आहे? कोण सर्व अर्हता धारण करत आहे? याची स्पष्ट यादी प्रत्येक महासभेपुढे ठेवली जाईल. व याचाही खुलासा झाला पाहिजे की, यास कामावर घेतले आहे की महासभा जेव्हा मंजुरी देईल त्यानंतर घेतले जाईल. नियुक्त प्राधिकारी महासभा आहे. सर्वांची यादी आमच्यासमोर येथे आली पाहिजे.

**<u>मा. महापौर :–</u>** श्री. नथु सोनवणेजी सभागृहात वर्तमानपत्र वाचण्यास मनाई आहे.

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>** बिस्कीट खाणे चालते?

**<u>मा. महापौर :–</u>** ज्यांना मधुमेहाचा त्रास आहे, अशांनी एक–एक तासांनी काही तरी खाल्ले पाहिजे असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

**<u>श्री. लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>** मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, हा जो प्रस्ताव महासभेपुढे आणला आहे. त्यास नियुक्ती दिलेली नाही. व उदयान अधिक्षक या पदासाठी आम्ही जी जाहिरात दिली होती, त्यानुसार ४० अर्ज आले होते. त्यातील १० उमेदवार पात्र होते. त्यांची नावे आम्ही निवड समितीपुढे ठेवली होती. त्यांच्यामधुन एकच पद भरायचे होते. यामध्ये जो अर्हता धारक होता त्याची निवड केली आहे, श्री. बबन शंकर पवार त्याची निवड केली आहे व प्रतिक्षायादीमध्ये सुवर्णा पाटील हिस ठेवली आहे. तर याची मेरिट लिस्ट व इतर माहिती सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्यांना आम्ही देवु.

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>** मा. महापौरजी, ही चुक आहे जी आता श्री. लोणारे साहेबांनी सांगितली. ४० अर्ज आले होते त्यामधील १० पात्र होते. यांनी त्या १० उमेदवारांना निवड समितीपुढे ठेवले. त्यातील एकाची निवड करुन त्याचा नेमणुकीचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवला. खरे म्हणजे नियुक्ती प्राधिकारी महासभा आहे. याबाबतचा कायदा काय आहेत तो मागील महासभेत सचिव साहेबांनी सांगितला होता. परंतु आता हे लोक सभागृहाची दिशाभुल करत आहे. मेहरबानी करुन हा प्रस्ताव रद्द केला जावा. आपण आमचे अधिकार काढुन घेत आहात.

**<u>श्री. लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>** मा. महापौर महोदया, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार जी निवड समितीची रचना केली जाते तिचे अध्यक्ष मा. आयुक्त असतात. पदसिध्द सदस्य म्हणुन मुख्य लेखा परिक्षक असतात. व आयुक्त साहेबांनी नेमलेले अधिकारी असतात. या सर्वांची मिळुन एक समिती असते. त्या समितीने पात्र उमेदवाराची महासभेपुढे शिफारस केली आहे. जी समितीची रचना झाली आहे ती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार आहे व आपण सुध्दा जे काही बोलत आहात ते सुध्दा या अधिनियमानुसारच, निवड समितीने आपल्या समोर शिफारस केली आहे. जे काही याबाबतचे दस्तऐवज आहेत ते महासभेपुढे ठेवण्यासाठी आम्ही त्यांना सांगितले आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:–</u>कुठे ठेवले आहेत? थेट एकाच नावाची शिफारस करुन गोषवारा महासभेपुढे ठेवला आहे. आपण आता जे म्हटले की, ४० अर्ज आले होते त्यातील १० पात्र होते......

<u>श्री. लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u> पुर्ण माहिती आम्ही आपणासमोर ठेवली आहे. ४० अर्ज आले होते. त्यातील १० लोक निवडले. हे सर्व गोषवा–यामध्ये दिले आहे. व याबाबत आणखी काही माहिती पाहिजे असेल तर ती मी आपणासमोर ठेवण्यास तयार आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> नाही, महासभेपुढे ही माहिती आपण ठेवलीच पाहिजे. ठेवु वगैरे नाही.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u>मा. महापौरजी, मी श्री. लोणारे साहेबांना विचारु इच्छितो की, हा जो एक कर्मचारी आपण नियुक्त केला आहे. या पदाची माहिती तर कुठे दर्शविली नाही?

<u>श्री. लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u> आमच्या आस्थापनेवर उदयान अधिक्षक हे पद मंजुर आहे. व ते एकमेव पद असल्यामुळे ते खुल्या प्रवर्गासाठी जाते. ते भरण्यासाठी आम्ही वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली होती. जाहिराती अंती आम्हांला ४० अर्ज प्राप्त झाले होते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आम्ही निवड समिती गठित केली आहे. या समितीने यातील उमेदवारांच्या मुलाखती घेवुन महासभा ही नियुक्ती प्राधिकारी असल्याने तिच्या समोर प्रस्ताव आम्ही ठेवला आहे.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u> त्याची शैक्षणिक अर्हता काय आहे? ती आपण सांगाल का?

<u>श्री. लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u> ही सर्व माहिती पुढील महासभेत आपणासमोर ठेवु.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> भरती करतांना लिहितात रिक्त पद, प्रत्येक अधिका–यास, कर्मचा–यास, नियुक्ती देतांना दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी दिला जातो. परंतु हे थेट लिहितात रिक्त पद. पद रिक्त असल्याने यांना देण्यात येत आहे. हे सर्व चुकीचे आहे. परिविक्षाधीन कालावधीत समाधानकारक काम करत नसेल तर त्यास कधीही कामावरुन काढुन टाकले जावु शकते. परंतु प्रत्येक वेळेस महासभेपुढे जेव्हा गोषवारा येतो तेव्हा त्यामध्ये लिहिलेले असते रिक्त पद. येथे आमचे ५३१ स्थानिक कर्मचारी आहेत त्यांना पदोन्नती मिळत नाही. नियुक्ती प्राधिकारी महासभा असतांना सुध्दा यांना थेट नियुक्ती दिली जाते व गोषवा–यामध्ये लिहिले जाते रिक्त पद. परंतु प्रत्यक्षात दोन वर्षापर्यंत परिवीक्षाधीन कालावधी असला पाहिजे. आज निवड समितीत यांनी अशा काही शिफारशी केल्या आहेत, निवड केल्यानंतर त्याचा प्रस्ताव महासभेपुढे आणला आहे. ते कर्मचारी आता पात्र नाहीत. त्यांचे जात प्रमाणपत्राची वैधता पडताळुन पाहिलेली नाही. त्यास कामावरुन काढुन टाकण्याचा प्रस्तावही महासभेपुढे आणला आहे. यांनी रिक्त पद असे लिहिताच कामा नये.

<u>श्री. लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u> जेव्हा एखादया पदासाठी शिफारस केली जाते तेव्हा ते पद रिक्त असल्यावरच केली जाते. सर्व लोकांना दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी नियुक्ती दिली जाते. जेव्हा नियुक्तीचा आदेश निर्गमित केला जातो तेव्हा त्यामध्ये परिविक्षाधीन कालावधीबाबत २ वर्षाची नोंद असते. महासभेस जर वाटत असेल तर पुढील वेळेस आम्ही नियुक्ती आदेशासह प्रस्ताव महासभेपुढे ठेवु.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u> श्री. वनवारीजी, नाहीतर हे प्रकरण माहितीच्या अधिकाराअंतर्गत उपस्थित करा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौरजी, आता आताच मा. सभागृह नेत्यांनी ज्या बाबत चर्चा केली त्या विषयाची माहिती जर आपण विधि अधिका–यांकडुन घेतली तर बरे होईल.

<u>श्री. ढेंगळेपाटील (विधी अधिकारी):–</u> मा. महापौरजी, नियुक्ती प्राधिकारी महासभा असल्यामुळे, नियमानुसार जी निवड समिती आहे ती अर्ज मागविते. त्यानंतर मुलाखती घेवुन एखादयाची निवड करते. व तो पुर्ण प्रस्ताव म्हणजे ८ उमेदवार आले त्यांना किती गुण मिळाले हा सर्व तपशिल महासभेपुढे ठेवला पाहिजे. व त्यावर महासभेने निर्णय घेतला पाहिजे की शिफारस कायम केली पाहिजे किंवा नाही? परंतु नियुक्ती

केल्यांनतर त्यास आदेश दिला जातो. त्यामध्ये परिविक्षाधीन कालावधी २ वर्षाचा असतो. या कालावधीत काम चांगले असेल तर कायम करण्यासाठी पुन्हा महासभेपुढे प्रस्ताव येवु शकतो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>मा. महापौरजी, आता आताच मा. विधी अधिकारीं यांनी आपले मत दिले आहे. त्यानुसार हा प्रस्ताव पुढील महासभेत आणला जावा. व याबाबतची सविस्तर माहिती महासभेपुढे ठेवावी.

<u>मा. सचिव :–</u> प्रस्ताव वगळण्यात येत आहे की अमान्य? अमान्य? सर्व संमतीने?

<u>मा. महापौर :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. १०:–** निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री बबन शंकर पवार यांच्या ''उद्यान अधिक्षक'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे

<u>प्रस्तावना:–</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'उद्यान अधिक्षक' या संवर्गातील एक पद मंजूर असुन ते रिक्त आहे. सदर पद सरळसेवेने भरण्यासाठी दिनांक १६/१२/२००४ रोजी जाहिरात देण्यात आली होती. जाहिरातीनुसार एकुण ४० उमेदवारांकडुन अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जाची निवडसमितीद्वारे छाननी केल्यानंतर त्यापैकी १० उमेदवारांचे अर्ज सदर पदासाठी पात्र ठरले. पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या दिनांक १६/२/२००५ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीमध्ये गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची पुढीलप्रमाणे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निवड यादीतील उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमदवाराचे नांव |
|---|---|---|
| १. | श्री. बबन शंकर पवार | श्री. सुवर्णा सुनिल पाटील |

सदर यादीतील उमेदवारांना नेमणुक देण्याचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) मधील तरतुदीनुसार मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

<u>महासभा ठराव क्र:–</u> ३८ <u>दिनांक:– २०/७/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. श्यामसुंदर रोहडा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव निवड समितीच्या शिफारशी अनुसार श्री बबन शंकर पवार या उमेदवाराच्या ''उद्यान अधिक्षक'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :–**विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

**विषय क्र. ११:– निवड समितीच्या शिफारसीनुसार कु. पौर्णिमा गणेश भिंगे यांच्या ''स्टाफ नर्स'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.**

———————————————————————————————————————

**मा. सचिव :–** हा सुध्दा अमान्य? वाचून दाखवु? काही हरकत नाही?

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–** मा. महापौरजी, या विषयावर मी प्रकाश टाकु इच्छितो..........

**मा. उप–महापौरजी :–** हा प्रस्ताव अमान्य केला आहे.........

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–** हे पद सुध्दा असेच भरले जात आहे कु. पोर्णिमा गणेश भिंगरे, हिला नेमणुक देण्याचे. प्रशासनाने जो पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल २००३–२००४ तयार केला आहे, व कृती आराखडा २००४–२००५ जो तयार केला आहे, त्यामध्ये रकाना क्र. ६ मध्ये उल्हासनगरमधील रुग्यालय व आरोग्य विषयक सुविधांची स्थितीचा उल्लेख आहे. पृष्ठ क्र. ६.४ टेबल नं. ६.३ ते मी वाचुन दाखवितो, यामध्ये आपण लिहिले आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये दोन डॉक्टर्स आहेत. व बाकीचे जे रकाने आहेत त्यामध्ये नर्स या रकान्यापुढे काही माहिती लिहिली नाही की, आमच्याकडे हे पद भरायचे आहे किंवा नाही तर आपण या पदासाठी भरती दर्शविली कशी? तर हा जो अहवाल आपण तयार केला आहे त्यामध्ये भरतीची स्थिती दर्शविली नाही. तर हे आकडे वजा दाखविले पाहिजेत. नर्स – २, नर्स – ३ असे काही आकडे दर्शविले पाहिजेत परंतु ते आपण दर्शविले नाही. फक्त दोन डॉक्टर्स दर्शविले आहेत. तर हा जो अहवाल तयार केला आहे त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी असला पाहिजे होता. तर या अहवालामध्ये नर्सची काही भरती दर्शविली नाही. तर या भरतीबाबत स्पष्टीकरण केले जावे.

**मा. सचिव :–** अमान्य ? विषय क्र. ११ अमान्य?

**मा. महापौर :–** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ११:–** निवड समितीच्या शिफारसीनुसार कु. पौर्णिमा गणेश भिंगे यांच्या ''स्टाफ नर्स'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

**प्रस्तावना:–**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'स्टाफ नर्स' या संवर्गातील एक पद मंजूर असुन ते रिक्त आहे. सदर पद सरळसेवेने भरण्यासाठी दिनांक १६/१२/२००४ रोजी जाहिरात देण्यात आली होती. जाहिरातीनुसार एकुण १९ उमेदवारांकडुन अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जाची निवडसमितीद्वारे छाननी केल्यानंतर त्यापैकी १४ उमेदवारांचे अर्ज सदर पदासाठी पात्र ठरले. पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या दिनांक १६/२/२००५ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीमध्ये गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची पुढीलप्रमाणे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे.

| अ.क्र. | निवड यादीतील उमेदवाराचे नांव | प्रतिक्षा यादीतील उमदवाराचे नांव |
|---|---|---|
| १. | कु. पौर्णिमा गणेश भिंगे | कु. सुवर्णा लडकु बेलवले |

सदर यादीतील उमेदवारांना नेमणुक देण्याचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) मधील तरतुदीनुसार मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र:– ३९ दिनांक:– २०/७/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव निवड समितीच्या शिफारशी अनुसार कु. पौर्णिमा गणेश भिंगे या उमेदवाराच्या ''स्टाफ नर्स'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :–विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. १२:– श्री. गोप शर्मा, तारतंत्री यांचे निलंबन कायम करणे.

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– आता आम्ही निलंबन कायम करतो. नंतर जेव्हा त्यास पुन्हा कामावर घ्यायची वेळ येईल, तेव्हा तो कसा निर्दोष आहे याबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे आला पाहिजे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– जर कामावर घेतले तर फक्त श्री. किशोर वनवारी यांना माहिती दिली जावी.

मा. आयुक्त (श्री. आर.के. सोनवणे) :– मा. महापौर महोदया, आम्ही कर्मचा–यास पुन्हा कामावर घेतो, उचलत नाहीत. कुणाही व्यक्तीस आयुष्यात एकदाच उचलले जाते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– आपल्या राज्यामध्ये सगळे उठतील.

काही सदस्य :– पास–पास.............

मा. महापौर :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

विषय क्र. १२:– श्री. गोप शर्मा, तारतंत्री यांचे निलंबन कायम करणे.

प्रस्तावना:–

श्री. गोप शर्मा हे विदयुत विभागात तारतंत्री या पदावर दिनांक १/४/१९८२ पासुन कार्यरत आहेत. दिनांक २१/१२/२००४ पासुन कार्यालयाची पुर्वपरवानगी न घेता ते सतत गैरहजर आहेत. त्यांचे गेल्या १० वर्षाचे कार्यालयीन उपस्थितीचे अभिलेख पाहिले असता त्यांची कार्यालयातील उपस्थिती अनियमित आहे. कार्यकारी अभियंता (विदयुत) यांनी श्री. शर्मा यांचा माहे सप्टेंबर, २००० ते जानेवारी २००५ पर्यंतचा कार्यालयीन अनुपस्थिती बाबतचा अहवाल दिला आहे. त्यामध्ये माहे सप्टेंबर, २००० ते जानेवारी २००५ या ५३ महिन्यांच्या (१६२३ दिवस कालावधीत)

कार्यालयाची पुर्व परवानगी न घेता एकुण १३०० दिवस ते अनुपस्थितीत आहेत. त्यांचे सेवापृस्तक तपासले असता त्यांची २३ वर्ष सेवा झाली असुन या कालावधीत त्यांना १९ वेतनवाढी मिळाल्या आहेत. यावरुन त्यांना कामावर विनापरवानगी अनुपस्थित राहण्याची सवय असल्याचे दिसुन येते. त्यांचे वारंवार विनापरवानगी अनुपस्थितीवरुन त्यांना वेळोवेळी ज्ञापन/ समजपत्र देवुनही त्यांच्या वर्तनामध्ये सुधारणा झालेली नाही. त्यांची नियुक्ती अत्यावश्यक सेवा विभागात असल्याने त्यांच्या उपस्थितीबाबतचे अनियमिततेमुळे बेजबाबदारपणामुळे कामामध्ये अडचणी निर्माण होत असल्याने त्यांना कार्यालयाचे क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/प्र.क्र.२१/०५, दिनांक २५ जानेवारी, २००५ च्या आदेशान्वये निलंबित करणेत आले आहे व त्याचे विरुध्द क्र. उमपा/साप्रवि/ आस्था/ टे—३/९९९, दिनांक ६/५/२००५ च्या ज्ञापनाद्वारे विभागीय चौकशी करणेकामी दोषारोपपत्र बजाविणेत आले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम १ (ब) अन्वये त्यांचे निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करणेत येत आहे.

महासभा ठराव क्र:— ४० दिनांक:— २०/७/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या गैरवर्तनाबाबत श्री. गोप शर्मा तारतंत्री यांना आयुक्तातर्फे बजावण्यांत आलेला निलंबन आदेश कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— कृपया लक्ष दया, प्रशासनाकडुन अचानक आयत्यावेळच्या विषयान्वये एक प्रस्ताव प्राप्त झाला आहे. अधिक्षक पदासाठी निवड समितीने २ उमेदवारांची शिफारस केली आहे. उमेदवार आहेत श्री. लाल लालचंदानी व श्री. व्ही.टी. ग्यानचंदानी. हा आयत्यावेळचा विषय म्हणुन यासाठी आणला आहे की, श्री. व्ही.टी. ग्यानचंदानी जे आहेत, सध्या ते पाणी पुरवठा विभागात वरीष्ठ लिपिक आहेत. ते अधिक्षक पदाच्या पदोन्नतीस पात्र आहेत. व या महिन्याच्या ३१ तारखेस ते सेवानिवृत्त होत आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— ३१ तारखेला जो कर्मचारी सेवानिवृत्त होत आहे त्याचाच प्रस्ताव येथे घेतला जावा.

मा. सचिव :— एकाच विषयामध्ये २ नावे आहेत. श्री. लाल लालचंदानी व श्री. व्ही.टी. ग्यानचंदानी ही दोन्ही नावे एकाच गोषवा—यात आहेत.
मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— ३१ तारखेला सेवानिवृत्त होत आहे? त्या पदास पात्र आहे का?

मा. सचिव :— तो पदोन्नतीस पात्र आहे. मान्य?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> हा जो ठराव आता पारीत होत आहे त्याबाबत इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता त्यांना पदोन्नतीचे आदेश दिले जावेत. कारण की, ते लोक ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

<u>मा. महापौर :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. १४ :–**निवड समितीच्या शिफारशी नुसार श्री. लाल लालचंदानी व श्री. व्हि. टी. ग्यानचंदानी यांना अधिक्षक या पदावर पदोन्नती देणे.

<u>प्रस्तावना:–</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर अधिक्षक या पदनामाची एकुण १० पदे ही पदोन्नतीने भरावयाची असुन महापालिका सेवाशर्ती नियमावलीनुसार निरीक्षक अथवा त्यास समकक्ष पदाचा ०३ वर्षाचा अनुभव असणे अशी आवश्यक अर्हता आहे. अधिक्षक या पदाची वेतनश्रेणी रू. ५५००–१७५ –९००० अशी आहे. महानगरपालिका आस्थापनेवरील निरीक्षक व त्यांस समकक्ष असणा–या जकात निरीक्षक व वरिष्ठ लिपीक या सवर्गातील कर्मचा–यांची निवड यादी तयार करण्यात आली आहे. अधिक्षक या पदावर १०० बिंदुनामावलीनुसार गुणोत्तर प्रमाण ३३: ६७ असे आहे. त्यानुसार सदर संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी शिल्लक असलेले आरक्षण पुढीलप्रमाणे आहे.

अनुसुचित जाती – ०१
अनुसुचित जमाती – ०१
वि.जा (अ) – ०१
खुला – ०२

यापुर्वी माहे फेब्रुवारी २००४ मध्ये अधिक्षक या पदावर पदोन्नती दिली असता अनु. जाती या पदासाठी आरक्षित असलेल्या ०१ पदासाठी अनु. जातीचे श्री. बी. एम. नितनवरे हे कर्मचारी उपलब्ध होते परंतु त्यावेळेस ते निलंबित होते. त्यामुळे सदर प्रवर्गाचा बिंदु राखुन ठेवण्यात आला होता. आता या बैठकीत अनु. जातीसाठी आरक्षित असलेल्या पदावर निवड यादीतील अ.क्र.०५ वरील श्री. बी. एम. नितनवरे हे वरिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचारी उपलब्ध होत आहेत. परंतु सदर कर्मचारी यांचेविरूध्द् विभागीय चौकशी सुरू असल्याने व त्यांचेविरूध्द् ब–याच तक्रारी असल्यामुळे त्यांचा पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही. अनु. जमाती व वि.जा. (अ) या प्रवर्गातील आरक्षित पदांवर पदोन्नतीसाठी निवड यादीत उमेदवार उपलब्ध नसल्याने सदर प्रवर्गाचे बिंदुदेखील राखुन ठेवण्यात यावेत. खुल्या प्रवर्गाच्या २ रिक्त पदांसाठी अनुक्रमे श्री. लाल लालचंदानी, जकात निरीक्षक व श्री. व्ही.टी. ग्यानचंदानी, वरिष्ठ लिपीक हे कर्मचारी उपलब्ध होत आहेत.

श्री. लाल लालचंदानी यांची यापुर्वीदेखील अधिक्षक यापदावर पदोन्नतीसाठी झालेल्या निवडसमितीने अधिक्षक या पदासाठी शिफारस केली होती परंतु सदर कर्मचारी यांनी पदोन्नती नाकारली होती. शासन साप्रवि निर्णय क्र. एस.आर.व्ही १०८७/११३१/प्र.क्र.११–८९बारा, दि. ३० एप्रिल १९९१ मधील तरतुदीनुसार आता पुनश्च निवडसमितीने श्री. लाल लालचंदाणी यांची अधिक्षक या पदावर पदोन्नतीसाठी शिफारस केली आहे. परंतु यावेळीदेखील त्यांनी अधिक्षक या पदाची पदोन्नती नाकारली तर त्यांचे जागी खुल्या प्रवर्गातील निवड यादीतील पुढील कर्मचारी श्री. एन.एस.सामतानी, वरिष्ठ लिपीक यांचे नावाची शिफारस केलेली आहे. अधिक्षक या पदावर पदोन्नती देणेसाठी वरिष्ठ लिपीक व जकात निरीक्षक या संवर्गाच्या एकत्रीत निवड यादीनुसार व आरक्षित प्रवर्गानुसार पुढील कर्मचा–यांची पदोन्नतीसाठी निवड समितीने शिफारस केलेली आहे.

| अ. क्र. | अनुशेषानुसार भरावयाच्या शिल्लक आरक्षणातील पदसंख्या | कर्मचा–याचा सेवाजेष्ठता यादीतील क्रमांक | पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेल्या कर्मचा–याचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अनु. जाती – ०१ | | | उमेदवार उपलब्ध नाही |
| २ | अनु. जमाती – ०१ | | | उमेदवार उपलब्ध नाही |
| ३ | वि.जा. अ. – ०१ | | | उमेदवार उपलब्ध नाही |
| ४ | खुला – ०२ | | १) श्री. लाल लालचंदानी<br>२) श्री. व्ही. टी. ग्यानचंदानी | पदोन्नतीसाठी पात्र<br>पदोन्नतीसाठी पात्र |

निवड समितीने शिफारस केलेल्या वरिल कर्मचा–यांना अधिक्षक या पदावर तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्यांसाठी नियुक्ती देवून, सदर कालावधीत त्यांचे काम समाधनकारक असल्यास त्यांना सदर पदावर स्थायी आदेश देण्यात येतील.

तरी सदर कर्मचारी यांना अधिक्षक या पदावर पदोन्नती देणेसाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:– ४१ दिनांक:– २०/७/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव व निवड समितीच्या शिफारशी अनुसार श्री. लाल लालचंदानी, जकात निरिक्षक व श्री. व्ही. टी. ग्यानचंदानी, वरीष्ठ लिपिक, यांची अधिक्षक या पदावरील पदोन्नती मान्य करीत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदर ठरावा अंतर्गतच्या निर्णयाची थेट अंमलबजावणी करण्यात यावी.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव:–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.१० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(श्री. प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–१८ ऑगस्ट, २००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/८/२००५ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १८.०८.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३४. | श्रीमती भावना खिलनानी |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३५. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | ३६. | श्री. चव्हाण रमेश |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना | ३७. | श्री. जाधव प्रशांत |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३८. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्रीमती मोकल सीमा | ३९. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. दिलीप गायकवाड | ४०. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४१. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ४२. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४३. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४४. | श्री. भालेराव गौतम |
| १४. | श्री. उमाप रामदास | ४५. | श्रीमती वसिटा बेबी |
| १५. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४६. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १६. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४७ | श्री. ठाकुर अशोक |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४८. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४९. | श्री. अंकुश म्हस्के |
| १९. | श्रीमती अनिता गुप्ता | ५०. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| २०. | श्री. पवार नाना | ५१. | श्री. पंजाबी नारायण |
| २१. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५२. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २२. | श्री. जग्यासी राजु | ५३. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २३. | श्री. निकम शांताराम | ५४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्री. टाले प्रमोद | ५५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५६. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५७. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५८. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५९. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २९. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६०. | श्रीमती करोतिया मालती |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६१. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३१. | श्री. साधवानी मोहन | ६२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३२. | श्रीमती साधवानी जया | ६३. | श्री. माखिजा हरदास |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६४. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ६५. | श्री. राजेश वदारिया |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. सोनवणे नथु, २. श्री. वाघे शामु बाबु, ३. श्री. मुलचंदानी महेंद्र, ४. श्रीमती खांडेकर प्रेमा, ५. श्री. जेसवानी सतराम फतनदास, ६. श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, ७. श्रीमती माने किरण, ८. श्रीमती. जयश्री सुर्वे, ९. श्री. साधवानी मनोज, १०. श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद, ११. श्रीमती भटिजा कोमल, १२. श्री. जयसिंघानी अनिल, १३. डॉ. निना प्रकाश नाथानी, १४. श्रीमती मीनु

राजकुमार दासानी , १५. श्रीमती माखिजा किरण, १६. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :—</u> श्रध्दांजलीची एक सुचना आलेली आहे.

<u>**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—**</u> मी त्यावरच बोलु इच्छितो.

<u>**मा. सचिव :—**</u>याचे सुचक श्री. विनोद तलरेजा असुन अनुमोदक श्री. किशोर वनवारी आहेत. दि. २६ व २७ जुलै रोजी या शहरात जो पुर आला होता त्यामुळे ब—याच लोकांचा बळी गेला होता. त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी ही सुचना आहे.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**</u> त्यानंतर आजारामुळे आतापर्यंत जे लोक बळी पडले आहेत त्यांचे काय आहे?

<u>**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—**</u>मा. महापौरजी, आर.एस.एस.चे वरिष्ठ नेते श्री. एच.व्ही. शेषाद्री यांचे देखिल निधन झाले आहे.

<u>**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—**</u> आपल्या उल्हासनगरचे विधानपरिषदेचे माजी सदस्य श्री. राम तोलानी यांचे देखील निधन झाले आहे. तसेच एक समाजसेवक श्री. मनोहर भोजवानी यांचे देखील निधन झाले आहे. त्यांना देखील श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

<u>**मा. महापौर :—**</u> आताच बातमी आली आहे की, आपल्या सदस्या श्रीमती कोमल बठिजा यांच्या मोठया सास—यांचे देखिल निधन झाले आहे. तसेच आपले सन्माननिय सदस्य श्री. सुरेश गायकवाड यांच्या आईचे देखिल निधन झाले आहे. त्यांना देखील आपण श्रंध्दाजली अर्पण करु.

<u>**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—**</u> तसेच आपल्या पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी श्री. काथार यांचे देखिल निधन झाले आहे त्यांना देखील श्रध्दांजली अर्पण करावी.

<u>**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—**</u> माझ्या प्रभागातील एका सफाई कामगाराचे देखील निधन झाले आहे.

<u>**मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—**</u> आमचे सदस्य श्री. सुरेश गायकवाड यांच्या आईचे देखिल निधन झाले आहे.

---

सुचकाचे नाव :— श्री. विनोद तलरेजा
श्री धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
श्री लाल पंजाबी

<u>शोक प्रस्ताव :—</u>

दिनांक २६ जुलै, २००५ च्या रौद्रभिषण अतिवृष्टीमुळे महाराष्ट्राची राजधानी मुंबईसह ठाणे जिल्हा कोकण पट्टी तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये महापुराचा जबरदस्त तडाखा बसलेला आहे. या अतिभिषण नैसर्गीक आपत्तीमुळे राज्यभर कित्येक हजार निरपराध बळी पडलेले आहेत तसेच अपरिमित

आर्थिक नुकसान झालेले आहे. पुराच्या या जबरदस्त तडाख्यातुन अद्यापही सर्वजण सावरलेले नाहीत. या आपदप्रसंगी व संकटाचा मुकाबला करण्यासाठी व सावरण्यासाठी सर्वजणांनी एक जुटीने व एकदा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभेमध्ये या नैसर्गीक आपत्तीमध्ये बळी गेलेल्या मृतात्म्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ४१ अ दिनांकः—१८.०८.२००५.

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरात दिनांक २६ व २७ जुलै आलेल्या पुरात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

---

सुचकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी
श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी
श्री. रमेश चव्हाण

शोक प्रस्ताव :—

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ नेते श्री. एच.व्ही.शेषाद्री यांचे, उल्हासनगर शहरातील माजी विधानपरिषद सदस्य श्री राम तोलानी यांचे, उल्हासनगर येथील समाजसेवक श्री मनोहर एल. भोजवानी यांचे, महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता श्री वामन काथार यांचे, महापालिकेच्या आरोग्य विभागातील ठेकेदाराकडे कार्यरत असणारे सफाई कर्मचारी श्री अरुण गायकवाड यांचे, त्याचप्रमाणे मा. सदस्या श्रीमती कोमल भटिजा यांचे सासरे श्री बाशोमल खेमोमल भटिजा व मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड यांच्या मातोश्री श्रीमती शांताबाई नामदेव गायकवाड यांचे नुकतेच निधन झाले आहे.

वर उल्लेखिलेल्या मृतात्म्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. ४१ ब</u> <u>दिनांक:—१८.०८.२००५.</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार श्री. एच.व्ही.शेषाद्री, श्री राम तोलानी, श्री मनोहर एल भोजवानी, श्री वामन काथार, श्री अरुण गायकवाड, श्री. बाशोमल खेमोमल भटिजा , श्रीमती शांताबाई नामदेव गायकवाड यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे.........
यावेळेस सांयकाळचे ४ वाजुन ४० मिनिटे झाली आहेत.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४०७ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे. ते यावेळी अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

? <u>प्रश्न क्र. ४०७:—</u> उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकुण किती बिअर बार आहेत? (कृपया यादी दयावी.) त्यापैकी किती बिअर बारना महापालिकेने कायदेशीर बांधकाम प्रमाणपत्र दिलेले आहे.

<u>उत्तर :—</u> या विभागाच्या अभिलेखात तपासणी केली असता सदर माहिती या विभागात उपलब्ध नाही.
आतापर्यंत या विभागातर्फे एकाही बिअरबारला परवानगी देण्यात आली नाही.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४०८ हा श्री.बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे.

? <u>प्रश्न क्र. ४०८:—</u>१) हाउ मच एक्सपेंडीचर वेअर ऑकर्ड इन फिलिंग ऑफ पोटहोल्स फोर द इअर २००३—२००४ अॅण्ड २००४—२००५?
२) हाउ मच अमाउंट प्रोव्हाइड फॉर फिलिंग द पोटहोल्स सेन्क्शनड इन द बजेट फॉर द इअर २००३—२००४ अॅण्ड २००४—२००५?
३) गिव द लोकेशन वेअर द पोटहोल्स वेअर फिलिंग?
४) गिव द नेम ऑफ एजन्सी हु कॅरीड आउट द वर्क फोर फिलींग ऑफ पोटहोल्स, झोन वाईज?

<u>उत्तर :—</u>२००३—२००४ — रुपीज ४६.९० लॅक्स
२००४—२००५ — रुपीज ५२.०० लॅक्स

२००३—२००४ — रुपीज १,००,००,०००
२००४—२००५ — रुपीज ७६,००,०००
लिस्ट इन्क्लोजड्.
मेन्शनेड इन द लिस्ट.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– मा. महापौर, उपमहापौर व आयुक्त साहेब, माझा हा प्रश्न २००५ सालचा आहे. यामध्ये मी विचारले आहे की, २००३–२००४ व २००४–२००५ या वर्षात रस्त्यावरचे खड्डे कुठे–कुठे भरले आहे? याचे उत्तर सरळ दिले आहे की २००३–२००४ मध्ये रुपये ४६.९० लाखाचे काम केले आहे. व २००४–०५ मध्ये रुपये ५२ लाखाचे काम केले आहे. याची एक यादी देखील दिली आहे. त्यामध्ये काही ठिकाणी लिहिले आहे की, अदयाप काम सुरु आहे, काही ठिकाणी लिहिले आहे, कामास सुरुवात झालेली नाही. या विषयावर यापुर्वी श्री. किशोर वनवारी यांच्या प्रश्नावर चर्चा झालेली आहे. त्यामुळे जास्त चर्चा न करता मी विचारु इच्छितो की, जे काम सुरु केले नव्हते त्याची स्थिती काय आहे? दुसरे म्हणजे २००३–०४ व २००४–०५ मध्ये या कामासाठी किती तरतुद ठेवण्यात आली होती?

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :–मा. महापौर महोदया, सन २००३–०४ मध्ये खड्डे भरण्यासाठी रुपये १ कोटींची तरतुद ठेवली होती. त्यानुसार ४६.९० लाखाचे काम झाले आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– तुम्ही एवढा खर्च केला आहे परंतु तेवढे कार्यादेश काढले होते का?

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :–सन २००३–०४ या वर्षाची सर्व कामे पुर्ण झाली आहेत. त्याचा पुर्ण खर्च रुपये ४६.९० लाख एवढा झाला आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–याचा अर्थ मागील वर्षी कोणतेही काम प्रलंबित राहिलेले नाही.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :–सन २००३–०४ सालातील एकही काम प्रलंबित नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–आपल्या यादीत लिहिले आहे की, काम अपुर्ण आहे, काम सुरु आहे. हे तुम्हीच लिहिले आहे, मी लिहिलेले नाही. अ.क्र. १३ बघा.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :–सन २००४–०५ मध्ये काम सुरु आहे असे लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. गोविंन्दराम लुंड सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–सन २००३–०४ च्या यादीतील अ.क्र. १३ बघा. साईबाबा मंदिर ते सोबराज गार्डन व्हाया पदम सोप फॅक्टरी.......

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :–मा. महापौर महोदया, अ.क्र. १३ वरील जे काम आहे ते १,५०,९००/– चे काम आहे. यापैकी पुर्ण खर्च न झाल्याने काम सुरु आहे असे दाखविले आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–मी आपणांस तेच विचारले. आपण सांगता सर्व काम झाले आहे. आपण रुपये ५५ लाखाचे कार्यादेश दिलेले आहेत. त्यापैकी रुपये ४६ लाखाचे कामे आपण पुर्ण केली आहेत. मी आपणांस तेच विचारले होते. कार्यादेश दिले आहेत तेवढे काम झाले आहे की अपुर्ण आहे? आपण स्वत:च सांगता की काम झाले आहे, ते कधी झाले आहे?

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :–हे काम पुर्ण कधी झाले याचा तपशिल आता माझ्याकडे नाही. परंतु हे काम १,५०,९००/– चे असल्याने व तेवढा खर्च न झाल्याने तसे दाखविले आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–आपण या ठिकाणी प्राकलन मंजुर झाल्याचे दाखविले आहे, काम सुरु आहे असे दाखविले आहे. तर काम पुर्ण झाले आहे का, आजपर्यंत झाले आहे का?

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :–काम पुर्ण झाले आहे, परंतु त्याचे अंतिम देयक अजुन तयार झाले नाही म्हणुन काम सुरु आहे असे दाखविले आहे. जागेवर काम पुर्ण झाले आहे. तेथे आता काही काम बाकी नाही.

मा. सदस्या श्रीमती दिपा पंजाबी, श्रीमती भावना रामचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–आधी असे लिहिले असते तर आम्ही विचारलेच नसते. आता २००४–२००५ ची यादी बघा.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :–मा. महापौर महोदया, सन २००४–०५ मध्ये या कामासाठी रुपये ७६ लाखाची तरतुद होती. त्यापैकी रुपये ५२ लाख एवढा खर्च खड्डे भरण्यासाठी झालेला आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मला असे विचारायचे होते की, आपण जे कार्यादेश काढले होते ते जास्त काढले होते. तुम्ही रुपये ९४ लाखाचे कार्यादेश काढले होते आणि काम रुपये ५२ लाखाचे केले आहे. उर्वरित रक्कम कुठे गेली? त्याची परिस्थिती काय आहे? एवढे मी विचारु इच्छितो.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—ज्यावेळी आमच्याकडे हा प्रश्न आला त्यावेळची ही वस्तुस्थिती आहे. जवळपास रुपये ५३ लाखाचे काम झालेले आहे. उर्वरित कामे देखील नंतर पुर्ण झालेले आहे. परंतु त्यांची देयके आमच्याकडे अजुन आलेली नाहीत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—एकुण रुपये ९४ लाखाचे काम आहे. ती सर्व कामे झाली आहेत काय?

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—काही कामे आम्ही वगळलेली आहेत त्यामुळे रुपये ९४ लाखापेक्षा कमी खर्च होईल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मला एवढेच विचारायचे आहे की, रुपये ९४ लाखाचे तुम्ही जे कार्यादेश दिले आहेत ते काम पुर्ण व्हायचे आहे की, झाले आहेत, अथवा होणार नाहीत? जर होणार नसतील तर त्याचे कारण काय आहे? त्याची प्राकलने का तयार केली होती?

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—मा. महापौर महोदया, त्यासाठी काही कारणे आहेत. काही ठिकाणी आम्ही सी.सी रस्ते बनविले आहेत त्यामुळे त्याठिकाणी आता पॉटहोल्स फिलिंगचे काम करणे उचित होणार नाही. त्यामुळे ती कामे वगळली आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—अ.क्र. ३३ बघा. तुम्ही लिहिले आहे की काम सुरु केले नाही.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—मा. महापौर महोदया, या ठिकाणी सी.सी. रस्त्याचे काम केले आहे त्यामुळे खड्डे भरण्याचे काम केलेले नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—तुम्ही प्राकलन कसे काय तयार केले? याचा अर्थ प्राकलन येथे कार्यालयात बसुन तयार केले जाते. तुम्हांला माहिती होते की, तेथे सिमेंट ब्लॉक आहे तर मग प्राकलन कसे काय तयार केले.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—मा. महापौर महोदया, रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामाचे प्राकलन आधी तयार केले होते. व त्यानंतर सी.सी रोड भरण्याचे काम नंतर झाले होते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—याचा अर्थ आपण उत्तर दिल्यानंतर हे काम मंजुर झाले आहे. हे प्राकलन कधी तयार केले आहे. अशी बरीच उत्तरे आहेत. हे जे प्राकलन बनले आहे त्यानंतरच सिमेंट ब्लॉकचे काम झाले असेल.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—खड्डे भरण्याचे प्राकलन आधी मंजुर झाले होते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपणांस याची खात्री आहे का?

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—हो, माझी खात्री आहे. प्राकलन कधी मंजुर झाले त्याची तारीख मी आता सांगु शकत नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मला असे वाटते की, कुणाला तरी खुष करण्यासाठी हे प्राकलन बनवत असतात. जेथे खड्डे भरण्याची खरी आवश्यकता आहे अशा ठिकाणी हे काम केले जात नाही. तुम्ही हवे तर पुढील बैठकीत मला याची विस्तृत माहिती दया.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :— याचे उत्तर पुढील बैठकीत देतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—दुसरे म्हणजे ज्या ४ प्रभाग समित्या आहेत त्यांच्या कार्यक्षेत्रात रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी किती खर्च झाला आहे हे देखील सांगा. कारण ब—याच समित्यांमध्ये, प्रभाग समिती क्र. १ व २ मध्ये ब—याच ठिकाणी सिमेंट ब्लॉक्स आहेत.

श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :— मा. महापौर महोदया, ज्या ठिकाणी सिमेंट ब्लॉक्स असतात त्याठिकाणी पॉटहोल्स फिलिंगचे काम केले जात नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—प्रत्येक प्रभाग समिती क्षेत्रात किती काम झाले आहे याचीही सविस्तर माहिती मला दया.

मा. सचिव :–प्रश्न क्र. ४०९ हा श्री.राजेंद्र चौधरी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४०९ :– प्रेमनगर टेकडी, उल्हासनगर–५ या ठिकाणी गुलशनसिंग नावाच्या व्यक्तीने बांधलेल्या इमारतीत १५०० स्केअर फुटाचे अनाधिकृत / वाढीव बांधकाम केले असल्याने महापालिकेमार्फत ५२.५३ अन्वये नोटिस बजावण्यात आली होती. सदर नोटीसचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतरही सदर वाढीव बांधकामावर का कारवाई करण्यात आली नाही याबाबत महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस नम्र विनंती आहे.

उत्तर :– संबंधितास नगररचना अधिनियिम १९६६ चे कलम ५२,५३ नुसार नोटिस दिली होती. त्यास अनुसरुन संबंधीतांनी त्यांचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यांनी दिलेला लेखी खुलासा विचारात घेता व नगररचनाकार यांचे पत्रानुसार संबंधीत ठिकाणी २७.७२ चौ.मी. इतके वाढीव बांधकाम आहे. त्यास दिनांक २२/६/२००५ रोजी सुनावणी घेवून अंतिम आदेश पारीत करण्यात येतील. त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–मा. आयुक्त साहेब माझ्या प्रश्नास वरीलप्रमाणे उत्तर दिले आहे. तर २२/६/२००५ ला जी सुनावणी होती त्यामध्ये काय निर्णय झाला याची माहिती द्या.

श्री. टी.के. ढेंगळेपाटील, उप–आयुक्त (अबांनिवि) :–मा. महापौर महोदया, याबाबतीत २६/६/२००५ ला सुनावणी घेवुन आदेश दिलेले आहेत. नगररचनाकार यांच्या अहवालानुसार २७.७२ चौ.मी. एवढे वाढीव बांधकाम आहे. त्याचे एका आठवडयात निष्कासन करुन अहवाल देण्यात येईल.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–मा. महापौरजी, मागील महासभेत एका अशाच प्रश्नाला उत्तर देतांना आपण सांगितले होते की, येणा–या महासभेपर्यंत कारवाई होईल. तो विषय आपल्या लक्षात आहे.

मा. सदस्या श्रीमती भारती छाब्रिया, श्रीमती वसिटा बेबी सभागृहातुन बाहेर गेल्या.

श्री. टी.के. ढेंगळेपाटील, उप–आयुक्त (अबांनिवि) :–.त्या बांधकामाची मुदत २६ जुलैला संपली होती. परंतु पाऊस आल्याने कारवाई झालेली नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :– या प्रश्नाचा हेतु एवढाच आहे की, जोपर्यंत जागेचा मालक बिल्डर आहे तोपर्यंतच महापालिकेने कारवाई करायला हवी. नाहीतर जर कुणी तेथे सदनिका खरेदी केली, दुकानाचे गाळे खरेदी केले आणि त्यानंतर महापालिकेने कारवाई केली तर योग्य होणार नाही. त्यापुर्वीच निष्कासनाची कारवाई करायला हवी.

श्री. टी.के. ढेंगळेपाटील, उप–आयुक्त (अबांनिवि) :–एक आठवडयाच्या आत आम्ही कारवाई करु.

मा. सचिव :–प्रश्न क्र. ४१० हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया यांनी सभागृहात प्रवेश केला.

प्रश्न क्र. ४१०:– उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत थोर समाजसेवक, क्रांतीकारक, पुढारी यांचे किती पुतळे बसविणेत आले आहेत?

त्याची नावे व ठिकाणे यांची यादी मिळावी. सदर पुतळयाचे देखभाल, मांगल्य, पावित्र्य राखण्याची जबाबदारी महापालिकेचे कोणत्या विभागाकडे असून कोण कारवाई करीत आहे?

याबाबत येत्या महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विंनती आहे.

उत्तर :–महापालिकेतर्फे उभारलेले पुतळे. २२+ खाजगी उभारलेले पुतळे. ०७= २९

सदर पुतळे कोणत्या महापुरूषाचे आहेत. व त्यांची स्थाने दर्शविणारी यादी सोबत जोडली आहे. पुतळयांची देखभाल व दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. महापौर महोदया, मा.     आयुक्त साहेब, मला उत्तर असे दिले आहे की, पुतळयांची देखभाल महापालिका करते. देखभाल करते म्हणजे नेमके काय करते?

<u>श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—</u>मा. महापौर महोदया, पुतळयांची देखभाल करण्याची जबाबदारी महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागची आहे. देखभाल व दुरुस्ती अंतर्गत पुतळे व पुतळयांचा परिसर, पुतळयाच्या अवतीभोवती जर उदयान असेल तर त्याची देखभाल या कामांचा समावेश त्यामध्ये होतो. सदरची कामे करण्याचा प्रयत्न वेळोवेळी केला जातो. त्या पुतळयांचे पावि™; अबाधित राहावे यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचारी कार्यरत असतात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> ते स्वच्छ ठेवण्यासाठी नेमके तुम्ही काय करता? आठवडयातुन एकदा स्वच्छ करता की, हार टाकता की साफसफाई करता. मी तुम्हांला याचा फोटो देखील दाखवु शकतो. माझ्याकडे १०—१२ फोटो आहेत ते मी तुम्हांला दाखवतो. तुम्ही काय देखभाल करता हे मी तुम्हांला दाखवतो. येथे श्री. काछामल यांचा पुतळा आहे. त्यांच्या ग्रीलवर लोक गोधडया व कपडे सुकायला टाकतात. हे फोटो १ महिन्यापासुनचे आहेत. ते मी तुम्हांला दाखविले सुध्दा आहेत. त्यानंतर श्री. हेमु कालानी यांचा पुतळा आहे. तेथे मोकाट कुत्रे बसल्याचे सुध्दा फोटो आहेत, आजुबाजुला घाण आहे. त्यानंतर पवई येथे श्री. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा पुतळा आहे. बाजुला जी झोपडपट्टी आहे तेथिल मुले जावुन त्यांच्या खांदयावर बसतात. तुम्ही देखभाल करता म्हणजे नेमके काय करता? जाता येता नुसते बघता का? ही थोर पुरुषांची विटंबना आहे.

<u>श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—</u> मा. महापौर महोदया, सन्माननिय नगरसेवक श्री. रमेश चव्हाण यांनी मला काही फोटो दाखविले होते ज्यामध्ये हे स्पष्ट दिसत होते की, पुतळयांच्या भिंतींवर चित्रपटांचे पोस्टर लावले होते. अशी घटना भविष्यात घडु नये, यासाठी आमचे कर्मचारी वर्गाला सुचना दिलेल्या आहेत. पुतळयावर कुणी पोस्टर लावु नये अथवा त्यांची विटंबना होवू नये यासाठी भविष्यात पुर्ण दक्षता घेण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> आठवडयातुन एकदा तरी ते पुतळे स्वच्छ धुण्याचा कार्यक्रम ठेवला पाहिजे. त्यावर फार धुळ साचलेली असते. तसेच जे फलक लावण्यात येतात ते पुतळयांच्या समोर लावण्यात येवु नये. मी तुम्हांला आताही उदाहरण दाखवितो, बैठक संपल्यावर तुम्ही माझ्या बरोबर चला. अजुनही तेथे तसेच कपडे सुकत ठेवले आहे. पोस्टर लागलेले आहेत. पुतळयांच्या नावावर अश्लील चित्रपटाचे पोस्टर लावलेले आहेत.

<u>श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि) :—</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब व आपल्या परवानगीने मी सन्माननिय नगरसेवक श्री. रमेश चव्हाण यांना आश्वासन देतो की, आठवडयातुन किमान एक वेळा पुतळयांची साफसफाई करुन त्यांना हार घालण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>त्यांची विटंबना होवू नये यासाठी देखिल पुरेशी काळजी घेण्यात यावी. जर विटंबना झाली तर पुतळा लावुन त्याचा फायदा काय, आम्ही त्यापासुन काय आदर्श घेणार? आपण पुतळे लावतो कशाला की, लोकांनी त्याचा आदर्श घ्यावा यासाठी. जर मुले त्यांच्या खांदयावर बसत असतील, त्यांच्याशी खेळत असतील तर त्यापासुन ते काय आदर्श घेतील? तर त्याचे पाविन्य राहिले पाहिजे याची काळजी घ्या.

**मा. सदस्या श्रीमती माया मसंद सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u> मा. महापौरजी, या विषयाबाबत मी बोलु इच्छितो की, काल व आजच्या टाईम्स ऑफ इंडिया या पेपर मध्ये शहिद हेमु कालानी यांच्या पुतळयाच्या दुरावस्थेबाबत बातमी आलेली आहे. हा प्रश्न माझ्या सहका—याने ब—याच कालावधी पुर्वी विचारला असेल. एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असेल. परंतु प्रशासनाने त्याकडे लक्ष दिले नाही. आज ते सांगतात की आम्ही भविष्यात काळजी घेवु. परंतु मागील वर्षी जेव्हा चालियाचा मेळा सुरु होता तेव्हा मी एक पत्र लिहिले होते की, लोकमान्य टिळकांचा एक पुतळा आहे ज्याची अवस्था फार खराब आहे, त्याची जाळी तुटली आहे. परंतु त्याकडे कुणी लक्ष दिले नाही. २१ जानेवारीला जेव्हा नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याशी संबंधीत कार्यक्रम होता तेव्हाही मी एक पत्र लिहिले होते की त्याकडे कुणी लक्ष देत नाही. संगमरवराची लादी तुटलेली होती. परंतु महापालिका त्याकडे बिल्कुल लक्ष देत नाही. तर माझी आपणांस विनंती आहे की, आपण प्रत्यक्षात कारवाई करा. तुम्ही प्रत्येक बैठकीत आश्वासन देतात. परंतु पुढील बैठकीत सर्व विसरतात. तर यापुढे बैठकीत अशी तक्रार यायला नको. माझ्या ब—याच तक्रारी आहेत व मला शरम वाटते की, आम्ही टाईम्स ऑफ इंडियामध्ये वाचतो शहीद हेमु कालानी यांच्या पुतळयाची अवस्था खराब आहे. आपल्या महापालिकेचे क्षेत्र फक्त १३ कि.मी. असतांना देखील आपण ते सांभाळु शकत नाही. तर यापुढे अशी तक्रार यायला नको.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४११ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

**मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>प्रश्न क्र. ४११ :—</u> उल्हासनगर महानगरपालिका कर्मचा—यामार्फत दिनांक २५/७/२००४ पासून जकात वसूली करण्यात येत असून, दिनांक २५ जुलै, २००४ ते १५ एप्रिल २००५ पर्यंत दैनंदिन जकात वसूली किती होती? तसेच १६ एप्रिल, २००५ ते आजतागायत जकात वसूली किती झाली आहे?

उत्तर :– सदर महिन्याची जकात वसुली तक्ता सोबत जोडण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–उत्तर ठिक आहे.

मा. सचिव :–प्रश्न क्र. ४१२ हा श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४१२:–१) द क्वालिफिकेशन ऑफ गार्डन सुपरिटेंडंट अलॉग विथ डेट ऑफ अपॉइंटमकंट ॲण्ड पे स्केल?

२) द नेमस ऑफ ज्यु. इंजिनिअर हू अटेंडस् ऑफिस गार्डनस्? वेदर द ज्यु. इंजिनिअर वर्कस इनडिपेंडंट फोर द गार्डन्स?

३) द नेमस ऑफ मेंल्स ॲण्ड लेबर्स वर्कड इन ४८ गार्डनस्?

४) वेदर द गार्डन कंस्ट्रक्टेड बाय द कार्पोरेशन आर एज पर द रिर्जर्वेशन. इफ नॉट, कार्पोरेशन हॅड रिमार्केड न्यु डेव्हलोपमेंट प्लॉन?

उत्तर :– द क्वालिफिकेशन ऑफ गार्डन सुपरीटेंडंट एज पर रिक्रुटमेंट रुल्स इज कॅंडिडेटस् हु हॅव बी. एस.सी.एक्जाम विथ सायन्स ॲण्ड हॅव पास्ड द कोर्स इन होर्टीकल्चर फ्रॉम अ इन्स्टीटयुट रेकगनाइज्ड बाय गर्व्हमेंट ऑफ महाराष्ट्र, नाउ द गार्डन सुपरिटेंडंट पोस्ट इज वेकंट. द स्केल ऑफ गार्डन सुपरीटेंडंट इज रुपीज ४५००–१२५–७०००.

इन ॲबसेंस ऑफ गार्डन सुपरीटेंडंट ज्यु. इंजिनिअर्स आर लुकिंग अफटर गार्डन. नेम ऑफ ज्यु. इंजिनिअर आर....

१. श्री. संदिप जाधव

२. श्री. एम.सी. सितलानी

नो, ज्यु. इंजिनिअर डु नॉट वर्कस इनडिपेंडेनटली. ज्यु. इंजिनिअर वर्कस अंडर द कंट्रोल ऑफ डेप्युटी इंजिनिअर.

लिस्ट इनक्लोजड्.

पर्टेन्स टू टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— मा. महापौरजी, मी प्रश्न विचारला होता, आपल्या महापालिकेत उदयान अधिक्षकाची नियुक्ती केली आहे अथवा नाही? जर असेल तर त्याची वेतनश्रेणी काय आहे? तर मला असे वाटते की, आजपर्यंत ही नियुक्ती झालेली नाही.

मा. आयुक्त :—मा. महापौर महोदया, उदयान अधिक्षकाच्या नियुक्तीबाबत सभागृहाला प्रशासनाने आश्वासन दिले होते. त्यानंतर उदयान अधिक्षकाच्या नियुक्तीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देखील प्रसिध्द करण्यात आली होती. उदयान अधिक्षकाच्या नियुक्तीसाठी निवड समितीने एका उमेदवाराची निवड करुन तसा प्रस्ताव महासभेसमोर सादरही केला होता. कदाचित मागील महासभेत तो प्रस्ताव आला असावा. तो नामंजुर झाला. यामुळे अदयाप या पदावर नियुक्ती झालेली नाही. परंतु नियुक्तीसाठी प्रशासनाने जे आश्वासन दिले होते त्याच्या पुर्तीसाठी जी पाऊले उचलणे आवश्यक होते ती पाऊले उचलली आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— मी या प्रश्नामध्ये कनिष्ठ अभियंत्याची नावे विचारली होती. मला उत्तर देतांना ४८ उदयानांमध्ये २ कनिष्ठ अभियंता काम पाहतात असे सांगितले आहे. याचा अर्थ २४ उदयानांसाठी १ कनिष्ठ अभियंता आहे. एकटा माणुस एवढे काम करु शकतो का?

मा. आयुक्तः— मा. महापौर महोदया, उदयानाच्या देखभाल व दुरुस्तीचे काम असेल तर ते काम कनिष्ठ अभियंत्याकडुन केले जाते. बाकी कामांसाठी प्रत्येक उदयानामध्ये एका माळयाची नियुक्ती केलेली आहे. ती देखील यादी आपणासमोर आहे. यामुळे ४८ उदयानांसाठी २ कनिष्ठ अभियंता ही संख्या काही कमी नाही. हे कनिष्ठ अभियंता देखभाल व दुरुस्तीचे प्रस्ताव तयार करु शकतात. ते ४८ उदयान सांभाळु शकतात.

मा. सदस्या श्रीमती निता अहुजा सभागृहातुन बाहेर गेल्या. 

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— तुम्ही उत्तर काय दिले आहे ते तर वाचा?

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— मा. महापौरजी,..................

मा. आयुक्त :— मा. महापौर महोदया, प्रश्नाचे उत्तर अगदी योग्य आहे व स्पष्ट आहे. आपले काही उपप्रश्न असतील तर ते स्पष्टपणे विचारावे? थेट प्रश्न विचारा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— आपण जे उत्तर दिले आहे तेच चुकीचे आहे. सितलानी २४ उद्याने बघायला कधी जातो ते सांगा. हे उत्तर चुकीचे आहे. शहरात ४८ उदयाने आहेत व फक्त २ कनिष्ठ अभियंते ते सांभाळतात. ते देखिल स्वतंत्रपणे पाहत नाहीत. त्यांना अधिकारच नाहीत तर ते उदयानात जावुन करतील तरी काय? तेथे काहीही तुटले तर ते काम अभियंता करु शकतो काय?

मा. आयुक्त :— मा. महापौर महोदया, ......... कृपया मला बोलु दयावे. आपण बसलात तर मी बोलु शकतो. आपले प्रश्न, उप—प्रश्न आधी विचारा त्यानंतरच मी उत्तर देवु शकतो. आधी आपण सर्व प्रश्न विचारा त्यानंतर मी एक—एक करुन सर्वांना उत्तरे देतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— माझ्या क्र. ३ च्या प्रश्नाला उत्तर दया. जर देवु इच्छित नसाल तर तसे सांगा. यामध्ये लिहिले आहे की, प्रश्न नगररचना विभागाशी संबंधीत आहे. आम्ही त्यांना विचारायला जावु का? तुम्हांला उत्तर दयायचे नसेल तर तसे सांगा.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, मला असे वाटते की, मागील सभेत आपण उद्यान अधिक्षकाचा प्रस्ताव मंजुर केला आहे. तो प्रस्ताव नामंजुर केलेला नाही.

मा. आयुक्त :— मा. महापौर महोदया, हा जो प्रश्न आहे त्याच्या उपप्रश्न क्र. २ मध्ये उत्तर दिले आहे की, २ कनिष्ठ अभियंता सदरचे काम पाहतात. त्यांचे काम काय आहे ते देखिल आम्ही येथे सांगितले आहे.

कनिष्ठ अभियंत्याला प्रशासकिय अथवा तांत्रिक मंजुरीचे अधिकार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मॅन्युअलमध्ये अथवा आपल्या कायदयात कुठेही दिलेले नाही. कनिष्ठ अभियंत्याचे काम प्राकलन तयार करण्याचे आहे. तसेच काम झाल्यावर त्यावर पर्यवेक्षण करण्याचे आहे. एवढी जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. त्यामुळे २ कनिष्ठ अभियंते ४८ उद्यानांसाठी पुरेसे आहेत. उत्तरामध्ये माळयांची नावे देखिल दिलेली आहेत. उपप्रश्न ४ ला जे उत्तर दिले आहे त्याच्याशी मी सहमत नाही. उत्तर नगररचना विभागाशी संबंधीत आहे, असे लिहिण्याऐवजी सर्व उद्याने विकास आराखडयाप्रमाणे बनविलेली नाही असे लिहायला हवे होते. या शहरात जेवढी उद्याने बनविली आहेत, आपला विकास आराखडा १९७४ मध्ये तयार झाला. मंजुर विकास आराखडयाप्रमाणे पाहिल्यास आज शहरात जेवढी उद्याने आहेत त्यापैकी काही उद्याने विकास आराखडयाशी विपरीत म्हणजे जो निवासी भाग होता, दुस—या उद्देशासाठी भुखंड राखीव असतांना देखील त्यावर उद्यानाचे बांधकाम झालेले आहे. ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती यापुर्वी देखील मी या महासभेत सादर केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> मी येथे हेच विचारले आहे. आता जो नविन विकास आराखडा येणार आहे त्यामध्ये आपण आरक्षण दाखवणार आहोत काय? हा माझा प्रश्न आहे.

मा. सदस्या श्रीमती भावना रामचंदानी, दिपा पंजाबी सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. आयुक्त :—</u> मा.महापौर महोदया, आपण कामकाजाचे नियम बघितले तर त्यामध्ये काल्पनिक प्रश्न जसे असे होवू शकते का? अजुन विकास आराखडा तयार व्हायचा बाकी आहे. त्यामध्ये ही उद्याने आरक्षणात दाखविण्यात येतील का? असा प्रश्न त्यांनी विचारला. येथे काल्पनिक प्रश्न विचारले जावु शकत नाहीत. त्या उपरही अशी संभावना आहे की, जेव्हा विकास आराखडा तयार करण्यात येईल तर आज जेथे उद्यान आहे व जर मंजुर विकास आराखडयात तसे आरक्षण नसेल तर प्रस्तावित आराखडयात त्याठिकाणी उद्यानासाठी आरक्षण दर्शविण्यात येवु शकते. परंतु यासाठी जे नियोजन अधिकारी येतील त्यांना त्याची आवश्यकता व जागेचा वापर विचारात घेवुन निर्णय घ्यावा लागेल. जर मी आज येथे निवेदन केले की, जेथे उद्यान आहे व मंजुर आराखडयात त्यासाठी आरक्षण नसेल तरी देखिल प्रस्तावित आराखडयात त्यासाठी आरक्षण दाखविण्यात येईल तर ते चुकीचे होईल. कारण तो अधिकार जे नियोजन अधिकारी सुधारीत आराखडा बनवतील त्यांचा असेल. त्यानंतर महासभेचा असेल.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४१३ हा श्रीमती किरण लखी माखिजा यांचा आहे. त्या यावेळी सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

? <u>प्रश्न क्र. ४१३:—</u>१. रिगार्डींग ही—फी रिनोव्हेशन / कन्स्ट्रक्शन इन मेयर ऑफिस बाय मेकिंग एक्सटेंशन बाय डिमोलिशींग युरीनल / लेव्हाटेरी, टु थ्री ऑफिस.

२. ही—फी रिनोव्हेशन इन कमीशनर आफिस.

विथ रिफरन्स टू द अबोव सबजेक्ट आय हॅव फोलोविंग क्वोशन फोर कमिंग जनरल बॉडी मिटींग :

१. डिटेल्स ऑफ अमाउंट स्पेंट ऑन ही—फी रिनोवेशन ऑफ बोथ द ऑफिसेस.
२. वेदर एनी रिजोलेशन वाज पासेड फोर मेकिंग दिस ही—फी रिनोवेशन ऑफ बोथ द ऑफिस? इफ येस, प्लीज सप्लाय मी द कॉपी ऑफ सेड रिझोलेशन.
३. वेदर ऐनी बजेट वाज पासड् इन स्टेडिंग कमिटी? इफ येस, प्लीज सप्लाय मी द कॉपी ऑफ द सेड बजेट.
४. इज इट नॉट टु दॅट द प्रोसिजर मेअर हॅड रिसेन्टली रिनोव्हेटेड हर ऑफिस बिफोर द चॉर्ज टेकन बाय एक्सीसटींग मेअर?
५. इज इट नॉट टु दॅट बाय मेकिंग ही—फी रिनोव्हेशन एव्हरी नाउ ॲण्ड देन ऑथरिटीज आर मिसिंग देअर पॉवर्स / चेअर ॲण्ड मिसिंग ऑफ पब्लीक फंड व्हेन द कार्पोरेशन इज ऑलरेडी रनिंग दन हयूज लोसेस.

<u>उत्तर :–</u> रेस. ५.५० लॅक्स हॅस बिन स्पेंट फोर द  चॅम्बर ऑफ कमिशनर नो एक्सपेंडिचर इज येट इनक्युरेड ऑन रिनोव्हेशन ऑफ हानेबल मेअर चेंबर.
येस
नो
येस

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४१४ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

? <u>प्रश्न क्र. ४१४:–</u>१) उल्हासनगर महापालिका आस्थापनेवरील अनु. जमाती (S.T) च्या अनुशेषांतर्गत नोकर भरती बाबतची, बिंदुनामावलीनुसार वर्ग–१, वर्ग–२, तृतीयश्रेणी, व चतुर्थश्रेणी याची पदनिहाय शिल्लक असलेल्या अनुशेषाबाबतची सदयस्थिती आज तारखेपर्यंत काय आहे?

२) उपरोक्त सर्व पदे मंजुर आहेत का?

३) अनु. जमातीचा अनुशेष भरण्यासाठी काय कारवाई करण्यात आली आहे? नसल्यास कधीपर्यंत कारवाई करणार?

<u>उत्तर :–</u>१) महानगरपालिका आस्थापनेवरील अनुसुचित जमातीचा अनुशेष पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ग | सरळसेवा | पदोन्नती |
|---|---|---|
| अ) | निरंक | निरंक |
| ब) | ०१ | ०१ |
| क) | २२ | ०८ |
| ड) | ६१ | –– |

२) होय.

३) सन २००३–२००५ या कालावधीमध्ये मागसवर्गीय सरळसेवा अनुशेषांतर्गत विविध संवर्गात अनुसुचित जमाती या प्रवर्गातील एकुण ५७ उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.
शासनाच्या मार्गदर्शक सुचना प्रमाणे अनुशेषाची पदे भरुन काढण्यांत येतील.

<u>मा. सदस्य श्री प्रमोद टाले :–</u> उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४१५ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

? <u>प्रश्न क्र. ४१५:–</u> सार्वजनिक बांधकाम विभागात कामाचा भार जास्त असल्याने सदर विभागात एक कनिष्ठ अभियंत्यांची नियुक्ती करणेबाबत मा. महासभेत विचार झाला होता. त्या अनुषंगाने महासभा ठराव क्र. २, दिनांक २०/४/२००५ अन्वये सदर विभागात कनिष्ठ अभियंत्यांची नियुक्ती करणेबाबतचा ठराव मंजुर करण्यात आला आहे.

परंतु प्रत्यक्षात मात्र सार्वजनिक बांधकाम विभागात देण्यात आलेले कनिष्ठ अभियंता हे सार्वजनिक बांधकाम विभागात काम न करता मालमत्ता विभागात काम करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

महासभा ठरावान्वये सदर कनिष्ठ अभियंत्यांची नियुक्ती सार्वजनिक बांधकाम विभागात केली असतांना सदर कर्मचारी मालमत्ता विभागात काम करीत आहेत हे योग्य आहे का? सदर कृतीमुळे महासभेचा अवमान होत नाही का?

<u>उत्तर :—</u>होय
नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव :—</u> प्रश्न क्र. ४१६ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे. ते यावेळी सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

**?** <u>प्रश्न क्र. ४१६:—</u>१ एप्रिल , २००४ ते ३१ मार्च २००५ या कालावधीत किती बहुमजली इमारतींतील (प्रभाग समिती क्र. ४ क्षेत्रातील) मंजुर बांधकाम आराखडयाचे उल्लंघन हुडकुन काढण्यात आले? (त्याची यादी दयावी.)

१. पैकी किती प्रकरणात निष्कासनाची कारवाई करण्यात आली? (यादी दयावी)
निष्कासीत प्रकरणांत किती ठिकाणी सदयस्थितीत पुर्नबांधकाम झालेले आहे? (यादी दयावी)

<u>उत्तर :—</u>कार्यवाही चालू आहे.

नगररचना विभागाकडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४१७ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

**?** <u>प्रश्न क्र. ४१७:—</u> सन २००४—२००५ व सन २००३—२००४ साली सार्वजनिक बांधकाम विभागाची किती व कोणत्या ठेकेदाराची बिले आपल्या अकाउंट डिपार्टमेंट मध्ये आली आहे?

१. आजपर्यंत कुठल्या ठेकेदारांची बिले आपण अदा केली आहे?

२. वर्षानुवर्षे काही ठेकेदाराची बिले अकाउंटस् डिपार्टमेंटमधुन अदा केली जात नाही असे किती ठेकेदार आहेत?

सन २००४—२००५ व २००३—२००४ सालातील विस्तृत माहिती मिळावी.

<u>उत्तर :—</u>१. सन ०३—०४ व ०४—०५ या वर्षासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्राप्त व अदा केलेल्या ठेकेदारांच्या बिलासंबंधी विविध नोंद वहया लेखा विभागात असून त्या पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

२. ३१ मार्च ०४ पर्यंत लेखा शाखेत प्राप्त झालेल्या सर्व देयकांची अदायगी करण्यात आलेली आहे.

३. वरीलप्रमाणे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४१८ हा श्री. रामदास उमाप यांचा आहे.

**?** <u>प्रश्न क्र. ४१८:—</u>१) प्रभाग क्र. ६ साठी किती बुस्टर पंप सध्या कार्यान्वीत आहेत? ते कोठे बसविणेत आले आहेत?

२) वरील बुस्टरची प्रत्येकी क्षमता किती आहे? रोज सकाळ, संध्याकाळ चालविण्याची वेळ किती आहे? प्रत्येकाचा सेक्शन व डिलीव्हरी प्रेशर किती आहे? व कोण—कोणत्या वसाहतीला (विभागाला) उदा. आजादनगर, बौध्द नगर, वडार कॉलनी, गरीब नगर, मा. गांधी नगर, पाणी पुरवठा केला जातो?

३) वरील पंपाचा १ महिन्याचा लाईट बीले, ऑपरेटर, मॅन्टॅनन्स इत्यादी खर्च किती येतो?

४) प्रभागात सध्यस्थितीत असणा—या पाईप लाईनची स्थिती काय? नविन पाईप लाईन टाकणे आवश्यक वाटते का? आवश्यकता नसल्यास त्यासाठी आपण काही नविन पाईप लाईन पास केल्या आहेत का?

५) वरील विभागात पाणी पुरवठा सुरळीत होत नाही, ब—याच भागात पाणी टंचाई वर्षानुवर्षे आहे त्यासाठी आपण केलेली उपाय योजना काय आहे?

<u>उत्तर :—</u>१. एकुण ५ बुस्टर कार्यान्वीत आहेत. ते खालील ठिकाणी बसविण्यात आले आहेत.
अ) भारत मार्बल (आझादनगर)
ब) रुहानी सतसंग
क) बाल्कनजी बारी
ड) बाल्कनजी बारी
इ) गांधी नगर

| | **अश्वशक्ती** | **पंपाची** |
|---|---|---|
| भारत मार्बल | ५ | १+१ |
| रुहानी सतसंग | ७.५० | १ |
| बाल्कनजी बारी | १.१० | १+१ |
| बाल्कनजी बारी | २, ७.५० | २ |
| गांधी नगर | ३, १२.५० | १ |

उध्दरण वाहिनीवरील पाण्याचा दाब हा सरासरी १.५ ते २ के. जी. / से.मी. इतका आहे.

२. सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये माहिती जोडली आहे.

३. बुस्टर दरांचा प्रति महा खर्च
१) विद्युत देयकापोटी सरासरी खर्च रुपये १८००/—
२) ऑपरेटर मेन्टन्सचा खर्च रुपये २७३७०/—
३) सर्व बुस्टरचा देखभाल व दुरुस्तीचा सरासरी खर्च रुपये ७००/— ते रुपये १०००/—

प्रभागात सद्यस्थितीत असलेलया पाईप लाईनची माहिती खालील प्रमाणे आहे.
आझादनगर ४'' व २.५'' व्यासाची वरच्या भागाकरीता
३'' खालीच्या भागाकरीता
बुध्दनगर—३''
वडार कॉलनी—२''
गरीब नगर—२'' (३ लाईन)
गांधी नगर—३'' व ६'' लाईन

४. होय. आवश्यकतेप्रमाणे चार ठिकाणी जलवाहिन्या टाकण्याच्या कामास मंजुरी मिळाली आहे व त्यापैकी एक काम पुर्ण झाले आहे.

५. वरील भागात सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारची पाणी टंचाई नाही.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :— उत्तर ठिक आहे.

मा. सचिव :—प्रश्न क्र. ४१९ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

**प्रश्न क्र. ४१९:—**१) कुत्र्यांचे संख्येवर नियंत्रण ठेवणेसाठी श्वान निर्बिजीकरण प्रकल्पांतर्गत शहरातील विविध प्रभागातून कुत्रे पकडुन त्यांची शस्त्रक्रीया (श्वान निर्बिजीकरण) करणेसाठी महानगरपालिकेतर्फे ठराव पारीत करण्यात आला आहे. परंतु उल्हासनगर शहरात कुत्र्यांची संख्या मोठया प्रमाणावर वाढल्याने नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. सदर बाबत महानगरपालिकेमार्फत कोणती उपाययोजना सध्या कार्यान्वित करण्यात आली आहे?

अ) सर्व महानगरपालिकेत भटके कुत्रे पकडण्यासाठी 'डॉग व्हॅन' भटके कुत्रे पकडणा—या पथकास पुरविण्यात येते. उल्हासनगर महानगरपालिकेत भटके कुत्रे पकडणेसाठी 'डॉग व्हॅन' पुरविण्यात आली आहे का? नसल्यास ती कधी पुरविण्यात येईल?

उत्तर :—१) कुत्र्यांचे संख्येवर नियंत्रण ठेवणेसाठी श्वान निर्बिजीकरण प्रकल्पांतर्गत श्वान निर्बिजीकरण प्रकल्पांतर्गत श्वान निर्बिजीकरण करण्याची निविदा अंतिम टप्प्यात आहे.
२) ''डॉग व्हॅन'' पुरविण्यात आलेली नाही. तसेच निविदा अंतिम होवून निविदाकारांतर्फे सदर ''डॉग व्हॅन'' पुरविण्यात येईल.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्री. लाल पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, माझा प्रश्न असा आहे की, उल्हासनगरमध्ये कुत्र्यांची संख्या फार वाढत चालली आहे. आता तर उल्हासनगरचे सोडा परंतु अंबरनाथ व कल्याण—डोंबिवली येथिल कुत्रे देखिल येथे घुसविले जात आहेत. काही दिवसांपुर्वी काही लोकांनी बाहेरुन गाडी भरुन कुत्रे कॅम्प नं. ५ येथे सोडले होते. आज मला येथे सांगतांना फार दु:ख होत आहे की, मी हा प्रश्न मागील ६ वर्षापासुन विचारत आलो आहे. एके काळी श्री. पानपट्टे हे उपायुक्त होते त्यांनी उत्तर दिले होते त्यानंतर श्री. भडकवाड यांनी उत्तर दिले होते की, कुत्रे हटविले जातील. ते अधिकारी गेले परंतु कुत्रे तेथेच आहेत. उत्तर देणारे बदलले आहेत परंतु कुत्रे तेथेच आहेत. मी येथे एक चांगला प्रश्न विचारला आहे. प्रश्न क्र. ४१९ ला आरोग्य अधिका—यांनी उत्तर दिले आहे व प्रश्न क्र. ४२० जो डुक्करांशी संबंधीत आहे त्याला उपायुक्त, मुख्यालय यांनी उत्तर दिले आहे. यांचा समन्वय चांगला आहे. एका प्रश्नाचे उत्तर आरोग्य अधिकारी देतात व एकाचे उत्तर उप—आयुक्त, मुख्यालय देतात. आता हे असे चॉकलेट खावु घालणे कधीपर्यंत चालेल? ६ वर्षापासुन कुत्रे हटविले जात नाहीत. डुक्कर हटविले जात नाहीत. तर मेहरबानी करुन याचे उत्तर दयावे की, आज ही एकच अशी महापालिका आहे जेथे डॉग व्हॅन नाही. कुत्र्यांसाठी व्हॅन कधी मागवणार? कुणी अडविले आहे का? महासभेसमोर, स्थायी समितीसमोर कधी आणणार? मंजुरी घेवुन मागवा. फक्त उत्तर देतात की, डॉग व्हॅन नाही. मेहरबानी करुन याचे उत्तर दया की, कुत्र्यांना मारणार नसाल तर त्यांची नसबंदी कधी करणार? डॉग व्हॅन नाही ती कधी मागविण्यात येईल. दिशाभुल करणारे उत्तरे देवुन चालणार नाही. वस्तुस्थितीदर्शक उत्तर दया. शहराचा त्रास कधी दुर होईल. पुर आल्यावर सांगितले जाते की, जर कुणाला जखम असेल आणि कुत्रा, डुक्कर अथवा उंदराच्या लघुशंकेने जंतु जावु शकतात. तर ही जनावरे आपण कधी हटविणार? मेहरबानी करुन याचा खुलासा येथे व्हायला हवा. अन्यथा हाच प्रश्न पुढे जावुन दूस—या वैद्यकीय अधिका—याला अथवा उपायुक्ताला विचारावा लागेल. जसे ६ वर्षापासुन विचारत आहे. मेहरबानी करुन मा. महापौरजी याचा खुलासा येथे व्हायला हवा. कधी पर्यंत डॉग व्हॅन येईल, कधी पर्यंत येथे कागदी कारवाई सुरु राहील. शहरात कुत्र्यांचा व डुक्करांचा उपद्रव फार वाढला आहे. जर आपण शहरात फिरलो तर सगळीकडे डुक्कर व कुत्रे आढळुन येतील. हा त्रास कधी पर्यंत दुर होईल याचा खुलासा येथे व्हायला हवा.

**मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. आयुक्त :— मा. महापौर महोदया, श्री. वनवारीजी माझी आपणांस विनंती आहे की आपण बसुन घेतले तर मला शांततेने उत्तर देता येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मी मा. महापौरांकडुन परवानगी घेतलेली आहे.

<u>मा. आयुक्त :—</u> सभागृहाचा नियम असा आहे की, एखादा सदस्य बोलत असेल तर त्यावेळी दुस—या सदस्याने बसायला हवे. मा. महापौर महोदया, माझी आपणांस विनंती आहे की, आपण सदस्यांना तसे निर्देश द्यावेत. मा. महापौर महोदया, या प्रश्नाच्या उत्तराच्या वेळी निवेदन केले गेले की, या शहरातुन कुत्रे हटविण्यासाठी महापालिका प्रशासनाने काहीही केलेले नाही. आपणा सर्वांना माहिती असेल की, उल्हासनगर महापालिकेने ठाणे जिल्हा परिषदे समवेत एक सामंजस्य करार केला होता. ठाणे जिल्हा परिषदेच्या पशु चिकित्सालयातुन जे पशु अधिकारी आहेत त्यांच्या समवेत एक वर्षात आम्ही १२०० पेक्षा जास्त कुत्र्यांवर नसबंदीची शस्त्रक्रिया करण्याचा एक करार केला होता. हा कार्यक्रम व्यवस्थीतरित्या न चालल्याने प्रशासनासमोर एक दुसरा प्रस्ताव आला. त्यानुसार आम्ही निविदा मागविली आहे. निविदा अंतिम करण्याची कारवाई सध्या सुरु आहे. ६ वर्ष काय झाले याची मला माहिती नाही. परंतु मागील दिड—दोन वर्षात आधी ठाणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने व त्यानंतर खाजगी ठेकेदार नियुक्त करुन उल्हासनगर शहरातुन जे कुत्रे आहेत त्यांच्या निर्बिजीकरणाचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन आहे. ठाणे जिल्हा परिषदे समवेत महापालिकेने काय कारवाई केली याची विस्तृत माहिती हवी असल्यास ती देखील सभागृहासमोर ठेवण्यात येईल. परंतु काहीही झाले नाही व पुढे कधी होईल. काही झाले नाही याच्याशी मी सहमत नाही. परंतु सध्या आमच्यासमोर जो प्रस्ताव आहे त्यावर जास्तीत जास्त एका महिन्यात निर्णय घेण्यात येईल. डॉग व्हॅन खरेदी करण्याचा जो निर्णय आहे तो महापालिकेची आर्थिक अवस्था बघुन लवकरात लवकर घेण्यात येईल.

मा. सदस्या श्रीमती मीना सोडे सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :—</u>मा. महापौरजी, कुत्र्यांना तर आपण काही कारणांमुळे अजुन हटवु शकलो नाही परंतु शहरात भटकी जनावरे उदाहरणार्थ गायी फिरत असतात. आपण त्यांना पकडुन त्यांच्या मालकांकडुन दंडही वसुल करु शकतो. यावर काहीही कारवाई केली जात नाही. मी ब—याच वेळा अधिका—यांना सांगितले आहे. आमच्या येथे एका वृध्द स्त्रीस एका गायीने मारले व त्यानंतर ८ दिवसांनी तीचे निधन झाले. तर हा एक गंभीर मुद्दा आहे. कुत्र्यांसमवेत जे इतर भटकी जनावरे फिरत असतात ज्यांचे मालकही असतात, ज्यांच्याकडुन आपण दंड वसुल करु शकतो. मला वाटते असे करण्यासाठी काहीही आडकाठी नाही. मला असे वाटते की, उल्हासनगर शहरात जेवढी देखील भटकी जनावरे व गायी फिरत असतात त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, आता पुन्हा एकदा तेच उत्तर ऐकायला मिळाले. यावरही श्वेतपत्रिका काढावी लागेल असे मला वाटते. कुत्रे कधी पकडले जातील, त्याचे नियोजन कसे करणार, ठाण्यासही आमचा करार झाला आहे, तेथेही प्रयत्न सुरु आहेत अशी उत्तरे मिळतात. परंतु परिस्थिती तशीच आहे. कुत्रे शहरात फिरत आहे. पुर्ण रात्र लोकांना झोपु देत नाहीत. पुर्ण उल्हासनगरमध्ये कुत्र्यांनी लोकांना त्रस्त करुन सोडले आहे. सकाळी ४—४, ५—५ वाजेपर्यंत जागे राहतात. स्वत: पण झोपत नाहीत आणि दुस—यांनाही झोपु देत नाहीत. तर माझी विनंती आहे की, मेहरबानी करुन लवकरात लवकर त्यावर कारवाई केली जावी. आज आमच्या श्री. होशियारसिंग यांनी सांगितले की, मा. महापौरजी, आपल्या महापालिकेत कॅटल कॅचर आहेत. आपल्या येथे कोंडवाडा देखील आहे. आपण गायी तरी पकडु शकतो. येथे लाखो गायी फिरत आहेत. उंदरांसाठी देखील काही काळापुर्वी महापालिका पिंजरे ठेवायची. लोकांना असे पिंजरे आरोग्य विभागाच्या कार्यालयांमध्ये मिळायचे. प्लेग होवू नये यासाठी. आता हे गायी बद्दल बोलले माझा पुढील प्रश्न डुक्करांबद्दल आहे. त्यावरही असेच उत्तर दिले जाईल. तर मेहरबानी करुन शहरातुन कुत्र्यांचा त्रास कधी दुर होईल. रात्री भुंकणे कधी बंद करतील. स्वत:ही झोपतील आणि लोकांनाही झोपु देतील. त्यांची नसबंदी करावी अथवा डॉग व्हॅन मागवुन त्यांना दुसरीकडे फेकुन दयावे. तुम्ही मध्ये पेपरमध्ये देखील वाचले असेल. तर मेहरबानी करुन यावर तोडगा किती महिन्यात, २ महिन्यात, ४ महिन्यात, किती महिन्यात होईल. यावर निर्णय व्हायला हवा. मंजुरीसाठी काहीही अडचण नाही. महासभेसमोर अथवा स्थायी समितीसमोर जो देखिल प्रस्ताव येईल तो मंजुर करण्यात येईल. परंतु ६ ते ८ वर्षापासुन हा त्रास सुरु आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> मा. महापौर, मा. आयुक्त, मुंबई येथे भटकी गाय पकडुन आणल्यास यासाठी रुपये २५० महापालिकेतर्फे दिले जातात. आपल्या उल्हासनगरमध्ये देखील बेरोजगारी कमी नाही. जर आपण १०० रुपये बक्षिस ठेवल्यास लोक स्वत:हुन भटकी जनावरे आणुन ठेवतील व जेवढे दिवस ते अन्न खातील त्याचा दुप्पट दंड महापालिका त्यांच्या मालकांकडुन वसुल करु शकेल. राहिला प्रश्न उंदराचा

तर एका उंदरामागे त्याला पकडणा–यास रुपये २५/– दिले व महापालिकेच्या कर्मचा–याने उंदिर मोजुन ते ताब्यात घेवुन त्यांना मारुन ते गाडल्यास महापालिकेला उंदरांच्या संबंधीत आजारांशी सामना करावा लागणार नाही. या गोष्टी लहान आहेत परंतु शहरासाठी महत्वाच्या आहेत. आज आपल्या समोर डासांचा प्रश्न आहे, त्यांची संख्या वाढली आहे त्यामुळे डेंग्यु व मलेरिया वाढला आहे. यासाठी आपण धुरीकरण करत आहोत, इतर कारवाई करत आहोत. यासाठी असे उपाय कुत्रे, डुक्करे यांच्यासाठीही करायला हवे. मा. महापौर महोदया, आपण यावर प्रशासनाला निर्देश दयावेत की, प्रत्येक उंदराला मारण्यासाठी बक्षिस ठेवले जावे. तसेच गाय, बैल व गाढव यांना पकडणा–यांनाही बक्षिस दिले जावे. त्यानंतर ते एका ठिकाणी ठेवुन नंतर त्यांच्या मालकांकडुन दंडही घेतला जावा. असे केल्याने महापालिकेला उत्पन्न प्राप्त होईल व जनावराचा जीवही वाचेल. तसेच शहराला या त्रासापासुन मुक्ती देखील मिळेल. धन्यवाद. मा. महापौर महोदया, ही समस्या मुळा पासुन हटविण्यासाठी प्रशासनाला कृपया निर्देश द्यावेत.

<u>मा. महापौर :–</u>सन्माननिय सदस्य, कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाचा प्रस्ताव सध्या विचाराधीन आहे. मला असे वाटते की, स्थायी समितीने त्याला मान्यता दिली आहे. लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यात येईल. आपल्याकडे सध्या कोंडवाडा उपलब्ध नाही. पशु, पक्षी ठेवण्यासाठी आपल्याकडे जागा उपलब्ध नाही. आपल्या या सुचनेवर पुढे विचार करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, जेव्हा मी सभापती होतो तेव्हा महापालिकेच्या मागील बाजुस एक कोंडवाडा होता. तो कुठे गेला आहे, याचा खुलासा व्हायला हवा. तो निघुन गेला का?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>कल्याणला निघुन गेला...

<u>मा. महापौर:–</u> कोंडवाडयाची अवस्था सध्या खराब असल्याने तेथे जनावरे ठेवता येणार नाही. तर त्यास दुरुस्त करुन याचा विचार करण्यात येईल. त्याला दुरुस्त केले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> सुरत मध्ये देखील प्लेग आला होता. आता सुरत या संकटातुन बाहेर आला आहे. आपल्या शहरात देखील मोठ–मोठे उंदिर आहेत. उंदरांबद्दल आपण निर्देश दिले तर बरे होईल.

<u>मा. महापौर :–</u> उंदिर गणपतीचे वाहन आहे. त्यांची मनापासुन पुजा करायला हवी. त्यांना हात जोडायला हवेत की आमच्याकडे काही नुकसान करु नका. तर खरोखर ते निघुन जातील.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४२० हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

?

<u>प्रश्न क्र. ४२०:–</u>१) उल्हासनगर–१ ते ५ मधील डुक्करांवर नियंत्रण नसल्याने डुकरांची संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे. सदर डुकरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे?

<u>उत्तर :–</u>खाजगी मालकीची डुक्करे संबंधीत मालकांनी बंदिस्त ठेवावयाची आहेत याबाबत संबंधीतांना सुचना देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
मोकाट व कोणाच्याही मालकीची नसलेली डुक्कर प्शुहत्या प्रतिबंधक कायदयातील तरतुदीमुळे सदर डुक्करे मारत येत नाहीत. परंतु पकडुन जंगलामध्ये सोडण्याची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>हा प्रश्न बघूनच याला ४२० हा क्रमांक दिलेला आहे. आता डुकरांसाठी महापालिकेने काय काय प्रयत्न केले आहे हे ही आम्ही ऐकु इच्छितो. काही दिवसांपुर्वी उल्हासनगरमध्ये डुक्करे हटविणा–या एका माणसाचा खुन झाला होता. तेव्हापासुन प्रशासन घाबरले तर नाही ना? हे डुक्कर उचलणे बंद का केले? आधी जेव्हा श्री. आर.डी.शिंदे हे आयुक्त होते तेव्हा पुर्ण उल्हासनगर शहरातुन डुक्करांचा सफाया झाला होता. एकही डुक्कर दिसत नव्हता. आज शहरात हजारो डुक्करे दिसत आहेत ते कधी हटतील? यासाठी पण डुक्करांची व्हॅन आणणार का, ठाण्याला संपर्क करणार का? त्यावेळी आर.डी. शिंदे साहेबांनी डुक्करांना नवी मुंबई व इतर ठिकाणी फेकुन दिले होते. संपुर्ण शहरात एकही डुक्कर आढळुन येत नव्हता. कुण्या एका काळी चंद्रशेखर साहेबांनी कल्याणमध्ये एका अधिका–याला कुत्रे व डुकरे

मोजण्याचे काम लावले होते. तर येथे उल्हासनगर शहरात चंद्रशेखर साहेब व आर.डी. शिंदे साहेबांसारखे उदाहरण कधी बघायला मिळेल? मेहरबानी करुन याचा खुलासा व्हायला हवा. टाईम्स ऑफ इंडिया व इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रांमध्ये देखिल डुक्करांचे फोटो येत असतात की उल्हासनगरमध्ये डुक्कर आहेत व यासाठी कोणतीही कार्यवाही केली जात नाही. तर मेहरबानी करुन हा त्रास कधी दुर होईल याचाही खुलासा व्हायला हवा.

<u>मा. आयुक्त :–</u> हे खरे आहे की, उल्हासनगरमध्ये दिवसेंदिवस डुक्करांची संख्या वाढत चालली आहे. मा. महापौर महोदया, आर.डी. शिंदे साहेबांच्या काळात डुक्करे हटविण्याची मोहिम या शहरात सुरु करण्यात आली होती. त्यानंतर आमच्या दोन, अडीच वर्षाच्या कालावधीत जास्त तेज मोहिम आम्ही चालवु शकलो नाही. परंतु आता शहराची जी परिस्थिती आहे ती पाहुन असे वाटते की, डुक्कर हटविण्याची मोहिम जोरात सुरु करायला हवी. महापालिका प्रशासन असे करेल एवढे आश्वासन मी सभागृहाला देतो.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४२१ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४२१ :–</u>१) उल्हासनगर महानगरपालिकेत काही सफाई कर्मचारी यांना सफाईचे कामकाज न देता शिपाई / लिपिकांची कामे देतात त्यांना त्यांचे मुळपदाप्रमाणे काम का देण्यात येत नाही?

अ) मुळपदाप्रमाणे काम न दिल्याने व इतर कामे केल्याने सफाई कामाची कमतरता भासते त्यामुळे साफसफाईचे कामात दिरंगाई दिसून येते यास जबाबदार कोण?

<u>उत्तर :–</u>प्रश्न वस्तुस्थितीस आधरीत नाही.
वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असल्याने कोणत्याही अधिका–यास जबाबदार धरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, मी माझ्या प्रभागात आकाश कॉलनी ते राशन ऑफिस बुस्टर पर्यंत जलवाहिनीचे गुच्छ काढुन त्याठिकाणी एकच जलवाहिनी टाकण्यासाठी विलंब का लागत आहे असा प्रश्न विचारला होता. याला टाळाटाळीचे उत्तर दिलेले आहे की ३ वेळा या कामासाठी निविदा काढली होती परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. परंतु प्रत्यक्षात ते काम आमदार निधितुन करायचे होते. ते एक प्राकलन गहाळ झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातुन त्याला मंजुरी आलेली आहे. परंतु पाणी पुरवठा विभागात ते प्राकलन कुठेतरी गहाळ झाले आहे. ते प्राकलन वेगळे होते हे प्राकलन वेगळे आहे. तर आमदार निधीतुन करावयाच्या कामाचे प्राकलन कुठे गेले व सदयस्थिती काय आहे याचा खुलासा व्हायला हवा. दिशाभुल करणारे उत्तर न देता, आमदार निधितुन करावयाच्या कामाचे काय झाले? याचा खुलासा व्हायला हवा. उत्तर असेल तर दया अन्यथा पुढील महिन्यात दया.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u> श्री. किशोर वनवारी, आपण प्रश्न क्र. ४२२ वर चर्चा करीत आहात, प्रश्न क्र. ४२१ राहुन गेला आहे.

**मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सचिव :–</u> प्रश्न क्र. ४२१ चे उत्तर ठिक आहे का?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> त्यांना माझा प्रश्न समजलेला नाही. पुढील वेळी मी चांगल्या प्रकारे समजावुन प्रश्न टाकेन. ते माझा प्रश्न समजावुन घेवु इच्छित नाही. माझा प्रश्न उघड–उघड होता की, ज्या सफाई कर्मचा–यांना ३१ मार्च पर्यंत टॅक्सची बिले वाटण्याचे काम दिले होते आजपर्यंत त्यांना तेथुन मुक्त करण्यात आलेले नाही. तर यांनी लिहिले आहे की, तुमचा प्रश्न समजुन येत नाही. दुस–यांदा आम्ही व्यवस्थित समजावुन प्रश्न देवु. माझ्या पॅनलमधुन बिल वाटण्यासाठी सफाई कर्मचारी दिले होते. आरोग्य निरिक्षकाने जो अहवाल दिला होता तो देखिल आपल्याकडे आला आहे. मी स्वत: आरोग्य निरिक्षकासोबत आपल्याकडे आलो होतो. प्रश्न तोच आहे की, ज्या सफाई कर्मचा–यांना ३१ मार्च पर्यंत बिल वाटण्याचे काम दिले होते त्यांना आता ऑगस्ट महिना आला आहे. ते परत कधी येतील असा प्रश्न होता.

<u>श्री. उत्तर लोणारे, उप–आयुक्त (मुख्यालय):–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, सभागृह नेता यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याला आम्ही जसा प्रश्न आहे त्याचप्रकारे उत्तर दिले आहे. मालमत्ता कर विभागात जे चतुर्थ श्रेणी कर्मचारी कार्यरत होते त्यांना बिल वाटण्याचा अतिरिक्त कार्यभार दिला होता. ३१ मार्चपर्यंत सदरचे काम करायचे होते. परंतु कर वसुलीचे काम सुरु असल्याने ते अदयाप तेथेच आहेत. ते जे ७ लोक आम्ही पाठविले होते त्यांना आता पुन्हा आरोग्य विभागात पाठविण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> उत्तर पण असेच दयायला हवे होते. तुम्ही काय उत्तर दिले आहे ते बघा.

<u>श्री. उत्तर लोणारे, उप–आयुक्त (मुख्यालय):–</u>आपला प्रश्न तसा नाही आहे. आपण पुन्हा एकदा बघा. आमचे उत्तर बरोबर आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> ज्याची जेथे नियुक्ती होते त्याने तेथेच काम करायला हवे. मी लिहिले आहे की, काही कर्मचारी शिपायाचे काम करतात. एकाला आपण सी.एफ.सी. मध्ये ठेवलेले आहे.

<u>श्री. उत्तर लोणारे, उप–आयुक्त (मुख्यालय):–</u>प्रमोशनसाठी साखळी पध्दत असते. जे कर्मचारी एका पदावरुन दुस–या पदावर जावु शकतात अशा कर्मचा–यांना आम्ही काम दिले आहे. आपण ते समजावुन न घेता प्रश्न विचारला आहे. यामुळे हा प्रश्न बरोबर नाही असे आम्ही लिहिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> यापुढे आपल्याला चांगल्याप्रकारे समजेल असे प्रश्न विचारु. मी लेटरपॅड आपल्याकडेच देवुन जाईल.

<u>श्री. उत्तर लोणारे, उप–आयुक्त (मुख्यालय):–</u>ज्यांना आम्ही लिपिक पदाचा अतिरिक्त कार्यभार दिला आहे अशा कर्मचा–यांना पुन्हा त्यांच्या विभागात पाठविण्यात येईल.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४२२ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४२२:–</u> प्रभाग क्र. ११ मधील आकाश कॉलनी ते राशन ऑफिस बुस्टर पर्यंत जलवाहिनीचे एकत्रित गट हटवून त्या जागी एकच वितरण जलवाहिनी टाकण्यास विलंब का लागत आहे?

<u>उत्तर :–</u>आकाश कॉलनी ते राशन ऑफिस बुस्टर पर्यंत जलवाहिनीचे एकत्रित गट हटवून नविन एकच जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी यापूर्वी तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु दर अवाजवी असल्यामुळे निविदा मान्य करण्यात आल्या नाहीत. सदर दोन्ही कामाचे सुधारीत प्राकलने तयार केले असून लवकरच निविदा मागवून काम सुरु करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> आमदार निधितुन जलवाहिनीचे जे काम मंजुर झाले होते. ज्यासाठी आमदार साहेबांनी रुपये २ कोटीचा निधी दिला होता. जेथे जलवाहिन्यांचा गुच्छ असेल तो काढुन तेथे एकच जलवाहिनी टाकण्याचे काम होते. ज्या जलवाहिनी गटारातुन जातात त्यामुळे आजार पसरतो. हे टाळण्यासाठी ते काम होते. तर ते आमदार निधीचे काम कुठे गहाळ झाले आहे ते सांगा.

<u>श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा):–</u>मा. महापौर महोदया, ही जी दोन कामे आहेत , दोन्ही मंजुर आहेत. यासाठी ३ वेळा निविदा मागविली होती. तिन्ही वेळा दर जास्त असल्याने निविदा नाकारण्यात आली होती. आता नविन दरसुचीप्रमाणे प्राकलन बनवुन निविदा बोलविण्यात येईल. आकाश कॉलनी ते रेशन ऑफीस व दुसरे आकाश कॉलनीचे अशी दोन्ही कामे आहेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> आमदार निधितुन करावयाच्या कामाचे देखिल शोधा.

<u>श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा):–</u>ठिक आहे.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४२३ हा श्री. किशोर वनवारी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४२३:—</u> प्रभाग क्र. ११ मधील काही समाज मंदिर, शौचालये व आकाश चाळमध्ये पायवाट व नाला मोडकळीस आलेला आहे. त्यांच्या दुरुस्ती व पुर्नबांधणीसाठी महापालिकेतर्फे उपाययोजना कधी करता येईल? सदर कामास विलंब का लागत आहे?

<u>उत्तर :—</u>प्रभाग क्र. ११ मध्ये आकाश चाळ येथे शौचालय, पायवाट, नाला, समाजमंदिर या कामांचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम खात्याने तयार केलेले आहेत. या कामाच्या मंजुरीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर व जिल्हा उप—निबंधक, ठाणे यांचेकडुन सदर मजुर कामगार सहकारी सोसायटी ची शिफारस प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धता लक्षात घेवून व प्राधान्यक्रम ठरवुन कामे हाती घेण्यात येतील.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>मा. महापौरजी, २६ व २७ तारखेला जेव्हा पुर आला तेव्हा आमच्या प्रभागात बॅरेक नं. २१०८ जवळ जे समाजमंदिर होते ते पडले. त्याच्या शेजारी शौचालय देखील पडले. आकाश कॉलनी मध्ये नाला न बनल्याने, गल्ल्या न बनविल्याने पुर आला. त्यावेळी मी अर्ज दिला होता. त्यावेळी सांगितले गेले की, कलम ६७ (सी) प्रमाणे आपले हे काम करण्यात येईल. मला वाटते की, प्राकलन बनविण्यास तेव्हा मंजुरी दिली होती. परंतु आजपर्यंत त्यानंतर काहीही कारवाई झालेली नाही. शौचालय व समाजमंदिर तसेच तुटुन पडले आहे. नाला न बांधल्याने जो पुर आला होता त्यामुळे आजपर्यंत तेथे पाणी आहे. तर नैसर्गिक आपत्तीमुळे जे काम करायचे आहे ते तरी लवकर करण्यात यावे. त्यासाठी उशिर व्हायला नको. यासाठी उशिर का होत आहे व ते कधी सुरु होईल. तसेच सध्या ते काम कोणत्या स्तरावर आहे याचाही खुलासा करावा.

<u>श्री. एम.ए. जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि):—</u>मा. महापौर महोदया, या प्रश्नाबद्दल मी बोलु इच्छितो की, सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी पुर येण्यापुर्वी जेव्हा समाजमंदिर व शौचालय पडल्याचे सांगितले होते त्यावेळी मी त्याठिकाणी पाहणी केली होती. पुर येण्यापुर्वी ही दोन्ही बांधकामे अंशत: पडली होती. त्या बांधकामांचे छत पडले होते. समाजमंदिराची दक्षिणेकडील एक भिंत पडली होती. त्याचवेळी याचे प्राकलन आम्ही बनविले होते. पुरामुळे जी दोन्ही बांधकामे पुर्णत: बाधित झाली आहेत ही बाब मी मा. आयुक्तांच्या निर्देशनास आणली होती. याचे प्राकलन बनवुन सादर केले आहे व ते मंजुरीच्या प्रक्रीयेत आहे. हे शौचालय, समाजमंदिर व पायवाट याचा खर्च माझ्या अंदाजाप्रमाणे ५ लाखाच्या आत मध्ये आहे. डी.डी. आर.कडुन मान्यता मिळाल्यानंतर ३—४ कामाचे प्राथम्य ठरवुन सुरुवात करण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>मा. महापौरजी मी देखिल हेच म्हणत आहे की, जिल्हा उपनिबंधक ठाणे यांच्या मान्यतेची आपण वाट पाहत आहोत तोपर्यंत शौचास जाणा—या लोकांचे हाल होत आहेत. ज्या लोकांचे नुकसान झाले आहे, ज्यांच्या घरात पाणी जात आहे त्यांचे काम आपण नैसर्गीक आपत्तीमध्ये कलम ६७(सी) प्रमाणे करु शकतो. डी.डी. आर.ला काम गेल्यास त्यामध्ये महिने लागतील. यासाठी जे आवश्यक आहे ते त्वरीत करुन घ्यावे.

<u>श्री. एम.ए. जवादे, कार्यकारी अभियंता (साबांवि):—</u>मा. महापौर महोदया, या कामाच्या आवश्यकतेबाबत आयुक्त महोदय स्थळपाहणी करुन निर्णय घेतील.

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४२४ व ४२५ हे श्री. जमनादास पुरस्वानी यांचे आहेत. यावेळी ते सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांचे प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ४२४:—</u>१) बी.पी.एल. स्कीम के अंतर्गत २००४—२००५ में टोटल कितने लोगों को प्रापर्टी टॅक्स का फायदा मिला ।

२) बी.पी.एल. स्कीम के अंतर्गत टोटल कितीने लोगों ने टॅक्स माफ के लिए आवेदन दिये ।

३) जिन लोगों की टॅक्स माफ हुई वह जिर्क २००४—२००५ के लिए हुई या हमेशा के लिए ।

४) जिन लोगों को इसका फायदा मिला कृपया उनके पत्ते तथा नाम हमें दे ।

<u>उत्तर :—</u>१. या योजनेअंतर्गत ५२६ मालमत्ता धारकांना लाभ मिळालेला आहे.

२. नागरीकांकडुन अर्ज प्राप्त झाले आहेत.

३. सन २००३ पर्यंतची थकबाकी व्याजाची रक्कम (शिक्षण कर रोजगार हमी व पाणीपट्टी वगळून) निर्लेखित करण्यात आलेली आहे.

४. स्थायी समिती ठरावानुसार यादी सोबत जोडली आहे.

५. **प्रश्न क्र. ४२५:–**१) बॅरेक नं. १८० शांती दरबार के सामने जो कचरे का खत्ता है वह प्लाट किसका है ।

२) बॅरेक नं. १८० के खत्ते के प्लॉट की सी.डी. किस को है क्या, किसके नाम पर है ।

३) इन प्लॉट की टॅक्स कोई भरता है क्या।

४) इए प्लाट पर कचरे का बडा ढेर है वह कब तक उठेगा ।

उत्तर :–जागेच्या मालकी हक्काबाबत उप–विभागीय अधिकारी, उल्हासनगर ३ यांचेकडुन माहिती मागविण्यात आलेली आहे.

सदर जागेची कार्यालयीन दप्तरी व संगणकीय नोंद आढळून येत नाही. त्यामुळे या जागेचे कर कोणही भरणा करीत नाही.

अतिवृष्टीमुळे प्रभावित झालेल्या भागाची स्वच्छता प्राधान्याने करणेची कार्यवाही चालु आहे. त्या सोबत सदर भागातला कचरा उचलण्याची कार्यवाही चालु आहे. परंतु कचरा जास्त प्रमाणात असल्याने सदर कार्यवाहीस काही काळ लागेल.

**मा. सचिव :–**प्रश्न क्र. ४२६ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**प्रश्न क्र. ४२६:–** उल्हासनगर महानगरपालिका हददीत कॅम्प १ ते ५ मध्ये जिन्स पॅन्ट बनविणेचे जिन्स वॉश करणेचे कारखाने आहेत त्या अनुषंगाने खालील प्रश्नाची सूचक समाधानकारक सविस्तर माहिती मिळणेस नम्र विंनती आहे.

प्र. क्र. १ अ) उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मध्ये किती जिन्स कारखाने आहेत? त्यांचा नाव व पत्ता दयावा.

ब) सदर कारखान्यांना महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय? का सदरचे कारखाने विनापरवानगी सुरु आहेत?

क) विना परवानगी सदरचे कारखाने सुरु असल्यास महानगरपालिकेने कारखान्यांवर कोणती कारवाई केली?

ड) संबंधीत जिन्स कारखान्याची कर आकारणी (घरपट्टी) घरगुती / व्यापारी दराने केली जाते?

ई) सदर कारखान्यावर घरपट्टीची थकबाकी आहे का? असल्यास कोणत्या व किती कारखान्यावर थकबाकी आहे?

प) जिन्स कारखान्यांना किती नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. त्यांचे क्रमांक दयावेत? त्यांना कोणत्या दराने (घरगुती /व्यापारी) आकारणी केली जाते? जिन्स कारखान्यात अनधिकृत नळजोडण्या घेण्यात आल्या आहेत काय? असल्यास किती? त्यांचेवर काय कारवाई केली?

फ) जिन्स कारखान्यात कोणत्या प्रकारचे केमिकल्स वापरण्यात येतात? सदर केमीकलमुळे प्रदुषण होते का? त्यांचेपासुन नागरीकांचे आरोग्यास धोका पोहचु शकतो का? जिन्स कारखान्याचे प्रदुषणाबाबत / जिन्स कारखान्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत का? किती तक्रारी प्राप्त झाल्या, सदर तक्रारीवर महापालिकेने काय कारवाई केली?

ब) सदर कारखाने रविहाशी क्षेत्रात आहेत काय? रहिवाशी क्षेत्रात जिन्स कारखान्यांना परवानगी दिली जाते का?

उत्तर :–जिन्स कारखान्याबाबत स्वतंत्र नोंद नाही.

महानगरपालिकेचे व्यवसायासंबंधी प्रारुप उपविधी व नियमावलीस अदयापपर्यंत अंतिम मंजुरी मिळालेली नाही.

व्यापारी दराने प्रत्येक मालमत्ता निहाय माहिती प्राप्त करुन घेवून पुढील सभेपर्यंत सादर करण्यात येईल.

सविस्तर वापरण्यात येणारे केमिकल्स यांचा अंदाज नाही. अंदाजे डाईंग प्रिंटींगसाठी लागणारे केमिकल्स वापरले जातात. त्यांची सविस्तर माहिती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे मागणी केलेली आहे.

जिन्स कारखान्याबाबत व जिन्स कारखान्यापासुन होणा—या प्रदुषणाबाबत या विभागास एकुण २९ तक्रारी प्राप्त झालेलया असून सदर जिन्स कारखान्यांबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ अ अन्वये संबंधीत कारखानदारास नोटिस बजावण्यात आलेल्या आहेत.

जिन्स उदयोगातील काही घटक (उदा. शिलाई इत्यादी) हे रहिवास विभागात अनुज्ञेय आहेत. परंतु ज्या पासुन आजुबाजुचे नागरीकांचे आरोग्यास धोका होइल असे घटक अनुज्ञेय नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. महापौर व आयुक्त साहेब मी प्रश्न विचारला होता कॅम्प नं. १ ते ५ मध्ये किती जिन कारखाने आहेत. मला याचे उत्तर दिले की याची महापालिकेत स्वतंत्र नोंद नाही. आपल्याकडे नोंद ठेवली पाहिजे अथवा नाही.

<u>मा. आयुक्त :—</u>मा. महापौर महोदया, महापालिका क्षेत्रात जेवढया मालमत्ता आहेत त्या सर्व मालमत्तांची नोंद ठेवणे आवश्यक आहे. जेथे प्लान्ट व मशिनरी असते तेथिल स्वतंत्र नोंद ठेवणे आवश्यक असते. परंतु आपल्याकडे जी कर निर्धारण यादी उपलब्ध आहे. त्यामध्ये प्लान्ट व मशिनरीची विस्तृत माहिती उपलब्ध नाही. ब—याच वर्षापासुन अशी माहिती घेतली जात नाही. परंतु जेव्हा आम्ही सुधारीत कर निर्धारण करु त्यावेळी प्लान्ट व मशिनरी बाबत कर निर्धारण यादीत उल्लेख करु. त्यानंतरच आमच्याकडे माहिती उपलब्ध होवु शकते.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> दुसरे असे की, सदर कारखान्यांना महापालिकेने परवानगी दिली आहे काय? तर तुम्ही उत्तर असे दिले आहे की, महापालिकेने व्यवसाय संबंधी प्रारुप उपविधी व नियमावलीस अंतिम मंजुरी दिलेली नाही. मंजुरी मिळाली नाही म्हणजे कुठपर्यंत आलेली आहे.

<u>मा. आयुक्त :—</u>मा. महापौर महोदया, हा जो प्रश्न आहे त्याचे योग्य उत्तर आहे—नाही, जिन्सचे जे कारखाने आहेत त्यांच्या बांधकामांसाठी व ते सुरु करण्यासाठी महापालिकेकडुन कोणतीही परवानगी दिली नाही. त्याबाबतीत जो व्यापार परवाना दयायचा आहे तो देण्यासाठी जी उपविधी आपल्याकडे असायला हवी. ती मान्यतासाठी आम्ही सभागृहासमोर ठेवली होती. त्याला जवळपास ३ वर्ष झाले आहेत. परंतु अदयाप उपविधी बाबत अंतिम निर्णय झालेला नाही. तो अंतिम निर्णय झाल्यानंतरच परवाना देण्याबाबत निर्णय घेतला जावु शकतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> तिसरे असे की, संबंधीत जिन्सच्या कारखान्याची घरपट्टी व्यापारी दराने केलेली आहे का? तुम्ही लिहिले आहे व्यापारी दराने. जर तुमच्याकडे कारखान्याची नोंदच नसेल तर तुम्ही हे उत्तर कसे काय दिले आहे की व्यापारी दराने दिली आहे. हे उत्तर बरोबर आहे का?

<u>मा. आयुक्त :—</u> मा. महापौर महोदया, जे उत्तर दिले आहे ते बरोबर आहे. त्याचे कारण हे आहे की, जेव्हा आमच्याकडे मालमत्तेचे निर्धारण होते त्यावेळी निर्धारण घरगुती व बिगर घरगुती अशा प्रकारे केले जाते. जिनच्या कारखान्याचा वापर बिगर घरगुती प्रकारात मोडतो. औद्योगीक वापरात येतो. यामुळे या कारखान्यांना औद्योगीक अथवा बिगर घरगुती दराने आकारणी करण्यात आली आहे. परंतु किती मालमत्तांचे निर्धारण केले याची माहिती आमच्याकडे नाही. कोणत्या मालमत्तेत कोणती प्लान्ट व मशिनरी आहे याची माहिती आमच्याकडे नाही. ती माहिती घेवुनच आपणांस उत्तर देण्यात येईल असे आम्ही आमच्या उत्तरात दिले आहे.

मा. उपमहापौर, श्री. विनोद तलरेजा सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> पुढील महासभेत तुम्ही याची सविस्तर माहिती द्याल का? कधी द्याल? तुम्ही उत्तरात लिहिले आहे की, माहिती देवु.

<u>मा. आयुक्त :–</u> मा. महापौर महोदया, हे सुधारीत निर्धारणाचे काम एक महिन्याचे अथवा दोन महिन्याचे नसुन यासाठी आम्ही जी.आय.एस.तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी एका एजन्सीला नियुक्त करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला होता. त्याला स्थायी समितीने मान्यता दिली आहे. हे काम सुरु होण्यास कमीत कमी एक महिना लागेल. पुर्ण काम होण्यासाठी ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागु शकतो. त्यानंतरच आमच्याकडे ही माहिती उपलब्ध होवू शकते.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> जास्तीत जास्त कारखाने हे कॅम्प नं. ५ मध्ये गायकवाड पाडा व इतर ठिकाणी आहेत. तर त्या ठिकाणी सुधारीत पाहणी करण्यासाठी आपणांस मोठी यंत्रणा लागणार नाही. ४ माणसे नियुक्त केली तरी एका महिन्यात काम पुर्ण होवू शकते. यामुळे मी कमीत कमी १५ पत्रे दिली आहेत. तुमचे स्वच्छता निरिक्षक श्री. मोरे यांनी स्वत: पाहणी केली आहे. माझ्या प्रभागात या कारखान्यांच्या केमिकलच्या वासाने लोकांना अस्थम्याचा त्रास झाला आहे. नाल्यामध्ये सगळे केमीकलचे पाणी येते. यामुळे जलवाहिन्यादेखील गंजतात. घाण पाणी येते यामुळे आरोग्याला धोका होतो. हे मी आपल्या लोकांच्या निदर्शनास आणुन देखिल अजुनही त्यावर काहीही कारवाई केलेली नाही. नोटिस देवुन दोन अडीच महिन्याच्या वर झाले आहेत. फक्त नोटिस देणे एवढीच कारवाई करायची आहे का? आपण काय करु शकतो? फक्त नोटिस दिली म्हणजे आपली जबाबदारी संपली का? त्यानंतर त्याचा पाठपुरावा करुन ते कारखाने रहिवाशी क्षेत्रातुन बाहेर कसे जातील हे देखिल आपण बघायला हवे. आज मी आरोग्य खात्याला कमीत कमी १५ पत्रे दिले असतील. तुम्हीही वाचले आहेत. तुम्हांलाही दिले आहेत. त्यावर कारवाई काय केली? फक्त नोटिस! जिनचे जे कपडे आहे ते मोकळया जागेत जावुन पसरुन टाकतात. आमचे येथे एक कारखाना आहे तेथे कपडे सुकवतांना एक मुलगा वरुन पडला. दुस–याच्या खोलीत पडला. तेथे एक लहान मुलगा वाचला. हे कुठेतरी थांबले पाहिजे. नोटिस देवुन चालणार नाही. याच्यापुढे काय करणार? लोकांना आरोग्याला धोका आहे, माझ्या येथे अस्थमाचे रुग्ण वाढले आहेत. माझ्या येथे नाला आहे.

<u>मा. आयुक्त :–</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी सहमत आहे. आजपर्यंत जेवढया जिनच्या अनाधिकृत कारखान्यांबाबत तक्रार आली. त्यांना नोटिस दिल्यानंतर कारवाई होवू शकली नाही. परंतु त्याचे मुख्य कारण म्हणजे आपल्याकडे उपविधी असायला हवी. आपल्या प्रत्येक कृतीला कायदेशीर पाठींबा मिळायला हवा. तो नसल्याने जे सफल प्रयास व्हायला हवे ते होवू शकले नाहीत. उपविधी मंजुर झाल्यानंतर बीपीएमसी अॅक्ट मध्ये ज्या तरतुदी आहेत त्यांच्या आधारे पुढे जावुन कठोर पाऊले उचलली जातील. असे मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न व प्रश्नोत्तराचा कालावधी संपला. उल्हासनगर महापालिकेच्या सेवेत शासनातर्फे श्री. अनुदिप दिघे यांची मुख्य लेखा अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. कृपया व्यासपिठावर येवुन त्यांनी ओळख करुन दयावी.

<u>श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी :–</u> मा. महापौर, मा. उप–महापौर, सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य, मा. आयुक्त साहेब, उपस्थित सर्व अधिकारी व सर्व सज्जनांना मी अनुदिप श्रीनिवास दिघे विनम्रतापुर्वक अभिवादन करतो. सर्वप्रथम मी महाराष्ट्र शासनाचे व आपणा सर्वांचे आभार प्रकट करतो की ज्यामुळे मला येथे काम करण्याची संधी प्राप्त होत आहे. महोदया, मी मागील ७ वर्षापासुन शासन सेवेत आहे. ज्यापैकी दिड वर्ष मी मंत्रालय येथिल कोषागारात काम केले आहे. जे कार्यालय नरीमन पॉईंट मुंबई येथे आहे. मी मंत्रालय येथे कोषागारात त्यावेळी काम केले होते ज्यावेळी राज्य शासन एका फार मोठया आर्थिक संकटातुन जात होते. श्री. लोणारे साहेबांना याची माहिती आहे. मी आशा करतो की, तेथिल अनुभव येथे काम करतांना मला उपयोगी पडेल. सन २००५–०६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये आयुक्त साहेबांनी लिहिले आहे की, या महापालिकेला कर्जमुक्त करणे आमचे स्वप्न आहे. तसेच या महापालिकेचे स्वत:चे आर्थिक स्त्रोत देखील विकसीत करावे लागतील. प्रत्येक संस्थेला स्वत:चे उत्पन्नाचे स्त्रोत असायला हवे व ती सर्व प्रकारच्या कर्जापासुन मुक्त असायला हवी. मी या संधीचा फायदा घेवून सांगेन की, यासाठी मी पुर्णपणे बांधील असुन आयुक्तांचे उद्दीष्ट पुर्ण करण्यासाठी मी प्रयत्नरत राहिन. मी असे मानतो की,

लेखा विभागाचे काम हे आकडेमोड करणे नाही कारण हे आकडे शहरातील जनतेच्या इच्छा व आकांक्षेचे प्रतिक असतात. या आकडयांची पुर्ती करणे हे सर्व लोकप्रतिनिधी व अधिकारी यांचे कर्तव्य बनते. भविष्यात माझे प्रयत्न याच दिशेने राहतील. या महापालिकेचा मुख्य लेखा अधिकारी म्हणुन मी

एवढेच बोलेन की, या प्रयत्नात काही चुका झाल्यास त्या माझ्या असतील व जे यश प्राप्त होईल ते आपणा सर्वांचे असेल. धन्यवाद.

**मा. उपमहापौर, श्री. विनोद तलरेजा यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.**

मा. सचिव :— मागील महासभेत प्रशासनाच्या वतीने आयपीडी अहवाल सादर करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तो अहवाल आता आपल्या समोर सादर होत आहे. तसेच या सभेत ५ लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे आहेत........

**लक्षवेधी सुचना क्र. १**— सुचक :— श्री. धनंजय बोडारे, अनुमोदक :— श्री. बच्चाराम रुपचंदानी
**विषय** :— २६ व २७ जुलै रोजी उल्हासनगर शहरात आलेल्या पुराने लोकांचे जे हाल झाले, त्यासाठी प्रशासनाने काय तयारी केली आहे व यापुढे काय करणार आहे.

**लक्षवेधी सुचना क्र. २**— सुचक :— श्री. किशोर वनवारी, अनुमोदक :— श्रीमती मोना वनवारी
**विषय** :—महापालिकेतर्फे दारिद्रयरेषेखालील लोकांना कर माफी देण्यासाठी योजना केली होती. महापालिकेला यासाठी ९ हजार अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी फक्त काहीच लोकांना फायदा मिळाला आहे व इतर अर्जदार या फायदयापासुन वंचित आहेत. याला विलंब का होत आहे व कोणता अधिकारी यासाठी जबाबदार आहे. यासाठी ही लक्षवेधी सुचना आहे.

**लक्षवेधी सुचना क्र. ३**— सुचक :— श्रीमती जया साधवानी, अनुमोदक :— श्री. मोहन साधवानी
**विषय** :—मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ८५५ इमारतींवर कारवाई करायची आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाने नविन अनाधिकृत बांधकाम न होण्याबाबत देखिल आदेश दिले आहेत. तरीही काही अनधिकृत बांधकामे होत आहेत. त्यांच्या विरुध्द कारवाईची अपेक्षा आहे.

**लक्षवेधी सुचना क्र. ४**— सुचक :— श्री. दिलीप लालवानी, अनुमोदक :— श्री. शांताराम निकम
**विषय** :—दिनांक २६ व २७ जुलै रोजी आलेल्या पुरामुळे ब—याच लोकांची घरे तुटली आहेत. त्यांना घराशिवाय रहावे लागत आहे. यासाठी महापालिकेने काय उपाययोजना केली आहे. त्यांचे पुनर्वसन कशा प्रकारे केले जाईल.

**लक्षवेधी सुचना क्र. ५**— सुचक :— श्री. प्रभुनाथ गुप्ता, अनुमोदक :— श्री. लाल बिहारी यादव
**विषय** :— दिनांक २६ व २७ जुलै रोजी आलेल्या पुरानंतर शहरात आजार पसरण्याची शक्यता वाढली आहे. कुत्रे, उंदिर व डुक्कर यांच्यामुळे आजार पसरण्याची शक्यता आहे. महापालिकेकडे यासाठी काय उपाययोजना आहे यासाठी ही लक्षवेधी सुचना आहे.

पाचही लक्षवेधी सुचनांना प्रशासनाने लेखी निवेदन दिले आहे. ते आपल्याला दिले आहे. पुराच्या सबंधात श्री. धनंजय बोडारे व श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी लक्षवेधी सुचना दिली आहे. याच प्रकारच्या दोन लक्षवेधी सुचना आहेत. श्री. धनंजय बोडारे हे सुचक असलेल्या लक्षवेधी सुचनेस मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. याच आधारे दोन अन्य लक्षवेधी सुचना आहेत. त्यांचा एकाच लक्षवेधी सुचनेत समावेश करण्यात येईल. त्या सुचनांच्या सुचकाचे व अनुमोदकाचे नाव मी वाचले आहे. श्री. दिलीप लालवानी, श्री. शांताराम निकम व श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्री. लालबिहारी यादव. बी.पी.एल. योजनेसंदर्भात जी लक्षवेधी सुचना आहे, तीही मा. महापौरांनी स्विकृत केली आहे. श्रीमती जया साधवानी सुचक व अनुमोदक श्री. मोहन साधवानी असलेली लक्षवेधी सुचना मा. महापौरांनी अस्विकृत केली आहे. तरी देखिल त्यांना प्रशासनातर्फे लेखी निवेदन देण्यात आले आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>मा. महापौरजी, आपला हा अधिकार आहे आपण ही लक्षवेधी सुचना अमान्य करीत आहात. मी आपल्या अधिकारात हस्तक्षेप करत नाही. परंतु मी या शहराची निवडुन आलेली नगरसेविका आहे. माझ्यावर जेवढी जबाबदारी आहे त्यापेक्षा अधिक जबाबदारी आपणावर आहे.

मी आपणांस सांगु इच्छिते की, ५ तारखेला आम्ही यांना पत्र दिले आहे. आपण शहरासाठी फार चिंतेत आहात. आम्ही टीव्हीवर आपणांस ब—याचवेळा मुख्यमंत्री यांच्याशी व वकिलांशी भेटतांना बघितले आहे.

मला फार आनंद होत आहे की, आपण या शहरातील प्रथम नागरीक म्हणुन शहराचा विचार करीत आहात. त्या ८५५ कुटुंबांचा व दुकानदारांचा विचार करीत आहात. परंतु त्याचबरोबर मला दु:ख होत आहे की आपण अशा ज्वलंत विषयाला नाकारत आहात. मी आपणांस सांगु इच्छिते की, यांनी ही जी उत्तरे दिली आहेत ती चुकीची व दिशाभुल करणारी उत्तरे आहेत. मी आपणासमोर काही छायाचित्रे सादर करेन ५ तारखेला मी स्वत: यांना पत्र दिले आहे. मी स्वत: जागेवर पाहणी केली आहे. कदाचित यांच्या अधिका—यांच्या व माझ्या नजरेत फरक असेल. तो फरक आपण बघु शकता. मी आपणांस हे फोटो व मुव्ही दोन दिवसात आपणाकडे पाठवुन देईन. त्यानंतर आपण काय निर्णय घ्याल हे मी बघेन. त्याचबरोबर ५ व १५ तारखेच्या मध्ये, मला ५ तारखेचे जे उत्तर दिले आहे ते चुकीचे आहे. त्यानंतर अजुन १० अनाधिकृत बांधकामांची यादी माझ्या हातात आहे. आपण लक्षवेधी सुचना अस्विकृत केली आहे याचे मला दु:ख नाही. कारण मी एक साधारण नगरसेविका आहे व आपण या शहराच्या मा. महापौर आहात. ही जी १५ अनाधिकृत बांधकामे तयार होत आहेत त्यांना उत्तरदायी आपण असाल. त्या दुकानांमध्ये पुढे जावुन कुणी राहिल्यास त्यासाठी आपण जबाबदार असाल. मी शहरातील एक साधारण नागरीक असुन आपणावर आरोप करते की, आपण या अनाधिकृत बांधकामांवर अंकुश बसवावा व घर उध्दवस्त होवू देवु नका. मा. महापौरजी, उच्च न्यायालयाने जेव्हा ८५५ इमारतींबाबत आदेश दिले होते तेव्हा ब—याच लोकांना हार्ट अ‍ॅटेक आले होते. ब—याच लोकांचे नाते तुटले होते. पुर्ण समाजात आपल्या उल्हासनगरचे नाव कश्याप्रकारे घेतले जाते हे आपणांस चांगल्याप्रकारे ठाऊक आहे. आपण ८५५ बांधकामांसाठी जे प्रयत्न करीत आहात त्याला माझा विरोध नाही. परंतु आता जी बांधकामे सुरु आहेत मी त्याच्या विरोधात आहे. आपण यावर जरुर विचार करावा. माझा असा विश्वास आहे. आपण याकडे लक्ष द्याल असा विश्वास ठेवून मी येथुन सभात्याग करीत आहे.

**यावेळी मा. सदस्या श्रीमती जया साधवानी व मा. सदस्य श्री. मोहन साधवानी हे सभागृहाच्या बाहेर गेले.** 

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** मा. महापौरजी, हे जे चित्रीकरण सुरु आहे यासाठी आपण परवानगी दिली आहे काय? सचिव साहेब, हे जे चित्रीकरण सुरु आहे हे संपुर्ण दाखवायला हवे. हे फक्त थोडी—थोडी दृश्य दाखवत असतात. जर वृत्तवाहिनीसाठी चित्रीकरण सुरु असेल तर ते चुकीचे आहे. हे मधुनच चित्रीकरण करीत आहेत. एकतर यांनी सुरुवातीपासुन हे करायला हवे होते. पुर्ण महासभेचे कामकाज लोकांना दाखवायला हवे. आम्ही वारंवार यावर आक्षेप घेतो परंतु यावर कोणतीही कारवाई होत नाही. हे बंद करा अन्यथा आम्हांला या विरुध्द कारवाई करावी लागेल.

**<u>मा. महापौर :—</u>** पुढील बैठकीपासून संपुर्ण बैठकीचे चित्रीकरण करण्यात येईल.

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>** यापुर्वी देखिल आपण असेच आश्वासन दिले होते की संपुर्ण सभेचे कामकाज दाखविण्यात येईल.

**<u>मा. महापौर :—</u>** यापुर्वी मी असे बोलले नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> आपण असे बोलला होतात की पुर्ण चित्रीकरण दाखविण्यात येईल. त्यानंतर त्याने बंद केले होते.

<u>मा. महापौर :—</u> हे स्थानिक न्युज चॅनल आहे. परवानगी घेवून ते चित्रीकरण करीत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> ते याचा गैरवापर करीत आहेत. फक्त निवडक दृश्य दाखविले जातात.

<u>मा. महापौर :—</u> असे नाही आहे. जे आक्षेप घेतले जातात ते देखिल दाखविले जातात.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> सचिव साहेब, या आधीच्या कॅसेट्स आपल्या ताब्यात आहेत का?

<u>मा. सचिव :—</u> आहेत.

मा. सदस्या श्रीमती लक्ष्मीबाई ससाने, श्रीमती रेखा कृष्णानी सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> आहेत तर मग त्या दाखवा. आम्ही आजपर्यंत बघितले आहे की, पुर्ण सभेचे कामकाज दाखविले जात नाही. फक्त निवडक दृश्य दाखविली जातात. त्या चॅनलच्या चालकांना जे हवे आहे फक्त तेच दाखवतात. लोकांमध्ये चुकीचा संदेश जात आहे.

<u>मा. महापौर :—</u> ठिक आहे, पुढील बैठकीपासुन संपुर्ण कामकाज दाखविण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u>मा. महापौरजी, आता ज्या लक्षवेधी सुचना आल्या आहेत तर मला असे वाटते की, आमच्या सचिव साहेबांनी त्या अनुक्रमाने वाचुन दाखविल्या नाहीत. श्री. दिलीप लालवानी, श्री. शांताराम निकम व श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्री. लालबिहारी यादव यांच्या लक्षवेधी सुचना आधी आल्या आहेत. त्यांनी परवा दिल्या होत्या. मा. बोडारे साहेब व श्री. रुपचंदानी यांनी १७ तारखेला दिली आहे. माझी जी लक्षवेधी सुचना आहे ती ८—१० दिवसांपुर्वी दिली आहे. तिचा प्रथम क्रमांक आहे. आज मा. महापौरांना जे आवश्यक वाटले जसे पुरपरिस्थीतीनंतर काय उपाययोजना केली आहे व बी.पी.एल.ची योजना अशा लक्षवेधी सुचना त्यांनी मंजुर केल्या आहेत. त्यांना ज्या महत्वाच्या वाटल्या त्या त्यांनी स्विकृत केल्या आहेत. तो त्यांचा अधिकार आहे. परंतु आता आमच्या मा. सदस्या श्रीमती जया साधवानी हे ज्या बोलल्या त्याच्याशी मी सहमत नाही. जर अनाधिकृत बांधकाम होत असेल तर ती प्रशासनाची जबाबदारी आहे. जेव्हा महापौर परिषद असते तेव्हा देखिल ही जबाबदारी आयुक्त व उपायुक्तांची असते. त्या बोलल्या की यासाठी महापौर जबाबदार असतील तर यासाठी आम्ही जबाबदार असणार नाही. यासाठी उपायुक्त व आयुक्त जबाबदार असतील. यामुळे सभागृहात महापौरांना जबाबदार बोलणे हे योग्य नाही. यासाठी प्रशासन जबाबदार आहे. त्यांना जर तक्रार दयायची होती तर ते तक्रार प्रशासनाला देवु शकले असते. मा. महापौरांनी ज्या लक्षवेधी सुचना आवश्यक होत्या त्या घेतल्या आहेत. आज अनाधिकृत बांधकामांची लक्षवेधी एवढी महत्वाची नव्हती. पुराची व बी.पी.एल. योजनेची लक्षवेधी सुचना स्विकृत केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

<u>मा. सचिव :—</u> आजच्या सभेत आपणासमोर दोन विषय सादर केले आहेत. ते आपल्या माहितीसाठी दिलेले आहेत. कोकण विभाग क्षेत्रात राजीव गांधी प्रशासकिय गतिमानता अभियान या स्पर्धेत आपल्या विदयुत विभागाच्या गुणवत्तेमुळे प्रथम पुरस्कार उल्हासनगर महापालिकेस प्राप्त झाला आहे. ही गौरवास्पद बाब आहे. पुरस्काराचा रुपये ५० हजाराचा धनादेश व प्रमाणपत्र मा. आयुक्तांकडे आता आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u> मा. महापौरजी, या विषयासंबंधात आमची आपणांस एक विनंती आहे की, विदयुत विभागाचे अधिकारी श्री. मुकेश आयलानी यांना व्यासपिठावर बोलावुन त्यांचा सत्कार करावा.

<u>मा. महापौर :—</u>हा ५० हजाराचा धनादेश व हे प्रमाणपत्र आहे. कृपया सर्वांनी पहावे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>आयलानी साहेब व्यासपिठावर यावे.

यावेळी कार्यकारी अभियंता श्री. मुकेश आयलानी यांना व्यासपिठावर बोलावुन मा. महापौर व उप–महापौर यांनी सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन केले.

श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता (विद्युत):– महासभेला धन्यवाद, आमच्या सर्व नगरसेवकांना धन्यवाद! मी आपणांस सांगेन की, आपण हे विसरु नका, आजचा हा दिवस दिसण्यासाठी आपले आयुक्त साहेब यांनी देखील तेवढाच पाठिंबा व मेहनत केली आहे जेवढी मी केली आहे. कदाचित त्यांनी जास्तच काम केले असेल ज्यामुळे मी येथे आज उभा आहे. मी सर्वांना धन्यवाद देतो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– नाही, नाही त्यांनी आयुक्त साहेबांवे अभिनंदन केले आहे व आमच्या सभागृह नेत्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ते त्या विभागाचे प्रमुख आहेत म्हणुन परंतु आमचे असे म्हणणे आहे की, प्रशासन जे चालवितात ते आयुक्त साहेब चालवितात. म्हणुन आयलानी साहेबांनी सांगितल्या प्रमाणे यामध्ये त्यांचे योगदान फार मोठे आहे. प्रशासनाचा प्रमुख म्हणुन आयुक्त साहेबांचे मी अभिनंदन करतो. व उल्हासनगर महानगरपालिकेची दिवसेंदिवस अशीच प्रगती होत राहो अशी अपेक्षा करतो.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. विरोधी पक्ष नेता साहेब मी थोडी दुरुस्ती करु इच्छितो श्री. मुकेश आयलानी यांना स्टेजवर बोलविण्याचा श्री. राजु जग्याशी यांचा प्रस्ताव आहे . कदाचित आपण बरोबर ऐकले नाही.

मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता, श्रीमती रेखा कारीरा सभागृहातुन बाहेर गेल्या. 

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :– बिल्कुल, बिल्कुल मीच बोलाविले.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– याची आठवण मी का करुन दिली? पोखरकर साहेब आयुक्त असतांना श्री. दिलीप लालवानी यांनी श्री. सोनवणे साहेबांचे अभिनंदन केले होते. पोखरकर साहेबांना कमी लेखण्यासाठी म्हणुन मी पुन्हा आपणांस आठवण करुन देतो की, प्रशासनाचा प्रमुख म्हणुन त्यांचेच अभिनंदन करावयास पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– त्यांचे अभिनंदन केले जात आहे. कारण की, त्यांच्याच नेतृत्वाखाली प्रशासन चालत आहे. व पुर्णच्या पुर्ण श्रेय सेनापतीचे असते. म्हणुन श्री. आर.के. सोनवणे साहेबांना आम्ही शुभेच्छा देतो व अभिनंदन करतो.

मा. सचिव :– आणखी एक सुचना आपणांस प्रस्तृत केली आहे. ती आपल्या माहितीसाठी आहे. २६ व २७ जुलै रोजी जो पुर आला होता त्याचे या शहराने जे परिणाम भोगले त्यासाठी प्रशासनाच्या वतीने काय तयारी केली होती. कोण–कोणत्या सेवा दिल्या होत्या व यापुढील काय उपाययोजना आहे याबाबत शासनास एक अहवाल पाठविण्यात आला होता. ज्याची प्रत आपणा सर्वांना दिली आहे.

याशिवाय एक आयत्यावेळचा विषय आहे श्री. संदिप एम. वाल्मीकी यांचे निलंबन कायम करायचे आहे. कारण की, ऑगस्ट नंतर पुढील महासभेपर्यंत ठेवु शकत नाही. तोपर्यंत ६ महिन्याचा कालावधी समाप्त होवुन जाईल. त्या अगोदर निलंबन कायम होणे जरुरीचे आहे. ठिक आहे हा प्रस्ताव घेतला जावा? सर्व संमतीने?

मा. महापौर :–प्रशासनाच्या वतीने आणण्यात आलेला आयत्यावेळचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येत आहे तसेच स्विकृत केलेल्या दोन्ही विषयांवरील लक्षवेधी सुचना एकामागुन एक चर्चेस घेण्यात याव्यात.

मा. सचिव:–सुचना जी आहे जिचे सुचक आहेत श्री. किशोर वनवारी, अनुमोदक श्रीमती मोना वनवारी आपण आपली लक्षवेधी मांडा

## लक्षवेधी सुचना

**विषय :— बी.पी.एल. योजनेबाबत.**

सुचकाची नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव:— श्रीमती मोना वनवारी

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील असणा—या झोपडपट्टीतील रहिवाशांना करामध्ये सुट देण्याबाबत योजना महानगरपालिकेतर्फे राबविण्यात आली होती. त्यांच्याकडुन विविध स्वरुपात अर्ज भरुन मागील एक वर्षात घेण्यात आले होते. त्यामध्ये एकूण ९,००० रहिवाशांनी अर्ज महापालिकेकडे दाखल केले असून आजपर्यंत आपल्या विभागामार्फत कोणत्याही प्रकारची कार्यवाही न झाल्याने स्थायी समितीच्या मंजुरीसाठी कोणताही प्रस्ताव अदयापपर्यंत आलेला नाही. तरी या अर्जांवर योग्य ती कार्यवाही अदयापपर्यंत का होऊ शकली नाही त्यास कोणते अधिकारी जबाबदार आहेत व जबाबदार अधिका—यांवर कोणती कारवाई करणार आहात तसेच सदरचे अर्ज किती दिवसांत निकाली काढणार याची माहिती आगामी होणा—या दिनांक १८/८/२००५ रोजीच्या महासभेत स्विकारण्यात यावी ही विनंती.

---

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी, श्री. मोहन साधवानी सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, आज शहरामध्ये लोक या गोष्टीची चर्चा करतात की, महानगरपालिकेस नागरीकांना काही सवलत जरी दयायची असली तरी त्यासाठी वर्षाचा कालावधी लागतो. व जेव्हा एखादी सवलत काढुन घ्यायची असते तेव्हा नागरीकांच्या घरातुन सामानांची जप्ती केली जाते. आज महानगरपालिकेकडे वेळ नाही. कर्मचारी नाहीत. ही डयुटी लागली, ती डयुटी लागली. गरीबांच्या सुविधेसाठी काही नाही. आज मी श्री. कोळेकर साहेबांना धन्यवाद देतो की, जेव्हा ते उपायुक्त होते तेव्हा बी.पी.एल.च्या ६०० केसेसना मंजुरी मिळाली होती. आज ९६०० केसेस प्रलंबित आहेत. मागील वर्षी जेव्हा मिळकत कराची देयके काढत होते तेव्हा सांगितले गेले की, आपण काळजी करु नका. आपल्या मालमत्ता कराचे देयक अगोदर निघाले त्यानंतर आपला मिळकत कर माफ झाला आहे. आपली जी थकबाकी आहे ती घेतली जाणार नाही. आता पुढील महिन्यात जेव्हा पुन्हा ही बिले जातील तेव्हा पुन्हा हेच सांगितले जाईल, आपण चिंता करु नका यावर्षी सुध्दा आपणाकडुन थकबाकीची रक्कम घेणार नाही. आपणाकडुन फक्त एक वर्षाचाच मिळकत कर घेवु व बाकीचा माफ करु. हे किती दिवस चालत राहील. आज महापालिकेमध्ये बाकीचे प्रस्ताव स्थायी समितीपुढे येतात, महासभेमध्ये येतात, तात्काळ सभा बोलवा, हे करा, ते करा. या सर्व गोष्टींसाठी वेळ आहे. गरीबांना सवलती देण्यासाठी प्रशासनाकडे वेळ नाही. बी.पी. एल. स्कीम नुसार सवलत देण्यामध्ये सुध्दा बदल होत आहेत. पहिल्या वर्षी ज्या ६०० लोकांना ही सुविधा दिली. त्यांना सांगण्यात आले की, आपणाकडुन फक्त टॅक्सची रक्कम घेतली जाईल आता पुन्हा त्यामध्ये आणखी दोन—तीन गोष्टी समाविष्ट केल्या आहेत. नाही, नाही त्या ज्या ६०० केसेस मंजुर केल्या त्यामध्ये काही चूका होत्या, अमुक—अमुक हा कर त्यांच्याकडुन आपणांस घ्यावयास पाहिजे होता. हा कर घ्यावयास पाहिजे होता. अशा प्रकारे त्यामध्ये सुधारणा केल्या गेल्या. गरीबांना टॅक्स माफ करण्याच्या प्रस्तावामध्ये सुध्दा वेगवेगळया सुधारणा केल्या जात आहेत. ज्या ६०० केसेस मंजुर झाल्या त्यांना ज्या सुविधा दिल्या, त्यानंतर यावर्षी ज्या केसेस मंजुर होतील, त्यामध्ये दोन—तीन कर असे आहेत की ते त्या लोकांकडुन घेतले जातील व ते कर कधी वसुल होतील? कधी तहसिलदार कार्यालयात डयुटी आहे, कधी ८५५ इमारती संदर्भात डयुटी आहे. कधी पुर—परिस्थिती बाबत डयुटी असते. अशाप्रकारे कारणांवर कारणे सांगितली जातात. व गरीब बिचारे आस—यावर बसले आहेत. व त्यांना आता असे वाटु लागले आहे की,


महानगरपालिका आमची मस्करी तर करत नाही ना? जर सुविधा दयायच्या असतील तर दयाव्यात. दयायच्याच नसतील तर ही योजनाच चालु करावयास नको होती. बजेटच्या मिटींगमध्ये आम्ही १०० वेळा याबाबत बोललो आहोत. दारिद्रय रेषेखाली जेवढे काही लोक आहेत त्या सर्वांचा कर माफ केला जाईल. मा. महापौरजी, ९ हजार ६०० केसेस चा हा प्रस्ताव स्थायी समितीपुढे केव्हा येईल? यासाठी प्रशासनास कधी वेळ मिळेल? प्रशासन झोपेतुन कधी जागे होईल? तर याचा खुलासा झाला पाहिजे व हया ९ हजार ६०० केसेस पास करण्याबाबत कालमर्यादा निश्चित केली पाहिजे की हे केव्हा पर्यंत होईल? आता पुन्हा सप्टेंबर–ऑक्टोंबर मध्ये बिले निघतील. त्यामध्ये सुध्दा थकबाकी दर्शविली जाईल. आज ही जी लक्षवेधी मी मांडली आहे ती माझ्या स्वत:साठी किंवा वैयक्तीक स्वार्थासाठी मांडलेली नसुन ती जनतेच्या हितासाठी मांडलेली आहे. उल्हासनगर मधील जनतेस आम्हांला उत्तर दयावे लागते. व आम्ही तिरकस उत्तरे देत नाही. जनतेला सरळ उत्तरे देतो. तर ज्या लोकांना कर माफ कधी केला जाईल? आम्ही आमच्या प्रभागामध्ये कधी सांगु शकु की आपला कर माफ होईल. तर अमुक–अमुक हा कर आपणाकडुन वसुल केला जाणार होता परंतु तो आता वसुल केला जाणार नाही याचाही खुलासा झाला पाहिजे. मागील वर्षी ६०० केसेस मध्ये जो निर्णय घेतला होता तोच निर्णय याबाबतीत झाला पाहिजे. काय यावर्षी एक–दोन कर आकारुन कर माफी केली जाईल? आणि हे कधी होईल?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, स्थायी समितीमध्ये बी.पी.एल. स्कीमनुसार जे प्रस्ताव पारीत झाले आहेत त्यातील एक मिटींग ३१/७/२००४ रोजी झाली, त्यामध्ये १९ केसेस मंजुर झाल्या. एक सभा ४/८/२००४ रोजी झाली, त्यामध्ये २४ केसेस मंजुर झाल्या. एक सभा ११/८/२००४ रोजी झाली, त्यामध्ये १०३ केसेस मंजुर झाल्यात व एक सभा २१/८/२००४ रोजी झाली, त्या सभेत ३७६ केसेस मंजुर झाल्या. २१/८/२००४ व आज १८/८/२००५ आहे फक्त तीनच दिवस कमी आहेत , एक वर्ष पुर्ण होत आहे. म्हणजेच ३६५ दिवस गरीबांच्या प्रश्नावर विचार करण्यास आम्हांला वेळ मिळाला नाही. बी.पी.एल. स्कीमनुसार आम्ही त्या गोर–गरीब लोकांना कर माफीचे वचन दिले होते. ज्यांच्या घरामध्ये खाण्यासाठी काही नाही, ते लोक कर भरु शकत नाहीत, ज्यांच्या शरीरात रक्तच नाही, त्यांच्या शरीरातून रक्त कसे काढता येईल? म्हणुनच तर ही स्कीम लागू केली होती व ही स्कीम जेव्हा लागू केली तर प्रथम १९, त्यानंतर २४, त्यानंतर १०३, व त्यानंतर ३७६ अश्या प्रकारे केसेस वाढत गेल्या. त्यानुसार आम्हांला असे वाटू लागले की, तो दिवस आता काही दूर नाही. या ज्या नऊ हजार, साडे नऊ हजार केसेस आहेत त्यांच्यावरही लवकरच निर्णय होईल. परंतु या ३६५ दिवसानंतरही ती वेळ आली नाही. त्याची कारणे भलेही बरीचशी असतील व ती वाजवीही असू शकतील. परंतु जेव्हा देशामध्ये युध्द होते, सरहद्दीवर युध्द चालु असतांना देशभरात बाकीची कामे सुरळीतपणे चालु असतात. जर उच्च न्यायालयाचा आदेश आला, पुर आला, असे काहीही झाले तरी ५–६ कर्मचारी स्वतंत्रपणे याकामासाठी लावून गोर–गरीब लोकांना न्याय देण्यासाठी हे काम केले जावु शकत होते. यानंतरही ज्या लोकांनी कर विभागामध्ये यासाठी अर्ज केले अशा लोकांच्या घरी जावुन जप्तीचे वारंट सुध्दा काढण्यात आले. म्हणुन कित्येक लोकांनी आपले दाग–दागिने गहाण ठेवून, विक्री करुन किंवा दुसरीकडुन कर्ज उभारुन महानगरपालिकेच्या जप्तीपासुन वाचण्यासाठी कराची रक्कम भरली अशा लोकांना काय आपण त्यांनी भरलेली कराची रक्कम परत करणार आहोत? सांगितले जाते की, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब असल्यामुळे सक्तीची पावले उचलावी लागली. तर या योजनेनुसार कर माफीसाठी जे अर्ज केले होते त्यांना होणा–या कर्ज माफीची रक्कम वगळून उर्वरीत रक्कम त्यांच्याकडुन वसुल करावयास पाहिजे होती. जोपर्यंत त्या अर्जांवर अंतिम निर्णय होत नाही परंतु असे होवू शकले नाही. म्हणुन अशा लोकांवर न्याय झाला पाहिजे. शासन, प्रशासनाने बी.पी.एल. स्कीमच्या अंमलबजावणीमध्ये जो विलंब केला आहे, भलेही विलंब झाला आहे परंतु यापेक्षा अधिक विलंब झाल्यास तो गरीबांवर अन्याय झाल्या सारखा होईल. असे होवू नये म्हणुन या गोष्टीकडे लक्ष दिले जावे. याशिवाय जर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खराब असेल तर याअगोदर कित्येक वेळा आम्ही सुचना केल्या आहेत, जसे की, शहरामध्ये लग्नाचे कित्येक हॉल आहेत, लॉन्स आहेत, पोस्ट ऑफिस, ए.टी.एम., सिनेमागृह, हॉटेल, लॉजिंग, बोर्डींग, रेस्टारंट व बियर बार आहेत जे भाडयावर चालत असतांनाही त्यांच्याकडुन भाडयाच्या हिशोबाने कर आकारणी वसुल केली जात नाही. माझ्या लक्षात येत नाही की, महानगरपालिकेचे अधिकारी / कर्मचारी गोर–गरीब लोकांच्या दरवाज्यांवर जप्तीचे वारंट घेवून जातांना, महानगरपालिकेचा खजाना खाली आहे, तो काय फक्त गोर–गरीबांची जप्ती काढुन भरला जावु शकतो? किंवा ज्या लोकांनी खरोखरच टॅक्सची चोरी केली आहे, ज्यांच्याशी कर विभागाचे काही कर्मचारी किंवा अधिकारी यांनी संगनमत केले आहे, अशा लोकांकडुन टॅक्स वसुल केला पाहिजे. वारंवार मागणी केल्यानंतर, आवाज उठविल्यानंतर, लेखी दिल्यानंतरही त्यावर

प्रशासनाने योग्य ती कार्यवाही केली नाही. व गोरगरीब लोकांवर जप्तीचे वारंट बजावले. यासाठी असे कित्येक वाद आहेत, ज्यांच्याबाबतीत शासनाने स्पष्टीकरण दिले पाहिजे व जे ९ हजार अर्ज बी.पी.एल. स्कीमनुसार आलेले आहेत त्यांच्याबाबतीत चौकशी करुन स्पष्ट केले पाहिजे की, कोण या स्कीमचा फायदा घेण्यास पात्र आहे व कोण नाही. जर बी.पी.एल. स्कीमनुसार एखादा नागरीक पात्र नसेल तर आपण त्यास सांगु शकता की, आपला टॅक्स माफ होवू शकणार नाही. परंतु जे पात्र आहेत, त्यांचा टॅक्स माफ झाला पाहिजे. याशिवाय आपण ही जी यादी दिली आहे त्यामध्ये सर्वप्रथम ज्या १९ केसेस मंजुर झाल्या आहेत, त्यामध्ये उल्हासनगर कॅम्प १ येथिल फक्त एकच केस मंजुर झालेली आहे. कॅम्प २ मधील एक सुध्दा केस मंजुर झालेली नाही. २४ ची जी यादी आहे त्यामध्ये कॅम्प नं. १ मधील फक्त दोनच केसेस मंजुर झालेल्या आहेत व कॅम्प नं. २ मधील फक्त ५ केसेस मंजुर झालेल्या आहेत. १०३ ची जी यादी आहे त्यामध्ये कॅम्प नं. १ मधील फक्त ७ केसेस मंजुर झालेले आहेत. व कॅम्प नं. २ मधील फक्त ९ केसेस मंजुर झाल्या आहेत. ३७६ ची यादी दिली आहे त्यामध्ये कॅम्प नं. १ मधील फक्त ८ केसेस मंजुर झाल्या आहेत. व कॅम्प नं. २ मधील फक्त १५ केसेस मंजुर झाल्या आहेत. तर काय कॅम्प नं. १ व २ मध्ये गोरगरीब लोक नाहीत? यांचे प्रमाण एवढे कमी का आहे? का अशा प्रकारचा भेदभाव केला गेला? आपण जर लक्षपुर्वक पाहिले तर असे दिसुन येईल की, काही मोजक्या नगरसेवकांकडे, मोजक्या प्रभागांकडे लक्ष दिले गेले. तर गोरगरीबांवर एक सारखाच न्याय झाला पाहिजे, एकाच दृष्टीकोनातुन झाला पाहिजे. गरीब, गरीबच आहे भलेही तो शहरातील कोणत्याही विभागामध्ये राहणारा असो. तर मी असे म्हणेन की, बाकीच्या ज्या केसेस आहेत त्यांच्या बाबतीत पाचही कॅम्पामध्ये एक सारखाच न्याय झाला पाहिजे. व त्यांना लवकरात लवकर मंजुरी दिली जावी, धन्यवाद, जय हिंद!

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, बी.पी.एल. स्कीम नुसार माझ्या प्रभागातील चिंतामण पांडुरंग अधिकारी यांनी दिनांक ५/८/२००४ रोजी अर्ज केला होता, त्यांनी १०—१५ वेळा महापालिकेत येवून चौकशी केली असता त्यांना असे सांगण्यात आले की, आपला अर्ज गहाळ झाला आहे. त्यांच्या त्या अर्जाची पावती माझ्याकडे आहे. त्याला सांगण्यात आले की, आपण दुसरा अर्ज करा. तर त्याने दुसरा अर्ज दिनांक १३/१२/२००४ रोजी केला. त्यानंतर सुध्दा त्याने १०—१५ वेळा महापालिकेत फे—या मारल्या. त्यानंतरही पुन्हा त्यांना सांगण्यात आले की, आपला अर्ज पुन्हा गहाळ झाला आहे. तर बी.पी.एल. स्कीमनुसार टॅक्स माफ करुन घेण्यासाठी एका माणसाने ५०—५० वेळा महापालिकेत यावे? यानंतर पुन्हा त्यांनी मा. महापौरांना अर्ज लिहिला आहे की, बी.पी.एल. स्कीम नुसार टॅक्स माफीसाठी मी दोनवेळा अर्ज दिले आहेत. त्यांच्या शिधा वाटप पत्रिकेवर १२ हजाराचे उत्पन्न दर्शविले आहे. व माझ्या प्रभागातील ही केस आहे. एवढा निष्काळजीपणा आपल्या प्रशासनामध्ये आहे. आपण यावर योग्य ती कार्यवाही करावी. व माझ्या प्रभागातील ही एकच केस आहे त्यांना न्याय दिला जावा.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब, मुळातच बी.पी.एल.स्कीम जेव्हा लागु करण्यात आली त्यावेळेस नेमके प्रशासनाने सर्व लोकांना कामाला लावल, सर्व जनतेला कामाला लावल, जनतेला, सत्यप्रतिज्ञापत्र करण्याचा खर्च, जनतेला, फॉर्म भरण्याचा खर्च, हा सर्व खर्च, जो दारिद्रय रेषेखालील व्यक्ती दिवसाला १०—१५ रुपये कमावतो. त्या माणसाला हा भुर्दंड त्यावेळेस सहन करावा लागला त्यावेळेस मिटींग झाली असतांना मी सुचना केली होती की आपल्या संपुर्ण शहरामध्ये महानगरपालिकेच्या दस्तऐवजांमध्ये ११ हजार दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याची नोंद आहे. यामध्ये कमी—जास्त असु शकेल. ११ हजार दारिद्रय रेषेखालील व्यक्तींची नोंद आहे. मी मागणी केली होती, बी. पी.एल. अंतर्गत पुन्हा सर्व्हे करण्यांत यावा जणेकरुन जे—जे दारिद्रय रेषेखालील व्यक्ती आहेत त्यांचा संपुर्ण सर्व्हे केल्यानंतर त्यांचा टॅक्स तेथल्या तेथे माफ करण्यात आला असता, तर मला वाटते आजचा हा जो आकडा आहे तो येथे राहिला नसता. आणि माझी अशी मागणी आहे की बी.पी.एल. स्कीमच्या अंतर्गत दारिद्रय रेषेखालील व्यक्तींचा पुर्ण शहरामध्ये सर्व्हे करण्यात यावा. त्या लोकांचा टॅक्स तिथल्या तिथे माफ करण्यात यावा त्यासाठी सर्व्हे करण्याचा किंवा त्या लोकांनी सत्यप्रतिज्ञापत्र लिहून देण्याचा काही प्रश्न राहणार नाही. त्यांचाही पैसा वाचेल, वेळ वाचेल, धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती मालती करातिया सभागृहातुन बाहेर गेल्या.** 

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> या विषयावर अधिक काही न बोलता मी एक—दोन बाबींवर बोलु इच्छितो. या विषयाबाबत जर मी बोलायचे झाले तर रस्ता लहान, फुटपाथ मोठा, काम कमी दिखावा जास्त, निपटारा

५२६ केसेसचा, प्रलंबित केसेस साडे नऊ हजार, ९,६४७/– . एक सेकंद मी यावर बोलेन की, हे जे काम आहे विहित मुदतीत पुर्ण झाले पाहिजे. व मला असे वाटते की, आयुक्त साहेब येथे सांगतील की हे काम किती दिवसात पुर्ण केले जाईल ते?

<u>मा. आयुक्त :–</u> मा. महापौर महोदया, वसुल न होण्याजोगी रक्कम आहे, ती निर्लेखित करण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमात जी तरतुद करण्यात आली आहे ती १९४९ मध्ये करण्यात आली आहे. १९४९ च्या कायदयानुसार, जेव्हा येथे नगरपालिका होती, नगरपालिकेच्या कायदयात सुध्दा अशीच एक तरतुद करण्यात आली होती. उल्हासनगरमध्ये नगरपालिका १९६० मध्ये स्थापन झाली व महानगरपालिका १९९६ मध्ये झाली. एवढे वर्ष झाल्यानंतर सुध्दा कधीही गरीबांचा कर माफ करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये ना कधी कोणत्याही प्रशासनाने आणला होता, ना कोणत्याही लोकप्रतिनिधी मार्फत आणण्यात आला होता. मागच्या वर्षी जेव्हा मिळकत कराच्या वसुली बाबत आम्ही माहिती घेत होतो तेव्हा आढळुन आले की, या शहरामध्ये असे बरेचसे लोक आहेत ज्यांच्याकडे ना काही मिळकत आहे, त्यांनी जो काही निवारा, घर तयार केले आहे त्याचा टॅक्स वर्षानुवर्षे येत आहे. तो भरण्यासाठी ना काही पैसा आहे, यासाठी स्थायी समितीपुढे एक प्रस्ताव ठेवून एक निर्णय घेतला होता त्या निर्णयानुसार जे अर्ज आले जवळ–जवळ नऊ हजारपेक्षा जास्त अर्ज आमच्याकडे आलेत. मागील वर्षी काही अर्जांची छाननी करुन जे अर्ज पात्र ठरले ते स्थायी समितीसमोर ठेवून त्यांचा टॅक्स माफ केला परंतु त्यातील दोन कर माफ करण्याचा अधिकार महापालिकेला नाही. शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर हे दोन्ही कर त्या लोकांनी भरावयास पाहिजे होते. आम्हांला असे वाटले होते, महानगरपालिकेचा टॅक्स माफ केल्यानंतर शासनाचा जो टॅक्स आहे, ते २ टॅक्स हे ६०० लोक भरतील. परंतु तसे झाले नाही. महानगरपालिकेचे टॅक्स तर माफ झाले परंतु शासनाच्या टॅक्सची जी थकबाकी आहे, ती तशीच राहिली आहे. हे जेव्हा लक्षात आले तेव्हा यावर्षी १ एप्रिल नंतर, आमच्याकडे जेवढे काही अर्ज आले होते त्यांना सांगण्यात आले आहे, जे शासनाचे टॅक्स आहेत जे महानगरपालिका माफ करु शकत नाही, ते टॅक्स आपण भरा. त्यानंतरच महानगरपालिकेचे टॅक्स माफ केले जातील. परंतु दुर्भाग्याने कोणताही मिळकतदार शासनाचे टॅक्स भरण्यास पुढे आला नाही. व हेच एक मुख्य कारण आहे, ज्यामुळे आपणांस प्रलंबित अर्जाची संख्या फार मोठी असल्याचे दिसुन येत आहे. आम्ही काही नगरसेवकांना सुध्दा सांगितले की, आपण आपल्या प्रभागातुन जेवढे काही अर्ज आले आहेत, त्या सर्वांना आवाहन करा की आपण शासनाचे टॅक्स भरा, त्यानंतर आपले महानगरपालिकेचे टॅक्स माफ केले जातील. त्या आवाहनाला सुध्दा काही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतरही आज प्रशासनावर येथे आरोप केला जात आहे की, निर्णय घेण्यामध्ये पक्षपात झाला आहे किंवा विलंब झाला. जे अर्ज आमच्यासमोर आले आहेत, त्यावर एकतर विचारपुर्वक निर्णय घ्यायचा आहे, जे दारिद्रय रेषेखाली येत नाहीत अशा लोकांनीही तहसिलदाराकडुन उत्पन्नाचा दाखला आणला आहे व अर्ज केले आहेत त्यांच्या बाबतीत चौकशी अंती आम्हांला माहिती मिळाली आहे त्यानुसार आम्ही त्यांना हा लाभ देवु शकणार नाही. परंतु जे लोक या योजनेनुसार पात्र आहेत, त्या लोकांनी जर शासनाचे टॅक्स भरले तर मी या सभागृहास आश्वासन देतो की, २ महिन्याच्या आतच जे पात्र लोक आहेत त्या सर्वांच्या अर्जावर निर्णय घेतला जाईल व स्थायी समितीपुढे ठेवले जातील. प्रशासनाकडुन विलंब झाला हा आरोप करण्याअगोदर आपण हे सुध्दा पाहावयास पाहिजे होते की, करदात्यांची जी जबाबदारी आहे, त्याने सुध्दा आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे फक्त अर्ज केला ही त्यांची जबाबदारी नाही. शासनाचे टॅक्स भरणे ही सुध्दा त्यांची जबाबदारी आहे त्यांच्या जबाबदारीची जर त्यांना जाणीव करुन दिलीत तर आम्ही आपणांस आश्वासन देतो दोन महिन्यात प्रत्येक अर्जावर निर्णय होईल. व जे पात्र आहेत त्यांच्याबाबतीत त्वरीत निर्णय होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, ज्या लोकांकडे शिक्षण उपकर व चालु वर्षाचे करांची बाकी असेल ते जर भरत असतील तर त्यांचे कर माफ केले जातील, तर मग काय त्यांनी अडवान्समध्ये कर भरायचे काय? जर कुणाकडुन करापोटी १० हजार रुपये येणे बाकी आहे, त्याचे वर्षाचे कराची रक्कम ६०० रुपये असते व ८०० रुपये शिक्षण कर व दुसरे कर असतात, एकुण १४०० रुपयाचे बिल पाठविले तर कुणीपण भरेल ना? याबाबत आज ते लोक वाट पाहत आहेत की आमची थकबाकीची जी रक्कम आहे ती जेवढी काही माफ करता येण्यासारखी असेल ती करा. शासनाचा शिक्षण उपकर, रोजगार हमी उपकर व चालु कर मागणी रक्कम याचे आज आपण आम्हांस बिल पाठविले तर आम्ही भरण्यास तयार आहोत. परंतु आज मिळकत दाराकडे जे बिल पाठविले जाते ते मागील थकबाकीसह रोजगार हमी उपकर व शिक्षण उपकरासह चालु मागणी या सर्वांमिळुनचे, तर त्या लोकांना सांगितले जाते की, आपण प्रथम शिक्षण उपकर, रोजगार हमी उपकर सह चालु बिलाची रक्कम भरा. दोन महिन्यानंतर आपला उर्वरीत कर माफ होईल हे

चूकीचे आहे. सर्वप्रथम आम्ही ९ हजार ६०० लोकांचा कर माफ केला पाहिजे आज सुध्दा त्यांना १० हजाराच्या आसपासची बिले पाठविली जात आहेत. यातील ९ हजार रुपये वजा करुन शासनाचे जे कर आहेत ते व चालु वर्षाचे जे कराचे बिल आहे ते भरण्यास ते लोक तयार आहेत. अडव्हान्स मध्ये कुणीही कर भरण्यास पुढे येणार नाही कारण की ते लोक गरीब आहेत. मेहरबानी करुन दोन महिन्याच्या आत त्यांचा कर माफ केला जावा व याबाबत आपण आदेश दयावेत, दोन महिन्याचे आत त्यांच्या कराची रक्कम माफ केली जावी. शासनाच्या करांची रक्कम व चालु वर्षाच्या करांची रक्कम भरण्यास ते लोक तयार आहेत.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :—</u> मा. महापौरजी, मी सभागृहास एक सुचना करु इच्छितो की, जेव्हा माझ्या प्रभागामध्ये कर वसुलीबाबत एक कॅम्प आयोजित केला होता त्यावेळेस मी आरोटे साहेबांशी संपर्क केला होता. त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की, २ करांची रक्कम भरणे आवश्यक आहे. तर माझ्या प्रभागातील ज्या लोकांकडे दारिद्रय रेषेअंतर्गत कर माफीसाठी अर्ज केल्याबाबतची पावती/टोकन क्र. होता. अशा लोकांना बाकीच्या कराची रक्कम भरण्यास न लावता शासनाचे दोन करांच रक्कम भरुन त्यांना त्याच ठिकाणी टॅक्स पावती देण्यात आली. ही माहिती मी याठिकाणी देवू इच्छितो.

<u>मा. महापौर :—</u> यापुढेही जावुन मी असे सांगु इच्छिते की, जे लोक पुरग्रस्त आहेत, ज्यांच्या घरामध्ये पुराचे पाणी आले होते जे कराची रक्कम भरण्यास सक्षम नाहीत, व ज्यांच्या घराचे पंचनामे झाले आहेत त्यावरुन हे सिध्द होते की, हे पुरग्रस्त लोक आहेत, अशा लोकांचा एक वर्षाचा कर माफ केला तर खुप चांगले होईल. अशा प्रकारचा प्रस्ताव प्रशासन आणेल.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, अशा प्रकारचा विचार दुस—या महानगरपालिकांनी केला आहे. ठाणे महानगरपालिकेने सुध्दा केला आहे. व आमची सुध्दा अशीच मागणी आहे की, हे झाले पाहिजे.

<u>मा. सचिव :—</u>दुसरी लक्षवेधी सुचना जी आहे तीचे सुचक आहेत श्री. धनंजय बोडारे, अनुमोदक आहेत श्री. बच्चाराम रुपचंदानी, या सुचनेबरोबर श्री. दिलीप लालवानी, श्री. शांताराम निकम, श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्री. लालबिहारी यादव हे सुध्दा सहभागी होवू शकतात.

---

## <u>लक्षवेधी सुचना</u>

**विषय** :— दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्यश अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीनंतर निर्माण झालेल्या समस्या बाबत त्याचा जनजिवनावर झालेल्या विपरित परिणाम तसेच भविष्यात उद्भवणा—या परिस्थितीवर मात करणेसाठी चर्चा करणेसाठी लक्षवेधी सुचना.

सुचकाची नाव :—श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव:— श्री. बच्चाराम रुपचंदानी

सदर लक्षवेधर सूचनेनुसार सभागृहाचे लक्षवेधु इच्छितो की, दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली पुरस्थिती व नंतर निर्माण झालेल्या समस्या त्यांचा जनजिवनावर झालेला विपरित परिणाम तसेच भविष्यात उद्भवणा—या समस्या व परिस्थितीवर मात करणेसाठी चर्चा करणेत यावी ही विनंती.

---

## लक्षवेधी सुचना

सुचकाची नाव :—श्री. दिलीप लालवानी

अनुमोदकाचे नाव:—श्री. शांताराम निकम

दिनांक २५/७/२००५ पासून अतिवृष्टीमुळे उल्हासनगर शहरात पुराचे पाणी झोपडपट्टी, घरे, दुकाने, गोडावून, गॅरेज व इतर विभागात मोठया प्रमाणात पुराचे पाणी शिरल्याने झोपडपट्टी, घरे, दुकाने, गोडावुन, गॅरेजांचे पूर्णत: बांधकामे निष्कासित होवुन असे रहिवाशी उघडयावर जीवन जगत आहेत. अशा रहिवाश्यांच्या झोपडपट्टी, घरे, दुकाने, गोडावून, गॅरेज पुनर्ववसनाबाबत आपल्या महापालिकातर्फे कोणतीउपाययोजना अथवा बांधकाम परवानगी देण्याबाबत कोणती भूमिका आपण घेणार आहेत याची माहिती आगामी होणा—या दिनांक १८/८/२००५ च्या महासभेमध्ये चर्चा होण्याकीरता ही लक्षवेधी मांडत आहेत.

---

## लक्षवेधी सुचना

सुचकाची नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

अनुमोदकाचे नाव:—श्री. लालबिहारी यादव

दिनांक २५/७/२००५ पासुन अतिवृष्टीमुळे उल्हासनगर शहरात रोगराई पसरु नये या संदर्भात मा. आयुक्त दुरदर्शनावर नागरीकांना जाहिर आव्हान करीत आहात की, कुत्रा, डुक्कर, उंदिर यांच्या दंशाने लेप्टोपॉरोसेस, डेंग्यु सारखा आजार उध्दभवू शकतो. तरी या संदर्भात उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे कोणती उपाययोजना आपण राबवली आहात किंवा राबविणार आहात. याची येणा—या महासभेत दिनांक १८/८/२००५ रोजीच्या महासभेमध्ये चर्चा होण्याकरीता ही लक्षवेधी मांडत आहेत.

---

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** २६ व २७ तारखेला अतिवृष्टीमुळे पुर उल्हासनगरमध्येच नाही तर संपुर्ण महाराष्ट्रात आला. ही पुरपस्थिती ज्या पध्दतीने प्रशासनाने हाताळली त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन. आयुक्त साहेब व त्यांच्या संपुर्ण पथकाने ज्या कर्तव्य भावनेने काम केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. उल्हासनगरमधील नागरीक आणि लोकप्रतिनिधी यांची सुध्दा हीच भावना आहे, प्रशासनाने हाताळलेल्या परिस्थितीबाबत त्यांचे अभिनंदन २६ व २७ तारखेला नियतीने जो कहर केला या दोन दिवसामध्ये किंवा त्यानंतर २८ तारखेपर्यंत प्रशासनाबाबत लोकांना उदासिनता वाटत होती. प्रशासनाबाबत तिव्र नाराजी होती. कित्येक ठिकाणी प्रशासनाचे अधिकारी पोहचू शकले नव्हते. ज्या दिवशी जरुरत होती, त्या दिवशी उल्हासनगरमधील लोकांनी, उल्हासनगर मधील लोकांना मदत केली, एका नागरीकाने दुस—या नागरीकाला वाचविले ही लोकांची भावना होती. प्रशासनाचे अधिकारी तेथे पोहचू शकले नाहीत. काही ठिकाणी पोहचले तर काही ठिकाणी पोहचू शकले नाही, याचे कारण काय होते यावर पुढे चर्चा करुच. सुरुवातीच्या दोन—तीन दिवसामध्ये नागरीकांची प्रशासनावर जी नाराजी होती ती नाराजी त्यानंतर प्रशासनाने केलेल्या कामामुळे दुर झाली. परंतु नैसर्गीक कोप, नैसर्गीक आपत्ती येते. त्यातुन बाहेर येण्यासाठी पहिल्या पासुन उपाययोजना असणे आवश्यक आहे. त्यादिवशी जी परिस्थिती होती अशी परिस्थिती यापुर्वी कधीही नव्हती. व भविष्यात कधी अशी होवू नये अशी मी परमेश्वराला प्रार्थना करतो. परंतु असे होणार नाही याची शाश्वती नाही. २६ व २७ तारखेच्या दरम्यान ज्या अडचणी आल्या त्या यापुढे येवु नयेत, परमेश्वराने आपणा सर्वांचे प्राण वाचविले परंतु यापुढे जर असे काही झाले तर उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे, जसे आम्हांस आता जे निवेदन

वाटप केले आहे त्यामध्ये आयुक्त साहेबांनी लिहिले आहे की, जिल्हाधिका–यांनी बोट उपलब्ध करुन दिली आहे. यापुढे अशा आपत्तीवर मात करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेकडे अशा प्रकारची व्यवस्था असली पाहिजे. लाईफ जॅकेट सुध्दा असले पाहिजे. कार्यकर्ते आपल्या जिवावर उदार होवून पाण्यामध्ये उतरत होते. त्यांच्याकडे ना लाईफ जॅकेट होते ना बोट होती. काही टयुब मागविले, दोर मागविले आणि त्यावर शेकडो लोकांना पाण्यातुन बाहेर काढले. खन्ना कंपाउंड , शांतीनगर, विठ्ठलवाडी, सी–ब्लॉक, सम्राट अशोक नगर, रेणुका नगर, आर्शिवाद कॉलनी, बंजारा कॉलनी, अशा ब–याचशा ठिकाणी लोकांनी लोकांची मदत केली. तर यापुढे यासाठी प्रशासनाने तयारी केली पाहिजे. पुर येवु शकतो किंवा नाही परंतु आपण तयारीत राहिले पाहिजे. आता त्यानंतर जे साथीचे रोग पसरले आहेत, आयुक्त साहेब, आपण जे निवेदन दिले आहे, त्यातील सर्व माहिती अदयावत आहे काय? कारण की, माझ्या माहिती नुसार खाजगी रुग्णालयामध्ये सुध्दा लोक दाखल झालेले आहेत. त्यांची माहिती येथे दिलेली नाही. आहे का? त्याच्यानंतर प्रशासनाने जे निवेदन दिले आहे त्यामध्ये एका ठिकाणी बाधित व्यक्ती १ लाख २७ हजार, व कुटुंबे दिली आहेत २५ हजार पेक्षा जास्त, पृष्ठ क्र. ३ वर प्रपत्र १ जे जोडले आहे, तेथे प्रशासनाने जी लोकसंख्या दर्शविली आहे ८९ हजार साधारणत: , २५ हजार कुटुंबे, हे मी का सांगतो आहे की कुटुंबे बाधित झाली आहेत २५ हजार व लोकांना जे धान्य वाटप केले आहे ते १३ हजार लोकांना. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणतात की, प्रत्येक आपत्तीग्रस्तास लाभ मिळाला पाहिजे. आमचे आयुक्त, आमचे महापौर, आमच्या सर्व सदस्यांची हीच भावना आहे की, प्रत्येक आपत्तीग्रस्तास लाभ मिळाला पाहिजे. २५ हजार कुटुंबे बाधित आहेत. तर मग १३ हजार लोकांना त्याचा फायदा का मिळाला आहे? किंवा १३ हजार कुटुंबे बाधित आहेत ज्यांना धान्य मिळाले आहे किंवा २५ हजार कुटुंबे बाधित असून उर्वरीत १२ हजार कुटुंबांना धान्य का दिले नाही? तर ही जी विसंगती आहे, म्हणजेच नंतर प्रशासनाने साफ सफाई बाबत जे लक्ष दिले ते खुपच चांगले केले. त्यामध्ये कुणीही दुमत व्यक्त करणार नाही. बाकी शहरांपेक्षा खुप लवकर साफसफाई आमच्या शहरामध्ये झाली आहे परंतु मदतीचे जे काम होते त्यामध्ये थोडयाश्या चुका झाल्या आहेत. त्याची कारणे काय आहेत ते महापौर महोदया व आयुक्त साहेब यांना माहित आहे. जे लाभार्थी पात्र असून सुध्दा त्यांना धान्य मिळाले नाही त्यांच्या बाबतीत काय विचार करणार आहात? करणार नाहीत? जर प्रशासनाच्या अधिका–यांच्या चुकीमुळे किंवा राजकारणांच्या चुकीमुळे हे झाले आहे. यापैकी कोणते कारण आहे ते शोधावे व उर्वरीत लोकांना धान्य वाटप करण्याची व्यवस्था झाली पाहिजे, दुसरे म्हणजे लेप्टोस्पायरीस व डेंग्युचे रुग्ण येथे दर्शविले आहेत ते अतिशय कमी दर्शविले आहेत. कारण की माझ्या माहितीनुसार उल्हासनगर मध्यवर्ती रुग्णालयामध्ये उल्हासनगरमधील १७ रुग्ण लेप्टोस्पायरीसचे होते, त्याव्यतिरिक्त डेंग्युचे. आर्शिवाद हॉस्पीटलमध्ये डेंग्युचे ६, लेप्टोस्पायरीसचे ३, शिवनेरी हॉस्पीटलमध्ये, अंकुर हॉस्पीटलमध्ये अशा प्रकारे एकुण संख्या पाहिली असता लेप्टोस्पायरीस व डेंग्युचे रुग्ण आहेत, ते जास्त आहेत. येथे निवेदनामध्ये जी संख्या दर्शविली आहे ती कमी आहे. तर अधिका–यानी जर हा आकडा कमी केला असेल तर ते चुकीचे आहे. कारण काय आहे ते आपणांस माहित आहे. परंतु ही वस्तुस्थिती आहे की रोगराई जास्त आहे, रुग्णांची संख्या जास्त आहे व येथे कमी दर्शविली आहे. सभागृहासमोर आकडेवारी ठेवतांना वस्तुस्थिती जी आहे तीच ठेवली पाहिजे. त्यामध्ये कोणतीही गडबड करता कामा नये. येथे जे निवेदन दिले आहे त्यामध्ये बाधित कुटुंबांची संख्या, एकुण संख्या यामध्ये गडबड आहे. त्यानंतर जे लोक मयत झाले आहेत त्यांची संख्या सुध्दा जास्त आहे. यामध्ये ज्यांचा मी उल्लेख केला होता ते वडोल गावामधील ४ व्यक्ती एकाच कुटुंबामधील होते. सोनवणे नावाचे व्यक्ती त्यांची नावे नाहीत. २० सेक्शन येथिल दिवटे नावाचे गृहस्थ त्यांचेही नाव नाही. त्यानंतर या रोगराईमुळे किती लोक गेले, मरण पावले, त्याची सुध्दा माहिती येथे ठेवलेली नाही. ही झाली आपल्या निवेदनावर चर्चा. पुढे जावुन रोगराई वाढु नये म्हणुन प्रत्येक पावसाळयाअगोदर आम्ही आता २५ स्प्रेपंप मागविले आहेत परंतु प्रत्येक विभागामध्ये प्रभागामध्ये, प्रत्येक गल्लीमध्ये जंतु नाशकांची फवारणी होणे जरुरीचे आहे. पुर येतो किंवा येत नाही, परंतु त्यापुर्वी रोगजंतु मारले पाहिजेत. यापुढे पावसाळयापुर्वी पुर्ण उल्हासनगरमध्ये स्प्रे फवारणी झाली पाहिजे. यागोष्टींकडे जास्तीत जास्त लक्ष देणे जरुरीचे आहे व या पुरामुळे ज्यांची घरे तुटली आहेत, जसे आमचे श्री. शांताराम निकम व श्री. दिलीप लालवानी यांनी लक्षवेधी मांडली, व लक्षवेधले की, ज्यांची घरे तुटली आहेत त्यांना दुरुस्तीची परवानगी दिली पाहिजे. घर आहे, दूकान आहे, गोडावुन आहे, ते तुटले आहे, उध्दवस्त झाले आहे, त्यांना दुरुस्तीची परवानगी देतांना काही बाधा येता कामा नये. परंतु प्रशासनाने लक्षवेधीच्या उत्तरामध्ये येथे दिले आहे की, याबाबत आम्ही महाराष्ट्र शासनाकडुन निर्देश मागविले आहेत. आता सरकारचे काम आहे, सरकारकडुन कधी आदेश येणार? तो पर्यंत हे लोक काय बाहेरच राहणार काय? यासाठी लवकरात लवकर सर्व्हे करुन भले कुणीही एखादा उप–जिल्हाधिकारी संवर्गातील माणुस ठेवा, जो विभाग पुरसदृश्य आहे पुरसदृश्य विभाग कोण–कोणते आहेत ते प्रशासनास माहित आहे. आयुक्त स्वत:

प्रत्येक ठिकाणी गेले होते. महापौर गेल्या होत्या, सर्व पदाधिकारी गेले होते. अशा लोकांना तात्काळ घरदुरुस्तीची परवानगी देणे आवश्यक आहे. कारण की, हिराघाटची स्थिती अशी आहे की, तेथिल काही लोक टॅम्पोमध्ये राहत आहेत. ते किती दिवस तेथे राहतील? सरकारचा आदेश जर एक महिन्यानंतर येणार असेल तर तोपर्यंत आम्ही त्यांना तेथेच ठेवणार आहोत काय? काही लोक वुडलॅण्ड कॉम्पलेक्स मध्ये आहेत, काही लोक २१ नंबर शाळेत आहेत, तेथे त्यांना किती दिवस ठेवणार? तर यावर लवकरात लवकर या लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांना त्यांचे घर दुरुस्तीची परवानगी, आपण जर त्यांना मदत करु शकत असू तर त्यावर विचार विर्मश झाला पाहिजे. जी घरे तुटली आहेत, पुर्णपणे उध्दवस्त झाली आहेत त्यांना महापालिकेच्यावतीने काय मदत देता येवू शकते? याचा विचार करुन त्यांना घरदुरुस्तीची परवानगी लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न केला तर बरे होईल. हीच सभागृहाची भावना आहे. लोकांच्या ज्या अपेक्षा आहेत, लोकांच्या अपेक्षेप्रती मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र!

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मा. महापौरजी, विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे यांनी जे म्हटले त्याची मी पुनरावृत्ती करु इच्छित नाही परंतु या लक्षवेधीच्या माध्यमातुन मी हे जरुर सांगु इच्छितो की, आयुक्त जे कुणी असोत, त्यांनी येथे राहिले पाहिजे. कारण की, पुराच्या वेळेस आमचे आयुक्त कल्याणमध्ये अडकुन पडले होते. आयुक्त साहेब शहरात नसल्यामुळे ..................

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरजी, मी क्षमा मागतो हे जे म्हणत आहेत त्यामध्ये मी दुरुस्ती करु इच्छितो आयुक्त साहेबांना २०—२०, २२—२२ तास काम करतांना आम्ही स्वत: पाहिले आहे. आपण म्हणता की, ते कल्याण मध्ये राहतात पुराच्या पाण्यामुळे ते तेथे अडकुन राहिले होते त्यामुळे ते येथे मदत कार्य करु शकले नाहीत. येथे आयुक्त नसल्यामुळे कुणाचेही नुकसान झाले नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— मी तेच सांगु इच्छितो की, आयुक्त साहेबांनी येथे राहिले पाहिजे. आयुक्त साहेब कल्याणमध्ये पुराच्या पाण्याने वेढले गेले होते. उल्हासनगरमध्ये यावे असे त्यांना वाटत होते. परंतु ते येवु शकत नव्हते कारण की, कल्याणमध्ये सुध्दा फार मोठया प्रमाणावर पाणी होते.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— २८ तारीख, २८ तारखेची गोष्ट आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— सभागृहास माझी अशी विनंती असेल की, उल्हासनगरमध्ये आयुक्तांसाठी लवकरात लवकर बंगला बांधला जावा. कारण की, जो कुणी आयुक्त म्हणुन येथे येईल तो येथे राहील. आज आम्ही येथे जी लक्षवेधी मांडली आहे तीचा उद्देश हाच आहे की, उल्हासनगरचे क्षेत्र १३ चौरस किलोमिटरचे आहे. नियतीने आमच्यावर फार मोठी मेहरबानी केली आहे चार, सव्वा चार किलोमिटर क्षेत्रामध्ये पुराचे पाणी आले. जसे कल्याणमध्ये फार मोठया प्रमाणावर पुराचे पाणी आले. अंबरनाथमध्ये जास्त आले, बदलापुरमध्ये ही जास्त आले. तर मला असे वाटते की, उल्हासनगरमध्ये झुलेलाल जे आहेत ते आमच्यावर प्रसन्न आहेत. परतु सव्वा चार किलोमिटर परिसरात पुराचे पाणी पसरल्यामुळे जेवढा काही त्रास झाला मी आयुक्तांना व त्यांच्या पुर्ण पथकांला धन्यवाद देतो की, त्यांनी पुरपस्थिती लवकरात लवकर नियंत्रणात आणली परंतु कचरा उचलणारा जो ठेकेदार आहे तो कचरा उचलण्याच्या आपल्या कामामध्ये पुर्णपणे अयशस्वी ठरला आहे. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, कचरा उचलणा—या ठेकेदाराचा ठेका रद्द केला जावा. किंवा आपणांस येथे ज्या काही अडचणींना सामोरे जावे लागले त्याबाबत त्या ठेकेदाराकडुन दंड वसुल केला जावा. एक—दोन दिवस ब—याचशा विभागांमध्ये कच—याचे ढिगच्याढिग पडले होते. ते उचलले जातील किंवा नाही याची शंका होती परंतु आपण जळगाव, नाशिक, ठाणे इत्यादी ठिकाणांहुन ट्रक्स मागवुन कचरा उलचण्याचे काम नियंत्रणात आणले. हे काम जर नियंत्रणात आले नसते तर आमची स्थिती सुध्दा कल्याण सारखी झाली असती. व तीन दिवस जे पाणी मिळाले नाही, शहरात पाण्याची फार बोंबाबोंब होती. टॅंकरबाबत आम्ही येथे एक विशेष महासभेची मागणी केली होती. प्रत्येक प्रभागामध्ये एक—एक टॅंकर दिला जाईल. तो टॅंकर आपण देवु शकला नाहीत. त्याचे सुध्दा काही कारण असू शकते. परंतु माझी आपणांस ही सुध्दा विनंती आहे की, टॅंकरचा जो ठेकेदार आहे त्यास आपण सुचीत करावे. जेव्हा अशी काही परिस्थिती निर्माण होते तेव्हा आम्हांस सहाकार्य केले पाहिजे. पुढे जावुन मी हे सांगु इच्छितो की, आपण साहित्याचे वितरण केले चटई, चादर ते वितरण बरोबर झाले नाही. आयुक्त साहेबांनी आम्हांस एक निवेदन दिले होते मा. महापौर, उप—महापौर, विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते यांना एक निवेदन दिले होते, वितरण व्यवस्था जशी व्हावयास पाहिजे होती तशी झाली नाही. माझे एक सहकारी यांनी आता थोडयावेळे

पुर्वी सांगितले की, जेवढे वितरण व्हावयास पाहिजे होते तेवढे झाले नाही. ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. व आम्ही जेव्हा कुण्या एका अधिका–याशी हे विचारायला जातो की, किती चटई, चादरीचे वितरण झाले? तर याबाबत कुणीही अधिकारी आम्हांस बरोबर उत्तरे देत नाहीत. तर त्यावरुन असे वाटते की, यामध्ये सुध्दा काही अपहार झाला आहे काय? तसे तर अशा परिस्थितीत असे होता कामा नये. तसेच नाल्याच्या बाजुस जेवढया काही झोपडपट्टया आहेत त्यांच्या बाबत आपण काय विचार केला आहे? कारण की प्रत्येक पावसाळयात त्यांना धोका संभवतो. तर जेव्हा आपण या लोकांचे पुनर्वसन कराल त्यासाठी प्रशासनाने शासनाशी काही पत्रव्यवहार केला आहे काय? यासाठी काय केले पाहिजे? जे नाल्याच्या बाजुला झोपडे आहेत तसे तर अशा ब–याचशा गोष्टी आहेत. माझ्या सहका–याने सांगितले आहे, व आयुक्त साहेब, आम्ही आपणांस एक पत्र लिहिले होते उल्हासनगर शहरामध्ये रोगराईची संभवना उद्‌भवू शकते. आम्ही आपणांस विनंती केली होती की, प्रत्येक पॅनलमध्ये जेथे आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचे समाज मंदिर आहे तेथे वैद्यकीय तपासणी शिबीर लावले जावे. परंतु त्याकडे आपण लक्ष दिले नाही. तसे जर आपण केले असते तर बरे झाले असते कारण की, लोकांना असे वाटत होते की, आपली वैद्यकीय तपासणी व्हावी. आपणास कुठल्या आजाराची लागण तर झाली नाही? अशा ज्या काही शंका आहेत त्या दुर झाल्या असत्या परंतु यापुढे रोगराईची जी भिती आहे ती राहिली नसती. माझी पुन्हा आपणांस विनंती आहे की, आपण प्रत्येक प्रभागामध्ये वैद्यकीय शिबिरे आयोजित केले पाहिजे. कारण की लोकांना आता सुध्दा भिती आहे की आम्हांला काही तरी आजाराची लागण होवू शकते कारण की, पाणी बरोबर येत नाही. त्यानंतर सुध्दा लोकांना या लक्षवेधीच्या माध्यमातुन मी पुन्हा एकदा आपणांस विंनती करतो की, सर्व प्रभागांमध्ये जर आपण वैद्यकीय शिबीर आयोजित केले , लोकांना याबाबत सांगितलें तर लोकांच्या मनामध्ये जी भिती असते ती दुर होईल. बाकी येणा–या पावसाळयामध्ये यासाठी जी साधन–साम्रुग्री आवश्यक आहे ती आपणाकडे नाही. ती यापुढे असली पाहिजे. जसे की, अंडरग्राउंड ड्रेनेजची मशिन, या मशिनने एक दिवस सुध्दा काम केले नाही, या मशिनचा सुध्दा बंदोबस्त झाला पाहिजे. कारण की, अंडरग्राउंड ड्रेनेजमुळे सुध्दा फार मोठया प्रमाणावर रोगराई पसरु शकते.

<u>**मा. सदस्य श्री. नाना पवार :**</u>–मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब, सभेत उपस्थित असलेले सर्व सदस्यगण २६ व २७ तारखेस जी नैसर्गीक आपत्ती महाराष्ट्रात आली , आमच्या शहरात सुध्दा नैसर्गीक आपत्तीमुळे फार मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे व त्या नैसर्गीक आपत्तीतुन हळूहळू आम्ही बाहेर येण्याचा प्रयत्न करत आहोत. अजुनही आम्ही पुर्णपणे नैसर्गीक आपत्तीतून बाहेर नाहीत. फार मोठया प्रमाणावर रोगराईची सुरुवात आमच्या शहरामध्ये झाली आहे. वेगवेगळया आजारांचे रुग्ण आमच्या शहरातील रुग्णालयांमध्ये दाखल झाले आहेत, काही लोक बाहेरुन औषधोपचार घेत आहेत. तर आमच्या शहरावर ही जी भयानक परिस्थिती आहे, ही परिस्थिती निपटुन काढण्यासाठी, शहरातील जनता, शहरातील सर्व लोक, उल्हासनगर महानगरपालिकेची सर्व यंत्रणा जोरदारपणे काम करत होती. माझा जो प्रभाग आहे तो पुर्णपणे पुरग्रस्त प्रभाग आहे व आताच कुणी म्हटले की आयुक्त साहेब आले नव्हते. परंतु माझ्या प्रभागामध्ये आयुक्त साहेब उपस्थित होते व आयुक्त साहेबांचे पुर्ण पथक तेथे उपस्थित होते. व त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोकांना वाचविण्याचे काम सुध्दा चालु होते. त्याचप्रमाणे आमचे आमदार साहेब सुध्दा तेथे उपस्थित होते. आमच्याकडे सर्वात प्रथम जे कुणी आले ते आमचे आमदार, सम्राट अशोक नगरमध्ये सर्वात प्रथम आले. आमच्या महापौर आल्या, उपमहापौर आले, माझ्या सांगण्याचा मुद्‌दा असा आहे की, सर्व लोकांनी सहकार्य दिले. आमचे विरोधी पक्ष नेता श्री. बोडारे साहेब व मी तर पाण्यामध्ये उतरलो होतो. आर्शिवाद सोसायटी, रेणुका सोसायटी, सम्राट अशोक नगर मध्ये श्री. बोडारे साहेबांच्या बरोबर मी स्वत: पाण्यामध्ये उतरुन आम्ही लोकांना मदत करत होतो. यावरुन सर्व राजकीय पक्षाचे लोक व सर्व यंत्रणा मदत कार्यात लागली होती व मला वाटते की यामुळेच आज आम्ही त्या नैसर्गीक आपत्तीमधुन बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहोत. या महासभेमध्ये काही लोकांचे अभिनंदन केले पाहिजे परंतु सध्या उल्हासनगरमध्ये अभिनंदन करण्यासारखी परिस्थिती नाही. कारण की आमच्या शहरामधील बरेचसे लोक आज आपल्यामध्ये नाहीत. पुरामळे व रोगराईमुळे कित्येक लोकांचे निधन झाले आहे. तरीही काळाबरोबर जावे लागते. काळाबरोबर लढावे लागते. शहरावर यापुढे अशी परिस्थिती येवु नये अशी मी परमेश्वरापुढे प्रार्थना करतो. लोकप्रतिनिधी, शासन व प्रशासन जे कुणीही असेल आता आम्ही लोकांनीसुध्दा काही केले पाहिजे. नैसर्गीक आपत्तीपुढे तर आम्ही काही करु शकत नाहीत ही गोष्ट खरी आहे. परंतु नैसर्गीक आपत्ती आल्यानंतर कमीत कमी नुकसान व्हावे व लोकांना लवकरात लवकर मदत पोहचावी यासाठी काय केले पाहिजे? त्यासाठी आपल्या महानगरपालिकेकडुन कोणती उपाययोजना केली पाहिजे याबाबत काही सुचना मी येथे ठेवू इच्छितो व जे पुरग्रस्त लोक आहेत त्यांना महानगरपालिका मदत करु शकते का? याबाबत काही सुचना मी

सभागृहापुढे ठेवू इच्छितो, माझी पहिली सुचना अशी आहे की, आमचा हा जो वालधुनी नाला आहे, नैसर्गीक आपत्ती आल्यामुळे सर्वात जास्त वालधुनी नाल्याच्या परिसरातील लोकांचे नुकसान झाले व नैसर्गीक आपत्ती न येता सुध्दा दर वर्षी पावसाळयामध्ये या विभागातील लोकांचे फार मोठया प्रमाणावर नुकसान होते. महानगरपालिका जर वालधुनी नाल्याच्या विकासास प्राधान्य देत असेल तर तो अतिशय चांगला असा निर्णय होईल. वालधुनी नाल्याची रुंदी, खोली व त्या नाल्याची क्षमता वाढविणे या हिशोबाने जर महानगरपालिका या नाल्याच्या विकासाचे काम हाती घेत असेल, होवू शकते की, महानगरपालिकेला आपल्या निधितुन या कामासाठी खर्च करावा लागत असेल तरीही तो केला पाहिजे. व दुसरे असे की उल्हासनगर शहरामध्ये पुराचे पाणी येवुन फार मोठया प्रमाणावर नुकसान झाले होते त्याबाबत मला असे वाटते की, आपल्याकडे, उल्हासनगर महानगरपालिकेकडे मोठया नाल्यांच्या विकासाची काही योजना नाही. मोठया नाल्यांच्या विकासाची एक योजना तयार केली जावी. नाल्यांची क्षमता वाढविली जावी. असे केल्याने शहरातील घरे व दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरुन जे नुकसान होते ते नुकसान कमी प्रमाणात होईल आताच मा. महापौरांनी एक चांगला निर्णय घेतला आहे तो असो की, पुरग्रस्त लोकांचा मिळकत कर माफ केला जाईल. हा एक चांगला निर्णय आहे. २६ व २७ तारखेला जे पुराचे पाणी आले, त्यातुन लोकांना बाहेर काढण्यासाठी फार अडचणी येत होत्या. त्यामध्ये आमच्या अग्नीशमन दलाचे जे काही लोक आहेत त्यातील काही लोक प्रशिक्षित आहेत त्यांनी सुध्दा अतिशय चांगले काम केले. परंतु आमच्या अग्नीशमन दलाची ही जी क्षमता आहे ती अतिशय कमी आहे. आमच्या अग्नीशमन दलामध्ये अधिकाधिक प्रमाणावर प्रशिक्षित लोक असले पाहिजेत. या कर्मचा–यांमधील दोन कर्मचारी असे होते ते बरीच मेहनत करत होते. ते प्रशिक्षित वाटत होते. अश्या प्रशिक्षित कर्मचा–यांची संख्या जर मोठया प्रमाणावर असेल तर अशा नैसर्गीक आपत्तीच्या वेळी त्यांचा फार मोठया प्रमाणावर फायदा होईल. सुरुवातीला या ठिकाणच्या आरोग्य विभागाचे अस्तित्व दिसेनासे होते. त्यानंतर आयुक्त साहेबांनी बाहेरुन यंत्रणा मागवून जी व्यवस्था करावयास पाहिजे होती ती तर केली. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेची आपली स्वत:ची सुध्दा व्यवस्था असली पाहिजे. यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेचा जो आरोग्य विभाग आहे तो सक्षम केला जावा. आरोग्य विभागामध्ये जे मनुष्यबळ पाहिजे जसे की, वैद्यकीय अधिकारी, नर्सेस इत्यादींची संख्या वाढविली जावी. आता आताच मी म्हटले की, आम्ही लोक नैसर्गीक आपत्तीतुन पुर्णपणे बाहेर आलेलो नाहीत. तर मी मा. महापौर व आयुक्तांना विनंती करतो की, जो पुरग्रस्त विभाग आहे त्या प्रत्येक पुरग्रस्त विभागात जावुन आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित केली जावीत व तेथिल लोकांच्या रक्ताची तपासणी केली जावी, कारण की बरेचसे लोक बाहेरुन औषधोपचार घेत आहेत व आमच्या काही नागरीकांमध्ये या आजाराची लक्षणे दिसुन येत आहेत. म्हणुन अशा प्रत्येक विभागामध्ये जावुन तेथे आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित केली जावीत. या पावसाळयात बरीचशी घरे पुर्णच्या पुर्ण वाहुन गेली आहेत. त्यामुळे त्या परिवाराची स्थिती काय होवू शकते हे आम्ही लोक जाणतो. मी अशा प्रभागाचा नगरसेवक आहे. त्यांच्या अडचणी मी समजु शकतो. मी या सभागृहास व महानगरपालिकेस विनंती करु इच्छितो की, जर आपण त्या लोकांना मदत करु शकत असू जर काही आर्थिक सहाय करु शकत असू तर ते सुध्दा केले पाहिजे. किंवा त्यानंतर एखादा ठराव पारीत करुन महाराष्ट्र शासनाकडुन जर मदत घेतली जात असेल तर तो मानवतेच्या नात्यातुन एक अतिशय चांगला निर्णय होईल. सर्व लोकांनी या कठिण समयी कारण की जे लोक आज सुरक्षित आहेत मी हे सुध्दा पाहिले की, ठाणे जिल्हयात व मुंबईमध्ये लोकांना वाचविण्यासाठी जे लोक गेले होते त्यांना आपले प्राण गमवावे लागले आहे. एक अशी भयानक परिस्थिती होती. अशा परिस्थितीत मा. आयुक्त साहेबांनी, मा. महापौरांनी, मा. उप–महापौरांनी, आमच्या शहराच्या आमदाराने, आमचे विरोधी पक्ष नेता श्री. बोडारे साहेबांनी, सर्वांनीच चांगले सहकार्य दिले. मी पुरप्रभावीत प्रभागाचा नगरसेवक असल्याने या सर्वांचा मी आभारी आहे. धन्यवाद !

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> मा. महापौर महोदया, लक्षवेधी सुचना मांडण्यामागे उद्देश हाच असतो की, कोणत्याही मुद्दयावर शासन व प्रशासनाचे लक्ष वेधणे त्यामध्ये पहिले माझी लक्षवेधी आली होती त्यानंतर श्री. बोडारे साहेबांची आली होती, लक्षवेधी ही लक्षवेधण्यासाठी असते. सभागृहाचे लक्षवेधणे कोणत्या परिस्थितीतुन आमचे शहर मार्गक्रमण करीत आहे, काय उपाययोजना केली पाहिजे, यावर मोकळेपणाने चर्चा व्हावी, व त्यावर काही निर्णय घेणे या लक्षवेधीच्या माध्यमातुन एक सकारात्मक निर्णय समोर यावा अशी आमची इच्छा आहे. मा. महापौर महोदया, महाराष्ट्रामध्ये जो मुसळधार पाऊस झाला त्यामुळे जे नुकसान झाले, त्यामुळे जी फार मोठया प्रमाणात जिवीत व वित्तहानी झाली व त्यानंतर मलेरिया, कॉलरा, डेंग्यु, डायरिया, लेप्टो इत्यादी रोगांमुळे जे लोक निधन पावले, काही लोक आज सुध्दा जीवन व मुत्यृ यामध्ये संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत कठोरात कठोर हृदयाच्या माणसाला सुध्दा दु:ख होईल. एक भारतीय असल्याच्या नात्याने ते दु:ख आम्हांला सुध्दा आहे. उल्हासनगर शहर सुध्दा २६ जुलैला याच

परिस्थितीतुन जात होते. फार मोठया प्रमाणावर नुकसान येथे सुध्दा झाले व आयुक्त साहेबांनी याबाबतचा महाराष्ट्र शासनाकडे अहवाल पाठविला आहे, जवळजवळ अडीचशे कोटी रुपयांचे नुकसान आमच्या उल्हासनगर शहराचे झाले आहे. परंतु पुरपरिस्थितीत ज्याप्रमाणे युध्दपातळीवर काम झाले त्यामध्ये सामाजिक संस्था, ब्रम्हकुमारीज्, स्वामी शांती प्रकाश आश्रम, बापु आशारामजी आश्रम, चालिया साहेब मंदिर आश्रम, रोटरी क्लब अशा ज्या काही सामाजिक संस्था होत्या किंवा जेवढे सामाजिक कार्य करणारे लोक होते ज्यांनी शासन व प्रशासनाकडुन मदत येण्या अगोदर २६ तारखेला रात्रभर जे मदत कार्य करण्याचे सुरु केले त्यामध्ये आमचे कित्येक सफाई कामगार सुध्दा होते, काही ठिकाणी पोलिस अधिकारी व कर्मचारी सुध्दा होते, काही ठिकाणी या महानगरपालिकेचे कर्मचारी सुध्दा होते व काही ठिकाणी या महानगरपालिकेचे लोक प्रतिनिधी सुध्दा होते व येथपर्यंत की आमच्या मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी, उपमहापौर श्री. विनोद तलरेजा, सभागृह नेता श्री. किशोर वनवारी, विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे व सर्व राजकिय पक्षाचे लोक, महानगरपालिकेचे आयुक्त, श्री. बनसोडे साहेब, श्री. प्रकाश कुकरेजा, श्री. लोणारे व सर्व पदाधिकारी हे मदतकार्यात मग्न होते व ज्या मुसद्दीगिरीने बचाव व मदतकार्य सुरु झाले. त्यातुन संपुर्ण शहरामध्ये व महाराष्ट्रामध्ये असा संदेश गेला की, एवढया मोठया आपत्तीतुन हे उल्हासनगर शहर कसे वाचले? जसे की आमच्या शेजारच्या कल्याण शहरामध्ये एवढी खराब स्थिती आहे. परंतु येथे एवढी चांगली स्थिती आहे थोडया वेळेपूर्वी बोलतांना मी कित्येक अधिका–यांची नावे घेवू शकलो नाही त्यात श्री. हरेश इदनानी व इतर बरेचशे अधिकारी मदत कार्यात मग्न होते त्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे काम केले व कित्येक लोकांनी रात्रीच्या आंधारात, जेथे १५ ते २४ फुट उंची पर्यंत पाणी भरले होते. तेथे पोहत जावुन दोराच्या मदतीने लोकांना वाचविले. त्यामध्ये रामा ढकोलिया, आतिष, पवार ब–याचशा लोकांना मी ओळखतो ज्यांनी आपले प्राण संकटात टाकुन लोकांना वाचविले. एकेक गल्ली बोळामध्ये असे बहाद्दुर लोक पुढे आलेत. त्यांच्यामुळे ज्या प्रकारे लोकांना वाचविले त्यांच्या त्या कार्यास आम्ही अभिवादन करतो. परंतु ही वेळ आहे, विश्लेषण कराण्याची ही जी आपत्ती आपल्या शहरामध्ये आली या आपत्तीतुन बाहेर पडण्यासाठी आम्ही किती प्रमाणावर यशस्वी झालो अशा परिस्थितीतुन बाहेर येण्यासाठी कधीही आपणांस तयार राहिले पाहिजे. आम्ही कुठे कुठे कमी पडलो या सर्व गोष्टींचे विश्लेषण जसे की, युध्दाच्या वेळेस युध्द लढण्यासाठी व जिकण्यासाठी लढले जाते त्याचप्रमाणे युध्द संपल्यानंतर या सर्व गोष्टींचे विश्लेषण होते की, आम्ही कुठे कमी पडलो, आम्ही कश्याप्रकारे काम केले पाहिजे, कश्याप्रकारे आपण आपल्या देशास किंवा आपल्या शहरास सुरक्षित स्थितीपर्यंत पोहचवु शकतो. आम्ही लढा देत आहोत रोगराईच्या विरोधात परंतु आमच्यासाठी ही प्रसन्नतेची गोष्ट आहे की, मध्यवर्ती रुग्णालयांमध्ये जेवढे काही रुग्ण दाखल झाले आहेत त्यामध्ये उल्हासनगरमधील रुग्ण सर्वात कमी आहेत, आजुबाजुच्या शहर व गावातील रुग्ण येवून येथे दाखल झाले आहेत. उल्हासनगर शहर इतराची सेवा करत आहे. आमच्या आमदारांबरोबर आम्ही कल्याण व आजुबाजुच्या गावांमध्ये सुध्दा गेलो तेथिल लोकांनी सांगितले की, पहिल्या दिवसापासुन उल्हासनगर मधील लोकांनी आम्हांस मदत देण्याची जी सुरुवात केली आहे व तेथिल आमदार आमची विचारपुस करण्यासाठी आला. येथे तर आमचे स्थानिक नेतेसुध्दा आमची विचारपुस करण्यासाठी आले नाहीत. येथिल कोणत्याही संघटनेने आमच्यापर्यंत मदत पोहचवली नाही. हा जो गौरव जातो तो उल्हासनगर शहरास. अत्यंत कठिण परिस्थितीमध्ये उल्हासनगरमधील लोकांनी मदत कार्य केले आहे. एकीकडे आम्ही स्वत: समस्यांविरुध्द लढत होतो. व दुसरीकडे आम्ही शेजा–यांना मदत करत आहोत. या १३ चौरस किलोमिटर शहरामध्ये एक तृतियांश भाग पाण्यात बुडाला होता त्यामध्ये येथे राहणा–या अधिकारी व कर्मचा–यांची कुटुंबे सुध्दा होती. एकीकडे येथिल प्रत्येक व्यक्ती शेजारील शहरातील लोकांना वाचविण्यासाठी लढा देत होता व दुसरीकडे आपले शहर व विभागातील व्यक्तींसाठी सुध्दा लढा देत होता. आमच्या ब–याचशा सहकार्यांनी या सर्व गोष्टींवर प्रकाश झोत टाकला आहे. परंतु आम्हांस आता लक्ष दयायचे आहे की, यापुढे काय करायचे आहे? महापौर महोदया मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, काही दिवसानंतर श्री. गणेश उत्सव सुरु होणार आहे या पुरामुळे कित्येक लोकांची आर्थिक व मानसिक स्थिती खालावली आहे. कित्येक रस्ते व पुलांची स्थिती खराब आहे. अश्या परिस्थितीत गणपतीची मुर्ती घेवुन जातांना आम्हा लोकांना अडचणीचे येवु शकते. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. यासाठी जे रस्ते वाहुन गेले आहेत, त्या रस्त्यांची व पुलांची लवकरात लवकर पुर्नबांधणी झाली पाहिजे. ज्या लोकांची घरे नाले, नदी यांच्या आजुबाजुस होती ज्यांचे फार मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे अशा लोकांसाठी, मा. गणेशराव नाईक यांच्याशी बोलणे झाले होते. ज्यांची मा. आमदार व मा. महापौर यांच्या बरोबर बैठक झाली होती त्यांनी सांगितले की, शासनाने असा निर्णय घेतला आहे की, पुरामध्ये ज्या लोकांची घरे उद्वस्त झाली आहेत अशांमधील ज्या लोकांची घरे अधिकृत असतील त्यांची पुन: बांधण्यासाठी महाराष्ट शासन ४० हजार रुपयांची मदत करणार आहे. या मदतीबाबत त्यांना जेव्हा प्रश्न विचारण्यात आला, येथे तर पुर्ण शहर अनाधिकृत आहे. तर येथे

मदत कशी मिळेल? तर त्यांनी सांगितले की, यावर आपणांस मार्ग काढावयाचा आहे. महापौर महोदया, महाराष्ट्र शासनाच्या एका नियमानुसार १ जानेवारी, १९९५ रोजी ज्या झोपडया वसलेल्या आहेत, त्यांना नियमित केले आहे. असे मानण्यात आले आहे. या आधारावर १९९५ पुर्वी जी घरे बांधण्यात आली आहेत ती घरे नियमित मानुन त्यांची पुर्नबांधणी करण्यासाठी त्यांना परवानगी दिली जावी. त्यामुळे ते आपल्या घराची दुरुस्ती करु शकतील. आपल्या दुकानांची दुरुस्ती करु शकतील. आपल्या गोदामाची दुरुस्ती करु शकतील. मा. महापौरजी, अशा लोकांकडुन जर कागदपत्रे मागविली गेली तर, कागदपत्रे मागविणे एक प्रकारे अन्यायकारक हाईल. कारण की जेव्हा पुराचे पाणी आले तेव्हा लोकांचे टिव्ही, फ्रीज एवढेच नाही तर लोकसुध्दा वाहून गेले त्यामुळे त्यांच्याकडे कागदपत्र सुस्थितीत नसतील. यासाठी मानवतेच्या दृष्टीकोनातुन अशा लोकांना आपली घरे, दुकाने, गोदामे दुरुस्ती करण्यासाठी परवानगी दिली जावी. मा. महापौर महोदया, अशा वेळी या गोष्टीकडे सुध्दा लक्ष दिले जावे की, नदी व नाल्याच्या एकदम बाजुस अशी बांधकामे पुन्हा होवू नयेत जसे की आमच्या आयुक्त साहेबांना चिंता आहे, मा. उच्च न्यायालयाचा आदेश आहे की, नाले–नालींवर अतिक्रमण होवू नये, परंतु नाले–नाल्या शेजारी जी बांधकामे झाली होती त्यांना पर्यायी जागा दिली पाहिजे. किंवा त्याबाबतीत अशी व्यवस्था केली पाहिजे की लवकरात लवकर त्यांचे पुनर्वसन होवू शकेल. जसे आयुक्त महोदयांनी आपल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की महाराष्ट्र शासनास अहवाल सादर केला आहे. जसे आमच्या बोडारे साहेबांनी म्हटले, जसे श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी म्हटले शासनाकडुन तो प्रस्ताव मंजुर होवून येण्यास थोडाफार वेळ लागेल. परंतु आम्ही ही प्रत्यक्ष परिस्थिती पाहत आहोत. लोकांच्या घरांवर छप्पर नाही, खाण्यापिण्याच्या अडचणी आहेत, बायको–मुलांसह कोठे जायचे? एक मानवतेच्या दृष्टीकोनातुन त्यांच्या समस्यांकडे पाहुन त्यांना मदत करण्यासाठी अशा लोकांना त्यांचे घर, दुकान, गोदाम दुरुस्त करण्यासाठी परवानगी दिली पाहिजे. परंतु जे लोक अशा दयादृष्टीस पात्र नाहीत जे लोक तेथे अतिक्रमण करीत आहेत, जसे की मी आपणांस सांगु शकतो की, हिराघाट शेजारी एक छोटेसे कार्यालय होते, टॅम्पो स्टॅंडचा एक छोटासा खोका होता तेथे पुरानंतर एक अलिशान कार्यालय थाटले आहे. असे होता कामा नये. पुरामध्ये ज्यांची घरे वाहुन गेलीत अशा लोकांना तर न्याय मिळालाच पाहिजे. परंतु पुर परिस्थितीला सुध्दा या हंगामातील आपले उत्पन्न समजुन या परिस्थितीचे जे भांडवल करु इच्छितात ते ख–या अर्थाने या शहराचे, समाजाचे, देशाचे शत्रु आहेत. अशा लोकांना कोणत्याही परिस्थितीत मदत होता कामा नये. अशा लोकांवर कठोरात कठोर कारवाई करण्यासाठी आपणाकडे मी निवेदन करत आहे व ज्या ठेकेदाराकडे शहरातील कचरा उचलण्याचा ठेका दिला होता त्याची यंत्रणा पुर्णपणे खराब झाली. १,१९,०००/– रुपये कष्टाचे पैसे आम्ही त्यास प्रति दिवसाचे देतो. अशा या पुरपरिस्थितीत महानगरपालिकेने बाहेरुन यंत्रणा मागविली, जिल्हाधिका–यांकडुन या कामी यंत्रणा मागविली, महाराष्ट्र शासनाकडुन मागविली. परंतु या सर्व बाबींवर झालेला खर्च आपण आपल्याकडील ठेकेदार श्री. ॲन्थॉनी यांच्याकडुन वसुल केला पाहिजे. कारण की हा पैसा आम्हांला कोणत्याही परिस्थितीतुन वाचवायचा आहे. कारण की, यावेळेस शहराच्या पुर्न उभारणीसाठी आम्हांस महाराष्ट्र शासनाच्या निधीची, केंद्र सरकारच्या निधीची व एवढेच नाही तर महानगरपालिका निधी सुध्दा वाढवावा लागेल. आपले उत्पन्न वाढवावे लागेल. जेणेकरुन आपण पुन्हा आपल्या शहरास पुर्व पदावर आणु शकु. महापौर महोदया, या शहरामध्ये झोपडपट्टी वाशियांचे जेवढे काही नुकसान झाले आहे, त्यापेक्षा कित्येक पटीने जास्त नुकसान व्यापारी व उदयोगपतींचे झाले आहे. लहान–मोठया कारखान्यांचे सुध्दा नुकसान झाले आहे याबाबत काही लोकांचे पंचनामे झाले आहेत, काही लोकांचे झाले नाहीत. यासाठी आम्ही लोकांनी एक प्रस्ताव पारीत करुन महाराष्ट्र शासनाकडे पाठविला पाहिजे की अशा अधिका–यांना आपण सक्त सुचना दया की आपण अशा काही योजना तयार करा. जेणेकरुन आमचे उल्हासनगर पुन्हा उल्हासित नगर म्हणुन पुन्हा उभे राहु शकेल. या उल्हासनगरची ओळख व्यापार आहे, या उल्हासनगरची ओळख एक उदयोग आहे. पुराने आमची ही सर्व ओळख मिटविण्याचा प्रयत्न केला आहे. आम्ही आमची ती प्रगती पुन्हा गाठण्याचा प्रयत्न करु. परंतु ते आम्ही तेव्हाच गाठु जेव्हा आमचा व्यापार वाढेल जेव्हा येथिल उदयोग वाचेल. यासाठी महाराष्ट्र शासनाकडे जोरदारपणे अपिल केले पाहिजे. एक सर्व संमतीने प्रस्ताव पारीत झाला पाहिजे की येथील व्यापा–यांना पुर्णपणे नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. त्याचबरोबर बॅकांकडुन शून्य टक्के व्याजदराने कर्ज मिळाले पाहिजे. महापौर महोदया, आमचे महाराष्ट्र शासन या विषयावर गंभीरतेने विचार करत आहे. मा. श्री. गणेशरावजी नाईक यांनी आमचे आमदार श्री. पप्पु कालानी यांना याबाबत सांगितले आहे परंतु त्याचबरोबर आम्ही जर सर्व संमतीने ठराव पारीत करुन महाराष्ट्र शासनास पाठविला तर व संपुर्ण शहराचा आवाज एक करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविला तर आपले शहर आपल्या पायावर उभे करण्यासाठी आपणांस मदत मिळेल. यासाठी या शहरातील व्यापार वाचविण्यासाठी या शहरातील उदयोगधंदे वाचविण्यासाठी हे अतिशय जरुरीचे आहे. महापौर महोदयांनी आपल्या विशाल हृदयाची ओळख करुन देवून येथे जो निर्णय घेतला की

ज्या लोकांची घरे, मिळकती वाहून गेल्या आहेत त्यांना एक वर्षासाठी कर मुक्त केले जाईल. त्यांच्या या निर्णयाला आम्ही या सभागृहात अभिवादन करतो. हा निर्णय मानवतेच्या दृष्टीकोनातुन घेतलेला निर्णय आहे. अशा निर्णयांची या वेळेस आमच्या शहरास अतिशय आवश्यकता आहे. व अशा परिस्थितीत ज्या लोकांनी मदत कार्यात काही अपहार केला किंवा अशा पुरपरिस्थितीत अनाधिकृत बांधकामांच्या रुपाने काही मिळविण्याचा प्रयत्न केला, त्याबाबतीत खात्रीपुर्वकपणे आमचे मा. पालकमंत्री म्हणाले आहेत की, हे लोक समाजाचे शत्रु आहेत. अशा लोकांना समाज मानुसकी कधी माफ करु शकणार नाही. अशा लोकांवर नियंत्रण ठेवले जावे व खात्रीपुर्वक ज्या लोकांनी पुरग्रस्त लोकांना मदत केली अशा लोकांसाठी या महासभेच्या वतीने अभिनंदन करण्याचा प्रस्ताव ठेवला जावा. अशा बहाद्दुर लोकांचे अभिनंदन जाहिररित्या मोठया समांरभ पुर्वक झाले पाहिजे. त्याचे यु.एस.ए. कॅबलवर थेट प्रक्षेपण झाले पाहिजे. जेणेकरुन पुन्हा जेव्हा केव्हा अशी समस्या येईल तेव्हा हे संपुर्ण उल्हासनगर एकजुट होवून उभे ठाकले पाहिजे व कोणतीही मोठयात मोठी समस्या आमच्या उल्हासनगरची एक विट सुध्दा ढासळु शकणार नाही. एवढे बोलुन मी माझे शब्द संपवितो. जय हिंद, जय भिम!

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब व सर्व सहकारी मित्रहो, ज्याप्रकारे कर्मचा–यांनी, अधिका–यांनी काम केले त्यांच्या अभिनंदनाची या ठिकाणी चर्चा झाली. मला असे वाटते की, त्याचबरोबर लोकांचे सुध्दा अभिनंदन झाले पाहिजे. कारण की, त्यांनी खास करुन त्या तीन दिवशी कमालीपेक्षा जास्त त्रास सहन केला. तो पूर असा होता की असा कधी आला नव्हता व आम्ही प्रार्थना करतो की, यापुढे सुध्दा असा पुर येवू नये. परंतु त्रास इतका काही होता लाईट बंद, पाणी बंद, फोन बंद, मोबाईल बंद, रेल्वे गाडया बंद, वाहतुक बंद एवढया काही अडचणी होत्या व ज्या धैर्याने लोकांनी त्यांच्यावर मात केली. त्यामुळे लोकांचे सुध्दा अभिनंदन केले पाहिजे. जसे श्री. दिलीप लालवानी यांनी म्हटले की, ही जी वेळ आहे ती विश्लेषण करण्याची आहे. आमची कुठे चुक झाली आहे व यापुढे परमेश्वर करो अशा अडचणी पुन्हा कधी येवू नयेत परंतु जर का आल्या तर त्यांच्यावर मात करण्यासाठी काय केले पाहिजे यावर विचार केला पाहिजे. तर मला असे वाटते की, आम्ही एका गोष्टीचा विचार केला पाहिजे की जशी आमची अन्नधान्य वाटपाची व्यवस्था झाली. तशी महानगरपालिकेची जी मदत आहे ती सरकारी मदतीच्या अगोदर लोकांना पोहचली पाहिजे अशी आमची यंत्रणा असली पाहिजे व त्याबाबत आपण विचार केला पाहिजे. अशा प्रकारची आपत्ती जेव्हा येते त्यानंतर मदत व पुर्नवसनाच्या गोष्टी येतात. पहिली मदत आणि त्यानंतर पुर्नवसन म्हणजेच लोकांना वाचविण्याची गोष्ट मदतीबाबत मी एक गोष्ट सांगु इच्छितो की, ज्याबाबत बोडारे साहेबांनी सांगितले की जेव्हा आम्ही सभागृहात येत होतो तेव्हा काही राष्ट्रीय स्तरावरील पत्रकारांनी आम्हांला सांगितले की, उल्हासनगरमध्ये लेप्टोस्पायरेसीसच्या सुध्दा केसेस आहेत, मध्यवर्ती रुग्णालयामध्ये जे १७ रुग्ण दाखल झाले होते, मला असे वाटते की, याबाबत लोकांमध्ये अधिकाधिक जागृतता निर्माण केली पाहिजे. ही काही घाबरविण्याची गोष्ट नाही. परंतु जर आपण याबाबत जागृतता निर्माण करु शकलो तर ते अधिक चांगले होइल. जेथपर्यंत पुर्नवसनाची गोष्ट आहे की, मी दोन–तीन सुचना देवू इच्छितो की, याबाबत कुणी या अगोदर सुध्दा सांगितले असेल, घर दुरुस्ती परवानगी त्याबाबत आपण लवकरात लवकर विचार केला पाहिजे. कारण की, ज्या कुणाचे घर, दुकान, गोदाम वाहून गेले आहे त्यातील काही लोक त्यांची दुरुस्ती करु इच्छितात. सरकारच्या मदतीची त्यांना भलेही आवश्यकता आहे, परंतु सध्या ते अन्य कोठुन तरी कर्ज वगैरे काढुन दुरुस्ती करु इच्छितात. म्हणुन घर दुरुस्ती परवानगी बाबत आपण त्वरीत विचार केला पाहिजे व आयुक्त साहेबांनी सांगितले पाहिजे की, त्यांना लवकरात लवकर घर दुरुस्ती परवानगी कशी मिळेल? एक वर्षासाठी कर माफ, तर मला असे वाटते की, केवळ मालमत्ता करच माफ न करता जसे ठाणे महानगरपालिकेने केले आहे त्याप्रमाणे पाणी बिलेही माफ केली पाहिजे. कारण की जर आपण सरकारी सहाय देवू शकत नसू किंवा ती मिळण्यास फार वेळ लागणार असेल तर जर महानगरपालिका थेट काही आर्थिक मदत करु शकत नसेल तर अप्रत्यक्षरित्या त्यांना आर्थिक मदत केली पाहिजे की जसे ठाणे महानगरपालिकेने केले आहे, सरकारी टॅक्सेस जसे की, शिक्षण उपकर, रोजगार हमी उपकर, वृक्ष कर इत्यादी कर सोडुन बाकीचे कर माफ केले पाहिजेत. महापालिकेचे जे कर आहेत भलेही तो मालमत्ता कर असो, पाण्याचे बिल असो हे सर्व कर माफ झाले पाहिजेत. महानगरपालिकेचे जे काही कर आहेत ते माफ करण्याबाबत एक बैठक बोलावली पाहिजे. त्याबाबत ठराव पारीत करण्याविषयी आपण विचार केला पाहिजे. तिसरी गोष्ट अशी की, मी आपले लक्ष एका गोष्टीकडे वेधु इच्छितो उल्हासनगर स्टेशनच्या बाहेर व चांदीबाई कॉलेजच्या मध्ये एक मोठा पूल आहे तेथुन मुंबईकडच्या किंवा कर्जतकडच्या लोकल ट्रेन पकडण्यासाठी उल्हास स्टेशनवर जाण्यासाठी बरेचसे प्रवासी या पुलावरुन ये–जा करत असतात व चांदीबाई कॉलेजचेही हजारो विदयार्थी जे बाहेर गावावरुन चांदीबाई कॉलेज येथे येत असतात ते या

पुलावरुनच ये–जा करतात. तर येथे जो मोठा पूल आहे त्याची जी स्थिती आहे जसे हिराघाट येथे जो पूल आहे त्याच्या दुरुस्तीचे काम चालु आहे. तर मला असे वाटते की, याबाबत सुध्दा आपण विचार केला पाहिजे. तर हा जो पूल आहे त्याची स्थिती अतिशय गंभीर झाली आहे. या पूलाच्या दोन्ही बाजुला रेलिंगस् आहे. लहान जो पूल होता तो पडुन पुर्णपणे वाहून गेला आहे. परंतु जो मोठा पूल आहे त्याच्या दोन्ही बाजुला ज्या रेलिंगस् आहेत त्या रोलिंगस् गायब झाल्या आहेत व पूलाच्या मध्यभागातील आर.सी.सी. चा जो भाग आहे तो सुध्दा ब–याचशा ठिकाणी तुटला आहे. जसे रस्त्यामध्ये आर.सी.सी.चा भाग व पॅसेज तुटत नसतो. परंतु पूलाच्या आर.सी.सी. चा जो भाग आहे त्यामध्ये दोन–चार मोठमोठे खड्डे, ते खड्डे सुध्दा एवढे मोठे आहेत की, त्यातुन माणुस पडु शकतो व त्याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे मला वाटते याबाबत आयुक्त साहेबांचे कुणी लक्ष वेधलेले दिसत नाही. तर मला असे वाटते की, आयुक्त साहेबांनी त्या जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन त्याबाबत विचार केला पाहिजे. नाही तर असे होईल की, जशी हिंदीमध्ये एक म्हण आहे '' आसमान से गिरा, खजुर मे अटका'' मोठया संकटातुन आपण वाचलो आहोत. असे नाही की, यानंतर एखादी मोठी घटना घडावी. म्हणुन याबाबत आपण लक्ष दिले पाहिजे. दुस–या एका गोष्टीकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. एका खाजगी ठेकेदाराबाबत येथे मुद्दा उपस्थित झाला. त्याने सुध्दा पहिल्या दोन–तीन दिवशी महानगरपालिकेला कचरा उचलण्याच्या कामामध्ये अयशस्वी केले व त्याच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई केली पाहिजे? त्याबाबत सुध्दा विचार केला पाहिजे. त्याने सुध्दा आपल्या गाडया एका ठिकाणी उभ्या करुन महानगरपालिकेस अडचण निर्माण करु नये. जसे आपण करतो की, अग्नीशमन दल दोन–तीन ठिकाणी दूर–दूर निर्माण केले जातात. संगणक खरेदी करतो तर त्याचा जो बॅकअपचा जो प्लान असतो, तर याच्यात सुध्दा बॅकअपचा प्लॉन पाहिजे होता तो झाला नाही. तर त्यावर काय कारवाई केली जावु शकते त्याच्यावर सुध्दा विचार झाला पाहिजे. त्यानंतर आणखी एक गोष्ट आहे त्याबाबतीत आपणांस विचार करावा लागेल की हे जे पुरग्रस्त विभाग आहेत तेथे आपल्या ज्या शाळा आहेत, महापालिकेच्या प्राथमिक शाळा आहेत, तेथे आमच्या शहरातील बरेचसे विदयार्थी शिक्षण घेत असतात, पुरग्रस्त विभागातील गरीब कुटुंबातील जे विदयार्थी शाळांमध्ये जातात, त्या मुलांची वहया–पुस्तके पुराच्या पाण्यात वाहून गेली आहेत. कित्येक ठिकाणी मी स्वत: जावून पाहिले आहे. व जर आपण सर्व साधारण स्थिती याबाबत आणु इच्छित असाल आपणांस असे वाटले पाहिजे की आपण पुरपस्थितीतुन बाहेर निघालो आहोत. तर मला असे वाटते की, शिक्षण मंडळाने विलंब केला आहे. आता एक महिना होत आला आहे. त्या मुलांना शिक्षण मंडळ किंवा महापालिकेच्या वतीने लवकरात लवकर आपण वहया–पुस्तके कशी देवु शकतो याचा सुध्दा विचार केला पाहिजे तर मला असे वाटते की, मदतीच्या नंतर पुनर्वसनाबाबत आपण जर उपाययोजना केली तर पुरग्रस्त लोकांना आपण ख–या अर्थाने मदत केल्या सारखे होईल. एवढे दोन शब्द मी बोलू इच्छितो. जय हिंद जय महाराष्ट !

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :–</u> मा. महापौरजी, आयुक्त व येथे उपस्थित असलेल्या माझ्या सर्व सहका–यांनो, श्री. बोडारे साहेबांनी व माझे मित्र श्री. रुपचंदानी यांनी जी आज लक्षवेधी सुचना दिली आहे त्याबाबत माझ्या कित्येक सहाका–याने बरीच चर्चा केली आहे. एक वेळ तर मी अशा विचारापर्यंत येवुन ठेपलो की, आता मला बोलले नाही पाहिजे व मी बोलण्यासाठी आता काही राहिलेलेच नाही. परंतु आज महासभेत येता–येता रस्त्यामध्ये हिंद सत्ता पेपर माझ्या हातामध्ये आला. बाहेर त्याचे वाटप करत होते कदाचित प्रत्येक सदस्यास त्याचे वाटप केले जात होते. मला सुध्दा दिला. त्यामध्ये मुख्य मथळा आहे की, ''आझाद देश का गुलाम आयुक्त'' व समोर आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांचे छायाचित्रही छापलेले आहे. मी विचार केला की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी अशी कोणती गोष्ट केली आहे की, त्यांच्या बाबत बातमीचा असा मथळा आला आहे. येथे सभेमध्ये बसल्या बसल्या मी ती बातमी वाचली व तिचा शेवटचा परिच्छेद मी या सभेमध्ये सुध्दा वाचुन दाखवेन. शेवटचा जो परिच्छेद आहे की, आयुक्त श्री. रामनाथ सोनावणे या पुर्ण प्रकरणामध्ये पुरग्रस्तांना मदत पोहचविण्यासाठी व्यस्त असल्याचे दर्शवित आहेत. परंतु वास्तविकता, सत्यता ही आहे की, आमदार श्री. पप्पु कालानी व त्यांची पत्नी, महापौर श्रीमती ज्योती कालानी यांच्या इशा–यावर, ज्यांच्या घर व अंगणामध्ये एक थेंब सुध्दा पाणी जमा झाले नव्हते. अशा वस्त्यांमध्ये व विभागांमध्ये पूरग्रस्तांना देण्यात येणा–या मदतीचे वाटप केले ज्यामध्ये वर उल्लेख आलेले सत्ताधारी सर्व लोकप्रतिनिधी व लाखो रुपयांची खाद्य सामुग्री आपल्या आपसातील मतदारांना वाटप करण्याची मोकळीक दिली व यामध्ये पक्षपातीपणा करुन स्वतंत्र देशाचा हा आयुक्त राजनैतिक लोकांचा गुलाम मानला जात आहे. हा परिच्छेद वाचुन खुपच दु:ख होत आहे. हे जे मी आता वाचुन दाखविले त्यानुसार हा केवळ आयुक्तांवरच केलेला हल्ला नसुन सर्व लोकप्रतिनीधींवर सुध्दा हल्ला केल्यासारखे आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, वर्तमानपत्रातील बातमीवर सभागृहात चर्चा होता कामा नये. या बातमीवर आम्ही निवेदन देवू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> सभागृहात वर्तमानपत्रातील बातमीवर कधीही चर्चा होत नसते.

**यावेळी मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. धनंजय बोडारे, श्री. लाल पंजाबी व इतर काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत होते. त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> वर्तमानपत्रातील बातमीवर येथे चर्चा होता कामा नये. आपण ती बातमी सभागृहात वाचुनच दाखववायस नको होती. एका माणसाने शहरासाठी दिवसरात्र जागून चांगले काम केले, त्याचे जर आपण अभिनंदन करु इच्छित नसाल तर कमीत कमी त्याच्याबाबत आलेली चुकीची बातमी सभागृहात वाचुन दाखवू नका. हे काय झाले? कपडयामध्ये गुडाळुन मारण्यासारखे झाले. याविषयावर चर्चा होता कामा नये. ज्या माणसाने चांगले काम केले आहे त्याची प्रशंसा करा. आमचा कप्तान चांगला आहे. अधिकारी जर कितीही चांगले असतील आणि कप्तान जर चांगला नसेल तर अधिकारी काहीही करु शकणार नाहीत. प्रशंसा कप्तानची झाली पाहिजे. ज्या माणसाने चांगले काम केले आहे त्यास ओल्या कपडयांमध्ये गुंडाळुन मारण्याचे काम करु नका.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :–</u> मला बोलू दिले जावे. आज सर्वात शेवटी मी यासाठी बोलणे सुरु केले की, सर्वांचे बोलुन झालेले आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, हा जो हल्ला केला आहे तो सर्व लोकप्रतिनिधींवर केला आहे. मी ही गोष्ट इतिवृत्तात आणु इच्छितो की, महाराष्ट्र राज्याच्या ४५ वर्षाच्या इतिहासामध्ये व त्या अगोदरच्या मुंबई राज्य व मुंबई प्रसिंडेंन्सी यांचा १००–१५० वर्षाचा इतिहास आपण पाहिला तर अशा प्रकारचे नुकसान महाराष्ट्र राज्याच्या व मुंबई राज्याच्या लोकांनी कधीही पाहिलेले नाही. अशा प्रकारचे हे नुकसान पहिल्यांदाच या विभागामध्ये झाले आहे. ज्यामध्ये ना केवळ मुंबई सारखे शहर ज्यास महाराष्ट्र शासन व भारत सरकार शांघाय करु इच्छित आहे जी देशाची आर्थिक राजधानी आहे. ठाणे जिल्हा जो महाराष्ट्र राज्यातच नाही तर पुर्ण देशामध्ये विकसित असे जे जिल्हे आहेत त्यांमध्ये आपली स्वत:ची एक ओळख निर्माण करीत आहे. रायगड जिल्हा व महाराष्ट्रातील इतर काही जिल्हे पुरग्रस्त झाले. २००० पेक्षा अधिक लोकांचे प्राण गेले आहे. पुरामध्ये व पुरानंतर जी भिषण रोगराई पसरली आहे त्यामध्ये जवळ जवळ ३५ हजार करोड रुपयांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा मुंबई अयशस्वी ठरली, जेव्हा ठाणे जिल्हा अयशस्वी ठरला, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका अयशस्वी ठरली, रायगड जिल्हा अयशस्वी झाला अशा परिस्थितीमध्ये उल्हासनगर जो आहे तो पुरपरिस्थितीतुन वर आला. उल्हासनगर महानगरपालिकेचे आयुक्त असोत, त्यांची पुर्ण यंत्रणा असोत, उल्हासनगरचे लोकप्रतिनिधी असोत, आमदार श्री. पप्पु कालानी असोत, महापौर श्रीमती ज्योती कालानी असोत, महानगरपालिकेतील सर्व राजकीय पक्षांची जी नेते मंडळी आहेत आमचे विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे, श्री. लाल पंजाबी असोत किंवा बच्चाराम रुपचंदानी असोत किंवा महाराज भुल्लर असोत किंवा किशोर वनवारी असोत, श्री. दिलीप लालवानी असोत, किंवा कॉग्रेसचे आमचे जे नेतागण आहेत, इतर काही पक्षांचेही नेतागण आहेत, परंतु जेवढे काही नगरसेवक आहेत ज्यास जेथे–जेथे सेवा करण्याची संधी मिळाली ती त्याने सोडली नाही. एवढेच नाही लोकप्रतिनिधी सोडुन उल्हासनगरमधील स्वंयसेवी संस्थांनी जे मदत कार्य केले त्याने उल्हासनगरचे नाव महाराष्ट्रामध्ये प्रथम श्रेणीमध्ये लिहिले आहे. याचे मी उदाहरण देवु इच्छितो की, जेव्हा आमदार श्री. पप्पु कालानी व मी मोहने गाव पाहण्यासाठी गेलो होतो त्याच्या शेजारी गाळेगाव नावाचे जे गाव आहे जेथे टाटाचा टॉवर तुटला होता ज्यामुळे संपुर्ण शहरातील विदयुत पुरवठा बंद झाला होता, शहरातील पाणी पुरवठयाची व्यवस्था बंद झाली होती, त्या गावामध्ये जेव्हा लोक पोहचले तेव्हा तेथिल लोकांनी म्हटले की, आमदार साहेब आपल्या उल्हासनगर मधील स्वंयसेवी संस्थांनी येथे येवून आम्हांस मदत केली आहे आमच्या मदतीसाठी दुसरा कुणीही येथे आला नाही. एवढेच नाही तर खडेगोलवली गाव असो, म्हारळ असो, वरप असो, जितकीपण उल्हासनगर शहराच्या आजुबाजुची गावे आहेत, त्यांमध्ये उल्हासनगरमधील स्वंयसेवी संस्थांनी मग ती ब्रम्हकुमारीज् संस्था असो, रोटरी क्लब, रोटरी क्लब मिड टाउन असो, किंवा अशा ज्या काही इतर संस्था आहेत, किंवा स्वामी शांतीप्रकाश यांचा आश्रम असो किंवा चालीया साहेब आश्रम असो किंवा साधुवासवानी मिशन असो अशा ज्या काही संस्था आहेत, अशा संस्थांनी शहरामधील अशा परिस्थितीमध्ये काम केले आहे. महानगरपालिकेचे अधिकारी व त्यांचे सरसेनापती, मा. आयुक्त त्यांना मी अतिशय चांगल्या पध्दतीने

ओळखतो. पहिल्या, दुस—या दिवसापासुन जेव्हा २६—२७ जुलैला पूराचे पाणी शहरामध्ये आले, २७ व २८ तारखेस दररोज मा. आमदार, आयुक्त व मी दररोज एकमेकांना भेटत राहिलो. मला असे नाही वाटत की, नैसर्गीक आपत्तीच्या वेळी २४ तासामध्ये दोन तासापेक्षा अधिकवेळ या आयुक्तांनी झोप घेतली असेल. एवढेच नाही तर शहराचा आमदार आयुक्तांना मदत करण्यासाठी महापौरांना घेवुन जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये मला घेवुन बैठका घेत राहिले व शहरातील मदत कार्यासाठी जेवढी काही साधनसामुग्री गोळा करायची होती ती गोळा करत राहिले. मा. मुख्यमंत्री महोदयांकडे सभा झाली सहयाद्री गेस्ट हाउस वर जी सभा झाली त्यामध्ये महापौर व उपमहापौर या दोघांनीही सहभाग घेतला. व या शहरासाठी अधिकाधिक मदत कार्य मिळविण्यासाठी प्रयत्न केले. आमदारांनी, मी व महापौरांनी शहरातील विदयुत पुरवठा लवकरात लवकर पुर्वव्रत करण्यासाठी विदयुत विभागाबरोबर कमीत कमी आठ—दहा बैठका घेतल्या आहेत. एवढेच नाही तर पाणी पुरवठा विभाग जो विदयुत विभागांवर अवलंबुन होता, आम्ही स्वतः एमएसईबीच्या अधिका—यांना भेटण्यासाठी मोहने गाव येथे गेलो. तेथे ते लोक साईटवर उभे होते व त्यांना सांगण्यात आले की, हा टॉवर उभा करुन शहरातील विदयुत पुरवठा लवकरात लवकर पुर्वव्रत झाला पाहिजे. हे सर्व काम आम्ही केले होते. मी आपल्या डोळयांनी पाहिले की, खडेगोलवली मध्ये जेव्हा पूराचे पाणी वेगाने वाहत होते, आमदार श्री. पप्पु कालानीचा मुलगा श्री. ओमी कालानी आपल्या सहकार्यांबरोबर व त्यांच्याबरोबर जनादेश वृत्तवाहिनीचे जे पथक होते त्यांनी कित्येक लोकांचे प्राण वाचविले. अशा प्रकारचे काम केल्यानंतर वर्तमानपत्रामध्ये अशा प्रकारची जी टिका होते त्यामुळे फार मोठे दुःख होते. या शहरामध्ये जेवढे मदत कार्य झाले आहे जवळ—जवळ १० करोड रुपये मदत कार्य म्हणुन या शहरामध्ये पुरग्रस्तांना वाटप करण्यात आले आहेत. ही काही लहानशी गोष्ट नाही. जेथपर्यंत व्यापा—यांचा व व्यवसायिकांचा प्रश्न आहे त्यांच्या बाबतीत जिल्हयाचे पालकमंत्री व राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे सुध्दा आम्ही निवेदने सादर केली आहेत. या शहरातील लहान —लहान उदयोगधंदयाचे जे नुकसान झाले आहे त्यांना सुध्दा नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. कारण की मी, मा. महापौर व मा. आमदार यांनी स्वतः जावुन यंत्रमागांची पाहणी केली आहे. तसेच कल्याण—अंबरनाथ रस्त्यांवर दोन्ही बाजुला जी दुकाने आहेत, किंवा विठ्ठलवाडीमध्ये बिस्कीटे व कन्फेक्शनरी यांचे जे कारखाने आहेत त्यांची आम्ही जी पाहणी केली त्यावरुन असे दिसते की, या व्यवसायिकांना पुर्व पदावर येण्यासाठी दोन ते तीन महिने लागतील. श्रमशक्तीचे नुकसान व वित्तहानी वेगळी आहे. आम्ही शासनाकडे मागणी केली आहे की, यांचे आर्थिक नुकसानीची भरपाई व्हावी त्याचबरोबर कारखान्यांचे व दुकानांचे जे नुकसान झाले आहे त्यांची दुरुस्ती करण्यासाठी महानगरपालिकेने त्यांना लवकरात लवकर दुरुस्तीची परवानगी दयावी. अशा प्रकारचे शासनाकडुन आयुक्तांना आदेश आले पाहिजेत. या पुरपरिस्थितीने आम्हांला असे दर्शवुन दिले आहे की, उल्हासनगर मधील जनता त्याचबरोबर महाराष्ट्रातील जनता ही साहसी आहे. मला नाही वाटते की पुर्ण देशभरामध्ये असे दुसरे कोणते उदाहरण मिळेल. या पुराने असे दर्शवुन दिले आहे की, उल्हासनगर मधील, ठाणे जिल्हयामधील, रायगड जिल्हयामधील, मुंबई मधील, महाराष्ट्रामधील जनता ही साहसी आहे. येथिल लोक कोणत्याही नैसर्गीक आपत्तीचा मुकाबला करण्याची हिम्मत ठेवतात. परंतु तरीही जसे आमचे मित्र, सहकारी यांचे जसे विचार आहेत अशी जी नैसर्गीक आपत्ती येते त्यावेळी महानगरपालिका, तहसिलदार कार्यालय, उपविभागीय कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय या सर्वांनी सतर्क राहिले पाहिजे व पुरपरिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याकामी आवश्यक ती साधनसामुग्री अगोदरपासुन आपल्या ताब्यात असली पाहिजे. ही अशी एक स्थिती होती की, जिचा कुणीही अंदाज लावु शकत नव्हता की अशी सुध्दा नैसर्गीक आपत्ती येवू शकते. मा. महापौरजी आपणांस व आयुक्तांना माझे निवेदन आहे की, अशी नैसर्गीक आपत्ती आली तर तिचा मुकाबला करण्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा सर्तक ठेवण्यासाठी उपाययोजना केली जावी. व यासाठी आपल्या पायाभुत सुविधा आणखी मजबुत केल्या जाव्यात. जेणेकरुन यापुढे अशी जर काही नैसर्गीक आपत्ती आली तर तिचा सहजासहसी मुकाबला करता येवु शकेल. पुरामध्ये ज्या लोकांचे प्राण गेले आहेत त्यांना मी आपल्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो व अशा प्रकारची नैसर्गीक आपत्ती अनुभवण्याचा उल्हासनगरवाशियांना, महाराष्ट्रवाशियांना, देशवाशियांना प्रसंग येवु देवु नये अशी मी परमेश्वराला प्रार्थना करतो. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—</u> मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब मी काही सुचना देवु इच्छितो, आता सर्वांनी बरीच चर्चा केली आहे, त्यामुद्दयांवर मी बोललो तर ती पुनरावृत्ती होईल, या लक्षवेधीवर बोलतांना सर्वात प्रथम आपल्या शहराचे मा. आमदार श्री. पप्पु कालानी, महापौर, उप—महापौर, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, सर्व पक्षांचे गटनेते सर्व सन्माननिय सदस्य यांनी पुरपरिस्थितीत जे बचाव कार्य केले त्याबद्दल त्यांना मी धन्यवाद देतो. आयुक्तांनी दिवसरात्र, २२—२२ तास काम करुन या शहरास व शहरातील ब—याचशा लोकांना वाचविले. त्यांना सुध्दा धन्यवाद देवू इच्छितो. तसेच येथिल

जनतेने दंगल वगैरे न करता मदत कार्यामध्ये आपणा सर्वांना सहकार्य दिले. त्याबद्दल सर्व जनतेला सुध्दा धन्यवाद देवु इच्छितो. ज्या–ज्या सामाजिक संस्थांनी मदतकार्य केले त्यांना सुध्दा मी धन्यवाद देवु इच्छितो. माझ्या शेजारी बसलेले सन्माननिय नगरसेवक श्री. विनोदजी ठाकुर यांनी सुध्दा पुरपरिस्थितीत फारच मोलाचे मदतकार्य केले. त्यांना सुध्दा धन्यवाद देवु इच्छितो. त्याचबरोबर येथे काही सुचना मी करु इच्छितो की ही जी समस्या उद्भवली, महानगरपालिकेची जर आपण यादी पाहिली तर त्यामध्ये आपणांस असे दिसुन येईल की, फक्त ९ प्रभागांमध्ये पुराचे पाणी आले होते. त्यापैकी सर्वात जास्त लोक जे प्रभावित झाले ते सन्माननिय सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. राजेंद्र चौधरी, श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे यांच्या प्रभागातील ५० हजार ८०० लोक पुराच्या पाण्याने प्रभावित झाले होते. त्यानंतर श्री. नाना पवार यांच्या प्रभागामध्ये ९ हजार १५० लोक पुराच्या पाण्याने प्रभावित झाले होते. त्यानंतर माझ्या प्रभागामध्ये नंतर श्री. प्रमोद टाले, श्रीमती प्रेमा खांडेकर, श्री. विनोद ठाकुर, श्रीमती मिना सोंडे यांचे जे प्रभाग आहेत या प्रभागांमधील १३ हजार लोक पुराच्या पाण्याने प्रभावित झाले होते. तसे पाहिले तर ९ प्रभाग असे आहेत की जे जास्त प्रभावित झाले. जसे आता श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितले की, १३ हजार पाकिटे येथे वाटप करण्यात आली. आयुक्त साहेब तर म्हणतात १६ हजार पाकिटे वाटप करण्यात आलीत. व त्यांनी २० हजार पाकिटांची ऑर्डर दिली होती तर ही पाकिटे सर्व लोकांना मिळाली नाहीत जर येथे २५ हजार कुटुंबे प्रभावित होत असतील तर २५ हजार लोकांना पाकिटे मिळाली पाहिजेत. यासाठी मी येथे विचारु इच्छितो, यापुढे आपण जे कोणतेही आश्वासन आपण दयाल किंवा जे कोणतीही मदत सामुग्री दयाल तर ती सर्वांना मिळाली पाहिजे. ज्यांना मदत सामुग्री मिळाली नाही ते नगरसेवकांच्या मागे फिरत आहेत व त्यांनी म्हटले आहे की यामध्ये काही भ्रष्टाचार झाला आहे. एकतर नगरसेवकांनी अपहार केला असावा किंवा प्रशासनाने ही पाकिटे गायब केली असतील. यासाठी असे होवू नये, दुसरी गोष्ट अशी की, येथे जी टॅंकरची सुविधा उपलब्ध केली, आयुक्त साहेबांनी म्हटले की, त्यांनी येथे २२ टॅंकर मागविले होते, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांना सुध्दा मी धन्यवाद देवू इच्छितो, कारण की जेव्हा २६ व २७ तारखेला शहरामध्ये पिण्याचे पाणी येत नव्हते त्यावेळी त्यांनी आपल्या ४ टॅंकर मधुन शहराला निशुल्क पाणी पुरवठा केला. त्यांनी ६० टॅंकर निशुल्क पाणी पुरवठा केला. त्यांनी समाजसेवेच्या माध्यमातुन हे कार्य केले. आयुक्त साहेबांना मी दुसरी एक सुचना करु इच्छितो की, शहरामधील जे मोठ–मोठे नाले आहेत त्यांची आता दुरुस्ती केली जावी. घर बनविण्याची परवानगी सर्वांना दिली जावी. अग्निशमन दल व नैसर्गीक आपत्ती कक्ष यामधील यंत्रणा सक्षम केली जावी कारण की मदत कार्यामध्ये याच पथकाची जास्त मदत घेतली जाते. जे लोक नालीमध्ये कचरा टाकतात त्यांच्यावर दंड आकारला जावा व आयुक्त साहेबांनी जो गोषवारा दिला आहे त्यामध्ये लिहिले आहे की, प्राथमिक शाळांमध्ये जे विदयार्थी शिक्षण घेत आहेत...........

<u>मा. सचिव :–</u> कृपया लक्ष दया, मा. महापौर व मा. उप–महापौरांसह यावेळी फक्त २२ सदस्य उपस्थित आहेत. गणपुर्ती नाही आहे. गणपुर्ती नसल्याने सभेचे कामकाज चालविता येणार नाही.

१. श्री. एडके गणपत
२. श्रीमती शर्मा कमला
३. श्री. वलेचा पृथ्वी
४. श्री. रोहडा श्यामसुंदर
५. श्री. गुप्ता प्रभुनाथ
६. श्री. पवार नाना
७. श्री. जग्यासी राजु
८. श्री. निकम शांताराम
९. श्री. ठाकुर विनोद
१०. श्री. वनवारी किशोर
११. श्रीमती खिलनानी भावना
१२. श्री. पमनानी ईश्वर
१३. श्री. पंजाबी नारायण
१४. श्री. लबाना होशियारसिंग
१५. श्री. ठाकुर नरेंद्र
१६. श्रीमती रिझवानी सुजाता

१७. श्री. मोकल चंदाराम
१८. श्री. टाले प्रमोद
१९. श्रीमती मोकल सिमा
२०. श्री. गायकवाड दिलीप

या सदस्यांना सोडुन बाकी सर्व सदस्य सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— मी आपणांस विनंती करु इच्छितो ज्या नगरसेवकांच्या प्रभागामध्ये पुराचे पाणी आले होते त्यांना आजच्या या सभेमध्ये बोलु दिले नाही. ज्या नगरसेवकांच्या प्रभागामध्ये पुराचे पाणी आले नव्हते त्यांना येथे बोलु दिले गेले. आम्हां लोकांना सुध्दा काही सुचना करावयाच्या होत्या. आणखी दुसरी काही आमची तक्रार नाही.

**मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव, श्री. संजय बठिजा, श्रीमती रेखा कारीरा, श्री. टेकचंदानी राजु हे** सभागृहातुन बाहेर गेले. 

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल :— मा. महापौरजी, उप—महापौरजी............

काही सदस्य :— गणपुर्ती नाही, गणपुर्ती नाही..........

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— मा. महापौरजी, ही चर्चा पुढील महासभेत चालु राहिल एवढेच मी सांगु इच्छितो. धन्यवाद.

मा. सचिव :— नाही, नाही असे चालणार नाही. लक्षवेधी सुचनांवरील चर्चा आज येथेच समाप्त होत आहे. कायदयानुसार आपणांस यावर पुढील महासभेत बोलता येणार नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— मला बोलायचे होते.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— दोन—तीन लोकांना बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— मा. महापौरजी, जेव्हा संपुर्ण शहर मदत कार्यात गुंतले होते........

मा. महापौर :— या सभेचे कामकाज स्थगित करण्यात येत असून ही सभा आता २४ तारखेला सायंकाळी ४.०० तारखेला हाईल.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— सचिव साहेब, ही चर्चा पुढे चालु राहिल ना? कृपया याचा आता खुलासा करा.

मा. सचिव :— मा. महापौरांच्या आदेशानुसार आपणांस सुचित करण्यात येते की, ही सभा २४ तारखेजा ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.४० वाजता सभेचे कामकाज दिनांक २४/८/२००५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२४ ऑगस्ट, २००५

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/८/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १८.०८.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती सदरची सभा बुधवार दिनांक २४.०८.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती जावळे संगिता | २२. | श्री. रुपचंदानी बच्चाराम |
| ३. | श्री. सोनवणे नथु | २३. | श्री. चव्हाण रमेश |
| ४. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | २४. | श्री. जाधव प्रशांत |
| ५. | श्रीमती मोकल सीमा | २५. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ६. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | २६. | श्री. भालेराव गौतम |
| ७. | श्री. एडके गणपत गोविंद | २७. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई |
| ८. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | २८. | श्रीमती भटिजा कोमल |
| ९. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | २९. | श्रीमती माखिजा किरण |
| १०. | श्री. उमाप रामदास | ३०. | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| ११. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ३१. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| १२. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ३२. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार |
| १३ | श्री. पवार नाना | ३३. | श्रीमती छाब्रिया भारती |
| १४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ३४. | श्री. बठीजा संजय रामचंद्र |
| १५. | श्री. जग्यासी राजु | ३५. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| १६. | श्री. खांडेकर प्रेमा | ३६. | श्रीमती दासानी मिनु |
| १७. | श्री. टाले प्रमोद | ३७. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| १८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ३८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| १९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ३९. | श्री. माखिजा हरदास |
| २०. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ४०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २१. | श्रीमती भावना खिलनानी | | |

तर,

मा. महापौर १. श्रीमती ज्योती कालानी व मा. सदस्य / सदस्या २. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, ३. श्री. टेकचंदानी राजु, ४. श्रीमती रामचंदानी भावना, ५. श्री. वाघे शामु बाबु, ६. श्री. दिलीप गायकवाड, ७. श्री. मुलचंदानी महेंद्र, ८. श्री. यादव लालबिहारी बुझारत, ९. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, १०. श्रीमती अनिता गुप्ता, ११. श्री. निकम शांताराम, १२. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), १३. श्रीमती मसंद माया घनश्यामदास, १४. श्री. सुरेश नामदेव गायकवाड, १५. श्रीमती वनवारी मोना अशोक, १६. श्री. साधवानी मोहन, १७. श्रीमती साधवानी जया, १८. श्री. लुंड गोविंदराम डोलुमल, १९. श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर, २०. श्रीमती माने किरण, २१. श्री. जाधव सुरेश, २२. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, २३. श्रीमती. जयश्री सुर्वे, २४. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल, २५. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, २६. श्रीमती कृष्णानी रेखा, २७. श्रीमती वसिटा बेबी, २७. श्री. पाटील विश्वनाथ, २९. श्री. ठाकुर अशोक, ३०. श्री. अंकुश म्हस्के, ३१. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम, ३२. श्री. साधवानी मनोज, ३३. श्री. पंजाबी नारायण, ३४. श्रीमती पंजाबी दिपा, ३५. श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद, ३६. श्री. जयसिंघानी अनिल, ३७. श्री. रामरख्यानी मोहनदास, ३८. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ३९. श्रीमती करोतिया मालती, ४०. श्री. वदारिया राजेश, ४१. श्री. बेहराणी ठाकुरदास, हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.४० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :—** मा. महापौरजी, उल्हासनगरचे रहिवाशी मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे विख्यात वकिल व सिंधी समाजाचे जेष्ठ नेते अॅड. श्री. नारी गुरसहानी यांचे दिनांक २२/८/२००५ रोजी निधन झाले आहे, सभागृहाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

---

**शोक प्रस्ताव**

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

उल्हासनगरचे रहीवाशी मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे विख्यात वकिल व सिंधी समाजाचे जेष्ठ नेते अॅड. श्री. नारी गुरसहानी यांचे दिनांक २२/८/२००५ रोजी निधन झाले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ४१ क** **दिनांक:—२४.८.२००५**

[

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार अॅड. श्री. नारी गुरसहानी यांचे निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>** मा. महापौरजी, आजच्या सभेचे कामकाज चालु होण्याअगोदर मी एक निवेदन करु इच्छितो की, जसे की, आयुक्त साहेबांची सुध्दा प्रकृती बरोबर नाही. तसेच माझे असेही ऐकण्यात आले आहे की, आमचे मा. सदस्य श्री. भुल्लर महाराज यांचीही प्रकृती ठिक नाही व त्याचबरोबर आमचे सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांची सुध्दा प्रकृती ठिक नाही. याचबरोबर माझी सुध्दा प्रकृती बरोबर नाही. आवश्यक त्या सर्व तपासण्या मी केल्या आहेत, तपासणी अहवाल प्राप्त होण्याचा बाकी आहे. तर ज्या ज्या सन्माननिय सदस्यांनी शहरासाठी पुरपरिस्थितीत काम केले आहे, अशा बहुतांश सदस्यांची प्रकृती ठिक नसल्यामुळे ते आज येथे उपस्थित नाहीत. आम्हांला असे वाटते की, परमेश्वराने कुणालाही आजार किंवा दु:ख देवु नये. परंतु या आजारामधुन जे वाचतील ते खरोखर भाग्यशाली आहेत. तर सभागृहास माझी विनंती आहे, विरोधी पक्ष नेता सुध्दा आज सभेस नाहीत, मा. महापौरजी सुध्दा उपस्थित नाहीत, तसेच आज आमच्या सिंधी बांधवांचा थदडी हा एक सण सुध्दा आहे, तर आजच्या या सभेचे कामकाज स्थगित करुन पुढील सभेची वेळ जी आपणांस सोयीस्कर ठरेल त्या दिवशी सभा आयोजित करण्यात यावी.

**<u>मा. पीठासीन अधिकारी :–</u>**आजच्या या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

**<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>** मा. महापौरजी, सभेचे कामकाज स्थगित करण्यापुर्वी आमचे जेवढे काही सहकारी आजारी आहेत, जसे की आमचे आयुक्त साहेब आहेत, त्याचबरोबर आमचे काही सन्माननिय नगरसेवकही आहेत या सर्वांची प्रकृती ठिक व्हावी म्हणुन दोन मिनिटांसाठी प्रार्थना करण्यात यावी अशी माझी इच्छा आहे.

**<u>मा. पीठासीन अधिकारी :–</u>**दादा नारी गुरसहानी यांना श्रध्दांजली वाहिल्यानंतर आजच्या या सभेचे कामकाज पुढील तारीख निश्चित करे पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

**<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>**जे आजारी आहेत त्यांची प्रकृती लवकरच ठिकठाक व्हावी म्हणुन त्यांना शुभेच्छा !

**<u>मा. सचिव :–</u>**मा. पिठासीन अधिका–यांच्या आदेशानुसार ही सभा पुढील सुचना मिळेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.४५ वाजता सभेचे कामकाज पुढील सुचना देईपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे मा. पीठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—५ सप्टेंबर, २००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ५/९/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १८.०८.२००५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित झाल्याने ती सभा बुधवार दिनांक २४/८/२००५ रोजी आयोजित करण्यात आली परंतु सदरची सभा पुन्हा स्थगित करुन सदर सभा सोमवार दिनांक ५/९/२००५ रोजी आयोजित करण्यात आली. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्मानिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. टेकचंदानी राजु | २८. | श्रीमती भावना खिलनानी |
| ४. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | २९. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ५. | श्री. वाघे शामु बाबु | ३०. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर |
| ६. | श्रीमती मोकल सीमा | ३१. | श्रीमती माने किरण |
| ७. | श्री. दिलीप गायकवाड | ३२. | श्री. जाधव प्रशांत |
| ८. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ३३. | श्री. जाधव सुरेश |
| ९. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३४. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| १०. | श्री. एडके गणपत गोविंद | ३५. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३६. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३७. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३ | श्री. उमाप रामदास | ३८. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १४. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ३९. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १५. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४०. | श्री. भालेराव गौतम |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४१. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्रीमती अनिता गुप्ता | ४२. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्री. पवार नाना | ४३. | श्री. पंजाबी नारायण |
| १९. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ४४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २०. | श्री. जग्यासी राजु | ४५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २१. | श्री. निकम शांताराम | ४६. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २२. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४७ | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २३. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ४८. | डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २४. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ४९. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २५. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ५०. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २६. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ५१. | श्री. माखिजा हरदास |
| २७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती संगिता जावळे, २. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, ३. श्री. सोनवणे नथु, ४. श्रीमती रामचंदानी भावना, ५. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ६. श्री. टाले प्रमोद, ७. श्री. सुरेश नामदेव गायकवाड, ८. श्रीमती वनवारी मोना अशोक, ९.श्री. साधवानी मोहन, १०. श्रीमती साधवानी जया, ११. श्रीमती खांडेकर प्रेमा, १२. श्री. चव्हाण रमेश, १३. श्रीमती वसिटा बेबी, १४. श्री. पाटील विश्वनाथ, १५. श्री. ठाकुर अशोक, १६. श्री. अंकुश म्हस्के, १७. श्रीमती पंजाबी दिपा, १८. श्री. साधवानी मनोज,

१९. श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद, २०. श्रीमती भटिजा कोमल, २१. श्री. जयसिंघानी अनिल, २२. श्री. रामरख्यानी मोहनदास, २३. श्रीमती माखिजा किरण, २४. श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश, २५. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, २६. श्रीमती करोतिया मालती, २७. श्रीमती मीनु राजकुमार दासानी, २८. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २९. श्री. लालवानी दिलीप जेठानंद, ३०. श्री. राजेश वदारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव:–</u>कॉग्रेस पक्षाच्या वतीने गटनेता पदासाठी श्री. अशोक ठाकुर यांची निवड करण्यांत आलेली आहे. त्या आशयाचे पत्र मा. महापौर यांना प्राप्त झाले आहे व मा. महापौरांनी त्यास स्विकृती दिलेली आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :–** मागील महासभेचे दिनांक २०/७/२००५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>**काही सदस्य :–**</u> पास–पास..........

<u>मा. सचिव :–</u> इतिवृत्त कायम? कुणाची काही हरकत?

<u>मा. महापौर :–</u>मागील सभेचे दिनांक २०.७.२००५ चे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ३ :–** उल्हासनगर शहरात ६ नवीन नागरी आरोग्य केंद्रे सुरु करणे व शासकीय नागरी आरोग्य केंद्रांचे महापालिकेकडुन व्यवस्थापन करणेकामी आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती ठराव क्र. २, दिनांक १८/७/२००५ कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u> पास–पास........

<u>मा. महापौर :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

प्रस्तावना:–

**विषय क्र. ३ :–** उल्हासनगर शहरात ६ नवीन नागरी आरोग्य केंद्रे सुरु करणे व शासकीय नागरी आरोग्य केंद्रांचे महापालिकेकडुन व्यवस्थापन करणेकामी आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती ठराव क्र. २, दिनांक १८/७/२००५ कायम करणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर नगरपरिषदेत उल्हासनगर शहरातील नागरीकांना आरोग्य सेवा देण्यासाठी केवळ एक नगरपरिषद दवाखाना कार्यान्वित होता.

[illegible] महापालि

कुटुंबकल्याण, माताबालसंगोपन, साथनियंत्रण, क्षयरोग नियंत्रण, कुष्ठरोग निर्मुलन आदि Outreach / Doorstep मुलभुत सेवा देण्यासाठी नागरी आरोग्य केंद्राची प्रमुख भुमिका आहे. उल्हासनगर शहरात सध्या राज्य शासनाची ६ नागरी आरोग्य केंद्र खालील ठिकाणी कार्यरत आहेत.

| अ.क्र. | नागरी आरोग्य केंद्र क्र. | पूर्ण पत्ता | अधिनस्त लोकसंख्या | प्रशासकिय व वित्तीय नियंत्रण |
|---|---|---|---|---|
| १. | नागरी आरोग्य केंद्र क्र. १ | साधुबेला हायस्कुल जवळ, उल्हासनगर–१ | ९३,४८६ | मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर–३. |
| २. | नागरी आरोग्य केंद्र क्र. २ | नेहरु चौक, उल्हासनगर–२. | ६०,१९३ | |
| ३. | नागरी आरोग्य केंद्र क्र. ३ | सम्राट अशोकनगर, उल्हासनगर–३. | ६५,००० | |
| ४. | नागरी आरोग्य केंद्र क्र. ४ | मातामंदीरजवळ, उल्हासनगर–३ | ७०,१२३ | |
| ५. | नागरी आरोग्य केंद्र क्र. ५ | व्ही.टी.सी ग्राऊंडजवळ, उल्हासनगर–४. | १,१९,८३३ | शासकीय प्रसृतीगृह, उल्हासनगर–४. |
| ६. | नागरी आरोग्य केंद्र क्र. ६ | भाजीमार्केट जवळ, उल्हासनगर–५. | ७५,१२६ | |

सदर सहा नागरी आरोग्य केंद्रासाठी राज्य शासनाची खालीलप्रमाणे पदे मंजुर आहेत. या पदांवर राज्य शासनाच्या सेवेतील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी कार्यरत आहेत.

| अ. क्र. | नागरी आरोग्य केंद्र क्र. संवर्ग | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ |
| २. | सार्वजनिक आरोग्य पारिचारिका | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ |
| ३. | प्रसाविका | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | २४ |
| ४. | बहुउद्देशिय पुरुष कर्मचारी | २ | २ | ३ | ४ | ३ | ३ | १७ |
| ५. | संगणक लिपिक | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ |
| ६. | चतुर्थ श्रेणी (स्त्री) | १ | १ | १ | १ | १ | १ | ६ |
| | एकुण | १० | १० | ११ | १२ | ११ | ११ | ६५ |

सदर सहा नागरी आरोग्य केंद्राचे प्रशासकीय व वित्तीय व्यवस्थापन राज्य शासनाच्या अखत्यारित शासकीय मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर–३ (नागरी आरोग्य केंद्र क्र. १ ते ४ चे व्यवस्थापन ) व शासकिय प्रसृतीगृह, उल्हासनगर–४ (नागरी आरोग्य केंद्र क्र. ५ व ६ चे व्यवस्थापन) यांचेकडुन चालविले जाते.

तथापि सदर सहा नागरी आरोग्य केंद्राच्या कामकाजाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांनी त्यांचे पत्र जा. क्र. आस्था/कक्ष–२/हेल्थ /पोस्ट/ नियंत्रण/७८०७–१४/०१, दिनांक ९/३/२००१ अन्वये वैद्यकिय आरोग्य अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांचेवर सोपविली आहे. त्यामुळे सध्या सदर सहा नागरी आरोग्य केंद्राचे प्रशासकिय व वित्तीय व्यवस्थापन राज्य शासनाच्या मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर–३ व शासकिय प्रसृतीगृह, उल्हासनगर–४ यांच्याकडे आणि या नागरी आरोग्य केंद्रातील कर्मचा–यांकडुन शहरातील नागरीकांना योग्य प्रकारे आरोग्य सेवा पुरविण्याची जबाबदारी उल्हासनगर महानगरपालिकेकडे अशी परिस्थिती आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीची स्वत:ची नागरी आरोग्य केंद्र आणि रुग्णालये नाहीत आणि राज्यशासनाच्या अखत्यारितील नागरी आरोग्य केंद्रांच्या व्यवस्थापनाची अवस्था वर उल्लेख केल्याप्रमाणे आहे. त्यामुळे उल्हासनगर शहरातील नागरीकांना आरोग्य विषयक विविध सेवा पुरविण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील/आदिवासी भागातील कुपोषण / साथरोग/ आरोग्यविषयक मुलभुत सेवांवर येत असलेला ताण याचा विचार करता राज्य शासन उल्हासनगर शहरातील शासनाची नागरी आरोग्य केंद्र आणखी किती काळ शहरात ठेवील याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. भविष्यात राज्य शासनाने उल्हासनगर शहरातील आरोग्य कर्मचारी ग्रामीण भागात हलविल्यास शहरातील सध्या सुरु असलेली नागरी आरोग्य केंद्र बंद होतील व परिणामत: नागरीकांना पायाभूत आरोग्य विषयक सुविधा ज्या सध्या काही अंशी पुरविण्यात येतात त्या देखील पुरविता येणार नाहीत. या सर्व बाबींचा विचार करता उल्हासनगर महानगरपालिकेने कार्यक्षेत्रातील नागरीकांना पायाभूत आरोग्य विषयक सेवा पुरविण्याच्या दृष्टीने तातडीने स्वत:ची आरोग्य विषयक यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांनी ''आर.सी.एच II आणि कुटुंबकल्याण कार्यक्रम अंमलबजावणी आराखडा'' च्या ड्राप्टमध्ये दर ५०,००० लोकसंख्येसाठी एक नागरी आरोग्य केंद्र सुचविले आहे.

तथापी उल्हासनगर शहराची सन २०११ ची लोकसंख्या विचारात घेता दर ५०,००० लोकसंख्येसाठी एक याप्रमाणे किमान १२ नागरी आरोग्य केंद्र सुरु करणे आवश्यक आहे. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीची १२ नागरी आरोग्य केंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची स्थापना होवुन दहा वर्षे पूर्ण होत आली आहेत, शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. शहरातील नागरीकांचे आरोग्य जपण्याची जबाबदारी उल्हासनगर महानगरपालिकेची आहे.

यास्तव उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कार्यरत असलेली शासनाची ६ आरोग्य केंद्रे महापालिकेने आपल्या ताब्यात घेणेकामी व उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या स्वत:च्या मालकीची ६ अशी एकूण १२ नागरी आरोग्य केंद्र सुरु करण्याकामीचा प्रस्ताव आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>आरोग्य परीरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती ठराव क्र. २</u> <u>दिनांक :—१८/७/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. नाना पवार

अनुमोदकाचे नाव :— श्री. अशोक ठाकुर

ही आरोग्य, परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव उल्हासनगर शहरातील नागरीकांना योग्य प्रकारे आरोग्य सेवा पुरविणे कामी सध्या कार्यरत असलेली महाराष्ट्र शासनाचे अर्थसहाय्याने ६ नागरी आरोग्य केंद्राचे प्रशासकिय / वित्तीय नियंत्रण व व्यवस्थापन महापालिकेकडुन चालविणे कामी शासनास शिफारस करणे व महापालिकेने स्वखर्चावर आणखी ६ नविन नागरी आरोग्य केंद्र स्थापन करणेस संमती देत आहे.

सूचकाची सही /—

अनुमोदकाची सही /—

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
आरोग्य, परिरक्षण व वैद्यकीय सहाय समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

महासभा ठराव क्र:– ४२ दिनांक:–५/९/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा उल्हासनगर शहरात ६ नवीन नागरी आरोग्य केंद्रे सुरु करणे व शासकीय नागरी आरोग्य केंद्रांचे महापालिकेकडुन व्यवस्थापन करणेकामी आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती ठराव क्र. २, दिनांक १८/७/२००५ कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :–विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ४ :– सन २००५–०६ या वर्षात श्री गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजित करणेकामी क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य समिती ठराव क्र. २, दिनांक १८/७/२००५ कायम करणे.

---

काही सदस्य :– पास...........

मा. महापौर :–सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

प्रस्तावना:–

**विषय क्र.** ४ :– सन २००५–०६ या वर्षात श्री गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजित करणेकामी क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य समिती ठराव क्र. २, दिनांक १८/७/२००५ कायम करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक समिती दरवर्षी गणपती सणाच्या वेळी श्री. गणेश दर्शन स्पर्धा आयोजित केली जाते. याही वर्षी सन २००५–२००६ साली उल्हासनगर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेश दर्शन प्रतियोगिताचे आयोजन करण्याचे योजिले आहे. प्रतियोगितेमध्ये मंडळास उत्कृष्ट मुर्ती, उत्कृष्ट देखावा, उत्कृष्ट विषय, उत्कृष्ट राष्ट्रीय एकत्मता देखावा, उत्कृष्ट धार्मिक वातावरण, उत्कृष्ट स्वच्छता, उत्कृष्ट शिष्टाचार, चलचित्र देखावा आणि अन्य विशेष प्रदर्शन

तसेच या वर्षापासुन शहरातील सर्व सार्वजनिक श्री. गणेश उत्सव मंडळातुन एका मंडळाच्या मुर्तीची उल्हासनगरचा राजा म्हणुन निवड करुन त्यांना एक वेगळे पारीतोषिक देणे बाबत समितीचा मनोदय आहे.

या कामी स्थायी समितीने दिनांक ४.७.२००५ रोजीचे ठराव क्र. २५ अन्वये ठराव पारीत केलेला आहे. त्यानुसार याकामी आवश्यक ती व्यवस्था करण्याकामी प्रशासनाला निर्देश देणे तसेच सदरची पारितोषिके वाटप करण्यासाठी परिक्षक म्हणुन मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली मा. सभापती क्रिडा समिती या उपाध्यक्ष तसेच मा. महापौरांच्या इच्छेनुसार त्या नेमतील त्या सदस्यांच्या समितीची रचना करण्यासाठी क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीपुढे प्रस्तावित.

या व्यतिरिक्त मागील वर्षाचे सन २००४–२००५ च्या गणेशदर्शन प्रतियोगितेची पारितोषिके अदयाप वितरीत करण्यात आलेली नाहीत. ती यावर्षीचे श्री. गणेशोत्सवापुर्वी वाटप केली तर सर्वांचे विश्वासास पात्र होईल म्हणुन या कामी प्रशासनातर्फे आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी अशी शिफारस करण्यासाठी क्रिडा समितीपुढे प्रस्तावित

<u>क्रिडा , समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती ठराव क्र</u>. :–२ <u>दिनांक :–१८/७/२००५</u>

सुचकाचे नाव :–श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :–श्री. गणपत एडके

ही क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव श्री. गणेश दर्शन प्रतियोगितेचे आयोजन करणे कामी मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्या स्वइच्छेअनुसार त्या नेमतील त्या सदस्यांची समिती रचना करण्यास संमती देत आहे.

परंतु————

सदर समितीत क्रिडा समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या सभापती कार्यकारी अध्यक्ष म्हणुन कामे पाहतील.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता सन २००५–२००६ आयोजित व कार्यान्वीत करणेकामी अनुषंगिक पारितोषिके, व्हीडीओ शुटिंग, वाहन, प्रमाणपत्रे, जाहिरात, बॅनर, छायाचित्रे इत्यादी व्यवस्थे कामी स्थायी समितीने दिनांक ४/७/२००५ रोजी, क्र. २५ अन्वये ठराव पारीत केलेला आहे त्यानुसार सदरची व्यवस्था लवकरात लवकर करण्यात येईल अशी प्रशासन खात्री करेल.

तसेच मागील वर्षीचे सन २००४–२००५ च्या गणेश दर्शन प्रतियोगितेची पारीतोषिके अदयाप वितरीत करण्यात आली नाही. ती या वर्षीचे गणेशत्सोवापुर्वी वाटप करण्याची प्रशासन व्यवस्था करेल.

तसेच मा. महापौर ज्या समितीची रचना करतील ती अंतिम राहील व ती या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र:–</u> ४३ <u>दिनांक:–५/९/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुर्यकांत लिंगे

ही महासभा सन २००५–०६ या वर्षात श्री गणेश दर्शन प्रतियोगिता आयोजित करणेकामी क्रिडा, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य समिती ठराव क्र. २, दिनांक १८/७/२००५ कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ५ .............

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> विषय क्र. ५ पासुन १० पर्यंत तेच विषय आहेत ना? कर्मचा–यांना पदोन्नती देण्याबाबतचे?

<u>मा. सचिव :–</u>होय.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> तर विषय क्र. ५ पासुन १० पर्यंतचे विषय पारीत केले जावेत. परंतु त्यातील ३ लोकांबाबत हरकत आहे. एक श्री. अनुप भागिया, व दुसरा आहे...........

<u>मा. सचिव :–</u> एक मिनिट, एक–एक विषय वाचुन दाखवु दया. तो विषय आल्यानंतर पाहता येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>चालेल......

<u>मा. सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ५ :– निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ''वरिष्ठ लिपीक'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

---

<u>काही सदस्य :–</u> पास..........

<u>मा. महापौर :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

प्रस्तावना:—

**विषय क्र. ५ :—** निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा—यांना ''वरिष्ठ लिपीक'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

<u>प्रस्तावना</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर वरिष्ठ लिपीक या पदनामाची एकुण १९ पदे ही पदोन्नतीने भरावयाची असुन त्यापैकी सद्यस्थितीत पदोन्नतीने भरावयाची ७ पदे रिक्त आहेत त्यांचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु. जमाती — ०१
भज (ब) — ०१
भज (ब/क) — ०१
खुले — ०४

महापालिका सेवाशर्ती नियमावलीनुसार सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) एस.एस.सी परिक्षा उत्तीर्ण
२) महापालिका सेवेत लिपीक या पदावरील सेवेचा पाच वर्षाचा अनुभव

वरिष्ठ लिपीक या पदाची वेतनश्रेणी रू. ४०००—१००—६००० अशी असुन वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती देणेसाठी लिपीक या संवर्गातुन सेवाज्येष्ठतेनुसार व आरक्षित प्रवर्गानुसार पुढील कर्मचा—यांची पदोन्नतीसाठी निवड समितीने शिफारस केलेली आहे.

| अ. क्र. | अनुशेषानुसार भरावयाच्या शिल्लक आरक्षणातील पदसंख्या | कर्मचा—याचा सेवाजेष्ठता यादीतील क्रमांक | पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेल्या कर्मचा—याचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अनु.जमाती — ०१ | — | — | उमेदवार उपलब्ध नाही |
| २. | भ.ज. (ब) —०१ | — | — | उमेदवार उपलब्ध नाही |
| ३. | भ.ज. (ब/क) —०१ | — | — | उमेदवार उपलब्ध नाही |
| ४. | खुले —०४ | ०१ | १) श्री. रमेश क्रिशनानी | शारीरीकदृष्टया अपात्र |
| | | ०३ | २) श्री. तुलसी मोहिनानी | शारीरीकदृष्टया अपात्र |
| | | ०८ | ३) श्री. डी. के. सुर्यवंशी | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | ०९ | ४) श्री. हरेश वाधवानी | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | ११ | ५) श्रीम. कोमल गेहानी | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | १२ | ६) श्री. यु. व्ही. लिमये | पदोन्नतीसाठी पात्र |

तरी निवड समितीने वरिष्ठ लिपीक या पदावर शिफारस केलेल्या कर्मचा—यांचा पदोन्नती देणेसाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> ४४ <u>दिनांक:—५/९/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. होशियारसिंग लबाना

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव व निवड समितीच्या शिफारशी अनुसार उपरोक्त पात्र कर्मचा–यांची ''वरिष्ठ लिपीक'' या पदावरील पदोन्नती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :–विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ६** :–निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ''जकात निरीक्षक'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

---

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** श्री. अनुप भागिया, श्री. बन्सी सोहंजा व श्री. रतन केदार या तिघांना पदोन्नती न देता विषय क्र. ५ ते १० मधील बाकी सर्व प्रस्ताव पारीत केले जावेत. या तिघांबाबत आम्हांला विचार करायचा आहे.

**प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–** मा. महापौर, उप–महापौर, सर्व सन्माननिय सदस्य या ठरावाबाबत मी असे म्हणेन की, निवड समितीने पदोन्नतीचा जो काही प्रस्ताव आपल्या समोर आणला आहे ज्याबाबत सभागृह नेत्यांनी म्हटले की, या लोकांना पदोन्नती दयायची नाही तर असे होवू शकत नाही. कारण की पदोन्नती देतांना गोपनिय अहवाल व त्यांची सेवाजेष्ठता पाहिली जाते. त्यांच्या विरोधात जर काही आरोप असतील, जर काही खातेनिहाय चौकशी चालू असेल तरच अशी पदोन्नती थांबविली जावु शकते.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** आम्हांला जे माहित पडले आहे त्याबाबत चौकशी करुन नंतर हा प्रस्ताव महासभेपूढे आणला जावा. या तिघांबाबतीत खातेनिहाय चौकशी चालु आहे असे मला माहित पडले आहे. यासाठी या तिघांचा प्रस्ताव पुढे ढकलुन यांच्या बाबतीत सविस्तर असा प्रस्ताव आणला जावा. यांच्या विरोधात कोणती खातेनिहाय चौकशी चालु आहे?

**मा. महापौर :–**सदर प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ६** :–निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ''जकात निरीक्षक'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

प्रस्तावना

महापालिकेच्या आस्थापनेवर जकात निरीक्षक या पदनामाची एकुण १५ पदे ही पदोन्नतीने भरावयाची असुन त्यापैकी सद्यस्थितीत पदोन्नतीने भरावयाची १४ पदे रिक्त आहेत त्यांचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु.जाती – ०२
अनु. जमाती – ०१
भज (ब) – ०१
भज (ब/क) – ०१
खुले – ०९

महापालिका सेवाशर्ती नियमावलीनुसार सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) एस.एस.सी परिक्षा उत्तीर्ण
२) महापालिका सेवेत वरिष्ठ लिपीक या पदावरील सेवेचा पाच वर्षाचा अनुभव

वरील सेंवाशर्ती नियमावलीतील क्र.२ वरील नियमामध्ये जकात निरीक्षक या पदासाठी वरिष्ठ लिपीकांमधुन पदोन्नती द्यावयाची असे नमुद केले आहे परंतु वरिष्ठ लिपीक व जकात निरीक्षक या पदनामांची वेतनश्रेणी रू. ४०००–१००–६००० अशी एकच असल्यामुळे जकात निरीक्षक या पदावर पदोन्नती देताना लिपीक या पदावरील सेवेचा पाच वर्षाचा अनुभव लक्षात घेवुन लिपीक संवर्गातील कर्मचा–यांना जकात निरीक्षक या पदांवर पदोन्नतीसाठी विचार व्हावा तसेच सेवाप्रवेश नियमावलीतदेखील तशी दुरूस्ती प्रस्तावित करण्यात यावी. जकात निरीक्षक या पदावर पदोन्नतीसाठी लिपीक संवर्गातील सेवाज्येष्ठतेनुसार व आरक्षणानुसार पुढीलप्रमाणे कर्मचारी उपलब्ध होत आहेत.

| अ. क्र. | अनुशेषानुसार भरावयाच्या शिल्लक आरक्षणातील पदसंख्या | कर्मचा–याचा सेवाजेष्ठता यादीतील क्रमांक | पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेल्या कर्मचा–याचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती – ०२ | १९ | १) श्री. मधुकर कनोजे | निलंबित, पदोन्नतीसाठी अपात्र |
| | | ४१ | २) श्री. रतन केदार | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | ४३ | ३) श्री. डी. आर. सोनावणे | पदोन्नतीसाठी पात्र |
| २. | अनु. जमाती –०१ | – | – | उमेदवार उपलब्ध नाही |
| ३. | भ.ज.(ब) –०१ | – | – | उमेदवार उपलब्ध नाही |
| ४. | भ.ज.(ब/क) –०१ | – | – | उमेदवार उपलब्ध नाही |
| ५. | खुले –०९ | ०२ | १) श्री. बी.के. सोहंजा | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | ०४ | २) श्री. अशोक जग्यासी | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | ०५ | ३) श्री. विष्णु गेरलानी | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | ०६ | ४) श्री. चंदर रूपचंदानी | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | १० | ५) श्री. ओमप्रकाश भाटीया | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | १३ | ६) श्री. अनुप भागिया | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | १४ | ७) श्री. के.के.सुकुमारन | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | १५ | ८) श्री. रमेश मनवानी | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | १७ | ९) श्री जी.टी.पिंजानी | पदोन्नतीसाठी पात्र |

तरी निवड समितीने जकात निरीक्षक या पदावर शिफारस केलेल्या कर्मचा–यांचा पदोन्नती देणेसाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्रः– ४५ दिनांकः–५/९/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. गणपत एडके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव व निवड समितीच्या शिफारसी अनुसार श्री. अनुप भागिया, श्री बी.के.सोहंजा व श्री रतन केदार वगळुन इतर पात्र कर्मचा–यांची ‘‘जकात निरीक्षक’’ या पदावरील पदोन्नती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :–विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ७** :–निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ‘‘कनिष्ठ लेखा परिक्षक’’ या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

---

काही सदस्य :– पास...........

मा. महापौर :–सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ७** :–निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ‘‘कनिष्ठ लेखा परिक्षक’’ या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

प्रस्तावना

महानगरपालिकेच्या आस्थापनावर कनिष्ठ लेखा परिक्षक या पदनामाची एकुण ४ पदे ही पदोन्नतीने भरावयाची असुन त्यापैकी सद्यस्थितीत पदोन्नतीने भरावयाची ३ पदे रिक्त आहेत त्यांचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु. जाती – ०१
खुला – ०२

महापालिका सेवाशर्ती नियमावलीनुसार सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) एस.एस.सी परिक्षा उत्तीर्ण

२) महापालिका सेवेत लेखा परिक्षण विभागातील लिपीक या पदावरील सेवेचा पाच वर्षाचा अनुभव.

कनिष्ठ लेखा परिक्षक या पदाची वेतनश्रेणी रू. ४०००—१००—६००० अशी आहे. वरील सेंवाशर्तीनियमावलीतील क्र. २ वरील नियमामध्ये लेखा परिक्षण विभागातील लिपीक या पदावरील सेवेचा अनुभव अशी अर्हता नमुद केली असली तरी प्रत्यक्षात लेखा परिक्षण विभागात आतापर्यंत लिपीक कोणीही कार्यरत नव्हते ज्यांची सलग पाच वर्षे सेवा झाली आहे. त्यामुळे सदर अर्हता शिथील करून एकंदरीत लिपीक या सेवेत ५ वर्ष काम केलेल्या कर्मचा—यांची सेवाज्येष्ठतेनुसार व आरक्षणानुसार खालिलप्रमाणे निवड समितीने शिफारस केली आहे.

| अ. क्र. | अनुशेषानुसार भरावयाच्या शिल्लक आरक्षणातील पदसंख्या | कर्मचा—याचा सेवाजेष्ठता यादीतील क्रमांक | पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेल्या कर्मचा—याचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती — ०१ | ४० | श्री. एस. पी.पगारे | पदोन्नतीसाठी पात्र |
| २. | खुला — ०२ | ०७<br>१६ | १) श्री. भास्कर नायक<br>२) श्री. सावल कुकरेजा | पदोन्नतीसाठी पात्र<br>पदोन्नतीसाठी पात्र |

तरी निवड समितीने कनिष्ठ लेखा परिक्षक या पदावर शिफारस केलेल्या कर्मचा—यांचा पदोन्नती देणेसाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:— ४६ दिनांक:—५/९/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. श्यामसुंदर रोहडा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव व निवड समितीच्या शिफारशी अनुसार उपरोक्त पात्र कर्मचा—यांची ''कनिष्ठ लेखा परिक्षक'' या पदावरील पदोन्नती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव यांनी सभागृहात प्रवेश केला.

---

**विषय क्र. ८:–** निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ''आरोग्य निरीक्षक'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

---

<u>काही सदस्य :–</u> पास...........

<u>मा. महापौर :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

प्रस्तावना:–

**विषय क्र. ८:–** निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ''आरोग्य निरीक्षक'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

<u>प्रस्तावना</u>

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आरोग्य निरीक्षक या पदनामाची एकुण ४ पदे ही पदोन्नतीने भरावयाची असुन त्यापैकी सद्यस्थितीत पदोन्नतीने भरावयाची २ पदे रिक्त आहेत त्यांचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.
अनु. जाती – ०१
खुला – ०१

महापालिका सेवाशर्ती नियमावलीनुसार सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.
१) एस.एस.सी परिक्षा उत्तीर्ण
२) स्वच्छता निरीक्षक या पदाचा कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

आरोग्य निरीक्षक या पदाची वेतनश्रेणी रू. ४०००–१००–६००० अशी आहे. आरोग्य निरीक्षक या पदावर पदोन्नतीसाठी प्रभारी आरोग्य निरीक्षक म्हणुन काम करीत असलेल्या कर्मचा–यांपैकी एक लसटोचक व उर्वरित लिपीक संवर्गातील कर्मचारी आहेत ज्यांनी न्यायालयात आरोग्य निरीक्षक या पदावर पदोन्नती मिळणेसाठी याचिका सादर केली होती अशा कर्मचा–यांमधुन सेवाज्येष्ठतेनुसार व आरक्षणानुसार पुढीलप्रमाणे कर्मचारी उपलब्ध होत आहेत.

| अ.क्र. | अनुशेषानुसार भरावयाच्या शिल्लक आरक्षणातील पदसंख्या | कर्मचा–याचा सेवाजेष्ठता यादीतील क्रमांक | पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेल्या कर्मचा–याचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती – ०१ | ०१ | श्री. विष्णु एस. जाधव | पदोन्नतीसाठी पात्र |
| २. | खुला –०१ | ४२ | श्री. राजकुमार चुग | पदोन्नतीसाठी पात्र |

तरी निवड समितीने आरोग्य निरीक्षक या पदावर शिफारस केलेल्या कर्मचा–यांचा पदोन्नती देणेसाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:–</u> ४७ <u>दिनांक:–५/९/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. देवेंद्रसिंग खेमाणी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव व निवड समितीच्या शिफारशी अनुसार उपरोक्त पात्र कर्मचा–यांची ''आरोग्य निरीक्षक'' या पदावरील पदोन्नती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ९ :–**निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ''विजतंत्री'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

---

<u>काही सदस्य :–</u> पास...........

<u>मा. महापौर :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे. 👍

---

☑

प्रस्तावना:–

**विषय क्र. ९ :–**निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ''विजतंत्री'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

<u>प्रस्तावना</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर विजतंत्री या पदनामाची एकुण ८ पदे ही पदोन्नतीने भरावयाची असुन त्यापैकी सद्यस्थितीत पदोन्नतीने भरावयाची ३ पदे रिक्त आहेत त्यांचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु. जमाती – ०१
वि.जा.(अ) – ०१
खुला – ०१

महापालिका सेवाशर्ती नियमावलीनुसार सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) मान्यताप्राप्त शासकिय संस्थेचा तारतंत्री पदाचा परवाना.
२) महापालिका सेवेत तारतंत्री पदावरील ५ वर्ष काम केल्याचा अनुभव

विजतंत्री या पदाची वेतनश्रेणी रू. ४०००—१००—६००० अशी आहे. विजतंत्री या पदावर पदोन्नतीसाठी तारतंत्री संवर्गातील जेष्ठतेनुसार व आरक्षणानुसार पुढीलप्रमाणे कर्मचारी उपलब्ध होत आहेत.

| अ.क्र. | अनुशेषानुसार भरावयाच्या शिल्लक आरक्षणातील पदसंख्या | कर्मचा—याचा सेवाजेष्ठता यादीतील क्रमांक | पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेल्या कर्मचा—याचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अनु.जमाती — ०१ | — | — | उमेदवार उपलब्ध नाही |
| २. | वि.जा (अ) —०१ | — | — | उमेदवार उपलब्ध नाही |
| ३. | खुला —०१ | ०१ | श्री. एस. एम. हेडुलकर | पदोन्नतीसाठी पात्र |

तरी निवड समितीने विजतंत्री या पदावर शिफारस केलेल्या कर्मचा—याचा पदोन्नती देणेसाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:— ४८ दिनांक:—५/९/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव व निवड समितीच्या शिफारशी अनुसार उपरोक्त पात्र कर्मचा—याची ‘‘विजतंत्री’’ या पदावरील पदोन्नती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १०:— निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा—यांना ‘‘वाहन चालक’’ या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे

---

काही सदस्य :— पास...........

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :— सचिवजी, एक सेकंद १० नंबरचा जो विषय आहे, त्याबाबत माझे असे म्हणणे आहे की, आपल्या येथे सुधाकर शिरसागर नावाचा एक वाहन चालक आहे. तर ज्यांची नावे या सुचीमध्ये आली आहेत त्यांच्यापेक्षा तो अधिक सेवाजेष्ठ आहे. परंतु त्याचे नाव या सुचीमध्ये आलेले नाही. त्याचे कारण काय?

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–</u>आमच्याकडे जे प्रस्ताव आले होते त्यामध्ये त्यांची शैक्षणिक अर्हता वाहन चालविण्याचा परवाना या गोष्टी लक्षात घेवून प्रस्ताव तयार केला आहे व ही जी यादी दिली आहे ती सेवाजेष्ठतेनुसार दिलेली आहे.

<u>मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :–</u> मा. महापौरजी, माझे आपणांस निवेदन आहे की, आपण आयुक्तांना निर्देश दयावेत की, श्री. सुधाकर शिरसागर जो आहे तो जर पदोन्नती बाबतच्या सर्व बाबींची पुर्तता करत असेल तर येणा–या महासभेत त्यास वाहन चालक या पदावर पदोन्नती मिळाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u> मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव आहे त्यामध्ये लिहिले आहे की, अनुसुचीत जमाती, भटक्या जमाती, भटक्या जमाती अ,ब,क या प्रत्येक जातीमधील उमेदवार उपलब्ध नाही, उमेदवार उपलब्ध नाही, तर मग ही पदे बाहेरुन का नाही भरली जात? बाहेर तर बरेचसे उमेदवार उपलब्ध आहेत. आजपर्यंत त्यांची भरती का नाही केली?

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–</u>मा. महापौरजी, उप–महापौर, सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्यांच्या प्रश्नाबाबत मी एवढेच म्हणु इच्छितो की, हा जो प्रस्ताव येथे आणला आहे तो पदोन्नतीचा प्रस्ताव आहे. पदोन्नती देण्यासाठी आमच्याकडे या यादीमध्ये उल्लेख केलेले जे कर्मचारी आहेत ते पात्र नाहीत. व काही पदे अशी आहेत ती रिक्त आहेत व आपल्या आस्थापनेवर ती पदे सध्या कार्यरत नाहीत. यामुळेच उमेदवार उपलब्ध नाहीत असे लिहिले आहे. बाकी दुसरे काही नाही.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u> परंतु मा. आयुक्त साहेब, यामध्ये असे लिहिले पाहिजे की, उमेदवार आपणाकडे उपलब्ध आहेत परंतु त्यांनी कालावधी पुर्ण केला नाही किंवा इतर काही ते लिहिले पाहिजे. उमेदवार तर आपणाकडे उपलब्ध आहेत आता आपण सांगत आहात. उमेदवार शैक्षणिक पात्रतेमध्ये कमी आहे किंवा सेवाजेष्ठतेमध्ये कमी आहे याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–</u>याबाबत मी आता एवढेच सांगु इच्छितो की, पदोन्नतीसाठी जे उमेदवार असले पाहिजे, त्यांची शैक्षणिक अर्हता पदोन्नती देण्याच्या पदालगतचे जे पद असते त्यापदावरील उमेदवार नाही म्हणजेच ते पद भरलेले नाही ही पदोन्नतीची पदे आहेत ती भरण्यासाठी त्या लगतच्या पदावरील उमेदवार पाहिजे. परंतु तसे उमेदवार उपलब्ध नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, अनुभव पाहिजे, सेवाभरती नियमानुसार तीन–पाच वर्षाचा अनुभव पाहिजे असे उमेदवार उपलब्ध नाहीत असे लिहिले आहे, बाकी कुणालाही टाळले नाही. पदोन्नती नाकारली आहे असे काही नाही.

<u>मा. सचिव :–</u>पास?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> आमच्या स्थानिक कर्मचा–यांना जी पदोन्नती दिली जात आहे त्याचबरोबर बाकीचे जे कर्मचारी आहेत त्यांच्या बाबतीतही लवकरात लवकर प्रस्ताव आणला जावा व रोजंदारी कर्मचा–यांच्या बाबतीतलाही प्रस्ताव महासभेपूढे आणला जावा.

<u>मा. महापौर :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. १०:– निवड समितीच्या शिफारसीनुसार पात्र कर्मचा–यांना ''वाहन चालक'' या पदावर पदोन्नतीस मान्यता देणे**

<u>प्रस्तावना</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर वाहनचालक या पदनामाची एकुण १५ पदे ही पदोन्नतीने भरावयाची असुन त्यापैकी सद्यस्थितीत पदोन्नतीने भरावयाची ५ पदे रिक्त आहेत त्यांचा शिल्लक अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

अनु. जमाती — ०१
वि.जा.(अ) — ०१
भ.ज. (क) — ०१
खुला — ०३

महापालिका सेवाशर्ती नियमावलीनुसार सदर पदावर पदोन्नती देताना पहावयाची आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) जड वाहनपरवाना असणे आवश्यक आहे.

वाहनचालक या पदाची वेतनश्रेणी रू. ३०५०—७५—३९५०—८०—४५९० अशी आहे. सामान्य प्रशासन विभागामार्फत वर्ग— ४ मधील विविध संवर्गातील कर्मचारी यांचेकडुन त्यांचेकडे असलेल्या उच्चतम शैक्षणिक अर्हता तसेच इतर अतिरिक्त अर्हता असल्यास त्यांनी संबंधित विभागाकडे अर्ज सादर करावेत. त्यानुसार वाहनचालक परवाना असलेले एकुण प्रभारी वाहनचालक म्हणुन वाहन विभागात कार्यरत असलेल्या कर्मचा—यांनी अर्ज सादर केले होते. अशा कर्मचा—यांची सेवाजेष्ठतायादी तयार करून त्यांचेमधुन जेष्ठतेनुसार व आरक्षणानुसार पुढीलप्रमाणे कर्मचारी उपलब्ध होत आहेत.

| अ. क्र. | अनुशेषानुसार भरावयाच्या शिल्लक आरक्षणातील पदसंख्या | कर्मचा—याचा सेवाजेष्ठता यादीतील क्रमांक | पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेल्या कर्मचा—याचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अनु.जमाती —०१ | — | — | उमेदवार उपलब्ध नाही |
| २. | वि.जा (अ) —०१ | — | — | उमेदवार उपलब्ध नाही |
| ३. | भ.ज.(क) —०१ | — | — | उमेदवार उपलब्ध नाही |
| ४. | खुले —०३ | ०१ | १) श्री. प्रकाश संपतराव सोनावणे | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | ०२ | २) श्री. मनोहर राजांगळे | पदोन्नतीसाठी पात्र |
| | | | ३) श्री. शरद पाटील | पदोन्नतीसाठी पात्र |

तरी निवड समितीने वाहनचालक या पदावर शिफारस केलेल्या कर्मचा—यांचा पदोन्नती देणेसाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> ४९ <u>दिनांक:—५/९/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव व निवड समितीच्या शिफारशी अनुसार उपरोक्त पात्र कर्मचा—यांची ''वाहन चालक'' या पदावरील पदोन्नती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सदस्य १) श्री. धनंजय बोडारे, २) श्री. लाल पंजाबी, ३) श्री. दिलीप गायकवाड, ४) श्री. बच्चाराम रुपचंदानी, ५) श्री. रामदास उमाप, ६) श्री. राज असरोंडकर,७)

श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे, ८) श्रीमती जयश्री सुर्वे, ९) श्रीमती रेखा क्रिष्णानी, १०) श्रीमती किरण माने, ११) श्रीमती सिमा मोकल यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सचिव :—विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ११** :—श्री अ.म.काटे यांची महापालिकेच्या सेवेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, आज महापालिकेमध्ये जे प्रभाग अधिकारी नियुक्त केले जातात, महाराष्ट्रातील प्रत्येक महानगरपालिकेमध्ये जे प्रभाग अधिकारी असतात ते स्थानिक असतात, परंतु या पदांसाठी सुध्दा येथे प्रतिनियुक्तीवरील अधिकारी मागवुन त्यांना प्रभाग अधिका—याचे पद दिले जात आहे. आपणाकडे अदयापपर्यंत महानगरपालिकेने उपायुक्तांचे एकही पद भरलेले नाही, परंतु प्रभाग अधिकारी पदावर स्थानिक कर्मचा—यास पदोन्नती न देता प्रतिनियुक्तीवर जे अधिकारी मागविले जातात तो स्थानिक कर्मचा—यांवर एक अन्याय आहे. आम्ही यांना येथुन परत पाठविण्याबाबतचा ठराव करत आहोत. हा सर्व संमतीने पारीत केला जावा व यापुढे प्रभाग अधिकारी म्हणुन प्रतिनियुक्तीवरील कोणताही अधिकारी नेमला जावु नये. आजपर्यंत, उपायुक्त पदापर्यंत स्थानिक कर्मचा—यास पदोन्नती मिळालेली नाही. ही वेगळी बाब आहे. परंतु प्रभाग अधिकारी सुध्दा जर प्रतिनियुक्तीवरील ठेवले तर हे अतिशय चुकीचे होईल व यांना आता परत पाठविले जावे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— व प्रभाग अधिका—याचे दुसरे जे प्रकरण आहे ते लवकरात लवकर महासभेपूढे आणले जावे.

प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):—मा. महापौर, सन्माननिय सदस्य या ठरावाबाबत सभागृहाला येथे मी सांगु इच्छितो की, आपणाकडे सहाय्यक आयुक्तांच्या पदासाठी जी शैक्षणिक पात्रता ठरविलेली आहे, त्या हिशोबाने आजपर्यंत आपणाकडे अधिक्षक संवर्गातील पद नाही, अधिक्षक संवर्गातील पदे दोन वर्षापुर्वी आपण येथे तयार केली आहेत व एका वर्षापूर्वी पदोन्नती दिली आहे. यासाठीच आज ही पदे पदोन्नतीने भरता येत नाहीत. म्हणुनच प्रतिनियुक्तीने अधिकारी मागविले आहेत. आपणाकडे या संवर्गात ६ पदे आहेत. सध्या आपणाकडे नियमित स्वरुपाचा एक सुध्दा प्रभाग अधिकारी नाही. यासाठी शासनाकडे अहवाल सादर करुन दुस—या कार्यालयांकडुन या पदांसाठी अधिकारी मागविले जातात. येथिल पदोन्नतीची जी पदे आहेत, ज्यांना ३ वर्ष पुर्ण झाली आहेत यानंतर आमच्या निवड समितीसमोर प्रस्ताव ठेवून जे लोक पात्र आहेत त्यांना पदोन्नती देवून परंत आता आम्ही जो प्रस्ताव आणलेला आहे व ही ६ पदे आपणाकडे रिक्त आहेत, नियमित पदावर एकही प्रभाग अधिकारी नाही. हा ठराव पारीत झाला पाहिजे. म्हणुन प्रशासनातर्फे मी शिफारस करीत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आयुक्त साहेबांनी या प्रस्तावावर चर्चा केली आहे. तर मी त्यांना विचारु इच्छितो की, बाकी जे प्रभाग अधिकारी आहेत, ते सर्व त्या पदावर नेमलेले आहेत काय? तरी सुध्दा श्री. नितनवरे, श्री. तुकाराम, श्री. रामसिंघानी या तिघांना प्रभाग अधिकारी म्हणुन बसविले आहे ना? तसेच चौथा एक अधिकारी नेमा ना. जसे तीन नेमले आहेत तसे चार नेमा. जोपर्यंत आपण ती पदे भरत नाहीत तोपर्यंत प्रभारी प्रभाग अधिकारी म्हणुन श्री. नितनवरे, श्री. तुकाराम, श्री. रामसिंघानी यांना आपण नेमले आहेत ना, प्रभाग अधिकारी म्हणुन? त्याप्रमाणे चौथा एक अधिकारी नेमा.

प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):—या मुद्दयाबाबत सभागृहास मी हे सांगु इच्छितो की, प्रत्येक संवर्गामध्ये पदोन्नतीचा कोटा वेगळा असतो व थेट भरतीचा कोटा वेगळा असतो, त्यानुसार पदोन्नती जरी दयायची झाली तरी ६ लोकांना आपण पदोन्नती देवु शकत नाही. सेवाभरतीचे नियम तयार केले आहेत त्यानुसार ७५ टक्के पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत, व २५ टक्के पदे थेट भरतीने भरावयाची आहेत. परंतु हा कोटा अंतिम झालेला नाही. आपण जसे म्हणतात की सर्वांना पदोन्नती दिली पाहिजे, आपल्या सेवाभरती नियमानुसार सर्वांना पदोन्नती दिली जावु शकत नाही. पदे थेट भरली पाहिजेत. प्रतिनियुक्तीने पदे भरली जातात, किंवा जाहिरात देवुन पदे भरली जातात, थेट भरतीची जी पदे आहेत ती पदे पदोन्नतीने भरु शकत नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> मा. महापौरजी, आमची आपणांस एक विनंती आहे की महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका आहे. येथिल जनतेच्या सोयीसाठी, सेवेसाठी, लोकांना तात्काळ सेवा हवी आहे, बाहेरील अधिकारी येथिल जनतेच्या सेवेसाठी मागविले जातात. परंतु ते येथे राहतात कुठे? ते या शहराबाहेर राहतात व ते येथे वेळवर सेवा कश्या देवू शकतील? आपण पाहिले असेल येथे जे पुराचे पाणी आले होते त्या वेळेस किती अधिकारी येथे राहणारे होते? जे बाहेरुन अधिकारी येतात, त्यातील काही कल्याणला तर काही ठाण्याला राहतात, जे मुंबई येथे राहतात ते येथिल लोकांची सेवा काय करु शकतील? आमची आपणांस नम्र विनंती आहे की, आपल्या महानगरपालिकेत जे अधिकारी वर्षानुवर्षापासुन सेवा करत आहेत, अशा अधिका–यांमधील ज्यांना अनुभव आहे, अशा अधिका–यास आपण नेमणुक दया. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :–</u> मा. महापौरजी, श्री. जेसवानी साहेबांच्या मुद्दयास मी माझा मुद्दा जोडु इच्छितो, आपल्या येथे एक ड्रेनेज विभाग आहे, त्या विभागाचे श्री. एन.डी. पाटील हे कधीही कार्यालयात मिळत नाहीत. त्यांच्याशी मोबाईल वरुन संपर्क साधला तर त्यांची मुले किंवा पत्नी मोबाईल उचलतात व सांगतात की ते मोबाईल घरी विसरुन गेले. तसेच त्या विभागात श्री. वाघ नावाचा एक कर्मचारी आहे त्यास १५ दिवसापुर्वी मी दोन ठिकाणांचा पत्ता लिहून दिलेला आहे, १५ दिवस होवुनही ते दोन चेंबर साफ होवू शकले नाहीत. माझा तर असा विचार आहे की, असे अधिकारी जे आपला मोबाईल घरी विसरुन येतात तर अशा लोकांना त्यांच्या घरीच ठेवले जावे. व दुसरी गोष्ट अशी की, ड्रेनेज डिपार्टमेंट १५–१५ दिवस जर चेंबर साफ करु शकत नसेल तर असे डिपार्टमेंट बंद केले तर बरे होईल.

<u>मा. सचिव :–</u> यांना परत पाठवायचे?

<u>मा. महापौर :–</u>सदरच्या प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यांत येत आहे.

---

☑

प्रस्तावना:–

**विषय क्र. ११** :–श्री अ.म.काटे यांची महापालिकेच्या सेवेत सहाय्यक आयुक्त या पदावरील प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. उमपा/२३२४/१३१३/प्र.क्र. २२/०५ नवि. २२, दिनांक १५/६/२००५ व नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ७ जुलै, २००५ च्या आदेशान्वये श्री. अ.म. काटे, संशोधन अधिकारी यांची या महापालिकेत सहाय्यक आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार श्री. अ.म. काटे हे या महापालिकेत दिनांक ८/७/२००५ पासुन रुजु झाले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५ नुसार श्री. अ.म. काटे यांच्या सहाय्यक आयुक्त पदाच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मंजुरी मिळणेसाठी महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:–</u> ५०      <u>दिनांक:–५/९/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. अ.म.काटे यांच्या महानगरपालिका सेवेत सहाय्यक आयुक्त या पदावरील नेमणुकीस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १२ :— श्री. संजय दुसाणे यांचा उपायुक्त पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.**

---

मा. सचिव :— परंतु यांचा प्रस्ताव जो होता तो प्रशासनाकडुन मागे घेण्यात आला आहे कारण की, त्यांना या महापालिकेच्या सेवेतुन कार्यमुक्त केले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आयुक्त साहेब, कोणत्याही प्रतिनियुक्तीवरील अधिका—याच्या मुदतवाढीचा प्रस्ताव त्यास विचारुन ठेवत नाही का? महासभेपुढे आपण त्यांचा ठराव ठेवता आणि ते येथुन निघुन जातात म्हणुन त्यांना आपण विचारत नाहीत का?

प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):— विषय क्र. १२ बाबत सभागृहास मी हे सांगु इच्छितो की, ........

मा. महापौर :—सदरचा विषय सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. १२ :— श्री. संजय दुसाणे यांचा उपायुक्त पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.**

---

मा. सदस्य श्री. सुरेश जाधव हे सभागृहातुन बाहेर गेले.

मा. सचिव :—विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १३ :— पूर्वीचा महासभा ठराव क्र. ४२, दिनांक १९/८/२००४ मध्ये अंशत: बदल करुन वाहनधारक पात्र अधिका—यांना शासकिय धोरणाप्रमाणे सुधारित वाहन भत्त्याची प्रतिपूर्ती रक्कम मान्य करणे.**

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, अधिका—यांना वाहन भत्यामध्ये वाढ करुन दिली जात आहे त्याबाबत आमची काही हरकत नाही. परंतु आमच्या पदाधिका—यांना वाहनभत्ता देणे जो बंद केला

आहे त्याचे काय? मा. महापौर, उप–महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता याच पदाधिका–यांचा वाहनभत्ता चालु आहे. प्रभाग समिती सभापती ८ ही विषय समित्यांचे सभापती त्यांना वाहनभत्ता दया नाहीतर कार्यालयाकडुन गाडी उपलब्ध करुन दया. दोन्ही पैकी काही तरी एक करा. सर्व महानगरपालिकांमध्ये पदाधिका–यांना वाहनभत्ता मिळतो. आयुक्त साहेबांनी म्हटले होते की, आपण फक्त महासभेमध्ये ठराव पारीत करा. त्यानुसार वाहनभत्ता चालु करु. आज दिड वर्षापासुन वाहनभत्ता देणे बंद केले आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आता जो विषय चर्चेस आला आहे तो फक्त अधिका–यांच्या वाहनभत्याचा आहे. मला असे वाटते की, पदाधिका–यांच्या वाहनभत्याबाबतचा विषय जेव्हा येईल तेव्हा याबाबत चर्चा करु.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):– महानगरपालिकेतील पदाधिका–यांना जे वाहन उपलब्ध करुन दिले जाते तसेच जे पदाधिकारी आपले स्वत:चे वाहन वापरतात त्यांना त्यापोटी वाहनभत्ता दिला जातो. वाहनभत्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ (अ) नुसार दिला जातो. त्यासाठी राज्य शासनाची मंजुरी आवश्यक आहे. यासाठी हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला आहे. या अगोदर आपण वाहनभत्ता देत होतो. लेखा परिक्षणामध्ये याबाबत आक्षेप घेण्यात आला होता. त्याची पुर्तता करण्यासाठी आम्ही काही पदाधिका–यांना हा वाहनभत्ता देणे बंद केले आहे. संविधानिक जे पदाधिकारी आहेत जसे की, मा. महापौर, उप–महापौर, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता यांना वाहनभत्ता दिला जातो. राज्य शासनाकडुन जेव्हा मंजुरी मिळेल तेव्हा बाकी पदाधिका–यांना वाहनभत्ता दिला जाईल व तो थकबाकीसह दिला जाईल. जर वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिले तर वाहन उपलब्ध करुन दिले जाईल.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–साहेब, कमीत कमी प्रभाग समितींच्या सभापतींना या संविधानिक पदाधिका–यांबरोबर जोडले जावे. कारण की, प्रभाग समित्यांच्या रचनेबाबत सर्वोच्च न्यायालयांकडुन आदेश झालेले आहेत.

प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–हाच खुलासा मी येथे केला आहे. संविधानिक पदे सोडुन बाकी पदांवरील पदाधिका–यांना वाहनभत्ता शासन मंजुरीच्या नंतर देवु व तो सुध्दा त्यांना थकबाकीसह मिळेल.

मा. सचिव :–पास?

काही सदस्य :– पास...........

मा. महापौर :–सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. १३** :– पूर्वीचा महासभा ठराव क्र. ४२, दिनांक १९/८/२००४ मध्ये अंशत: बदल करुन वाहनधारक पात्र अधिका–यांना शासकिय धोरणाप्रमाणे सुधारित वाहन भत्त्याची प्रतिपूर्ती रक्कम मान्य करणे.

प्रस्तावना

शासनाच्या वित्त विभागाकडील दि. १० सप्टेंबर,२००१ च्या शासन निर्णयाद्वारे शासकीय व इतर कार्यालयातील अधिकाऱ्यांना शासकीय कामासाठी स्वत:चे वाहन वापरासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी वाहन धोरण विहित करण्यात आलेले होते. त्यातील निर्देशांक सुत्राप्रमाणे पात्र अधिकाऱ्यांना वाहन खर्च प्रतिपूर्ती देण्यात येत होती.

त्यांनतर शासनाने त्याचेकडील दि. १३/३/२००३ च्या शासन निर्णयाद्वारे निर्देशांक सुत्रामध्ये बदल करून नवीन सुत्रानुसार वाहन खर्च प्रतिपूर्ती द्यावी असे सुचविलेले होते. त्यानुसार महासभा ठराव क्र. ४२, दि. १९/८/२००४ प्रमाणे पेट्रोल वाहनधारक

अधिकाऱ्यांना दरमहा रु. १२०००/— आणि डिझेल वाहनधारक अधिकाऱ्यांना दरमहा रु. १०५००/— वाहन खर्च प्रतिपूर्ती सध्या अदा करण्यात येत आहे.

उपरोक्त विषयातील शासन निर्णय या कार्यालयास प्राप्त झालेला असून त्यात शासनाने विविध नियम अटी सुधारीत करून जुनी सुत्रे, दुरूस्त्या निष्प्रभावित करून नवीन सुत्रे कार्यवाहीत करणेबाबत सुचविले आहे.

त्यानुसार सचिव दर्जाखालील वाहन अनुज्ञेय असलेले जे अधिकारी खाजगी वाहन शासकीय कामकाजासाठी वापरण्याचा पर्याय स्विकारणार आहेत. त्यांना वाहन वापर दरमहा खर्चाची प्रतीपूर्ती रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | पेट्रोल वाहन वापर (वाहन किंमत रु. ३ लाख) पात्र अधिकारी | — | रु. १६३७५/— |
| | वरिष्ठ सचिव समिती बैठक निर्णयानुसार वजावट | — | रु. १०००/— |
| | | | *रु. १५३७५/* |
| (२) | डिझेल वाहन वापर (वाहन किंमत रु. ३ लाख) पात्र अधिकारी | — | रु. १४८७५/— |
| | वरिष्ठ सचिव समिती बैठक निर्णयानुसार वजावट | — | रु. १०००/— |
| | | | *रु. १३८७५/—* |

सबब दि. २५ मे,२००५ च्या सदर शासन निर्णयानुसार त्यातील नियम अटी शर्तीच्या अधिन राहून महापालिकेच्या पात्र अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामासाठी पेट्रोल वाहन वापर खर्च प्रतिपूर्ती रु. १५३७५/— आणि डिझेल वाहन वापर खर्च प्रतिपूर्ती रु. १३८७५/— दरमहा अदा करणेस मंजुरीसाठी प्रकरण प्रस्ताव मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:—</u> ५१ <u>दिनांक:—५/९/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव पुर्वीचा महासभा ठराव क्र. ४२, दिनांक १९/८/२००४ मध्ये अंशत: बदल करण्यास मान्यता देत असुन शासन धोरणास अनुसरुन महापालिकेतील वाहनधारक पात्र अधिका—यांना कार्यालयीन कामासाठी पेट्रोल वाहन वापर खर्च प्रतिपूर्ती दरमहा रु. १५,३७५/— व डिझेल वाहन वापर खर्च प्रतिपूर्ती दरमहा रु. १३,८७५/— अदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**मा. सचिव :—**विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १४ :—** निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री दत्तात्रय बाजीराव जाधव यांच्या ''वरिष्ठ लिपीक'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे

---

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, येथे आमच्या समोर जो मुद्दा आला आहे त्याच्या गोषवा—यामध्ये लिहिले आहे प्रकल्पग्रस्त. मी आपल्या आयुक्त साहेबांना याबाबतीत विचारु इच्छितो की, प्रकल्पग्रस्त घोषित करण्याचा अधिकार कुणाला आहे? मा. मुख्यमंत्री महोदयांना आहे की आणखी दुस—या कुणाला आहे? येथे कर्मचा—यांची जी भरती केली जात आहे त्याबाबत लिहिले जात आहे की, प्रकल्पग्रस्त. म्हणजे येथे काय प्रकल्पग्रस्त आहे? याचा खुलासा झाला पाहिजे. यास कुठे नेमणुक दिली जाईल? व दुसरे असे की, यास प्रकल्पग्रस्त म्हणुन नेमणुक दयायची होती तर या अगोदर सुध्दा सहा महिने आपण त्यास नेमणुक दिलेली होती. ६ महिने सेवेत ठेवल्यानंतर निवड समिती ठरविते व त्यानंतर प्रकल्पग्रस्त म्हणुन प्रस्ताव आमच्या समोर येतो. असे मुद्दे या अगोदर सुध्दा आलेले आहेत. येथे कुणीही प्रकल्पग्रस्त झालेला नाही. जर झाला असेल तर तो आज झाला आहे. ही व्यक्ती ६ महिन्यापासुन सेवेत आहे. या बाबतचे अधिकार फक्त मा. मुख्यमंत्री महोदयांना आहेत. मी असेही ऐकले आहे की, निवड समिती निर्णय घेते ती समितीसुध्दा म्हणते की, रिक्त पदांवर यांची नेमणुक केली जात आहे. प्रत्यक्षात अशा कर्मचा—यांना दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असतो. सर्वात प्रथम गेल्या कित्येक वर्षापासुन येथे कार्यरत असलेल्या कर्मचा—यांना पदे दिली पाहिजेत. आपण थेट भरती करता आणि त्यांना कायम स्वरुपाचे पद देता. खरं म्हणजे दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीनंतर हा मुद्दा महासभेसमोर आला पाहिजे की अमुक—अमुक हा कर्मचारी वर्ग या पदासाठी लायक आहे किंवा नाही, सक्षम आहे किंवा नाही, त्यानंतरच त्यास कायम स्वरुपाचे पद दिले पाहिजे. कृपया करुन प्रकल्पग्रस्त जाहिर करण्याचा अधिकार कुणाला आहे याचा जरा खुलासा केला जावा.

**प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):—**सन्माननिय सभागृह नेता, आपण जे प्रश्न विचारले आहेत त्याबाबतीत मी सांगु इच्छितो की, महाराष्ट्र शासनाच्या कार्यक्षेत्रांतर्गत जे—जे प्रकल्प हाती घेतले जातात, त्यामध्ये जे लोक बाधित होतात, अशा या लोकांना प्रकल्पग्रस्त म्हणुन जाहिर करण्याचा अधिकार जिल्हाधिका—यांना देण्यात आलेले आहेत. व याबाबतचे जे निकष आहे ते पाहुन जिल्हाधिकारी तसे प्रमाणपत्र देतात व जे प्रकल्पग्रस्त लोक आहेत त्यांना महाराष्ट्रात कोठेही नियुक्ती प्राधिकारी नेमणुक देते. प्रकल्पग्रस्तांचे हे जे प्रस्ताव असतात ते निवडसमिती पुढे जात नाहीत. त्यांची काही मुलाखत घेतली जात नाही. एखादया पदासाठी जी किमान शैक्षणिक पात्रता असते ती पात्रता त्या उमेदवाराकडे आहे किंवा नाही व दुसरे ते पद मंजुर आहे किंवा नाही, किंवा ते त्या संवर्गाचे आहे किंवा नाही एवढयाच गोष्टी पाहिल्या जातात व त्यानुसार नियुक्ती दिली जाते. श्री. जाधव यांना जी नियुक्ती दिली आहे ते खुल्या संवर्गातील आहेत. पद रिक्त आहे, प्रकल्पग्रस्त आहे. म्हणुन त्यास नेमणुक दिली आहे. प्रकल्पग्रस्त व्यक्ती जाहिर करण्याचा अधिकार जिल्हाधिका—यांना आहे. त्यांच्याकडे जिल्हाधिका—यांकडील प्रमाणपत्र होते म्हणुन त्यांना नेमणुक दिली.

**मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी, श्रीमती नीना नाथानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** आपणांस किती कालावधी पर्यंतचे अधिकार आहेत व त्यापुढील अधिकार कुणाला आहेत? प्रकल्पग्रस्त म्हणुन नेमणुक देण्याचे अधिकार महासभेला आहेत की आपणाला आहेत?

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–</u>प्रशासनाला जे अधिकार आहेत त्यानुसार त्यांनी नेमणुक दिली होती. प्रकल्पग्रस्त म्हणुन आता प्रस्ताव महासभेपुढे ठेवला आहे. याची जी शिफारस केली आहे ती बरोबर आहे व यापुढे त्यांची सेवा सलग सुरु राहिली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, सहा महिन्यापर्यंत नेमणुक देण्याचे आयुक्तांना अधिकार असतात आणि त्यापुढील कालावधीसाठी नेमणुक देण्याचे अधिकार महासभेला असतात. परंतु प्रकल्पग्रस्त म्हणुन खरोखरच यांना घोषित करावयाचे होते व नेमणुक दयावयाची होती तर हा प्रस्ताव थेट महासभेपूढे यावयास पाहिजे होता. सहा महिने त्यास आपण स्वत: कामावर ठेवून त्यानंतर प्रकल्पग्रस्त म्हणुन प्रस्ताव महासभेपूढे आणला आहात. हे चुकीचे असून हा प्रस्ताव रद्द केला जावा व यापुढे कुठलाही प्रकल्पग्रस्त व्यक्ती असला तरी त्यास आयुक्तांनी सहा महिन्यापर्यंत कामावर घेवुन त्यानंतर प्रकल्पग्रस्त म्हणुन अंमलबजावणी करुन नंतर त्यास कामावरुन काढुन टाकले जावु शकते.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, फक्त श्री. किशोर वनवारी यांनी जो खुलासा मागविलेला आहे की ''प्रकल्पग्रस्त'' आणि सहा महिन्यापुर्वी प्रस्ताव यावयास पाहिजे होता असे त्यांचे म्हणणे आहे तर .............

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>प्रकल्पग्रस्त म्हणुन यांना जर कुणाला नेमणुक दयायची होती तर त्यांनी त्यास थेट नेमणुक दयावयास पाहिजे होती. यांनी त्यास सहा महिने हंगामी स्वरुपावर कामावर घेतले. त्यानंतर सहा महिन्यानंतर प्रकल्पग्रस्त म्हणुन घोषित केले. या व्यक्तीस सहा महिन्यापुर्वी कामावर घेतले होते त्यावेळेस तो प्रकल्पग्रस्त नव्हता? त्यावेळी त्यास हंगामी स्वरुपी नेमणुक दिली होती.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> माझ्या माहितीनुसार ज्या प्रकारे गोषवारा आहे, त्यांनी सुरुवातीसच प्रकल्पग्रस्त म्हणुन त्यास कामावर घेतले आहे. परंतु सहा महिन्यानंतर महासभेपूढे प्रस्ताव आणला पाहिजे त्याप्रमाणे त्यांनी तो प्रस्ताव महासभेपूढे आणला आहे. पंरतु घोषित तर पहिल्यापासुनच केले आहे असेच आहे ना? त्याच्याकडे सर्व प्रमाणपत्रे आहेत काय? प्रकल्पग्रस्त म्हणुन.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–</u>प्रकल्पग्रस्त म्हणुन कागदपत्र?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> होय.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–</u> आहेत.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> आम्हांला फक्त उल्हासनगरच्या बाबतीतच विचार करायचा नाही तर पुर्ण महाराष्ट्राच्या बाबतीत विचार करायचा आहे. आपण केवळ उल्हासनगरच्या बाबतीतील संकुचीत वृत्ती सोडुन दया. पुर्ण महाराष्ट्रातील प्रकल्पांमुळे जे लोक बाधित होतात, आम्ही महाराष्ट्रात राहतो. महाराष्ट्र शासनाचे जे निर्देश आहेत त्यांचे आम्हांस पालन करायचे आहे. फक्त उल्हासनगर मध्येच बाधित होत असेल तर, उल्हासनगरचा प्रकल्पग्रस्त व्यक्ती जर ठाण्यामध्ये जात असेल आणि त्यास जर कामावर घेतले जात नसेल तर ही त्यांची संकुचित वृत्ती आहे. महाराष्ट्र शासनाचे जे निर्देश आहेत, त्याचे आम्हांस पालन करायचे आहे. मला असे वाटते की, जर प्रकल्पग्रस्त आहे, शेवटी उल्हासनगर प्रकल्पग्रस्त आहे, प्रकल्पग्रस्त नसतील तर येथे येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. यांनी गोषवा–यात जे लिहिले आहे की, ५ टक्के असे कर्मचारी आम्हांला घ्यायचेच आहेत. तर अशा प्रकल्पग्रस्त व्यक्तींना सहकार्य देणे गरजेचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेबांनी जरा खुलासा करावा. यास कोणत्या प्रकल्पासाठी ठेवला आहे? प्रकल्पग्रस्त म्हणुन यास नेमणुक दिली आहे? आता हे काय काम करत आहेत? कोणते कामकाज पाहत आहेत ते जरा सांगा.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–</u>नैसर्गीक आपत्तीने बाधित असल्याबाबतचे मी अगोदरच सभागृहात सांगितले आहे की पुर्ण महाराष्ट्रामध्ये कोणत्याही प्रकल्पामध्ये कुणी बाधित झाले असेल तर ती व्यक्ती ज्या ठिकाणी पदे रिक्त असतील अशा ठिकाणी अर्ज करु शकते व नियुक्ती प्राधिकारी त्यास नियुक्ती देवु शकतात. ही जी व्यक्ती आहे ती उल्हासनगरची नाही. आता तर आम्ही त्यास कर विभागामध्ये नियुक्ती दिली आहे. नियुक्ती कुठे दिली ही वेगळी गोष्ट आहे. प्रकल्पग्रस्त व्यक्तीने प्रकल्पावर काम केले पाहिजे असे काही नाही. त्यांची जी शैक्षणिक अर्हता आहे, त्यानुसार ज्या पदावर त्यांना नेमणुक दिली आहे, अशी व्यक्ती जेथे रिक्त पद असेल तेथे काम करु शकते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, ८ तारखेपासुन पाणी पुरवठयामध्ये कपात होणार आहे. मालमत्ता कराची वसुली थंडावली आहे. जकात नाक्यावरील वसुली थंडावली आहे व हे म्हणतात त्यास

कर विभागामध्ये नेमणुक दिली आहे. आज शहरामध्ये जे लोक पुरग्रस्त झाले आहेत त्यांना जर कामावर ठेवले असते तर म्हणाले असते प्रकल्पग्रस्त आहेत.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** श्री. किशोर वनवारीजी, नाही—नाही आपली चुकीची समजुत आहे असे नाही आहे. प्रकल्पग्रस्त म्हणुन त्यास लिपिक पदावर नेमणुक दिली आहे. त्यास कोणत्या विभागात काम दयायचे हे महापालिकेचे काम आहे. प्रकल्पग्रस्त म्हणुन त्यास येथे नेमणुक दिली आहे, लिपिक म्हणुन त्यास नेमणुक दिली आहे.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, प्रकल्पग्रस्ताचा अर्थच श्री. किशोर वनवारी यांना समजला नाही. महाराष्ट्रामध्ये कोठेही, कुणीही, कोणत्याही प्रकल्पामध्ये बाधित होत असेल, त्यास महाराष्ट्रामध्ये कोठेही शासनाच्या निर्देशानुसार सेवेत घेतले जाते. राहिला प्रश्न कर विभागामध्ये त्यास का पाठविले? याचा अर्थ असा होतो की, त्याची जी शैक्षणिक अर्हता आहे, व ज्या पदावर तो काम करु शकतो, ज्या जागेवर तो काम करण्यास सक्षम आहे, तेथे नेमणुक करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** मा. महापौरजी, हे पहा शासन आपले आहे, राज्यात सरकारही आपलेच आहे. शासनाचे निर्देश आहेत, विविध प्रकल्पांतर्गत, महाराष्ट्रामध्ये जे लोक बाधित झाले आहेत त्यांच्याबाबतीत शासनाचे जे निर्देश आहेत त्यांना सेवेत सामावुन घेण्यासाठी शासनाचे जे निर्देश आहेत, त्यानुसार हा कायदेशीर असा विषय आहे. आता आपण हा विषय जो पुढे ढकलला आहे ते ठिक आहे परंतु पुढील महासभेत आम्ही सभागृहास विनंती करु की, या विषयाबाबत सर्वांनी सहकार्य देवून त्यांची सेवा सलग केली पाहिजे.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** महापौर महोदया, एक प्रकल्पग्रस्त ज्यास जिल्हाधिका—यांनी येथे पाठविले. येथिल प्रशासनाने त्यास कामावर ठेवले व त्याच्या मंजुरीचा प्रस्ताव आपणासमोर ठेवला आहे. ही महासभा सलग तीन वेळा स्थगित झाली आहे व आता चौथ्यांदा आता हा प्रस्ताव आपल्यासमोर आलेला आहे अशा वेळेस एका लिपिकाच्या नेमणुकीचा प्रस्ताव, तोही प्रकल्पग्रस्त व्यक्तीचा......आपण संकुचित मनाचे होता कामा नये. कारण की या लहानश्या विषयाच्या बाबतीत सुध्दा आपण त्वरीत निर्णय घेवु शकत नाहीत. एका लिपिकाचा विषय सुध्दा आपण चार—चार वेळा सभा होवुनही त्यावर आपण विचार करु शकत नाहीत. त्यावर निर्णय घेवु शकत नाही, हे बरोबर नाही.

**मा. महापौर :—** जसे आपण म्हटले की, राज्यात सरकारही आपलेच आहे. सरकार, आपणा सर्वांचे आहे. सरकारचा आदेश आपण मान्य करु परंतु हा विषय काय आहे तो समजुन घेण्यासाठी दोन—चार दिवसाची वेळ पाहिजे. पुढील आठवडयात महासभा आहेच, त्या सभेमध्ये हा विषय घेवु या.

सदरचा विषय आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. १४ :—** निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री दत्तात्रय बाजीराव जाधव यांच्या ''वरिष्ठ लिपीक'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे

---

**मा. सचिव :—**विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १५ :—** श्री. लाल भागचंदानी, लिपीक, श्री एस.पी.जगवानी व श्री सोनू पोखरदास, शिपाई यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, एक लिपिक व दोन शिपाई यांचे निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव महासभेपुढे आला आहे. मला असे वाटते की, यांच्यावर जे आरोप लावुन त्यांना निलंबित केले ते आरोप लिखित स्वरुपात आपणाकडे आहेत. किंवा त्यांना रंगेहाथ पकडले आहे, कुणाची लेखी तक्रार आपणाकडे आहे व हे तिघेही त्यावेळस कामावर होते? तर या सर्व गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे की आपणाकडे लेखी तक्रार आहे किंवा त्यांना रंगेहाथ पकडले आहे. यांच्याबाबतीत आपणाकडे काय आहे त्याचा जरा खुलासा केला जावा.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):–</u>मा. महापौर महोदया, या प्रस्तावाबाबत मी सभागृहास हे सांगु इच्छितो की, हे जे कर्मचारी जकात विभागामध्ये काम करत होते, त्या विभागाच्या प्रमुखांचा आम्हांस जो अहवाल प्राप्त झाला आहे. त्यांनी जी कारणे सांगितली आहेत ती आमच्या गोषवा–यामध्ये स्पष्टपणे लिहिली आहेत याबाबत चौकशी करण्यासाठी त्यांना सेवेतुन निलंबित केले आहे. याबाबत संपुर्ण चौकशी करुन तसा प्रस्ताव सभागृहासमोर आणु. प्रथमदर्शनी आमच्या समोर जे पुरावे आले आहेत त्यानुसार आम्ही त्यांना निलंबित केले आहे.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, मी जे म्हटले त्याचा खुलासा झालाच नाही. आपणाकडे कुणाचीही लेखी तक्रार आहे का? व ज्यावेळेस यांना निलंबित केले त्यावेळेस यांनीच ही गाडी सोडली होती काय? त्याचा जरा खुलासा करा. मला असे माहित पडले आहे की, कुणाचीही लेखी तक्रार नाही. तीन–तीन कर्मचा–यांना आपण निलंबित करता, ७५ टक्के पगार त्यांना घरबसल्या देता. तीन–तीन कर्मचा–यांना निलंबित करण्यासाठी काही कारण तर असेल? नंतर काय म्हणाल की, यांच्यावरील कोणताही आरोप सिध्द झाला नाही म्हणुन त्यांना पुन्हा कामावर घेतले. यासाठी त्याअगोदर महासभेपुढे आपण सांगा की यांच्या बाबतीत कुणाचीही लेखी तक्रार आहे का? आपण जो गोषवारा पाठविला आहात त्यामध्ये लिहिले आहे. परंतु कुणी लेखी तक्रार दिली आहे, रंगेहाथ पकडले आहे? हे यामध्ये लिहिले नाही.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे) :–</u>मा. महापौर महोदया, मी या अगोदर जे सांगितले आहे की, हेच सांगितले आहे की जी शिफारस केली जाते, ती अमुक–अमुक या कर्मचा–याची अमुक ही चुक माझ्या निदर्शनास आली आहे म्हणुन यास सेवेतुन निलंबित केले जावे. अशी शिफारस आल्यानंतर आम्ही त्या कर्मचा–यास निलंबित करतो व नंतर त्याची चौकशी करतो. आता सभागृह नेत्यांकडुन जे प्रश्न विचारले जात आहेत ते हेच प्रश्न विचारले जात आहेत की, यामध्ये सत्यता काय आहे? यामध्ये सत्यता नसेल तर त्यांना आम्ही पुन्हा कामावर घेवु, नाहीतर आम्ही यापुढील कार्यवाही सुरु करु.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> मा. महापौरजी, प्रशासनाने निलंबन कायम करण्याचा जो विषय विषयपत्रिकेवर आणलेला आहे, त्याबाबत काहीतरी सबळ कारण असेल तेव्हाच तो विषय सभा सुचनेवर आणलेला असेल. चौकशीचा अर्थ असा असतो की, महासभेने निलंबनास मान्यता दिल्यानंतर तो किती कर्मचारी किती दोषी आहे, किती नाही आहे, ही चौकशी झाल्यानंतर त्यावर निर्णय घेतला जातो की त्यास महापालिकेच्या सेवेतुन कायमचे बडतर्फ करायचे आहे किंवा पुन्हा सेवत घ्यायचे आहे? तर मी सभागृहास विनंती करेन की, प्रशासनाने जो विषय येथे आणलेला आहे त्यास मान्यता देणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> महापौर महोदया, आमच्या श्री. उमाप साहेबांनी आता–आताच सांगितले की, प्रशासनाने जो प्रस्ताव आणलेला आहे, काय प्रशासनाकडुन कधी चुक होत नाही? प्रशासनाच्या चुका काढण्यासाठी आम्ही नगरसेवक येथे बसलो आहोत. कुणावर अन्याय होवु नये, आम्हां लोकांच्या ऐकण्यात आले आहे की प्रशासनाकडुन काही ना काही चुक झाली आहे. हे जे तीन कर्मचारी जकात विभागात होते, जेव्हा हे कामावर नव्हते तेव्हा त्यांच्यावर हा आरोप लावण्यात आलेला आहे. कृपया आपण सत्यता जाणुन घ्या. खरोखरच त्यांचा काही दोष आहे का? जर दोष असेल तर भलेही आपण

त्यांना फाशी दया. जर दोष नसेल तर त्यांना दोषमुक्त करा. प्रशासनाच्या ज्या चुका होतात, कुणावर अन्याय होतो, एखादया अधिका—यावर जेव्हा अन्याय होतो तेव्हा त्याचा बचाव करण्यासाठी, सत्यता जाणुन घेण्यासाठी आम्ही नगरसेवक म्हणुन निवडुन आलो आहोत धन्यवाद!

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :—मा. महापौरजी, मी आयुक्तांना जे विचारले, जेव्हा जेव्हा मी आयुक्त साहेबांना विचारतो त्यांना माझ्या प्रश्नावर थोडा अधिकच राग येतो. माझ्या हे लक्षात येत नाही मी काय म्हणतो आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही की ते काय म्हणत आहेत हे माझ्या लक्षात येत नाही? मी असे म्हणत आहे की, यांना जे निलंबित केले आहे, त्याबाबत पुरावा काय आहे? याबाबत आपण म्हणता की, त्या विभागाच्या उपायुक्तांनी सांगितले—उपायुक्तांनी सांगितले, पुरावा काय आहे तो आतापर्यंत आपण सांगितला नाहीत. कुणा—कुणाचे जवाब घेतले ते आपण अदयापपर्यंत सांगितले नाहीत. श्री. मनोहर चाम्पुरकर याने २० रुपये घेतले होते त्यास पुन्हा कामावर घेतले आहे. त्याच्याबाबतीत तर पुरावा सुध्दा होता. त्यास पुन्हा कामावर घेतले. परंतु या तिघांच्या बाबतीत पुरावा काय आहे? आपण कुणा—कुणाचे जबाब घेतले आहेत? आज जकात विभागाचे उप—आयुक्त येथे नाहीत, असते तर मी त्यांना येथे हा प्रश्न विचारु शकत होतो. आता श्री. ढेंगळेपाटील साहेब येथे उपस्थित नाहीत असते तर त्यांना विचारले असते की, आपणाकडुन पुरावा काय आहे? कुणा—कुणाचे जबाब घेतले आहेत? तर या ज्या गोष्टी आहेत त्या आपण समजुन न घेता फक्त म्हणत आहात की, सभागृह नेत्यांनी प्रथम हा प्रश्न विचारला त्यानंतर पुन्हा—पुन्हा तोच प्रश्न ते विचारत आहेत. तर प्रश्न तर महासभेतच विचारेल ना? तर मेहरबानी करुन आपणाकडे पुरावे काय—काय आहेत? कुणा—कुणाचे जबाब घेतले आहेत? व माझे असे मत आहे की, या लोकांचे निलंबन कायम न करता, खातेनिहाय चौकशी चालु ठेवुन व आपणाकडे जे पुरावे आहेत ते महासभेपूढे सांगा की आपण कुणा—कुणाचे जबाब घेतले आहेत, पुरावे काय—काय आहेत?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> महापौर महोदया, सभागृह नेत्यांनी अशा प्रकारचा जो प्रस्ताव दिला आहे तो चुकीचा आहे. याचा अर्थ असा की, भ्रष्टाचारास आम्ही उत्तेजन देत आहोत किंवा आमचा तो उद्‌देश अहो. चोरी करणा—यास, चोरी करण्यासाठी आम्ही प्रोत्साहन देत आहोत. जकात नाका क्र. १० येथुन जी गाडी गेली ती गाडी जकात न भरता तेथुन गेल्याचे गाडी पकडल्या अंती निदर्शनास आले. ज्या अधिका—याने ती गाडी पकडली, त्याबाबत चौकशी करणे हे चौकशी अधिका—याचे काम आहे की महासभेचे काम आहे? जर त्यांच्या चौकशीमध्ये काही दोष आहे, याबाबतीत जेव्हा प्रस्ताव महासभेपूढे येईल तेव्हा त्यामध्ये सुधारणा करणे हे महासभेचे काम आहे. आता चौकशी अधिका—याचे काम आहे. त्यांचे म्हणणे आहे की, यांचे निलंबन कायम राहिले पाहिजे. जर त्यांना निलंबित केले नाही तर चौकशीमध्ये काही गडबड होवू शकते. त्या होवू नयेत म्हणुन शासनाने हा जो कायदा तयार केला आहे, त्यानुसार यांचे निलंबन कायम होणे जरुरीचे आहे. महासभेने जर यास मान्यता दिली नाही तर चोरीस आमचे सुध्दा समर्थन राहिल असा यातुन अर्थ निघतो. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन जकात हे आहे व जकातीमध्ये जर अश्या काही चोर वाटा असतील किंवा त्यांच्यासाठी, चोरी करण्यासाठी आम्ही जर प्रोत्साहन देत असू तर या उल्हासनगरचा विकास होणार नाही म्हणुन कृपा करुन अशा लोकांना समर्थन देवु नये जे चोरी करतात, चोरी करतात, नाही करत जर ते बरोबर असतील तर त्यांना पुन्हा कामावर घेतले जाईल. आणि जर तसे नसेल तर त्यांचे निलंबन कायम केले जाईल. हे चौकशी अधिका—याचे काम आहे. चौकशी झाल्यानंतर महासभेपुढे आल्यानंतर आम्ही त्यावर चर्चा करु शकतो. सध्या प्रशासनाने निलंबन कायम करण्याचा जो प्रस्ताव आणलेला आहे, त्यास शिवसेना—भाजपाच्या वतीने आम्ही समर्थन देतो.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे)</u>:—मा. महापौर महोदया, गोषवा—यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे, ते जे कर्मचारी होते ''ब'' पाळीमध्ये, वेळ दुपारी २ ते १० यावेळेमध्ये जी एक गाडी, जकात नाक्यावरुन गेली, त्या गाडीचा क्रमांक सुध्दा दिलेला आहे. त्या गाडीची जकात वसुली केलेली नव्हती. म्हणुनच या तीन कर्मचा—यांना निलंबित केले आहे. आमच्याकडे जी टिप्पणी आहे, त्यानुसार आवश्यक ते सर्व पुरावे असल्यामुळेच त्यांच्यावर कारवाई केली आहे. असे असतांना वारंवार पुरावे काय आहेत असे विचारणे बरोबर नाही. त्यांनी ज्या चुका केल्या आहेत त्याबाबत अधिक माहिती गोळा करण्यासाठी त्यांना निलंबित केले आहे. यापुढे चौकशी करुन जी पुढील कारवाई करायची आहे, जी कारवाई केली आहे ती योग्य आहे किंवा नाही? जर कारवाई चुकीची केली असेल तर त्यांचा निलंबन कालावधी हा कामावरील कालावधी म्हणुन गणला जाईल. या कालावधीचे त्यांना वेतनसुध्दा मिळते. जर त्यांची चुक सिध्द झाली तर निलंबन कालावधी हा कामाचा कालावधी म्हणुन गणला जाणार नाही. चौकशी अहवालानुसार त्यांना किमान किंवा


कमान यापैकी एखादी शिक्षा देवुन त्यांना पुन्हा कामावर घेतले जाते. हे स्पष्टपणे आमच्या गोषवा—यामध्ये दिलेले आहे. वेळ काय आहे, त्यांनी काय केले आहे, तरीही पुरावे मागण्याचे काही औचित्य नाही. तर निलंबित केल्यानंतर, चौकशी केल्यानंतरच यांना पुन्हा कामावर घेतले जाईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, आमचा एक कर्मचारी श्री. मनोहर चाम्पुरकर याने जसे मान्यही केले होते, २० रुपये त्यांने त्या गाडीवाल्याकडुन घेतले होते. त्याला निलंबित करुन नंतर पुन्हा कामावर घेतले आहे. आज ज्यांच्यावर आरोप आहेत जे सिध्द होत नाहीत तरीसुध्दा त्यांचे निलंबन कायम, ५व्या महिन्यामध्ये त्यांना निलंबित केले. आजपर्यंत त्यांची चौकशी पुर्ण केली नाही, कुणाचे जबाब घेतले नाहीत. लेखी स्वरुपात कुणाची तक्रारही नाही. माझे असे मत आहे की, यांचे निलंबन कायम न करता, खातेनिहाय चौकशी चालु ठेवली जावी व जर हे खातेनिहाय चौकशीत दोषी आढळुन आले तर यांना निलंबितच काय कामावरुन काढुन टाकले तरी महासभा त्यास परवानगी देईल. कर्मचारी कमी असल्याचे बोलले जात आहे, या कर्मचा—यांनी जर जकात विभागामध्ये हेराफेरी केली असेल तर त्यांना त्या विभागात न ठेवता जर दुस—या कुठल्या विभागात ठेवुन त्यांच्याकडुन काम करुन घेतले जावे असे माझे मत आहे व चौकशी पुर्ण झाल्यानंतर याबाबतचा प्रस्ताव आयुक्त साहेबांनी महासभेपूढे आणावा. आम्ही त्यास मान्यता देवु.

<u>मा. सचिव :—</u> पास? कुणाची काही हरकत?

<u>मा. महापौर :—</u> सचिव साहेब, या प्रस्तावाबाबत मतदान घ्या.

<u>मा. सचिव :—</u> सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी सुचविलेल्या प्रस्तावाच्या बाजुने जे सन्माननिय सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.



<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>चोरीस समर्थन?

## <u>सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी सुचविलेल्या प्रस्तावाच्या बाजुने ३२ मते</u>

९. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
१०. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
११. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
१२. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
१३. श्री. ऐडके गणपत गोविंद
१४. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
१५. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
८. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
९. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१०. श्रीमती. गुप्ता अनिता धमेंन्द्र
११. श्री. पवार नाना आनंदा
१२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
१३. श्री. जग्याशी राजु
१४. श्री. निकम शांताराम ओंकार
१५. श्री. ठाकुर विनोद लालसिंग
१६. श्रीमती सोनेजी मिना
१७. श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१८. श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
१९. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
२०. श्री. लुंड गोविंदराम

२१. श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२२. श्री. वनवारी किशोर नारायणदास
२३. श्री. भालेराव गौतम यशवंत
२४. श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
२५. श्री. लाल बिहारी यादव
२६. श्री. चंदाराम मोकल
२७. श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२८. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२९. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३०. श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज
३१. श्री. टेकचंदानी राजु
३२. श्री. संजय बठिजा

मा. सचिव :—सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी सुचविलेल्या प्रस्तावाच्या विरोधात जे सन्माननिय सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी सुचविलेल्या प्रस्तावाच्या विरोधात ११ मते

१५. श्री. बच्चाराम रुपचंदानी
१६. श्रीमती. मोकल सिमा चंद्राराम
१७. श्री. उमाप रामदास राघोजी
१८. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
१९. श्रीमती. कृष्णानी रेखा हरेश
२०. श्री. गायकवाड दिलीप
२१. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
२२. श्री. बोडारे धनंजय बाबुराव
९. श्रीमती. ससाणे लक्ष्मी रोहिदास
१०. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम
११. श्रीमती जयश्री सुर्वे

मा. महापौर :— सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. १५** :— श्री. लाल भागचंदानी, लिपीक, श्री एस.पी.जगवानी व श्री सोनू पोखरदास, शिपाई यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे.

प्रस्तावना

श्री. लाल भागचंदानी, लिपिक, श्री. एस.पी. जगवानी, शिपाई व श्री. सोनू पोखरदास, शिपाई हे दिनांक ३०/५/२००५ रोजी नाका क्र. १० येथे ''ब'' पाळीमध्ये (दुपारी २.०० ते १०.००) कार्यरत

असतांना सदर जकात नाक्यावरुन वाहन क्र. एम. एच. ०४ बी.यु. ५१५८ हे पी.व्ही.सी. बॅग व इतर माल भरलेले वाहन जकातीची आकारणी न करता निघुन गेले. उप–आयुक्त (जकात) यांनी रात्री १०.०० वाजता सदर वाहन मार्गात पकडुन तपासणी केली असता वाहनचालकाकडे कुठल्याही प्रकारची जकात भरणा केलेली पावती नसल्याचे आढळून आल्याने सदर वाहनाने जकात न आकारता महानगरपालिका हद्दीत प्रवेश केल्याचे सिध्द झाले आहे. सदर वाहनाने नाका क्र. १० वरुन महापालिका हद्दीत प्रवेश केला असल्याने वाहन महापालिका हद्दीत प्रवेश करतांना त्यावेळी नाका क्र. १० येथे कार्यरत असलेले श्री. लाल भागचंदानी, लिपिक, श्री. एस.पी. जगवानी, शिपाई व श्री. सोनू पोखरदास, शिपाई या कर्मचा–यांनी संगनमताने जकातीची आकारणी न करता गाडी सोडल्याबद्दल त्यांना कार्यालयीन क्र. उमपा/जकात विभाग/८६/०५, दिनांक ३१/५/२००५ च्या आदेशान्वये निलंबित करणेत आले आहे. सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम १ (ब) अन्वये श्री. लाल भागचंदानी, लिपिक, श्री. एस.पी. जगवानी, शिपाई व श्री. सोनू पोखरदास, शिपाई यांचे निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव मा. महासभेपूढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्रः–</u> ५२ <u>दिनांकः–५/९/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या गैरवर्तनाबाबत श्री. लाल भागचंदानी, लिपीक, श्री एस. पी.जगवानी व श्री सोनू पोखरदास, शिपाई यांना आयुक्तातर्फे बजावण्यांत आलेले निलंबन आदेश कायम करीत नाही.

## *कारण :–*

उपरोक्त कर्मचा–यांचा थेट संबध असल्याचे पुरावे प्रथमदर्शनी आढळुन येत नाहीत. त्यामुळे या प्रकरणात सविस्तर खातेनिहाय चौकशी होईपर्यंत निलंबन कायम करणे न्यायोचित ठरणार नाही.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मा. महापौरजी, मागील वेळेस आम्ही थोडा उशिरा आलो होतो व कदाचित आपण थेट सभेचे कामकाज चालु केले होते. एक महत्वाची गोष्ट राहुन गेली आहे, ती सर्वांच्या कामाची आहे. मागील वेळेस आम्ही जी सभा स्थगित केली होती, त्यावेळेस एक लक्षवेधी होती. त्या द्वारे आम्ही दोन–तीन गोष्टींची मागणी केली होती. घर दुरुस्ती परवानगी तसेच आणखी दोन–तीन गोष्टी होत्या.

सर्वानुमते त्या दोन–तीन गोष्टींची मागणी केली होती. मला वाटते प्रशासनाच्या वतीने त्यावर काही खुलासा केलेला नाही. तो झाला पाहिजे.

मा. सचिव :– आयत्यावेळचा एक विषय राहिलेला आहे, त्याचे कामकाज प्रथम पुर्ण करु या काय? मागील सभेत आयत्यावेळचा एक विषय स्विकृत केला होता. निलंबित कर्मचा–यांबाबतचा एक विषय स्विकृत केला होता त्यावर निर्णय घ्यायचा आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– स्विकृत केला आहे तर ठिक आहे, कोणता आहे विषय?

मा. सचिव :– विषय वाचुन दाखवितात.

**मा. सदस्य श्री. वाघे शामु यांनी सभागृहात प्रवेश केला.**

---

**विषय क्र. १६** :–श्री. संदिप एम. वाल्मिकी, विद्युत मदतनीस यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे.

---

काही सदस्य :– पास, पास..........

मा. सचिव :–पास? सर्वानुमते?

मा. महापौर :–सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १६** :–श्री. संदिप एम. वाल्मिकी, विद्युत मदतनीस यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे.

प्रस्तावना

श्री. संदिप एम. वाल्मिकी हे विद्युत विभागात दिनांक १४/७/२००४ च्या कार्यालयीन आदेशाद्वारे विद्युत मदतनीस म्हणुन कार्यरत असतांना माहे जुलै, २००४ ते फेब्रुवारी , २००५ या ०८ महिन्यांचा म्हणजे २२८ दिवसांच्या कालावधीत २८ दिवस वरीष्ठांच्या पुर्वपरवानगी शिवाय अनुपस्थित राहिले आहेत. विद्युत विभाग हा अत्यावश्यक सेवेचा विभाग असुन त्यामध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा–याने अशाप्रकारे विनापरवानगी अनुपस्थित राहिल्याने प्रशासकिय कामावर त्याचा परिणाम होतो. ही बाब कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी असुन अशाप्रकारे कामामध्ये अनियमितता करुन श्री. संदिप वाल्मीकी यांनी गैरवर्तन केले आहे. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियम १९७९ चे नियम ४ (१) व ४ (२) अन्वये कार्यालयीन आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे–३/९६/०५, दिनांक १४ फेब्रुवारी, २००५ नुसार निलंबीत केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम १ (ब) अन्वये श्री. संदिप एम. वाल्मीकी, विद्युत मदतनीस यांचे निलंबन कायम करुन विभागीय चौकशी करण्यात यावी. प्रस्तुत प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्रः–</u> ५३ <u>दिनांकः–५/९/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. भालेराव गौतम

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या गैरवर्तनाबाबत श्री. संदिप एम. वाल्मिकी, विद्युत मदतनीस यांना आयुक्तातर्फे बजावण्यांत आलेले निलंबन आदेश कायम करीत आहे.

सुचकांची सही/–

अनुमोदकांची सही/–

<u>एकमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :</u>आता बोला आपणांस काय बोलायचे आहे ते?

<u>**मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :–**</u> महापौरजी, मी मा. महापौरांना, आयुक्तांना व सर्व सभागृहास सुचित करु इच्छितो की, मागील महासभेत पुरपरिस्थितीबाबत जी लक्षवेधी सुचना मांडण्यात आली होती. तिच्या चर्चेच्या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जे गटनेते आहेत श्री. दिलीप लालवानी त्यांनी एक मुद्दा उपस्थित केला होता की हिराघाट शेजारी टेम्पा ट्रॅव्हलर्स चालविणा–याचे एक तात्पुरत्या स्वरुपाचे कार्यालय होते. पुराच्या नावाखाली त्या कार्यालयाच्या बांधकामाचे काम चालु आहे. आर.सी.सी. बांधकाम आहे, त्या कार्यालयाचे यापुर्वीचे जे क्षेत्र होते त्याच्या चौपट आता बांधकाम चालु आहे व मला असेही माहित पडले आहे की, महानगरपालिकेचे काही अधिकारी दोन–तीन दिवसांपुर्वी ते बांधकाम निष्कासित करण्यासाठी तेथे गेले होते परंतु ते खाली हात परत आले. तर मी या सभागृहास सुचित करु इच्छितो की, त्यासाठी कॉंग्रेसच्या नगरसेवकाने व शहराच्या आमदाराने महानगरपालिकेत तक्रार केली आहे. या अनाधिकृत बांधकामास तात्काळ उध्दवस्त केले जावे. परंतु त्यावर कोणतीही कारवाई होत नाही. तर माझे आपणांस निवेदन आहे की, आपण आयुक्तांना निर्देश दया की, आजच त्या कार्यालयाचे बांधकाम थांबविले जावे व ते निष्कासीत केले जावे.

<u>**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**</u> मा. महापौरजी, आता–आताच श्री. हरदास माखिजा यांनी आता जे सांगितले आहे, त्याबाबत थोडी माहिती मी देवु इच्छितो की ते कार्यालय या अगोदर तेथे होते व आता पुर आल्यानंतर ते तुटले आहे. त्याच्या दुरुस्तीचे काम चालु आहे. तर महापालिकेच्या संबंधीत अधिका–याने तेथे जावुन परिस्थिती काय आहे ती पहावी व त्यानंतर आपण निष्कासनाचे आदेश दिले तर चांगले होईल.

<u>**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**</u> महापौर महोदया, या पुरामध्ये कित्येक इमारती, कित्येक घरे, झोपडयांचे नुकसान झाले आहे, मानवतेच्या दृष्टीकोनातुन त्या सर्वांना बांधकाम करण्याची संधी आपण दिली आहे. प्रशासनाच्या अधिका–यांचे म्हणणे आहे की, एक नोटिस काढली आहे की पुराच्या पाण्यामध्ये हे बांधकाम वाहुन गेले आहे म्हणुन तेथे पुन्हा बांधकाम करण्याची परवानगी आम्ही देवू शकत नाही. कारण की न्यायालयात याबाबत केसेस चालु आहेत. परंतु सर्वांना बांधकाम करण्याची आम्ही परवानगी दिली आहे जसे श्री. दिलीप लालवानी व श्री. हरदास माखिजा साहेबांनी म्हटले होते, ते वस्तुस्थितीच्या विपर्यस्थ आहे. श्री.

दिलीप लालवानी यांनी सभागृहात सांगितल्यानंतर वस्तुस्थितीची माहिती घेण्यासाठी आम्ही प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी केली असता, पुर्वीचे जे बांधकाम होते ते पुर्णपणे वाहुन गेले होते म्हणुनच ते नव्याने बांधकाम करत होते व ते कार्यालय नविन नाही. खुप जुने आहे. तसेच यांनी म्हटले होते की, पुर्वीचे जेवढे बांधकाम होते तेवढेच बांधकाम केले पाहिजे. त्यांचेही म्हणणे तेच आहे. जर जास्त बांधकाम करत असतील तर महापालिकेच्या संबंधीत अधिका—याने तेथे जावुन यापुर्वीचे जेवढे बांधकाम होते तेवढेच बांधकाम करण्यास परवानगी दयावी व ते आर.सी.सी. बांधकाम वगैरे नाही.

मा. सदस्य श्री. हरदास माखिजा :—मा. महापौरजी, माझे बंधु श्री. धनंजय बोडारे व श्री. राजेंद्र चौधरी यांनी जे म्हटले आहे त्या कार्यालयाचे जे बांधकाम चालु आहे, त्याचे यापुर्वीचे जेवढे क्षेत्रफळ होते, तेवढयाच क्षेत्रफळाचे सध्या बांधकाम होत असेल तर मला असे नाही वाटत की, त्याबाबत कुठला नगरसेवक किंवा आमदार हरकत घेईल. परंतु मला जी माहिती मिळाली आहे ती अशी की, त्या कार्यालयाचे पुर्वीचे जे क्षेत्रफळ होते त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळाचे बांधकाम चालु आहे. त्यावर मी हरकत घेतली आहे. दुसरे असे की, श्री. बोडारे साहेबांनी आता जो मुद्दा उपस्थित केला, पुराच्या वेळी ज्या—ज्या लोकांची घरे, दुकाने तुटली आहेत, किंवा कारखाने तुटले आहेत, किंवा त्यांच्या संरक्षणभिंती तुटल्या आहेत, त्यांच्या बाबतीत मला दु:खाने म्हणावे लागत आहे की, महानगरपालिका त्यांना बांधकाम करण्याची परवानगी देत नाही व त्यामध्ये लोकांना सहकार्य मिळत नाही असा माझा आरोप आहे. आयुक्त श्री. रामनाथ सोनावणे, मी व आमदार श्री. पप्पु कालानी यांच्यामध्ये एक निर्णय झाला होतो त्याच बरोबर उपायुक्त श्री. ढेंगळेपाटिल हे सुध्दा होते. तेव्हा असे ठरले होते की, पुराच्या वेळेस जी काही बांधकामे पडली आहेत मग ते झोपडे असो, घर असो, दुकान असो, गोदाम असो, कारखाना असो, काहीही असो, त्याबाबत येथे माहिती दयायची आहे. त्यानंतर उपायुक्तांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन तेथेच मौखिक स्वरुपी त्यांना लगेच परवानगी दयायची आहे. परंतु असे होत नाही. याबाबत शहराच्या विविध भागातुन अनेक तक्रारी येत आहेत की महानगरपालिकेकडुन अपेक्षित सहकार्य मिळत नाही. तर मा. महापौरजी माझे आपणांस असे निवेदन आहे की, त्याचबरोबर आयुक्तांनाही माझे निवेदन आहे की, या बाबतीत लोकांना पुर्णपणे सहकार्य दिले जावे जेणेकरुन पुराच्या वेळी ज्यांची घरे, दुकाने, गोदामे पडली आहेत, त्यांच्या बाबतीत कार्यालयीन कोणतीही कार्यवाहीची पुर्तता न करता फक्त प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन, पाहिजे तर पंचनामा तयार करुन त्यांना तात्काळ दुरुस्तीची परवानगी दिली जाईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मा. महापौरजी, जेव्हा लक्षवेधी मांडली होती व आम्ही लोकांनी त्यावेळी विशेष करुन हा मुद्दा उपस्थित केला होता. म्हणुनच आम्ही आपणांस थोडया वेळेपुर्वी विनंती केली की, या सभेत आम्ही थोडा वेळ उशिरा आला होतो परंतु दुरुस्ती परवानगीचा हा मुद्दा अतिशय गंभीर असा मुद्दा आहे. पुरग्रस्तांसाठी शासनाचे किंवा इतर कुणाचेही एक विशेष असे धोरण असते. कारण की सरकार संवेदनशिल असले पाहिजे. यासाठी आमची ही विनंती आहे की, दुरुस्ती परवानगी बाबत त्यांनी गंभीरतेने विचार केला पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— मा. महापौरजी, पुरपरिस्थितीत ज्या लोकांची घरे पडली आहेत, ज्यांचे घरातील सर्व सामान वाहुन गेले आहे, हिराघाट येथिल एका व्यक्तीने महापालिकेत येवुन आम्हांला एक नोटिस दाखविली त्या नोटिस मध्ये ब—याचशा अटी, शर्ती घातलेल्या आहेत. त्यानुसार आपणांस कागदपत्र दाखवायची आहेत. टॅक्स पावती आहे. किंवा या अगोदर जे घर बांधले त्याची परवानगी आपणाकडे आहे का? ही सर्व कागदपत्रे आपण आमच्याकडे जमा करा. त्यानंतरच आपणांस घर दुरुस्तीची परवानगी किंवा बांधकाम परवानगी मिळु शकेल. तर त्या माणसाने सांगितले की, माझ्या घरातील काहीही सामान वाचले नाही. नाल्याच्या बाजुस त्याचे घर आहे, त्याच्या घरामध्ये एवढे पाणी आले होते की, घराचे पत्रे तुटुन गेले. पुर्ण घर वाहुन गेले. ना त्याच्याकडे काही कागदपत्रे आहेत, ना अंगावरचे काही कपडे आहेत, काहीही वाचलेले नाही. तर अशा लोकांनी कोठुन कागदपत्र आणुन साहेबांना दाखवायचे. अशा लोकांना आपण दुरुस्ती परवानगी दयाल किंवा नाही? ते लोक रस्त्यावर राहत आहेत. महापालिकेचे अधिकारी जावुन त्यांची बांधकामे थांबवितात. तर अशा लोकांना बांधकाम करण्याची परवानगी दया. एवढेच मी आपणांस सांगु इच्छितो. धन्यवाद !

मा. सदस्य श्री. राजु जग्याशी :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. हरदास माखिजा यांच्या म्हणण्याचे मी समर्थन करु इच्छितो की, जो पुरग्रस्त विभाग आहे, तेथिल लोकांना लवकरात लवकर घर

दुरुस्तीची परवानगी दिली जावी. तेथे समस्या काय येते की मा.आयुक्त साहेबांनी आपल्या आरोग्य निरिक्षकांना काही निर्देश दिले आहेत व ते लोक व पुरग्रस्त विभागामध्ये जावुन, ज्या लोकांचे पुरामुळे अगोदरच नुकसान झाले आहे, त्यांना त्रास देत आहेत, असे होत आहे की, आरोग्य निरिक्षक नाली किंवा रस्यावरील कच–याकडे न पाहता, जेथे रेती उतरवली आहे तेथे सर्वात अगोदर पोहचतात, तर आयुक्त साहेब, जेथे अनाधिकृत बांधकाम होत आहे तेथे आरोग्य निरिक्षकांना जाण्यासाठी आपण निर्देश देवु शकता. परंतु जो विभाग पुरग्रस्त आहे तेथिल लोकांच्या बाबतीत आपण आरोग्य निरिक्षकांना सांगा की, त्या लोकांना त्रास देवु नका. होते असे की हे लोक कच–याकडे लक्ष न देता रेती, सिमेंट व विटा कुठे पडल्या आहेत तेथे सर्वात अगोदर पोहचतात. कृपया या गोष्टीकडे लक्ष दिले जावे. धन्यवाद !

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> मा. महापौरजी, माझ्या प्रभागामध्ये एक रस्ता खुपच तुटला आहे. खुनी खड्डा झाला आहे. एक महिन्याच्या कालावधीत सुध्दा तो रस्ता तयार होवू शकत नाही. आंबिवली येथे रेल्वेचा एक किलोमिटरचा ट्रॅक जो वाहुन गेला होता त्याचे काम एक महिन्यामध्ये पुर्ण झाले परंतु माझ्या प्रभागामधील त्या रस्त्याचे एक छोटेसे काम आहे. हे जरुरी काम आहे ते महानगरपालिका करु इच्छित नाही तर याबाबत मा. महापौरांकडे माझा असा आग्रह राहिल की, लवकरात लवकर ते काम चालु करावे. कारण की, तेथे बरेच त्रासाचे होत आहे व कधीही अपघात होवू शकतो. कारण की लोक असे म्हणतात की, अपघात झाल्यानंतर महानगरपालिका, प्रशासन जागे होते, असे होवू नये म्हणुन मी आपणांसही आठवण करुन देत आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौरजी, या विषयाबाबत अगोदरच मी आयुक्त साहेबांना लेखी तक्रार दिली होती. त्यानंतर पर्वाच आम्ही आयुक्त साहेबांना भेटलो आहोत, परंतु तरीही लोकांना त्रास देण्याचे काम महापालिकेचे अधिकारी करत आहेत. ते काम चालुच आहे. आज सकाळीच अशी एक घटना घडली, त्याचे उदाहरण श्री. दिलीप गायकवाड यांनी दिले आहे, तर कृपया करुन आपण प्रशासनाचे प्रमुख आहात, प्रशासनाचे प्रमुखांचे जर ते ऐकत नसतील तर मग कुणाचे ऐकतील? असा प्रश्न पुढे उभा राहतो. तर प्रशासनाने पुरग्रस्त लोकांना घरदुरुस्ती परवानगी देण्याबाबत तसेच अधिका–यांकडुन लोकांना जो त्रास दिला जात आहे त्याकडे लक्ष दयावे. दुसरी अशी सुचना आहे की, जो वालधुनीचा नाला आहे, जो पुर आला होता त्यामुळे लोकांचे जे नुकसान झाले, त्या वालधुनी नाल्याबाबत बी.एम.आर.डी.ए. मध्ये एक बैठक झाली आहे व तो नाला रुंद करण्याचे प्रयत्न चालु आहेत. त्याबाबत जर प्रशासनाने अधिक माहिती दिली तर बरे होईल. जेव्हा आम्ही प्रभागामध्ये फिरतो तेव्हा याबाबत लोक आम्हांस विचारणा करतात, तर याबाबत आम्हांला माहिती असेल तरच आम्ही लोकांना माहिती देवु . तर कृपया प्रशासनाने याची माहिती दयावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, त्यादिवशी लक्षवेधीवर जी चर्चा झाली होती, त्यामध्ये आयुक्त साहेबांनी पुरग्रस्त विभागांची जी यादी सादर केली होती, त्यांनी एक समिती तयार केली होती, त्यामध्ये मा. महापौर, उपमहापोर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते यांची तर त्यांनी जी यादी दिली होती त्यानंतर मा. महापौरांनी, त्यामध्ये ३०–४० विभाग जोडले होते, तर ज्या–ज्या विभागामध्ये पुराचे जे पाणी आले होते ते विभाग सुध्दा जोडले जावेत. जसे माझ्या प्रभागामध्ये गायकवाड पाडा, आकाश कॉलनी मध्ये पुराचे पाणी आले होते, क्रांतीनगर, हनुमान गल्ली, विजय पाटील चाळ, निळकंठ चाळ, नेहरु नगर, शिवकॉलनी, इंदिरा नगर, विठ्ठलनगर, कैलास कॉलनी या सर्व विभागांमध्ये पुराचे पाणी आले परंतु आयुक्त साहेब जेथे–जेथे पोहचले त्याच विभागांची यादी तयार केली, जेथे ते पोहचले नाहीत त्या विभागांची नावे या यादीत घेतली नाहीत. तर असा पाऊस ५० ते १०० वर्षानंतर पहिल्यांदाच झाला होता. असा कोणताही काना कोपरा नाही जेथे पुराचे पाणी आले नाही. तर कृपया आपण जी यादी तयार केली होती व त्यानंतरही जे विभाग त्या यादीमध्ये समाविष्ट करण्याचे बाकी होते ते विभाग सुध्दा जोडुन ते पुरग्रस्त विभाग म्हणुन घोषित केले जावेत. मा. महापौर महोदया, आयुक्तांनी आपली स्वत:ची यादी तयार करुन दिली होती ती मान्य न करता, आपण पुर्ण शहरामध्ये फिरला होतात, आपणाकडे सर्व विभागातील लोक आले होते आपण व उप–महापौर, एक–एक विभागामध्ये गेला होतात, आपण महापालिकेच्या वतीने तेथे सुविधाही पोहचविल्या. तर ती जी यादी आहे ती वाढविली जावी व आयुक्त साहेबांनी व आपण असे ठरविले होते की, २० हजार लोकांना सुविधा दिली जाईल, १७ हजार लोकांना आजपर्यंत सुविधा मिळाली आहे. ३ हजार लोकांना अदयापपर्यंत मिळालेली नाही. ज्या मध्ये आमच्या काही सदस्यांनी कुपण सुध्दा वाटप केली आहेत, परंतु तेथे सुविधा पोहचल्या नाहीत. तर त्यावर सुध्दा आपण पुर्नविचार करु शकतात. जर एक–दोन हजार लोकांना कुपण वाटप केली आहेत तर महानगरपालिकेकडुन त्यांना जर सवलत मिळत असेल तर पहावे ते मी

आपणावर सोडतो. परंतु पुरग्रस्त विभागाबाबतची जी यादी आहे या यादीमध्ये आपल्या विभागातील नाव समाविष्ट करण्यासाठी जे नगरसेवक नावे देवू इच्छितात त्यांनी ती दयावीत तसेच मी असेही ऐकले आहे की, जेथे पुराचे पाणी आले होते त्या विभागातील लोकांना असे प्रमाणपत्र महापालिकेकडुन देण्यात येणार आहे की ही व्यक्ती पुरग्रस्त आहे. तर जेथे–जेथे पुराचे पाणी आले होते त्या सर्व विभागांना पुरग्रस्त विभाग म्हणुन घोषित केले जावे.

मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :– मा. महापौरजी, श्री. किशोर वनवारी यांचे म्हणणे मी आणखी थोडे पुढे सरकवु इच्छितो की मी आयुक्त साहेबांना पत्र दिले आहे माझ्या प्रभागामध्ये सुध्दा ५०० घरे पुराच्या पाण्याचे प्रभावित झाली आहेत व महानगरपालिकेच्या वतीने तेथे मदत कार्य केले होते. साधनसामुग्री वाटप केली होती, रॉकेल वगैरे वाटप केले होते, एवढेच नाही तर लोकांना पैसे सुध्दा वाटप केले आहेत. परंतु येथे जी यादी आहे त्या यादीमध्ये त्या विभागाचा उल्लेख नाही. हरीजन कॉलनी, हनीमुन कॉटेज, बॅरेक नं. ३६८, सोनारा हॉलच्या समोर, भोलेनाथ कॉलनी, सतनाम कॉलनी, ४० कोठी, या ८ ठिकाणी फार मोठया प्रमाणावर पुराचे पाणी आले होते. येथिल लोकांना ३ दिवस आम्ही शाळा, कॉलेज जेथे–जेथे जागा मिळाली तेथे ठेवले होते. महानगरपालिकेच्या वतीने खुपच चांगले मदत कार्य झाले, त्या लोकांना अन्नधान्य, रॉकेल इत्यादी साहित्य मिळाले. एवढेच नाही तर ब–याचशा लोकांना पैसे सुध्दा मिळाले. त्यातील काही लोकांना अजुन मिळायचे आहेत. परंतु येथिल यादीमध्ये आता मी हे जे विभाग सांगितले ते समाविष्ट केले जावेत. धन्यवाद!

मा. महापौर :– वालधुनी नदीबाबत एम.एम.आर.डी.ए.मध्ये जी बैठक झाली होती त्याची माहिती पुढील महासभेत दिली जाईल व आयुक्त साहेबांनी या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे की, जे लोक घरदुरुस्ती परवानगीसाठी येतात, त्यांचे कागदपत्र पाहून त्यांना त्या हिशोबाने बांधकाम परवानगी दिली जावी.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :– ज्या लोकांचे सर्व सामान सुमान वाहुन गेले आहे त्यांच्याबाबतीत काय करणार? झोपडपट्टी, गलिच्छवस्त्यामध्ये राहतात, हिराघाट, धोबीघाट, कमला नेहरु नगर, अशा ठिकाणी झोपडयांमध्ये जे लोक राहतात त्यांचे काय करणार?

मा. महापौर :– ज्यांचे घर व कागदपत्रे वाहुन गेली आहेत त्यांच्या बाबतीत प्रत्यक्ष जागेची पाहणी करुन त्यांना सुध्दा बांधकाम परवानगी दिली जाईल. त्याचबरोबर सभागृहास माझे नम्र निवेदन आहे.......

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– तसेच मी जे म्हटले योगासन समोर जो खुनी खड्डा तयार झाला आहे त्याचे काय होईल?

मा. महापौर :– कॅम्प नं. ५ येथिल टेकडीवर एक रस्ता आहे तो सुध्दा वाहुन गेला आहे, त्याचे सुध्दा लवकरात लवकर निरिक्षण करणे अतिशय जरुरीचे आहे. उल्हास स्टेशन येथिल जो छोटा पुल आहे तो सुध्दा तुटला आहे, त्यामध्ये सुध्दा खड्डे पडले आहेत, प्रत्येकवेळी त्याबाबत मागणी केली जाते, ही दोन्ही कामे होणे अतिशय जरुरीचे आहे. आपण हा आदेश समजुन ही दोन्ही कामे करावीत. तसेच टेम्पो असोशिएशनचे जे कार्यालय तयार होत आहे त्याचेही निरिक्षण करुन व योग्य ती कारवाई त्यावर करुन तेथे आपले पथक पाठवून अहवाल मागविला जावा व त्याबाबत माहिती दिली जावी व त्यानंतर सभागृहास माझे नम्र निवेदन आहे की सभा संपत आहे. सालाबादप्रमाणे यावर्षीही आमच्या घरी गणपती व गौरीचे पुजन आहे. मी आपणा सर्वांना एक निवेदन पत्र दिले आहे. माझे आपणांस हे सुध्दा निवेदन आहे की, आपण गणपती व गौरी मातेचे दर्शन घेण्यासाठी आमच्या घरी जरुर यावे, धन्यवाद!

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :– मा. महापौरजी आपण श्री. गणेश दर्शनासाठी आम्हांस निमंत्रण दिले आहे, श्री. गणेश दर्शनासाठी आम्ही आपल्या घरी जरुर येवु. त्याचबरोबर दरवर्षी रस्त्यावर थोडयाफार प्रमाणात खड्डे पडत होते, परंतु या वर्षी फार मोठया प्रमाणावरील पावसामुळे फार मोठया प्रमाणावर रस्त्यावर खड्डे पडले आहे तर लवकरात लवकर रस्त्यावरील खड्डे भरले जावेत अशी मी याठिकाणी सुचना करु इच्छितो धन्यवाद!

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** मा. महापौरजी, एक छोटीशी सुचना आहे, आपण सांगितले की, उल्हासनगर येथिल पुल वाहुन गेला आहे, तसेच माझ्या प्रभागामध्ये वालधुनी नाल्या शेजारील सार्वजनिक शौचालयांचे दरवाजे , पत्रे वाहुन गेले आहेत, त्यांची सुध्दा लवकरात लवकर दुरुस्ती केली तर चांगले होईल.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मी सुध्दा शेवटी—शेवटी एक विनंती करु इच्छितो की, गणेश दर्शन प्रतियोगिता समितीच्या वतीने, ज्या समितीच्या आपण अध्यक्ष आहात, शहरामध्ये जेवढे काही सार्वजनिक गणेश उत्सव मंडळे आहेत, त्याबाबत आमच्या सर्व सदस्यांना व पत्रकार बंधुना आमची विनंती आहे की, ३ तारखेपासुन ७ तारखेपर्यंत क्रिडा समितीच्या कार्यालयातुन ते फॉर्म घेवुन जावु शकतात. व गणपती मंडळांना त्यांनी सांगावे की त्यांनी ते फॉर्म त्वरीत भरुन दयावे. सदस्यांची जी समिती आहे, ठराव आज पारीत झाला आहे ती यादी उदया आपणांस मिळेल. या समितीमध्ये मा. महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते असतात, त्याचबरोबर सर्व मुर्तीकार, पत्रकार, चित्रकार, समाजसेवक, नगरसेवक अश्या तीस लोकांची समिती आज पास झालेली असुन ती यादी बनवुन उदया सर्वांना वाटप करण्यांत येईल......... एक चित्रकार तर आपणच आहात ना? मला तर आपणच चित्रकार वाटतात. कृपया सार्वजनिक गणेश मंडळाच्या लोकांनी उदया फॉर्म भरावा, धन्यवाद!

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**मी सभागृहास सांगु इच्छितो की, येणा—या ९ तारखेला कॅम्प नं. ५ मध्ये पुज्य चालिया साहेब यांचा मेळा असतो, माझी आपणा सर्वांना विनंती आहे की, आपण सर्वांनी दर्शनास यावे. तसेच आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की, जे छोटे—मोठे रस्त्यावर खड्डे भरण्याचे काम बाकी आहे ते पुर्ण केले जावे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** आयुक्त साहेबांनी पुज्य चालिया साहेबांसाठी आदेश काढले आहेत परंतु सर्व प्रभाग समितीमधील मजुर असेच बसले आहेत काही काम करत नाहीत.

**मा. सचिव:—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१९ सप्टेंबर, २००५

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/९/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.०९.२००५ रोजी सायंकाळी ४. ०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३७. | श्री. चव्हाण रमेश |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३८. | श्री. जाधव प्रशांत |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ३९. | श्री. जाधव सुरेश |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना | ४०. | श्रीमती. जयश्री सुर्वे |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४२. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ११. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४५. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १२. | श्री. एडके गणपत गोविंद | ४६. | श्री. भालेराव गौतम |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४७ | श्रीमती वसिटा बेबी |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४८. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १५. | श्री. उमाप रामदास | ४९. | श्री. ठाकुर अशोक |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५०. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५१. | श्री. अंकुश म्हस्के |
| १८. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५२. | श्री. पंजाबी नारायण |
| १९. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २०. | श्रीमती अनिता गुप्ता | ५४. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २१. | श्री. पवार नाना | ५५. | श्रीमती भटिजा मोकल |
| २२. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५६. | श्री. जयसिंघानी अनिल |
| २३. | श्री. जग्यासी राजु | ५७. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २४. | श्री. निकम शांताराम | ५८. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २५. | श्री. टाले प्रमोद | ५९. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २६. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्रीमती निना नाथानी |
| २७. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६१. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २८. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६२. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २९. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६३. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६४. | श्रीमती करोतिया मालती |
| ३१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६५. | श्रीमती मीनु राजकुमार दासानी |
| ३२. | श्री. जेसवानी सतराम फतनदास | ६६. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३४. | श्रीमती भावना खिलनानी | ६८. | श्री. माखिजा हरदास |
| ३५. | श्री. राजेश उर्फ राज असरोंडकर | ६९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३६ | श्रीमती माने किरण | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. टेकचंदानी राजु, २. श्री. मुलचंदानी महेंद्र, ३. श्रीमती खांडेकर प्रेमा, ४. श्री. साधवानी मोहन, ५. श्रीमती साधवानी जया, ६. श्री. बच्चाराम रुपचंदानी, ७. श्री. चौधरी राजेंद्र , ८. श्री. साधवानी मनोज, ९. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, १०. श्रीमती माखिजा किरण, ११. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास , १२. श्री. राजेश वदारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी या अनुपस्थित असल्याने मा. उप—महापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> मा. महापौरजी, एक विषय आहे जो मी प्रश्नोत्तरापुर्वी उपस्थित करु इच्छितो. ३१ व १ तारखेसाठी सेंच्युरी येथिल विश्रामगृह आपल्या महापालिकेने आरक्षित केले होते. पुण्याचे महापौर व तेथिल अधिकारी यांच्यासाठी आरक्षित केले होते. त्यानंतर असे कळले की ते येणार नाहीत. तरी देखिल आरक्षण लेखी पत्र देवून रद्द केले नाही. त्या दिवशी रात्री तेथे जावुन एक माणुस एका महिले सोबत राहिला आहे व सकाळी तेथुन निघाला आहे. तो कोण आहे याची चौकशी व्हायला हवी. कारण यामुळे महापालिकेचे नाव खराब होत आहे.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, हा जो प्रश्न विचारला आहे त्याबद्दल मी सांगु इच्छितो की, महाराष्ट्र महापौर परिषदेच्या अध्यक्षा व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या महापौर श्रीमती कदम येथे येणार होत्या. उप—महापौर श्री. विनोद तलरेजा यांनी त्यांच्यासाठी विश्रामगृह आरक्षित करण्याबाबत निर्देशित केले होते. आमच्या जनसंपर्क अधिका—याने त्याप्रमाणे विश्रामगृह आरक्षित केले होते. संध्याकाळी असे कळले की त्या येणार नाहीत. त्याच क्षणी आमचे जनसंपर्क अधिकारी श्री. भदाणे यांनी विश्रामगृहातील लिपिक श्री. नटराजन यांना दुरध्वनीद्वारे संपर्क साधुन आम्ही येणार नाही असे सांगितले. त्याचप्रमाणे सायंकाळी ५.०० वाजेनंतर तेथे कोणतेही पत्र स्विकारत नाही. याचा अर्थ आम्ही जे आरक्षण केले होते ते रद्द केले होते. त्यानंतर तेथे कोण माणुस जावुन काय करतो, ती मालमत्ता सेंच्युरी कंपनीची आहे. त्यांनी त्याची नोंद ठेवायला हवी होती. जसे सन्माननिय सदस्यांनी सांगितले की, महापालिकेचे अधिकारी होते तर आम्ही त्याची चौकशी करु.

मा. सदस्य श्री. रामरख्यानी मोहनदास सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> महापालिकेने पोलिसांना देखील चौकशीसाठी पत्र दयायला हवे.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):—</u>ठिक आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> जोपर्यंत आपण आरक्षण केले होते, जोपर्यंत पत्र देवुन आरक्षण रद्द केले नव्हते तोपर्यंत ते आपल्या ताब्यात होते. यासाठी पोलिसांना पत्र देवुन याची गुप्तरित्या तपासणी व्हायला हवी. तो कोण अधिकारी होता त्याचे नाव समोर यायला हवे.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):—</u>पोलिसांना देखील पत्र देवु व एडिटरलाही पत्र देवुन तो माणुस कोण होता याची चौकशी करु.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> एक विषय आहे. मी बोलणार होतो परंतु त्यापुर्वी श्री. भुल्लर यांनी हा विषय उपस्थित केला. सर्वसाधारणपणे आपण विषय सुरु होण्यापुर्वी ज्यांचे निधन झाले आहे त्यांना श्रध्दांजली देतो तर आपल्या पुर्व नगरसेविका व स्थायी समिती सभापती श्रीमती भगवंती रुपचंदानी यांचे निधन झाले आहे. आपले सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांच्या त्या पत्नी देखील आहेत. श्री. बच्चाराम रुपचंदानी यांच्या वडिलांचे देखिल निधन झाले आहे. तर मला असे वाटते की, त्यांना श्रध्दांजली देवुन त्यानंतर पुढील कार्यवाही सुरु करावी.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, मी याला अनुमोदन देतो, त्याचप्रमाणे श्री. दयाल आशा यांच्या मातोश्री श्रीमती पार्वतीबाई यांचे देखिल निधन झाले आहे. त्यांना देखील श्रध्दांजली देण्यात यावी.

**<u>शोक प्रस्ताव</u>**

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

उल्हासनगर महानगरपालिकेच्या माजी सदस्या श्रीमती भगवंती बच्चाराम रुपचंदानी यांचे दिनांक ०६ सप्टेंबर २००५ रोजी दु:खद निधन झाले आहे. श्रीमती रुपचंदानी ह्या १९९७ ते २००२ या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेच्या सदस्या होत्या. त्याचप्रमाणे त्यांनी एक वर्ष स्थायी समिती सभापती म्हणुन देखिल काम पाहिले आहे. त्याचप्रमाणे महापालिका सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचे वडिल श्री. बाशोमल रुपचंदानी यांचे देखिल नुकतेच निधन झाले आहे.

त्याचप्रमाणे प्रख्यात सिंधी साहित्यीक श्री. दयाल आशा यांच्या मातोश्री श्रीमती पार्वतीबाई धामेजा यांचे देखिल नुकतेच निधन झाले आहे.

यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र. ५३ अ</u>** **<u>दिनांक:—१९/९/२००५</u>**

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्रीमती भगवंती रुपचंदानी, श्री. बाशोमल रुपचंदानी, श्रीमती पार्वतीबाई धामेजा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर /पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात. प्रश्नोत्तरे.........

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४२८ हा श्री. पृथ्वी वलेचा यांचा आहे. यावेळी ते सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

**<u>प्रश्न क्र. ४२८:—</u>** १. बॅ.नं. ५७० चे मागे, उल्हासनगर—२, बॅ.नं. ६१९ चे मागे, सुलभ शौचालयाचे बांधकाम एक वर्षापासुन अर्धवट सोडलेले का आहे. तरी यांस जबाबदार कोण आहे व हे काम अर्ध्यावर का सोडले आहे?

२. नगरपालिकेचे जे शौचालय आहे त्यांचे साफ सफाई व फिनेलसाठी पाणी कोठुन आणले जाते. पाणी टंचाई असल्यामुळे साफसफाई कसे केले जाते?

३. कचराकुंडी व खुल्या जागेवर संस्थेचे बोर्ड लावलेले असतात. सदर बोर्ड लावल्यावर त्या जागेची मालकी हक्क सिध्द होते का? व जर नाही तर ते बोर्ड तेथुन हटविले का जात नाही?

<u>उत्तर :–</u> सुलभ शौचालयांच्या अर्धवट बांधकामाबाबत संबंधीत संस्थेस नोटिस बजावण्यात आली आहे.
साफ सफाई व फिनेलसाठी जवळच्या बोरवेलमधुन पाणी आणले जाते. आवश्यकतेनुसार टॅन्करद्वारे पाणी उपलब्ध केले जाते.
कचरा कुंडी व खुल्या जागेवर बोर्ड लावल्यास मालकी हक्क सिध्द होत नाही. याबाबतीत मालमत्ता विभागाकडुन सर्वेक्षण होवून कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**<u>मा. सचिव :–</u>**प्रश्न क्र. ४२९ हा श्री. पृथ्वी वलेचा यांचा आहे. यावेळी ते सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

**?** **<u>प्रश्न क्र. ४२९:–</u>** १. नगरपालिका स्थापन झाल्यापासुन शहरात एकुण किती सार्वजनिक शौचालय आहेत (आजपर्यंत)

२. त्यापैकी किती सार्वजनिक शौचालय व्यवस्थित व जनतेच्या वापरात आहेत?

३. त्यापैकी किती शौचालय मोडकळीस व जनता वापर करीत नाहीत व त्या शौचालयांबाबत महानगरपालिकेतर्फे काय कार्यवाही करण्याची तजबिज आहे?

४. जे शौचालये तोडुन अनधिकृत बांधकामे त्यावर झाली अशी किती व संबंधीतांविरुध्द काय कार्यवाही करण्यांत आली. तसेच ज्यांनी अतिक्रमण केले त्यांची नावे व संबंधितांविरुध्द कार्यवाही काय करण्यांत येणार व किती कालावधीत व कोणत्या प्रकारची कार्यवाही केली आहे?

५. जे शौचालय मोडकळीस आलेले आहेत तेथे ते तोडुन त्या जागी सुलभ शौचालये बांधता येतील का? व किती कालावधीत बांधता येतील?

६. शौचालये साफसफाई करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे कोणती पध्दत हाताळली जाते?

७. किती शौचालयांना पाण्याचे कनेक्शन अथवा पाण्याची टाकीची व्यवस्था केली आहे का नसल्यास सार्वजनिक शौचालयांना किती कालावधीत पाण्याची व्यवस्था केली जावु शकते?

८. काही शौचालयांवर पुरुष व स्त्री असे नावाचे बोर्ड दिलेली नसल्यामुळे अडचणी येतात तर ती नावे का दिलेली नाहीत?

९. सुलभ शौचालयाच्या अर्धवट कामासाठी केलेल्या तक्रारीबाबत कोणतेही उत्तर दिलेले नाही. (दिनांक २३/१२/२००४, दिनांक ८/६/२००५ व दिनांक २/७/२००५)

१०.सन २००३–२००५ या कालावधीमध्ये महापालिका निधितुन सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे कोणकोणत्या प्रभागात कोणकोणते काम झाले आहे?

<u>उत्तर :–</u> दि. १२/४/०५ ते २८/४/०५ या कालावधीत स्वच्छत निरिक्षक यांनी केलेल्या सर्वेक्षणावरुन ६७८ सार्वजनिक शौचालय आहेत.

त्यापैकी ६०७ सार्वजनिक शौचालय जनतेच्या वापरात आहेत.

त्यापैकी ७१ जनतेच्या वापरात नाहीत. मोडकळीस व जनता वापर करीत नाही अशा शौचालयांची महापालिकेकडुन (सा.बां.विभाग) दुरुस्ती केली जाते.

याबाबतीत सर्वेक्षण झालेले नाही. नव्याने सर्वेक्षण करुन अबांनिवि कडुन निष्कासन करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

होय, संबंधीत स्वच्छता निरिक्षक यांच्या अहवालावरुन मा. आयुक्त यांच्या मान्यतेने विषय महासभेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल महासभेच्या मंजुरीने संबंधीत संस्थेस तिन (३) महिन्यात बांधण्याबाबतचा करार करुन त्यानुसार कार्यवाही करता येईल.

शौचालय साफ सफाई करण्यासाठी मनुष्यबळ पध्दत हाताळली जाते.
एकुण पाच (५) सार्वजनिक शौचालयांना पाण्याचे कनेक्शन आहे. सार्वजनिक शौचालयांना पाण्याची व्यवस्था पाणी पुरवठा विभागाकडुन केली जावु शकते. सार्वजनिक शौचालयांना पाण्याची व्यवस्था करण्याबाबत पाणी पुरवठा विभागाकडे कळविण्यात आले आहे.

सार्वजनिक शौचालयांवर पुरुष व स्त्री असे स्वतंत्र बोर्ड लावण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कळविण्यात आले आहे.

सुलभ शौचालयाच्या अर्धवट केलेल्या बांधकामाबाबत संबंधीत संस्थेस नोटीस बजावण्यात आली आहे.

सदरची माहिती लांबणीची असल्याने सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये उपलब्ध आहे.
(सुमारे ३०० पाने)

<u>मा. सचिव :—</u>प्रश्न क्र. ४३० हा श्री. रामदास उमाप यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४३०:—</u> प्र.क्र. १ अ) प्रभाग क्र. ६ मधील चंद्रशेखर आजाद चौक ते तुळशी निवास वडार कॉलनी रोडची प्राकलनाची तारीख /प्राकलनाची माहिती/ आतापर्यंत रोडचे काम न होण्याचे कारण / सध्या स्थिती/ कामाला सुरुवात केव्हा करणार यांची माहिती दयावी.

ब) भारत मार्बल ते कृष्णनगर संतोषी माता मंदिर पर्यंतचा रोड प्र. क्र. ६ प्राकलनाची तारीख / प्राकलनाची माहिती / काम न होण्याचे कारण सध्या स्थिती / काम सुरु न होण्याचे कारण / कधी काम सुरु होणार? पुर्ण माहिती दयावी.

क) प्र. क्र. ६ बजरंग ऑईस फॅक्टरी ते कृष्णनगर, रोड बाबत प्राकलनाची तारीख / प्राकलनाची माहिती/ आतापर्यंत रोडचे काम न होण्याचे कारण / सध्या स्थिती / कामाला सुरुवात केव्हा होणार?

वरील प्रश्न महासभेपूढे ठेवणेस विंनती आहे.

<u>उत्तर :—</u>या कामाची निविदा क्र. २८२ दिनांक १०/१२/२००४ अन्वये मागविण्यात आली होती. परंतू सर्वात कमी दराच्या निविदाकाराने दर कमी करण्यास तक्रार दिल्याने निविदा क्र. ११ दिनांक ८/९/२००५

अन्वये सदर कामाच्या निविदा पुन्हा मागविण्यात आल्या आहेत. निविदा कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर स्विकृत करण्यात येणा–या निविदाकारास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कामास सुरुवात होणार आहे.

या कामाची निविदा मिळाल्यानंतर संबंधित ठेकेदाराशी वाटाघाटी करुन स्विकृत करण्यात आलेली निविदा आदेश देवून कामास सुरुवात करण्यात येत आहे. मंजूरी करीता स्थायी समितीसमोर पाठविण्यात आली आहे. स्थायी समितीकडुन मंजुरी मिळताच कार्यारंभ आदेश देवून कामास सुरुवात करण्यात येईल.

या कामाची निविदा मिळाल्यानंतर संबंधीत ठेकेदाराशी वाटाघाटी करुन स्विकृत करण्यात आलेली निविदा मंजुरी करीता स्थायी समिती समोर पाठविण्यात आली आहे. स्थायी समितीकडुन मंजूरी मिळताच कार्यारंभ आदेश देवून कामास सुरुवात करण्यात येत आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u>उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४३१ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे. यावेळी ते सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

? **<u>प्रश्न क्र. ४३१:–</u>** प्र. क्र. १) वाल्मीकी आंबेडकर योजने अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकुण किती ठिकाणी नविन शौचालये बांधण्यात आलीत? (यादी दयावी)

अ. त्यावर एकुण किती खर्च करण्यात आला?

ब. सदर खर्चाची देयके महापालिकेने शासनाला सादर केली आहेत काय?

क. सदर खर्चापोटी शासनाकडुन महापालिकेस किती अनुदान प्राप्त झाले आहे?

ड. सदरची शौचालये सुस्थितीत आहेत काय?

<u>उत्तर:–</u> प्रस्तावित २९

पुर्ण झालेली २४

सोबत यादी जोडली आहे.

रुपये ८९.९० लक्ष

होय

रुपये ६२.८६ लक्ष

होय

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४३२ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे. यावेळी ते सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ४३२:–</u> प्र. क्र. २) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समित्यांची स्थापना कोणत्या हेतूने करण्यात आली आहे?

अ. प्रभाग कार्यालयामार्फत कोणकोणती कार्य–कर्तव्ये पार पाडण्यात येतात? त्यासाठी आवश्यक अधिकार प्रभाग अधिका–यांना सूपूर्त करण्यात आले आहेत काय?

ब. प्रभाग कार्यालयांमध्ये आवश्यकतेनुसार कर्मचारी वर्ग कार्यरत आहे काय?

क. प्रभाग कार्यालयांमुळे कारभाराचे विकेंद्रीकरण साध्य झालेले आहे काय?

<u>उत्तर :–</u>२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ मधील तरतूदीनुसार व सर्वसाधारण महासभा ठराव क्र.४, दिनांक २९/४/२००१ अन्वये ४ प्रभाग समित्यांची सीापना करण्यात आली आहे.

अ) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे–५/१४४, दिनांक २९/४/२००३ अन्वये प्रभाग समितीमार्फत कार्य–कर्तव्य पार पाडणेबाबत आदेश देण्यात आले आहेत.

ब) होय

क) होय

<u>मा. सचिव :–</u>प्रश्न क्र. ४३३ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे. यावेळी ते सभागृहात अनुपस्थित असल्याने त्यांच्या प्रश्न व उत्तराची सभेच्या कामकाजात नोंद करण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. ४३३:–</u> प्र. क्र. १) सन २००५–२००६ या वर्षात मान्सुन पुर्व रस्त्यातील खड्डे भरण्याचे काम कोण–कोणत्या ठिकाणी केले गेले आहे?
अ) गणेशोत्सवाच्या काळात करण्यात आलेले खड्डे भरण्याचे काम कोण–कोणत्या ठिकाणी केले गेले आहे?
ब) मान्सुन पुर्व केलेल्या कामाच्या ठिकाणी पुन्हा गणेशोत्सवाच्या काळात काम केले आहे काय?

<u>उत्तर :–</u> सोबत यादी जोडली आहे.

सोबत यादी जोडली आहे.

जुलैं व ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तीन ठिकाणी खड्डे भरावे लागले आहेत.

मा. सचिव :–प्रश्न संपलेले आहेत. प्रशासनाकडुन एक आयत्यावेळचा विषय प्राप्त झाला आहे. तसेच एक लक्षवेधी सुचना आलेली आहे. आयत्यावेळचा विषय पुढील प्रमाणे आहे........

विषय क्र. १० :– पुरग्रस्त महापालिका अधिकारी व कर्मचा–यांना ३ महिन्यांचे अग्रिम वेतन बिनव्याजी देण्यास मान्यता देणे.

**यावेळी मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला व त्यांच्या जागी आसनस्थ झाल्या.**

मा. महापौर :– सदरचा विषय आयत्यावेळचा विषय म्हणुन सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यात येत आहे.

मा. सचिव :– तसेच एक लक्षवेधी सुचना प्राप्त झाली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे...............

**मा. सदस्य / सदस्या श्रीमती कमला शर्मा, श्री. सुरेश जाधव, श्री. प्रशांत जाधव, श्री. राजु जग्याशी, श्री. नाना पवार, श्री. प्रभुनाथ गुप्ता, श्री. ठाकुर विनोद, श्री. सतरामदास जेसवानी, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्रीमती भावना खिलनानी, श्रीमती लबाना होशियारसिंग, श्री. पृथ्वी वलेचा, श्री. प्रमोद टाले, श्रीमती नीना नाथानी, श्रीमती बेबी वसिटा, श्री. एडके गणपत, श्री. सुर्यकांत लिंगे, श्रीमती मीना सोंडे, श्रीमती निता आहुजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

---

## लक्षवेधी सुचना

सुचकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :–श्री. गोविंदराम लुंड

**विषय** :– कचरा ठेकेदार, अंडर ग्राऊंड गटर लाईन ठेकेदार का सही काम न करने बाबत लक्षविधी ।

उल्हासनगर महानगरपालिका के और से कचरा ठेकेदार, अंडर ग्राऊंड गटर लाईन साफ करता ठेकेदार सही काम न किए जाने से यहां के नागरीक व नगरसेवक अत्यंत परेशान है इस लक्षविधी द्वारा महानगरपालिका की महासभा में चर्चा हो यह विनंती ।

---

मा. सचिव :–सदरची लक्षवेधी सुचना मा. महापौरांनी स्विकृत केली आहे. कृपया श्री. सतरामदास जेसवानी यांनी त्यांचा प्रस्ताव सादर करावा.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :– मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्यांना मी ही माहिती देवु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेने काही दिवसांपुर्वी ॲन्थोनी नावाच्या ठेकेदाराला कचरा हटविण्याच्या कामाचे कंत्राट दहा वर्षासाठी दिलेले आहे. त्या ठेकेदाराने सुरुवातीस खरोखर चांगल्याप्रकारे काम सुरु केले होते. त्यावेळेस त्यांनी घराघरातुन कचरा जमा करण्यासाठी काही कामगार नियुक्त केले होते. ते कामगार एक वेगळाच गणवेष घालुन संपुर्ण शहरात दिसुन येत होते. ज्यामुळे नागरीक देखिल खुष होत होते. त्यावेळेस आम्ही शासन व प्रशासनाला यासाठी धन्यवाद देखिल दिले होते की, आपण ज्या ठेकेदाराची नियुक्ती केली आहे तो योग्य आहे, त्याच्याकडे चांगल्या गाडया आहेत व तो

चांगल्याप्रकारे काम करीत आहे. परंतु काही काळापासुन त्याच ठेकेदाराने चुकीच्या प्रकारे काम सुरु केले आहे. जो कचरा वेळेवर उचलला जात होता तो आता उचलला जात नाही. ब—याचवेळा आम्हांला प्रभाग समिती कार्यालयात जावुन स्वच्छता निरिक्षकाच्या तक्रार वहीत याची नोंद करावी लागते की या—या ठिकाणचा कचरा उचलला गेला नाही. यानंतर स्वच्छता निरिक्षक त्यांना फोन करुन सांगतो की, या ठिकाणचा कचरा आपण उचलला नाही. तरी देखिल तो ठेकेदार लक्ष देण्यास तयार नाही व कचरा उचलण्यास तयार नाही. याची पुर्ण माहिती मी येथे फोटो काढुन आणली आहे. कशाप्रकारे दोन—तीन दिवस कचरा उचलला जात नाही याचे फोटो मी काढुन आणलेले आहे. मी एका कच—याच्या खत्यावर स्वच्छता निरिक्षक श्री. हिबारे यांना बोलाविले होते की आपण स्वत: येवुन बघा. तेथे श्री. हिबारे यांचा मी फोटो देखिल काढला आहे. त्यानंतर लगेच तेथे गाडी येवुन कचरा हटविला गेला. तर हे काम आम्ही नगरसेवकांनीच करायचे का? त्या ठेकेदाराने कामात ढिलाई का सुरु केली आहे? त्यांच्याकडे कसली कमतरता आहे? अशा सुस्तीने काम का सुरु आहे? कचरा उचलतांना अर्धाच कचरा उचलुन नेतात. त्यांना नियमाप्रमाणे कुंडीतुन कचरा पुर्ण रिकामा करुन तेथे डी.डी.टी. पावडर माारणे आवश्यक आहे. सुरुवातीला ते कुंडया देखील धुवायचे. आता कुंडी धुवायचे नावच घेत नाहीत, डी.डी.टी. पावडर देखिल नाही. तेथे जे औषध फवारणी करायचे आहे ते देखिल फवारणी करत नाहीत. ही कमतरता का झाली आहे? माझी महापौर, आयुक्त व सर्वांना विनंती आहे की, ज्याप्रमाणे आधी योग्यरित्या काम सुरु होते त्याचप्रमाणे आता देखील काम सुरु व्हायला हवे. दररोज खत्यावरुन कचरा उचलायला हवा. कचरा उचलल्यानंतर स्वच्छता निरिक्षक व मुकादम यांनी लिहून त्याची माहिती मुख्यालयात दयायला हवी. ज्याप्रमाणे माहितीच्या अधिकारात वेळेवर माहिती न दिल्यास अधिका—यांना दंडित केले जाते त्याचप्रकारे मुकादम, स्वच्छता निरिक्षक, मुख्य स्वच्छता निरिक्षक व उपायुक्त व जे देखिल आपले कर्तव्य पालन करणार नाहीत त्यांना दंडित केले जावे. धन्यवाद !

<u>मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—</u> मा. महापौर, मला फार दु:ख होते. एक वर्षापुर्वी मी आमच्या अध्यक्षांकडे याची तक्रार केली होती. त्याचवेळी आम्ही मेहनत करुन साफ—सफाई करुन दिली होती. त्यानंतर आज पुन्हा परिस्थिती खराब झाली आहे. नाले भरुन वाहत आहेत, कच—याचे ढिग लागले आहेत, तक्रार करुन देखिल कचरा उचलला जात नाही. आयुक्त साहेबांनी स्वत: जावुन पहावे. कलानी सोसायटी, दिपक सोसायटी याठिकाणी परिस्थिती फार खराब आहे. दोन महिन्यांपुर्वी मी आयुक्तांना पत्र देखिल दिले होते. तरी देखिल काहीच झाले नाही. असे का होते? श्री. पाटील साहेबांना सांगितले तर येतो—येतो असे म्हणतात परंतु येत नाहीत. मी भाभींना देखिल ५ तारखेला हे सांगितले होते. सावकारे साहेबांनी सांगितले उदया सकाळी येईल. त्यांना येथे बोलावुन विचारा. हे काम का करीत नाहीत? आम्ही जावुन संडास साफ करायचे का? चेंबर साफ करायचे का? आधी जे मजुर यायचे ते आता यायचे बंद झाले आहेत याचा अर्थ काय आहे? गाडी देखिल नाही. श्री. सावकारे व श्री. पाटील अजिबात लक्ष देत नाहीत. आयुक्तांचे देखिल ऐकत नाहीत याचा अर्थ काय आहे? मी महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेबांना विनंती करेन की त्यांनी स्वत: जावुन पहावे परिस्थिती काय आहे? इमारतींमध्ये मलनिस्सारण होत नाही. महात्मा फुले नगरमधुन ज्यावेळी मोर्चा आला त्यावेळी आपण गाडी पाठविली. असे का होत आहे? करुणा अपार्टमेंटमध्ये आज चार महिने झाले आहे, संडासची टाकी भरुन वाहत आहे. गाडी का येत नाही? एकच गाडी आहे, दुसरी गाडी मंजुर झाली आहे तर ती का येत नाही? कुणीही लक्ष देत नाही. सफाईसाठी पावडर व इतर साहित्य नसते. याला जबाबदार कोण आहे? आम्ही आहोत का? जर तसे असेल तर आम्ही स्वत: जावुन सफाई करु. यामुळे मी विनंती करतो की, आपण याकडे लक्ष दयावे. जे अधिकारी बाहेरुन येतात त्यांना उल्हासनगरची परिस्थिती माहिती नाही. पाटील साहेब काहीच कामाचे नाही. यामुळे मी म्हणेन की, शहर वाचवा व पाटील साहेबांना घालवा. धन्यवाद !

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u> मा. महापौर महोदया, माझी एक चुक झाली आहे. भुयारी गटाराबद्दल बोलायचे राहून गेले. उमाप साहेब जर मला बोलु दिले तर मी आपला आभारी राहिन.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौरजी.....

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> मा. महापौर महोदया, सफाई विभागाचे काम हे महापालिकेच्या प्राथमिक जबाबदारीचे अंग आहे. या मुद्दयावर सभागृहात ब—याचवेळा चर्चा झाली आहे. काही दिवसांपुर्वी महासभेत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की, ज्यावेळी २६ व २७ जुलै रोजी हे शहर पाण्याखाली

गेले होते त्यावेळी ठेकेदाराची मशिनरी खराब झाली होती व महापालिका प्रशासनाने ते आवाहन स्विकारुन सफाईकडे लक्ष दिले होते. त्या ठेकेदारावर काय कारवाई केली याची माहिती आमच्याकडे नाही. याशिवाय पुराच्या वेळी मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली व आमदार साहेबांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली आम्ही स्थायी समिती सभागृहात ब—याचवेळा बैठका घेतल्या. आरोग्य विभागावर पुर्ण लक्ष ठेवले. महापालिकेच्या सफाई विभागाने चांगल्याप्रकारे काम करुन त्यावेळी रोगराई पसरु दिली नाही हे आम्ही मानतो. परंतु त्यानंतर पुन्हा सफाई विभागाला काय झाले आहे ते आम्हांला समजुन येत नाही. एकीकडे आम्ही त्यांची प्रशंसा करतो की, रोगराई पसरु दिली नाही. महापालिकेच्या सफाई विभागाने त्यावेळी चांगल्याप्रकारे काम केले ज्यावेळी संपुर्ण महाराष्ट्रात रोगराई पसरली होती, ज्यावेळी आमच्या ठेकेदाराची पुर्ण मशिनरी अपयशी ठरली होती. परंतु त्यानंतर आज या शहराची अवस्था खराब झाली आहे. काही ठिकाणी कच—याचे ढिग लागल्याचे दिसुन येत आहे. काही सार्वजनिक शौचालयांमध्ये एवढी दुर्गंधी येत आहे की, आजुबाजुने जाणे मुश्किल झाले आहे. मोठे—मोठे डास जे त्यावेळी रोगराई पसरवु शकले नाही ते आता डेंग्यु सारखे आजार पसरवु शकतात. यामुळे महापौर महोदया या सभागृहाला आयुक्त साहेबांकडुन माहिती हवी आहे की, या ठेकेदाराला जो ठेका दिला आहे त्याने ठेक्यातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता केली आहे अथवा नाही? माझ्या माहितीप्रमाणे हा ठेका शून्य कचरा होण्यासाठी दिला होता. महापालिकेकडे कर्मचारी कमी असल्याने व काम जास्त असल्याने हा ठेका दिला होता. परंतु शुन्य कचरा होण्यासारखे काम या ठेकेदाराने आजपर्यंत दाखविले नाही. तर त्याच्यावर एवढी दया दाखविण्याची आवश्यकता काय आहे? याने आतापर्यंत ब—याच अटींची पुर्तता केलेली नाही, शुन्य कचरा योजना राबविली नाही. हा ठेका दिल्यानंतर ब—याचवेळा हा विषय सभागृहात उपस्थित केला गेला की शहरात घाणीचे साम्राज्य आहे, दुर्गंधी आहे परंतु आजपर्यंत या ठेकेदारावर काहीही कार्यवाही केली गेली नाही. आजही आरोग्य विभागाच्या आमच्याकडे ब—याच तक्रारी आहेत. आम्ही प्रशासनाचे लक्ष या गोष्टीकडे वेधु इच्छितो की, या शहराला रोगराईपासुन वाचवा. उदाहरणा दाखल मी पुन्हा एकदा सभागृहात बोलु इच्छितो की, या सभागृहातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा गटनेता जेथे राहतो, तेथे एक सार्वजनिक शौचालय आहे. आयुक्त महोदयांनी दोन मिनिटांसाठी त्या शौचालयाच्या आसपास उभे राहुन दाखवावे. मला असे वाटते की, जर एखादया कैदयाला जन्मठेपेची अथवा फाशीची शिक्षा झाली असेल आणि जर त्याला सांगितले की, तुझी शिक्षा रद्द होईल तु दोन तासांसाठी शौचालयात उभे राहुन दाखव तर तो देखिल ते मंजुर करणार नाही. तो फासावर जाणे पसंत करेल. एवढी अवस्था खराब झाली आहे. आपण एवढया महत्वपुर्ण सेवेकडे योग्य प्रकारे लक्ष का देत नाही? यासाठी स्वच्छता विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडुन आपणांस कठोरपणे काम करुन घ्यावे लागेल. ठेकेदार कामात जी कुचराई करत आहे ती सहन न करता, त्याला कारणे दाखवा नोटिस दयायला हवी. त्याचप्रकारे त्याने कामात जी ढिलाई दाखविली आहे त्याबाबत त्याच्याकडुन दंड देखिल वसुल करावा. शहराचे जे आरोग्य आहे त्याच्याकडे आपण लक्ष दयायला हवे. जयहिंद !

**मा. सदस्य श्री. पृथ्वी वलेचा हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौरजी, आयुक्त, सचिव साहेब, सन्माननिय सदस्य येथे ॲन्थोनी बद्दल व शहराच्या सफाई बद्दल जो मुद्दा आणला आहे यामुळे आम्ही बेहद्द खुष आहोत. कारण या मुद्दयासाठी लढुन आम्ही थकलो होतो. परंतु सत्य जे असते ते थोडया उशिराने बाहेर येते. परंतु नक्कीच येते. याची अनुभुती मला आज झाली. येथे श्री. गोविंदराम लुंड व श्री. सतरामदास जेसवानी यांच्यासारखे वरिष्ठ नगरसेवक ज्यांनी नगरपालिकेपासुन ते महापालिकेपर्यंत जनतेची सेवा केली आहे. यांच्या व सत्ता पक्षाच्या मनात साफ सफाई बद्दल काय विचार आहेत हे आज येथे उघड झाले आहे. आम्ही ब—याचवेळा ॲन्थोनी बद्दल या सभागृहात मुद्दा उठविला होता. ॲन्थोनीने आजपर्यंत करारातील एकाही अटी व शर्तीची पुर्तता केली नसतांना देखील ज्याप्रमाणे एखादा लाडका ठेकेदार आणण्यात येतो त्याप्रमाणे त्याला येथे आणुन त्याची एवढी खुशामत का केली जात आहे ते समजुन येत नाही. माझा तर एक आरोप आहे की, प्रशासन या ठेकेदाराला साथ देत आहे असे आमच्या वारंवार निदर्शनास आले आहे. महापालिकेने कोणताही निर्णय घेतल्यानंतर त्याचे योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. जर प्रशासन हे योग्य प्रकारे करु शकत नसेल तर यामध्ये काहीतरी काळेबेरे आहे हे पुन्हा एकदा समोर येते. ॲन्थोनी मुळे या शहरातील सफाईची अवस्था फार खराब झाली आहे. आमचे कामगार वर्ग, स्वच्छता निरिक्षक यांच्यामुळे आज हे शहर सुस्थितीत आहे. पावसाळयात जेव्हा रोगराई पसरते त्यावेळी ठेकेदाराची मशिनरी फेल गेली. हे आताच श्री. लालवानी यांच्या तोंडुन ऐकले व ते खरे आहे. त्याची मशिनरी फेल गेल्यानंतर त्याची

एवढीही कुवत नव्हती की दोन–चार ट्रक आणुन साफ सफाई करु शकेल. तर अशा ठेकेदाराला येथे ठेवायला नको. जर सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षाला सहकार्य केले तर या ठेकेदाराला येथुन हाकलुन दयायला हवे. काढुन टाकणे उचित होणार नाही, हाकलणेच योग्य होईल. असा माझा प्रस्ताव आहे. धन्यवाद !

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–मा. महापौरजी, हे खरे आहे की, या ठेकेदाराला शहरात चांगल्याप्रकारे साफ सफाई करण्यासाठी ठेका दिला होता. ज्याप्रकारे प्रत्येक आठवडयाला अतिक्रमणांचा आढावा घेण्यासाठी दर सोमवारी बैठक घेतली जाते. त्या बैठकीत मुकादमांना व स्वच्छता निरिक्षकांना कुठे कुठे सफाई होत आहे याची विचारणा करायला हवी. त्यांना कुठे–कुठे अतिक्रमण होत आहे हे विचारले जाते. परंतु साफ सफाई हे तर महत्वाचे काम आहे. याकडेही लक्ष दयायला हवे. आयुक्त साहेब माझी आपणांस विनंती आहे की, आपण सोमवारी जी बैठक घेतात त्यामध्ये आपण स्वच्छता निरिक्षकाला कुठे कचरा उचलला गेला नाही याची माहिती विचारा व जर अहवाल मिळाला तर निलंबित करण्यात येईल असे सांगावे. ॲन्थोनी व सफाई कामगार यांची आपसात हातमिळवणी झाली असल्याचे देखिल शक्यता आहे. मेहरबानी करुन उदया–परवाच यासाठी बैठक घेवुन सर्वांना कामावर लावावे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– मा. महापौर महोदया............

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :– कृपया मला बोलु दयावे. मी अर्धवट बोललो होतो. भुयारी गटारासाठी देखिल मी लक्षवेधी दिलेली आहे. पाणी पुरवठा विभागात भुयारी गटाराच्या तक्रारीसाठी एक तक्रार वही ठेवली आहे कृपया आयुक्तांनी जावुन त्याची पहाणी करावी. नगरसेवक त्यामध्ये काय लिहितो याची माहिती आपण घ्यावी. त्या विभागात किती गोंधळ आहे हे पहावे. तेथे एवढे दिवे लागले आहेत तरी देखील नगरसेवकांने त्यामध्ये काय लिहिले आहे हे ते वाचु शकत नाहीत. तेथे असे काही लिहावे लागते की, मी ते येथे सांगु शकत नाही. येथे ते शब्द बोलणे उचित वाटत नाही. परंतु अधिका–यांना ते वाचतांना काहीही लाज वाटत नाही. मला हे बोलतांना वाईट वाटते परंतु नगरसेवक लाचारीने लिहितो, त्यांना यासाठी वेदना होतात. आम्हांला वाईट का वाटते? आमच्या प्रभागातील लोक आम्हांला वारंवार फोन करतात की आम्ही ६ दिवसांपासुन तक्रार केली आहे, गटार भरुन वाहत आहे. असे असतांना आम्ही तेथे कसे राहणार? श्री. सावकारे साहेब जे मेहनत करतात, मी असे म्हणणार नाही की ते काम करीत नाहीत. परंतु भुयारी गटार योजनेच्या ठेकेदारावर त्यांची एवढी मेहरबानी का आहे, ते त्याला काहीच बोलत नाहीत हे समजुन येत नाही. त्यांच्याकडे जे पाटील म्हणुन अधिकारी आहेत ते अत्यंत अकार्यक्षम आहेत. मी दहा वेळा त्यांना सांगितले आहे की, अशा भ्रष्ट अधिका–याला निलंबित करायला हवे. त्याला कसे निलंबित करायचे याचे मी आपणांस उदाहरण देतो. बॅरेक क्र. १७४० शांती भवन मध्ये येते. तेथे काम करण्यासाठी रुपये १ लाख १८ हजाराचे प्राकलन मंजुर झाले होते. त्यानंतर तेथे ४० हजाराचे देखिल काम झाले नाही. त्यानंतर मी तक्रार केली की काम बरोबर झालेले नाही. कृपया आपण त्याठिकाणी चौकशी करावी. त्यावर कारवाई करा. अजुन एक रुपये ५०–६०–७० हजाराचे प्राकलन होते. ते देखिल काम बरोबर झाले नाही. तरीही श्री. पाटील डोळे बंद करुन बसतात. हे किती चुकीचे काम आहे. तेथे आता श्री. नारवानी आले आहेत. त्यांनी आल्यावर काय काम केले आहे? हे अधिकारी काहीच काम करु शकत नाही. मी माहितीच्या अधिकाराखाली एक अर्ज केला होता की, भुयारी गटार योजनेची जी गाडी आहे ती महिन्यातुन किती दिवस चालु असते? मला दु:ख होते की, ती गाडी २८ दिवस चालु असल्याचे त्यांनी सांगितले आहे. खरेतर ती गाडी १८ दिवस देखिल चालत नाही. एवढी चुकीची माहिती देतात. अशी चुकीची माहिती देणा–या अधिका–यांमुळे प्रशासनाचे नाव खराब होत आहे. आमच्या नगरसेवकांचे नाव खराब होत आहे. आम्ही बदनामी का सहन करावी? जे अधिकारी व्यवस्थीत काम करत नाहीत त्यांना दंडित करण्यात यावे. त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी. त्यांना निलंबित करण्यात यावे. आज आम्ही २००५–२००६ च्या प्राकलनांबद्दल चौकशी करतो, निधी बद्दल चौकशी करतो तेव्हा आम्हांला सांगतात की, निधी संपला आहे. कसा काय संपला? आमचे एवढे अर्ज प्रलंबित आहेत, आम्ही एवढे विनंती पत्र दिले आहेत. आमचे एकही प्राकलन मंजुर झालेले नाही तर निधी कसा काय संपला? आयुक्त साहेब येथे नसतांना व त्यांनी एकही प्राकलन सही केले नसतांनाही निधी कसा काय संपला? हे काय सुरु आहे? अधिकारी काय करीत आहेत?कृपया याची सखोल चौकशी करावी. मी तर असे म्हणेन की, सावकारे साहेबांना व्यासपिठावर बोलवावे व त्यांनी स्वत:हून सांगावे की, भुयारी गटार योजनेची स्थिती काय आहे? सतरामदास जेसवानी किती फॅक्स पाठवतात? काहीच कार्यवाही होत नाही. मी तर आयुक्तांना देखील फॅक्स पाठविले

आहेत. मी श्री. लोणारे यांना माहितीच्या अधिकाराखाली पत्र दिले होते की, नगरसेवकांचे हक्क व कर्तव्य काय आहेत? नगरसेवकांच्या पत्रांना उत्तर मिळायला हवे अथवा नाही? नियमात तसे आहे अथवा नाही? श्री. लोणारे यांनी उत्तर दिले की, तसा नियम आहे. नगरसेवकांच्या पत्रांना उत्तर दयायलाच हवे. परंतु मी येथे सांगु इच्छितो कोणत्याही विभागाने उत्तर दिलेले नाही. फक्त विद्युत विभाग यांना मी हजारो धन्यवाद देईल, सचिव साहेब यांच्या विभागाची कागदपत्रे वेळेवर मिळतात. उर्वरित विभाग काय करीत आहेत? कोणत्याही विभागाने हात वर करुन सांगावे की, ते वेळेवर काम करतात. लोणारे साहेब हे पत्र तुम्ही दिलेले आहे अथवा नाही? यामध्ये तुम्ही लिहिले आहे की, संबंधीत सर्व अधिका—यांना नगरसेवकांच्या पत्रांना उत्तर देण्यासाठी सुचित केले आहे. कृपया याचा खुलासा करावा की या पत्रावर आपली सही आहे अथवा नाही. धन्यवाद !

**मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील, श्री. रमेश चव्हाण, श्री.अनिल जयसिंघानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मा. महापौर ..............

मा. महापौर :— तुम्ही खाली बसा. आयुक्त साहेब यावर उत्तर देतील.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— परंतु सगळयांचा प्रभाग एकच नाही. ते त्यांच्या प्रभागाबद्दल बोलले.

मा. महापौर :— परंतु सर्वांची तक्रार तर एकच आहे ना? श्री. सावकारे आपण उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— मा. महापौर महोदया, भुयारी गटाराबद्दल यांनी जे सांगितले की, भुयारी गटारे साफ होत नाहीत. आपल्या शहरात १२० किलोमिटर लांबीची भुयारी गटारे आहेत. परंतु पाण्याची पातळी वाढल्याने व चोकअप झाल्याने तक्रारींचे प्रमाण वाढले आहे. आपल्याकडे एकच गाडी आहे व एकच गाडी असल्यामुळे आपण सर्व तक्रारींचे निवारण करु शकत नाहीत. मी एक महिन्याची आकडेवारी काढली आहे. एका महिन्यात १५९ तक्रारींचे निवारण केले आहे. आज रोजीस कॅम्प नं. १,२ व ३ मध्ये ३१ तक्रारी व कॅम्प नं. ४, ५ मध्ये १९ तक्रारी शिल्लक आहेत. दुसरी गाडी पुढील आठवडयात येणार आहे. दोन्ही गाडया उपलब्ध झाल्यावर शहरातील तक्रारींचे प्रमाण कमी होईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— या कामासाठीचे मजुर कामावर आहेत काय?

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— त्या कामाची निविदा संपली आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मुदत कधी संपली आहे?

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— तीन—चार महिने झाले आहेत.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मी हेच बोलणार होतो. चार महिन्यांपुर्वी मजुरांच्या ठेक्याची मुदत संपली आहे आणि चार महिन्यापासुन आपण मजुरांची नियुक्ती केलेली नाही, तर काम कसे काय चालेल?

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— या कामाचे प्राकलन तयार करुन पाठविले होते. परंतु ते मंजुर झाले नव्हते. त्यानंतर देखिल त्यांने काम सुरु ठेवले होते. परंतु ८ ऑगस्ट नंतर त्याने काम बंद केले आहे. त्यानंतर या कामाची ३—४ प्राकलने बनवुन मंजुरीसाठी पाठविली आहेत. मंजुरी मिळताच कामास सुरुवात करण्यात येईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आज काय तारीख आहे? आज १९ तारीख आहे. ८ ऑगस्ट पासुन काम बंद आहे. याचा अर्थ गेल्या दिड महिन्यापासुन काम बंद आहे. हे चुकीचे आहे. लोकांच्या घरात

भुयारी गटाराचे पाणी भरले आहे व मजुर काम करण्यासाठी येत नाहीत. मला असेही कळले आहे की, ठेकेदाराला पैसे न मिळाल्याने काम बंद केले आहे हे खरे आहे का? प्राकलनाची काही अडचण आहे का?

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— त्याचे थोडे पेमेंट बाकी आहे.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— दिड महिना काम होत नसेल तर ते चुकीचे आहे. लोकांमध्ये चुकीचा संदेश जातो. याचा अर्थ साफ सफाईमध्ये आपण अपयशी ठरलो आहोत असा होतो. आयुक्तांनी सांगावे की हे काम कधी पासुन सुरु होईल, मजुर कधी पासुन कामावर येतील? आता पावसाळा सुरु आहे, आपण बघितले तर रस्त्यावर भुयारी गटारे भरुन वाहत असल्याचे संपुर्ण शहरात दिसुन येईल.

प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):— मा. महापौर महोदया, या कामाचे प्राकलन मंजुर झाले आहे. आता दोन—तीन दिवसात कामास सुरुवात होईल. मी स्वत: मंजुर केले आहे.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :— ती गाडी महिन्यातुन किती दिवस सुरु असते? कारण कधीही फोन केला तरी ती गाडी उपलब्ध नसते. यासाठी तुम्ही गेल्या दोन—तीन महिन्यातील माहिती दाखवा. गाडीचे इंजिन खराब आहे, मजुर नाहीत, गाडीचे टायर खराब आहेत अशा सबबी नेहमी ऐकायला मिळतात.

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— सध्या माझ्याकडे मागील महिन्याचा रेकॉर्ड उपलब्ध आहे. १६ तारखेपासुन ते १७ तारखेपर्यंत एकुण १५९ तक्रारींचे निवारण केले आहे. तुम्हांला हवे असेल तर मी मागील चार महिन्याची माहिती देवु शकतो.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :— तक्रारी किती काढल्या आहेत ती माहिती नको आहे. गाडी किती दिवस चालते ही माहिती हवी आहे. ती दुरुस्त असते अथवा कामासाठी उपलब्ध असते का याचा गेल्या तीन—चार महिन्याचा रेकॉर्ड दाखवा.

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— आता माझ्याकडे माहिती नाही, पुढील बैठकीत देतो.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मला मिळालेल्या माहितीप्रमाणे मागील तीन महिन्यांमध्ये दिड महिना गाडी बंद होती. तीन महिन्यांपासुन तुम्ही सांगत आहात की, नविन गाडी येणार आहे. नविन गाडी तयार होण्यासाठी गेली आहे. परंतु मला असे वाटते की, ज्याप्रमाणे अग्निशमन विभागाची ८—१० वर्षात गाडी उभ्या—उभ्या जागेवरच सडली त्याचप्रमाणे ही गाडी देखिल पाण्यात बुडुन खराब झाली आहे अथवा दुसरे काही झाले आहे. तीन महिन्यांपासुन उत्तर मिळत आहे की, गाडी येत आहे. आपल्याकडे जी एक गाडी उपलब्ध आहे, तीचे इंजिन खराब असल्याने दिड महिन्यापासुन ती बंद आहे. याचा अर्थ ६ महिन्यांमध्ये तीन महिने गाडी सुरु असते व तीन महिने बंद असते. आपल्या येथे आधी कॅप्टन शुळ हे आयुक्त होते त्यांच्या कार्यकाळात ही एक गाडी घेतलेली आहे. ही गाडी घेवुन त्यांनी आपल्यावर मेहरबानी केली आहे. अन्यथा आज अशी दुर्दशा झाली असती की, संपुर्ण उल्हासनगर शहर खाली झाले असते. आज तुम्ही सांगता की, एका गाडीची आवश्यकता आहे परंतु जी एक गाडी आहे ती देखिल नादुरुस्त आहे. दुसरी गाडी आल्याने काय होईल? यासाठी दोन नविन गाडया घ्यायला हव्यात. तुम्ही जी गाडी मागविली आहे तिला मागवुन किती दिवस झाले आहेत? मला असे कळले आहे की, ती गाडी पाण्यात बुडाली होती.

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— हे चुकीचे आहे. असे काहीही झालेले नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— ज्याप्रमाणे अग्निशमन विभागाची गाडी १० वर्षापासुन उभी आहे त्याप्रमाणे ही गाडी उभी राहता कामा नये. असे केल्यास याची जबाबदारी आपणावर असेल.

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):— मी याबद्दल खुलासा करु इच्छितो की नविन गाडी बनवायला पाठविली असून पुढील आठवडयात ती आपणाला मिळेल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– तीची चॅसीस कधी आली आहे?

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):– चॅसीस येवुन चार महिने झाले आहेत.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– गाडी बनविण्यासाठी तुम्ही एक महिन्याचा वेळ दिला होता, त्यानंतर जो पाऊस झाला त्यामुळे गाडी पाण्यात गेली होती काय?

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):– असे नाही आहे. आमचे लोक ठाणे येथे पाहणीसाठी गेले होते. त्यांनी गाडीची पाहणी केली होती. त्याचा अहवाल देखील माझ्याकडे आहे. पुढील आठवडयापर्यंत ती गाडी येईल.

मा. सदस्य श्री. गोविंदराम लुंड :– सावकारे साहेब, आपण २१ तक्रारी आहेत असे म्हणता परंतु १० तक्रारी तर माझ्या प्रभागातील आहेत. त्यानंतर आपण माझ्या प्रभागात माणसे पाठविले आहेत काय? १० तक्रारी तर आता देखिल आहेत. तुम्ही आता येवुन पाहणी करा. हे चुकीचे असेल तर मी आता पद सोडेन. तक्रार केल्यानंतर मी १० वेळा फोन केला आहे. श्री. वाघ, श्री. ससाणे, श्री. सेलवन यांना ब–याचवेळा तक्रार सांगितली आहे. तुम्ही सांगितले गाडी येईल परंतु अजुन गाडी आली नाही. तुम्ही येवुन बघा.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :– तुम्ही सभागृहाची दिशाभुल करीत आहात. पुर्ण उल्हासनगरमध्ये फक्त १० च तक्रारी आहेत काय? फक्त २१ तक्रारी आहेत असे तुम्ही बोलु शकतात काय? एवढे नगरसेवक बसले आहेत त्यांच्या प्रभागात तक्रार नसेल काय?

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):– २१ व १९ तक्रारी असे म्हणालो.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :– तुम्ही २१ म्हणालात. सभागृहाला विचारा. उल्हासनगरमध्ये काय फक्त ४० तक्रारी आहेत का? यासाठी आम्ही ओरडत आहोत का?

कार्यकारी अभियंता (श्री. आर.आर. सावकारे):– माझ्याकडे जो रेकॉर्ड उपलब्ध आहे, त्यामध्ये २१ व १९ तक्रारींचा उल्लेख आहे.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :– जो अधिकारी काम करीत नाही तुम्ही त्याची पाठराखण का करीत आहात? अशा अधिका–यांना आपण हटवित का नाही? मी आपणांस यासाठी किती वेळा विनंती केली आहे? आम्ही आपल्याकडे काय मागत आहोत? जे अधिकारी कर्तव्य पालन करीत नाहीत त्यांना आपण का हटवित नाही?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया, आज भुयारी गटाराची अवस्था एवढी खराब झाली आहे की, १९९७ मध्ये ज्या प्रकारे आपणांस कच–याची गाडी घेण्यासाठी डंपिंग ग्राउंडवर जायला लागायचे त्याचप्रकारे आजकाल सर्व नगरसेवकांना सकाळी उठल्यानंतर आधी भुयारी गटार साफ करण्यासाठी गाडी आहे अथवा नाही हे बघावे लागते. येथे महापालिकेत सकाळी येवून बसावे लागते. यामुळे नगरसेवकांमध्ये आपसांत भांडणे होतात. भुयारी गटार योजनेची येथे अशी अवस्था आहे. कमीत कमी दोन गाडया तात्काळ या शहरात आणायला हव्यात. कारण जुनी गाडी अगदी खराब झाली आहे. असे व्हायला नको की गाडी मे महिन्यात आली आणि चार महिन्यात तीची बॉडी तयार झाली नाही. जी नविन गाडी आहे ती पुर्णपणे पाण्यात बुडाली होती. मी जे बोलत आहे ते इतिवृत्तात देखील येईल. नविन गाडी आल्यावर ती एक महिना देखील चालणार नाही. कारण त्या गाडीचे इंजिन पुर्णपणे पाण्यात बुडाले होते. जेथे गाडी तयार करायला दिली होती तेथे ती तयार न होता पुर्णपणे पाण्यात बुडाली होती. हे लक्षात घ्यायला हवे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– मा. महापौर, उप–महापौर, सचिव, आयुक्त साहेब, तीन वर्ष झाले हे बेस्ट की वेस्ट हॅडलिंगचे काम चालु आहे. तो कसा हॅडलिंग करतो ते त्यालाच माहित. त्याने बेस्ट हॅडलिंग केले नाही त्यामुळे येथे समस्या झाली आहे. कधी–कधी असे वाटते की, नगरसेवक होवून तीन साडेतीन वर्ष झाले, उगीच येथे आलो असे वाटते. कारण एका गावात एक वेडा होता तो खांबावर चढला. त्यानंतर

संपुर्ण गाव जमा झाले. गाववाले म्हणाले खाली ये परंतु तो तयार झाला नाही. परत दुसरा वेडा आला, शेजारी हजामाचे दुकान होते. तो म्हणाला ब्लेड आणा, मला खांब कापायचा आहे. तर तो वरचा वेडा म्हणाला, थांब–थांब मी खाली उतरतो. म्हणजे त्याची भाषा त्यालाच समजली. आपल्यालापण येथे समजतच नाही, कोण काय बोलतो आणि कोण काय नाही. तीन वर्ष झाली, काय बोलावे ते काहीच कळत नाही. यांना कचरा उचलण्यासाठी आता जाग आली. ओरडुन ओरडुन थकलो. कसे बोलावे? आम्ही हात जोडतो, विनवण्या करतो की साहेब कचरा उचला. परत तक्रारी केल्या, सर्व काही करुन सुध्दा येथे सुनावणीच होत नाही. येथे कशाला लोकांना दाखवण्यासाठी ओरडत आहात. काम होत नाही तर उपयोगच नाही. पत्र देवुन सुध्दा उपयोग नाही. प्रभागातील कामे होत नाही. तो कोण ॲन्थोनी आहे त्याने बेस्ट हॅंडलिंग सुरु करायला हवे. आजपर्यंत वेस्ट हॅंडलिंग केले. चांगल्याप्रकारे काम केले तरच काम होवू शकते. १० वर्षासाठी त्याला काम दिले आहे. पुढच्या वेळी आपण असू अथवा नसु. पाच वर्ष तर त्याने आपल्याला तोंड देखिल दाखविले नाही. ८० नगरसेवक आहेत. त्याला तर ५ लाख लोकांकडे जायचे आहे. ८० पैकी फक्त ४ ते ५ नगरसेवक त्याला ओळखु शकतात. समोर आले तर आम्ही त्याचा एकही माणुस ओळखु शकत नाही. आम्ही फक्त एस.आय. व मुकादमला ओळखतो. त्यांनी प्रत्येक नगरसेवकाच्या, एका प्रभागात तीन नगरसेवक आहेत, त्यांना विचारायला हवे की, काही अडचण आहे का? परंतु आम्हीच त्याला शोधत राहतो. तो आम्हांला कधी सापडतच नाही. भेटला तरी असे वाटते की, नगरसेवकाचे कुणी ऐकतच नाही. फोन करावा लागतो. ३६० रुपयाचे कार्ड भरावे लागते. येतो–येतो असे म्हणतो तोपर्यंत कार्ड संपुन जाते. परंतु साहेब काही भेटत नाही. कामे होत नाहीत त्यामुळे लोकांचा वेळ जातो, आमचा जातो, सभागृहाचा जातो. त्यामुळे असा विचार करण्याची वेळ आली आहे. त्याचा ठेका सर्वानुमते रद्द करायला हवा. आणि नविन निवीदा मागवायला हवी. कशाला शहराला अधोगतीकडे नेत आहात. उल्हासनगरचे नाव चांगले आहे. आपण येथेच राहतो, येथलीच रोजी–रोटी खात आहोत, त्यामुळे आपण चांगले म्हणु तर दुसरेही चांगले म्हणतील. अशा पध्दतीने जर तुम्हांला शहर चालवायचे असेल तर वेस्ट हॅंडलिंग वाल्याला काळया यादीत टाका. आणि रद्द करा. हाकलुन दया. हवे असेल तर आमच्या सहया आता घ्या. त्याचा ठेका रद्द करुन नविन ठेका दया. त्यामुळे आपले रोजचे रुपये ६० हजार वाचतील. शहराचे कल्याण होईल. त्याला गब्बर करण्यापेक्षा आपण शहराची चांगल्याप्रकारे सेवा करु. त्याला काळया यादीत टाकुन दुस–या ठेकेदाराला हे काम दयावे असे माझे मत आहे. धन्यवाद !

**मा. सदस्य श्री. अनिल जयसिंघानी, श्री. गोविंदराम लुंड हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u> मा. आयुक्त, महापौर व सर्व सन्माननिय सदस्य आज श्री. सतरामदास जेसवानी व श्री. लुंड यांनी लक्षवेधी सुचना मांडली आहे. कच–याचा ठेकेदार असो किंवा भुयारी गटाराचा ठेकेदार असो, किंवा इतर विभागात जे ठेकेदार आहेत, त्यांची ठेकेदारी असो, त्या ठेकेदाराने काम केले किंवा नाही, ठेकेदाराने कचरा उचलला किंवा नाही, ठेकेदाराने भुयारी गटारे साफ केली अथवा नाही याची जबाबदारी कुठल्याही अधिका–यावर येईल असे मला वाटत नाही. भुयारी गटाराची जबाबदारी पाणी पुरवठा विभागावर सोपविली आहे. परंतु मला असे वाटते की, पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी याला जबाबदार नाही. आमचे श्री. सावकारे साहेब देखिल दोषी नाहीत. आमच्या पाटील साहेबांकडे भुयारी गटारांचे काम आहे. ते पण दोषी नाहीत, दोषी आहेत तर ते आयुक्त आहेत. याचे महत्वाचे कारण असे आहे की, सर्व यंत्रणा उपलब्ध असतांना, गाडी उपलब्ध असतांना, ठेकेदार असतांना किंवा त्याचे कामगार उपलब्ध असतांना केवळ तुमच्या चुकीच्या प्रशासनाने आज शहराची ही दुरावस्था आहे. आज येथे एवढे नगरसेवक साध्या भुयारी गटाराच्या कामासाठी झगडत आहेत. १५ दिवसापुर्वी आमच्या प्रभाग समितीमध्ये नागरीकांच्या तक्रारींची सुनावणी झाली नाही, माझ्या सारख्या स्थानिक नगरसेवकाच्या तक्रारीची सुनावणी नाही. मुकादमाच्या तक्रारीची सुनावणी नाही. आरोग्य निरिक्षकाच्या तक्रारीची सुनावणी नाही. प्रभाग समिती सभापतीची तक्रार व त्याचीही सुनावणे नाही. म्हणजे तक्रार गांभीर्याने घेत नाहीत. सावकारे साहेबांना सांगितले तर हसत हसत उडवतात, म्हणजेच नगरसेवकांच्या बोलण्याला कुठलीही किंमत नाही. प्रभाग समिती सभापतीला किंमत नाही. फक्त कारणांवर कारणे दिली जातात. कारण काय तर ठेकेदाराला बिल मिळाले नाही. निविदेचा कालावधी संपल्यानंतर त्वरीत नविन निविदा मागविण्याची अथवा मुदत वाढवुन देण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यांनी ही कामे का केली नाहीत? त्यांनी वेळेवर पुर्तता केली असती तर आज ही वेळ आली नसती. तुमच्या बोअरवेल विभागाची देखील हीच अवस्था आहे. जेटपंप ठेकेदाराची पण हीच अवस्था आहे. पुर्वी ठेकेदारीवर देण्याच्या अगोदर महापालिकेचे कर्मचारी जेव्हा हे काम

करायचे, त्यावेळी एक फोन केला अथवा तक्रार केली तरी ताबडतोब कामे व्हायची. महापालिकेचे कर्मचारी काम करायचे, वेळेवर काम करायचे. परंतु आज ठेकेदार पध्दती वापरुनही आज एवढी मोठी आरडाओरड होत आहे. याच्या मागचे मुळ कारण म्हणजे आयुक्तांनी प्रशासन सक्षम करणे आवश्यक आहे. जर अधिकारी वेळेवर काम करत नसतील, एन.डी. पाटील सारखा माणुस कुठल्याही कामाचा नाही. त्याने माझ्या सारख्या माणसाला देखील खुप त्रास दिलेला आहे. सावकारे साहेब स्वत: कुठेच लक्ष देत नाहीत. ते कुठल्या तंद्रीमध्ये असतात माहिती नाही. म्हणजे आम्ही वारंवार लोकांच्या शिव्या खायच्या आणि आम्ही यांना काही न बोलता लोकांचे बोलणे सहन करायचे. याला कुठेतरी रोखणे आवश्यक आहे. ही सर्व जबाबदारी आयुक्तांची आहे. आम्ही अधिका–यांना कुठलाही दोष देणार नाही. सावका–यांना कुठलाही दोष देणार नाही, पाटलांना कुठलाही दोष देणार नाही. आम्ही सर्व दोष हा आयुक्तांवर देतो. आयुक्तांनी त्याची शहानिशा करावी आणि यापुढे आम्ही अधिका–यांकडे तक्रार करणार नाही. आम्ही थेट आयुक्तांकडे तक्रार करु. आयुक्तांनी त्याचे निवारण करावे. धन्यवाद!

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर महोदया, तीन वर्षात ॲन्थोनी विरुध्द विरोधी पक्षाने ब–याचवेळा येथे प्रस्ताव आणले, पत्रव्यवहार देखील केला. या शहरातील कच–याची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे व शहरात सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. २५ व २६ तारखेला जेव्हा पुर आला तेव्हा ॲन्थोनीच्या सगळया गाडया खराब झाल्या. एक ठेकेदार जो शहरातील कचरा उचलतो त्यावेळी त्याने पर्यायी गाडयांची व्यवस्था करणे ही त्याची नैतिक जबाबदारी होती. डंम्पर व जेसीबी आणुन या शहरातील कच–याचे ढिग हलवायला हवे होते. परंतु त्याने हात वर केले. तसेच त्यांनी सांगितले की, तुम्ही गाडया लावा आणि माझ्या देयकातुन पैसे वजा करा. आपल्या येथे जे अधिकारी होते, श्री. कुकरेजा, श्री. इदनानी व इतर दोन अधिकारी त्यांनी मोठया हिंमतीने आसपासच्या ठेकेदाराकडुन डंम्पर जेसीबी व इतर सामान मागविले व या शहरातील कच–याचे ढिग हटवून शहरातील कच–यावर व दुर्गंधीवर नियंत्रण मिळविले. आपले हे असे अधिकारी नसते तर या शहरात प्रेतांचे ढिग लागले असते. मी आयुक्त साहेबांना त्याचवेळी सांगितले होते की, अशा ठेकेदाराला काळया यादीत टाकुन याचा ठेका त्वरीत रद्द करायला हवा. कारण जर या शहरातील २–५०० लोक मेले असते तर पैशांनी त्याची भरपाई झाली नसती. ठेकेदार जर म्हणत असेल की मी गाडया आणणार नाही तुम्ही गाडया आणा व माझ्या देयकातुन पैसे कापुन घ्या असे उत्तर हे बेजबाबदारपणाचे आहे. हे ठेकेदाराला शोभा देत नाही. हे तर आपले अधिकारी ज्यांचे ठेकेदारांशी मित्रत्वाचे संबंध होते, कल्याण–अंबरनाथ, ठाणे येथुन जेसीबी आणले व तीन दिवसानंतर शहरातुन दोन–चारशे गाडया भरुन कचरा हटवून लोकांना रोगराईपासुन वाचविले. परंतु त्यानंतरही आयुक्तांनी अशा बेजबाबदारपणे काम करणा–या ठेकेदारावर काहीही कार्यवाही केली नाही. या गोष्टीवर संपुर्ण सभागृहाला शंका आहे की, यामध्ये नक्कीच काहीतरी काळेबेरे आहे ज्यामुळे ॲन्थोनी वर कारवाई झाली नाही. वारंवार तक्रार करुन जर आता सत्तापक्षाचे डोळे उघडले असतील तर त्यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत. कमीत कमी उशिरा तरी त्यांना जाग आली. शहराला जर रोगराईपासुन वाचवायचे असेल, कच–यापासुन वाचवायचे असेल तर मा. महापौरांचे कर्तव्य बनते की, आज या सभागृहातील सर्व सदस्यांचे म्हणणे ऐकुन आजच त्या ठेकेदाराला काळया यादीत टाकण्यात येवुन त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. जर मा. महापौरांनी असे केले नाही तर भाजपाचा गटनेता म्हणुन व शिवसेना सदस्यांच्या वतीने आम्ही पुर्ण उल्हासनगरमध्ये कच–याबद्दल आंदोलन करु. तसेच जेथे जेथे कचरा पडला असेल तो उचलुन महापालिकेच्या बाहेर टाकु. सभागृहाचा रोख बघुन महापौरांचे कर्तव्य बनते की, त्यांनी आताच्या आता त्याचा ठेका रद्द करायला हवा. धन्यवाद !

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u>कचरा उचलुन खत्त्यावर टाका, महापालिकेत कशाला टाकता?

**मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड, श्री. राज असरोंडकर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u> मा. महापौरजी, यात्री निवास व कालानी महल समोरचा जो रस्ता आहे तेथुन मी रिक्षाने मध्यवर्ती रुग्णालयाकडे जात होतो. ट्राफिक जाम असल्याने यात्री निवासच्या पाठीमागच्या रस्त्याने मला जावे लागले. महत्वाचे सांगायचे म्हणजे त्या प्रभागात एक फलक लावला होता. मला वाटते तो प्रभाग उपमहापौर श्री. विनोद तलरेजा यांचा आहे. ''आदर्श प्रभागात आपले स्वागत आहे'' असा फलक उप–महापौरांच्या प्रभागात लावला आहे. माझ्याबरोबर पाहुणे सुध्दा होते, आम्ही रिक्षेतुन चाललो होतो तेवढयात तेथे ती रिक्षा थांबली आणि त्या फलकाच्या समोरच कच–याचा मोठा ढिग लागल्याचे दिसुन आले.

कच–याचा ढिग लागला होता व त्याच्यासमोरच लिहिले होते की, मा. उप–महापौरांच्या आदर्श प्रभागात आपले स्वागत आहे. आदर्श प्रभागात कच–याचा ढिग पडला होता. मला शंका वाटू लागली की, यांना साफ सफाईसाठी संत गाडगेबाबा अभियानाच्या वेळी जे बक्षिस मिळाले आहे, ते पुन्हा परत केले तर काही हरकत नाही. कारण आदर्श प्रभाग म्हणुन महापालिकेने त्यांना पुरस्कृत केले आहे आणि अशा प्रभागात कच–याचे ढिग साचु लागले तर गेल्या तीन वर्षापासुन.............

**मा. उप–महापौर :–** माझ्या प्रभागात कच–याची कोणतीही समस्या नाही.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–** मी स्वतः बघितले आहे. तुम्ही नाही बोलाल तर ती गोष्ट वेगळी आहे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–** मा. उप–महापौरजी, तुम्ही फक्त तुमच्या प्रभागाविषयी बोलत आहात की संपुर्ण प्रभागाविषयी बोलत आहात.

**मा. उप–महापौर :–** हे माझ्या प्रभागाबद्दल बोलत आहेत म्हणुन मी उत्तर दिले.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–** मी स्वतः जे पाहिले आहे त्याबद्दल बोलत आहे.

**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–** मा. महापौरजी, मला सदस्यांना एक सांगायचे आहे की, आधी त्यांनी स्वतःचा प्रभाग बघावा आणि नंतरच दुस–यांच्या प्रभागाबद्दल बोलावे.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–** आमच्या प्रभागाच्या दुःखद परिस्थिती बाबत आम्ही गेल्या ३ वर्षापासुन बोलत आहोत. असे नसेल तर आज श्री. सतरामदास यांनी लक्षवेधी का आणली? ३ वर्षात सेटिंग बरोबर झाली नाही का? कच–याची सेटिंग बिघडली का? अथवा दुसरी कुठली सेटिंग बिघडली आहे का? आधी तीन वर्ष सेटिंग बरोबर होती त्यावेळी कचरा बरोबर उचलला जायचा. आज कचरा का उचलला जात नाही. आज सत्ताधारी पक्षाला लक्षवेधी देण्याची गरज का भासली? आम्ही तर ३ वर्षापासुन बोलत आहोत. आज अचानक काय झाले? आज उप–महापौरांबद्दल बोलतो तर तुम्हांला दुःख का होते? मी जे पाहिले ते बोललो. त्यामध्ये खोटे काहीही नाही.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:–**तुम्ही त्यांच्या भावना समजावुन घ्या. या मुद्दयावर राजकारण करु नका.

**मा. सदस्या श्रीमती अनिता गुप्ता, श्रीमती माने किरण, श्री. सुनिल सुर्वे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** आधी त्यांना बोलु दया, त्यानंतर तुम्ही बोला.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–** उप–महापौरांचा प्रभाग आदर्श प्रभाग आहे, तेथे नेहमी साफसफाई असते परंतु काही दिवसांपुर्वी मी कच–याचा ढिग बघितला म्हणुन त्याबद्दल बोललो. गणपती असल्याने ट्रॅफिक जाम होता त्यामुळे मागच्या रस्त्याने गेलो तेव्हा तेथे समोरच कच–याचा ढिग दिसला. त्यांनी लिहिले आहे की, आदर्श प्रभागात आपले स्वागत आहे व त्याच्यासमोरच कच–याचा ढिग होता. मी फोटो काढला नाही ही माझी चुकी झाली. पुढील वेळी सभागृहात फोटो आणुन दाखवेन. अशा ठेकेदाराला तुम्ही काळया यादीत का टाकत नाही? त्याच्याकडे कच–याचे ट्रक सुध्दा उपलब्ध नव्हते. वसई वरुन ट्रक आणावे लागले.

**मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :–** मा. महापौरजी, माझ्या जनसंपर्क कार्यालयाबाहेर कचराकुंडी आहे. कोणीही येतो–जातो आणि बोलतो की, तुमच्या कार्यालयाबाहेर कचरा पडला आहे. आता मी त्यांना कसे सांगु की गाडी १ वाजता येते किंवा रात्री येते. माझ्यासाठी तेथे पुर्ण दिवस ट्रक उभा राहु शकत नाही. कचराकुंडी भरल्यावर तेथे कचरा साठणारच. परंतु मला माहिती आहे की, दिवसातुन दोन वेळा गाडी येते

आणि कचरा घेवुन जाते. परंतु जो जातो तो बोलतो की, तुमच्या कार्यालयाबाहेर कचरा पडला आहे. माझ्या येथे दिवसातुन दोन वेळा गाडी येते आणि कचरा घेवुन जाते. श्री. दिलीप गायकवाड हे त्यावेळी गेले असतील ज्यावेळी कचरा उचलायचा असेल, असे होवू शकते.

<u>मा. महापौर :–</u> श्री. गायकवाड मी आपणांस एक सांगु इच्छिते, जेव्हा आरोटे साहेब होते तेव्हा आम्ही एक पथक घेवुन संपुर्ण शहरात पहाणीसाठी निघालो होतो. आम्ही श्री. विनोद तलरेजा यांच्या प्रभागात गेलो त्यांचा प्रभाग अतिशय स्वच्छ होता. मला बघुन आश्चर्य वाटले. तसेच त्यावेळी त्यांच्या प्रभागात नाला सफाईचे काम सुरु होते. त्यांनी नाल्यातील गाळ काढुन अशा प्रकारे ठेवला होता की, त्यामुळे देखिल प्रभागातील शोभा वाढत होती. त्यानंतर जेव्हा मी माझ्या प्रभागात गेले तेव्हा कचरा बघुन माझी अवस्था एवढी खराब झाली की, मी सर्वांना ऐकविले. मी एवढी ओरडली की, इतरांचा प्रभाग एवढा स्वच्छ आणि माझा प्रभाग किती अस्वच्छ आहे. त्यावेळी आरोटे साहेब एवढे चिडले की, ते म्हणाले मी माझे पदच सोडुन देतो. तर कधी–कधी असे होते. आता ही जी चर्चा सुरु आहे यावर सर्वांना आयुक्त उत्तर देतील.

**मा. सदस्या श्रीमती भावना रामचंदानी, श्रीमती दिपा पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, हे चित्र काही चांगले दिसले नाही.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. महापौर महोदयांनी जे सांगितले की, कचरा फार चांगला होता तर ते चित्र मी देखिल पाहीले आहे. श्री. विनोद तलरेजा यांच्या प्रभागात नाल्यांमधुन जो कचरा काढुन ठेवला होता तो एवढया चांगल्याप्रकारे ठेवला होता की, खरचं छान दिसत होता.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> कच–यातुनही कलाकृती कशी निर्माण करायची हे श्री. विनोद तलरेजा यांच्याकडुन शिकायला हवे.

<u>मा. उप–महापौर :–</u> तुम्ही माझ्या प्रभागात या माझे तुम्हांला आमंत्रण आहे. माझ्या प्रभागात चार झोपडपट्टया आहेत मी तुम्हांला त्या दाखवतो.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> हे बरोबर नाही. याचा अर्थ तुम्ही ठेकेदाराला फक्त तुमचा प्रभाग स्वच्छ करण्याच्या सुचना दिल्या आहेत असा होतो.

<u>मा. उप–महापौर :–</u> मी ठेकेदाराबद्दल काही बोलु इच्छित नाही. मी सफाई कामगारां बद्दल बोलतो आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, मी आधी श्री. सतरामदास जेसवानी व श्री. लुंड यांना धन्यवाद देतो की त्यांनी सभागृहाचे लक्ष योग्य बाबीकडे केंद्रित केले आहे. जसे आमच्या सदस्यांनी सांगितले की, मागील ३ वर्षापासुन आम्ही बोलुन–बोलुन थकलो आहोत परंतु काहीही फरक पडला नाही. प्रशासनाच्या वतीने अथवा जे चालवत आहेत त्यांच्या वतीने. उल्हासनगरच्या जनतेला यामुळे काहीही फरक पडला नाही. तीन वर्ष यासाठी मोठी लढाई झाली. आम्ही उच्च न्यायालयापर्यंत गेलो. तेथेही तेच झाले. परंतु आज सत्यता यांनी समोर आणली. येथे मतभेद असु शकतात. कोणी म्हणेल काम चांगले झाले आहे, कोणी म्हणेल चुकीचे आहे. परंतु आमचे गटनेता श्री. लालवानी हे सत्तापक्षाचे आहे त्यांचेही मत तेच आहे की काम चांगले होत नाही. त्यांनी त्यांचे स्पष्ट मत मांडले आहे. परंतु तीन वर्ष ठेकेदाराने कोणत्या अटींची पुर्तता केली नाही याची माहिती आता घेणे आवश्यक नाही. ३ वर्षापुर्वी हा विषय महासभेत उठवितांना आम्ही या ठेकेदाराला ठेका दिल्याने महापालिकेचे किती नुकसान होत आहे, एक वर्षाचा तोटा किती होत आहे, मागील वर्षी २.३३ कोटी, या वर्षी ४.३८ कोटी, पुढे चालुन १० वर्षांसाठी ५० लाखांची वाढ, २३ लाखाचे काम आपण ५० लाखाला देत आहोत असे आम्ही सांगितले होते. याचा अर्थ महापालिकेला १० वर्षात २९ कोटीचा तोटा होणार आहे. ही सर्व आकडेवारी आम्ही तेव्हा दिली होती. महापालिकेने काम केले असते तर एवढा खर्च झाला असता, सध्याच्या ठेकेदाराने काम केले तर एवढा खर्च झाला असता अशी आकडेवारी आम्ही दिली होती. तरी देखिल आपण बहुमताच्या आधारे निर्णय घेतला

होता. तो चुकीचा होता हे आज सिध्द झाले आहे. आज तीन वर्ष झाल्यानंतर देखिल ठेकेदार करारातील अटी व शर्तींचे पालन करीत नाही. तीन वर्ष का घालविले, कसली वाट पाहिली? अशा वेळी शंका येते म्हणुन आमच्या श्री. दिलीप गायकवाड यांनी शंका उपस्थित केली. जर चुकीचे असेल तर त्याचे स्पष्टीकरण दया. तीन वर्ष तुम्ही वाट का पाहिली? त्याला संधी का दिली? काम चालु होण्याअगोदर सहा महिन्याआधी करारावर सही केली व त्यानंतर सहा महिन्याने काम सुरु केले. करारातील अटी व शर्तीची पुर्तता करण्यासाठी त्याला सहा महिन्याचां अवधी दिला होता. एप्रिलमध्ये आपण ठराव मंजुर केला होता आणि सप्टेंबरमध्ये त्याने काम सुरु केले होते. मग त्याने या ६ महिन्यात काय केले? आज उल्हासनगरची अवस्था खराब आहे. महापालिकेच्या महसुलात देखिल घट झालेली आहे. तसे नसते तर जकातीसाठी आपण बैठक बोलविली नसती. आज पैसे नाहीत, लोकांची कामे होत नाहीत, त्यामूळे आपण बाहेर निघू शकत नाही. जर महापालिकेची आर्थिक स्थिती चांगली असती, लोकांची कामे झाली असती तर आपण बाहेर पडु शकलो असतो. आता मागील महिन्यात जकात वसुली फक्त रुपये ११.५४ लाख एवढी झाली आहे. मागील वर्षी याच महिन्यात ती वसुली रुपये २१ लाख एवढी होती. याचा अर्थ १२ लाख रुपये कमी आले आहेत. हा पैसा कुठे जात आहे? २६ व २७ जुलै रोजी या शहरात पुर आला होता. पुरामध्ये लोकांचे बरेच नुकसान झाले होते. त्यामुळे आता बाजारात जास्त माल आलेला आहे. नेहमीपेक्षा सुमारे २५ ते ३० टक्के जास्त मालाची आवक झाली आहे. असे असतांनाही वसुली वाढण्याऐवजी कमी झाली आहे. अशीच परिस्थिती राहीली तर या महापालिकेचे काही खरे नाही. आपण सर्व लोक येथे निवडुन आलो आहोत. जनतेने कारभार तुमच्या हातात दिला आहे. महापालिकेचे शासन तुमच्या हातात आहे. कारभार व्यवस्थितपणे चालविणे हे तुमचे काम आहे. तुम्ही या महापालिकेला दलदलीत ढकलत आहात. यासाठी फक्त आपणच जबाबदार आहात. जसे आमचे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले यासाठी आपणच जबाबदार आहात. आमचा विरोध दर्शविण्यासाठी शिवसेना व भाजपाचे सदस्य या सभेचा बहिष्कार करीत आहेत. येथे हे सर्व चुकीचे चालु आहे.

**यावेळी शिवसेना व भाजपाचे मा. सदस्य / सदस्या श्रीमती संगिता जावळे, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, श्री. नथु सोनवणे, श्री. राज असरोंडकर, श्रीमती किरण माने, श्री. रमेश चव्हाण, श्रीमती जयश्री सुर्वे, श्रीमती रेखा क्रिष्णानी, श्रीमती लक्ष्मीबाई ससाणे, श्री. पाटील विश्वनाथ, श्री. दिलीप गायकवाड, श्री. उमाप रामदास, श्रीमती बामणकर नंदिनी, श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. धनंजय बोडारे, श्रीमती मोकल सिमा, श्री. पंजाबी लाल हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> मा. महापौर महोदया, शहरात साफसफाईचे काम बरोबर व्हावे, त्यात ढिलाई होवू नये यासाठी आम्ही हा मुद्दा सभागृहात उपस्थित केला आहे. अधिका—यांवर बोट दाखविण्याचा आमचा हेतु नाही. कारण २६ व २७ जुलै रोजी या शहरात जेव्हा पुर आला होता तेव्हा याच अधिका—यांनी येथे चांगल्याप्रकारे काम केले होते. श्री. ढेंगळेपाटील, श्री. प्रकाश कुकरेजा, श्री. बनसोडे, श्री. आरोटे व श्री. इदनानी या व इतर अधिका—यांनी त्यावेळी चांगल्याप्रकारे काम केले होते. परंतु शहरात कचरा असेल, साफ सफाई होत नसेल तर तो मुद्दा सभागृहासमोर आणणे हे आमचे कर्तव्यच आहे. आम्ही हेच आमच्या महापौर श्रीमती ज्योती कालानी व आमदार श्री. पप्पु कालानी यांच्याकडुन शिकलो आहोत. जर कुठे अन्याय होत असेल तर आम्ही गप्प बसणार नाही. या आधीही अयोग्य गोष्टींविरुध्द आम्ही येथे आवाज उठविला आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी काम करण्याचा ठेका घेतला आहे काय? वस्तुस्थिती ऐकुन घ्यायची नाही म्हणुन हया लोकांनी सभात्याग केला आहे.

**मा. सदस्य श्री. सुरेश गायकवाड, श्री. प्रशांत जाधव, श्री. सुरेश जाधव, श्री. विनोद ठाकुर हे सदस्य सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>मा. सदस्या श्रीमती भावना खिलनानी :—</u>मा. महापौर महोदया, शहरातील भुयारी गटारे अजिबात साफ होत नसून वारंवार तक्रारी करुन देखिल काम होत नाही. भुयारी गटारे भरुन वाहत आहेत यासाठी कारवाई करणे आवश्यक आहे. कॅम्प नं ४ व ५ साठी नवीन गाडी ठेवल्यास तक्रारी होणार नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मी सभागृहाचे लक्ष आकर्षित करु इच्छितो. मी बोलु इच्छितो की, आम्ही आमच्या मा. महापौर भाभी श्रीमती ज्योती कलानी व आमचे मा. आमदार श्री पप्पु कलानी यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली एक बैठक बोलाविली होती. सदरच्या बैठकीमध्ये महापालिकेचा महसुल कसा वाढेल यावर चर्चा करण्यात आली. आता आमचे प्रभारी आयुक्त श्री. लोणारे हे देखिल चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. डी.डी.आर कडुन जी कामे मंजुर होवुन आली ती करण्यास त्यांनी मान्यता दिली आहे. तसेच मी येथे हे ही सांगु इच्छितो की, आम्ही बैठकीमध्ये आयुक्तांना पेमेंट करताना पहिले प्राथम्य कर्मचा—यांच्या पगाराला व द्वितीय प्राधान्य एमआयडीसीच्या पाण्याला देण्याबाबत सांगितले आहे. आता आपण बरेच महिने बिल भरले नाही त्यामुळे पाण्यात कपात होणार होती. परंतु आमच्या आमदार साहेबांनी बैठक घेवुन त्यावर मार्ग काढला आहे. तसेच मी हे ही सांगु इच्छितो की, कॅम्प नं ४ व ५ साठी लवकरात लवकर भुयारी गटार साफ करण्यासाठी गाडी मागविण्यात यावी. भुयारी गटार विभागातील श्री. पाटील हे जर व्यवस्थितरित्या काम करीत नसतील तर त्यांची तेथुन बदली करावी अन्यथा त्यांना महापालिकेतुन परत पाठवुन द्यावे. तसेच मी हे ही सांगु इच्छितो की, ज्या ज्या वेळी नागरिकांवर अन्याय होत आहे असे आम्हाला वाटले त्या त्या वेळी सत्तापक्षात असतानाही आम्ही आवाज उठविला आहे. आमच्या आमदारांनी आम्हाला हेच शिकवले आहे.

<u>मा. प्रभारी आयुक्त (श्री. उत्तम लोणारे):—</u>मा. महापौर महोदया, श्री. सतरामदास जेसवानी यांनी कच—याबद्दल जी लक्षवेधी सुचना मांडली आहे तर या विषयावर यापुर्वी आयुक्त श्री. सोनवणे साहेबांनी येथे खुलासा केलेला आहे. मी येथे पुन्हा एकदा स्पष्ट करेन की, २६ व २७ जुलै रोजी जेव्हा पुर परिस्थिती निर्माण झाली होती, त्यावेळी ॲन्थोनीची संपुर्ण यंत्रणा कार्यरत नव्हती. तरी देखिल आम्ही वाहने मिळवुन शहरातील साफ सफाई करुन घेतली होती. यापुढे काम व्यवस्थित करण्यासाठी त्याला सक्त सुचना दिल्या जातील. त्याचप्रमाणे भुयारी गटार साफ करण्याची गाडी काही दिवस बंद होती. गाडीचे सुटे भाग न मिळाल्याने गाडी बंद होती. परंतु गाडी आता दुरुस्त झाली आहे. तसेच थोडया दिवसात नविन गाडी येणार आहे. २ गाडया चालु झाल्यानंतर सर्व तक्रारींचे निवारण केले जाईल. तसेच येथे आता श्री. टाले साहेबांनी सांगितले की, आयुक्तच सर्वस्वी जबाबदार आहेत. त्यांचे हे म्हणणे चुकीचे आहे. आयुक्त हे प्रशासन प्रमुख असतात. प्रत्येक विभागात विभाग प्रमुख असतो. त्यांनी त्यांना दिलेले काम व्यवस्थितपणे पार पाडणे आवश्यक असते. ती त्यांची देखिल जबाबदारी असते. तसेच या पुढे ज्या देखिल तक्रारी आमच्याकडे प्राप्त होतील, त्यांचे निवारण त्वरीत केले जाईल एवढी मी सभागृहाला शाश्वती देतो.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u> मा. महापौर महोदया, येथे सभागृहात सदस्यांना दिलेल्या आश्वासनांवर काही एक अंमलबजावणी होत नाही. अंमलबजावणी होण्यासाठी यांच्यावर बंधन टाकणे आवश्यक आहे. वेळेत काम करणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री नारायण पंजाबी :—</u> आयुक्त साहेब, साप्ताहिक अहवालाचे काय झाले? तुम्ही दर आठवडयाला जी बैठक घेता त्यामध्ये स्वच्छता निरीक्षकांना व मुकादमांना साफसफाईच्या सूचना द्या.

<u>मा. प्रभारी आयुक्त :—</u> ठिक आहे. सदरच्या बैठकीमध्ये साफसफाईविषयीही माहिती घेण्यात येईल.

<u>मा. सदस्य श्री चंदाराम मोकल :—</u> कचरा उचलला जात नसल्याबद्दल आपल्याकडे एवढया तक्रारी येत असतानाही ठेकेदाराची एवढी बाजु का घेतली जाते.

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. २ :— मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/०८/२००५ (त्यात दिनांक २४/०८/२००४ व ०५/०९/२००५) चे इतिवृत्त कायम करणे

---

<u>मा. सचिव :–</u>पृष्ठ क्र. ४ वरील प्रश्न क्र. ४०७ च्या उत्तरामध्ये माहिती उपलब्ध करुन घेण्यात येत आहे असा चुकीने उल्लेख केला आहे. त्याऐवजी प्रशासनाने दिलेल्या उत्तराचा योग्यरितीने उल्लेख करण्यात येत आहे. त्या प्रयोजनार्थ सुधारणा करण्यासाठी सभागृहास विनंती आहे.

<u>काही सदस्य :–</u> पास–पास.........

<u>मा. सचिव :–</u> इतिवृत्त कायम? कुणाची काही हरकत?

<u>मा. महापौर :–</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/०८/२००५ (त्यात दिनांक २४/०८/२००४ व ०५/०९/२००५) चे इतिवृत्त वर सुचविलेल्या सुधारणेसह जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ३ :– डॉ.के.आर. खरात यांचा वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.**

---

<u>काही सदस्य :–</u> पास–पास........

<u>मा. महापौर :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. ३ :– डॉ.के.आर. खरात यांचा वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.**

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. प्रतिनि–१००२/२१५८/प्र.क्र. ४३४/सेवा–२, मंत्रालय, मुंबई यांचेकडील १९ मे, २००४ च्या आदेशान्वये डॉ. के.आर. खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी यांची या महापालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर दिनांक २३/६/२००३ पासून प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली असून सदर पदी ते कार्यरत आहेत.

डॉ. के. आर. खरात यांच्या दिनांक २३/६/२००३ पासून प्रतिनियुक्तीस महासभेने महासभा ठराव क्र. ४९, दिनांक ४/११/२००४ अन्वये ०२ वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे.

डॉ. के. आर. खरात यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीतील काम पाहता त्यांच्या सेवेची महापालिकेला आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक २३/६/२००५ पासुन पुढील ०१ वर्षाच्या कालावधीसाठी वाढविण्याचा प्रस्ताव महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:–</u> ५४ <u>दिनांक:–१९/९/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्रीमती भावना खिलनानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिनु दासानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव डॉ.के.आर.खरात यांच्या उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील वैद्यकिय आरोग्य अधिकारी या पदावरील दिनांक २३/६/२००५ पासुन वाढविलेल्या कालावधीसह एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :— श्री.सु.के.बनसोडे यांचा मुख्य लेखा परिक्षक या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.**

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— विषय वगळण्यांत यावा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—विषय का वगळायचा? सगळयांचा पास करीत आहोत तर हा देखिल पास करा.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—हे काम करणारे अधिकारी आहेत, यांचा विषय पास करा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :— ज्यावेळी शहरात पुरपरिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी या अधिका—याने शहरात काम केले आहे. शहराला वाचविले आहे. अशा अधिका—याचा विषय वगळणे योग्य होणार नाही. पास करण्यात यावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आम्ही विषय नामंजुर करीत नाही. विषय वगळीत आहोत, पुढील बैठकीत बघु.

✂ मा. महापौर :—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

---

⌧ विषय क्र. ४ :— श्री.सु.के.बनसोडे यांचा मुख्य लेखा परिक्षक या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

---

मा. सचिव :—विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी, श्रीमती अनिता गुप्ता हे सभागृहातुन बाहेर गेले.

---

विषय क्र. ५ :— श्री.एम.ए.जवादे यांचा कार्यकारी अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

---

**मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी:—**मा. महापौर महोदया, जवादे साहेब चांगले अधिकारी आहेत. काम चांगले करतात. परंतु आता काही काळापासून त्यांच्या प्रशासनात देखिल ढिलाई निर्माण झाली आहे. कृपया त्यांना कामात लक्ष देण्यास सांगावे. जे अधिकारी सुस्त आहेत त्यांना चांगल्याप्रकारे कामास लावावे. २००३ मध्ये आमच्या भाभी श्रीमती कालानी यांनी बांधकाम विभागास एक पत्र दिले आहे. माझ्या प्रभागात काम करण्यासाठी. अजुनपर्यंत त्यावर अंमलबजावणी झाली नाही. विद्युत विभागाने मात्र त्यांचे काम त्वरीत केले आहे. बांधकाम विभागात व विद्युत विभागात असलेला फरक बघा. धन्यवाद !

**काही सदस्य :—** पास—पास........

**मा. महापौर :—**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ५ :—** श्री.एम.ए.जवादे यांचा कार्यकारी अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मुख्य प्रशासकिय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जा. क्र. का.अ./प्रतिनि/२०४/११६९/आ. १, दिनांक १९.११.०४ अन्वये श्री एम.ए. जवादे, यांची कार्यकारी अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दोन वर्षाकरिता प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री. एम.ए.जवादे, कार्यकारी अभियंता हे महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागात दिनांक १८.८.२००४ रोजी मध्यान्हपूर्व रुजू झालेले आहेत.

श्री. एम.ए. जवादे, उप—अभियंता यांची उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता या पदावर केलेल्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता मिळणेसाठी दिनांक ३०.३.२००५ रोजी झालेल्या महासभेत गोषवारा सादर केला होता. सदर प्रकरणी महासभा ठराव क्र. ८४, दिनांक ३०.३.०५ अन्वये श्री. एम.ए. जवादे, कार्यकारी अभियंता यांना एका वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक १८.८.२००५ रोजी संपृष्टात आला आहे. तथापी महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने प्रतिनियुक्तीचा कालावधी संपृष्टात आल्यानंतर देखील कार्यमुक्त केलेले नाही.

तरी श्री. एम.ए. जवादे, कार्यकारी अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दिनांक १७.८.०६ पर्यंत प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

**महासभा ठराव क्र:—** ५५ **दिनांक:—१९/९/२००५**

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव श्री.एम.ए.जवादे यांच्या उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील कार्यकारी अभियंता या पदावरील दिनांक १८/८/२००५ पासुन वाढविलेल्या कालावधीसह एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ६** :— श्री आर.आर.सावकारे यांचा कार्यकारी अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—</u> येथे कशी विसंगती आहे ते पहा. आज भुयारी गटारांचे काम होत नाही म्हणुन येथे एवढी ओरड चालु आहे. असे असतांना त्या विभागाच्या अधिका—याचा प्रस्ताव पास होतो आणि श्री. बनसोडे यांच्या विरुध्द तक्रार नसतांना देखील विषय वगळण्यांत येतो. हे चुकीचे आहे.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास........

<u>मा. महापौर :—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

**विषय क्र. ६** :— श्री आर.आर.सावकारे यांचा कार्यकारी अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:—</u>

मुख्य प्रशासकिय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जा.क्र. का.अ./प्रतिनि/२००४/११५५/आ. १, दिनांक ११.८.०४ अन्वये श्री आर.आर. सावकारे, यांची कार्यकारी अभियंता या पदावर उल्हासनगर महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून तीन वर्षाकरिता

प्रतिनियुक्तीवर नेमणूक केली आहे. श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता हे महानगरपालिका अंतर्गत पाणी पुरवठा विभागात दिनांक १७.८.२००४ रोजी मध्यान्हपूर्व रुजू झालेले आहेत.

श्री. आर.आर. सावकारे, यांची उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता या पदावर केलेल्या प्रतिनियुक्तीवरील नेमणुकीस मान्यता मिळणेसाठी दिनांक ३०.३.२००५ रोजी झालेल्या महासभेत गोषवारा सादर केला होता. सदर प्रकरणी महासभा ठराव क्र. ८५, दिनांक ३०.३.०५ अन्वये श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता यांना एका वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक १६.८.२००५ रोजी संपृष्टात आला आहे. तथापी महापालिकेस त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने प्रतिनियुक्तीचा कालावधी संपृष्टात आल्यानंतर देखील कार्यमुक्त केलेले नाही.

तरी श्री. आर.आर. सावकारे, कार्यकारी अभियंता यांच्या वाढलेल्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह दिनांक १६.८.०६ पर्यंत प्रतिनियुक्तीच्या कालावधीसह मुदतवाढ मिळणेसाठी प्रस्ताव महासभेसमोर प्रस्तावित केला आहे.

<u>महासभा ठराव क्र:–</u> ५६ <u>दिनांक:–१९/९/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सतरामदास जेसवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव श्री.आर.आर.सावकारे यांच्या उल्हासनगर महानगरपालिका सेवेतील कार्यकारी अभियंता या पदावरील दिनांक १६/८/२००५ पासुन वाढविलेल्या कालावधीसह एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. ७ :– श्री बी.एस.पवार यांचा प्रशासन अधिकारी, महापालिका शिक्षण मंडळ या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :–</u> पास–पास........

<u>मा. महापौर :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ७ :—** श्री बी.एस.पवार यांचा प्रशासन अधिकारी, महापालिका शिक्षण मंडळ या पदावरील प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेकामी मान्यता देणे.

प्रस्तावना:—

शालेय शिक्षण विभाग क्र. एसएटी ३३०४/(३६७/०४) प्रशा—२, दिनांक १७ ऑगस्ट, २००४ च्या आदेशान्वये श्री. बी.एस.पवार, मुख्याध्यापक यांची या महापालिकेत ''प्रशासन अधिकारी'' या पदावर दिनांक १/९/२००४ पासुन प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेली असून सदर पदी ते सध्या कार्यरत आहेत.

श्री. बी.एस.पवार यांच्या दिनांक १/९/२००४ पासून प्रतिनियुक्तीस महासभेने महासभा ठराव क्र. ४८, दिनांक ४/११/२००४ अन्वये ०१ वर्षासाठी मंजूरी दिली आहे. त्यानुसार त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ३१/८/२००४ रोजी संपुष्टात येत आहे.

श्री. बी.एस. पवार यांचे प्रतिनियुक्तीचे कालावधीतील काम पाहता त्यांच्या सेवेची यापुढे देखील महापालिकेला आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक १/९/२००५ पासुन पुढील ०१ वर्षाच्या कालावधीसाठी वाढविण्याचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:— ५७ — दिनांक:—१९/९/२००५

सुचकाचे नाव :— श्रीमती मीना सोंडे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती कोमल भटिजा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव श्री.बी.एस.पवार यांच्या महानगरपालिका शिक्षण मंडळातील प्रशासन अधिकारी या पदावरील दिनांक १/९/२००५ पासुन वाढविलेल्या कालावधीसह एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ८ :—** श्री. मनोहर राजांगळे, मुकादम यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे.

---

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मा. महापौरजी, या विषयावर मी बोलु इच्छितो. आम्ही नेहमी बोलतो की, अतिक्रमण विभागाला कार्यभार दयायला हवा. परंतु आता अतिक्रमण, आरोग्य या सर्व विभागाचे काम

प्रभाग अधिकारीकडे दिले आहेत. परंतु अनाधिकृत बांधकामाचा मुद्दा येतो त्यावेळी एकाच माणसाला निलंबित केले जात आहे. त्याच्या सोबत कनिष्ठ अभियंता देखिल होते, प्रभाग अधिकारी देखिल होते. अहवाल तर सगळयांनाच दयायचा आहे. मग श्री. मनोहर राजांगळे, मुकादमाला का निलंबित केले? कनिष्ठ अभियंत्याला का केले नाही? प्रभाग अधिका—याला का केले नाही? फक्त खालच्या स्तरावरच्या कर्मचा—याविरुध्द कारवाई का केली जाते? यामुळे यांचे निलंबन कायम न करता यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु ठेवण्यात यावी. असे आमचे मत आहे. अन्यथा संबंधीत कनिष्ठ अभियंता व प्रभाग अधिकारी यांना देखिल निलंबित केले जावे. अनाधिकृत बांधकामांसाठी एकच माणुस जबाबदार नसतो. खालुन वर पर्यंत कारवाई व्हायला हवी.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मी देखिल यावर प्रकाश टाकु इच्छितो की, यामध्ये आपण लिहिले आहे की, आपण ११/७/०५ ला त्याला कारणे दाखवा नोटिस दिली होती. १२/७/२००५ ला त्याने उत्तर दिले आहे. यामध्ये आपण लिहिले आहे की, खुलासा असमर्थनीय होता. त्याने २४ तासात आपणांस उत्तर दिले होते. खुलासा असमर्थनीय आहे म्हणजे काय आहे? हे चुकीचे आहे. अशी कारवाई आपण करायला नको होती. त्याने आपणांस उत्तर तरी दिले आहे. त्याने खुलासा काय दिला हे देखिल येथे यायला हवे होते. ते आले नाही. आपण निलंबन कायम करण्यासाठी प्रस्ताव आणता हे चुकीचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> निलंबन कायम करण्यात येवु नये.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास........

<u>मा. महापौर :—</u>सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया या सभागृहातुन बाहेर गेल्या.

---

☑

**विषय क्र. ८ :—** श्री. मनोहर राजांगळे, मुकादम यांना आयुक्तांतर्फे देण्यात आलेले निलंबन आदेश कायम करणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. न्यायालयाचे आदेशानुसार प्रभागक्षेत्र अधिकारी व त्यांचे अधित्याखालील कार्यरत कर्मचारी यांचेवर त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये सुरु असलेल्या अनधिकृत बांधकामाची पाहणी करुन, सदर अनधिकृत बांधकामे वेळोवेळी निष्कासित करुन, त्याचा अहवाल वरीष्ठांकडे सादर करणेची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानुसार श्री. मनोहर राजांगळे, मुकादम, प्रभाग समिती क्र. ३ यांना (१) एस.के. प्रोडक्टस्, हिरा आईस फॅक्टरी, बॉक्सवाला, उल्हासनगर—४, (२) पवई जकात नाका, श्रीराम टॉकीजसमोर, उल्हासनगर—४ येथिल अनधिकृत बांधकामे त्वरीत नियमान्वये निष्कासित करुन अहवाल सादर करणेचे आदेश देण्यात आले होते. तथापि, दक्षता पथकांच्या सदस्यांच्या अहवालावरुन त्यांनी वरील अनधिकृत बांधकामांचा अहवाल दिलेला नाही व निष्कासनाची कारवाईसुध्दा केली नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे, त्यांना इकडील क्र. उमपा/अबांनिवि/ज्ञापन/५२७/०५, दिनांक ११/७/२००५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावुन २४ तासात खुलासा मागविणेत आला होता. त्या अनुषंगाने त्यांनी १२/७/२००५ अन्वये दिलेला खुलासा असमर्थनिय असल्याने व वरीष्ठांचे आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे त्यांना क्र. उमपा/साप्रवि/मुली/५३९/०५, दिनांक २०/७/२००५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ चे पोटकलम १ (ब) अन्वये श्री. मनोहर राजांगळे, मुकादम यांचे निलंबन कायम करण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्रः—५८ दिनांकः—१९/९/२००५

सुचकाचे नाव :— श्री. चंदाराम मोकल

अनुमोदकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या गैरवर्तनाबाबत श्री. मनोहर राजांगळे, मुकादम यांना आयुक्तातर्फे बजावण्यांत आलेले निलंबन आदेश कायम करीत नाही.

## *कारण :—*

उपरोक्त कर्मचा—याचा थेट संबध असल्याचे पुरावे प्रथमदर्शनी आढळुन येत नाहीत. त्यामुळे या प्रकरणात सविस्तर खातेनिहाय चौकशी होईपर्यंत निलंबन कायम करणे न्यायोचित ठरणार नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ९ :—** महापालिका कर्मचा—यांनी व त्यांच्या कुटूंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीची मर्यादा वाढविणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :— पास—पास........

मा. महापौर :—सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

**विषय क्र. ९ :—** महापालिका कर्मचा—यांनी व त्यांच्या कुटूंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या आंतररुग्ण उपचाराच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीची मर्यादा वाढविणेस मान्यता देणे.

प्रस्तावना:—

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६९ मधील तरतुदीनुसार व वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशास अनुसरुन आकस्मिक व गंभीर आजारावर खाजगी रुग्णालयात उपचार केल्यास त्यासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती देण्यात येते. सदर प्रतिपुर्तीची सद्याची कमाल मर्यादा रुपये २०,०००/— पर्यंत आहे. परंतु सद्य:स्थितीत औषधांच्या किंमतीत व उपचार पध्दती वरील खर्चामध्ये झालेली वाढ तसेच अशी प्रकरणे निकाली काढण्यास लागणारा कालावधी इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाने सार्वजनिक आरोग्य विभाग शा.नि. क्र. एमएजी—२०००५/९/प्र.क्र.१/आरोग्य—०३, दिनांक १९/३/२००५ च्या आदेशानुसार पुढीलप्रमाणे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीमध्ये सुधारणा केली असून सदर खर्चाची मर्यादा रुपये २०,०००/— वरुन रुपये ४०,०००/— (रु. चाळीस हजार फक्त) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस म.रा.सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशातील तरतुदीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे.

तसेच सदर आदेशाच्या परिशिष्ट 'अ' मध्ये २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारावर खाजगी रुग्णालयात उपचार केल्यास वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे. याशिवाय शासकिय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्टोपचारावरील खर्चास शासकिय रुग्णालयाप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रुग्णालयाची यादी अद्यायावत केली आहे. त्यानुसार सदर शासन मान्य खाजगी रुग्णालयात कर्मचा—याने वैद्यकीय उपचार केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे.

महापालिकेने प्रशासकीय ठराव क्र. ९, दिनांक २२/१०/१९९६ अन्वये महापालिकेतील कर्मचा—यांसाठी शासनाचे आदेश व सूचना लागू केल्या आहेत. त्यामुळे महापालिकेतील कर्मचा—यांना शासनाच्या दिनांक १९/३/२००५ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीस अधीन राहून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजूर करण्याचा प्रस्ताव मा. महासभेपूढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र:— ५९ दिनांक:—१९/९/२००५

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती भारती छाब्रिया

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव महापालिकेतील कर्मचा—यांना शासनाच्या दिनांक १९/३/२००५ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीस अधिन राहुन वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीची कमाल मर्यादा रु. २०,००० वरुन रु. ४०,००० एवढी वाढविण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. १० :— <u>प्रस्तावाची सुचना :—</u>

उल्हासगनर कॅम्प नं ५ येथील जयबाबा लॉन्स समोरील चौकास ''कै. भगवंती बच्चाराम रुपचंदानी चौक'' असे नामकरण करण्यासाठी सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी व श्री. किशोर वनवारी यांचा प्रस्ताव मान्य करणे.

---

<u>मा. सचिव :—</u>या प्रस्तावाचे सुचक श्री. लाल पंजाबी यावेळी सभागृहात अनुपस्थित असल्याने प्रस्ताव चर्चेस घेता येणार नाही.

<u>मा. महापौर :—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

---

विषय क्र. १० :— <u>प्रस्तावाची सुचना :—</u>

उल्हासगनर कॅम्प नं ५ येथील जयबाबा लॉन्स समोरील चौकास ''कै. भगवंती बच्चाराम रुपचंदानी चौक'' असे नामकरण करण्यासाठी सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी व श्री. किशोर वनवारी यांचा प्रस्ताव मान्य करणे.

---

<u>मा. सचिव :—</u> आयत्यावेळचा एक विषय आलेला आहे. तो पुढीलप्रमाणे आहे.

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

<u>विषय क्र. ११</u> :— पुरग्रस्त महापालिका अधिकारी व कर्मचा—यांना ३ महिन्यांचे अग्रिम वेतन बिनव्याजी देण्यास मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा. महापौरजी, विषय पास करायचा आहे परंतु त्यापुर्वी यामध्ये आपण असे लिहिले आहे की, पुरग्रस्ताने स्वत:च्या विभागप्रमुखाकडे अर्ज करावा. परंतु अर्ज करतांना त्याच्याकडे कोणती कागदपत्र हवीत? यासाठी स्थानिक नगरसेवकाचे पत्र देखिल घ्यायला हवे. अन्यथा याचा दुरुपयोग होवू शकतो. ते ज्या विभागात राहतात तेथिल स्थानिक नगरसेवकाचे पत्र घेणे आवश्यक आहे. नगरसेवक त्यांना लिहून देईल की, ते पुरग्रस्त आहेत अथवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—</u> नगरसेवक जबाबदारी कशाला घेतील? महापालिका त्यांना पगार कापुन देणार आहे. महापालिका काय करायचे ते करेल.

<u>काही सदस्य :—</u> पास—पास........

<u>मा. महापौर :—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

<u>विषय क्र. ११</u> :— पुरग्रस्त महापालिका अधिकारी व कर्मचा—यांना ३ महिन्यांचे अग्रिम

वेतन बिनव्याजी देण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहर हे उल्हास व वालधुनी नदी काठावर वसलेले असुन शहराचे एकूण क्षेत्रफळ १३ चौ.कि.मी इतके असून लोकसंख्या ४.७२ लक्ष इतकी आहे. वालधुनी नदी शहराच्या मध्यातून वाहत असून उल्हास नदी ही महापालिकेची उत्तरपूर्व सिमा आहे.

प्रतिवर्षी पावसाळयात या नदयांना पुर येत असल्याने पुरामुळे जिवित व वित्तहानी झालेली आहे. दिनांक २६ व २७ जुलै या दरम्यान मुसळधार अतिवृष्टीमुळे वालधुनी नदीवरील चिखलोली धरण व उल्हासनदी वरील बारवी धरणाच्या साठयात वाढ झाल्याने धरणातून सोडण्यात येणारे पाणी व अरबी समुद्रातील खाडीला येणारी भरतीची वेळ एक होवून उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील भाग जलमय होवून संपूर्ण जनजीवन विस्कळीत झालेले आहे. दिनांक २६ व २७ जूलै, २००५ रोजी विक्रमी पाऊस झाल्यामुळे महापालिका क्षेत्रापैकी सुमारे ३.१९ चौ.कि.मी. चा परिसर पुर्णपणे पाण्याने व्यापून गेल्याने नदी किना—यावर असलेल्या मानवी वस्त्या जलमय होवून त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर जिवित व वित्तहानी झालेली आहे.

अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासन, साप्रवि, शासन परिपत्रक क्रमांक सीएमएफ/१००५/प्र.क्र. ५४/०५/१६—अ, मंत्रालय, मुंबई, दिनांक २३ ऑगस्ट, २००५ या निर्णयान्वये शासनाने राज्यातील शासकिय / निमशासकिय, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगर परिषद इत्यादी कर्मचारी की, ज्यांच दिनांक २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच पुरामुळे, भुख्खलनामूळे मनुष्य, वित्त व मालमत्तेचे नुकसान झाले आहे, अशा अधिकारी / कर्मचा—यांना ३ महिन्याचे पुर्ण वेतनाची अग्रिम रक्कम बिनव्याजी देण्याचा निर्णय घेतला आहे.

हा अग्रिम सप्टेंबर अखेरपर्यंत देण्यात येवून त्याची वसूली जानेवारी, २००६ पासून समान ३६ सलग मासिक हप्त्यामध्ये करण्यात यावी. शासकिय अग्रिमासाठी असलेल्या नियमानुसार त्याचे लेखे ठेवण्यात यावे. जे कर्मचारी नजिकच्या काळात सेवानिवृत्त होत असतील तर त्याचे उर्वरीत हप्ते त्यांना देय असलेलया रक्कमेतून एक रक्कमी वसूल करण्यात यावे. असे निर्देश उपरोक्त शासन आदेशान्वये देण्यात आलेले आहेत.

जे अधिकारी / कर्मचारी बाधित झाले असतील त्यांनी त्यांच्या विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांचेकडे अग्रिमासाठी अर्ज करुन त्यामध्ये पुरामूळे बाधित झालेल्या नुकसानीबाबतचा तपशिल नमूद करण्यात यावा असेही सुचित केले आहे.

उल्हासनगर शहरात अतिवृष्टी होवून पुरपरिस्थिती निर्माण झाल्याने बरेचशे कुटूंबे बेघर झालेले आहेत. त्यामूळे उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे अशा पुराने बाधित अधिकारी / कर्मचा—यांना मदत म्हणून वरील शासन निर्णयाचा विचार करता, पुरग्रस्त कुटुंब म्हणून केलेला पंचनामा तहसिलदार, उल्हासनगर कार्यालयाने दिलेले प्रमाणपत्र तसेच इतर संबंधित कागदपत्रांची छाननी केल्यानंतर ३ महिन्याचे बिनव्याजी आगाऊ वेतन देणेसाठी मंजुरी मिळणेस मा. महासभा यांचेपुढे ठेवणेस प्रस्तावित करीत आहे.

महासभा ठराव क्र. ६० — दिनांक :— १९/९/२००५

सुचकाचे नाव :—श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्रीमती कमला शर्मा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव उल्हासनगर महापालिकेतील पुराने बाधित झालेल्या अधिकारी व कर्मचा—यांना दिनांक २३/८/२००५ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीस अधिन राहुन ३ महिन्यांचे अग्रिम वेतन बिनव्याजी देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही /—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.०५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१९ नोव्हेंबर, २००५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/११/२००५ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक १९.११.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :—श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३५. | श्रीमती माने किरण |
| ४. | श्री. सोनवणे नथु | ३६. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३७. | श्री. जाधव प्रशांत |
| ६. | श्रीमती मोकल सीमा | ३८. | श्री. जाधव सुरेश |
| ७. | श्री. दिलीप गायकवाड | ३९. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ८. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४०. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. एडके गणपत गोविंद | ४१. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४२. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४३. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. उमाप रामदास | ४४. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १३ | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४५. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १४. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४७ | श्री. अंकुश म्हस्के |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४८. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १७. | श्री. पवार नाना | ४९. | श्री. पंजाबी नारायण |
| १८. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५०. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १९. | श्री. जग्यासी राजु | ५१. | श्री. साधवानी मनोज |
| २०. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ५२. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २१. | श्री. निकम शांताराम | ५३. | श्रीमती भटिजा कोमल |
| २२. | श्री. टाले प्रमोद | ५४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५६. | श्रीमती निना नाथानी |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५७. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २६. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २७. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २९. | श्री. साधवानी मोहन | ६१. | श्रीमती मिनु दासानी |
| ३०. | श्री. सतरामदास जेसवानी | ६२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्रीमती साधवानी जया | ६३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६४. | श्री. हरदास माखिजा |
| ३३. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | ६५. | श्री. राजेश वदारिया |
| ३४. | श्री. राज असरोंडकर | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, २. श्री. टेकचंदानी राजु, ३. श्रीमती रामचंदानी भावना, ४. श्री. वाघे शामु, ५. श्री. मुलचंदानी महेंद्र, ६. श्रीमती वसिटा बेबी, ७. श्री. ठाकुर अशोक, ८. श्रीमती अनिता गुप्ता, ९. श्रीमती भावना खिलनानी, १०. श्री. भालेराव गौतम, ११. श्री. रामरख्यानी मोहनदास, १२. श्रीमती किरण माखिजा, १३. श्री. जयसिंघानी अनिल, १४. श्रीमती करोतिया मालती, १५. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १६. श्री. इदनानी राजु चंद्रभान हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

दुपारी १२.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u> मा. महापौरजी, सर्वप्रथम आपण आज येथे आपले भुतपुर्व राष्ट्रपती श्री. के.आर. नारायणन्, तसेच श्री. मधु दंडवते व श्रीमती खुशबु कालानी यांच्या निधनानिमित्त येथे श्रध्दांजली दयावी अशी मी विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>मा. महापौरजी, माझ्या प्रभागात सात वर्षाची एक छोटी मुलगी डेंग्यु या आजारामुळे निधन पावली आहे. तीचे नाव वैष्णवी जाधव असे आहे तिला देखिल येथे श्रध्दांजली दयावी.

<u>मा. सदस्या श्रीमती कमला शर्मा :–</u> महापालिकेच्या विद्युत विभागाचे कर्मचारी श्री. गोप शर्मा यांचे देखिल निधन झाले आहे, त्यांना देखिल श्रध्दांजली देण्यात यावी.

---

<u>शोक प्रस्ताव</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती कमला शर्मा
श्री. नारायण पंजाबी

भुतपुर्व राष्ट्रपती श्री. के.आर. नारायणन यांचे दिर्घ आजाराने नुकतेच निधन झाले. तसेच श्री. मधु दंडवते यांचे देखिल निधन झाले आहे. आमदार श्री. पप्पु कालानी यांच्या वहिनी श्रीमती खुशबु कालानी यांचे नाशिक येथे निधन झाले आहे.

श्री. रमेश चव्हाण यांच्या प्रभागातील सात वर्षाची एक छोटी मुलगी कु. वैष्णवी जाधव हीचे डेंग्यु या आजाराने निधन झाले आहे. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत विभागाचे कर्मचारी श्री. गोप शर्मा यांचे देखिल निधन झाले आहे.

यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ६४ अ** **दिनांक:–१९.११.**

२००५

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. के.आर. नारायणन्, श्री. मधु दंडवते, श्रीमती खुशबु कालानी, कु. वैष्णवी जाधव व श्री. गोप शर्मा यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मी येथे सांगु इच्छितो की, आपले सन्माननिय पालकमंत्री पाच मिनिटांमध्ये महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात येणार आहेत. त्यामुळे आजची बैठक काही दिवसांसाठी, पुढील सुचना मिळेपर्यंत स्थगित करावी. तसेच सर्व सदस्यांना विनंती करतो की, सध्या जो ८५५ इमारतींचा प्रश्न आहे त्याबद्दल पालकमंत्री महोदय यांच्याशी आपण चर्चा करु. त्यांना उल्हासनगरच्या परिस्थितीबाबत अवगत करुन देवु. त्यामुळे आता ही बैठक स्थगित करु या. तसेच दोन वाजता रिजेन्सी हॉलमध्ये जो जनता दरबार आयोजित केला आहे तेथे देखिल सर्वांनी उपस्थित रहावे. धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. महापौर महोदया, मा. पालकमंत्री आता येथे येत आहेत तर स्थायी समितीचा जो हॉल आहे तेथे सर्व सदस्य बसु शकत नाही. तर यासाठी आपण महापालिका सभागृहात बैठक ठेवावी जेणेकरुन सर्वांना चर्चा करता येईल.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u>मा. महापौरजी, बैठक स्थगित करण्यापुर्वी मी आपणांस अवगत करु इच्छितो की, उल्हासनगर महापालिकेच्या आरोग्य विभागात ठेकेदाराकडे कार्यरत असलेले कर्मचारी कालपासुन

उपोषणाला बसले आहेत. त्याचे कारण काय आहे, त्यांच्या काय मागण्या आहेत, हे आपण सभा स्थगित करण्यापुर्वी बघितले तर, त्यांच्या मागण्या सोडविल्या तर जास्त चांगले होईल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– मा. महापौर महोदया, कालपासुन जे कर्मचारी आमरण उपोषणास बसलेले आहेत त्यांच्या मागण्या योग्य आहेत. आयुक्तांच्या मध्यस्थीने हे अॅन्थनी ठेकेदाराला सांगितलेले आहे. आयुक्तांनी एक नोटिस देवुन त्यांना मागण्या पुर्ण करण्यास सांगितल्या आहेत. या ज्या मागण्या आहेत त्या महापालिकेने केलेल्या करारात अंतर्भुत आहेत. अॅन्थनी ठेकेदार कुठल्याही मागण्या मान्य करत नाही. महासभेत देखिल अॅन्थनीच्या कार्यपध्दतीवर बरीच टिका झाली आहे. यामुळे जर तो अटींचे पालन करण्यास नकार देत असेल व गोर–गरीब, दलित जनता जे सफाई कामगार आहेत त्यांच्यावर अन्याय करीत असेल तर त्याचा ठेका रद्द करायला हवा. कारण महाराष्ट्र सरकारच्या नियमाप्रमाणे जे न्युनतम वेतन दयायला हवे ते वेतन देखिल तो त्यांना दयायला तयार नाही. त्यांच्या ज्या समस्या आहेत त्या स्वतः आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे यांनी ऐकल्या आहेत. त्यांनी देखिल मागण्या योग्य असल्याचे सांगितले आहे. महासभेची कारवाई स्थगित करण्यापुर्वी अॅन्थनी ठेकेदारास बोलावुन त्याच्याशी याबाबतीत स्पष्ट बोलायला हवे की तो वाजवी मागण्या व अटी मानण्यास तयार आहे अथवा नाही. अन्यथा सभागृहात प्रस्ताव ठेवुन तो ठेका रद्द करायला हवा. याच्यापेक्षा अर्ध्या दराने पनवेलकर चांगले काम करु शकतो. अथवा दुस–या कोणाला ठेका दयावा. मागण्या पुर्ण करुन कामगारांना न्याय दयायला हवा अशी माझी मागणी आहे. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– मा. महापौर महोदया, जुन महिन्यापासुन नोव्हेंबर महिन्यापर्यंत पाच महिने झाले आहेत एकदाही वेळेवर महासभा झालेली नाही. नेहमी काहीना काही कारण देवुन, कारण नसेल तरी देखिल काही तरी कारण दाखवुन महासभा स्थगित केलेली आहे. काही महत्वाचे विषय देखिल काही कारण न देता वगळले आहेत अथवा नाकारले आहेत. परंतु आजची सभा स्थगित करतांना जे कारण दिले आहे ते चांगले आहे व योग्य आहे. शहराच्या हिताचा विचार करुन आजची सभा स्थगित केली जात आहे. परंतु ही परंपरा आहे. आपण बघा जुन महिन्यापासुन एकही सभा आजपर्यंत वेळेवर झाली नाही. तर माझी आपणांस विनंती आहे की, यापुढे सभेची वेळ ठरवितांना जे कार्यक्रम असतील ते बघुन त्यानंतर बैठक ठेवावी. पालकमंत्री महोदयांचा कार्यक्रमही एकाएकी लागलेला नाही. आपण सभा महिन्यातुन फक्त एक वेळा घेतो. परंतु वारंवार स्थगित करणे योग्य नाही. आम्ही आपणांस पाठींबा देत आहोत. परंतु वारंवार असे करणे योग्य नाही. हे लोकांना देखिल माहिती पडले आहे. आज आपण उपस्थिती बघा, वर बघा पत्रकार देखिल नाहीत. कधीही सभा पहिल्या दिवशी पुर्ण होत नाही त्यामुळे पत्रकार देखिल येत नाहीत. हा जो संदेश जात आहे तो चुकीचा आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, सत्ताधारी पक्षाचे गटनेते श्री. दिलीप लालवानी यांनी जे सांगितले ते योग्य सांगितले की, अॅन्थोनी ठेकेदाराला जो ठेका दिला आहे तो रद्द करुन पनवेलकराला दयायला हवा. यामुळे आपले रोजचे रुपये ७० हजार वाचतील. ते दुस–या ठिकाणी वापरता येतील. अॅन्थोनी फक्त लोकांना चांगले कपडे घालुन पाठवितो. ते वाकत पण नाहीत. पनवेलकरला हा ठेका दयायला हवा अन्यथा आम्ही पुर्ण शहरात कॅसेट वाजवु की, '' कचरा रे कचरा रे पुर्ण शहरात कचरा रे ''. लोक सकाळी येतात व बोलतात की, '' कचरा रे कचरा रे पुर्ण शहरात कचरा रे'' यासाठी मेहरबानी करुन अॅन्थोनीला बोलवावे व त्याच्याशी चर्चा करावी. तो जर अटींची पुर्तता करत नसेल तर त्याचा ठेका रद्द करुन दुस–या ठेकेदाराला हे काम दयावे. असे मी निवेदन करतो धन्यवाद.

मा. सदस्य श्री. नाना पवार :– आता सभागृहात जो विषय उपस्थित झाला त्याबद्दल एक सुचना आहे. आपण या विषयावर बोललात तर आम्हांला देखिल असे वाटले की, सर्व सदस्य यावर बोलत आहे तर आपणही यावर आपले मत मांडावे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौरजी, बैठक चालु आहे अथवा नाही.

मा. सदस्य श्री. नाना पवार :– आम्ही येथे प्रस्ताव ठेवत नाही. सभागृहात कामगारांबद्दल एक चांगला मुद्दा उपस्थित झाला आहे. ही जी चर्चा चालु आहे. ती योग्य आहे. आता बैठक संपल्यानंतर उपोषणाबद्दल कुणी चर्चा करणार नाही. जे लोक उपोषणाला बसले आहेत ते गरीब आहेत व आपल्या

हक्कासाठी उपोषणाला बसले आहेत. मी सभागृहास सांगु इच्छितो की, जेव्हा महापालिका एखादया ठेकेदाराला काम देते तेव्हा त्याचा अर्थ असा होत नाही की, त्या ठेकेदाराने मनमानीपणाने काम करावे. त्यांना योग्य मजुरी न देणे, सुविधा न देणे हे योग्य नाही. कोणताही ठेकेदार हा महापालिकेकडुन पैसे घेतो त्यामुळे त्याने नियमाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. आता हे जे कामगार उपोषणाला बसले आहेत त्यांच्या काही फार मोठया मागण्या नाहीत. ते घाणीमध्ये काम करतात त्यामुळे त्यांना घाणकाम भत्ता मिळायला हवा. कायदयाप्रमाणे जे वेतन मिळायला हवे ते दयायला हवे. ते काही महापालिकेत नोकरी मिळावी अशी मागणी करण्यासाठी आलेले नाहीत. ते जे काम करतात, मेहनत करतात त्याचा त्यांना योग्य मोबदला मिळावा अशी त्यांची रास्त मागणी आहे. मी मा. महापौर व आयुक्तांना विनंती करतो की आपण ठेकेदाराला जे काम देतो ते काम देतांना जे मजुर असतात त्यांच्यासाठी जी अट असेल ती ठेकेदाराने पुर्ण करायला हवी. जर तो ठेकेदार त्याप्रमाणे काम करत नसेल तर त्याचा ठेका रद्द केला तर ते योग्य होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, श्री. नाना पवार यांच्याशी मी सहमत आहे. बैठक स्थगित करण्यापुर्वी मी एक सुचना देवु इच्छितो की, आपले सदस्य श्री. विनोद ठाकुर यांचे सुपुत्र श्री. धिरज यांचा १० डिसेंबरला विवाह आहे, उत्सव लॉन्स येथे. यासाठी ते सर्वांना पत्रिका देणार होते परंतु बैठक स्थगित होत असल्याने मी त्यांच्या तर्फे सर्वांना विनंती करतो की, १० डिसेंबरला विवाहाला अवश्य यावे. यासाठी ते आता सर्वांना पत्रिका देत आहेत धन्यवाद.

<u>मा. महापौर :–</u> सन्माननिय सदस्य, कचरा ठेकेदार ॲन्थोनी यांच्याबद्दल येथे मुद्दा उपस्थित केला होता, आमच्या सदस्यांनी सांगितले आहे की, आयुक्तांची त्याबद्दल चर्चा झालेली आहे. त्यांनी हे मान्य केले आहे की, ठेकेदाराची चुक झाली आहे. आज आयुक्त साहेब महत्वाच्या बैठकी निमित्त मुंबई येथे गेले असल्याने प्रभारी आयुक्त श्री. लोणारे यांना निर्देश देण्यात येतात की, जे कर्मचारी उपोषणाला बसले आहेत त्यासाठी ठेकेदाराला बोलावुन आपण चर्चा करावी व मार्ग काढावा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौर महोदया, मी सांगु इच्छितो की, याच विषयावर मी प्रश्न क्र. २२३ टाकला होता. त्यामध्ये मी ठेकेदार कोणत्या अटी, शर्तीचे पालन करतो याची विचारणा केली होती. अट क्र. ५ अन्वये कामगारांना किमान वेतन कायदयान्वये लाभ दिले जातात का याची विचारणा केली होती त्यावर उत्तर दिले की, कामगारांना पुर्ण फायदे दिले जातात. जर त्या प्रश्नाचा योग्य खुलासा प्रशासन व सत्ताधारी पक्षाने त्यावेळी केला असता तर, तो प्रश्न गांभीर्याने घेतला असता तर ही वेळ आली नसती. तर याची पुर्ण जबाबदारी प्रशासनावरच जाते. त्यांनी त्या वेळी चुकीचे उत्तर देवुन ठेकेदाराला संरक्षण दिले.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> सत्ताधारी पक्षाकडे याची तक्रार आता आली आहे. जेव्हा पासुन आमच्याकडे तक्रार आली आहे आम्ही या विरुध्द आवाज उठविला आहे. कामगारांवर अन्याय होत आहे हे आयुक्तांनी स्विकारले आहे. कायदेशीररित्या जे काही करता येईल ते करायला हवे. सत्ताधारी पक्ष यासाठी समर्थन देत आहे. श्री. धनंजय बोडारे यांनी यापुर्वी या विषयावर प्रश्न उपस्थित केला होता. आम्ही देखिल अशी मागणी यापुर्वी केली होती व ॲन्थोनीच्या कामकाजावर टिका केलेली आहे. मा. महापौर महोदया, महापालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असतांना देखिल आम्ही कर्मचा–यांना बोनस दिला होता परंतु ॲन्थोनीकडील सफाई कामगार हे सफाई मजदुर कॉंग्रेसचे सदस्य झाले म्हणुन ठेकेदाराने त्यांचा पगार थांबवुन त्यांची दिवाळी काळी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी कामगारांना धमकाविण्याचे प्रयत्न केले होते. ते दादागिरी करीत आहेत. ते कामगारांना ईस्ट इंडिया कंपनी प्रमाणे गुलाम करु इच्छितात. यामुळे लवकरात लवकर त्यांना न्याय दयायला हवा व त्यांचे उपोषण संपृष्टात आणायला हवे अशी मागणी आम्ही येथे करीत आहोत. ही मागणी फक्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची नसुन सर्व पक्षांची आहे. कारण ही मागणी दलितांसाठी, सफाई कामगारांसाठी आहे. कामगारांना न्याय मिळायला हवा अशी या सभागृहाची मागणी आहे. त्यांचे आमरण उपोषण लवकरात लवकर संपृष्टात आणावे अशी आमची मागणी आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :–</u> मा. महापौरजी, माझी अशी विनंती आहे की, खाली जावुन कामगारांना भेटुन उपोषण संपृष्टात आणण्यासाठी आपण आयुक्तांना आदेश दयावे.

<u>मा. महापौर :–</u>सर्व सभागृह कामगारांच्या बाजुने आहे. यासाठी आयुक्तांनी त्यांच्या मागण्यांकडे लक्ष दयावे. गरज वाटल्यास स्वत: भेटुन उपोषण संपृष्टात आणावे. त्यानंतर ठेकेदाराला बोलावुन त्याच्याशी चर्चा करुन

यावर मार्ग काढावा. दुसरे म्हणजे आता ही जी बैठक स्थगित केली जात आहे तर बैठकीची सभा सुचना आठ दिवस आधी काढावी लागते त्यावेळी आठ दिवसानंतर काय होणार आहे याची माहिती नसते. तसेच आज जनता दरबार आहे. दुसरे म्हणजे आज आयुक्त साहेब नाहीत तसेच विषय सुचीवर खास असे विषय नाहीत. बैठक लवकर संपवता आली असती परंतु आयत्यावेळचे विषय देखील आहेत व ते देखिल फार महत्वपुर्ण विषय आहेत त्यावर आयुक्तच उत्तर देवु शकतील. हे लक्षात घेवुन आजची ही सभा स्थगित करण्यात येत आहे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** मा. महापौर महोदया, पालकमंत्री येथे येतील की, तेथे येतील?

**मा. महापौर :—** आम्ही त्यांना येथे येण्यासाठी विनंती करु.

**मा. सचिव :—** कृपया लक्ष दयावे. दोन लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचक : श्री धनंजय बोडारे

अनुमोदक: श्री राजेंद्र चौधरी

**विषय** : जकात उत्पन्नातील त्रुटीबाबत व त्यामुळे शहराच्या विकासावर होणा—या विपरीत परिणामाबाबत.......

उपरोक्त विषयानुसार लक्षवेधीने आपले लक्ष वेधु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील जकात वसुली महापालिका कर्मचा—यामार्फत करण्यात येत असून दैनंदिन वसुलीच्या तक्त्यावरुन जकात वसूली कमी प्रमाणात होत असून जकात चोरीचे प्रमाण वाढलेले निदर्शनास येत असल्याने शहराचे विकासावर याचा परिणाम होऊन विकासकामे ठप्प झाली आहेत त्या अनुषंगाने महासभेत प्रश्न ४४६ विचारुन जकात वसूलीत घट होण्यास कारणीभूत कर्मचारी किती? जकात उत्पन्नात किती टक्केवाढ झाली यास उत्तर म्हणून जकात विभागातील ५ कर्मचा—यांच्या बदल्या केल्या आहेत व त्यामूळे जकात उत्पन्नात ८.९९ टक्के वाढ झाली आहे. व महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदीनुसार दोषी कर्मचा—यावर कारवाई करण्यात येईल असे कळविले आहे.

परंतू आजतागायत जकात वसूलीत वाढ झालेली नसल्याने जकात चोरी होत असून जकात उत्पन्नात घटच होत आहे. यास जबाबदार कर्मचा—यावर कारवाई होणेकरीता व जकात उत्पन्न वाढविणेसाठी उपाय योजना करणेसाठी याविषयावर चर्चा होणेसाठी सादर.

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचक : श्री राजेंद्र चौधरी
अनुमोदक : श्री रमेश चव्हाण

**विषय** : पुरग्रस्त नागरिकांना वाटप करण्यात आलेल्या मदतीची माहिती व त्यावर करण्यात आलेल्या आकडेवारीची माहिती मिळणेबाबत....

उपरोक्त विषयानुसार माहे जूलै, ऑगस्ट, २००५ मध्ये अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमूळे शहरातील बहूतांश भाग पुराचे पाण्यामुळे बाधीत होवून अन्नधान्य कपडालत्ता चिजवस्तू महत्वाचे कागदपत्र यांचे तसेच

अनेक घरे पाण्याखाली जावून पूर्णपणे उध्वस्त होवून तूटलेली आहेत व मोठया प्रमाणात नुकसान होवून जिवित व वित्तहानी झाली आहे. अश्या पुरपरिस्थितीचे वेळी पुरग्रस्त नागरीकांना मदत म्हणुन अन्नधान्य/चादर चटई/औषध उपचार/जेवण इत्यादीचे वाटप करण्यात आले याबाबत केलेल्या खर्चाची माहिती मिळावी म्हणून महासभेत प्रश्न उपस्थित केला होता. परंतू प्रशासनाने केलेल्या खर्चाची आकडेवारी उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी सदरील विषयावर चर्चा होवून आकडेवारी (खर्चाची रक्कम) उपलब्ध व्हावी ही विनंती.

---

मा. महापौर :— सदरच्या दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

मा. सचिव :— प्रशासनाकडुन आयत्यावेळचे विषय म्हणुन पुढील प्रस्ताव प्राप्त झाले आहेत आपली मान्यता असल्यास ते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेता येतील.

आयत्या वेळचा विषय क्र. १:— कुमारी सुषमा एन. पाटील यांना ''वर्ल्ड वेट लिफटिंग चॅम्पीयनशिप''साठी स्वीडन येथे जाण्यासाठी महापालिकेतर्फे आर्थिक मदत देणे.

आयत्या वेळचा विषय क्र. २ :— पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बनविणेबाबत केलेला करारनामा रद्द करुन ठिकाणे अन्य संस्थेस वितरीत करणे.

आयत्या वेळचा विषय क्र. ३ :— स्थानिक स्वराज्य संस्थेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या असलेल्या पाणीपट्टी तसेच कर्जाची थकबाकी परतफेडीबाबतची वाढीव मुदतीत निर्भय योजनेनुसार भरुन अनुक्रमे विलंब आकार लाभ घेणे.

आयत्या वेळचा विषय क्र ४:—श्री. छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी, उल्हासनगर—४ या संस्थेस शैक्षणिक उद्देशांसाठी उल्हासनगर—४ येथिल भुखंड क्र. २४९, २५० देणे.

आयत्यावेळच्या विषयावर कोणाची काही आपत्ती आहे काय?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, आयत्यावेळचे जे विषय आहेत ते एवढे तातडीचे विषय नाहीत ते नियमित सभा सुचनेवर का आणले जात नाहीत? शिवसेना—भाजपा कडुन नेहमी ही मागणी केली जाते. एखादा महत्वपुर्ण विषय असेल जो तातडीने करणे आवश्यक असेल तो आयत्या वेळचा विषय म्हणुन घेतला तर ठिक आहे परंतु आज जे विषय आले आहेत त्यामध्ये कोणताही महत्वपुर्ण विषय नाही. एक विषय सोडला तर इतर विषय तातडीचे नाहीत. त्यामुळे ते नियमित सभा सुचनेवर आणावेत अशी आमची मागणी आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— एका मुलीस वेट लिफटिंग च्या स्पर्धेसाठी जायचे आहे तो विषय आयत्यावेळचा म्हणुन घेण्यास हरकत नाही. परंतु इतर विषय नियमित सभा सुचनेवर आणले तर योग्य होईल. कारण २४९ व २५० क्रमांकाचा भुखंड कोणता आहे ते कोणालाही माहिती नाही. तो विषय आयत्यावेळमध्ये आणण्याची काय गरज आहे? तो भुखंड कुठे जाणार आहे काय? तो त्या संस्थेच्याच ताब्यात आहे. एक महिन्याने काय फरक पडणार आहे?

मा. सचिव :— हे सर्व विषय प्रशासनातर्फे आले आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— हे विषय जर नियमित सभा सुचनेवर घेतले तर उल्हासनगर शहरावर कोणते मोठे संकट येणार आहे? त्यामुळे हे दोन विषय नियमित सभा सुचनेवर यायला हवेत. ज्या मुलीला मदत दयायची आहे तो विषय स्विकृत केला जावा.

मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :— मा. महापौर महोदया, माझी आपणांस व सर्व सदस्यांना विनंती आहे की, सुलभ शौचालयाचा जो मुद्दा आहे त्यामध्ये फक्त संस्था बदलायची आहे. आज त्या शौचालयाची

अवस्था एवढी खराब आहे की, तेथे कुणाचाही अपघात होवु शकतो. आपण सर्वांनी एक दिड वर्षापूर्वी तो विषय मंजुर केला होता, जर यावर विचार केला तर योग्य होईल, धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी:—** मा. महापौर महोदया, यावेळी आपण विषय घेण्यास मान्यता दिलेली आहे. तर आता ते विषय घ्यावेत पुढील वेळी यावर विचार करण्यात यावा व विरोधी पक्षातील सदस्यांचा विचार घेण्यात यावा.

**मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—** मा. महापौरजी, आयत्यावेळचे विषय म्हणुन जे चार विषय आणले आहेत, त्यापैकी पहिला विषय समाविष्ट करुन इतर विषय नियमित सभा सुचनेवर आणले तर योग्य होईल. ते विषय काही तातडीचे नाहीत.

**मा. सचिव :—** सर्व विषयांचा समावेश करावा का?

**काही सदस्य :—** सर्व विषय घ्यावेत.

**मा. महापौर :—** वरील चारही विषयांचा आयत्यावेळचे विषय म्हणुन सभा सुचनेत सर्वानुमते समाविष्ट करण्यात येत आहेत. तसेच ही सभा पुढील सुचना मिळेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १२.५० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–१६ डिसेंबर, २००५

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १६/१२/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक १९.११.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदरची सभा स्थगित झाल्याने ही सभा शुक्रवार दिनांक १६.१२.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | २७. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ४. | श्री. सोनवणे नथु | २८. | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | २९. | श्री. राज असरोंडकर श्रीमती माने किरण |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना | ३०. | श्री. जाधव प्रशांत |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३१. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्री. वाघे शामु | ३२. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ३३. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. एडके गणपत गोविंद | ३५. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १२. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३६. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १३ | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३७. | श्री. ठाकुर अशोक |
| १४. | श्री. उमाप रामदास | ३८. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १५. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ३९. | श्री. पंजाबी नारायण |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४०. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४१. | श्री. साधवानी मनोज |
| १८. | श्री. पवार नाना | ४२. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| १९. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ४३. | श्रीमती भटिजा कोमल |
| २०. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ४४. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २१. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ४५. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २२. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ४६. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २३. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ४७ | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २४. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ४८. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २५. | श्री. साधवानी मोहन | ४९. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २६. | श्री. सतरामदास जेसवानी | ५०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, २. श्री. दिलीप गायकवाड, ३. श्री. मुलचंदानी महेंद्र, ४. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ५. श्री. जग्यासी राजु, ६. श्रीमती खांडेकर प्रेमा, ७. श्री. निकम शांताराम, ८. श्री. टाले प्रमोद, ९. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, १०. श्रीमती साधवानी जया, ११. श्रीमती भावना खिलनानी, १२. श्री. रमेश चव्हाण, १३. श्रीमती सुर्वे जयश्री, १४. श्रीमती अनिता गुप्ता, १५. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १६. श्रीमती वसिटा बेबी, १७. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे, १८. श्री. अंकुश म्हस्के, १९. श्री. भालेराव गौतम, २०. श्री. रामरख्यानी मोहनदास, २१. श्रीमती किरण माखिजा, २२. श्री. जयसिंघानी अनिल, २३. श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना, २४. श्रीमती निना नाथानी, २५. श्रीमती छाब्रिया भारती, २६. श्रीमती करोतिया मालती, २७. श्रीमती मीनु राजकुमार दासानी,

२८. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २९. श्रीमती दासानी मिनु, ३०. श्री. हरदास माखिजा, ३१. श्री. राजेश वदारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

दुपारी १२.२० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—. महापौरजी, आज या बैठकीला आयुक्त साहेब उपस्थित नाहीत, तसेच उपायुक्त(मुख्यालय) देखिल उपस्थित नाहीत. त्यामुळे ही बैठक तहकुब करुन १९/१२/२००५ रोजी ११. ३० वाजता ठेवण्यात यावी. त्यानंतर लगेच १२.०० वाजताची सभा चालु करावी.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौरजी, श्री. मोहन बेहरानी यांची कॉंग्रेस पक्षाच्या गटनेता पदी नियुक्ती करण्याबाबतचे पत्र मी देत आहे. कृपया यास मान्यता दयावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— आता ही बैठक स्थगित करुन १९ तारखेला ११.३० वाजता ठेवावी तसेच त्यानंतर लगेच दुसरी बैठक सुरु करावी. दरम्यानच्या कालावधीत सर्व सदस्यांसाठी भोजनाची व्यवस्था देखील करावी.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— मा. महापौरजी, आजची बैठक स्थगीत करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी माझे आपल्याला निवेदन आहे की, या सभागृहात ज्या मुद्दयांवर चर्चा होते, निर्णय होतो त्यावर प्रशासन अंमलबजावणी करीत नाही अथवा करुन घेत नाही. यामुळे सभागृहाचा अवमान होत आहे. मा. महापौरजी, हा असा मुद्दा आहे ज्यावर संपुर्ण सभागृहाचे एकमत झाले होते. काही दिवसांपुर्वी सफाई कामगारांनी महापालिकेच्या बाहेर उपोषण केले होते. ज्यावेळी ॲन्थोनी वेस्ट हॅडलिंगच्या कामगारांनी बाहेर उपोषण केले होते त्यावेळी महासभेची बैठक सुरु होती. त्यावेळी आपण निर्णय दिला होता व त्यानंतर आयुक्तांच्या दालनात बैठक झाली होती. तेव्हा ठेकेदारांनी सर्व मागण्या मान्य केल्या होत्या. परंतु त्यावर अंमलबजावणी झाली नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, सत्ताधारी पक्षाचे गटनेते जर येथे चर्चा करीत असतील तर बैठक स्थगीत करायला नको असे मला वाटते. कारण येथे कामे थांबलेली आहेत. तरी देखील बैठक वारंवार स्थगीत करण्यात येत आहे. जर गटनेता एवढया गंभीर विषयावर चर्चा करीत असतील तर बैठक स्थगीत करायला नको.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— मा. महापौर महोदया, आपण प्रशासनाला निर्देश दयावेत की, ॲन्थोनी ठेकेदाराने ज्या मागण्या मान्य केल्या होत्या त्यावर त्वरीत कारवाई करावी. असे आमचे म्हणणे आहे, धन्यवाद.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— मा. महापौरजी, तुम्ही १९ तारखेला जी महासभा ठेवणार आहात त्यामध्ये आपण आयुक्तांना व इतर अधिका—यांना उपस्थित राहण्याबाबत आदेश दयावेत.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :— मा. महापौरजी, श्री. मोहन बेहरानी यांच्या गटनेते पदाबाबत घोषणा केली तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदया, यापुर्वीची सभा देखिल स्थगीत झाली होती आज देखिल स्थगीत होत आहे. मागील ५ महिन्यापासुन एकाही सभेचे कामकाज व्यवस्थित चालले नाही. वारंवार सभा स्थगित करणे हे या शहरासाठी योग्य नाही. यापुर्वी देखील आपण आश्वासन दिले होते की, सभा स्थगित केली जाणार नाही. मग आज आयुक्त व उपायुक्तांची सबब का सांगितली जात आहे? याचा अर्थ शासनाची प्रशासनावर पकड नाही असा होतो.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— सबब सांगतो असे कसे काय म्हणतात? जी वस्तुस्थिती आहे ती सांगत आहोत. जर आयुक्तच उपस्थित नसतील तर काय करणार?

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजुन येत नव्हते.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :– जर अधिका–यांना वेळ नसेल तर नगरसेवकांकडे फार वेळ आहे असा अर्थ होत नाही. त्यांनी बैठकीला यायला हवे.

मा. सचिव :– कृपया लक्ष दयावे. कॉंग्रेस जिल्हा अध्यक्षांकडुन मा. महापौरांना एक पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रान्वये श्री. मोहन बेहरानी यांची कॉंग्रेस गटनेता पदी नियुक्ती केल्याबाबत कळविले आहे. मा. महापौरांनी देखील त्यास स्विकृती दिलेली आहे.

मा. महापौर :–आपल्या सर्वानुमते ही सभा दिनांक १९/१२/२००५ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

मा. सचिव :–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी १२.४० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–१९ डिसेंबर, २००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१२/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरुवार दिनांक १९.११.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सदरची सभा स्थगित करण्यात आल्याने ही सभा शुक्रवार दिनांक १६.१२.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदर सभेत पुन्हा स्थगित झाल्याने ती सभा सोमवार दिनांक १९.१२.२००५ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३७. | श्री. राज असरोंडकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३८. | श्रीमती माने किरण |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ३९. | श्री. रमेश चव्हाण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४०. | श्री. जाधव प्रशांत |
| ७. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४१. | श्री. जाधव सुरेश |
| ८. | श्रीमती भावना रामचंदानी | ४२. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ९. | श्री. वाघे शामु | ४३. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती मोकल सीमा | ४४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. दिलीप गायकवाड | ४५. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४६. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १३ | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४७ | श्री. पाटील विश्वनाथ |
| १४. | श्री. एडके गणपत गोविंद | ४८. | श्री. भालेराव गौतम |
| १५. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४९. | श्री. ठाकुर अशोक |
| १६. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ५०. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १७. | श्री. उमाप रामदास | ५१. | श्री. अंकुश म्हस्के |
| १८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५२. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १९. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५३. | श्री. पंजाबी नारायण |
| २०. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५४. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २१. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५५. | श्री. साधवानी मनोज |
| २२. | श्रीमती गुप्ता अनिता | ५६. | श्रीमती भटिजा कोमल |
| २३. | श्री. पवार नाना | ५७. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २४. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५८. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २५. | श्री. जग्यासी राजु | ५९. | श्रीमती निना नाथानी |
| २६. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ६०. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २७. | श्री. निकम शांताराम | ६१. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २८. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६२. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २९. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६३. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३०. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६४. | श्रीमती करोतिया मालती |
| ३१. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६५. | श्रीमती दासानी मिनु |
| ३२. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६६. | श्री. इदनानी राजु |
| ३३. | श्री. सतरामदास जेसवानी | ६७. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६८. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३५. | श्रीमती खिलनानी भावना | ६९. | श्री. राजेश वदारिया |
| ३६. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. टाले प्रमोद, २. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, ३. श्री. साधवानी मोहन, ४. श्रीमती साधवानी जया, ५. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, ६. श्रीमती वसिटा बेबी, ७. श्री. पुरस्वानी जमनादास, ८. श्री. रामरख्यानी मोहनदास, ९. श्रीमती किरण माखिजा, १०. श्री. जयसिंघानी अनिल, ११. श्री. हरदास माखिजा, १२. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

दुपारी १२.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>मा. महापौरजी, महासभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर आपल्या महापालिकेत नव्याने आलेल्या आयुक्तांचे संपुर्ण सभागृहाच्या वतीने, मा. महापौर, उपमहापौर, तसेच सचिव व सर्व अधिका—यांच्या वतीने मी स्वागत करतो.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात. यावेळी दुपारचे १२ वाजुन १५ मिनिटे झाली आहेत. प्रश्नोत्तरे.........

<u>मा. सचिव :—</u> प्रश्न क्र. ४५३ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा असून यावेळी त्या सभागृहात उपस्थित नसल्याने त्यांचा प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यांत येत आहे.

<u>प्रश्न क्र. ४५३ :—</u> सन २००२ ते २००६ मध्ये करण्यात आलेल्या कामांची व निधींची माहिती मिळणेबाबत.

२००२ ते २००६ पर्यंत उल्हासनगर महानगरपालिके अंतर्गत केलेल्या नागरी सुख सुविधा व सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा व विद्युत व्यवस्थेसाठी मा. खासदार, मा. आमदार, महापालिका जनरल निधी, प्रभाग समिती निधी, महापौर, उपमहापौर निधी दुर्बल घटक निधी, दलित वस्ती निधी व अन्य निधी प्रती वर्षी किती उपलब्ध वा मंजूर करण्यात आले. सदर निधीतून कोणती कामे करण्यात आली? कामाचे नाव, ठिकाणी, प्रभाग क्र., कामाची रक्कम, सदर कामापोटी अदा करण्यात आलेल्या बिलाची रक्कम, थकित बिलाची रक्कम, कामाची मुदत, कामाची सद्यस्थिती याची सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

<u>उत्तर :—</u> मागविण्यात आलेल्या विविध विभागांची विविध माहिती संबंधीत विभागात उपलब्ध आहे.
मागविण्यात आलेली माहितीचे परिमाण अति जास्त असून मा. सदस्या यांस विनंती आहे की, संबंधीत विभागात भेट देवुन माहितीचे अवलोकन करावे.

<u>मा. सचिव :—</u> प्रश्न क्र. ४५४ हा श्री. राज असरोंडकर यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४५४ :—</u> उल्हासनगर महानगरपालिकेने सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा, विद्युत, घनकचरा व भांडार विभागाशी संबंधीत कंत्राटदारांना चुकते करावयाच्या बिलांची प्रत्येकी एकूण रक्कम किती?
अ) १ एप्रिल, २००५ ते ३१.८.२००५ याकालावधीत कंत्राटदारांना चुकती केलेली विभागवार एकूण रक्कम किती?
ब) १.९.२००५ ते २३.१०.२००५ या कालावधीत ज्या कंत्राटदारांना धनादेश देण्यात आले आहेत, त्यांची नावे काय? (कृपया रक्कमेसह यादी दयावी.)
क) कंत्राटदारांची थकलेली बिले चुकवण्यासाठी प्राप्त परिस्थितीत नेमक्या कोणत्या कंत्राटदारांना बिले द्यावीत, याबाबत प्रशासनाचे काय धोरण आहे?
ड) कंत्राटदारांची बिले आयुक्त कार्यालयात जमा करुन लेखा विभागातून आलेल्या ''चिठ्ठी संदेशा'' नंतरच विशिष्ट कंत्राटदारांची बिले लेखा विभागात पाठविण्यात येतात, हे खरे आहे काय?

<u>उत्तर :—</u> प्रपत्र ''अ'' मध्ये नमुद केल्याप्रमाणे.
यादी सोबत जोडत आहे.
विभागवार कामानुसार प्राधान्यक्रम ठरवुन देयक अदा करण्याचे विचाराधीन आहे.
नाही.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :–</u> मा. महापौर महोदया, हा जो प्रश्न मी विचारला आहे, ठेकेदारांची जी देयके आहेत आणि ती अदा करण्याची जी पध्दती आहे त्याच्याशी संबंधीत हा प्रश्न आहे. या प्रश्नाबाबत जी माहिती दिली आहे त्यानुसार एक गोष्ट स्पष्ट होत आहे. महानगरपालिकेची जी आर्थिक स्थिती आहे तिच्याशी सबंधित हा प्रश्न आहे. महानगरपालिकेतील विविधी विभागांच्या कामकाजाची जी पध्दती आहे, त्याकडे लक्ष वेधणारा हा प्रश्न आहे. लेखा विभाग हा एक महत्वपुर्ण विभाग आहे. आमच्या आर्थिक परिस्थितीचे पुर्णपणे तो विभाग नियंत्रण करतो. या विभागावरुन महापालिकेची आर्थिक स्थिती कशी आहे ती समजुन येते. देयक अदा करण्याचे कोणतेही धोरण आमच्या येथे प्रशासनाने ठरविलेले नाही. त्यामुळे ब–याचशा अनियमितता समोर येत आहेत. या प्रश्नातील चौथ्या क्रमांकाच्या प्रश्नाद्वारे मी विचारणा केली आहे की कंत्राटदारांची बिले आयुक्त कार्यालयात जमा करुन लेखा विभागातून आलेल्या ''चिठ्ठी संदेशा'' नंतरच विशिष्ट कंत्राटदारांची बिले लेखा विभागात पाठविण्यात येतात, हे खरे आहे काय? त्याचे उत्तर दिले आहे, नाही. हे स्वभाविकच आहे कारण की प्रशासन हे मान्य करणार नाही की अशा प्रकारची काही पध्दत चालत आहे किंवा चालत नाही? आपले आयुक्त साहेब आता नविनच आले आहेत त्यांनी नव्यानेच येथिल पदभार स्विकारला आहे. मला असे वाटते की, या प्रश्नाच्या माध्यमातुन मा. महापौरांनी प्रशासनाला आदेश दयावेत की देयके अदा करण्याची जी पध्दती आहे, कोणत्या विभागाला किती प्राधान्य दयायचे? महापालिकेचा विद्युत विभाग जो आहे त्या विभागाने सर्वात प्रथम महापालिकेस आय.एस.ओ. हे प्रमाणपत्र मिळवून दिले आहे. परंतु त्या विभागाच्या कामांची देयके वेळेवर अदा होत नसल्याने बरीचशी कामे प्रलंबित आहेत. हा प्रश्न विचारण्याचे जे कारण होते, ते मी या सभागृहासमोर ठेवू इच्छितो. कॅम्प नं. ५ येथे आपला पाणी पुरवठा विभागाचा एक पंप हाऊस आहे. येथे पंपिंग करण्याचे दिवसभर जे काम चालते त्याच्या लगतच्या परिसरात एक ट्रान्सफार्मर आहे त्यामधुन इलेक्ट्रिकचा थेट सप्लाय त्या पंप हाऊसला दिलेला आहे. आणि तेथे अतिशय धोकादायक अशी स्थिती आहे. कोठेही कधीही विद्युत शॉक लागुन एखादा अपघात होवु शकतो. तेथे कुणीही माणुस शॉक लागुन मरु शकतो. असेही होवू शकते की, आता आम्ही येथे महासभेत बोलत असतांना तेथे शॉक लागुन एखादा माणुस मरु शकतो. अशा प्रकारची स्थिती आहे आणि तिचा मी गेल्या ५–६ महिन्यापासुन पाठपुरावा करत आहे. तर याबाबत मला उत्तर असे मिळत आहे की, कुण्या ओम इंडस्ट्रिजकडे या पंप हाऊसच्या पंपींगचे व देखभाल, दुरुस्तीचे काम सोपविण्यात आलेले आहे. त्यास देयक रक्कम न मिळाल्यामुळे तो हे काम करत नाही आहे. या नुसार प्रश्न असा निर्माण होतो की, पंपींग हाऊसमधील एखादे महत्वाचे दुरुस्तीचे काम आहे. व ते काम न केल्यामुळे एखादा अपघात होवून जिवित हानी होण्याची शक्यता आहे. आमची मशिनरी यंत्रणा जर बिघडत असेल तेथील पंपींग स्टेशनचे काम पुर्णपणे कोलमडुन पडत असेल आमची पाणी पुरवठयाची यंत्रणा पुर्णपणे कोलमडुन पडत असेल तर यापेक्षा अधिक अग्रक्रमाची एखादी गोष्ट या महानगरपालिकेच्या प्रशासनासमोर असेल किंवा नसेल हे मला माहित नाही हा एक अग्रक्रमाचा मुद्दा होता. व त्या ठेकेदाराचे एक–दोन लाखाचे देयक न दिल्यामुळे हे काम होत नाही. कधी–कधी आम्ही गटारावरील झाकणांची मागणी करतो तेव्हा असे सांगितले जाते की, ठेकेदारास देयक अदा केले नसल्याने तो गटारांवरील झाकणे पुरवत नाही. काही ठिकाणी सार्वजनिक शौचालयाचे काम अतिशय महत्वाचे असते. त्याबाबत सुध्दा असे माहित पडते की, ठेकेदारास देयक रक्कम अदा न केल्याने त्या सार्वजनिक शौचालयाचे काम होत नाही. तर प्रशासनाने याबाबत ठरविले पाहिजे. सर्व कामांना, सर्व ठेकेदारांना एकाच तराजूत तोलता कामा नये. जेथे निकडीचे काम आहे, तातडीचे काम आहे, जेथे काम होणे अतिशय गरजेचे आहे, अशा कामांना अग्रक्रम देवुन प्रशासनाला जे योग्य वाटेल, अशा प्रकारचे निश्चित एक धोरण लेखा विभागाने देयक अदा करण्याबाबत ठरविले पाहिजे. या धोरणामध्ये पारदर्शकता असली पाहिजे. व ज्या प्रकारच्या अनियमितता आमच्या ऐकण्यामध्ये आल्या आहेत कारण की, ब–याचशा गोष्टी येथे उघडपणे बोलल्या जावु शकत नाहीत. कारण की, त्याबाबत आमच्या हातात कोणतेही पुरावे नाहीत. म्हणुन पुरावे नसल्यामुळे बोलणेही योग्य नाही. ब–याच अनियमितता चालतात ही गोष्ट बरोबर आहे त्या थांबविल्या पाहिजेत. कारण की, त्या विभागाशी आमच्या महानगरपालिकेची पुर्ण आर्थिक यंत्रणा संबंधीत आहे. यासाठी मी मा. महापौरांच्या माध्यमाने आयुक्त साहेबांना ही विनंती करतो व अपेक्षा व्यक्त करतो की, महापौर महोदयांनी याबाबतीत काहीतरी

निश्चित स्वरुपाचे आदेश दयावेत. प्रशासनाने निश्चित असे धोरण ठरवावे. त्यामध्ये पारदर्शकता असावी.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी जो प्रश्न विचारला आहे तो अगदी बरोबर आहे. जी महत्वाची कामे आहेत त्यांच्या बाबतीत देयक रक्कम न मिळाल्याने तसेच लेखा विभागाच्या या बाबतच्या निष्काळजीपणामुळे पुर्ण यंत्रणा दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. कॅम्प नं. ५ येथिल जे पंपींग स्टेशन आहे ते धोकादायक स्थितीत आहे. विद्युत पुरवठयातील कमतरतेमुळे ब—याचशा ठिकाणी लोड शेडिंग होत आहे. तेथे डबल फिडरची आवश्यकता आहे. परंतु लेखा विभागाकडुन याकामी प्रतिसाद मिळत नसल्यामुळे दिवसेंदिवस स्थिती खराब होत चालली आहे. भुयारी गटार योजना विस्कळीत झाली आहे. ड्रेनेजची गाडी नाही, देयके वेळेवर अदा केली जात नाहीत. तर या गोष्टींकडे लक्ष दिले जावे व जेथे जेथे डबल फिडरची आवश्यकता आहे तेथे याकामी त्वरीत व्यवस्था केली जावी. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सचिव साहेब आमच्या प्रभागामध्ये नगरसेवक निधीमधून चार बैठकीचे शौचालय बांधण्याचे काम मंजुर झाले आहे. ठेकेदारास देयक रक्कम न अदा केल्यामुळे, पुर्ण दोन वर्ष पाठपुरावा केल्यानंतरच सुध्दा नगरसेवक निधीतुन शौचालयाचे काम होत नाही. ठेकेदारास फार थोडी देयक रक्कम अदा केल्यास नगरसेवक निधीतुन जी काही कामे होवु शकतील. तर याबाबीकडे जरा लक्ष दिले जावे.

**मा. उप—महापौर श्री. विनोद तलरेजा, मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे व श्री. लाल पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मा. महापौरजी, या अगोदर शहरामध्ये जेवढी काही कामे झाली आहेत, प्रगतीपथावर आहेत, चालु आहेत, ती सर्व कामे पुर्ण होईपर्यंत, उल्हासनगरला अतिशय सुंदर बनविले आहे? आहे त्या स्थितीत सजविले तर खुपच सुंदर होईल. लोकांना फार मोठी स्वप्ने दाखविली जातात, हे करु ते करु. फार मोठमोठी कामे मंजुर केली जातात. परंतु प्रत्यक्षात काहीच होत नाही. ३३ रस्त्यांचे जे काम झाले ते अतिशय चांगले काम झाले. त्यांची आपण वेळोवेळी दुरुस्ती केली तर खुप चांगले होईल. या रस्त्यांची चांगली देखभाल दुरुस्ती केली तर असे वाटेल की, जसे काही आम्ही मुंबई मध्ये फिरत आहोत. तर आता जी आवश्यक कामे आहेत जसे की सार्वजनिक शौचालय या व्यतिरिक्त दुसरे कोणतेही प्रस्ताव मंजुरीस आणले जावु नयेत, शौचालयांची जी कामे मंजुर झाली आहेत, त्याचा पाठपुरावा केला नंतर सुध्दा कामे होत नाहीत. शौचालयांची जी कामे प्रलंबित आहेत तसेच आमच्या हक्काचा जो नगरसेवक निधी आहे त्यांची कामे केली तरी आम्ही खुश होवु. आपणाकडुन फार मोठया अपेक्षा ठेवत नाहीत. लोकांना चॉकलेट देवु नये की, आम्ही हे करु ते करु. आहे त्यामध्ये आम्ही खुप समाधानी आहोत. शहरवासी सुध्दा समाधानी आहेत. आम्हांला ना मैदाने हवी आहेत ना उद्याने हवी आहेत, कारण की, आमच्याकडे तेवढा वेळ सुध्दा नाही. जे आहे तेच व्यवस्थित करा. देयके अदा करा. आम्हांला काम करु दया आमचा उरला सुरलेला बारा महिन्याचा कालावधी चांगला जावो. लोकांचे आम्हांला शुभआर्शिवाद मिळावेत. शिव्या—शाप मिळु नयेत. एवढेच बोलतो व सर्व ठेकेदारांची देयके अदा करा. त्यानंतरच दुस—या कामाचा विचार करा. जयहिंद जय महाराष्ट्र ।

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— सन्माननिय महापौरजी, मा. उपमहापौर, सन्माननिय आयुक्त, हा जो महत्वाचा विजेशी संबंधीत प्रश्न श्री. राज असरोंडकर यांनी उपस्थित केला आहे. खरोखरच तो अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. माझ्या प्रभागातील काही असुविधा मी आपल्या निदर्शनास आणुन देत आहे. विद्युत विभागाला निधी पुरविल्या न गेल्याने निर्माण झालेल्या आहेत. मी गेल्या वर्षभरापासुन विद्युत विभागाला महिन्यातुन एक पत्र सातत्याने लिहित आहे. माझा प्रभाग हा गलिच्छ वस्तीचा प्रभाग

असल्याने त्या विभागात काही ठिकाणी सार्वजनिक दिवाबत्तीसाठी विजेचे खांब उभारायचे आहेत. सोडीयमचे दिवे लावायचे आहेत. त्याची आपणाकडुन व्यवस्था करण्यात यावी. अशा प्रकारचे पत्र दिल्यानंतर आम्हांला असे उत्तर दिले जाते की, आपण आपल्या नगरसेवक निधितुन हे काम करुन घ्यावे. निधी आमच्याकडे उपलब्ध नाहीत. किंवा हे काम आम्ही करु शकत नाही. अशी अनेक पत्रे आली आहेत मी तुम्हांला दाखवु शकेन. परंतु सध्या ती माझ्याकडे उपलब्ध नाहीत. मुळातच आम्हां नगरसेवकांना नगरसेवक निधी कमी मिळालेला आहे. त्यातुनही जर नगरसेवक आपल्या निधीमधुन सार्वजनिक दिवाबत्तीसाठी विजेचा खांब उभारायचे काम करु लागला तर इतर जशी नाल्याची कामे आहेत, पायवाटा आहेत, अशा प्रकारची कामे गलिच्छ वस्त्यांमध्ये आम्ही करु शकणार नाहीत. म्हणुन मी या ठिकाणी श्री. राज असरोंडकर यांनी जो मुद्दा मांडला आहे. ठेकेदारांना लवकरात लवकर देयक रक्कम अदा करण्याची व्यवस्था करावी. गलिच्छ वस्त्यांमध्ये सोडियमचे दिवे लावण्याची जी कामे प्रलंबित आहेत ती लवकरात लवकर पुर्ण करावीत अशी मी आपणाला या ठिकाणी विनंती करतो धन्यवाद.

**मा. महापौर :–** सन्माननिय सदस्यहो, एक पत्र आमच्याकडे आले आहे, ते सचिव साहेब आपणांस वाचुन दाखवतील.

**मा. सचिव :–** पत्र अशाप्रकारे आहे,

मा. महापौर
उल्हासनगर महानगरपालिका
उल्हासनगर–३.

विषय :– महानगरपालिकेतील कॉंग्रेस गटनेता नियुक्ती बाबत.

महोदया,

उल्हासनगर कॉंग्रेस जिल्हा अध्यक्ष पदावर आमच्या येथील नोंदी अनुसार श्री. हरदास माखिज हे नियुक्त आहेत असे असतांना श्री. जयराम लुल्ला यांनी अध्यक्ष या नात्याने उल्हासनगर महापालिकेतील कॉंग्रेस गटनेता पदाबाबत पत्र दिले आहे. त्यानुसार आपण श्री. मोहन बेहरानी यांच्या गटनेता पदावरील नियुक्तीस मान्यता दिली आहे असे या कार्यालयास कळले आहे. वस्तुस्थिती वेगळी असून उल्हासनगर कॉंगेस जिल्हा अध्यक्ष पदाची नियुक्ती अदयापही विवादीत असून आज पावेतो श्री. हरदास माखिजा हेच जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्त आहेत. श्री. जयराम लुल्ला यांच्या बाबतीत निर्णय झालेला नाही. त्यामुळे श्री. लुल्ला यांनी दिलेले पत्र गृहित धरण्यात येवु नये. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेतील कॉंग्रेस गटनेता पदी श्री. अशोक ठाकुर यांची झालेली नेमणुक कायम ठेवुन आपण आपला पुर्वीचा निर्णय जसा आहे तसा राखुन ठेवावा असे आपणांस सुचित करण्यात येत आहे.

आपली,

प्रभा राव
प्रदेश अध्यक्षा
प्रदेश कॉंग्रेस कमिटी

**मा. महापौर :–** सन्माननिय सदस्यहो, या अगोदरचे जे पत्र आहे तेच कायम राहिल तसेच या अगोदरचा जो प्रश्न होता त्यावर सभागृहातील सर्व सदस्यांनी प्रदिर्घ चर्चा केली. परंतु शेवटी सर्व चर्चा येवुन जी ठेपते ती महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीवर. महापालिकेच्या यापुढील आर्थिक स्थिती बाबत चर्चा केली जाईल. आयुक्त साहेबांना याबाबतीत आदेश दिले जातील आर्थिक स्थिती बाबत

काय निर्णय घ्यायचे तसेच नगरसेवक निधीची जी कामे आहेत तसेच शहरातील मुख्य मुख्य जी कामे आहेत जी अतिशय जरुरीची आहेत जी टाळली जावु शकत नाहीत, ती झाली पाहिजेत. तसेच आमचे नविन आयुक्त म्हणुन जे श्री. डी.एस. पाटील साहेब आलेले आहेत, सर्व ८१ सदस्य त्यांचे स्वागत करत आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— नविन आलेले आयुक्त श्री. डी.एस. पाटील साहेब, यांचे आम्हीही स्वागत करतो.

मा. महापौर :— आपणावतीनेही त्यांचे स्वागत केले , सर्वांच्या वतीने स्वागत केले.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आता सभागृह नेते बोलले, विरोधी पक्ष नेता बोलला नाही ही एक औपचारीकता आहे. ती पुर्ण करतो. नाहीतर अर्धवट होईल?

मा. महापौर :— नाही, नाही, एकच गोष्ट आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— आपण एवढे मोठे मन केले आम्हांलाही करु दया.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—मा. महापौरजी, जनादेश चॅनलचे हे जे व्हिडीओ चित्रीकरण चालु आहे हे चित्रीकरण यापुर्वी पहिल्यांदा चालु करण्याच्या वेळेस आपण म्हटले होते की, सर्व सदस्यांवर प्रकाश ज्योत टाकला जाईल सभागृहाच्या कामकाजाची वस्तुस्थिती व पारदर्शकता दाखवीली जाईल. नि:पक्षपातीपणे हा चॅनल सर्व शहरास दाखविला जाईल. परंतु प्रत्यक्षात असे होत नाही. आम्ही जे काही बोलतो ते न दाखविता आपले सदस्य जे काही बोलतात तेच या चॅनलवरुन दाखविले जाते.

मा. महापौर :— महासभेतील असा एखादा मुद्दा आपण दाखवुन दया, ज्यामध्ये फक्त सत्ताधारी पक्षालाच दाखविले आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—मा. महापौर महोदया, मागील महासभेत विकास नियंत्रण नियमावलीला शिवसेना—भाजपा या विरोधी पक्षातील सदस्यांनी विरोध का केला? हे दाखविले नाही. विकास नियंत्रण नियमावलीला शिवसेना—भाजपाच्या सदस्यांनी विरोध केला एवढेच दर्शविले. त्याचे कारण काय होते ते दाखविले नाही. सचिव साहेब आपल्या निदर्शनास ही गोष्ट आणुन देत आहे या चित्रीकरणाचा वारंवार दुरुपयोग केला जात आहे. एका राजकीय पक्षाचे हत्यार, शस्त्र म्हणुन याचा वापर केला जात आहे. महासभेने यास परवानगी देवु नये.

**मा. सदस्य श्री. संजय बठिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— नाहीतर या चॅनलसाठी चित्रिकरण केले जावु नये.

मा. महापौर:— नाही त्या अगोदर आपल्या विनंती नुसार आपला जो चॅनल आहे त्याला सुध्दा चित्रीकरणासाठी परवानगी दिली आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— दोन्ही बंद करा. कोणताही नको आहे. सभेचे कामकाज जर दाखवत असतील तर सर्व कामकाज दाखवा.

मा. महापौर :— जसे आपण म्हणता की, एकतर्फी बातम्या दिल्या जातात तर मी आपणांस सांगु इच्छिते की, दोन दिवसापुर्वीच एका बातमीकडे लक्ष गेले होते, श्री. उमाप साहेब बोलत होते. आम्ही जी विकास नियंत्रण नियमावली मंजुर केली तीला ते उलट रुप देत होते. झोपडपट्टयांबाबतीत

नकारात्मक भुमिका घेतली आहे. ही सर्व आपसातील गोष्ट आहे, सर्व शहरास माहित आहे. शिवसेना–भाजपा.....

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– बाहेर आपण काय बोलतात त्याच्याशी काही मतलब नाही. बाहेर कुणी काहीही बोलु शकतो. परंतु सभागृहाच्या कामकाजाचे जे चित्रीकरण केले जाते ते पुर्ण दाखविले पाहिजे.

मा. महापौर :– त्या बातमीमध्ये जो मुद्दा मांडला होता, जे चित्रीकरण दाखविले जात होते ते पुर्णपणे चुकीचे होते.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :– महापौर महोदया, मला बोलु दिले जावे. मा. महापौरजी, झोपडपट्टीच्या विषयाबाबत मी जे काही बोललो ते बरोबर होते. झोपडपट्टीमध्ये चटईक्षेत्र निर्देशांक एकाचा जो चार केला आहे त्यामधुन सव्वा दोनशे चौ. फुट बांधकाम झोपडपट्टी धारकास देण्याचा आपण जो निर्णय घेतला होता त्यास आमचा विरोध होता. साडे चारशे चौ. फुटाची मागणी आम्हां शिवसेना–भाजपाच्या सदस्यांची होती. त्यामध्ये मी कोणतेही चुकीचे असे निवेदन दिलेले नाही. सभागृहात जे झाले तेच मी सांगितले होते. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :–मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त मी शिवसेनेचा गटनेता असल्याने नवीन आलेल्या आयुक्तांचे शिवसेना–भाजपाच्या सदस्यांच्या वतीने स्वागत करतो. आणि थोडयावेळापुर्वी ज्या प्रश्नावर चर्चा चालली होती त्याबाबत मी थोडेसे बोलु इच्छितो. तो प्रश्न खरोखरच शहराच्या विकासाशी निगडित आहे. याबाबत महानगरपालिकेच्या प्रशासनाने काही धोरण ठरविले आहे काय? ते आयुक्तांनी सांगावे किंवा त्या संबंधीत अधिका–यांनी सांगावे. अगोदर आलेली बिले, अगोदर अदा केली जातात की, नंतर अदा केली जातात? यामुळे काय होते की, बरेचसे ठेकेदार आज कामे करण्यास तयार नाहीत. कारण त्यांना वेळेवर देयक रक्कम मिळत नाही. त्यामुळे ते काम करण्यास तयार नाहीत आणि नगरसेवकांनी विनंती करुनही काही ठेकेदार कामे करत नाहीत. याबाबत काही धोरण ठरविले आहे काय? क्रमवारीनुसार देयके अदा करायची की काय याबाबत काही धोरण महापालिका प्रशासनाने ठरविले आहे काय?

**मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल, श्रीमती मालती करोतिया यांनी सभागृहात प्रवेश केला.**

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :– मा. महापौर, उप–महापौर व आयुक्त साहेब, आताच मा. महापौरांनी सांगितले की, आम्ही विरोध करत असतो. प्रत्यक्षात आम्ही कधीच विरोध केलेला नाही. शहराच्या प्रत्येक समस्येच्या वेळेस आम्ही आपणांस सहकार्य देत आलो आहोत. विरोधी पक्ष म्हणुन विरोध करायचा असे काही नाही. चांगल्या कामांसाठी आम्ही सहकार्य करत असतो. आपणांस सहकार्य करण्याची आमची भावना आहे. त्यामुळे आमचा सन्मान ठेवला तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :– आम्ही जी विचारणा केली त्याचे उत्तर मिळेल काय?

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :–मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सध्या चर्चा कशावर चालु आहे ते काहीच कळत नाही. प्रश्नोत्तराचा तास आहे की चर्चेचा तास आहे तेच कळत नाही. कोणीही उठतो आणि बोलत सुटतो. सभागृहाची काही शिस्त आहे की नाही? सन्माननिय सदस्यांना सांगण्यात यावे की, प्रश्न–उत्तराचा तास आहे त्यामुळे प्रश्न–उत्तरावरच बोलावे. दुसरा विषय घेवु नये. ही विनंती आहे.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :– मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, कॉंग्रेस पार्टीच्या वतीने मी आयुक्तांचे स्वागत करतो व अपेक्षा व्यक्त करतो की, शहरामध्ये आवश्यक अशी जी कामे आहेत त्यांच्याकडे लक्ष दिले जावे. व ती लवकरात लवकर चालु केली जावीत.

<u>मा. महापौर :—</u> सचिव साहेब, प्रश्नोत्तरे पुकारली जावीत.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—</u> सचिव साहेब, मी जी विचारणा केली आहे त्याचे उत्तर मिळेल काय?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरांनी खुलासा केलेला आहे. यापूढे मा. आयुक्त खुलासा करतीलच.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—</u>खुलासा तर झाला पाहिजे ना?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> होय, ही लक्षवेधी नाही प्रश्न आहे.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—</u> सदस्य जर प्रश्न विचारतात त्याचे काही तरी उत्तर मिळाले पाहिजे ना? काहीतरी परिमाण दिसून आला पाहिजे ना? सभागृहाला माहित पाहिजे प्रश्न काय आहे आणि सदस्याचे समाधान झाले पाहिजे, नाहीतर प्रश्न विचारुन फायदा काय?

**मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. महापौर :—</u> एकत्रित उत्तर दिले जाईल. एकच मुद्दा आहे.

<u>मा. सचिव :—</u> प्रश्न क्र. ४५५ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ४५५ :—</u> उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत करण्यात येणा—या कामांसाठी अनामत रक्कम ( Security Deposit) घेण्यात येते त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर चर्चा होऊन सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १) सन २००२ ते आजतागायत किती अनामत रक्कम ( Security Deposit) जमा करण्यात आली?

२) सदर अनामत रक्कम ( Security Deposit) किती कालावधीसाठी ठेवण्यात येते?

३) सदर अनामत रक्कम ( Security Deposit) परत कधी करण्यात येते?

४) सन २००२ ते आजतागायत जमा अनामत रक्कम ( Security Deposit) मधून किती रक्कम परत करण्यात आली?

५) ज्या अनामत रक्कमेची ( Security Deposit) मूदत संपली आहे परंतु देणेत आली नाही अशी रक्कम किती? व ठेकेदाराचे / पुरवठादाराचे नाव दयावे.

६) अनामत रक्कम ( Security Deposit) विहित मुदतीत परत न केल्यास यास जबाबदार कोण?

<u>उत्तर :—</u> १) रुपये ८,२४,०२,०००/—

२) निविदेत नमुद कालावधी पर्यंत

३) निविदेत नमुद कालावधी संपल्यानंतर

४) रुपये ८,७२,५८,०००/—

५) यादी सोबत जोडत आहे.

६) महापालिकेचे वित्तीय परिस्थिती समाधानकारक नसल्याने थोडा फार विलंब होतो. तरी सुध्दा लवकरात लवकर सुरक्षा अनामत परत करण्याचा प्रयत्न असतो.

**मा. सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–** उत्तर ठिक आहे.

**मा. सचिव :–** प्रश्नोत्तराचा कालावधी संपला. तीन प्रश्न होते तीनही झाले.

लक्षवेधी सुचना क्र. १.... सुचक व अनुमोदक यांनी आपली लक्षवेधी मांडावी.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** मा. महापौर महोदया, के न्यूज चॅनल वाल्यांनी परवानगीसाठी येथे अर्ज केला आहे.

**मा. महापौर :–** अदयापपर्यंत अर्ज मिळालेला नाही. अर्ज मिळाल्यावर परवानगी दिली जाईल.

लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. धनंजय बोडारे व अनुमोदक आहेत श्री. राजेंद्र चौधरी. लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचक : श्री धनंजय बोडारे

अनुमोदक: श्री राजेंद्र चौधरी

**विषय** : जकात उत्पन्नातील त्रुटीबाबत व त्यामुळे शहराच्या विकासावर होणा–या विपरीत परिणामाबाबत.......

उपरोक्त विषयानुसार लक्षवेधीने आपले लक्ष वेधु इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील जकात वसुली महापालिका कर्मचा–यामार्फत करण्यात येत असून दैनंदिन वसुलीच्या तक्त्यावरुन जकात वसूली कमी प्रमाणात होत असून जकात चोरीचे प्रमाण वाढलेले निदर्शनास येत असल्याने शहराचे विकासावर याचा परिणाम होऊन विकासकामे ठप्प झाली आहेत त्या अनुषंगाने महासभेत प्रश्न ४४६ विचारुन जकात वसूलीत घट होण्यास कारणीभूत कर्मचारी किती? जकात उत्पन्नात किती टक्केवाढ झाली यास उत्तर म्हणून जकात विभागातील ५ कर्मचा–यांच्या बदल्या केल्या आहेत व त्यामूळे जकात उत्पन्नात ८.९९ टक्के वाढ झाली आहे. व महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदीनुसार दोषी कर्मचा–यावर कारवाई करण्यात येईल असे कळविले आहे.

परंतू आजतागायत जकात वसूलीत वाढ झालेली नसल्याने जकात चोरी होत असून जकात उत्पन्नात घटच होत आहे. यास जबाबदार कर्मचा–यावर कारवाई होणेकरीता व जकात उत्पन्न वाढविणेसाठी उपाय योजना करणेसाठी याविषयावर चर्चा होणेसाठी सादर.

---

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** आयुक्त साहेब, यापुर्वी सांगितल्याप्रमाणे तुमचे पुन्हा एकदा स्वागत. अशा परिस्थितीमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्त पदाचा मुकुट तुम्ही सांभाळला आहे. त्याबद्दल पुन्हा पुन्हा अभिनंदन. उल्हासनगरच्या जनतेच्या आणि लोकप्रतिनिधींच्या तुमच्याकडुन असलेल्या अपेक्षा त्या पहिल्या बैठकीमध्ये मिटींगमध्ये मी तुम्हांला सांगितल्याप्रमाणे की, निष्पक्ष कारभार, प्रशासन आणि पारदर्शकता. ..........

**मा. महापौर :–** श्री. बोडारेजी, हा अतिशय महत्वपुर्ण विषय असल्याने कृपया हिंदीत बोलला तर फार बरे होईल.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**आयुक्त, उल्हासनगर मधील जनतेच्या आणि लोकप्रतिनिधींच्या अपेक्षा पुर्ण करतील अशी खात्री त्यांच्याकडुन बाळगु या. पुन्हा एकदा आयुक्तांचे स्वागत करुन महत्वाचा विषय हा आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाची दोनच साधने आहेत. एक मिळकत कर व दुसरा जकात कर,

या दोन साधनांमधुन जवळ जवळ महानगरपालिकेस ७५ टक्के महसुल प्राप्त होतो. आम्हांला असे दिसून येत आहे की, मागील तीन–चार महिन्यापासून या जकात करापासुन जे उत्पन्न मिळायला पाहिजे ते मिळत नाही. यासाठी २६ जुलै रोजी मी आयुक्तांना एक पत्र दिले आहे की, उल्हासनगरमध्ये जे वाहतुकदार आहेत ते चोरी करत आहेत आणि हे प्रशासनाने वारंवार कबुलही केले आहे. वाहतुकदारांची आम्ही यादी दिली आहे. व मागील वर्षी म्हणजे २००४ मध्ये जेव्हापासुन उल्हासनगर महानगरपालिकेने स्वत: जकात वसुली करण्याचे सुरु केले आहे तेव्हापासुन १ एप्रिल पर्यंत किती वसुली झाली आहे? व १ एप्रिलच्या ठरावानुसार जी जकात दरामंध्यक वृध्दी केली आहे, त्यानंतर या वाहतुकदारांनी येथे किती जकात कर भरला आहे त्याची सविस्तर माहिती दिली जावी. आज ५ महिने झाले तरी त्याबाबत प्रशासनाकडुन काहीही माहिती देण्यात आलेली नाही. याचे मला अतिशय दु:ख वाटते. १३.९.२००५ रोजी आम्ही दुसरे पत्र दिले त्यामध्ये लिहिले आहे की, उल्हासनगरमध्ये जकात चोरी व अनाधिकृत बांधकामे होत आहेत याबाबत मा. महापौरांनी बैठक बोलावली आहे, त्याबद्दल महापौरांचे अभिनंदन केले आहे. व प्रशासनाला पुन्हा पत्र दिले आहे की, २५ ते ३० टक्के उत्पन्न वाढले पाहिजे, वसुली वाढली पाहिजे, परंतु असे होतांना दिसत नाही. उलट वसुली कमी होत आहे. यासाठी प्रशासन काय उपाययोजना करणार आहे. त्याचेही काही उत्तर दिले नाही. म्हणुन पुन्हा एकदा महासभेमध्ये ३.१०.२००५ रोजी प्रश्न उपस्थित केला की, याबाबत महासभेत चर्चा केली जावी. प्रशासनाने जकात वसुली व उत्पन्न वाढविण्यासाठी काय–काय प्रयत्न केले. त्यावर प्रशासनाने उत्तर दिले आहे की, उत्पन्न वाढविण्यासाठी मध्यवर्ती जकात नाक्यावर प्रत्येक वाहनाची काळजीपुर्वक तपासणी केली जाते. दुसरे असे लिहिले आहे की, त्या विभागातील ५ कर्मचारी ज्यांच्यावर जकात चोरीचा संशय होता त्यांची बदली केली आहे. आणि त्यामुळे ८.९० टक्के उत्पनात वाढ झाली आहे. व या ५ लोकांमुळे वसुली कमी होत होती. त्यांच्यावर कारवाई केली जावी. महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी अनुसार त्यांच्यावर कारवाई केली जाईल. प्रश्न क्रमांक ४४६ ला प्रशासनाने दिलेले हे उत्तर आहे, ४.१०.२००५ रोजीच्या. आजची तारीख आहे १९/१२/२००५ म्हणजेच तब्बल अडीच महिने. अडीच महिन्याच्या अवधीमध्ये आपण महासभेत दिलेल्या उत्तरानुसार या ५ कर्मचा–यांवर काय कारवाई केली? माझ्या प्रश्नाचा रोख असा होता, उत्तर मागण्याचा की जे लोक दोषी असल्याचे तुम्हांला आढळून आले व ज्यांची बदली केल्यानंतर त्वरीत ८.९० टक्के वसुलीमध्ये वाढ झाली आहे. याचाच अर्थ चोरी कमी झाली. असे प्रशासनाचे म्हणणे होते. तर त्या कर्मचा–यांवर काय कारवाई केली? एवढे होवून सुध्दा या ५ लोकांवर काय कारवाई केली? त्यांची बदली केली, कारवाई केली किंवा नाही? जर आपण महासभेत उत्तर दिले आहे, मागील अडीच महिन्याच्या कालावधीत आपण कारवाई केलीही असेल केली असेल तर काय? आणि नसेल केली तर त्याची कारणे काय? याबाबत प्रशासनाची भुमिका काय आहे? काय चोरीला उत्तेजन दयायचे आहे? मागील वर्षी ऑगस्ट महिन्यामध्ये ४ कोटी ६५ लाख १६ हजार १६६ रुपयांची जकात वसुली होती. आता यावर्षी ऑगस्ट मध्ये ५ कोटी ३३ लाख ६ हजार ९०० म्हणजेच १ एप्रिल रोजी जी जकात दरांमध्ये जी वाढ केली होती, त्यानुसार जकात वसुली वाढावयास पाहिले होती, मागील वर्षी म्हणजे सप्टेंबर, २००४ मध्ये ५ करोड ६९ लाख २८ हजार ७३२ वसुली होती आता यावर्षी २००५ मध्ये सप्टेंबर मध्ये ५ करोड ४९ लाख ३८ हजार २९४ म्हणजेच मागील वर्षापेक्षा २० लाख रुपये कमी प्रत्यक्षात एप्रिल महिन्यामध्ये जकात दरामध्ये वाढ केल्यानंतर या महिन्यामध्ये जकातीचे उत्पन्न वाढावयास पाहिजे होते. मी सविस्तर आकडेवारी देत आहे यावरुन असे दिसुन येते की, या अगोदर चोरी होत होती ते प्रशासनाने कबुल केले आहे. २० टक्यापर्यंत चोरी होत होती. परंतु ही चोरी किती आहे ती दाखवा. २० टक्के उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील व्यापा–याकडुन २० टक्के अधिक जकात दर वसुल केल्यानंतर तो पैसा गेला कुठे? मागील वर्षी एवढे दर न वाढविताही ५ कोटी ६९ लाख आणि या वर्षी दर वाढवुनही ५ कोटी ४९ लाख मागील वर्षी ऑक्टोंबर महिन्यामध्ये २००४ मध्ये ६ कोटी ५५ लाख ८० हजार म्हणजेच जवळ जवळ साडे सहा कोटीची वसुली होती. यावर्षी ६ कोटी २८ लाख यावर १० टक्के नैसर्गीक वाढ गृहित धरली तर आणि २० टक्के जे दर वाढविले आहेत याचाच अर्थ ३० टक्के वसुली वाढावयास पाहिजे होती. परंतु या ठिकाणी ६ कोटी ५५ लाखच्या जागी ६ कोटी २८ लाख वसुली झाली आहे. ६ कोटी वर ३० टक्के वाढ पकडली तर जवळ–जवळ ७ , साडेसात कोटी वसुली व्हावयास पाहिजे होती. आता वसुली झाली आहे ६ कोटी २८ लाख याचाच अर्थ १ ते सव्वा कोटी रुपयाची कमी वसुली होत आहे. चोरी होत आहे. सत्ताधारी पक्ष म्हणतो आम्ही केले–केले. या वेळी माझा असा आरोप आहे की, प्रशासन सत्ता चालविते. शासनाचे प्रशासनावर नियंत्रण असते. जेव्हा पाहिजे तेव्हा अधिका–यांना बोलवितात. जेव्हा नको असेल तेव्हा अधिका–यांना परत पाठवितात. हेच सत्ताधारी पक्षाचे काम आहे. या महानगरपालिकेत जर प्रशासन योग्य पध्दतीने चालत नसेल उल्हासनगर महानगरपालिकेचे उत्पन्नातील स्त्रोत वाढवत नसेल तर जर त्यामध्ये चोरी होत असेल त्यावर नियंत्रण आणणे हे सत्ताधारी पक्षाचे काम आहे.

परंतु वारंवार असे होत असतांना सुध्दा प्रशासनाच्या आम्ही निदर्शनास आणले. सत्ताधारी पक्षाच्या निदर्शनास ही बाब आणलेली आहे. कारण की, महापौर महोदयांनी याबद्दल बैठक घेतली होती. बैठक तर घेतली, सप्टेंबर महिन्यात बैठक घेतली, परंतु आता डिसेंबर महिना चालला आहे. नोव्हेंबर मध्ये वसुली २० लाख ते २२ लाख अशी होती, आजची व कालची वसुली १८.१२.२००५ ची ७ लाख ६१ हजार आहे. १७.१२.२००५ ची आहे १८ लाख ४६ हजार, १६.१२.२००५ ची १६ लाख ९५ हजार व १५.१२.२००५ ची आहे १७ लाख ४५ हजार म्हणजेच वसुली २० लाखाच्या खालीच आहे म्हणजेच कमी आहे. मागील १ डिसेंबर, २००५ पासुन पाहिले तर जवळ–जवळ ११ ते १२ लाख अशी सरासरी वसुली सन २००३ सारखी, वसुली प्रशासनाने आणुन ठेवली आहे. शासनाचे काही नियंत्रण नाही. तर पहिला मुद्दा असा आहे की, वसुली वाढविण्यासाठी आपण काय योजना केली आहे? काही उपाययोजना केलेली नाही. परवाच मी पुर्ण महानगरपालिकेमध्ये सर्व विभागांना भेट दिली. महापालिका सचिव व पाणी पुरवठा विभागाचे श्री. सावकारे सोडुन एक सुध्दा अधिकारी आपल्या जागेवर नव्हता. काय शासन करत आहे? काय प्रशासन करत आहे हे कुणाला समजुन येत नाही. बस्स फिरत आहेत. अशा प्रकारे जर चालत असेल तर तीन वेळा चोरी, चोरी, चोरीच होईल. परंतु त्यामुळे नुकसान उल्हासनगर मधील जनतेचे होईल. कारण की, मागील तीन वर्षामध्ये उल्हासनगर मधील जनतेला आम्ही काहीही दिलेले नाही त्याचे कारण हेच आहे की, आमच्याकडे पैसा नाही. जेव्हा पण पहा ठेकेदारास दयावयास पैसे नाही, त्यामुळे ठेकेदार काम करण्यास तयार नाहीत. एमआयडीसीची ही तलवार डोक्यावर लटकत आहे. ते कधी पाणी कपात करतात, सर्व पाणी पुरवठयाचे ठेकेदार काम करण्यास तयार नाहीत. आरोग्य खात्यात सुध्दा तीच समस्या आहे. जेव्हा पाहिले तेव्हा पैसा नाही, पैसा नाही, पैसा नाही, परंतु जेथुन पैसा येणार आहे तो चोरी होणार हे आम्ही लक्षात आणुन दिल्यानंतरही ते नजरेआड केला, हा उल्हासनगरमधील जनतेला फार मोठा धोका आहे. यामध्ये आपण व शासन जाणुनबुजुन हे ढोंग करत आहात. मला असे वाटते की, येणारा प्रस्ताव असाच काहीतरी असेल. जो उल्हासनगरच्या जनतेला नको आहे. यासाठी लोकांना मजबुर करण्यासाठी एक नाटक रचले आहे, ही एक मिलीजुली साजिस आहे. उल्हासनगरमधील उत्पन्न घटविण्याची जेणे करुन लोक मजबुरीने म्हणु शकतील ठिक आहे. आपल्या हा मध्ये हा मिळवतील. आपण प्रस्ताव आणा, त्यावेळी आपणही म्हणाला की, काय करायचे? जकात चोरी होत आहे. या मार्गाने आपण महापालिकेला घेवुन जात आहात ते थांबवा. यासाठी आपणांस जी काही पावले उचलायची असतील ती उचला परंतु कोणत्याही परिस्थितीत चोरी थांबली पाहिजे. उल्हासनगरचा जो पैसा आहे तो उल्हासनगरमधील आम जनतेच्या कामास आला पाहिजे. कुण्या एका अधिका–याच्या कामास येता कामा नये. आम्ही आपणांस सविस्तर माहिती दिली आहे. ते बरोबर आहे की चुकीची आहे याची आपण चौकशी करु शकता. मागील वर्षी जकात वसुली किती होती? त्यावर २० टक्के जकात वाढ केल्यानंतर किती झाली पाहिजे? नैसर्गीक वाढीच्या १० टक्के म्हणजेच जवळ जवळ ३० टक्के जकात वाढ झाली पाहिजे. परंतु त्यानंतरही १० टक्के जकात वसुली कमी आहे. म्हणजेच जवळ जवळ ४० टक्के उल्हासनगर महानगरपालिकेचा महसुल कुण्या एका व्यक्तीच्या खिशात जात आहे. व्यापा–याकडे जात आहे, अधिका–याकडे जात आहे, लोकप्रतिनीधीकडे जात आहे. त्याची चौकशी करणे हे आपले काम आहे. यासाठी या लक्षवेधीद्वारे आपले लक्ष वेधत आहोत. त्या ५ कर्मचा–यांची आपण बदली केलीत. परंतु त्यांच्यावर कारवाई काय केली? ते सुध्दा दाखविले पाहिजे. जर वेळेवर कारवाई केली असती तर आज एवढी जकात चोरी झाली नसती. याच्यामागे कोण आहे? आपण कारवाई का केली नाही? कुणाचे दबावा खाली येवुन कारवाई केली नाही का? किंवा आपणच त्यांना जकात चोरीसाठी प्रोत्साहीत करीत आहात? याची सविस्तर माहिती या लक्षवेधीच्या माध्यमातुन आम्ही आपणाकडुन जाणुन घेवु इच्छित आहोत. व उत्पन्न वाढविण्यासाठी आपण काय–काय उपाययोजना केली हे जाणुन घेवु इच्छितो धन्यवाद.

**मा. सदस्या श्रीमती मोना वनवारी, श्रीमती भावना रामचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौरजी, या लक्षवेधीवर विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय बोडारे साहेबांनी अतिशय चांगली चर्चा केली आहे. जकातीमध्ये चोरी कशा प्रकारे केली जाते? याची एक–दोन उदाहरणे सांगतो. जकात विभागाचा जो मध्यवर्ती जकात नाका आहे, तेथे जकात भरण्यासाठी वाहने आणली जातात व तेथिल जकात कर्मचारी जे आहेत ते नगाच्या हिशोबाने जकात कर आकारतात. परंतु उल्हासनगर महानगरपालिकेच्या जकात नियमानुसार वजनाच्या हिशोबाने जकात कर आकारला पाहिजे. नगाच्या हिशोबाने जकात कर आकारला जातो. नगांची संख्या बरोबर असते परंतु वजन जास्त असते. त्यामुळे एका

वाहनामागे १० ते १५ हजाराची जकात चोरी केली जाते. ही गोष्ट प्रशासनाच्या यासाठी आम्ही लक्षात आणुन देतो की, आपण जर कारवाई करणार आहात तर यापुढील काही मुद्दे मी आपणांस सांगु इच्छितो, आपण कारवाई करणार असाल तर ते मी सांगेन. याबाबत प्रशासनाकडुन उत्तर मिळाले तर बरे होईल. आम्ही ब–याचवेळा जकात चोरी पकडुन दिलेली आहे. मागचे जे आयुक्त होते त्यांच्या लक्षात होते आम्ही वारंवार त्यांना जकात चोरी पकडुन देत होतो. जकात नाक्यांवर जकात चोरी कशी होते हे आम्ही येथिल उपायुक्तांना दाखवुन दिले आहे. परंतु आमच्या मनाप्रमाणे जशी कारवाई व्हावयास पाहिजे तशी कारवाई होत नाही म्हणुन जकात चोरी वाढलेली आहे. तुम्ही कारवाई आणि ठोस उपाययोजना जर कारणार असाल तर आम्ही पुढील मुद्दे जे काही आहेत ते सभागृहापुढे सांगु.

<u>श्री. व्ही.आर.गर्जे (प्रभारी सहा. आयुक्त):–</u> मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, मा. सभागृह नेता साहेब, मा. सचिव साहेब, जकात चोरी चा संशय असलेल्या ज्या कर्मचा–यांबाबत आपण विचारणा केली आहे, तेच कर्मचारी जकात चोरीस जबाबदार आहेत काय ही पुर्ण माहिती घेवुन कारवाई करण्यात येईल.

**<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>** गर्जे साहेब, मागील एक महिन्यापुर्वीची गोष्ट आपल्या लक्षात आणुन देतो, आपण स्वत: तेथे हजर होतात. एक जनरेटरची गाडी आली होती त्याची माहिती आम्हांला मिळाली. ती गाडी तेथुन कमी जकात भरुन गेली होती. आयुक्तांना फोन करुन आम्ही ती गाडी परत मागविली आणि त्या जनरेटरची गाडी तेथे उभी ठेवली होती. त्यामध्ये कोण दोषी आहे हे सर्व आपल्याला माहित असतांना आपण त्या कर्मचा–यांवर काय कारवाई केली?

<u>श्री. व्ही.आर.गर्जे (प्रभारी सहा. आयुक्त):–</u> या विभागातुन बदली केली आहे.

**<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>** या विभागातुन बदली? जो जकातीची चोरी करतो त्यास फक्त बदलीची शिक्षा असेल, तर मग वर्षानुवर्षे जकात नाक्यांवर जकात चोरी होत राहील. हा मी आपणावर आरोप करतो. एक कर्मचारी आपल्या जकात नाक्यावर काम करत असतांना श्री. राजु खिडकीकर त्याचे नाव आहे, त्यांनी प्रमाणीक पणे आपले कामकाज बजावत असतांना एक शहरातील प्रतिष्ठित नागरीक गाडीतुन काही माल घेवुन चालला होता त्याचा त्यांने पाठलाग केला. आपण स्टेट बॅकेजवळ ती गाडी पकडली. शहरातील तो प्रतिष्ठीत नागरीक होता या अगोदरच्या आयुक्तांशी त्याचे काही लागेबांधे होते. म्हणुन त्या व्यक्तीने सांगितल्या नंतर आयुक्तांनी त्या कर्मचा–याला बोलावुन घेतले आणि त्याची दुस–या विभागात बदली केली. अशी जर कारवाई होणार असेल तर ब्रम्हदेव आला तरीही या उल्हासनगरमधील जकात चोरी थांबवु शकणार नाही. तर त्या कर्मचा–याची बदली का केली? याचेही उत्तर जकात विभागाचे आपण जर प्रमुख असाल तर दयावे. नाहीतर आयुक्त साहेब देतील. चांगले काम केले म्हणुन श्री. राजु खिडकीकर याची मालमत्ता विभागात बदली केली?

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>** श्री. गर्जे साहेब, तुम्ही आता जे सांगितले, ते जबाबदारीने बोलत आहेत. मी अगोदरच म्हटले आहे की, दिनांक ४.१०.२००५ च्या पत्रामध्ये तुम्ही नमुद केले आहे की, आम्ही त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करु. आणि अडीच महिन्यानंतर सुध्दा आज तुम्ही सांगत आहेत की, ते जर दोषी असतील तर कारवाई करु, तुम्ही स्पष्टपणे म्हटले आहे की, ५ कर्मचा–यांची बदली केल्यानंतर ८.९ टक्के वसुलीत वाढ झालेली आहे. म्हणजेच ते ५ कर्मचारी दोषी होते. त्यानंतर सुध्दा ४.१०.२००५ रोजीच्या पत्राला तुम्ही उत्तर दिले आहे. त्यावर आम्ही कारवाई करु. महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती नुसार अडीच महिन्यात तुम्ही काय केले? ही चौकशी करायला वेळ मिळाला नाही का? प्रशासनातील एकही अधिकारी चौकशी साठी गेला नाही का? उत्पन्न वाढीसाठी तुम्ही प्रयत्न केले का? नोव्हेंबर मधील जकात वसुली ६ कोटी वरुन मागील महिन्यात ४ कोटीवर आले. जर सगळे अधिकारी वसुलीमध्ये गुंतले होते तर ६ कोटीची जकात वसुली साडे सहा ते सात कोटी व्हावयास पाहिजे होती. ते उत्पन्न ४ कोटी ९१ लाखावर आले. आणि या महिन्यात तर जकातीचे उत्पन्न आणखी खाली येणार आहे. या महिन्यातील दररोजचे उत्पन्न ११ लाख, १२ लाख, १३ लाखाच्या वर जाणार नाही. मग विभाग नक्की काय करतो? त्या कर्मचा–याची चौकशी करायला वेळ नाही. आणि अडीच महिन्यानंतर आता तुम्ही सांगत आहात की, ते दोषी असतील तर आम्ही कारवाई करु. मग ते दोषी नाहीत काय? याला जबाबदार कोण? अधिकारी आहेत काय? मग आता पर्यंत तुम्ही काय चौकशी केली? अडीच महिन्यापुर्वी तुम्ही एका प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा शर्तीनुसार कारवाई केली जाईल. अडीच महिन्यापर्यंत तुम्ही त्यांची काही

दखल घेतली नाहीत का? दखल नाही घेतली तर का नाही घेतली? महासभेत प्रश्नाला उत्तर दिले तर संपले. त्याची दखल घ्यायची नाही असे वाटत का?

श्री. व्ही.आर. गर्जे (प्रभारी सहा. आयुक्त) :— मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, जुलै—ऑगस्ट महिन्यामध्ये पावसाळयामध्ये इतर कामे वाढली होती म्हणुन वेळ मिळाला नाही. तसेच मध्यंतरी अनाधिकृत बांधकामे निष्कासनाची कारवाई करण्याचे काम चालु असल्यामुळे व्यापारी वर्गामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे मालाची आयात कमी झाली आहे. त्यामुळे जकात वसुली कमी झाली आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— मा. महापौरजी, गर्जे साहेब, तुम्ही आता हे जे काही सांगितले ती १५ दिवसापुर्वीची गोष्ट आहे परंतु जे कर्मचारी दोषी आहेत त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करत आहात? वारंवार आपल्या लक्षात आणुन दिल्यानंतर सुध्दा आपण जी कारवाई करायला पाहिजे ती करत नाहीत. जबाबदारी आपण झटकत आहात. श्री. राजु खेडगीकर याने चांगली कामगीरी बजावली, म्हणुन त्याची मालमत्ता विभागात बदली केलेली आहे. ती का केली? कोणाच्या सांगण्यावरुन केली? याचाही खुलासा करावा.

श्री. व्ही.आर. गर्जे (प्रभारी सहा. आयुक्त) :—सन्माननिय सदस्य साहेब ती कार्यवाही माझ्याकडुन झालेली नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर, श्री. मनोहर चांपुर या एका कर्मचा—यास २० रुपये घेतांना एका अधिका—याने पकडले. त्याला तुम्ही निलंबित करतात. आणि श्री. विजय मंगलानी याने १२ हजाराची जकात चोरी केल्यानंतर तुम्ही त्याची बदली केली आहे. दोघांमध्ये तुम्ही हा फरक का करत आहात? २० रुपये घेणा—यास तुम्ही निलंबित करता आणि १२ हजाराची चोरी करणा—यास तुम्ही दुस—या विभागात बदली करतात? कारवाई काय करणार ते तुम्ही सांगत का नाहीत? सांगत नाही म्हणजे याचा अर्थ तुम्ही कुणाच्या तरी दबावाखाली काम करतात. दुसरा एक प्रश्न आहे, जकात चोरीच्या एका प्रकरणात तुम्ही ११ पट दंड म्हणुन जकात वसुली करता त्या दिवशी जनरेटर ची जकात चोरी पकडल्यानंतर त्यांच्याकडुन तुम्ही किती पट दंड वसुल केला?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— साहेब मला असे वाटते की, हे जे प्रश्न विचारत आहेत ते विचारत आहेत श्री. गर्जे यांना की, ज्यांना काही अधिकार नाहीत. बदली करण्याचा किंवा कारवाई करण्याचे यावर आयुक्तांनी उत्तर दिले तर अधिक योग्य होईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— उत्तर देणारा कोण आहे? तुम्ही हतबल असाल तर तेही सांगा. तुम्ही कारवाई करु शकत नसाल तर तेही सांगा की तुम्ही कुणाच्या दबावाखाली अडकलात ते सांगा?

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):— मी नव्यानेच पदभार स्विकारलेला आहे. त्यामुळे मला येथिल पुर्वीची पार्श्वभुमी माहित नाही. तरीपण एकंदरित तुमचा सुर पहाता जकात वसुली अतिशय कमी झालेली आहे असे आकडेवारीने दिसुन येत आहे. तर त्या नुसार काय उपाययोजना करायची याबाबत यावर सखोल अभ्यास करुन एक कृती आराखडा तयार करु.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— साहेब, जरा हिंदीत बोला.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):— मी नव्याने पदभार स्विकारला आहे.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर:— आयुक्त साहेब हिंदीत बोलणार तर बरे होईल.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):— मी आता आताच पदभार स्विकारलेला आहे. त्यामुळे या अगोदर जकातीच्या बाबत जे काही झालेले आहे त्याची मला काही माहिती नाही. आता मी यावर अभ्यास करुन जकातीचे उत्पन्न वाढविण्यासाठी जे काही करावे लागेल त्याकडे लक्ष देवुन कार्यवाही करेन. एका सन्माननिय सदस्याने सांगितले की, कुण्या एका कर्मचा—याची बदली केली आहे. काहींना शिक्षा झालेली नाही. याबाबतही अभ्यास करुन कायदयानुसार जी काही कारवाई करायची आहे ती मी करेन.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारें :– ठिक आहे आपण नविन आहात. परंतु जी आकडेवारी आम्ही सांगितली ती खरी आहे व वस्तुस्थिती मागील वसुली व आताची वसुली यांची तुलना केली तर जवळ जवळ ३० ते ४० टक्के नुकसान होत आहे. `अभ्यास करण्यासाठी आणखी आठ–दहा दिवसाची वेळ आपण व्यर्थ घालवाल त्यामुळे जकात वसुली आणखी कमी होईल म्हणुन आपण त्वरीत कारवाई करुन या गोष्टीस जे जबाबदार आहेत, जकात पर्यवेक्षक आहेत किंवा त्यांचा कर्मचारीवृंद आहेत? कोणत्या पध्दतीने काम चालु आहे? याची चौकशी करुन योग्य प्रकारे अंमलबजावणी झाली पाहिजे. कारण की, जर आणखी १५ दिवस गेले तर ६ कोटीच्या ठिकाणी तीन साडेतीन कोटी जकात वसूली होईल म्हणजेच ५० टक्के जकात वसुलीचे नुकसान होईल.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):–दोन–तीन दिवसामध्ये कारवाई केली जाईल.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– श्री. रमेश चव्हाण हे जे आपणांस विचारणा करत आहेत त्यांचे म्हणणे असे आहे की, महानगरपालिकेमध्ये कर्मचा–यांबाबतीत दुजाभाव केला जात आहे. एक कर्मचारी २० रुपयाची चोरी करतांना जर पकडला गेला तर त्यास निलंबित केले जाते. त्याच्यावर कारवाई होते. व १५ हजाराची चोरी करणा–यास सोडुन दिले जाते. त्याची फक्त बदली केली जाते. असा दुजाभाव होता कामा नये. याबाबतीत आपण काय करणार आहात असे त्यांचे म्हणणे आहे.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):–आपण हे जे सांगत आहात असे यापुढे होणार नाही. चोरी मग ती लहान असो किंवा मोठी कायदयाप्रमाणे कारवाई केली जाईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– मा. महापौर महोदया, दुसरी एक गोष्ट अशी की, जकात चोरी पकडल्यानंतर आपण जो दंड वसुल करतो, तो काही ठिकाणी ११ पट तर काही ठिकाणी ४ पट, ५ पट असा वसुल केला जातो. ....................

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):– त्यासाठी नियमामध्ये जी काही तरतुद आहे त्याप्रमाणे कारवाई केली जाईल. व अधिकाअधिक शिक्षा केली जाईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–मा. महापौर महोदया, राजु खिडकीकर याची काय चुक आहे ती जरा सांगितली जावी. ज्याची आपण बदली केली आहे त्याने काय चुक केली आहे, ज्यामुळे त्याची बदली केली आहे. समजा, कारवाई करता तर का कारवाई करता? हे सभागृहाला माहित झाले पाहिजे ना? कुणाच्या सांगण्यानुसार कुणाच्या दबावानुसार आयुक्त साहेबांनी आम्हांला सांगितले होते की आठ दिवस त्याला तेथे काम करु दया त्यानंतर त्याला पुन्हा घेतो. आता आयुक्त साहेब गेले. त्याच्यावर कारवाई का केली, त्याची चुक काय होती? ज्याच्यावर कारवाई व्हावयास पाहिजे होती, ज्याला निलंबित करावयास पाहिजे होते त्याची आपण बदली केली. याबाबत उत्तर कोण देणार?

श्री. उत्तम लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य सन्माननिय सदस्यांनी एका कर्मचा–याच्या बदली बाबत आता जे काही सांगितले त्याची माझ्याकडे आता माहिती नाही. त्याची बदली का केली आहे त्याचे जे काही कारण असेल ते मी सांगेन.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– आज सांगाल काय?

श्री. उत्तम लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–आजच सांगेन.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :– जर त्याच्यावर अन्याय झाला असेल तर त्याला आपण न्याय दयाल?

श्री. उत्तम लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय):–अन्याय झाला असेल तर आम्ही त्याला न्याय देवु.

मा. सदस्य श्री. रामदास उमाप :– मा. महापौरजी, प्रश्न आपल्या शहराच्या उत्पन्नावर येवुन ठेपला आहे. येथे प्रशासनाची स्थिती तर एवढी दयनिय दिसत आहे. प्रशासकिय अधिकारी आपापल्या कार्यालयात नव्हते

असे आमचे विरोधी पक्ष नेता व त्यांच्या सोबत मी सुध्दा होतो तेव्हा दिसून आले आहे. प्रत्येक विभाग जेव्हा आम्ही उघडुन पाहिला तेव्हा तेथे कुणीही अधिकारी नव्हता. दुसरी एक गोष्ट मी आयुक्त साहेबांकडुन आता ऐकली की मला अभ्यास करावा लागेल. व त्यानंतरच हे जेवढे काही विषय आहेत त्यांच्यावर निर्णय घेईन. ही तर आश्चर्याची गोष्ट आहे जेव्हा आयुक्त पदभार सांभाळतात तेव्हा सर्वात प्रथम त्याचे लक्ष लेखा विभागाकडे, महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या साधनाकडे असले पाहिजे. जकातीमध्ये जी काही चोरी होते किंवा चोरी केली जाते. यावर त्यांनी ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. यावर अभ्यास करण्यासाठी जर त्यांना १० ते १५ दिवस लागत असतील तर या १५ दिवसामध्ये लाखो रुपयाची चोरी होवू शकेल. आता बोडारे साहेबांनी एक अंदाज सांगितला की, जकात विभागामध्ये ५० टक्के जकात चोरी होत आहे. शहरातील विकास कामे जकात चोरीमुळे ठप्प झाली आहेत. महापालिकेच्या निवडणुकीसाठी आता एक वर्ष बाकी आहे. या कालावधीत शहरात विकास कामे झाली पाहिजेत. पाणी बिलाची रक्कम वेळच्या वेळी अदा केली पाहिजे. विजेची देयके वेळोवेळी अदा केली पाहिजेत. एका सदस्यांनी सांगितले की, विकास कामे करण्यासाठी एखादे तातडीचे काम असले किंवा जसे एका सदस्याने सांगितले की, समजा पंप हाऊसचा एक पॅनल बोर्ड निकामी झाला तो खरेदी करण्यासाठी काही रक्कम पाहिजे त्यासाठी जर ठेकेदार काम करत नसेल त्याचे कारण आहे की, त्याचे देयक अदा न होणे अशा प्रकारचे संवेदनशिल विषय असतांनाही आयुक्त जर अभ्यास करत राहिले व त्यांचे प्रशासकिय अधिकारी जर गायब राहिले तर मला असे वाटते की, ही महानगरपालिका बुडविण्यासाठी प्रशासन पुर्णपणे तयार आहे. पुर्ण शहराची बर्बादी करण्यासाठी ही हेतुपुरस्कर योजना आहे असे मला वाटते. तर मी विनंती करतो की, या गोष्टीकडे आयुक्त साहेबांनी लवकरात लवकर लक्ष दिले पाहिजे. दुसरी गोष्ट लाखो रुपये जकात चोरी करण्यामागे फक्त दोन–चारच कर्मचारी नसतील त्यामध्ये बरीच मोठी लॉबी असेल. त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. मी महापौरांना विनंती करेन की, यावर योग्य तो तोडगा काढुन महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी जे काही उपाययोजना करावी लागेल त्याबाबत आयुक्तांना निर्देश देवुन या शहराचा विकास कसा होईल हे पाहिले पाहिजे. कोणतीही एक चांगली उपाययोजना ठरविली पाहिजे व ती लवकरात लवकर झाली पाहिजे. हीच सभागृहाला विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब व सर्व सहकारी, मा. विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे यांनी आकडेवारीसह सविस्तर माहिती सभागृहासमोर मांडली आहे. त्यातुन एक गोष्ट स्पष्ट होत आहे, त्यांनी आपल्या भाषणात सुध्दा म्हटले की, शासन आणि प्रशासनाची जेव्हा–जेव्हा इच्छा शक्ती जागृत झाली व त्यांनी प्रशासनाला सक्त ताकिद दिली. अधिका–यांवर कारवाई केली. कर्मचा–यांवर कारवाई केली. त्या त्या वेळी आम्हांला दिसून आले, जकातीचे उत्पन्न वाढले आहे. काही दिवसापुर्वी आमचे सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांना जकात विभागाचा कार्यभार दिला होता. त्यावेळेस जकात वसूलीमध्ये अचानकपणे फार मोठया प्रमाणावर वाढ झाली होती. अशी कित्येक उदाहरणे आहेत, श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितले आहे की, त्या ५ कर्मचा–यांना जकात विभागातुन काढल्यानंतर महापालिकेचे जकात उत्पन्न ८.९ टक्यापर्यंत वाढले. तर सांगण्याची गोष्ट एवढीच आहे की, जेव्हा शासन व प्रशासनाची इच्छाशक्ती असते. तोपर्यंत जकातीचे उत्पन्न वाढते. तर मला आता असे वाटते की, काही दिवसांपासून जकात वसुलीमध्ये जी कमतरता/शिथीलता आली आहे व खास करुन जे नविन आयुक्त आले आहेत ते आल्यानंतर त्यांनी प्रशासनास ज्या पध्दतीने कार्यान्वीत करावयास पाहिजे होते. परंतु तसे न होता ते इतर गोष्टींमध्ये व्यस्त झाले आहेत. प्रशासन अधिक गतिमान करावयास पाहिजे होते. ते अदयाप गतिमान झालेले नाही. माझे असे स्पष्ट मत आहे की, शासनाने प्रशासनाला अधिकाधिक गतिमान केले पाहिजे. जो पर्यंत कर्मचा–यांमध्ये दुजाभाव केला जाईल, सर्वांवर समान कारवाई होणार नाही तोपर्यंत जकातीचे उत्पन्न वाढणार नाही. यासाठी माझी एक सुचना आहे शासनाने प्रशासनाला अधिक गतिमान केले पाहिजे व अधिका–यावर एक सशक्त कारवाई झाली पाहिजे. जो पर्यंत अधिकारी जकात चो–यांमध्ये शामिल आहेत तोपर्यंत जकातीची वसुली वाढणार नाही म्हणुन मला असे वाटते की, शासन व प्रशासनाने आपली इच्छा शक्ती जागृत केली पाहिजे.

**मा. सदस्य श्रीमती दिपा पंजाबी, श्रीमती अनिता गुप्ता यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u> मा. महापौरजी, आमचे विरोधी पक्ष नेता श्री. बोडारे साहेबांनी जी लक्षवेधी मांडली आहे ती एकदम बरोबर आहे. आमची वसुली कमी झाली आहे. तिची कारणे जी सांगितली जातात त्यामध्ये आणखी काही कारणे आहेत, जोपर्यंत वरच्या पातळीवर कार्यप्रणाली बिघडत नाही

तोपर्यंत खालच्या कर्मचा—यांना चुकीचे काम करण्याची हिम्मत होणार नाही. हे लोक लिपिक स्तरावरील कर्मचा—यांबाबत बोलतात. परंतु प्रत्यक्षात आपले जे आयुक्त होते श्री. आर.के. सोनवणे ते यामध्ये अतिशय बेपर्वा वागत होते. याव्यतिरिक्त त्यांच्या हाताखालील जे उपायुक्त होते ते सुध्दा बरोबर लक्ष देत नव्हते. व जे आता आमचे गर्जे साहेब आहेत, ते म्हणतात की, २० रुपयासाठी एका कर्मचा—याची बदली झाली तसेच श्री. मंगलानी बाबत जे काही ते म्हणत आहेत तर या सर्व लोकांचे बेपवाई चे वागणे श्री. सोनावणे, श्री. लोणारे, श्री. गर्जे या लोकांचे पॅनल तयार झाले होते या लोकांच्या मनात जेव्हा येत होते तेव्हा वसुली वाढत होती. जेव्हा त्यांच्या मनात येत होते तेव्हा वसुली कमी होत होती. म्हणुन कारवाई कनिष्ठ स्तरावरील कर्मचा—यांवर न करता वरीष्ठ अधिका—यांवर केली पाहिजे. विभागप्रमुखांवर कारवाई झाली पाहिजे त्यामुळे कनिष्ठ स्तरावरील कर्मचा—यांवरही त्याचा परिणाम होईल. जेव्हा आमचे आयुक्त साहेब सुट्टीवर होते त्यावेळेस आमच्या मध्यवर्ती जकात नाक्यावर कुणी दोन वरीष्ठ अधिकारी (जे उपायुक्त दर्जाचे होते) रात्री दारु पिऊन नाक्यावर गेले होते. अशी आम्हांला माहिती मिळाली होती. या लोकांवर चौकशी नेमली जावी. आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये उपायुक्त म्हणुन जे लोक येतात ते आपल्या कामाव्यतिरिक्त दुस—या विभागातील कामाकडे लक्ष देतात. जेथे बेकायदेशीर बांधकाम होते त्यांच्याकडुनही यांना पैसे हवे असतात नंदलाल समितीमध्ये ज्या अधिका—याची नावे आली आहेत त्यांच्यावर काय कारवाई झाली आहे? ते लोक फक्त जकात विभाग व अनाधिकृत बांधकाम याकडे लक्ष देतात आणि हप्ते वसुल करतात. लिपिक लोकांवर कारवाई करण्याऐवजी अधिका—यांवर कारवाई केली तर बरे होईल व जी काही वसुली कमी झाली आहे त्याबाबत मी एक उदाहरण देतो आमचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे जकात वसुलीचे खाजगीकरण करु पाहत होते. ते फक्त खाजगीकरण करा—करा असे म्हणत होते परंतु प्रत्यक्षात तसा प्रस्ताव आणत नव्हते. माझी तर अशी विनंती आहे की, जकात चोरी थांबविण्यासाठी जकात वसुलीचे खाजगीकरण करणे हेच योग्य आहे. याबाबत संपुर्ण सभागृहाचे आपणास सहकार्य राहिल.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—</u> मा. महापौर, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, सध्या जकात चोरीबाबत येथे चर्चा चालु आहे आणि या महानगरपालिकेची परंपरा अशी आहे जेव्हा प्रशासनामुळे किंवा प्रशासकामुळे जेव्हा ही महानगरपालिका अडचणीत येते तेव्हा तेव्हा त्या अधिका—यांच्या बदल्या होतात ही या महानगरपालिकेची परंपरा आहे. आणि त्यामुळे सभागृहात हे प्रश्न उपस्थित केले जातात. मुद्दे उपस्थित केले जातात व अधिका—यांच्या बदलीमुळे ते तसेच अनुत्तरीत राहतात. आणि उल्हासनगरच्या जनतेला त्याच्यापासुन वंचित राहावे लागते. आणि त्यांच्या समस्यांची सोडवणुक होत नाही. ही परंपरा जर अशीच राहिली तर या उल्हासनगरचे पुढे काय होईल? हे देव सुध्दा सांगु शकत नाही तरी कृपया तर आयुक्तांना माझी अशी विनंती आहे की, हा प्रश्न उल्हासनगरच्या जनतेशी आणि विकासाशी पुर्ण निगडीत आहे. सर्वात जास्त वसुली जकात विभागातुनच होत असते. या प्रश्नावर आयुक्तांनी सर्व बाजुंनी विचार करुन आणि याच्यावर संबंधीत अधिका—यांशी पुर्ण विचार विनिमय करुन दोषींवर कारवाई करण्याचा निर्णय घ्यावा.आणि आताच उमाप साहेबांनी सांगितले की, यामध्ये हे दोन—चारच कर्मचारी असतील असे नाही. हे खुप मोठे रॅकेट असु शकते. आणि हा जकात चोरीचा मलिदा कुठपर्यंत पोहचतो, त्या सर्वांची तुम्ही चौकशी करुन आणि त्यांच्याबाबतीत अभ्यास करुन तो या सभागृहासमोर जरुर आणावा अशी मी आयुक्तांना विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौर महोदया, माझी आयुक्तांना एक विनंती आहे की,............

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :—</u> उमापजी पुन्हा पुन्हा बोलु नका. आम्हांला सुध्दा काही बोलु दया आम्ही सुध्दा आपणांस सहकार्य करत आहोत.

**मा. सदस्य श्री. राजु टेकचंदानी, श्री. मोहन बेहरानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> दोन मिनिटच बोलेल, त्यापेक्षा जास्त बोलणार नाही. आयुक्तांना माझा एक लहानसा प्रश्न आहे आता पर्यंत सभागृहात जी चर्च्रा झाली त्यानुसार जकातीबाबत आपणाकडे काय काय पर्याय आहेत, काय उपाययोजना आहेत? मागील आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे यांनी सभागृहात एक आश्वासन दिले होते की, आम्ही ८० ते ९० करोड पर्यंत जकात वसुली वाढवु, प्रशासनाच्या जबाबदारी मुळे आम्ही खाजगीकरण रोखले होते. परंतु आताची परिस्थिती पहाता लवकरात लवकर निर्णय नाही घेतला तर

खुप वाईट परिस्थिती निर्माण होईल. यासाठी मी आयुक्तांना विनंती करतो की, काय पर्याय आहेत किंवा उपाययोजना आहेत ते जरा सांगावे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—मा. महापौरजी, नव निर्वाचीत आयुक्त साहेब, वेळ असतांनाच मी माझे वाक्य सुधारले. आमच्या शब्दाकडे लक्ष न देता आमच्या भावनेकडे लक्ष दयावे. सर्वात प्रथम मला खुशी होते व प्रसन्न वाटते की, ८५५ अनाधिकृत बांधकामाच्या विषयामुळे आपले सर्वांचे व शहराचे पुर्ण लक्ष त्यावरच होते, तणावग्रस्त होते त्यामुळे महानगरपालिकेचे काही काम किंवा विकास करणे राहिलेच नाही आहे, पुर्ण शहराचे लक्षच ८५५ अनाधिकृत बांधकामाच्या इमारतींवर लागले होते..............

मा. महापौर :—एक सेकंद दिलीपजी, आपले नगररचनाकार जे आहेत त्यांना मंत्रालयात बोलविले आहे. त्यांना मंत्रालयात जावु दिले जावे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— या शहरातील सत्ताधारीपक्ष व विरोधी पक्ष तणावग्रस्त जीवन जगत होते. आता ते ढग विरळ झाले आहेत. आमचे विरोधी पक्ष नेता मा. श्री. धनंजय बोडारे यांनी जी लक्षवेधी सुचना येथे मांडली तीचे आम्ही स्वागत करतो. खरेतर त्यांनी सत्ताधारी पक्षाला शाल—जोडे मारण्याचा, शालीमध्ये लपेटुन शब्दाने मारण्याचा प्रयत्न केला. त्यांनी म्हटले की, ही जी जकात चोरी होत आहे त्यात सत्तापक्षाचा काही तरी हात आहे असेच काहीतरी म्हटले किंवा इशारा दिला, सर्वात प्रथम मी या गोष्टीचे खंडण करतो किंवा विरोध करतो, प्रखर विरोध करतो, शासन पक्षाचा या कामात ना कोठे हात आहे, हात आहे किंवा इशारा आहे, या गोष्टीला मी येथे विनम्र पणे खंडन करतो. दुसरे असे की, विरोधी पक्षानी या गोष्टीवर चिंता जाहिर केली की, जकात वसुली कमी होत आहे, शहराचा विकास होत नाही, आपल्या या चिंतेमध्ये , आम्ही सुध्दा तेवढया प्रमाणात सहभागी आहोत. आम्हांलाही चिंता आहे की, कारण आज शहराची विकास कामे ठप्प झाली आहेत, नगरसेवक निधीतील कामेही होणे मुश्किलीचे झाले आहे. श्री. दिघे व श्री. बनसोडे हे नवतरुण अधिकारी आमच्याकडे आता आलेले आहेत परंतु ते सुध्दा उच्च रक्तदाबाने त्रस्त झाले आहेत असे मला वाटते. पेमेंट पेमेंट, पेमेंट खिशात तर पैसा नाही. दररोज ठेकेदार महापालिकेत फे—या मारत राहतात त्यामुळे त्यांनी घेतलेली कामे ते पार पाडु शकत नाहीत. ते म्हणतात की, अगोदर जी आमची देयके प्रलंबित आहेत त्यातुन काही रक्कम दयाल तर पुढचे काम आम्ही चालु करु शकु. ही एक वस्तुस्थिती आहे ती लपविण्याचा आम्ही प्रयत्न करणे म्हणजे हाताने सुर्य झाकण्याचा प्रयत्न केल्यासारखा आहे. हाताने सुर्य झाकला जावु शकत नाही. जर आम्हांला वाटत असेल की या शहराचा विकास व्हावा. जर आम्हांला वाटत असेल की या स्थिती मध्ये काही सुधारणा होवो. निश्चित स्वरुपात आम्ही सत्ताधारी पक्षाचे आहोत. विरोधी पक्षांनी मांडलेल्या लक्षवेधीस उत्तर देणे किंवा त्यांना गप्प करणे या गोष्टीने काम होणार नाही. आम्हांला समस्येच्या मुळापर्यंत जावे लागेल. त्यावर योग्य पध्दतीने उपचार करावा लागेल.व जकातीची जी वसुली कमी झाली आहे त्याच बरोबर मिळकत कराची वसुलीही कमी झाली आहे, पाणी पट्टीची वसुलीही कमी झाली आहे व अशाप्रकारे आमचे आर्थिक उत्पन्न जसे कमी झाले आहे, विकास कामे तर करणे आम्ही विसरुन गेलो आहोत. पाण्याचे बिल भरायचे आहे किंवा पगारे दयायची आहेत, त्याचेही पैसे महानगरपालिकेकडे नसतात. परिणाम स्वरुप प्रत्येक वेळेस पाण्याची कपात केली जाते व आमचे आमदार मा. श्री. पप्पु कलानीजी व मा. महापौर महोदया व आमचे दुसरे जे वरिष्ठ नेतागण आहेत त्यांना दौडधुप करुन पाणी कपात रद्द करुन घ्यावी लागते. जेणेकरुन पाणी पुरवठा व्यवस्थित व्हावा यासाठी त्यांना दौडधुप करावी लागते. जसे की हे काम केवळ आमच्या आमदारांचे नाही, हे काम प्रशासनाचे आहे. उत्पन्न वाढवुन एमआयडीसीला पाणी बिलाचे वेळच्या वेळी पैसे देवुन पाणी पुरवठा सुरळीत करणे. कारण पाण्याचे बिल दिले तर पाण्याची कपात कधीही होणार नाही. आता तर हिवाळा आहे, उन्हाळयामध्ये अतिशय त्रासाचे होईल यासाठी जर आम्हांला वाटत असेल पाण्याचे बिल वेळच्या वेळी भरावे, पगारे वेळच्या वेळी दयावीत, ठेकेदारांना काही बिलाची रक्कम दिली जावी. जेणेकरुन शहरात विकास कामे चालावीत. यासाठी आपणांस वसुलीकडे लक्ष दयावे लागेल. आणि ही वसुली कमी होण्यामध्ये जे कुणी अधिकारी, कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई केली पाहिजे. अशी मागणी मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने मागणी करत आहे. व यामागे माझा स्पष्ट दृष्टीकोन आहे की, यामध्ये सत्ताधारी पक्षाची काहीही भागीदारी नाही. जर यामध्ये सत्ताधारी पक्ष सहभागी असता तर अशी उघड मागणी सत्ताधारी पक्षाने कधीही केली नसती. महापौर महोदया, मला असे वाटते की, ही जी चौकशी समिती नेमली जाईल त्यामध्ये आमच्या महानगरपालिकेचे सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांच्या नेतृत्वाखाली ती नेमली जाईल. ज्यांनी अतिशय चांगल्या प्रकारची जकात वसुली करुन दाखविली आहे , त्यांना माहित पडते की, कुठे जकात चोरी झाली

आहे? कोठुन झाली? त्यास जबाबदार कोण आहेत? जो कोणी जबाबदार असेल त्यास आम्ही माफ करु शकणार नाही. कारण ज्या व्यक्तीने आपल्या कर्तव्यात कसुर केली आहे तो चांगला अधिकारी / कर्मचारी होवु शकत नाही. जर का तो लोकप्रतिनिधी असेल तर तोही गद्दार आहे आम्ही या ठिकाणी अशी मागणी करतो की, श्री. प्रकाश कुकरेजा यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती नेमली पाहिजे. श्री. कुकरेजा यांनी अतिशय चांगल्या प्रकारे जकात वसुली करुन दाखविली आहे. त्यांना लवकर माहित पडु शकते की जकात चोरी कुठे झाली आहे ते? जकात चोरीसाठी कोण जबाबदार आहेत? जो कोणी जबाबदार असेल त्यास आम्ही माफ करु शकणार नाही. कारण की, ज्या कोणी व्यक्तीने कर्तव्याचा त्याग केला आहे, तो एक चांगला अधिकारी होवु शकत नाही. चांगला कर्मचारी होवु शकत नाही. जर का तो कोणी लोकप्रतिनिधी असेल तर तो शहराचा जनप्रतिनिधी नसुन तो शहराचा गद्दार आहे. आम्ही येथे मागणी करतो की, श्री. प्रकाश कुकरेजा यांच्या नेतृत्वाखाली एक चौकशी समिती नेमली जावी. ते या गोष्टीची पुर्ण चौकशी करतील की या कामी जबाबदार कोण आहे? दोषी कोण आहेत? त्यावर काय कारवाई करावी? त्यांनी आमच्यासमोर तसा अहवाल सादर करावा. व त्यावर कारवाई व्हावी. महापौर महोदया याचबरोबर जकात वसुली वाढविण्याची व्यवस्था कशाप्रकारे होवु शकेल याचबरोबर मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीची व्यवस्था झाली पाहिजे. व या संबंधी जेवढे काही निर्णय असतील त्यावर त्वरीत अंमलबजावणी व्हावी. कारण आता वेळ नाही. २००७ मध्ये आपणा सर्वांना जनतेसमोर जायचे आहे. व आपल्या कार्यकालावधीमध्ये जास्तीत जास्त विकास कार्य करायचे आहे, यासाठी आपणांस पैसा पाहिजे. याचबरोबर महापौर महोदया, मी आपणांस आणखी एक विनंती करतो, मागील वेळेस जी महासभा झाली होती त्या वेळेस आमच्या अन्थोनी नावाच्या ठेकेदाराचा उल्लेख आला होता ज्यास प्रती दिवसाचे १ लाख १९ हजार या हिशोबाने साफसफाईचे देयक दिले जात आहे. त्या महासभेमध्ये एक सर्वानुमते असे एक मत तयार झाले होते की, या ठेकेदाराकडुन हे काम काढुन घेतले जावे. शहरामधील कचरा उचलला जात नाही. याचबरोबर करारनाम्यामध्ये ज्या अटी, शर्ती टाकलेल्या आहेत त्या ठेकेदाराकडुन पुर्ण करुन घेतल्या जाव्यात. परंतु त्यानंतर सुध्दा काही झाले नाही. येथपर्यंत की त्या ठेकेदाराकडे जे कर्मचारी आहेत त्या कर्मचा—यांच्या ज्या मागण्या होत्या त्याबाबत त्यांनी उपोषण केले होते. आणि त्याबाबत सभागृहामध्ये आवाज उठविण्यात आला होता. त्यावर एक बैठकही झाली होती. त्या सभेमध्ये निर्णय घेण्यात आले होते. त्या सभेचे हे इतिवृत्त ही आहे. ॲन्थोनी ठेकेदाराने करारनाम्यातील अटी, शर्तीचे पालन व पुर्तता केलेली नाही. महापौर महोदया, याचबरोबर या गोष्टीचाही निर्णय झाला पाहिजे. त्या ॲन्थोनी ठेकेदाराला सक्त सुचना दिल्या जाव्यात. किंवा अशा ठेकेदाराचा ठेका रद्द करावा. जो प्रतिदिवसाचे १ लाख १९ हजार घेवुन सुध्दा शहरातील साफ सफाईचे काम बरोबर करत नाही. आपल्या अटी, शर्तीचे पालन करत नाही. मी आपले हे विचार पुन्हा एकदा सभागृहास स्पष्ट करतो की, विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्षाची चिंता एकच आहे. आम्हां सर्वांचे काम शहराचा विकास करण्याचे आहे. शहर विकासामध्ये जो कोणी बाधा आणेल त्यास आम्ही कधीही माफ करणार नाही. जयहिंद, जयमहाराष्ट्र ।

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—</u> मा. महापौर महोदया, जकात चोरीबाबत ही जी चर्चा चालु आहे, उल्हासनगर शहर हे जकात चोरांसाठी मुक्तद्वार झाले आहे. हे जकात चोर लोक सुधारणार नाहीत. येथुन दररोज दहा—बारा खाली ट्रक सुरतला जातात. तेथुन कपडा भरुन येतात, परंतु जकात भरत नाहीत व जी कार्यप्रणाली खराब झाली आहे, त्यासाठी जकात वसुलीचे खाजगीकरण होणे आवश्यक आहे. कारण की, महापालिकेची जकात वसुलीची यंत्रणा कधीही सुधारणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा. महापौरजी, सचिव साहेब, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आज प्रशासनासमोर मा. विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे यांनी जी लक्षवेधी सुचना मांडली आहे व श्री. राजेंद्र चौधरी साहेबांनी सुध्दा काही मुद्दे येथे मांडले आहेत. त्यांचे मी स्वागत करतो. त्याचबरोबर सत्ताधारी पक्षांवर जे सिंतोडे उडविले आहेत, ते चुकीचे आहे. उल्हासनगरमध्ये सुधारणा घडवुन आणण्यासाठी प्रत्येक वेळेस आम्ही त्यांच्याबरोबर आहोत, राहु आणि होतो. आज जकात वसुलीचा जो मुद्दा प्रशासनासमोर आणला आहे, मागील वर्षाच्या वसुलीत आणि या वर्षाच्या वसुलीत जरुर फरक दिसुन येत आहे, परंतु जकातीची कमी वसुली जकात चोरी होते म्हणुनच नाही तर त्याची अनेक कारणे आहेत व त्यावर मी प्रकाश झोत टाकु इच्छितो. एकतर २६ व २७ जुलै रोजी शहरातील ८५५ अनाधिकृत इमारतींचा जो मुद्दा एखादया महामारी सारखा शहरामध्ये आला व त्यामुळे उल्हासनगर शहरातील व्यापा—यांना व मालाची आयात करणा—यांना एक भिती बसली की या सगळ्या इमारती तोडल्या जातील. कारण की, मा. उच्च न्यायालयाचा आदेश होता, मा. न्यायालयाचा कोणीही अवमान करु शकत नाही. त्यामुळे मालाची आयात कमी झाल्याने

जकात वसुली कमी झाली. व तुलनात्मकदृष्टया एप्रिल पासुन आजपर्यंतची वसुली पाहिली तर ८५५ इमारतींचा मुद्दा व जुलै महिन्यामध्ये जो महापुर आला, त्यामध्ये जे नुकसान झाले, ज्या लोकांच्या इमारती पडल्या त्यामुळे येथिल व्यापारी पैसे परत देवु शकले नाहीत त्यामुळे सुध्दा मालाची आयात कमी झाली आहे. यामुळे जकात वसुली कमी झाली आहे. आता राहिला प्रश्न जकात चोरीचा चोरी कोण करत नाही? चोरी दुनियाभर होत असते. त्यासाठी मी उदाहरण देतो, दुनियामधील प्रत्येक माणुस चोर आहे. दुनियामधील एक निर्जीव वस्तु जसे एखादे भांडे आहे,....................

**यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोर–जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे ते समजून येत नव्हते.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> त्यांच्या भावना समजुन घ्या.

**<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u>** दुनियामध्ये कोण चोर नाही? परंतु सर्वसाधारणपणे एक उदाहरण, .... सकाळी एका भांडयामध्ये दुध गरम करतो, व संध्याकाळी सर्व दुध काढुन घेतो. परंतु भांडयाला थोडीसी मलई लागलेली असते. म्हणजेच एक निर्जीव वस्तू आपला अधिकार काढुन घेते. व तुम्ही आम्ही तर चालती फिरती माणसे आहात. तर यामध्ये कोणती मोठी गोष्ट आहे. तर हे एक चोरीचे एक उदाहरण मी आपणांस सांगतो, चोंरीवर नियंत्रण ठेवणे अतिशय गरजेचे आहे.

**<u>मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :–</u>** अलीबाबा चाळीस चोरांचा हा मामला आहे का?

**<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–</u>** नाही, नाही असे काही नाही. दुसरा आहे, मिळकत कर, जेव्हा पुर आला होता, तेव्हा ३० टक्के उल्हासनगर शहर पाण्यामध्ये बुडले होते. त्यामुळे सुध्दा मिळकत कराची वसुली कमी झाली आहे. तर माझे म्हणणे असे आहे की, आपण जी लक्षवेधी सुचना मांडली आहे, त्यामध्ये वसुलीचे प्रमाण कमी होण्यामध्ये ही सुध्दा काही कारणे आहेत, व प्रशासनाने जी कारवाई केली पाहिजे,...............

**<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :–</u>**मा. महापौरजी, मला असे वाटते की, प्रत्येक सदस्यांनी आपापले विचार मांडले आहेत की अमुक एका कारणामुळे जकात वसुली, मिळकत कर वसुली, पाणीपट्टी वसुली कमी झाली आहे. माझ्या मते बरीचशी चर्चा झाली आहे. आता मला असे वाटते की, ज्यांच्याकडे जकात विभागाचा कार्यभार आहे. जे कोणी अधिकारी आहेत, भलेही ते लहान असोत, लिपिक असोत, उपायुक्त असोत, जे कोणी दोषी आहेत त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. त्यांना निलंबित केले जावेत. धन्यवाद.

**<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>** मा. महापौर महोदया, शेवटचे एक सांगु इच्छितो, श्री. दिलीप लालवानी यांनी माझा उल्लेख करुन सांगितले की, जोडे मारले, जोडे कुठे मारले? ते सुध्दा शाल–जोडे, असे काही नाही. हेतु असा होता की, प्रशासनावर नियंत्रण असले पाहिजे. महापौरांनी जी बैठक घेतली त्यानंतर लागोपाठ बैठका घेवुन, बैठकानंतर जकात वसुली आणखी कमी झाली आहे, त्यामुळे लक्ष वेधणे हा आमचा हेतु होता. लक्षवेधी त्याचसाठी मांडली जाते. आमचा जो उद्देश होता तो आम्ही पार पाडला. कुणाला शिंतोडे उडविणे, कुणाला जोडे मारणे हा आमचा उद्देश नव्हता. कुणी आपली जबाबदारी विसरत असेल तर तीची जाणीव करुन देणे हे आमचे कर्तव्य आहे. यासाठी प्रशासनावर नियंत्रण ठेवावे. प्रशासन जे काम करत नाहीत, जर प्रशासनाचे अधिकारी किंवा कर्मचारी जे या जकात चोरीमध्ये सामिल आहेत, चोरी होत आहे ते जाहिर आहे. आम्ही ते मान्यही केले. श्री. मोकल साहेबांनी म्हटले सर्व चोर आहेत, म्हणजेच चोरी होत आहे हे मान्य केले. जसे श्री. दिलीप लालवानी यांनी सांगितले की, सचिव साहेबांच्या अध्यक्षतेखाली याची चौकशी केली जावी. श्री. लाल पंजाबी यांनी सांगितले की, एकवेळ अशी होती की जकात वसुली कमी झाली होती म्हणुन सचिव साहेबांकडे जकात वसुलीचे काम सोपविले होते. त्याप्रमाणे आमची एक सुचना आहे की, पुन्हा एकदा त्यांच्याकडे या कामाचा कार्यभार सोपविला तर या प्रकरणाची चौकशी सुध्दा होईल, ही आमची सुचना आहे. चौकशी सुध्दा त्यांच्या अध्यक्षतेखाली केली जावी. व उल्हासनगरची जकात वसुली वाढविण्याकामी मदत होईल.

**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–**जकात वसुली कशी वाढविली जाईल याचेही प्रयत्न केले जावेत.

**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :–** मा. महापौरजी, श्री. धनंजय बोडारे साहेबांनी म्हटले की, चोरीचा मुद्दा मी स्विकृत केला. नाही, उदाहरणादाखल मी म्हटले आहे. दुनिया मध्ये चोर कोण नाही. ऑफिसमधुन एक पेपर आपण घेवुन जातो ती सुध्दा चोरी आहे. चोरीचे विश्लेषण केल्यास लहानसी गोष्ट सुध्दा चोरी ठरु शकते.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** मा. महापौरजी, आज लक्षवेधीचा मुद्दा महासभेमध्ये अतिशय जोरदारपणे मांडण्यात आला. व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती जी खराब आहे, याविषयावर सुध्दा बरीच चर्चा झाली. व त्याचबरोबर जकात वसूलीमध्ये जी चोरी होत आहे त्याबाबत सुध्दा बरीच चर्चा झाली आहे. मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो की, आम्हां नगरसेवकांची जी कामे आहेत भलेही महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कशीही असो, स्थायी समितीमध्ये व महासभेमध्ये जो अर्थसंकल्प मंजुर करतो तो केवळ यासाठी मंजुर करत नाही की कर्मचा–यांचा पगार, एमआयडीसीला पाण्याचे बिल, विद्युत पुरवठयाचे देयक, व इतर सुविधा यासाठीच नसुन या बरोबर शहरामध्ये जी तातडीची कामे करावयाची आहेत, ती जी मंजुर होवुन पडली आहेत, ती सुध्दा होणे अतिशय आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेतील सत्ताधारी पक्ष असोत, किंवा विरोधी पक्ष असोत त्यांनी उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहुन आपल्या नगरसेवक निधीची कपात केली आहे. १९९७ पासुन २००२ पर्यंत नगरसेवक निधी १० लाख रुपये होता त्यानंतर २००२ पासुन ४–४ लाख रुपये होता. आता यावर्षी नगरसेवक निधी फक्त २–२ लाख रुपये केला आहे. त्याचबरोबर जो महानगरपालिकेचा सर्वसाधारण निधी होता, ४–४, ५–५ कोटीचा त्याची सुध्दा आम्ही अर्थसंकल्पामध्ये कपात केली आहे. १९० कोटीचा जो अर्थसंकल्प तयार केला जात होता, तो यावर्षी आम्ही १६१ कोटीचा केला आहे. त्यावर २ टक्केच्या हिशोबाने नगरसेवक निधी २ लाख रुपये झाला आहे. वेळोवेळी आम्हीही महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहून सहकार्य दिले आहे. परंतु विरोधी पक्षांचे म्हणणे आहे की, शासन ढिल्ले आहे, शासन ढिल्ले नाही. प्रशासन चालविणे, हे प्रशासनाचेच काम आहे. श्री. चंदाराम मोकल यांनी असे नाही म्हटले की, चोरी होत आहे. मी आपणांस एका उदाहरणाची आठवण देवु इच्छितो, श्री. सोनवणे साहेब जेव्हा आयुक्तांच्या आसनावर बसले होते, तेव्हा आरोटे साहेब जकात विभागाचे उपायुक्त होते ते म्हणत की, जकात विभागामध्ये अडीचसे कर्मचारी आहेत. मी तर त्या सर्वांना संशयाच्या नजरेने बघतो. कोणताही कर्मचारी मला बरोबर वाटत नाही. हे उपायुक्त साहेबांचे महासभेतील म्हणणे आहे, तर फिरुन फिरुन गोष्ट त्या मुद्दयावर येते. शिवसेना–भाजपाने आपल्या कार्यकालावधीत जकात वसुलीचे खाजगीकरण केले. आम्ही लोकांनी सुध्दा सहकार्य दिले होते. त्यावेळी ते काम फारच चांगले चालले होते. परंतु न जाणे शहरामध्ये असे काही वातावरण निर्माण केले गेले, जकात वसुलीचे खाजगीकरण रद्द झाले पाहिजे. जकात वसुलीचे काम महानगरपालिकेने चालविले पाहिजे. त्यानंतर जेव्हा पासुन महानगरपालिका जकात वसुलीचे काम करत आहे, तेव्हापासून आपण पाहत आहोत दिवसेंदिवस जकात वसुली कमी होत चालली आहे. फिरुन फिरुन या मुद्दयाकडे विषय येतो की, खाजगीकरणामुळे जकात वसुलीची रक्कम निश्चित स्वरुपाची तर होती? आता अडीचशे ते तीनशे कर्मचारी जकात वसुलीकामी दिलेले आहेत. त्यामुळे मिळकत कराची वसुली कमी झाली आहे. पाणी पट्टीची वसुलीही कमी झाली आहे. मा. महापौरांचे व सर्व पदाधिका–यांचे एक–एक स्विय सहाय्यक कमी करुन वसुलीसाठी पाठविले आहेत. आज महानगरपालिकेमध्ये हे झाल्यानंतरही मिळकत कराची वसुली वाढत नाही, ती दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे. तर या गोष्टी लक्षात घेता, जसे श्री. नारायण पंजाबी यांनी म्हटले, मी त्यांच्या मताशी सहमत आहे. कधीही कर्मचा–यास पकडण्याऐवजी, विभागप्रमुखास पकडले पाहिजे. कारण की, जे आमचे उपायुक्त आहेत, ते प्रतिनियुक्तीवर असल्याने त्यांना आम्ही निलंबित करु शकत नाहीत. परंतु जे आमच्या महानगरपालिकेचे अधिकारी आहेत श्री. गर्जे त्यांना त्वरीत निलंबित केले जावे व त्यांच्या विरुध्द चौकशी नेमली जावी. जेणेकरुन जकात वसुलीत वाढ होईल. जसे आता लहान–सहान गोष्टी बाबत शासनास जबाबदार धरले जाते. जकात वसुली कमी व्हावी असा सत्ताधारी पक्षाचा कोणताही हेतु नाही. ना आमचा त्याच्याशी काही संबंध आहे. ना आम्ही कधी एखादया जकात लिपिकासाठी हस्तक्षेप केला, हे काय आहे? याची बदली का झाली? हे काम प्रशासनाचे आहे. लोकनियुक्त प्रतिनिधीचे नाही. कोणता कर्मचारी कोठे नेमायचा हे आयुक्त साहेब निश्चित करतात. या गोष्टी लक्षात घेता, मला असे वाटते की, या सर्व लोकांना जर असे वाटत असेल की, मिळकत करा बरोबर पाणी पट्टीची वसुली वाढावी व जकात विभागामध्ये वसुलीसाठी आमचे जे ३०० कर्मचारी व्यस्त आहे, व जेव्हापासुन महानगरपालिका जकात वसुलीचे काम करत आहे तेव्हा पासुन महानगरपालिकेवर ४ कोटी रुपयाचे कर्जाचे ओझे वाढले आहे. आमचे जे कर्मचारी

आहेत, त्यांचा १०० टक्के पगार आम्ही देतो, कोनार्क, मोनार्च जे कोणी आमचे कर्मचारी घेत होते, तेव्हा १०० टक्के कर्मचा–यांचा पगार महानगरपालिकेस देत होते. दुसरे जकात नाक्यांवरील विजेचे जेवढे काही बिल येते ते आता महानगरपालिका भरते या अगोदर ते ठेकेदार भरत होता. आज दुरध्वनीची देयके महापालिका अदा करत आहे. या अगोदर ती ठेकेदार अदा करत होता. तसेच जे संगणक आहे, पावती पुस्तके, रजिस्टर व इतर स्टेशनरी आहे तीचाही दोन कोटी रुपयांचा जो खर्च आहे आज कमीत कमी या ४ कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. त्याशिवाय या सभागृहात ५–६ वेळा जकातीचा मुद्दा उपस्थित झाला आहे. कुण्या एका नगरसेवकाने म्हटले की, आयुक्त साहेब असे म्हणत होते की, याबाबत जकात वसुली खाजगीकरणाचा प्रस्ताव सभेपुढे आणतो–आणतो. आमच्यासमोर कधी आला नाही. प्रशासनाने जर आमच्या समोर असा प्रस्ताव आणला एमआयडीसीचे पैसे वेळेवर भरण्यासाठी, कर्मचा–यांचे पगार वेळेवर देण्यासाठी, शहरात विकास कामे होण्यासाठी तसेच व्यापा–यांच्या समस्या कमी करण्यासाठी, त्यांची शिष्ट मंडळे कमी करण्यासाठी, जर जकातीचे खाजगीकरण सर्व संमतीने होत असेल तर त्यावरही विचार करता येइल. जेव्हापासुन महानगरपालिका जकात वसुलीचे काम करत आहे तेव्हापासुन व्यापारी त्रस्त आहेत. या गोष्टी लक्षात घेता जर खाजगीकरणाचा निर्णय घेतला जात असेल तर तो अतिशय चांगला आहे. व मी जो प्रस्ताव मांडला आहे, त्याबाबत मला असे वाटते की, हा लोकनियुक्त प्रतिनिधींचा अधिकार आहे. एखादया अधिका–याला निलंबित करुन त्याच्याविरुध्द खातेनिहाय चौकशी बसवुन महासभेपुढे त्याचा अहवाल मागविणे, जसे आमच्या पाटील साहेबांनी म्हटले की, कोण–कोण दोषी आहे, हे महासभेसमोर आणले जावे. तसेच आमच्या समोर हा प्रस्ताव आणला जावा व चौकशी अधिकारी नेमला जावा व यामध्ये कोण–कोण सामिल आहे, जो सामिल असेल, जो नसेल त्यास त्याने घाबरण्याची जरुरत नाही. तर या गोष्टी लक्षात घेता, मेहरबानी करुन हा प्रस्ताव पारीत केला जावा व चौकशी अधिकारी नेमला जावा. धन्यवाद.

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):–मा. महापौर, उप–महापौर, व सर्व सन्माननिय नगरसेवक आता जी चर्चा झाली आहे, त्याबाबतीत मी सांगु इच्छितो की, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजुक आहे, जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव या अगोदरच्या आयुक्तांनी पाठविलेला आहे. त्यास मंजुरी मिळेल असे मला वाटते. ती मिळाली तर आपले उत्पन्न बरेच वाढेल असे मला वाटते. व आपल्या ज्या काही अडचणी आहेत त्या आपण सहजपणे सोडवु शकु व जी देयके अदा केली जातात त्याबाबत आताच मी लेखा विभागाच्या अधिका–यांना विचारणा केली. त्यांनी सांगितले की, काही देयके अदा करायची राहिली आहेत. ज्या अत्यावश्यक सेवा आहेत, त्यांची देयके अगोदर अदा केली जातात. पाणी व विदयुत देयके ही प्रथम व अग्रक्रमाने अदा केली जातात. म्हणुन जकात वसुलीचे खाजगीकरण करणे हे अतिशय जरुरीचे आहे.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–साहेब हिंदीत बोला, हिंदीत बोला..........

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):– हिंदी मला बरोबर येत नसल्यामुळे बोलण्यामध्ये मध्ये मध्ये थोडे इंग्रजी शब्द येतील. जकात खाजगीकरणाचा जो प्रस्ताव आहे, तो स्थायी समितीपुढे आणण्यात येणार आहे व स्थायी समितीमध्ये तो मंजुर होईल अशी मला अपेक्षा आहे.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–जकात वसुलीमध्ये चोरी होते याबाबत आम्ही लक्षवेधीद्वारे लक्ष वेधले आहे, याबाबत आपण उत्तर दिले आहे की, जकात वसुलीचे खाजगीकरण, हा खाजगीकरणाचा मुद्दा नाही. तर आपण प्रशासन कसे चालु इच्छिता?

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):–होय, सांगतो.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– नाही, नाही, मी असे म्हणतो की, तुम्ही सांगता ते वेगळे आहे, याच्यावर पर्याय म्हणजे तुम्ही प्रशासन चालवु शकत नाही.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :– दोषी अधिका–यांना सजा दया.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– अगोदरच्या आयुक्तांनी सांगितले की, खाजगीकरणाद्वारे येणा–या देकारापेक्षा महापालिका अधिक रक्कमेची जकात वसुली करु शकते असे त्यांनी ठामपणे सांगितले होते, आणि आता तुम्ही सांगतात की, जकात वसुलीचे खाजगीकरण हा एकमात्र मार्ग आहे. तो मार्ग असु शकेल पण

तोच मार्ग आहे असे नाही. खाजगीकरणाच्या कार्यवाहीला दोन महिने जातील, तीन महिने जातील, तोपर्यंत तुम्ही काय करणार अशीच चोरी होवू देणार का?

,

मा. आयुक्त (श्री. डी.एस. पाटील):—जकात वसुलीचे खाजगीकरण आपण करणारच आहोत. परंतु जे दोषी आहेत, कर्मचारी किंवा व्यक्ती त्यांच्यावर कायदयानुसार कारवाई केली जाईल. याअगोदरही मी म्हटले आहे. दोषी व्यक्तींवर कारवाई होईलच यामध्ये काही संदेह नाही.

मा. महापौर :—सन्माननिय सदस्यहो, ..........

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— महापौर महोदया, श्री. गर्जे काही बोलू इच्छितात.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— त्यांच्यावर आरोप लावले आहेत, त्यांना सभागृहात बोलु दिले जावे. एवढेच आमचे आपणाकडे निवेदन आहे. आरोप एकतर्फी लावता कामा नयेत. ते बरोबर आहेत की चुकीचे आहे ते त्यांना सांगु दया.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— आरोपीला कधी बोलु दिले जात नाही.

मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सभागृहापुढे त्यांना खुलासा करु दिला पाहिजे. काय बरोबर आहे, काय खोटे आहे, त्याबाबत त्यांना बोलु दिले जावे.

मा. महापौर :— जेव्हा चौकशी होईल तेव्हा त्यांना बोलु दिले जाईल. कृपया सर्वांनी बसुन घ्यावे. सन्माननिय सदस्यहो, ही जी स्थगित सभा आहे, या सभेपुढे लक्षवेधी सुचना मांडण्यात आली होती. आजची ही शहराची ज्वलंत समस्या आहे. आमच्या सभागृहातील विरोधी पक्ष नेत्याने जी आकडेवारी सादर केली की मागील वर्षी किती जकात वसुली होती व यावर्षी किती आहे, त्याबाबत सांगतांना मला अतिशय दु:ख होत आहे की मीच मागील वर्षाचे व या वर्षाचे जकात वसुलीचे आकडे मागवुन घेतले होते. व हे पाहून मला अतिशय आश्चर्य वाटले की, मागील वर्षी आम्ही जी जकात वसुली वाढविली होती त्या हिशोबाने जी जकातीची वसुली व्हायची होती तेवढी झाली नाही. नियमित स्वरुपाची जी १० टक्के वाढ व्हावयास पाहिजे होती ती दिसुन येत आहे. तसेच आपण जे म्हणता की, जे जकात दर वाढविले आहे त्यामध्ये जे २० टक्के वसुली वाढवावयास पाहिजे होती मला त्याबाबतीत अंदाज नाही किती टक्के जकात वसुली वाढते ती. परंतु ती जी रक्कम होती ती बिल्कुल वाढलेली नाही. आता प्रश्न असा निर्माण होतो की, एवढी जी कमी जकात वसुली होत आहे, ती का होत आहे? आम्ही लोकांनी वेळोवेळी बैठकाही घेतलेल्या आहेत. व या गोष्टीकडेही लक्ष दिले आहे. परंतु तरीही आजच्या तारखेला या निर्णयापर्यंत पोहोचलो आहोत, आमचे मागील आयुक्त श्री. आर.के. सोनवणे जे होते, त्यांनी आमच्या बरोबर ब—याचवेळा बैठका घेतल्या होत्या. व त्यांनी आम्हांस जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यासाठी ब—याचवेळा सांगितले होते. एवढे सुध्दा सांगु शकते की, त्यांनी बराच दबाव आणला होता की, जकात वसुलीचे खाजगीकरण केलेच पाहिजे. कारण की, आमच्या येथिल जे दोनशे—तीनशे कर्मचारी आहेत, ते तेथे व्यस्त आहेत. परंतु शहराची व सभागृहाची भावना लक्षात घेता, आम्ही लोकांनी या मुद्दयास स्पष्टपणे नकार दिला होता व आयुक्तांना सांगितले होते की, जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव आपण आमच्याकडे पाठवु नका. परंतु त्यानंतरही मागील काही दिवसांपासुन त्यांनी आपला प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला आहे. आता प्रश्न असा निर्माण झाला आहे की, जकात वसुली एवढी कमी झाली आहे, निश्चित आहे की, जकात वसुलीमध्ये चोरी होत असेल काही गोष्ट अशा आहेत की, शहरामध्ये ८५५ अनाधिकृत इमारतींचा मुद्दा चालु आहे, त्यामुळे शहराचा व्यापार कमी झाला आहे. येणा—या कालावधीमध्ये काय होईल? एमआयडीसीचे पाण्याचे बिल आम्ही भरु शकत नाही. जेव्हा पाणी कपात होते तेव्हा आम्ही मंत्रालयाचे दरवाजे ठोठावतो व माझी स्थिती आता अशी झाली आहे की, श्री. अजितदादा पवार हे मला जेथे कोठे दिसतात तर ते सर्वात प्रथम विचारतात की, भाभी आपण पाण्याचे पैसे भरले? चेक दिला? आपले उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांना भेटण्यासाठी आम्ही जेव्हा कधी जातो, त्यावेळेस ते सर्वात प्रथम हीच विचारणा करतात की, आपण पाण्याचे पैसे भरले का? तर ही आमच्या शहराची स्थिती आहे. व येणा—या कालावधीमध्ये सांगु शकत नाही काय होवु शकते ते आम्ही कसा सामना करु शकु. ८५५ इमारतींचे प्रकरण अर्धवट स्थितीत पडुन आहे. अशा परिस्थितीत आम्ही एमआयडीसीची पाण्याची बिले वेळेवर भरु शकणार नाही. कर्जाचे हप्ते भरु शकणार नाही. पाण्याच्या चालु

बिलाची रक्कम सुध्दा आम्ही जर भरु शकत नसु. कर्जाची गोष्ट तर सोडुन दिली. परंतु चालु बिलाची रक्कम जर आम्ही भरु शकत नसु तर जाहिर आहे पाण्याची कपात होईल. पहिल्या पासुन ब—याचशा समस्या आमच्या शहरात आहेत. त्यानंतर जर पाण्याची आणखी कपात झाली तर आपण अंदाज लावु शकतात की आपणांस किती समस्यांचा सामना करावा लागेल. व किती अडचणी सहन कराव्या लागतील. आपण सर्वांनी आपले—आपले विचार व्यक्त केले आहेत. आमचे सन्माननिय सदस्य श्री. दिलीप लालवानी यांनी सार्वजनिक साफसफाईचा मुद्दा उपस्थित केला. या अगोदरसुध्दा सार्वजनिक साफसफाईचा मुद्दा अनेक वेळा उठला आहे. विरोधी पक्षांनी सुध्दा हा मुद्दा अनेकवेळा उपस्थित केला आहे, त्याचबरोबर सत्ताधारी पक्षांनी सुध्दा हाच मुद्दा उपस्थित केला आहे. या अगोदर जी संस्था आपल्या शहरातील सार्वजनिक साफसफाईचे काम या ठेकेदारापेक्षा निम्म्या दराने करीत होती. आमचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांनी हा सार्वजनिक साफसफाईचा ठेका एका संस्थेला दिला आहे. परंतु त्याचे जे परिणाम आहे, ते शहराला समाधानकारक नाही. सफाईच्या बाबतीत सर्व नाराज आहेत. तर मी आयुक्त साहेबांना सांगु इच्छिते की, सध्या ॲन्थोनी नावाच्या ठेकेदाराला जो ठेका दिला आहे त्या ठेकेदाराला आपण बोलावुन त्यांच्याशी जो करारनामा केला आहे, तो एकवेळ चांगल्याप्रकारे नजरेखालुन घालावा. व त्यातुन असा काही जर मार्ग निघत असेल की, हा ठेका रद्द करु शकत असेल तर त्यामुळे आमच्या शहराचा सार्वजनिक साफसफाईवरील अर्धा खर्च वाचेल. त्या संस्थेला बोलावुन ब—याचवेळा सांगण्यात आले आहे, ठेकेदाराबरोबर ब—याचवेळा बैठका झाल्या, उपोषणे झाली, मागील वेळेस काही लोक उपोषणास बसले होते. आम्ही श्री. आर.के. सोनवणे यांच्याकडे जावुन उपोषण कर्त्यांचे उपोषण मागे घ्यावे लागले. त्यावेळी ठेकेदाराने खात्री दिली की, अशी हमी दिली की, आम्ही आमच्या कामगारांना ठेक्याच्या हिशोबाने पगार देवु. परंतु मागील सभेच्या वेळी पुन्हा एक पत्र प्राप्त झाले की, ठेकेदाराने त्या हिशोबाने कामगारांना पगार दिला नाही. आयुक्त साहेब आपण नव्याने आला आहात. हे सभागृह आपणांस पुर्ण सहकार्य देईल. आपण या बाबीकडे पुर्ण लक्ष देवुन काय निर्णय घेता येईल तो घ्या. जेणेकरुन आमच्या शहरात जकात वसुलीचे उत्पन्न वाढेल. संपुर्ण सभागृहाचे असे मत आहे की, जकात विभागाचे जे सहा. आयुक्त आहेत त्यांना निलंबित करुन त्यांच्याविरुध्द खातेनिहाय चौकशी बसविली जावी जेणेकरुन जकातीचे उत्पन्न वाढेल, आमचे विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे साहेबांनी सांगितले की, एकेक महिन्यामध्ये कधी २० लाख तर कधी २५ लाख सुध्दा चोरी झाली आहे. व ब—याचवेळा आमच्या असे निदर्शनास आले आहे की, शिवसेनेचे सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्र चौधरी व रमेश चव्हाण हे अनेकवेळा जकात चोरीची प्रकरणे शोधुन काढतात. जकातीचे उत्पन्न वाढविण्यासाठी ते लोक प्रयत्न करतात. म्हणुन जकात चोरी होते हे जाहिर आहे. जकातीचे उत्पन्न कमी होणे हे शहर कधीही सहन करणार नाही. उत्पन्नाच्या बाबतीत आम्ही अतिशय नाजुक स्थितीतुन जात आहोत. या सर्व गोष्टी लक्षात घेवुन आपण योग्य तो निर्णय घ्यावा व सभागृहाचे जर हे एक मत असेल की, आपण जकातीचे खाजगीकरण करावे. त्यामध्ये शहरास काय त्रासाचे होणार आहे? शहरातील जे चांगले व्यापारी आहेत ते जकात खाजगीकरणामुळे जकात भरतीलच जसे ते महानगरपालिकेकडे जकात कर भरत होते त्याप्रमाणे परंतु असे थोडे फार लोक आहेत की, जे जकात चोरी करतात. ज्यांच्यामुळे जकातीचे उत्पन्न कमी येत असेल, त्यांनाच त्रासाचे होईल. मला असे नाही वाटत की, शहरातील सर्व व्यापारी जकात खाजगीकरणाला विरोध करतील. जकात कर तर त्यांना भरायचाच आहे व ते भरतातही. या सर्व गोष्टी लक्षात घेता आमचे आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे आहे. त्यावर आम्ही लक्ष देवु, जकातीच्या खाजगीकरणामुळे एवढे काही फायदे होणार आहेत की, आपल्या महापालिकेचे जे ४ कोटी रुपये स्टेशनरी, टेलिफोन व विद्युत बिलावर खर्च होतात ते वाचतील. आमचे दोन—तीनशे कर्मचारी जे जकात विभागात काम करतात ते इतर विभागांमध्ये काम करतील. आता आपणांस असे दिसुन येईल की, मिळकत कर व पाणी पट्टीची वसुली पुर्णपणे ठप्प झाली आहे. त्याबाबत असे माहित पडते की, आपणाकडे वसुलीसाठी कर्मचारी वर्ग नाही. थोडया दिवसापुर्वीची गोष्ट आहे, दिवाळीची वेळ होती, आम्ही त्यावर अर्थसंकल्पावर नजर टाकली, पाण्याचे बिल आपण भरु शकत नाही, तसेच जे ठेकेदार कामे करतात त्यांच्याबाबत आपण जी तक्रार केलीत की त्यांना देयक रक्कम अदा करत नाहीत त्यामुळे ते कामे करत नाहीत. दिवाळीचा महिना लक्षात घेता आम्ही एक बैठक घेतली सर्व विभागप्रमुखांना बोलविण्यात आले. व असे नियोजन केले त्यावेळी त्यांचेही असे म्हणणे होते की, आमच्याकडे कर्मचारी वर्ग अपुरा आहे. मिळकत कर व पाणी पट्टी वसुलीसाठी कर्मचारी नाहीत. तर या सर्व गोष्टी लक्षात घेता जेवढे काही समितीचे आमचे जवेढे काही सदस्य आहेत, आमचे सभागृह नेता तसेच माझ्याकडीलही एक—दोन कर्मचारी एक—दोन महिन्यासाठी घ्या म्हणुन मी सांगितले. हे सर्व कर्मचारी आमचे श्री. हरेश ईदनानी यांना देण्यात आले. आमचे असे नियोजन होते की, त्या महिन्यामध्ये आमचे थोडे फार उत्पन्न वाढावे. ठेकेदारांनाही थोडीफार देयक रक्कम अदा करता यावी. याचा विचार करुन आम्ही आमच्याकडील सर्व कर्मचारी वर्ग श्री. हरेश ईदनानी यांना दिला

होता जेणेकरुन वसुली अधिकाधिक व्हावी. तर या सर्व गोष्टी लक्षात घेता, सभागृहाचे मत सुध्दा असे आहे की, जकात चोरी बंद केली जावी. मागील ब—याचशा महिन्यापासुन आपणांस असे दिसुन येईल की, उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ बसत नाही. व वसुली फारच कमी झाली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता माझे सुध्दा आपणा सर्वांना निवेदन आहे की, आपण जकातीचे खाजगीकरण करावे, त्यासाठी आपण सुध्दा सहकार्य दयावे. धन्यवाद.

<u>मा. सचिव :—</u> लक्षवेधी सुचना क्र. २.....

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

सुचक : श्री राजेंद्र चौधरी
अनुमोदक : श्री रमेश चव्हाण

**विषय :** पुरग्रस्त नागरिकांना वाटप करण्यात आलेल्या मदतीची माहिति व त्यावर करण्यात आलेल्या आकडेवारीची माहिती मिळणेबाबत....

उपरोक्त विषयानुसार माहे जूलै, ऑगस्ट, २००५ मध्ये अतिवृष्टी व पुरपरिस्थितीमूळे शहरातील बहूतांश भाग पुराचे पाण्यामुळे बाधीत होवून अन्नधान्य कपडालत्ता चिजवस्तू महत्वाचे कागदपत्र यांचे तसेच अनेक घरे पाण्याखाली जावून पूर्णपणे उध्वस्त होवून तूटलेली आहेत व मोठया प्रमाणात नुकसान होवून जिवित व वित्तहानी झाली आहे. अश्या पुरपरिस्थितीचे वेळी पुरग्रस्त नागरीकांना मदत म्हणुन अन्नधान्य/चादर चटई/औषध उपचार/जेवण इत्यादीचे वाटप करण्यात आले याबाबत केलेल्या खर्चाची माहिती मिळावी म्हणून महासभेत प्रश्न उपस्थित केला होता. परंतू प्रशासनाने केलेल्या खर्चाची आकडेवारी उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी सदरील विषयावर चर्चा होवून आकडेवारी (खर्चाची रक्कम) उपलब्ध व्हावी ही विनंती.

---

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :—</u>मा. महापौरजी, आमच्या सभागृहाचे सदस्य श्री. महेंद्र मुलचंदानी यांच्या मुलाचे लग्न आहे. त्या निमित्त निमंत्रण पत्र सर्वांना वाटप करण्यासाठी मी आपणाकडुन परवानगी मागु इच्छितो. ती दिली जावी.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—</u> मा. महापौरजी, मी आपणांस एक निवेदन करते की, श्री. गर्जे साहेब बोलु इच्छितात, त्यांना बोलण्याची संधी दिली जावी.

<u>मा. महापौर :—</u> दुसरी लक्षवेधी संपल्यानंतर परवानगी दिली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u> मा. महापौरजी, पुरग्रस्तांना वाटप करण्यासाठी देण्यात आलेल्या मदतीच्या आकडेवारीची लक्षवेधी सभागृहात मांडलेली आहे. पुरग्रस्तांना अन्नधान्य, चटई, चादरी, औषधे व तयार केलेले अन्न इत्यादी वाटण्यात आले. २६ जुलै रोजी आलेल्या महापुरामुळे ज्यांच्या घरादाराचे नुकसान झाले अशा लोकांना महापालिकेतर्फे वाटप करण्यात आलेल्या वस्तुंचा खर्च किती झाला याची मागणी महासभेच्या प्रश्नोत्तराद्वारे आम्ही केली होती. परंतु २६ जुलै पासुन आतापर्यंत या प्रश्नाचे उत्तर आम्हाला मिळाले नाही. आज लक्षवेधी असतांनाही त्याचे उत्तर मिळत नाही. या विषयाबाबत मला एका गोष्टीची आठवण होते या सभागृहाचे जे एक सदस्य होते श्री. मनोहर जेसवानी हे नेहमी असा एखादा प्रश्न आल्यानंतर एक शेर ऐकुन दाखवायचे की, दाल मे कुछ काला है, या पुरी दाल काली है । त्यानुसार दाळीत काही काळे आहे की, पुर्ण दाळच काळी आहे? म्हणजेच या प्रकरणात काही भ्रष्टाचार झाला आहे की हे पुर्ण प्रकरणच भ्रष्टाचाराचे आहे? याबाबत कोणी अधिकारी उत्तर देईल तर बरे होईल.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>मा. महापौर, उप–महापौर, मा. आयुक्त व सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्य श्री. चौधरी साहेबांनी जी लक्षवेधी सुचना मांडली आहे, पुरपरिस्थितीच्या काळात महानगरपालिकेच्या वतीने नागरीकांना जी मदत सामुग्री देण्यात आली त्याची पुर्ण माहिती आमच्याकडे आहे. पामोलिन तेल, तांदुळ, चनादाळ, मिठ, चटई, चादर, सफाई कामगारांना मास्क, घमेले, फावडे, बॅटरी, टयुब इत्यादी दिले गेले, यावरील एकुण खर्च ५६ लाख, १३ हजार, ८६८ रुपये आहे, या व्यतिरिक्त काही औषधे खरेदी केली होती. ती औषधे अद्यापही सपंलेली नाहीत, ती अजुनही महापालिकेच्या वतीने वापरली जातात, या औषधांवरील खर्च आहे ३३ लाख, ३४ हजार, २३७ रुपये तर अशा प्रकारचा खर्च आहे. काही खर्च लेखा विभागाकडील आहे, त्यामुळे आकडयांमध्ये थोडी फार वाढ होवु शकते. परंतु हा एकंदरीत खर्च आहे तो बाबनिहाय आपणाकडे उपलब्ध आहे. त्याची संचिकाही आपणाकडे आहे. सन्माननिय सदस्यास मी लेखी स्वरुपी उत्तर देईन. व संचिका जर पाहायची असेल तर ती सुध्दा त्यांच्यापुढे ठेवेन.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त आता श्री. लोणारे साहेबांनी जी आकडेवारी आता येथे दिली, मला अतिशय दु:खाने म्हणावे लागत आहे कीं, लक्षवेधी ब–याच अगोदर दिलेली आहे, आता जी आकडेवारी त्यांनी आम्हांला वाचुन दाखविली. ती त्यांना लेखी देण्यामध्ये काय अडचणीचे होते? असा काय राज आहे की ते लेखी देवु शकत नाहीत.?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>राज काही नाहीं, राज असता तर मी आकडेवारी सांगितली नसती.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> आता सुध्दा आम्हांला असे वाटते की, अशा काही बाबी आहेत त्या आम्हांला सांगितल्या नाहीत. त्यांनी बाबनिहाय माहिती मागितली आहे. आता आपण सांगितले ते दिले, अमुक दिले, तमुक दिले. आता आपण सांगता की, या बाबींवर ५६ लाख रुपये खर्च झाले. जेव्हा एक महिना अगोदर आपणांस लक्षवेधी सुचना दिली आहे तर तीचे उत्तर आपण या अगोदरच दयावयास पाहिजे होते ना? उत्तर देण्यामध्ये आपण का टाळाटाळ करत आहात? असे वाटते कीं, लक्षवेधीची आपणांस जबाबदारी वाटत नाही. प्रश्न दिला आहे. लक्षवेधी दिली आहे. त्यानंतरही अर्धे उत्तर देतात कीं, ५६ लाख रुपये खर्च झाले. हे ५६ लाख कुठे खर्च झाले? कुठे गेले? यांचा जो प्रश्न आहे त्याचे उत्तर दयायचे नाही का? आपण असेच अर्धवट उत्तर देतात व म्हणता कीं, लेखा विभागाकडुन काही आकडेवारी येणार आहे. ऑगस्ट महिन्यातील प्रकरण आहे, आता डिसेंबर महिना आहे. या ५ महिन्यामध्ये लेखा विभागाकडुन आपणांस माहिती मिळालेली नाही?याच्यावरुन तर असे वाटते की, यामध्ये फार मोठी गडबड घोटाळा आहे.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>याबाबत मी सांगु इच्छितो की, चटई, चादर इत्यादी दिल्या आहेत. हे साहित्य नगरसेवकाच्या मार्फत दिले आहे. त्याची सुध्दा यादी आमच्याकडे आहे.

<u>मा.सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> मोघम स्वरुपाचे उत्तर देवु नका. आपण सविस्तर लेखी उत्तर दिले पाहिजे. आपण जे म्हणता ५६ लाख रुपये खर्च केले ते आम्ही कसे मान्य करणार? आपणांस एकेक बाबीवरील खर्च दिला पाहिजे. किती माल आला? तो कोठे वाटप केला? कुठे जास्त वाटप केला? कुठे कमी केला? याची लक्षवेधीनंतर सुध्दा माहिती देत नाही?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>जेवढे साहित्य मागविले होते ते सर्व वाटप केले आहे. भांडार विभागामध्ये त्याची सर्व माहिती उपलब्ध आहे. सन्माननिय सदस्यास मी लेखी स्वरुपी उत्तर देईन. याशिवाय मी हेही सांगु इच्छितो की, माहितीच्या अधिकारान्वये प्रत्येक व्यक्तीस माहिती मागण्याचा अधिकार आहें. याबाबतची पुर्णच्या पुर्ण संचिका मी आपणासमोर ठेवेन.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> लक्षवेधीचे उत्तर आपणांस सभागृहात दयायचे आहे. सर्व सदस्यांना आपणांस माहिती दयायची आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> मा. महापौरजी, ...............

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय)</u> :–आपणांस कोणत्या खर्चाची माहिती पाहिजे? मला सांगा मी ती सांगतो.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u> मा. महापौरजी यांनी सांगितले की, चटई, चादर प्रत्येक नगरसेवकांमार्फत वाटप केली आहे. भिक मागण्यासारखे मी यांच्या मागे फे–या मारत होतों, मला त्यांनी एक चटई सुध्दा दिली नाही. पुरातील सर्वात जास्त झल माझ्या प्रभागातील लोकांना बसली होती. ५६ लाख रुपये, पुरग्रस्त प्रभाग किती होते? अंदाजे २२ असतील, त्या हिशोबाने प्रत्येक नगरसेवकास अडीच लाख रुपयाची मदत साम्रुग्री वाटप व्हावयास पाहिजे होती. यांनी अडीच रुपयांची सुध्दा मदत साम्रुग्री माझ्या प्रभागात दिलेली नाहीं. म्हणुन याची चौकशी केली जावी. जसे श्री. गर्जे साहेबांच्या बाबतीत ओरडुन ओरडुन सांगितले जात आहे, त्याप्रमाणे यांच्या विरोधात सुध्दा चौकशी नेमली जावी. जर चौकशी नेमली नाही तर मी टेबलावर उभा राहुन उपोषण करेन. सभागृहाचे कामकाज चालु देणार नाही व दुसरी गोष्ट अशी की, २–२ नावे घेतात, मग २ नावे सभागृह नेत्यांनी का नाही सांगितली? तर या बाबतीत अडीच रुपयाचे सुध्दा मला सामान दिलेले नाही. ते म्हणतात की, सर्वाच्या स्वाक्ष–या घेतलेल्या आहेत, तर दाखवा कुठे माझी सही आहे ती? ती कागदपत्र सभागृहाला प्रस्तृत केली जावीत. दालनामध्ये बसुन तडजोड करु नये. ठरावीक लोकांना दालनामध्ये बोलवुन हे प्रकरण मिटविले जाईल म्हणुन ही सर्व माहिती सभागृहासमोर आली पाहिजे. ५६ लाख गेले कुठे? बस्स याचे उत्तर पाहिजे, आता येथेच पाहिजे. नाहीतर आज दुपारचे जेवण मी घेणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. महापौर महोदया, मी श्री. लोणारे साहेबांना विचारु इच्छितो, आरोग्य विभागासाठी किती खर्च झाला?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>मी एकेक बाबीवरील खर्च सांगतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> नाही, आरोग्य विभागासाठी केलेला खर्च सांगा.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>अशाप्रकारे वेगवेगळा खर्चाची आकडेवारी काढलेली नाही. १४ बाबींवरील खर्चाची माहिती माझ्याकडें आहे, ती आपणांस सांगतो व यातील पुर्ण आकडे लेखा विभागाकडुन मिळायचे बाकी आहेत. मदत कार्याची जबाबदारी केवळ भांडार विभागाकडे सोपविण्यात आलेली नव्हती तर ती वेगवेगळया विभागांकडे सोपविण्यात आली होती. जसे की, अग्निशमन दल, पाणी पुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जेवण वाटप करायचे होते ते काम लेखा विभागाकडे सोपविले होते. या सर्व बाबींपैकी १४ बाबींवरील माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> आरोगय विभागासाठी करण्यात आलेलया खर्चाची माहिती सांगा.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>विभागनिहाय माहिती मी काढलेली नाही. आरोग्य विभागातील कर्मचा–यांना आम्ही कापडी मास्क दिले होतें, फावडे – घमेले दिले होते व रात्री काम करणा–यांना बॅटरी, टयुब लाईट असे साहित्य दिले होते. अशा १४ बाबींवरील माहिती काढलेली आहे. त्यांच्यावरील खर्चाचे आकडे मी सांगतो. विभागनिहाय खर्चाची आकडेकवारी अदयाप काढलेली नाही. जे साहित्य खरेदी केले ते वाटप केले त्याचीची माहिती माझ्याकडे आहे. त्यासाठी ती माहिती मी देवु शकत नाहीं. जसे की, आरोग्य विभागाने काही औषधे खरेदी केली. ती औषधे त्यांच्या नियंत्रणाखाली खरेदी करण्यात आली. काही लोकांना रस्सी देण्यात आली. तसेच जेवण वाटप करण्यात आले.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> आरोग्य विभागातुन आपण जे मदत साहित्य वाटप केले त्यात औषधे, घमेला, फावडा, हे आले ना?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>होय.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> तर हा खर्च आपण ॲन्थोनी ठेकेदाराच्या बिल रक्कमेतुन कपात करणार आहात का? ॲन्थोनीची ती जबाबदारी नव्हती काय?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u> फावडा, घमेला, दोरी, कोयता यासाठी आम्ही फक्त १८ हजार, १९६ रुपये खर्च केले आहेत. त्यानंतर कापडी मास्क घेतले होते, यावरील खर्च १४ हजार ८५० रुपये आहे. बाकी चटया ज्या खरेदी केल्या त्यावरील खर्च आहे, ५ लाख ६० हजार आहे, ज्या चादरी खरेदी केल्या त्यावरील खर्च आहे ५ लाख ५० हजार, जे पुरग्रस्त प्रभाग आहेत, त्यातील प्रत्येक नगरसेवकास मदत साहित्य वाटप केले आहे असे मी म्हटले नाही. ज्या पुरग्रस्त प्रभागातील नगरसेवकांकडे मदत साहित्य वाटप केले त्यांची यादी आमच्याकडे आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> आपण जे भाडयाने ट्रक्स घेतले होते, जेसीबी व ट्रक्स त्यावरील खर्च?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u> त्यावरील खर्च जो आहे तो, शासनाकडुन ७५ वाहने आलेली होती. त्यांवरील खर्च, त्यांची बिले अदयाप आमच्याकडे आलेली नाहीत. फक्त नवी मुंबईच्या, जेसीबीचे बिल आले आहे. आरटीओ कडुन बील येणार आहे ते अदयाप आलेले नाही. महाराष्ट्र शासन परिवहन सेवा यांचे जे दर आहेत, ते त्यांनी निश्चित केले आहेत. त्या दराने आपणांस दयावे लागेल. अदयाप पर्यंत फक्त एक–दोन लोकांनी बिलाची मागणी केली आहे, अजुन कोणाची बिले आली नाहीत.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u> सन्माननिय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कच–याची साफसफाई करण्यासाठी ॲन्थोनीकडुन घ्यायला पाहिजे. जो काही खर्च येईल तो आपण ॲन्थोनी या ठेकेदाराकडुन करुन घेवु.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> मा. महापौरजी, या संदर्भात माझा एक असा मुद्दा आहे की, ॲन्थोनी ठेकेदाराची जी जबाबदारी होती, त्या दिवसात त्याची सर्व वाहने अयशस्वी झाली होती. प्रशासनाने ठेकेदारावर कोणतीही कार्यवाही केली नव्हती, त्यांनी विचारले की सफाईवर आपला किती खर्च झाला? प्रशासनाने त्याला आपल्या डोक्यावर इतके बसविले की, लाखो रुपयांचे नुकसान ॲन्थोनी या ठेकेदाराच्या विषयावरच झाले. आपण बाहेरुन ट्रक मागवुन खर्च करण्यापेक्षा ॲन्थोनी या ठेकेदाराकडुन काम करुन घेतले असते तर आज आपले भरपुर पैसे वाचले असते. दुसरे म्हणजे आपण एक वक्तव्य केले की, पुरग्रस्तांसाठी जो खर्च झाला तो प्रत्येक नगरसेवकाला दिला आहे. मी ठामपणे सांगतो की, माझ्या प्रभागात प्रशासनाने खर्च केला हे होवुच शकत नाही. कारण एक रुपयासुध्दा आमच्या प्रभागात खर्च झाला नाही. लक्षवेधी मांडण्याचा एकच उद्देश आहे की, आपण अशा प्रभागात खर्च केला आहे की, तिथे टेकडी आहे, तेथे पुराचे काही कारणच नाही, तेथे कोणतीही पुरपरिस्थिती नव्हती, अशा जागेवर तहसिलदार कार्यालयाने सुध्दा खर्च केला आहे. त्याची यादी आमच्याकडे आहे. महानगरपालिकेने सुध्दा तेथे खर्च केला आहे हे आम्हांला सिध्द करायचे आहे. श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी जो प्रश्न विचारला याचे जे उत्तर आहे ते तपशिलवार सभागृहासमोर का नाही मांडले? याचाच अर्थ असा आहे की, सन्माननिय चौधरी साहेबांनी म्हटले होते की, दाळ में कुछ काला है तसे आम्हांलाही म्हणावे लागेल, याचे उत्तर का नाही दिले, येथे महानगरपालिकेचे नुकसान आहे. असे आम्हां विरोधी पक्षीय सदस्यांचा आपणांवर आरोप आहे.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u> दाल मे कुछ काला नही है, माहितीच्या अधिकारानुसार आपणांस सर्व फाईल पाहावयास मिळेल. श्री. रमेश चव्हाण यांनी वाहनांच्या खर्चावरील जो मुद्दा उपस्थित केला, त्याबाबत सांगु इच्छितो की, सर्वांची देयके अदयाप आपणाकडे आलेली नाहीत. सर्व बिले आल्यानंतर कचरा उचलण्याची जी जबाबदारी ठेकेदारावर सोपविण्यात आली होती त्याच्याकडुन हा खर्च वसुल केला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> लक्षवेधी संपल्यावर आम्ही त्याचा कधी अभ्यास करु.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>सन्माननिय सदस्यांना मी लेखी स्वरुपी देवुन देईल.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> असे नाही, ते नंतर देवुन काय उपयोग? आम्ही लक्षवेधी ज्या कारणाने टाकली आहे, ते कारण जर पुर्ण होत नाही तर नंतर देवुन काय उपयोग?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>श्री. चव्हाण सो. यांनी वाहनांवरील खर्चाची जी विचारणा केली, त्याबाबत मी उत्तर दिले आहे. बाकीचे जे मुद्दे आहेत जसे की, दाळ, तांदुळ यावर केलेल्या खर्चाचे आकडे माझ्याकडे आहेत, आरोग्य विभागामार्फत जे घमेले, फावडे वाटप करण्यात आलीत त्याच्या खर्चाची माहितीसुध्दा आपणांस दिली आहे. यापेक्षा आणखी काही माहिती हवी असेल तर ती देण्यास मी तयार आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> मा. महापौर महोदया, पुर परिस्थितीच्या काळातच जर ठेकेदाराला सक्त ताकिद दिली असती तर बरे झाले असते. आजकाल आपली जेसीबी मशिन डंम्पींग ग्राउंडवर लावली जाते. जेसीबी मशिन कधी खाली मिळत नाही. तीन दिवसांपासुन त्यांचा संप चालु आहे त्याचवेळेस तुम्ही ठेकेदारावर कारवाई केली असती, त्याला तुम्ही बाकीची वाहने व इतर सामुग्री पुरविली नसती तर आज त्याचे एवढे लाड आपणांस पुरवावे लागले नसते. दारोदारी कचरा गोळा करण्यासाठी जी गाडी जाते ती तीन दिवसापासुन जात नाही.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u> पुर्ण बिले आपणाकडे आलेली नाहीत. एक–दोघांचीच बिले आली आहेत. सर्व बिले आल्यानंतर त्यांची एकुण बेरीज करुन ती सर्व रक्कम एक रक्कमी ठेकेदाराकडुन वसुल करता येईल. अजुनपर्यंत आपण त्या वाहनांचे देयक अदा केलेले नाही. नवी मुंबई येथिल एक किंवा दोन जेसीबी वाल्यांची बिले आलेली आहेत. बाकीच्यांची बिले अदयाप आपल्याकडे आलेली नाहीत. सर्व वाहनांची बिले आल्यानंतर कदाचित जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन आपणांस ती बिले येणारही नाहीत. परंतु आजमितीस दोन किंवा तीनच लोकांची बिले पुर्णपणे दिली आहेत. जेव्हा पुर्ण देयके येतील तेव्हो संपुर्ण रक्कम त्यांच्याकडुन वसुल केली जाईल.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> तुम्ही सर्व रक्कम त्यांच्याकडुन वसुल करणार?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>होय. त्याप्रमाणे आम्ही शेरे मारुन देवु. लेखा विभागाला सुध्दा आम्ही तसे कळवु. पावसाळयामध्ये त्यांनी कचरा उचलला नाही म्हणुन ती रक्कम त्यांच्याकडुन वसुल करुन घेवु. वाहन विभागामार्फत आम्ही तसे कळवु.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> आता शहरामध्ये वाहतुक बंद आहे, शहरात कचरा जमला आहे, शहरात पुर्ण हाहाकार आहे, तीन दिवस झाले संप चालु आहे, त्यावर काय उपाययोजना केली आहे?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>याबाबतीत आयुक्त साहेबांनी, उप–आयुक्त (आरोग्य) यांच्याबरोबर चर्चा करुन काय प्रकार आहे ते आम्ही पाहून घेवु आता याबाबतीत मला काही सांगता येणार नाही.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> माझी अशी विनंती आहे की, ॲन्थोनी ठेकेदाराबद्दल आम्ही सभागृहात विरोधी पक्षाबरोबर खुप ओरडलो. स्थायी समितीमध्ये मी असतांना हा ठराव आला होता, त्यांनी अटी व शर्ती पुर्ण केल्या नाहीत. मला अटी व शर्ती पुर्ण माहिती आहेत. तुम्ही जर प्रत्येक विषयात त्याला गहाळ ठेवाल.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>मा. सदस्यांना मी एकच येथे सांगु इच्छितो की, मा. महापौरांनी अटी व शर्ती पाहून कारवाई करायला सांगितले आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> मा. महापौरजी, प्रशासन या प्रश्नाचे सखोल उत्तर देवुच शकत नाही. म्हणुन ही लक्षवेधी पुढच्या महासभेपर्यंत तशीच ठेवावी.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>सन्माननिय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांना कुठल्या मुद्दयावर उत्तर पाहिजे, ते सांगावे, ते मी आता देतो.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :–</u> याचे उत्तर आताच सभागृहाला सांगा व त्यानंतर प्रश्न विचारा. तुमच्याकडे जर माहितीच नाही तर प्रश्न विचारुन काय फायदा? पुर्ण माहिती आहे काय तुमच्याकडे?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>सन्माननिय सदस्यांना विनंती करतो की, याचा संपुर्ण अहवाल घेवुन सभागृहाला याची प्रत देतो. सर्व माहिती सभागृहाला देतो.

<u>मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :–</u> कधी देवु शकता याची माहिती?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>संपुर्ण खर्चाची माहिती सभागृहाला मी लेखी स्वरुपात कळवितो.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौरजी, आपण प्रशासनाला पाठीशी घालु नका, प्रशासन पुर्ण चुकीचे उत्तर देत आहे. आज आम्ही महासभेमध्ये प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर त्यांनी दयायला पाहिजे होते. तेव्हाही उत्तर दिले नाही, आज लक्षवेधीद्वारे विचारले तरीही उत्तर देवु शकत नाहीत. आपण प्रशासनाला पाठीशी घालु नका, प्रशासनाला सहकार्य करु नका.

<u>मा. महापौर :–</u> श्री. लोणारे साहेबांना निर्देश देत आहे की, त्यांनी सर्व अहवाल जसा आहे तसा आकडेवारीसह सादर करावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>दुसरे म्हणजे जेसीबी मशीन......

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे:–</u>प्रभाग निहाय खर्च सांगावा, कोणत्या प्रभागात किती वाटला गेला. तेच महत्वाचे आहे. कारण ही गोष्ट निश्चित आहे की, जेथे पुर आलाच नाही तेथे जास्त प्रमाणात वाटले गेले.

<u>मा. महापौर :–</u> प्रत्येक पुरग्रस्त प्रभागाचे नगरसेवकास जे काही मदत साहित्य दिले गेले आहे त्याचा सुध्दा अहवाल दिला जाईल.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>सन्माननिय सदस्यांच्या या प्रश्नाला उत्तर देतो की, जेथे पण मदत साहित्य वाटप करायचे होते त्याबाबत तेथे एक समिती नेमली होती. त्यात पदाधिकारी होते व त्यांनी सांगितले तेथे भांडार विभागामार्फत साहित्य वाटप केले गेले. याची आमच्याकडे यादी आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> जेसीबी मशिनचे काय? आपली जेसीबी मशिन रोज डंम्पींग ग्राउंडवर लावली जाते. आपली स्वत:ची, महापालिकेची जेसीबी मशिन डंम्पींग ग्राउंडवर लावली जात आहे.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>याची माहिती घेवुन मी आपणांस सांगतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> आपली जेसीबी मशिन बंद करुन त्यास त्याची जेसीबी मशिन लावावयास सांगा ना.

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>माहिती घेवुन सांगतो.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> त्यांना आपण पाठीशी का घालता?

<u>श्री. उत्तर लोणारे (उप–आयुक्त, मुख्यालय) :–</u>पाठीशी घालत नाही.

<u>मा. महापौर :–</u> लेखी अहवाल दया.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u> ॲन्थोनी ठेकेदाराकडुन ठेका काढुन घेतला जावा. कारण की, त्यावेळेस आपणाला चांगल्याप्रकारे माहिती आहे की, या शहरामध्ये जेव्हा, २६ जुलै रोजी पुराचे पाणी आले

होते. त्यावेळेस या ठेकेदाराकडुन ना जेसीबी मिळाली आहे, ना टॅंकर ना इतर काही वाहन, त्यांनी साफसफाई बरोबर करुन दिली नाही. त्यामुळे या शहरामध्ये रोगराई पसरली. त्यामुळे शहरामध्ये जिवीत व वित्तीय हानी झाली. त्याचबरोबर एक महत्वाचे मी एक येथे सांगु इच्छितो की, कचरा वेळेवर उचला न गेल्याने आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांना लेप्टोस्पायरोसीस झाला आणि त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. ॲन्थोनी ठेकेदाराचा ठेका लवकरात लवकर रद्द केला जावा. व दुस–या ठेकेदाराला दयावा जो चांगल्याप्रकारे साफसफाई करु शकेल. असे मी याठिकाणी निवेदन करतो, धन्यवाद.

<u>मा. महापौर :–</u>दुसरी लक्षवेधी जी होती तिचा अहवाल श्री. लोणारे साहेब आपणाला लेखी स्वरुपात देतील. लक्षवेधी सुचनांवरील चर्चा पुर्ण झाली.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>एक सेकंद, लक्षवेधी सुचनेबरोबर एका गोष्टीची आपणांस आठवण करुन देवु इच्छितो की, सर्वांच्या चर्चेतुन सुटली आहे. सप्टेंबर महिन्यामध्ये जेव्हा हा मुद्दा आला होता, त्यावेळेस आम्ही लोकांनी म्हटले होते की, ज्या लोकांची घरे पाण्यामध्ये बुडाली आहेत, जसे ठाणे महानगरपालिकेने त्या लोकांचा एका वर्षाचा मालमत्ता कर माफ केला आहे. त्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेने अशा लोकांचा एक वर्षाचा मालमत्ता कर माफ करावा व आपण स्पष्टपणे म्हटले होते की, अशा प्रकारचा ठराव महापालिकेत आणला जाईल. परंतु तो ठराव आतापर्यंत आलेला नाही. तर मला असे वाटते की, आपण जे निर्देश दिले होते, त्याबाबत आतापर्यंत काही कारवाई झालेली नाही. तो ठराव सुध्दा आला पाहिजे. त्या लोकांचा मिळकत कर माफ झाला पाहिजे. हे आपणसुध्दा मान्य केले होते. तो ठराव आला पाहिजे. त्याबाबत आपण काय विचार करत आहात?

<u>मा. महापौर :–</u> त्यावेळी अधिनिर्णय आला होता. तो अधिनिर्णय जसा की आदेशच होता, त्यावर अंमलबजावणी करायची आहे. ती आपण कधी करणार? यावर्षापासुन करण्याकामी मिळकत कर विभागाला लेखी स्वरुपी आदेश दिले जातील.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> सचिव साहेब, श्री. गर्जे साहेबांवर आरोप लावण्यात आलेले आहेत. आणि ते काही बोलु इच्छित आहेत. कदाचित त्यांच्याकडे आपल्याकडील काही लोकांची नावे असतील? म्हणुन त्यांना बोलु दिले जावे. सभागृहात त्यांचा आवाज का दाबला जात आहे?

<u>मा. महापौर :–</u>जकात वसुली कमी झाली आहे, याबाबत सभागृहात आपण मुद्दा उपस्थित केला आहे. तसेच त्यांना बोलण्याची पुर्णपणे संधी दिली जाईल.

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. २ :–** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/१०/२००५ चे (त्यात दिनांक २९/१०/०५) इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u> पास–पास..........

<u>मा. सचिव :–</u> इतिवृत्त कायम? कुणाची काही हरकत?

<u>मा. महापौर :–</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक २०/१०/२००५ चे (त्यात दिनांक २९/१०/०५) इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ३ :–** निवड समितीच्या शिफारसीनुसार श्री दत्तात्रय बाजीराव जाधव यांच्या ''वरिष्ठ लिपीक'' या पदावरील नियुक्तीस मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>मा. महापौरजी, या विषयावर मागील वेळेस सुध्दा चर्चा झाली होती. या प्रस्तावाची सविस्तर माहिती आम्हांस दिली जावी. व त्यानंतरच महासभेपुढे हा प्रस्ताव ठेवावा. त्यानंतरही प्रशासन वेगवेगळे कारणे सांगते हे नाही, ते नाही. या विषयावर कोणतीही तयारी न करता पुन्हा हा विषय महासभेपुढे आणला आहे. कृपया हा प्रस्ताव सर्वसंमतीने नाकारला जावा. व या प्रस्तावाबाबत आमचे सन्माननिय सदस्य श्री. सतरामदास जेसवानी हे पत्र देत आहेत ते पत्र दाखल करुन घ्यावे. व हा प्रस्ताव सर्वसंमतीने नाकारला जावा.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u> मा. महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, एखादया अधिका–यावर अशा प्रकारचे आरोप लावणे ही अतिशय वाईट गोष्ट आहे. अधिकारी आपला खुलासा देण्यास तयार आहे. त्यास बोलण्यास परवानगी दिली जात नाही हे चुकीचे आहे. कारण की, मी सुध्दा महापौर होते. माझ्या कार्यकालावधीत किती लोकांना निलंबित केले? किती लोकांना येथुन परत पाठविले? श्री. गर्जे खुलासा दयावयास तयार आहेत कमीत कमी त्यांना खुलासा करण्यासाठी संधी दिली जावी. जो अधिकारी चांगले काम करत आहे, पुरपरिस्थिती काळात त्यांनी चांगले काम केले आहे अशा अधिका–यांना आपण निलंबित करीत आहात. हे काय चालु आहे?



**मा. महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. व त्या जागी श्री. विनोद तलरेजा, मा. उप–महापौर यांनी पिठासीन अधिकारी म्हणुन आसन ग्रहण केले.**

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> जसे की, हा विषय तीन–चार महिन्यापुर्वी महासभेपुढे आला होता. त्यावेळेस असे ठरले होते की, आता हा विषय पुढे ढकलु या व पुढील सभेमध्ये हा विषय आणु असे आपणा सर्वांच्या वतीने ठरले होते. एकवेळ असे ठरविल्यानंतर ते नाकारले जात नाही. सभागृह नेता यांनी म्हटले होते की, ती व्यक्ती कोण आहे? ती व्यक्ती कोण आहे, याच्याशी काही संबंध नाही. परंतु तो पुरग्रस्त आहे की, प्रकल्पग्रस्त आहे? व त्यास शासनाने पाठविले असल्याने आपण या प्रस्तावास मंजुरी दयावी. असे सभागृहामध्ये सर्वसंमतीने ठरले होते. परंतु आज त्याच्या उलट प्रस्ताव नाकारण्याची गोष्ट केली जात आहे. जी खात्री आम्ही देतो मग ती सभागृहात असो कि सभागृहाबाहेर ती आम्ही पुर्ण करतो त्यामध्ये आम्ही कुठेही कमी पडत नाही. परंतु आज येथे जे होत आहे ते चुकीचे आहे. महापौर पीठासीन अधिकारी आपण होतात तेव्हा आपण बोलला होता. आपण जी खात्री दिली आहात त्यावर आपण कायम आहात किंवा नाही?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, त्यावेळेस आम्ही म्हटले होते की, याची सविस्तर माहिती आमच्यासमोर ठेवली जावी. ती माहिती अदयाप आमच्यासमोर ठेवलेली नाही ही प्रशासनाची चुक आहे, त्यासाठी मी सभागृहाला विनंती करतो की, हा प्रस्ताव सर्वसंमतीने नाकारला जावा नाहीतर या प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> नाहीतर काय? मतदान घेतले जावे? भावना अशी आहे की, जसे या प्रस्तावाअगोदर ॲन्थोनीच्या विषयावर चर्चा करत होतात, आपण अगोदर काय करतो आहे याचे आपणांस भान राहत नाही. पुढे काय करणार आहोत याचेही भान राहत नाही. मागे ज्या चुका करता त्याची दुरुस्ती करण्यासाठी पुढच्या सभेत आणता. यापुढे सुध्दा आपण चुका करत राहणार व पुन्हा पुन्हा आम्ही त्या दाखवत राहणार, श्री. दिलीप लालवानी यांनी मुद्दा उपस्थित केला होता की, सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष..... विरोधी पक्ष काय करतो, आपण ज्या चुका करता त्या दाखवुन देतो. परंतु त्या नंतर सुध्दा आपण चुकीकडे लक्ष देत नाहीत. शहरवाशियांच्या बाबत आपण जी खात्री दिली आहात ती आपण पुर्ण करत नाहीत. या अगोदर ॲन्थोनीच्या बाबतीत विरोधी पक्ष म्हणुन ज्या गोष्टी आपल्यासमोर मांडल्या होत्या त्या आज ख–या होत आहेत. परंतु त्या वेळेस आपण त्यांच्याकडे लक्ष दिले नव्हते. आज आपण ओरडत आहात, ॲन्थोनी चुकीचा आहे. त्यावेळेस आम्ही म्हटले होते की, उल्हासनगरला नुकसानीत घालु नका. दहा वर्षाचा ठेका आपणच दिला होता व आज बोलत आहात तर त्यावेळेस आपण घाई का केली होती दहा वर्षाचा ठेका

देण्यामध्ये? काल जे केले होते त्यात सुधारणा करण्यासाठी आज प्रस्ताव होता, व पुन्हा आज चुका करता. आपणाकडे काही नियोजन नाही. आजची ही चुक उदया स्पष्ट होईल हे आम्ही पुन्हा पुन्हा आपणांस दाखवुन दिले आहे, आपले प्रस्ताव किती चुकीचे झाले आहेत, आणि त्यांना नंतर आपणच पर्याय दिला आहे या सर्वांची यादी आपणांस देतो. या अगोदर आपण जी चुक केली आहे, ज्यास अगोदर विरोधी पक्षांनी विरोध केला होता की आपला हा निर्णय चुकीचा आहे, तो सुधारा. परंतु त्यावेळेस आपण दुर्लक्ष केले व पुढे जावुन आपली ती चुक स्पष्ट झाली आहे. दुर्भाग्याने हा ही तसाच आहे. मागील सभेमध्ये हा प्रस्ताव पुढे ढकलला होता. व पुढील सभेमध्ये आपण त्यामध्ये सुधारणा करणार होता तशी खात्री दिली होती परंतु आज आपण त्यादिवशी दिलेल्या खात्रीवर कायम नाहीत. त्यातुन हेच तर निश्चित होत आहे. व एक महापौर, पीठासीन अधिकारी म्हणुन हे बरोबर नाही.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौरजी, या विषयावर सभागृहात अतिशय चांगल्या प्रकारे चर्चा झाली होती. महाराष्ट्र शासनाने निर्देश दिलेले आहेत. जी व्यक्ती प्रकल्पग्रस्त असते, त्याच्यासाठी जे आरक्षण ठेवलेले असते त्या आरक्षणावर, जागेवर प्रकल्पग्रस्त व्यक्तीची नेमणुक करावीच लागते. ती प्रशासन व शासनाची जबाबदारी आहे. कायदयानुसार प्रकल्पग्रस्त व्यक्तीला सेवेमध्ये सामावुन घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाने निर्देश दिलेले आहेत. पहिली जी सभा झाली त्या सभेत या विषयावर आमचे सभागृह नेता श्री. किशोर वनवारी यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, याबाबतची सर्व कागदपत्रे आमच्यासमोर म्हणजे सभागृहासमोर ठेवली जावीत. परंतु कागदपत्रांमध्ये बदल करण्याचा अधिकार सभागृहाला नसतो. जे प्रशासकिय अधिकारी असतात त्यांनी हे पाहायचे असते की, ही व्यक्ती प्रकल्पग्रस्त आहे की नाही. हे तपासुन पाहण्याची जबाबदारी अधिका—यांची असते. तर कृपया हा जो विषय आहे तो मंजुर केला पाहिजे तो पुढे ढकलता कामा नये.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> हे पहा हा प्रस्ताव नाकारला जात नसुन तो फक्त पुढे ढकलला जात आहे.

<u>मा. सचिव :—</u>कागदपत्र तपासणीसाठी?

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> मागील महासभेत जेव्हा हा विषय पुढे ढकलण्यात आला होता तेव्हा आम्ही असे म्हटले होते की, सभा तीन वेळा स्थगित झालेली आहे. हा प्रस्ताव चौथ्या वेळेस सभेसमोर आला. व एका लिपिकाचा प्रस्ताव आणि तोही प्रकल्पग्रस्त व्यक्तीचा, जिल्हाधिकारी साहेबांनी पाठविलेला आहे. एका लिपिकाच्या प्रस्तावावर विचार करण्यासाठी आमचा तीन महिन्याचा कालावधी गेला, हा चौथा महिना चालु आहे. यानंतर पुन्हा तीन महिने कशासाठी? आज पुन्हा पुढे ढकलायचा? एका लहानशा प्रस्तावावर काय संशोधन करणार आहात? संपुर्ण सभागृहाने खात्री दिल्यानंतरही आपण ती नाकारत आहात हे चुकीचे आहे. याबाबत योग्य असा संदेश जात नाही.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> आम्ही आपल्या भावनांचा सन्मान करतो.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> सचिव साहेबांना माझे एक निवेदन आहे की, महाराष्ट्र शासनाने पुरग्रस्त / प्रकल्पग्रस्तबाबतीत जे निर्देश दिले आहेत ते कायदयानुसारचे निर्देश आहेत. त्याबाबतीतील कागदपत्र तपासण्याचा अधिकार फक्त संबंधीत अधिका—या व्यक्तीरिक्त कुणालाही नाही. तरीही याबाबतीतला विषय पुढे ढकलला जातो, कायदयानुसारचा विषय पुढे ढकलला जातो हे बरोबर नाही असे मला वाटते. याबाबत आपले मत काय आहे? हा प्रस्ताव मंजुर झाला पाहिजे नाहीतर याबाबत महाराष्ट्र शासनाचा अवमान केल्यासारखे होईल व जो कायदा तयार केला आहे त्याचाही अवमान होईल.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> श्री. धनंजय बोडारे साहेबांनी म्हंटल्यानुसार त्यांच्या भावनांचा आदर करुन हा विषय नाकारण्याऐवजी पुढे ढकलत आहे. याबाबतीतील सविस्तर माहिती सभागृहापुढे आणली जावी.

<u>मा. सचिव :—</u> ठिक आहे? पुढे ढकलायचा?

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ४ :– <u>प्रस्तावाची सुचना :–</u>

स्वामी शांतीप्रकाश उद्यानात मांसाहार व नशापान न होणेबाबत योग्य ती उपाययोजना करणेसाठी सन्माननिय पालिका सदस्य श्री. किशोर वनवारी व श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रस्तावाची सुचना विचारात घेणे.

---

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> हा प्रस्ताव पारीत करण्यामध्ये काही अडचणीचे नाही. आम्हांला फक्त एवढे म्हणायचे आहे की, इतर जी उदयाने आहेत त्यांमध्ये या गोष्टींना परवानगी आहे का? समजा आम्ही हा प्रस्ताव आणत आहोत की, उल्हासनगर कॅम्प नं. ५ मध्ये जे स्वामी शांतीप्रकाश उदयान आहे तेथे दारु प्यायचे नाही मांस–मच्छी खायचे नाही तर मग साधु वासवानी उदयान आहे तेथे या गोष्टींना परवानगी आहे काय? किंवा जे सपना उदयान आहे तेथे या गोष्टींना परवानगी आहे का? असे आम्ही समजायचे का? इतर उदयानांमध्ये दारु प्या, मटन–मच्छी खा, मजा करा, जसे की तेथे या गोष्टींना मनाई आहे? म्हणुन अशा प्रकारचा निर्णय सर्व उदयानांसाठी असला पाहिजे. आपण म्हणता की, इतर उदयानांमध्ये दारु प्या, या उदयानामध्ये पिऊ नका असा काही उद्देश आहे का? महानगरपालिकेची जेवढी काही उदयाने आहेत त्या सर्वांमध्ये या कामी मनाई असली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u>सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी जे म्हटले त्याचा मी खुलासा करु इच्छितो. आपण कोणत्याही उदयानाबाबतीत अशा प्रकारचा प्रस्ताव आणा.

<u>मा सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> सर्व उदयानांसाठी अशा प्रकारचा प्रस्ताव असला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मी, ही सुरवात केली आहे.

<u>मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :–</u>आजच सर्व उदयानांसाठी प्रस्ताव पारीत करा. गोल मैदान वगैरे जी उदयाने आहेत, सार्वजनिक ठिकाणे आहेत.........

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मी व श्री. नारायण पंजाबी यांनी हा जो प्रस्ताव येथे आणलेला आहे, आमच्याकडे त्या उदयानाबाबतीत एक तक्रार आली की तेथे काही लोक मास–मच्छी खात आहेत म्हणुन आम्ही त्या उदयानासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे. कोणत्याही उदयानाबाबतीत एखादा सदस्य जर अशा प्रकारचा प्रस्ताव आणत असेल तर त्याचे स्वागत आहे. मी हा प्रस्ताव आणला, ही सुरुवात आहे. इतर उदयानांमध्ये या कामी परवानगी आहे का असे म्हणुन या प्रस्तावावर टिका करु नका. मी आणलेल्या प्रस्तावानुसार इतर सदस्यांनीही आपापल्या पॅनलमधील, प्रभागामधील उदयानांचे प्रस्ताव आणावयास शिकले पाहिजे. सर्व सदस्यांनी अशा प्रकारचे प्रस्ताव महासभेपुढे आणावेत व ते पारीत करुन घ्यावे.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>हा प्रस्ताव पारीत केला जावा तसेच अशा प्रकारचा प्रस्ताव ज्या कुणा सदस्यांचा येईल तो पारीत केला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–</u> श्री. किशोर वनवारी यांच्या प्रस्तावात थोडी सुधारणा करुन संपुर्ण शहरातील उदयानांबाबतचा प्रस्ताव पारीत केला जावा.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>जे निवडुन आलेले सदस्य आहेत त्यांच्या प्रभागातील उदयानांची स्थिती काय आहे ही सर्वांना माहित आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> पीठासीन अधिकारी जी एक गोष्ट ऐकुन घ्या. हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा व प्रत्येक सदस्याने आपापल्या प्रभागातील उदयानांचा प्रस्ताव आणावा. मला काय म्हणायचे आहे की, ही एक समजुन घेण्यासारखी गोष्ट आहे की महापालिकेची जी काही उदयाने आहेत त्यांमध्ये मद्य पिणे तसेच

मास–मच्छी खाणे यास मनाई आहेच. असे कुणालाही वाटता कामा नये की, या कामी परवानगी आहे. याबाबतीत आपण निर्देश दिले पाहिजेत की, उदयानांमध्ये दारु पिणे तसेच मास–मच्छी खाण्यास परवानगी नाही. याबाबतीत प्रत्येक सदस्यांनी आपापले प्रस्ताव आणावेत.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :– मी प्रशासनाला निर्देश देतो की, याबाबतीतले सर्व प्रस्ताव आणावेत.

मा. सचिव :– हा प्रस्ताव मंजुर?

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :–मा. महापौरजी, श्री. लाल पंजाबी साहेब जे म्हणत आहेत ती गोष्ट एकदम बरोबर आहे. अश्याने जनतेमध्ये चुकीचा संदेश जाईल. यासाठी महानगरपालिकेतील जेवढी काही उदयाने आहेत तेथे नशापान व मांसाहार करण्यास बंदी असली पाहिजे. या गोष्टीचा निषेध केला पाहिजे.

मा. सचिव :– विषय क्र. ४ पास?

काही सदस्य :–पास–पास.....

**मा. सदस्य श्री. वाघे शामु, श्री. मोहन बेहरानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

प्रस्तावाची सुचना :–

**विषय क्र. ४:–** स्वामी शांतीप्रकाश उद्यानात मांसाहार व नशापान न होणेबाबत योग्य ती उपाययोजना करणेसाठी सन्माननिय पालिका सदस्य श्री. किशोर वनवारी व श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रस्तावाची सुचना विचारात घेणे.

सूचक : श्री किशोर वनवारी

अनुमोदक : श्री नारायण पंजाबी

*प्रस्ताव :*

उल्हासनगर कॅम्प नं ५ येथील प्रभात सिनेमाच्या मागील बाजुस स्वामी शांतीप्रकाश उद्यान उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे आहे.

उपरोक्त उद्यानास थोर संत पुरुषांच्या नावाने ओळखले जाते. सदरच्या उद्यानामध्ये नशापान करणे व मांसाहार करणे अभिप्रेत नाही. परंतु सदर ठिकाणी काही लोक ब–याच वेळा नशापान व मांसाहार करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे उद्यानातील पाविञ्याचा भंग होतो. तसेच सदर उद्यानामध्ये मोठया प्रमाणावर आबालवृध्द व महिला येत असल्याने सदर ठिकाणी नशापान व मांसाहार करणे योग्य नाही.

तरी स्वामी शांतीप्रकाश उद्यानात मांसाहार व नशापान होणार नाही याबद्दल निर्बंध करणेकरिता, महासभेपुढे सादर.

महासभा ठराव क्र. ६६ दिनांक :– १९/१२/२००५

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार कॅम्प नं ५ येथील स्वामी शांतीप्रकाश उद्यानात मांसाहार व नशापान न होणेसाठी योग्य ती उपाययोजना करण्यासाठी प्रशासनास निर्देश देत आहे.

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————

<u>विषय क्र. ५:— प्रस्तावाची सूचना :—</u>

उल्हासगनर कॅम्प नं ५ येथील जयबाबा धाम समोरील चौकास ''कै. भगवंती बच्चाराम रुपचंदानी चौक'' असे नामकरण करण्यासाठी सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी व श्री. धनंजय बोडारे यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

————————————————————————————————————————

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

<u>विषय क्र. ५:— प्रस्तावाची सूचना :—</u>

उल्हासगनर कॅम्प नं ५ येथील जयबाबा धाम समोरील चौकास ''कै. भगवंती बच्चाराम रुपचंदानी चौक'' असे नामकरण करण्यासाठी सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी व श्री. धनंजय बोडारे यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

सूचक : श्री. लाल पंजाबी
अनुमोदक: श्री. धनंजय बोडारे

<u>*प्रस्ताव :*</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या माजी सदस्या श्रीमती भगवंती बच्चाराम रुपचंदानी यांचे दिनांक ०६ सप्टेंबर २००५ रोजी दु:खद निधन झाले आहे. श्रीमती रुपचंदानी हया १९९७ ते २००२ या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेच्या सदस्या होत्या. त्याचप्रमाणे त्यांनी एक वर्ष स्थायी समिती सभापती म्हणुन देखिल काम पाहिले आहे.

श्रीमती रुपचंदानी यांनी त्यांच्या महापालिका सदस्य पदाच्या कार्यकालावधीत तसेच सभापती, स्थायी समिती म्हणुन अनेक लोकोपयोगी कामे करुन जनसेवा केलेली आहे. तसेच जनतेच्या विविध समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला होता.

त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उल्हासनगर कॅम्प नं ५ येथील जयबाबा धाम समोरील चौकास ''कै. भगवंती बच्चाराम रुपचंदानी चौक'' असे नामकरण करण्यासाठी अशासकीय प्रस्ताव महासभेसमोर सादर.

<u>महासभा ठराव क्र. ६७</u> <u>दिनांक :— १९/१२/२००५</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर कॅम्प नं ५ येथील जयबाबा धाम समोरील चौकास ''कै. भगवंती बच्चाराम रुपचंदानी चौक'' असे नामकरण करण्यास मान्यता देत आहे.

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

---

<u>आयत्या वेळचा</u>

<u>विषय क्र. ६ :–</u> कुमारी सुषमा एन. पाटील यांना ''वर्ल्ड वेट लिफटिंग चॅम्पीयनशिप'' साठी स्वीडन येथे जाण्यासाठी महापालिकेतर्फे आर्थिक मदत देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> <u>:–</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

<u>विषय क्र. ६ :–</u> कुमारी सुषमा एन. पाटील यांना ''वर्ल्ड वेट लिफटिंग चॅम्पीयन शिप'' साठी स्वीडन येथे जाण्यासाठी महापालिकेतर्फे आर्थिक मदत देणे.

<u>प्रस्तावना</u>

चांदीबाई कॉलेज, उल्हासनगर या महाविदयालयातर्फे कुमारी सुषमा एन. पाटील यांची ''वर्ल्ड वेट लिफटिंग चॅम्पीयन शिप'' साठी वर्ष २००५ मध्ये उल्हासनगर शहरातून निवड झालेली असून सदर विद्यार्थीनीने स्वीडन येथे जाणेसाठी रक्कम रुपये ९३,०००/– मदत म्हणून मागितली आहे.

कुमारी सुषमा पाटील हिची आर्थिक परिस्थिती नाजुक असल्याने सदरचा खर्च तिला पेलण्यासारखा नाही व महाराष्ट्राचे तसेच देशाचे नाव उज्वल करेन असे तिने आपल्या पत्रात नमूद केलेले आहे.

त्यानुसार कुमारी सुषमा एन. पाटील यांनी विविध प्रवास कंपन्यांकडुन काढलेल्या माहिती नुसार मुंबई ते स्वीडन जाणेचा प्रवास खर्च रक्कम रुपये २३,०००/– (तेवीस हजार) देणेबाबत विनंती केली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६६ (११) मध्ये स्वेच्छाधिकारानुसार सदरचा खर्च करण्याची तरतुद आहे.

सन २००५–२००६ चे अंदाजपत्रकात संकीर्ण अ.क्र. (९), भाग –१ ''क्रिडा खर्च'' या लेखा शिर्षांतर्गत रक्कम रुपये ५,००,०००/– लाखाची तरतुद असून सदर रक्कमेतून कुमारी सुषमा पाटील यांना रुपये २३,०००/– देणेबाबत मा. महासभा यांच्या मंजुरीसाठी प्रस्तावित करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६८ <u>दिनांक:–१९/१२/२००५</u>

सुचकाचे नाव :– श्री. नारायण पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार कुमारी सुषमा एन. पाटील यांना ''वर्ल्ड वेट लिफ्टिंग चॅम्पीयनशिप''साठी स्वीडन येथे सहभागी होण्यासाठी रु. २३,०००/– एवढी रक्कम आर्थिक सहाय्याच्या हेतुने महापालिकेतर्फे अंशदान करणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप–महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>आयत्या वेळचा</u>

<u>विषय क्र. ७ :–</u> पैसे दया व वापरा तत्वावर शौचालय बनविणेबाबत केलेला करारनामा रद्द करुन ठिकाणे अन्य संस्थेस वितरीत करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>कृपया आपणा सर्वांना माझी विनंती आहे की, या दोन्ही सुलभ शौचालयांचे काम ज्या संस्थांना दिले होते, तेव्हा त्यांनी हे काम केले नाही. आणि त्यासाठी आम्ही प्रशासनाचे लक्ष वेधले होते. ती सुध्दा आमची एक विनंती होती. माझे जर ऐकुन घेतले आणि निर्णय घेतला तर धन्यवाद. नाहीतर जसे आपण बोलाल तसे. नियम जो असेल तो तर आपणाकडेच आहे. जी नवल वेल्फेअर फांउडेशन नावाची संस्था आहे जीला अगोदर काम दिले होते. झुलेलाल मार्केट येथे जे सुलभ शौचालय बांधायचे आहे ते एक काम यांना दया. व दुसरे काम ज्या एका नविन संस्थेने विनंती पत्र दिले आहे त्यांना दिले तर ही दोन्ही कामे लवकरात लवकर चालु होवु शकतील. हीच आमची विनंती आहे. जेणेकरुन लोकांना सुविधा मिळु शकेल धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u> मा. महापौरजी, सुलभ शौचालयांबाबत मी सुध्दा सांगु इच्छितो, माझ्या प्रभागामध्ये कल्याण–मुरबाड रस्त्यावर बिर्ला गेट गार्डन येथे मागील वर्षी एक सुलभ शौचालय बांधण्याचे काम मंजुर झाले आहे. त्याचे काम अदयापपर्यंत चालु सुध्दा झाले नाही. तेथे शिलान्यास सुध्दा झालेला नाही याचे कारण काय? त्याचा येथे जरा खुलासा करावा. हे मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो, धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> मा. महापौरजी, सुलभ शौचालयाबाबतीत माझी सुध्दा एक तक्रार आहे. १६ नं. शाळेजवळ, कमीत कमी ९–१० महिन्यापासुन खोद काम केलेले आहे. हे काम ज्या ठेकेदारास दयाल त्यास निर्देश दयावेत की, ते लवकरात लवकर व्हावे. व याबाबत अनेक महासभांमध्ये आम्ही आवाज उठविला आहे व आयुक्तांनाही बराच पत्रव्यवहार केला आहे. १६ नं. शाळेजवळ सुलभ शौचालय बांधण्यासाठी खड्डा खोदलेला आहे. काम चालु केलेले नाही. शाळेच्या मुलांना अतिशय त्रासाचे होत आहे. म्हणुन यावर सुध्दा कार्यवाही केली जावी. व दुस–या संस्थेस हे काम दिले जावे. जी संस्था लवकरात लवकर हे काम करु शकेल.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> पीठासीन अधिकारीजी कृपया यावरील आपण आपला निर्णय जाहिर करावा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी १६ नं. शाळेजवळील शौचालयांचा उल्लेख केला. त्याच ठेकेदाराला

माझ्या प्रभागातील वसंत शहा दरबाराजवळील एक  वर्षापुर्वी सुलभ शौचालयाच्या कामाचा ठेका दिला आहे. जुने शौचालय तोडुन नविन शौचालयाचे काम अदयापपर्यंत सुरु केलेले नाही. १६ नं. शाळेजवळील व वसंन शहा दरबाराजवळील काम एकाच संस्थेला दिलेले आहे. म्हणुन त्या संस्थेची अनामत रक्कम जप्त केली जावी. हे दोन्ही प्रस्ताव आयुक्त साहेबांकडे स्वाक्षरीसाठी पडुन आहेत. आयुक्तांच्या स्वाक्षरी नंतर दुस–या संस्थेस हे काम दिले जावे.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> मी आयुक्त साहेबांना आदेश देतो की, सुलभ शौचालयांबाबत सन्माननिय सदस्यांच्या ज्या काही भावना आहेत, जे ठेकेदार काम करत नाहीत किंवा ते काम अर्धवट सोडुन गेले आहेत कृपया ती कामे लवकरात लवकर पुर्ण केली जावीत. जे करत नसतील त्यांच्यावर कारवाई केली जावी.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u> महापौर साहेबा आपण आदेश दया, ज्या विषयी मी आपणांस विनंती केली होती त्याबाबत आपण काय निर्णय दिलात? जसे झुलेलाल मार्केट येथे जे सुलभ शौचालय बांधायचे आहे ते नवल वेल्फेअर फांउडेशन या संस्थेस दिले जावे. व दुसरे काम ज्या संस्थेने पत्र दिले आहे त्या संस्थेस दिले जावे.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> ठिक आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

## <u>आयत्यावेळचा विषय</u>

<u>विषय क्र. ७ :–</u> पैसे दया व वापरा तत्वावर बॅ.नं. १८३५, झुलेलाल बाजार, कॅम्प नं. ५, कापड बाजार, व नवजीवन बॅक शेजारी, मटन मार्केट जवळ, बॅ. नं. १८२२, कॅम्प नं. ०५ येथे शौचालय बनविणेबाबत केलेला करारनामा रद्द करुन सदर जागा अन्य संस्थेस वितरीत करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

महासभा ठराव क्र. १९, दिनांक १९/५/२००३ नुसार बॅ.नं. १८३५ झुलेलाल बाजार कॅम्प नं. ५, कापड बाजार, जुन्या शौचालयाच्या जागेवर व नवजीवन बॅक शेजारी, मटन मार्केट जवळ, बॅ. नं. १८२२, कॅम्प नं. ०५ या ठिकाणी नवल वेल्फेअर फांउडेशन संस्था मार्फत ''पैसे दया व वापरा'' तत्वावर सुलभ शौचालय बांधणेस मंजुरी दिलेली आहे.

त्या अनुषंगाने संस्थेने दिनांक ६/७/०४ रोजी मनपा सोबत करारनामा केलेला असुन शौचालय देखभाल व दुरुस्तीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्याचे आत काम पुर्ण करणे बाबत नमुद केलेले आहे. तद्नंतर जा.क्र. उमपा/उप आ/आ वि/१२३६/०५, दिनांक २२/२/०५ नुसार अनामत रक्कम भरुन शौचालय बांधणेस त्वरीत सुरुवात करावी. तसे न केल्यास आपल्या सोबत केलेला करारनामा रद्द करणेस येईल असे नमुद केलेले आहे.

तद्नंतर जा.क्र. उमपा/मालमत्ता/६३१/०५, दिनांक २५/१०/०४ नुसार नोटिस बजावण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने संस्थेने दिनांक २७/१०/०५ च्या पत्रान्वये अनामत रक्कम १५ दिवसांचे आत भरणा करुन दोन महिन्याचे आत संपुर्ण काम पुर्ण करुन नागरीकांच्या वापरासाठी शौचालय उपलब्ध करु असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने इकडील पत्र संदर्भ नुसार अनामत रक्कम ७ दिवसाचे आत भरुन १५ दिवसाचे आत शौचालयाचे काम सुरु करणेबाबत कळविलेले आहे व तसे न केल्यास करारनामा रद्द करणेत येईल असे सुचित केले आहे.

परंतु नवल वेल्फेअर फांउडेशन संस्थेने दिलेल्या कालावधीत अनामत रक्कमेचा भरणा या विभागात केलेला नाही व करारातील अटी व शर्तीचा भंग केलेला आहे. त्यामुळे इकडिल पत्र क्र. उमपा/मालमत्ता/६५२/०५, दिनांक ११/११/२००५ नुसार संस्थेसोबत दिनांक ६/७/२००४ रोजी करणेत आलेला करारनामा रद्द करणेत आला आहे.

सबब मा. नगरसेवक यांनी एकता सामाजिक प्रतिष्ठान संस्थेची शिफारस केले प्रमाणे तसेच संस्थेचे दिनांक ३०/९/०५ रोजी प्राप्त झालेल्या पत्राचे अनुषंगाने करारनामा करुन घेवुन व अनामत रक्कमेचा भरणा करुन घेवुन पैसे दया व वापरा तत्वावर देणेबाबत प्रस्ताव महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६९ <u>दिनांकः—१९/१२/२००५</u>

सुचकाचे नाव :— श्री सतरामदास जेसवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री नारायण पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार नवजीवन बॅक शेजारी, मटन मार्केट जवळ, बॅ. नं. १८२२, कॅम्प नं. ०५ या ठिकाणी ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बनविणेकामी महापालिकेने नवल वेल्फेअर फांउडेशन संस्थेशी पूर्वी केलेली संविदा रद्द करीत आहे व सदर कामी प्रशासनास ''एकता सामाजिक प्रतिष्ठान'' या संस्थेशी संविदेस मान्यता देत आहे तसेच बॅ.नं. १८३५, झुलेलाल बाजार, कॅम्प नं. ५, कापड बाजार, येथिल शौचालय नवल वेल्फेअर फांउडेशन कडुन बनविण्यास संमती देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची

सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>आयत्या वेळचा</u>

<u>विषय क्र. ८ :—</u> स्थानिक स्वराज्य संस्थेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या असलेल्या पाणीपट्टी तसेच कर्जाची थकबाकी परतफेडीबाबतची वाढीव मुदतीत निर्भय योजनेनुसार भरुन अनुक्रमे विलंब आकार लाभ घेणे.

---

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>काय प्रस्ताव आहे, तो तर सांगा. चार पर्याय दिलेले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>काय प्रस्ताव आहे?

<u>श्री. सावकारे (कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा) :—</u>महापौर महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन उल्हासनगर महानगरपालिकेने जे कर्ज घेतले होते त्यामधील चार पर्यायापैकी आम्ही चौथा पर्याय निवडला आहे. ३० जुन २००६ पर्यंत जवळ जवळ २४ करोड रुपयांचे कर्ज जर आम्ही फेडत असु तर त्यामध्ये जो

विलंब शुल्क आकार दिला जावु शकतो तो महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांकडुन ८ कोटी ५५ लाख रुपये माफ होवु शकते. म्हणुन या योजनेमध्ये आपण सहभागी झाले पाहिजे यासाठी हा प्रस्ताव आहे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> २४ कोटी भरायचे आहेत?

<u>श्री. सावकारे (कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा) :—</u>होय. २४ कोटी देवु शकतो किंवा नाही ही वेगळी गोष्ट आहे. परंतु योजनेमध्ये सहभाग घेणे आवश्यक आहे. योजनेमध्ये सहभाग घेतला नाही तर विलंब शुल्क आपणांस भरावाच लागेल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> भरण्यास आम्ही तयार आहोत परंतु तशी परिस्थिती आहे काय? तेथ पर्यंत आपण पोहचु शकु का?

<u>श्री. सावकारे (कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा) :—</u> ती गोष्ट वेगळी आहे. सहभाग तर घेतला पाहिजे ना?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> हम होंगे कामयाब एकदिन, मन में है विश्वास ।

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ८ पास?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

<u>विषय क्र. ८ :—</u> स्थानिक स्वराज्य संस्थेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या असलेल्या पाणीपट्टी तसेच कर्जाची थकबाकी परतफेडीबाबतची वाढीव मुदतीत निर्भय योजनेनुसार भरुन अनुक्रमे विलंब आकार लाभ घेणे.

<u>प्रस्तावना</u>

महासभा ठराव क्रमांक : ११६ दिनांक १९/१/२००४ नुसार पारीत करुन निर्भय योजनेत भाग घेवून दंडनीय व्याज माफ होणेसाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक :उमपा/लेखा विभाग/९६० दिनांक २१/१/२००४ अन्वये मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. व एकूण ४ टप्प्यांमध्ये कर्जाची परतफेड करणेबाबत सुचित करण्यात आले होते.

सदर निर्भय योजनेचा कर्जाची परतफेड मुदतीचा कालावधी दिनांक २८/२/२००५ पर्यंत होता. सदर निर्भय योजनेत भाग घेवून सुद्धा निश्चित केलेल्या हप्त्यांची परतफेड महापालिका आर्थिक परिस्थिती अभावी करु शकली नाही . त्यामूळे निर्भय योजनेचा कालावधी संपुष्टात आला तरी महापालिका सदर निर्भय योजनेचा लाभ घेणेपासून वंचित राहिली .

आता पुन्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई, यांचे कडील पत्र कमांक अशा.पत्र क्रमांक :मजीप्रा/विवले—१/वशा/नियो/२८२ /२००५—२००६ दिनांक १४/९/२००५ अन्वये निर्भय योजनेचा दिनांक १/९/२००५ ते ३१/८/२००६ पर्यंत कालावधी वाढविला असून पुन्हा निर्भय योजनेत भाग घेणे

बाबत सदर पत्रान्वये कळविलेले आहे . त्यानुसार पुन्हा एक प्रयत्न म्हणून निर्भय योजनेचा लाभ घेणे महापालिकेच्या दृष्टीने हिताचे आहे असे वाटते . सबब खालील प्रमाणे प्रस्तावीत करीत आहे .

१) पाणी पुरवठा योजना टप्पा –१ कर्ज परतफेड :–

उल्हासनगर शहराच्या उंच संखल भागात समान तत्वावर पाण्याचे वितरण करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत खुल्या बाजारातून व जीवन आयुर्विमा महामंडळाकडून खालील प्रमाणे कर्जाची उभारणी करण्यात आलेली आहे .

| अ. क्र | तपशिल | रक्कम | कर्ज /दिनांक | व्याज दर | कर्जाचा कालवधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १ | ओ एम बी | ७.०० कोटी | ३१/३/९८ | १४.५५ | १० वर्षे |
| २ | ओ एम बी | १.५० कोटी | १८/३/९७ | १५.३५ | १० वर्षे |
| ३ | एल आय सी | १.१० कोटी | २६/३/९९ | १३.०० | २५ वर्षे |
| ४ | एल आय सी | ४.०९ कोटी | १६/९/२००२ | ११.५० | २५ वर्षे |

उपरोक्त कर्जापोटी संप्टेंबर, २००५ अखेर पर्यत देय असलेली थकीत रक्कम, व्याज व आकारण्यात आलेल्या दंडनीय व्याजाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

| अ. क्र. | तपशिल | व्याजाची रक्कम | कर्ज | व्याज | शासन हमी फी | एकूण | दंडनीय व्याज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ओ एम बी | ८५० | ६१० | ५२१ | –– | ११३१ | ७५० |
| २ | ओ एम बी | | | | | | |
| ३ | एल .आय .सी | ५१९ | ४८ | ९९ | २० | १६७ | १२ |
| ४ | एल .आय .सी | | | | | | |
| | एकूण | | ६५८ | ६२० | २० | १२९८ | ७६२ |

२) भुयारी गटार योजना कर्ज परतफेड :–

उल्हासनगर महानगरपालिकेने उल्हासनगर शहरात भुयारी गटार योजना राबविणेसाठी वर्ष १९७९–१९८६ या कालावधीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत जागतिक बॅकाकडून रुपये ११.८४ कोटी कर्जाची उभारणी केली होती . सदर कर्जाचा व्याजदर ६.६० टक्के प्रति वर्ष असून कर्जाचा कालवधी २५ वर्षापर्यंत आहे .

सन २००४–०५ या वित्तीय वर्षाअखेर प्रकल्प कर्जापोटी खालील रक्कम प्राधिकारणाकडे भरणा करावयाची आहे .

मूळ रक्कम रुपये ७४१ लाख
व्याज ४०४ लाख
एकूण ११४५ लाख
दंडनीय व्याज ४६० लाख

सदर योजना लागू झाल्यापासून ४ पर्यायी कालावधी मध्ये थकबाकीची रक्कम भरेणची मुभा आहे . ज्या स्थानिक संस्था मूळ रक्कम पूर्णत भरतील त्यांना विलंब आकारात / दंडनीय व्याजात खालील प्रमाणे सवलत देण्यात आलेली आहे .

| अ.क्र | तपशिल | विलंब आकार /दंडनीय व्याज माफीची टक्केवारी | विलंब आकार / दंडनीय व्याज भरावयाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पहिल्या तिमाही (१ सप्टे. २००५ अखेर) मूळ थकबाकी पूर्ण भरल्यास | योजना सुरु होण्याच्या दिनांकास देय असलेली | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विलंब आकाराची दंडनीय व्याजाची संपूर्ण रक्कम | |
| २ | दुसरी तिमाही (३१ डिसेंबर २००५ अखेर) मूळ थकबाकीची रक्कम भरल्यास | योजना सुरु होण्याच्या दिनांकास देय विलंब आकार दंडनीय<br>व्याज रक्कमेच्या ९० टक्के | १० टक्के |
| ३ | तिस–या तिमाही (३० मार्च २००६ अखेर) मूळ थकबाकीची रक्कम भरल्यास | योजना सुरु होण्याच्या दिनांकास देय विलंब आकार / दंडनीय<br>व्याज रक्कमेच्या ८० टक्के | २० टक्के |
| ४ | चौथ्या तिमाही ३० जुन २००६ अखेर मूळ थकबाकीची रक्कम पूर्ण भरल्यास | योजना सुरु होण्याच्या दिनांकास देय विलंब आकार /दंडनीय रककमेच्या ७० टक्के | ३० टक्के |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निर्भय योजनेचा विचार करता, उल्हासनगर महानगरपालिकेस पाणी पुरवठा योजनेत टप्पा –१ या कर्जापोटी माहे संप्टेंबर २००५ रोजी देय असलेली मूळ रक्कम ६५८ लाख, व्याज रक्कम रुपये ६२० लाख अशी एकूण रक्कम रुपये १२७८ लाख दंडनीय व्याज रक्कम रुपये ७६२ लाख , शासन हमी फी रक्कम रुपये २० लाख देणे बाकी आहे.

तसेच भुयारी गटार योजने अंतर्गत माहे संप्टेंबर २००५ रोजी देय असलेली मुळ रक्कम रुपये ७४१ लाख , व्याजाची रक्कम रुपये ४०४ लाख अशी एकूण रक्कम रुपये ११४५ लाख, दंडनीय व्याज रक्कम रुपये ४६० लाख एवढी देणे बाकी आहे.

निर्भय योजने अंतर्गत उपरोक्त तक्त्यातील ४ पर्यायापैकी कोणताही एक पर्याय स्विकारणे आवश्यक आहे. त्यामुळे पाणी पुरवठा योजने अंतर्गत घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी चौथा तिमाही हप्ता ३० जुन, २००६ अखेर हा पर्याय स्विकारण्याचे प्रस्तावीत आहे

सबब मुळ रक्कम ६५८ , व्याजापोटी थकबाकीची रक्कम रुपये ६२० लाख ,व शासन हमी फी रक्कम रुपये २० लाख, एकूण रक्कम रुपये १२९८ लाख भरल्यास त्यावरील दंडनीय व्याज रक्कम रुपये ५३३.४० लाख ( ७६२ – २२८.६० ) लाख माफ होवून महापालिकेस त्याचा लाभ होईल.

सबब भुयारी गटार योजना परतफेडी करीता उपरोक्त तत्क्यातील ४ था पर्याय म्हणजे जुन २००६ अखेर स्विकारण्याचे प्रस्तावीत आहे .

भुयारी गटार योजने अंतर्गत रक्कम रुपये ११४५ भरल्यास एकूण विलंब शुल्क रक्कम रुपये **३२२ लाख** (४६०–१३८) लाख माफ होवून महापालिकेस त्याचा फायदा होईल.

उपरोक्त तक्त्यातील पर्याय क्रमांक ४ च्या लाभ घेण्याच्या दृष्टीने सदर निर्भय योजनेत भाग घेवून एकूण रुपये **२४४३ लाख** व्याजासह कर्ज परतफेड करुन विलंब शुल्क ८५५.४० **लाख** माफ करण्याचा प्रयत्न करणे महापालिकेच्या दृष्टीने हिताचे होईल .

सबब पुर्वीचा प्रस्ताव विचारात घेवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी वाढविलेल्या मुदतीचा फायदा घेणेसाठी कर्जाची परतफेड करणेबाबत महासभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावीत करीत आहे.

महासभा ठराव क्र: ७० दिनांक:–१९/१२/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर पाणी पुरवठा योजना टप्पा क्र. १ व भुयारी गटारी योजना या कर्जावरील वा थकित रक्कमेवर दंडनीय व्याज माफ होणेकामी महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या निर्भय योजने अंतर्गत सहभागी होण्यासाठी व कर्जाच्या परतफेडीसाठी वरील तक्त्यातील

चार पर्यायांपैकी प्रशासनाने सुचविलेला पर्याय क्र. ४ स्विकृत करीत आहे व सदरहु योजनेचा लाभा घेण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

उप— महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

---

⇨ आयत्या वेळचा

विषय क्र. ९ :— श्री. छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी, उल्हासनगर—४ या संस्थेस शैक्षणिक उद्देशांसाठी उल्हासनगर—४ येथिल भुखंड क्र. २४९, २५० देणे

---

काही सदस्य :—पास—पास......

मा. सचिव :—नाही, यामध्ये एक अडचण आहे, ती अशी आहे की, त्यांची जी इमारत आहे ती बेकायदेशीर आहे. तीचे आपण काय करणार?

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— तीचा तसा उल्लेख करुन या प्रस्तावाबाबत ठराव पारीत करुन भुखंड दिला जावा.

मा. सचिव :— त्यासाठी ते लोक जबाबदार राहतील.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— ठिक आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:— त्यासाठी ते लोक जबाबदार राहतील.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— इमारत बेकायदेशीर आहे? तसे तर संपुर्ण शहर बेकायदेशीर आहे. जे काय होईल ते यांच्या बाबतीत सुध्दा होईल.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— आता मुद्दा भुखंडाचा आहे ना? भुखंड दिला जावा.

मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :— मा. महापौर साहेब, हा प्रस्ताव पारीत केला जावा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी :— सचिव साहेब, आम्हांला माहित पडले आहे की, एक विधी अधिकारी आला आहे. तर त्याची ओळखही करुन दिलेली नाही.

<u>मा. सचिव :–</u>आधी त्यांची ओळख करुन देतो. त्यांचे नाव श्री. एस.एस. साळवी असे आहे. त्यांना विधी सल्लागार म्हणुन सहा महिन्यासाठी ठेकेपध्दतीवर नियुक्ती दिली आहे. यानंतर त्यांची ओळख ते स्वतः करुन देतील.

<u>श्री. एस.एस. साळवी (विधी सल्लागार) :–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य ....

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> यांना मागील आयुक्तांनी नियुक्ती दिली आहे.

<u>मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–</u> महापौर साहेब, आयुक्तांनी यांची नेमणुक करतांना महानगरपालिकेची परवानगी घेतली होती का?

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> आयुक्त साहेबांनी जेव्हा यांची नियुक्ती केली, सहा महिन्यापर्यंत नेमणुक देण्याचे अधिकार त्यांना आहेत. एक वर्षापर्यंत नेमणुक देण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे. दोन वर्षापर्यंत नेमणुक देण्याचे अधिकार महासभेला आहे. आयुक्तांनी आपल्या अधिकारक्षेत्रामध्ये विधी सल्लागारांची नेमणुक केली आहे. त्यानंतर महासभा निर्णय घेईल काय करायचे आहे ते. परंतु ते एलएलबी आहेत म्हणुन विधी अधिकारी म्हणुन नेमणुक दिली आहे, आपली नेमणुक होवुन किती दिवस झाले आहेत? मागील महिन्याच्या २५ तारखेला? २५ नोव्हेंबर.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> महापौरजी व आयुक्त साहेब, अशा प्रकारची नेमणकु या अगोदर कुण्या एकाची झाली होती. आम्ही कुण्या एका व्यक्तीच्या विरोधात नाही. मग ते साळवी साहेब असोत किंवा दुसरे कोणी असोत. मला असे वाटते की, सेवा निवृत्त व्यक्तीला नियुक्त करण्याचे अधिकार आयुक्तांना सुध्दा नाहीत. मागील वेळेस जेव्हा ४ नेमणुका झाल्या तेव्हा सुध्दा आम्ही विरोध केला होता. त्यांनतर आयुक्तांनी त्या चारही नेमणुका रद्द केल्या होत्या. त्या सर्व बेकायदेशीर नेमणुका होत्या. आमचा कोणत्याही व्यक्ती विशेषशी विरोध नाही. कुण्याही व्यक्तीची नेमणुक असो, त्या व्यक्तीस बडतर्फ केले पाहिजे.

<u>श्री. एस.एस. साळवी (विधी सल्लागार) :–</u> माझं स्वतःचे नाव एस.एस. साळवी असे आहे, मी न्यायालयामध्ये २३ वर्ष न्यायदानाचे काम केले आहे. त्यातल्या त्यात उल्हासनगर न्यायालयात मुख्य न्यायाधिश म्हणुन १ वर्ष काम केले आहे. आणि इतर न्यायालयांमध्ये असे मिळुन एकुण २३ वर्ष न्यायदानाचे काम केले आहे. त्याच्या अगोदर ५ वर्ष वकिली केली आहे. येथे येण्यापुर्वी सुध्दा मी विधी सल्लागार म्हणुन अनेक ठिकाणी काम केले आहे. आणि शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे निवृत्त न्यायाधिश किंवा निवृत्त सरकारी कर्मचारी यांना महापालिकेमध्ये अशा प्रकारच्या नेमणुका देता येतात. ते परिपत्रक या पुर्वीचे जे आयुक्त होते त्यांना ते दाखविले आहे. आपण त्यावर विचार करा. माझे काही म्हणणे नाही.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> ही बाब कायदेशीर आहे का? हे स्पष्ट करण्याचे काम आयुक्तांचे आहे. आम्ही जसे सांगितले की, या अगोदर चार अशा नेमणुका झाल्या होत्या आम्ही हरकत घेतल्यानंतर त्या चारही नेमणुका तत्कालीन आयुक्त श्री. आर.के. सोनवणे यांनी रद्द केल्या होत्या. नैमित्तीक स्वरुपाच्या कोणत्याही नेमणुका करण्याचे आयुक्तांना अधिकार नाहीत. याबाबत आयुक्तांनी निर्णय घेतला पाहिजे व मीरा–भाईंदरमध्ये सुध्दा अशा प्रकारची नेमणुक झाली होती. तर मंत्रालयातुन, नगर विकास विभागाच्या आदेशाने ती नेमणुक रद्द झाली आहे. अशा नेमणुका का होतात तेच आम्हांला समजुन येत नाही.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> आयुक्त साहेब, श्री. पंजाबी साहेब म्हणतात की, ही नेमणुक बेकायदेशीर आहे?

<u>मा. आयुक्त (श्री. डी.एस.पाटील):–</u> ही जी नेमणुक आहे ती कायदेशीर आहे की बेकायदेशीर हे पाहुन पुढील कार्यवाही करेन.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :– साळवी साहेबांनी जे पत्र दिले आहे ते कोठुन आले आहेत? ते जे पत्र दिले आहे ते महाराष्ट्र शासनाचे आहे की, .......................

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– पिठासीन अधिकारीजी, आपण आपला निर्देश दया.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :– ती जी नेमणुक आहे ती बेकायदेशीर आहे. जर बेकायदेशीर असेल तर त्यांना कामावरुन काढुन टाकले जाईल. सभागृहाचे मत घेवुन ठराव करु या. भलेही आपण सभागृहाचे मत घ्या.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :–मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, हे जे साळवी साहेब आलेले आहेत यांना आयुक्तांनी नियुक्त केले आहे की, राज्य शासनाने नियुक्त केले आहे. याबद्दलची माहिती दया.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–नाही, नाही या अगोदरच्या आयुक्तांनी नेमणुक केली आहे.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :– राज्य शासनाने नेमणुक केलेली नाही का?

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :– नाही, नाही.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :– राज्य शासनाच्या आयुक्तांना तशा मार्गदर्शक सुचना नाहीत का?

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–नाही, राज्य शासनाचा काही संबंध नाही.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :– त्यांना महानगरपालिकेत सामावुन घेतल्यानंतर त्यांचे कार्य काय राहिल? तेही सांगितले जाईल, त्याबद्दलचीही माहिती दया. मा. आयुक्त साहेब, त्यांचा आपणाला काय फायदा होईल? त्याची माहिती घ्या त्यानंतर त्यांना ठेवायचे की नाही हा त्यानंतरचा प्रश्न आहे. अगोदरचा प्रश्न तुम्ही कसा उद्भवत आहात. ते नंतर ठरावा, अगोदरच नको आहे नको आहे? त्यांचे कार्य काय आहे? त्यांचा आपणाला किती फायदा होईल त्याबद्दलची माहिती घ्या.

मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :–पुढील महासभेत आयुक्त साहेब याबाबतचा प्रस्ताव आणतील.

श्री. एस.एस. साळवी (विधी सल्लागार) :– आता माझ्या समोर एक विषय कायदेशीर मत देण्यासाठी आलेला आहे. त्याबाबत मला असे म्हणायचे आहे की, भुखंड क्र. २४९ आणि २५० हा ज्या संस्थेने मागितला आहे तो त्या संस्थेस देता येईल किंवा नाही?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :– आपण जे कायदेशीर मत देण्यासाठी उभे राहिला आहात तर आपणाकडे कायदेशीर मत कोणी मागितले आहे? विरोधी पक्ष नेता यांनी मागितले आहे की सत्ताधारी पक्षातील कोणी मागितले आहे?

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :–महापौरांनी मागितले आहे.

श्री. एस.एस. साळवी (विधी सल्लागार) :–माझ्याकडे आता हा प्रस्ताव दिलेला आहे.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :– मा. आयुक्त साहेब, त्यांनी आपली ओळख दिलेली आहे. त्यामुळे दुसरे सदस्य आता त्यांची परिक्षा घेत आहेत काय? मा. आयुक्त साहेब, त्यांनी आपला परिचय करुन दिलेला आहे, त्यांनी कुठे कुठे नोकरी केली आहे. काय काय काम केले आहे. तुम्ही काय त्यांची परिक्षा घ्यायला बसले आहात काय? सभागृहामध्ये हे काय चुकीचे चालले आहे? हे जे सभागृहात चालले आहे ते चुकीचे चालले आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> शाळेच्या भुखंडाचा जो विषय चालु आहे. त्याबाबत मी विचारणा केली की, प्रशासनाने जो प्रस्ताव आणला आहे तो कायदेशीर आहे का? तर त्यावर पीठासीन अधिका—यांनी आयुक्तांना सांगितले की, जे विधी सल्लागार नेमले आहेत त्यांना याबाबत खुलासा करायला सांगा.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> हे चुकीचे आहे. श्री. प्रशांत जाधव जे म्हणतात ते बरोबर आहे. अशी परिक्षा घेणे चुकीचे आहे. तो विषय नाही तर विषय कसा झाला? त्याबाबतीत मुलाखतीसारखी परिक्षा घेणे बरोबर नाही.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>मुलाखतीची गोष्ट नाही.

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—</u>महापौर महोदय, .....

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>पास—पास....... कायदेशीरच असेल ना?

<u>काही सदस्य :— </u>पास—पास.....

<u>मा. सचिव :—</u> परंतु जो प्रस्ताव आहे त्याचा ठराव अशा प्रकारचा असेल तो जरा मी आपणांस वाचुन दाखवितो. कारण की यामध्ये कायदेशीर अडचण असल्याने आपणासाठी तो वाचुन दाखविणे व आपण ऐकुन घेणे आवश्यक आहे.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे भुखंड क्र. २४९, शिट क्र. ४० व ४१, उल्हासनगर—४ मंजुर विकास आराखडयामधील आरक्षण क्रमांक १०१ प्राथमिक शाळेसाठी राखीव असलेली ९१८० चौरस वारांपैकी ६४५० चौरस वार एवढी जागा श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटीला शैक्षणिक उद्देशासाठी खालील अटी व शर्तीवर हस्तांतरण करण्यास हरकत नाही.

१) सदरहु जागेची मालकी महाराष्ट्र शासनाकडे असल्याने नियमीत हस्तांतरण उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्या मार्फत करता येईल.

२) सदरहु जागेवरील ६४५० चौरस वारांपैकी ५६८ चौरस वार एवढया क्षेत्रावर असलेल्या अनधिकृत बांधकामा विरुध्द् महापालिकेतर्फे अपेक्षित कारवाईवर संस्थेस आक्षेप घेता येणार नाही.

३) सदरहु जागेचा वापर शैक्षणिक उद्देशाशिवाय करता येणार नाही.

४) सदरहु जागेची सनद उपविभागीय कार्यालयातर्फे दिल्यानंतर सदरचे हस्तांतरण अंतिम मानण्यात येईल.

ठिक आहे?
पास? विषय तर येथे समाप्त झाले. दुसरी सभा आहे तीच्याबद्दल.................

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>जेवल्यानंतर अर्ध्या तासानंतर दुसरी सभा ठेवु या. दुपारी ३.३० वाजता... आपणांस वाटत असेल सभेचे कामकाज तहकुब करावे तर तहकुब करा.

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

विषय क्र. ९ :–श्री. छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी, उल्हासनगर–४ या संस्थेस शैक्षणिक उद्देशांसाठी उल्हासनगर–४ येथिल भुखंड क्र. २४९, २५० मिळणे.

प्रस्तावना

श्री. छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटी, उल्हासनगर–४ या संस्थेस भुखंड क्र. २४९, २५० मिळणेबाबतची मागणी सदर संस्थेकडुन करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. भुखंड क्र. २४९, शिट नं. ४० व ४१, उल्हासनगर–४ ही जागा मंजुर विकास आराखडयानुसार आ.क्र. १०१ प्राथमिक शाळेसाठी राखीव आहे व प्रारुप आराखडयामध्ये अस्तित्वातील शाळा दर्शविले आहे. उल्हासनगर शहर वसाहत यांचेकडुन सदर जागेचा कागदोपत्री ताबा, त्यांचेकडील पत्र क्र./प्रशासन/प्र.भु./वशी–३३, दिनांक १०.३.८७ रोजी ९१८०.०० चौ. वार तत्कालीन नगरपालिकेस हस्तांतण केले आहे.
२. सदर संस्थेने प्लॉट नं. २४९ यामध्ये सन १९६७ पासुन अनधिकृतपणे अतिक्रमण केले आहे. शिक्षण अधिका–यांचे पत्रावरुन दिसून येते. संस्थेने मालकी हक्काचे कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. प्राथमिक शाळेचा वापर मंजूर व प्रारुप विकास आराखडयानुसार अनुज्ञेय आहे. नगर भुमापन कार्यालय यांचेकडील मालमत्ता उतारा मध्ये सदर संस्थेस अतिक्रमणदार दर्शविण्यात आले आहे. (आखिव पत्रिका क्र. २३५५८–अ व २३५५९) संस्थेतर्फे सदर भुखंडावर शासनमान्य अनुदानीत मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविली जात आहे.
३. भुखंड क्र. २४९ व २५० समोर मंजुर व प्रारुप आराखडयानुसार ४०’ रस्ता दाखविलेले आहे. त्यानुसार शैक्षणिक वापर अनुज्ञेय आहे.
४. सदर संस्थेने उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर शहर वसाहत यांचेकडील दिनांक २.१२.०३ रोजी दिलेला नकाशा सादर केलेला आहे. नकाशाप्रमाणे प्लॉट नं. २४९ (भा) मधील एकुण ६४५०.०० चौ.वार जागा संस्थेच्या नांवे होणेबाबत मागणी केली असल्याचे सदर नकाशात नमुद केले आहे.
५. सदर भुखंडात एकुण ६४५० चौ. वार जागेपैकी अस्तित्वात असलेल्या बांधकामाचे अंदाजे ५६८ चौ.वार क्षेत्र विनापरवानगी व नियंत्रण नियमावलीचा उल्लंघन करुन प्राथमिक शाळेचे बांधकाम करुन व त्याचा वापर सुरु आहे. जागेवरील अस्तित्वातील बांधकाम, बांधकाम नियंत्रण नियमावलीनुसार नसल्याने सदर अनधिकृत बांधकाम नियमित करता येणार नाही.
६. भुखंड क्र. २४९ ही जागा मंजुर व प्रारुप प्रसिध्द विकास आराखडयानुसार अनुक्रमे प्राथमिक शाळेसाठी आरक्षित आहे. विभागात व अस्तित्वातील प्राथमिक शाळा म्हणुन दर्शविण्यात आली आहे. सदर जागा ही महानगरपालिका, उल्हासनगर यांची असल्याने सदर जागेवरील संस्थेस देण्याबाबत शासनास शिफारस करण्यापुर्वी महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. याबाबत मा. आयुक्तांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

सदर जागा अर्जदारास शासनाकडुन देण्याबाबत निर्णय होणे आवश्यक असल्याने प्रकरणी विचारविनिमयाकरीता महासभेपुढे प्रस्ताव सादर करणेस विनंती.

महासभा ठराव क्र: ७१ दिनांक:–१९/१२/२००५

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे भुखंड क्र. २४९, शिट क्र. ४० व ४१, उल्हासनगर–४ मंजुर विकास आराखडयामधील आरक्षण क्रमांक १०१ प्राथमिक शाळेसाठी राखीव असलेली ९१८० चौरस वारांपैकी ६४५० चौरस वार एवढी जागा श्री छत्रपती शिवाजी एज्युकेशन सोसायटीला शैक्षणिक उद्देशासाठी खालील अटी व शर्तीवर हस्तांतरण करण्यास हरकत नाही.

१) सदरहु जागेची मालकी महाराष्ट्र शासनाकडे असल्याने नियमीत हस्तांतरण उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांच्या मार्फत करता येईल.

२) सदरहु जागेवरील ६४५० चौरस वारांपैकी ५६८ चौरस वार एवढया क्षेत्रावर असलेल्या अनधिकृत बांधकामा विरुध्द् महापालिकेतर्फे अपेक्षित कारवाईवर संस्थेस आक्षेप घेता येणार नाही.

३) सदरहु जागेचा वापर शैक्षणिक उद्देशाशिवाय करता येणार नाही.

४) सदरहु जागेची सनद उपविभागीय कार्यालयातर्फे दिल्यानंतर सदरचे हस्तांतरण अंतिम मानण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उप—महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :—</u>चालु ठेवा. जेवण्याची व्यवस्था केलेली आहे, सभा चालु ठेवा. सभा तहकुब करण्याबाबत गिनिज बुकामध्ये आपले नाव जाता कामा नये म्हणुन सभेचे कामकाज चालु ठेवा.

<u>मा. उपमहापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>दुसरी सभा ४.०० वाजता......

<u>मा. सचिव :—</u> दुस—या सभेचे आयोजन ४.०० वाजता केले जाईल.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी २.३० वाजता मा. उप—महापौर तथा पिठासीन अधिकारी श्री. विनोद तलरेजा यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

दिनांक:—१९ डिसेंबर, २००५

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१२/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.१२.२००५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | १८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | १९. | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु | २०. | श्री. सतरामदास जेसवानी |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना | २१. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |
| ७. | श्रीमती मोकल सीमा | २२. | श्रीमती खिलनानी भावना |
| ८. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | २३. | श्रीमती माने किरण |
| ९. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | २४. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| १०. | श्री. उमाप रामदास | २५. | श्री. पाटील विश्वनाथ |
| ११. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | २६. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १२. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | २७. | श्री. पंजाबी नारायण |
| १३ | श्रीमती अनिता गुप्ता | २८. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १४. | श्री. पवार नाना | २९. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| १५. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ३०. | श्रीमती निना नाथानी |
| १६. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ३१. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| १७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ३२. | श्रीमती दासानी मिनु |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. सोनवणे नथु, २. श्री. वाघे शामु, ३. श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे, ४. श्री. दिलीप गायकवाड, ५. श्री. एडके गणपत गोविंद, ६. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ७. श्री. मुलचंदानी महेंद्र, ८. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल, ९. श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती, १०. श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे, ११. श्री. निकम शांताराम, १२. श्री. टाले प्रमोद, १३. श्री. ठाकुर विनोद लालसिंग, १४. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), १५. श्रीमती वसिटा बेबी, १६ . श्री. ठाकुर अशोक, १७. श्री. वनवारी किशोर नारायणदास, १८. श्री. साधवानी मोहन, १९. श्रीमती साधवानी जया, २०. श्री. बच्चाराम रुपचंदानी, २१. श्री. राज असरोंडकर, २२. श्री. रमेश चव्हाण, २३. श्री. जाधव प्रशांत, २४. श्री. जाधव सुरेश, २५. श्री. देवेंद्रसिंग खेमाणी, २६. श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल, २७. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास, २८. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, २९. श्री. भालेराव गौतम, ३०. श्रीमती कृष्णानी रेखा, ३१. श्री. रामरख्यानी मोहनदास, ३२. श्रीमती किरण माखिजा, ३३. श्री. जयसिंघानी अनिल, ३४. श्रीमती करोतिया मालती, ३५. श्री. अंकुश म्हस्के, ३६. श्री. साधवानी मनोज, ३७. श्री. पुरस्वानी जमनादास, ३८. श्रीमती भटिजा कोमल, ३९. श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना, ४०. श्रीमती मीनु राजकुमार दासानी, ४१. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ४२. श्रीमती छाब्रिया भारती, ४३. श्री. जग्यासी राजु, ४४. श्री. संजय रामचंद्र बठीजा, ४५. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ४६. श्री. पंजाबी लाल देवनदास, ४७. श्री. लालवानी दिलीप जेठानंद, ४८. श्री. हरदास माखिजा, ४९. श्री. राजेश वदारिया, ५०. श्री. इदनानी राजु चंद्रभान हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

दुपारी ४.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. महापौर :– आजच्या या सभेचे कामकाज पुढील सुचना देईपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी ४.०० वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–    डिसेंबर, २००५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.  /१२/२००५ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १९.१२.२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित झाल्यामुळे ती सभा  सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी
२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३५. | श्रीमती माने किरण |
| ४. | श्री. सोनवणे नथु | ३६. | श्री. रमेश चव्हाण |
| ५. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३७. | श्री. जाधव प्रशांत |
| ६. | श्रीमती मोकल सीमा | ३८. | श्री. जाधव सुरेश |
| ७. | श्री. दिलीप गायकवाड | ३९. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| ८. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४०. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ९. | श्री. एडके गणपत गोविंद | ४१. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४२. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४३. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. उमाप रामदास | ४४. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १३ | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४५. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १४. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४६. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १५. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४७ | श्री. अंकुश म्हस्के |
| १६. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४८. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १७. | श्री. पवार नाना | ४९. | श्री. पंजाबी नारायण |
| १८. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५०. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १९. | श्री. जग्यासी राजु | ५१. | श्री. साधवानी मनोज |
| २०. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ५२. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २१. | श्री. निकम शांताराम | ५३. | श्रीमती भटिजा कोमल |
| २२. | श्री. टाले प्रमोद | ५४. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २३. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५५. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५६. | श्रीमती निना नाथानी |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५७. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २६. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २७. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ५९. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २९. | श्री. साधवानी मोहन | ६१. | श्रीमती दासानी मिनु |
| ३०. | श्री. सतरामदास जेसवानी | ६२. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३१. | श्रीमती साधवानी जया | ६३. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३२. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६४. | श्री. हरदास माखिजा |
| ३३. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | ६५. | श्री. राजेश वदारिया |
| ३४. | श्री. राज असरोंडकर | | |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, २. श्री. टेकचंदानी राजु, ३. श्रीमती रामचंदानी भावना, ४. श्री. वाघे शामु, ५. श्री. मुलचंदानी महेंद्र, ६. श्रीमती वसिटा बेबी, ७. श्री. ठाकुर अशोक,

८. श्रीमती अनिता गुप्ता, ९. श्रीमती भावना खिलनानी, १०. श्री. भालेराव गौतम, ११. श्री. रामरख्यानी मोहनदास, १२. श्रीमती किरण माखिजा, १३. श्री. जयसिंघानी अनिल, १४. श्रीमती करोतिया मालती, १५. श्रीमती मीनु राजकुमार दासानी , १६. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १७. श्री. इदनानी राजु चंद्रभान
हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

दुपारी वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>मा. सचिव :—</u> प्रश्न क्र. ४५६ हा श्री. रामदास उमाप यांचा असून त्यांनी प्रश्न मागे घेतला आहे.

प्रश्न क्र. ४५७ हा श्री. प्रमोद टाले यांचा आहे.

<u>**प्रश्न क्र. ४५७ :—**</u> खालील दर्शविलेल्या ठिकाणातील बांधकामे महानगरपालिकेच्या नियमानुसार आहे का?

संबंधीत बांधकामावर आपण काय कारवाई केली आहे?

आजच्या तारखेला सदर बांधकामाची स्थिती काय आहे?

१) सर्वानंद हॉस्पीटलच्या पाठीमागे असलेले लोड बेअरींग काम.
२) वसंत बहार रोडमध्ये चालु असलेले आर.सी.सी. बांधकाम.

<u>उत्तर :—</u> सदर लोड बेअरींगचे पहिल्या मजल्यावरील बांधकाम दिनांक १५/११/२००५ रोजी निष्कासित करण्यात आलेले आहे.

सदर बांधकामाचा नकाशा मंजूर असून, वाढीव बांधकामाबाबतचा अहवाल नगररचनाकार विभागाकडून प्राप्त होताच पुढील कारवाई करण्यात येईल.

<u>**मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :—**</u> उत्तर ठिक आहे.

<u>**मा. सचिव :—**</u> प्रश्न क्र. ४५८ हा श्री. राजेंद्र चौधरी यांचा आहे.

<u>**प्रश्न क्र. ४५८:—**</u> माहे जूलै ऑगस्ट—२००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व त्यामूळे निर्माण झालेल्या पुरपरिस्थितीमुळे शहरातील बहूतांश परिसरात पुराचे पाणी शिरुन मोठया प्रमाणात नुकसान मोडतोड व वित्तहानी झालेली आहे. अनेक गोरगरीब नागरीकांची घरे हक्काचा निवारा पूर्णपणे उध्वस्त होऊन त्यांचे संसार रस्त्यावर आले आहेत. पूरामुळे नुकसान झालेल्या पुरग्रस्त नागरीकांना महानगरपालिकेतर्फे घरपट्टी (हाउस टॅक्स) माफ करणेसाठी ठराव पारीत केला गेला आहे का? असल्यास त्यांची प्रत मिळावी तसेच त्या अनुषंगाने खालील प्रश्नांवर महासभेत चर्चा होऊन सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

प्र.क्र. १ अ) पुरग्रस्त नागरीकांना घरपट्टी माफ करणेचा ठराव पारीत झाला असल्यास त्यांची अंमलबजावणी होणार आहे किंवा नाही?

<u>उत्तर :—</u> नाही.

पुरग्रस्त नागरीकांना घरपट्टी माफ करणेबाबतचा ठराव अद्याप पारित झालेला नाही. त्यामुळे अंमलबजावणीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव :–</u> प्रश्न क्र. ४५९ हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

? <u>प्रश्न क्र. ४५९ :–</u> श्री. किसन लाहोरी यांनी प्लॉट नं. ६१९ (पी) मधूबन हॉटेलसमोर, उल्हासनगर–१ या ठिकाणी इमारत बांधकाम केले असून त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

प्र.क्र. १ अ ) सदर इमारतीचा प्लान मंजूर आहे का? प्लान कोणाचे नावे मंजूर झाला आहे?
ब) इमारतीची सनद किती चौरस वॉल आहे? इमारतीत किती चौ. यार्ड जागा इमारतीकडे उपलब्ध आहे का?
क) सदर इमारत बांधकाम किती मजली आहे? इमारतीच्या प्रत्येक माळयावर किती प्लान मंजूर आहे? प्रत्येक मजल्यावर किती सदनिका आहेत? इमारतीत किती दुकाने आहेत?
ड) इमारतीने पायाभरणी व पुर्णत्वाचा दाखला घेतला आहे का?
ई) सदर भुखंड आरक्षीत आहे का? कश्यासाठी?
प) सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे आहे का? सदर इमारतीत वाढीव बांधकाम केले आहे का? केले असल्यास वाढीव बांधकाम किती?
फ) सदर इमारतीचे वाढीव अनधिकृत बांधकामास नोटीस बजावली आहे का? कोणत्या प्रकारची तिचा कालावधी किती होता तो संपृष्टात आला का? प्रशासनाने सदर इमारती विरुध्द कोणती कारवाई केली आहे का?

<u>उत्तर :–</u> अ) होय. सदरचा नकाशा श्री. चंदर के. मोर्यानी व इतर यांचेतर्फे कुलमुखत्यार श्री. भरत डी. गालानी यांचे नांवे मंजूर करण्यात आलेला आहे.
ब) ५६७.७२ चौ.मी.
क) सदर इमारतीस तळमजला + ४ मजलेची परवानगी देण्यात आलेली आहे व प्रत्येक मजल्यावर २ सदनिका मंजूर करण्यात आलेल्या आहेत व दुकानांना मंजूरी देण्यात आलेली नाही.
ड) सदर इमारतीस दि. १४.८.२००२ रोजी पायाचा दाखला देण्यात आलेला आहे व बांधकाम पुर्णतेचा दाखला देण्यात आलेला नाही.
ई) नाही.
प) नाही. सदर इमारतीमध्ये तळमजला + ५ मजले मिळुन एकूण २४४.१५ चौ.मी.चे अनधिकृत बांधकाम आहे.
फ) सदर इमारतीस दि. १६.९.२००५ रोजी अतिक्रमण विभागातर्फे नोटीस बजावण्यात आलेली आहे व त्याचा कालावधी एक महिन्याचा आहे व त्याबाबत अनधिकृत बांधकाम विभागामार्फत कारवाई करण्याचे काम सुरु आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> उत्तर ठिक आहे.

<u>मा. सचिव :–</u> प्रश्न क्र. ४६० हा श्री. रमेश चव्हाण यांचा आहे.

? <u>प्रश्न क्र. ४६० :–</u> महात्मा फुले शिक्षण हमी योजना राबविणे प्रकरणी केलेल्या मुद्दयांची माहिती आगामी महासभेपुढे मांडण्यात यावी. व लेखी स्वरुपात त्याचा खुलासा देण्यात यावा ही विनंती.

१. महात्मा फुले शिक्षण हमी योजना महापालिकेमार्फत राबविणेत येते का?

२. असल्यास एकुण किती लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळाला आहे?
३. योजनेची अंमलबजावणी केव्हापासुन करण्यात आली आहे?
४. सदर योजनेची अंमलबजावणी केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत? योजना अदयाप सुरु न करण्यास त्यास जबाबदार कोण?

१. उत्तर :— होय.
२. एकुण लाभार्थी ५,१०८
३. सदर योजनेची अंमलबजावणी २००१—०२ पासून सुरु झाली आहे.
४. सदर योजनेबाबत फौजदारी गुन्हा दाखल असल्याने अंमलबजावी थांबविली आहे. योजनेबाबत पोलिस चौकशी सुरु असल्याने निश्चित कुणाला जबाबदार धरता येणार नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— उत्तर ठिक आहे.

मा. सचिव :— प्रश्न क्र. ४६१ हा श्री. मोहन साधवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. ४६१ :— हाउ मेनी चेरीटेबल ट्रस्ट /एज्युकेशन ट्रस्ट/ रिलीजीअस ट्रस्ट हॅव अप्लाय्ड फोर ग्रान्ट / अेड अॅण्ड हाउ मेनी ऑफ देम हॅव बीन गिवन ग्रान्ट/ अॅड इन लेझी ३ इअरर्स. एल्सो मेन्शन हाउ मच अमाउंट हॅस बीन सेक्शनड् फोर द लास्ट ३ इअरर्स.
काइन्डली डु द निडफुल अॅण्ड ऑबलाईज.

उत्तर :— शासनाकडे ४ शैक्षणिक संस्थांनी या कार्यालयामार्फत अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले होते. मागील ३ वर्षात एका शैक्षणिक संस्थेला शासनाकडून अंशत: अनुदान मंजुर झाले आहे. सदर अंशत: अनुदाना वितरण वेतनपथक (प्राथ.)जि.प. ठाणे यांचेमार्फत करण्यात आले. त्यामुळे निश्चित अनुदानाची रक्कम या कार्यालयाकडून सांगता येत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन साधवानी :— उत्तर ठिक आहे.

मा. सचिव :—विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. २ :— मागील विशेष महासभेचे दिनांक ०५/१२/२००५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :— पास—पास..........

मा. सचिव :— इतिवृत्त कायम? कुणाची काही हरकत?

मा. महापौर :— मागील विशेष महासभेचे दिनांक ०५/१२/२००५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

मा. सचिव :—विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३** :—एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा—२ अंतर्गत महापालिका हद्दीतील रस्त्यांचे रुंदीकरण व नुतनीकरण करणेकामी ४९ कामांच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

---

<u>मा. सचिव :—</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ४ :— <u>प्रस्तावाची सुचना :—</u>

महापालिकेच्या आस्थापनेवरील ''अतिरिक्त आयुक्त'' हे पद रद्दबातल करणेसाठी सन्माननिय पालिका सदस्य श्री. किशोर वनवारी व श्री. विनोद ठाकुर यांच्या प्रस्तावाची सुचना विचारात घेणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. महापौर :—</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

---

☑

---

<u>मा. सचिव:—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(प्रकाश पं. कुकरेजा)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका